१२०
२

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रं १२०/२
मंडळ

# इस्लामची सामाजिक रचना

रुबेन लेव्ही लिखित

## SOCIAL STRUCTURE OF ISLAM

या ग्रंथाचा मराठी अनुवाद

●

अनुवादक

श्री. श्रीपाद केळकर

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

भाषांतरमाला क्र. ६४

# इस्लामची सामाजिक रचना

रूबेन लेव्ही लिखित

## SOCIAL STRUCTURE OF ISLAM

या ग्रंथाचा मराठी अनुवाद

अनुवादक

श्री. श्रीपाद केळकर

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : १९७६ ( शके १८९८ )

प्रकाशक :

© सचिव,

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई ४०००३२.

**किंमत : रु. २८·५०**

मुद्रक :

नाना डेंगळे
साधना प्रेस,
४३०-३१ शनिवार, पुणे ४११०३०

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञान-विज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत, त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात ठेवून साहित्य-संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती–विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्ययावत् माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही; एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञान-विज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश, अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशा पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके, त्यासाठी निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रूसो, कींट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय, दोस्तएव्स्की, कॅसिरेर, गॉर्डन व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक; तसेच प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. मंडळाच्या भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यंत अनेक अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिल्चे ' On Liberty ', रुसोचे ' Social Contract ', एम्. एन. रॉय्ची ' Reason, Romanticism and Revolution ' व ' Letters from Jail ', स्तानिस्लाव्स्कीचे ' An Actor Prepares ', तुर्गेनिवचे ' Fathers and Sons ', रायशेनबाखचे ' Rise of Scientific Philosophy ', गन्नर मिरदाल्चे ' Economic Theory and Underdeveloped Regions ', पां. वा. काणे यांचे ' History of Dharma-shastra ', कोपलँड्चे ' Music and Imagination ', बर्ट्रांड रसेलचे ' Religion and Science ', तेरझागीचे ' Theoretical Soil Mechanics ', विशाखदत्तचे ' मुद्राराक्षसम् ', भरतमुनीचे ' भरतनाट्यशास्त्र ' ( अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९ ), निकोलाय मनुचीचे ' Storia do Mogor ', ऑ. से. पिगू लिखित ' Socialism Vs. Capitalism ', बर्ट्रांड रसेललिखित ' Introduction to Mathematical Philosophy ' इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

६. रुबेन लेव्हीलिखित ' Social Structure of Islam ' या ग्रंथाचा मराठी अनुवाद श्री. श्रीपाद केळकर, पुणे यांनी केला असून तो " इस्लामची सामाजिक रचना " या शीर्षकाने मंडळाच्या भाषांतरमालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे. या ग्रंथात इस्लामी समाज व्यवस्थेतील विविध वर्ग, इस्लाममधील स्त्रियांचा दर्जा, इस्लामी न्यायशास्त्र, इस्लाममधील नैतिक विचार, वहिवाटी, प्रथा व ऐहिक कायदे इत्यादी विषयांचे मौलिक विवेचन केले असून, इस्लामी समाजरचनेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व सर्वसाधारण मराठी वाचकांना हा ग्रंथ माहितीपूर्ण व उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

मुंबई
२ आषाढ, शके १८१८,
२३ जून १९७६.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**, अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ.
सचिवालय, मुंबई.

हर्बर्ट स्पेन्सर यांच्या 'डिस्क्रिप्टिव्ह सोशिऑलॉजी' च्या सूत्रानुसार पुढील संशोधन म्हणून हा ग्रंथ हर्बर्ट स्पेन्सर ट्रस्टीजच्या विनंतीवरून प्रथम लिहिण्यात आला. सर्व जगातील मुस्लिम समाजाची समान धार्मिक श्रद्धेतून उद्‌भवलेली अशी जी काही समान वैशिष्ट्ये आहेत ती एक संपूर्ण विषय म्हणून अभ्यासण्याजोगी आहेत. इस्लाम धर्म मानणाऱ्या समाजांची जीवनपद्धती व रचना यांच्यावर इस्लाम धर्माचा किती व कसा प्रभाव पडलेला आहे याचा शोध घेणे हा या ग्रंथाचा उद्देश आहे. प्राचीन काळातील, साधारणतः खिलाफतींच्या अमदानीमधील मुस्लिम समाजाच्या रचनेच्या विभिन्न अंगांचा अभ्यास व्ही. क्रेमर, डब्ल्यू. रॉबर्टसन स्मिथ व गोल्डझीहर यांच्यासारख्या श्रेष्ठ विद्वानांनी यापूर्वीच केलेला आहे. प्रस्तुत ग्रंथांत इस्लामच्या पायाभूत तत्त्वांचे परिशीलन केले असून वेगवेगळ्या कालखंडातील व देशांतील मुसलमान समाजांनी या तत्त्वांशी आपल्या जीवनव्यवहारांनी कशी सांगड घातली हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीचे दोन खंड अनुक्रमे १९३१ व १९३३ मध्ये 'सोशिऑलॉजी ऑफ इस्लाम' या नावाने प्रकाशित झाले. त्यानंतर परिस्थितीत झालेल्या परिवर्तनाच्या संदर्भात पहिल्या आवृत्तीमधील माहितीत जरूर त्या सुधारणा हे पुस्तक लिहिताना केल्या आहेत. जुन्या सामग्रीची फेरमांडणी करून आणि तीत या विषयासंबंधी अलीकडे उपलब्ध झालेल्या माहितीची भर घालून सोय व काटकसर या दृष्टीने दोन्ही खंड एकाच पुस्तकात समाविष्ट करून हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत, ए. ए. बेव्हन, आर. ए. निकल्सन आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या 'सोशिऑलॉजी 'चे संपादक टी. डब्ल्यू. हिल या माझ्या सहाध्यायी प्राध्यापकांच्या माझ्यावरील ऋणाचा मी निर्देश केलाच होता. माझे हे सर्व सहाध्यायी आता माझे आभार त्यांच्यापर्यंत पोचण्यापलीकडे गेले आहेत. तथापि त्यांचे माझ्यावरील ऋण कायमच आहे. पहिल्या आवृत्तीच्या गुणदोषांची समीक्षा करून दुरुस्त्या सुचविल्याबद्दल मी लीडन विद्यापीठाचे प्राध्यापक जे. शाख्ट आणि नवीन सामग्री उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रा. जे. एन. डी. अँडरसन या उभयतांचा आभारी आहे.

केंब्रीज,
२८ एप्रिल, १९५५

रुबेन लेव्ही

या ग्रंथाचा मराठीत अनुवाद करणे मोठेच बिकट काम आहे. अपरिचित धार्मिक परिभाषा तसेच व्यक्ती इत्यादींची अपरिचित नावे व संज्ञा ही मुख्य अडचण. तज्ञांच्या सहाय्याने व स्वतःच्या मतीने या अडचणींतून मार्ग काढावा लागला.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने नियुक्त केलेले या अनुवादाचे निरीक्षक आणि इस्लामचे एक तज्ञ श्री. मुहम्मद अब्दुररहीम दळवी आणि इस्लामचे एक चांगले ज्ञाते श्री. बासित अंजुम शेख या उभयतांनी या अनुवादाच्या कामी मला अतिशय सहाय्य व मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय मी हा अनुवाद करूच शकलो नसतो. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

साहित्य संस्कृती मंडळाने व मंडळाच्या भाषांतर विभागाचे प्रमुख श्री. बा. रं. सुंठणकर यांनी या बहुमोल ग्रंथाचा मराठीत अनुवाद करण्याची मला संधी दिली आणि प्रसंगी मार्गदर्शनही केले. मी त्यांचा अतिशय आभारी आहे.

अनुवादात काही दोष असतील तर त्याची जबाबदारी बव्हंशाने माझीच आहे.

श्रीपाद केळकर

# अनुक्रम


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | ... | १ |
| २. | इस्लामी समाजव्यवस्थेतील विविध वर्ग | ... | ५१ |
| ३. | इस्लाममधील स्त्रियांचा दर्जा | ... | ९० |
| ४. | मुलांचे इस्लाममधील स्थान | ... | १३५ |
| ५. | इस्लामी न्यायशास्त्र | ... | १५१ |
| ६. | इस्लाममधील नैतिक विचार | ... | १९७ |
| ७. | इस्लाममधील वहिवाटी, प्रथा व ऐहिक कायदे | ... | २५० |
| ८. | खिलाफत व केंद्रीय सत्ता | ... | २७९ |
| ९. | खिलाफतीमधील प्रांतांची शासनपद्धती | ... | ३७१ |
| १०. | इस्लाममधील लष्करी संघटना | ... | ४१७ |
| ११. | इस्लामी विश्वविज्ञान व इतर शास्त्रे | ... | ४६३ |
| | **विषयसूची** | ... | ५१० |
| | **ग्रंथसूची** | ... | ५३२ |

# प्रास्ताविक

मक्केच्या अब्दुलाचा मुलगा मुहम्मद प्रारंभीच्या काळात उंट हाकण्याचे काम करीत असे. पुढे तो व्यापार करू लागला. परंपरागत समजुतीप्रमाणे मुहम्मदांनी कोणा व्यक्तीजवळ आपणास दैवी दृष्टांत झाल्याचे प्रथम इ. स. ६१० मध्ये बोलून दाखवले. त्या वेळी ते चाळीस वर्षांचे होऊन गेले होते. तू ऐकलेस ते इतरांना सांग[1] असा आदेश त्यांना अगदी सुरुवातीच्या ईश्वरी संकेतांमधून मिळाला. त्यामागोमाग त्यांना आणखी ईश्वरी संकेत मिळाले. त्या संकेतांद्वारे मुहम्मदांना आपल्या नगरातील बांधवांचा मूर्तिपूजेवरील विश्वास व अन्य रूढी यांचा धिक्कार करण्याची आणि त्यांना एका उच्च अशा धर्माची व अधिक पवित्र अशा जीवनपद्धतीची शिकवण देण्याची आज्ञा मिळाली. अल्लाहशिवाय अन्य परमेश्वर अस्तित्वात नाही हे या नवधर्माचे मध्यवर्ती सूत्र होते. अल्लाहची कल्पना अरबी पुराणात पूर्वीपासून रूढ होतीच. आता नव्या धर्मात अल्लाहला केवळ सर्वश्रेष्ठ नव्हे तर एकमेवाद्वितीय स्थान दिले गेले. आपण अल्लाहचा प्रवक्ता तसेच त्याचा अखेरचा प्रेषित आहोत; पहिल्या आदमपासून तो येशू, मोझेस, अब्राहम इत्यादींपर्यंत होऊन गेलेल्या प्रेषितांच्या प्रदीर्घ मालिकेतील शेवटचा दुवा आहोत असाही त्यांचा दावा असल्याचे मुहम्मदांच्या प्रारंभीच्या उद्गारांवरून स्पष्ट दिसते.

अल्लाहच्या अद्वितीयतेसंबंधीचा दृढ विश्वास आणि मुहम्मदांचे ईश्वरदत्त प्रेषितपद या तेव्हापासून मुहम्मदी धर्माच्या दोन श्रद्धा बनल्या आहेत. आणि आज देखील या श्रद्धा तो धर्म मानणाऱ्यांची कसोटी आहे असे मानले जाते. या सर्व शक्तिमान व सर्वज्ञ अल्लाहला " स्वर्गात किंवा पृथ्वीवर वस्ती करणारा प्रत्येकजण स्वेच्छेने किंवा अनिच्छेने शरण जात असतो."[2] ही शरणता, अरबीत ज्याला इस्लाम म्हणतात हेच पैगंबरांच्या तत्वज्ञानाचे सार आहे. अशाप्रकारे जो अल्लाहला ' शरण ' जातो तो मुस्लिम.

कदाचित सोयीसाठी असेल, मुहम्मदांनी प्रारंभी आपल्या प्रेषितपदाची फारशी वाच्यता केली नाही. फक्त आपल्या नजीकच्या कुटुंबीयांपाशीच त्यांनी या गोष्टीचा गौप्य-स्फोट केला. हे कुटुंबीयच पुढे त्यांचे पहिले शिष्य व धर्मानुयायी झाले. पारंपारिक कथनानुसार तीन वर्षे मुहम्मदांनी ही गोष्ट अतिशय गुप्त ठेवली. तथापि या तीन वर्षांत मक्केमधील तरुणवर्गातून त्यांना अनेक नवे अनुयायी मिळाले. त्यांपैकी बहुसंख्य तरुण

१. अरबी भाषेत इक्रा. त्यापासून कुराण हा शब्द निघाला.

२. कुराण ३<sup></sup>७७.

गरीब वर्गातले होते. तथापि त्यांच्या अनुयायांत त्यांचा भावी श्वशुर अबु बकर यांसारखे काही उच्च वर्गातले व प्रतिष्ठित लोकही होते.

आपल्या जन्मभूमीबाहेरच्या म्हणजे अरबस्तान बाहेरच्या जगाला आपले तत्त्वज्ञान लागू करण्याचा मुहम्मदांचा प्रारंभी किंवा पुढेही कधी विचार होता की नाही या प्रश्नाचे निश्चित उत्तर मिळत नाही. खुद्द मुहम्मदांचे या संदर्भातील उद्‌गार पुराव्याच्या दृष्टीने संदिग्ध व परस्परविरोधी आहेत. तसेच त्यापैकी कोणत्याही मताच्या समर्थनार्थ प्रख्यात अधिकारी व्यक्तींचे पुरावे[1] काढता येतात. त्याकाळी ज्ञात असलेल्या जगातील निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांकडे मुहम्मदांनी आपले दूत पाठवले होते, अशा पारंपारिक कथा प्रचलित आहेत. त्या कथा मागाहून गढलेल्या असाव्यात इतक्या त्या असंभाव्य वाटतात. मक्केतील आपल्या जीवनाच्या प्रारंभीच्या काळांत मुहम्मदांच्या मनात विश्वव्यापी धर्माची कल्पना असण्याची शक्यता नव्हती असेच एकूण विचार करता दिसते. आपणाला झालेल्या साक्षात्काराची सत्यता व त्याचे प्रामाण्य आपल्या बांधवांना पटवून द्यावे एवढीच त्यांची त्या वेळी इच्छा होती. आपल्याला ईश्वरी संदेश मिळाला असल्याचे त्यांनी जाहीर केले तेव्हा त्यांना त्यांच्या स्वतःच्या कुरेशी जमातीमधील लोकांचा तत्काल विरोध सुरु झाला. पवित्र काबा मशिदीचे परंपरागत उपाध्याय या नात्याने कुरेशींना मिळणाऱ्या फायद्याला व प्रतिष्ठेला मुहम्मद जो दावा करीत होते त्यामुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे असे स्वाभाविकपणे कुरेशींना वाटू लागले. काबा ही मक्केतील एक 'घनाकार' मशिद असून दरसाल हजारो यात्रेकरू तेथे येत असत. या कुरेशी जमातीतील लोकांना पैगंबर असल्याचा आपला दावा आणि त्यात अनुस्यूत असलेले त्या जमातीचे आपले नेतृत्व पटवून देण्यात मुहम्मदांना यश तर आले नाहीच उलट त्यामुळे कुरेशी क्रुद्धच झाले, आणि परिणामान्ती इ. स. ६२२ मध्ये मुहम्मदांना मक्का सोडून जाणे भाग पडले. ते आपल्या मूठभर अनुयायांसह यसरीब ( नंतरची मदिना ) या शहरात आश्रयासाठी गेले. मक्केच्या उत्तरेकडे असलेल्या या गावी पोचायला उंटावरून सुमारे अकरा दिवस लागतात. मुहम्मदांचा हा देशत्याग (हिजरा) हा मुहम्मदी धर्माच्या विकासातील एक महत्वाचा टप्पा समजला जाऊ लागला. आणि मुस्लिम इतिहासातील घटनांची गणना या युगप्रवर्तक प्रसंगापासून केली जाऊ लागली तेव्हा कालांतराने हिजराला महत्त्व प्राप्त झाले[2].

१. मासिक ' इस्लामिका ' – २ ( १९३६ ) मध्ये एफ. ब्हल यांनी यासंबधीचे पुरावे पुनश्च तपासून पाहिले आहेत. इस्लाम हा एक विश्वव्यापी धर्म व्हावा अशी प्रारंभी कल्पना नव्हती या मताचे त्यांनी समर्थन केले आहे.

२. गुरुवार ता. १५ जुलै, ६२२, या दिवशी ' हिजरा'चा प्रसंग घडला. त्याच्या दुसऱ्या-दिवसापासून – शुक्रवार ता. १६ जुलै ६२२ – इस्लामी वर्षाचा प्रारंभ होतो. इस्लामी वर्षात हा दिवस १ मुहर्रम, हिजरीचे १ले वर्ष या नावाने ओळखतात. इस्लाम वर्ष हे ३५४ दिवसांचे चांद्रवर्ष आहे.

मदिनेमध्ये मुहम्मदांच्या प्रेषितपदाला खळखळ न होता आणि अधिक व्यापक मान्यता मिळाली. त्यामुळे त्यांची धार्मिक सत्ता द्रुतगतीने वाढली; एवढेच नव्हे तर त्यांची राजकीय सत्तादेखील वृद्धिंगत झाली. साध्याभोळ्या आणि लोकशाही प्रवृत्तीच्या लोकांच्या बाबतीत असे घडणे स्वाभाविकच असते. तसे पाहिले तर पैगंबरांना आपल्या सत्तेचा वापर करता आला असता. परंतु तात्त्विक दृष्टीने तरी त्यांनी मदिनावासीयांवर आणि इतरांवर आपली शिकवण मानण्याची सक्ती केली नाही. ते केवळ लोकांना आपली शिकवण समजावून सांगण्याचे काम करीत असत.[1] लवकरच अनेक लोक त्यांच्या कार्यात सामील होण्यास प्रवृत्त झाले. मदिनेमधील आणि आसपासच्या ज्यूंनी मात्र आपला दुराग्रह कायम ठेवला. ज्या माणसाने आपणाला झालेल्या साक्षात्कारात इतरांकडून किंवा स्वतः ज्यूंकडून ऐकलेल्या बायबलातील कथा मोडतोड करून चुकीचा अर्थ लावून कथन केल्या, त्याच्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत ही भावना ज्यूंच्या दुराग्रहामागे प्रामुख्याने असावी. बायबलातील कथांचे मूळ व अधिकृत स्वरूप आपणालाच माहीत आहे असा ज्यूंचा दावा होता. मुहम्मदांनी हे ज्यू-धर्मीय लोक खोट्या-नाट्या स्वरूपात धर्मग्रंथ मांडीत आहेत असा उलट टोला मारला. परंतु त्याचा काही परिणाम झाला नाही तेव्हा मुहम्मदांनी ज्यूंची हकालपट्टी करून किंवा त्यांना ठार मारून त्यांचा धोका नाहीसा केला. पुरेसे शस्त्रसामर्थ्य प्राप्त होताच मुहम्मदांनी त्यांचा धर्म न मानणाऱ्या मक्केमधील लोकांविरुद्ध शस्त्र उचलले. या पाठीमागे काही अंशी सूडबुद्धी होती. म्हणूनच पुढे त्यांनी आपल्या धर्मानुयायांना "परमेश्वरी मार्गाने लढा"[2] असे आवाहन केले. आणखी एक कारण असे की, आपल्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने मक्का हे आपल्या लोकांचे पारंपारिक निवासस्थान जिंकणे मुहम्मदांना आवश्यक होते. त्यांच्या प्रयत्नाला यश आले. प्रथम मदिना आणि नंतर अन्य शहरांनाही वाढत्या मुहम्मदी साम्राज्याच्या राजधान्यांचे महत्त्व प्राप्त झाले, तरी देखील इस्लामचे धार्मिक केंद्र या नात्याने मक्केचे महत्त्व सदैव कायम राहिले. पैगंबरांच्या यशामुळे व त्यांच्या वाढत्या धार्मिक प्रभावामुळे अरबस्तानमधील आपापसात लढणाऱ्या वेगवेगळ्या जमाती एक प्रकारच्या नव्या मजबूत नात्याने बांधल्या गेल्या. हे नाते आजवर त्यांना माहीत असलेल्या रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक बळकट पण नाजूक होते. रक्ताचे नाते हे त्यांच्यातील संबंधांचा आजवर सर्वांत मजबूत दुवा होता. आता इस्लाम हा आणखी एक दुवा मिळाला. हा दुवा अधिकच मोहक आणि व्यापक होता.

आपल्या मृत्यूपूर्वी (इ. स. ६३२) मुहम्मदांनी अरबस्तानांतील बहुतांश लोकांना आपल्या निशाणाखाली आणले होते. फक्त ज्यू, काही ख्रिश्चन्स आणि मॅगिअन्स याला अपवाद होते. जिझिया कर देऊन आपली राजकीय सत्ता मानण्याच्या शर्तीवर

१. कुराण $२^{२५७}$ आणि $३^{१९}$.
२. कुराण $२^{२४१}$.

मुहम्मदांनी त्यांना आपापल्या धर्मात राहावयाची परवानगी दिली. तथापि या धर्मीयांना आणि इस्लामधर्म न मानणाऱ्या इतरांना मक्केमध्ये[1] प्रवेश करण्यास मनाई करून मुहम्मदांनी त्यांना सामूहिक जीवनातून बहिष्कृत केले. अद्यापीही ही बंदी कायम आहे.

आपल्या अनुयायांना उपदेश व मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून परमेश्वराने मुहम्मदांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार ज्या आज्ञा दिल्या त्या आज्ञांचा मुहम्मदांच्या मृत्यू नंतर कित्येक वर्षांनी संग्रह करण्यात आला. हा संग्रह म्हणजेच कुराण. पैगंबरांची मते व ध्येय याविषयीच्या माहितीचा कुराण हाच प्रमुख स्त्रोत आहे. अनेक मुद्यांसंबंधी कुराणात वेगवेगळी मते दिसून येतात. कारण मुहम्मदांचे विचार कालपरत्वे विकसित होत होते; बदलत होते. तरी देखील कुराणात त्यांच्या बदललेल्या विचारांबरोबर त्यांनी सोडून दिलेले विचारही तसेच कायम ठेवलेले दिसतात. जे प्रश्न मुहम्मदांसमोर कधी आलेच नव्हते, निदान ज्यांची थोडीही तातडी नव्हती अशा प्रश्नांसंबंधी कुराणात काहीही सांगितलेले नाही. इस्लाम धर्म सर्व जगाने स्वीकारावा अशी मुहम्मदांची कल्पना होती की तो धर्म फक्त अरबस्तानातील लोकांसाठी होता. हा अशापैकीच एक प्रश्न होय हे आपण पाहिलेच.

' किताबी ' लोकांना ( म्हणजे ज्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ होते अशांना ) जिझिया कर देण्याच्या अटीवर इस्लामबाहेर राहण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. यावरून खुद्द अरबस्तानांतील प्रत्येक व्यक्तीला देखील इस्लामधर्म स्वीकारावयास लावता येणे शक्य नाही ही गोष्ट मुहम्मदांनी ओळखली होती असे अनुमान काढणे संयुक्तिक ठरेल. मक्केला इस्लामधर्मात स्थान देण्यात आले देण्यात आले हे तर अधिकच महत्त्वाचे होते. अरबी द्वीपकल्पाबाहेरील कोणाही जमातीला मक्केचे फारसे महत्त्व असण्याचे कारण नव्हते. जरुसलेमऐवजी मक्केकडेच सर्व मुस्लिमांनी नमाजाच्या वेळी तोंड केले[2] पाहिजे असे ठरवण्यात आले. त्यावरून पैगंबरांची दृष्टी अरबस्तानवरच केंद्रित झालेली होती हे लक्षात येते. तथापि, ते कसेही असले असली तरी इस्लामचा विस्तार अरबी द्वीपकल्पाच्या बाहेरही झाला हेही खरेच. अर्थात मुहम्मदी धर्मामधील अरबस्तानचे श्रेष्ठ व महत्त्वाचे स्थान कायमच आहे. याचे एक कारण मक्का हे धर्मक्षेत्र अरबस्तानातच आहे. दुसरे कारण अरबस्तानची अरबी भाषा. याच भाषेत कुराण आहे. एवढेच नव्हे तर सर्व मुसलमान याच भाषेतून प्रार्थना करतात. यहुदी धर्माची भाषा जशी हिब्रु तशी अरबी ही इस्लामची पवित्र भाषा बनली. आणि भिन्न भिन्न राष्ट्रीयत्व असलेल्या व

---

१. कुराण ९ २८-२९

२. जरुसलेम ( अल कुद्स-' पवित्र ' ) हे इस्लामधील दुसरे सर्वाधिक पवित्र नगर होय. आपल्या ऐतिहासिक रात्रीच्या प्रवासात पैगंबर तेथील मंदिरामध्ये गेले होते आणि बहुतांश मुस्लिमांची अशी श्रद्धा आहे की त्या ठिकाणाहूनच कयामतची सूचना मिळणार आहे.

विभिन्न भाषा बोलणाऱ्या मुस्लिमांनी आपल्या भाषांसाठी अरबी लिपीचा स्वीकार केला. पुष्कळदा अरबी लिपी त्यांच्या भाषांना सोयीचीही नव्हती. पुढे १९२८ मध्ये तुर्कस्तानने सरकारी छापील कागदपत्रासाठी लॅटिन भाषेची सुधारलेली वर्णमाला सक्तीने अमलात आणीपर्यंतच्या काळात अरबी अक्षरांत लिहिणे हे एखादी व्यक्ती किंवा देश हा मुस्लिम असल्याचे गमक मानले जात होते. याला अपवाद फक्त सीरियन ख्रिश्चनांचाच काय तो होता.

पैगंबरांनी आपल्या हयातीत अरबस्तान बाहेरच्या जगातील कोणालाही इस्लामची दीक्षा दिलेली नाही. हिजरानंतर आठव्या वर्षी (हिजरी सन. ८ इ. स. ६२९) पैगंबरांनी सीरियामध्ये आपले दूत पाठवले होते असे इतिहासकार सांगतात. परंतु ते कशाकरता गेले होते हे स्पष्ट नाही. सम्राट हिरॅक्युलसकडे इस्लामधर्म स्वीकारण्याचा मुहम्मदांचा आदेश घेऊन हे दूत गेले होते असा एक अनिश्चित स्वरूपाचा अंदाज आहे. सीरियात गेलेल्या दूतांना ठार मारण्यात आले. याचा सूड म्हणून सम्राटाच्या अरब प्रजाजनांवर स्वारी करण्यात आली. पण मुटा येथे झालेल्या लढाईत आक्रमकांचा धुव्वा उडाला. पुढे पैगंबरांच्या मृत्युनंतर (८ जून इ. स. ६३२) या पराभवाचा कलंक धुवून काढण्यासाठी नव्याने सैन्याची जमवाजमव करण्यात आली. इस्लामधर्माने जी एक एकजुटीची साखळी निर्माण केली होती त्यामधील सर्वात बलशाली दुवा स्वतः मुहम्मद हा होता. त्यांच्या मृत्यूनंतर विघटनास प्रारंभ झाला. बदवी जमाती लगेच चोहोबाजूंनी बंड करुन उठल्या. नुकत्याच स्वीकारलेल्या इस्लामची त्यांच्यावरील पकड जेमतेमच होती. पैगंबरांचा वारसा सांगणारे अनेक तोतये[1] पुढे आले. बदवीं-पैकी कित्येकजण यापैकी या ना त्या तोतयाला मिळाले. मदिना, मक्का व त्या शेजारचे तायफ ही शहरे मात्र पैगंबरांशी एकनिष्ठ राहिली. परंतु त्यांच्यापुढे योग्य नेतृत्वाचा प्रश्न उपस्थित झाला. मुसल्मान जमातीत जिच्या शब्दाला सर्वाधिक वजन होते अशी त्या वेळी एकच व्यक्ती होती उमर. तथापि तो मदिनाचा नागरिक नव्हता. मुहम्मदांबरोबर हिजराच्या वेळी मक्का सोडून मदिनाला आलेल्या लोकांपैकी तो एक मुहाजिर म्हणजे 'निर्वासित' होता. मदिनानिवासीयांनी आपल्यापैकीच कोणाला तरी इस्लामचे नेतेपद मिळाले पाहिजे असा आग्रह धरला. वास्तविक आपल्या मनाप्रमाणे घडवून आणण्या इतका उमर सामर्थ्यशाली होता. तरी देखील त्याने तडजोड केली. स्वतःऐवजी मुहम्मदांच्या सासऱ्याला अबु बकरला मुस्लिमांनी आपली निष्ठा द्यावी असे त्याने सांगितले. अशा रीतीने अबु बकर पहिला खलिफा म्हणजे पैगंबरांचा वारस झाला.

खरे तर सीरियाकडे पाठवण्याच्या उद्देशाने जमविण्यात आलेले सैन्य पहिल्या मुस्लिम सेनानीच्या हाताशी उपयोगासाठी सिद्ध होते. बंडखोर अरबी टोळ्यांचा बीमोड करण्यासाठी ते सैन्य पाठवणेच वास्तविक सर्वदृष्टींनी योग्य होते. परंतु त्याऐवजी संख्याबळाच्या

१. यामधील सर्वात प्रमुख 'मुसैलिमा' या उपहासगर्भ संक्षिप्त नावाने ओळखला जातो.

दृष्टीने एखाद्या छापामार तुकडीपेक्षाही लहान असलेले ते सैन्य सीरियाच्या सीमेवर राहणाऱ्या रोमन सम्राटाच्या अरब प्रजाजनांवर त्वरेने चाल करून गेले. तिकडे ते सैन्य न पाठवण्याचा वास्तविक खलिफाला सल्ला देण्यात आला होता; परंतु पैगंबरांचीच इच्छा आपण पूर्ण करीत आहोत असे सांगून त्याने आपला आग्रह कायम ठेवला. पुढे ते सैन्य मदिना शहराची सुटका करण्यासाठी तिकडे तात्काळ परत फिरले. कारण बंडखोर बदवींना शरण आणण्यासाठी व त्यांना परत इस्लाम मान्य करावयास लावण्यासाठी अबु बकरने लष्करी कारवाई सुरू केली होती. त्यात मदिना शहराला वेढा पडला होता. मदिनातून एकामागून एक आकस्मिक हल्ले चढवून अबु बकरने असंतुष्ट गटाचा उच्छेद केला. तथापि मुहम्मदांच्या जीवनाच्या अखेरच्या दिवसांत अरबस्तानमध्ये मुस्लिमांत जे ऐक्य अस्तित्वात होते ते पुन्हा प्रस्थापित करण्याच्या कार्यात अबु बकरला तत्काल यश आले नाही. पुढे शेजारच्या देशावर खलीफाने स्वाऱ्या करावयास सुरुवात केली; आणि आपल्या सैन्याच्या लढण्याच्या खुमखुमीचा युद्धासाठी उपयोग करून घेतला. एवढेच नव्हे तर पूर्वी केलेल्या कामगिरीबद्दल आपल्या सैनिकांना बक्षिसीही दिली तेव्हा कोठे पूर्वीचे ऐक्य प्रस्थापित झाले. सैन्याला लढाईसारखा आकर्षक उद्योग मिळाल्यामुळे अनेक बंडखोर जमाती इस्लामला पुन्हा आपली निष्ठा वाहू लागल्या. सागरी वाहतुकीच्या मार्गाशिवाय सैन्याला तीन बाजूंनी पुढे जाता येणे शक्य होते. अरबस्तानच्या उत्तरेला बायझानटियम व इराण यांच्या ताब्यातील प्रांत होते. हे प्रदेश इस्लामी सत्ताकेंद्रापासून अतिशय दूर असल्यामुळे त्यांच्यावर हल्ला करणे विशेष धोक्याचे नव्हते. शिवाय हे प्रदेश चांगले संपन्न असल्यामुळे भरपूर लूटही मिळवता आली असती. अरबी इराक या सर्वांत नजिकच्या इराणी प्रांतावर खालिद इब्ने वलिद ( सैफुल्लाह म्हणजे परमेश्वराची तलवार ) याच्या नेतृत्वाखाली १२/६३३ साली प्रथम स्वारी करण्यात आली. युफ्रातिस (अरबी नाव फुर्आत) नदीच्या किनाऱ्यावर अनेक धनसंपन्न शहरे वसलेली होती. हिरा हे त्यांपैकीच एक शहर होते. फार मोठ्या संख्येने तेथे ख्रिश्चन जमात वस्ती करून होती. हेच शहर ख्रिश्चन पाद्र्यांचे मुख्य केंद्र होते. हिरा शहरातील बहुसंख्य ख्रिश्चनांनी फारसा प्रतिकार न करता शरणागती पत्करली. पुनश्च हल्ला होणार नाही अशी हमी मिळवून वार्षिक खंडणी देण्याचे त्यांनी कबूल केले. शरणागतीचा हा करार त्यांनी पाळला नाही तर काय ते मागाहून ठरवले जाईल, असेही ठरले.

इकडे युफ्रातिस किनाऱ्यावर खालिद इब्ने वलिदच्या हालचाली चालू होत्या त्याचवेळी खलीफा बकरने पॅलेस्टिन व सीरिया यांच्यावर सात हजार टोळीवाल्यांचे सैन्य पाठवले. या टोळीवाल्यांत प्रामुख्याने दक्षिण अरबस्तानातील टोळीवाले होते. आपण युद्धावर चाललो नसून जणू कायमचे देशत्याग करून चाललो आहोत अशा थाटात त्यांनी आपल्याबरोबर आपला कुटुंबकबिलाही नेला होता. ही तर एक अडचण होतीच,

शिवाय खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या विरुद्ध बाजूच्या बायझन्टाइन सैनिक तुकड्या शक्तिशाली होत्या. तरी देखील अबु बकरच्या टोळीवाल्यांच्या सेनेने गॅलीलीचा समुद्र व व त्याहीपलीकडेपर्यंत मुसंडी मारली. पण तेथे रोमन सेनानींनी टोळीवाल्यांवर मात केली. तेव्हा टोळीवाल्यांना पळून माघार घेणे भाग पडले. मदिना येथे पराभवाची ही वार्ता पोचली तेव्हा खालिद इब्ने वलिद इराकच्या मोहिमेवरून परत आला होता. लागलीच कुमक देऊन त्याला पॅलेस्टीनमधील सेनेच्या मदतीसाठी पाठवण्यात आले. तो तेथे पोचताच पराभूत सैन्याला पुन्हा धीर आला. त्यांनी परत जॉर्डन खोऱ्याच्या कडेने आगेकूच केली. या वेळी त्यांना प्रतिकार झाला नाही आणि झाला तो फारच दुर्बल होता.

सीरियनांनी लढाईतून माघार घेतली. खालिदची सेनानी म्हणून असलेली ख्याती या गोष्टीला निस्संशय कारणीभूत होती, परंतु त्यापेक्षाही आणखी एक गोष्ट अधिक प्रमाणात कारणीभूत झाली. शहरी जनतेहून भिन्न असलेली ग्रामीण भागांतील जनता ही आक्रमकांच्याच रक्तामांसाची होती. आक्रमक हे आपलेच सेमाईट वंशीय बांधव आहेत हे त्यांच्या लक्षात आले. सीरियातील सेमाईट लोकांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला असला तरी त्या धर्माची तत्त्वे त्यांनी कधीच नीटशी आत्मसात केलेली नव्हती. शिवाय एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या विभिन्न ख्रिश्चन धर्मपंथांमध्ये गूढ धार्मिक शिकवणुकीवर होणारे वादविवाद शेतकऱ्यांच्या आकलनशक्तीच्या अगदी पलीकडे होते. त्यामुळे आक्रमण करून आलेल्या मुस्लिमांच्या कळपात ते आपोआप दाखल झाले. आक्रमक मुसलमानांची भाषा त्यांच्या स्वतःच्या भाषेशी अगदी मिळतीजुळती होती. आक्रमक क्वचित कधी आपल्या धर्माचा उल्लेख करीत तेव्हा तो धर्म स्वीकारण्यासाठी आपल्या मूळ धर्मनिष्ठांमध्ये फारसा बदल करण्याची आवश्यकता नाही असे त्यांना दिसून आले. शिवाय लूटमारी आणि कर देण्याच्या आपत्तीमधून सुटका करून घेण्याचा सोपा मार्ग म्हणजे आक्रमकांचा धर्म स्वीकारणे हा होय, हेही त्यांच्या लक्षात आले.

सीरियन जनतेच्या दृष्टीने अरबांना शरण जाण्याचा राजकीय अर्थ एका शासका-ऐवजी दुसरा शासक पत्करणे एवढाच होता. शिवाय सीरियन जनतेवर झालेले रोमन जीवनपद्धती आणि विचार यांचे संस्कार फारच अल्प होते. त्यामुळे ते संस्कार टाकून देऊन नवे स्वीकारण्यात त्यांना फारसे प्रयास पडले नाहीत.

खालिद आगेकूच करीत मार्च, ६३५ मध्ये दमास्कसच्या तटबंदीशी येऊन पोचला. तो सहा महिने शहराला वेढा घालून बसला होता. अखेर दमास्कस शरण आले. याच वेळी अबु बकरच्या जागी उमर हा खलिफा पदावर आला होता. दमास्कसच्या पतनामुळे सीरियाचे प्रवेशद्वार आक्रमकांच्या हाती पडले. परंतु खुद्द पॅलेस्टीन अद्याप रोमन सेनेच्या ताब्यात होते. रोमन सेनेला समुद्रमार्ग खुला असल्यामुळे तिला बायझँटियममधून कुमक मिळाली. इ. स. ६३६ मध्ये रोमनांनी दमास्कस व अरबस्तान

यांमधील मुसलमानांचा दळणवळण मार्ग तोडण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. त्याच वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात यार्मुक (जॉर्डन नदीला मिळणारी पूर्वेकडील नदी. गॅलीली समुद्राच्या खालच्या बाजूने ती जॉर्डन नदीला मिळते.) नदीच्याकाठी झालेल्या लढाईत बायझेनटीयनांचा सपशेल धुव्वा उडाला आणि त्यामुळे पॅलेस्टीनमध्ये शिरण्याचा मुस्लिमांचा मार्ग मोकळा झाला. पॅलेस्टीनमधील रोमन ठाणी एकामागून एक नष्ट करण्यात आली. काही काळ जरूसलेम येथील रोमनांचे ठाणे तग धरून होते. ते ठाणे देखील इ. स. ६३६ अखेर शरण आले.

सीरियावरील स्वारी चालू होती त्याच वेळी इतर बाजूंनी छापामार तुकड्या आगेकूच करीत होत्या. इ. स. ६३७ मध्ये समुद्रमार्गे युद्धनौकांचा एक लहानसा काफिला पूर्व अरबस्तानातील ओमानहून मुंबईजवळील ठाण्यापर्यंतसुद्धा पोचला. त्या त्यानंतरच्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानकडे करण्यात आलेल्या मोहिमांप्रमाणेच या मोहिमेच्या पदरात थोडीबहुत लूट सोडली तर भोपळाच पडला. उमर खलिफाला ही मोहीम मुळीच पसंती नव्हती. त्यामुळे मोहिमेवरून परत येताच मोहिमेच्या सेनापतीला उमरने बजावले की मोहिमेत भाग घेतलेल्या छापामार तुकडीतले कोणी मारले गेले असतील तर त्यांची भरपाई तुमच्या जमातीतील तितक्याच लोकांना मारून केली जाईल.

इराणची स्थिती निराळी होती. तेथे मुस्लिमांना मिळालेल्या प्रारंभिक विजयानंतर युफ्रातिस नदीशी त्यांच्या पुढील यशाला इ. स. ६३४ मध्ये पायबंद बसला. आणि मुसान्नाच्या नेतृत्त्वाखालील मुस्लिम आक्रमकांना इराणी सेनेने पिटाळून लावले. पण हा पायबंद केवळ तात्कालिक ठरला. कारण उमरने शत्रूला जेरीस आणण्यासाठी नंतर अनेकदा हल्ले करून आगेकूच केली आणि ६३५ च्या ऑक्टोबरमध्ये कुफाजवळ बुवायब येथे त्याने शत्रूवर विजय संपादन केला. या विजयामुळे मुस्लिमांत पुन्हा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याच वर्षी इराकमध्ये अतिदक्षिणेस तैग्रीस व युफ्रातिस या नद्यांच्या संगमाच्या तोंडाशी नदीकाठी असलेले उबुला शहर[1] जिंकण्यात आले. त्यामुळे इराण्यांना फार्स प्रांतातून मिळणारी कुमक बंद झाली. बायझटीयनांचा यार्मुक नदीजवळ पराभव झाल्यामुळे मुस्लिम सेनेचा मोठा विभाग इतरत्र लढण्यास मोकळा झाला. युफ्रातिसच्या पूर्वेला त्याच वेळी लढत असलेल्या आपल्या फौजेला कुमक म्हणून त्यांच्यापैकी अनेकांना उमरने पाठवून दिले. मुस्लिम सेनेने प्रथम हिरा हे शहर परत जिंकण्याची कामगिरी बजावली. कारण खालिद इब्ने वलिद याच्या नेतृत्वाखालील पहिल्या मुस्लिम-स्वारी नंतर झालेला करार या शहराने मोडला होता. या विजयामागोमाग कादिसिया येथील अतिशय मजबूत असा इराणी किल्ला तुफानी हल्ला चढवून जिंकण्यात आला. त्यामुळे आता मदाईन (सेलेयुसिया व स्टेसिफन ही जुळी शहरे) या इराण्यांच्या हिवाळी राजधानीचा मार्ग मोकळा झाला. या शहराला

१. या शहराजवळ हिजरी वर्ष १७/६३८ मध्ये उमरने बसरा हे शहर वसवले.

वेढा घालण्यात आला. आणि पुढे जुलै ६३७ मध्ये ते शहर पडले. आजूबाजूच्या प्रदेशांत लूट मिळवण्यासाठी छापे मारण्याच्या दृष्टीने मुस्लिम सेनानीला ते शहर हे सोयीचे केंद्र वाटले. तथापि उमर खलिफाची बुध्दी लष्करी डावपेचांत अलौलिक होती तरी त्याने आपल्या बुद्धीला विवेकाचा अंकुशही लावलेला होता. त्याच्या मते मदाईन हे शहर शत्रूच्या प्रदेशांत अतिशय आत असल्यामुळे लष्करी कारवाईचा तळ या दृष्टीने चांगले नव्हते. म्हणून त्याने अरबी सीमेनजीकच्या एका ठिकाणी सैन्य परत फिरवण्याचा हुकुम दिला. या पवित्र्यामुळे दळणवळणाच्या मार्गाचे अंतर बरेच कमी झाले. शिवाय या निर्णयामुळे तैग्रीसच्या पूर्वेकडील प्रदेशावर यापुढे छापे मारले जाऊ नयेत या आपल्या आदेशाची त्याला अमलबजावणी करून घेता आली.

या आदेशाप्रमाणे तैग्रीस किनाऱ्याच्या उत्तरेकडे आगेकूच करण्यास प्रतिबंध नव्हता. त्यामुळे इ. स. ६४१ पर्यंत सर्वच्यासर्व पश्चिम इराक आणि मोसलपर्यंतचा मेसापोटेमियाचा प्रदेश मुसलमानांच्या हाती आला. मुस्लिम आक्रमक थेट आमनियापर्यंत पोचले. आर्मेनियन लोकांची जंगम संपत्ती लुटण्यापेक्षा मुसलमानांना तेथे जास्त काहीही करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे जित अरबांचे धार्मिक स्वातंत्र्य, तसेच त्यांच्या सरंजामशाही संस्था आणि जमीन-मालकीची व्यवस्था अबाधित राहिल्या. एवढेच नव्हे तर दडपशाहीपासून आपले रक्षण करता यावे यासाठी आपल्या हाती काही सत्ताही राखून ठेवता आली. तथापि त्यांचे प्रत्येक कुटुंब हा एक स्वतंत्र घटक होता. देश सुसंघटित नव्हता. त्यामुळे अरबांना तेथे मोठ्या संख्येने घुसण्यास संधी मिळाली. मेसोपोटेमियाच्या इतर भागातील लोकही अशाच कारणांमुळे बलशाली अरबांना शरण गेले. आक्रमित प्रदेशांतील ज्या झरतुष्ट्री, ख्रिश्चन किंवा मूर्तिपूजक रहिवाशांना आपल्याच धर्मात राहावयाची इच्छा होती, त्यांना तशी परवानगी मिळाली.

कॉकेशस व तौरस या दरम्यानच्या उरलेल्या भूपट्ट्यांतील जनतेने इस्लामचा अत्युत्साहाने स्वीकार केला. त्यामुळे त्या भागात इस्लामची झपाट्याने प्रगती झाली. तौरसच्या पश्चिमेकडील भागात मात्र इस्लामला आर्मेनियातल्या प्रमाणेच अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. तौरसच्या पश्चिमेकडील आशिया मायनरचा प्रदेश बायझेन्टियमच्या लगत होता. त्यामुळे तेथील लोकांत आक्रमकांचा प्रतिकार करण्याचे धैर्य आले असावे. शिवाय अनेक वर्षे तेथे ग्रीकांचे राज्य असल्यामुळे त्यांच्याशी त्या लोकांचा दीर्घकाळ परिचय होता. म्हणूनच बहुधा नव्या शासकांचा स्वीकार करण्यास त्यांचे मन राजी झाले नसावे.

आशिया मायनरवरील पहिली स्वारी २०/६४१ मध्ये झाली असावी. या आक्रमणात फक्त थोडीशी लूट मुस्लिमांच्या हाती पडली. त्यानंतर लागोपाठच्या वर्षांत मुस्लिमांनी आणखीही अनेक आक्रमणे केली. त्या प्रत्येक आक्रमणाच्या वेळी अरब सेना द्वीपकल्पांतील प्रदेशात अधिकाधिक घुसली आणि ६५२ साली ती कॉन्स्टॅन्टिनोपल-

( कुस्तुन्तुनिया ) पाशी पोचली. परंतु अँटिऑक पलीकडे मुस्लिम सेना कधीच गेली नाही. अँटिऑक येथे मुआविया खलिफाने (६६१ ते ८०) इराणी सैन्यतुकड्या आणून ठेवल्या होत्या. आशिया मायनरच्या मध्यभागात मुस्लिम सैन्याने कित्येक वर्षे स्वस्थ बसून काढली. एकदा तर तिने स्मर्नावरही हल्ला चढवला. असे असले तरी आशिया मायनरमध्ये मुस्लिम सेनेचा पाय पक्का रोवला गेला नव्हता. एखाद्या भागावर कायम ताबा प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनेही त्यानंतरच्या वर्षांत अरबांची मुळीच प्रगती झाली नाही. आणि इ. स. ७१७ मध्ये सुलेमान खलिफाचा भाऊ मस्लामा याने कॉन्स्टॅन्टिनोपलवर स्वारी करीपर्यंत त्या शहरावर एकही जोरदार हल्ला चढविला गेला नव्हता.

आशिया मायनरमधील अनेक शहरे तुफानी हल्ले करून अरब सेनापतीने हस्तगत केली. ती मोहीम संपविल्यानंतर तो रोमन प्रदेशात काळ कंठित राहिला. पुढे मेसोपोटेमियातून खलिफाकडून नवी सैन्य कुमक आली तेव्हा तो राजधानीवर चाल करून गेला. याचवेळी उमर इब्ने हुबैरा याच्या नेतृत्वाखाली युद्धनौकांचा एक ताफा पश्चिमेकडून आला आणि त्याने दार्दनेल्सचा किनारा व बॉस्फोरसकडे जाणारे मार्ग व्यापले. युद्धनौकांच्या या काफिल्याचा, सामुद्रधुनीच्या युरोपियन प्रदेशाकडे मोठ्या संख्येने सैन्यतुकड्या वाहून नेण्याच्या कामी उपयोग झाला. या सामुद्रधुनीत मस्लामा अतिशय मजबूतपणाने पाय रोवून बसला होता. राजधानीवर प्रत्यक्ष चढाई करण्याचा आपला उद्देश सफल झाला नाही तरी राजधानीकडे जाणारी अन्न-रसद बंद करून तिला उपाशी मारून शरण आणता येईल अशी मस्लामाची कल्पना होती. राजधानीच्या वेढ्याच्या काळात मस्लामाला इजिप्त व सीरियामधून आलेल्या नौकादलाच्या कुमकेचे साहाय्य होत असले तरी त्याची सैन्यशक्ती अपुरी पडली. आगनौकांनी आपल्या रहस्यमय व भयकारक 'ग्रीक तोफां' च्या साहाय्याने मस्लामाची जहाजे नष्ट केली. क्वचित अनुभवास येणार कडाक्याचा हिवाळा आणि त्याच्या जोडीला अन्न व कपड्यांचा पुरेसा पुरवठा न झाल्यामुळे मस्लामाचे शेकडो सैनिक मृत्युमुखी पडले. हा वेढा तेरा महिने चालू होता. त्याचे वैय्यर्थ्य नवा खलिफा दुसरा उमर याच्या (७१७-२०) लक्षात आले तेव्हा त्याने माघारीचा हुकूम दिला. इतिहासकार गिब्न याने म्हटले आहे, "आशियाच्या प्रदेशातील व हेलेस्पॉंटमधील अरेबियन घोडदलाची मोहीम द्रुतगतीने पार पडली. शत्रूकडून त्यांचा छळही झाला नाही परंतु बायदिनियाकडील त्यांचे हजारो बांधव तुकडे-तुकडे करून कापले गेले. शिल्लक राहिलेल्या युद्धनौकांचे वादळाने आणि आगीने अनेकवेळा नुकसान झाले. अखेर त्यांपैकी फक्त पाच छोटी जहाजे आपल्यावर आलेल्या अनेक अकल्पनीय संकटांची कहाणी सांगण्यासाठी अलेक्झांड्रिया बंदरात पोचू शकली."

बायझन्टियम किंवा आशिया मायनर यावर अरबांना कधीच ताबा मिळवता आला नाही. अर्थात कालांतराने इतर मुस्लिम या कामात यशस्वी झाले. दहाव्या शतकात

झालेल्या नायसेफोरस, फोकस, झिमिसिस व बॅसिलिअस या तीन महान बायझन्टाईन सेनापतींनी आशिया मायनर आणि सीरिया यामधील अनेक शहरांतून अरबांना माघार घ्यावयास भाग पाडले. नवव्या शतकातील इतिहासकार बालाझुरी याने आपल्य 'फुतुह अल् बुलदान' (विविध देशांवरील विजय) या पुस्तकात असे नमूद केले आहे की उमर व उस्मान यांच्या अमदानीत अँटिऑक व इतर शहरे ही सीरियाची सीमा होती. पुढे या शहरांचा हरून अल् रशीद याने 'अवासिम' (संरक्षण फळी किंवा मजबूत केंद्रे) असा उल्लेख केलेला आढळतो. इतिहासकार बालाझुरी पुढे म्हणतो, "तार्ससच्या पलीकडील प्रदेशांत ज्याप्रमाणे मुस्लिम आज घुसत आहेत त्याप्रमाणे त्याहीवेळी सीरियन सीमेपलीकडे ते हल्ले करीत असत. आणि अस्कंदरिया (अॅलेक्झांड्रिया) आणि तार्सस या दोन नगरांच्या दरम्यान आज मुस्लिमांना आढळतात तसे रोमनांचे किल्ले व शस्त्रागारे त्यावेळीही होती." या मजबूत केंद्रांतून दहाव्या शतकातील बायझन्टाइन सेनापतींनी मुसलमानांना हाकलून लावले. ही केंद्रे पहिल्या उमर खलिफाच्या काळापासून अरबांच्या हाती होती. आणि पुढील शतकात सेल्जुकांच्या टोळ्या येईपर्यंत ती रोमनांना परत मिळवता आली नव्हती.

आशिया मायनरमधील अरबांच्या प्रगतीची माहिती करून घेता घेता आपण तीन शतके पुढे गेलो आहोत. इतर प्रदेशांत त्यांनी किती प्रगती केली हे समजून घेण्यासाठी पुन्हा मागे फिरले पाहिजे. उत्तर इराणात अधिक पुढे जाण्याच्या बाबतीत उमर खलिफाचे धोरण सावधपणाचे होते. त्यामुळे स्टेसिफनवरील यशस्वी चढाईनंतर त्याने आपल्या सैन्याला युफ्रातिसपर्यंत मागे हटण्याचा हुकूम दिला. त्याचा परिणाम असा झाला की, इराण्यांनी जबरदस्त हल्ले करण्यास सुरुवात केली, आणि त्यामुळे इराणमध्ये घुसण्याची आपली योजना सोडून पूर्णपणे माघार घ्यावयाची की अगोदर मिळवलेला प्रदेश आपल्या ताब्यात ठेवण्याची उपाययोजना करावयाची याविषयी खलिफा उमरला लवकरच निर्णय करावा लागला. शत्रूचा पूर्ण नायनाट करायचा असेल आणि मुस्लिमांची प्रतिष्ठा राखायची असेल तर इराणमधील मोहीम पुन्हा हाती घेणे हा एकच मार्ग त्याच्यापुढे होता. त्याचे सैनिक लढायला उतावीळ झाले होते. त्यामुळे इराणची मोहीम पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यास खलिफाला प्रोत्साहन मिळाले. त्यानुसार युफ्रातिसवरील आपल्या सैन्याला त्याने आगेकूच करण्याचा अधिकार दिला. तसेच त्याने बसराच्या सुभेदारालाही खजिस्तानवर स्वारी करण्याचा हुकूम दिला. खजिस्तान हा इराणी आखाताच्या वरच्या बाजूकडील कारून नदीच्या पाण्याने भिजणारा प्रांत होता. सुभेदाराने फार्सच्या किनाऱ्यापलीकडील बेटे प्रथम काबीज करून नंतर मुख्य भूमीमध्ये घुसण्याचा हुकूम देऊन इराणी आखाताच्या मार्गाने ओमानहून सैन्य रवाना केले. ह्या दोन्ही योजना यशस्वी झाल्या. अबरकवाँ हे मोठे बेट तसेच मुख्य भूमीतील तावाज, साबूर, इस्तख, आराजान (प्राचीन पर्सेपोलीस) इत्यादी अनेक शहरेही जिंकण्यात आली.

युफ्रातिस नदीवरील कुफा येथे असलेल्या लष्करी तळापासून बाबिलोन ते खुरासान या प्राचीन हमरस्त्याने इराणच्या इराकी प्रदेशातून अरब सेनेने इराणमध्ये आगेकूच केली. ६४० मध्ये हल्वान हे शहर जिंकण्यात आले. ते शहर इराणी मैदानाकडे झाग्रोस पर्वतराजींतून जाणाऱ्या रस्त्यावरील खिंडीत वसलेले होते. नंतर हळूहळू टप्प्याटप्प्याने अरब आक्रमक सैन्य खुरासान हमरस्त्याने पुढेपुढे सरकत बहिस्तन पर्वत- ( डारियसने खोदलेले शिलालेख याच पर्वतात आहेत.) पार करून ते निहावंद मैदानापर्यंत पोचले. पश्चिम व दक्षिण बाजूंनी हमादानकडे जाणाऱ्या रस्त्याचे रक्षण करणाऱ्या अल्वंद या पर्वताच्या पायथ्याशी हे निहावंद मैदान पसरलेले आहे. या मैदानात तिसरा यज्दगर्द या इराणी राजाने उभारलेल्या सैन्याशी अरबांची गाठ पडली. युफ्रातिस तीरावरील कादिसिया या ठिकाणी यज्दगर्दच्या सैन्याचा अरबांनी त्याअगोदर पराभव केला होता. त्यात त्याला स्टेसिफॉन ही आपली राजधानी गमावून माघार घ्यावी लागली होती. आपली आगेकूच आपण आवरती घेतली नाही तर काय परिणाम होतील याची कल्पना त्याचवेळी त्याला आली. निहावंद तेथे त्याच्या साम्राज्याचे भवितव्य ठरणार होते. म्हणून त्याने प्रत्येक शहरातील व खेड्यातील लष्करात भरती होण्याचे वय असलेल्या सर्व पुरुषांना सैन्यात दाखल करून घेतले. लोक नाखुशीने सैन्यात भरती झाले होते. अरबांपेक्षा संख्येने ते जास्त होते. परंतु लढायला ते नाखूष होते. त्यामुळे आक्रमकांकडून सहजगत्या ते पराभूत झाले. इराणसारखा धनाढ्य देश लुटायला मिळेल या कल्पनेने अरब आक्रमक बेफाम झाले होते. शिवाय आपल्यापेक्षा भिन्न धर्माच्या व भिन्न रक्ताच्या विरोधकांचा द्वेष करणाऱ्या इराण्यांना नेस्तनाबूद करावयास अरब अतिशय उत्सुक होते. बसराचा सुभेदार अबू मुसा अल्-अशारी याच्या नेतृत्वाखाली अरब सैनिकांनी खजिस्तान प्रांतातील यज्दगर्दच्या प्रदेशावर त्याच सुमारास जो हल्ला चढवला त्यामुळे यज्दगर्द जास्तच अडचणीत सापडला होता. आणि नेमके याचवेळी निहावंद येथेही लढाई सुरू झाल्यामुळे त्याच्या सैन्याची पांगापांग झाली व ते पळत सुटले. आणि भयग्रस्त झालेला यज्दगर्द अज्ञात जागी पळून गेला.

तथापि इराण हा अतिशय विस्तीर्ण प्रदेश होता. आणि तेथील जनताही स्वभावतः शरण न जाणारी होती. त्यामुळे इस्लामी सैन्याला तिच्यावर तत्काळ विजय मिळवणे शक्य नव्हते. शिवाय इराणवर वेगवेगळ्या राजघराण्यांची व झरतुष्ट्र धर्माची जबरदस्त पकड होती. पहिल्याच हल्ल्यासरशी ही पकड नष्ट होणे शक्य नव्हते ही गोष्ट खलीफा उमरच्या लवकरच लक्षात आली. त्यामुळे निहावंदच्या लढाईनंतर इराण्यांना अंकित करण्याचे त्याने लगेच प्रयत्न केले नाहीत. त्याऐवजी जिंकलेल्या प्रदेशाची कुफा व बसरा येथील लष्करी तळाच्या सेनापतींमध्ये वाटणी करणे उमर खलिफाला जास्त उपयुक्त वाटले. या सेनापतींवर पराभूत इराण्यांना काबूत ठेवण्याची, त्यांच्याकडून खंडणी वसूल करण्याची आणि शक्य झाले तर खंडणी देणारा अधिक

प्रदेश मिळवण्याची जबाबदारी टाकण्यात आली. इराणमध्ये ठोक स्वरुपात इस्लामीकरण झाले नाही. 'किताबी' म्हणजे ज्यांना धर्मग्रंथ आहे अशा लोकांना असलेल्या सवलती मिळण्यास प्राचीन झरतुष्ट्रधर्मीय अपात्र होतो. तथापि त्यांची संख्या फार मोठी होती. त्यामुळे जिझिया कर देण्याचे कबूल करून त्यांना धर्मांतराच्या संकटातून आपली सुटका करून घेता आली. तरीही त्यांच्यापैकी पुष्कळ लोकांनी निरुपायाने किंवा मॅगिअन पाद्र्यांच्या छळवादाला कंटाळून मुस्लिम धर्म स्वीकारला. अशा लोकांची संख्या हळूहळू वाढत गेली. परंतु संपूर्ण इराणने दहाव्या किंवा अकराव्या शतकापर्यंत इस्लामधर्म स्वीकारला नव्हता.

मध्यवर्ती अरबी सत्तेला समग्र इराणवर तत्काळ आपली निरंकुश सत्ता प्रस्थापित करणे जरी शक्य झाले नाही तरी त्यातील इराणी प्रदेशावर तिने आपला लष्करी ताबा हळूहळू प्रस्थापित केला. निहावंदच्या लढाईनंतर कूफा येथील लष्करी अधिकाऱ्यांनी पाठवलेला सेनापती खुरासान हमरस्त्याने आगेकूच करीत सांप्रतच्या आसादाबाद लिंडीच्या मार्गाने अलवंद पर्वतश्रेणी ओलांडून हमादान व रे या महत्वाच्या शहरांपर्यंत पोचला आणि त्याने ती शहरे जिंकली. या सेनापतीने दळण-वळणाच्या रस्त्यापासून थेट उत्तर व वायव्येपर्यंतच्या दूरच्या प्रदेशांवर हल्ले चढवले. इ. स. ६४३ मध्ये त्याने अझुरबैझान प्रांतावर स्वारी केली. आणि कझवीन येथे दायला-माइट सैन्याचा धुव्वा उडवला. अरब सैन्याची आगेकूच रोखण्यासाठी हे दायलामाइट लोक कास्पियन समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरून घरेदारे सोडून आले होते. या सेना-पतीने आर्मेनियातील इरिव्हाँ व आराराट यांवरही हल्ले चढवले.

इ. स. ६४४ मध्ये एका इराणी खिश्चनाने उमरचा खून केला. कारण उत्तर इराण-मधील मुस्लिम सैनापतीपासून आपणास संरक्षण द्यावे अशी या खिश्चनाने उमरला विनंती केली होती. पण तिचा उपयोग झाला नव्हता. उमरच्या जागी दुसरा खलिफा आला. परंतु खलिफा बदलले किंवा नुकत्याच ताब्यात घेतलेल्या प्रदेशात वारंवार बंडाळ्या होत राहिल्या तरी इस्लामचा विस्तार थांबला नाही. खलिफा उस्मानच्या कारकीर्दीमध्ये बसरा येथून एकाच वेळी अनेक मोहिमा आयोजित करण्यात येऊन पूर्व इराण जिंकण्यात आला. खुरासान या विशाल प्रांतातील अनेक मोठी शहरे एकामागून एक शरण आली. इ. स. ६५२ मध्ये हिरात, निशापूर, बादगीस व सरख्स इत्यादी शहरे ताब्यात येईपर्यंत आणि सिअस्तान हा प्रांत जिंकेपर्यंत ही शरणागती चालू होती. त्यानंतर दोन वर्षांनी फरयाब, जुझजान व तुखारिस्तान ही शहरेही पडली.

आक्रमण करून मिळवलेल्या प्रदेशांतील जमिनी ताब्यात घेण्यासंबंधी दोन नियम करण्यात आले. जेथील रहिवासी शांतपणे शरण आले त्यांना स्वतःच्या जमिनी स्वतः-जवळ ठेवण्याची परवानगी देण्यात आली. जिंकलेला प्रदेश कोणाही मुस्लिम सैनिकाला आपल्या स्वतःकरता आपल्या ताब्यात ठेवता येणार नाही किंवा बळकावता येणार

नाही असे त्याच्यावर बंधन घालण्यात आले होते. जमीन कर (खिराज) आणि डोईकर (जिझिया कर) देऊन जमिनीच्या मालकांना आपल्या जमिनी आपल्यापाशी ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती. आपली मालमत्ता आपापसांत विकण्याचीदेखील त्यांना परवानगी होती. मात्र विजेत्या मुस्लिमांना जमिनी विकता येत नसत. जेथील स्थानिक रहिवाशांना जबरदस्तीने अंकित करावे लागे त्यांच्या जमिनी मुसलमानांच्या सामायिक उपयोगासाठी सार्वजनिक भूकोषात जमा झाल्या असे समजण्यात येई. या जमिनींपैकी कोणतीही जमीन कोणाही मुस्लिम व्यक्तीला खाजगी मालकी हक्काने मिळत नसे. मूळ मालकांनाही त्या जमिनी विकण्याची परवानगी नव्हती. मात्र उत्पन्नाचा काही भाग खंड म्हणून देऊन मूळ मालकांना त्या लागवडीस आणता येत असत. एकदा इस्लामचा स्वीकार केला की मग आपल्या पूर्वीच्या धर्मात परत जाता येणार नाही एवढी एकच शर्त जित देशांना घातली जात असे. धर्मत्यागाला मृत्यूची किंमत सांगितलेली होती.

मुस्लिम आक्रमकांना सर्वत्र सारखे यश आले नाही हे याआधी सांगितलेच आहे. कधी कधी शस्त्रांबरोबर राजकीय मुत्सद्देगिरीचाही वापर करावा लागे. उदाहरणार्थ, एखाद्या बलिष्ठ इराणी मर्झबानकडून (जिल्ह्याचा सरदार) डोईकर घेऊन किंवा तोही न घेता त्याच्या हाती सीमित सत्ता ठेवण्यात येत असे. सरकारी लष्करी मोहिमांव्यतिरिक्त कमी महत्त्वाच्या खाजगी मोहिमा निरंतर चालू असत. निरनिराळ्या अरब जमाती लूट मिळवण्यासाठी लढाया करीत होत्या. अरब सेनानीही पूर्वेकडे आपली सैन्ये पुढे रेटीत होते. अगोदर जिंकलेल्या आणि अद्याप जेथे पूर्णपणे स्थिरस्थावर झालेले नव्हते अशा प्रदेशांची त्यांना चिंता नव्हती. शिवाय ते आपल्या देशापासून दूर अंतरावर होते. त्यामुळे काहीही करावयास ते काहीसे स्वतंत्र होते. नव्या उमय्या वंशातील पहिला पुरुष व खलिफा मुआविया अधिकारपदावर आल्यानंतर म्हणजे ६६१ किंवा ६६२ मध्ये मुस्लिमांनी काबूलवर पहिली स्वारी केली. त्यामागोमाग झालेल्या मोहिमेत बल्ख (प्राचीन बॅक्ट्रिया) या शहराला शरण आणण्यात आले.

इ. स. ६४० नंतर चार वर्षांच्या काळात खुरासानमध्ये वारंवार बंडाळ्या झाल्या ही गोष्ट आक्रमकांच्या प्रगतीमधील चढउताराची निदर्शक आहे. तसेच तद्देशीय लोकांचा मुस्लिम आक्रमणाला प्रखर प्रतिकार झाला आणि त्यामुळे मुस्लिम विजय-मोहिमेला काही काळ खीळ बसली असे इतिहासावरून दिसते. आपल्या ताब्यातील अधिक सुरक्षित भूमीमध्ये अरब फौजांनी घेतलेली कदाचित ती तात्पुरती माघार असण्याचीही शक्यता होती. अर्थात याला पुरावा नाही. इ. स. ६४४ च्या आसपास बंडखोरांचा पाडाव करण्याइतकी अरबांनी पुन्हा शक्ती प्राप्त केली आणि ते परत आगेकूच करू लागले. त्यांनी माझना हे शहर सर केले. आणि नंतर एक वर्षाने काबूलवर निर्णायक हल्ला करून ते जिंकले. तेथील बारा हजार लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारला. खुरासानच्याबाबतीत मात्र नुसते हल्ले करण्यापलीकडे त्यांना यश आले

नाही. सैन्यदळाच्या जोरावर बसरा व खुरासान प्रांतांचा कारभार पाहणाऱ्या इब्ने झियादने प्रयत्न करूनही खुरासान प्रांत मुस्लिमांना संपूर्णपणे शरण आणता आला नाही.

अरबस्तानच्या उत्तरेकडील इजिप्तमधील संपत्ती व त्या प्रदेशाची कमजोर अवस्था मुस्लिम नेत्यांना प्रथमपासून अगदी उघड दिसत होती. त्यामुळे नजीकच्या काळात त्यांची इजिप्तवर धाड पडणार हे निश्चित होते. सीरियातल्या लोकांप्रमाणे इजिप्तची जनतादेखील रोमन सत्तेमुळे आणि रोमन चर्चच्या जुलमामुळे चिडली होती; संतापली होती. काहीही करून त्यांच्यापासून मुक्त व्हावयास इजिप्तची जनता उतावीळ झाली होती. त्यामुळे मुस्लिम फौज चालून येत असल्याचे समजले तेव्हा तिने सुटकेचा निःश्वास टाकला. इजिप्शियनांनी मोठ्या मिनतवारीने प्रतिकाराचा देखावा केला. या आक्रमक फौजेचे आधिपत्य अमर इब्ने अल्-आस हा करीत होता. त्याने आपल्या मुलाकडे सीॲसारिया शहराचा (सीलिसियांतील शहर. ते ६४० मध्ये पडले.) वेढा चालू ठेवण्याचे काम सोपवले. आणि ३५०० घोडेस्वार घेऊन तो स्वतः फराया (पेलसियम) या शहरावर चाल करून गेला. फराया हे इजिप्तचे प्रवेशद्वार होते आणि तेथे बायझनटाईनांच्या लष्करी तुकडीचा तळ होता. अल्पावधीत त्या शहराचा आक्रमकांनी ताबा मिळवला. अमरच्या या उद्योगाला खलिफा उमरचा पाठिंबा होता की नाही हे निश्चित सांगता येत नाही. आपली परवानगी न घेता आपली जागा सोडून अधिक धन मिळवण्याच्या आशेने अमर इब्नेने ती मोहीम हाती घेतली याबद्दल खलिफाने अमरची निर्भर्त्सना केली अशीही एक हकीगत आहे. उमर खलिफाची परंपरा सावध-गिरीच्या धोरणाची होती. त्या दृष्टीने ही हकीगत खरी वाटते. खुद्द खलिफानेच इजिप्तवर स्वारी करण्याचा अमरला आदेश दिला असेही दुसरे एक ठाम मत आहे. वस्तुस्थिती काहीही असो, फराया येथे झालेला तात्पुरता अटकाव मोडून काढून ते छोटे मुस्लिम सैन्य झपाट्याने नाईल नदीच्या परिसरात ज्या ठिकाणी पोचले त्या जागेला मुस्लिम आक्रमकांनी 'अल् फुस्तात' असे नाव दिले. जुने कैरो म्हणून आज ते ठिकाण ओळखले जाते. तेथे त्या सैन्याला सक्तीने भरती केलेल्या सुमारे दहा बारा हजार लोकांची कुमक मिळाली. अरब सेनेने अखेर हेलीओपोलिसजवळील लढाईत रोमनांचा पराभव केला. नंतर नाईल नदीच्या खालच्या अंगाकडे कूच करून ६४१ मध्ये अरब सेनेने अलेक्झांड्रिया ही राजधानी जिंकली.

खलिफा व त्याचा इजिप्तमधील सेनापती यांच्यातील एका पत्रव्यवहाराचा इतिहासकार तबरी याने उल्लेख केला आहे. मुस्लिमांनी इजिप्त आणि इतर देशांवर जे विजय मिळविले त्यावर या पत्रव्यवहाराने बराच प्रकाश पडतो. या पत्रांच्या खरेपणा-विषयी शंका घेण्याचे कारण दिसत नाही. या पत्रव्यवहारात उमरचे म्हणून जे एक पत्र दिले आहे, त्याचा सूर आपणाला परिचित असलेल्या उमरच्या धोरणाशी सुसंगतच आहे. अलेक्झांड्रियाच्या पराभूत सुभेदाराने युद्धबंद्यांना सोडण्याच्या मोबदल्यात खंडणी

देऊ केली होती. ही सूचना स्वीकारायची काय, अशी अरब सेनापतीने उमरकडे विचारणा केली असता उमरने ती मान्य करावयास सांगितले. उमरने म्हटले, "लुटीपेक्षा खंडणी घेणे मला अधिक पसंत आहे. कारण लूट वाटून घेतली जाते आणि लवकरच ती संपुष्टात येते." त्याबरोबरच उमरने आपल्या सेनापतीला अशीही आज्ञा दिली की, इस्लाम स्वीकारायचा की नाही, याचा निर्णय अलेक्झांड्रियातील खिश्चनांना स्वतःलाच करू द्यावा. अलेक्झांड्रियातील खिश्चन हे बहुसंख्य इजिप्शियन खिश्चनां-(कब्ती)प्रमाणे मूलतः प्राचीन ग्रीक वंशाचे होते. त्यांनी इस्लामचा स्वीकार केला तर त्यांना सर्व बाबतीत मुस्लिमांप्रमाणे वागवले जावे आणि त्यांनी इस्लाम धर्मात येण्याचे अमान्य केले तर खिश्चनांप्रमाणे त्यांच्याकडूनही डोईकर घेतला जावा असाही उमरने हुकुम दिला. आपणास मिळालेल्या या हुकुमाचे आपण पालन केले असल्याचे सेनापतीने उमरला उलट लिहून कळवले. त्याचबरोबर जुन्या धर्मात रहावयाचे की, नवा धर्म स्वीकारायचा याचा निर्णय युद्धकैदी करीत होते त्या वेळी आपल्या व आपल्या सेनेतील सैनिकांच्या काय प्रतिक्रिया होत होत्या याचेही वर्णन त्याने त्या पत्रात केले होते. एखादा युद्धबंदी आपण मुस्लिम होणार असे सांगे तेव्हा अरब सैनिकांना "अलेक्झांड्रिया शहर जिंकले त्या वेळेपेक्षादेखील जास्त आनंद झालेला दिसला." धर्म सोडणार नाही, असे एखादा युद्धबंदी सांगे तेव्हा अरब सैनिक अतिशय उदास व क्रुद्ध होत; इतके की जणू काही त्यांच्यापैकीच कोणीतरी शत्रुला जाऊन मिळाला आहे!

मात्र मुस्लिम सैनिकांच्या छावण्यांशेजारी राहात असलेल्या इजिप्शियन खिश्चन (कब्ती) युद्धबंद्यांचे इस्लाम धर्मात येण्यासाठी मन वळवण्यात मुस्लिमांना यश आले. कारण इस्लाम धर्म न स्वीकारणाऱ्यांना द्यावे लागणारे भारी कर आणि निश्चितपणे भोगावी लागणारी सामाजिक अपात्रता यांपासून मुक्तता मिळावी अशी त्यांची इच्छा होती. जसजसा काळ लोटला तसतशी ही इच्छा वाढतच गेली. तथापि नवव्या शतकापर्यंत इजिप्तच्या तळ-प्रदेशांतील बहुसंख्य लोकांनी खिश्चन धर्म सोडला नव्हता. चौदाव्या शतकाच्या मध्यास परिस्थिती बदलली आणि १९४७ मध्ये तर त्या वर्षीच्या शिरगणतीनुसार इजिप्तच्या एकोणीस दशलक्ष लोकसंख्येमध्ये खिश्चनांची संख्या दहा लाखांपेक्षाही कमी होती.

पश्चिमेच्या बाजूला उत्तर आफ्रिकन वाळवंट व भूमध्य समुद्र यांमधील प्रदेशांत मुस्लिम प्रगतीला किंचितही अडथळा आला नाही. पेन्टॅपोलिस (सायरेनिका) येथे राहणाऱ्या बर्बर लोकांची संस्कृती व दृष्टिकोण शहरांतील ग्रीक रहिवाशांपेक्षा सर्वस्वी भिन्न होता. त्यांचा धर्मही अद्याप प्राचीन गूढतावादी अवस्थेतच होता. या बर्बरांच्या दृष्टीने कोणीही विजेता सारखाच चांगला किंवा वाईट होता. त्यामुळे त्यांनी फारसा प्रतिकार न करता इस्लाम धर्म स्वीकारला. मात्र बार्का इत्यादी शहरांतील काही बर्बरांवर बिगर-मुस्लिमांना द्यावा लागणारा डोईकर देण्यासाठी आपली मुले-बाळे विकण्याची पाळी

आली. बार्का हे शहर इजिप्तचा सेनापती अमर इब्ने अल् आस याने ६४२ मध्ये जिंकले. इ. स. ६४३ मध्ये अमरने ट्रिपोली शहरास वेढा घातला. तेही शहर पुढल्याच वर्षी पडले. त्यानंतर लवकरच उमर खलिफा मरण पावला आणि त्याबरोबरच पश्चिमेकडे लष्करी मोहिमा करण्यावर त्याने घातलेली बंदी संपली. इ. स. ६४७ मध्ये व त्यापुढील वर्षी उत्तर आफ्रिका व बाद्‌दान या प्रदेशांवर मुस्लिमांनी चढाई केली. त्यानंतरच्या वीस वर्षांत पेन्टॅपोलिस हा जवळपास संपूर्णपणे मुस्लिम वस्तीचा प्रदेश बनला. ग्रीक प्रदेशावर वारंवार हल्ले होत होते आणि मुस्लिम सैन्ये उत्तर व पश्चिम दिशेला सतत पुढे जात होती. इ. स. ६७५ मध्ये मुस्लिम फौजांनी कैरवान हे शहर वसविले आणि ६८१ मध्ये प्रखर युद्धानंतर त्यांनी इफ्रिकिया[1] या शहराचा ताबा मिळवला. या वेळी प्रत्येक लढाईत मुस्लिम फौजांना जबरदस्त प्रतिकार होत होता. सांप्रत ट्युनिशिया या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व जेथील बहुसंख्य जनता ख्रिश्चन आणि ज्यू होती असे म्हणतात त्या प्रदेशातील बर्बरांनी आक्रमकांचा दृढतेने प्रतिकार केला. त्यांच्यापैकी ज्यांच्यावर जबरदस्तीने इस्लाम लादण्यात आला होता त्यांनी पुढे अनेक वेळा त्या धर्माचा त्याग केला असे सांगतात. ट्युनिशियात पुढील काळात अनेक मुस्लिमविरोधी उठाव झाले. कैरवान येथील उठाव नमुनेदार होता. तेथील एका बर्बर ज्योतिषी स्त्रीने[2] स्थानिक लोकांत मुस्लिमांविषयी एवढी वैरभावना प्रज्वलित केली की मुस्लिमांना काही काळ ते शहर सोडून जाणे भाग पडले. शहराची नासधूस करण्यात आली. मुस्लिमांना सैन्याची कुमक मिळेपर्यंतच या ज्योतिषिणीचे बंड चालू राहिले. नंतर मुस्लिम सेनेने तिचा व तिच्या पाठिराख्यांचा पराभव करून शहराचा पुन्हा ताबा घेतला. कैरवानवर ताबा मिळवल्यानंतर कार्थेज शहरापर्यंत पोचायला मुस्लिम आक्रमकांना पुढे बारा वर्षे लागली (६७८ पर्यंत ते शहर पडले नव्हते). कार्थेजच्या पाडावानंतर तेथील ग्रीक नागरिक सिसीलीला किंवा स्पेनला पळून गेले.

लष्करी आक्रमणाद्वारे उत्तर आफ्रिका जिंकण्याच्या मुस्लिमांच्या मोहिमेत इ. स. ७०८ हे वर्ष युगनिदर्शक समजले जाते. याच वर्षी मुसा इब्ने नुसैर या उत्तर आफ्रिकेच्या सुभेदाराने त्याच्याकडे सोपवलेल्या प्रदेशांत पहिली मोहीम काढली. लूटमार करण्यासाठी काढलेल्या मोहिमांची एक आनुषंगिक बाब यापेक्षा आता अरबांना इस्लामचे काहीसे जास्त महत्त्व त्या काळात वाटू लागले होते. म्हणूनच मुसाने आपला बंधमुक्त गुलाम तारिक इब्ने झियाद याची तांजा(टँजियर्स)च्या सुभेदारीवर नियुक्ती केली. त्याला आफ्रिकेतील मोहिमेवर पाठवले तेव्हा त्याच्या सैन्यात बहुसंख्येने असलेल्या

१. फ्रॉइसार्ट याचे शब्दात 'आफ्रिका' : या शहराला मूर लोक 'माहादिया' असेदेखील म्हणत.

२. काहिना हे तिचे नाव. इब्न खाल्दुन याच्या म्हणण्याप्रमाणे ती ज्यू होती.

बर्बर सैनिकांना कुराणाचे अणि महत्त्वाच्या इस्लामी धार्मिक विधींचे शिक्षण देण्यासाठी एक शिक्षकदेखील पाठवल्याचे आढळते. या काळात आफ्रिकन प्रदेशात प्रस्थापित झालेली इस्लामची पकड पुढे इतकी बळकट झाली की उत्तर आफ्रिका हा एक अतिशय कडवा मुस्लिम देश बनला आणि त्या वेळेपासून आजतागायत तो तसाच राहिला आहे.

मुस्लिम विस्ताराच्या इतिहासातील ज्या काळाचा आतापर्यंत विचार केला त्या काळात काही अपवाद वगळता अरबांनी समुद्रमार्गाने लांब पल्ल्याची आक्रमणे केलेली नव्हती. अरब हे उत्तम दर्यावर्दी नव्हते. त्यांच्यापाशी सागरी वाहतुक साधनेही फारशी नव्हती. या उणीवा होत्या तरी भौतिक फायद्याची आशा असेल तेव्हा त्यांनी समुद्र-मार्गाने छोटी छोटी आक्रमणे केल्याचे आढळते. उदाहरणार्थ, ( हिजरी ३२/इ. स. ६५२-३ ) मध्ये अरबांनी र्‍होड्स बेटावर आक्रमण करून त्या बेटाच्या राजधानीवर हल्ला चढवला आणि तेथील प्रसिद्ध भव्य पुतळा पळवून नेला. त्यानंतर आठ वर्षे (६७३–८०) या बेटावर काही मुस्लिम 'वसाहत' करून राहिले होते. सीरियातून त्यांना अन्नपुरवठा केला जात असे. मुस्लिमांची ही वसाहत शेजारच्या बायझन्टाइन लोकांच्या दृष्टीने उघड उघड एखाद्या काट्यासारखी होती. बायझन्टायनी जहाजांवर हल्ले होऊ लागले, आणि त्यामुळे त्यांचा त्यांच्या मूळ तळाशी संबंध तुटला. पुढे मुस्लिमांनी या बेटाचा ताबा सोडला. कारण मुस्लिम अधिकाऱ्यांना एक नित्याचा काळजीचा विषय होऊन बसावा इतके त्या बेटाचे संरक्षण करणे अतिशय कठीण झाले. र्‍होडस्‌वर प्रथम हल्ला करण्यात आला त्याच वर्षी सिसीलीच्या किनारपट्टीवरीही चढाई करण्यात आली. हिजरी ४५/इ. स. ६६५ मध्ये सिसीलीवर पुन्हा हल्ला करण्यात आला. या वेळी थेट सिरॅक्युसपर्यंत मुस्लिम सेना गेली होती असे म्हणतात. या हल्ल्यात मुस्लिमांनी अनेकांना युद्धबंदी करून नेले. आणि चर्चेसमधील चांदीसोन्याच्या अनेक मूर्ती त्यांनी पळवल्या. याहि अगोदर म्हणजे २७/६४७-४८ मध्ये सायप्रसवर आक्रमण करण्यात आले होते. पुढे इ.स. ६५३ मध्ये सीरीयन किनारपट्टीवरील मुस्लिमवसाहतीवरील हल्ल्यांत सायप्रसवासीयांनी ग्रीकांना मदत केली तेव्हा खलिफा मुआवियाने बारा हजार सैनिकांची एक संरक्षण तुकडी सायप्रसमध्ये तैनात केली.

मुसा इब्ने नुसैरने इ. स. ७०८ मध्ये उत्तर आफ्रिकेच्या पश्चिम भागातील बर्बरांवर स्वारी केली. त्याच वर्षी त्याने मजुर्काविरुद्ध देखील यशस्वीपणाने चढाई केली. आज ज्याला जिब्राल्टर सामुद्रधुनी म्हणतात तेथपर्यंत त्याने मजल मारली. त्यामुळे स्वाभाविकच इबेरिअन आखातातील संपत्ती मिळवण्याच्या आपल्या प्रयत्नात आता जिब्राल्टर सामुद्रधुनीचा अडथळा राहिलेला नाही असे त्याला वाटू लागले.

अंदलूसियन ( स्पॅनिश ) किनाऱ्यावरील प्रदेशांवर ७१० मध्ये प्रथम हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात सैन्याने अल्जिसिरासकडून मिळवलेली लूट इतकी प्रचंड होती की पुढील वर्षी पुन्हा त्या प्रदेशावर हल्ला करण्याचा मुस्लिमांना मोह झाला. मुसाने

आपल्या तारिक नावाच्या बंधमुक्त बर्बर गुलामाला मोठे सैन्य देऊन पाठवले. तेथील सत्ताधारी राजांच्या आपापसांतील मत्सरपूर्ण कलहामुळे आणि पाद्यांच्या भ्रष्टाचारामुळे तो देश इतका दुर्बल झाला होता की देशाला मुळी नेतृत्वच राहिले नव्हते. त्यामुळे आक्रमकांना तेथे फारसा प्रतिकार झाला नाही आणि ते थेट अंदलुसियाच्या अंतर्भागापर्यंत पोचू शकले. टॉलेडोच्या[1] रॉड्रिक्सने आक्रमकांची आगेकूच रोखून धरण्याचा दुर्बल प्रयत्न केला. पण त्यांनी तो मोडून काढला. आणि थोड्याच वर्षांत आस्टुरिअस हा बिस्केच्या उपसागराच्या दक्षिण किनाऱ्यावरील डोंगराळ प्रांत वगळता मुस्लिमांनी संपूर्ण अंदलुसिया आखाताचा ताबा मिळवला.

इ. स. ७१९ त दक्षिण गॉल (सेप्टिमानिया) मध्ये मुस्लिम आक्रमक मोठ्या संख्येने जमा झाले. आणि त्यांनी कारकॅसोन व नार्बोन ही शहरे ताब्यात घेतली. ७३० मध्ये एव्हिग्नान शहराचा पाडाव झाला. तेव्हा त्याचा नवनियुक्त सुभेदार अब्द अल् रहमान हा संपूर्ण गॉलचा विजेता बनण्याची स्वप्ने रंगवू लागला. त्याने आपली विजयमोहीम गॅरोनवर सैन्य पाठवून आणि बोर्डुक्स काबीज करून सुरू केली. तेथून पुढे टुर्स घेण्याच्या उद्देशाने तो लॉइरकडे निघाला. वाटेत "पायसीटीयर्स व टूर्स या शहरांच्या[2] दरम्यान" एके ठिकाणी चार्ल्स 'द हॅमर' (पेपिन द हरिस्टॉलचा मुलगा) याच्याशी त्याची गाठ पडली. चार्ल्सशी झालेल्या लढाईत त्याचा इतका निर्णायक पराभव झाला की त्यानंतर मुस्लिमांनी फ्रान्स जिंकण्याचा अधिक प्रयत्न केला नाही. टूर्स येथील लढाईमुळे सारासेनचे रहिवासी कायमचे देशाबाहेर हाकलले गेले, असे सर्वसाधारणपणे समजले जाते. तथापि वस्तुस्थिती अशी दिसते की त्यांनी आपल्या हाती नार्बोन शहर काही काळ ठेवले होते आणि त्या शहराच्या सुभेदाराने ७३४ मध्ये ऱ्होन नदी ओलांडून आर्ल्स हे शहर काबीज करण्यात आणि ॲव्हिग्नॉन पुन्हा जिंकून घेण्यातसुद्धा यश मिळवले होते. मक्कारी या इतिहासलेखकाच्या मते लँग्वेडॉकच्या सारासेन्सनीदेखील ऱ्होन नदीच्या परिसरात मजबूतपणे पाय रोवलेला होता. त्यांनी नार्बोन मार्गे डॉफाईनमध्ये आक्रमणे केली आणि तेथील कित्येक चर्चेस उद्ध्वस्त केली. याव्यतिरिक्त ७३९ नंतर ऱ्होनमधून त्यांनी आक्रमणे केल्याची नोंद नाही. मात्र नार्बोन शहर वीस वर्षे मुस्लिमांच्या हाती होते. त्यानंतर तद्देशीय रहिवाशांनी बंड केले आणि तेथे तैनात केलेल्या मुस्लिम सैनिक

---

१. ग्वाडालेटच्या किनाऱ्यावरील (वादी अल् -लक्का) जेरेस द ला फ्रॉन्टेरानजीक ही लढाई झाली अशी पारंपरिक समजूत आहे. अगदी अलीकडेपर्यंत इतिहासकारही तसेच मानीत होते. परंतु या संबंधीच्या पुराव्याच्या अलीकडच्या छाननीवरून असे दिसते की, बार्बेट (किंवा गुआडबेका) या छोट्या नदीचा 'ला जांडा' या सरोवराशी जेथे संगम होतो तेथपासून आणखी दक्षिणेस ही लढाई झाली.

२. या दोन शहरांत सत्तर मैलांचे अंतर आहे. लढाई नेमकी कोठे झाली यासंबंधी अद्याप संशोधकांना ठरवता आलेले नाही.

तुकडीतील सैनिकांना ठार मारले. अशा रीतीने आपल्या देशावरील परकी सत्तेचा त्यांनी अंत केला हे निश्चित. मात्र अद्याप स्पेनमधून त्या देशावर हल्ले चालू होते.[1]

मुस्लिम सैन्ये पश्चिमेस किती लांबवर गेली होती ते आतापर्यंत आपण पाहिले. आता परत पूर्वेकडे येऊन त्या भागात मुस्लिम फौजांनी व इस्लामने किती प्रगती केली ते पाहू. खुरासान प्रांतामध्ये मुस्लिमांना सर्वत्र सारखे यश मिळवता आले नव्हते हे आपण पाहिलेच आहे. खरे म्हणजे त्या प्रांतात अरबांना कधीही पूर्णांशाने शांतता निर्माण करता आली नव्हती. किंवा आपल्या ताब्यातील प्रदेशाच्या सीमा त्यांना निश्चित करता आल्या नव्हत्या. कारण त्या प्रांतावरील आपला ताबा कायम ठेवण्याकरता अरबांनी जे सैन्य तेथे तैनात केले होते त्या सैन्याला ऑक्सस नदीमार्गे सतत चालू असणारे तुर्कांचे किंवा स्थानिक असंतुष्ट इराण्यांचे हल्ले परतवून लावण्याचे काम करावे लागत असे. स्थानिक इराणी लोकांच्याही काही अडचणी होत्याच. इस्लाम धर्मामुळे त्यांच्या जुन्या निष्ठांचा छेद घेतला जाणार होता. एवढेच नव्हे तर त्या निष्ठा त्यांना सोडाव्या लागणार होत्या. ज्या इराण्यांनी नव्या धर्माचा अंगिकार केला होता ते धर्माच्या बाबतीत आपल्या नव्या बांधवांच्या बाजूने असले तरी अरब–मुस्लिमांच्या रक्तसंबंधियांशी किंवा त्यांच्यातील जुन्या अर्धसरंजामदारी सरदारांशी किंवा धन्यांशी हे इराणी मिसळावयास राजी नव्हते. जुन्या निष्ठांचा प्रभाव अद्याप कायम असल्यामुळे कित्येक जण इस्लाम धर्मात गेले नाहीत. कालांतराने निशापूर, मर्व्ह आणि हेरट ही शहरे जेव्हा मुहम्मदी धर्माचे मजबूत बालेकिल्ले बनली; मुस्लिम धर्माची जणू प्राथमिक संस्कार केंद्रे झाली आणि आपला प्रभाव पाडू लागली तेव्हा कोठे आपल्या सुरक्षित किल्ल्याच्या बाहेर बिनधोकपणाने अरब मुस्लिमविजेत्यांना हिंडता फिरता येऊ लागले. तरीदेखील त्यांना फार धोका वाटे आणि म्हणून दळणवळणाच्या मार्गावर खडा पहारा ठेवावा लागे. अल्–हकम या खुरासानच्या असीराने काळजीपूर्वक तयारी करून ४७।६६७ मध्ये खुरासानच्या दक्षिण-पूर्वेकडील ख़ूर या प्रदेशावर स्वारी केली. तसेच त्याने आरल समुद्राच्या दक्षिणेकडील ख्वाराज्म ( खिव ) वरही चढाई केली. पुढे दोन वर्षांनी बाल्ख हे शहर सर करण्यात आले. बाल्ख हे ऑक्सस नदीच्या सर्वांत नजीक असलेले मोठे शहर होते. ऑक्सस नदीपलीकडील ट्रान्सोक्सिआना या प्रदेशात अद्याप मुस्लिम जाऊ शकले नव्हते. या प्रदेशात लष्करी हालचाली करण्याच्या दृष्टीने बाल्ख हे शहर तळ म्हणून मुस्लिम सेनेला उपयोगी होते. ट्रान्सोक्सिआनाचे या काळात पाच विभाग होते. एक : सुग्ड ( प्राचीन सॉग्डियाना ). या विभागाच्या बुखारा व समरकंद अशा दोन राजधान्या होत्या. दोन : ख्वाराज्म. ऑक्ससनदीच्या दुआबातील प्रदेश. तीन : सघानियन. हा विभाग ऑक्सस-नदीच्या वरील बाजूस ख्वाराज्मच्या दक्षिण–पूर्वेस होता. चार : फरघना : जक्झार्टस

१. फ्रान्समधील मुस्लिमांविषयीच्या माहितीसाठी Invasions des Sarazzins en France; एम्. रेनॉड ( Paris, 1836 ) हे पुस्तक पहावे.

नदीच्या वरील बाजूस असलेला प्रदेश आणि पाच : शाश. हा याच नदीच्या अरल समुद्राला मिळणाऱ्या प्रवाहाजवळील प्रदेश.

ऑक्सस नदी ओलांडून ६७१ मध्ये ट्रान्सोक्सिआनावर पहिला हल्ला करण्यात आला. त्यानंतर लूट मिळवण्यासाठी वारंवार हल्ले होत होते. परंतु त्यानंतर मात्र साल्म इब्ने शियाद हा खुरासानचा सुभेदार होईपर्यंत ( ६८१–३ ) मुस्लिम आक्रमक ट्रान्सोक्सिआनाच्या वाटेला गेले नाहीत. कारण तेथे फार कडक हिंवाळा होता. मुस्लिम सेनेच्या या मोहिमा आपल्या मूळ ठाण्यापासून दूर अंतरावरील प्रदेशांत काढलेल्या होत्या. या मोहिमांत त्यांना आलेल्या अडचणी बव्हंशी शारीरिक होत्या. आक्रमक सैन्यांतील बहुसंख्य सैनिकांना त्या प्रदेशातील कडक थंडीची सवय नव्हती. बरोबर खूप गरम कपडे बाळगावे लागत होते. त्यामुळे झटपट हालचाली करणे त्यांना जमत नव्हते. बुखारापाशी तर त्यांना डोंगराळ प्रदेशांत लढावे लागले. डोंगरी लढाईची त्यांना माहिती नव्हती. या मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या अरब सैनिकांमधील अंतर्गत वांशिक हेवेदावे हेदेखील त्यांच्या मंद प्रगतीला कारणीभूत झाले. तथापि ज्यांच्याविरुद्ध अरबांनी आक्रमण केले होते त्या लोकांतील दुही मात्र त्यांच्या पथ्यावर पडली. राज्यकर्ते व प्रजाजन हे भिन्न भिन्न वंशांचे असल्यामुळे समाजाचे दोन तुकडे झाले होते. जन्म, भाषा व जीवनपद्धती या बाबतीत प्रजाजन इराणी होते तर राज्यकर्ते तुर्की होते. हे तुर्की मूळचे जक्झार्टस नदीच्या पूर्वेकडील प्रदेशांतले केवळ खंडणी वसूल करण्यासाठी तेथे आले होते. त्या प्रदेशात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी या तुर्की सत्ताधाऱ्यांशीच अरब आक्रमकांना सामना करावा लागला. मुस्लिम आक्रमकांविरुद्ध तेथे एकजूट होऊ शकली नाही याचे कारण तेथील लहान लहान राज्ये आपापसात लढत होती. असे असले तरी इस्लामच्या व मुस्लिम साम्राज्याच्या विस्ताराच्या बाबतीत अरबांना मिळालेले यश प्रारंभी तरी अगदी मामूली होते. कारण तुर्कीप्रमाणे अरबांनाही फक्त लूट हवी होती. त्यापेक्षा स्थायी महत्त्वाचे कार्य त्यांनी भवितव्यतेवर सोपवले होते.

दुसऱ्या कोणाहिपेक्षा कुतैब इब्ने मुस्लिम ( ७०५ मध्ये खुरासानचा सुभेदार म्हणून याची नेमणूक झाली होती ) या सेनापतीनेच ट्रान्सोक्सिआनामधील मुहम्मदी धर्मीयांची सत्ता दृढ करण्याची कामगिरी केली. त्यानेच तेथे पहिल्याप्रथम अरब सत्तेची निर्विवाद-पणे प्रतिष्ठापना केली. जिंकलेल्या प्रदेशात मुस्लिमांशिवाय इतर कोणालाही शस्त्रे बाळगता येणार नाहीत, हा उमरने केलेला कायदा त्याने शिथिल केला आणि जित समाजांतील लढाऊ गटांना त्याने आपल्या सेनेत दाखल करून घेतले. खंडणी देण्याच्या अटीवर त्याने स्थानिक राजांना सत्तेवर रहावयास परवानगी दिली. मात्र प्रत्येक राजावर देखरेख करण्यासाठी आपला एकेक अधिकारी त्याने नेमला. त्याने निरनिराळ्या जिल्ह्यांत अरबांच्या ‘ वसाहती ’ स्थापन केल्या. या वसाहती अरब व मुस्लिम जीवनपद्धती आणि

धर्मतत्त्वे यांच्या शिक्षणाची केंद्रे बनल्या. परंतु या वसाहतींत राहणाऱ्या तद्देशीय लोकांना आपल्या स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या अधिकारकक्षेत राहून एक प्रकारचे स्वतंत्र जीवन जगण्याची परवानगी दिली होती. अशा प्रकारच्या वसाहतींपैकी समरकंद, ख्वारिज्म, बुखारा या वसाहती सर्वांत महत्त्वाच्या होत्या. तेथे मजबूत संरक्षक सैन्य तैनात केले होते. या शहरांतील पारशी जमातीच्या एकूणएक अग्यारींचा नाश करण्यात आला. त्यांना हात न लावण्याइतकी सहिष्णुता अरबांनी दाखवली नाही. या युद्धात (७६५) पेकंद हे बाजाराचे शहर अरबांनी जिंकले. या शहरातील शस्त्रास्त्रांचे प्रचंड साठे त्यांच्या हाती पडले. अरबांना ते अतिशय उपयोगी ठरले. कारण फारच थोड्या अरबांजवळ पुरेसे युद्धसाहित्य होते. या महत्त्वाच्या फायद्याव्यतिरिक्त या लढाईतील विजयामुळे अरब आक्रमकांना आणखी आक्रमणे करण्यास प्रोत्साहन मिळाले. तुर्की-कडून कणखर प्रतिकार होऊनही ही आक्रमणे यशस्वी झाली. कुतैबचा वरिष्ठ अधिकारी व इराकचा कुशल व दृढनिश्चयी सुभेदार हज्जाज हा दूरवर चाललेल्या या मोहिमांतील घडामोडी काळजीपूर्वक अभ्यासीत होता हे विसरता कामा नये. आपला सेनापती कुतैब याच्यावर त्याचे खूपच वजन होते. त्याचा फायदा घेऊन त्याने कुतैबला आणखी आगेकूच करण्याची विनंती केली. कुतैबने बुखारावर प्रथम हल्ला चढवला. पण तो परतवून लावण्यात आला. तेव्हा कुतैब ऑक्सस नदी ओलांडून मर्व्हकडे परत फिरला. त्या-नंतरच्या मोहिमेत सुघडच्या राजाशी त्याला सामना द्यावा लागला. आपले सैन्य घेऊन हा राजा बुखाराच्या राजाच्या मदतीला आला होता. परंतु अरब सेनापतीची जिद्द मोठी होती. त्यांत आणखी सुभेदार हज्जाज याचे त्याला प्रोत्साहन असे. त्या जोरावर त्याने अखेर इ. स. ७०९ मध्ये विजय संपादन केला. सुघडियनांनी स्वतंत्रपणे त्याच्याशी तह केला आणि खंडणी देण्याचे मान्य केले.

इ. स. ७११ मध्ये म्हणजे ज्या वर्षी स्पेनवर स्वारी करण्यात आली त्याच वर्षी कुतैबने सिस्टान या अतिपूर्वेकडील इराणी प्रदेशावर स्वारी केली. या स्वारीवर असताना शेकडो मैल अंतरावरच्या ख्वाराज्मच्या राजाने कुतैबकडे मदतीची मागणी केली. सत्तालोभापोटी त्या राजाच्या धाकट्या भावाने राजाविरुद्ध चढाई केली होती. या राजाच्या मदतीला जाण्याकरता शेकडो मैलांचा प्रदेश पार करावा लागणार होता. अरब सेनापतीने ती प्रदीर्घ मजल मारली. आणि स्वतःला फायदेशीर अशा अटींवर त्याने त्या राजाला भरपूर सहाय्य केले आणि नंतर तो पुन्हा दुसऱ्या स्वारीवर निघाला. या मोहिमेत त्याने सुघडियनांवर हल्ला चढवला. कारण ते लोक सतत अरबांचे शत्रुत्व करीत होते. सुघडियनांना बेसावध अवस्थेत पकडून आणि त्यांच्या सैन्यफळ्या फोडून त्यांच्या राजधानीपर्यंत– समरकंदपर्यंत– आपण मुसंडी मारू शकू अशी त्याची अपेक्षा होती. तथापि त्याची अपेक्षा पूर्णतया सफल झाली नाही. अखेर ते शहर जिंकण्यात व तेथील बरीचशी संपत्ती हस्तगत करण्यात तो यशस्वी झाला तरी त्याला उग्र प्रति-काराला तोंड द्यावे लागले आणि त्यात त्याचे बरेच सैनिक कामाला आले. शाश व

फरघाना येथील राजांची मदत मिळाल्यामुळेच सुघडियनांना अरब आक्रमकांचा थोडा तरी प्रतिकार करता आला. जक्झार्टस नदीपलीकडे या राजांची राज्ये होती. समरकंद काबीज झाल्यावर शांततेचा तहनामा झाला तरी त्या दोन राजांनी केलेले शत्रुत्व कुतैब विसरू शकला नाही. शक्य तितक्या लवकर त्यांचा सूड घेण्याचा त्याने निर्धार केला, आणि ७१३ मध्ये त्याने तो पुरा केला. त्या वेळी मुस्लिम फौजा प्रथमच जक्झार्टस नदी ओलांडून गेल्या. शत्रुत्व करणाऱ्या त्या दोन्ही राजांच्या जमिनी मुस्लिमांनी हस्तगत केल्या आणि काही मुस्लिमांनी तर काश्गर या त्या वेळेच्या चिनी प्रदेशावर हल्ला चढवून त्याही पलीकडे आतवर चीनमध्ये प्रवेश केला असावा असा एक अंदाज आहे.

इतिहास लेखक तबरी याने या अंदाजाला दुजोरा दिला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, चिनी सीमेवर कुतैब पोचला तेव्हा चिनी सम्राटाने त्याला एक संदेश पाठवला. इस्लाम धर्माची तत्त्वे तपशीलवार समजून सांगण्यासाठी उच्च दर्जाचे बारा धर्मप्रसारक चीनच्या दरबारात पाठवावे अशी विनंती सम्राटाने त्या संदेशात केली होती. तबरीचे हे म्हणणे खरे मानायचे तर कुतैबने पाठवलेल्या दूतांचे चिनी सम्राटाने मैत्रीपूर्ण स्वागत केले नाही आणि आपल्या जमिनीवर आक्रमण केले तर त्याचे भयंकर परिणाम आक्रमकांना भोगावे लागतील अशी धमकी देऊन चिनी सम्राटाने त्या दूतांना हाकलून लावले या वस्तुस्थितीचे काय ? ते काहीही असले तरी इराणमार्गे चीनवर स्वारी करण्याचा रीतसर प्रयत्न मुस्लिमांनी केला नव्हता हे निश्चित. कुतैबने चिनी प्रदेशात केलेला प्रवेश हा मुस्लिम फौजा मध्य आशियात कोठपर्यंत पोचल्या होत्या एवढेच सूचित करतो. या आक्रमणानंतर लवकरच नव्या खलिफाने खुरासानच्या सुभेदारीवर आपला माणूस नेमला. पण कुतैबने सुभेदारी सोडण्यास नकार दिला. त्याने बंड केले आणि लढाईत तो मारला गेला.

इस्लाममध्ये न आलेल्या अन्य प्रदेशांवर मुस्लिम सैन्याने केलेल्या त्या अगोदरच्या जवळपास सर्व आक्रमणांप्रमाणेच, कुतैबने खुरासान व ट्रान्सोक्सिआनावर केलेल्या स्वाऱ्यांतूनही इस्लामच्या विस्ताराच्या दृष्टीने फारच थोडे पदरात पडले. त्यामुळे सैन्यशक्तीऐवजी अन्य मार्गांनी इस्लामचा प्रसार करणे आवश्यक झाले. म्हणूनच बहुदा उमर या दुसऱ्या उमय्या खलिफाने ( १७१७–२० ) आणि अति उत्साही मुस्लिमाने इस्लाम स्वीकारणाऱ्यांना करमाफी जाहीर केली असे दिसते. जराह या खुरासानच्या आपल्या सुभेदाराला त्याने लिहिले होते : " जो कोणी मक्केकडे तोंड करून प्रार्थना करावयास तयार असेल त्याला कर माफ कर." ही सवलत म्हणजे कर चुकवण्याची एक सोपी युक्ती ठरली. आणि अनेकांनी घाईघाईने नवा धर्म पत्करला. त्यामुळे महसूलावर घातक परिणाम होऊ लागला. तेव्हा इस्लाम स्वीकारण्यासाठी घातलेल्या या मामूली अटीचे जे परिणाम होत होते त्याची जराहने उमरला कल्पना दिली

आणि अशी सूचना केली की सुंता ही इस्लामधर्म स्वीकारण्यासाठी अट ठरवली जावी. पण उमरने त्याची ही सूचना फेटाळली आणि सांगितले, "जनतेला इस्लामचा उपदेश करण्यासाठी अल्लाने मुहम्मदांना पाठवले, सुंता करा असे सांगण्यासाठी नव्हे." खुरासानचा बंदोबस्त फक्त तलवारीनेच होऊ शकेल असा आपला विश्वास असल्याचे जराह आग्रहपूर्वक सांगू लागला तेव्हा खलिफाने त्याला सुभेदारपदावरून दूर केले.[1]

धर्मप्रसाराच्या गरजा आणि सरकारी तिजोरीची गरज यामधील अशाच प्रकारचा आणखी एक संघर्ष ७२८ मध्ये खलिफा हिशाम याच्या कारकीर्दीत उद्भवला. अशरास इब्ने अब्दुल्ला या खुरासानच्या सुभेदाराने ट्रान्सोक्सिआनामधील सर्व रहिवाशांना करमाफीचे आमिष दाखवून इस्लाम धर्मात आणायचे ठरविले. या सवलतीमुळे स्थानिक रहिवाशांना इस्लाममध्ये आणण्यात मुस्लिम धर्मप्रसारकांना प्रचंड यश मिळाले. त्यामुळे ज्यांची मिळकत, त्यांनी गोळा केलेल्या करांवर अवलंबून होती अशा महसूल अधिकाऱ्यांनी विरोध सुरू केला. स्थानिक जमात-नेतेही (दिहकान्स) त्यांना सामील झाले. कारण इस्लामसारख्या लोकशाहीवादी धर्माने शेतकरी वर्गात मजबूत जम बसवला तर त्यांच्या प्रतिष्ठेला मोठाच धक्का पोचण्याचे भय होते. इराणमध्ये संरक्षणासाठी ठेवलेल्या अरब सैन्याचा गुजारा स्थानिकरीत्या जमा होणाऱ्या महसूलावरच अवलंबून असल्यामुळे सर्व कर रद्द करण्यात आले तर त्या सैनिकांवर लवकरच उपासमारीची पाळी आल्याशिवाय राहणार नाही ही गोष्ट सुभेदाराला पटवून देण्यात सरकारी अधिकाऱ्यांना यश आले. तेव्हा सुंता केलेल्या किंवा न केलेल्या अशा पूर्वीच्या प्रत्येक करपात्र व्यक्तीवर सुभेदाराने खिराज किंवा जमीनकर पुन्हा बसवला.

या नव्या धोरणामुळे बंडाचा प्रचंड भडका उडाला. आणि परिणामान्ती दाबूसिया व समरकंद जवळचे छोटे विभाग वगळता सर्वच्या सर्व ट्रान्सोक्सिआना पुढील काही वर्षे अरबांना गमावून बसावा लागला. नंतरच्या काळात ट्रान्सोक्सिआनातील छोटे प्रदेश दमास्कसमध्ये अधिकारपदावर असलेल्या उमय्या खलिफा हिशामला जरी परत मिळू शकले नाहीत तरी ते इस्लाममध्येच राहिले. ७३४ मध्ये पैगंबर कुटुंबाच्या अधिकाराचे आपण पाठिराखे असल्याचा दावा करणाऱ्या अलिदांनी हिशामविरुद्ध बंड उभारले आणि त्यांनी काही अनुयायीही मिळवले. अलिदांनी असे आश्वासन दिले की, 'संरक्षित धर्मातून' (या ठिकाणी प्रामुख्याने पारशी) जे लोक इस्लाममध्ये आले आहेत त्यांच्यावर कर बसवला जाणार नाही व कोणावरही जुलूम केला जाणार नाही या पूर्वी झालेल्या कराराचे पालन केले जाईल.

---

१. बालाझुरी याचे फतेह अल्-बुलदान, पृष्ठ ४२६. धर्माचे अधिकार व सरकारी तिजोरीचे अधिकार यांत तडजोड घडवून आणण्यासाठी दुसऱ्या उमरने योजिलेल्या उपायांसंबंधीच्या जास्त माहितीसाठी एच्. ए. आर. गिब याचे "Fiscal Rescript of Umar II" in Arabica, II (Leyden, 1955), 1-16 पहा.

प्रारंभीच्या मोहिमेनंतर मुस्लिमांनी आक्रमित प्रदेशांत एकदा पक्का पाय रोवल्यानंतर त्या प्रदेशाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी केवळ तेथे लूटमार करण्याची राहिली नाही. पूर्वी ज्याप्रमाणे कुफा व बसरा या इराकमधील शहरांतील छावण्यांत किंवा इजिप्तमधील फुस्तात (जुने कैरो) या शहरातील छावण्यांत धर्माचे शिक्षण देणारे आणि धार्मिक कायद्यांचे तज्ज्ञ नेमले होते त्याचप्रमाणे ट्रान्सोक्सिआनामधील छावण्यांतही त्यांची नेमणूक करण्यात आली. पुढे लवकरच कुराणाचा खरा अर्थ समजून घेण्याची ज्यांची इच्छा होती त्यांच्याकरता धार्मिक कायदे व भाषा शिकवण्याची सोय असलेल्या पाठशाळा काढण्यात आल्या. सहाजिकच या शाळा इस्लामला शक्ति प्राप्त करून देणारी केंद्रे बनल्या. आणि या शाळांतून झालेल्या प्रयत्नांतूनच हळूहळू जित प्रदेशांनी इस्लामचा अंगिकार केला. अब्बासी खलिफांचे आसन स्थिर झाले त्यासुमारास मुस्लिम विजयाची पहिली शक्तिशाली लाट ओसरली होती. जित प्रदेशातील बराचशा भागातील लोकांच्या लवकरच लक्षात आले की राजधानी बगदादपासून आपण इतके दूर आहोत की खलिफाची सत्ता आपणाला सहज झुगारून लावता येईल. खिलाफतीच्या अगदी एका टोकाला असलेल्या इराण, स्पेन आणि उत्तर आफ्रिका या प्रदेशांतील ज्या बंडखोरांना लष्कराचा पाठिंबा मिळाला त्यांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली. परंतु इराणने खलिफाशी नाममात्र तरी निष्ठा कायम ठेवली. मशिदींत शुक्रवारी होणाऱ्या नमाजाच्या वेळी खुतब्यामध्ये तोपर्यंत खलिफाच्या नावाचा उल्लेख केला जात होता आणि इराणी नाण्यांवरही खलिफाची मुद्रा अंकित केली जात होती. या निष्ठेचा अर्थ खलिफाला इराणी लोक कर देत होते किंवा स्थानिक कारभाराच्या बाबतीत ते खलिफाचे मार्गदर्शन मानीत होते असा मात्र नव्हता.

बगदादच्या खिलाफतीची सत्ता ऱ्हास पावली तरी त्यामुळे इस्लाम धर्माच्या एकूण सत्तेचा क्षय झाला नव्हता. इस्लाम धर्माच्या अनुयायांची संख्या सतत वाढतच होती. तसेच मुस्लिम प्रभुत्वाखालील एकूण भूप्रदेशांत सतत भरच पडत होती. आणि काही प्रदेश आणि काही अनुयायी गमवावे लागले तरी सोळाव्या व सतराव्या शतकांत अधिक शक्ती संपादन करण्याच्या बाबतीत इस्लामने उच्चांक गाठला.

भूमध्य सागरीय बेटांत इस्लामचा ज्या तऱ्हेने विकास व ऱ्हास झाला त्यावरून राजकीय परिस्थितीचा इस्लामच्या संख्याबळावर कसा परिणाम होत असे हे लक्षात येते. ऱ्होडस्, सिसीली, सायप्रस व मजुर्का यांच्यावरील आक्रमणांचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. ५४।६७४ मध्ये अब्दुल्ला इब्ने कैसने क्रीट बेटावर चढाई केली. तेथे आपल्या सैन्यासह हिवाळाभर तो तळ ठोकून होता. पुढे २१०।८२५ च्या दरम्यान अधूनमधून त्या बेटावर हल्ले होत होते, तरी फारसे कोणी त्या बेटाच्या वाटेला गेले नव्हते. त्या वर्षी म्हणजे २१०।८२५ मध्ये मूर लोकांच्या एका गटाने कार्डोव्हा येथील उमय्या खलीफा अल् हकम याच्याविरुद्ध उठाव केला. तो अयशस्वी झाला तेव्हा ते या क्रीट बेटावर आश्रयासाठी गेले. तेथील मूळ रहिवाशांना त्यांनी अंकित केले. निसेफोरस

फोकसने ते बेट ९३१ मध्ये बायझनटियमकडे परत सोपवीपर्यंत ते मुस्लिमांच्या हाती होते. त्यानंतरच्या सात शतकातील बहुतांश काळ क्रीटमध्ये खिश्चनधर्म टिकून होता. नंतर १६४५ ते १६६९ या दरम्यान तुर्की आक्रमकांनी क्रीट परत इस्लाममध्ये आणले. तरीही काही रहिवासी खिश्चन धर्मालाच चिकटून राहिले. सबंध इस्लामी जगतातील कडव्या मुस्लिमांत तुर्की मुस्लिमांची गणना होते. धार्मिक अध्ययनाकडे त्यांचे फारसे लक्ष नसले तरी ते कडवे धर्माभिमानी व धर्मासाठी लढणारे उत्तम लढवय्ये होते. म्हणूनच कदाचित अगदी आताआतापर्यंत तुर्कांपाशी फारसे शासनकौशल्य असल्याचे अनुभवास आले नाही. या कौशल्याच्या अभावीच तुर्कांच्या अंकित असलेल्या इस्लामी किंवा बिगर इस्लामी प्रजेला राज्यकर्त्या वर्गाकडून होणारा त्रास सहन करावा लागलेला आहे. तुर्कांच्या गैरकारभाराचा त्रास क्रीटन्सनाही सोसावा लागला. त्यामुळेच १८२१ मध्ये जेव्हा तुर्की सत्तेविरुद्ध ग्रीकांनी उठाव केला तेव्हा मुस्लिमेतर क्रीटन्सनी ग्रीकांना सहानुभूती दाखवण्यासाठी स्फाकिऑट या डोंगरी लोकांच्या नेतृत्वाखाली बंड केले. हा उठाव मोडून काढण्याचे तुर्की सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न विफल झाले. शेवटी तह झाला आणि इजिप्तमधील मुहम्मद अली सरकारच्या हाती १८३० ते ४० पर्यंत दहा वर्षे क्रीटचा कारभार सोपवण्यात आला. पुढे पुन्हा ते बेट तुर्कांना देण्यात आले आणि अखेर सव्हेज येथे झालेल्या तहनाम्यानुसार ते बेट ऑगस्ट १९२० मध्ये त्याच्या पूर्वीच्या मालकाकडे–ग्रीकांकडे–परत देण्यात आले. बेटाच्या प्रत्येक नव्या सत्ताधाऱ्या-बरोबर सत्ताधाऱ्याच्या धर्माला तेथील प्रमुख धर्माचे स्थान मिळाले. त्यामुळे सांप्रत तेथील बहुसंख्य नागरिक बिगर-मुस्लिम आहेत.

सायप्रसमध्येही असेच झाले. सायप्रसवर ६४७ मध्ये पहिला हल्ला झाला. निसेफोरसने ९६६ मध्ये ते बेट परत घेतले. तोपर्यंतच्या काळात ते बेट मुस्लिमांनी केलेल्या नासधुशीचे व लुटालुटीचे क्षेत्र बनले होते. दैवगतीच्या विविध परिवर्तनांमुळे पुढे सायप्रस बेट बायझनटाइन्सच्या हातून वेनेशियनांच्या हाती गेले. ते त्यांनाही १५७१ मध्ये तुर्कांच्या हाती देणे भाग पडले. सायप्रसमधील तुर्की सरकारचा कारभार देखील क्रीटमधील कारभारासारखाच वाईट ठरला. अखेर दुसरा सुलतान अब्द अल् हमीद याच्याशी १८७८ मध्ये झालेल्या करारानुसार सायप्रस बेटाचा कारभार इंग्लंडकडे सोपवण्यात आला. पुढे नोव्हेंबर १९१४ रोजी इंग्लंडने तुर्कस्तानशी युद्ध पुकारले तेव्हा त्याने ते बेट ब्रिटिश साम्राज्यात सामील करून टाकले. १९४६ मध्ये झालेल्या जनगणनेप्रमाणे सायप्रसमधील मुस्लिमांची संख्या एकूण लोकसंख्येच्या दोनपंचमांशा-पेक्षाही कमी होती. सायप्रसवरील तुर्कस्तानचे सर्वाधिपत्य संपुष्टात आल्यानंतर तेथील मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण फारच कमी कमी होत गेले.

६५२ ते ६७०च्या दरम्यान इजिप्तमधील मुस्लिमांनी पश्चिमेकडे सिसीलीवर हल्ले केले. आणि सिरॅक्युसकडूनदेखील खंडणी वसूल केली जाऊ लागली. परंतु पुढे ८२६ पर्यंत सिसिली बेटाची निष्ठा रोमन साम्राज्याकडे होती. त्या वर्षी युफेमियस

या बंडखोराने रोमन सत्तेविरुद्ध उठाव केला. पण उत्तर आफ्रिकेतील मूरांनी त्याला हुसकून लावले. या मूरांनी पार्लेमो हा आपल्या लष्करी हालचालींचा तळ बनवला आणि पुढील पन्नास वर्षांत त्यांनी सिसीलीचा पश्चिम भाग हळूहळू परत मिळविला. परंतु सर्व ख्रिश्चनधर्मीयांची व सीझरनिष्ठेची सिरॅक्युसमधून हकालपट्टी करण्यासाठी आणि तेथील बायझन्टीयमी धर्म व भाषा नाहीशी करण्यासाठी मूरांना त्यापेक्षाही जास्त काळ लागला. ९६२ मध्ये तौरमिना शहराचा पाडाव होऊन ते संपूर्णपणे मुस्लिम आधिपत्याखाली आले तेव्हाच ती गोष्ट शक्य झाली. इटलीविरुद्ध सोयीस्कर लष्करी तळ म्हणून तौरमिना बेटाचा नंतर उपयोग झाला. कालाब्रिया व कम्पानिया या शहरांविरुद्धच्या लढाईसाठी मूर व बर्बर सैनिकांना घेऊन जाण्यात उत्तर आफ्रिकेतील ट्यूनिस व बिझर्टा येथील जहाजांबरोबर पार्लेमो येथील जहाजे गुंतून पडली नसती आणि मुस्लिम फौजांचे नेतृत्व थोडे जरी कार्यक्षम व एकजुटीचे असते तर संपूर्ण इटली मुस्लिमांच्या हाती पडला असता यात किंचितही शंका नाही. परंतु झाले असे की, सीसिलीच्या अमीरांनी त्याच वेळी स्वातंत्र्याची मागणी केली. मूरांनी तर बगदादच्या खलिफाची सत्ता फार पूर्वीच झुगारून लावली होती. परिणामांती, गिबनच्या शब्दांत सांगायचे तर "देश जिंकण्याचे उद्दिष्ट लुटीसाठी केलेल्या हल्ल्यात पुनश्च अवनत झाले."[1] त्यामुळे काही काळ तरी मूरांच्या सत्तेखाली जाण्याच्या शक्यतेतून इटली निसटली. १०६० मध्ये नॉर्मंडीचा रॉजर येईपर्यंत सिसीलीवर मूरांचे स्वामित्व होते. १०६० पासून मात्र ख्रिश्चन धर्म हाच त्या बेटाचा धर्म आहे.

सिसीलीचा पाडाव झाला त्याच सुमारास माल्टा मुस्लिम आक्रमणाला बळी पडले. तथापि माल्टावरील मुस्लिमांची पकड सिसीलीवरील सत्तेपेक्षा जास्त मजबूत होती. माल्टावरील मुस्लिम सत्तेचा प्रभाव खोलवर पोचलेला होता. कारण आजही माल्टावासीयांची भाषा ही अरबी भाषेचीच एक बोली आहे. १०९० मध्ये नॉर्मनांनी त्या

१. इटलीवर त्याआधीही आक्रमणे झाली होती. ८४६ मध्ये आफ्रिकन किनाऱ्याकडून जहाजांचा एक ताफा तैबरपर्यंत आला होता. मुस्लिम सैनिकांनी प्रत्यक्ष रोममध्येदेखील प्रवेश केला होता, आणि तेथील सेंट पीटर चर्च व इतर चर्चेस लुटली होती. या मुस्लिम आक्रमकांना गाय ऑफ स्पॉलेटो याने पिटाळून लावले. परंतु पुढे आणखी तीन वर्षांनी पहिला मुहम्मद (८४०–८५६) या अघलावीद राजाने सार्डिनियाहून जहाजे पाठवली आणि पुन्हा हल्ला चढवला. त्याच्या जहाजांनी रोमपासून सोळा मैलांवर नांगर टाकला आणि सैन्य तुकड्या उतरवण्याची तयारी चालवली. तेव्हा चौथा पोप लिओ याच्या प्रयत्नाने सागरी राज्यांची एक संयुक्त फळी आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी घाईघाईत उभी करण्यात आली. एकाएकी प्रचंड वादळ झाले. त्याचा इटलीला फायदा झाला आणि तिने ओस्टिया येथे झालेल्या लढाईत मुस्लिम जहाजांचा धुव्वा उडवला.

बेटावर विजय मिळवला तेव्हा ते मुस्लिमांच्या हातून गेले. परंतु तेराव्या शतकाच्या मध्यापर्यंत मुस्लिमांना तेथे राहण्याची परवानगी होती.

पूर्वीपासून युरोपमध्ये समाविष्ट केल्या जात असलेल्या भूमध्य सागरीय बेटांतील इस्लामच्या प्रगतीची आतापर्यंत आपण वरवर पहाणी केली. आता यानंतर फ्रान्समधून इस्लाम धर्मीयांना हुसकून लावल्यानंतरच्या काळात इस्लामने युरोपच्या मुख्य भूमीवर किती प्रगती केली हे पाहणे योग्य ठरेल. जित प्रदेश ताब्यात ठेवण्यात मुस्लिम यशस्वी झाले नाहीत याचे बव्हंशी कारण ते संख्येने कमी होते आणि दक्षिण स्पेन हाच आपला तळ आहे असे समजून ते वागत होते. स्पेनमध्येच काय ती त्यांची खरी ताकद होती. तेथेच त्यांच्या सत्तेला काहीशी स्थिरता आली होती. स्पेनशिवाय द्वीपकल्पात ( युरोपात ) अन्यत्र कोठेही उमय्या ( दमास्कसच्या सत्ताधारी घराण्यातील एकाने या वंशाची स्थापना केली. ) वंशियांसारखी तेजस्वी कामगिरी मुस्लिम करून दाखवू शकले नव्हते. ७५६ पासून १०३१ पर्यंतची सुमारे तीन शतके कॉर्डोव्हा येथे उमय्या वंश सत्तेवर होता. त्याचे साम्राज्य तसे लहान होते, परंतु या वंशातील लोकांनी केलेली कामगिरी बरीच मोठी होती. विशेषतः ९१२ मध्ये गादीवर आलेल्या तिसऱ्या अब्द् अल रहमान याच्या कारकीर्दीत देशाची भरभराट झाली. शेती, उद्योग, व्यापार, कला व शास्त्र यांचा विकास झाला. कॉर्डोव्हा हे शहर विस्तार व वैभव या बाबतीत बगदादच्या खालोखाल होते. पाच लक्ष लोकवस्तीच्या या शहराची अठ्ठावीस उपनगरे होती. शहरांमध्ये तीन हजार मशिदी, अनेक ऐश्वर्यसंपन्न राजमहाल, तेरा हजार शंभर घरे व तीनशे स्नानागारे होती.

उत्तर स्पेन व कॅस्टील यामधील प्रदेशावर मुस्लिमांना लष्कराच्या सहाय्यानेच नियंत्रण ठेवता आले आणि अंदलुसिया व व्हॅलेंशियाप्रमाणे तेथेही मुस्लिमांना कधीच निश्चितपणे वस्ती करून रहाता आले नाही. कॅन्टाब्रियामध्ये तर इस्लामला कधीच पाय रोवता आला नाही. पूर्वी इ. स. ७५१ मध्ये आलफॉन्सो या गोथिक राजाने अटलांटिक किनाऱ्यावरील गॅलिशियन लोकांच्या मदतीने मूरांना हाकलून देण्यासाठी प्रतिचढाई सुरू केली होती. ओल्ड कॅस्टिल, लिऑन, ॲस्टुरियन व गालिशिया या प्रांतांतून त्यांना हाकलून लावण्यात आल्फॉन्सो यशस्वी झाला. दहाव्या शतकाच्या सुरुवातीला जोरदार प्रयत्न करूनदेखील मूरांना हा मुलुख परत मिळवता आला नाही. टोलेडो व नॅव्हरी येथील ख्रिश्चन सत्ताधाऱ्यांच्या मदतीने आक्रमकांना मागे रेटण्याचे काम नंतरही चालू होते. परंतु दहाव्या शतकाच्या प्रारंभी प्रामुख्याने लिऑ येथील तिसरा आल्फॉन्सो ( मृत्यू ९१० ) याच्या प्रयत्नामुळे मुस्लिम सत्तेला दक्षिणेस डूरोपर्यंत आणि दुसऱ्या बाजूस तर ग्वाडियानापर्यंत माघार घ्यावी लागली.

उत्तर स्पेनमध्येदेखील स्पॅनियार्डस व मूर यांच्यामध्ये नेहमीच संघर्ष होत असे समजण्याचे कारण नाही. त्या दोघांमध्ये सर्वसाधारणपणे मैत्रीचे संबंध असल्याचे दिसते. त्यांच्यात परस्परविवाहही होत असत. आणि चर्चची सत्ता प्रभावी नव्हती त्या

काळात अनेक ख्रिश्चन सरदारांनी एक धोरण म्हणून किंवा फायदेशीर बाब म्हणून इस्लामचा स्वीकार केलेला होता असे दिसते. मुहम्मदी धर्म पत्करला की करांच्या ओझ्यापासून सुटका करून घेता येत असे. स्पॅनिश चर्चचा प्रभाव जास्त वाढला तेव्हा मात्र मुस्लिमांना कठोर विरोध होऊ लागला आणि स्पेनला आपली मातृभूमी मानणाऱ्या या दोन्ही समाजांतील वांशिक भेदांमध्ये धार्मिक वैरातील कटुतेची आणखी भर पडली.

जितक्या द्रुत गतीने मूरांनी स्पेनमध्ये प्रगती केली तितक्या द्रुत गतीने तेथे त्यांची पीछेहाट मात्र झाली नाही. उमय्या सत्तेचा अंत झाल्यानंतर मुस्लिमांचे सामर्थ्य बरेच कमी झाले तेव्हा कोठे मुस्लिमांना सत्ताच्युत करण्याची स्पॅनियार्डस्ना आशा वाटू लागली. नंतर मात्र १८०५ मध्ये लिऑं व कॅस्टिलचा राजा सहावा आल्फॉन्सो याच्या अमदानीत ख्रिश्चनांनी टोलेडो पुनश्च जिंकले. साऱ्या मुस्लिमांना त्याचे अतिशय दुःख झाले. टोलेडो हे शहर मुस्लिमांनी युद्धात नव्हे तर ख्रिश्चन राजा व सव्हिलचा सत्ताधारी आणि अब्बादि वंशीय याह्या यांच्यामध्ये झालेल्या एका तहनाम्यात गमावले. उमय्यांच्या पतनानंतर त्यांची सत्ता याह्याच्या हाती आली. या तहनाम्यातील कलमांनुसार टोलेडो शहराच्या बदल्यात याह्याला गॅलेन्शिया शहर मिळणार होते. परंतु करारातील या भागाची अंमलबजावणी होणार तोच युसुफ दी आल्मोराव्हि हा उत्तर आफ्रिकन राजा तेथे येऊन पोचला. ख्रिश्चनांची आक्रमणे परतवून लावण्याच्या कामी मदत करण्यासाठी त्याला स्वतः याह्यानेच बोलावले होते. पण ज्यांच्या सहाय्याला तो आला होता ते अब्बादि कमकुवत आहेत हे त्याच्या लक्षात आले. त्याचा फायदा घेऊन १०९० मध्ये त्याने स्वतःच त्यांची सत्ता बळकावली आणि ख्रिश्चनांविरुद्धची लढाई चालू ठेवली व स्वतःचा फायदा करून घेतला. त्यानंतरच्या बारा वर्षांत त्याने[1] टोलेडो सोडून स्पेनमधील मूरांच्या स्वाधीन असलेल्या संपूर्ण प्रदेशा-

१. ११०२ मध्ये त्याने व्हॅलेन्शियावर ताबा मिळवला.

वर आपली सत्ता प्रस्थापित केली. टोलेडोवर मात्र ख्रिश्चनांचे आधिपत्य कायम राहिले. मुस्लिम आधिपत्याखालील स्पॅनिश प्रदेश उत्तर आफ्रिकेचा एक प्रांत म्हणून नंतर ओळखला जाऊ लागला. या प्रदेशाचे उत्तर आफ्रिकेशी नेहमीच घनिष्ठ संबंध होते. पुढे ११४५ ते ५० च्या दरम्यान उत्तर आफ्रिकेमधल्याच आल्मोहेद वंशीयांनी स्पेनमध्ये जाऊन आल्मोराव्हि वंशीयांना सत्तेवरून हुसकून लावले. एवढेच नव्हे तर त्यांच्यापूर्वी सत्तेवर असलेल्या आल्मोराव्हि वंशीयांच्याकडून कॅस्टील, ॲरगॉन व पोर्तुगॉल येथील राजांनी हिसकावून घेतलेला फार मोठा भूभाग आल्मोहेदनी परत इस्लामी साम्राज्यात आणला. आल्मोहेदना मिळणाऱ्या या सततच्या यशामुळे पोप इनोसंट तिसरा इतका भयभीत झाला की त्याने त्यांच्याविरुद्ध धर्मयुद्ध पुकारले. आपल्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या संयुक्त ख्रिश्चन फौजांशी मुकाबला करणे आल्मोहेदना अशक्य झाले. परिणामान्ती सिएरामोरेनामधील लास नेव्हास दी टोलोसा या ठिकाणी ख्रिश्चन फौजांशी झालेल्या लढाईत १२१२ मध्ये आल्मोहेदांचा पराभव झाला.

लिस्बन ते सिएरामोरेना मार्गे बार्सिलोना या रेषेच्या उत्तरेस असलेले इबेरियन द्वीपकल्प हे याच सुमारास मुस्लिम आधिपत्यातून मुक्त झाले. त्यानंतरच्या काळात सव्हिली, कॉर्डोव्हा, जेन, ग्रॅनडा व व्हॅलेन्शिया या केंद्रापुरतीच मुस्लिम राजांची सत्ता मर्यादित[1] राहिली. या राजांच्या आपआपसांतील हेव्या-दाव्यांचा स्पॅनियॉर्डस्ना फायदा मिळून गमावलेला आपला आणखी प्रदेश त्यांनी पुन्हा जिंकला. १२३८ ते १२६०च्या दरम्यान कॅस्टिलचा तिसरा फर्नंडो व ॲरेगॉनचा पहिला जेमे यांनी व्हॅलेन्शिया, कॉर्डोव्हा, सव्हिली व मुर्सिया हे मूरांच्या ताब्यातील प्रदेश परत जिंकले. मूरांच्या हाती फक्त ग्रॅनडा प्रांत राहिला. ग्रॅनडा प्रांतात सिएरा नेवाडा भोवतालचा प्रदेश आणि अल्मेरिया ते जिब्राल्टरपर्यंतचा सागर किनाऱ्यावरील भूप्रदेश यांचा समावेश होता. आपण अगदी आताआतापर्यंत इस्लामधर्मीय होतो याचा विसर न पडलेले आणि नाममात्र ख्रिश्चन असलेले इतर प्रांत मूरांच्या सहाय्याला धावून आले. परंतु त्या वेळची परिस्थितीच अशी होती की मूरांना आपल्या प्रदेशाचे स्वातंत्र्य फार काळ टिकवून धरणे शक्यच नव्हते. कॅस्टिलियनच्या राजाने इतर मूर राजांना आपले अधि-राज्य मान्य करावयास भाग पाडले. त्यामुळे मूर राजांच्या हाती त्यांच्या पूर्वीच्या सत्तेची केवळ छाया उरली. फर्डिनांड व इसाबेला यांच्या विवाहानंतर आणि ॲरेगॉन व कॅस्टिल यांचे संयुक्त राज्य स्थापन झाल्यावर तर मुस्लिम सत्तेच्या सार्वभौमत्वाचा नुसता देखावा-देखील चालू ठेवण्याची आशा मावळली. १४९२ मध्ये ग्रॅनडा या स्पेनमधील मूरांच्या अखेरच्या राजधानीतून त्यांना सत्ताभ्रष्ट करण्यात आले. तेव्हा तेथील राजा बोब्दिल (अबु अब्दुल्ला) आफ्रिकेत पळून गेला. त्याच्याप्रमाणे त्याच्या बहुसंख्य प्रजाजनांना पळून जाणे शक्य नव्हते. त्यामुळे ते नाइलाजाने मागे राहिले व त्यांनी आपल्या ख्रिश्चन अधिपतींशी एकनिष्ठ राहण्याचे कबूल केले. त्यांच्यापैकी अनेकांना स्वखुशीने किंवा सक्तीने ख्रिश्चन करण्यात आले. परंतु ज्यांच्यावर धर्मांतराची सक्ती करण्यात आली होती त्या लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास दिलेली अनुमती केवळ बाह्यात्कारी होती. हे नाममात्र ख्रिश्चन चोरून आपल्या पूर्वीच्या धर्मातील विधींचे आचरण करीत. हे

१. बेलेअरिक [मजुर्का, मिनोर्का, आणि याबिसा (इव्हिसा)] या बेटांचा इतिहास व स्पेनचा इतिहास एकमेकांशी निगडित आहेत. ४०७।१०१६ मध्ये (इब्ने अल्-असीर, IX, 405) दानिया या शहराचा कारभारी अब्दुल हसन मुजाहिद या अमीराने त्या बेटांवर स्वारी केली. या स्वारीत ती बेटे मुस्लिम वर्चस्वाखाली आली. नंतर ॲरेगॉनचा राजा पहिला जेमे याने १२२८ मध्ये मजुर्का बेट जिंकले. तोवर ती बेटे मुस्लिम अधिपत्याखाली होती. मजुर्कानंतर बाकीची बेटे पुढील तीन-चार वर्षांत परत घेण्यात आली. याच बेलेअरिक बेटांवरून मुस्लिमांनी सार्डिनियावर शेवटचे मोठे आक्रमण केले होते. त्याचे नेतृत्व अल् मुजाहिद याने केले. सार्डिनियातील ख्रिश्चन लोकांची मोठ्या प्रमाणात कत्तल केली आणि ते बेट आपल्या नियंत्रणाखाली आणले.

ख्रिश्चन मोरिस्कोज या नावाने ओळखले जात. १६१० मध्ये त्यांना हाकलून देण्यात आले तेव्हा मात्र पश्चिम युरोपातून इस्लाम पूर्णपणे हद्दपार[1] झाला.

पश्चिम युरोपात इस्लामची हळूहळू पीछेहाट होत होती त्या वेळी तिकडे युरोप खंडाच्या दुसऱ्या टोकाकडील प्रदेशांत इस्लाम वाढत्या प्रमाणात पाय रोवीत होता. या प्रदेशांत उस्मानअली किंवा ऑटोमन तुर्क घुसले. त्यांना ही गोष्ट कशी शक्य झाली हे समजून घेण्याकरता कालाच्या दृष्टीने तिसऱ्या व चौथ्या शतकापर्यंत आणि अंतराच्या दृष्टीने आशिया खंडातून थेट इराणपर्यंत गेले पाहिजे. इराणमधील खलीफाची सत्ता दुर्बल झाल्यामुळे अनेक लहान लहान राज्ये निर्माण झाली होती. खिलाफतीपासून स्वतंत्र होऊन ती नेतृत्वासाठी आपापसांत स्पर्धा करीत होती. दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात समानि या स्वतंत्र झालेल्या वंशाची आपल्या रयतेवरील सत्ता संपुष्टात आली होती. खुरासानमधील मोठ्या भागावर या समानिची सत्ता होती. त्यांच्यापैकी सबक्तगीन ( हा आल्प्तगीन याचा गुलाम होता आणि आल्प्तगीन हाही स्वतः समानिनींचा गुलाम होता. ) हा आपल्या अपार रणकौशल्याच्या जोरावर स्वतंत्र झाला आणि खुरासानमधील फार मोठा प्रदेश त्याने आपल्या स्वामित्वाखाली आणला. आपल्या मृत्युपत्राद्वारे त्याने हा प्रदेश आपला मुलगा महमुद याच्याकडे सोपवला. प्रारंभी महमुदाने आपल्या बापाप्रमाणे समानींचे मांडलिकत्व मान्य केले. परंतु हा तरुण योद्धा युद्धनैपुण्यात आपल्या बापापेक्षाही सवाई होता. काही वर्षांतच त्याने आपल्या ताब्यातील प्रदेशात आणखी बरीच भर घातली. हिंद–इराण सीमेच्या दोन्ही अंगांना त्याच्या ताब्यातील प्रदेश पसरला होता. महमुदाने लवकरच समानींचे मांडलिकत्व पार झुगारून दिले आणि तो स्वतःच राजा बनला. सांप्रतच्या अफगाणीस्तानातील गझनी येथे त्याने आपली राजधानी बसवली. त्यानंतरच्या काळात महमुदाने हिंदुस्थानवर एकामागून एक स्वाऱ्या केल्या. मुस्लिम इतिहासात या स्वाऱ्यांमुळे त्याचे नाव विख्यात झाले आहे. त्याच्या या यशस्वी स्वाऱ्यांमुळे पंजाब प्रांत इस्लामी साम्राज्यामध्ये कायमचा आला आणि गुजरात राज्य मुस्लिम आक्रमकांच्या अंकित झाले.

उत्तरेकडे काश्मीर व ट्रान्सोक्सिआना जिंकून महमुदाने आपल्या साम्राज्यात भर घातली. ऑक्सस नदीपलीकडील ट्रान्सोक्सिआनामध्ये सेल्ज्युकस नावाचे एक तुर्की घराणे महमुदाच्या अमदानीत महत्त्व पावले होते. हे घराणे मूळ मध्य आशियातील किर्घीझ या उजाड विस्तीर्ण प्रदेशातील. इस्लामधर्म मूळ धरू लागला त्या काळात हे सेल्ज्युकस लोक व त्यांच्या आधिपत्याखालील तुर्कोमन टोळीवाले स्थलांतर करून तेथे राहावयास आले आणि त्यांनी उत्साहाने नवधर्माचा स्वीकार केला. समानि व महमुद यांच्यामध्ये

१. स्पेनमधील मूरांच्या इतिहासाच्या तपशीलवार माहितीसाठीं पहावे : लेन पूल यांचे Mohammadan Dynasties ( London, 1894 ) आणि डोझी यांचे Spanish Islam.

लढाया चालू होत्या त्याच वेळी तुर्कीस्तानच्या इलाकखानांनी महमुदाविरुद्ध लष्करी कारवाई केली. त्यामुळे समानि व महमुद यांच्यातील संघर्षात अधिकच गुंतागुंत निर्माण झाली. सेल्ज्युक्सनी त्याचा फायदा उठवला. गझनीचा हा महान अमीर १०३० मध्ये मरण पावला. त्यामुळे सेल्ज्युक्सना अधिक मुलख बळकावण्याची संधी मिळाली. नंतरच्या सात वर्षांत सेल्ज्यूक्सनी गझनवी मसूदाला त्याच्या पित्याच्या स्वामित्वाखालील खुरासान, ट्रान्सोक्सिआना आणि इराणी प्रदेशांतून हुसकून लावले. फक्त हिंद-इराण सीमेच्या पूर्वेकडील भूप्रदेश मसूदाच्या हाती शिल्लक राहिला आणि सेल्ज्यूक्सनी थेट पश्चिमे पर्यंत मजल मारली. त्यांचा सेनापती तुघ्रिल बेग याने १०५५ मध्ये खुद्द बगदादमध्ये प्रवेश केला आणि तेथील दुर्बल झालेल्या खलिफाशी एकनिष्ठ राहण्याचे कबूल करून त्याच्याकडून सुलतानपद[1] मिळवले. जेथील बहुसंख्य स्थानिक लोकांनी इस्लाम धर्म पत्करला असे प्रदेश तुघ्रिल बेगच्या आक्रमक टोळ्यांच्या हाती पडले होते. तुर्कोमनांच्या दुसऱ्या एका गटाने एशिया मायनरमधील सुलतान आल्प आरस्लान याच्या नेतृत्वाखाली रोमन प्रदेशावर स्वारी केली. तुर्कोमनांची आगेकूच परतवून लावण्याच्या हेतूने आलेल्या बायझन्टाईन फौजांचा त्यांनी मालाझ्कर्ड (मॅन्झीकर्ट) येथील लढाईत १०७१ मध्ये धुव्वा उडविला आणि रोमनस डायोजीन या रोमन सम्राटाला कैद केले. गिबन म्हणतो त्याप्रमाणे परिणामांवी, "या घातक दिवशी रोमन साम्राज्यातील आशियाई प्रांतांचा कायमचा बळी पडला." आणि आशिया मायनरचा मार्ग तुर्कोमनांना खुला झाला. पुढे १०७४ ते १०८१ च्या दरम्यान सुलेमान इब्ने कुतुलमिशने आशिया मायनरच्या मध्यभागी रम किंवा कोन्या हे बलशाली मुस्लिम राज्य स्थापन करण्याच्या कामी यश मिळवले. हे राज्य तेव्हापासून अद्याप मुस्लिमांच्या वर्चस्वाखाली आहे.

सुलेमाननंतरच्या दोन शतकांच्या काळात त्याने संस्थापित केलेल्या राज्याचे तुकडे तुकडे झाले. त्यांपैकी काही भाग पहिल्या धर्मयुद्धांत लढणाऱ्या सैन्यांनी किंवा बायझान्टीयन राजे कॉम्नेनॉय यांच्या सैन्यांनी जिंकून खिश्चन साम्राज्यात आणले. बाकीचा प्रदेश, त्यावर हक्क सांगणाऱ्या निरनिराळ्या राजांत वाटला गेला. अमीर उस्मानअली एर्टुघ्रिल हा त्यापैकीच एक होय. उस्मानअलींला व त्याच्या कुळातील लोकांना, सेल्ज्युक सुलतान दुसरा कैकोबाद (१२४५-५४) यांच्याशी झालेल्या एका लढाईत त्यांनी केलेल्या मदतीबद्दल फ्रायगियामधील प्राचीन डोरिलियम जवळील लहानसा प्रदेश बक्षिस मिळाला होता. पुढे १३०८ मध्ये इराणमधील मंगोलांनी संपूर्ण पश्चिम आशिया पादाक्रांत करी-पर्यंत त्या छोट्या राज्याचा विस्तार होत राहिला व ते भरभराटले. मंगोलांच्या आक्रमणात पश्चिम आशियातील सर्व स्वतंत्र सत्ता नाहीशा झाल्या; आणि त्यांच्या विध्वंसाच्या खुणा तेवढ्या शिल्लक राहिल्या. परंतु उस्मानअलीच्या तुर्की वंशात पुनरुज्जीवनाची बीजे

१. लेन-पूल यांच्या Mohammadan Dynasties मध्ये सेल्जुकांची संक्षिप्त माहिती आहे.

तग धरून होती. आपल्या नांवाने वंशस्थापना करणारा आणि एर्टुघ्रिलाचा वारस असलेला उस्मान याने १३२६ मध्ये पुनश्च उस्मानअली तुर्कमान राज्याची प्रस्थापना केली. उस्मानचा मुलगा ओरखान याने आपल्या राज्याची सीमा ब्रूसापर्यंत नेली. ब्रूसा येथेच त्याने आपली राजधानी स्थापन केली. नीसिया हे शहरही त्याने इस्लामी साम्राज्यांत आणले. पहिल्या धर्मयुद्धानंतर इस्लामने हे शहर गमावले होते.

आठव्या शतकाच्या मध्यावर इस्लाम पोचला त्या सुमारास पश्चिम युरोपमध्ये ग्रॅनडा राज्यापुरतेच त्याचे साम्राज्य मर्यादित झाले होते. इस्लामने याची भरपाई पूर्व युरोपात केली. १३६० मध्ये ओर्खानचा मुलगा पहिला मुराद ( आमुराथ ) गादीवर आला. त्याआधी तीन वर्षे ऑटोमनांचा विजय ध्वज दार्दानेल्स ओलांडून युरोपात पोचला होता. आणि पालेओलोगस या बायझन्टाईन सम्राटाला शरण आणण्यात आले होते. मुरादने १३७१ मध्ये मारित्झा येथे झालेल्या लढाईत विजय मिळवल्यानंतर बाल्कन्सच्या दक्षिणेकडील थ्रेसचा बहुतांश प्रदेश, बल्गेरिया, मॅसिडोनिया व सर्बिया यांसह बायझन्टाइन सम्राटाचा जवळपास सर्व प्रदेश जिंकला. या विजयानंतर मुरादला आशियामधील आपली राजधानी युरोपात आणण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्याप्रमाणे ब्रूसाऐवजी ॲड्रियानोपल ही त्याने आपली नवी राजधानी केली. पुढे नव्वद वर्षे ती ऑटोमन साम्राज्याची राजधानी होती. १३८६ पर्यंत मुरादच्या सेनापतींनी पश्चिमेस वर्दार नदीपर्यंतचा आणि उत्तरेस सर्बियामधील निश व व बल्गेरियातील मोनॅस्टरपर्यंतचा भूभाग जिंकला. १३८९ मध्ये सर्बियनांचा कोसोव्हो येथील लढाईत पराभव झाला. त्यामुळे त्यांना आपल्या देशाचा बाकीचा प्रदेशही गमवावा लागला. त्याच वर्षी मुराद मृत्यू पावला. त्याच्यामागून यिल्डरीम म्हणजे ' विजेचा कडकडाट ' या नावाने ओळखला जाणारा त्याचा मुलगा पहिला बयाझि हा सम्राट झाला. आपल्या बापाप्रमाणेच तो विजय मिळवीत होता. डॅन्यूब नदीच्या किनाऱ्यावरील बल्गेरियाच्या उत्तर भागावर त्याने स्वारी केली. आणि त्या प्रचंड नदी-पलीकडील हंगेरीच्या प्रवेशमार्गावरील किल्ले त्याने काबीज केले. आपल्याविरुद्ध धर्मयुद्ध चालू असतानाच बयाझिने हंगेरीवर चढाई केली. या युद्धात निकोपोलिस येथील लढाईत त्याने धर्मयुद्धासाठी ठाकलेल्या फौजांचा पराभव केला.

आता बयाझिला ग्रीसवर स्वारी करण्यात अडचण उरली नव्हती. त्याने त्या-नंतरच्या तीन वर्षांत ग्रीस आपल्या साम्राज्यात आणला. पण या सुमारास त्याला आपली विजयमोहीम थांबवून, पूर्वी कधीही भेटला नसेल अशा एका रक्तपिपासू व अतिशय जबरदस्त शत्रूशी सामना करण्यासाठी मागे जाणे भाग पडले. हा शत्रु म्हणजे तैमूरलंग हा तार्तर होय. तैमूरलंग याने आपल्या लुटारू फौजांसह इराण ओलांडून अनाटोलिया हा तुर्की प्रदेश पादाक्रांत केला. त्याने जुलै १४०२ मध्ये अंगोरा येथील लढाईत बयाझिचा अगदी सहजपणे पराभव केला आणि त्याला कैद केले. तैमूरलंग आपल्या कैद्यांना पोलादी पिंजऱ्यांतून

आपल्याबरोबर नेत असे अशी एक आख्यायिका प्रचलित आहे. पण त्यात तथ्य नसावे.

तैमूरच्या या विध्वंसक स्वाऱ्यांत अनेक राज्ये संपूर्णपणे नष्ट झाली, परंतु तुर्कस्तान टिकून राहिले. पुढील अर्ध शतकात त्या देशाने आपल्या सामर्थ्याचा पुन्हा आश्चर्यकारकरीत्या प्रत्यय आणून दिला आणि १४५३ मध्ये सुल्तान दुसऱ्या मुहम्मदाने कॉन्स्टॅन्टिनोपल अखेर इस्लामी साम्राज्यात जिंकून आणले. तेव्हापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत तुर्कस्तानला त्या शहरातून हुसकण्याचे अनेक वेळा प्रयत्न होऊन देखील तो तेथे भक्कमपणे पाय रोवून आहे. आणि ते शहर इस्लामच्या भूतकालीन साम्राज्य वैभवाचे स्मारक म्हणून कायम राहिले आहे.

बायझंटियमवरील विजय हे तुर्कस्तानच्या युरोपमधील त्यानंतरच्या विजयमार्गावरील केवळ एक पाऊल होते. पुढे १४७५ मध्ये तुर्कस्तानने क्रीमिया जिंकला. आणि एजियन बेटे तुर्की साम्राज्यात आणली. ओट्रँटोचा समावेश असलेला इटलीचा एक भागदेखील काही काळ तुर्कांच्या हाती होता. सुलेमान द मॅग्निफिशंट याच्या कारकीर्दीत ( १५२०–६६ ) ऑटोमन तुर्कांनी पश्चिमेकडे आपल्या साम्राज्याचा विस्तार केला आणि खिश्चन युरोपमध्ये अगदी आतपर्यंत त्यांनी प्रवेश केला. १५२१ मध्ये बेलग्रेड त्यांच्या हाती आले. मोहाक्सच्या लढाईत हंगेरीचा राजा लुई याने " घाईघाईत भरती केलेल्या व प्रामुख्याने निःशस्त्र शेतकऱ्यांचा भरणा असलेल्या केवळ मूठभर सैनिकांच्या सहाय्याने " सुलेमानच्या मोठ्या व अतिशय शिस्तबद्ध फौजांशी कसाबसा प्रतिकार केला. पण १५२६ मध्ये " मोहाक्सचा विध्वंस झाला. " त्यामुळे हंगेरीचे स्थान आता ऑटोमन साम्राज्यातील एक प्रांत एवढेच उरले. प्रदीर्घ काळ ( १५२९ ) वेढा पडला होता तरी व्हिएन्नाने आक्रमकांना दृढपणे तोंड दिले. परंतु त्यानंतर नऊ वर्षांनी प्रेव्हेसा येथील सागरी लढाईत सुलेमानने इटलीतील " पोप, सम्राट व सरन्यायाधीश या सर्वांचा एकत्र " पराभव केला. उत्तर आफ्रिकेमधील मुस्लिम प्रदेशांवरील आपली पकड भक्कम आहे अशा समजुतीत स्पॅनियर्डस होते, परंतु सुलेमानने त्यांनादेखील तेथून हुसकावून लावले. युरोपमधील सुलेमानने जिंकलेला प्रदेश एका शतकापेक्षाही अधिक काळ इस्लामी साम्राज्यात होता. पुढे १६४८ मध्ये वेस्टफालिया येथे शांततेचा तह झाला. त्यामुळे " तीस वर्षांचे युद्ध " समाप्त झाले. या तहानंतरदेखील क्रीमियातील आशियाई प्रदेशापासून ते जवळजवळ व्हिएन्नापर्यंतचा युरोपमधील भूभाग तुर्कस्तानच्या स्वामित्वाखाली होता. तुर्की लोक खिश्चनांना कनिष्ठ दर्जाच्या धर्माचे समजत असत. तरी त्यांनी नव्याने आपल्या प्रभुत्वाखाली आलेल्या खिश्चन प्रजेवर इस्लाम धर्म लादण्याचा क्वचित्च प्रयत्न केला. तुर्की सत्ताधीश सर्वसाधारणपणे सहिष्णू होते. हंगेरीवरील तुर्कांचे अधिपत्य केवळ लष्करी स्वरूपाचे होते. तेथे इस्लामचे कधीच प्रभुत्व नव्हते. त्यामुळे हंगेरी वगळता तुर्कांनी जिंकलेल्या इतर प्रदेशांतील नागरिकांनी एकतर राजकीय हेतूने किंवा श्रद्धेपोटी तुर्कजेत्यांचा धर्म उत्साहाने

स्वीकारला. बोस्निया, बल्गेरिया व अल्बानिया येथील मुस्लिम, इस्लामचे कडवे अनुयायी म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचे ख्रिश्चन देशबांधव व हे मुस्लिम एकाच रक्ताचे होते; तरी इस्लाम हा त्यांना एकमेकांपासून वेगळे ठेवणारा घटक होता.

दोन हात केल्याशिवाय युरोपीय सत्ता शत्रूला शरण जाणे शक्यच नव्हते. जितप्रदेशांत धार्मिक भेदांमुळे तुर्कीविरुद्ध बंड झाले नाही तर तुर्की शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे बंडाला प्रोत्साहन मिळाले असे दिसते. तुर्कांची मध्यवर्ती सत्ता लष्करी मोहिमांत इतकी व्यग्र होती की जित प्रदेशांतील शासनाकडे तिचे फारसे लक्ष नव्हते. अधिकाऱ्यांच्या मर्जीवर बराचसा कारभार सोपवण्यात आला होता आणि हे अधिकारी सुलतानाच्या व त्याच्या दुर्दैवी प्रजेच्या जीवावर आपल्या तुंबड्या भरीत होते.

सेंट गोथार्ड येथे झालेल्या युद्धात ऑस्ट्रियनांनी तुर्कांचा पराभव केला तेव्हा १६६४ मध्ये तुर्कांवर चढाई करून प्रथम हंगेरीने त्यांचे जोखड झुगारून दिले. पुढे १६८३ मध्ये व्हिएन्नाला वेढा घालून ते घेण्याचा तुर्कांनी दुसऱ्यांदा अनर्थकारी प्रयत्न केला तेव्हा पोलंडच्या जॉन सोबाईस्कीने त्यांना पोलोडियाच्या बाहेर पिटाळून लावले. या पराभवामागोमाग तुर्कांनी क्रोशिया गमावले. ते ऑस्ट्रियनांच्या हाती गेले (१६८४). त्यामागोमाग हंगेरियनांनी बुडापेस्ट परत घेतले. हंगेरियनांची ही राजधानी एकशेपंचेचाळीस वर्षे शत्रूच्या ताब्यात होती. मोहाक्स येथे दुसऱ्यांदा लढाई (१६८७) झाली. त्यांत ऑस्ट्रियनांना आणखी एक विजय मिळाला. या विजयाचा परिणाम म्हणून मुस्लिमांच्या स्वामित्वातून हंगेरी मुक्त झाला. त्यानंतर एक वर्षाने ऑटोमनांनी परत हल्ला केला तेव्हा तो परतवून लावण्यात आला. ऑस्ट्रियनांनी बेलग्रेड जिंकले आणि बोस्नियाचा बराचसा भाग व्यापला. दल्माशियामध्ये तुर्की सत्तेविरुद्ध राष्ट्रव्यापी उठाव झाला. पुढे ऑस्ट्रियनांनी डॅन्यूब नदी प्रदेशातील किल्लेदेखील काबीज केले. त्याचवेळी निशही त्यांच्या ताब्यात आले.

उत्तरेस तुर्की सेना ऑस्ट्रियाला तोंड देत होत्या त्याच वेळी दक्षिणेकडे व्हेनिशियनांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. व्हेनिशियनांनी ग्रीसवर यशस्वी चढाई करून १६८६ मध्ये मोरिया काबीज केले आणि त्यानंतर एक वर्षात पायरेयस, अथेन्स व त्या लगतचा मोठा प्रदेश आपल्या कब्जात घेतला. पुढे १६९८ मध्ये डॅन्यूब नदी किनाऱ्यावरील कार्लो विट्झ येथे व १७१८ मध्ये पास्नारोविट्झ येथे ऑस्ट्रिया, व्हेनिस आणि तुर्कस्तान यांच्यामध्ये दोन करार झाले. या करारांन्वये तुर्कांना त्यांच्या वर्चस्वाखालील हंगेरीचा सर्व उर्वरित प्रदेश आणि वालाचिया, सर्बिया व बोस्निया यांचा बराचसा भाग सोडावा लागला. परंतु त्याऐवजी त्यांना व्हेनिशियनांकडून मोरिया परत मिळाले.

युरोपात आपण आणखी आक्रमणे करण्याचे साहस केले तर त्याचा कडवेपणाने प्रतिकार केला जाईल हे तुर्कांना ऑस्ट्रियाशी झालेल्या या युद्धांतून कळून चुकले. तसेच

युरोपातील आपला उरलेला साम्राज्यप्रदेश आपल्या ताब्यात ठेवायचा असेल तर भविष्यकाळात आपण बचावाचे धोरण पत्करण्यातच समाधान मानले पाहिजे हे तुर्कांनी ओळखले. रशियाशी झालेल्या संघर्षात लवकरच तुर्कांच्या सामर्थ्याची कसोटी लागली. रशियाशी त्यांचे नाममात्र शांततेचे संबंध होते. रशियनांनी तुर्कांचे अझॉफ-शहराजवळचे अनेक किल्ले हस्तगत केले आणि क्रीमियावर स्वारी करून खुद्द अझॉफ हे मजबूत तटबंदी असलेले शहर जिंकले. आकस्मिकपणे झालेले हे युद्ध बेलग्रेड येथे तह ( १७३९ ) होऊन संपले. या तहातील शर्तीनुसार अझॉफ शहर उद्ध्वस्त करण्यात आले. परंतु यावेळच्या तहात तुर्कस्तानने जेवढे गमावले त्यापेक्षा जास्त कमावले. कारण बेलग्रेड, बराचसा सर्बियाचा भाग, बोस्निया आणि वालाचिया त्यांना परत देण्यात आले. त्यामुळे बेलग्रेड-तहातील शर्ती स्वाभाविकच रशियाला रुचल्या नव्हत्या. त्या शर्ती रद्द करण्याच्या संधीची रशिया वाट पहात होता. पुढे तीस वर्षांनी तुर्कस्तानच्या विरोधाला न जुमानता दुसऱ्या कॅथराईनने प्रशियाच्या फ्रेडरिक दी ग्रेटला पोलंडची फाळणी करण्यास संमती दिली तेव्हा तुर्कस्तानने चढाई केली. रशियाला आता संधी मिळाली. तुर्कस्तान रशिया यांच्यात लढाई जुंपली. या लढाईत तुर्कस्तानचे नुकसान झाले. त्याला क्रीमिया गमवावा लागला. तो रशियाच्या हाती गेला. एवढेच नव्हे तर कॉन्स्टॅन्टिनोपलमधील ख्रिश्चनांचे संरक्षण करण्याचा अधिकारदेखील तुर्कांना रशियाकडे सोपवावा लागला. याची रशियन वाटच पहात होते. उलट तुर्कांना कैनार्जी तहानुसार ( १७७४ ) क्रीमिया व बेस-अरेबिया येथील तार्तर मुस्लिमांचे स्वातंत्र्य कायम राहील अशी हमी मिळाली. तसेच वोलाचिया, मोल्डव्हिया, बेसअरेबिया व जॉर्जिया हे तुर्कस्तानपासून घेतलेले प्रदेश परत त्याच्या अधिराज्याखाली सोपवण्यात आले. तुर्कस्तानवर पुढे आणखी एक हल्ला झाला. १७९२ मध्ये जॅसी येथे तह होऊन त्या युद्धाचा शेवट झाला. या तहाद्वारे नीसर नदी ही तुर्कस्तानची पूर्व सीमा ठरवून देण्यात आली.

सारांश एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी युरोपातील तुर्की साम्राज्यात युरोपीय तुर्कस्तान हा भू-प्रदेश आणि ( १ ) इओनियन बेटे वगळून आजचा ग्रीस व ( २ ) बुल्गारिया, अल्बानिया व युगोस्लाव्हिया ही आजची राष्ट्रे यांचा समावेश होत होता. तसेच डॅन्यूबपलीकडील मोल्दाविया व वालाचिया हे प्रदेशही तुर्की संरक्षणाखाली होते. त्या वेळच्या युरोपीय तुर्की साम्राज्याचे एकूण क्षेत्रफळ २३८,००० चौरस मैल व लोकसंख्या ८,०००,००० इतकी असावी. त्यानंतर तुर्की साम्राज्यावर झालेल्या अनेक स्वाऱ्या व युद्धे आणि त्यामागोमाग झालेले अनेक तह यामुळे साम्राज्याचा विस्तार फारसा होऊ शकला नाही. युरोपमधील तुर्की साम्राज्यातील पूर्वीच्या प्रदेशांपैकी आजमितीस ( १९५५ ) फक्त पूर्व थ्रेस आणि त्याची ॲड्रियानोपल व कॉन्स्टॅन्टिनोपल ही प्राचीन राजधानीची[1] शहरे, एजियन बेटांपैकी फक्त इम्ब्रॉस व टेनेडोस ही बेटे एवढाच

१. १९५० मध्ये युरोपियन तुर्कस्तानची लोकसंख्या १,६२६,२३९ इतकी होती.

भू-भाग तुर्कस्तानपाशी आहे. क्रीट व इतर बेटे ग्रीसकडे[1] आहेत. १९२२ मध्ये मुदानिया येथे झालेल्या करारानुसार लोकसंख्येची अदलाबदल करण्यात आली. शिवाय हेलास तर संपूर्णपणे युरोपियन व ख्रिश्चन झाले. त्यामुळे ग्रीसमधील मुस्लिम लोकसंख्या बरीच घटली.

युरोपमधील इस्लामच्या इतिहासाचा आतापर्यंत जो आढावा घेतला त्यावरून तेथे दोन वेळा इस्लामी आक्रमणाच्या प्रचंड लाटा आल्या असे दिसते. या लाटांना अतिशय झपाट्याने भरती आली. आणि नंतर मग त्या धीरेधीरे ओसरू लागल्या. परंतु या दोन्ही लाटांच्या खुणा मात्र मागे राहिल्या. परंतु या खुणा परस्पर भिन्न आहेत. स्पेनमध्ये एकही मुस्लिम राहिलेला नाही. तथापि मूरांचे शिल्प व स्पॅनिश भाषेत दिसून येणारे अरबी भाषेचे घटक या दोन गोष्टी स्पेनमधील मुस्लिम सत्तेच्या वैभवाचे आणि सामर्थ्याचे स्मृतिचिन्ह म्हणून मागे राहिल्या आहेत. इस्लामशी अद्याप एकनिष्ठ असलेले पूर्व युरोपमधील विविध लोकसमूह हे तुर्की सत्तेचेच प्रतीक आहेत. अगदी प्रारंभीच्या काळातील तुर्क हे अत्यंत कडवे व धर्माच्या बाबतीत उत्साही लोक होते. त्यांच्या अंकित झालेल्या लोकसमूहांनी कमी-जास्त कालावधीत त्यांचा धर्म अंगिकारला. या लोकांनी एक उपयुक्त युक्ती म्हणून किंवा सत्ताधारी तुर्कांमधील उत्साह पाहून भारले गेल्यामुळे अथवा काही अंशी दडपणापोटी इस्लामचा स्वीकार केला होता. दडपणाखाली ज्यांनी इस्लामचा अंगिकार केला त्यात जानिसार हे लोक[2] होते. कारण त्यांच्यापैकी बहु-संख्य लोकांचे आई-वडील ख्रिश्चन होते. युरोपात मुस्लिमांची सर्वात जास्त संख्या सांप्रत रशियात आहे. हे रशियन मुस्लिम मूळ तुर्की किंवा तुर्कोमन आणि तातैर या विभिन्न वंशांचे आहेत. कॅस्पियनपासून अझॉव्ह समुद्रापर्यंतच्या किनाऱ्यावरील रशियातील किर्गीज कझॅक या उजाड प्रदेशात बहुसंख्य लोक राहतात. यापैकी आणखी पुष्कळसे

---

१. काही लष्करी व राजनैतिक फेरबदल करून ही बेटे लौसाना येथे झालेल्या ( २४ जुलै, १९२३ ) तहान्वये इटलीकडे सोपवण्यात आली. त्यामागोमाग या बेटां-वरील व कॅस्टेलरॉसोवरील इटलीच्या सत्तेला बड्या राष्ट्रांची मान्यता मिळाली. तेथे त्यानंतरही मुस्लिम शाळा होत्या. परंतु इतर धर्मपंथियांच्या शाळांप्रमाणे या शाळांतही आठवड्यातून चार तास इटालियन भाषा शिकवली जात असे. १९४७ मध्ये इटलीच्या ताब्यातील ही बेटे ग्रीसला परत मिळाली.

२. युरोपीय तुर्कस्तानप्रमाणेच युरोपमधील इतर देशातदेखील मुस्लिम मोठ्या संख्येने आहेत. बल्गारिया १४ टक्के, तुर्क व पोमॅक्स वंशांचे. तरी १९५१ मध्ये तेथील १,६०,००० तुर्कांना हाकलून देण्यात आले होते. युगोस्लाव्हिया १२ टक्के. यापैकी बहुसंख्य बोस्नियामध्ये आहेत. रूमानिया व अल्बानिया या देशांत ६८ टक्के. अधिक माहितीसाठी : एल्. मॅसिग्टन, Annuairedu Monde Mussulman ( Paris, 1955 ). जॉर्जियन लोक मात्र सदैव ख्रिश्चनधर्मीयच राहिले.

मुस्लिम अलीकडच्या काळापर्यंत क्रिमीयन द्वीपकल्पात व कॉकेशसमध्ये तसेच कझान, आरेनबर्ग, उफा इत्यादी शहरांत[१] राहात होते. लिथुआनियामध्येदेखील पोलिश भाषा बोलणारे काही तार्तरवंशीय मुस्लिम राहतात. गोल्डन होर्ड ( सोनेरी टोळी ) या नावाने प्रसिद्ध असलेल्या पूर्वजांनी चेंगीजखानचा पणतू बातु याच्या नेतृत्वाखाली १२४० च्या सुमारास व्होल्गा नदीच्या खालचा व मध्यभागातील प्रवाहाखाली भिजणारा भू-प्रदेश जिंकला होता. व्होल्गा किनाऱ्यावरील सारे येथे त्यांची राजधानी होती. एका स्वारीत तर त्यांनी मॉस्को व नोव्हगोरॉड या शहरांतही प्रवेश केला. क्रॅको शहर भस्मसात केले व पेस्थवर चोहोबाजूंनी मारा केला. १२७२ मध्ये त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला आणि तेव्हापासून ते त्या धर्माशी एकनिष्ठ आहेत. तार्तर भाषा विकसित करून त्याद्वारे त्यांनी एक प्रकारची राष्ट्रीय भावनाही जोपासली आहे. तरीदेखील भटक्या तार्तर टोळ्या सोडून बाकीच्या तार्तरांची जीवनपद्धती व विचारपद्धती संपूर्णपणे स्लाव्ह लोकांसारखीच आहे. त्यांची नावे रशियन पद्धतीची आहेत; आणि त्या सर्वांना रशियन भाषा समजते व बोलता येते.[२]

बॅबिस, बहाई व अहमदिया यासारख्या काही सुधारणावादी पंथांकडे आकर्षित झालेले काही छोटे समाजगट सोडले तर पाश्चिमात्य जगातील इस्लामची प्रगती थांबली आहे किंवा त्याची पीछेहाटच होत आहे असे म्हटले तरी चालेल. याची काही राजकीय कारणे तर आहेतच परंतु ग्रीक व रोमन परंपरेत आणि आचारधर्मात वाढलेल्या पश्चिमी देशांच्यादृष्टीने पैगंबर मुहम्मदांचा धर्म अनुरूप नाही, हेही त्याचे एक कारण आहे. ग्रीक व रोमन परंपरांत व आचारधर्मात वेगवेगळ्या देशातील परिस्थितीशी जुळवून घेण्याइतका लवचिकपणा असल्याचे त्या परंपरांनी दाखवून दिले आहे. आज मितीला इस्लामचे जे स्वरूप आहे त्यामध्ये व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील बारीकसारीक वर्तनावर त्या धर्माचे नियंत्रण व नियमन आहे. त्यामुळे जेथे विचारस्वातंत्र्याच्या क्षेत्रात व सामाजिक आचारांच्या बाबतीत व्यक्तीला स्वतःच्या आवडीप्रमाणे वागण्याचे बरेचसे स्वातंत्र्य आहे तेथील लोक हा धर्म पसंत करीत नाहीत. तसेच इस्लामची तत्त्वे जेथील स्थानिक परंपरांशी व धार्मिक तत्त्वांशी अतिशय विरोधी आहेत तेथेही इस्लाम धर्माला साथ मिळालेली नाही. परंतु ज्या देशांतील अतिप्रचंड लोकसंख्या धर्मपीठांची सत्ता सहजगत्या

---

१. या पुस्तकाची प्रथम आवृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतरच्या काळात सोव्हिएट रशियात काही परिवर्तने आणि जनसंख्येची स्थलांतरे झाली आहेत. व्होल्गा काठच्या कझाक शहरात एके काळी एक मुस्लिम मुद्रणालय होते. अरबी, तुर्की व पर्शियन भाषांतील अनेक पुस्तके या मुद्रणालयाने प्रकाशित केली होती. ते मुद्रणालय आता अस्तित्वात नाही.

२. रशियांत अगदी अलीकडच्या काळात इस्लाम धर्म स्वीकारला असे लोक म्हणजे कॉकेशसमधील अबकाझिस लोक होते. १९०५ साली सहिष्णुतेची राजाज्ञा निघेपर्यंत धर्माने नाममात्र ख्रिश्चन पण जन्माने ते मुस्लिम होते.

मानतात अशा आशिया-आफ्रिकेतील देशांमधील परिस्थिती वेगळी आहे. इस्लामचा कडक आचारधर्म या देशांतील साधेपणाला उपकारक असा आहे. त्याचाही त्या धर्माला फायदा झाला आहे. जे समाज चिंतनशील नाहीत किंवा धार्मिक कर्मकाण्ड करणे हेच साध्य मानतात अशा समाजांतच इस्लामचे बालेकिल्ले आहेत. असे सर्वच देश मुस्लिम-धर्मीय आहेत असे नाही. परंतु इस्लामशी संबंध आला तेव्हा अशाच देशांनी तो आतुरतेने स्वीकारला व त्याच्या प्रसारास सहाय्य केले. मुसलमानांचे आज सर्वांत मोठे गट पाकिस्तान, हिंदुस्थान व इंडोनेशियन प्रजासत्ताक या देशांत आढळतात.

या देशांत इस्लामचा प्रवेश तुलनेने उशीरा झाला. अरबांनी अगदी प्रारंभी या देशांवर केलेल्या स्वाऱ्या बहुतांशाने लूटमारीसाठी केलेल्या आक्रमणाच्या स्वरूपाच्या होत्या. नवीन प्रदेश किंवा नवे लोकसमूह इस्लाममध्ये आणण्याच्या दृष्टीने त्या स्वाऱ्यांचा फारसा परिणाम झाला नाही. खुरासान जिंकले तेव्हाच मुस्लिम फौजांना हिंदुस्थानात प्रवेश करण्याचा रस्ता उपलब्ध झाला आणि त्या मार्गाचा त्यांना काहीसा सुलभतेने उपयोग करता येऊ लागला. मागे सांगितल्याप्रमाणे सबक्तगीनाने खुरासान प्रांतात गझनी साम्राज्य स्थापन केले. त्याचा मुलगा गझनीचा महमुद याने ते वाढवले. महमुदाने पंजाब आपल्या साम्राज्यात आणला आणि तेथे त्याने धर्मांतराचा कार्यक्रम आरंभला. त्यामुळे पंजाबमधील निम्म्यापेक्षा जास्त हिंदू इस्लाम धर्मात आले. मथुरा ( १०१८ ) व सोमनाथ ( १०२४ ) येथील हिंदू मंदिरांतील मूर्तींचा विध्वंस करण्याचा जो पराक्रम महमुदाने केला त्याचा इस्लामच्या प्रसाराच्या दृष्टीने फारच थोडा उपयोग झाला असावा. या पराक्रमासंबंधी मुस्लिमांत प्रचलित असलेल्या आख्यायिकांपैकी काहींच्या सत्यतेबद्दल शंका वाटते. तथापि महमुदामुळे मुस्लिम व्यापाऱ्यांना पंजाबमध्ये व्यापार करण्याची संधी मिळाली आणि त्याबरोबरच तेथील जनतेला आपल्या धर्माचे फायदेही समजून सांगता आले. काश्मीर व गुजरातमधील महमुदाच्या स्वाऱ्या विशेष फायदेशीर झाल्या नाहीत, आणि त्याच्या मृत्यूनंतर ( १०३० ) त्यांची आठवणही जवळजवळ नष्ट झाली. त्याने स्थापन केलेले साम्राज्यही त्याच्यामागून फार काळ टिकले नाही. महमुदाच्या साम्राज्यातील इराण व ट्रान्सोक्साइन प्रदेश सेल्ज्युकसनी १०३७ ते १०४५ च्या दरम्यान बळकावले. १०६१ मध्ये घोरी या अफगाण वंशाने गझनी जिंकले आणि जाळून टाकले तेव्हा गझनी साम्राज्यावर आणखी एक आघात झाला. स्वतः सत्तारूढ होण्याच्या प्रयत्नात महमुदाने या घोरी घराण्यातील लोकांना नागवले होते. पुढे बरीच स्थित्यंतरे घडली आणि घोरींनी आणखी बराच प्रदेश संपादित केला. नंतर याच घोरी वंशातील महमुद घोरीने हिंदुस्थानवर स्वारी करून सिंध व मुलतान जिंकले ( ११७५ ). नंतर त्याने लाहोर घेतले आणि तेथे संरक्षणासाठी ठेवलेल्या बाकीच्या गझनवींचा समूळ नाश केला. मग त्याने राजपूत, चौहान व त्यांचे दोस्त यांच्यावर चढाई केली. महमुद घोरीच्या स्वाऱ्यांचा राजपुतांनी प्रारंभी यशस्वी प्रतिकार केला. त्यानंतर जवळपास समस्त राजपूत

राजे उत्तर हिंदुस्थानच्या रक्षणासाठी एकत्र आले. त्यांच्याशी ठाणेश्वर येथे ११९२ मध्ये झालेल्या लढाईत महमुदाने त्यांचा पराभव केला आणि राजपुतांचा प्रदेश त्याच्या सत्तेखाली गेला. या वेळी पेशावरपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा सर्व हिंदुस्थान मुसलमान अधिपत्याखाली आला होता. ११९३ मध्ये दिल्ली ही राजधानी करण्यात आली. मुहमद घोरी वंशियांच्या अल्पकालीन सत्तेनंतर गुलाम वंशातील सुलतान दिल्लीच्या गादीवर आले. दक्षिणेत विंध्य पर्वतापर्यंत त्यांची राजसत्ता पसरली होती.

गुलामवंशीय सुल्तानांनंतर १२९० मध्ये दिल्लीच्या तख्तावर आलेल्या खिलजी तुर्कांच्या मध्यदक्षिण व दक्षिण हिंदुस्थानातील मुस्लिम विजयाला प्रारंभ झाला. अल्ला-उद्दीन खिलजीने इस्लामचा पुष्कळच प्रसार केला. हिंदूंना चिरडून टाकण्यासाठी त्याने निर्दय कायदे केले. तरीही फारच थोड्या हिंदूंना तो हिंदू धर्मांत आणू शकला. त्याच्याच अमदानीत गुजरात प्रांत निर्विवादपणे इस्लामच्या कब्जात गेला. परंतु मोठ्या प्रमाणात बंगालमध्ये इस्लामला अनुयायी मिळावयास पुढे अनेक शतके जावी लागली. पुढे सुल्तान अकबराच्या कारकीर्दीतच (१५५६–१६०५) खरेतर इस्लाम फोफावला. सिलोनमध्ये इस्लामची प्रगती मंदगतीने झाली. सांप्रत तेथे ४००,००० मुस्लिम आहेत. आणि ते सर्व सामान्यपणे मूळ मद्रासमधील आहेत.

मुस्लिमांच्या हिंदुस्थानातील निर्विवाद विजयानंतरच्या काळात त्यांची संख्या हिंदूंच्या मानाने अधिक प्रमाणात वाढली, आणि पाकिस्तान व भारत अशी ब्रिटिश हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वी, म्हणजे १९४१ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी, ११ व्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानात आक्रमक म्हणून आलेल्या मुस्लिमांची संख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे $\frac{1}{4}$ होती. हिंदुस्थानातील मुस्लिमांच्या या प्रचंड प्रमाणाचे कारण नैसर्गिकपणे होणारी लोकसंख्यावृद्धी, स्थानिक जनतेने मोठ्या प्रमाणात केलेले धर्मांतर व आक्रमक म्हणून सतत येणाऱ्या 'नव्या' मुस्लिमांचा ओघ हे होते. पश्चिम अथवा मध्य आशियातील जनतेने अतिशय उत्साहाने इस्लामचा स्वीकार व प्रसार केला होता. तेथूनच इस्लाम हिंदुस्थानात आला. त्यामुळे पश्चिम किंवा मध्य आशियाला जास्त लगत असलेल्या हिंदुस्थानातील प्रांतांनी हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील किंवा पूर्वेकडील प्रांतांपेक्षा जास्त लवकर आणि जास्त मोठ्या प्रमाणात इस्लामचा स्वीकार केला. म्हणूनच १९२१ च्या जनगणनेनुसार वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान या प्रांतांमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक लोक मुसलमान होते. काश्मीरमध्ये हे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा व पंजाबात ५० टक्क्यांपेक्षा जास्त दिसून येते. तर आसाममध्ये हे प्रमाण दर ३०० लोकांत फक्त १ मुस्लिम असे असल्याचे दिसते.

याला बंगाल अपवाद ठरला. १९५१ च्या जनगणनेनुसार पाकिस्तानची निम्म्या-पेक्षा अधिक लोकसंख्या बंगालमध्ये आहे. म्हणूनच मुस्लिम देशांशी असलेली सलगत

हे, काही प्रांतांत हिंदुंपेक्षा मुस्लिमांची संख्या तुलनेने अधिक वाढली याचे फक्त एक कारण आहे. यापेक्षा या गोष्टीची आणखीही महत्त्वाची कारणे आहेत. उदाहरणार्थ, मुस्लिमांत अधिक रग दिसून येते. (त्यांचा आहार-ज्यांत मांसाहारही येतो– याला काही अंशी कारणीभूत आहे.) तसेच मुस्लिम समाज हा साधारणपणे शहरवासी असल्याने आणि त्यांच्यापैकी फार थोडे लोक हिंदूप्रमाणे खेड्यांत राहून शेती करणारे असल्याने त्यांच्यावर दुष्काळात मरण्याचा फारसा प्रसंग येत नाही. त्याचप्रमाणे मुस्लिमांत हिंदूंच्याइतकी अल्पवयात लग्ने होत नाहीत आणि विधवाविवाहास मनाई नाही. यापेक्षाही महत्त्वाचे आणखी एक सामाजिक कारण आहे. जन्मामुळे आपल्याला लागलेला कलंक इस्लामचा स्वीकार केला की धुवून काढता येईल असे हिंदुधर्मीयांतील अस्पृश्यांना वाटते.[1]

इस्लामी आक्रमणाची झळ नेपाळच्या पर्वतमय प्रदेशास लागलेली दिसत नाही. कदाचित नेपाळवरील आक्रमणात वापरावे लागणारे बिकट डोंगरी युद्धतंत्र आणि हिमालयातील हिवाळा मुस्लिमांना फारच कष्टप्रद वाटला असावा. तरीदेखील तिबेटमध्ये ल्हासा व इतर शहरात अनेक मुस्लिम कुटुंबे आहेत. त्यांपैकी काही चिनी आहेत. बौद्ध लोकांसाठी हे लोक कसाईकाम करतात. त्यांच्याव्यतिरिक्त त्यांच्यापेक्षाही जास्त संख्येने तेथे दुसरेही मुस्लिम आहेत. ते काश्मीरमधून तेथे आलेले आहेत. विविध प्रकारचा व्यापार-उदीम करून ते आपला उदरनिर्वाह चालवितात. पामीरच्या पठारावरही इस्मायली मुस्लिमांची एक छोटी जमात राहते. आणि सोव्हिएट वृत्तपत्रांतील माहितीवरून असे दिसते की आगाखान यांचे प्रतिनिधी १९५२ मध्ये वसुलीसाठी तेथपर्यंत गेले होते.

हिंदुस्थानलगतच्या मलाया आणि सुमात्रा जावा व बोर्निओ या द्वीपप्रदेशांत हिंदुस्थानातूनच इस्लाम गेला. मले भाषेची 'अरबी' वर्णमाला ही हिंद-इराणी[2] पद्धतीची आहे. त्याचप्रमाणे अरबस्तानातील पुराणमतवादी धर्मश्रद्धेशी विसंगत असलेली आणि हिंदुस्थानातील इस्लामचे लक्षण समजली जाणारी अद्वैत आणि सुफी विचारसरणी मलायातील महम्मुदी धर्मात दिसून येते. फार पूर्वी बहुधा नवव्या शतकामध्ये अरबी व्यापारीदेखील मलाकामध्ये गेलेले होते. मार्को पोलो सुमात्रामध्ये गेला होता. [ सुमात्राला त्याने छोटा[3] जावा म्हटले आहे. ] त्या वेळी सुमात्राच्या उत्तर

---

१. अमेरिकेमधील निग्रो समाजातदेखील यात्र कारणामुळे मुस्लिम प्रचाराला काही अंशी यश आल्याचे दिसते, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

२. इब्ने बतुता १३४६ च्या सुमारास सुमात्रा बंदरात उतरला तेव्हा त्याला ज्या काही प्रमुख व्यक्ती भेटल्या त्यांची नावे इराणी होती : दौलासा (? दौलतशहा), सय्यद अल्-शिराझी आणि ताज अल्-दिन अल् इस्पहानी.

३. मार्को पोलो याने ज्याला 'ग्रेट जावा' म्हटलेले आहे ते बेट म्हणजे आपण ज्याला 'जावा' म्हणतो तेच असावे. त्याला इब्न बतुता 'मूल जावा' म्हणतो.

किनाऱ्यावरील बंदरांच्या शहरांत त्याला अनेक मुसलमान भेटले होते. या शहरात व्यापारासाठी नेहमी येणाऱ्या सारासेन व्यापाऱ्यांनी त्यांना मुसलमान केले. इब्ने बतुता हा मोरोक्कन प्रवासी हिंदुस्थान व चीन या देशांच्या यात्रेच्या (१३४६) दरम्यान वाटेत सुमुत्रा नगरात (पुढे सुमात्रा या नावाने ओळखल्या जाऊ लागलेल्या बेटाची राजधानी) पोचला, तेव्हा त्या शहरात मुस्लिम राहात असल्याचे त्याला आढळले. चीनच्या १४०९ मधील वार्षिक वृत्तांतात मलाक्कामधील मले लोक मुसलमान असल्याची नोंद आहे. जोहोर व अचिनमध्ये इस्लाम मलाक्कातूनच गेला. तेथून पुढे १७ व्या व १८ व्या शतकांत इस्लामचा सुमात्रा किनाऱ्यावरील शहरांत व अंतर्गत प्रदेशात विस्तार झाला.

जावामध्ये अगदी प्रथम[1] पोचलेला अरब मिशनरी मौलाना मलिक इब्राहिम नावाचा मुस्लिम होता. अगदी प्रारंभी जावात जे हिंदी मुस्लिम गेले त्यांच्यानंतर तो तेथे गेला. १४१९ मध्ये ग्रीसेक येथे त्याचे निधन झाले. तेथेच तो वस्ती करून राहिला होता. तेथे त्याचे नाव एका स्मारकावर कोरलेले आहे. या मौलवीनंतर जावात गेलेल्या व्यापाऱ्यांप्रमाणे तोही दक्षिण अरबस्तानातील हाद्रामौत येथील रहिवासी होता. या व्यापाऱ्यांनीच जावामध्ये मिशनऱ्यांसारखे काम करून इस्लामचा प्रसार केला. दुर्भिक्ष्या-मुळे ते आपली मूळभूमी सोडून जावा व त्या जवळच्या बोर्निओत आणि सेलिबसमध्ये येऊन स्थायी झाले होते. तेथे त्यांनी लहान लहान राज्ये स्थापन केली. त्या राज्यांत त्यांच्या धर्माचा द्रुतगतीने प्रसार झाला. सतराव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात जावा आदी बेटांत डच लोक येऊन राहिले. १९४९ च्या डिसेंबरात इंडोनेशियन प्रजासत्ताक जाहीर होईपर्यंत त्यांनी तेथे राज्य केले. या प्रजासत्ताकाचा पहिला अध्यक्ष मुस्लिम होता. इंडोनेशियातील सुमारे ८ कोटी लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोक इस्लामचे अनुयायी आहेत. मलायातील सर्व मले मुसलमान आहेत.

कुतैब इब्ने मुस्लिम व त्याचे अरब सैनिक यांनी इस्लामी इतिहासाच्या पहिल्या शतकात मध्य आशियामध्ये इस्लामची जी बीजे पेरली त्यांनी मजबूत मूळ धरले. त्यानंतरच्या काळात तुर्कीस्तान या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विशाल भूप्रदेशात सर्वत्र भक्कमपणे तो धर्म स्थिर झाला. या प्रदेशात खिवा (ख्वार्ज़्म), बुखारा, समरकंद, फरगाना आणि चीनची सीमा व त्याहिपलीकडेपर्यंत पसरलेल्या भूमीचा समावेश होत असे. चेंगीझखानच्या नेतृत्वाखाली मंगोल आक्रमकांनी केलेल्या विध्वंसामुळेदेखील इस्लामच्या अनुयायांवरील त्या धर्माची पकड नष्ट होऊ शकली नाही. थोड्याच काळात मुस्लिम खानांची अनेक राज्ये उदयास आली. झारच्या अमलाखालील रशियाने १८७३

---

१. इब्ने बतुता जावामध्ये गेला होता त्या काळात तेथील रहिवासी मुसलमान झालेले नव्हते.

मध्ये खानांचा पराभव करीपर्यंत त्यांचे स्वातंत्र्य टिकून होते. युनियन ऑफ सोव्हिएट सोशलिस्ट रिपब्लिकमधील मध्य आशियातील मुस्लिम प्रदेश उझ्बेकीस्तान, कझगिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिगीस्तान, किर्गिझिया व अझुरबैझान अशा सहा प्रजासत्ताकांत विभागलेला आहे. खुद्द रशियन प्रदेशातदेखील बश्किरिया या स्वायत्त प्रजासत्ताकातील (खुफा ही त्याची राजधानी आहे.) काही भाग व उत्तर कॉकेशस जिल्हा हे मुस्लिम प्रदेश मानले जातात.

राष्ट्र हेच व्यक्तीच्या निष्ठेचे एकमेव केंद्र होय आणि राष्ट्राचे कायदे कानू हेच व्यक्तिजीवनाचे मार्गदर्शक तत्त्व होय हा सोव्हिएट धोरणाचा स्पष्ट उद्देश आहे. काही अंशी हे धोरण अपरिहार्यपणे इस्लामच्या विरोधी आहे. मुस्लिम प्रजासत्ताकातील ग्रामीण व शेतकरी विभागात इस्लाम प्रबळ व दीर्घकाळापासून रुजलेला आहे. सोव्हिएट वृत्तपत्रांतून रमझान व इतर मुस्लिम सण, साधुसंतांच्या दर्ग्याच्या ठिकाणी होणारे उरूस व बहुपत्नीत्वाची पद्धत याविरुद्ध प्रामुख्याने टीका केली जाते. भटक्या टोळ्यांची वस्ती असलेल्या प्राचीन प्रदेशांतील व अलीकडेच औद्योगिकरण व 'रशियनीकरण' झालेल्या जिल्ह्यांमधील (उदा. बाकू व अक्काबाद) तरुण पिढीमध्ये इस्लामी आचारविचारांसंबंधीचे ज्ञान कमी होत असल्याचे दिसते.

उत्तर व अतिपूर्व आशिया या प्रदेशात जाणे-येणे कठीण असल्यामुळे इस्लामला तेथे फार मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळालेले नाहीत. तेथे असलेले थोडेसे मुसलमान तार्तर आक्रमकांच्या (उदा-, तिऊमेनच्या शेबानीखानांच्या) वंशाचे आहेत. तुलनेने अलीकडच्या काळात ते इस्लाम धर्मात आले. विशेषतः उझ्बेग या नावाने ते ओळखले जातात. भटक्या किर्घिजनांनी पूर्वीच धर्मांतर केले असले तरी अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यांनी आपला मूळ शमानिझम धर्म खरे म्हणजे सोडलाच नव्हता. पुढे रशियाने ते किर्घिजांच्या प्रांतात कझानमधील मुलांना प्रामुख्याने काही राजकीय कामासाठी पाठवले होते. त्यांनी तेथे मशिदी बांधल्या आणि इस्लाम धर्मात येण्यास किर्घिजांना विशेष चालना दिली.

चीनमधील काही भागात त्यामानाने मुस्लिम धर्माचा प्रचार जास्त फलदायी ठरला. तरीदेखील आपल्या अंतर्गत गोष्टीत परकी हस्तक्षेप खपवून न घेण्याच्या चीनच्या प्रवृत्तीमुळे इस्लामच्या प्रगतीला खीळ बसली. समुद्रमार्गाने थेट हँग–चाऊ फू (कान्सू) पर्यंत चीनमध्ये गेलेल्या व्यापाऱ्यांमार्फत चिनी लोकांना इस्लामचा सर्वांत प्रथम परिचय झाला असावा. हे व्यापारी समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांत वस्ती करून राहिले. देशाच्या अंतर्भागात ते गेले नाहीत. त्या भागात बहुदा मध्य आशियातील तुर्कांनी इस्लाम नेला असावा. हे तुर्क चिनी लोकांशी वांशिकदृष्ट्या निकट होते. ९६० पर्यंत बऱ्याचशा तुर्कांनी स्वतः इस्लाम धर्म अंगिकारला नव्हता. पण त्या सुमारास त्यांच्यातील अनेक जमाती इस्लाम धर्मात गेल्या. अर्थात् त्यांनी सनातन इस्लामचा नव्हे तर इस्लामांतील अन्य

गूढवादी पंथांचा अंगिकार केला. या धर्मांतरितांनी नव्याने पत्करलेला आपला धर्म चीनमध्ये नेला. परंतु चेंगीझखानने आशियामध्ये आपल्या साम्राज्याचा विस्तार करीपर्यंत त्या देशात इस्लामने फारशी प्रगती केली असण्याची शक्यता अतिशय कमी दिसते. स्वतः चेंगीजखान शमानिस्ट होता तरी त्याची वागणूक सर्वच धर्मांच्या बाबतीत सारखीच तटस्थतेची होती. पण त्याने धर्मांतराला अडथळा मात्र केला नाही. धर्मांतराचा मार्ग मोकळा होता. त्यामुळे सर्व चिनी प्रांतांत मुस्लिम लोक दिसत असत. तरी फक्त पश्चिम व उत्तर चीनमधील प्रांतांत उदाहरणार्थ, कान्सू, सिंकियांग ( चिनी तुर्कीस्तान ), शान्सी, शेन्सी, चिहली व युनान यांतच मुस्लिमांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकली. चिनी साम्राज्यातील इस्लामच्या प्रगतीचा प्रारंभ युनानपासून झाला असावा. कारण कुब्लायखानाने (कुब्लाखान, १२६०-९४) याच प्रांतावर सय्यद-ई-अजाली या मुस्लिमाला आपला सुभेदार म्हणून नेमले होते. हा सैय्यद-ई-अजाली आपण मुहम्मद पैगंबरांचा वंशज असल्याचा दावा करीत असे. तो व त्याचा मुलगा नासिर अल्दिन या दोघांनी आपल्या धर्माचा सक्रिय प्रसार केला आणि इस्लामला अनेक अनुयायी मिळवून दिले.

मंगोल युआन राजवटीच्या उत्तरार्धात व मिंगवंशीय अमदानीच्या प्रारंभीच्या काळात ( म्हणजे १४ व्या शतकाच्या उत्तरार्धात ) काही थोडे मुस्लिम समूह चीनमध्ये स्थिर झाले असावेत असे दिसते. अगदी १९३९ पर्यंत म्हणजे मुस्लिम रेल्वे कामगार चीनमध्ये येईपर्यंत आणखीही मुस्लिम गट तेथे येत होते. आंतर मंगोलियातील काही समाजात चिनी वंशाचे काही मुस्लिम आहेत. 'ग्रेट वॉल' ओलांडून देशांतर करता कामा नये हा मांचू राजांचा निर्बंध मोडून हे लोक आंतरमंगोलियात गेले आणि तेथे त्यांनी आपल्याबरोबर आलेल्या मुसलमानांकडून इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. चीनमधील मुस्लिमांची निश्चित संख्या सांगता येणार नाही. परंतु चीनच्या एकूण लोकसंख्येच्या एकनवमांश मुसलमान आहेत असे सांगतात.

पेहराव, चेहरामोहरा व मनोरचना याबाबतींत चीनमधील[1] मुस्लिम आपल्या अन्यधर्मीय देशबांधवांप्रमाणेच आहेत आणि इतरत्रच्या आपल्या देशबांधवांशी त्यांचा फार पूर्वीपासून संबंध राहिलेला नाही असे म्हटले जात असले तरी इस्लाम हा चीन-मधलाच एक धर्म आहे असे तेथे कधीही मानण्यात आलेले[2] नाही. चीनमधील

१. हरकारी घोडे पाळण्यासारखे काही धंदे त्यांच्या आवडीचे आहेत. काही मुस्लिम खाणावळी चालवतात. त्यांच्या खाणावळीबाहेर पाण्याची एक सुरई ठेवलेली असते. खाणावळीचा मालक मुसलमान असल्याची आणि जेवताना डुकराचे मास दिले जात नसल्याची ही सुरई ही खूण असते.

२. १९३१ पर्यंत खुद्द अरबीमधून चिनीभाषेत कुराणाचे संपूर्ण भाषांतर झालेले नव्हते.

मुस्लिमात दोन प्रमुख पंथ आहेत– जुना व नवा. यापैकी नवा पंथ इस्लाम धर्माच्या आचारांच्या बाबतीत अधिक आस्थेवाईक असावा असे दिसते.

जपानमध्ये इस्लामला मुळीच प्रगती करता आलेली नाही. ज्या कारणांमुळे इतर काही देशांतील समाजांना इस्लाम प्रभावित करू शकला नाही तीच कारणे जपानच्याही बाबतीत असावी. जपानी साम्राज्यात जे थोडेबहुत मुस्लिम आहेत ते बहुतेक जावामधून आलेले निर्वासित आहेत.

आशियाखालोखाल आफ्रिका खंडात सर्वांत जास्त मुसलमान समाज आहे. त्यांची संख्या अलीकडच्या काळात सतत वाढत आहे. इतर देशांतल्याप्रमाणे इस्लामी धर्मप्रसारकांचा संघटित प्रयत्न या वाढीला कारणीभूत झालेला नाही. तर मुसलमान व्यापाऱ्यांच्या आणि प्रवाशांच्या खाजगी आणि स्वेच्छापूर्वक केलेल्या प्रयत्नांचे ते फळ आहे. प्रामुख्याने व्यापार करण्यासाठीच हे व्यापारी तेथे गेले होते. तरी व्यापार करताना भेटणाऱ्या माणसांशी ते व्यापारी आपल्या धर्माची चर्चा करीत. आफ्रिकेतील इस्लामचा प्रसार तद्देशीय स्त्रियांशी मुस्लिमांनी विवाह केल्यामुळे झाला आणि विवाहीत स्त्रिया व त्यांची मुलेही अशा प्रकारे त्या ' शांतिप्रिय ' मुस्लिम ' आक्रमकां 'च्या धर्माची बनली.

इस्लामी इतिहासाच्या पहिल्या शतकापासून म्हणजे इजिप्शियनांना आणि बर्बरांना त्या धर्माची दीक्षा देण्यात आली तेव्हापासून इस्लामी प्रसाराची प्रक्रिया राजकीय परिस्थिती व व्यावहारिक अडचणी यांच्या अनुरोधाने कमीजास्त गतीने चालू राहिली. नाईल नदीकिनाऱ्यापासून थेट आस्वानपर्यंत इस्लामची खूप वेगाने प्रगती झाली. अगदी पूर्वी म्हणजे ३१।६५१ मध्ये अब्दुल्ला इब्ने साद या इजिप्तच्या सुभेदाराने नुबियावर स्वारी केली होती. तरीही त्याआधी सुमारे शंभर वर्षे ख्रिश्चन धर्म पत्करलेल्या तेथील रहिवाशांनी आपले धार्मिक स्वातंत्र्य अबाधित टेवले होते. नुबियावरील हल्ल्यांत मुस्लिम आक्रमकांच्या हाती फक्त थोडी लूट पडली. डोंगोला येथील चर्च त्यांनी तोफखान्यांच्या साह्याने जमीनदोस्त केले. याशिवाय आक्रमकांना फारसे काही करता आले नाही. अरबांचे प्रयत्न कमी पडले म्हणून म्हणा किंवा ख्रिश्चनधर्मीयांवर सुदानी सत्तेची भक्कम पकड होती म्हणून म्हणा, चौदाव्या शतकात इब्ने बतूता तेथे गेला होता तो वेळपावेतो, निग्रो लोक आपल्या धर्माला चिकटून होते. एवढेच नव्हे, तर पंधराव्या शतकाच्या प्रारंभीसुद्धा आस्वान आणि द फर्स्ट कॅटॅरॅक्टच्या पलीकडील अंतर्प्रदेशावर अरबांना विजय मिळवता आला नव्हता. एकूण आस्वानपलीकडे इस्लामचा विस्तार होण्यास बराच अवधी लागला.

पूर्व आफ्रिकन किनाऱ्यावरील प्रदेशात इस्लामने बराच अगोदर प्रवेश केला होता. हा प्रदेश अरबस्तानच्या लगत होता. त्यामुळे फार पूर्वीपासून अरबी व्यापारी व्यापारासाठी तेथे जात असत. आपल्या देशबांधवांच्या छळापासून आपली सुटका करून

घेण्यासाठी प्रारंभीचे काही मक्कावासी इस्लामधर्मीय ॲबिसिनीयात आश्रयासाठी येऊन राहिले होते. यामुळे त्या देशाकडे आज ना उद्या मुस्लिमांचे लक्ष जाणे अनिवार्य होते. दहाव्या शतकाच्या सुमारास मोठ्या संख्येने मुसलमान तेथे येऊ लागले. इस्लामच्या शिकवणीतील साधेपणामुळे त्यांना स्थानिक जनतेचे प्रेम संपादन करता आले. तेथील जनता धर्माने ख्रिश्चन होती; परंतु नावापुरतीच. राज्यकर्ते ख्रिश्चनधर्म जबरदस्तीने लादून निरनिराळ्या मार्गांनी इस्लामचा प्रभाव मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. तरी देखील ॲबिसिनीयातील अनेक टोळीप्रमुख इस्लामकडे आकर्षित होत होते. त्यामुळे इस्लाम व ख्रिश्चन धर्मांतील संघर्ष अटळ झाला. अमेदा झिऑन राजाच्या अमदानीत ( १३१४-४४ ) या संघर्षाने फारच भयंकर स्वरूप धारण केले. या राजाने ख्रिश्चन धर्माचा त्याग केलेल्या लोकांवर तो धर्म जबरदस्तीने परत लादण्याचा आणि शत्रूच्या धर्माला जलसमाधी देण्याचा प्रयत्न केला. परंतु ॲबिसिनीयन राजाच्या या प्रयत्नाला अदल या बलिष्ठ राज्याच्या राजाने तीव्र प्रतिकार केला. पण त्यांत त्याला फारसे यश आले नाही. आज ज्याला इरिट्रिया म्हणतात त्याच्या किनारपट्टीवरील एका भागात हे अदल राज्य त्याचसुमारास उदयास आले होते. काही काळ इस्लामची पीछेहाट झाली. पण पुढे त्यातून तो सावरला. इतका की सोळाव्या शतकात अदल राज्याच्या मुस्लिम राजाने ॲबिसीनियावर स्वारी केली आणि तेथील लोकांना इस्लाम धर्मात आणले. राज्यकर्ते ख्रिश्चनच राहिले व बऱ्याचशा टोळीप्रमुखांनी सामाजिक कारणासाठी इस्लामचा त्याग केला तरी त्या वेळेपासून ॲबिसिनीयात इस्लामची सतत प्रगतीच होत राहिली. सोमालीलँडमधील बहुसंख्य लोक मुसलमान आहेत. इरिट्रिया व हरार प्रांतांमध्ये त्यांची संख्या जवळपास निम्मी आहे तर गॅल्लासिदामामध्ये ती अंदाजे एक तृतियांश आहे. परंतु खुद्द ॲबिसीनीयांत मात्र फक्त दहा टक्के लोक मुसलमान आहेत. पुढील काळात तेथील सर्वसामान्य जनतेने इस्लामचा स्वीकार केला याची जी कारणे सांगितली जातात त्यांपैकी एक असे की, ख्रिश्चन धर्मोपदेशक भ्रष्ट आणि अडाणी होते. ख्रिश्चन धर्मपीठाने बराचसा भूप्रदेश आपण होऊन सोडून दिल्यामुळे त्याचे उत्पन्न घटले होते व त्याला आपली धर्मादाय कामे बंद करावी लागली होती. आणखी एक कारण असे की सरकारी नोकरीतील ख्रिश्चनांचे वरिष्ठ अधिकारी मुस्लिम असत. त्यामुळे स्वाभाविकच मुस्लिम-अधिकाऱ्यांविषयी जनतेत अधिक आदरबुद्धी होती. या मुस्लिम अधिकाऱ्यांनी अनेक प्रजाजनांना इस्लामधर्मात येण्यास प्रवृत्त केले. हे मुस्लिम अधिकारी सांगत, सरकारी धर्मापेक्षा इस्लाम हा जनतेने जास्त विचार करावा असा धर्म आहे. अलिकडे कर्ती धर्मोपदेशकांच्या सहाय्याने ख्रिश्चन धर्मपीठाच्या कारभारात सुधारणा केली जात आहे. त्यामुळे कदाचित इस्लामच्या प्रगतीवर भावी काळात परिणाम होऊ शकेल. तथापि आज तरी ॲबिसीनीयात इस्लामला अनुकूलता वाढत आहे असे दिसते.

पंधराव्या शतकाच्या शेवटी शेवटी नाईल नदीच्या प्रवाहाच्या दिशेने भटके अरब लगतच्या आफ्रिकन प्रदेशात– सुदानमध्ये आले व त्यांनीच प्रथम तेथील जनतेला

इस्लामची शिकवण दिली. पश्चिम बाजूस थेट छाड सरोवरापर्यंत हे भटके अरब गेले होते. त्याचवेळी तिकडे सुलतानांच्या झांझिबार, मोंबासा, मोझांबिक या राज्यांतून आणि किनारपट्टीवरील दुसऱ्या भागांतून अरब व्यापारी विषववृत्तीय आफ्रिकन प्रदेशात घुसले. इजिप्शियन सुदानच्या उत्तर व मध्यभागीय प्रांतांतील नाईल नदी व तांबडा समुद्र यांमधील प्रदेशात राहणाऱ्या हेमिटिक भाषी आणि अधिक संपन्न अशा टोळ्यांनी इस्लामचा संपर्क आल्यानंतर अल्पावधीतच त्याचा अंगिकार केला. या हेमिटिकभाषी जमातीत अरबी भाषी जमातींप्रमाणे इस्लामी संस्कृती पसरत आहे. आणि नाईल आणि तिच्या उपनद्यांच्या प्रदेशापर्यंतही या संस्कृतीचा व अरबी भाषेचा[1] हळूहळू प्रसार होत आहे.

सहारा आणि उत्तर गिनी किनाऱ्यावरील भूप्रदेश व कामेरून या सुदानमधील पश्चिम टोकाकडील विशालप्रदेशातील जनतेला सहरामधील बर्बर दूतांच्याद्वारे इस्लामचा प्रथम परिचय झाला. मात्र त्यांना ज्या इस्लामधर्माचा परिचय झाला तो धर्म साध्या व प्राथमिक स्वरूपातला आणि खारिजिझम या मूळ इस्लाममधून वेगळ्या झालेल्या फुटीर पंथाचा होता. खुद्द बर्बरांच्यातही अकराव्या शतकापर्यंत इस्लामविषयी फारशी आस्था नव्हती. उक्बा व मूसा इब्ने नुसैर या सुरुवातीच्या काळातील मुस्लिमविजेत्यांनी जे कार्य केले ते प्रामुख्याने आपल्या आक्रमक सैन्याची सुरक्षितता सांभाळून खलिफाच्या खजिन्यात भर घालण्याच्या उद्देशानेच केले होते. या आधी सांगितल्याप्रमाणे मुस्लिम आक्रमकांना परतवून लावण्याचा बर्बरांनी अनेकदा प्रयत्न केला. आणि बर्बरांमध्ये थोडी जरी एकजूट असती तरी त्याकामी काही प्रसंगी तरी ते सहज यशस्वी झाले असते. परंतु अखेर त्या प्रदेशात मुस्लिम कायमचे राहिले आणि त्यांच्या धर्माने संपूर्ण उत्तर आफ्रिका व्यापून टाकला. भूमध्यसमुद्र व अटलांटिक महासागर जेथे एकमेकांना मिळतात त्या कोनांतील प्रदेशांत (सध्याचा मोरोक्को) राहणाऱ्या लोकांना संत आलीदच्या मुलांनी व फेझचा दुसरा इद्रिस (मृत्यु ८२८) या राजाने बऱ्याच पूर्वी इस्लामधर्मात आणले होते अशी एक आख्यायिका आहे. परंतु खरे म्हणजे पुढे बाराव्या शतकात त्या प्रदेशातील (मोरोक्कोमधील) लोकांनी इस्लाम स्वीकारला. त्या सुमारास दक्षिण व पश्चिम भागात बर्बर लोक जात-येत होते; तेथे वस्ती करून राहात होते. त्यांची संख्या स्थानिक रहिवाशांपेक्षा इतकी वाढली की त्यांच्या प्रभावामुळे उत्तर-पश्चिम सुदानच्या सहारा विभागातील जवळपास सर्वच्या सर्व तद्देशीय लोकांनी (म्हणजे निग्रोंनी) मुस्लिम आक्रमकांचा धर्म पत्करला. आज फ्रेंच सुदान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांतील मॉरिटॅनियन्स, फ्यूहल्स (फुला) व तुआरेग हे सर्व लोक इस्लाम धर्माचे आहेत. परंतु सुदानी निग्रो या अन्वर्थक नावाने अलीकडच्या काळापर्यंत ओळखले

---

१. सुदान प्रजासत्ताकाची जनसंख्या सुमारे ८० लक्ष आहे. आणि त्यापैकी बहुसंख्य मुस्लिम आहेत. दक्षिण सुदानमधील निग्रो सर्वसाधारणपणे इस्लामेतर आहेत.

जाणारे लोक गूढवादी पंथाचे होते. विभागशः विचार केला तर मॉरिटॅनिया, सेनेगल व फ्रेंच गिनी येथे मुसलमानांचे प्राबल्य आहे तर अप्पर व्होल्टा हा प्रदेश गूढवादी पंथाचा आहे. फ्रेंच वेस्ट आफ्रिकेत इस्लामची प्रगती अद्याप पूर्णांशाने झालेली नाही. आज तेथील लोकसंख्येपकी फक्त ⅓ लोक मुसलमान आहेत. परंतु तेथील मुसलमान समाज हा क्रियाशील व कर्तबगार समाज आहे. त्यामुळे प्राचीन धर्म मानणाऱ्या स्थानिक जमातीं-मधील अधिकाधिक लोकांना हे मुसलमान आपल्या धर्मात आणतील अशी लक्षणे दिसत आहेत.

नायजेरियातील इस्लामचा इतिहास १५ व्या शतकापासून सुरू होतो. हौसा संस्कृती व हौसा भाषा यांचा देश म्हणून समजल्या जाणाऱ्या नायजेरियातील उत्तर भागाचा धर्म इस्लाम आहे. उस्मान फौदी (फावदी) या कादिरी पंथातील एका माणसाच्या नेतृत्वाखाली, त्या भागातील अंतर्गत दुहीचा फायदा घेऊन फुला (किंवा फुलानी) या जमातीने १८०४ मध्ये जिहाद पुकारला आणि उत्तरेच्या बाजूने त्या देशातील मुस्लिमेतर रहिवाशांवर हल्ला चढवला. परिणामी कानो वगळता बाकीची अनेक छोटी हौसा राज्ये पूर्णपणे इस्लामी धर्मात आली. उस्मानच्या या विजयामुळे उत्तर-पश्चिमेतील अनेक हौसा राज्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. सोकोटो येथे उस्मानची कबर आहे. कादीरी पंथाचे अनुयायी ते एक पवित्र स्थान समजतात. तथापि अद्यापही त्या देशात गूढवादी पंथाचे समाज अस्तित्वात आहेत. पश्चिम आफ्रिकेतील पूर्वेकडील सर्व भागांची हौसा हीच भाषा आहे. आणि काही अंशी त्यामुळेच तेथे इस्लामचा प्रसार सुलभपणे होऊ शकला. नायजेरियाच्या उत्तर भागात विखुरलेले हौसा व फुला हे दोन्ही समाज जवळपास बव्हंशाने मुसलमान आहेत. आणि या समाजांमुळे आणि कानुरी या समाजामुळे जवळपास संपूर्ण उत्तर नायजेरिया, बर्बर आणि निग्रो यांची संमिश्र वस्ती असलेला लगतचा फ्रेंच प्रदेश आज इस्लामधर्मात दाखल झाला आहे. मात्र दक्षिण नायजेरियातील इबो लोकांत इस्लामविषयी आपुलकी निर्माण होऊ शकलेली नाही.

सिएरा लिऑनमधील मेंदे या भागाची हीच परिस्थिती आहे. तेथेही फुला लोकांचा एक गट राहतो. हे फुला लोक आणि पश्चिम आफ्रिकेच्या अन्य भागातील बांटूवंशीय मँडिगो हे दोन समाज त्या प्रदेशातील इस्लामचे प्रचारक होत. तेथील गूढवादी पंथीय लोकात इस्लाम निरंतर पसरत आहे.

आफ्रिकेतील इस्लामच्या विस्ताराची संभाव्य कारणे आणि इस्लामच्या विस्ताराची इतरत्रची कारणे यांमध्ये मूलतः फरक नाही. संस्कृति– सोपानाच्या कनिष्ठ पायरीवर असलेल्या ज्या देशात मुस्लिम गेले, तेथील लोकांना मुस्लिमांचे सांस्कृतिक, राजकीय आणि लष्करी श्रेष्ठत्व याविषयी साहजिकच आदर वाटू लागला. आणि म्हणूनच त्यांनी मुस्लिमांच्या सामाजिक व धार्मिक संस्थांचाही सहजतेने स्वीकार केला. उदाहरणार्थ,

जावाप्रमाणे आफ्रिकेतही मक्केची यात्रा करून आलेल्या हाजींविषयी लोकांना अतिशय आदर वाटतो, आणि आपणही मक्केला जावे असे तीव्रतेने वाटू लागते. जे सैनिक व व्यापारी स्थानिक स्त्रियांशी विवाह करतात ते आपल्या बायकांना व मुलांनाही इस्लामची दीक्षा देतात. लैंगिक भूक भागवण्याचे एक साधन आणि स्थानिक कुटुंबपद्धतीला अनुकूल अशी एक प्रथा या दृष्टीने इस्लामने बहुपत्नीत्वाला मान्यता दिली असल्यामुळे स्थानिक जमातींतील पुरुषही इस्लामचा स्वीकार करतात. त्याचप्रमाणे इस्लाममध्ये आलेल्या व्यक्तीला आपल्या पूर्वाश्रमीच्या जमातींशी असलेले त्याचे संबंध तोडायला इस्लाम सांगत नाही. धर्मांतरिताचा पूर्वीचा सामाजिक दर्जा इस्लाममध्ये कायम राहतो एवढेच नव्हे तर तो वाढतोच. इस्लामच्या विकासाला ही गोष्ट उपकारक ठरली. इस्लामचे आणखीही काही फायदे आहेत. त्यापैकी एक म्हणजे गुलामीपासून संरक्षण. धर्मांतरिताला इस्लाम एक नवी जीवनपद्धती देतो. ती मुळीच सोपी नाही. परंतु साधी, सरळ व स्पष्ट आहे. या जीवनपद्धतीचा स्वीकार केला की संस्कृतीच्या आदि– अवस्थेचे अविभाज्य अंग म्हणता येईल अशा अनेक अदृश्य भयांपासून माणसाची मुक्तता होते. त्याच्यामध्ये आत्मविश्वासाची व आत्माभिमानाची भावना निर्माण होते, आणि त्यातूनच त्या माणसामध्ये स्वधर्माविषयीचा एक शंकारहित अभिमान निर्माण होतो. असा अभिमान हे प्रत्येक मुसलमान व्यक्तीचे वैशिष्ट्य आहे.

□ □

प्रकरण : १

ग्रंथालय

# इस्लामी समाजव्यवस्थेतील विविध वर्ग

इस्लामचा स्वीकार केलेल्या समाजांमध्ये इस्लामने केलेल्या कार्याचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी त्या समाजांमध्ये नवधर्माचा प्रवेश होण्यापूर्वी आणि त्यानंतर प्रत्येक समाजाची सामाजिक स्थिती कशा प्रकारची होती याचा अचूक शोध घेणे जरूर आहे. या कामाच्या व्यापकपणावरून ते किती कठीण आहे ते लक्षात येईल. डब्ल्यू. रॉबर्टसन स्मिथ व इग्नाझ गोल्डझीहर यांच्यासारख्या विद्वानांनी या बाबतीत बरेच प्रारंभिक काम केले आहे. त्यांच्या या कार्यातून निघालेले निष्कर्ष या पुस्तकात मुक्तपणे आणि अनिवार्यपणे उद्धृत केले आहेत. ज्या समाजांनी इस्लामचा अंगिकार केला त्यांतील वेगवेगळ्या सामाजिक थरांमध्ये इस्लामने घडवून आणलेले बदल सूचित करणे, त्याचप्रमाणे मुहम्मदांनी चालू केलेले सामाजिक कायदेकानू व त्यांत मुहम्मदांच्या भाष्यकारांनी पुढे केलेले काही फेरबदल यांची नोंद घेणे एवढेच या ग्रंथाचे उद्दिष्ट आहे.

कायमचे वस्ती करून राहिलेले काही थोडे जनसमूह वगळता अरबस्तानातील बाकीचा सर्व समाज इतिहासज्ञात काळात अनेक जनसमूह व टोळ्या यांनी बनलेला होता. या गटांतील व टोळ्यांतील अंतर्गत ऐक्य कोणत्या तरी नेत्यावरील निष्ठेद्वारे किंवा एकाच पूर्वजांचे वंशज आहोत या खऱ्या अथवा कल्पित समजाच्या आधाराने ढिलेपणाने टिकून होते. या प्रत्येक गटातील व टोळ्यांतील व्यक्तिगत घटकांचे ( म्हणजे त्यांच्या छावण्या व कुटुंबे ) स्वातंत्र्य नेहमीच स्वाभाविक मानले जात होते. तसेच सर्व घटकांच्या प्रमुखांचा दर्जा समान आहे असे समजले जात असे. या कुटुंबप्रमुखांना आपल्या टोळीचा नेता अथवा शेख निवडण्याचा अधिकार होता. या नेत्याला तत्त्वतः तरी कोणत्याही विशिष्ट पात्रतेची आवश्यकता नसे. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र विशिष्ट कुटुंबामधील व्यक्तीच त्या पदावर निवडली गेली पाहिजे असा आग्रही पक्षपात दाखवला जात असे. मुहम्मदांचा उदय झाला त्या काळात या विशिष्ट कुटुंबांना समाजात अतिशय प्रभावशाली स्थान होते. त्यामुळे अधिकारपदावरील हक्कांच्या बाबतीत जन्माच्या मुद्द्याला अत्यधिक

महत्त्व दिले जात असे. उच्च वंशांतील असणे ही वरिष्ठ वर्गाची सर्वोच्च कसोटी मानली जाई. आणि ज्या व्यक्तीचे वंशचरित्र आनुवांशिक लांच्छनापासून संपूर्णतया मुक्त नाही– म्हणजे उदाहरणार्थ ज्याच्या वंशात गुलाम किंवा निम्नकुलोत्पन्न पूर्वज असतील अशी कोणीही व्यक्ती वरिष्ठ वर्गासाठी लायक समजली जात नसे. असे (आनुवांशिक लांच्छन असलेले) लोक समाजातील कनिष्ठ वर्गात ढकलले जात. त्यामुळे स्वाभाविकपणेच त्यांना हलक्या प्रतीचे जीवनव्यवसाय करणे भाग पडे आणि परिणामान्ती त्यांना समाजात हीन गणले जाई.

जन्मावर आधारलेली टोळ्यांची सामंतशाहीसारखी कल्पना इस्लामच्या उदयानंतरही दृढपणे प्रचलित होती आणि त्यानंतरही तिचे प्राबल्य कायम होते. चौदाव्या शतकातील एक तत्त्वज्ञ इतिहासकार इब्ने खाल्दून याने इतिहासातील उदाहरणांच्या आधाराने असा सर्वसाधारण निष्कर्ष काढला आहे, की ज्या टोळ्यांमध्ये प्रबळ संघजाणीव आहे अशा टोळ्यांतील ज्या माणसाला आपण टोळीमधील एखाद्या श्रेष्ठ वंशातील आहोत असे अभिमानाने सांगता येणार नाही त्याला त्या टोळीतील अधिकारपद कधीही मिळणार नाही. त्यामुळेच मुहम्मद पैगंबरांनी आपली नवी ईश्वरप्रणीत धर्मव्यवस्था प्रथम घोषित केली तेव्हा पैगंबरांचा हलक्या कुटुंबातील जन्म आणि त्यांचा उंट हाकण्याचा हलका व्यवसाय याची त्यांच्या यशोमार्गात तीव्र अडचण उद्भवली. वास्तविक मुहम्मद पैगंबर हे त्यांच्या कुरेशी जमातीचे अस्सल घटक होते. बहुतांशाने समाजातील कनिष्ठ घटक असलेल्या आपल्या अत्यल्प अनुयायांना, (इस्लाम न मानणाऱ्या) नास्तिकांपेक्षा अधिक वरचे स्थान जरी नाही तरी त्यांच्या बरोबरीचे स्थान नवा धर्म मिळवून देणार आहे हे पटवून देण्याचे कठीण काम मुहम्मदांना प्रथम करायचे होते. सामंतवर्गाप्रमाणेच इस्लाम न मानणाऱ्या नास्तिकांची त्या काळी समाजाला दहशत वाटत होती. तरीदेखील त्या काळी सामंतवर्गाचे स्थान अधिक मजबूत होते. कारण त्या वर्गाच्या पाठीशी दृढमूल रूढी व परंपरा यांचे सर्व सामर्थ्य उभे होते.

पैगंबरांनी पेटवलेली धर्मज्वाला अखेर जुन्या जमान्यातील प्रमुखांचे वर्चस्व नष्ट करण्यात यशस्वी झाली. इब्ने खाल्दुनने महम्मुदी धर्माच्या नंतरच्या इतिहासाचा आधार घेऊन पुढे असा मुद्दा मांडला आहे की, कोणी तरी प्रेषिताने किंवा संताने बदवी अरबांची मने धर्मप्रसाराच्या उत्साहाने भारून टाकल्याशिवाय बदवींचे साम्राज्य प्रस्थापित होणे शक्य नव्हते. मुहम्मद हा प्रेषित व नेता म्हणून पुढे आला होता. त्यांनी स्वतःच केलेल्या दाव्याप्रमाणे ते शेवटचे व सर्वश्रेष्ठ प्रेषित होते. आपल्या काही अरब बांधवांना आपला दावा मानावयास मुहम्मद पैगंबर राजी करू शकले तरी आपल्याच जमातीमधील ज्या जुन्या वरिष्ठ वर्गाच्या वर्चस्वाला त्यांच्यामुळे उघड भीती निर्माण झाली होती त्या वर्गाने मुहम्मदांचे प्रेषितपद मानावयास दीर्घकाळपर्यंत नकार दिला. एवढेच नव्हे तर इस्लामचा प्रभाव प्रस्थापित झाला आणि कुरेशी सरदारांकडून मक्का

जिंकून घेण्याइतके सामर्थ्य मुहम्मदांना प्राप्त झाले तेव्हादेखील जुन्या वरिष्ठ वर्गाचा विरोध चालू होता. " जन्माला काहीही महत्त्व नाही; धर्मासंबंधी कोणाला किती आस्था आहे हाच प्रतिष्ठेचा खरा निकष आहे. "– हा जो निश्चित असा दैवी साक्षात्कार मुहम्मदांना झाला तो त्यानंतरच.– " जनहो, तुम्हांला मी खरोखर स्त्री व पुरुष यांच्या संबंधांतून निर्माण केले आहे. तुमच्यापैकी जो सर्वांत धर्मशील तोच परमेश्वराच्यालेखी खरोखर सर्वाधिक श्रेष्ठ " असे कुराणाच्या ४९[१३] या सुरामध्ये सांगितले आहे. अलीकडील टीकाकारांच्या मते पैगंबरांना[१] हा साक्षात्कार त्यांच्या जीवनाच्या बऱ्याच नंतरच्या काळात झाला असावा. तथापि प्रारंभापासून त्यांच्या विचाराचे प्रधान तत्त्व काय असले पाहिजे हे या वचनातून ध्वनित होते. या वचनासंबंधी तेराव्या शतकातील टीकाकार बेदावी याने जे स्पष्टीकरण केले आहे ते बहुतांश मुस्लिमांच्या याविषयीच्या मताचे द्योतक आहे : " तुमच्यापैकी प्रत्येकास आई व बाप यांच्या सहाय्याने आम्ही निर्माण केले आहे. या बाबतीत सर्वजण समान आहेत. म्हणून आपल्या पूर्वजांची बढाई मारण्याचे कारण नाही. ( कुलपरंपरेत मोठेपणा आहे असा जुन्या अरबांचा दृष्टिकोण होता. ) धर्मावरील श्रद्धेद्वारेच माणसाला पूर्णत्व प्राप्त होत असते. धर्मश्रद्धेच्या बाबतीत माणसांनी एकमेकांशी स्पर्धा करावी आणि ज्याला मोठेपणा हवा असेल तो त्याने धर्मश्रद्धेत मिळवावा. "

कुलाभिमानासारखी समाजसंघटनेमधील असपर्श व नाजुक प्रवृत्ती धर्माज्ञेद्वारे एका फटकाऱ्याने नाहीशी होणार नव्हती. अरब समाजात समानता प्रस्थापित करण्याच्या मुहम्मदांच्या कल्पनेलासुद्धा उग्र लढा दिल्यावरच जुन्या व्यवस्थेच्या प्रतिनिधींनी मान्यता दिली. मुहम्मदांनी समानतेचा पुकारा केला त्या वेळी त्यांनाही अरब-अरबांतील समानतेपेक्षा अधिक व्यापक कल्पना अभिप्रेत असणे फारसे संभवनीय नव्हते. ' किताब अल-अघानी ' या नावाचा प्राचीन इस्लामी आख्यायिकांचा एक मोठा संग्रह आहे. त्यांत एक कथा सांगितली आहे. जुन्या व नव्या दृष्टिकोणांचा त्या कथेद्वारे अचूक परिचय होतो.

घासानचा राजा जाबाला इब्ने अल्-ऐहाम हा एकदा मक्केच्या यात्रेला चालला होता. वाटेत हाजचे विधी करण्यासाठी जमलेल्या यात्रेकरूंमधील एका अरब टोळी-वाल्याचा पाय राजाच्या झग्यावर पडला. तेव्हा राजाने त्या बदवीच्या एक तोंडात भडकावली. तेव्हा त्या बदवीने खलिफाकडे तक्रार गुदरली. खलिफाने राजाला बोलावले आणि सांगितले, " तू ज्याला मारलेस त्याला मी उलट तुझ्याही थोबाडीत मारायला परवानगी देणार आहे. "

---

१. तबरीचे असे म्हणणे आहे की, मुहम्मदांनी मक्केमधील काबा मंदिरात प्रवेश केला त्या वेळी म्हणजे हिजरी सन ८ । इ. स. ६३० मध्ये हे वचन कथन केले. यावरून पैगंबरांना या वचनाचा ' साक्षात्कार ' त्याआधी झाला असावा असे सूचित होते.

"ते कसे शक्य आहे ?" आश्चर्यचकित होऊन त्या घासानीने विचारले, "तो तर सामान्य माणूस आहे आणि मी एक राजा आहे."

उमरने उत्तर दिले, "इस्लामने तुला त्याच्यासारखेच केले आहे. धर्मश्रद्धा व सत्कर्म सोडून बाकीच्या कोणत्याही बाबतीत तुला त्याच्यावर श्रेष्ठता मिळवता येणार नाही."

त्यावर राजा म्हणाला, "जाहिलिया (मुहम्मदपूर्व रानटी युगाला इस्लामने दिलेले नाव) मध्ये होता त्यापेक्षाही माझा इस्लाममधील दर्जा अधिक उच्च असेल असे मला वाटले."

त्यावर उमर म्हणाला, "आता ती कल्पना तू तुझ्या डोक्यातून काढून टाक.[१]"

त्यानंतरच्या काळात समतेच्या तत्त्वाच्या पुष्ट्यर्थ हदिसची (पैगंबरांची म्हणून सांगितली जाणारी वचने) रचना करण्यात आली. "इस्लाम वंशपरंपरा वगैरे मानीत नाही" हे असेच एक प्रसिद्ध हदिस आहे. वंशावरून स्पर्धा करणे व पूर्वजांविषयी शेखी मिरवणे अन्य हदिसांद्वारे निषिद्ध मानण्यात आले. तथापि पैगंबरांची स्वतःची काहीही इच्छा असली आणि विद्वान अधिकारी पुरुषांचे काहीही मत असले तरी जन्माधिष्ठित श्रेष्ठतेचा दावा जोरदारपणे केला जातच होता. परिणामी समानतेच्या कल्पनेतील तीव्रता कमी होऊन ती तत्त्वापुरती राहिली. आनुवंशिक श्रेष्ठत्वाच्या कल्पनेविषयी असलेला आदर नष्ट तर झालाच नाही. उलट खुद्द पैगंबरांना प्राप्त झालेल्या यशामुळे ज्यांच्या मनात जन्माधिष्ठित श्रेष्ठत्वाविषयी प्रथमपासून प्रखर आदरभावना होती अशा लोकांसाठी आदराचे एक नवेच आकर्षणकेंद्र निर्माण झाले. पैगंबरांशी रक्तसंबंधांचे नाते असणे हा नंतरच्या काळात अस्सल उच्च कुलीनत्वाचा निकष समजला जाऊ लागला. एवढेच नव्हे तर मुहम्मदांच्या कुरेशी टोळीमधील एक या नात्याने एखाद्या व्यक्तीला मुहम्मदांशी जो थोडासा नातेसंबंध दाखवता येत असे तोदेखील श्रेष्ठ दर्जाच्या प्रतिष्ठेची सनद समजली जात असे. कुरेशी जमातीमधील माणूस दुसऱ्या जमातीमधील महत्त्वाच्या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ प्रतिष्ठापदासाठी पात्र ठरत असे. एवढेच नव्हे तर कुरेशींनी आपल्या जमातीमध्ये

---

१. सर्व मुस्लिम समान आहेत या तत्त्वाचे खलिफा उमरने श्रद्धापूर्वक आचरण केले अशी त्याची ख्याती आहे. परंपरागत कथनानुसार उमर जाडेभरडे कपडे वापरत असे आणि विणलेल्या सपाता घालून रस्त्यातून पायी हिंडत असे. तसेच कधीही घोड्यावर बसत नसे. आपल्या प्रजाजनांपैकी अगदी हलक्यांतल्या हलक्या लोकांशी सामान्यजनांच्या भाषेत बोलत असे. इस्लाममध्ये जिंकून न आणलेल्या प्रदेशावर छापे घालून मिळवलेल्या लुटीत सर्व मुस्लिमांना पूर्वीच्या काळी समान वाटा मिळत होता. एकदा त्याच्या प्रजाजनांपैकी एकाने त्याच्यावर लुटीचा जास्त वाटा त्याने घेतला असा आरोप केला तेव्हा त्या माणसाचा आरोप खोटा आहे हे त्याला सिद्ध करावे लागले.

घेतलेली परकी जमातीतली व्यक्ती ( देई ) देखील जुन्या शेख घराण्यातील व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची मानली जात होती. म्हणूनच पैगंबरांच्या जमातीमधील कोणतीही स्त्री गुलाम असू शकत नाही असे म्हटले जाऊ लागले यात आश्चर्य नाही. अर्थातच मग पैगंबरांच्या कुरेशी जमातीमधील कोणी पुरुष गुलाम समजले जाणे शक्यच नव्हते.

प्रारंभीच्या काळातील मुसलमानांमध्ये समतेच्या तत्त्वाचा कसा आचार होत असे हे दाखवण्यासाठी इतिहासकार अबू बकर याचा दाखला देत असतात. अबू बकर हा पैगंबरांचा पहिला उत्तराधिकारी. युद्धामध्ये मिळालेली सर्व लूट अबू बकर सर्व मुसलमानांना– तरुण किंवा वृद्ध, गुलाम अथवा स्वतंत्र, स्त्री किंवा पुरुष असा भेद न करता सारखी वाटून देत असे. अबू बकर याच्यानंतरचा खलिफा उमर हा, सर्व जन्ममूलक भेद इस्लामने एका पातळीवर आणले, असे आग्रहपूर्वक म्हणत असला तरी धर्माच्या बाबतीत सर्व मुसलमान समान आहेत हे तत्त्व काही तो मान्य करावयास तयार नसे. युद्धातील लुटीची वाटणी करताना फार पूर्वीपासून मुसलमान असलेल्यांना तो अग्रक्रम देई. तो म्हणत असे, " पैगंबरांविरुद्ध जो लढला त्याला मी पैगंबरांच्या खांद्याला खांदा देऊन लढणाऱ्याच्या बरोबरीचे स्थान देणार नाही. " मुहम्मदांशी सर्वांत अगोदर जे संबंधित होते, त्यांच्यापासून अबू बकरने लूट वाटावयास प्रारंभ केला. पैगंबरांबरोबर मदिनेला गेलेले त्यांचे सह-निर्वासित मुहाजिर आणि मदिना येथील त्यांचे सहाय्यक अन्सार ( मुहाजिर व अन्सार दोघेही पैगंबरांबरोबर बद्रच्या लढाईत लढले होते. ) या दोघांना अबू बकरने लुटीतील संपत्तीपैकी प्रत्येकी ५००० दिरहाम दिले. पैगंबरांबरोबर जे बद्र येथे लढले नव्हते त्यांना ४००० दिरहाम मिळाले. त्यांच्या मुलांना प्रत्येकी २००० व बायकांना प्रत्येकी २०० ते ६००, मक्कावासीयांना ८०० आणि इतर मुसलमानांना ३०० ते ५०० इतके दिरहाम मिळाले. या रकमांना तसे महत्त्व नाही. तथापि मुसलमान, मुसलमान–मुसलमानांत कोणत्या प्रकारे भेद करू लागले होते त्याचे या रकमा निदर्शक आहे.

अरबस्तानाबाहेरील जनसमूह इस्लाममध्ये येऊ लागताच सामान्य दर्जाचा पण शुद्ध रक्ताचा आणि स्वतंत्र बदवी टोळीवाला ( सारीह ) देखील स्वाभाविकच नव्याने इस्लाममध्ये आलेल्या बाहेरच्या परकी लोकांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजू लागला. खरे तर बाहेरून आलेले जनसमूह व अरबस्तानातील जनसमूह एकाच इस्लाम धर्माचे होते. आणि " ( इस्लामवर ) श्रद्धा असलेले सर्व भाऊ भाऊ होत "– या वचनाप्रमाणे[1] सर्व तऱ्हेची सामाजिक व वंशासंबंधीची विषमता नष्ट व्हावयास हवी होती. विभिन्न टोळ्यांतील सर्व हेवेदावे थांबायला हवे होते. तथापि इतर अरबांच्या समानतेच्या दाव्याला ज्याप्रमाणे अरब समाजातील जुन्या वरिष्ठ वर्गाने विरोध केला त्याचप्रमाणे अरबस्ताना-

---

१. कुराण ४९[१०]

तील तमाम अरब समाज आता नव्याने इस्लाममध्ये आलेल्या परकीयांना आपल्या बरोबरीचे मानण्यास नकार देऊ लागला. तथापि इस्लाम धर्मीयांतील विविध व विविधवर्णीय[1] माणसे ईश्वरानेच निर्माण केली आहेत या गोष्टीवर कुराणाने भर दिला आहे. त्यामुळे अरबस्तानात परंपरेने हीन म्हणून समजले जाणारे निग्रो व इतर जमाती यांच्यासह कोणत्याही मुस्लिम जमातीला आपण दुसऱ्या कोणत्याही मुस्लिम जमातीच्या बरोबरीचे आहोत असे आपोआपच समजता येऊ लागले.

पैगंबरांच्या मृत्यूनंतर तीन शतके हा अंतर्गत समानतेचा संघर्ष चालला होता. एका बाजूला अरब व दुसऱ्या बाजूला बिगर-अरब वंशाचे नवे मुसलमान म्हणजेच "मवाली"[2] किंवा आश्रित. एका टोळीतील सदस्याला किंवा कधी कधी अरबेतर परकी इसमालादेखील काही काळ त्याच्या वर्तणुकीची पारख केल्यानंतर दुसऱ्या टोळीत घेतले जात असे; आणि अशा इसमाला त्या टोळीतील इतर सदस्यांच्या बरोबरीचे अधिकार व सवलती[3] दिल्या जात. अशा माणसाला मौला ही संज्ञा होती. पुढे इस्लामच्या आधिपत्याखालील प्रदेशांचा विस्तार झाल्यानंतर अरबस्तानाबाहेरील जित प्रदेशांतील धर्मांतरित रहिवासीही 'मवाली' या नावाने ओळखले जाऊ लागले. बंदीतून अथवा युद्धातून किंवा गुलामीतून मुक्त झाल्यावर या धर्मांतरितांना विजेत्या टोळ्यांपैकी एखाद्या टोळीत घेतले जात असे. तथापि त्यांच्या आश्रयदात्यांचा त्यांच्यावरील अधिकार कायम राही. आणि शांततेच्या आणि युद्धाच्या[4] काळात त्यांना त्यांच्या आश्रयदात्यांच्या नोकरा-चाकरांच्या लवाजम्यात राहून काम करावे लागे. त्या मोबदल्यात त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली जाई. परंतु नेहमीच असे होत असे असे नाही. कारण लष्करी शासनाधिकारी 'मवालीं'शी कठोरपणे वागत. एका टोळीतले आपले आश्रितपद सोडून दुसऱ्या टोळीत आश्रित म्हणून जाण्याचा किरकोळ अधिकारदेखील लष्करी शासक 'मवालीं'ना द्यावयास बहुधा तयार नसत. हज्जाज इब्ने युसुफ या इराकच्या रक्तपिपासू पण कर्तृत्ववान सुभेदाराने आणि त्याचा खुरासान आणि ट्रान्सोक्सिआनातील दुय्यम अधिकारी कुनायब इब्ने मुस्लिम याने 'मवालीं'वर जिझिया किंवा डोईकर बसवला होता. खरे तर मुस्लिमेतरांवरच हा कर बसवला जात असे. इराक प्रांतातील नागरिकांनी या कराविरुद्ध उठाव केला तेव्हा हज्जाजने त्यांना त्यांच्या गावांतून हाकलून लावले; दुसऱ्या

---

१. कुराण ३०[२१].

२. या शब्दाचे एकवचन 'मौला' असे आहे.

३. कधी कधी याला अपवाद केले जात. उदाहरणार्थ टोळीत प्रवेश मिळालेल्या परकी इसमासाठी घ्यावयाचा रक्ताचा बदला टोळीतील मूळ माणसाच्या निम्म्याने असे.

४. मुक्तता केलेल्या आणि त्यानंतर आपल्या भूतपूर्व धन्याचे 'आश्रित' झालेल्या गुलामांचा मवालींमध्ये आणखी एक वर्ग होता. त्यांचा याच्याशी संबंध नाही.

खेडेगावांत डांबून ठेवले व रानटी म्हणून घोषित केले; आणि प्रत्येक मौलाने आपल्या हातावर आपल्या खेडेगावचे नाव नोंदले पाहिजे असेही फर्मान काढले. विजेत्या सेनेतील कोणाही मुसलमानाला आक्रमित प्रदेशांतील जमीन व घरे संपादन करता येणार नाहीत हा उमरने केलेला कायदा बदललेल्या परिस्थितीमुळे रद्द करण्यात आला तेव्हा तर मवालींवर त्याहीपेक्षा मोठा अन्याय झाला. कारण अरबांना थोडासा 'जकात' नावाचा प्राप्तिकर देऊन आपली सुटका करून घेता आली, परंतु बिगर अरब 'मवालीं'वर मात्र 'खिराज' नावाचा भूमिकर लादण्यात आला. जिझिया कर देऊन शिवाय हा कर त्यांना द्यावा लागे. हा कर जमिनीच्या उत्पन्नाच्या सुमारे एकपंचमांशाइतका असावा.

तथापि या 'आश्रितां'ना अरब समाज तिरस्कारपूर्ण भावनेने वागवीत असल्यामुळे जेवढी इजा त्यांच्या स्वाभिमानाला पोचली तेवढी अरबांनी त्यांच्यावर लादलेल्या करामुळे पोचली नसेल. इस्लामच्या प्रारंभीच्या काळात ज्या ठिकाणी लष्कराचे तळ पडले तेथे शहरे निर्माण झाली. या शहरांमध्ये कोणीही अरब, मौलाबरोबर रस्त्यातून फिरताना कधी दिसत नसे. एखाद्या अरबाचे कोणा मौलाशी काही काम असले तर तो त्याला त्याच्या संक्षिप्त अथवा साध्या नावाने किंवा त्याच्या 'लकाब'ने म्हणजे व्यावसायिक अथवा टोपणनावाने हाक मारी. उलट आपल्या बाबतीत मात्र मौलाने 'कुन्या' या पितृप्राप्त आदरपूर्ण 'किताबा'चा उपयोग केला पाहिजे असा अरबाचा आग्रह असे. उदाहरणार्थ, 'अबु फलाणाफलाणा' किंवा 'इब्ने फलाणाफलाणा.'[1] सण-समारंभाच्या निमित्ताने लोक एकत्र जमत त्या वेळी 'आश्रितां'ना अगदी शेवटच्या व कनिष्ठ जागी बसवले जात[2] असे. निदान युफ्रेतिस नदीकाठी असलेल्या खुफा या गावी तरी 'आश्रितां'ची स्वतःची वेगळी मशीद होती. तसेच खुरासानमध्ये त्यांचे स्वतःचे वेगळे असे शासन होते; सामुदायिक पद्धतीची रीतसर जीवनपद्धती अस्तित्वात होती. उमय्या

---

१. एके काळी दक्षिण अमेरिकन राज्यांतील निग्रोंना दिल्या जाणाऱ्या अशाच प्रकारच्या वर्तणुकीशी याची तुलना करता येईल. गोऱ्या व काळ्या लोकांना घेऊन जाणाऱ्या सार्वजनिक वाहनांमध्ये काळ्या लोकांना वेगळ्या दालनात बसवले जात असे. गोरे नागरिक काळ्या लोकांना त्यांच्या पहिल्या नावाने संबोधीत. शिष्टाचाराचे निदर्शक म्हणून सामान्यपणे ज्या विशिष्ट नावांचा किंवा संज्ञांचा उपयोग केला जातो तसा तो काळ्यांच्या बाबतीत गोरे करीत नसत.

२. मसूदी याच्या 'मुरुज अल् धहाब' या काव्यसंग्रहातील पुढील अर्थाच्या द्विपंक्तीत मौलाच्या दर्जाविषयी स्पष्ट शब्दांत वर्णन केले आहे : "ज्याला लांच्छनास्पद, लज्जास्पद व निंदनीय कोठे आहे ते पाहावयाचे असेल त्याला ते सर्व 'मवालीं'मध्ये एकत्र (नखशिखान्त) पाहावयास मिळेल."

राजवटीत इस्लामसाठी झालेल्या युद्धांत 'आश्रित' लोक लढले होते तरी त्यांच्यापैकी अनेकजणांना हक्काने मिळणारा लुटीतला हिस्सा देण्यात आला नव्हता.

'आश्रितां'पैकी सर्वांत अगोदरचे व अत्यंत महत्त्वाचे आश्रित म्हणजे इराणी. त्यांच्यात अनेक विद्वान व संस्कृतिसंपन्न लोक होते. नव्या धर्माविषयी ते गंभीर होते. त्यामुळे इस्लामची तत्त्वे आणि परंपरा यांच्याविषयीच्या ज्ञानात त्यांनी नैपुण्य संपादन केले. लवकरच इस्लामी धर्मशास्त्र व इस्लामी न्यायशास्त्र यांतील अत्यंत विद्वान पंडित म्हणून इराणी, तुर्की इत्यादी अरबेतर मुस्लिम प्रसिद्धीस आले. किंबहुना खरे म्हणजे ही शास्त्रे जवळपास संपूर्णतया अरबेतर पंडितांच्याच हाती होती. इब्ने खाल्दुन या इतिहासकार दार्शनिकाने या संदर्भात असे म्हटले आहे की, इस्लामी साम्राज्यातील मोठ्या शहरांत कायदाशास्त्राचा व धर्मविचाराचा विकास झाला, आणि या शहरांमधील प्रमुख रहिवासी, संस्कृतीशी दीर्घकाल परिचित असलेले लोक इराणी असल्यामुळे स्वाभाविकच इस्लामधर्माच्या विद्याशाखांतील सर्वांत अगोदरचे आणि सर्वांत श्रेष्ठ अध्यापक इराणीच होते. परंतु आक्रमक अरब सेनेतील विभिन्न टोळ्यांचे प्रमुख मात्र आपल्या परंपरेला धरून जित जमातींना हलक्या दर्जाचे लेखीत, आणि विद्या व शास्त्रे वगैरे हीन लोकांसाठीच आहेत असे समजत. ज्यांना या गोष्टीचे महत्त्व वाटे ते तर इराण्यांची विद्वत्ता किंवा अरब साहित्यातील त्यांचे कौशल्य मानावयासही तयार नव्हते. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, अरबी व्याकरणशास्त्राचे श्रेष्ठ संशोधक, विद्वान कुराणावर परिश्रमपूर्वक टीकाग्रंथ लिहिणारे टीकाकार आणि अरबी काव्याचे बरेचसे संग्रहकर्ते हे सर्व इराणवंशीयच होते.

आपल्या या उवडउखड प्रतिकूल परिस्थितीतून आपले नशीब काढण्यासाठी अरबेतर मुस्लिम मवालींनी सरळसरळ फसवणुकीचा मार्ग स्वीकारला. त्यांच्यापैकी ज्यांच्यामध्ये कमी धैर्य होते त्यांनी आपली इराणी नावे बदलून अरबी नावे धारण केली. एवढेच नव्हे, तर त्यांनी त्यासाठी खोट्या अरब वंशावळ्या तयार केल्या. ही लबाडी उघडकीला येई तेव्हा ती करणाऱ्याचा कटू उपहास केला जाई. परंतु तरीदेखील हा प्रकार चालूच राहिला. इस्लामी इतिहासाच्या तुलनेने बऱ्याच नंतरच्या काळातदेखील मुस्लिम जगतात आपली प्रतिष्ठा वाढावी यासाठी जमातीच्या जमाती अरबस्तानातील अरबांशी आपला रक्तसंबंध असल्याचा दावा करीत असत, आणि कोठल्या तरी अरब कुलपरंपरेशी स्वतःचा संबंध जोडीत. एकेकाळी कुर्द, बर्बर इतकेच नव्हे तर आफ्रिकेतील निग्रो– उदाहरणार्थ बोर्नू व फुला– यांनादेखील आपणाला किंवा आपल्या राजांना अरबवंशीय मानले जावे असे वाटत असे. इराण्यांनी आपली राष्ट्रीय अस्मिता काहीशा निराळ्या मार्गाने सुरक्षित ठेवली. त्यांनी असा दावा केला की, इराणचा शेवटचा ससानि राजा तिसरा यज्दगर्द याची मुलगी साहराबानू हिचा तर खुद्द पैगंबरांचा नातु हुसेन याच्याशी विवाह झाला होता.

शुद्ध अरबवंशीय उमय्यांची राजवट चालू होती तोपर्यंत मवालींना, प्राप्त हीन अवस्थेत दिवस काढण्याशिवाय गत्यंतर नव्हते. हे खरे की, दुसरा उमर (७१७-२०) या खलिफाने आपल्यातील सद्‌धर्मश्रद्धेच्या प्रेरणेमुळे कुराणातील प्राणतत्त्वे प्रत्यक्ष अमलात आणण्याचा प्रयत्न केला आणि खूप विरोध झाला तरी त्याने दोन मवालींची कैरो येथे काजी म्हणून नेमणूक केली. त्याबद्दल त्याच्यावर अतिशय टीका झाली. पुढे आठव्या शतकाच्या मध्यास अब्बासी खिलाफतीचा उदय होऊन इराण्यांचा राजकीय प्रभाव बळकट होईपर्यंत 'आश्रितां'च्या दर्जात कोणतीही स्थायी स्वरूपाची सुधारणा झाली नाही. अशा रीतीने अरबेतर मुस्लिमांना राजकीय महत्त्व प्राप्त झाले तेव्हाच त्यांच्यातून आलेले त्यांचे पुरस्कर्ते सक्रिय होऊ लागले. आपल्याजवळच्या वाङ्‌मयीन साधनांच्या सहाय्याने त्यांनी, सर्व इस्लामधर्मीय समान आहेत, हे तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारात आणले पाहिजे असा आग्रह धरला. आणि अशी मागणी केली की, अरबवंशीयांनी खाजगी व सार्वजनिक जीवनात सर्व मुस्लिम भाऊ-भाऊ आहेत, मग ते कोणत्याही वंशाचे असोत, या तत्त्वाला मान्यता दिली पाहिजे. त्यानुसार मग समतेविषयीच्या कुराणामधील सुरांच्या पुष्ट्यर्थ विभिन्न हदिसे रचण्यात आली आणि पैगंबरांच्या[१] तोंडी तत्संबंधीची विधाने घालण्यात आली. तसेच समतेसंबंधीच्या पैगंबरांच्या मतांची अभिव्यक्ती समाविष्ट करून जुन्या परंपरांत सुधारणा करण्यात आली. आपल्या मक्केच्या 'निरोपाच्या यात्रे'च्या प्रसंगी मुहम्मदांनी जे प्रसिद्ध भाषण केले असे सांगितले जाते ते भाषण 'मवालीं'च्या प्रचाराच्या संदर्भात अगोदरच्या साहित्यात कशी सुधारणा करण्यात आली याचे एक उदाहरण म्हणून सांगता येईल. पैगंबरांच्या बहुतेक सर्व चरित्रांत या भाषणाचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील अनुवाद आढळतो. याकुबी या नवव्या शतकातील इतिहासकाराने लिहिलेल्या चरित्रात पुढीलप्रमाणे एक परिच्छेद आहे : "इस्लाममध्ये (सर्व) माणसे समान आहेत. आदम व इव्हने ज्या पृथ्वीची संवृद्धी केली त्या पृथ्वीच्या बाह्यसीमा म्हणजे मनुष्य. एक ईश्वराविषयीचे भय सोडले तर अन्य कोणत्याही बाबतीत परकी (आजमी) मुस्लिमापेक्षा अरब श्रेष्ठ नाही किंवा परकी मुस्लिम अरबापेक्षा श्रेष्ठ नाही. ...माझ्यासमोर तुमच्या वंशावळ्या आणू नका, तर तुमची (सत्) कर्मे आणा." याकुबीच्या अगोदर पन्नास वर्षे किंवा त्याहि-आधी होऊन गेलेल्या इब्ने हिशाम व वाकिदी या चरित्रकारांनी दिलेल्या पैगंबरांच्या भाषणाच्या अनुवादात हा परिच्छेद नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

मवालींच्या पुरस्कर्त्यांच्या प्रयत्नांना अपेक्षित दिशेने काहीसे यश येत होते यात संशय नाही. परंतु अरब मुस्लिम बांधवांच्या बरोबरीचे स्थान बिगर अरब मुसलमानांना प्राप्त करून देण्यात खरे सहाय्य झाले ते खलिफा मामुनच्या राजवटीमध्ये राजधानीत मोठ्या संख्येने राहावयास आलेल्या इराण्यांना राजकीय सत्ता मिळाली तेव्हा. समानतेच्या

१. कुराण ४९ १०, १३.

पुरस्कर्त्यांच्या प्रयत्नात खुद्द मवालींमधील निग्रो वर्गामुळे विशेष प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्या. या निग्रोंचे पूर्वज, इतकेच नव्हे तर कधी कधी खुद्द ते स्वतः आफ्रिकेतून अरबस्तानात आलेले गुलाम होते. इस्लामधर्मीयांमधील विविध भाषा आणि वर्ण हे स्वतः ईश्वरानेच निर्मिलेले आहेत असे कुराणात स्पष्टपणे सांगितले आहे, याची सर्वांना जाणीव होती. म्हणून तर्काला पटले म्हणून नव्हे तर धर्मावरील श्रद्धेपोटी तरी निग्रोंना-देखील आपण इतर मुसलमानांच्या बरोबरीचे आहोत असे समजण्याचा अधिकार देणे जरूर होते. आपल्याच रक्ताच्या व वर्णाच्या स्वतंत्र अरबांनादेखील जी परंपरा समतेने वागवावयास तयार नव्हती अशा एका जुन्या परंपरेत जे अरब वाढले होते असे अरब परकी आणि त्यांच्या दृष्टीने निश्चितच हलक्या दर्जाच्या निग्रो समाजाला आपल्या बरोबरीचे स्थान द्यावयास जास्तच नाखुष होते. आणि स्वतः निग्रो, मुस्लिम असला तरी कोणत्याही विशेष अधिकारांची मागणी करीत नव्हता. ती करावी अशी त्याची परि-स्थितीही फारशी नव्हती. किताब-अल् अघानी या ग्रंथातील इब्ने मुसाज्जिद या निग्रो-विषयींच्या एका कथेवरून ही गोष्ट चांगल्या रीतीने स्पष्ट होते.

अरबस्थानातील एका जुन्या मूर्तिपूजक उच्च कुलाचे वंशज व प्रतिनिधी असलेल्या उमय्या खलिफांच्या राज्यांत हा निग्रो राहात होता. मक्केमधील तो एक प्रख्यात कवी व गायक होता. कुरेशी तरुणांना भ्रष्ट करण्याच्या आरोपाखाली इब्न झुबेर या सुभेदाराने त्याला हद्दपार केले. तेव्हा तो निग्रो दमास्कसला पळाला. तेथे एका मशिदीत तरुणांचा एक गट चर्चा करीत असल्याचे त्याने पाहिले. काय करावे, कोठे जावे या काळजीत तो होता. त्यामुळे तो त्या तरुणांना म्हणाला, " उदार मनाच्या तरुणांनो, हिझाझहून तुमच्याकडे एक पाहुणा आला आहे. तुमच्यापैकी कोणी त्याचा पाहुणचार करील काय ? "

तशी ते तरुण एकमेकांकडे पाहू लागले, का-कू करू लागले. कारण त्याच वेळी ते एका गायिकेला भेटायला जाणार होते. परंतु त्यांच्यापैकी एका तरुणाने त्या निग्रो कवीचे आतिथ्य करण्याची तयारी दाखविली आणि आपल्या हातून घडलेला असभ्यपणा सुधारला. तो आपल्या मित्रांना म्हणाला, " तुम्ही जा. मी माझ्या पाहुण्याबरोबर जातो."

त्यावर मित्र म्हणाले, " नको. तूही आमच्याबरोबर चल; आणि तुझ्या पाहुण्या-लाही येऊ दे. " मग सर्वजण बरोबर गेले.

दुपारचे जेवण आले, तेव्हा इब्ने मुसाज्जिद म्हणाला, " मी निग्रो आहे. तुमच्या-पैकी एखाद्याला कदाचित माझा राग येईल म्हणून मी दूर बसून जेवतो, " असे म्हणून तो उठला तेव्हा बाकीचे तरुण शरमिंदे झाले.

गाणारी मुलगी व तिचे मित्र आले तेव्हा त्या निग्रोने एक स्वागतपर गीत म्हटले. हा उद्धटपणा आहे असे त्या मुलीला वाटून ती संतापली, आणि ओरडली, " याच्यासारख्या निग्रोला माझ्यावरची कविता म्हणण्याचा अधिकार आहे काय ? "

तेव्हा सर्वजण त्या निग्रोकडे रागाने पाहू लागले. परंतु त्यांच्या रागाचा निग्रो तरुणावर काहीच परिणाम झाला नाही; आणि नंतर दुसरी मुलगी आली व गायली तेव्हाही त्याने तिची वाहवा केली.

या वेळी त्याचा हा उद्धटपणा पाहून त्या मुलीचा मालक संतापला व ओरडला; "याच्यासारख्या निग्रोने माझ्या गुलाम मुलीची अशी वाहवा करण्याची हिम्मत करावी काय?" उगीच शांतताभंग व्हावयास नको म्हणून ज्या तरुणाने प्रथम निग्रो कवीचे आतिथ्य करण्याची तयारी दर्शविली त्यानेच निग्रोने आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी जावे असे सुचविले. परंतु असे सांगणे उगीचच असभ्यपणाचे होईल असे इतर तरुणांना वाटले. अखेर निग्रोला तेथे बसण्याची परवानगी देण्यात आली; मात्र त्याने नीट वागावे असे त्याला बजावण्यात आले.

विवाहाचा प्रश्न उद्भवला की समतेचा मुद्दा सर्वात जास्त तीव्र स्वरूपात उपस्थित होत असे. दीर्घकाळ चालत आलेल्या रूढीप्रमाणे लग्नाची मागणी घातलेल्या मुलीचा बाप किंवा तिचा एखादा सर्वात जवळचा आप्त, मुलीचा वली म्हणजे पालक म्हणून काम करी. मुलीला मागणी घालणाऱ्या व तिच्याशी विवाहबद्ध होऊ इच्छिणाऱ्या पुरुषाचे जन्मकुळ मुलीच्या बरोबरीचे आहे की नाही हे पाहण्याची त्या पालकाची जबाबदारी असे. इस्लामने सर्व प्रकारचे जन्माधिष्ठित विभेद नष्ट केले आहेत असे आग्रहपूर्वक सांगितले जाऊ लागले तेव्हा विवाहसंबंधांतील अशा प्रकारच्या आवश्यकतांची उपेक्षा होण्याचा अतिशय धोका निर्माण झाला. उदाहरणार्थ, एखाद्या गुलामालाही इस्लामच्या या समानतेच्या तत्त्वानुसार अगदी कायदेशीरपणे स्वतंत्र स्त्रीला, शक्य तर प्रतिष्ठित घराण्यातील स्वतंत्र स्त्रीलादेखील, लग्नासाठी मागणी घालता येणे शक्य झाले.

इस्लामी न्यायपंडित आपले कायदेकानू तयार करू लागले तेव्हा प्राचीन रूढींशी कायद्याची सांगड घालण्यातील अडचणी तत्कालीन परिस्थितीमुळे फारशा दूर झाल्या नसल्या तरीदेखील ते कठीण काम त्यांच्या कल्पनाशक्तीपलीकडचे होते असे मात्र नाही. मुहम्मदांच्यानंतर जवळजवळ दीडशे वर्षांपर्यंत शुद्ध रक्ताच्या अरबाच्या मुलीसाठी[1] त्याच्या आईबापांकडे मागणी घालण्याचे साहस मवालींनी केले नाही. त्यांच्यापैकी पुष्कळजण आपली पायरी ओळखून होते. म्हणून त्यांनी असे साहस केले नाही असेही म्हणता येईल आणि ज्यांनी असे साहस केले त्यांची कठोर निर्भर्त्सना झाली. त्या वेळपावेतो आचार-व्यवहारांना मूर्तस्वरूप प्राप्त झाले होते. कुरेशी जमातीला नव्या सामंतकुलाची प्रतिष्ठा

१. अरब पुरुषाने अरबेतर स्त्रीशी विवाह केला तर त्याविषयी तितकीच नापसंती व्यक्त केली जात असे. त्या काळातदेखील इस्लामधर्मीयांत इस्लामपूर्व रिवाजाची अतिशय जाण होती.

प्राप्त झाली होती. कुरेशीव्यतिरिक्त मुसलमानांनी सामाजिक वर्गवारीवर आधारित अशी आपली स्वतःची रचना निर्माण केली होती. एकाच वर्गातले या नात्याने सर्व कुरेशी समान सामाजिक दर्जाचे आहेत आणि कोणत्याही जमातीचे असले तरी बाकीचे सर्व अरब समान आहेत असा सर्वसामान्य नियम सांगणे अबु हनीफा पंथाला तसे पाहता सोपे होते. आपल्या समाजांतील ज्या माणसाचा बाप व आजा पूर्वीपासून मुस्लिम असतील त्याला जन्मकुलाच्या दृष्टीने अरबेतर समाज अरबाच्या बरोबरीचा मानीत. मात्र असा माणूस पुरेसा महर ( लग्नातील हुंडा ) देण्याइतका श्रीमंत असला पाहिजे. अशा बाबतीत-देखील अरबेतर व्यक्ती ही पूर्णपणे अरब मुस्लिमांच्या बरोबरीची आहे असे हनफी मानावयास तयार नव्हते हे स्पष्ट आहे. तथापि मलिकपंथीय मात्र ( त्यापैकी पुष्कळजण निग्रो होते ) कुराणातील सिद्धान्तांमागील भावनेचे समर्थक होते.

स्वतंत्र अरब पुरुष व गुलाम स्त्री यांच्या विवाहसंबंधामुळे निर्माण होणारी समस्या तेवढी गंभीर नसे. अशा दांपत्याची संतती कायदेशीर मानली जाई. अर्थातच जुन्या जमान्यातील अरबांना मात्र, गुलाम स्त्रीच्या संततीने आपण सामंत कुलातले आहोत असा दावा केला तर तो मंजूर नसे हे पूर्वी सांगितलेच आहे. ही गोष्ट गुलाम स्त्रीशी झालेला विवाह हा स्वतंत्र अरब स्त्रीशी झालेल्या विवाहाइतकाच कायदेशीर आहे या कुराणांतील सूत्राच्या उघडउघड विरुद्ध होती. तथापि अब्बासी कालाच्या मध्यापूर्वी बरीच वर्षे एखाद्या व्यक्तीची आई कोण होती या गोष्टीला फारसे महत्त्व दिले जात नसे. पहिले तीन खलिफा सोडले तर या वंशातील बाकीच्या सर्व खलिफांच्या माता गुलाम होत्या. खलिफा माहादी याचा मुलगा इब्राहिम हा निग्रो मातेपासून झाला होता. परंतु त्यामुळे त्याला आपल्या अनेक मुसलमान बांधवांची निष्ठा मिळाली नाही असे झाले नाही. उलट इब्राहिमचा पुतण्या आणि हरून अल् रशीद याचा मुलगा मामुन याच्यापेक्षा इब्राहिम हा खिलाफतीसाठी अधिक लायक आहे असे मुस्लिम बांधव मानीत.

इतर मवालींप्रमाणे निग्रोंचेही पाठीराखे होते. त्यांनी निग्रोंच्या समतेच्या मागणीला पाठिंबा दिला. बसरा येथील जाहिझ ( मृत्यू ८६९ ) या स्वतः 'मौला' असलेल्या उदारमतवादी इसमाने निग्रोंचे समर्थन करणारा एक प्रबंध लिहिला. त्या प्रबंधात त्याने, निग्रो हे पुष्कळदा गोऱ्यांच्या बरोबरीचेच नव्हे तर त्यांच्यापेक्षादेखील श्रेष्ठ असतात हे अनेक युक्तिवाद करून दाखवून दिले आहे. मवालींच्या समर्थनार्थ लिहिलेल्या दुसऱ्या एका पुस्तकात जाहिझ ठामपणाने सांगतो की, "आपल्या इच्छेनुसार आपल्या सेवकाला अरब किंवा अरबेतर, कुरेशी अथवा निग्रो करावयास ईश्वर समर्थ आहे." निग्रोंची बाजू उचलून धरणाऱ्या आणि चांगली बाजू दाखवणाऱ्या हदिसांचीही रचना करण्यात आली.

अशा रीतीने अरबेतर मुसलमान कनिष्ठतेचा बोजा शिरावर वाहत आणि मुसल-मान या नात्याने आपल्या अधिकारांचा आग्रह धरीत राहत होता त्यावेळी सर्व इस्लामी

प्रदेशांतील समाजाच्या स्वरूपात एक महत्त्वाचे परिवर्तन घडून येत होते. बसरा आणि कुफा या जित प्रदेशांतील दोन ठिकाणांची आता मोठी शहरे झाली होती. या दोन ठिकाणी पूर्वी लष्कराचे तळ होते. सभोवतालच्या भूभागावर व तेथील रहिवाशांवर तेथून नियंत्रण ठेवले जात असे. सिरीयामधील दमास्कस, इराकमधील हिरा व अन्वर आणि ट्रान्सोक्सिआनातील बुखारा व समरकंद या शहरांनाही बेसुमार महत्त्व प्राप्त झाले. त्यांची लोकसंख्या वाढली. ७६२ मध्ये बगदाद या राजधानीची स्थापना झाली. उमय्या वंशानंतर आलेल्या अर्ध-इराणी अब्बासी खलिफांच्या वंशाची बगदाद ही राजधानी होती. या शहरांच्या वाढीबरोबर समाजात दोन स्पष्ट तट निर्माण झाले– ज्यांना स्वतःचे घरदार होते अशांचा एक व जे भटके जीवन जगत होते अशांचा दुसरा. शहरी समाज वाढला आणि दमास्कस, बगदाद यांसारखी शहरे राज्यसत्तेची केंद्रे बनली तेव्हा एक फार मोठा परिणाम असा झाला की, खिलाफतीमधील राजकीय सत्ता भटक्या टोळ्यांपेक्षा बव्हंशाने शहरी लोकांच्या हाती गेली.

आणखी एक बदल दिसू लागला. वरिष्ठ वर्गातील कोण, याविषयीच्या जनतेच्या विचारात हळूहळू परिवर्तन होऊ लागले. या परिवर्तनाची काहीशी कल्पना या-अगोदर आपणास आलेली आहेच. काहीशा कल्पित भूतकालातील शूर पुरुषांशी असलेल्या रक्तसंबंधाचा आधार घेऊन पूर्वीचा वरिष्ठवर्ग प्रतिष्ठेवर हक्क सांगत असे. आता या वरिष्ठ वर्गाची जागा एका नव्या वर्गाने घेतली. या नव्या वर्गातील मुसलमान आपण स्वतः किंवा आपले पूर्वज मुहाजिर किंवा अन्सार असल्याचे अभिमानाने सांगत. हिजराच्या प्रसंगी मक्केमधील आपली घरेदारे सोडून मुहम्मदांबरोबर मदिना येथे निर्वासित झालेले मुहाजिर ( सहनिर्वासित ) या नावाने ओळखले जात. अन्सार म्हणजे ' सहाय्यक ' आणि मदिनाचे रहिवासी. मुहम्मदांच्या अनुयायी वर्गात दाखल होऊन त्यांनी त्यांना सहाय्याचे वचन दिले होते. आपण उच्च वर्गातील असल्याचा दावा करणाऱ्यांचा आणखी एक गट ( हाशिमीं चा होता. ) तेही पैगंबरांचा पणजा हाशिम याचे वंशज असल्यामुळे त्यांचे पैगंबरांशी रक्ताचे नाते होते. हाशिमींच्या या दाव्याला अब्बासी अमदानीत राज्यसत्तेची मान्यता मिळाली. त्यामुळे राज्यसत्तेकडून त्यांना पेन्शन-देखील मिळत असे. त्यांना ' जकात 'कराची सूट होती. मोठ्या शहरांत तर त्यांना त्यांच्या कायदेकानूप्रमाणे वागण्याचा खास अधिकार दिला होता. त्यांच्यासाठी खलिफाने स्वतंत्र न्यायाधीश ( नकीब ) नेमला होता.

हाशिमींसारखा पण त्यांचा प्रतिस्पर्धी असलेला असा आलिदांचा आणखी एक गट होता. हाशिमींप्रमाणे या आलिदांचाही सामंतवर्गात म्हणजे अश्रफांमध्ये समावेश होत असे. पैगंबरांच्या जावयाच्या– अलीच्या– हुतात्मा मुलाशी– हुसेनशी आपले रक्ताचे नाते असल्यामुळे आपण अलीचे वंशज आहोत असा या आलिदांचा आग्रह होता. या आलिदांचे सांप्रतचे प्रतिनिधी सैय्यद होत. हिजरीनंतर आठव्या व इ.

सनाच्या चौदाव्या शतकात हे सैय्यद आपल्या श्रेष्ठतेचे बाह्यचिन्ह म्हणून हिरवा फेटा परिधान करीत. काही मुस्लिम देशांत[1] हा फेटा खूपच प्रचलित होता. आपण आलिद किंवा शरीफ या प्रतिष्ठित वर्गातील आहोत असा चिनबुडाचा दावा पुष्कळदा केला जात असे. गुलिस्तॉं या सादी याने लिहिलेल्या ग्रंथातील एका गोष्टीवरून याला पुष्टी मिळते. ज्याचा बाप कुर्दिश खिश्चन होता अशा एका तोतयानेदेखील असा दावा केला होता असे या गोष्टीवरुन दिसते.

इस्लामच्या दुसऱ्या शतकाच्या मध्यास समाजात कोणकोणते विभाग अस्तित्वात होते याची कल्पना ' वसीयतनामा 'मध्ये पुष्कळशी अचूकपणे दिसून येते. खलिफा उमरने मृत्युशय्येवर असताना आपल्या उत्तराधिकाऱ्याला दिलेल्या आज्ञा ' वसीयतनामा 'मध्ये आहेत असे सांगतात. वास्तविक आपला उत्तराधिकारी नेमण्याअगोदरच खलिफा मरण पावला होता. त्यामुळे त्या आज्ञा उमरच्या आहेत हे म्हणणे खोटे वाटते. त्या आज्ञा अशा :

" परमेश्वराचे भय बाळग. त्याची बरोबरी दुसरा कोणीही करू शकत नाही. जुन्या मुहाजिरवर तुझी मेहेरबानी असू दे. त्यांनी गतकालात केलेल्या सेवेची आठवण ठेव. तसेच अन्सारांवरही लोभ असू दे. त्यांनी केलेली सत्कर्मे तेवढी पहा आणि त्यांची दुष्कृत्ये दृष्टीआड कर. त्याचप्रमाणे शहरात राहणाऱ्या लोकांवर तुझी कृपादृष्टी असू दे. कारण तेच शत्रूंच्याविरुद्ध[2] ( व इस्लामचा आधार ) आहेत. आणि खंडणीची वसुलीही तेच करीत असतात. त्यांची संमती व इच्छा असेल तरच त्यांच्याकडून कर वसूल कर. खेडे–गावात राहणाऱ्या लोकांवरही मेहेरबानी असू दे. कारण ते अरबांचे मूळ पूर्वज आहेत. त्यांच्यापैकी जे श्रीमंत असतील त्यांच्याजवळच्या बाजवीपेक्षा जास्त संपत्तीपैकी काही भाग काढून घेऊन तो त्याच्यांतल्या गरीबांना दे. हे तर इस्लामचे सार आहे. तसेच संरक्षणा-खाली असलेल्या लोकांवरही कृपादृष्टी असू दे. त्यांच्या रक्षणासाठी लढ. मुसलमानांना द्यावयाचा कर ते स्वखुषीने अथवा " पराभवानंतर अंकित झाल्यामुळे " देत असतील तर त्यांना झेपणार नाही एवढा करांचा बोजा त्यांच्यावर लादू नकोस. ... "[3]

' संरक्षित ' म्हणून ज्यांचा उल्लेख केला आहे ते लोक म्हणजे बिगर मुसलमान प्रजाजन होते. या लोकांना राज्यात कोणतेही कायदेशीर हक्क नव्हते. जिझिया किंवा

---

१. तुर्कस्तान व इराण या देशांनी हिरवा फेटा वापरावयास बंदी केली आहे. ज्या व्यक्तींना उपाध्यायांच्या कामासारखी कामे करण्याचा अधिकार आहे, अशा व्यक्तींचा मात्र याला अपवाद केलेला आहे.

२. Taj al Arus ( हिजरी १२८७ ) मध्ये ' शत्रूविरुद्ध ' हे शब्द वगळले आहेत.

३. कुराण ९^२९.

डोईकर देऊनच त्यांना राहता येत असे. तशी कुराणात तरतूद आहे. "ज्यांना स्वतःचा असा धर्मग्रंथ दिलेला आहे असे बिगर मुसलमान जनसमाज जिझिया[1] कर देत असतील तर त्यांच्यावर आक्रमण करू नये" असे कुराणात म्हटले आहे. प्रारंभीच्या काळात ज्यू, ख्रिश्चन व सॅबियन्स या लोकसमूहांना 'धर्मग्रंथ असलेले समाज' (किताबी) ठरवण्यात आले होते. हे समाज स्वतःचा असा धर्मग्रंथ दाखवू शकत किंवा तो असल्याचा त्यांचा दावा होता. कालांतराने परिस्थितिजन्य व्यापक सादृश्यतेमुळे झरतुष्ट्र-धर्मीयांचाही (पारशी) संरक्षित जनसमाजात समावेश करण्यात आला. समाजातील अत्यावश्यक कामे, विशेषतः व्यापार व अर्थव्यवहार झरतुष्ट्रधर्मीय लोक करीत होते. त्याच-प्रमाणे तत्कालीन वैद्यक व प्रसूतिविषयक कलेत ते निपुण होते. त्यामुळे समाजाला त्यांची गरज होती. म्हणूनच बहुधा उमरने आपल्या 'वसीयतनामा'मध्ये त्यांचा उल्लेख केला असावा. असे असले तरी अनेक नियंत्रणांखाली आणि इस्लामी सत्ताधाऱ्यांच्या कृपेवरच त्यांना बहुधा अवलंबून राहावे लागत असे.

इ. सनाच्या नवव्या शतकाच्या अखेरीस खिलाफतीच्या व खिलाफतीशी संबंधित असलेल्या अधिकारपदांच्या सत्तेत व कार्यक्षेत्रात बरेचसे परिवर्तन झाले तेव्हा समाजाच्या रचनेतही आणखी थोडासा बदल झाला. राजदरबारात मानकरी असलेल्या अब्बासी अल् फदल याह्या याने म्हटले आहे की, मानवी समाजाचे त्या काळात चार विभाग होते. इब्ने अल् फकी या भूगोलकाराने ९०३ मध्ये नमूद केले आहे : "पहिला, आपल्या योग्यतेमुळे अधिकारपदावर चढलेल्या सत्ताधाऱ्यांचा वर्ग. दुसरा, आपल्या ज्ञानामुळे व विचारशक्तीमुळे ख्याती पावलेल्या वझीरांचा वर्ग. तिसरा, आपल्या संपत्तीमुळे प्रतिष्ठा पावलेल्या वरिष्ठ श्रेणींतील लोकांचा वर्ग; आणि चौथा, मध्यम वर्गीयांचा— आपल्या संस्कृति-संपन्नतेसाठी प्रसिद्ध असलेल्यांचा वर्ग. बाकी लोक म्हणजे घाण, कचरा, वाहात असलेली घाण, हीन जनावरे. कोणाला म्हणून खाणेपिणे व झोपणे याशिवाय दुसरे माहीत नाही अशांचा वर्ग."

इब्ने अल् फकी याने वरील अभिप्राय व्यक्त केला त्या सुमारास 'समानते'साठी चाललेला संघर्ष यशस्वी झाला असल्यामुळे जन्माधिष्ठित श्रेष्ठतेचा इस्लामपूर्व काळातील सिद्धान्त जवळपास संपूर्णपणे संपुष्टात आला होता हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. आता संपत्ती किंवा राजकीय अधिकारपद हेच सामंतशाहीचे निदर्शक चिन्ह बनले होते. स्वाभाविकच या वस्तुस्थितीचा एकंदर दृष्टिकोणावर परिणाम झाला असावा. कारण पहिले तीन खलिफा वगळले तर खलिफापदावर आरूढ झालेल्या सर्व खलिफांच्या माता तुर्की, ग्रीक एवढेच नव्हे तर गुलाम निग्रो मुली होत्या.

---

१. झारच्या काळात बुखारामध्ये रशियन वगळता बाकीच्या नास्तिकांकडून जिझिया वसूल केला जात होता.

जमीनमालक या नात्याने आज अशरफांना किंवा पैगंबरांच्या वंशजांना अरबस्तानात काहीसे महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे वेगवेगळे समाज आहेत. उच्च सामंत-वर्गातील लोक म्हणून सर्व अरब समाजात त्यांना मान्यता आहे. स्वतःविषयी अत्यंत अभिमान बाळगणारा बदवी टोळीप्रमुखदेखील अगदी गरीबातील गरीब अशरफाच्या हाताचे चुंबन घेतो. सामान्यतः कोणीही 'शरीफ' आपली मुलगी शरीफाशिवाय दुसऱ्या कोणालाही देत नाही. तथापि कोणत्याही दृष्टीने अशरफ ही पुरोहितांची वेगळी अशी जात किंवा विशेष धार्मिक समाज आहे असे समजले जात नाही.[1] इराक व जॉर्डन देशांचे आजचे इहलोकवादी राजे याच अशरफ समाजातून आलेले आहेत. मात्र ज्याचे राज्य प्रामुख्याने तलवारीच्या बळावर मिळवलेले होते त्या सौदी अरेबियाच्या राजापेक्षा ते धार्मिकदृष्ट्या जास्त श्रेष्ठ कुळातले आहेत असे मात्र मानले जात नाही.

अशाच प्रकारचे परिवर्तन प्रतिष्ठितपणाचा हक्क कोणाला यासंबंधीच्या मूल्य-मापनाच्याबाबतीत इस्लामने अरबस्तानबाहेरील मुसलमानांमध्ये घडवून आणले. त्यामुळे पैगंबरांशी असलेले अगदी दूरचे नाते, तसेच संपत्ती आणि राजकीय सत्ता या गोष्टींना प्रतिष्ठितपणावरील हक्काच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. पहिले दोन खलिफा अबु बकर व उमर यांचे आपण वंशज आहोत असे समजणाऱ्यांचा आधुनिक इजिप्तमध्ये अशरफांत समावेश[2] होतो. अबू बकरचे वंशज बक्री (किंवा सिद्दीकी) यांच्या हाती १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून अत्यंत कमाईची अशी धार्मिक अधिकारपदे आहेत. राजकीय प्रतिष्ठा मात्र १९५३ मध्ये तेथील राजेशाहीचा शेवट होईपर्यंत तुर्कीवंशीय कुटुंबांनाच होती. मंत्रिमंडळाचे अनेक सदस्य जुन्या तुर्की सत्ताधारी वर्गातले होते. इजिप्तमधील अस्सल उच्चकुलीन वर्गात अद्यापही त्यांचाच प्रामुख्याने समावेश होतो. वास्तविक

---

१. तथापि दक्षिण इराकमधील शिया पंथीयांमध्ये सय्यदांचा (सादा–त्यांना पुष्कळदा मिर्झा असे देखील म्हणतात.) समाज मोठा आहे. बाकीचा समाज या सय्यदांचा धर्मशील (पुण्यशील) पुरुष म्हणून आदर करतो. त्यामुळे त्यांचा राजकीय-दृष्ट्या खूपच प्रभाव असल्याचे दिसून येते.

२. शरीफ किंवा पैगंबरांचा वारस कोणत्याही दर्जाचा असला तरी तो 'सय्यद' म्हणूनच ओळखला जातो. पुष्कळसे 'सय्यद' अगदी हलक्या दर्जाच्या पदावर काम करतात. मुहम्मदांच्या सन्मान्य वंशातील या लोकांत नोकऱ्या करणारे, कचरा साफ करणारे आणि भिकारीदेखील आहेत. परंतु हे सर्व लोक सय्यद या प्रतिष्ठित संज्ञेला पात्र समजले जातात. त्यांना हिरवा फेटा वापरण्याचाही अधिकार असतो. तरीदेखील त्यांच्यापैकी पुष्कळजण यापैकी कोणतेही खास अधिकार धारण करू इच्छीत नाहीत. त्याऐवजी ते 'शेख' ही संज्ञा व पांढरा फेटा धारण करतात. अशा लोकांमध्ये कनिष्ठ दर्जाचेच लोक असतात असे नव्हे तर श्रीमंत आणि विशेषतः विद्वानदेखील असतात. इजिप्तमध्ये सांप्रत हिरवा फेटा घातलेले लोक क्वचित आढळतात.

तुर्कवंशीय मुस्लिम आणि टोळीवाले किंवा फेलाहिन हे एकाच इस्लाम धर्माचे. तरीदेखील तुर्कवंशीय मुस्लिम, टोळीवाल्या मुस्लिमांत मिसळत नाहीत. आणि लग्नसंबंधदेखील बहुधा फक्त आपापसांतच जोडत असतात.

आज देखील सय्यदांचा सर्वांत जास्त प्रभाव कदाचित इराणमध्येच असावा. कारण पैगंबरांचा जावई अली व अलीचे मुलगे हसन व हुसेन यांच्याविषयी इराणमध्ये परंपरागत आदर आहे. स्वतःला हसन-हुसेनचा वारस म्हणवून घेणाऱ्या पहिल्या इस्माईलने १५०२ मध्ये सफावी शहाच्या राजवंशाची स्थापना केली तेव्हा या पारंपारिक आदराला मूर्तस्वरूप मिळाले. त्या अगोदरच्या सफावींना आध्यात्मिक व ऐहिक अशी दोन्ही प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होती. सफावींमुळे इराणी सय्यदांनाही परावर्तित प्रतिष्ठा लाभली होती. त्यामुळे सफावी सत्ताच्युत झाल्यानंतरदेखील पुरोहित व्यवस्थेतील लहानमोठी पदे इराणात सय्यदांच्या हाती राहिली.

इस्लामपूर्व काळात इराण्यांना अरबांप्रमाणेच राजेरजवाडे व सैनिक यांच्याशी असलेल्या सामंतकुलीन संबंधामुळे प्रतिष्ठेवर हक्क सांगता येत असे. पुरोहित वर्गाला व धार्मिक नेत्यांना इराणमध्ये प्रतिष्ठेच्या दृष्टीने त्याखालचे स्थान होते. बसरा येथील जाहिझ या निबंधकाराच्या लिखाणाचा अनेकदा या संदर्भात उल्लेख केला जातो. या निबंधकाराने इ. स. च्या ९ व्या शतकाच्या सुमारे मध्यास असे म्हटले आहे की इराणी राजा अरदेशर याने आपल्या प्रजेचे चार वर्ग केले होते. आणि ही विभागणी त्याने कडकपणे अमलात आणली होती. कारण अरदेशर राजाचे असे मत होते की एका वर्गाचे रूपांतर दुसऱ्यात झाले, मग ते कनिष्ठवर्गाचे वरिष्ठवर्गात होवो की वरिष्ठवर्गाचे कनिष्ठ-वर्गात होवो, म्हणजे जितक्या वेगाने साम्राज्याचा विनाश होतो तितका लवकर दुसऱ्या कशानेही होत नाही. त्याने पुढीलप्रमाणे समाजाचे वर्ग पाडले होते : पहिला राजाचा व सरदारांचा, दुसरा धार्मिक नेत्यांचा व अग्निमंदिरांच्या रक्षकांचा, तिसरा वैद्य, लेखक व ज्योतिर्विद यांचा, आणि चौथा शेतकरी व हलकी कामे करणारे वगैरेंचा.

इराणमध्ये व इतर ठिकाणी धर्मपुरोहितांचा जो काही थोडा स्थिरस्वरूपाचा वर्ग शिल्लक राहिला होता तो इस्लामच्या आगमनानंतर लोप पावला. परंतु या वर्गाची जागा कुराण आणि पैगंबरांच्या 'परंपरा' तसेच या दोहोंत सांगितलेले कायदेकानू यांच्या भाष्यकारांनी घेतली. उलेमा व काझी या "विद्वद्वर्गा"ला वरिष्ठ स्थान प्राप्त झाले. तथापि शहा व त्याचे शासकीय अधिकारी यांच्यापेक्षा त्यांचे स्थान कनिष्ठ होते. सियास-तनामा अर्थात् "शासनविषयक प्रबंध" या नावाचा एक ग्रंथ इ. स. १०९२ च्या सुमारास 'महान् सेल्जुक्स'चा प्रख्यात वझीर निजाम उल् मुल्क याने लिहिला आहे. त्यात त्याने विभिन्न शासनाधिकाऱ्यांचे पुढील क्रमाने वर्गीकरण केले आहे : (१) राजा, (२) प्रांतांचे राज्यपाल व महसूल अधिकारी, (३) वझीर, (४) सामंतवर्गीय जमीनदार, (५) त्यांची शेतकरी प्रजा आणि (६) काझी, खातिब (धर्मोपदेशक), मुहतासिब (पोलिस अधिकारी) वगैरे.

निजाम उल् मुल्कच्या काळात इराणमधील सामंतशाहीत जन्म व कुलपरंपरा यांना अतिशय महत्त्व होते असे काबुस-नामा या ग्रंथावरून दिसते. या ग्रंथात नैतिक व व्यावहारिक शिकवण आहे. तात्रारिस्तान या दक्षिण कास्पियन प्रांताचा राजा काई कौस इब्ने इस्कंदर याने आपला पुत्र गिलान शहा याच्यासाठी हा ग्रंथ १०८२-८३ मध्ये लिहिला. त्यात त्याने आपल्या कुलपरंपरेचे विस्ताराने वर्णन केले आहे, आणि आपले पूर्वज कसे थोर होते व त्यांचा आपणास का अभिमान वाटतो यासंबंधी लिहिले आहे. त्यानंतरच्या पाचशे वर्षांमध्ये सफावींच्या राजवटीत परिस्थिती फारशी बदलली नव्हती. फरक एवढाच झाला होता की, मानवसमाजाच्या सर्वश्रेष्ठ वर्गात पैगंबर, त्यांचे सोबती आणि पैगंबरांचे थेट वंशज असलेले बारा इमाम हे धर्मनेते यांना नेऊन बसविण्यात आले. या लोकांखालोखाल राजे, अमीर, वझीर व इतर शासकीय अधिकारी, बुद्धिवंत, पत्रलेखक किंवा सचिव, बदवी व्याकरणकार, वक्ते, शेख, उलेमा ( विद्वान अध्यापक व कायदेपंडित ) आणि शेवटी तत्त्वज्ञ यांचा क्रम लागतो. लताइफ अल् झराईफ अर्थात् 'बुद्धिचातुर्याचे गूढ' या ग्रंथाचा लेखक ( लेखनकाल १५३२-३३ ) अली इब्ने हुसेन इब्ने अल वाझिझ अल काशिफी यानेही मानवसमाजाच्या विविध वर्गांचे या पद्धतीनेच वर्णन केले आहे.

इस्लामच्या उदयानंतर पहिली काही शतके इराणातील सामंतसमाजात दिहकान्सचा किंवा कनिष्ठ दर्जाच्या जमीनदारांचा एक विशिष्ट वर्ग होता. ग्रामप्रमुखापासून टोळी-प्रमुखांपर्यंत विभिन्न दर्जाची पदे त्यांच्याकडे होती. त्यांच्याकडे शेतकऱ्यांचे पुढारीपणही होते. या लोकांनी वेळीच इस्लामधर्म पत्करला असल्यामुळे त्यांची सत्ता व प्रभाव टिकून राहिला आणि करवसुलीच्या कामी अरबांचे प्रतिनिधी बनून त्यांनी अरब विजेत्यांना महत्त्वपूर्ण मदत केली. अगदी खलिफा मामुन ( ८१३-३३ ) च्या अमदानीपर्यंत ते हे काम करीत होते.

आज इराणमध्ये काटेकोर असे सामाजिक गट नाहीत किंवा कोणत्याही जाति-जमाती नाहीत. अर्थातच संपूर्णपणे नाही तरी काही अंशी कमी जास्त भूसंपत्तीवर आधारित असे संपत्ती व राजकीय प्रतिष्ठा यांच्याशी संलग्न असे भेदाभेद आहेत. परंतु ज्या जमीनदारीपद्धतीमध्ये बापाकडून मुलाकडे बऱ्याच अंशी अक्षयरीतीने मालमत्ता जाते अशा प्रकारची स्थिर स्वरूपाची जमीनदारी तेथे अस्तित्वात नाही. प्रामुख्याने इस्लामी कायद्यातील तरतुदींमुळे हे झाले आहे. कजर शहांचे वंशज सोडून इतर फारच थोड्या भटक्या टोळी-प्रमुखांच्या ठायी आपल्या वंशावळीचा अभिमान आढळतो. काही टोळीवाले मात्र आपला वंशसंबंध थेट चेंगीजखानाशी, तैमूरलंगाशी इतकेच नव्हे तर ससानियनांशी जोडताना दिसतात. 'नजाबात' (म्हणजे सामंत-वर्ग) किंवा 'नजीब' ( म्हणजे सामंत ) हे शब्द कोठे ऐकू येत असलेच तर ते एखाद्या व्यक्तीच्या दर्जाच्या संबंधात; जन्मश्रेष्ठत्वाचे ते शब्द सूचक नसतात.

बगदाद येथील अब्बासी खलीफांच्या अमदानीच्या बऱ्याच प्रारंभीच्या काळात ऑक्सस नदीपलीकडील एके काळच्या इराण्यांच्या ताब्यातील भूप्रदेशात तेथील अमीरांनी खिलाफतीपासून स्वतंत्र अशी राज्ये स्थापन केली होती. या छोट्या राज्यांपैकी समानिद राजांचे राज्य सर्वांत अधिक काळ टिकले. या राजांच्या हाताखाली अनेक अधिकारी होते; तरी खरी सत्ता राजांच्याच हाती होती. जे मुस्लिम 'धर्मपंडित' शरतुद्दी धर्माधिकाऱ्यांच्या जागी आले त्यांना ट्रान्सोक्सिआनामध्ये मोठा मान आणि सत्ता होती. राजाच्या समोर जमिनीचे चुंबन घेतले पाहिजे यासारख्या काही अपमानास्पद व अनावश्यक शिष्टाचारांच्या बाबतीत त्यांना सूट देण्यात आली होती. या निम-धर्माधिकारी वर्गाला असलेले पारंपारिक महत्त्व पुढे बुखारा येथील ट्रान्सोक्सियन अमीरांच्या राज्यातही कायम टिकून होते. या अमीरांच्या राज्यात खुद्द अमीराच्या खालोखाल सय्यद उलेमा आणि इतर धर्माधिकारी यांना समाजात सर्वश्रेष्ठ स्थान होते. हे लोक आपल्यामध्ये मदरंसात (मशिदीतील पाठशाळा) शिक्षण घेतलेले व्यापारी व वरिष्ठ दर्जाचे कारागीर यांचादेखील समावेश करीत. वारसाप्राप्त अधिकार असलेला सामंतवर्ग किंवा विशेषवर्ग अस्तित्वात नव्हता आणि फुकारा ( गरीब ) वर्गातील किंवा अधिकारी वर्गाबाहेरील कोणीही कर्तृत्ववान व्यक्ती 'बेग' अथवा प्रांतिक राज्यपालाच्या पदापर्यंत पोचू शकत असे. रशियनांची सत्ता येण्यापूर्वी काही वर्षे सरकारातील विभिन्न वरिष्ठ पदांवर इराणी गुलामांची मुले किंवा मुक्त केलेले गुलाम होते. वारसाने मिळणारे विशेषाधिकार सामान्यतः अस्तित्वात नव्हते. त्याला फक्त एक अपवाद होता. 'बेग'च्या औरस मुलाला आपल्या बापाचे अधिकारपद वारशाने मिळत नसले तरी त्याची पदवी मिळे. कारण एखाद्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याचा मुलगा देखील पुष्कळवेळा अतिशय हलका धंदा करताना आढळे. कजर वंशाच्या अमदानीत इराणमध्ये पुष्कळदा ही गोष्ट अनुभवास येई.

आणखी पूर्वेकडे चीनमधील मुसलमानांमध्येदेखील जन्माधिष्ठित विशेष अधिकार नाहीत. इस्लाममध्ये इतरत्र सय्यदांना जसे प्रभावशाली स्थान आहे तसे चीनमध्ये त्यांना नाही. याचे कारण बहुतांश चीनी मुस्लिमांनी तुलनेने बऱ्याच अलीकडच्या काळात इस्लामचा स्वीकार केला, ही सर्वमान्य वस्तुस्थिती होय. चीनमधील धर्माधिकारी वर्गात, इस्लाममध्ये इतरत्र निदान तत्वतः जेवढे भेद अस्तित्वात आहेत त्यापेक्षा जास्त लहानमोठे असे भेद किंवा त्यावर आधारलेली अधिकारपदांची उतरंड अस्तित्वात नसावी. चीनमधील मुस्लिम उपाध्यायाचे ( अ-हॉंग किंवा इराणी भाषेत आखुंद ) काम त्याच्याकडील मशिदीपुरतेच किंवा तेथे होणाऱ्या नमाजापुरतेच मर्यादित असते.

इस्लाममधील आनुवांशिकतेचा सिद्धान्त परंपरेने पुरस्कारणाऱ्या शियांपेक्षा पाकिस्तान व हिंदुस्थान या देशांतील विशाल मुस्लिम समाजात सुन्नींची संख्या पुष्कळच जास्त असली तरी त्या देशात सय्यद समाजाला महत्त्वाचे स्थान आहे. इतरांपेक्षा वेगळी

अशी पवित्र माणसे असल्याचे निदर्शक म्हणून 'पीरजादा' ( म्हणजे संतवंशाचा ) हे नाव ते स्वतःला लावतात. सय्यद किंवा मीर ही पदवी लावून घेणे त्यांना आवडते. त्यांच्या स्त्रिया आपल्या नावापुढे बेगम ही संज्ञा लावतात. अशरफांना पूर्वीपासून हिंदुस्थानात प्रतिष्ठा आहे. आणि सुमात्रा (जावा) मध्ये हिंदी मुसलमानांनी इस्लाम नेला त्या वेळी तेथे त्यांच्याबरोबर अशरफांना प्रतिष्ठित समजण्याची प्रथाही गेली. कारण १४ व्या शतकात इब्ने बतूताने त्या बेटाला भेट दिली, तेव्हा त्याच्या स्वागतासाठी गेलेल्या उल्लेखनीय व्यक्तींमध्ये कित्येक 'शुराफा' किंवा अशरफ होते.

सन्माननीयतेच्या शिडीच्या काहीशा खालच्या पायरीवर असलेला वर्ग म्हणजे शेखांचा. त्यांच्यापैकी ज्यांना एक शिष्टाचार म्हणून शेख ही पदवी मिळालेली नाही असे खरेखुरे शेख, आपण पहिल्या दोन खलिफांचे अथवा पैगंबरांचा चुलता अब्बास याचे वंशज असल्याचा दावा करीत असतात. अफगाण व मुघल हे प्रतिष्ठित मुसलमानांचे आणखी दोन वर्ग आहेत. ते परकी वंशाचे आहेत. मुसलमानांतील या वर्गांना जे विशेष स्थान प्राप्त झाले आहे त्याचे कारण इस्लामच्या जन्मस्थानाजवळ असलेल्या देशातील मुसलमानांचे ते वंशज आहेत, हे आहे.

तात्त्विक दृष्टीने तरी इस्लाममधील हे विभिन्न वर्ग एकमेकांशी समान आहेत; तसेच ते त्या त्या देशांतील विभिन्न वंशांच्या मुस्लिम धर्मबांधवांच्या बरोबरीचे आहेत. तरीदेखील हिंदु जातिव्यवस्थेच्या प्रभावामुळे तिच्यातील काही विभेद मुस्लिम समाजातही निर्माण झाले आहेत. उदाहरणार्थ अश्रफ लोकांमध्ये पुरुषांना आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीच्या स्त्रीशी विवाह करण्याचे स्वातंत्र्य असलेली अनुलोम विवाहपद्धती[1] म्हणून ओळखली जाणारी पद्धती प्रचलित आहे. म्हणजे, "एखाद्या सैय्यदाला शेख मुलीशी लग्न करता येईल. परंतु आपली स्वतःची मुलगी मात्र तो शेख मुलाला देऊ शकणार नाही. हिंदुस्थानबाहेरील वंशातील वरिष्ठ वर्तुळातील मुसलमानात [ उदाहरणार्थ अफगाण व मुघल. आपण बाहेरून आलेल्या वंशातील असल्यामुळे सामाजिकदृष्ट्या श्रेष्ठ आहोत असा यांचा दावा आहे ] आणि हिंदी वंशातील बहुसंख्य मुसलमानांत साधारणतया विवाहसंबंध होत नाहीत. अर्थात देशातील ज्या भागात वरिष्ठवर्णीय मुसलमानांची संख्या कमी आहे तेथे जमेल तेवढ्या चांगल्या मुसलमान वंशीयांशी त्यांना विवाहसंबंध करावेच लागतात.

बंगाली मुसलमानांमधील अश्रफांत किंवा उच्चवर्गीयांत [ अरब, इराणी, पठाण, अफगाण वगैरे ] जे निःसंशयपणे बाहेरून आलेले मुस्लिम आहेत त्यांच्या वंशजांचा आणि

---

१. या पद्धतीनुसार स्त्रीने आपल्यापेक्षा वरिष्ठ वर्गातील पुरुषाशीच विवाह केला पाहिजे असे बंधन आहे; तर शक्य असेल त्या वर्गातील स्त्रीशी लग्न करण्याचे स्वातंत्र्य पुरुषाला दिलेले आहे.

हिंदुधर्मातील उच्च जातीतून इस्लाममध्ये गेलेल्यांचा समावेश[1] होतो. "उच्च वर्णीय हिंदूंप्रमाणे हे लोकही शरीरश्रमाचे काम करणे किंवा नांगर चालवणे कमीपणाचे समजतात." इतर सर्व वर्गांतील बंगाली मुस्लिमांकडे ते तिरस्काराने पाहतात. आणि 'अजलाफ' म्हणजे "गोंगाट करणारा एक हीन जमाव" अशा शब्दात त्यांची हेटाळणी करतात. अशा वर्गात विणकर, पिंजारी, तेली, न्हावी, शिपी, इत्यादी "बारा-बलुत्यां"चा व मूळ हलक्या हिंदु जातीतून जे इस्लाम धर्मात गेले अशांचा समावेश होतो. "काही ठिकाणी[2] 'अर्झल' किंवा 'सर्वांत कनिष्ठ' या एका तिसऱ्या वर्गाचा समावेश केला जातो. या वर्गात हेलाखोर, लालबेगी, आंदल व बेदिया यांसारख्या अतिशय कनिष्ठ जातींमधील लोक मोडतात. या लोकांना मशिदीत जाण्यास व सार्वजनिक कबरस्तानाचा वापर करण्यास मनाई असते."

या संदर्भात एका गोष्टीचा उल्लेख करता येईल. अरबी द्वीपकल्पीय प्रदेशातदेखील एक प्रकारची काहीशी अतिशूद्र जातीसारखी एक जात अस्तित्वात आहे. तेथील सुलैबी व हुताईम या जिप्सी लोकसमूहांना तेथील इतर लोक काफर व हलक्या दर्जाची माणसे समजतात [ याच लोकांना डॉटी याने आपल्या 'अरेबिया डिझर्टा' या पुस्तकात 'सोल्युबा' व 'हेटेम' म्हटले आहे ].

गुलामांचा वर्ग हा अगदी आज घटकेपर्यंत मुस्लिम समाजाचा एक अभिन्न घटक बनून राहिलेला आहे. प्राचीन समाजव्यवस्था ज्या गुलामगिरीच्या पद्धतीवर आधारलेली होती ती पद्धती वरवर पाहता निःशंकपणे मुहम्मदांनी उचलली. अशा विचाराने की जगाच्या नैसर्गिक व्यवस्थेचाच ती पद्धती हा एक भाग आहे. मात्र गुलामांना माणुसकीने वागवावे असा त्यांनी उपदेश केला[3] आहे आणि गुलामांना स्वतंत्र[4] करणे हे एक स्तुत्य काम आहे असेही त्यांनी सांगितले आहे. यावरून मुहम्मदांना गुलामांच्या परिस्थितीत काही सुधारणा अपेक्षित होत्या असे दिसते. परंतु कुराण अथवा "परंपरा" यांचा विचार करताना गुलामीचे उच्चाटन करणे हा मुहम्मदांचा हेतू होता असा निष्कर्ष काढता येत नाही. इस्लामचा स्वीकार केलेल्या सर्वांना इस्लामने समानता प्रदान केली आहे, या इस्लाममधील तत्त्वाचा मुहम्मदांच्या काळात एवढाच अर्थ असावा की अरबांनी आपल्या पूर्वजांच्या श्रेष्ठत्वाचा दुरभिमान यापुढे बाळगू नये. तथापि मुहम्मदी धर्म जसजसा विकसित होत गेला तसतसा गुलाम असणे हा सामाजिक कलंक राहिला नाही ही

---

१. हिंदू ब्राह्मणांशी यांचे साम्य आहे. उपाध्यायपणा हा त्यांच्यापैकी सय्यदांचा परंपरागत व्यवसाय आहे. मुघल व पठाण यांचे हिंदूतील क्षत्रियांशी साम्य आहे.

२. अरबी भाषेत 'अर्धल'.

३. कुराण १६^७३, ४^०.

४. कुराण २४^३३ इत्यादी.

वस्तुस्थिती आहे. परंतु समान धर्माद्वारे सर्व मुस्लिम समाजावर ‘ आर्थिक ’ समता लादणे जसे शक्य नव्हते तसेच इस्लामची दीक्षा देऊन सर्वांना ‘ स्वातंत्र्य ’ बहाल करणेही शक्य नव्हते.

काही परिस्थितीत तर काही गुलामांना सत्ता व संपत्ती मिळवण्याची संधी स्वतंत्र व्यक्तीपेक्षा अधिक प्रमाणात मिळाली असे दिसते. उदाहरणार्थ ट्रान्सोक्सिआनाच्या समानिद राजाच्या विश्वासातील सबक्तगिन या गुलामाने फार मोठा भूप्रदेश संपादन करून गझनवी वंशाची स्थापना केली. प्रसिद्ध विजेता महमुद हा याच गझनवी वंशातला. हिंदुस्थानातील इस्लामचा खरा संस्थापक आणि सेनानी महमुद घोरी याचा आवडता गुलाम, ऐबक हा तर दिल्लीच्या तख्तावर बसलेला गुलाम वंशातील पहिला सुलतान होय. इजिप्तचे मामलुक[1] सुलतान हेसुद्धा जन्माने गुलाम होते. १२ व्या व १३ व्या शतकात मध्यपूर्वेत तुर्की अताबेगांनी अनेक गुलाम राजवंशांची स्थापना केली होती. प्रारंभी या गुलामांना सेल्जुक सुलतानांनी विकत घेतले आणि आपले शरीरसंरक्षक नेमले. पुढे आपल्या राज्यातील श्रेष्ठ अधिकारपदावर त्यांनी त्यांची नियुक्ती केली. लेनपूल म्हणतो, “ सेल्जुकांच्या पदरी असलेले प्रसिद्ध गुलाम नोकर हे कोणाही मध्ययुगीन उमराव वर्गातील अनौरस माणसाइतकेच स्वाभिमानी व प्रतिष्ठित होते. त्यांच्या हाती राज्याची सत्ता आली तेव्हा आपल्या भूतपूर्व धन्यांची उच्च परंपरा आपल्या वंशजांना वारसा म्हणून त्यांनी दिला. ”

आपल्या संरक्षणासाठी राजांनी खरेदी केलेल्या गौरवर्णीय तुर्की गुलामांच्या वर्गातील व्यक्ती अशा प्रकारे उच्च पदाला पोचल्या होत्या. समानिद राजांच्या अमदानीत प्रचलित असलेल्या एका अभ्यासक्रमाचे जे वर्णन निजाम उल् मुल्क याच्या ‘ सियासत–नामा ’ ( सरकारी शासनासंबंधीचा प्रबंध ) या प्रबंधात केले आहे त्यावरून मनुष्यरूपी जंगम संपत्ती समजल्या जाणाऱ्या या गुलामांकडून एक विशिष्ट पद्धतशीर अभ्यासक्रम पुरा करून घेतला जात असे, असे दिसते. गुलामाला विकत घेतल्यानंतर पहिल्या वर्षात सैनिकाचे शिक्षण देण्यात येई. मात्र गुलामीची सजा म्हणून घोड्यावर बसण्याची त्याला कधीही परवानगी नसे. त्यानंतर दुसऱ्या वर्षी राजदरबाराधिकाऱ्याच्या ( हाजिबच्या ) छावणी नायकाने ( विथाक्-बाशीने ) शिफारस केली तर गुलामाला साधे खोगीर व इतर आवश्यक सामान असलेला घोडा दिला जाई. आणखी एक वर्ष शिक्षण घेतल्यानंतर त्याला एक शोभेचा पट्टा दिला जाई आणि पाचव्या वर्षात त्याला अधिक चांगले खोगीर व एक गदा दिली जाई. सातव्या वर्षात त्याला ‘ विथाक-बाशी ’चे ( छावणी नायकाचे ) पद दिले जाई आणि त्याच्यावर बरीच महत्त्वाची कामे सोपविली जात.

---

१. मामलुक = दुसऱ्याची मालकी असलेला. गोऱ्या तुर्की किंवा ( सर्‌काशियन ) गुलामांच्या बाबतीत हा शब्द वापरतात.

सामाजिक दर्जाच्या दृष्टीने हे तुर्की गुलाम इतर गुलामांपेक्षा पूर्णपणे वेगळे होते. बाकीच्या गुलामांतील बहुसंख्य गुलाम कनिष्ठ वर्गातील होते आणि त्यांना अनेक अड-चणींना तोंड द्यावे लागत असे. मुहम्मदपूर्व काळातील गुलाम हे मूलतः शत्रुप्रदेशावर केलेल्या स्वारीत किंवा युद्धात पकडलेले युद्धबंदी होते, किंवा गुलामांची मुले होती. आपल्याच देशबांधवांना द्यामध्ये पकडून अरब त्या काळात गुलाम करू शकत असत. किंवा कर्जफेडीसाठी, निदान जुगारातील कर्जापोटी, गुलामांची देवाणघेवाण करता येत असे. किताब-अल् अघानी या ग्रंथात अबु लहाब अल्–आसी याची एक कथा आहे. त्याचा इस्लाम न मानणारा आजा बद्र येथील लढाईत ( ६२४ ) प्रारंभीच्या मुस्लिमांशी लढला होता. हा अबु लहाब अल् आसी एकदा इब्ने हिशामशी जुगार खेळला आणि त्यात आपले सर्वस्व गमावून बसला. तेव्हा तो इब्ने हिशामला म्हणाला, "बाणांचा ( एक प्रकारचे जुगारासाठी वापरण्यात येणारे बाण ) व तुझा काहीतरी करार झाला असावासे दिसते. मी पुन्हा तुझ्याशी खेळतो आणि त्यात आपल्यापैकी जो हरेल तो दुसऱ्याचा गुलाम होईल." अबु लहाब पुन्हा खेळला. त्यात त्याची जीत झाली, परंतु मित्र असलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्याला गुलाम करून नेण्याची कल्पना त्याला रुचली नाही. तेव्हा तो इब्ने हिशामच्या टोळीतल्या लोकांना भेटला आणि दहा उंट देऊन इब्ने हिशामची गुलामीतून मुक्तता करावी अशी त्याने त्यांना विनंती केली. परंतु टोळीवाल्यांनी हिशामसाठी एक केसभरसुद्धा देणार नाही असे सांगितले. तेव्हा मग अबु लहाब इब्ने हिशामला आपला गुलाम करण्याकरता घेऊन गेला.

आपण गुलाम असल्याचे जे स्वतःच मान्य करतात किंवा जे गुलाम असल्याचे भरपूर पुराव्याने सिद्ध करता येते असे लोक सोडून बाकीचे सर्व स्वतंत्र आहेत, असा एक सिद्धान्त इस्लामी कायदेपंडितांनी विकसित केला. इस्लामी इतिहासाच्या बऱ्याच सुरुवातीच्या काळात जित मुस्लिमांपैकी कोणालाही बंदी करून नेऊ नये आणि कोणाही मुस्लिम अरबाला गुलाम करू नये असा एक दंडक ठरवण्यात आला होता. कुराणात तसे काही सांगितलेले नसले तरी प्रत्यक्ष व्यवहाराद्वारे हे तत्त्व निःसंशयपणे विकसित झाले होते. किताब अल्-अघानी मध्ये शारिया या नावाच्या एका बुद्धिवान गुलाम-कन्येची माहिती आहे. त्यामध्ये ही मुलगी गुलाम कशी झाली असावी यासंबंधीचे दोन तर्क दिले आहेत. एका तर्काप्रमाणे या मुलीचा बसरा येथे जन्म झाला. तिचा बाप बानु सामा या टोळीतील होता व आई गुलाम होती. जन्मानंतर शारियाचा स्वीकार करण्यास तिच्या बापाने नकार दिला तेव्हा तिने आपल्या आईचे नाव लावले. पुढे तिला विकण्यात आले. दुसऱ्या तर्कानुसार लहानपणीच तिला पळविण्यात आले होते व हाशिमी घराण्यातील एका स्त्रीला तिला विकत देण्यात आले होते.

त्यानंतरच्या काळात ( इ. स.च्या दहाव्या शतकाच्या प्रारंभी ) दक्षिण इराकमधील सनातन इस्लाम न मानणाऱ्या कारमॅथियन 'पाखंड्यां'नी युद्धात पकडलेल्या अथवा

अन्य मार्गांनी मिळविलेल्या इतर मुस्लिमांना गुलाम बनविले. आपणच खरे धर्मश्रद्ध आहोत आणि इतर लोक अश्रद्ध आहेत असे ते मानीत असत. हेच कारण सांगून पुढे १९ व्या शतकात सुनी तुर्कोमनांनी इराणमधील शियांना व ताजिकांना गुलाम करून नेले. आणि त्याबद्दल त्यांना मुळीसुद्धा पश्चात्ताप वाटला नाही.

जाहिलियाप्रमाणे इस्लाममध्येसुद्धा मालमत्तेच्या स्वरूपात गुलाम[1] विकत घेता येतात. देणगी किंवा वारसा संपत्ती म्हणून ते मिळू शकतात. तसेच त्यांना बंदी करून आणता येते. इस्लामच्या उदयानंतर शत्रु-प्रदेशात पकडलेल्या अश्रद्ध लोकांनाच[2] केवळ कायद्याप्रमाणे गुलाम करता येत असल्यामुळे दुसऱ्या कोणत्याही प्रकारे एखाद्या स्वतंत्र मुस्लिमाचा विक्रय करणे बेकायदा ठरले. मुलांचा विक्रय करण्याची पद्धत आधुनिक काळात मुळीच[3] प्रचलित नाही असे नाही. परंतु त्या काळात तरी आपल्या मुलांची विक्री करण्यास आईबापांना बंदी होती. पूर्वीपासून गुलामीत असलेल्या गुलामांचा दर्जा इतर कोणत्याही जंगम मालमत्तेसारखाच होता. इतर कोणत्याही मामुली मालाप्रमाणे या गुलामांची खरेदी-विक्री करण्याची सोय इस्लामी कायद्यात होती.[4] परंतु आपल्या धन्या-पासून ज्यांना संतती झाली आहे अशा गुलाम स्त्रिया व ती संतती यांच्या खरेदीविक्रीवर काही बंधने होती. पण कायदा काहीही असला तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये गुलाम व त्याचा धनी यांच्यामधील नात्यात भावनेला महत्त्व होते. धन्याच्या घरातच गुलाम

---

१. अमीर अली या प्रख्यात मुस्लिम कायदेपंडिताचे असे मत आहे की, पहिल्या चार खलिफांच्या अमदानीत गुलाम विकत घेण्याची पद्धत प्रचलित नव्हती. त्यांच्या अगोदर व त्यानंतरच्या लगतच्या काळात अरबस्तानासह सर्व देशांत गुलाम खरेदी करण्याची प्रथा इतकी उघडउघड सररहा चालू होती की फक्त या खलिफांच्या राज-वटीतच ती बंद होती हे शक्य वाटत नाही. गुलामांच्या विक्रीसंबंधीच्या कायद्यासंबंधी पाहा : साचू, Muhammedanisches Recht ( Berlin, 1897 ) पृष्ठ 286.

२. कुराण ४७४. या लोकांना पारिभाषिक शब्दात 'रकिक' (बहुवचन 'आरिका') असे म्हणतात. पॅलेस्टिन ब्रिटिशांच्या स्वामित्वाखाली जाण्यापूर्वी आणि १९१४–१८ च्या युद्धकाळात तेथे सार्वजनिक बाजारात आर्मेनियन मुलींची विक्री होत होती असे म्हणतात. या मुली 'आरिका' होत्या आणि मुस्लिमांना कायद्याची अडचण न येता त्या खरेदी करता येत होत्या.

३. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत सिरकॅशियन लोक आपल्या मुली विकत असत. तथापि ही गोष्ट बेकायदेशीर होती. जॉसनने स्पष्ट म्हटले आहे, "पॅले-स्टिनमध्ये १९२५ त कर्जापोटी आपल्या मुलींचा विक्रय करणारे अरब लोक होते."

४. त्यामुळे तत्त्वतः ज्यूंना व ख्रिश्चनांना मुस्लिम गुलाम ठेवता येत असत. जे स्वतंत्र ज्यू व ख्रिश्चन्स डोई-कर देत असत त्यांना गुलाम करता येत नसे. गुलामाच्या बाजारा-संबंधीच्या 'खरेदीकाराची मार्गदर्शिके'साठी पाहा 'काबूस-नामा'.

जन्मला आणि वाढला असेल आणि त्याच्या हातून एखादा खास गुन्हा– उदाहरणार्थ दारू पिणे– घडला नसेल तर त्याची कधीही विक्री केली जात नसे. गुलामांना एक कुटुंबीय म्हणून सरसहा स्वीकारले जात असे. गुलामांशी निर्दयतेने वागण्यास मनाई होती. त्यांना दयाळूपणाने वागविण्याबाबत आज्ञा देणाऱ्या अनेक 'परंपरा' आहेत. मात्र गुलामांचे पौरुषत्व[1] खच्ची करण्याच्या प्रथेविषयी कुराणाने व परंपरांनी कितीही नापसंती दर्शविली असली तरी ती प्रथा सरसहा चालू होती. जनानखान्याला जोडून हिजडे अनिवार्यपणे बाळगले जात असत. इस्लाममध्ये तत्त्वतः इतर जंगम मालमत्तेइतकीच गुलामांची किंमत असल्यामुळे त्यांना कायद्याचे साहाय्य नव्हते. इस्लामी कायदेशास्त्रातील सर्व पंथांचे गुलामांच्या बाबतीत बहुतांशाने एकमत आहे. या संदर्भात यापुढील विवेचनात काही तज्ज्ञांची जी मते सांगितली आहेत, ते तज्ज्ञ सर्व पंथांतील आहेत. गुलामांना द्यावयाच्या वागणुकीबाबत त्यांच्यात कोठे मतभेद होते याचीच फक्त दखल घेतली आहे.

गुलामाच्या शारीरिक गरजा पुऱ्या करण्याच्या दृष्टीने गुलाम आणि घरातील पाळीव जनावरे यामध्ये फारसा फरक केला जात[2] नव्हता. परंतु मागे सांगितल्याप्रमाणे

---

१. कुराणा ( ४$^{११८}$ ) प्रमाणे परमेश्वराच्या लेकरांना पांगळे करणे हे सैतानाच्या प्रेरणेने केलेले कृत्य होय. कुराणातील यासंबंधीच्या वचनावर भाष्य करताना बैदावी याने असे म्हटले आहे की, माणसाला पंगू करण्याच्या कृत्यात गुलामांना खच्ची करणे, डाग देणे किंवा त्यांचे दात तासणे यांचा आणि इतर अनैतिक गुन्ह्यांचा समावेश होतो. गुलामां-संबंधीच्या कायद्याचे उल्लंघन होऊ नये याची दक्षता घेण्याची जबाबदारी मुहतासिब– ( पोलिस अधिकारी ) वर होती. तरुण गुलामांची आयात करण्यापूर्वी त्यांना पुष्कळदा खच्ची करण्यात येत असे व अशा गुलामांना भरपूर किंमत येत असे.

२. खलिल बिन् इशाक, 'Mukhtasar' अनुवादक : गुडी व सँटिलाना ( Milan, 1919 ) II,116; शिवाय साचू यांचे पुस्तक– पृष्ठ १८, शिराजी, Tanbih, संपादक–ज्यूनबॉल ( लीडन १८८९ ) पृष्ठ २५८. "गुलामांना आणि घरातील गुराढोरांना उपजीविकेची भरपूर साधने दिली पाहिजेत. त्यांना झेपेल तेवढेच काम त्यांच्याकडून करून घ्यावे." 'उपजीविकेच्या साधना'त अन्न, वस्त्र, डॉक्टराची फी, औषधपाणी यांचा समावेश होतो ( खलिल, पृष्ठ १०१ ). गुलाम ज्या देशातील असेल त्या देशात वरील गोष्टी ज्या प्रमाणात इतरांना मिळत असतील त्याच प्रमाणात गुलामांनाही सर्वसाधारणपणे मिळाव्यात. धन्याला मिळते तशा प्रकारचे अन्न व वस्त्र गुलामांना मिळणे स्तुत्य असले तरी तसे ते दिलेच पाहिजे असे नाही ( कित्ता पृष्ठ १०२ ). मालकाने उपजीविकेची ही साधने पुरविली नाहीत तर गुलामाला त्यासंबंधी न्याया-धीशाकडे तक्रार करता येईल. गुलामाच्या निर्वाहासाठी आवश्यक असेल तेवढ्या

जिच्यापासून मुले झाली आहेत अशा स्त्री–गुलामाची ( उम्म वलादची ) किंवा धन्यापासून तिला झालेल्या मुलांची गुलाम-स्त्रीच्या मालकाला विक्री करता येणार नाही, अशा प्रकारची बंधने अस्तित्वात होती. हे गुलाम सोडून आपल्या बाकीच्या गुलामांची मालकाला विक्री करता येत असे; मृत्युपत्राद्वारे किंवा बक्षीस म्हणून गुलामांना देता येत असे; तारण म्हणून ठेवता येत असे; भाड्याने देता येत असे; किंवा स्वतः-करता पैसे मिळविण्यासाठी त्यांना सक्तीने कामाला लावता येत असे. गुलामांना मालमत्ता बाळगण्याचा अधिकार नव्हता. आणि संपादन केलेली मालमत्ता गुलामांना धन्याच्या स्वाधीन करावी लागे. याचा अर्थ आपल्या धन्याचा प्रतिनिधी म्हणूनच केवळ गुलामाला धंदा किंवा व्यापार करता येत असे, एरवी नाही. परंतु मालकाने दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेत गुलामाने त्याचा प्रतिनिधी या नात्याने केलेले करार कायदेशीर व मालकावर बंधनकारक समजले जात. त्याचप्रमाणे एखाद्या गुलाम स्त्रीला किंवा पुरुषाला ( उदा. उम्म वलाद ) त्याच्या मालकाच्या मृत्यूनंतर स्वतंत्र करण्यात आले तरी तिला अथवा त्याला वारसाने प्राप्त होणारी संपत्ती मिळत नसे.

कायद्यामध्ये नैतिक तसेच व्यावहारिक दृष्टीने गुलाम हा हीन दर्जाचा माणूस समजला जाई. कोर्टात त्याने दिलेली साक्ष क्वचितच[1] ग्राह्य धरली जात असे. तथापि गुलामाच्या हातून एखादा अपराध घडला तर त्याला एकट्याला त्याबद्दल दोषी समजले जात नसल्यामुळे स्वतंत्र माणसाला दिल्या जाणाऱ्या शिक्षेपेक्षा त्याला अपराधाबद्दल निम्मी शिक्षा दिली जाई. मात्र त्याने दुसऱ्या गुलामाचा किंवा स्वतंत्र व्यक्तीचा हेतु-पूर्वक खून केला असेल तर त्याचा बदला त्याचा प्राण घेऊन घेतला जाई. विशेषतः ज्या भांडणात रक्तपात झालेला असेल अशा प्रकरणाच्या बाबतीत स्वतंत्र माणसाच्या हत्येच्या बदल्यात दुसऱ्या स्वतंत्र माणसाचा प्राण घेण्याची, गुलामाच्या प्राणाचा बदला दुसऱ्या गुलामाच्या प्राणाने घेण्याची शिक्षा कुराणामध्ये[2] सांगितली आहे. कुराणातील याविषयीच्या परिच्छेदाविषयी लिहिताना बैदावी म्हणतो,

---

किंमतीचे मालकाचे सामान-सुमान विकण्याचा न्यायाधीशांना अधिकार होता. गुलामाला पोसण्याचे मालकाला सामर्थ्य नसले तर त्याने न्यायाधीशाच्या अनुज्ञेने गुलामाला विकून टाकावे; भाड्याने द्यावे किंवा मुक्त करावे. आणि मालकाला यापैकी काहीच शक्य नसे, तेव्हा गुलामाचा निर्वाह सार्वजनिक पैशातून केला जाई. उन्हाळ्यात कडक गरमी असेल तेव्हा वामकुक्षी करण्याचा गुलामाला हक्क आहे असे स्पष्टपणे सांगितले आहे.

१. कारण प्रत्येक साक्षीदार हा स्वतंत्र, मुस्लिम धर्माचा आणि वेडा असता कामा नये. काही बाबतींत सच्चरित्र गुलामांची साक्ष ग्राह्य मानण्यास परंपरेची परवानगी होती.

२. २, १७३.

"जाहिलियाच्या काळात एकदा दोन टोळ्यांत रक्तपाती झगडा झाला. त्यांपैकी एक जमात आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचा दावा करीत होती. उभय जमातींनी अशी प्रतिज्ञा केली की, आपल्यातील कोणीही गुलाम ठार झाला तर त्याच्या बदली एका स्वतंत्र माणसाला आणि एखादा पुरुष मारला गेला तर त्याच्या बदली एका स्त्रीला मारण्यात येईल. इस्लाम आल्यावर त्यांनी हे प्रकरण मुहम्मदांपुढे निर्णयासाठी नेले. सध्या कुराणात आढळणाऱ्या वचनाचा या प्रसंगी मुहम्मदांना साक्षात्कार झाला आणि त्यांनी अशी आज्ञा केली की, बदला समान न्यायाने घेतला जावा. मात्र गुलामाच्या बदल्यात स्वतंत्र माणसाला मारले जाऊ नये असा या वचनांतून अर्थ निघत नाही किंवा त्याच्या-उलटही अर्थ होत नाही;— आपल्या किंवा दुसऱ्याच्या मालकीच्या गुलामाच्या हत्ये-बदली स्वतंत्र माणसाला ठार मारणे कायदेशीर आहे ही गोष्ट मालिक व शाफी यांना मान्य[1] नाही. पण एकदा केवळ, तशी 'परंपरा' होती म्हणून एका माणसाने आपल्या गुलामाला ठार मारले तेव्हा पैगंबरांनी त्याला चाबकाने फोडून काढले व एक वर्षभर हद्दपार केले. मात्र पैगंबरांनी त्याला त्या खुनाबद्दल मृत्युदण्ड दिला नाही. असे सांगितले जाते की, अली याने या बाबतीत "संरक्षणप्राप्त मुसलमानेतर माणसाच्या हत्येसाठी मुसल्मानाला इस्लाममध्ये ठार मारले जात नाही किंवा गुलामाच्या हत्येसाठी स्वतंत्र माणसाला ठार मारले जात नाही" असे म्हटले आहे.

एखाद्या स्वतंत्र माणसाने दुसऱ्या स्वतंत्र माणसाच्या गुलामाला ठार मारले तर त्याने गुलामाच्या नातलगाला नुकसानभरपाईदाखल पैसा न देता ज्याचा गुलाम त्याने मारला असेल त्याला त्या गुलामाची मृत्युसमयी जी किंमत असेल ती नुकसान-भरपाईदाखल त्याने द्यावी.[2] यावरून दिसते की, कायदा काहीही असला तरी स्वतंत्र माणसाला आपल्या गुलामाला ठार मारता येत होते. आणि त्याबद्दल त्याला शिक्षा होण्याचे भय नव्हते. गुलामाला विवाहाची परवानगी होती, पण त्यासाठी त्याला आपल्या धन्याची संमती[3] घ्यावी लागे. हनिफी व शाफी यांच्या विधिसंहितेप्रमाणे गुलामाला गुलाम किंवा स्वतंत्र अशा फक्त दोन बायका करण्याची परवानगी आहे. पण मालिकींनी गुलामाला चार बायका करण्याची परवानगी दिलेली आहे. गुलाम व

---

१. उलट पक्षी एखाद्या गुलामाची जाणूनबुजून हत्या झाली असेल तर हनिफींच्या मताप्रमाणे त्याच्या बदल्यात स्वतंत्र माणसाला ठार मारता येते.

२. Shirazi ने Tanbih (पृष्ठ २७१) मध्ये म्हटले आहे की धन्याने आपल्या गुलामाला ठार मारले तर त्याने त्याबद्दल दुसऱ्याचा प्राण घेऊ देऊन भरपाई करण्याची गरज नाही.

३. संमतीविना झालेला असा गुलामाचा विवाह हा परंपरेप्रमाणे अवैध शारीरिक संबंधाचा प्रकार समजला जातो.

स्वतंत्र माणूस या दोहोंमध्ये विवाहाबाबत त्यांनी[१] भेद केलेला नाही. धन्याला आपल्या गुलामावर विवाहाची सक्ती करता येते की नाही याविषयी वेगवेगळी मते आहेत. आपल्या गुलामांच्या विवाहाला त्याने संमती दिलीच पाहिजे अशी त्याच्यावर सक्ती नाही, याबाबत मात्र एकमत आहे. स्वतंत्र व्यक्तीप्रमाणे गुलामालादेखील आपल्या विवाहप्रसंगी महर ( देणगी ) द्यावा लागतो. तो त्याने स्वतःच्या श्रमाने कमावलेला असला पाहिजे. त्याची नवविवाहित बायको गुलाम असेल तर हा महर तिच्या मालकाच्या मालकीचा होतो. गुलाम स्त्री-पुरुषाच्या विवाहसंबंधांतून जन्मलेली संतती हीदेखील गुलाम समजली जाते, आणि त्या संततीवर गुलाम स्त्रीच्या मालकाची मालकी राहते. स्वतंत्र माणसाने, आपल्या मालकीच्या नसलेल्या गुलाम स्त्रीशी लग्न केले तर त्याच्या संततीची मालकी त्या गुलाम स्त्रीच्या धन्याकडे[२] जाते.

स्वतंत्र मुस्लिम व्यक्तीला स्वतःच्या मालकीच्या इस्लामधर्मीय गुलाम मुलीशी विवाह करण्याची परवानगी कुराणात ( ४[२९] ) दिली असली तरी अशा प्रकारच्या विवाहाला न्यायपंडितांनी घातलेल्या बंधनामुळे मर्यादा पडल्या. शाफी विचारपंथाचे तर असे मत आहे की, एखाद्या पुरुषाला स्वतःच्या गुलाम स्त्रीशी लग्न करावयाचे असेल तर त्याने तिला प्रथम स्वतंत्र केले[३] पाहिजे. परंतु गुलाम मुलीशी रखेलीसारखे संबंध ठेवण्यावर मात्र बंधने नव्हती. (उम्म वलाद नसलेल्या) विवाहित गुलाम मुलीची मुले (त्यांचा बाप गुलाम असो की स्वतंत्र माणूस असो गुलाम समजली जात, आणि ती तिच्या धन्याच्या मालकीची होत. उलटपक्षी स्वतःच्या गुलाम स्त्रीला, तिच्यावरील आपल्या मालकी हक्कापोटी एखाद्या मालकाने रखेली म्हणून ठेवले असेल व तिला त्याच्यापासून मुले झाली असतील तर ती गुलाम स्त्री वालाद समजली जात असे, आणि तिच्या मालकापासून तिला झालेली मुले स्वतंत्र समजली[४] जात. परंतु दुसऱ्या पुरुषापासून तिला त्याआधी मुले झाली असतील तर ती मुले

---

१. उत्तर व मध्य आफ्रिकेमध्ये मालिकी विचारपंथाचा सर्वांत जास्त प्रचार आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

२. अवैध संबंधांतून गुलाम मुलीला झालेल्या संततीला हाच नियम लागू होतो.

३. इब्राहिम इब्ने अल् माहदी व गुलामकन्या शारिया या दोघांतील संबंधांची कथा या संदर्भातील एक उदाहरण आहे.

४. हा नियम इस्लाममध्येच अस्तित्वात आला. कारण त्याआधीच्या नियमा-प्रमाणे मुलाचा सामाजिक दर्जा, ' तो ज्या गर्भाशयातून जन्मला त्याप्रमाणेच असतो. ' लेनच्या मते ( थाउजंड ॲन्ड वन नाइटस्, १६२ ) अशा संततीला आपली मुले मानणे न मानणे धन्याच्या मर्जीवर अवलंबून होते. त्यांना त्याने आपली मुले मानली तर ती स्वतंत्र समजली जात व त्यांना इतर मुलांना मिळणाऱ्या सर्व सुखसोयी मिळत. नाही तर त्या मुलांना गुलाम समजले जात असे.

गुलाम समजली जात आणि ती तिच्या धन्याच्या मालकीची होत. धनी आपल्या गुलाम पत्नीला विकू शकत नसे; अथवा तारणावर म्हणून किंवा देणगी म्हणून देऊ शकत नसे. परंतु तिच्याकडून आपली चाकरी करून घेण्याचा त्याला अधिकार असे. तसेच मालक मुस्लिम असेल तर त्याला आपल्या गुलाम बायकोचे तिच्या मनाविरुद्धसुद्धा दुसऱ्याशी लग्न लावण्याचा हक्क होता.

आपल्या दुष्कृत्याबद्दल, उदाहरणार्थ इच्छा नसताना घडलेली मनुष्यहत्या, एखाद्या गुलामाने पश्चात्ताप व्यक्त केला किंवा आपणाला मुक्त करण्याची त्याने मागणी केली आणि तो त्याला पात्र असेल तर त्या गुलामाला मालकाने मुक्त करावे ही गोष्ट कुराणाने[1] व हदिसने प्रशंसनीय मानली आहे.[2] अनेक मार्गांनी गुलाम स्वतंत्र होऊ शकत असे.[3] उम्म वलाद गुलाम स्त्री आपल्या पुरुषाच्या मृत्यूनंतर स्वतंत्र होत असे. त्या पुरुषाची पत्नी अथवा रखेली या नात्याने तिला झालेली संततीही तिच्याबरोबर स्वतंत्र होई. एखाद्या गुलाम स्त्रीचा किंवा पुरुषाचा मालक तिच्या अथवा त्याच्या आधीच्या किंवा नंतरच्या पिढीतील आणि सख्ख्या नात्यातला असेल तर ती किंवा तो गुलाम स्वतंत्र समजला जाई. उदाहरणार्थ, एखाद्या स्वतंत्र केलेल्या बापाला, त्याचाच गुलाम मुलगा एखाद्या धन्याने मृत्युपत्रातील इच्छेनुसार देणगी म्हणून दिला तर तो मुलगा स्वतंत्र होत असे. आपल्या मृत्यूनंतर आपला गुलाम स्वतंत्र होईल असे मालकाने तोंडी किंवा लेखी आश्वासन दिलेले असेल, तरीदेखील गुलामाची मुक्तता होत[4] असे. कुराणात सांगितलेले एक धर्मनिष्ठेचे कृत्य म्हणून एखादा मालक आपल्या गुलामाला स्वातंत्र्य देत असे. तसेच सहज गंमतीने किंवा मनापासून एखाद्या मालकाने "तुला मुक्त केले आहे" असे आपल्या गुलामाला स्पष्ट शब्दात सांगितले असेल तर तो गुलाम स्वतंत्र होऊ शकत असे. त्याचप्रमाणे आपण आपल्या गुलामाला मुक्त केले आहे असे मालकाने दुसऱ्या माणसाजवळ सांगितले असेल तर तो शब्द त्याच्यावर कायद्याने बंधनकारक[5]

---

१. उदाहरणार्थ– ४^{९४}, ५^{९१}, ५^{८९}.

२. कुराण– २४^{३३}.

३. मशिदीसारख्या धार्मिक प्रतिष्ठास्थानाच्या उपयोगासाठी वक्फ म्हणजे देणगी म्हणून एखादा गुलाम मृत्युपत्राद्वारे दिला असेल तर तो कधीच स्वतंत्र होत नसे. कारण वक्फ म्हणून दिलेली वस्तू कायमची दिलेली असते. म्हणून अशा गुलामाला स्वतंत्र करणे म्हणजे भविष्यकाळात त्याच्या सेवेचा ज्यांना उपयोग होणार आहे त्यांना त्याच्या सेवेपासून वंचित करणे होय.

४. परंतु मालक गुलाम विकून आपले आश्वासन रद्द करू शकत असे.

५. अशा प्रकारे स्वतंत्र झालेल्या गुलामाला 'अतिक' या नावाने ओळखले जात असे.

ठरत असे. आपल्या मुक्ततेबद्दल भरपाई म्हणून दोन किंवा तीन हप्त्यांनी पैसे देण्याच्या किंवा चाकरी करण्याच्या अथवा दुसऱ्या एखाद्या अटीवर मालक आपल्या गुलामाची मुक्तता करावयास व तसा करार करावयास राजी असेल तर गुलामाला आपली सुटका करून घेता येत असे. मात्र मुक्तता पैशाच्या मोबदल्यात व्हावयाची असेल तर मालकाने पैसे कमावण्याचा व संपत्ती संपादन करण्याचा हक्क गुलामाला द्यावा[1] लागत असे.

अशा रीतीने स्वतंत्र झालेल्या गुलामाला 'अतिक' (स्वतंत्र माणूस) म्हणत असत किंवा आपल्या पूर्वीच्या धन्याचा तो 'मौला' (आश्रित) आहे असे समजले जात असे. आणि त्याचा मालक त्याचा वली (आश्रयदाता) होत असे. त्याच्या मोबदल्यात मालकाला आश्रितापासून काही लाभ, विशेषतः आर्थिक लाभ घेण्याचा अधिकार होता. आणि आपल्या आश्रिताच्या संरक्षणाची व त्याला आश्रय देण्याची जबाबदारी त्याबद्दल मालकाला घ्यावी लागे. आश्रयदाता मालक आपल्या आश्रिताला कोणत्याही प्रकारे आश्रय देण्यास नकार देऊ शकत नसे, किंवा आश्रय संपुष्टात आणू शकत नसे. आणि मालकाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांवर त्याला आश्रय देण्याची जबाबदारी पडत असे. त्याचप्रमाणे आश्रितालाही आपला आश्रयदाता बदलता येत नसे. आश्रयदाता मृत्यू पावला व त्याला वारस नसेल तर मालकाला किंवा मालकाच्या वारसाला आश्रिताचा वारसा मिळत असे. मात्र मालक धर्माने ख्रिश्चन किंवा ज्यू असेल आणि आश्रित व्यक्ती मुस्लिम असेल तर आश्रिताच्या मालमत्तेचा सार्वजनिक कोषात समावेश केला जात असे. कारण कोणाही बिगरमुस्लिमाला मुस्लिम व्यक्तीपासून वारसा हक्क मिळत नसे. वारसाहक्काचा हा अपवाद वगळता आश्रिताशी असलेले इतर सर्व प्रकारचे संबंध कायम आहेत असे मानले जाई, मग त्या दोघांचे धर्म कोणतेही असोत. एखादे वेळी आश्रयदाता ख्रिश्चन व त्याचा आश्रित मुस्लिम किंवा दोघेही एकाच धर्माचे असत. बंधमुक्त गुलाम आश्रिताची आश्रित म्हणून आपल्या भूतपूर्व धन्याविषयीची असलेली जबाबदारी त्याच्यापुरतीच मर्यादित नसे, तर ती त्याच्या वारसावर, एवढेच नव्हे तर खुद्द त्याच्या बंधमुक्त गुलामांवरही येऊन पडत असे.

मागे म्हटल्याप्रमाणे गुलामी हा आपल्या काळातील सामाजिक व्यवस्थेचा एक स्थायी घटक आहे ही गोष्ट मुहम्मदांच्या लक्षात आली होती. मुहम्मदांनीसुद्धा गुलामीच्या पद्धतीत, आपल्या अगोदरच्या धर्मसुधारकांप्रमाणे बरीच सुधारणा केली तरी ती प्रथा हे समाजरचनेचे एक सामान्य अंग आहे ही गोष्ट त्यांनी गृहीतच धरली होती. तेव्हापासून, मुस्लिम देशांवर युरोपीय राष्ट्रांची सत्ता होती तो अलसा काळ सोडला तर गुलामीची प्रथा मुस्लिम देशांत सदैव चालू होती. गुलामांच्या व्यापारात होणाऱ्या प्रचंड फायद्याच्या आशेने खिलाफतीच्या काळात हजारो काळे व गोरे गुलाम दरसाल आयात केले जात.

---

१. या मार्गाने मुक्त झालेला गुलाम 'मुकातब' या नावाने ओळखला जात असे.

लिबियांतील फेझान भागातून व उत्तर इजिप्तमधून काळे निग्रो गुलाम आणले जात तर गोरे गुलाम मध्य आशियातून किंवा सीरियातून आयात केले जात. काळ्या निग्रोपेक्षा गोरे गुलाम संख्येने कमी आयात होत असल्याने त्यांना जास्त किंमत मिळत असे. युरोपातून, विशेषतः स्पेनमधून आणलेल्या काही अतिशय सुंदर गुलामकन्या बगदादच्या खलिफांच्या जनानखान्यांत पाठविल्या जात. इटालियन बंदरातून गुलामांचा मोठा व्यापार चालत असे. आठव्या शतकात रोममध्ये वेनेशियनांच्या मालकीचा एक गुलामांचा बाजारही होता. व्होल्गाकाठच्या प्रदेशांतून दहाव्या शतकात मध्य आशियाच्या बाजारपेठेत आयात होणारी सर्वांत किंमती वस्तू म्हणजे गुलाम. ऑक्सस नदी-प्रदेशात व विशेषतः समरकंदमध्ये गुलाम आयात होत आणि त्यापैकी उत्तम गुलाम विकत घेतले जात. भूगोलकार याकुबी याने आपण तैग्रीस नदीकाठच्या समारा या शहरात गुलामांचा एक बाजार पाहिल्याचे म्हटले आहे. लांब लांब गल्ल्यांतील घरांतून गिऱ्हाइकांना दाखविण्यासाठी व विक्रीसाठी गुलाम ठेवल्याचे त्याला आढळले होते.

मध्य आफ्रिकेतून आणल्या जाणाऱ्या गुलामांच्या इजिप्त, दक्षिण अरबस्तान व उत्तर आफ्रिका या सर्वांत प्रमुख बाजारपेठा होत्या. इस्लामी सत्ताधाऱ्यांनी गुलामांच्या व्यापारावर कधीच बंदी घातलेली दिसत नाही. सहाव्या ते आठव्या शतकांच्या दरम्यानच्या काळात तुर्क व बार्बरी चाच्यांनी युरोपीय ख्रिश्चन देशांत भयानक लूटमार करून धुमाकूळ घातला होता. या काळांत त्यांनी भूमध्यसमुद्रांतील व स्पॅनिश बंदरांकडे जाणाऱ्या अनेक जहाजांवरील कामगारांना व प्रवाशांना गुलाम करून आणि शेकडो ब्रिटिश नागरिकांना बंदी करून नेले. जहाजावर सक्तीने काम करावयास लावलेल्या व इतरही कैद्यांची पैशाच्या मोबदला देऊन सुटका करण्याची कामगिरी ज्या प्रवाशांवर आणि पाद्र्यांवर सोपवली होती, त्यांनी या प्रकाराची भयंकर वर्णने केली आहेत. परंतु ज्या बंद्यांना खाजगीरीत्या अथवा सार्वजनिकरीत्या कामास लावले जात असे, त्यांची स्थिती काही बाबतींत सुसह्य होती. तुर्की व सागरी चाच्यांच्या मुख्य तळांना ज्या प्रवाशांनी व पाद्र्यांनी भेटी दिल्या, त्यांनी सांगितलेली हकीकत पाहता या प्रकाराबाबत इतर काही प्रवाशांनी व पाद्र्यांनी सांगितलेली माहिती अतिरंजित वाटते. सर्व्हन्टीस हा या चाच्यांनी केलेल्या बंद्यांमधील सर्वांत प्रख्यात बंदी होय. पायांत बेड्या वागवीत अत्यंत दयनीय अशा अवस्थेत पाच वर्षे त्याने बंदिखान्यात काढली.

ख्रिश्चन गुलामांपेक्षा मुस्लिम गुलामांना बऱ्यापैकी वागवले जाई. डब्लू. जी. पाल्ग्रेव्ह या इंग्रज प्रवाशाने १८६२ च्या सुमारास असे नमूद करून ठेवले आहे की, अरबस्तानात त्याला नेहमी फार मोठ्या संख्येने निग्रो गुलाम पहावयास मिळत. तसेच मोठ्या प्रमाणात अनेक मिश्रवंशीय लोक आढळत. त्यावरून निग्रो स्त्रियांना रखेली म्हणून ठेवण्याचा प्रघात होता असे दिसते. गुलामांना मुक्त करणे ही सर्वसामान्य गोष्ट

होती. पालग्रेव्ह म्हणतो, " नागरी स्वातंत्र्य प्राप्त झाले की गुलामांना ताबडतोब लग्न करता येत असे. त्यांची लग्ने लावली जात. मुक्त निग्रो गुलामाला, किंवा ज्याची आई अथवा बाप यांपैकी कोणी तरी एकजण निग्रो किंवा गोरा आहे अशा व्यक्तीला चव्या लोकांच्या उच्च वर्तुळात तत्काळ प्रवेश मिळत नसला, किंवा उच्च वर्गातील अरब टोळीप्रमुख आपली मुलगी काळ्या व्यक्तीला द्यायला तयार होत नसला, तरीसुद्धा इंग्लीश रक्ताच्या समाजातल्याप्रमाणे काळ्या निग्रोला येथे अपात्र व बहिष्कृत ठरवले जात नाही."

पालग्रेव्हनंतर सुमारे पंचवीस वर्षांनी डॉटी यानेही आपणाला गुलामांची परिस्थिती कशी दिसली हे सांगितले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे गुलामांची स्थिती नेहमीच सुसह्य व पुष्कळशी सुखपूर्ण होती. कुटुंबीय आपल्याच गरीब भावांप्रमाणे व मुलांप्रमाणे त्यांचे पालन-पोषण करतात; गुलाम हे धर्मपरायण मुस्लिम कुटुंब-प्रमुखाकडे सोपवलेले ईश्वराचे पाल्यच समजले जात. आणि "त्यांचा धनी अल्लाचे भय बाळगणारा असेल, तर लौकरच तो त्यांना स्वतंत्र करतो आणि काही तरी देऊन त्यांना निरोप देतो."

मिश्रवस्तीच्या पवित्र शहरांतील गुलामांना जास्त कडकपणाची वागणूक मिळत असे, असे मत डॉटीने व्यक्त केले आहे. डॉटीने पुढे असेही म्हटले आहे की, मक्का हे गुलामांचे एक केंद्र होते आणि मक्केची यात्रा करून परत जाणारे यात्रेकरू तेथून इस्लामी जगताच्या वायव्येकडील सर्व भागात गुलाम घेऊन जात असत. "कारण दिवसभर शोधूनदेखील मला पाचसुद्धा गुलाम तेथे दिसले नाहीत". स्नौक हरगोन्ज या नांवाच्या एका विद्वान डच प्रवाशाने सांगितलेली माहिती डॉटीच्या विधानांना पुष्टी देणारी आहे. हा गृहस्थ मक्केतील उलेमांबरोबर सहा महिने राहिला होता. मक्केमधील गुलामांपैकी बरेचसे आफ्रिकन होते. आणि "गुलामांचा व्यापार व मक्केची समाजव्यवस्था या दोन्ही मध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान होते". या गुलामांची विभिन्न वर्गांत विभागणी झालेली होती. त्यांच्यापैकी तुकतुकीत काळ्या रंगाच्या 'नुबियन्स' गुलामांना बांधकाम, खाणकाम आणि तशाच इतर अत्यंत अवघड कामांत जुंपले जात असे. ज्यांच्याकडून इतर सर्वसाधारण कामे करून घेतली जात आणि जे साधारणपणे सुदानमधून आयात केलेले असत ते नुसते 'काळे गुलाम' या नावाने ओळखले जात. सुरवातीला या गुलामांना पुष्कळदा साधे विटा-चुना वाहण्याचे काम दिले जाई. अरबी भाषा चांगली यावी म्हणून त्यांचे मालक त्यांना इमारतीच्या बांधकामावर हाताखालची पोरे म्हणून पाठवीत. त्यांच्यापैकी कमी कुशल गुलाम नुबियन गुलामांप्रमाणे सामान्य मजूरीचे काम करीत आणि बांधकाम वगैरे करणाऱ्यांकडे ते मजुरीने पाठविले जात. इस्लाममधील अत्यावश्यक धर्मविधी तेवढे त्यांना शिकवले जात. ही प्रौढ गुलाम मुले इस्लाममधील धर्मविधींचे फारसे आस्थेने पालन करीत नसले, तरी त्यांच्यात मुसलमान धर्माविषयी कडवी भावना वसत असे. भरपूर व स्वस्त अन्न दिले जात असल्यामुळे त्यांना पोटभर

खायलाप्यायला मिळे. हवामानामुळे कपड्यांची व घरांची फारशी गरज नसे. तरी गरजेपुरत्या या गोष्टी त्यांना दिल्या जात. हे गुलाम स्वतंत्र झाले की पाणक्याची कामे किंवा रोजंदारी करीत. विशेषतः धन्याच्या परवानगीने लग्न केल्यावरदेखील आपणांवरील मालकाचे छत्र कायम राहावे अशीच बहुधा त्यांची इच्छा असे.

इतर चांगल्या निग्रो गुलामांना घरगड्याचे किंवा दुकानातील गुमास्त्याचे काम मिळे. सुस्थितीतील व्यापारी मंडळी घरात कित्येक गुलाम बाळगीत. या गुलामांचे जीवन फारच सुखकारक असे. " हरकाम्या गुलामाचे जीवनही फारसे खडतर नव्हते. ज्या घरात ते चाकरी करीत त्या घरातल्या कुटुंबियांप्रमाणेच ते तेथे राहात. जे चांगल्यापैकी गुलाम दुकानातून काम करीत, त्यांना मालकाच्या विश्वासू सहाय्यकाचे स्थान प्राप्त होत असे. ते नावापुरते गुलाम असत. घरगडी गुलामांना जवळपास नेहमीच विसाव्या वर्षी मुक्त करण्यात येई. घरात काम करीत असताना अनेक मुक्त व गुलाम स्त्रियांशी या गुलामांचा साहजिकच जो संबंध येत असे. त्यामुळे बहुधा त्यांना स्वतंत्र केले जात असावे. शक्य होईल तेव्हा आपल्या गुलामाला राहण्यासाठी घर दिलेच पाहिजे असे प्रतिष्ठित मालक मानीत असत. गुलामाला मुक्त करणे प्रशंसनीय समजले जाई. मुक्ततेनंतरदेखील गुलामाचे मालकाच्या कुटुंबाशी पूर्ववत संबंध राहात. स्वतंत्र केलेल्या गुलामाला जवळपास कोणतेही पद किंवा काम नाकारले जात नसे. जन्मतः स्वतंत्र असलेल्या व्यक्तीशी त्याला समानतेच्या पातळीवरून स्पर्धा करण्याची संधी मिळत असे, आणि अनुभवांती ते या स्पर्धेत नेहमीच हरले असे मुळीच दिसत नाही. कारण कित्येक अतिशय वजनदार नागरिक, घरांचे व दुकानांचे मालक भूतपूर्व गुलाम होते. काळ्या कातडीची त्यांना अडचण होत नसे; (व सध्याही होत नाही.) कारण पुष्कळ नागरिकांची गुलाम रखेल्यांपासून झालेली मुले काळीच असत.

निग्रो स्त्रियांना स्वयंपाकासाठी व घराभोवतालच्या इतर कामाकरिता ठेवीत. पुष्कळदा त्यांना रखेल्या म्हणून ठेवले जाई. ॲबिसीनियन गुलाम स्त्रिया मात्र प्रामुख्याने रखेल्या म्हणूनच ठेवल्या जात. क्वचित त्यांना किरकोळ घरकामही करावे लागे. या ॲबिसीनीयन गुलाम स्त्रियांमध्ये फिकट पिवळ्या रंगापासून गडद तपकिरी रंगापर्यंत सर्व रंगांच्या स्त्रिया असत. निग्रोंपेक्षा ॲबिसीनीयन पुरुष प्रकृतीने नाजुक व हुषार समजले जात आणि त्यांचे अधिक चांगल्या प्रकारे पालनपोषण व शिक्षण केले जाई. व्यापारधंद्यात चाकराची किंवा मदतनीसाची कामे त्यांच्यावर सोपविली जात. सिरकॅसियन स्त्री व पुरुष गुलामांची इस्तंबूलमार्गे आयात केली जाई. या गुलामांना जास्त किंमत द्यावी लागत असल्यामुळे त्यांची संख्या कमी होती; आणि मक्केमधील सार्वजनिक बाजारात त्यांची कधीही विक्री होत नसे.

आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात हा डच लेखक म्हणतो, " अशक्य वाटेल पण हिंदुस्थान व डच वेस्ट इंडीजमधूनदेखील मक्केच्या बाजारात मोठ्या संख्येने गुलाम

येत असतात. जावामधून येणारे गुलाम, सिलिबस व बोर्निओ या इस्लामेतर प्रदेशांतील किंवा निआस बेटामधील असतात. इजिप्तमध्येही ते विकले जातात. कित्येक तरुण हिंदुस्थानी गुलाम तसेच नुकत्याच आणलेल्या चार हिंदी गुलाम मुली मला दिसल्या. त्यांच्या आईबापांपासून त्यांना पळवून आणले होते की काय आणि ते कोणत्या जिल्ह्यातील होते याबद्दल मला निश्चित माहिती मिळू शकली नाही." मक्कायात्रेसाठी येणारे हिंदी यात्रेकरू बहुदा आपल्या मुलांना विकत असावेत. गुलाम मुलांचा पद्धतशीर व्यापार नेहमीच चालत असावा. हिंदुस्थान,[1] ईस्ट इंडीज व आफ्रिका येथून मक्केला यात्रेसाठी येणारे आईबाप येताना आपली मुले विकण्यासाठी आणीत. अशी सुमारे ५००० मुलेमुली दरसाल विकली जात.

१९२५ त मक्केमध्ये इतर व्यवसायांप्रमाणे गुलामांची खरेदी-विक्री चालत होती. "अद्यापदेखील येमेन व आफ्रिकेतून आणि कधी कधी आशिया मायनरमधून कित्येक नवे गुलाम मक्केत आणले जातात. मक्केमधील गुलामांपैकी मुले स्थानिक गुलामांचीच मुले असतात."

ब्रिटिश सरकार आणि इब्ने सौद (नेज्द व हिजाजचा वहाबी राजा) यांच्यामध्ये जेद्दा येथे झालेल्या करारानुसार [मे, १९२७, कलम ७] अरबस्तानामधील गुलामांचा व्यापार बंद करण्याचे ठरले. या दिशेने चालू असलेले प्रयत्न संपूर्ण यशस्वी झालेले नसले,[2] तरी सौदी अरेबियाने मात्र १९३६ मध्ये एक हुकुमनामा काढून नव्या गुलामांची आयात बंद केली. येमेनमध्ये गुलामीच्या पद्धतीला कायद्याची पूर्णपणे मान्यता आहे. कारण ती पद्धत ही शरीयतने संमत केलेली संस्था आहे असे त्याचे मत आहे. ओमानमध्ये व दक्षिणपूर्व अरबस्तानात अगदी अलीकडच्या काळापर्यंत गुलामीची प्रथा सररहा रूढ होती. आणि गुलामांच्या सदैव नशीबी असलेली सामाजिक अपंगता गुलामांना सहन करावी लागे. १८२८ मध्ये दक्षिण अरबस्तानात बर्ट्राम टॉमस हा

१. कायद्याने संमत केलेली गुलामीची पद्धत हिंदुस्थानात १८४३ च्या ५ व्या कायद्यान्वये रद्द करण्यात आली. तरी १ जानेवारी १८६२ पासून इंडियन पिनल कोडमधील गुलामीविषयींच्या कलमांची अमलबजावणी सुरू झाली, तेव्हाच त्या पद्धतीला अखेरचा तडाखा मिळाला.

२. ३ फेब्रुवारी १९२९ च्या 'संडे एक्स्प्रेस'मध्ये एका नाविक अधिकाऱ्याने एक लेख लिहिला होता. त्यात म्हटले होते की लाल समुद्राच्या प्रदेशांत व उत्तर आफ्रिकन किनाऱ्यापलीकडील भागांत गुलामांचा व्यापार अद्याप चालू आहे. तसेच अरबस्तानमध्येही गुलामांचे बाजार पद्धतशीरपणे चालू आहेत. सुदानमधून आलेल्या हजारो गुलामांची तेथे खरेदीविक्री होत असते. शिवाय ॲबिसीनीयन व्यापारी दक्षिण अरबस्तानात विक्रीसाठी गुलाम घेऊन येत असत.

प्रवासी गेला होता. तो म्हणतो की, हिनावी टोळीवाले राहात असलेल्या प्रदेशांतून जात असताना रफिक म्हणजे हिनावी टोळीतील एखादा माणूस आपल्या बरोबर घ्यावा लागत असे. कारण असा माणूस घेणे हे प्रवाशाला एक प्रकारचे संरक्षण होते. आणि तो प्रवासी हा गफारी नावाच्या हिनावींचा शत्रू असलेल्या टोळीतला नाही याचे ते निदर्शक चिन्ह समजले जात असे. याच पद्धतीने गफारी टोळीतील माणसाला बरोबर घेऊन जाणाऱ्या प्रवाशालाही आपले संरक्षण करता येत असे. "फक्त कारा टोळीवाल्यांतच गुलामाला रफीक म्हणून काम करता येते. इतर टोळयांत स्वतंत्र माणसाला ठार मारण्याची व कैद्याला गुलाम करून नेण्याची पद्धत रूढ आहे. गुलामाला व्यापारी मोल असते आणि म्हणून लुटीत मिळविलेल्या उंटाइतके त्याला महत्त्व असते."

अरबस्तानव्यतिरिक्त इतर मुस्लिम देशांपैकी अरबस्तानलगतच्या इराकच्या[१] बाळवंटी प्रदेशात अद्याप गुलामी पद्धत आढळते. १९०८ मध्ये इजिप्त व पॅलेस्टाईनच्या सीमा भागांतील सर्व टोळ्यांमध्ये गुलाम आढळत असत. या गुलामांत केवळ निग्रोच असत असे नाही तर इतर टोळ्यांमधील विशेषतः उत्तर आफ्रिकेतील टोळीवाले गुलाम त्यांत असत. सुदानमधील काही जमातींपाशीदेखील गुलाम आहेत. ते मात्र निग्रो आहेत. सरकारी कायद्याप्रमाणे आता तेथे कोणालाही गुलाम करता येत नाही आणि गुलामाने मुक्ततेची मागणी केली, तर त्याला मुक्त करावे लागते. खरे म्हणजे गुलामांना तेथे इतकी चांगली वागणूक मिळते आणि त्यांची गुलामी इतक्या सौम्य स्वरुपाची आहे की गुलामीतून बाहेर पडावे असे गुलामाला क्वचितच वाटते. अरबाच्या मुलीशी गुलामाला लग्न करता येत नाही एवढेच. गुलाम व स्वतंत्र अरब व्यक्ती यांच्यात फरक केला जात असला, तरी आपल्या गुलामाला एखादी चांगली व विश्वासार्ह गुलाम मुलगी बायको म्हणून मिळवून देण्याची मालक जबाबदारी घेतो. शांततेच्या काळात गुलाम विश्वासाच्या पदांवर काम करतो तर युद्धात तो आपल्या मालकाच्या जोडीने घोड्यावर बसलेला दिसतो.

पुढे पश्चिमेस लिबियन बाळवंटामधील हिरवळीच्या प्रदेशातील सुनुसियाह जमातीत गुलामीची प्रथा हे समाजरचनेचे एक रीतसर अंग आहे. हसनीन बे या इजिप्शियन संशोधकाने १९२४ साली असे लिहिले आहे की, वादाई (फ्रेंच सुदान) या प्रांतातून होणारी गुलामांची आयात बंद झाली असल्यामुळे अलीकडच्या काळात गुलामांच्या किंमती वाढल्या आहेत. वादाईचे फ्रेंच अधिकारी गुलामांच्या व्यापाराला प्रतिबंध घालण्याच्या कामी अतिशय दक्ष असतात.

---

१. प्रस्तुत लेखक लोअर युफ्राटिसच्या किनाऱ्यावरील सुक अल शुयुख येथे सरकारी नोकरीत होता (१९२४). त्या वेळी त्याला एक निग्रो गुलाम (इराकी भाषेत आबेद) भेटावयास आला. सुविख्यात सादुन घराण्यातील आपल्या मालकाची मालकी हक्काची काही प्रमाणपत्रे तो घेऊन आला होता.

कधी कधी बदवी या अडचणीतून मार्ग काढताना दिसतात. बादाईमध्ये जाऊन ते तेथील गुलाम मुलीशी लग्न करतात आणि आपल्या देशात परत आल्यावर तिला सोडचिठ्ठी देतात व विकून टाकतात. काही वेळा बदवी आपल्या ताब्यातील गुलाम मुलीशी लग्न लावतो आणि एखाद्या गुलाम मुलीला अशा बदवीपासून मुलगा झाला म्हणजे ती आपोआप स्वतंत्र होते. बदवीच्या मनात गुलामांच्या काळ्या कातडी-विषयी पूर्वग्रह नसतो. म्हणून एखाद्या टोळीप्रमुखाला गुलाम स्त्रीपासून मुलगा झाला आणि तो (कितीही) काळा असला, तरी त्याला टोळीचे पुढारीपण मिळते. गुलामांची मुले गुलाम मानली जातात. परंतु स्वतंत्र पुरुष आणि गुलाम स्त्री यांची अपत्ये स्वतंत्र समजली जातात. मुलांचा बाप त्यांना दारिद्र्यात सोडून मेला, तरी त्यांना कधीच गुलाम केले जात नाही. मालकांच्या मर्जीतल्या गुलामांची स्थिती तर सुखाची असते. मालक त्याला आपल्या विश्वासातला माणूस मानतो आणि चांगल्या रीतीने वागवितो. पुरुष गुलामाला गुलाम मुलगी विकत घेण्याची परवानगी आहे. वाळवंटातील हिरवळीच्या प्रदेशात आढळणारा अतिशय घाणेरडा गुलाम हा सर्वसाधारणपणे मुक्त केलेला गुलाम असतो. आश्चर्य असे की, स्वतंत्र नसलेले बाकीचे गुलाम त्याला हीन समजतात. आणि त्यालाही आपणाला कोणीच मालक नाही याची शरम वाटत असते.

आणखी पश्चिमेकडे फ्रेंच सहारातील बुरखाधारी तुआरेग जमातीमधील लोकांकडे गुलाम असतात. वास्तविक फ्रेंच प्रदेशात गुलाम बाळगण्याला कायद्याने बंदी[1] आहे. या गुलामांचे दोन प्रकार आहेत. एक घरकामासाठी ठेवलेले गुलाम आणि दुसरे बाहेरच्या कामासाठी ठेवलेले गुलाम. हे दोन्ही प्रकारचे गुलाम ही स्थानिक रूढीगत कायद्याप्रमाणे जंगम संपत्ती मानली जाते. यापैकी पहिल्या प्रकारच्या गुलाम निग्रोंकडून (इकेलान) मुख्यतः बागबगीच्याची व इतर घरकामे करून घेतली जातात. त्यांच्या श्रमाच्या उत्पादनातील निम्मा वाटा त्यांच्या मालकांना व उरलेला वाटा त्यांना स्वतःसाठी व आपल्या कुटुंबियांच्या चरितार्थासाठी मिळतो. हे गुलाम घरातील सर्व कामे करतात. ते कुरणाजवळ राहात असले, तर त्यांना मालकांच्या शेळ्या-मेंढ्या वळण्याचे कामही करावे लागते. दुसऱ्या प्रकारच्या गुलामांना – बुझांना गुरे-ढोरे सांभाळण्याचे, विशेषतः उंट सांभाळण्याचे काम दिले जाते. हे गुलामदेखील पुष्कळदा निग्रो असतात. पण पहिल्या वर्गातील इकेलान निग्रोंपेक्षा ते श्रेष्ठ दर्जाचे समजले जातात. यांपैकी कोणत्याच वर्गातील गुलाम तुआरेग पुरुषांच्या पोषाखात वैशिष्ट्याने आढळणारा तोंडावरचा बुरखा वापरीत नाहीत. कायद्याच्या दृष्टीने गुलाम ही एक मालमत्ता आहे असे मानले जात असले तरी व्यवहारात मात्र त्यांना स्वतंत्र व्यक्तीप्रमाणे संपत्ती बाळगण्याची परवानगी असते. आपणाला स्वतंत्र केले जाईल व गुलामाऐवजी आपल्याला भूमिदासाचा दर्जा दिला जाईल

१. चालू शतकाच्या प्रारंभीच्या काळात मोरोक्को मध्ये गुलाम होते.

अशी त्यांना नेहमी आशा वाटत असते. भूदास हे समाजरचनेतील वरच्या दर्जाचे पद आहे आणि ते पुष्कळदा गुलामांना मिळतेही.[१]

गुलामांना पळवून नेऊन त्यांना विकण्याचा तुर्कोमनांचा मध्य आशियातील कुप्रसिद्ध उद्योग, रशियनांनी बुखारा, कीव्ह व इतर 'खान' राज्ये जिंकून तेथील गुलामी प्रथा बंद करीपर्यंत चालू होता.

कॉन्स्टन्टिनोपलमध्ये स्त्री-गुलामांचा ( निग्रो व सिरकॅसिअन्स या दोन्ही प्रकारच्या स्त्री-गुलामांचा ) व्यापार १९०८ मध्ये नवी घटना लागू होईपयत उघडपणे चालू होता.

गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत ईस्ट इंडीजमध्येही गुलामगिरीची प्रथा जोरात चालू होती. तसेच सिंगापूरमध्ये १८९१ पर्यंत चिनी गुलाम स्त्री-पुरुषांचा व्यापार पद्धतशीरपणे चालू होता आणि त्याला सरकारी संरक्षणही होते. चिनी गुलामांना विकत घेणारे मुस्लिम मालक त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा देत आणि त्या पैकी स्त्रिया व मुलींचा रखेल्यांसारखा उपयोग करीत. गुलाम विकण्याचा प्रत्यक्ष धंदा चिनी लोक ( म्हणजे बिगर मुसलमान ) करीत असले, तरी बहुतांश गुलामांची खरेदी मुसलमान मालकच करीत.

१९३९ मध्ये एका नियतकालिकाने एक बातमी प्रसिद्ध केली होती. तीत म्हटले होते की, जावामधील एका उलेमाने अल अझहरच्या जबाबदार अधिकाऱ्यांना अशी विनंती केली आहे की, एखाद्या मुस्लिम माणसाने आपल्या तरुण मुलाची विक्री करणे आणि त्या मुलाला एखाद्या मुसलमानाने विकत घेणे कायदेशीर आहे काय, यासंबंधी फतवा काढावा. संबंधित अधिकाऱ्यांनी नकारात्मक उत्तर दिले. परंतु या प्रश्नाबाबतचा वाद अगदी अलीकडेपर्यंत चालू होता.

जोहोर येथील राजाच्या मालकीच्या कोकोब बेटातील अरब मळेवाल्यांनी स्ट्रेट्स सेटलमेंटमध्ये जवळपास गुलामीसारखी एक प्रथा चालवली होती. हे गुलाम डच ईस्ट इंडीज बेटांतील होते. ते मक्केला यात्रेसाठी येत. त्यांच्याजवळचा सर्व पैसा प्रवासात संपून जाई आणि परतीच्या प्रवासासाठी त्यांच्याजवळ काही शिल्लक राहात नसे. अरब मळेवाले त्यांना गाठून कामाच्या मोबदल्यात प्रवासासाठी पैसे देण्याचे कबूल करीत. आणि अशा रीतीने त्यांना जवळपास जन्मभर वेठीला धरीत.

ईस्ट इंडीजमधील गुलामगिरीविषयीची ही माहिती ज्या अधिकारी निरीक्षकाने सांगितली आहे आणि मक्केमधील गुलामगिरीप्रथेविषयीच्या ज्या लेखकाच्या माहितीचा

---

१. तुआरेग जमातीमधील गुलामी पद्धतीच्या अवलोकनानंतर लेखकाने असा निष्कर्ष काढलेला आहे की, तुआरेग लोकांकडून युरोपीय नीतितत्त्वाचे उल्लंघन होतच असेल, तर हे तुआरेग लोक गुलामांचा व्यापार करतात यामुळे; ते गुलाम ठेवतात म्हणून नव्हे.

वर सविस्तर उल्लेख केला आहे तो निरीक्षक म्हणतो, "मुस्लिम देशातील गुलामीची प्रथा ही एक प्राचीन संस्था आहे आणि परिस्थितीच्या गरजेतून ती निर्माण झाली आहे. युरोपियन लोकांकडून होणारी निग्रोंची पिळवणुक पहाता या प्रथेत गुलामांना मिळणारी वागणूक चांगली आहे." या निरीक्षकाच्या मताला अनेक प्रवाशांकडून पुष्टी मिळते. त्यांपैकी काहींच्या मतांचा उल्लेख आलाच आहे. या प्रवाशांच्या मते मुस्लिम देशातील गुलामांची परिस्थिती एकंदरीने समाधानकारक आहे. मुस्लिम समाजाची सार्वजनिक सदसदविवेकबुद्धी या वस्तुस्थितीने संतुष्ट होईल की नाही हा आता चर्चेचा विषय होऊ शकत नाही. जसजशी राजकीय आत्मजागृती होईल, तसतशा इस्लामी देशांत अंतर्गत सुधारणा होत जातील अशी अपेक्षा करायला हरकत नाही.[1]

इस्लामी समाजात काही ढोबळ वर्ग आणि वर्गांतर्गत असे काही सामाजिक गट आहेत. ते विभिन्न देशांत व विभिन्न काळांत कोणत्या ना कोणत्या तरी समान हितसंबंधांच्या आधारे बनलेले आहेत. उदाहरणार्थ, कोणतातरी समान हस्तोद्योग, खेळ, धार्मिक सुधारणेचा विचार, राजकीय प्रेरणा, व्यापारविषयक गरज किंवा यांपैकी दोन किंवा अधिक हितसंबंध हे ते आधार होत. विशिष्ट धंदा करणाऱ्यांचे गट आणि व्यावसायिकांचे संघ इस्लामच्या उदयाच्या फार पूर्वीपासून कदाचित अस्तित्वांत असावेत. मध्यपूर्वेतील व उत्तर आफ्रिकेतील बहुतेक प्रत्येक शहरात बाजाराची जी व्यवस्था आहे ती पाहता असे संघ फार पूर्वीपासून अस्तित्वात असावेत असे दिसते. तेथील बाजारात परंपरेने ठरवून दिलेल्या जागीच त्या त्या विशिष्ठ कारागीरांचे विक्रीचे गाळे किंवा कामाचे ठिय्ये असल्याचे दिसते. या प्रत्येक व्यावसायिक संघाचे पदाधिकारी होते आणि संघाचे काम शिस्तीने चालेल याकडे ते लक्ष देत. धार्मिक-राजकीय सत्ताधाऱ्यांनीही 'मुहतासिब' या नावाचे अधिकारी या व्यावसायिक संघांवर देखरेख करण्यासाठी नेमले होते. व्यापारधंदा इमानदारीने केला जावा व इस्लामी कायदेकानूंचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याचे काम त्यांच्यावर सोपवलेले होते.

१४ व्या शतकात अनातोलियामधील आखिया ( भ्रातृसंघ. एकवचन आखि ) या संस्था जे सामाजिक कार्य करीत असत त्याची इराणमधील प्राचीन तालीमसंघांशी तुलना केली म्हणजे वर उल्लेखिलेली व्यावसायिक संघांची परंपरा कशी चालू राहिली होती हे दिसून येईल. या तालीमसंघांचा प्रत्येक शहरात स्वतःचा झुर-खाना किंवा तालीम असे. हे तालीमबाज 'अली बिन अबी तालिब' या आपल्या संताचे एक मोठे चित्र समोर ठेवून आपले पारंपरिक पद्धतीचे व्यायाम करीत असत. या व्यायाम प्रकारांचे वर्णन सादीच्या 'गुलिस्तान' मध्ये सापडते.

---

१. बहुसंख्य मुस्लिम देशांनी गुलामीची प्रथा बंद केली आहे. तथापि अद्यापही अरबी आखातातील देशांत उदा. सौदी अरेबिया, येमेन व ओमान या देशांत ती जोरात चालू आहे. कुवेत व कतारमध्ये मात्र ती नष्ट झाली आहे.

इस्लामच्या सामूहिक जीवनात या संघांपेक्षाही धार्मिक व राजकीय स्वरूपाच्या भातृ-संघांना ( उदा.- तुरुक; एकवचन-तारिक) महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक देशातील इस्लामी समाजाचे हे भातृसंघ हे एक अंग आहे. उत्तर आफ्रिकेमधील अशाप्रकारचे संघ विशेष प्रसिद्ध आहेत. त्यापैकी सुनुसियाह संघ हा विशेष प्रसिद्ध आहे. परंतु शेख हसन अल बन्ना (त्यांचा १९४९ साली खून झाला) यांनी १९२९ मध्ये स्थापन केलेल्या जमीयत इखवान अल्-मुसलीमीन या इजिप्तमधील संघाची कीर्ती फारशी चांगली नव्हती. कोणत्याही भातृसंघात ( तारिक) नाहीत असे फारच थोडे मुसलमान सुदानमध्ये आढळतील. धार्मिक विचारांच्या दृष्टीने हे सर्व संघ सनातनी आहेत. परंतु संख्याबळाने अधिक असलेल्या खातमिया अथवा मिर्घानिया या संघाचा प्रतिस्पर्धी असलेला माहदिया हा संघ मात्र सय्यद सर अब्द अल् रहमान अल् माहदी याने आपण मसीहाचे अग्रदूत आहोत हा जो दावा केला होता तो मंजूर करतो. हा माहदी म्हणजे जनरल गॉर्डनशी लढलेल्या माहदीचा त्याच्या मृत्यूनंतर जन्मलेला त्याचा मुलगा.

यासारखे संघ आणि सुफी किंवा दरवेशी यांचा संघ यांच्यामध्ये अनेकदा निकटचे संबंध असल्याचे आढळते. तुर्कस्तानातील जानिसारी संघांत व बेक्ताशी दरवेशी संघांत जवळचे संबंध होते. या बेक्ताशी दरवेशी संघातील लोक सैन्याबरोबर धर्मोपदेशक म्हणून जात. सोव्हिएट वृत्तपत्रांत केल्या जाणाऱ्या टीकेवरून असे दिसते की मध्य आशियामध्ये अलीकडच्या काळात मुरायदीझम विचाराचा प्रचार बराच वाढलेला असून त्याला धार्मिक संघाचे स्वरूप येत असल्याचे दिसते. [ निधर्मीकरणाच्या अत्युत्साही प्रयत्नांविरुद्ध गरीब मुसलमानांची ही प्रतिक्रिया आहे हे उघड आहे. ]

□ □

प्रकरण २

# इस्लाममधील स्त्रियांचा दर्जा

इस्लामचा उदय अरबस्तानात झाला. इस्लामच्या संपूर्ण विकासावर या वस्तुस्थितीचा ठसा अनिवार्यपणे उमटलेला दिसत असला तरी मुहम्मदांनी आपल्या जमातीमधील स्त्रिया व मुले यांचा दर्जा यासारख्या अतिशय मूलगामी बाबतीत अत्यंत मौलिक अशा सुधारणा करण्यात यश मिळविले. पैगंबराच्या काळात स्त्रिया व मुले यांचे समाजात निश्चित कोणते स्थान होते यासंबंधी फारच अल्प पुरावा उपलब्ध आहे. परंतु कुराण आणि मुहम्मदाच्या काळात रचलेल्या, पण जुनी माहिती असलेल्या पुस्तकातील–विशेषतः गद्य-पद्य वेच्यातील माहितीवरून बरीच अनुमाने काढता येतात. रॉबर्टसन स्मिथ यांनी स्वतः गोळा केलेल्या पुराव्यावरून असे अनुमान काढले आहे की प्राचीन अरबस्तानमध्ये अनेक जमातींत बहुपतित्वाची प्रथा अस्तित्वात होती; आणि जमातींचा कारभार मातृसत्ताक होता. सर्वसाधारणपणे अशा प्रकारची अवस्था असलेल्या समाजात स्त्रियांची संख्या कमी असते असे मानले जाते. तसे असेल तर मुहम्मदाचा उदय होण्यापूर्वीच्या काळात त्यावर काहीतरी उपाय शोधून काढला गेला असावा. स्त्रियांची संख्या मर्यादित ठेवण्याचा कृत्रिम उपाय म्हणून पूर्वी अनावश्यक मुली जन्मतःच पुरून टाकण्याची प्रथा होती. अशाप्रकारे किती प्रमाणात मुली मारल्या जात याची कल्पना नाही. परंतु या प्रथेमागील उद्देश कुराणातील उल्लेखावरून अगदी स्पष्ट होतो. कुराणात मात्र निःसंदिग्ध शब्दांत या चालीस बंदी केलेली आहे. या चालीमागे काहीही हेतू असले तरी मुहम्मदाच्या काळात सार्वजनिक कार्यात स्त्रियांना वरिष्ठ स्थान होते या म्हणण्याला काही पुष्टी मिळत नाही.

लहान मुलींना ठार मारण्याच्या प्रथेच्या मुळाशी प्रारंभी कदाचित बळी देण्याची कल्पना असण्याची शक्यता[1] वाटते. या प्रथेची तर्कसंगत कारणे कालांतराने शोधून काढली

---

१. कुराणामधील ६ १३७ मध्ये असे म्हटले आहे की, "त्यांच्या सोबत्यांनी मुलांना ठार मारणे, त्यांचा नाश करणे आणि त्यांचा धर्म त्यांच्यापासून हिरावून घेणे इत्यादी कित्येक मूर्तिपूजकांची कृत्ये शिष्टसंमत ठरविली आहेत."

गेली असावीत. कधीकधी गरीबीचे कारण सांगितले जाई. आपल्या मुलींना आपण पोटाला काही देऊ की नाही या भीतीपोटी आपण त्यांना मारले असे एक कारण काही वेळा गरीब वर्गातील आईबाप देत असत. तर काही वेळा वरिष्ठ वर्गातील आईबाप आपल्या पोटी जन्मलेल्या आपल्याच रक्तामांसाच्या मुलीचे परकी जमातीमधील मुलाशी लग्न होईल आणि त्यामुळे आपल्या नावाला बट्टा लागेल असे कारण सांगत. मुलींना जन्म देणे नामुष्कीचे[१] आहे, ही तर समजूत होतीच. पण त्याचबरोबर आईबापांना अशीही भीती वाटे की युद्धात आपल्या मुली पळवून नेऊन आपले शत्रू त्यांच्याशी लग्ने लावतील किंवा त्यांना रखेल्या म्हणून ठेवतील. कारण युद्धात जिंकलेल्या बायकांशी लग्ने लावण्याची पद्धत त्या वेळी समाजात सरसहा रूढ होती. या प्रश्नासंबंधीची भावना किती तीव्र होती हे 'हमासा' या बहुतांशाने इस्लामपूर्व अरबी काव्यविषय असलेल्या कविता-संग्रहातील एका कवितेवरील टीकेवरून दिसून येते. त्या टीकेत कबरस्तान हा सर्वात उत्तम पति होय, आणि आपली प्रतिष्ठा सुरक्षित ठेवायची असेल तर मुलीला कबरीत गाडणे उत्तम अशा अर्थाच्या एका प्राचीन म्हणीचा उल्लेख केला आहे. कोणत्याही कारणासाठी ही प्रथा पडली असो, कुराणातील अनेक प्रकटीकरणातून मुहम्मदांनी या प्रथेचा धिक्कार केला असून तिला मनाई केली[२] आहे. त्यामुळे इस्लामच्या प्रारंभीच्या काळातच ही प्रथा अरबस्तानमधून नाहीशी झाली. त्याचप्रमाणे या प्रथेला कारणीभूत समजल्या जाणाऱ्या काही खोट्या सबबीदेखील बऱ्याच अल्पावधीत दूर करण्यात इस्लाम काही अंशी यशस्वी झाला. दारिद्र्य हे बहुधा अनैतिक समजले जात असावे. म्हणूनच मुहम्मदी धर्माने दरिद्री माणसाला दानधर्म करणे हे गौरवास्पद कृत्य आहे असे सांगून व दानधर्माची सक्ती करून दरिद्री माणसाला दारिद्र्यामुळे लागणारा कलंक दूर केला. त्याचप्रमाणे "इस्लाममध्ये कोणीही बंदी असणार नाही" असा सिद्धान्त सांगून युद्धबंदी करून नेण्याच्या अरबांच्या पद्धतीला प्रतिबंध केला. परिणामी युद्धात पकडलेल्या स्त्रियांशी लग्ने लावण्याचा प्रकार हळूहळू बंद झाला. हा प्रकार खुद्द पैगंबराच्या काळातही सर्वत्र बराच प्रचलित होता. बंदी करून आणलेल्या स्त्रियांना बहुधा मोठ्या आदराने व समंजसपणाने वागविले जात असले तरी त्या बंदी असल्यामुळे त्यांना इतर जंगम मालमत्तेचाच दर्जा प्राप्त होत असे. अर्वा बिन अल् वर्द नावाच्या एका इसमासंबंधीच्या एका कथेवरून ही गोष्ट चांगल्या रीतीने सिद्ध होते. हा इसम मुझायाना जमातीमधील एका विवाहित स्त्रीला पळवून आपल्या घरी घेऊन चालला होता. वाटेत एका छावणीत तो थांबला. तेव्हा तेथील लोकांनी त्याला दारू पाजली आणि त्या स्त्रीची मागणी केली. त्याने ती मान्य केली.

---

१. पहा– कुराणातील $१६^{५०-६१}$

२. $६^{१४१}$. "मूर्खपणाने आपल्या मुलांना मारणाऱ्यांचे नुकसान होईल. त्यांची ती चूक होईल." $६^{१५२}$ "गरीबीमुळे तुम्ही तुमच्या मुलांची हत्या करण्याचे कारण नाही. आम्ही तुमच्या व त्यांच्या पोटापाण्याची सोय लावू." याशिवाय $१७^{३३}$ व $८१^{९}$.

वास्तविक त्या स्त्रीची आपणाला हवी तशी विल्हेवाट लावण्याचा त्याला अधिकार होता तरीदेखील दारूच्या नशेतून शुद्धीवर आल्यावर त्याला आपल्या कृतीचे दुःख झाले.

बंदी करून आणलेली स्त्री आणि बंदी करून आणणाऱ्या इसमाकडून तिला झालेली मुले ही दोन्ही त्या इसमाच्या जमातीची समजली जात. त्या स्त्रीवर त्याचा संपूर्ण हक्क राही, फक्त त्याला तिची खुल्या बाजारात विक्री करता येत नसे. ही बाब वगळता इतर सर्व दृष्टींनी ती त्याची जवळपास जंगम मालमत्ताच समजली जात असे.

सर्वच स्त्रियांच्या बाबतीत ही स्थिती असावी. काही मूठभर स्त्रिया सोडून बाकीच्यांना स्वतः आपला पती निवडण्याचे किंवा मामुली किंमतीची मालमत्ता विकण्या-एवढे तरी मर्यादित व्यक्तिस्वातंत्र्य होते की नाही याविषयी शंका आहे. स्त्रियांना उच्च स्थान प्राप्त होते असे सिद्ध करण्यासाठी पुष्कळदा जी उदाहरणे दिली जातात ती अपवादात्मक स्त्रियांची आहेत आणि बहुधा म्हणूनच ती जतन करून ठेवलेली असावीत. अशी अनेक उदाहरणे किताब अल् अघानीमध्ये दिलेली आहेत. उदाहरणार्थ तैय जमातीमधील औस याच्या मुलींची गोष्ट. हारीस बिन औफ नावाचा एक गृहस्थ या मुलींच्या वडिलांकडे लग्नाची मागणी घालण्यासाठी गेला तेव्हा त्याच्या थोरल्या दोन मुलींनी त्याच्याशी लग्न करण्यास नकार दिला. तिसऱ्या आणि सर्वांत लहान मुलीने, बुहायसा हिने लग्नाला संमती दिली. पण त्या गृहस्थाने जेव्हा वैवाहिक संबंधातील पती या नात्याने असलेल्या आपल्या अधिकाराचा अशिष्टपणे आग्रह धरला तेव्हा तिने लग्नाला नकार दिला. तिने विचारले, "मला काय तुम्ही गुलाम मुलीसारखे किंवा युद्धबंद्यासारखे वागविणार आहात ?" अखेर तिने त्याच्याशी लग्न करायला संमती दिली. परंतु केवळ नावाची बायको म्हणून नाही; लग्नाला संमती देताना तिने त्याच्यावर आबस् व धुब्यान या दीर्घकाल परस्परांशी भयानक शत्रुत्व करणाऱ्या दोन जमातींमध्ये शांतता घडवून आणण्याची कठीण कामगिरी लादली.

दुसरे उदाहरण पैगंबराचा नातू हुसेन याची मुलगी सुकायना हिचे दिले जाते. तिने एकामागोमाग चार नवरे केले होते. आणि त्यांची निवड तिने स्वतः केली होती. सुकायना ही उच्च कुळातील असल्यामुळे तिला ही गोष्ट करता आली हे स्पष्टच आहे. पण झैद याची मुलगी आतिका हिचाही या संदर्भात उल्लेख केला जातो. तिने अशाप्रकारे तीनदा लग्न केले होते.

ज्या विवाहित स्त्रियांनी आपल्या नवऱ्यांनी विवाहासंबंधीच्या कायद्याविरुद्ध गुन्हा केला म्हणून त्यांचा त्याग केला आणि त्यामुळे ज्यांना कोणतेही नुकसान सोसावे लागले नाही अशा काही स्त्रियांची या संदर्भात उदाहरणे दिली जातात. उम्म सलाम ही यांपैकीच एक स्त्री होती. आपल्या नवऱ्याचा एका गुलाम मुलीशी संबंध आहे हे लक्षात येताच तिने त्याचा त्याग केला. निदान बदवीमध्ये तरी पुन्हा लग्न करण्यास नकार देण्याचे

विधवा स्त्रीला स्वातंत्र्य होते. मृत पतीच्या शोकसमारंभाच्या वेळी उभे राहून त्याची विधवा आपला या बाबतीतील नकार बोलून दाखवीत असे.

विवाहित स्त्रीवर अन्याय झाला तर तिला तिच्या जमातीमधील रक्ताच्या नात्याच्या लोकांकडे संरक्षण मागता येत असे. बायको प्रतिष्ठित कुटुंबातील असे, तेव्हा तिच्या पतीचे अधिकार निश्चितच नियंत्रित केले जात. पैगंबराची पत्नी आयेषा हिची भाची आयेषा बिन तल्हा हिने आपल्या प्रियकराला – मुसाबला – बराच काळ वाट पहावयास लावल्यावर त्याच्याशी विवाह करण्यास संमती दिली होती. एवढेच नव्हे तर आपण हवा तर गोषा करू किंवा करणार नाही असेही दृढतापूर्वक तिने सांगितले होते.[1] ज्या विवाहपद्धतीत लग्नानंतर पतीचा आपल्या पत्नीवर निश्चित स्वरूपाचा मालकी हक्क प्रस्थापित होतोच असे मानले जात नसे अशा प्रकारच्या विवाह पद्धतीचे अवशेष मुहम्मदांच्या काळातही शिल्लक होते एवढेच फार तर वरील उदाहरणांवरून म्हणता येईल.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की मुस्लिम युगाच्या प्रारंभीच्या काळी अरबस्तानातील स्त्री ही एक तर आपल्या सर्वांत जवळच्या पुरुष नातेवाइकाच्या म्हणजे वडील, भाऊ किंवा इतर कोणाच्या किंवा आपल्या नवऱ्याच्या अधीन असे आणि तिच्यावर त्याचा इतर मालमत्तेवरील अधिकाराप्रमाणेच अधिकार आहे असे मानले जात असे.

पतीचे नैतिक कर्तव्य म्हणून पत्नीची अब्रू संपूर्णपणे तिच्या पतीकडे सुपूर्द केलेली असे; आणि तिचे रक्षण करण्याची जबाबदारी पतीची आहे असे मानले जाई. पत्नी ही पतीची ' मुहसना ' म्हणजे ' संरक्षित स्त्री ' समजली जाई; आणि ही जबाबदारी पार पाडण्यात पती चुकला तर त्याच्या पत्नीने दुसऱ्या पुरुषाशी मैत्री ठेवणे दोषास्पद मानले जात नसे. पतीचे स्वामित्व मान्य केलेल्या विवाह पद्धतीसंबंधीच्या [ या पद्धतीला रॉबर्टसन् स्मिथ या लेखकाने ' ब अल ' विवाह पद्धत म्हटले आहे. ] कायद्याचे पालन व्हावे यासाठी त्या काळात खरे म्हणजे कोणतीही कायदेशीर किंवा ' नैतिक ' शक्ती त्या कायद्यामागे नव्हती. स्वतःच्या जमातीपुरता पुरुषाला त्याच्या पत्नीवर इतर संपत्तीवरील हक्काप्रमाणे हक्क होता; तरी दुसऱ्या एखाद्या जमातीमधील पुरुषाने एखाद्या विवाहित स्त्रीला पळवून नेऊन शीलभ्रष्ट केले तरी त्याचे ते कृत्य बेकायदेशीर अथवा अप्रतिष्ठितपणाचे समजले जात नसे. उलट कवींनी असल्या चोरट्या[1] प्रकरणांचा नेहमीच गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. अर्थात् दुसऱ्याच्या बायकोला भ्रष्ट करणाऱ्या माणसाचा त्या बाईच्या अपमानित नवऱ्याकडून आणि त्याच्या किंवा तिच्या नातेवाइकांकडून बदला घेतला जाण्याचे भय असे.

---

१. बुलाक या इतिहासकाराने यासंबंधी म्हटले आहे, “ बनु तमिम जमातीमधील बायकादेखील परमेश्वरनिर्मित प्राण्यांपैकी सर्वात विकृत प्राणी होत्या. तरीही त्या आपल्या नवऱ्यांच्या अतिशय आवडत्या होत्या.”

मात्र त्या बाईवर कोणी व्यभिचाराचा आरोप केला की तिचे नातेवाइक संतप्त होत. कारण अशा प्रकारचा व्यभिचार कलंकपूर्ण समजला जात नसला तरी व्यवहारात मात्र नवऱ्याने आपल्या बायकोला सोडचिठ्ठी देण्यासाठी ते कारण पुरेसे होत असे. या संदर्भात हिंद बिन अताबा हिचे उदाहरण दिले जाते. कुरेशी जमातीमधील अल् फकी नावाच्या एका पुरुषाशी तिचा विवाह झाला होता. तिच्या तंबूपाशी एकदा एक माणूस संशयास्पद स्थितीत हिंडत असताना तिच्या पतीने पाहिले तेव्हा त्याने तिला तिच्या घरी हाकलून दिले. आपल्या वडिलांच्या घरी ती गेली तेव्हा त्यांनी तिला खरे काय ते विचारले. ते तिला म्हणाले, "हा आरोप खरा असेल तर अल् फकीला ठार मारायला मी कोणाला तरी सांगतो आणि लोकांची तोंडे बंद करतो. आणि आरोप खोटा असेल तर त्याच्यावर– तुझ्या नवऱ्यावर– येमेनमधल्या एखाद्या काहिनापुढे (भविष्य सांगणाऱ्या मौलवीपुढे) खटला भरतो."

स्त्रीला पकडून तिच्याशी लग्न लावण्याच्या पद्धतीशिवाय मुहम्मदांच्या काळात व त्यापूर्वी स्त्रीला विकत किंवा कराराने घेऊन तिच्याशी विवाह करण्याची आणखी एक पद्धत प्रचलित होती. ती बऱ्याच उशीरा चालू झाली असावी. या नव्या पद्धतीमुळे स्त्रियांच्या दर्जात फारसा फरक पडला नाही. लग्नाची मागणी घालणाऱ्या पुरुषाला मागणी घातलेल्या मुलीच्या बापाला किंवा तिच्या जवळच्या नातेवाइकाला काही रक्कम [ याला महर म्हणत ] द्यावी लागे. त्याचप्रमाणे त्या मुलीलाही काही पैसे [ सदाक ] द्यावे लागत. या रक्कमा किती असाव्यात हे निश्चित केलेले नव्हते. लग्नात द्यावयाची मुलगी ही युद्धपेशा करणाऱ्याची आई होण्याची संभावना असेल तेव्हा मोठ्या रकमेने महर दिला जाण्याची शक्यता असे. मुहम्मदांच्या काळापर्यंत या पद्धतीच्या मूळ स्वरूपात काही थोडा बदल झाला होता. तरीही वराने पैसा द्यावा लागत होता. पण तो फक्त वधूला द्यावा लागे. तिच्या बापाला किंवा जवळच्या नातेवाइकाला नव्हे. त्यामुळे महर व सदाक या दोन्ही संज्ञा पर्यायी अर्थाच्या ठरल्या. तथापि स्त्रीचे स्थान व तिची परिस्थिती यांमध्ये त्यामुळे फारच थोडा फरक पडला. अद्यापही स्त्री ही तिच्या पतीची मालमत्ताच समजली जात होती. आणि पतीने तिच्यासाठी पैसे मोजले असल्यामुळे तर तिच्याकडून सेवा करून घेण्याचा आपणाला सर्वस्वी अधिकार आहे असेच पती मानत असे.

इस्लाममध्ये बायकोला महर किंवा सदाक[२] दिला जात असे या गोष्टीचा इस्लाम-

---

१. आर. स्मिथ याचे असे मत आहे की काही रानटी जमातीत असा एक शिष्टाचार रूढ आहे की पतीने आपल्या नवपरिणीत वधूची भेट गुप्तपणाने घेतली पाहिजे. वर उल्लेखिलेल्या प्रेमसंबंधातील चोरटेपणाही याच प्रकारचा आहे.

२. कुराण ४[३] (उत्तर भाग) द्वारे बायकोने सदाकच्या रकमेपैकी दिलेल्या रकमेचा संपूर्ण उपभोग घेण्याचा नवऱ्याला अधिकार दिलेला आहे.

पूर्व आणि इस्लामच्या प्रारंभिक काळात स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार होता की नाही या प्रश्नाशी संबंध आहे. या संबंधातील पुरावे परस्परविरोधी आहेत. परंतु खुद्द मुहम्मदांच्या काळात स्त्रियांना मालमत्तेच्या मालकीचा अनियंत्रित अधिकार नसावा. याच्या पुष्ट्यर्थ असा पुरावा देण्यात येतो की कुराणाच्या[1] भाष्यकारांच्या मतानुसार प्राचीन मदिनामध्ये मृत्युपत्र न करता मरण पावलेल्या नातेवाइकाची मालमत्ता स्त्रियांना वारशाने प्राप्त होत नसे. याबाबतीत मुस्लिम पंडितांनी, विशेषतः प्राचीन काळातील पंडित सोडून इतर कोणाही पंडितांनी पुढे केलेली विधाने पुरावे म्हणून ग्राह्य मानताना सावधगिरी बाळगणे जरूर असते. कारण इस्लाम येण्यापूर्वीच्या काळापेक्षा इस्लामी व्यवस्था किती पवित्र आहे हे दाखविण्याच्या हेतूनेच कधी कधी जाणूनबुजून अशी विधाने केली जातात. आपल्या पतीच्या किंवा नातेवाइकांच्या मालमत्तेत स्त्रियांना वारसाहक्काने वाटा मिळण्याचा अधिकार इस्लाममध्ये कायद्याने दिलेला आहे तर उलट ‘जाहिलिया’च्या काळात (रानटी समाजव्यवस्था होती त्या काळात) जे लोक जमातीने केलेल्या लढाईत कामगिरी बजावीत व जमातीच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचे काम पार पाडीत त्यांनाच फक्त वारसाचा अधिकार होता असे वारंवार सांगितलेले आहे.[2] म्हणून त्या काळात स्त्रियांना वारसा मिळण्याचा किंवा देण्याचा हक्क नव्हता असे मानावयास हरकत नाही. फैज बिन अल् खातिम याच्या उदाहरणावरून या म्हणण्यास पुष्टी मिळते. त्याने युद्धावर जाताना आपल्या आईला देण्यासाठी एक खजुरीची बाग आपल्या एका नातेवाइकाकडे सोपविली होती. त्या बागेचे उत्पन्न तिच्या निर्वाहासाठी खर्च करावयाचे होते. याउलट उदाहरण खदीजा या विधवेचे आहे. तिने मुहम्मदाशी विवाह केला होता. ती श्रीमंत बाई होती. आणि पैगंबराच्या प्रारंभीच्या अनुयायाना अन्न व इतर मदत देण्याच्या कामी तिने पैगंबराना खूपच साहाय्य[3] केले होते. अशी एक पारंपरिक समजूत आहे की खदीजाच्या मृत्यूनंतर मुहम्मदाना अतिशय कष्ट भोगावे लागले आणि काही दिवस तर जवळपास ते भिकेला लागले होते. यावरून असे दिसते की आपल्या नवऱ्याला व मुलीला आपल्या मृत्यूनंतर आपली संपत्ती खदीजा देऊ शकली नाही. वास्तविक ती देणे योग्य झाले असते. परंतु तत्कालीन सक्त रूढीप्रमाणे तिची संपत्ती तिचे जवळचे पुरुष नातेवाईक–भाऊ व त्यांचे मुलगे किंवा तिचे भाचे यांच्याकडे परत गेली.

---

१. उदाहरणार्थ, वारसा कायद्याविषयीच्या कुराणातील ४:१-६ यावरील बैदावी याचे भाष्य.

२. बैदावी याचे कुराणातील ४:८ वरचे भाष्य.

३. त्याचप्रमाणे उम्म सलमाच्या पतीलादेखील तिच्या प्रचंड संपत्तीचा स्वतःसाठी उपभोग घेता आला होता.

तत्कालीन परिस्थितीच्या गरजेपोटीच इतर कायद्यांप्रमाणे मुहम्मदांना वारसा-संबंधीचे कायदेही करणे भाग पडले यात शंका नाही. आपल्या कार्यासाठी आपली माणसे लढाईत लढून मृत्युमुखी पडत असताना जुनी प्रथा तशीच कायम ठेवून आपल्या धर्म-बांधवांच्या बायका–मुलांना त्यांच्या नातेवाइकांच्या फायद्यासाठी निराधार सोडून देता येणे त्यांना शक्यच नव्हते. शिवाय मुहम्मदाचे बहुतेक नातेवाईक त्यांचे विरोधकच होते. अशी एक पारंपरिक[1] कथा आहे की उहूदच्या लढाईत कोणी औस इब्ने सामित नावाचा एक माणूस कामाला आला तेव्हा मृत इसमाच्या विधवेने, आपल्या पतीचे दोघे पुतणे आपल्या पतीच्या संपत्तीवर हक्क सांगत आहेत आणि ती संपत्ती त्यांना दिली गेली तर आपण व आपल्या तीन मुली निराधार होऊ अशी मुहम्मदांकडे तक्रार केली. "आईबापांनी व आप्तेष्टांनी मागे ठेवलेल्या संपत्तीचा काही वाटा पुरुषांना मिळाला पाहिजे आणि स्त्रियांनाही त्यांच्या आईबापांनी व आप्तेष्टांनी मागे ठेवलेल्या संपत्तीचा काही वाटा मिळाला पाहिजे,[2] मग तो थोडा असो की जास्त असो, निश्चित हिस्सा मिळाला पाहिजे" हा परमेश्वरी साक्षात्कार मुहम्मदांना याच वेळी झाला.

कुराणातील याच प्रकरणात मृत्युपत्र न करता मरण पावलेल्या इसमाच्या संपत्तीची कशी व्यवस्था केली जावी यासंबंधी आणखी निश्चित स्वरूपाच्या सूचना करण्यात आल्या आहेत : "तुमच्या मुलाबाळांसाठी ईश्वराने सूचना केलेल्या आहेत : पुरुषाला दोन स्त्रियांच्या वाट्याइतका हिस्सा मिळावा; आणि दोनपेक्षा अधिक स्त्रिया ( म्हणजे मुली ) असतील तर त्यांना ( मृत व्यक्तीने ) मागे ठेवलेल्याचा दोन तृतीयांश हिस्सा मिळावा. आणि एकच मुलगी असेल तर तिला अर्धा वाटा मिळावा."[3] यानंतर आईला द्यावयाच्या हिश्शाचा खास उल्लेख आहे. "तिसरा हिस्सा ( मिळावा ) आणि त्याला ( मृताला ) भाऊ असतील तर त्याने ( मृत इसमाने ) मृत्युपत्राकरवी ( दुसऱ्यांना ) दिलेली संपत्ती व त्याची कर्जे देऊन उरलेल्या ( संपत्तीमधील ) सहावा हिस्सा त्याच्या आईला मिळावा."

नवऱ्याला आपल्या बायकोच्या संपत्तीचा ( तिला मुले नसतील तर ) अर्धा हिस्सा मिळावा. जर तिला मुले असतील तर तिने मृत्युपत्रात दुसऱ्या कोणाला दिलेला वाटा देऊन आणि तिची कर्जे परत करून उरलेल्या संपत्तीमधील चौथा हिस्सा तिच्या नवऱ्यास मिळावा.[4] मृत्युपत्राद्वारे आपल्या मालमत्तेची व्यवस्था करण्याचा पत्नीचा अधिकार यावरून स्पष्ट होतो. त्याचप्रमाणे कुराणातील दुसऱ्या एका आयताद्वारे आपल्या पतीकडून

---

१. बैदावीचे कुराण ४[९] वरील भाष्य.
२. कुराण ४[८].
३. कुराण ४[१२].
४. कुराण ४[१३].

वारशाने संपत्ती मिळण्याचा तिला हक्क होता हे स्पष्ट[१] होते. याचा अर्थ पती व पत्नी या दोघांची त्यांच्या संपत्तीवर संयुक्त मालकी होती असे नाही. पति-पत्नींची आपापल्या मालमत्तेपुरतीच संपूर्ण मालकी होती. तथापि आपल्या अन्न-वस्त्राची योग्य व्यवस्था आपल्या पतीकडून त्याच्या खर्चाने करून घेण्याचा पत्नीला अधिकार होता. शिवाय विवाहित स्त्रीला आपल्या लग्नाच्या वेळी मिळालेल्या महरची रक्कम लग्नातील संपत्तीचा हिस्सा म्हणून आणि सर्वस्वी आपली जिंदगी म्हणून स्वतःजवळ ठेवता येत[२] होती. याबाबतीत असे दिसते की, मुहम्मदांनी तत्संबंधीच्या तेव्हाच्या प्रचलित रूढीला फक्त मान्यता दिली असावी. त्यानी ती प्रथा कायम केली एवढेच नव्हे तर स्त्रियांवर त्यांच्या मालमत्तेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करण्यास प्रतिबंध केला आणि त्या प्रथेची अधिकारकक्षा विस्तृत केली. पतीपासून पत्नीला फारकत मिळण्याचा वास्तविक हक्क असेल, पण आपण तिच्या संपत्तीला मुकू या भीतीने तिचा पती तिला फारकत देत नसेल तर अशा परिस्थितीत पतीने फारकतीस नकार देणे मुहम्मदांनी बेकायदेशीर ठरवले.[३] त्याचप्रमाणे खोट्या कारणासाठी बायकोला फारकत देऊन तिच्या मालकीच्या मालमत्तेचा काही हिस्सा कायद्याच्या सहाय्याने स्वतःसाठी मिळविण्याचा प्रयत्न करणे कुराणाने बेकायदेशीर[४] ठरविले. पुरुषांना सर्वसाधारणपणे "दोन स्त्रियांच्या हिश्श्या-इतका हिस्सा[५]"मुहम्मदांनी ठरवून दिला असला तरी त्यांनी सर्वच स्त्रियांना "त्यांच्या आईबापांनी व नातेवाइकांनी ठेवलेल्या संपत्तीचा हिस्सा[६]" वारशाने मिळण्याचा अधिकार दिला.

असे असले तरी व्यवहारात मात्र इस्लामी कायद्यापेक्षा प्राचीन काळापासूनच्या चाली-रीती कधी कधी बलवती ठरलेल्या दिसतात. उदाहरणार्थ, मोरोक्कोमधील काही जमातींमध्ये मुलींना वारसा-हक्क नाही, आणि सुदानमधील कबाबिश जमातीत फक्त पुरुषांना तो आहे. कबाबिश जमातीमध्ये मृत्यूपूर्वी मृत्युपत्र केले नसेल अशा इसमाची विधवा, त्याच्या मुली, बहिणी व त्याची आई यांना कुराणाने[७] ठरवून दिला आहे तेवढा जरी नाही तरी

---

१. कुराण ४[१४].

२. कुराण ४[३].

३. कुराण ४[२३].

४. कुराण ४[२४].

५. कुराण ४[१२].

६. कुराण ४[८].

७. हलायिद अदीब ( Inside India 1937 ) म्हणतात, "स्त्रियांचा दर्जा व वारसा याविषयींच्या मुस्लिम कायद्याऐवजी लाहोरमधील मुस्लिमांनी तत्संबंधीच ( जुना हिंदु ) रूढीगत कायदाच स्वीकारला आहे... वारसा हक्क मिळावा म्हणून १७० मुस्लिम स्त्रियांनी ख्रिश्चनधर्म स्वीकारला."

संपत्तीचा काही हिस्सा मिळू शकतो. असे काही अपवाद वगळता स्त्रियांना स्वतःच्या मालमत्तेची व्यवस्था करण्याचे अधिकार देऊन मुहम्मदांनी एक निश्चित स्वरूपाची सुधारणा घडवून आणली हे स्थूलमानाने स्पष्ट आहे.

स्त्री-जीवनाच्या अन्य प्रश्नांसंबंधीच्या काही प्रथा व परंपरा फार पूर्वीपासून प्रचलित होत्या. मुहम्मदांनी नवे कायदेकानू करावयाचे योजिले तेव्हा या प्रथांचा व परंपरांचा प्रभाव पैगंबरांच्या विचारांवर अपरिहार्यपणे पडला. अर्थातच स्त्री हा कनिष्ठ दर्जाचा प्राणी आहे या स्त्रीसंबंधीच्या पारंपरिक मूल्यमापनाला मुहम्मद विरुद्ध होते हे अगदी स्पष्ट आहे. अल्लात, अल् ऊझा व अल् मनात या देवतांची पूजा करणाऱ्यांचा धिक्कार करताना मुहम्मद उपरोधिकपणे विचारतात,[1] (काय हो!), तुम्हा लोकांसाठी का मुलगे व परमेश्वरासाठी मुली ? असे असेल तर ती मोठी अन्यायाची वाटणी होय.

दुसऱ्या एका ठिकाणी पैगंबर म्हणतात, "खरोखरच परलोकावर ज्यांचा विश्वास नाही तेच लोक देवदूतांना स्त्रियांची नावे देतात.[2]" ज्या स्त्रिया आपल्या कुटुंबांत जमवून घेत नाहीत, विशेषतः विवाहित स्त्रिया, अशा स्त्रियांच्या बाबतीत तर मुहम्मदानी अधिकच स्पष्ट शब्दांत आदेश दिलेला आहे. अनावर व हट्टी मुलांशी जसे वागतात तशीच वागणूक अशा स्त्रियांना दिली पाहिजे असे मुहम्मदांनी म्हटले आहे. "पुरुष हे स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ आहेत; कारण परमेश्वराचीही पसंती तशीच आहे. ज्या स्त्रिया विकृतपणे वागतात असे तुम्हाला वाटते त्यांना शय्यागृहात नेऊन बडवा. मात्र त्या तुम्हाला शरण आल्या तर त्यांना काही करू नका.[3]"

कुराणातील या परिच्छेदाचे स्पष्टीकरण करताना तेराव्या शतकातील कुराणाचा भाष्यकार बैदावी याने स्त्रियांपेक्षा पुरुष हे निरनिराळ्या बाबतींत कसे श्रेष्ठ असतात हे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. अगदी आजदेखील बैदावीचा शब्द सुन्नी लोक शिरोधार्य मानतात. बैदावी म्हणतो, अल्लानेच एकाला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ ठरविले आहे. उदाहरणार्थ, मानसिक शक्ती व चांगले विचार, कर्तव्ये पार पाडण्याची कुवत आणि परमेश्वरी आज्ञांचे पालन इत्यादींबाबतीत. म्हणूनच भविष्यकथन, धार्मिक नेतृत्व, फकिरी, यात्राविधी, कोर्टात साक्षी देण्याचे काम, पवित्र युद्धातील कामे, प्रार्थनेच्या दिवशी मशिदीत जाणे इत्यादी कामे पुरुषांनाच (अल्लाने) नेमून दिली आहेत. पुरुषांनाच आपले नेते निवडण्याचा अधिकार, तसेच वारशाने मिळणाऱ्या संपत्तीमध्ये जास्त वाटा व तलाकसंबंधीचा निर्णय करण्याचा अधिकार दिला आहे."

स्त्रिया या घराबाहेरील कामे करण्यास अयोग्य आहेत हा जो स्त्रीविषयक सर्व-

---

१. कुराण ५३[२१].
२. कुराण ५३[२७].
३. कुराण ४[३८].

सामान्य मुस्लिम दृष्टिकोण आहे तो यात अतिशय स्पष्टपणे दिसून[1] येतो. तथापि इस्लामी समाजाचा एक घटक एवढी मान्यता मात्र स्त्रियांना दिलेली आहे. कारण आस्तिक पुरुषाप्रमाणेच आस्तिक स्त्रियांनाही स्वर्गप्राप्तीचा लाभ होईल असे मानलेले[2] आहे. पैगंबरांच्या भाष्यकारांचे काहीही मत असले तरी स्त्रियांचे घराच्या चार भिंतींमधील हक्क पैगंबरांनी नाकारलेले नाहीत. स्त्रियांना आईबापांनी आणि नवऱ्याने समजूतदारपणे वागविले पाहिजे, या स्त्रियांच्या हक्काला पैगंबरांच्या मानवतेत स्थान आहे. पतीने पत्नीला द्यावयाच्या वागणुकीच्या बाबतीत पैगंबरांनी सांगितलेल्या तत्त्वाचे पैगंबरांच्या भाष्यकारांनीही अनुकरण केले आहे; आणि नवऱ्याने आपल्या खर्चाने बायकोच्या अन्नवस्त्राची व्यवस्था केली पाहिजे या गोष्टीला कायद्याचे स्वरूप दिले आहे. बायकोने आपल्या नवऱ्यासाठी पैसे कमाविले पाहिजेत असे कधीच समजले जात नव्हते. किंवा घरातल्या लोकांसाठी तिने सूत कातावे किंवा कापड विणावे अशी अपेक्षा नव्हती. बायकोला घरकामासाठी गड्याची जरुरी वाटत असल्यास शक्य तर नवऱ्याने गडी ठेवला पाहिजे. नवऱ्याला एकीपेक्षा जास्त बायका असतील तर त्याने त्यांपैकी कोणा एकीचे, दुसरीची उपेक्षा करून लाड करता कामा नयेत. त्याचप्रमाणे आपल्या बायकोशी संभोग न करण्याची शपथ घेणे हे तलाक घेण्याचा विचार असल्यासारखेच आहे असे समजले जात असे.

ज्या स्त्रीला घरगड्याकडून काम करून घेणे जमत नसेल तिने स्वतः घरदार स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. तसेच नवऱ्याच्या पाहुण्यांना जरी नाही तरी नवऱ्याला जेवण करून घातले पाहिजे. शिवाय तसा स्थानिक रिवाज असेल तेथे तिने आवश्यक तर घराबाहेर पडून शेतातही काम केले पाहिजे, किंवा घरची गुरेढोरे सांभाळली पाहिजेत.

मुहम्मदांच्या ज्या सर्वांत महत्त्वाच्या सुधारणांमुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर प्रभाव पडला त्या सुधारणा स्त्री–पुरुषांतील परस्परसंबंधांविषयीच्या होत्या. कुराणावरून असे दिसते की यहुदी धर्म व ख्रिश्चन धर्म यांविषयी मुहम्मदांना जी माहिती होती त्यानुसार त्या धर्मांतील विवाहविषयक रीतिरिवाजांच्या बरोबरीने इस्लाममधील विवाहविषयक पद्धती आणून ठेवण्याच्या हेतूनेच मुहम्मदांनी विवाहासंबंधीचे कायदे केले असावेत. अर्थात् इस्लामी विवाहपद्धतीची काही वैशिष्ट्ये आहेत. विशेषतः इस्लाममध्ये लग्न हा एक इह-

---

१. इजिप्तचे मुफ्ति शेख मुहम्मद हसनेन मॅखलुफ यांनी एक फतवा काढला होता. त्यानुसार इस्लामी सामाजिक व्यवस्थेत स्त्रियांना मताधिकार देणारी किंवा पार्लमेंटमध्ये निवडून जाण्याचा अधिकार देणारी कोणतीही सत्ता इस्लामी समाजव्यवस्थेला मंजूर नाही. कारण स्त्रिया या गोष्टीसाठी अपात्र आहेत असे इस्लामी कायदा मानतो. यावर ‘इस्लामिक रिव्ह्यू’च्या संपादकाने असे मत व्यक्त केले होते (ऑगस्ट १९५२) की अल् अझहरच्या अधिकाऱ्यांना या प्रकरणी “परंपरेने ठरवून दिलेली प्रथा व इस्लाम–योग्य काय आहे” यात फरक करता आलेला नाही.”

२. कुराण ९ऽ८.

लौकिक (सेक्युलर) करार मानला जातो; धार्मिक विधी मानला जात नाही. कायदेशीररीत्या एका वेळी मुस्लिम पुरुषाला किती बायका करता येतील यासंबंधीचा अशा प्रकारचा निर्बंध हा मुहम्मदांनी केलेल्या नव्या नियमांमधील सर्वांत महत्त्वाचा नियम आहे. एखाद्या अरबाने किती बायका कराव्या हे मुहम्मदपूर्व काळात फक्त त्या अरबाच्या थैलीत किती पैसे आहेत यावर अवलंबून असावे. बायकांच्या दर्जाच्या बाबतीत काही दृढमूल प्रथा अस्तित्वात असल्या तरी अरबाने किती बायका कराव्या याविषयी परंपरेचे किंवा कायद्याचे कोणतेही निर्बंध नव्हते. पुरुषाला एकाच वेळी दोन, तीन किंवा चार बायका करण्याची परवानगी कुराणातील[१] कायद्याने दिली असली तरी एकीपेक्षा अधिक बायकांशी पुरुषाला[२] निःपक्षपातीपणाने वागता येणे कठिण आहे हेही कुराणात मान्य केले आहे. विवाहाच्या संदर्भात 'बायका' म्हणून कुराणात ज्यांचा उल्लेख केला आहे तो 'स्वतंत्र' स्त्रियांच्या संदर्भात असावा. कारण कुराणात असेही सुचविले आहे की एकीपेक्षा अधिक 'स्वतंत्र' स्त्रियांशी लग्न करणे आर्थिकदृष्ट्या अडचणीचे असेल तर एकाच 'स्वतंत्र' स्त्रीशी किंवा एकापेक्षा अधिक गुलाम स्त्रियांशी लग्न करावे. कारण स्वतंत्र स्त्रीपेक्षा गुलाम स्त्रियांच्या निर्वाहासाठी करावा लागणारा खर्च व त्यांना लग्नप्रसंगी द्यावी लागणारी महरची रक्कम जास्त नसते. याबाबतीत स्वतः मुहम्मदांना एक खास परमेश्वरी 'साक्षात्कार' झाला व विवाहासंबंधीचे सर्व निर्बंध आपल्या बाबतीत रद्द करण्याची त्यांना अनुमती प्राप्त झाली आणि त्याद्वारे "पैगंबरांना वाहून घ्यावयास तयार असलेल्या कोणाही आस्तिक स्त्रीशी[३]" विवाह करण्याची त्यांना परवानगी मिळाली. बऱ्याच पूर्वी लेन पूल यांनी म्हटल्याप्रमाणे पुत्रसंतान नसल्यामुळेच[४] [ पैगंबरांना वयात आलेला मुलगा नव्हता ] पैगंबर या गोष्टीस प्रवृत्त झाले असावेत. त्यात विषयासक्ती नव्हती. परंतु स्वतःच केलेले कायदे आपल्या स्वतःसाठी धुडकावून[५] देऊन व दीर्घकालापासून चालत आलेली प्रथा [ दत्तक घेतलेला मुलगा हा सर्व बाबतींत सख्ख्या मुलासारखा समजला जावा ] रद्द करून आपल्याच दत्तक मुलाच्या घटस्फोटीत बायकोशी विवाह करण्याचे मुहम्मदांच्या[६] मनात यावे ही गोष्ट लक्षात घेता या बाबतीत पैगंबरांना पूर्णपणे निर्दोष ठरविता येणार नाही.

विवाहासंबंधीची काही हदिसे या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहेत. साररूपाने ती 'हदिसे' अस्सल असावीत. अनेक बायकांशी लग्न करणे गौरवास्पद आहे, मात्र या बायका शक्यतो स्वतंत्र व कुमारिका असल्या पाहिजेत असे पैगंबरांनीच म्हटले आहे

---

१. ४[३].
२. ४[१२८].
३. कुराण ३३ [४९–५१].
४. कुराण ३३ [४०].
५. कुराण ३३[४].
६. कुराण ३३ [३७].

असे परंपरेने मानले जाते. दुसऱ्या एका हदिसमध्ये असे म्हटले आहे की कोणाही स्त्रीशी तिच्या संमतीशिवाय लग्न करू नये.

जितक्या बायकांशी लग्न करण्याची परवानगी देण्यात आली आहे त्यापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करण्याचा गुन्हा करणाऱ्याला फक्त नरकाग्नीची भीति घातली आहे. याहून दुसरी कोणतीही सजा सांगितलेली नाही. परंतु बेकायदेशीरपणे लग्न झालेल्या पति-पत्नीच्या अपत्याचा काय दर्जा असावा याचा विचार केलेला दिसतो. कुराणात मात्र त्यासंबंधी सांगितलेले नाही. परंतु आज प्रत्यक्ष व्यवहारात पुष्कळशा मुस्लीम देशांतील पुरुष आर्थिक परिस्थितीमुळे एका वेळी एकीपेक्षा अधिक बायका क्वचितच करतात. कारण कायद्याने, प्रथेने आणि गरज म्हणून प्रत्येक बायकोच्या अन्नवस्त्राची व राहण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी लागते. ती करणे सर्वच पुरुषांना शक्य नसते. शिवाय सामाजिक जागृतीमुळे व पाश्चिमात्य शिक्षणाच्या प्रसारामुळे काही इस्लामी देशांनी कोणाही पुरुषाला एका वेळी एकीपेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करणे शक्य होऊ नये अशा प्रकारचा निर्बंधक कायदा कुराणात तत्संबंधी असलेली परवानगी रद्द न करता केला आहे. मुहम्मद अब्दुल्ला ( १८४९–१९०५ ) या सुप्रसिद्ध आधुनिकतावादी समाज-सुधारकाच्या मताप्रमाणे खुद्द पैगंबरांनीच एकपत्नीत्व सक्तीचे केले आहे. कुराणाच्या ४[३],[१२८] या परिच्छेदांच्या आधारे मुहम्मद अब्दुल्ला यांनी हे सिद्ध केले आहे. या परिच्छेदात कोणाही पुरुषाला एकाच वेळी अनेक बायकांना निःपक्ष न्यायाची वागणूक देता येणे शक्य नाही असे म्हटलेले आहे. परंतु मुहम्मद अब्दुल्लांच्या या मताला फारसा पाठिंबा मिळाला नाही. १९२६[१] मध्ये स्विस सिव्हिल कोड लागू करून तुर्कस्तानने बहुपत्नी-प्रथा बंद केली. इजिप्त, सीरिया व इराण या देशांतील निर्बंधक कायद्यांमुळे अनेक बायका करणे अवघड झाले आहे. रशिया व चीनमध्ये बहुपत्नीप्रथा कायद्याने बंद करण्यात आली आहे. तथापि मध्य आशियामधील मुस्लीम राज्यात या कायद्याला वारंवार बगल दिली जात असल्याचा पुरावा मिळतो. ज्या देशात इस्लामी कायदा हाच देशाचा कायदा आहे तेथे वारंवार बायका बदलणे सरसहा रूढ आहे. तलाक दिलेल्या बायकोला पोटगी देण्याची नवऱ्याची ऐपत हीच काय ती या बाबतीतील मर्यादा आहे.

शाफी परंपरेतील विधिज्ञांच्या मतानुसार गुलाम पुरुषाला फक्त दोनच बायका करता येतात. कारण कुराणात अनेक बायका करण्याची दिलेली संमती फक्त स्वतंत्र पुरुषापुरतीच मर्यादित आहे असे ते समजतात. शियापंथीयांच्या या संबंधीच्या भूमिकेची चर्चा पुढे येईलच. स्वतंत्र स्त्रियांपुरता शियापंथीयांना शाफींचा हा निर्णय मान्य आहे. परंतु चारापर्यंत 'गुलाम' स्त्रियांशी लग्न करावयास हरकत नाही असे शियांचे मत आहे.

---

१. बहुपत्नीत्व प्रथा इस्लाममध्ये कायदेशीर मानली असल्यामुळे तुर्कस्थानमध्येही ती तशी अद्याप चालू आहे. परंतु पहिल्या पत्नीलाच सरकारची कायदेशीर मान्यता मिळते.

कुराणातील नियम पाहता स्त्रियांना अनेक पती करता येत नाहीत. त्यांना एकच पती करता येतो. कोणत्या स्त्रीशी विवाह करावा याबाबतीत परंपरा व कुराण यांनी काही बंधने घातलेली आहेत. इस्लामपूर्व काळामध्ये बहुसंख्य अरबी जमातींत स्वतःच्या कुळातील स्त्रीशी किंवा पुरुषाशी लग्न लावण्याच्या पद्धतीसारखी पद्धत प्रचलित होती. उदाहरणार्थ, भाच्याशी किंवा पुतण्याशी लग्न. पुरुषाला त्याच्या चुलत बहिणीशी ( बिन अम्मा ) लग्न करता येत असे. आणि ती त्याची थोरली बायको समजली जात असे. त्या पुरुषाने आणखी बायका केल्या व त्या त्याच्या अधिक आवडत्या बनल्या तरीदेखील पहिली बायकोच घरादाराची खरी मालकीण समजली जाई. अशाप्रकारे आपल्याच कुळात लग्नसंबंध जोडणे बहुधा यासाठीच पसंत केले जात असावे की त्यामुळे मुलीच्या नवऱ्यावर तिच्या आप्तेष्टांना नियंत्रण ठेवणे सोपे जात होते आणि आपल्या टोळींची मालमत्ता दुसऱ्या टोळीवाल्यांकडे जाण्याचे टळत होते. अशा लग्नामुळे स्त्रीला होणारी मुले टोळीतच राहात हा आणखी एक फायदा होता. आपल्या चुलत किंवा आतेभावाशी विवाह करण्याची इस्लामपूर्व काळात स्त्रीवर सक्ती करता येत नव्हती. फक्त पारंपरिक प्रथेच्या आधारानेच तशी सक्ती करणे शक्य होते. कोणत्याही कायद्यात न सापडता स्त्रीला अशा लग्नाला नकार देता येत असे. परंतु चुलतभावाचा आपल्या चुलत बहिणीवर हक्क आहे अशी अतिशय दृढ समजूत होती व तिला सर्वसाधारण मान्यताही होती. आपली मुलगी आपल्या भावाच्या मुलाशी लग्नाला तयार होईना तेव्हा एकदा एका बापाने आपल्या मुलीची कानउघाडणी केली अशी एक कथा सांगितली जाते. बाप पोरीला म्हणाला, "तो तुझ्या चुलत्याचा मुलगा आहे आणि त्याचा तुझ्यावर सर्वप्रथम अधिकार आहे."

इस्लामने ही पद्धत कायम केली आणि त्यामुळे तिला कायद्याचे महत्त्व प्राप्त झाले. फक्त चीनी मुस्लिमांत ही पद्धत नाही. तेथील स्थानिक रूढीनुसार तिला मनाई आहे. हनफी परंपरेतील विधिज्ञांच्या मते एखाद्याने आपल्या भावाच्या मुलाला आपली अज्ञान मुलगी लग्नात दिली तर त्या मुलीला ऋतू प्राप्त झाल्यावर तो लग्नसंबंध रद्द करण्याची मागणी करता येणार नाही. तिच्या नवऱ्याला मात्र वाटले तर तसे करता येईल. अर्थात् काही कायदेपंडितांचा याच्याशी मतभेद आहे.

थोडक्यात, मूर्तिपूजक[१] स्त्री सोडून कोणाही स्त्रीशी विवाह करणे कुराणाप्रमाणे कायदेशीर आहे. या संदर्भात असाही स्पष्ट निर्देश आहे की "किताबी लोकांतील नैतिकदृष्ट्या निर्दोष स्त्रियांशी" लग्न[२] करणे कायदेशीर आहे. या पात्रतेचा जो अन्य संदर्भात उल्लेख आला आहे त्यावरून ज्यू, ख्रिश्चन्स व सेबियन्स [ सेबियन्सच्या बाबतीत पैगंबरांचा विचित्र गैरसमज झालेला दिसतो. ] हे ईश्वरदत्त धर्मग्रंथ लाभलेले लोक पैगंबरांना अभिप्रेत असावेत असे दिसते. हनिफी कायदेपंडितांनी कुराणातील या वाक्याचा

---

१. कुराण २^२२०.

२. कुराण ५^७.

आधार घेऊन, कुराणात परवानगी आहे तेवढ्या संख्येने ज्यू किंवा ख्रिश्चन स्त्रियांशी मुस्लिम माणसाला लग्न करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. याउलट शाफींनी कोणाही पुरुषाला " नास्तिक स्त्रिया आपल्या अधिकारात ठेवता येणार नाहीत "[1] या कुराणातील वचनाच्या आधारे कोणाही मुस्लिम पुरुषाला बिगर मुस्लिम स्त्रीशी विवाह करण्यास जवळपास प्रतिबंध केला आहे. या बाबतीत शाफींना एका हदिसचा पाठिंबा आहे. अर्थात् खुद्द पैगंबरांनी फक्त आस्तिक स्त्रियांशीच लग्ने केली असे मात्र दिसत नाही.

तथापि मुस्लिम स्त्रियांना आस्तिक पुरुषाशिवाय कोणाशीही लग्न करता येत नाही हा नियम पारंपरिक प्रथेद्वारे तर लागू होतोच पण कुराणातील एका आयताचाही त्यासाठी आधार घेतला जातो.[2] या वचनाप्रमाणे आस्तिक स्त्रीला मूर्तिपूजक पुरुषाशी लग्न करण्यास मनाई आहे. त्याचप्रमाणे इस्लामवर श्रद्धा असलेल्या ज्या स्त्रिया अश्रद्ध नवऱ्यापासून[3] आपली सुटका करून घेऊन पळून आल्या असतील त्यांना परत त्यांच्या अश्रद्ध नवऱ्याकडे पाठविण्यास मनाई करणारा मुहम्मदांना झालेला साक्षात्कार कुराणाने लागू केला आहे. तुर्कस्तानातील नवीन सिव्हिल कोडमध्ये मुस्लिम स्त्रीला बिगर मुस्लिम पुरुषाशी लग्न करावयास मनाई नाही. परंतु तिच्या नियोजित पतीने लग्नापूर्वी इस्लामधर्माचा स्वीकार केला पाहिजे असा रूढीचा मात्र आग्रह आहे. जुन्या करारात ज्या विशिष्ट प्रकारच्या नातेवाइकांशी लग्न करणे निषिद्ध ठरविले आहे त्या नातेवाइकांशी काही अपवाद वगळून लग्न करावयास इस्लाममध्येही मनाई आहे. मुहम्मदांनी या पारंपरिक प्रथेमध्ये सर्वांत तीव्र स्वरूपाचा बदल केला. जाहिलियाच्या काळात कोणाशी लग्न करावे याबाबत त्यामानाने थोडे निर्बंध होते. आपल्या विधवा सावत्र आईवरही वारसा हक्काने मुलाचा अधिकार पोचत असे. तिच्याशी त्याला स्वतःला लग्न करता येत असे किंवा दुसऱ्या एखाद्या पुरुषाशी तिचे लग्न लावून देता येत असे. या संदर्भात एका घटनेची नोंद केली गेली आहे. अबु अल् अर्सी याने आपल्या बापाच्या मृत्यूनंतर आपल्या सावत्र आईचा 'वली' या नात्याने तिच्या सावत्र मुलाशी म्हणजे आपल्या सावत्र भावाशी, अबु अमरशी, विवाह लावून दिला.

तथापि स्वतःच्या जन्मदात्या आईशी विवाह करणे मात्र कधीही कायदेशीर मानले जात नव्हते. स्वतःच्या घटस्फोटित स्त्रीच्या पुनर्विवाहाच्या प्रश्नावरील चर्चा असलेल्या कुराणातील[4] भागाचे जे विवेचन केले जाते त्यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे. तद्देशीय समीक्षकांच्या म्हणण्याप्रमाणे प्राचीन काळी तलाकच्या वेळची घोषणा अशी होती :

---

१. कुराण ६०[१०].

२. कुराण २[२२०].

३. कुराण ६०[१०].

४. कुराण ३३[४] व ५८[२].

"आता तू मला माझ्या आईसारखी आहेस." अशा गौरवपूर्ण शब्दांत नव्या संबंधाचे वर्णन केल्यावर पुरुषाने परत त्या स्त्रीबरोबर बायकोसारखे राहणे बेकायदा समजले जात होते.

आपल्या तलाक दिलेल्या किंवा विधवा आईशी मुलाने विवाह करणे कुराणाने बेकायदा ठरविले. मात्र अशाप्रकारचे लग्न त्याआधीच झालेले असेल तर ते रद्द ठरविले नाही. आधीच ठरलेल्या लग्नासंबंधीचा उल्लेख कुराणात[१] अशा शब्दात केला आहे, "जे अगोदरच होऊन गेले असेल ते सोडून"– म्हणजेच जे आधीपासून अस्तित्वात आहे ते सोडून. एकाच वेळी दोन[२] बहिणींशी लग्न करण्यास मनाई करतानाही याच शब्दांचा प्रयोग केला आहे. त्यावरून कुराणाने अशाप्रकारच्या लग्नास बंदी केली तरी इस्लामपूर्व काळात तशी पद्धत चालू असावी असे दिसते. तसेच मुहम्मदांनी कायदा करून कोणाही पुरुषाला आपल्या मुलींशी, बहिणींशी[३], आपल्या आत्यांशी, मावश्यांशी तसेच भाच्यांशी[४] पुतण्यांशी आणि सुनांशी[५] लग्न करायला मनाई केली. त्याचप्रमाणे एकाच वेळी एखाद्या स्त्रीशी व तिच्या मुलीशी लग्न करावयास बंदी केली. तसेच दुसऱ्या पुरुषाशी जिचे कायदेशीरपणे लग्न झालेले आहे व जी त्याच्याजवळ राहात आहे तिच्याशी विवाह करण्यासही मनाई करण्यात आली.[६] एकाच दत्तक आईचे दूध प्यालेल्या भाऊ-बहिणीच्या किंवा दत्तक आई व दत्तक मुलाच्या लग्नास मनाई करणारी एक वैशिष्ट्यपूर्ण आज्ञा[७] कुराणात आहे.

कुराणातील लग्नासंबंधीच्या तरतुदी अधिक व्यापक बनवून आणि परिणामी त्या बायबलमध्ये पूर्वीपासून असलेल्या तरतुदींच्या अधिक बरोबरीने आणून आपल्या आज्या किंवा आपल्या नाती यांच्याशी तसेच एकाच वेळी एखादी स्त्री व तिची भाची यांच्याशी लग्न करायला इस्लामी कायद्याने प्रतिबंध करण्यात आला. इस्लामी कायद्याच्या पुस्तकात

१. ४[२६].

२. ४[२७].

३. इराणात तत्पूर्वी चालू असलेल्या सामाजिक रिवाजामध्ये त्यामुळे परिवर्तन झाले. कारण तेथील झरतुष्ट्रीयनांची भावा-बहिणीच्या विवाहाला संमती व प्रोत्साहन होते.

४. जुन्याकरारात हे नातेसंबंध लग्नासाठी वर्ज्य केलेले नाहीत. त्यामुळे यहुदी कायद्यांत भाचीशी लग्न करण्यास परवानगी आहे. इराणी कायद्याप्रमाणे पुरुषाला बायकोच्या संमतिशिवाय तिच्या भाचीशी विवाह करता येत नाही.

५. कुराण ४[२६–२७].

६. त्यानंतर केलेल्या कायद्यामुळे स्त्रियांचे एकपतित्व निश्चित झाले.

७. ४[२७].

' शिबार ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका विवाहप्रकारासंबंधी एक स्वतंत्र कलम आहे. आपली स्वतःची मुलगी देऊन त्या बदल्यात दुसऱ्याच्या मुलीशी लग्न करण्याचा करार या ' शिबार ' पद्धतीनुसार करता येत असे. या प्रकारात वधू-वरांच्या बापांपैकी कोणीही हुंडा मागत नाही. आणि खुद्द वधूच्या रूपाने ' महर ' मिळाला आहे असे समजले जाते. इस्लामपूर्वकाळात सरसहा प्रचलित असलेला हा विवाह प्रकार इस्लामी कायद्याने बंद केला. मात्र दोन्ही बाजूंच्या वधूंना लग्नात स्वतंत्रपणे ' महर 'ची रक्कम देण्यात आली असेल तर अशा लग्नाला बंदी नव्हती. ज्या पुरुषाचा दुसऱ्या पुरुषाशी लैंगिक संबंध असेल त्याला त्या पुरुषाच्या आईशी, बहिणीशी किंवा मुलीशी लग्न करण्यास इराणी कायद्यात बंदी आहे.

स्वतंत्र पुरुषाला गुलाम स्त्रीशी विवाह करण्यास कुराणाने संमती दिली असली तरी इस्लामी कायद्याने त्यावर काही निर्बंध घातले आहेत. याआधीच्या प्रकरणात त्यांचा उल्लेख आलाच आहे. मालकाने आपल्या अविवाहित गुलाम स्त्रियांना रखेल्या म्हणून ठेवण्यावर कायद्याचे बंधन नाही. परंतु हनफी कायद्यानुसार ( स्वतंत्र ) पुरुषाला आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या मुलाच्या गुलाम स्त्रीशी विवाह करण्यास बंदी आहे. तसेच ( स्वतंत्र ) स्त्रीला आपल्या पुरुष गुलामाशी विवाह करता येत नाही. म्हणून एखादा पुरुष एखाद्या गुलाम स्त्रीचा नवरा या नात्याने तिचा मालकही बनला तर त्यांचे लग्न रद्द समजले जाते. तिला तो मुक्त करणार नसेल तर त्या पुरुषाला तिचा फक्त मालक म्हणून तिच्याबरोबर राहता येते. मात्र तिच्यावरील सर्व मालकी अधिकार त्याला उपभोगता येतात. त्या स्त्रीला स्वतंत्र केल्यानंतर तिची संमती असेल तर तिला तो परत बायको म्हणून ठेवून घेऊ शकेल. तसेच एखादी स्वतंत्र स्त्री एखाद्या गुलामाची बायको या नात्याने त्याची मालक बनली तर त्यांचे लग्न रद्द ठरते. त्या गुलामाला स्वतंत्र करूनच व त्याच्या संमतीने त्याच्याशी तिला परत लग्न करता येते.

बहुतांश कायदेतज्ञांच्या मताप्रमाणे दुसऱ्याच्या गुलाम स्त्रीशी पुरुषाला पुढील परिस्थितीत विवाह करता येतो; ( अ ) तो पुरुष अविवाहित असला पाहिजे. आणि दुसरी गुलाम स्त्री त्याच्यापाशी रखेली म्हणून असता कामा नये.

( आ ) अतिशय गरिबीमुळे त्याला स्वतंत्र स्त्रीला द्यावा लागणारा ' महर ' देता येत नसेल तर.

( इ ) अविवाहित राहिल्यामुळे तो अनैतिक मार्गाला लागण्याचे भय असेल तर; आणि

( ई ) ज्या गुलाम स्त्रीशी लग्न करायचे ती मुहम्मदी धर्माची असेल तर.

ज्यू किंवा ख्रिश्चन गुलाम स्त्रियांना रखेल्या म्हणून ठेवण्यास प्रतिबंध केलेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्याशी विवाह करायलादेखील हनफींनी संमती दिलेली आहे. फक्त अट एकच की त्यांच्याशी विवाह करणाऱ्या पुरुषाचे अगोदर स्वतंत्र स्त्रीशी लग्न झालेले असता कामा नये.

काही विशिष्ट वेळी स्त्रीने लग्न करणे निषिद्ध ठरवून मुहम्मदांनी आणखी एक सुधारणा केली. बायबलमधील नियमाशी ही सुधारणा बरीचशी मिळती-जुळती आहे. आपल्या शारीरिक अवस्थेचा विचार न करता एखाद्या स्त्रीने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर किंवा पतीने तलाक दिल्यावर तत्काळ लग्न केले तरी ते 'जाहिलिया'च्या काळात कायदेशीर मानले जाई. परंतु तीन मासिक पाळ्या होईपर्यंत, तलाक मिळालेल्या स्त्रीने परत लग्न करता कामा नये असे इस्लामने बंधन घातले.[१] त्याचप्रमाणे विधवेने चार महिने दहा दिवस लग्न करता कामा नये असेहीं बंधन[२] घातले. कारण ती स्त्री गर्भवती आहे की नाही ते समजण्यास एवढा अवधी आवश्यक असतो.[३] ती गर्भवती असेल तर नव्या पतीने ती प्रसूत होईपर्यंत तिच्याबरोबर राहता कामा नये. त्याचप्रमाणे एखादी गुलाम स्त्री मिळाली तर ती गर्भवती नाही अशी खात्री होईपर्यंत पुरुषाने थांबले[४] पाहिजे. ती गर्भवती असेल तर ती प्रसूत होईपर्यंत थांबले पाहिजे. तथापि या काळात त्या स्त्रीला लग्नाची मागणी घालणे कायद्याच्या विरुद्ध समजले जात नाही. मात्र अशी मागणी अप्रत्यक्ष शब्दांत घातली जावी, उघडपणे घालू नये, आणि प्रत्यक्ष विवाह हा कालावधी संपल्यावरच केला जावा.[५]

विधवा नसलेल्या किंवा जिचा प्रथम विवाह होत आहे अशा स्वतंत्र स्त्रीशी विवाह करण्यासाठी अशाप्रकारे वाट पाहण्याची आवश्यकता[६] नसते.

---

१. या कालावधीला कुराणात ( २^२२८ ) 'इद्दा' हे नाव आहे. ताल्मुदीक ( ज्यू ) कायदा अशाच स्वरूपाचा आहे. त्यानुसार घटस्फोटित किंवा विधवा स्त्रीला ९० दिवसांच्या आत पुन्हा लग्न करता येत नाही. कारण त्या अवधीत ती गर्भवती आहे की नाही ते निश्चित ठरते.

२. कुराण २ ^२३४.

३. येथे सांगितलेले कालावधी 'स्वतंत्र' स्त्रियांसाठी आहेत. गुलाम स्त्रियांसाठी हा कालावधी अनुक्रमे दोन मासिक पाळ्यांचा आणि दोन महिने पाच दिवस असा आहे.

४. गुलाम स्त्रीच्या बाबतीतील या वाट पाहण्याच्या कालावधीला 'इस्तिब्रा' म्हणतात.

५. कुराण २ ^२३५.

६. हसन अल् रशीदविषयी सांगितल्या जाणाऱ्या गोष्टीतील एका मुद्याचा यावरून उलगडा होतो. त्याच्या ताब्यात एक गुलाम मुलगी आली. तिच्याशी त्याला ताबडतोब लग्न करावयाचे होते. तेव्हा या बाबतीत त्याने आपल्या अबु युसुफ या काझीचा सल्ला घेतला. तेव्हा काझीने सांगितले की त्या गुलाम मुलीला तू मुक्त केलेस तर तुला तिच्याशी लग्न करता येईल. कारण स्वतंत्र स्त्रीशी लग्न करण्यासाठी 'इस्तिब्रा'ची अट नाही.

इस्लामने लग्नाची वयोमर्यादा ठरवून दिलेली नाही. अगदी लहान मुलांची लग्नेसुद्धा कायदेशीर समजली जातात. मात्र लग्न झालेल्या मुलीला ती विवाहोत्तर संबंधास योग्य होईपर्यंत नवऱ्याकडे पाठविले जात नाही. हनफी कायद्याप्रमाणे वयात येईपर्यंत मुलीला नवऱ्याकडे पाठविता येत नाही. मुलीचा नवरा व तिचा वली, म्हणजे जवळचा नातेवाईक पालक, यांच्यात त्यासंबंधी काही वाद उद्भवला तर त्याची सूचना काझीला द्यावी लागते. काझीने दोन पोक्त विवाहित स्त्रियांकडून मुलीची तपासणी करून घेऊन शारीरिक दृष्ट्या मुलगी विवाहोत्तर संबंधाच्या दृष्टीने योग्य आहे किंवा नाही याची माहिती करून घ्यावी लागते. मुलगी अद्याप फारच लहान आहे असा त्या बायांनी अभिप्राय दिला तर शारीरिकदृष्ट्या विवाहोत्तर संबंधाच्या दृष्टीने योग्य होईपर्यंत तिला आपल्या वडिलांकडे परत पाठविले जाते. मात्र मुलगी वयाने केवढीही असली तरी वाङ्निश्चय करता येतो. प्रत्यक्ष लग्न मात्र नंतर होते. लग्नाचे वय विभिन्न देशांत विभिन्न आहे.

इस्लामी सोव्हिएट रिपब्लिक्समध्ये सरकारने मुला–मुलींचे लग्नाचे किमान वय १८ ठरवून दिले आहे. परंतु उझबेकिस्तानच्या शिक्षण-संचालकांनी १९५० मध्ये मुलीचे लग्नाचे वय १२ किंवा १३ असावे असे सुचविले होते. तुर्कस्तानमधील राष्ट्रीय विधिसंहितेने पुरुषांच्या बाबतीत कमीत कमी १८ वर्षे पूर्ण व स्त्रियांसाठी १७ वर्षे ही लग्नाची वयोमर्यादा ठरवून दिली आहे. तथापि काही विशिष्ट परिस्थितीत १५ व्या वर्षी झालेल्या मुलाच्या किंवा मुलीच्या लग्नास संमती देण्याची मागणी न्यायालयाकडे करता येते. मात्र त्यापेक्षा ही मर्यादा खाली नेली जात नाही. अल्पवयीन विवाह अनिष्ट असल्याची वाढती जाणीव इतर काही मुस्लिम देशांना होऊ लागल्यामुळे तेथेही अलीकडे झालेल्या कायद्यांमुळे असे विवाह करणे अवघड झाले आहे. अशा विवाहांना प्रत्यक्षपणे बंदी घातली गेलेली नाही. कारण तसे करणे पैगंबराच्या 'सुन्ना'च्या विरोधी आहे. परंतु इजिप्तने केले आहे त्याप्रमाणे कार्यपद्धतिविषयक नियमांद्वारे अप्रत्यक्षपणे ही बंदी घालण्यात आली आहे. उदाहरणार्थ, निश्चित केलेली वयोमर्यादा वधू किंवा वराने गाठली नसताना त्यांचे लग्न करण्यात आले तर ते रजिस्टर करून घेतले जात नाही आणि सरकारात रजिस्टर न झालेल्या कोणत्याही विवाहाला विवाहविषयक खटल्यामध्ये न्यायालयाचे साहाय्य मिळू शकत नाही.

इराणमध्ये कोणाही स्त्रीला वयाच्या पंधराव्या वर्षाआधी आणि कोणाही पुरुषाला वयाच्या अठराव्या वर्षाआधी विवाह करता येत नाही. कोर्टामार्फत या वयोमर्यादेत काही प्रसंगी सवलत मिळवता येत असली तरी तेरा वर्षांखालील मुलीच्या बाबतीत किंवा पंधरा वर्षांखालील मुलाच्या बाबतीत सवलत मिळत नाही.

इजिप्तमध्ये मुलीचे १२ व्या किंवा १३ व्या वर्षी लग्न करण्याची रूढी आहे. १६ व्या वर्षानंतर अविवाहित राहणाऱ्या मुली फार थोड्या असतात; आणि १९ हे वय तर तेथे 'म्हातारीचे वय' समजले जाते. इराण व चीनी मध्य आशिया

मध्ये १२ ते १४ हे मुलीच्या लग्नाचे वय समजले जात होते. आणि लिबियन वाळवंटी प्रदेशातील बर्बर लोकांत हीच वयोमर्यादा सरसहा प्रचलित आहे. त्याचप्रमाणे सुदानमधील कबाबिश लोकांत मुलगी ९ ते ११ वर्षांची झाली की तिचा वाङ्निश्चय होतो व नंतर ३–४ वर्षांनी तिचे लग्न केले जाते. वर बहुधा नेहमीच वधूपेक्षा वयाने मोठा असतो. सहारामधील तुआरेग जमातीमध्ये स्त्रियांची लग्नाची वयोमर्यादा इतर पौर्वात्य देशातील स्त्रियांच्या मानाने अधिक असावी. तथापि सर्वसाधारणपणे मुलीच्या लग्नाच्या वाटाघाटी होतात तेव्हा तिच्या वयापेक्षा लग्नासाठी ती शारीरिकदृष्ट्या योग्य आहे की नाही याचाच विचार केला जातो आणि त्यावरच निर्णय अवलंबून असतो.

प्रथम-विवाहाच्या वेळची वधूपरीक्षेची पद्धत काही अपवाद वगळता बहुतेक मुस्लिम देशांत समान आहे. या पद्धतीमध्ये कुटुंबप्रमुख आपल्या घरातील स्त्रियांना गोषामध्ये ठेवतो. उदाहरणार्थ, बगदादमध्ये आधुनिक व सुशिक्षित कुटुंबांतील तरुण आपल्या पत्नीची निवड स्वतःच करतो. तथापि सर्वसामान्यपणे कोणाही भावी वराने आपल्या आईला किंवा दुसऱ्या एखाद्या जवळच्या स्त्री-नातेवाइकाला आपली लग्नाची इच्छा बोलून दाखवायची असते. मग आई किंवा नातेवाईक स्त्री आप्तेष्टांना व मैत्रिणींना बरोबर घेऊन आपणास अनुरूप वाटणाऱ्या मुलीच्या आईकडे जाते आणि तिला आपल्या नवऱ्याशी नियोजित लग्नाविषयी बोलण्याची विनंती करते. मुलीच्या आईला काही कारणासाठी तो विवाहसंबंध पसंत नसेल तर ती उडवाउडवीची उत्तरे देते. त्यावरून तिला काय म्हणावयाचे आहे ते समजते. तसे नसेल तर आपल्या नवऱ्याशी त्याबाबत बोलायला ती होकार देते. पुढे सर्व काही सुरळीत झाले तर मुलीची आई मुलाच्या आईला निरोप पाठवून वाङ्निश्चयाचा विधी करावयास हरकत नसल्याचे कळविते. मुलीचे ते पहिलेच लग्न असेल तर तिला तिच्या लग्नाच्या वाटाघाटीची कल्पना दिली जात नाही आणि तिने कधीही ज्याचे तोंड पाहिलेले नसते अशा मुलाशी तिचे लग्न लावून देण्याचे वचन तिचे आईबाप देत असतात. चांगल्या संस्कारांत वाढलेली कोणीही मुलगी आपल्या आईबापांनी पसंत केलेली निवड बहुधा कधीच नाकारीत नाही. नंतर एक दिवस निश्चित करून त्या दिवशी नियोजित वर आपल्या भागातील इमामाला व मित्रांना घेऊन मुलीच्या बापाकडे जातो व त्याला त्याची मुलगी लग्नात देण्याची औपचारिक विनंती करतो. या वेळी 'महर'संबंधी वाटाघाटी होऊन त्याची रकम निश्चित केली[1] जाते. मग इमाम प्रार्थना म्हणतो; आणि काझीची नियोजित विवाहास परवानगी मागतो. मगच वधू-वरांचा वाङ्निश्चय कायदेशीर समजला जातो.

इजिप्त आणि इतर देशांतील रूढींमध्ये पुष्कळच साम्य आहे; परंतु इतर पारंपरिक प्रथांना जसे काही अपवाद असतात तसे याही रूढीला अपवाद आहेत. लिबिया-

---

१. मोरोको व ट्युनिशियामधील काही जमातींमध्ये 'महर'ची रकम परंपरेने ठरवून दिलेली असते. त्यामुळे त्याबद्दल वाटाघाटी होत नाहीत.

मधील वाळवंटी प्रदेशांतील बदवी जमातीतील वरिष्ठ वर्गातील मुले-मुली सोडून बाकीची एकमेकांत मोकळेपणाने मिसळतात. वरिष्ठ वर्गातील स्त्रियांना एकांतवासात ठेवले जाते. "सामान्यतः मुलगा आपली प्रेयसी निवडतो. तो तिच्या निवासस्थानी जातो. तिला कविता गाऊन दाखवतो. कविता बहुधा त्याची स्वतःचीच असते. मुलीला मुलगा पसंत असेल तर ती बाहेर येते आणि त्याच्या कवितेला उत्तर देते. प्रेयसीसुद्धा पुष्कळदा स्वतःच रचलेल्या कवितेत उत्तर देते." मग तो मुलगा जातो आणि मुलीकडच्या लोकांना भेटून तिची मागणी घालतो. ती मान्य झाली तर हुंडा देतो. प्रेयसी प्रियकराबरोबर पळून गेल्यामुळे रक्तमय कलहही कधीकधी घडतात.

चीनी तुर्कीस्तानमध्येदेखील मुलाला आपल्या वाङ्निश्चयित पत्नीला लग्नाआधी भेटू न देण्याचा प्रघात पाळला जात नाही. कारण मुले-मुली लहानपणापासून एकमेकांना ओळखत असतात. शेजारीच राहणाऱ्या अरबांत होतात तशी तुआरेग जमातीत मुलींची लग्ने ठरवून होत नाहीत. तेथे मुली आपला नवरा आपणच निवडतात; कारण त्या जमातीत स्त्रियांना इतरत्र आढळणार नाही इतके स्वातंत्र्य आहे. प्राचीन काळी यासंबंधी काय रूढी होती याची कल्पना मदीनामधील एका तरुणाविषयीच्या कथेवरून येऊ शकते. त्याच्या एका मुलीशी भेटी होत. तो तिच्या प्रेमात पडला. त्याने आपल्या बापाला व घरातील काही वडिल-धाऱ्या माणसांना मुलीच्या बापाकडे लग्नाची मागणी घालण्याकरिता पाठविले. पण मुलीच्या बापाने त्या लग्नास नकार दिला.

मुलाने आपल्या भावी वधूचा चेहरा व हात पाहावयास शिया कायद्यात परवानगी आहे. परंतु शहा रझा याने कायद्याने गोषापद्धती रद्द करीपर्यंत हा अधिकार क्वचितच प्रत्यक्षात मिळत असे. शहाच्या मृत्यूनंतर या बाबतीतील जुने निर्बंध परत लागू करण्यात आलेले दिसतात. याला फक्त युरोपीयीकरण झालेल्या कुटुंबांचा अपवाद आहे.

लग्नासंबंधीच्या शर्ती ठरविण्याच्या कामात मुलीच्या वलीला विशेष स्थान असते. वराने वधूच्या जवळच्या आप्तेष्टाला वधूची किंमत म्हणून 'महर' देण्याचा रिवाज रूढ ज्या काळी होता, तेव्हापासून वलीला हे स्थान प्राप्त झालेले आहे. मुहम्मदांच्या काळातही वलीच्या या कार्याला बाजारी किंमत होती. वलीचे काम कोणी करावे यासंबंधी कायद्याच्या विभिन्न संप्रदायांची विभिन्न मते आहेत. शाफी संप्रदायानुसार वली हा मुलीचा बाप, आजा किंवा त्याच मालिकेतील त्याआधीच्या पिढीतील कोणीही नातेवाईक असला पाहिजे. मुलीला तसा कोणी आप्तेष्ट नसेल तर मग तिचा भाऊ, भाचा, चुलता किंवा चुलतभाऊ यांना अनुक्रमे वलीचे काम करता येई. आणि यांपैकी कोणीही पुरुष नातेवाईक नसेल तर ते काम काझीने करावयाचे असते. हनफी परंपरेप्रमाणे वली हा जिचा विवाह होणार असेल, त्या स्त्रीचा बाप नाही तर तिचा मुलगा किंवा मग दुसरा कोणीही त्याच मालिकेतील त्यापुढील पिढीचा पुरुष नातेवाईक असला पाहिजे. तसा कोणी नातेवाईक नसेल तर मग दुसऱ्या कोणीही पुरुष आप्तेष्टाने वलीचे काम करावयाचे

असते. आणि यापैकी कोणीच नसेल तर खलिफाने किंवा सुलतानाने वली म्हणून काम करावे. मुहम्मद स्वतःच वलीचे काम करीत असत. नियोजित वधूशी वलीचे कोणतेही नाते असो, कायद्याप्रमाणे (अ) तो मुहम्मदी धर्माचा असला[१] पाहिजे. (आ) वयात आलेला असला पाहिजे. (इ) पुरुष असला पाहिजे. (ई) स्वतंत्र माणूस असला पाहिजे. (उ) निरोगी मनाचा असला पाहिजे. (ऊ) आणि निष्कलंक चारित्र्याचा[२] असला पाहिजे. वलीचे मुख्य काम वधू व वर पक्ष समान दर्जाचे असावेत[३] या तत्त्वाचे पालन होईल याची काळजी घेणे हे असते. तसेच त्याच्याकडे सोपवलेली नियोजित वधू नियोजित वराला तापदायक व अयोग्य आहे की काय, आणि तिच्यामुळे जमातीची अप्रतिष्ठा तर होणार नाही याची त्याला काळजी घ्यावी लागते. 'महर 'पैकी ठरलेला भाग वलीला मिळाला की तो मुलीला नवऱ्याच्या स्वाधीन करतो. आणि त्यानंतर मग इच्छा असेल तर नवरा तिला आपल्या घरी घेऊन जाऊ शकतो. कोणाही स्त्रीचे तिच्या संमतीशिवाय लग्न करू नये अशा अर्थाचे एक हदिस आहे. परंतु हनफी संहितेनुसार " मागणी घालणारा आला आहे " असे सांगून वली अल्पवयीन कुमारिकेचे लग्न लावून देऊ शकतो. मग मागणी घालणारा पुरुष गुलाम असला तरी त्याचा विचार केला जात नाही. तिचे मौन ही संमती समजली जाते आणि तिने अशा लग्नाला संमती दिलेली नसली तरी ते लग्न कायदेशीर मानले जाते[४].

---

१. खिश्चन व्यक्तीच्या मुलीने मुहम्मदी धर्म स्वीकारला असेल तर त्याला वली या नात्याने आपली मुलगी कायद्याने लग्नासाठी देता येत नाही. उलटपक्षी ज्यू किंवा खिश्चन स्त्रीच्या बाबतीत ज्यू किंवा खिश्चन पुरुषाला वली म्हणून काम करता येते.

२. वधू गुलाम असेल तेव्हा शेवटची अट लागू केली जात नाही.

३. शिराझीच्या Tanbih मध्ये कोणाही वलीने त्याच्याकडे सोपवलेल्या मुलीचे तिच्या किंवा अन्य वलीच्या संमतीशिवाय तिच्यापेक्षा गरीब कुळातील मुलाशी लग्न ठरवू नये असे म्हटले आहे. " कुळ, धर्म, व्यवसाय व व्यक्तिस्वातंत्र्य या बाबतींत समानता असली पाहिजे. आणि कोणाही अरब स्त्रीचा इराण्याशी, कुरेशी स्त्रीचा बिगर कुरेशीशी, हाशिमी स्त्रीचा बिगर हाशिमीशी, शीलसंपन्न बाईचा स्वैराचाऱ्याशी, व्यापाऱ्याच्या मुलीचा विणकराशी वगैरे विवाह लावला जाऊ नये." लेन पूल म्हणतो, " समान दर्जा असावा या गोष्टीला फार महत्त्व दिलेले आहे. कोणाही पुरुषाला आपल्यापेक्षा भिन्न उद्योगव्यवसाय करणाऱ्याची मुलगी पत्नी म्हणून बहुधा मिळू शकत नाही. तसेच थोरली बहीण अविवाहित असेल तर तिची धाकटी बहीण लग्नात मिळत नाही."

४. मात्र वली हा त्या पदावर अधिकार असलेला नातेवाईक असला पाहिजे. दुसऱ्या कोणी लावून दिलेल्या लग्नास मुलीने नकार दिला तर योग्य समजले जाते व ते लग्न रद्द ठरते.

शाफींच्या संहितेप्रमाणे कोणाही कुमारिकेच्या विवाहाच्या वेळी तिचा बाप किंवा आजा वली म्हणून काम करीत नसेल तर तिचा विवाह होऊच शकत नाही. तथापि इस्लाममध्ये विवाहाला अतिशय महत्त्व असल्यामुळे मुलगी ज्या धार्मिक विधीच्या परंपरेत वाढलेली असेल, त्याऐवजी दुसऱ्या विधीच्या आधारे वलीसंबंधीची अडचण दूर करण्याची सवलत आहे. अशी सवलत असल्यामुळे अनेक प्रकारच्या नातेवाइकांचा वलींच्या यादीत समावेश करता येतो आणि त्यांतून एकाची निवड करता येते. हनफींच्या धार्मिक नियमाप्रमाणे संपूर्ण वयात आलेल्या स्वतंत्र कुमारिकेचादेखील तिच्या संमतीशिवाय कधीही विवाह लावता येत नाही. इस्लाममधील इतर सर्व धार्मिक विधिपरंपरांनुसार एखाद्या स्त्रीची कौमार्यावस्था कायदेशीरपणे किंवा अन्यथा संपलेली असेल तर तिच्या विवाहासाठी तिच्या संमतीची गरज असते. एकदा वलीचे काम संपले की कायद्याप्रमाणे त्याचा त्या विवाहाशी किंवा विवाहित स्त्रीशी पुन्हा त्या स्त्रीच्या लग्नाचा प्रश्न येईपर्यंत संबंध राहात नाही.

इस्लाममधील इतर बाबींत सर्वसाधारण नियमाला सोडून जसे वर्तन होऊ शकते तसेच वलीच्या बाबतीतील कायद्याचे नियमही सर्वसाधारण व्यवहारात नेहमीच अमलात आणले जातात असे नाही. उदाहरणार्थ, सिस्तानमधील काझी इश्तखी याची वली म्हणून नेमणूक झाली आणि तो आपले काम करावयास गेला तेव्हा वलीचे काम आधीच कोणीतरी करून टाकल्याचे त्याच्या निदर्शनास आले. सांप्रतच्या इराणी संहितेप्रमाणे अठरा वर्षांखालील कोणाही स्त्रीला आपल्या कायदेशीर पालकाच्या संमतीशिवाय आपले लग्न ठरवता येत नाही; आणि ती अठरा वर्षांपेक्षा मोठी असली तरीही आपल्या पहिल्या लग्नाच्या वेळी तिला आपल्या वडिलांची ( किंवा वडील नसतील तर आजाची ) संमती घ्यावी लागते. वडिलांनी संमती दिली नाही तर एका खास स्थापन करण्यात आलेल्या खात्याच्या मध्यस्थीने तिला आपले लग्न ठरविता येते.

याअगोदर दुसऱ्या एका संदर्भात सांगितल्याप्रमाणे गुलाम स्त्रीच्या मालकाला तिचे लग्न तिच्या संमतीशिवाय त्याला योग्य वाटेल त्याच्याशी लावून देता येते. स्वतः मालकालाच तिच्याशी विवाह करावयाचा असेल तर प्रथम तिला गुलामीतून मुक्त करावे लागते; आणि मग तिच्या संमतीनेच तिच्याशी लग्न करता येते. इब्राहिम इब्न अल् माहदी याची गुलाम स्त्री शारिया हिच्याविषयीच्या एका कथेवरून ही गोष्ट स्पष्ट होते. तिच्याशी लग्न करावे असे त्याला तीव्रतेने वाटू लागले. तेव्हा त्याने आपल्या अनेक मित्रांना बोलावले. आणि त्यांच्यासमोर शारियाला आपला बुरखा काढायला सांगितले. मग त्याने आपल्या मित्रांना आपले नाव सांगावयास तिला सांगितले. त्यावर ती म्हणाली, "मी शारिया, तुमची गुलाम." मग त्याने उपस्थितांना तिच्या चेहऱ्याकडे पहावयास सांगून म्हटले, "परमेश्वराशपथ मी तिला स्वतंत्र केले आहे आणि मी तिच्याशी विवाह करणार आहे, आणि दहा हजार दिर्हाम हुंडा देणार आहे. याला तुम्ही साक्षी रहा."

नंतर शारियाकडे वळून त्याने विचारले, " शारिया, इब्राहिम इब्ने अल् माहदीच्या मुक्त केलेल्या स्त्रिये, तुझी संमती आहे का ? "

शारियाने उत्तर दिले, " होय स्वामी. परमेश्वराने मला दिलेल्या देणगीबद्दल त्याला धन्यवाद. " मग त्याने तिला आत जाऊन पाहुण्यांसाठी जेवण आणावयास सांगितले.

प्रत्यक्ष विवाहप्रसंगीच्या विधींना सर्व ठिकाणच्या मुस्लिम समाजात अतिशय महत्त्व आहे. सर्वसामान्यपणे वाङ्निश्चयानंतर काही दिवसांनी विवाहसमारंभ एका ठराविक पद्धतीनुसार केला जातो. उदाहरणार्थ, बगदादमध्ये असा रिवाज आहे की आपल्या वाङ्निश्चित वधूच्या घरी किती स्त्रिया आहेत याची माहिती मिळवून वराने प्रत्येक स्त्रीला पादत्राणांचा एक जोड किंवा दुसरी एखादी वस्तू देणगी म्हणून तसेच मिठाई व बरेचसे रेशमी हातरुमाल पाठवावयाचे असतात. लग्नसमारंभाला येणाऱ्या पाहुण्यांना हे हातरुमाल दिले जातात. वरपक्षाच्या सामाजिक दर्जानुसार कमीजास्त थाटात हा आहेर ताटात भरून अनेक लोक डोक्यावर घेऊन मिरवणुकीने तो नेतात. मिरवणुकीच्या अग्रभागी अरबी पद्धतीचा क्लॅरोनेट व ढोल असलेला बँड असतो. बँडमागे अनेक स्त्रिया चालत असतात. कुत्र्याच्या भुंकण्यासारखा आवाज काढून आनंदाने ओरडत असतात. त्याच दिवशी नवरा-मुलगा साक्षीदारांना आपल्या लग्न कराराला साक्षीदार म्हणून सह्या करण्यासाठी आमंत्रण देतो. लग्नसमारंभातील हा एक अतिशय महत्त्वाचा भाग असतो.

लग्नाच्या दिवशी आमंत्रित पाहुणे वधूच्या बापाच्या घरी जमतात. स्त्रिया जनानखान्यात बसतात तर पुरुष त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या दालनात बसतात. सगळी मंडळी जमली की विवाह लावण्यासाठी बोलाविलेला इमाम वधू व वर पक्षांच्या कुटुंबातील एकेका प्रतिनिधीला बोलावितो. हे दोन प्रतिनिधी त्या लग्नाचे साक्षीदार समजले जातात. लग्नाच्या वेळी त्यांची उपस्थिती प्रथेनुसार अत्यावश्यक मानली जाते. इमाम हासुद्धा धार्मिक विधी करण्यासाठी केवळ प्रथा म्हणून उपस्थित असतो. एरवी मुस्लिम विवाह हा एक इहलौकिक करार असल्यामुळे इमामच्या उपस्थितीची आवश्यकता नाही. लग्नाच्या करारावर वधू-वरांच्या सह्या असत नाहीत. फक्त साक्षीदारांच्या सह्या असतात. साक्षीदार होण्याकरता ज्या अटी ठरवून दिलेल्या आहेत त्यावरून साक्षीदार या पदाचे महत्त्व निदर्शनास येते. वधूच्या वलीप्रमाणे साक्षीदारही पुरुष, स्वतंत्र व्यक्ती, प्रौढ, मुस्लिम व पूर्ण सज्ञान असे असावे लागतात. असे दोन पुरुष– साक्षीदार उपलब्ध नसतील आणि एकच उपलब्ध असेल तर एका पुरुष साक्षीदाराचे काम दोन मुस्लिम स्त्रिया मिळून करू शकतात. मात्र साक्षीदारांपैकी एकजण तरी पुरुष असावाच लागतो.[1]

---

१. वधू ज्या धर्माची असेल त्या धर्माच्या दोन स्त्रियांच्या उपस्थितीत एखाद्या पुरुषाने ज्यू किंवा ख्रिश्चन स्त्रीशी लग्न केले असेल तर ते लग्न कायदेशीर ठरते. ( कुदुरी यांच्या **Mukhtsar** या पुस्तकात पृष्ठ १५० मध्ये सांगितल्याप्रमाणे अबु हनीफा याचे असे मत आहे. )

लग्न-करारावर सह्या झाल्या की मग इमाम वधू व वर पक्षाच्या प्रतिनिधींना करारातील अटी मान्य आहेत की नाही ते औपचारिकपणे विचारतो. आणि मग उभयतांचे अंगठे एकमेकांना चिकटतील अशा पद्धतीने वधू व वराचे हात एकमेकांच्या हातांत देतो. त्यानंतर मग इमाम प्रार्थना म्हणतो. आणि ती संपेपर्यंत त्या अवस्थेत तो त्यांचे हात तसेच धरून ठेवतो. सर्व उपस्थित लोक मग फातिहा ( कुराणातील प्रारंभीचा खंड ) म्हणतात आणि अशा रीतीने लग्नांतील औपचारिक विधीचा भाग संपतो. त्यानंतर मेजवानी होते. मेजवानी हा लग्नविधीचा एक अविभाज्य भाग आहे. इस्लामपूर्व काळापासून मेजवानीची प्रथा प्रचलित आहे आणि तिचा उगम बहुतेक प्राचीन बळीभोजनातून झाला असावा. या मेजवानीला कोणीही निमंत्रित व्यक्तीने योग्य व पुरेसे कारण असल्याशिवाय गैरहजर राहता कामा नये, आणि यजमानाने–वधूच्या बापाने किंवा वलीने या मेजवानीस फक्त श्रीमंत व प्रतिष्ठित मंडळींना न बोलावता विद्वान व धर्मशील व्यक्तींनाही बोलवावे असे सांगितलेले आहे. शक्य असेल तर यजमानाने या प्रसंगी बकरा बळी देणे प्रशंसनीय मानले जाते. तसेच शास्त्राने विधिप्रसंगी निषिद्ध ठरवलेले अन्न मेजवानीचे प्रसंगी पाहुण्यांना दिले जाणार नाही आणि मनाई असलेला थाटमाट ( उदाहरण : सोन्या-चांदीची भांडी वापरणे ) केला जाणार नाही याची यजमानाने काळजी घ्यावयाची असते.

एक करार हे इस्लामी लग्नपद्धतीचे मध्यवर्ती लक्षण आहे. लग्न[1] करारातील

---

१. एफ. एच. रस्स्टन यांच्या ' Maliki Law ( London 1916 ) मध्ये पान ९४ वर खाली दिलेला एक लिखित करार उद्धृत केला आहे. तो या संदर्भात नमुन्यादाखल मानता येईल : " सर्व विश्वांचा स्वामी जो परमेश्वर त्याचा जयजयकार असो.

" सन्माननीय कादीर, पूर्ण वयात आलेला व अल्जीयर्समध्ये राहणारा, व्यवसायाने व्यापारी, सुलेमान याचा पुत्र याने, परमेश्वराच्या कृपेने कुलीन कुमारिका फातिमा, यौवनावस्था प्राप्त झालेली, १८ वर्षांची, अल्जीयर्समध्ये राहणाऱ्या मुहमद बिन अर्सी या विणकराची मुलगी हिच्याशी शुभशकुन म्हणून ३० दीराज हुंडा घ्यावयास तयार असल्याचे लक्षात घेऊन लग्न–करार केला आहे. या हुंड्यापैकी अर्धी रक्कम तत्काळ, लग्न संपण्यापूर्वी आणि बाकीची अर्धी रक्कम चार वर्षांत द्यावयाची आहे. ही रक्कम देण्याच्या जबाबदारीतून नवऱ्याला फक्त कायदेशीर मार्गानेच आपली मुक्तता करून घेता येईल. परमेश्वराने दिलेल्या अधिकारामुळे आणि वधूची मूक संमती मिळवून वधू पित्याने तिच्या वतीने हा करार केला आहे. नवरा स्वतः उपस्थित आहे. त्याने करारास व विवाहाच्या सूचनेस मान्यता दिली आहे. अशा रीतीने कायद्याप्रमाणे आवश्यक अशी त्याची संमती मिळाली आहे." या आधी नमूद केलेल्या सर्व गोष्टींना साक्षीदार आहेत ( दोन साक्षीदारांच्या साक्षी ).

अतिशय महत्त्वाचे कलम, 'महर' किती व कसा असावा यासंबंधी असते. जास्तीत-जास्त किती महर द्यावा याविषयी कायद्यामध्ये सामान्यतः निर्देश नसतो. आणि शाफींनी महरची किमान रक्कमही निश्चित सांगितलेली नाही. ज्या लग्नात वधूला एक दिनारपेक्षा कमी (किंवा दहा[1] दिर्हाम) महर देण्याचे ठरले असेल अशा लग्नाला हनफींची संमती मिळत नाही. महरची ही क्षुल्लक रक्कम एका पारंपरिक समजुतीनुसार दिली जाई. कारण खुद्द मुहम्मदांनीही आपल्या अनेक बायकांना लग्नाच्या वेळी फक्त दहा दिर्हाम हुंडा आणि जाते, पाण्याचा खुजा व इतर लाकडी सामान इत्यादी घरगुती आवश्यक वस्तू दिलेल्या होत्या.[2]

वधू स्वतंत्र स्त्री असेल[3] तरच तिला महरची रकम दिली जाते. वधू गुलाम असेल तर तिचा नवरा गुलाम असो की स्वतंत्र माणूस असो 'महर'ची रकम त्याच्या मालकाची होते. वधू कुमारिका असेल तर तिला मिळणारी 'महर'ची रकम घटस्फोटित किंवा विधवा स्त्रीला मिळणाऱ्या 'महर' पेक्षा पुष्कळच जास्त असते. मक्केमध्ये काय किंवा चिनी तुर्कीस्तानात काय, आधीच्या लग्नाचा अनुभव असलेल्या, चारचौघांपेक्षा दिसायला जास्त चांगल्या, हुशार स्त्रीला फार मागणी असते. तिला चांगला 'महर' मिळतो.

बहुतेक वेळी 'महर'ची रकम एकदम दिली जात नाही. नियोजित वधूच्या वलीशी बोलून त्याबाबतीत ठरविले जाते. लग्नाअगोदर महरपैकी किती रकम द्यावयाची यासंबंधी भिन्न देशात भिन्न रिवाज आहेत. ती कधी अर्धी तर कधी दोन तृतीयांश असते. बाकीची रकम नवरा मेला किंवा त्याने तलाक दिला तर बायकोला देण्यासाठी राखून ठेवली जाते. महरचा ठरलेला पहिला हप्ता मिळेपर्यंत बायको नवऱ्याला नाकारू शकते किंवा त्याच्याबरोबर प्रवासाला जायला नकार देऊ शकते. महरची रकम अगदी मामुली असली तरी तिचा उल्लेख लग्न-करारात केलेला नसेल तर ते लग्न रद्द ठरवणारी एक अतिशय मान्यता–प्राप्त अशी प्रथा रूढ आहे. उत्तर आफ्रिकेतील काही जमातींमध्ये नवऱ्याने आपल्या बायकोला तलाक दिला तरच तो तिला 'महर' देतो. तथापि तेथेही सर्वसाधारणपणे लग्नाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ही रकम दिली जाते.

---

१. प्रचारांत नसलेल्या अगदी जुन्या नाण्यांत ही रक्कम सांगितली आहे. या नाण्यांची किंमत कधीही स्थिर नसे. बगदादमध्ये आब्बासी खिलाफतीच्या प्रारंभीच्या काळातील दिर्हाम हे एक चांदीचे नाणे होते. त्याची किंमत सुमारे पाच पेन्स होती.

२. ही 'पारंपरिक' समजूत फारच अविश्वासार्ह वाटते. इब्ने हशाम यांनी लिहिलेल्या पैगंबरांच्या चरित्रांत पैगंबरांनी बहुतेक वेळा ४०० दिर्हाम 'सादक' दिल्याची नोंद आहे. जे लाकडी सामान वगैरे दिल्याचा उल्लेख आहे ते त्यांनी उम्म सल्मा या आपल्या बायकोला दिले होते.

३. रखेलीच्या बाबतीत 'महर'ची मागणी केली जात नाही.

वधू ही लग्नाच्या अगोदर कुमारिका आहे की नाही याचा उल्लेख लग्न करारात पुष्कळदा केलेला असतो. वधू कुमारिका आहे असे सांगितलेले असेल आणि वास्तवात ती तशी नसेल तर अनेकदा नवरामुलगा तिला तिच्या घरी परत पाठवितो अशी मोरोक्कोत पद्धत आहे. काही जमातींत तर अशा वधूला तिचा बाप किंवा भाऊच ठार मारून टाकतो.

ज्या लग्नपद्धतीसंबंधीचे नियम कुराणात सांगितलेले आहेत आणि ज्या लग्नाद्वारे बायकोला नवऱ्याच्या पूर्ण स्वामित्वाखाली सुपूर्द केले जाते अशा लग्नांची आतापर्यंत चर्चा[1] केली. मुलीला विकत घेऊन तिच्याशी विवाह करण्याची जी जुनी पद्धत होती तिची काही लक्षणे या लग्नपद्धतीमुळे चिरस्थायी झाली. या जुन्या विवाहपद्धतीमध्ये 'महर'ची रक्कम मुलीच्या नातेवाईकाला किंवा वडिलांना दिली जात असे. आणि स्त्री ही नवऱ्याची जंगम मालमत्ता समजली जाई. पूर्वी सांगितल्याप्रमाणे इस्लामच्या स्थापनेनंतर 'महर' हा स्त्रीला हुंडा म्हणून मिळू लागला. तथापि अन्यथा जुन्या पद्धतीतील तिच्या दर्जात फारसा अनुकूल बदल झाला नाही. जुन्या 'ब अल' विवाह प्रकाराच्या जोडीला इस्लाम-पूर्व काळात अरेबियामध्ये 'मुट्‌ आ' या नावाने ओळखला जाणारा दुसरा एक लग्न-प्रकार अस्तित्वात होता. कुराणात (४ २८)[2] लग्नाशी संबंधित असा जो एक अरबी शब्द वापरला आहे, त्यातून 'मुट्‌ आ' शब्द निघालेला आहे. या शब्दाचा अर्थ 'उपभोग' किंवा 'उपभोग्य बक्षीस' 'मुट्‌ आ' हा लग्नप्रकार 'ब अल' या लग्न-प्रकारापेक्षा भिन्न होता. कारण 'मुट्‌ आ' पद्धतीने लग्न करण्यामागे संसार करून राहण्याचा किंवा प्रजानिर्मितीचा हेतू नसे. लष्करातील चाकरीमुळे अथवा अन्य काही कारणामुळे आपल्या घरापासून एखादा पुरुष लांब असेल तेव्हा त्याला एक (तात्पुरती) बायको मिळवून देणे एवढाच त्या लग्नाचा हेतू असे. या तात्पुरत्या विवाहाचे वैशिष्ट्य असे की त्यासंबंधीच्या करारात त्या विवाहाची मुदत निश्चित सांगितलेली असे. एका पुरुषाने व एका स्त्रीने परस्परांत केलेली व्यवस्था एवढेच त्या लग्नाचे मर्यादित स्वरूप होते. या लग्नातील बायकोच्या नातेवाईकांना त्यात ढवळाढवळ करता येत नसे. त्याचप्रमाणे वलीचीही आवश्यकता नसे. ठरलेल्या मुदतीनंतर कोणताही विधी न करता नवरा-बायको एकमेकांना सोडण्यास स्वतंत्र असत. मात्र बायकोला त्या वेळी तिचा हुंडा किंवा मोबदला मिळालेला असला पाहिजे. या प्रथेचा दुरुपयोग होण्याचा संभव होता. कारण वेश्या-

---

१. अशा लग्नांना रॉबर्टसन स्मिथने 'ब अल' विवाह असे म्हटले आहे. ब अल या हिब्रु शब्दाचा अर्थ 'स्वामी', 'मालक' किंवा 'ताबा ठेवणारा' असा आहे. जुन्या करारात 'नवरा' या अर्थाने हा शब्दप्रयोग केलेला आहे.

२. 'परंतु ज्यांचा तू उपभोग घेतला आहेस अशा (स्त्रियांना) कायदेशीर मोबदला दे. हा कायदेशीर मोबदला दिल्यानंतर तुम्ही जे आपसात ठरवाल त्यानुसार तुझ्याकडून काही गुन्हा झाला असे म्हणता येणार नाही.'

पद्धतीत व या पद्धतीत फारच थोडा फरक होता. म्हणूनच मुहम्मदांनी ही पद्धत बेकायदेशीर ठरविली होती असे 'परंपरां'द्वारे सांगितले गेले आहे. तथापि खुद्द कुराणात त्यासंबंधीचा पुरावा सापडत नाही. उलट अशा काही 'परंपरा' आहेत की ज्यामुळे या प्रथेला अनुमती असावी असे वाटते. मुहम्मदांनी वेश्या ठेवण्यास बहुदा नाखुषीने परवानगी दिली होती असे दिसते. कारण वेश्यांचा एक वर्ग सदैव समाजात अस्तित्वात होता. आणि शब्दाच्या एका फटकाऱ्याने तो नाहीसा करता येणे शक्य नव्हते.

"हिमयाराईट सय्यद" याच्यासंबंधीच्या एका कथेद्वारे सनातनी इस्लामचा 'मुट् आ' या लग्नप्रकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोण व या लग्नप्रकाराचे स्वरूप दिसून येते. एकदा या गृहस्थाला रस्त्यात एक स्त्री भेटली. तिने त्याच्याशी तेथल्या तेथे लग्न लावण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा तो तिला म्हणाला, "वलीच्या व साक्षीदाराच्या अनुपस्थितीत केलेले आणि उम्म खादिजाच्या[1] लग्नासारखे ते लग्न होईल." मग तिने त्याला "तू कोण आहेस ?" असे विचारले. या प्रश्नाचे आत्मप्रौढीपूर्ण कवितेत त्याने दिलेले उत्तर ऐकून आपले लग्न होणे शक्य नाही असे तिने सांगून टाकले. "कारण तू येमेननिवासी आहेस; रफिई ( पाखंडी ) पंथाचा आहेस. आणि मी तर तुझ्या प्रतिस्पर्धी तामिनी जमातीतली आणि धर्माने खारिजी आहे." त्यावर तो म्हणाला, "जरा विवेकाने बोल. माझ्या बाबतीत मन जरा उदार कर. आपण कोणीच आपल्या पूर्वजांचा व धर्माचा विचार करू नये असे मला वाटते." तेव्हा तिने उलट विचारले, "परंतु लग्न झाल्याचे लोकांना कळले की खाजगी गोष्टी जाहीर होत नाहीत काय ?" त्यावर तो म्हणाला, "मला तुला वेगळेच सांगावयाचे आहे. आपण 'मट् आ' करू या. कोणालाच काही कळणार नाही." तेव्हा तिने उत्तर दिले, "( मुट् आ ) हा प्रकार म्हणजे वेश्या-व्यवसायाची बहीणच आहे." याला हरकत घेऊन तो म्हणाला, "परमेश्वराची शपथ मी तुला कळकळीने सांगतो, एकदा कुराणावर विश्वास ठेवल्यावर आता तू त्याच्यावर अविश्वास दाखवू नकोस."[2] अखेर त्या स्त्रीने लग्नास संमती दिली. तेव्हा तिच्या जमातीच्या लोकांनी तिला ठार मारले. कारण ते 'मुट् आ' लग्न होते याची त्यांना कल्पना नव्हती. त्यामुळे एका पाखंड्याशी लग्न केल्याचा त्यांचा तिच्यावर आरोप होता.

सुन्नी पंथीयांच्या मताप्रमाणे हा लग्नप्रकार बेकायदेशीर आहे. तो बंद करण्याचा खलीफा उमरने प्रयत्न केला[3]. परंतु कुराणातील वचनानुसार अशा तात्पुरत्या लग्नास

---

१. अगदी सहजपणे एकामागून एक विवाह करण्याविषयी ती प्रसिद्ध होती.

२. हा उल्लेख कुराणातील ४[२८] यापूर्वी उल्लेखिलेल्या परिच्छेदाविषयी बहुतेक असावा.

३. खलिफा मामूनने हा लग्नप्रकार कायदेशीर असल्याचा हुकुम काढला. पण लोकमताच्या दडपणामुळे तो त्याला मागे घ्यावा लागला.

पूर्णपणे संमती आहे असे शियापंथीयांचे मत आहे. त्यामुळे इराण आदी शियापंथीय देशांमध्ये मुस्लिम पुरुषाला आपल्या धर्मातील किंवा ज्यू अथवा ख्रिश्चन किंवा मॅगिअन[१] (पण याबद्दल काहींचा मतभेद आहे.) स्त्रीशी निश्चित ठरविलेल्या मुदतीपुरते लग्न करता येते. ही मुदत काही तासांपासून एक किंवा अनेक वर्षांपर्यंत असू शकते. मात्र प्रतिष्ठित लोक अशा पद्धतीच्या लग्न-करारात नव्वद वर्षांची मुदत घालतात आणि त्या लग्नाला कायमच्या लग्नाचे स्वरूप देतात. इराणमध्ये 'मुट्आ' पद्धतीने लग्न झालेल्या बायकोला 'सिघा' असे म्हणतात. खरे तर या लग्नप्रकारात मुल्लाच्या देखरेखीखाली जो करार केला[२] जातो त्या कराराला 'सिघा' म्हणतात. खरे म्हणजे या लग्नांत महरची निश्चित रक्कम (कधी कधी मूठभर धान्यसुद्धा 'महर' म्हणून देण्यात येते) आणि लग्नाची निश्चित मुदत याचा उल्लेख करावा लागतो. तथापि पैशाच्या मोबदल्यात विकण्यासाठी किंवा मजुरीने देण्यासाठी पुरुषाला ती स्त्री देणगी म्हणून दिली आहे असा अर्थ अभिप्रेत असेल असा कोणताही शब्दप्रयोग किंवा वाक्यरचना त्या करारात असता कामा नये. तसे असेल तर तो करार रद्द ठरतो. या मार्गाने, अशा प्रकारच्या लग्नातील स्त्री सोडून देण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य पुरुषाला मिळू नये अशी व्यवस्था केलेली असते. तथापि ठरलेली मुदत संपण्यापूर्वीदेखील परस्परांच्या संमतीने लग्न रद्द करता येते. बायकोच्या संमतीशिवाय नवऱ्याला तिच्याशी फारकत घेता येत नाही.[३] या लग्नामुळे झालेली मुले कायदेशीर ठरतात आणि त्यांना आपल्या बापाच्या मालमत्तेतील हिस्सा वारशाने मिळण्याचा हक्क असतो. परंतु नेहमीच्या प्रकारातील लग्नाच्या बायकोप्रमाणे या लग्नप्रकारातील बायकोला ('सिघा'ला) पोटगीची मागणी करण्याचा किंवा करारात ठरलेल्या देणगीपेक्षा अधिक मागण्याचा अधिकार नसतो. आणि तिला आपल्या नवऱ्याकडून वारशाने काही मिळत नाही. तसेच नवऱ्यालाही तिच्याकडून वारसाहक्काने काही मिळत नाही.

स्त्रीला रखेली म्हणून ठेवणे आणि तिच्याशी लग्न करणे यात इस्लामने स्पष्टपणे फरक केलेला आहे. कारण इस्लाममध्ये फक्त गुलाम स्त्रियांनाच रखेली म्हणून ठेवता येते, स्वतंत्र स्त्रियांना नाही. मागे एके ठिकाणी सांगितल्याप्रमाणे गुलाम स्त्रीशी, तिला मुक्त केल्यावरच मालकाला लग्न करता येते. एखाद्या पुरुषाला लग्नाची बायको किंवा बायका नसतील

---

१. परिचित स्त्रीशी केलेले 'मुट्आ' लग्नच कायदेशीर आहे असे काही शियापंथीय कायदेपंडितांचे आग्रहपूर्ण मत आहे.

२. सर्वसाधारण लग्नासंबंधीच्या कराराला 'अक्द' असे म्हणतात.

३. वैवाहिक जीवनात शरीरसंबंध ठेवण्यास अशाप्रकारे लग्न झालेल्या नवऱ्याला नकार देता येतो. खरे तर सर्वसाधारण लग्नातील बायको या कारणासाठी फारकत मागू शकते. लग्न कराराची मुदत संपण्यापूर्वी लग्न रद्द करण्यात आले तर करारात ठरविलेल्या 'महर' मधील अर्धी रक्कम मागण्याचा बायकोला अधिकार असतो.

किंवा त्याला त्या असल्या तरी त्याशिवाय किती रखेल्या ठेवता येतील यासंबंधी कायद्याचा कोणताही निर्बंध नाही. परंतु या बाबतीतील पुरुषाच्या अनिर्बंध अधिकारावर अन्य काही मर्यादा घातलेल्या दिसतात. अविवाहित मुस्लिम किंवा ज्यू अथवा खिश्चन स्त्रियांना रखेल्या म्हणून ठेवता येते. बहिणी-बहिणी असलेल्या दोन अथवा जास्त स्त्रियांना तसेच ज्यांच्याशी एकाच वेळी लग्न करता येत नाही अशा प्रकारे ज्यांचे परस्परांशी नाते आहे अशा स्वतंत्र स्त्रियांना रखेल्या म्हणून ठेवता कामा नये. त्याचप्रमाणे गुलाम म्हणून नवीनच आणलेली स्त्री गर्भवती आहे की नाही यासंबंधीची खात्री होईपर्यंत तिच्याबरोबर राहू[1] नये. गुलाम स्त्रीवरील मालकाच्या सर्वांगीण अधिकारावर आणखी एक निर्बंध घातलेला आहे. तो असा की, स्वतः मालकाला त्या स्त्रीला रखेली म्हणून ठेवता येईल अथवा रखेली म्हणून तिला तो दुसऱ्यालाही देऊ शकेल किंवा विकू शकेल परंतु "जर ती ब्रह्मचर्य व्रताचे पालन करू इच्छित असेल तर[2]" पैशाच्या लोभाने वेश्याव्यवसाय करण्याची मालकाला तिच्यावर सक्ती करता येणार नाही.

गुलाम स्त्रीला वेश्याव्यवसाय करावयास लावून त्यावर मिळालेल्या पैशावर मालकाला जगता येणार नाही, अशा अर्थाचे एक हदिस आहे. परंतु वेश्याव्यवसाया-संबंधींच्या निर्णयाच्या बाबतीत कुराणात ज्या मर्यादा घातलेल्या दिसून येतात त्यावरून स्वतः मुहम्मदांना आपल्या मताच्या योग्यतेविषयी एक तर शंका असावी किंवा वेश्यापद्धती इतकी दृढमूल झालेली असावी की ती एकदम नाहीशी करणे अशक्यच असावे. दुसरीच शक्यता अधिक खरी दिसते. मुहम्मदांपूर्वीच्या काळी वेश्याव्यवसाय प्रचलित होता यांत शंका असायचे कारण नाही. आणि वेश्येकडे जाणे हे मुस्लिमपूर्व काळातील अरब लज्जास्पद मानीत नसत असे दाखविण्याचाही प्रयत्न झाला आहे. वस्तुस्थिती खरोखरच तशी असेल तर इस्लामने त्यांत बदल घडवून आणला असे दिसते. उमय्या खलिफा मारवान बिन अल् हकम या अल्पकाळ सत्तेवर राहिलेल्या खलिफाच्या राजवटीच्या इतिहासात इतिहासकारांनी म्हटले आहे की या खलिफाचा अपमान करू पाहणारी माणसे त्याला "अल् झरकाचा पोर" असे म्हणत. अल् झरका खलिफाची पूर्वज होती. तसेच जाहिलियामध्ये वेश्यांच्या घराचे निदर्शक असलेले निशाण आपल्या घरावर लावणाऱ्या स्त्रियांपैकी ती एक[3] स्त्री होती.

---

१. या नियमाचे पालन नेहमी केले जात नाही असे अनेक पुराव्यांवरून दिसते.

२. कुराण २४[33].

३. al-Fakhri ( अहलवाइर्ट संपादित ) मध्ये असेही म्हटले आहे की झियाद इब्ने अबीही हा सुमाया या बाजारी वेश्येचा मुलगा होता. तिचाही 'झरका' याच नावाने उल्लेख केलेला आहे. रॉबर्टसन स्मिथ यांच्या मतानुसार इस्लामच्या आगमना-नंतरही ज्या स्त्रिया जुन्या बहुपतित्वाच्या नैतिकदृष्ट्या ढिल्या प्रथेला चिकटून राहिल्या

[ टीप नं. ३ पुढे पहा ]

स्वतःच्या जमातबांधवांमध्ये वेश्या कधीही राहत नसत. कारण वेश्या व्यवसाय बदनामी कारक समजला जात असे. ज्या गावी त्यांची स्वतंत्र घरे नसत तेथे त्या बाजार-पेठेत, यात्रेच्या ठिकाणी आणि माणसांची सतत ये-जा आहे अशा भागात राहात. बानु अमीर जमातीमधील खरका ही या वेश्यांपैकी अशीच एक वेश्या होती. तिच्या-विषयी अनेक गोष्टी प्रचलित आहेत. ती स्वतःला यात्रेकरूंची वेश्या समजत असे आणि तिच्याकडे जाणे " हा एक यात्रेमधला विधी " आहे असे ती माने. परकी पुरुषासमोर ती आपल्या चेहऱ्यावरचा बुरखा उतरवी आणि उलट ओळखीच्या माणसासमोर बुरखा चढवी.

इस्लामचा वेश्याव्यवसायाला अधिकृतपणे विरोध असूनही ती पद्धत कधीच बंद झाली नाही एवढे सांगितले की पुरे. 'तसेच बाजारी स्त्रिया व त्यांचे दलाल हे कायद्याचे उल्लंघन करणारे लोक आहेत असे समजले जात असले तरी बहुतेक सर्व मुस्लिम देशात असे लोक आढळतात.

लग्नसंबंधात स्त्रीचे व पुरुषाचे जे सापेक्ष स्थान आहे त्याचे स्वरूप लक्षात घेता विवाहित स्त्रियांना व्यभिचार करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल असे दिसत नाही. पण बायकोवर व्यभिचाराचा आरोप असेल तर त्यासाठी कुराणाप्रमाणे जो पुरावा त्याला द्यावा लागतो तो मिळविणे जवळपास अशक्यच आहे. यासंबंधीचा कुराणातील मूळ उतारा असा आहे : " ज्यांनी चारित्र्यवान स्त्रियावर व्यभिचाराचा आरोप केलेला आहे त्यांनी तो आरोप सिद्ध करण्यासाठी चार साक्षीदार[१] आणले नाहीत तर त्यांना चाबकाचे ऐंशी फटके मारा." यासंबंधी बैदावी याने केलेल्या भाष्याचा संबंधित भाग असा आहे : " येथे शुद्ध चारित्र्याची, याचा अर्थ स्वतंत्र, वयात आलेली व निर्दोष मनाची, इस्लाम-वर निष्ठा असलेली व व्यभिचारापासून अलिप्त अशी व्यक्ती असा आहे. पुरुष व स्त्री असा भेद या संदर्भात अभिप्रेत नाही. एक उदाहरण म्हणून किंवा स्त्रियांवर आरोप करणे अधिक गंभीर स्वरूपाचे व दोषास्पद असते म्हणूनच या संदर्भात शुद्ध चारित्र्याच्या स्त्रियांचा खास उल्लेख करण्यात आला आहे."

व्यभिचाराविषयीच्या आरोपाबद्दलचे पुरावे, क्वचित एखाद्याला दाखविता आलेच, तर दोषी व्यक्तीला कुराणाने कडक स्वरूपाची सजा सांगितलेली आहे. पण ती

---

[ मागील पानावरून चालू ]

होत्या त्यापैकी या 'झरका' स्त्रिया होत्या. आणि त्यांच्याकडे जाणे अप्रतिष्ठितपणाचे मानले जात नसे. याविरुद्ध पुरावा त्यामानाने फार अल्प आहे. परंतु मुआविआने वेश्येचा मुलगा असलेला झियाद हा आपला सावत्र बाप असल्याचे सांगितले तेव्हा मुआविआच्या समकालिनांनी तिटकाराच व्यक्त केला होता, यात मुळीच संशय नाही. निदान तबरीने सुमाया ही वेश्या होती असेच म्हटले आहे.

१. कुराणात ४[१९] मध्ये असे स्पष्टपणे सांगितले आहे की, "तुमच्या बायकांपैकी एखादीचे वर्तन अनैतिक आहे असा तुमचा आरोप असेल तर तुमच्यातील चार साक्षीदार आणा."

दोन भिन्न प्रकारांची आहे. सुरा २४[२] हा या प्रश्नासंबंधीचा कुराणातील अगोदरचा सुरा असावा. त्यामध्ये व्यभिचारी पुरुष व व्यभिचारी स्त्री या दोघांनाही प्रत्येकी शंभर चाबकांच्या फटक्यांची शिक्षा ठरवून दिलेली आहे. सुरा ४[१९] या नंतरच्या प्रत्येक सुरामध्ये फक्त व्यभिचारी बायकांचा उल्लेख आहे. त्यात त्यांना मरेपर्यंत 'घरात कोंडून' ठेवण्याची सजा सांगितली आहे.

या सुरांच्या समीक्षकांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या स्त्रियांवर बदफैलीपणाचा आरोप असेल त्यांना इस्लामच्या प्रारंभीक काळात अक्षरशः तुरुंगात डांबले जात असे. त्या नंतरच्या काळात दगडाने मारण्याची[१] शिक्षा देण्यात येऊ लागली. कुराणातील या दोन सुरांमधील विसंगती दूर करण्यासाठी कायद्याच्या भाष्यकारांनी व्यभिचारासंबंधीच्या अपराध्यांचे दोन वर्ग पाडले आहेत. (अ) जे मुहसना आहेत व (आ) जे मुहसना नाहीत. मुहसना म्हणजे वयात आलेले सज्ञान, स्वतंत्र स्त्री किंवा पुरुष; स्वतंत्र असल्यामुळे ज्यांना कायदेशीर वैवाहिक जीवन जगता येते, असे लोक.[२] या 'मुहसना' लोकांसाठी व्यभिचाराबद्दल दगड मारुन ठार करण्याची शिक्षा आहे. जे 'मुहसना'संबंधीच्या वर उल्लेखित अटी पूर्ण करीत नाहीत त्यांचा दुसऱ्या वर्गात समावेश[३] होतो. अशा लोकांपैकी जे स्वतंत्र स्त्री-पुरुष असतील त्यांना शंभर फटके आणि गुलाम असतील त्यांना त्याच्या निम्मे फटके अशी शिक्षा सांगितलेली आहे.

ज्याला आपल्या बायकोवरील व्यभिचाराच्या आरोपाबद्दल आवश्यक तो सर्व पुरावा देता येत नसेल त्याने कुराण[४] प्रमाणे "परमेश्वराची शपथ घेऊन आपण खरे

---

१. हिजरीच्या दुसऱ्या शतकासंबंधीच्या एका अभ्यासक तज्ज्ञाने एका स्त्रीची कथा सांगितली आहे. तिच्यावर व्यभिचाराचा आरोप होता. तिने तो कबूल केला. मुहम्मदांचा जावई व त्याचा एक उत्तराधिकारी (खलिफा) अली याने तिला प्रसूत होईपर्यंत तुरुंगांत ठेवले. मग त्याने तिला एका खड्डयात छातीपर्यंत पुरले. तिच्यावर एक दगड ठेवला. मग बाजूला उभ्या असलेल्यांना तिला दगड मारण्यास फर्मावले.

२. बैदावी याचे कुराण २४[२] वरील भाष्य पहा. बैदावीने याला अशी पुस्ती जोडली की शाफीच्या म्हणण्याप्रमाणे 'मुहसना' होण्यासाठी या अटीव्यतिरिक्त ती व्यक्ती इस्लामवर श्रद्धा असलेली असणे जरूर आहे अशी अट आहे. या विधानाला अशी हरकत घेण्यात आली आहे की खुद्द मुहम्मदांनी व्यभिचाराचा आरोप असलेल्या ज्यूंना दगडाने मारले असल्याने अशाप्रकारे 'मुहसना'च्या पात्रतेसंबंधीची आणखी अट नमूद करण्याचे कारण नाही.

३. कोणत्या तर्काने हा फरक करण्यात आला आहे ते स्पष्ट होत नाही. स्नौक हरगोन्ज म्हणतो त्याप्रमाणे धर्मनिष्ठ माणसाने ज्या गोष्टीच्या अर्थाची अधिक खोल चौकशी न करता जी गोष्ट मानली पाहिजे अशी ही बाब (ता अब्बुदी) असावी.

४. ४६–९.

बोलत आहोत असे चार वेळा सांगितले पाहिजे. आणि आपण खोटे बोलत असलो तर परमेश्वराचा आपल्यावर कोप होईल असे पाचव्या वेळी म्हटले पाहिजे." या प्रसंगी बायको काही न बोलता स्वस्थ राहिली तर तिला तिच्यावरील आरोप मंजूर आहे असे समजून सजा दिली जाते. तथापि कुराणामध्ये "तिने परमेश्वराशपथ तो खोटे बोलतो आहे असे सांगितले तर शिक्षेतून तिची सुटका होऊ शकते. आणि तो बोलला ते खरे आहे असे सिद्ध झाले तर तिच्यावर परमेश्वराचा कोप होईल" असेही म्हटले आहे.[1] बायकोने अशी पाच वेळा शपथ घेऊन सांगितले तरी त्यांचे लग्न रद्द होते. आणि तिला कायमचा तलाक मिळून तिच्या नवऱ्यापासून तिची फारकत केली जाते. नवरा नंतर कोणत्याही परिस्थितीत तिच्याबरोबर पुन्हा संसार करीत[2] नाही.

घटस्फोटाच्या एकूण प्रश्नाविषयी कुराणात बरेच सांगितलेले आहे. तथापि घटस्फोटाच्या कारणांपेक्षा घटस्फोटाची पद्धती व घटस्फोटित बायको व तिची मुले यांच्यासंबंधीचीच चर्चा त्यात जास्त आहे. घटस्फोटाच्या कारणांसंबंधी इस्लामी भाष्यकारांनी केलेली भाष्ये मुस्लिम जीवनावर फार खोल परिणाम करणारी आहेत. बायकोशी फारकत घेण्यासंबंधीची कारणे सांगण्याची कोणतीही जबाबदारी कुराणाने नवऱ्यावर टाकलेली नसल्यामुळे नवऱ्याची मर्जी किंवा लहर लागेल तेव्हा तो आपल्या बायकोशी तलाक घेऊ शकतो. तो अधिकार बायकोला मात्र दिलेला नाही. परिणामी या विषमतापूर्ण दृष्टिकोणामुळे इस्लाममधील स्त्रियांचा दर्जा आणखीनच कनिष्ठ झाला आहे. नवऱ्याला मिळालेली फारकतीची सवलत काही बाबतीत इस्लामपूर्व काळातील रिवाजातून आलेली आहे. त्या काळात नवरा बायकोला विकत घेत असे. त्यामुळे तिच्या बापाला किंवा वलीला 'महर'ची उरलेली रक्कम देऊन टाकून तिच्यासंबंधीच्या आपल्या संपूर्ण जबाबदारीतून त्याला आपली सोडवणूक करून घेता येत असे आणि फारकतीची ठरवून दिलेली घोषणा करून बायकोपासून मुक्त होता येत[3] असे. फारकत देण्याचा आपला

---

१. व्यभिचारासंबंधीच्या या विशिष्ट शपथेला 'ल आन' म्हणतात. याचा शब्दशः अर्थ, "कोणाला तरी शाप देणे" असा आहे. ही पवित्र शपथ घेण्याच्या विशिष्ट जागा कायद्याने ठरवून दिल्या आहेत. एखाद्याने पवित्र जागी शपथ घेतली तर ती बहुसंख्य मुसलमान आजदेखील मानतात ही गोष्ट लक्षात घेता शपथ घेण्याची ही कसोटी एकंदरीत चांगली आहे.

२. असे शाफींचे मत आहे. तथापि हनिफींचे असे मत आहे की कोर्टाने तलाक देऊन हाकलून देण्याचा सर्वसाधारण निकाल देणे जरूर आहे अशा प्रकारचे हे प्रकरण आहे.

३. "तुला काढून टाकले आहे" यावरून फारकतीच्या या योजनेला 'तलाक'-काढून टाकणे हा शब्द पडला आहे.

निश्चय झाला आहे याचे चिन्ह म्हणून नवऱ्याने ही घोषणा एकाचवेळी किंवा काही दिवसांच्या अंतराने तीनदा करावयाची असते. फारकतीची ही साधी पद्धत इस्लामने तशीच ठेवली. एवढाच फरक करण्यात आला की अशा प्रकारे आपल्या बायकोला टाकण्याची पहिली व दुसरी घोषणा केल्यावरसुद्धा इच्छा असेल तर नवऱ्याला तिच्याशी परत लग्न करता येते.[1] त्यासाठी कोणताही समारंभ करावा लागत नाही की बायकोच्या संमतीचीही त्याला आवश्यकता नसते. मात्र त्या स्त्रीचा दुसऱ्या माणसाशी विवाह ठरलेला असेल तर कायद्याने त्या माणसाशी विवाह करण्यासाठी थांबण्याची जी मुदत ठरवून दिलेली असते ती संपण्याच्या आत पहिल्या नवऱ्याला तिच्याशी विवाह करावा लागतो. परंतु नवऱ्याने तिसऱ्यांदा व शेवटच्या वेळी फारकतीची घोषणा घोषित केली असेल आणि त्याद्वारे तिच्यावरील आपले अन्य सर्व हक्क संपले असल्याचे जाहीर केले असेल तर त्या स्त्रीचे प्रथम दुसऱ्याशी लग्न होऊन त्याने तिला फारकत देईपर्यंत तिच्याशी तिच्या पूर्वीच्या नवऱ्याला परत लग्नसंबंध जोडता येत[2] नाहीत. दुसरा नवरा गुलाम असेल तर तिला तो बक्षीस म्हणून देऊन लग्न रद्द झाले असे समजले जाते. कारण कोणाही स्वतंत्र स्त्रीला स्वतःच्या गुलामाशी कायद्याने लग्न करता येत नाही.

घटस्फोटित स्त्रीने परत लग्न करण्याआधी काही काळ थांबले पाहिजे हा इस्लामने घडवून आणलेला नवा बदल होय. "तीन मासिक पाळ्या होईपर्यंत[3] घटस्फोटित स्त्रियांनी दुसरा नवरा करता कामा नये."[4] स्थगित घटस्फोटाच्या काळात घटस्फोटित स्त्री

---

१. कुराण २$^{२२८}$, $^{२३२}$. रॅबिनिकल (यहुदी) कायद्याने आपल्या घटस्फोटित बायकोशी अन्यथा आवश्यक असते त्याप्रमाणे ९० दिवस न थांबता लग्न करण्याची परवानगी दिली आहे.

२. कुराण २$^{२३०}$. कधी कधी असेही घडते की रागाच्या भरात किंवा अन्य कारणामुळे नवरा तलाकची घोषणा एकदम तीनदा करून टाकतो आणि मग पुन्हा नवरा-बायकोला लग्न करावयाची इच्छा होते. अशा प्रकरणी त्या स्त्रीचे प्रथम दुसऱ्याशी लग्न लावून दिले जाते (ते व्हावेच लागते– बैदावी-कुराण २$^{२३०}$.) आणि पुन्हा फारकत घेतली जाते. या दोन गोष्टींना तयार असलेला माणूस मोबदला देऊन मिळवला जातो. आणि अशा रीतीने कायद्यातील तरतूद पुरी केली जाते. या प्रक्रियेला 'तहलील' (कायदेशीरपणा आणणे, असे म्हणतात.)

३. कुराण २$^{२२८}$. नवऱ्याने लग्नाचा विचार बोलून दाखविल्यानंतर लग्नासाठी चार महिन्यांची मुदत इस्लामी कायद्याने घालून दिली आहे.

४. 'जाहिलिया'मध्ये घटस्फोटित स्त्रीला ती गरोदर असली तरी घटस्फोटानंतर लागलीच परत लग्न करता येत असे आणि तिचे मूल नव्या नवऱ्याच्या मालकीचे होत असे.

आपल्या पूर्वीच्या नवऱ्याचीच बायको समजली जाते आणि त्याला आधीच्या चार बायका असतील तर आणखी लग्न करता येत नाही. स्थगित घटस्फोटाच्या या काळात कोणताही विधी न करता नवरा आपल्या तात्पुरत्या घटस्फोटित बायकोला आपल्याकडे तात्पुरते परत नेऊ शकतो. घटस्फोट अंतिमरित्या निश्चित झाल्यावर जर असे दिसून आले की मध्यंतरीच्या काळात बायकोला गर्भ राहिला आहे तर नवऱ्याने तिला पुन्हा आपल्यापाशी ठेवून घ्यावे आणि ती प्रसूत होईपर्यंत तिला चांगली वागणूक द्यावी[1] असे सांगितलेले आहे. असे मूल व्यभिचारातून झालेले नसेल तर ते तिच्या नवऱ्याच्या मालकीचे होते. प्रसूत होईपर्यंत घटस्फोटीत स्त्रीला दुसऱ्याशी लग्न करता येत नाही.

फारकतीच्या तहकूबीच्या काळात नवऱ्याने जर बायकोला परत नेले तर फारकती-संबंधीच्या आधीच्या सर्व घोषणा रद्द समजल्या जातात आणि नवरा-बायको परत एकत्र राहू लागतात. अशारीतीने बायकोशी अर्धवट फारकत घ्यावयाची व मागून परत तिला घरात घ्यावयाचे या पद्धतीमुळे बायकोकडून काही तरी जबरदस्तीने कबूल करून घेऊ इच्छिणाऱ्या नवऱ्याला आपल्या बायकोला आपले म्हणणे ती कबूल करीपर्यंत धड लग्न नाही व धड फारकतही नाही अशा अवस्थेत ठेवता येणे शक्य असते. म्हणून पैगंबरांनी या पद्धतीला स्पष्टपणे बंदी केली.[2] नवऱ्याने दोन वेळा बायकोला सोडण्याची ठरलेली घोषणा केली असेल तेव्हा नवऱ्याकडून उभयमान्य रक्कम घेऊन त्याचा त्याग करण्याची सुद्धा परवानगी मुहम्मदांनी बायकोला[3] दिली आहे. इस्लामपूर्व काळात महरची रक्कम नवऱ्याला परत करून बायकोला त्याच्यापासून सुटका करून घेता येत असे.[4] या पद्धतीचा उघडच दुरुपयोग होण्याची शक्यता असल्यामुळे तिच्यावर मुहम्मदांनी निर्बंध घातले.[5] परंतु ती प्रथा इतकी पक्की रूढ झाली होती की मुहम्मदांना ती नष्ट करता येणे शक्य नव्हते. म्हणून जेव्हा "उभय पक्षांना परमेश्वराने ठरवून दिलेल्या मर्यादांमध्ये राहणे अशक्य" असेल अशा बाबतींतच फक्त वरील सवलत देण्यात आली. एकदा नवऱ्याला 'महर'ची रक्कम परत मिळाली की त्याचे आपल्या बायकोवरील सर्व हक्क संपले असे समजले जाई. तथापि नेहमीची ठरलेली मुदत संपेपर्यंत त्या स्त्रीने परत लग्न करता कामा नये. नवऱ्याला बायकोचा परत स्वीकार करावयाची इच्छा असेल तर त्याला तिच्याशी पुन्हा नव्याने लग्न करावे लागते.

नवरा-बायको हे दोघेही मूळ बिगर मुसलमान असतील आणि बायकोने इस्लामचा स्वीकार केलेला आहे पण नवऱ्याने मात्र तिच्याबरोबर धर्मांतर केलेले नाही अशी

---

१. कुराण २[२२८].

२. कुराणातील आयत २३१.

३. कुराणातील आयत २२९.

४. घटस्फोटाच्या या प्रकाराला 'खुल्' (मुक्तता) असे म्हणतात.

५. कुराण ४[२४] आणि २[२२९] (पहिला भाग) पहा.

परिस्थिती असेल तर त्या परिस्थितीत बायकोला नवऱ्याशी फारकत मागता[१] येते. उलट नवऱ्याने इस्लाम पत्करला आहे पण बायको बिगर मुसलमानच राहिली आहे अशा वेळी काझीने त्या दोघांनी काय करावे याचा निर्णय करावयाचा असतो. अशा परिस्थितीत फारकत झालीच पाहिजे असे नाही. तथापि पति-पत्नी लग्नानंतर एकत्र राहिलेले नसतील आणि घटस्फोट मिळालेला असेल तर नवऱ्याने बायकोला 'महर'ची रक्कम देण्याची गरज नसते.

पति किंवा पत्नी यांच्यापैकी कोणातही शारीरिक दोष असेल तेव्हा त्यांचा विवाह रद्द करण्याची तरतूद कायद्यात आहे. उदाहरणार्थ पति पत्नीपैकी कोणीही लैंगिकदृष्ट्या अपात्र असेल तर दुसऱ्याला फारकतीची मागणी करता येते. तसेच लग्न-करारातील अटी नवरा किंवा बायको यांच्यापैकी कोणीही एकाने पुऱ्या केल्या नसतील तर त्यांचा विवाह रद्द होऊ शकतो. कराराच्या वेळी वधूने आपण कुमारिका असल्याचे सांगितलेले असते परंतु वस्तुस्थिती तशी नाही हे वराच्या मागून लक्षात येते अशी प्रकरणेच या संदर्भात सर्व-साधारणपणे आढळतात. वधू कुमारिका आहे की नाही हे सिद्ध करण्याच्या प्रथेने लादलेल्या कसोट्या अनेकदा चुकीच्या असतात. लोकमत या प्रश्नासंबंधी प्रखर असते. त्यामुळे कुमारिका वधूच्या मैत्रिणी तिला आपण कुमारिका असल्याचे सिद्ध करण्यात अडचण पडू नये म्हणून काही कृत्रिम उपाय सांगतात. ॲबिसीनीया व सुदानमधील काही जमातींमध्ये वधू लग्नपूर्व काळात शुद्ध राहिली होती याची खातरजमा करून घेण्यासाठी तिला वराला आलिंगन द्यावयास लावले जाते. फ्रेंच डॉक्टर क्लॉट बे याने दिलेली माहिती खरी मानली तर असे दिसते की गेल्या शतकात इजिप्तमध्ये जाहिररित्या कुमारिका वधूचा कौमार्य-भंग करण्याचीही पद्धत रूढ होती.

लग्न–करारात ठरलेली महरची रक्कम देण्याची किंवा निर्वाहासाठी लागणाऱ्या गोष्टी पुरविण्याची नवऱ्याची शक्ती नाही असे काझीपुढे सांगितले गेले तर त्यांचे लग्न रद्द होऊ शकते. तसेच करारातील अन्य अटी पुऱ्या झाल्या नसतील तरीही लग्न रद्द होऊ शकते. अलीकडेच इराणमध्ये झालेल्या कायद्याप्रमाणे नवऱ्याने दुसरी बायको न करण्याची अट मोडली किंवा एका ठरलेल्या मुदतीपेक्षा नवरा बायकोला सोडून राहिला किंवा तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करू शकला नाही अथवा बायकोला तो चांगली वागणूक देत नसेल, तर बायकोला कोर्टाच्या संमतीने नवऱ्यापासून फारकत घेता येते. तुर्की राष्ट्रीय नागरी कायद्याप्रमाणे लग्न व फारकत या दोन्ही बाबतीत स्त्रियांना पुरुषांइतकेच हक्क दिलेले आहेत. या कायद्यानुसार न्यायालयाकडून घटस्फोटापूर्वी विभक्त राहण्याची परवा-नगी मिळविण्याचीही तरतूद आहे. स्विस कायद्यातून ही कल्पना उचललेली आहे आणि यावर अशी टीका झालेली आहे की विवाहपावित्र्याच्या कॅथॉलिक कल्पनेत या

१. याला 'तलाक'–मुक्त करणे असे म्हणतात.

कल्पनेचा उगम आहे. विवाहपावित्र्याची ही कल्पना मुस्लीम कायद्याने कधीही मान्य केलेली नाही.

शेवटची बाब म्हणजे आपल्या मालकाच्या संमतीशिवाय गुलामाने आपले लग्न ठरवले तर ते लग्न रद्द ठरते. तसेच मुक्त असलेल्या गुलाम पति-पत्नींपैकी कोणीही परत गुलाम झाले तर त्यांचेही लग्न रद्द ठरते.

इस्लाममधील विवाहपद्धतीशी निकटचा संबंध असलेली दुसरी बाब म्हणजे गोषापद्धती व स्त्रियांना एकान्तवासांत ठेवण्याची प्रथा. प्राचीन अरबस्तानमध्ये गोषा-विषयी विविध प्रथा होत्या असे दिसते. वाळवंटी प्रदेशात राहणाऱ्या समाजातील स्त्रिया गोषा न करता पुरुषांमध्ये मोकळेपणाने वावरत असत. तर शहरात राहणाऱ्या स्त्रिया गोषा करीत असत. खुद्द पैगंबरांच्या कुरेशी जमातीतील सर्व स्त्रिया गोषा करीत असत. फकी या इतिहासकाराच्या कथनानुसार प्राचीन मक्कानगरवासी आपल्या अविवाहित मुलींना व स्त्री-गुलामांना भपकेबाज कपडे घालून आणि बुरखा न घालता त्यांचे काबाच्या भोवती प्रदर्शन भरवीत असत. त्यांना मागणी घालण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी कोणी पुढे यावे अशी अपेक्षा असे. ती पुरी झाली की मग त्या स्त्रिया परत बुरखा चढवीत तो कायमचा. मुहम्मदांनी आपल्या घरांतल्या बायकांना रानटीपणाच्या काळातल्याप्रमाणे नटून-थटून सार्वजनिक ठिकाणी न फिरण्याची आणि घरातच राहण्याची आज्ञा कुराणातील[१] एका परिच्छेदात केली आहे, ती वर उल्लेखिलेल्या 'अधार्मिक' प्रथेच्या संदर्भातच असावी.[२] मुहम्मदांच्या हातात सत्ता येण्यापूर्वी आणि ज्या काळात त्यांच्या पाठिराख्यांवर अत्याचार होण्याची व त्यांची अप्रतिष्ठा केली जाण्याची भीती होती, त्या सुरुवातीच्या काळात मुहम्मदांनी एका साक्षात्काराद्वारे आपल्या स्वतःच्या व इतर इस्लामनिष्ठ लोकांच्या बायका-मुलींनी तोंडावर लांब बुरखा घेऊन बाहेर पडावे अशी आज्ञा केली होती.[३] वर उल्लेखिलेल्या परिच्छेदात मुहम्मदांनी

---

१. ३३[३३].

२. बैदावी ( याविषयासंबंधी अधिकारवाणीने बैदावी वास्तविक फारच थोडे किंवा मुळीच सांगू शकत नाही.) म्हणतो की मुहम्मदपूर्व काळात दागदागिने घालून सार्वजनिक हमरस्त्यावर फिरण्याची व लोकांमध्ये मिरवण्याची स्त्रियांना संवय होती.

३. कुराण ३३[५९]. तबरीच्या 'तफसीर'मध्ये या आज्ञेसंबंधी असे म्हटले आहे : आपल्या प्रेषिताला अल्ला म्हणतो "तुझ्या बायकांना व मुलींना तसेच धर्मनिष्ठांच्या बायकांना असे सांग की, गुलामाप्रमाणे पोषाख करून केस व चेहरा उघडा ठेवून त्यांनी घराबाहेर पडू नये. त्यांनी आपल्या अंगावरच्या खमीसाचा काही भाग खाली सोडावा म्हणजे त्या स्वतंत्र कुटुंबांत जन्मलेल्या स्त्रिया आहेत हे कळेल व मग एखादा उनाड माणूस घाणेरड्या शब्दात जी टवाळी करतो ती त्यांना ऐकावी लागणार नाही." "काही

[ टीप नं. ३ पुढे पहा ]

आपल्या अनुयायांनी वारंवार आपल्या घरी येऊ नये आणि आपल्या परवानगीशिवाय घरात प्रवेश करू नये अशी विनंती केली आहे. कोणाला आपल्या बायकांना काही सांगावयाचे असेल तर ते त्यांनी 'पडद्याआडूनच' सांगितले[1] पाहिजे.

आपल्या घरातील स्त्रियांनी तरी आपल्या जमातीची जुनी प्रथा पाळावी असे मुहम्मदांचे मत असावे असे यावरून स्पष्ट दिसते. परंतु मुहम्मदांच्या कुटुंबांतील एक स्त्री मात्र जुना प्रघात किंवा मुहम्मदांची ही इच्छा बंधनकारक मानण्यास तयार नव्हती. त्यांच्या बायकोच्या भाचीने– आयेषाने– या बाबतीत आपण स्वतंत्र असल्याचा आग्रह धरला. नवऱ्याचा विरोध न जुमानता बुरखा न घालता ती लोकांमध्ये वावरत असे.

बुरख्यासंबंधी पैगंबरांनी प्रकट केलेल्या साक्षात्कारानंतर काही काळाने त्यांनी स्त्री व पुरुष या दोघांनाही वर्तणुकीचे व शुद्ध चारित्र्यासंबंधीचे काही नियम घालून दिले. मागाहून स्त्रियांसाठी त्यात आणखी नियमांची भर घालण्यात आली. त्यानुसार रक्तसंबंध असलेल्या जवळच्या नात्यातील ज्या पुरुषांशी लग्न करता येत नाही असे पुरुष किंवा त्यांच्या बायका, अथवा आपले नवरे सोडून अन्य कोणाही परपुरुषासमोर आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन करू नये अशी आज्ञा[2] देण्यात आली. यासंबंधीचा परिच्छेद असा आहे : "धर्मश्रद्ध (पुरुषांना) सांग की त्यांनी आपली नजर खाली ठेवावी व आपल्या शरीराचे गुप्त भाग झाकून ठेवावे... धर्मश्रद्ध स्त्रियांनाही सांग की त्यांनी आपली नजर खाली ठेवावी व आपल्या शरीराची गुह्यांगे झाकून ठेवावीत. (शरीरावरचे) बाहेरचे दागिने सोडून इतर दागदागिन्यांचे प्रदर्शन करू नये. आपल्या वक्षःस्थलावरील वस्त्राच्या उघड्या भागापर्यंत बुरखा घ्यावा आणि पती किंवा वडील वगळून अन्य

---

[ मागील पानावरून चालू ]

भाग खाली सोडावा (बुरखा)" या वाक्याच्या अर्थाविषयी भाष्यकारांत मतभेद आहेत. काहींचे म्हणणे असे की स्त्रियांनी आपले कपाळ व चेहरा झाकला पाहिजे व फक्त एकच डोळा उघडा ठेवला पाहिजे असा त्याचा अर्थ आहे (तर काहींचे म्हणणे आहे की फक्त कपाळच झाकून घ्यावे.).

१. यावर बैदावीची टीका अशी : उमरने असे म्हटल्याचे सांगितले जाते की, "हे परमेश्वराच्या दूता, तुझ्या घरी येणारी माणसे साधीभोळी किंवा दुष्टही असू शकतील. म्हणून धर्मनिष्ठांच्या आयांनी बुरखा घ्यावा अशी तू आज्ञा करणे योग्य होईल." तेव्हा मग पैगंबरांना या वचनाचा साक्षात्कार झाला.

२. कुराण २४३०. अशा अपवाद केलेल्या लोकांत, गुलामांचा (विशेषतः नपुंसक) व ज्या लहान मुलांना स्त्री-पुरुषांतील भेदाची जाणीव नसते अशा अगदी लहान मुलांचा समावेश करण्यात आला आहे.

लोकांना आपले दागिने दिसू देऊ नयेत " इत्यादी. बैदावी याने या परिच्छेदांवर केलेले भाष्य त्याच्या स्वतःच्या काळातील ( १३ वे शतक ) आणि त्यानंतरच्या काळातील रिवाजावर प्रकाश टाकणारे आहे. बैदावीने ( शरीराचा ) गुप्त भाग झाकण्यासंबंधीच्या आज्ञेविषयी असे स्पष्टीकरण केले आहे की ती आज्ञा म्हणजे लैंगिक पावित्र्यासंबंधी केलेल्या उपदेशासारखी आहे किंवा गुप्त भाग नीट झाकावे यासंबंधीचा तो आदेश आहे. अगदी अलीकडच्या काळापर्यंत या आज्ञेचा शब्दशः अर्थ लावला जात होता, आणि त्यामुळे युरोपीय आचारपद्धतीची नक्कल करणारे किंवा त्या पद्धतीत वाढलेले मूठभर मुसलमान पुरुष सोडले तर इतर कोणीही सभ्य मुसलमान पुरुष पाश्चात्य पद्धतीचा आखूड कोट व पँट घालीत नसत. कारण तो फारसा सभ्य पोषाख समजला जात नसे. " बाह्य दागिने सोडून बाकीच्या दागिन्यांचे प्रदर्शन करू नये " या स्त्रियांसाठी दिलेल्या आज्ञेचा " चेहरा व दोन्ही हात सोडून " असा अर्थ बैदावीने लावला आहे. कारण हे अवयव जननेंद्रियाशी संबंधित नसतात. बैदावी पुढे म्हणतो, " परंतु ही आज्ञा नमाजाच्या वेळेपुरती आणि त्यावेळी ( लोकांचे ) लक्ष जाऊ नये यासाठी असण्याची जास्त शक्यता आहे. " अर्थात स्वतंत्र स्त्रीचे सर्वच शरीर हे गुप्तेंद्रियाप्रमाणे मानले पाहिजे. आणि म्हणूनच पती आणि अगदी जवळचे अंतेवासी यांच्याशिवाय तिच्या शरीराचा कोणताही भाग दुसऱ्या कोणाला दिसता कामा नये. स्त्रीवर वैद्यकीय उपचार होत असतील किंवा ती साक्षीसाठी उभी असेल तर त्यावेळेपुरताच काय तो अपवाद करता येईल.

हिजरीच्या तिसऱ्या शतकापर्यंत आणि त्यानंतर देखील मशिदीत जाऊन पुरुषांबरोबर नमाज पढण्याचा स्त्रियांना अधिकार होता. उमरने सार्वजनिक नमाजाच्या वेळी स्त्रियांना कुराण वाचून दाखविण्यासाठी एक खास माणूस नेमला होता असे सांगतात. त्यावेळी स्त्रियांनी बुरखा घेतला नाही तरी चालत असे. परंतु सार्वजनिक नमाजाच्या वेळी स्त्रियांनी करावयाच्या पोषाखाविषयी कायद्यात सूचना आहेत. छातीवर चोळी व कपाळाच्या वरच्या बाजूस बुरखा आणि शरीरावर अंगरखा असा हा पोषाख असावा. चेहरा, हात व पावलांच्या नजिकचा वरचा भाग आच्छादून घेण्याची गरज नाही. यापैकी पायांच्या वरचा भाग झाकून घ्यावा की नाही याबद्दल मतभेद आहेत. पेंटॅट्यूकच्या ( बायबलची पहिली पाच पुस्तके ) यहुदी भाष्यकारांनी बायबलमधील आज्ञांचे पूर्णपणे पालन व्हावे याची सावधगिरी म्हणून ज्याप्रमाणे ' आज्ञांचे भोवती कुंपण ' निर्माण केले होते, त्याचप्रमाणे कुराणाच्या भाष्यकारांची कुराणातील आदेशांत मुळात सांगितले आहे त्यापेक्षाही अधिक केले जावे अशी अपेक्षा होती. पैगंबरांनी मुळात आपल्या स्वतःच्या घरातील बायकामुलींना बुरख्यासंबंधी जे आदेश दिले ते कुराणाच्या भाष्यकारांनी सर्व स्त्रियांना लागू केले. ज्याप्रमाणे पुरुषांनी पैगंबरांच्या सर्व प्रघातांचे ( सुन्ना ) अनुकरण करणे स्तुत्य समजलेले आहे त्याचप्रमाणे स्त्रियांनीदेखील पैगंबरांच्या घरांतील स्त्रियांच्या पद्धतीचे अनुकरण करणे योग्य आहे असा बहुधा कुराणांच्या भाष्यकारांचा युक्तिवाद असावा. वैद्याव्यतिरिक्त नातेसंबंध नसलेल्या कोणाही परपुरुषाला बुरखा न घेतलेल्या कोणाही स्त्रीकडे

फक्त वाङ्निश्चयाच्या[1] वेळीच कायद्याने पाहता येत असे. पण ही परवानगीदेखील प्रत्यक्ष व्यवहारात काढून घेण्यात आली होती.

जनानखान्याची आणि स्त्रियांना एकान्तवासात ठेवण्याची चाल सर्वत्र कशी पसरली हे सांगणे कठीण आहे. प्रारंभीच्या काळातील कुराणाचे भाष्यकार इराणी होते आणि इराणात फार पूर्वीपासून स्त्रियांना एकान्तवासात ठेवण्याची पद्धत रूढ होती. दमास्कसच्या उमय्या खलिफांची[2] सत्ता संपुष्टात आल्यानंतरच्या काळात कुराणाच्या इराणी भाष्य-कारांचा इस्लाममधील अधिकार वाढू लागला, त्याचा हा परिपाक असावा. हरून-अल्-रशीदच्या काळात, म्हणजे पैगंबरांच्या निधनानंतर दीडशे वर्षांनी, स्त्रियांना एकांतवासात ठेवण्याची चाल पक्केपणी रुजली होती. जनानखाना व त्याच्याशी निगडीत असलेल्या सर्व गोष्टी या चालींत अंतर्भूत होत्या. या चालीनुसार श्रीमंत वर्गातील स्त्रियांना घरातील बाकीच्या लोकांपासून वेगळ्या जागी ठेवण्यात येत असे, आणि हिजड्यांची त्यांच्यावर नेमणूक करण्यांत येत असे. मध्ययुगाच्या सुमारास काही मुस्लिम देशांत ही प्रथा सर्व-साधारणपणे इतकी दृढमूल झालेली होती की ती पाहून धर्मपरायण प्रवासी यात्रेकरूंना धक्का बसे. कारण एके काळी याच देशात स्त्री-पुरुष मोकळेपणाने एकमेकांत मिसळत असत. मूर प्रवासी इब्ने बतूता याचा या बाबतीतील अनुभव बोलका आहे. सहारा प्रदेशांतील इवालातान भागात तो गेला होता, त्यावेळी तेथील मसूफा जमातीमधील स्त्रिया, मुस्लीम असूनही पुरुषांसमोर मर्यादेने वागत असल्याचे त्याला दिसले नाही. त्यांनी बुरखा घेतलेला नव्हता. परंतु त्या नमाज वगैरे मात्र व्यवस्थितपणे म्हणत. कोणाशीही त्यांचा विवाह होऊ शकत असे. पण नवऱ्याबरोबर त्या प्रवासाला मात्र जात नसत. एखाद्या स्त्रीला प्रवासाला जावेसे वाटले तरी तिचे नातलग तिला जाऊ देत नसत. नात्यातल्या पुरुषांशी त्यांची मैत्री असे. पुरुषांनाही नात्याच्या बाहेरच्या स्त्री मैत्रिणी असत. एखादा माणूस आपल्या घरात आला आणि बायकोचा मित्र ( पुरुष ) त्याला तेथे दिसला तरी तो त्याबद्दल नापसंती दाखवीत नसे.

इब्ने बतूता याने उल्लेखिलेल्या स्त्रिया बहुधा तुआरेग जमातींतील असाव्यात. आजही या स्त्रिया पूर्णपणे मोकळेपणाने वावरू शकतात. त्या बुरखा घालीत नाहीत. अन्य काही ठिकाणच्या स्त्रियाही गोषा न करता हिंडतात, कारण आर्थिक परिस्थितीमुळे गोषासंबंधीच्या नियमांचे त्यांना कसोशीने पालन करणे शक्य नसते. ज्या स्त्रियांना घरांतील किंवा घराबाहेरील कठीण शारीरिक श्रमाचे काम करावे लागते त्यांना तोंडावर बुरखा घेणे गैरसोयीचे असते हे स्पष्टच आहे. म्हणूनच अरबस्तानांतील बदवी स्त्रियांत,

---

१. कुराण ३३^५९.

२. उमय्या खलिफांनीच जनानखान्याची प्रथा आणली असे इब्ने ताघिबार्दी याचे मत आहे. पण ते शक्य वाटत नाही. कारण हे लोक बहुतांशी मूर्तिपूजक अरबांच्या कल्पना व समजुती मानणारे होते.

कुर्द स्त्रियांत व अन्य स्त्रियांत साधारणपणे अपवादात्मकरीत्याच बुरखा आढळतो. इजिप्त-मध्ये फेलाहिन स्त्रिया बुरखा घालतात, पण तो प्रामुख्याने फॅशन म्हणून. मध्य आशिया-मधील भटक्या जमातींतील स्त्रियासुद्धा पुरुषांमध्ये मुक्तपणे वावरतात. बुरख्याची त्यांस आडकाठी येत नाही. तेथे जनानखान्याची चाल नाही. मात्र किर्घीज स्त्रिया लग्ना-नंतर बुरखा घालतात. तथापि ज्या प्रदेशांचा आता मुस्लीम सोव्हिएट रिपब्लिक्स-मध्ये समावेश होतो, तेथे वसाहत करून राहिलेले मुस्लीम जनसमूह फार पूर्वीपासून अतिशय सनातन पद्धतीचे जीवन जगत आले आहेत. स्त्रियांना एकान्तवासात ठेवण्याच्या प्राचीन पारंपरिक प्रथेचे ते कठोरपणे पालन करीत असतात. स्त्रियांना संपूर्णपणे मुक्त करण्याच्या धोरणाला सोव्हिएट युनियन वचनबद्ध असले, तरी त्या देशात बुरखा व जनानखान्याच्या प्रथा चालूच आहेत. अगदी मोठाल्या शहरांतल्या स्त्रियासुद्धा बुरखा घालूनच बाहेर पडतात. नेहमीच्या बुरख्याऐवजी त्या जाळीचे कापड वापरतात, एवढाच फरक. कारण अलीकडे बुरख्याचे कापड रशियामध्ये तयार केले जात नाही आणि त्याची आयातही करता येत नाही.

इराणधील कॅस्पियन प्रांतांतील खेडुत स्त्रिया कधीच बुरखा घालीत नाहीत, उलट इराणातील ज्या शहरांत इस्लामी धर्माधिकाऱ्यांचे वर्चस्व आहे अशा शहरामधील उदाहरणार्थ क्युममधील, गरीब वर्गातील स्त्रियादेखील नीट बुरखा घेऊन बाहेर पडतात. तसेच विवाहित किंवा विवाहयोग्य स्त्रियांना सक्तपणे एकान्तवासात ठेवले जाते. पूर्वे-कडील देशांत– मलाया, पूर्वीचा डच ईस्ट इंडिज प्रदेश व चीन या देशांत-गोषासंबंधीच्या नियमांची सामान्यतः उपेक्षा होत असते. मलायामधील मुस्लिम स्त्री बुरखा न घेता बाहेर हिंडते. " आपल्या नवऱ्याच्या कामात भाग घेते आणि उत्सव–समारंभ वगैरे प्रसंगी आपल्या दागदागिन्यांचे प्रदर्शनही करते. "

डच प्रवासी स्नौक हरग्रोन्ज मक्केमध्ये गेला होता, तेव्हा त्याला स्त्रियासुद्धा नमाजासाठी मशिदीत जात असल्याचे आढळले. हरग्रोन्जने म्हटले आहे, की मशिदीत स्त्री व पुरुष यांच्यामध्ये फक्त एक कठडा असे. स्त्रियांचे चेहरे क्वचित कधी अनाच्छादित दिसत असले, तरी केसाची एक बटदेखील बाहेर दिसणार नाही अशा रीतीने त्या आपले केस मात्र कडव्या रूढीनिष्ठांच्या भीतीने काळजीपूर्वक आच्छादून घेत. कारण कपाळावर केस भुरभुरत ठेवणे हा अतिशय निंद्य असा नखरा समजला जाई. यात्रेतील विधींच्या प्रसंगी म्हणजे इहरामसाठी पोषाख करताना कायद्यात सांगितल्याप्रमाणे पुरुष आपले मस्तक व स्त्रिया फक्त आपले हात व चेहरा उघडा ठेवीत.[1] परंतु तरीदेखील वरिष्ठ वर्गातील कित्येक स्त्रियांना बुरखा न घेता आपला चेहरा उघडा ठेवणे अडचणीचे वाटे. म्हणून त्या आपल्या चेहऱ्यावर एक प्रकारचे आच्छादन घालीत व मग त्यावर बुरखा चढवीत आणि अशा रीतीने कायद्याचे तांत्रिकपणे पालन करीत.

---

१. इहरामच्या वेळी पुरुषांना मस्तक व स्त्रियांना चेहरा उघडा ठेवावा लागतो.

युरोपीयकरणाच्या आपल्या कार्यक्रमानुसार मुस्तफा कमाल अतातुर्कने सार्वजनिक ठिकाणी बुरखा घ्यावयास तुर्की स्त्रियांना बंदी केली. त्याचे अनुकरण करून १९३६ मध्ये इराणातही तसाच कायदा शाह रेझाने केला. युगोस्लाव्ह सरकारने एक हुकूमनामा काढून ही प्रथा अलीकडेच बंद केली आहे. इजिप्त, इराक आणि मध्यपूर्वेतील देशांनी या बाबतीत कोणताही कायदा केलेला नाही. तरीसुद्धा त्या देशातील मोठ्या शहरांमधील स्त्रिया गेली पंचवीस वर्षे बुरखा न घेता आणि युरोपियन पद्धतीचा पोषाख करून हिंडताना दिसतात. याउलट १९२६ मध्ये सौदी अरेबियाच्या वहाबी उलेमाने सार्वजनिक ठिकाणी बुरख्याशिवाय जाण्यास स्त्रियांना मनाई केली.

बुरखा घालण्याच्या व स्त्रियांना एकांतवासात ठेवण्याच्या व्यापक प्रथेला एकंदरीत तुलनेने फारच थोडे अपवाद आहेत. कुराणाने पुरुषांचे स्त्रियांवरील वर्चस्व गृहीत धरलेले आहे. त्याच्याशी ही प्रथा पूर्णपणे सुसंगतच आहे. तथापि कुराणातील त्या संबंधीचे नियम संदिग्ध असल्यामुळे स्वाभाविकच मुस्लिम विधिज्ञांच्या हाती त्यांचा अर्थ लावण्याचा बराचसा अधिकार आला. विशेषतः ज्या नियमाच्या बाबतीत एखादे 'हदिस' अस्तित्वात नाही अशा नियमाचा त्यांनी स्थानिक रीतिरिवाजांनुसार[1] अर्थ लावला. तथापि एखाद्या नियमाच्या विशिष्ट अर्थाला पुष्टी मिळावी म्हणून मुद्दाम एखादे हदिस तयार केले गेले असण्याचीही शक्यता आहे. अशा हदिसांद्वारे प्रचलित झालेल्या 'परंपरां'पैकी पुष्कळशा 'परंपरा' कुराणांतील विधानांच्या विरोधी किंवा त्या विधानांतील गर्भितार्थाचा विपर्यास करणाऱ्या आहेत असे दिसून येते. धार्मिक विधी करण्याच्या अधिकारापासून स्त्रियांना वगळण्याची कुराणाची कल्पना नव्हती, असे स्पष्ट दिसते. स्त्रियाही उत्तम धर्मश्रद्ध असतात असे कुराणाने मानलेले असल्यामुळे कुराणाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिलेले आहे. आणि पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही खऱ्या धर्मश्रद्धेचे फळ म्हणून स्वर्गप्राप्तीचे आश्वासन दिलेले आहे.[2] ज्यांच्यात धर्मश्रद्ध माणसाचे गुण आहेत असे पैगंबर मानीत अशा लोकांची एक यादी कुराणातील एका वैशिष्ट्यपूर्ण परिच्छेदात[3] आहे. असे लोक म्हणजे "अल्लाला शरण जाणारे, धर्मश्रद्ध, भाविक, सत्यप्रिय, सहनशील, दानधर्म करणारे, उपवास करणारे, शुद्धचरित, नित्य परमेश्वराचे नामस्मरण करणारे आणि ज्यांना परमेश्वर क्षमा करणार

---

१. बॅबिलोनिया, ॲसिरिया व इराण या देशांत प्राचीनकाळी आपल्या लहरी-प्रमाणे नवरा आपल्या बायकोला टाकून देऊ शकत असे. प्राचीन अरबी परंपरा या प्रथेचे अनुकरण करणारी होती. वरीलपैकी बाकीच्या दोन देशांत नसली तरी इराणमध्ये फार प्राचीन काळापासून जनानखान्याची चाल अस्तित्वात होती.

२. कुराण ९^{७३} आणि ४८^{५}, ३ ^{१९३} : "तुमच्यापैकी कोणाचेही, मग ती स्त्री असो अगर पुरुष असो, (सत्)कर्म मी वाया जाऊ देणार नाही."

३. ३३^{३५}.

आहे आणि ज्यांना तो मोठे बक्षीस ( प्रसाद ) देणार आहे असे स्त्री-पुरुष. " विश्वासार्ह ऐतिहासिक परंपरेवरून असे दिसते, की पैगंबरांच्या काळानंतरही इस्लामी धर्मसत्तेत स्त्री व पुरुष असा भेद न करता धर्माच्या बाबतीत सर्वांना समान मानलेले होते. म्हणूनच पैगंबरांची ' जागा घेणारा ' ( खलिफा ) अबु बकर याने युद्धात मिळालेली लूट तरुण किंवा वृद्ध, गुलाम अथवा स्वतंत्र, स्त्री किंवा पुरुष अशा इस्लामी समाजाच्या सर्व लोकांना सारखी वाटून दिली.

परंतु त्यानंतरच्या काळात, प्रामुख्याने कुराणाच्या इराणी व तुर्की भाष्यकारांनी, कुराणाच्या स्पष्टपणे ग्रथित केलेल्या उद्दिष्टांविरुद्ध जाऊन स्वतःची मते व परंपरा साऱ्या मुस्लिम जगावर लादल्या. कारण पुरुषांचे उघड उघड वर्चस्व असलेल्या वातावरणात हे भाष्यकार वाढलेले होते. आणि म्हणूनच ' परंपरां 'च्या बहुतेक प्रमाणभूत संग्रहात " नरकात राहणाऱ्यांत बहुतांश स्त्रियाच असतात, " कारण " त्या धर्मश्रद्ध नसतात, " अशा अर्थाचे एक हदिस आढळते. कुराणाच्या सनातनी भाष्यकारांनी, [ बैदावी[1] हा असाच एक नमुनेदार भाष्यकार आहे. ] स्त्रियांना पैगंबरांनी दिलेल्या स्वर्गप्राप्तीच्या आश्वासनाची स्वतःच्या मताशी सांगड घालण्याच्या हेतूने एक हदिस जोडले आहे. ते हदिस असे की, अगणित पुरुषांनी धार्मिक पूर्णता मिळविली आहे आणि त्याचे फळ म्हणून स्वर्ग प्राप्त केला आहे; पण अशा स्त्रियांची संख्या मात्र फक्त चारच आहे.

इस्लाममधील स्त्रियांच्या दर्जाच्या संदर्भात त्यांच्या अधिकारापेक्षा त्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये महत्त्वाची समजलेली आहेत. कुराणातील ज्या परिच्छेदाचा नुकताच उल्लेख येऊन गेलेला आहे, त्याचा विचार करता कायद्याने ठरवून दिलेली कर्तव्ये पार पाडणे एवढेच स्त्रियांचे स्थान आहे असे निःसंशयपणे मानले गेले आहे. ही कर्तव्ये पार पाडण्यासाठी जनानखान्यातून बाहेर पडण्याचा प्रश्न आला, की धर्मपंडितांच्या विरोधाला स्त्रियांना तोंड द्यावे लागते. सार्वजनिक जागी नमाज पढणे, हा कोणालाही आपण खरे धर्मश्रद्ध आहोत हे दाखविण्याचा सोपा व उघड उपाय आहे. प्रारंभीच्या काळातील एका जुन्या परंपरेप्रमाणे स्त्रियांना आपल्या बरोबर प्रार्थना करू देण्यास स्वतः मुहम्मदांचा विरोध नव्हता. तसेच नवऱ्याची संमती असेल तर स्त्रियांना नियमितपणे मशिदीत जावयास आपली हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले होते. या परंपरेला दुसऱ्या एका परंपरेद्वारे पुष्टी मिळत असल्याचे दिसते. ' परमेश्वराच्या ज्या दासीं 'ना मशिदीत जाऊन प्रार्थना करावयाची इच्छा असेल, त्यांच्या मार्गात कोणतीही अडचण आणणे मुहम्मदांना नापसंत असल्याचे त्यात म्हटले आहे. हिजरीनंतरच्या दुसऱ्या शतकात लिहिलेल्या ( हे पुस्तक झैद इब्ने सैद याचे आहे असे चुकीने सांगितले जाते ) एका पुस्तकात असे म्हटले आहे, की स्त्रियांना चारचौघांत प्रार्थना करण्यास बंदी होती

---

१. याची कुराणावरील ( ६६[११] ) टीका पाहा.

आणि खरे म्हणजे मशिदीत जाणे हा नंतर लौकरच पुरुषांचा विशेषाधिकार होऊन बसला होता. अर्थात या गोष्टीला पुष्कळदा अपवाद आढळतात. अगदी अलिकडच्या काळात विसाव्या शतकात मूर प्रवासी इब्ने जुबायर याला बगदादमध्ये एका प्रसिद्ध धर्मोपदेशकाचे प्रवचन ऐकण्यासाठी स्त्री व पुरुष एकत्र जमल्याचे आढळले होते. प्रवचनाला जमलेल्या स्त्रिया, त्यात खलिफाची आईही होती, राजवाड्यात एका जाळीदार खिडकीमागे बसल्या होत्या आणि बाकीचे सर्वसाधारण लोक खालच्या आवारात बसले होते. राजमाता उपस्थित असल्याची कल्पना धर्मोपदेशकास असावी. कारण त्याने तिला आशीर्वाद दिले, आणि पडदा घेतलेली 'महान भव्य व्यक्ती' आणि उपस्थित असलेली 'थोर दयाळू व्यक्ती' असे तिचे स्तुतिपर वर्णनही त्याने केले.

काही देशांत फक्त सणावारीच स्त्रिया मशिदीत प्रार्थनेला जातात. तथापि मक्केमध्ये मात्र स्त्रिया नेहमीच मशिदीत जातात; पण तेथेही पुरुष व स्त्रिया यांच्यात एक कठडा असतो. अगादसमध्ये तुआरेग पुरुष प्रार्थना करीत असतील (बहुतेक उघड्या जागी) तेव्हा स्त्रिया एका बाजूला उभ्या राहून ती ऐकतात. इस्लामी जगातील इतरही अनेक देशात हीच पद्धत आहे.

तथापि बहुतेक देशांत इस्लामी धर्मपंडितांच्या तीव्र विरोधामुळे स्त्रिया मशिदीत जाऊ शकत नाहीत. आपले लोक काय म्हणतील याविषयी मुसलमान माणूस अतिशय जागरूक असतो. स्त्रियांच्या वावग्या वागणुकीमुळे आपली अप्रतिष्ठा होईल अशी मुसल-मान आई-बापांना व नवऱ्यांना भीती वाटत असते. मशिदीत जाऊन नमाज पढण्याच्या बाबतीत स्त्रियांवर जी बंधने पडलेली आहेत त्याचे हे आणखी एक कारण आहे.

एक गोष्ट मात्र लक्षात ठेवण्यासारखी आहे. धर्मपंडितांचा विरोध नव्हता त्या काळात अनेक अडचणी असूनही मुस्लीम स्त्रियांमध्ये साधुसंत झालेले आहेत. "बारा-खडीतील प्रत्येक अक्षरानुसार पवित्र स्त्रियांची नोंद नाही असे फारच थोडे चरित्रकोश सापडतील. या स्त्री साधुसंतांनी केलेले चमत्कार, त्याच चरित्रकोशात शेजारीच ज्यांची नोंद केलेली आहे, अशा पुरुष साधुसंतांच्या चमत्कारांपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी महत्त्वाचे नाहीत." इस्लाममध्ये संघटित असा धर्मोपदेशकांचा वर्ग किंवा जमात नाही. त्यामुळेच कदाचित् स्त्री साधुसंतांना पुढे येणे सुकर झाले असावे. परंतु या स्त्री संतांपैकी बहुतेक संत सुफी अथवा अन्य गूढवादी पंथांतील होत्या असे दिसते. कारण या पंथांत बाह्य भेदांना फारसे महत्त्व नाही. राबिया या स्त्री-संताविषयी फरीद अल् दिन अत्तार हा सूफी संतांचा चरित्रकार म्हणतो, "मला कोणी विचारले की तुम्ही तिला पुरुष संतांच्या बरोबरीने का बसविता ? तर मी सांगेन, की सर्वश्रेष्ठ प्रेषितानेच असे म्हटले आहे की परमेश्वर तुमच्या बाह्य स्वरूपाचा विचार करीत नसतो. देवत्वाची प्राप्ती बाह्य स्वरूपावर अवलंबून नाही, तर ध्येयासंबंधीच्या श्रद्धेवर अवलंबून आहे. थोर सदाचारी आयेषा (मुहम्मदांची पत्नि) हिच्यापासून जर इस्लाम धर्माची दोनतृतियांश शिकवण मिळविता येत असेल, तर धर्मसत्याचा काही अंश तिच्या एखाद्या दासीकडूनही शिकता येणे शक्य

आहे. परमेश्वराकडे नेणाऱ्या ( सेवेच्या ) मार्गावरून जाणारी स्त्री ही पुरुषच असते; तिला स्त्री म्हणता येणार नाही." भविष्यकथन, सार्वजनिक प्रार्थनेचे नेतृत्व आणि साधुत्व ही फक्त पुरुषांची मिरास आहे या वैदावी यांच्या वर एके ठिकाणी उल्लेखिलेल्या मताच्या संदर्भात हे विचार महत्त्वाचे आहेत.

राबियाचा संत म्हणून उल्लेख केल्याबद्दल आपल्यावर टीका होणार याची स्वतः फरीद अल् दिन अत्तार याला ज्याअर्थी कल्पना होती त्यावरून इस्लामी इतिहासाच्या नंतरच्या काळात लोकांचे लक्ष वेधून घेईल अशा प्रकारचा कोणताही जीवनक्रम स्त्रियांनी स्वीकारण्याच्या बाबतीत इस्लामचा सर्वसाधारण दृष्टिकोण काय होता याची कल्पना येते. प्रत्येक स्त्री-पुरुषाने धर्माचे शिक्षण घेतलेच पाहिजे अशा अर्थाचे एक हदिस सांगण्यात इस्लामच्या प्रारंभिक काळात अडचण वाटली नव्हती. या हदिसमधील आज्ञेचे पालन करून एखाद्या स्त्रीने धार्मिक ज्ञानात प्राविण्य प्राप्त केले, की साहजिकच पांडित्य हा जणू आपलाच विशेषाधिकार आहे असे वाटणाऱ्या पुरुष विद्वानांचे त्या स्त्रीकडे लक्ष वेधले जात असावे, आणि खरोखर तसेच झाले आहे. त्या काळात निश्चितच अनेक स्त्री साधुसंत होऊन गेल्या. त्यांना प्राप्त झालेले श्रेष्ठत्व साधुसंतांविषयी सर्वसामान्य जनात जी आदरभावना असते त्यामुळे मिळाले असे कदाचित म्हणता येईल; परंतु त्या काळात अनेक मुस्लीम पंडिताही झाल्या आहेत. त्यांनी नेहमीच्या साधनांनी ज्ञान मिळविले आणि त्यामुळे आपापल्या पुरुष सहाध्यायांची वाहवा मिळविली. उदाहरणार्थ, प्रख्यात " लेखिका " आणि ' स्त्री जातीचा गौरव ' म्हणून ओळखली जाणारी शुहदा बिन अल् इब्रारी, हिने आपल्या पांडित्याने फार मोठी ख्याती मिळवली. तिच्या काळातील ती प्रथम श्रेणीची पंडिता[1] होती.

शुहदाने हदिसांचा सखोल अभ्यास केलेला होता हे तिला लाभलेल्या ख्यातीचे काही अंशी कारण होते. हदिस ही मुस्लीम शास्त्राची एक शाखा समजली जात होती आणि त्या शास्त्राचा अभ्यास हा केवळ पुरुषांनी करावयाचा उद्योग आहे अशी बहुधा त्याकाळी समजूत असावी. पण वस्तुस्थिती तशी नव्हती. पैगंबरांच्या विभिन्न हदिसांच्या अस्सलपणासंबंधी अधिकाराने निर्णय देणारी पंडितांची जी मालिका होती तिच्यामधील स्त्रिया हा एक समर्थ असा दुवा होता, ही गोष्ट इस्लामच्या प्रारंभिक काळात त्यांनी स्वतःच दाखवून दिलेली आहे. काही हदिस-संग्रहांत, उदाहरणार्थ बुखारी याच्या, स्त्रियांच्या मतांना प्रमुख स्थान देण्यात आले आहे. हिजरीच्या दहाव्या शतकापर्यंत अशा अधिकारी स्त्रिया अधूनमधून होऊन गेल्या आहेत.

घराबाहेरच्या क्षेत्रांतील स्त्रियांचे कर्तृत्व उघडपणे फारसे मान्य केले जात नसले तरी राजसिंहासनामागील त्यांचे कर्तृत्व नाकारता येणार नाही. पण या त्यांच्या कर्तृत्वाला मान्यता नव्हती. तथापि अब्बासी खिलाफतीच्या अमदानीत राजघराण्यातील कित्येक

---

१. ५७४–११७८ मध्ये बगदाद येथे ती निधन पावली.

स्त्रियांचा राजसिंहासनाबाहेरही प्रभाव होता याची अनेक उदाहरणे आढळतात. उदाहरणार्थ, हरून अल् रशीदची पत्नी सीट्टा झुबैद हिने बगदादमध्ये एवढी ख्याती प्राप्त केली होती, की अद्याप तिच्या कबरीला मोठे आदराचे स्थान आहे (मात्र ही कबर तिचीच आहे असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही). या कबरीत तिचे अवशेष आहेत असे म्हणतात. तिच्यानंतर एका शतकाने झालेली खलिफा मुक्तादिनची आई ही तर इस्लामी साम्राज्याची सत्ताधीश बनली होती. कारण स्वतः खलिफा दुर्बल होता. अर्थात त्या वेळी इस्लामी साम्राज्याचा विस्तार काहीसा कमी झाला होता. तिनेच जनता दरबार भरवून लोकांचे अर्ज घेण्याची व त्यांची गाऱ्हाणी दूर करण्याची पद्धत सुरू केली. ती आपल्या प्रांताधिकाऱ्यांना व काझींना बोलावून त्यांना आपल्या कामाचे अहवाल द्यावयास लावीत असे आणि स्वतःच्या सहीने हुकूम काढीत असे.

तथापि मुस्लिम इतिहासात अशा विख्यात स्त्रिया क्वचित्च आढळतात. आणि ज्या क्वचित झालेल्या आहेत त्यांनाही टीका सोसावी लागलेली आहे. इतिहासात सर्वत्रच असे घडले आहे. परंतु इस्लामी जगताबाहेरील स्त्रियांच्या मार्गात मात्र असे जाणूनबुजून निर्माण केलेले अडथळे एवढे भयंकर नाहीत. या बाबतीत बाहेरच्या घटनांचा प्रभाव इस्लामी जगतात दिसून येत असला, तरी अद्यापही हे अडथळे अस्तित्वात आहेतच. आणि इस्लामी धर्मपंडित आपला कडवा दृष्टिकोण जोवर सोडून देत नाहीत किंवा धार्मिक सत्तेचा ऱ्हास होऊन धर्मपंडितांच्या मतांचा सर्वसाधारण मुस्लिम समाजावरील प्रभाव कमी होत नाही तोपर्यंत हे अडथळे कायम राहणारच.[१]

◻ ◻

१. अधिक माहितीसाठी Islamic Review (August, 1952) मधील "Al-Azhar, Islam & the Role of Women in Islamic Society" हा लेख पाहा.

प्रकरण ३

# मुलांचे इस्लाममधील स्थान

अरबस्तानातील जमातींच्या संघटनेतील सर्वात लहान घटक म्हणजे अहल्, 'तंबू' म्हणजेच घर. या घरात एकच कुटुंब राहते. बाप हा कुटुंबप्रमुख व बाकीचे कुटुंबीय हे त्याचेच वंशज असतात. स्वतः कुटुंबीयांच्या आणि ते ज्या समाजात राहतात त्या समाजाच्या हिताच्या दृष्टीने त्यांना, कुटुंबप्रमुख ज्या वंशात जन्मला असेल त्या वंशाचे मानले जाते. पित्याचे प्रत्यक्ष पितृत्वाचे नाते फार महत्त्वाचे असते. मुहम्मदांच्या उदया-पूर्वी एके काळी मुस्लिम परंपरेनुसार मुलाच्या जन्माच्या वेळी त्याच्या आईचा जो कोणी नवरा असेल त्याच्याकडे त्या मुलाचे पितृत्व जात असे. इस्लामने या नियमात सुधारणा केली आणि गर्भवती विधवेला किंवा घटस्फोटीत गर्भवती स्त्रीला प्रसूत होईपर्यंत परत लग्न करण्यास मनाई केली. अशा स्त्रीचे मूल तिच्या मृत किंवा घटस्फोटापूर्वीच्या नवऱ्या-पासून झालेले आणि कायदेशीर आहे असे मुहम्मदी कायद्यात मानले गेले आहे.

सर्वसाधारण सिद्धान्त म्हणून विवाहित पतिपत्नीला झालेले मूल हे कायदेशीर[1] तसेच त्या पतीपासून झालेले आहे असे समजले जाते. मात्र ते दोघे एकत्र राहू लागल्याला सहा महिने होण्याच्या आत ते मूल जन्मलेले असता कामा नये.[2] तथापि त्या मुदतीच्या आत जन्मलेल्या मुलास त्याचा बाप पत्करावयास तयार असला तर ते मूल कायदेशीर समजले जाते. शाफी व मालिकी विधिसंहितेनुसार नवराबायकोच्या वैवाहिक जीवनाला

---

१. मुलाच्या आई-बापापैकी कोणीही एकाने आपण इस्लामधर्माचे आहोत असे सांगितले असेल अथवा त्या धर्माचा स्वीकार केलेला असेल तर ते मूल मुस्लिम समजले जाते.

२. ही कालमर्यादा कुराणातील ३१[१३] व ४६[१४] या दोन आयतांचा एकत्र विचार करून ठरवलेली आहे. ३१[१३] या आयतात मुलाला आईच्या अंगावरचे दूध तोडण्याची कालमर्यादा दोन वर्षे सांगितलेली आहे. आणि ४६[१४] या आयतात मुलाला अंगावर दूध पाजण्याची व ते तोडण्याची कालमर्यादा ३० महिन्यांची सांगितलेली आहे. (४६[१४] या आयतावरील बैदावी याचे भाष्य पाहा.)

चार वर्षे झालेली असतील ( ही या बाबतीतील कमाल मर्यादा समजली जाते ) आणि या काळात बायकोने दुसऱ्याशी लग्न केलेले नसेल[1] तर बायकोला झालेले मूल कायदेशीर समजले जाते. हनफी कायद्याने ही मुदत दोन वर्षांची ठेवलेली आहे. तथापि नवरा-बायकोचा शेवटचा संबंध येऊन दहा महिने उलटल्यानंतर झालेले मूल शियापंथीय कायदेशीर मानीत नाहीत.

"मुलाच्या आईचा त्याच्या जन्माच्या वेळी" जो कोणी नवरा असेल तोच मुलाचा बाप होय या नियमाशी "व्यभिचार करणाऱ्याला काहीच मिळणार नाही" हे हदिस निगडित केले आहे. म्हणजेच मुलाच्या जन्मावेळचा त्याच्या आईचा नवरा त्या मुलाचा जनक बाप नसला, तरी त्याची त्या मुलावर मालकी राहील. शियापंथीयांचा कायदा याहिपुढे जाऊन असे सांगतो, की स्त्रीला व्यभिचारातून झालेल्या मुलाचे पितृत्व तिच्या नवऱ्याने आपल्या बायकोविरुद्ध 'ल आन' घोषित करून ते औपचारिकपणे नाकारलेले नसेल, तर तिच्या नवऱ्याकडेच जाते. त्या मुलाचे पितृत्व स्वीकारण्यास प्रारंभी नकार देऊन मागाहून पश्चात्ताप झाल्यावर त्याने ते मान्य केले तर ते चालते. तथापि कोणत्याही परिस्थितीत त्याच्या बायकोशी व्यभिचार करणाऱ्या पुरुषाला त्या मुलाच्या पितृत्वावर अधिकार सांगता येत नाही.

मुलाच्या पितृत्वाविषयी शंका असेल त्यावेळी काइफकडे जाण्याची 'जाहिलीया' मध्ये पद्धत होती. 'काइफ' ही इस्लामी सिद्धपुरुषांच्या वर्गातील एक व्यक्ती होय. त्याने मुलाच्या शारीरिक खाणाखुणा पाहून मुलाचे पितृत्व कोणाकडे ते ठरवायचे असते.[2] परंपरावादी मताचा पुरस्कर्ता बुखारी याचे असे म्हणणे आहे, की ज्या पुरुषाकडे 'काइफ' मुलाचे पितृत्व देतो, त्या पुरुषाला त्याचे पितृत्व मान्य करावेच लागते. परंतु याविषयी मतभेद आहे. मुलाची आई (ती स्वतंत्र असो की गुलाम असो ) व आपण एकत्र राहात होतो एवढे जरी मुलाच्या बापाने सांगितले तरी इस्लामी कायद्यानुसार त्याने मुलाचा कायदेशीरपणा सिद्ध केला आहे असे समजले जाते. वारसा हक्कासारखे प्रश्न उपस्थित होतात तेव्हा मुलाच्या आईला मूल आपले असल्याचे सिद्ध करणे जरूर झाले, तर तिला आपला दावा सिद्ध करण्यासाठी मुलाच्या जन्माच्यावेळी हजर असलेली एखादी मुस्लिम प्रतिष्ठित बाई किंवा दाई यांची साक्ष काढावी लागते. रखेली ठेवणे हे इस्लाम-मध्ये कायदेशीर मानलेले असल्याकारणाने मुलाचा कायदेशीरपणा सिद्ध होण्यासाठी मुलाच्या आईचे त्याच्या बापाशी लग्न झालेले असण्याची आवश्यकता नसते.

---

१. (या चार वर्षांच्या अवधीतील नवराबायको यांच्या एकत्र सहवासाच्या शेवटच्या प्रसंगानंतरच्या काळात ) बायको दुसऱ्या कोणाबरोबर राहिली असल्याचा संशय असला तरीसुद्धा तिला होणारे मूल कायदेशीर समजले जाते.

२. इस्लामपूर्व काळात वेश्येला आपल्या मुलाचा बाप कोण हे सांगण्याची परवानगी होती. बहुतेक वेळा मुलाचा बाप पितृत्व मान्य करीत असे.

एखादे लग्न नियमबाह्य ठरण्यापूर्वी झालेली मुले नंतरही कायदेशीर समजली जातात. मात्र अशा बाबतीत त्या मुलांच्या आईबापांनी आपला परस्परावर विश्वास होता आणि आपणास लग्न करण्याचा अधिकार होता या समजुतीने लग्न केले हे सिद्ध करून दाखविले पाहिजे. त्याचप्रमाणे एखाद्या गुलाम स्त्रीला झालेल्या मुलाची गर्भधारणा ती तिच्या मालकाच्या कायदेशीर स्वामित्वाखाली असताना झाली की नवऱ्याशी लग्न झाल्यावर झाली याविषयी शंका असेल किंवा अन्य काही चुकीची समजुत असेल अशा परिस्थितीत देखील ते मूल कायदेशीर समजले जाते.

आपल्या मुलांना आईबाप क्वचितच टाकीत. कारण विशेषतः मुलगे ही मूल्यवान संपत्ती समजली[1] जाई. तथापि आपल्या बायकोला झालेले मूल आपले नाही असा नवऱ्याला संशय असेल आणि म्हणून त्या मुलाचा स्वीकार करावयास तो तयार नसेल तर ते मूल जन्मताच त्याने धिक्कारले पाहिजे आणि त्या मागोमाग व्यभिचाराच्या कलमाखालील 'ल आन'मधील नियमानुसार आपल्या बायकोवर व्यभिचाराचा आरोप ठेवला पाहिजे. आपल्यासारखे 'आपले' मूल दिसत नाही एवढ्या कारणासाठी अर्थात त्याला ते मूल नाकारता येत नाही. या बाबतीत एक अतिशय टोकाचे उदाहरण दिले जाते. कदाचित ते तयार करून सांगितलेले असावे. एकदा पैगंबरांकडे एक बद्वी अरब आला व आपल्या बायकोला झालेले मूल निग्रो आहे असे सांगू लागला. ते मूल टाकून देण्याचा आपला विचार आहे असे त्याला सुचवावयाचे होते. तथापि मुहम्मदांनी त्याला तसे करण्याची परवानगी दिली नाही. यासंबंधीच्या 'परंपरे'वर एका भाष्यकाराने असे म्हटले आहे, "रंगातील फरकामुळे (देखील) व्यभिचार सिद्ध होत नाही आणि या कारणासाठी बाईच्या नवऱ्याला तिच्याशी फारकत घेता येणार नाही." दुसऱ्या एका हदिसद्वारे आपल्याला झालेल्या कोणत्याही मुलाचा पुरुषाने पुरेसे कारण न देता स्वीकार न करणे निःसंदिग्धपणे बेकायदेशीर ठरविले आहे.

इस्लाम धर्म दृढमूल झाल्यानंतर मुलाच्या कायदेशीरपणाला मान्यता मिळण्याच्या बाबतीत कायद्याच्या फारशा अडचणी राहिल्या नाहीत तरीही काही प्रमुख अडचणींचा उल्लेख केलेला आढळतो. एखाद्या बाईला लग्नानंतर सहा महिन्यांच्या आत मूल झाले तर ते तिला तिच्या नवऱ्यापासून कायदेशीर विवाहाच्या काळात झालेले आहे असे समजले जात नाही. त्याचप्रमाणे नवरा-बायको एकत्र राहू लागल्यानंतर विशिष्ट काळापेक्षा जास्त दिवसांनी झालेले मूलही कायदेशीर मानले जात नाही. याव्यतिरिक्त आणखी फक्त एकाच कारणासाठी कायद्याप्रमाणे मूल अनौरस ठरते. ते म्हणजे मुस्लिम या नात्याने आपला ज्या स्त्रीवर लग्नाची बायको म्हणून अथवा आपल्या मालकीची रखेली म्हणून

---

१. कुराण १८$^{४४}$, "संपत्ती व पुत्र ही या जीवनाची भूषणे होत." तसेच ८$^{२८}$ व ६३$^{९}$. ए. व्हॉन क्रेमर याने मुलींविषयी खऱ्या पित्याला किती अभिमान असतो हे दाखवून दिले आहे.

किंचितही अधिकार नाही हे माहीत असूनही तिला त्याच्यापासून झालेले मूल. मुहम्मदी कायद्यानुसार कोणाही मुस्लिम स्त्रीला बिगर मुस्लिम पुरुषाशी विवाह करण्यास सर्वत्र बंदी आहे. त्यामुळे अपरिहार्यपणे अशा लग्नसंबंधांतून जन्माला आलेली मुले स्वाभाविकपणेच बेकायदेशीर समजली जातात. खरे म्हणजे मुस्लिम देशात अवैध मुलाला चिकटलेला कलंक कायद्याच्या दृष्टीने समर्थनीय आहे असे फारच थोड्या प्रकरणात म्हणता येते. कारण एखादे विशिष्ट लग्न कायदेशीर ठरविण्यासाठी जरूर असलेला युक्तिवाद मुळीच सापडत नाही असे क्वचितच घडते. आज मुस्लिम देशात " वेश्येचे कार्टे " ही शिवी सर्रास वापरली जात असली तरी इराण सोडून इतर कोणत्याही देशात ' हरामजादा ' ( अनौरस ) ही शिवी कोठेही ऐकू येत नाही. इराणमध्ये व्यभिचारी स्त्रीला व व्यभिचारातून जन्मलेल्या तिच्या मुलाला मृत्युदण्ड दिला जातो. याचा अर्थ ' हरामजाद्या 'ला तेथे कायदेशीर मान्यता नाही.[1] डच ईस्ट इंडीजमध्ये संशयास्पद परिस्थितीत एखादे मूल जन्मण्याची भीती असते तेव्हा ते औरस असल्याचा देखावा करता यावा यासाठी बहुधा काही ना काही कायदेशीर किंवा बेकायदेशीर युक्त्या योजल्या जातात.

मुलाच्या आईच्या नवऱ्याने त्याचे पितृत्व नाकारले किंवा नवऱ्याच्या नातलगांनी तसे पुराव्यानिशी सिद्ध केले तर ते मूल फक्त आईच्या वंशाचे समजले जाते. सर्वसाधारणपणे मुलग्याचा कायदेशीरपणा ही त्याच्या बापाच्या किंवा त्याच्या जमातीच्या[2] दृष्टीने काहीशी चिंतेची बाब असते. आणि कुटुंबाच्या पावित्र्याची विशेषतः जरूरी असते तेव्हा ते मूल त्या कुटुंबाचे असल्याचा दावा काहीसा अधिक काळजीपूर्वक तपासून पाहिला जातो. किताब अल् अघानीमध्ये इस्लामच्या प्रारंभिक काळातील पुढील उदाहरण या संदर्भात दिले जाते. खलिफा मुतावक्कील याच्या दरबारात अली इब्ने जाम अल्

---

१. ' हाजी बाबा ऑफ इस्पहान ' या मोरियरच्या पुस्तकामध्ये कुर्दीश गुलाम स्त्रीनायची एक कथा आहे. त्या कथेचा तेथील वस्तुस्थितीशी संबंध असला पाहिजे. त्यामुळे तिचा दाखला द्यावयास हरकत नाही.

२. अन्य बाबतीत जसा तुआरेग जमातीचा अपवाद आहे तसा याहिबाबत आहे. त्या लोकात कोणाही स्त्रीची मुले तिच्याच जमातीची समजली जातात, मग त्यांचा बाप कोणीही असो. नवरा व बायको ही विभिन्न जमातीतील असल्यास नवरा मेल्यावर त्याची बायको मुलासह परत आपल्या जमातीत सामील होते. जमाती–जमातींत लढाई सुरू झाली तर ती मुले आपल्या आईच्या आप्तेष्टांच्या बाजूने लढतात. मात्र सर्वसामान्यपणे आपल्या बापाच्या निधनापर्यंत किंवा त्याने त्याच्या आईशी फारकत घेईपर्यंत मुले बापापाशीच राहतात. मुले आपल्या आईच्याच जमातीची समजली गेली पाहिजेत, बापाची नाहीत असा तुआरेग लोकांत कायदाच आहे. परंतु एखाद्या खानदान बापाने गुलाम बायको केली असेल आणि तो जबरदस्त असामी असेल तर तो आपली मुले उच्च खानदानांतील आहेत असे मान्य करून घेण्यात यशस्वी होतो.

सामी या नावाचा एक कवी होता. त्याच्या कुटुंबीयांचा असा दावा होता की आपण सामा नावाच्या कुरेशी जमातीचे वंशज आहोत. परंतु कुरेशी जमातीतल्या वंशावळ अभ्यासकांनी या कवीचे कुटुंब आपल्यातील आहे हे मान्य करण्यास नकार दिला. कारण त्यांचे म्हणणे असे की सामाच्या ( सामा जमातीचा मूळ पुरुष ) मृत्यूनंतर त्याच्या विधवा बायकोने दुसऱ्या जमातीमधील एका पुरुषाशी विवाह केला होता आणि कवीचे कुटुंब ज्या पुरुषाचे आपण वंशज असल्याचा दावा करीत आहे तो पुरुष या दुसऱ्या लग्नातून जन्मलेला होता.

मुलाच्या आईच्या नवऱ्याने मुलाला नाकारले असेल तर दुसऱ्या कोणत्याही पुरुषाला मुलाच्या पितृत्वाचा कायद्याने दावा करता येत नाही. अशा प्रकरणी मुलाचे पितृत्व सांगणाऱ्या पुरुषाचे व त्या मुलाचे रक्ताचे नाते असले तरी त्याला कायद्यात मान्यता नाही. त्यामुळे काही कायदेपंडितांची, बाप व त्याची अवैध मुलगी यांच्या विवाहाला संमती आहे. परंतु इतर पंडितांचा ( विशेषतः शियापंथीय ) या गोष्टीला विरोध आहे.

मुलाच्या संगोपनाच्या जबाबदारीच्या बाबतीत कुराणाने काही नियम घालून दिले आहेत. आई-बाप एकत्र नांदतात आणि विशेषतः आपली मुले ही मौल्यवान संपत्ती आहे असे आई बाप मानतात तोंवर अशा प्रकारच्या नियमांची गरज नसते असे मानता येईल. परंतु नवऱ्याने बायकोला घटस्फोट दिल्यावर गुंतागुंत निर्माण होते तेव्हा अशा नियमांची गरज भासते. बाप आपल्या मुलांकडे दुर्लक्ष करील असे कुराणात कोठेही मानलेले नाही. पण आईच्या बाबतीत संशयाला जागा असल्याचे मान्य केले गेले आहे. कुराणामध्ये यासंबंधी दोन कलमे, फारकतीसंबंधीच्या परिच्छेदानंतर लगेच आढळतात. आपल्या मुलाला आईने किमान संपूर्ण दोन[१] वर्षे अंगावर पाजले पाहिजे; या काळात मुलाच्या बापाने आईच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घेतली पाहिजे. परंतु आई किंवा बापावर मुलांच्या संगोपनासाठी अप्रस्तुत असे दडपण आणता येणार नाही असा आदेश या कलमात देण्यात आला आहे.[२] मात्र मुलांच्या संगोपनाविषयींच्या आधीच्या परिच्छेदामध्ये[३] आपल्या मुलाला आईने अंगावर दूध पाजले पाहिजे याबाबतीत घटस्फोटीत स्त्रीवर निश्चितच सक्ती करण्यात आलेली नाही. तिने ती जबाबदारी घ्यावयाचे कबूल केले तर आपल्या अंगावर दूध पाजून मुलाला वाढविणाऱ्या इतर कोणत्याही दासीला दिला जातो तेवढा मोबदला तिला मिळाला पाहिजे असे म्हटले आहे असे काही कायदेपंडितांचे मत आहे. नंतरच्या[४] परिच्छेदाच्या आधाराने दुसऱ्या काहीजणांचे असे मत आहे, की आई विधवा असो की घटस्फोटीत असो, आपल्या

१. कुराण ३१$^{१३}$.
२. कुराण २$^{२३३}$. ६५$^{६}$.
३. ६५$^{६}$.
४. २$^{२३३}$, या आयतावरील बैदावीचे भाष्य.

मुलांना अंगावरचे दूध पाजण्याची जबाबदारी तिचीच आहे. आणखी काहीजण, उदाहरणार्थ मालिकी असे मानतात की विवाहित स्त्रीवर विशिष्ट काळापुरती ही जबाबदारी आहे, परंतु घटस्फोटीत स्त्रीवर नाही. मात्र मुले दुसऱ्या कोणाही बाईकडे जावयास तयार नसतील तर त्यांना पाजण्याची जबाबदारी या दोन्ही वर्गातील आयांनी घेतली पाहिजे. या बाबतीत विभिन्न पंथीय लोक इतर पंथांच्या या बाबतीतील नियमांचा विचार न करता स्वतःच्या नियमाप्रमाणेच चालत असतात. आईने आपल्या अंगावर मुलाला दूध पाजण्यासंबंधींची जी दोन वर्षांची कालमर्यादा कुराणाने ठरवून दिलेली आहे ती आईबापांच्या परस्पर संमतीने कमी होऊ[1] शकते.

आईबाप विवाहित असतील आणि एकत्र राहत असतील, तर आपल्या मुलांना वाढविण्याची जबाबदारी त्यांनी संयुक्तपणे घ्यावयाची असते. बापाने जीवनातील त्यांच्या भौतिक गरजा भागवावयाच्या असतात; आणि आईने त्यांच्या शरीरस्वास्थ्याची आणि मानसिक व धार्मिक शिक्षणाची काळजी घ्यावयाची असते.[2] आई-बापांत तंटा उद्भवला तर मुले लहान असेपर्यंत ती आपल्याजवळ ठेवण्याचा आईला अधिकार असतो. यासंबंधींची कालमर्यादा कुराणात निश्चित सांगितलेली नाही. कायद्याच्या वेगवेगळ्या पंथांनी आपआपल्या कल्पनांप्रमाणे याची मुदत ठरवून दिलेली आहे. शियापंथीयांच्या मतानुसार मुलाची आई स्वतंत्र स्त्री आणि मुस्लिम असेल तर मूल अंगावर पीत असेपर्यंत म्हणजे त्याच्या वयाच्या पहिल्या दोन वर्षांपर्यंत तिला आपल्याजवळ आपले मूल ठेवता येते. अंगावरचे दूध पाजणे बंद झाले की मुलग्याला त्याच्या बापाच्या संपूर्णपणे हवाली करावे लागते आणि मुलगी वयाच्या सातव्या वर्षापर्यंत आईजवळ राहते. त्यानंतर मुलीलाहि बाप आपल्याकडे नेतो. मुलगा दोन वर्षांचा आणि मुलगी सात वर्षांची होण्यापूर्वी त्यांची आई मरण पावली तर बाप त्यांची जबाबदारी घेतो. मुलांच्या आईशी त्याने फारकत घेतलेली असली तरीसुद्धा तो मुलांची जबाबदारी पत्करतो. मुलांचा बाप वारला तर आई मुलांची जबाबदारी घेते.

आपले मूल सात वर्षांचे होईपर्यंत त्याला आपल्यापाशी ठेवण्याच्या आईच्या अग्र अधिकारास शियापंथीयांची संमती आहे. या वयात मुलाला सारासार[3] विचार करता येतो आणि भविष्य काळात आईकडे राहावयाचे की बापाकडे राहावयाचे हे तो ठरवू शकतो. परंतु 'स्वतंत्र' मुस्लिम स्त्रीलाच आपले मूल आपल्यापाशी सात वर्षांपर्यंत ठेवण्याचा अधिकार आहे. मात्र ती स्त्री मानसिकदृष्ट्या शाबूत असली पाहिजे. तिच्या-

---

१. कुराण २[२३३] प्रमाणे. इजिप्तमध्ये ही मुदत १ किंवा १॥ वर्षांची ठरविण्यात आली आहे. शियापंथीय कायदा याची योग्य मुदत २१ महिन्यांची असावी असे मानतो.

२. या प्रकारच्या जबाबदारीला तांत्रिक भाषेत 'हदाना' म्हणतात.

३. वयाच्या सातव्या वर्षीच मुलग्याने नमाज पढावयास प्रारंभ करावा लागतो. आपल्या कर्तव्यात त्याने कसूर केली तर दहाव्या वर्षी त्याला मार देता येतो.

हातून कोणताही गंभीर गुन्हा घडलेला असता कामा नये; ती विश्वासू असली पाहिजे; तिच्यापाशी राहावयासाठी निश्चित घर असले पाहिजे आणि त्या मुलाच्या बापाशिवाय दुसऱ्या पुरुषाशी तिचे लग्न झालेले असता कामा नये.

मालिकींच्या कायद्याप्रमाणे मुलगा वयात येईपर्यंत त्याचे पालकत्व त्याच्या आईकडे असते आणि मुलीचे पालकत्व तिला सांभाळण्याची जबाबदारी संपेपर्यंत म्हणजेच तिचे लग्न होईपर्यंत आईकडे असते. मुलाची आई नास्तिक अथवा घटस्फोटीत स्त्री किंवा विधवा असली तरी त्याची याबाबतीत अडचण येत नाही.

अनाथ मुलांची जबाबदारी ज्या नातेवाईकांनी घ्यावयाची असते अशा लोकांची एक लांबलचक यादी कायद्यात दिलेली आहे. खुद्द कुराणात मात्र या प्रश्नाविषयी फारच थोडे सांगितले आहे. परंतु आपल्या बायको-मुलांच्या निर्वाहाची नीट तरतूद करण्यापूर्वी नवरा निधन पावला म्हणजे अनाथ मुलांचा प्रश्न निकडीचा होत असावा. आपल्या जमातीबाहेर विवाहसंबंध जोडण्यास इस्लामने परवानगी दिली होती, तरी काही जमातीत जमात-अंतर्गत विवाह करण्याची पद्धत रूढ होती. त्यामुळे विधवा स्त्रीची निराधार किंवा आधार असलेली मुले जमातीचीच घटक म्हणून स्वीकारली जात. परंतु मुले मोठी होऊन आपला उदरनिर्वाह करीपर्यंत आणि त्यांचा जमातीला उपयोग होऊ लागेपर्यंत जमातीने त्यांची जबाबदारी घेतली पाहिजे असे बंधन फारसे नसावे. विधवा किंवा घटस्फोटीत स्त्रीने पुन्हा दुसऱ्याशी लग्न केले असेल, पण तिच्या नव्या नवऱ्याची इच्छा नसेल, तर त्याच्यावर आणखी मुलांना पोसण्याची सक्ती करता येत नाही. ज्या ठिकाणी आपल्या जमातीबाहेर लग्न करण्याची प्रथा होती तेथे पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्री आपल्या मुलांसह परत आपल्या जमातीत निश्चितच जाऊ शकत असे. अशा विधवेचा नवरा ज्या जमातीमधील असेल ती जमात मुले वयात येऊन ती उपयोगी होईपर्यंत त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेत नसे.

आईबाप किंवा जवळचे कोणीही नातलग नसलेल्या मुलांची जबाबदारी कोणाकडे असावी यासंबंधी पैगंबरांनी काहीच नियम सांगितलेले नाहीत. परंतु धर्मादाय संस्था ( अवकूफ '–' वक्फ 'चे अनेकवचन ) गरीब मुलांची सोय करतात. बेवारशी मुलांची जबाबदारी सर्व समाजावर स्पष्टपणे टाकण्यात आली आहे.

कुराणामध्ये मुहम्मदांनी मुलाचे यौवनावस्थाप्राप्तीचे निश्चित वय सांगितलेले नाही. तथापि रात्री झोपेत मुलाचा वीर्यपात होऊ लागला की त्याला पौरुषत्व प्राप्त झाले असे मानावे, असे त्यांनी सूचित केले ( २४५६ ) आहे. पंधराव्या वर्षी मुलगा वयात येतो याविषयी इस्लामी कायद्याच्या बहुतेक सर्व पंथांचे एकमत आहे. या प्रश्नासंबंधीचे निर्णायक मत देण्याच्या हेतूने एक हदिस सांगण्यात आले आहे. या हदिसात या संदर्भात एक प्रसंग सांगितला आहे. खलिफा उमर ( पहिला ) चा मुलगा अब्दुल्ला, आपल्या स्वतंत्र केलेल्या गुलामाला एकदा म्हणाला, की पैगंबरांनी उहद्च्या लढाईनंतर लढाई-तील लुटीचा वाटा आपणास दिला नाही. कारण आपण त्यावेळी १४ वर्षांचे असल्याने

लढाईत भाग घेण्याच्या दृष्टीने फारच लहान होतो. पण त्यानंतर एक वर्षाने ट्रेन्च येथे लढाई झाली, त्यातला लुटीचा वाटा मात्र पैगंबरांनी आपणास दिला.

मुलामधील यौवनप्राप्तीच्या शारीरिक लक्षणाविषयी शंका असते तेव्हा त्याचे पंधरावे वर्ष चालू असेल तर तो कायदेशीररित्या वयात आला आहे असे समजले जाते. १५ व्या वर्षाआधीच यौवनाची लक्षणे एखाद्या मुलात आहेत असे सिद्ध करून देता आले तर त्या वयातही तो मुलगा यौवनप्राप्त आहे असे मानण्यास हरकत नाही. परंतु नववे वर्ष ही या बाबतीतील किमान वयोमर्यादा मानलेली आहे. तसेच मुलीला पंधरावे वर्ष लागले असेल किंवा तिच्याठायी ऋतुप्राप्तीची लक्षणे दिसू लागली असतील, तर तिला निश्चितपणे स्त्रीत्व प्राप्त झाले आहे असे समजले जाते.[1] अबू हनीफा हा मुलाच्या बाबतीत १८ वे वर्ष हे प्रौढत्व प्राप्तीचे कायदेशीर वय आहे असे मानतो.[2] हनीफाने असेही सांगितले आहे, की पालकाच्या देखरेखीखाली असलेल्या एखाद्या मुलाला आपण आपल्या मालमत्तेची व्यवस्था लावण्यास समर्थ आहोत असे जर आपल्या पालकाला पटवून देता आले नाही तर आणखी ७ वर्षे म्हणजे तो मुलगा २५ वर्षांचा होईपर्यंत[3] तो अज्ञान आहे असे समजले जावे.

अज्ञान मुलांना स्वतःसंबंधीचा किंवा आपल्या संपत्तीबाबतचा कोणताही व्यवहार करण्याचा हक्क नाही त्यामुळे या वयात मुले ही आपल्या कुटुंबांतील एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीच्या नाममात्र पालकत्वाखाली असतात. पालकत्वाचे काम तीन प्रकारचे असू शकते. पहिला प्रकार अज्ञान मुलांच्या संगोपनाचा व भरणपोषणाचा. त्याविषयी मागे सांगितलेच आहे. ही आई-बापांची संयुक्त जबाबदारी समजली जाते. आई घटस्फोटीत

---

१. कुराण ४[5] वरील बैदावी याचे भाष्य. (हात किंवा पाय तोडण्याची) चोरीसाठी ठरलेली सजा पंधरा वर्षांखालील मुलास दिली जात नाही. 'मेजेले' (१८७६ ते १९२६ मधील तुर्कस्थानचे सिव्हिलकोड) ने १५ वर्ष हे मुलाचे संपूर्ण यौवनप्राप्तीचे वय ठरविले. तथापि बाराव्या वर्षीच यौवनाची सर्व शारीरिक लक्षणे मुलात दिसत असतील तर बाराव्या वर्षीदेखील मुलगा वयात आला आहे असे समजण्यास हरकत नव्हती.

२. मालिकी हाही याच्याशी सहमत आहे. तुर्कस्तानात १८ वे वर्ष हे मुलाचे सज्ञानतेचे कायदेशीर वय मानलेले आहे. इराणमध्येही विवाह व घटस्फोट सोडून इतर बाबतीत १८ वे वर्ष हेच मुलाचे सज्ञानतेचे कायदेशीर वय मानले जाते. १० जुलै १९५३ मध्ये जाहीर झालेल्या सीरियन प्रजासत्ताकाच्या घटनेने ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या १ जानेवारी रोजी ज्या स्त्रीपुरुषांची वयाची १८ वर्षे झाली असतील त्यांना मतदानाचा अधिकार दिला आहे.

३. बैदावी याचे कुराण ४[5] वरील भाष्य पाहा. व्हॉन क्रेमर याच्या मताप्रमाणे इस्लामी कायद्यावर रोमन कायद्याच्या प्रभावाचे हे चिन्ह आहे.

असेल, तर मागे सांगितले त्याप्रमाणे मुले विशिष्ट वयाची [ निरनिराळ्या पंथीयांनीं ठरवून दिलेल्या वयाची म्हणजे दोन किंवा चार वर्षांची ] होईपर्यंत त्यांची काळजी घेणे हे तिचेच काम समजले जाते. मूल सात वर्षांचे होण्याआधींच त्याची आई मरण पावली तर मुलांच्या आजीने ( आईच्या आईने ) आणि तीही नसेल तर पणजीने ( आजीच्या आईने ) मुलाची जबाबदारी घ्यावयाची असते. यांपैकी कोणीही नातेवाईक नसतील तेव्हाच फक्त मूल सात वर्षांचे होईपर्यंत त्याची जबाबदारी मुलाच्या बापावर सोपविली जाते. सातव्या वर्षी मुलाला सारासार विचारशक्ती प्राप्त होते, असे इस्लामी कायद्याच्या ज्या विचारपंथांचे मत आहे अशा पंथीयांनी ज्याचे आईबाप जिवंत आहेत पण घटस्फोटीत आहेत अशा सात वर्षांच्या मुलांना आईकडे राहावयाचे की बापाकडे राहावयाचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मुलाने आपल्या आई-बापांपैकी ज्याची पालक म्हणून निवड केली असेल ती व्यक्ती पूर्ण वयात आलेली, स्वतंत्र व मुस्लिम असली तरच त्या व्यक्तीला मुलाचे पालकत्व करता येते. मुलाच्या आईने त्या मुलाच्या नातलगां-बाहेरच्या माणसाशी परत लग्न केले तर तिला मुलाचे पालकत्व करण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे.

मुलांचे भरणपोषण करण्याच्या पालकत्वाच्या पहिल्या प्रकारच्या कामाशी मुले योग्य वयाची झाली, की त्यांना सुयोग्य पती अथवा पत्नी मिळवून देण्याची जबाबदारी निकटतेने निगडीत आहे.[१] या दृष्टीने पालकाला त्या मुलांचा वली समजले जाते. त्याने पार पाडावयाच्या वलीच्या जबाबदाऱ्या व अधिकार यासंबंधी या पुस्तकाच्या लग्नाविषयी चर्चा असलेल्या भागात याअगोदर सांगितलेच आहे. वली म्हणून काम करण्याचा पहिला हक्क मुलाच्या बापाकडे आणि बाप नसेल तर जवळच्या पुरुष नातलगाकडे जातो. वली या नात्याने पालक व्यक्ती पूर्ण वयात आलेली व मुसलमान असावी लागते.

मुलगी मुस्लिम व बाप ख्रिश्चन अशी परिस्थिती असेल तर बापाला आपल्या मुलीचे लग्न करता येत नाही.

पालकत्वाच्या तिसऱ्या प्रकारांत अज्ञान पाल्यांच्या संपत्तीची व्यवस्था पाहणे व काळजी वाहणे ही कामे समाविष्ट आहेत. या बाबतीतसुद्धा मुलाच्या बापालाच पालक म्हणून काम करण्याचा अधिकार[२] आहे. बाप नसेल तर तो अधिकार मुलाच्या आजाकडे किंवा आजाने मृत्युपत्राद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे जातो. मुलाचा पालक म्हणून काम करण्याचा हक्क फक्त पुरुषालाच असतो; परंतु काही कायदेपंडितांच्या मते मुलाच्या आईचा याबाबतींतील अधिकारही विचारात घेता येईल.

---

१. आणि म्हणूनच अशा जबाबदारीला ‘ विलायत अल् निका ’ असे ( लग्न-विषयक मार्गदर्शकत्व ) म्हटले आहे.

२. याला ‘ विलायत अल् माल ’ ( म्हणजे मालमत्तेचे पालकत्व ) म्हणतात.

यापैकी कोणत्याही प्रकारच्या पालकत्वामध्ये बापाला आपल्या मुलांचे बाबतीत अतिशय अधिकार आहेत. बाप आपल्या मुलांना गुलाम म्हणून विकू शकत नाही. तथापि बहुतेक सर्व पंथीयांच्या विधिसंहितेप्रमाणे बाप आपल्या कुमारिका, अविवाहित मुलीचे आपल्या इच्छेप्रमाणे कोणाशीही लग्न लावून देऊ शकतो. वयात न आलेल्या आपल्या मुलाच्या लग्नाचा करारही करू शकतो. विवाहित परंतु स्वतःचे स्वतंत्र घर न केलेल्या व बापाचे न ऐकणाऱ्या मुलाला बाप आपल्या घरातून हाकलून लावू शकतो आणि त्याद्वारे मुलाचा कुटुंबाच्या मालमत्तेतील वाटा नाकारू शकतो. कारण कुटुंब-प्रमुख या नात्याने बापाचा कुटुंबाच्या मालमत्तेवर संपूर्ण हक्क असतो. तथापि आपल्या कुटुंबाबाहेरील व्यक्तीला कुटुंबाच्या संपत्तीमधील किती हिस्सा मृत्युपत्राद्वारे द्यावा याबद्दल कुटुंबप्रमुखावर परंपरागत प्रथेनुसार काही मर्यादा घातलेल्या आहेत. सर्व-साधारणपणे आईबापांना या संबंधात अधिकार चालविण्यात क्वचित अडचण येते. कारण त्यांची विवाहित मुलेदेखील त्यांना अतिशय मानाने वागवितात. कुराणाने नेहमीच तशी शिकवण दिलेली[१] आहे.

अनाथ मुलाच्या पालकाला बापासारखेच पण थोडे कमी व्यापक असे अधिकार असतात. मुलाचे लग्नाचे वय झाले नसताना त्याच्या बापाने त्याच्या लग्नाचा करार केला तरी मुलगा लग्नाच्या वयात आल्यावर त्याच्यावर तो बंधनकारक समजला जातो. परंतु दुसऱ्या कोणी वलीने पाल्य मुलाचा अशा प्रकारे लग्नाचा करार केलेला असेल तर पाल्य मुलगा वयात आल्यावर तो रद्द करू शकतो. पालकाच्या परवानगीशिवाय अज्ञान मुलाला आपली मालमत्ता दुसऱ्याला देता येत नाही. तसेच पालकालाही आपल्य देखरेखीखाली असलेल्या पाल्याच्या मालमत्तेबाबत त्याच्या हिताचा नसलेला कोणताही व्यवहार करता येत[२] नाही. तथापि अडचणीच्या प्रसंगी आपल्या पाल्याच्या संपत्तीचा काही हिस्सा वापरण्यास कुराणात पालकाला परवानगी[३] आहे. अनाथ मुलाचे लग्नाचे वय झाले की आपली मालमत्ता सांभाळण्यास तो लायक झाला आहे की नाही, याची तपासणी करून त्यात तो योग्य ठरला तर त्याला त्याची मालमत्ता दिली जावी.[४] अबु हनीफाचे असे मत आहे, की अशा तपासणीचा निर्णय काहीही होवो, अनाथ मुलगा २५ वर्षांचा झाला असेल व तो मानसिकदृष्ट्या दुर्बल नसेल, तर त्याची संपत्ती पालकाने आपल्याकडे ठेवता कामा[५] नये.

---

१. उदाहरणार्थ, $१७^{२०}$, $२९^{७}$; $३१^{१३}$.
२. कुराण $६^{१५३}$; $१७^{३६}$.
३. कुराण $४^{६}$.
४. कुराण $४^{५}$.
५. कुराण $४^{५}$ वरील बैदावीचे भाष्य.

आतापर्यंत पाहिले त्यावरून इस्लामधर्मीतील मुलांचे स्थान पाश्चात्य समाजातील मुलांच्या दर्जापेक्षा फारसे भिन्न नाही असे दिसते. तथापि वारसा हक्काच्या बाबतीत मात्र स्पष्ट फरक दिसतो. वारसा हक्कासंबंधी निर्माण होणाऱ्या सर्व संभाव्य प्रश्नांच्या सोडवणुकीची तरतूद कुराणाने केलेली नाही. तथापि स्त्रियांना आपल्या नातलगांच्या संपत्तीबाबत वारसा हक्क देऊन कुराणातील कायद्यांनी एक नावीन्यपूर्ण व महत्त्वाची सुधारणा केली. अर्थात् वारशासंबंधीच्या इस्लामपूर्व काळातील प्रथांपैकी काही गोष्टी कुराणाने तशाच कायम ठेवल्या. ते अपरिहार्यही होते. छाप्यात अथवा लढाईत मिळवलेली लूट सोडून इतर कोणतीही संपत्ती सर्व जमातीने किंवा टोळींतील सर्व लोकांनी मिळवलेली आहे असे 'जाहिलिया'च्या काळात मानीत नसत. टोळीच्या शेखला लुटीमधील त्याच्या हक्काचा वाटा (एक चतुर्थांश) दिला, की उरलेली मालमत्ता, ती मिळवण्यात सहभागी असलेल्या सर्व लोकांत सारख्या प्रमाणात वाटून घेतली जाई. त्यामुळे टोळींतील कोणाही व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याच्या मालमत्तेवर त्याच्या टोळीला कांही प्रमाणात हक्क सांगता येत असे. वारसासंबंधीच्या आपल्या कायद्यात मुहम्मदांनी या गोष्टीस तत्त्वतः मान्यता दिलेली[1] आहे. परंतु एखाद्या व्यक्तीने आपल्या संपत्तीची वाटणी करतेवेळी आपल्या आई बापांना आणि मुलांना किती प्रमाणात हिस्सा द्यावा याविषयीं यासंबंधींचे कायदे सांगताना मुहम्मदांचे मन साशंक होते. त्यांच्या मनातील शंकेला त्यांनी बनविलेल्या नव्या कायद्याद्वारे पुष्टीच मिळते. मुहम्मदांच्या कायद्याप्रमाणे सर्व मुलांना, ती किती वयाची आहेत याचा विचार न करता वारशाचा वाटा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मृत व्यक्तीचा बाप, भाऊ, आया, बायका आणि मुली यांनाही वाटा देण्यात आला आहे. वारसाहक्काने मुलाला संपत्तीचा किती वाटा मिळावा हे कुराणाने सांगितलेले नाही. तथापि मृत व्यक्तीचे मुलगे सोडून त्या व्यक्तीच्या कुटुंबातील इतर लोकांना जंगम किंवा स्थावर असा फरक न करता, संपत्तीचा किती हिस्सा[2] देण्यात यावा हे मात्र कुराणाने निश्चित ठरवून दिलेले आहे. मृत माणसाने मृत्युपत्राने दिलेल्या देणग्या अथवा त्याची कर्जे देऊन झाल्यावर कुराणाने ठरवून दिलेल्या या 'हिश्या'चा, त्याच्या संपत्तीची विल्हेवाट लावताना अग्रक्रमाने विचार करावा लागतो. या संबंधीच्या कुराणामधील कायद्यांच्या आधाराने मुस्लिम कायदेपंडितांनी कोणाला किती हिस्से द्यावेत याचा एक तक्ता तयार करून दिलेला आहे. मुस्लिम कायद्याच्या बहुतेक पुस्तकांत तो पाहावयास मिळतो. येथे फक्त मुलगे व मुली यांच्या वारसा हिश्श्यापुरता आपणाला विचार करावयाचा आहे. परंपरेवर आधारलेल्या

१. कुराण ४ ८–१२, १५, १७६.

२. या हिश्शांना 'फराइद' म्हणजे 'बंधनकारक हिस्से' असे म्हणतात. या संबंधीचे नियम असलेल्या भागाला 'इल्म अल फराइद' म्हणजे 'फराइदचे शास्त्र' असे नाव आहे.

प्रथेनुसार मृत्युपत्राद्वारे कोणाही स्त्रीला किंवा पुरुषाला, सर्व कर्जे वगैरे देऊन शिल्लक राहिलेल्या आपल्या संपत्तीच्या तिसरा हिस्सा संपत्तीपेक्षा जास्त संपत्ती दान म्हणून देता येत नाही. त्याची बाकीची संपत्ती, ती व्यक्ती मृत्युपत्र न करता मरण पावली असेल तर त्या व्यक्तीची सर्व कर्जे देऊन उरलेली संपत्ती, ज्या व्यक्तींना 'हिस्सा' मिळण्याचा हक्क कुराणाने दिलेला आहे अशा व्यक्तींना मिळते; या सर्वांना त्यांच्या त्यांच्या वाट्याचा हिस्सा देऊन संपत्ती उरली आणि त्या माणसाला मुलगे असतील तर त्यांना ती दिली[1] जाते. सर्वांत थोरल्या मुलाला वारसासंबंधी काही विशेष अधिकार असल्याचा उल्लेख कुराणाने केलेला नाही. त्यामुळे मुस्लिम कायद्याप्रमाणे सर्व मुलांना बापाच्या इस्टेटीतील समान भाग वारशाने मिळतो. एखाद्या माणसाला मुलांप्रमाणे मुलीही असल्या तर त्यांना कुराणाप्रमाणे, मुलांना दोन हिस्से तर मुलींना एक हिस्सा या प्रमाणात बापाच्या संपत्तीचा वाटा मिळतो.

ज्या व्यक्तींना वाटा मिळाला पाहिजे अशांची खास नोंद कुराणात केलेली आहे. त्यात मुलींचाही समावेश आहे. एखाद्या व्यक्तीला मुलगे नसतील आणि फक्त एकुलती एक मुलगी असेल, तर तिला कर्जे वगैरे देऊन उरलेल्या इस्टेटीचा अर्धा हिस्सा मिळतो. आणि दोन किंवा जास्त मुली असतील तर त्या सर्वांना मिळून दोन तृतीयांश हिस्सा मिळतो आणि उरलेली इस्टेट, दुसरा कोणी कायदेशीर वारस नसेल तर काही विधिसंहितांप्रमाणे मुलीला किंवा मुलींना मिळते. मात्र इतर कांही विधिसंहितांनीं मुलींना हा अधिकार दिलेला नाही. हिश्श्यांच्या रकमेची मोजदाद करताना मृत्युपत्र करणाऱ्याची किंवा कायद्याची काही चूक झाली असेल, तर त्यासाठी कोणाही मुलग्याला किंवा मुलीला वारसा संपत्ती मिळण्यापासून कायद्याप्रमाणे वंचित करता येत नाही. हे सर्व खरे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र आपल्या बापाच्या इस्टेटीतला वाटा मुलींना क्वचितच मिळतो. मोरोक्कोमधील काही जमातींमध्ये फक्त मुलांना बापाकडून वारसा संपत्ती मिळते आणि विवाहित स्त्रीची संपत्ती तिच्या मुलांऐवजी तिच्या नवऱ्याला मिळते. कबाविश जमातींत मुलाला बापाची मालमत्ता मिळते आणि मुलगा नसेल तर भावाकडे अथवा अशाच इतर नातलगांकडे ती जाते; पण कुराणातील निर्देशाप्रमाणे मुलींना किंवा इतर कोणाही स्त्री नातेवाईकांना संपत्तीमधील हिस्सा मिळत नाही. तथापि आपणाला हव्या असलेल्या मालमत्तेचा काही भाग आपणास मिळावा अशी त्यांना अपेक्षा धरता येते. पॅलेस्टाईनमधील बदवी जमातींमध्येही मुलींना वारसा हक्काने संपत्ती मिळत नव्हती. तथापि तुर्की लोकांनी मात्र धर्मशास्त्राने सांगितलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

---

१. मालिकांच्या कायद्याप्रमाणे अज्ञान व्यक्तीने मृत्युपत्राद्वारे केलेली संपत्तीची व्यवस्था कायदेशीर मानलेली आहे. मात्र त्यात इस्लामी कायद्याच्या विरुद्ध असे काहीही असता कामा नये. शाफींच्या कायद्यानुसार अल्पवयीन व्यक्तीचे मृत्युपत्र बेकायदेशीर ठरते.

धर्मशास्त्राने सांगितलेल्या कायद्याचा जेथे आदर केला जातो तेथे धर्माने केवळ ज्येष्ठत्वाचा अधिकार मानलेला नाही हे लक्षात घेऊन मृतव्यक्तीचा मुलगा कितीही लहान असला तरी त्याला मृतव्यक्तीच्या नातवाऐवजी ( नातु सर्वात वडिल मुलाचा थोरला मुलगा असला तरी ) वारशाच्या बाबतीत अग्रक्रम दिलेला आहे.[१] म्हणूनच खिलाफतीचा वारस म्हणून एका भावामागून दुसरा भाऊ अधिकारपदावर आला आहे असेच पुष्कळदा वंशावळ्यांवरून दिसते. हरून अल रशीद याचा सर्वात थोरला मुलगा व सहावा खलिफा अमीन याच्यानंतर त्याच्या मुलाऐवजी हरूनचे दुसरे दोन धाकटे मुलगे मामून व मुतासिम हे अनुक्रमे सातवा व आठवा खलिफा म्हणून खिलाफतपदावर आरूढ झाले. मामूनऐवजी आपल्या मुलाला खलिफा करण्याचा अमीन याने खूप प्रयत्न केला, पण त्यात त्याला यश आले नाही. याउलट त्यानंतरच्या काळात बापामागून खलिफा-पदावर त्याचा मुलगा न चुकता आलेला दिसतो. तिसऱ्या मुहम्मदापर्यंतच्या ( मृत्यू १५९५ ) कोणत्याही ऑटोमन सुलतानाला आपल्या मुलाला आपली गादी मिळवून देण्यात अडचण आली नाही. मात्र तिसऱ्या मुहम्मदानंतर त्याच्याच घराण्यातील सर्वात ज्येष्ठ पुरुष व्यक्तीकडे सुलतानपद गेले आहे. काही बाबतींमधील सर्वात वरिष्ठ मुलाच्या हक्कांना शियापंथीयांची मान्यता आहे. उदाहरणार्थ, इराणातील कजर राज-वंशातील प्रत्येक शाहचे पद त्याच्या मुलाकडेच वारशाने गेलेले आहे.

या रिवाजाला पुढे एक चमत्कारिक फाटा फुटला असे इब्ने बतूताने लिहून ठेवले आहे. तो म्हणतो की, तकादाचे सुलतानपद सुलतानाच्या बहिणीच्या मुलाला बहुदा मिळत असे. दुसऱ्या काही बाबतींत जी एक प्रथा तुआरेग जमातीत अस्तित्वात होती असे आपण ऐकतो त्याच्याशी ही प्रथा जुळणारी आहे. अर्थात तुआरेग जमातीत आज वंशपरंपरेने क्वचितच कोणाकडे अधिकारपद जात असते.

अवांछित लोकांना वारसा मिळू नये यासाठी कायदेपंडितांनी व कुराणाच्या भाष्य-कारांनी काही अपात्रतेचे नियम घालून दिलेले आहेत. त्यानुसार एखाद्या माणसाने एखाद्या माणसाला हेतुपुरस्सर किंवा चुकून ठार मारले असेल तर त्या माणसाचा वारसा त्याला मिळू शकत नाही.[२] धर्मत्याग केलेल्या वारस व्यक्तीला कोणताही वारसा मिळत नाही. तसेच वारस व्यक्ती गुलाम किंवा नास्तिक असेल तरीही तिला वारसा मिळत

---

१. प्रत्यक्षात मात्र सर्वात थोरल्या मुलाला आपल्या बापाचे घर मिळते. विशेषतः बदवी जमातीत ही सवलत आहे.

२. तथापि शियापंथीय कायद्याप्रमाणे अशा माणसाला वारसा हक्क नाकारण्यापूर्वी त्याने खून केल्याचे सिद्ध व्हावे लागते. अपघाती मृत्यू हा या बाबतीत बाधक ठरत नाही.

नाही.[1] अनौरस मुलाला बापापासून वारसा मिळत नाही परंतु आईपासून मिळतो. अशा अनौरस मुलाचे आईबाप व त्यांची कोणतीही मुले यांच्याबाबतीत नातलगासंबंधीचे नेहमीचे नियम लागू केले जातात. त्यामुळे मुलाला आईच्या नातलगाकडूनही वारसा मिळू शकतो असा सुन्नीपंथीयांच्या मताप्रमाणे कायदा आहे. शियापंथीयांच्या मतानुसार अनौरस मुलाला आपल्या आईकडून किंवा तिच्या नातलगाकडून वारसा मिळत नाही. किंवा अशा मुलाकडून आईला व तिच्या नातलगांनाही वारसा मिळत नाही. परंतु नवरा-बायको वैवाहिक जीवन जगत असताना जे मूल जन्मले असेल परंतु त्याच्या आईच्या नवऱ्याने 'ल आन 'द्वारे त्याचे पितृत्व नाकारले असेल अशा मुलाला आईकडून वारसा मागण्याचा हक्क आहे.

इस्लाममध्ये दत्तकाला वारसा हक्क दिलेला नाही. जमातीमधील किंवा कुटुंबातील दत्तक व्यक्तीस ( देई ) इस्लामपूर्व काळात त्या कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तीच्या बरो-बरीने हक्क प्राप्त होत असत. त्याला लढाईतील लुटीत व वारशात हिस्सा मिळत असे. तसेच त्याला छापे घालण्याच्या कामातील आपली जबाबदारी उचलावी लागत असे. इतर वारसांचा विरोध पत्करूनदेखील स्त्रियांना[2]सुद्धा क्वचितप्रसंगी कायद्याने दत्तक घेता येत असे व वारशात वाटा देता येई. दत्तक घेतलेल्या व्यक्तीकडून वारसा मिळण्याचा हक्क जमातीला होता. त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने हीन समजल्या जाणाऱ्या परंतु मालमत्ता असलेल्या व्यक्तीला कधीकधी दत्तकासाठी आमंत्रित केले जाई. परंतु प्रसंगी आमंत्रित व्यक्ती अशा आमंत्रणामागील हेतू लक्षात घेऊन आमंत्रणास नकारही देत असे. नुसायब या गवयाने असा नकार दिला होता.

पैगंबर मुहम्मदांनी इस्लामची शिकवण देण्यास प्रारंभ करण्यापूर्वी खुद्द त्यांच्या-पाशी झैद इब्ने हारिसा या नावाचा एक गुलाम होता. त्याच्याविषयी असे सांगितले जाते की एक दिवस त्या गुलामाचे वडील व चुलते त्याला मुक्त करून घेऊन जाण्यासाठी मक्केला मुहम्मदांकडे आले. त्या वेळी आपल्यापाशी रहावयाचे की आपल्या आप्तेष्टांकडे परत जावयाचे, याचा निर्णय आपल्या गुलामाने स्वतःच करावा असे मुहम्मदांनी सांगितले. तेव्हा त्या गुलामाने आपण मुहम्मदांपाशीच राहू असे सांगितले. त्यावर मुहम्मद आजू-बाजूस असलेल्या माणसांना म्हणाले, " झैद हा आता माझा मुलगा झाला याला तुम्ही साक्षी आहात. मी त्याचा वारस आहे आणि तो माझा वारस आहे. " इस्लामच्या उदयापर्यंत तो तरुण गुलाम ' मुहम्मदांचा पुत्र ' म्हणून ओळखला जात असे. परंतु त्या-नंतर काही दिवसांनी असा एक प्रसंग घडला की त्यामुळे मुहम्मदांच्या या दत्तक पुत्राच्या दर्जात पार बदल झाला. झैदच्या बायकोकडे मुहम्मद आकर्षित झाले. तेव्हा तिच्याशी

---

१. तथापि नास्तिकांना एकमेकांपासून वारसा हक्क मिळू शकतो. मुस्लिमांना मात्र नास्तिकापासून वारसा घेता येत नाही.

२. या संदर्भात सुरायमच्या गुलाम मुलीची कथा प्रसिद्ध आहे.

आपणांस विवाह करता यावा म्हणून मुहम्मदांनी झैदला आपल्या बायकोशी फारकत घ्यावयास राजी केले. स्वतःच्या मुलाच्या बायकोशी लग्न करण्यास पैगंबरांनी इतरांना बंदी केली होती. पण स्वतः मात्र झैद या आपल्याच मुलाच्या बायकोशी मुहम्मदांनी विवाह केला यावरून बरीच बदनामीकारक चर्चा सुरू झाली. ही चर्चा बंद व्हावी म्हणून मुहम्मदांनी आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ दोन प्रकटीकरणे प्रस्तुत केली. त्यापैकी पहिले[१] प्रकटीकरण असे की पैगंबर हा कोणा एका व्यक्तीचा पिता नाही. आणि दुसरे[२] असे की दत्तक मुलगे हे सख्खे मुलगे होत असे परमेश्वराने सांगितलेले नाही. आणि म्हणून दत्तक मुलांना त्यांच्या जन्मदात्या बापाच्या नावे ओळखले जावे. या प्रकरणानंतर झैद हा "मुहम्मदांचा मुलगा" या ऐवजी "हारिसाचा मुलगा" (हारिसा हे त्याच्या बापाचे नाव होते) या नावाने ओळखला जाऊ लागला.

दत्तक मुलांना (बहुदा ते मुलगेच असतात) कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क मिळू नये आणि सख्ख्या मुलाची कोणतीही कर्तव्ये त्याला करावी लागू नयेत अशा पद्धतीने हनफी कायदेपंडितांनी कुराणातील या कथेचा अर्थ लावला आहे. दत्तक घेणाऱ्या आई-बापांना दत्तक मुलाशी अथवा मुलीशी विवाह करण्यास प्रतिबंध केलेला आहे हीच तेवढी त्या दोघांत निराळ्या प्रकारचे नातेसंबंध आहेत या गोष्टीस मान्यता दर्शवणारी बाब आहे. हा निर्बंध सोडता, पूर्ण वयात आलेला कोणीही मुस्लिम पुरुष आणि (आपल्या पतीच्या संमतीने) कोणीही मुस्लिम स्त्री, कोणाही मुलाला (सज्ञान असेल तर त्याच्या संमतीने) दत्तक घेण्यास स्वतंत्र आहे. मात्र दत्तक घ्यावयाच्या मुलाचे आई-बाप किंवा त्यापैकी कोणीही एकजण पूर्वपरिचित असेल तर त्या मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी दत्तक घेणाऱ्या आई-बापांवर कायद्याने येत नाही. अर्थात् नैतिक जबाबदारी असते.

हनफींच्या उलट मालिकींनी दत्तक मुलाला दत्तक घेणाऱ्या आई-बापांचा वारसा दिलेला आहे. परंतु ज्यांना अन्यथा वारशांतील हिस्सा मिळण्याचा अधिकार नाही अशा व्यक्तींनाच दत्तक घेता येईल. कोणत्याही एकाच नातलगास कायद्याप्रमाणे इतर सख्ख्या माणसांना मिळावयाच्या संपत्तीच्या नेहमीच्या हिश्श्यापेक्षा जास्त हिस्सा मिळू नये हा या निर्बंधामागील हेतू असावा.

दक्षिण पॅलेस्टाईनमधील काही जमातींत आंशिक दत्तकपद्धती रूढ आहे. या पद्धतीनुसार कुटुंबाबाहेरील एखादी व्यक्ती एखाद्या कुटुंबात काही काळापासून रहात असेल तर ती व्यक्ती 'त्या' कुटुंबाचाच घटक समजली जाते व तिला कुटुंबाच्या

---

१. कुराण ३३$^{४०}$.
२. कुराण ३३$^{४}$.

सामायिक मालमत्तेचा काही अंश मिळण्याचा हक्क असतो. तथापि कुटुंबांतील व्यक्तिगत घटकाकडून त्यांना वारसा हक्काने मात्र काही मिळत नाही. आणखीही एक खऱ्याखुऱ्या दत्तकपद्धतीचा प्रकार आहे. त्यानुसार दत्तक मुलगा हे कुटुंबातीलच एक रक्ताच्या नात्याचे अपत्य समजले जाते आणि दत्तक बाप तो मुलगा आपल्या रक्ताचा मुलगा म्हणजे ' दमावी ' आहे आणि नावानेही आपला मुलगा म्हणजे ' समावी ' आहे असे मानतो. त्या मुलाला दत्तक बापाच्या जमातीच्या पूर्वसंमतीने त्याच जमातींत लग्न-संबंधही जुळविता येतो.

□ □

प्रकरण ४

# इस्लामी न्यायशास्त्र

इस्लाममधील सर्वांत प्रबल मताप्रमाणे " फिकाह् " किंवा " न्यायशास्त्र " याची व्याख्या अशी : " धर्माच्या व्यावहारिक नियमांचे ज्ञान " किंवा अधिक पूर्णत्वाने व्याख्या करावयाची तर ती अशी : " ज्यांनी स्वतःला कायद्याचे पालन करण्यास बांधून घेतले आहे अशा व्यक्तींनी कोणते काम करणे योग्य ( वाजिब ) आहे; कोणते काम करणे अयोग्य ( महझूर ) आहे, कोणते काम करावे ( मंदूब ) आणि कोणते काम करू नये ( मक्रूह ) किंवा कोणते काम करावयास हरकत नाही ( मुभा ) या संबंधी परमेश्वराने घालून दिलेल्या नियमांचे ज्ञान. हे ज्ञान कुराणांतून, सुन्नांद्वारे आणि या दोन्हींमधील कायदे साकल्याने सांगण्यासाठी कायदेपंडितांनी केलेले शास्त्रार्थ यांच्यातून मिळते." कायदेपंडितांनी केलेल्या या शास्त्रार्थांतून उद्भवणाऱ्या नियमांच्या संग्रहाला ' फिकाह् ' असे म्हणतात. हे शास्त्र आणि कलाम किंवा ( इंग्रजीत डॉग्मॅटिक्स व स्कोलॅस्टिक थिऑलॉजी ) ही दोन्ही मिळून जे शास्त्र बनते त्याला ' शारे ' किंवा ' शरीयत ' म्हणतात. शरीयत याचा शब्दशः अर्थ ' मार्ग ' किंवा ' पथ ' [ इस्लामी धर्मसत्तेचा मार्ग. अल्ला हा या सत्तेचा प्रमुख व स्फूर्तिस्थान आहे. ] आणि म्हणूनच इस्लामी " कायदा " असा आहे. परंतु इस्लामी धर्माधिष्ठित कायदा ख्रिश्चन धर्माधिष्ठित कायद्यासारखाच आहे असे नाही. कारण धर्मनियम बनविण्याचा अधिकार असलेल्या इस्लाममधील व्यक्तींनी केलेल्या सर्व नियमांचा इस्लामी कायद्यांत समावेश केलेला आहे.

कुराण ( किंवा अधिक काटेकोरपणे म्हणावयाचे तर कुर्आन् ) या नावाने ओळखला जाणारा ग्रंथ हा इस्लामचा सैद्धान्तिक आधारस्तंभ आहे. ' कुर्आन् ' म्हणजे " पठण. " ' कराऽ ' हे कुराणाचे अरबी मूळ होय. कराऽ याचा अर्थ ' त्याने कथन केले ' किंवा ' त्याने पठण केले. ' खुद्द कुराणात या शब्दाचा उपयोग एक ' पठण ' किंवा ' परिच्छेद[१] ' अथवा त्यांचा संग्रह[२] या अर्थाने केलेला आहे. कमीअधिक अंतराने

---

१. उदाहरणार्थ कुराण ७२[१], १०६[२].

२. कुराण १५[८७], १७[८४].

आणि परिस्थितीच्या गरजेनुसार झालेल्या व स्वर्गात जतन करून ठेवलेल्या व आद्य-संहिता असलेल्या 'कुराणाच्या[१] जननी' मधून ज्यांची प्रेरणा मिळाली अशा अनेक प्रकटी[२]करणांचा संग्रह म्हणजे कुराण असे पैगंबर मानीत असावेत असे अनुमान काढता येते. स्वर्गातून[३] ज्याने हे संदेश पृथ्वीवर आणले तो दूत ही एक विश्वसनीय[४] शक्ती होती. या शक्तीला जिब्रीईल[५] देवदूत असे नाव दिले गेले.

कुराणामध्ये पैगंबरांना 'कथन करण्या'चे किंवा 'सांगण्या'चे आदेश मिळाले असा वारंवार उल्लेख आहे. मुद्दाम असा उल्लेख करण्याचा गर्भित हेतू, हे स्वर्गीय संदेश परमेश्वराने दिलेले संदेश होत आणि हे संदेश म्हणजे "माणसाला सदाचारासाठी केलेले मार्गदर्शन" व "सर्व बाबींसंबंधींचा निर्णय" होत[६] हे सांगणे हा आहे. आजवरच्या भूतकाळात जे जे सत्य म्हणून अस्तित्वात होते त्याचे सार कुराणात आहे असाही एक दावा केला गेला आहे. आणि असेही म्हटले आहे की कुराणाच्या आधींचा भू-तला-वरील धर्मग्रंथ म्हणजे मोझेसला मिळालेले पुस्तक. त्याचीच पुष्टी कुराणामध्ये जरूर तेथे केली आहे.[७]

कुराण हे अरबी भाषेत अथवा पैगंबरांच्या मातृभाषेत कथन केले गेले आहे असे कुराणांतच अनेकदा सांगितले[८] आहे. आणि गर्भितार्थाने म्हणूनच ते सुगम व सुबोध[९] आहे. "आम्ही कुराण परकी भाषेत सांगितले असते तर ते [ कुराणाचे विरोधक किंवा कदाचित ते स्वीकारणारे ] म्हणाले असते की त्यांतील शब्दांचा अर्थ सांगितला जात

---

१. उम्म अल किताब.

२. तान्झिल: "खाली पाठविणे".

३. कुराण ४३[३], १३[३९], ३[५], ८५[२२].

४. कुराण २६,[१९३].

५. कुराण २[९७].

६. ६[१५५]. "धर्माविषयी उपस्थित होणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे तपशीलवार स्पष्टीकरण" (बैदावी). वस्तुतः भाष्यकारांच्या निकषानुसारदेखील हे म्हणणे खरे नाही. उदाहरणार्थ कुराणामध्ये 'सुंता' या प्रश्नासंबंधी एक शब्दही आढळत नाही. 'सुंता'ची पद्धत सर्व इस्लामी देशांत प्रचलित नाही. तथापि सुंता हे मुसलमानांचे सर्वसाधारणपणे चिन्ह समजले जाते.

७. कुराण ४६[११] आणि ६[१५५].

८. कुराण १९[२७].

९. कुराण ४२[५], २०[११२], २६[१९५], १३[३७], ४१[२].

नाही तोंपर्यंत [ आम्ही ते स्वीकारणार नाही ]... काय ? अरबी माणसाठी परकीय भाषेत[1] कुराण ? "

आजच्या स्वरूपांतील कुराण हा 'सुरां'चा म्हणजे प्रकरणांचा एक संग्रह होय. या 'सुरां'मध्ये अतिशय संमिश्र स्वरूपाचे साहित्य आहे. एकंदर हे सर्व सुरा म्हणजे पैगंबरांनी आपल्या जीवनकालात जी अनेक प्रवचने दिली त्या प्रवचनांच्या वृत्तांतांची मालिका होय. हे वृत्तांत साररूपाने मुळाबरहुकुम आहेत. पैगंबरांनीं प्रवचने करण्यापूर्वी किंवा नंतर स्वतः ती लिहिली असण्याचा संभव नाही. कारण पारंपरिक मुस्लिम समजुतीप्रमाणे पैगंबर निरक्षर होते.[2] पैगंबरांनीं वेळोवेळी नेमलेल्या आपल्या खाजगी चिटणीसांच्या नावांची नोंद इतिहासकारांनी करून ठेवलेली आहे. तथापि कुराणाच्या प्रारंभीच्या प्रकरणांत असणारी पैगंबरांची प्रवचने त्यांनी अगोदर तयार करून कथन केली होती असे दिसत नाही. कारण ती मुक्त व उत्स्फूर्तपणे केल्यासारखी वाटतात. आकडेवारी असलेल्या कायदाविषयक मुद्यांचे कदाचित अगोदर टिपण केले असण्याची शक्यता आहे. कारण अशा प्रकारची आकडेवारी लक्षात ठेवणे कठिण असते. परंतु कुराणांतील बहुसंख्य प्रकटीकरणे ही पैगंबरांनी ज्या प्रवचनांत ती सांगितली त्या प्रवचनांना उपस्थित असलेल्या श्रोत्यांनी आपल्या आठवणीत साठवून ठेवलेली असली पाहिजेत. या प्रवचनांचे ऐकीव वृत्तांत आणि त्यांची काही उपलब्ध टिपणे यांच्या आधारावर पैगंबरांच्या देहावसानानंतर कुराणाची अधिकृतपणे रचना केली गेली.

'सुरां'च्या कमीजास्त लांबीप्रमाणे कुराणातील 'सुरां'चा क्रम लावण्यात आला आहे. कुराणातील पहिल्या किंवा उपोद्‌घाताच्या 'सुराला' 'फातेहा' म्हणतात. सामुदायिक प्रार्थनेच्या दृष्टीने हा सुरा महत्त्वाचा समजला जातो. या पहिल्या 'सुरा'नंतर त्या सुराखालोखाल दुसरा दीर्घ सुरा आणि त्यानंतर छोटे छोटे अनेक सुरा अशी एकूण

---

१. ४१[४४]. अरबीशिवाय दुसऱ्या भाषेत कुराणाचे पठण करणे हे कायदेशीर आणि योग्य आहे काय असा मुद्दा यातून उपस्थित होतो. कुराणावरील ( १, ५ ) आपल्या भाष्यांत तबरी म्हणतो, "परमेश्वर त्याच्या धर्मदूतांच्या भाषेतून प्रकटीकरण पाठवीत असतो. मुहम्मदांची भाषा अरबी असल्यामुळे कुराण अरबीत आहे." कुराण अरबी भाषेत का आहे याचे विवेचन करताना झमाखशारी हा दुसरा एक भाष्यकार म्हणतो, "म्हणून अबु हनीफा याने असा निर्णय दिला की, प्रार्थनेच्या प्रसंगी इराणी भाषेतून कुराणाचे पठण करावयास हरकत नाही. कारण परकी भाषेत कुराणाचा अनुवाद केला तरी कुराण हे कुराणच राहते. कारण त्यांतील विषय तेच असतात; बदलत नाहीत."

२. कुराणांतील ७[१५६], [१५८] आणि २९[४७] या आयतांवरून हे अनुमान काढले आहे.

रचना आहे. कुराणांतील प्रत्येक प्रवचन हे एकाचवेळी पैगंबरांनी दिलेले संपूर्ण प्रवचन आहे की अनेक प्रवचने एकत्र करून प्रकरणांची रचना केली आहे हे निश्चित सांगता येत नाही. कुराणातील काही प्रवचने खूपच दीर्घ आहेत. त्यांमध्ये विभिन्न विषयांची चर्चा आहे. तथापि ती प्रवचने मुहम्मदांनी एकाच प्रार्थनासभेत दिली असण्याचीही शक्यता आहे.[1] पैगंबरांनी विशिष्ट सुरांतील प्रवचन कधी दिले याची कल्पना नसल्यामुळे सुरांची रचना त्यांच्या कालक्रमानुसार न करता त्यांच्या कमीजास्त लांबीनुसार करण्यात आली आहे असे म्हणता येत नाही. कारण पैगंबरांनी आपल्या मक्केमधील वास्तव्यात कोणते सुरा सांगितले आणि मदिना येथील वास्तव्यात कोणते सांगितले याची नोंद कुराणात आहे आणि ती अचूक असण्याची शक्यता आहे.[2]

फार पूर्वी आणि तेसुद्धा कदाचित् फक्त एकदाच जे प्रवचन ऐकले त्यातील विषयांच्या तपशीलाचे अचूक स्मरण अगदी उत्तम स्मरणशक्ती असलेल्या श्रोत्यांनादेखील राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे कुराणात बऱ्याच मोठ्या प्रमाणात अस्पष्टता आढळते. यात आणखी भर म्हणून प्रदत्त कुराणाच्या प्रतीमध्येही काही तफावती आहेत. याचे कारण अरबी लिपीची अपूर्णता. अरबी लिपी ही सुरुवातीला अरबी लिहिण्याच्या दृष्टीने अपूर्ण होती. तिच्यामध्ये ऱ्हस्व स्वर नव्हते. ऱ्हस्व स्वरांवरच नामांची व क्रियापदांची विभक्तीरूपे आधारलेली असतात. शिवाय अरबी लिपीत अशी काही अक्षरे होती की त्यांतील चिन्हात्मक फरक नीट समजून घेतला नाही तर त्यांची एकमेकांशी गल्लत होण्याची सहज शक्यता होती. तसेच पैगंबरांची भाषणे ऐकून त्यांचा वृत्तान्त ज्यांनी कथन केला त्यांच्या भाषेतील प्रादेशिक भिन्नतेमुळे कुराणात काही वचनांचे विवादास्पद पाठ आढळतात.

तथापि अनेकदा कुराणामधील विचारदेखील संदिग्ध वाटतात. याचे कारण महत्त्वाच्या प्रश्नांबाबत आपले निवाडे देण्याचे किंवा ( वारसाहक्कासारख्या ) गुंतागुंतीच्या कठीण व दूरगामी परिणाम करणाऱ्या बाबींसंबंधीचे नियम फारशी पूर्वकल्पना नसताना आयत्यावेळी सांगण्याचे प्रसंग पैगंबरांच्यावर वरचेवर आले असावेत. शिवाय आपली प्रकटीकरणे काव्यात्मकपद्धतीत व काव्यात्म भाषेत सांगण्यावर पैगंबरांचा जोर होता.

---

१. मुस्लिम देशांत आणि इतरत्र बरीच लांबलचक भाषणे केली जात यात नवे काही नाही. हिब्रु प्रेषितांच्या प्रवचनाप्रमाणे पैगंबरांच्या प्रवचनात विविध विषयांवर चर्चा आहे.

२. एकाच सुरामध्ये केलेला विभिन्न कालांचा निर्देशही मुस्लिम पंडितांनी जशाच्या तसा ठेवलेला आढळतो. म्हणूनच बैदावी याने कुराणातील २[२४१] यावरील आपल्या भाष्यांत असे म्हटले आहे की याचे प्रकटीकरण संबंधित सुरातील दुसऱ्या आयताच्या अगोदर झालेले होते.

उत्तरायुष्यात कायद्यासारख्या गद्य विषयासंबंधी त्यांना बोलायचा प्रसंग आला तेव्हादेखील सरळ व स्वच्छ भाषेऐवजी त्यांनी काव्यात्मक भाषेचा वापर केलेला आहे.

कुराणात समाविष्ट केलेल्या मक्केमधील प्रारंभीच्या सुरांमध्ये तसेच त्याआधीच्या मदिनातील सुरांमध्ये पैगंबरांनी आपल्या नवीन अनुयायांपुढे केलेल्या भावनापूर्ण व आवेशपूर्ण भाषणांचा समावेश आहे. आपल्या अनुयायांतील धर्मश्रद्धा बळकट करण्याकरता या भाषणात पैगंबरांनी जळजळीत शब्दांत आपल्या शत्रूंचा धिक्कार केलेला आहे. त्यासाठी त्या भाषणात नरकाची व स्वर्गाची तसेच 'कयामत 'च्या दिवशींच्या निवाड्याची वर्णने केली आहेत.[१] याव्यतिरिक्त आपल्या नव्या अनुयायांची धर्मश्रद्धा अधिक प्रखर व्हावी या हेतूनेच पैगंबरांनी ज्युईश व ख्रिश्चन धर्मग्रंथातील किंवा जुन्या करारांतील नकली भागामधील कथाही सांगितल्या आहेत. परंतु या कथांमध्ये ज्या तफावती व विसंगती दिसतात त्यावरुन त्या ऐकीव कथा असल्याचे स्पष्ट दिसते.[२] त्याचप्रमाणे या सर्व सुरांमध्ये संयम[३] करावा, केलेल्या करारांचे व दिलेल्या शब्दांचे पालन करावे, इमानदारीने साक्ष द्यावी[४], माल विकताना वजन[५] खरे व सढळ ठेवावे, आईबापांविषयी ममता व कृतज्ञता असावी[६] इत्यादी गुणांचा उपदेशही इतस्ततः केलेला आढळतो. व्यक्तिगत वर्तणुकीचे पाठही न विसरता दिलेले आहेत.[७] परमेश्वरी सामर्थ्याचे व विश्वसत्तेचे उदाहरण म्हणून अनेकदा ( विश्वाची ) निर्मिती कशी झाली हे वारंवार सांगितले आहे. पैगंबरांनी स्वतःच्य त्यासंबंधीच्या कल्पना सांगितल्या आहेत. बहुधा तत्कालीन विद्वानांमध्ये जगदुत्पत्ती व विश्वरचना यासंबंधी ज्या कल्पना प्रचलित होत्या त्याच कल्पना पैगंबरांनी सांगितल्या असाव्यात.[८]

खऱ्या आस्तिकाची धार्मिक कर्तव्ये, धार्मिक विधी आणि सामाजिक कर्तव्ये व जबाबदाऱ्या यासंबंधी कुराणात प्रासंगिक सूचना दिलेल्या आहेत, पण स्पष्ट शब्दांत मार्गदर्शन केलेले नाही. उदाहरणार्थ ७० व्या सुरातील हा विषय : 'मेअराज' ( उत्कर्ष )–

---

१. यासाठी ५२ व ५६ हे सुरा विशेषतः पहावे.

२. यांपैकी काही प्रदीर्घ कथा जोसेफ ( सुरा १२ ), जोनाह ( सुरा १० ) व मोझेस ( सुरा ७ $^{१०३-६०}$ ) यांच्याविषयी आहेत.

३. ७०$^{२९}$, २६$^{६५}$.

४. ७०$^{३२}$.

५. ५५$^{८}$, २६$^{१}$, ११$^{८५}$.

६. २९$^{७}$, ४६$^{१४}$, ३१$^{१३}$.

७. ३१$^{१६-१९}$.

८. उदाहरणार्थ— २१$^{३१-३४}$, २५$^{५५}$, ३८$^{७१}$, ४१$^{९-११}$, ११$^{७}$, ५४$^{४९}$, १५ $^{६, १९}$, २२, २६.

"मनुष्य जन्मतःच लोभी आहे. दुष्टप्रवृत्तीच्या स्पर्शाने (तो) उतावीळ बनतो, आणि सत्प्रवृत्तीच्या स्पर्शाने तो नाराज होतो. परंतु प्रार्थनाशील माणसाचे तसे होत नाही. जी माणसे प्रार्थनेत सदैव मग्न असतात, भिकारी व गरीब लोकांना आपल्या संपत्तीचा ठरलेला व योग्य वाटा देतात, ज्यांची 'कयामत'च्या निवाड्यावर श्रद्धा असते, अथवा जे लोक परमेश्वर शासन करणार नाही अशा रीतीने वागतात, (खरे तर परमेश्वरीशासन कोणालाच चुकत नाही) किंवा जे आपल्या स्वतःच्या बायका अथवा गुलाम स्त्रिया वगळून इतर स्त्रियांपुढे आपली गुप्तेंद्रिये झाकून घेतात [गुलाम स्त्रिया व स्वतःच्या बायकांपुढे गुप्तेंद्रियांचे प्रदर्शन करणे दोषास्पद नाही पण यापुढे जाऊन वर्तन करणे दोषास्पद आहे.], दिलेला शब्द व केलेले करारमदार जे प्रामाणिकपणे पाळतात, जे इमानदारीने साक्ष देतात, किंवा प्रार्थनेच्या बाबतीत जे काळजीपूर्वक वागतात– त्यांचे तसे[१] होत नाही."

पैगंबर मदिनामध्ये वास्तव्य करून राहिले होते त्या काळात संपूर्ण अरबस्तानात इस्लामचा प्रसार झाला होता. तसेच इस्लामच्या अनुयायांची संख्याही खूप वाढली होती. अशा वेळी तरी आपल्या अनुयायांसाठी एखादी विधिसंहिता तयार करण्याचे काम पैगंबरांनी हाती घेतले असेल असे वाटेल, परंतु त्या वेळीही कायद्याच्या बाबतीत त्यांनी स्पष्टपणे मार्गदर्शन केलेले नाही. मदिना येथील 'सुरां'मध्ये मक्केमधील 'सुरां'-पेक्षा काव्यात्मकता कमी आहे. ते बरेचसे गद्य आहेत. परंतु त्या 'सुरां'मध्येही पुन्हा जुन्याच विषयांची चर्चा केलेली आहे. मदिना येथील प्रवचनांतसुद्धा पैगंबरांच्या धर्मविषयक मतांचे स्पष्ट दर्शन होत नाही. त्या प्रवचनांमध्येही धर्मश्रद्ध मनुष्याने नियमितपणे प्रार्थना केली पाहिजे, गरीबासाठी कर (जकात) दिला पाहिजे, आणि परलोकावर विश्वास ठेवला पाहिजे इत्यादी पूर्वी सांगितलेली कर्तव्येच पैगंबरांनी पुनश्च सांगितली आहेत. परंतु पुढे परिस्थितीच्या गरजेपोटी पैगंबरांना विधिनियम बनविणे भाग पडले पण ती विधिसंहितादेखील फारच मामुली स्वरूपाची होती.

गुलामीची प्रथा, विवाह आणि वारसा यासंबंधी कुराणात जे नियम आहेत ते प्रसंगानुरूप या पुस्तकात याअगोदर सांगितलेच आहेत. हे जवळपास सर्व नियम पैगंबरांनी मदिना येथील आपल्या वास्तव्यात सांगितले होते.

आता कुराणात कायदेकानूविषयक भाग कसेकसे विकसित होत गेले; इस्लामच्या प्रसाराबरोबर त्यात वेळोवेळी कसकशी भर घातली गेली आणि त्यांचे विशाल मुस्लिम न्यायशास्त्राच्या रचनेत कोणते स्थान आहे ते पहावयाचे आहे. प्रार्थना, गरीबासाठी कर देणे, उपवास व यात्रा या धर्मश्रद्धांच्या प्रत्येक प्रमुख कर्तव्यासंबंधी कुराणात सांगितलेले नियम हे या संदर्भातील एक चांगले उदाहरण म्हणून घेता येईल. यांपैकी

---

१. कुराण ७०$^{१९-३४}$.

तीन कर्तव्यांच्या बाबतीत कुराणाने आपल्यापरीने बरेच मार्गदर्शन केलेले आहे. या कर्तव्यांना " परमेश्वरी शब्दां "च्या अधिकाराचे अधिष्ठान आहे. त्यामुळे या कर्तव्यां-संबंधींचे नियम सर्व मुस्लिमविश्वात प्रमाण मानले गेले आहेत. आणि मुस्लिम न्याय-शास्त्राच्या प्रत्येक ग्रंथांत त्यांना गौरवाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ' फर्ज-अल्-ऐन ' म्हणजे ' व्यक्तीवर बंधनकारक असलेले कर्तव्य ' या शब्दांनी यापैकी प्रत्येक कर्तव्य ओळखले जाते. दुसऱ्या प्रकारचे कर्तव्य म्हणजे ' फर्ज-अल्-किफाया ' म्हणजे ' समाजा-वर बंधनकारक असलेले कर्तव्य. ' उदाहरणार्थ, सुलतानाची निवड करण्याची जबाबदारी. खाली जे तुलनात्मक विवेचन केले आहे त्यावरून कुराणांमध्ये[१] या कर्तव्यांबाबतचे पायाभूत नियम कशाप्रकारे विशद करून सांगितले आहेत ते लक्षात येईल.

## ( १ ) प्रार्थनेच्या निर्देशित वेळा

सूर्योदय व सूर्यास्त होण्यापूर्वी आपल्या परमेश्वराची स्तुतिस्तोत्रें म्हणावी. रात्रीही काही वेळा म्हणावी[२].

सूर्यास्तापासून रात्रीचा काळोख होईपर्यंत प्रार्थना करावी आणि पहाटे ( कुराणाचे ) पठण करावे...इच्छा[३] असेल तर रात्री काही वेळ जागून प्रार्थना करावी.

दिवसाच्या प्रारंभी व शेवटी अशी दोनदा आणि रात्र पडल्यानंतर प्रारंभीचा काही वेळ प्रार्थना[४] करावी.

प्रार्थनेसंबंधीच्या कर्तव्याची व मधल्यावेळच्या प्रार्थनेची काळजी घ्यावी.[५]

या आयतांवरून असा समज होण्याची शक्यता आहे की प्रार्थनेच्या फक्त तीन वेळा ठरवून दिलेल्या आहेत, परंतु तसे निश्चित समजता येत नाही. कारण त्याच त्याच शब्दांचा पुन्हा पुन्हा उपयोग केलेला आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शिवाय या शब्दांना खुद्द ' अल्लाचे शब्द ' म्हणून अत्यंत मान आहे. पण पुढे मुस्लिम न्याय-पंडितांकडून असेही सांगण्यात आले की प्रत्येक वेळी पुन्हा नियम सांगताना शब्दांत फरक करण्यात आला आहे. याचा अर्थ प्रत्येक वेळी नवी भर घालण्यात आली आहे. पैगंबरांच्या मृत्यूला एक शतक किंवा त्याहीपेक्षा जास्त काळ लोटल्यावरदेखील कितीदा व कोणत्या वेळी प्रार्थना करायची हे निश्चित झालेले नव्हते किंवा त्यासंबंधी निर्णय झालेला नव्हता.

---

१. या ठिकाणी कुराणांतील परिच्छेद कालानुक्रमाचा विचार न करता उद्धृत केले आहेत.

२. $५०^{३८}$.

३. $१७^{८०}$.

४. $११^{११४}$.

५. $२^{२३९}$.

प्रार्थनेसंबंधीचे नियम ज्याप्रमाणे निश्चित नव्हते तसेच इतर बाबतींतील नियमांतही इस्लामी इतिहासाच्या पहिल्या शंभर वर्षांत अनिश्चितता दिसून येते. उदाहरणार्थ, कोणती वस्तू खावी किंवा खाऊ नये, वारसाची वाटणी कशी करावी यांसारख्या निकडीच्या व व्यावहारिक बाबीसंबंधीसुद्धा अगदी याविषयीच्या अधिकारी व्यक्तींची मतेदेखील निश्चित झालेली नव्हती. म्हणूनच एकदा दुसऱ्या उमर खलिफाच्या मुलाला जेव्हा विचारले की, 'समुद्रातून बाहेर फेकला गेलेला मासा खाणे योग्य आहे काय ?' तेव्हा त्याने 'नाही' असे उत्तर दिले. तथापि 'समुद्रातून[1] आणलेल्या वस्तू' खाणे कायदेशीर आहे असे सांगणारा कुराणातील उल्लेख त्याला दाखविण्यात आला तेव्हा त्याने आपले मत बदलले आणि समुद्रातील मासा खाणे निषिद्ध नाही असे त्याने सांगितले. तसेच घोड्याचे मांस खावे की नाही याहीबाबतीत व्यापक मतभिन्नता असल्याचे दिसते. इस्लाममध्ये कधीही व कोठेही या प्रश्नासंबंधी अधिकृत निर्णय झालेला नाही.

मृत व्यक्तीच्या संपत्तीची तिच्या नातलगांत कशा रीतीने वाटणी करावी यासारख्या व्यावहारिक महत्त्वाच्या बाबींविषयीसुद्धा किती विभिन्न मते अस्तित्वात होती याचे वर्णन मसूदी या इतिहासकाराने केलेले आहे. या संदर्भात त्याने एका प्रसंगाचा उल्लेख केला आहे. शुबी नावाच्या एका विद्वान पंडिताला हज्जाज या इराकच्या प्रख्यात गव्हर्नराने एकदा विचारले, "एखाद्या व्यक्तीच्या इस्टेटीची आई, बहीण व आजी यांच्यामध्ये कोणत्या प्रमाणात वाटणी करावी ?" तेव्हा शुबीने उत्तर दिले की पैगंबरांच्या पाच सहकाऱ्यांनी याबद्दल भिन्नभिन्न निवाडे दिलेले आहेत.

पैगंबरांची राजधानी आणि पारंपरिक विद्येचे पीठ असलेल्या मदिना या शहरांतील सत्ताधाऱ्यांची इस्लामच्या अनुयायांवर काही प्रमाणात सत्ता प्रस्थापित होण्यास प्रारंभ झाला तेव्हाच कुराणामधील प्रार्थनेसंबंधीच्या सर्व आयतांचा एकत्र विचार करून अखेर असे अनुमान काढण्यात आले की, कुराणात प्रार्थनेच्या तीन नव्हे तर पाच वेळा सुचविलेल्या आहेत. तेराव्या शतकातील कुराणाचा इराणी भाष्यकार बैदावी याने कुराणामधील ५०[३९] या आयतावर भाष्य करताना वर उल्लेखिलेले अनुमान कसे काढले गेले ते अतिशय स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. तो म्हणतो, "परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे म्हणणे म्हणजे प्रार्थना. सूर्योदयापूर्वी केलेली प्रार्थना म्हणजे 'सकाळची (सुब्ह) प्रार्थना' आणि सूर्यास्तापूर्वी करावयाची प्रार्थना म्हणजे दुपारची (जोहोर) आणि मध्यान्हींची (अस्र) या दोन प्रार्थना होत. आणि 'रात्रीच्या काही वेळी' याचा अर्थ 'संध्याकाळ' व 'रात्र' या दोन[2] वेळा असा आहे." स्वतः बैदावीच्या काळात प्रार्थनेच्या ज्या

---

१. ५[९७].

२. अल् इशान म्हणजे मगरिब व 'ईषा.'

वेळा रूढ होत्या (आणि आजही ज्या योग्य समजल्या जातात) त्यांना कुराणात दुजोरा आहे हे दाखवून देण्याचा बैदावी याचा हा प्रयत्न आहे हे उघड आहे.

प्रार्थनेविषयीचे इतर नियम प्रार्थनेवेळच्या शुचिर्भूततेसंबंधींचे आहेत. कुराणात याविषयी पुढील नियम सांगितले आहेत :

" धर्मावर श्रद्धा असलेल्यांनो, दारू पिऊन प्रार्थनेला जाऊ नका. आपण काय बोलतो आहोत हे आपणाला समजेपर्यंत (थांबा), तुम्ही रस्त्यावरून प्रवास करीत असाल ती वेळ सोडून इतर वेळी अस्वच्छ अवस्थेत प्रार्थनेला जाऊ नका. अंग स्वच्छ धुवून जा. आजारी असाल किंवा प्रवासात असाल अथवा तुमच्यापैकी कोणी अंतःपुरांतून किंवा स्त्रीला स्पर्श करून आले असेल अथवा पाणी न मिळाल्यामुळे अंग धुतले नसेल तर त्याने जमिनीवरच्या स्वच्छ मातीने चेहरा व हात साफ करून प्रार्थनेस जावे.[1]

" धर्मावर विश्वास असलेल्यांनो, प्रार्थनेपूर्वी तोंड व हात कोपरापर्यंत आणि पाय गुडघ्यापर्यंत धुवा[2]. "

प्रार्थनेच्या वेळी कोणत्या दिशेला तोंड असावे यासंबंधी सुरुवातीला कोणतीही खास सूचना केलेली नव्हती [ " पूर्व आणि पश्चिम या दोन्ही दिशा परमेश्वरनिर्मित आहेत. त्यामुळे कोणत्याही दिशेला तुम्ही तोंड केलेत तरी तेथे परमेश्वराची मुद्रा दिसेल.[3] " ]. पुढे जरूसलेमकडे तोंड करून प्रार्थना करावी असे ठरले अशी सार्वत्रिक पारंपरिक समजूत आहे. बहुधा ज्यू पद्धतीशी जुळवून घेण्यासाठी हा निर्णय घेतला असावा. वास्तविक जरूसलेमचा कुराणात उल्लेख नाही. " प्रार्थनेचे अत्यंत पवित्र स्थान "($२^{१४५}$) किंवा " प्रार्थनेचे अत्यंत दूरचे स्थळ " ($१७^{१}$) हे कुराणांतील उल्लेख जरूसलेमविषयीच आहेत असा नंतरच्या काळात निष्कर्ष काढण्यात आला. ते काहीही असो, पुढे लवकरच मक्का येथील मशिदीकडे तोंड करून मुहमदीधर्मीय प्रार्थना करू लागले.

कायदेपंडितांसमोर भविष्यकालात उभ्या राहणाऱ्या शक्यतो सर्व प्रश्नांना उत्तरे मिळतील अशा रीतीने ' फिकाह् 'च्या पुस्तकांमध्ये कुराणांतील सर्व नियमांची व्याप्ती वाढविण्यात येऊन त्यात भर घालण्यात आली. यापैकी काही प्रश्न तर केवळ नैतिकता-अनैतिकता यासंबंधांतील आहेत.

यापुढील मजकूरांत कायद्याच्या विभिन्न ग्रंथांच्या प्रमुख भागांतील विषयांचाच उल्लेख केला आहे. उदाहरणार्थ, ' धार्मिक विधीच्या वेळी पाळावयाची शुचिर्भूतता '

---

१. $४^{४६}$.
२. $५^{८}$.
३. $२^{१०९}$.

[ हा भाग स्वाभाविकपणे ' प्रार्थना ' या विभागाच्या अगोदर आहे ]. या शीर्षकाखाली ' मजमु अल्[1] फिकाह् ' या ग्रंथांमध्ये पुढील विषयांची चर्चा आहे.

प्रार्थनेपूर्वी करावयाची स्वच्छता, अस्वच्छता झाली तर विधिपूर्वक करावयाची स्वच्छता, पाणी नसेल तेव्हा वाळूने अंग स्वच्छ करणे ( तयम्मुम ), ऋतुस्राव झालेला असेल तर—इत्यादी.

" प्रार्थना " या विषयासंबंधीच्या भागात पुढील शीर्षके आहेत :

प्रार्थनेचे आवाहन ( अझान ), प्रार्थनेच्या वेळा, प्रार्थनेसाठी जमलेल्या समाजाला कोणी प्रार्थना सांगावी, प्रवासातील प्रार्थना इत्यादी.

याच सुमाराचा ' जामी-अल-सघीर ' या नावाचा एक ग्रंथ आहे. त्यांत न्याय-शास्त्राची अधिक पद्धतशीर मांडणी केलेली आहे. मुहम्मद इब्ने हसन अल शेबानी या हनफी पंथाच्या पंडिताने या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथात ' प्रार्थना ' या विभागात पुढील विषयांची नोंद आहे :

कशामुळे स्वच्छता बाद झाली असे समजावे; स्वच्छतेसाठी कशाचा उपयोग करावा; कशामुळे कपडे अस्वच्छ होतात ( पायमोजे की जोडे ? ); मांडीचा काही भाग ( अनवधानाने ) उघडा ठेवून एखाद्या स्त्रीने प्रार्थना केली तर ( तिने पुन्हा प्रथमपासून प्रार्थना करणे जरूर आहे काय ? ); अझान किंवा प्रार्थनेचे आवाहन; ' अल्ला हो अकबर ' कसे म्हणावे; प्रार्थनेचा काही भाग खाजगीरीत्या पुरा केल्यानंतर एखाद्याला सार्वजनिक प्रार्थनेस जावे लागले तर; प्रार्थना बाद कधी ठरते; प्रार्थनाप्रसंगीचे कुराण पठण; प्रार्थनेच्या वेळी कोणते अंगविक्षेप करू नयेत; प्रार्थनेच्या प्रसंगी होणाऱ्या चुका व त्या कशा सुधाराव्या; बसून प्रार्थना करणारा अपंग; सणाच्या वेळची प्रार्थना; शव-यात्रा व त्या वेळची प्रार्थना; चुकून मारलेल्या व्यक्तीचे शव धुण्याची गरज आहे काय ? मशिदींच्या ( मालकीसंबंधीचा ) कायदा.

या संदर्भात शिराझी याच्या ' तनबीह '[2] या आणखी एका ग्रंथाचा उल्लेख करता येईल. या ग्रंथामधील " धार्मिक विधीच्या वेळी करावयाची स्वच्छता " या विभागामध्ये पुढील विषय आहेत :

---

१. मूलतः शियापंथीयांचा किंवा फुटीर धार्मिक गटाचा समजला जाणारा कायदे-विषयक हदिसांचा हा संग्रह आहे. सैद बिन अली ( हिजरीनंतर २ रे शतक ) या कोणा व्यक्तीने हा संग्रह तयार केला अशी पारंपरिक समजूत आहे. परंतु त्याबद्दल शंका असल्याचे सिद्ध झाले आहे.

२. ४५२ ( १०६१ ) मध्ये या ग्रंथाची रचना केलेली आहे. सदर लेखक शाफी आचार पंथाचा होता.

स्वच्छतेसाठी वापरावयाचे पाणी; स्वच्छतेसाठी वापरावयाची भांडी; ‘वुझू’ (प्रार्थनेवेळची स्वच्छता) ची माहिती; काय केले असता ‘वुझू’ निरर्थक ठरते; औपचारिक स्वच्छता (तयम्मुम); ऋतुस्राव ही अवस्था कधी संपते ?

या पुस्तकामधील ‘प्रार्थना’ या संबंधींच्या भागातील विषय ‘मजमू अल् फिकाह्’मधील विषयांसारखेच आहेत. त्याशिवाय त्यात पुढील विषय आहेत :

शरीराचा गुप्त भाग झाकणे, प्रार्थनास्थळ, प्रार्थनेच्या वेळची शरीराची व कपड्यांची स्वच्छता, प्रार्थनेच्या वेळी कोणत्या दिशेकडे (किब्ला) पाहून प्रार्थना करावी, प्रार्थनेच्या वेळी पाळावयाची बंधने आणि प्रथेप्रमाणे काय केले पाहिजे, नियमापेक्षा जास्त वेळा प्रार्थना करणे, कुराणपठणाच्या वेळी जमिनीवर वाकणे, प्रार्थना कशामुळे निरर्थक ठरते, प्रार्थनेच्या वेळी खाली वाकण्यात हयगय करणे, कोणकोणत्या वेळी प्रार्थना करू नये, सामुदायिक प्रार्थना, इमामांमध्ये आवश्यक असलेली पात्रता, प्रार्थनेच्या वेळी प्रार्थना सांगणाऱ्याने (इमामाने) व प्रार्थना करणाऱ्यांनी (मा’मुम) कोठे बसावे, अपंग व्यक्तीने कशी प्रार्थना करावी, प्रवासकाळातील प्रार्थना, भयभीत अवस्थेतील प्रार्थना, प्रार्थनेच्या वेळी वर्ज्य असलेले व नसलेले कपडे, शुक्रवारची प्रार्थना, शुक्रवारच्या प्रार्थनेच्या वेळची व्यवस्था, दोन सणांच्या (बकरीद, रमझान) वेळची प्रार्थना, सूर्यग्रहणाच्या वेळची प्रार्थना आणि पावसासाठी करावयाची प्रार्थना.

## (२) दानधर्म किंवा गरीबांसाठी द्यावयाचा कर

धर्मश्रद्ध व्यक्तीने दानधर्म करावा[१] असा उपदेश कुराणातील अनेक आयतांत केलेला आहे. तथापि कोणाला किती व कसे दान करावे यासंबंधी निश्चित असे मार्गदर्शन एकाही आयतात केलेले नाही. ज्यामध्ये बरीचशी निश्चितता आहे असे म्हणता येईल असा फक्त एकच नियम एका आयतात सांगितला आहे.[२] या आयताप्रमाणे लुटीतील एकपंचमांश हिस्सा “परमेश्वर व त्याचा प्रेषित, जवळचे नातेवाईक, निराधार मुले आणि गरीब व पायी प्रवास करणारे यांना द्यावा.” परंतु यांपैकी कोणाकोणाला किती द्यावे याचा स्पष्ट निर्देश केलेला नाही. अर्थात याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण मुहम्मदांच्या हयातीत इस्लामी साम्राज्य ही एक सुसंघटित राज्यसत्ता म्हणून विकसित झालेली नव्हती. अशी सुसंघटित राज्यसत्ता निर्माण झाल्यानंतरच कायद्याच्या विभिन्न पुस्तकांत कोणाला किती जकात द्यावी यासंबंधींचे आकडे कायदेशीर ठरू शकतात. अरबस्तानच्या वेगवेगळ्या भागातील जनतेकडून आपल्या प्रतिनिधींनी किती

---

१. (अ) जकात, ४१$^{६}$, १९$^{५६}$, ३०$^{३८}$ इत्यादी किंवा (ब) सदाक २$^{२८०}$, ४$^{११४}$, ९$^{५८}$ आदी.

२. ८$^{४२}$.

महसूल घ्यावा याविषयी खुद्द पैगंबरांनी नियम ठरवून दिलेले होते असे सांगणाऱ्या अनेक 'परंपरा' अस्तित्वात आहेत. या 'परंपरा' कदाचित मुद्दाम बनविलेल्या असाव्यात. तरीही यासंबंधींच्या काही कायदेशीर तरतुदी मुस्लिम साम्राज्याच्या प्रारंभिक काळापासून अस्तित्वात होत्या याविषयी शंका घेण्याचे कारण नाही.

यापूर्वी उल्लेखिलेल्या 'फिकाह्'च्या तिन्ही पुस्तकांमध्ये 'जकात' या शीर्षकाखाली पुढील विषय घेतलेले आहेत :

( अ ) उंट, बैल व शेळ्यामेंढ्यांवरील व चांदी-सोन्यावरील कर आकारणी, दानधर्मासाठी व करापोटी द्यावयाची जमीन, कर्ज देण्यासंबंधींची पात्रता, दानधर्मास पात्र असलेल्या व्यक्ती, दानधर्म करण्यास व त्याबाबत विलंब लावणाऱ्यांना पैगंबरांनी सांगितलेली सजा.

( आ ) मालमत्तेवरील दानधर्म-कर, ( दानधर्म म्हणून संपत्तीचा ) 'पाचवा हिस्सा' ( खूम्स ) व गरीबांसाठी कर देणे, दानधर्मासाठी जमिनीच्या उत्पन्नांतील हिस्सा देण्यात टाळाटाळ करणारी व्यक्ती, जमिनीच्या ( उत्पन्नातील ) दानधर्मासाठी खर्च करावयाचा भाग, इतर भू-कर, 'संरक्षित' समाजावरील ( उदा. ज्यू व ख्रिश्चन ) डोईकर, खनीज संपत्तीवरील कर आणि रमझानच्या उपवासाच्या शेवटी करावयाचा दानधर्म कोणाकोणाला करावा इत्यादी.

## उपवास

उपवासाबाबत बरेच व्यापक नियम केले आहेत. त्यांचे मूळ निश्चितच इस्लामपूर्व रिवाजांत आहे. तसेच उपवासासंबंधीच्या आजच्या रिवाजांशी त्यांचा असलेला संबंध सहज लक्षात येतो. मुख्य बाबी एकाच परिच्छेदात समाविष्ट केलेल्या आहेत :

" धर्मश्रद्धांनो, तुमच्या अगोदर होऊन गेलेल्या लोकांप्रमाणेच तुम्हीही ( काही ) निश्चित दिवशी उपवास करावा असे सांगितलेले आहे... तथापि तुमच्यापैकी आजारी असलेल्या किंवा प्रवासांत असलेल्या माणसांकरिता इतर दिवस[१] ( ठरवून दिलेले आहेत. ) रमजानच्या महिन्यांतील ( चंद्रोदयाचे ) दर्शन झाल्यानंतर उपवासास प्रारंभ करावा परंतु आजारी माणसाने व प्रवासात असलेल्या माणसाने इतर ठरलेल्या दिवशी उपवास करावा.[२] "

याला पुढील पुस्ती जोडण्यात आली आहे :

" उपवासाच्या रात्री, दोरा पांढरा आहे की काळा आहे हे ओळखू येईल इतका पहाटेचा प्रकाश पडेपर्यंत आपल्या बायकांशी संभोग करायला आणि खायला-प्यायला

---

१. काही लोकांच्या मते अशी सवलत आहे तर इतरांच्या मते नाही.

२. २ १७९-१८१

हरकत नाही. त्यानंतर पुढील रात्रीपर्यंत कडक उपवास करावा. ( बायकांशी ) कसलाही संबंध ठेवू नये. आणि मशिदीत एकांतात ( एतेकाफ ) जाऊन बसावे.[1] ''

या अगोदर उल्लेखिलेल्या ' फिकाह् 'च्या तीन ग्रंथांत ' उपवास ' या सदरामध्ये पुढील विषय आहेत :

( अ ) उपवासाचे महत्त्व, उपोषणाची समाप्ती, कोणत्या गोष्टीमुळे उपवास निरुपयोगी ठरतो; उपवास कोणी मोडावा; जाणूनबुजून उपवास मोडला तर त्यासाठी घ्यावयाचे प्रायश्चित्त, ( रमजानच्या महिन्याचा ) चंद्रोदय पाहिला असल्याविषयीचा पुरावा; खोट्या शपथा घेण्याबद्दल शिक्षा.

( आ ) जो दिवस रमजानमधील आहे की नाही याविषयी शंका आहे अशा दिवशी केलेला उपवास; शुद्ध हरपलेल्या अथवा भ्रमिष्ठ अवस्थेतील व्यक्ती, तसेच नुकतेच वयात आलेले तरुण, इस्लाम धर्माचा स्वीकार करण्यास तयार असलेले खिश्चन, ठरलेल्या वेळेआधी उपवास संपविला आहे असे प्रवासी– या लोकांनी संपूर्ण महिना उपवास करणे जरूर आहे काय; ज्यांनी महिनाभर उपवास केलाच पाहिजे आणि प्रायश्चित्त घेतलेच पाहिजे असे लोक आणि ज्यांनी महिनाभर उपवास केला नाही व ज्यांनी प्रायश्चित्त घेतले नाही तरी चालेल असे लोक कोणते.

( इ ) रमजानमध्ये कोणी उपवास केला पाहिजे किंवा कोणी केला नाही तरी चालेल ( उपवास या एकंदर शीर्षकाखाली यासंबंधी मार्गदर्शन केलेले आहे ); ठरलेल्या काळापेक्षा अधिक दिवस उपोषण करणे; रमजानमधील प्रार्थनेच्या वेळी करावयाचा एकांतवास ( एतेकाफ ).

## यात्रा

कुराणात, चार धार्मिक कर्तव्यांपैकी ' यात्रा ' या कर्तव्याची सर्वांत जास्त चर्चा आहे. यात्रेचा सुनिश्चित असा विधी कुराणाने सांगितला आहे. इस्लामपूर्व काळातील मूर्तिपूजक अरबांचाच यात्रा-विधी थोडाफार फरक करून घेतलेला आहे असे स्पष्ट दिसते. यासंबंधीची आयते पुढीलप्रमाणे आहेत :

बक्का[2] येथील मंदिर हे मानवासाठी बांधलेले पहिले मंदिर होय... तेथे स्पष्ट खुणा दिसतात. अब्राहम उभा रहात होता त्या जागेची खूणदेखील तेथे आहे. त्या मंदिरात जाणाऱ्याला भय नाही. ज्यांना शक्य आहे त्यांनी त्या मंदिरापर्यंत जाऊन यात्रा करणे हे सर्व मानवांचे परमेश्वराविषयीचे कर्तव्य[3] आहे.

---

१. २^१८३.

२. म्हणजे मक्का.

३. ३^९०; २२^२७-३०.

सफा व मरवा ही परमेश्वरप्रार्थनेची आणखी दोन स्थळे आहेत. तथापि मक्केच्या मंदिराची यात्रा करण्यासाठी गेलेले किंवा त्या मंदिराला विधिपूर्वक भेट देणारे लोक या दोन्ही ठिकाणी गेले नाहीत तर तो गुन्हा ठरत[१] नाही.

ही यात्रा व परमेश्वरदर्शनाचा उत्सव पार पाडा, आणि ते शक्य होणार नाही तेव्हा तुमच्याजवळ असेल ते खैरात म्हणून तिकडे पाठवा. हा खैरात इच्छित ठिकाणी पोचेपर्यंत डोक्याचे केस कापू नका.[२] यात्रा कोणत्या महिन्यात करावी हे सर्वश्रुतच आहे. आपले यात्रेचे कर्तव्य पार पाडीत असताना मैथुन किंवा अशुद्ध आचरण अथवा भांडण-तंडण करू नका[३].

'फिकाह्' च्या तिन्ही पुस्तकांमध्ये 'यात्रा' या शीर्षकाखाली पुढील कलमे आहेत :

(अ) यात्रेचे कर्तव्य; यात्रेकरूंच्या जथ्थ्यांनी कोठे एकत्र जमावे; (मक्केमध्ये पार पाडावयाचे विभिन्न धर्मविधी); यात्रा करीत असताना शिकार करणे; तरुण, गुलाम व बदवी यांनी करावयाची यात्रा; आपल्याऐवजी आपला प्रतिनिधी पाठवून यात्रा करणे; पशू बळी देताना करावयाची प्रार्थना; बळी दिलेल्या पशूच्या मासाचे भक्षण; (बळी देण्यासाठी) शिकारयोग्य प्राण्यांचा वापर इत्यादी.

(आ) ठरवून दिलेल्या काळात यात्रा न करणाऱ्या किंवा यात्रेच्या वेळचा (एहराम) पोशाख न करता मक्केमध्ये जाणाऱ्या व्यक्तींनी [ घ्यावयाचे प्रायश्चित्त ]; यात्रेच्या वेळी शिकारयोग्य प्राण्याची शिकार करणाऱ्या इसमाला द्यावयाची सजा; यात्रेच्या काळात आपली नखे व केस कापणारी व्यक्ती; [ यात्राविधी सदोष पद्धतीने व अनियमितपणे करण्याशी संबंधित अनेक बाबी. ] आपल्याऐवजी प्रतिनिधी पाठवून यात्रा करणे इत्यादी.

(इ) [ यात्रा करणे कोणावर बंधनकारक आहे ]; यात्रेकरूंच्या जथ्थ्यांनी एकत्र जमण्याची जागा, मक्केमध्ये करावयाचा पोशाख; चुकीचा पोशाख करण्याबद्दलचे प्रायश्चित्त; हजच्यावेळचे विधी; बळी देणे; (खाण्यासाठी) शिकारयोग्य व अन्य प्राण्यांची हत्या. (यात्रा काळात निषिद्ध नसलेले) अन्न; शपथा.

जुन्या करारातील लेव्हिटिक्स किंवा डियुटेरोनोमी यांच्या पुस्तकात जशी विविध विषयांची चर्चा केलेली आहे तशीच कुराणामध्येही अनेक विषयांची चर्चा आहे.

---

१. २[१५३]. या आयतच्या शेवटच्या भागाचे तात्पर्य असे की मूर्तिपूजकांची प्रथा कायम ठेवण्यात आली असून फक्त त्यास संमती दिली गेली आहे.

२. म्हणजे यात्रेच्या संपूर्ण काळात शरीराच्या सर्व भागांवरील केस तसेच नखे वाढवावी असा याचा प्रत्यक्षात अर्थ आहे.

३. २[१९२].

तथापि पाश्चात्त्य विचारपद्धतीनुसार ज्यांना धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, नागरी व गुन्हेगारी कायदा यांच्याशी संबंधित असे विषय म्हणता येतील अशा विषयांसंबंधीचे फारच थोडे नियम कुराणात आढळतात. दुसऱ्या एखाद्या विषयावरील लांबलचक भाषणाच्या ओघात सहज जाता जाता एखाददुसरे वाक्य बोलून महत्त्वाच्या विषयाची ओळवण केलेली आहे. शिवाय सांगितलेला एखादा नियमदेखील नेहमीच अंतिम स्वरूपाचा आहे असे म्हणता येत नाही. कारण कधी कधी आपली मते मुहम्मदांना बदलावी लागत असत आणि ते स्वाभाविकही होते. मुहम्मदांच्या प्रत्येक बदलत्या मताबरोबर एक नवीन प्रकटीकरण जन्म घेत असे आणि ते अगोदरपासून अस्तित्वात असलेल्या प्रकटीकरणाला काट देत असे. अशाप्रकारे प्रकटीकरणाद्वारे अनिश्चित स्वरूपात नियम व कायदे सांगितले जात असल्यामुळे तात्कालिक गरजेपोटी पैगंबर हवे ते बदल करतात असा त्यांच्यावर आरोप केला जात असे आणि मग हा आरोप खोडून काढण्यासाठी पुन्हा खास नवीन प्रकटीकरणे प्रचारात आणावी लागत. उदाहरणार्थ—

"आम्ही एका आयताऐवजी दुसरे आयत सांगितले (आणि ते बरोबर आहे की नाही हे ज्या परमेश्वराने ते आयत सांगितले आहे त्यालाच कळते) की लागलीच हे लोक म्हणतात की तुम्ही काहीतरी खोटे बनवून[१] सांगत आहात. हे (लोक) लक्षपूर्वक कारण तपासून पाहणार नाहीत काय? (कारण) परमेश्वराशिवाय अन्य कोणाकडून ते आलेले असते तर त्यात अनेक परस्परविसंगत गोष्टी दिसल्या असत्या.[२]"

(पूर्वीचे नियम) रद्द (नस्ख) करण्याचे तत्त्व नियमांमध्ये करण्यात येणाऱ्या बदलांमागे होते. खाली दिलेल्या कुराणातील काही आयतांमध्ये याचे स्पष्टीकरण आढळते :

"परमेश्वराला जे हवे असेल ते तो कायम ठेवतो किंवा रद्द करतो. आणि त्याला या बाबतीत '(कुराणाच्या) माते'चा दुजोरा असतो.[३]

"आम्ही एखादे आयत रद्द करतो किंवा आपोआप (व्यवहारात) ते नाहीसे होऊ देतो तेव्हा त्या जागी दुसरे त्यापेक्षा योग्य किंवा तितकेच योग्य असे आयत सांगतो."[४]

वर उल्लेखिलेल्या आयतांपैकी दुसऱ्या आयतावर बैदावीने जे भाष्य केले आहे त्यावरून इस्लाममध्ये रद्द (नस्ख) करण्याच्या तत्त्वाला किती महत्त्व आहे ते लक्षात येते. बैदावी म्हणतो, "एखादे प्रकटीकरण रद्द करणे अथवा तहकूब ठेवणे (कारण मूळ प्रकटीकरणांत 'जर' म्हटलेले असते.) आणि त्या जागी नव्या आज्ञेचा समावेश करणे कसे कायदेशीर समजले जाते हे या आयतावरून दिसते. कारण मानवी

---

१. १६[१०३].
२. ४[८४].
३. १३[३९].
४. २[१००].

हिताच्या दृष्टीनेच कायदे केले जातात आणि आयते प्रकट होतात. हे कायदे व प्रकटीकरणे व्यक्ती आणि परिस्थितीप्रमाणे बदलत असतात. उदाहरणार्थ, जीवनातील आवश्यक गोष्टी. या गोष्टी एखाद्या काळात मानवी हिताच्या असतील तर अन्य वेळी त्या घातक असू शकतील[1]. ''

पैगंबरांच्या देहावसानानंतर कुराणाचे संकलन करण्यात आले, तेव्हा त्यात (परस्परांना) 'काट देणाऱ्या[2]' व 'रद्द करण्यात[3] आलेल्या' अशा दोन्ही प्रकारच्या आयतांचा समावेश करण्यात आला. कारण यापैकी कोणती आयते ठेवावयाची आणि कोणती नाहीत हे मुहम्मदांशिवाय अन्य कोणीच ठरवू शकले नसते. त्यामुळेच कोणत्याही दिशेला तोंड करून प्रार्थना करावयास हरकत नाही असे मूळ कुराणामध्ये ज्या आयतात सांगितले आहे, त्यापुढील आयतात लगेच मक्केकडे तोंड करून प्रार्थना करावी असे म्हटल्याचे दिसून येते. 'जीवनांतील आवश्यक गोष्टीं'चा उल्लेख करताना उदाहरण म्हणून कदाचित बैदावीच्या मनात 'दारू पिण्यास कुराणात केलेली मनाई[4]' या गोष्टीचा विचार असावा. कारण एके काळी खजुरीच्या[5] झाडापासून मिळणारे "एक आरोग्यदायक पेय" एवढेच दारूचे महत्त्व नव्हते, तर दारू म्हणजे मद्य हे शुद्ध पाणी, दूध, मध यांच्यापासून मिळणारे स्वर्गसुख[6] प्राप्त करू देणारे साधन मानले जात असे[7].

यापेक्षा रद्द केलेले अधिक महत्त्वाचे नियम म्हणजे वारसाहक्क, व्यभिचाराबद्दल सजा इत्यादी सामाजिक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधींचे नियम होत. एकदा पैगंबरांनी एका 'प्रकटीकरणा'द्वारे जाहीर केले की नवऱ्याने आपल्या मृत्युनंतर आपल्या बायकांसाठी एक वर्षाच्या[8] उदरनिर्वाहापुरती संपत्ती मृत्युपत्रांत लिहून ठेवलीच पाहिजे. परंतु नंतर हा नियम दुसऱ्या एका 'प्रकटीकरणा'द्वारे रद्दबातल करण्यात आला. आणि यानंतरच्या नव्या प्रकटीकरणानुसार अपत्यहीन व्यक्तीने आपल्या बायकांसाठी आपल्या इस्टेटीचा

---

१. याच परिच्छेदाच्या प्रारंभी बैदावी म्हणतो, "एखादे आयत रद्द केल्यानंतर तिचे पठण करणे हे धार्मिकदृष्ट्या उचित समजले जात नाही. तसेच अशा आयतावर आधारलेला कायदा कायदेशीर राहात नाही अथवा धार्मिकदृष्ट्या योग्य आहे व कायदेशीरही असे ठरत नाही."

२. नासिख.

३. मनसूख.

४. कुराण २[२६], ५[९२].

५. १६[६९].

६. ४७[१५], ८३[२५].

७. ४७[६].

८. २[४१].

चौथा हिस्सा व ज्याला मूल असेल त्या माणसाने आठवा हिस्सा ठेवावा असे सांगण्यात आले.[१] वारसासंपत्तीसंबंधींच्या या नियमांतही विसंगती दिसून येते. एके जागी माणसाने मृत्युपूर्वी आपले आईबाप व इतर नातेवाईक यांना सारख्या प्रमाणात संपत्ती वाटून द्यावी अशी मोघम शिफारस करण्यात आली आहे तर या शिफारसीला विरोधी असे वारसा-संपत्तीच्या वाटणीचे निश्चित स्वरूपाचे नियम नंतरच्या एका परिच्छेदात सांगितले आहेत.[२]

व्यभिचाराबद्दलच्या सजेविषयी याआधी सांगितलेच आहे. या संबंधात कुराणा-मध्ये दोन आयते आहेत. एका आयतात व्यभिचाराच्या गुन्ह्यासाठी मृत्युदण्डाची[३] शिक्षा सांगितली आहे, तर नंतरच्या दुसऱ्या एका आयतामध्ये ही शिक्षा कमी करून शंभर[४] फटके ठरविण्यात आली आहे. मुस्लिम भाष्यकारांनी या दोन आयतांचा मेळ घालण्याचा कसा प्रयत्न केला आहे ते आधी सांगितलेच आहे.

पवित्र कुराणातील प्रकटीकरणांमध्ये अशा प्रकारच्या ज्या तफावती व विसंगती आहेत त्यांचे स्पष्टीकरण करण्याच्या कामी इस्लामी कायदेपंडितांना व भाष्यकारांना आपल्यापाशी असलेल्या सर्व कल्पनाशक्तीचा व तर्कज्ञानाचा उपयोग करून दैनंदिन जीवन सुकर होईल 'अशा रीतीने त्यांचा अर्थ लावून सांगावा लागला आहे. नंतरच्या काळातील काही न्यायपंडितांनी असे एक मत मांडले आहे की एखादे प्रकटीकरण 'रद्द होणे' याचा अर्थ एकतर रद्द केलेल्या नियमाची जागा दुसऱ्या नियमाने घेतली आहे अथवा मूळ नियमच अधिक व्यापक व स्पष्ट शब्दांत सांगितला गेला आहे असा आहे.

परंतु मुस्लिम शासकांनी मात्र कुराणांतील परस्परविरोधी निर्देशांना फारसे महत्त्व दिले नाही. प्रत्यक्ष शासन करताना उद्‌भवणाऱ्या आकस्मिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने कुराणांतील कायदे अत्यंत अपुरे होते. त्यांतून कसा मार्ग काढावयाचा हाच त्यांच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न होता. पैगंबरांच्या मृत्युनंतर तीस वर्षांत सिंधू नदीपासून अटलांटिक महासागरापर्यंतच्या प्रदेशांतील प्रचंड भूभाग अरबांनी आपल्या स्वामित्वाखाली आणला होता. सर्वसामान्य अरब आक्रमकांना या मुलुखगिरीत आपणाला किती लूट मिळते यांतच दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त रस होता. जिंकलेल्या प्रत्येक नव्या देशात मुस्लिम विजेत्यांची त्यांच्यापेक्षा अत्यंत सरस अशा संस्कृतींशी गाठ पडत होती. पवित्र कुराणात या संस्कृतींविषयी फारच

---

१. ४[१४].
२. २[१७६].
३. ४[१९].
४. २४[४].

थोडी माहिती होती ( किंबहुना नव्हतीच ). त्यामुळे इराणी व रोमन प्रदेश ताब्यात आल्यानंतर तेथल्या संस्कृतींनी अरब नेत्यांना चकित केले आणि त्या समजून घेताना त्यांना आपल्या कल्पनाशक्तीला ताण द्यावा लागला. अरब विजेत्यांना कुराणाचे ज्ञान असले आणि त्यांनी त्याचा अभ्यास केलेला असला तरी खुद्द कुराणातच आकस्मिक उद्भवणाऱ्या राजकीय किंवा सामाजिक अथवा कायदाविषयक प्रश्नांचे बाबतीत काय करावे याबाबत व्यापक मार्गदर्शन केलेले नव्हते. त्यामुळे नव्याने जिंकलेल्या देशांच्या मुस्लिम प्रशासकांना एक तर तद्देशीय रीतिरिवाजांच्या आधाराने कारभार चालवावा लागला किंवा आपल्या विवेकबुद्धीचा अथवा व्यवहारज्ञानाचा उपयोग करून आपल्या-पुढील अडचणीतून मार्ग काढावा लागला. विजयानंतर प्रारंभीची काही वर्षे अरब सेना-धिकारी व प्रशासक जरूर तेव्हा आपल्या तारतम्य बुद्धीचा निःशंकपणे उपयोग करून निर्णय घेत असावेत असे दिसते. याला काहीसा ऐतिहासिक आधारही आहे. उदा-हरणार्थ, दुसऱ्या खलिफा उमर ( ७१७–२० ) कडे एकदा इजिप्तमधील एका काझीने एका प्रकरणी काय करावे यासंबंधी विचारणा केली. प्रकरण असे होते की एका मुलीवर एका तरुणाने विशिष्ट प्रकारे हल्ला केला होता. तेव्हा खलिफाने असे सांगितले की अशा प्रकारचे एखादे पूर्वी घडलेले प्रकरण आपल्याला माहीत नाही, म्हणून काझीने स्वतःच्या तारतम्याचा उपयोग करून निर्णय द्यावा.[१] अशाप्रकारे आपल्या तारतम्याचा वापर किंवा आपले मत याला अरबी भाषेत 'राय' म्हणतात. मुस्लिम न्यायशास्त्रात 'राय' हा एक पारिभाषिक शब्द बनला आहे. नंतरच्या काळात 'राय' पद्धतीला एका परंपरेचा आधार शोधून काढण्यात आला. अशी एक[१] परंपरा असल्याचे सांगण्यात आले की, एका विवादास्पद प्रश्नाच्या बाबतीत प्रकटीकरण मिळाले नाही तेव्हा स्वतः पैगंबरांनी-देखील आपल्या ( राय ) मताप्रमाणे निर्णय केला होता.

इस्लामी इतिहासाच्या दुसऱ्या शतकात अरबस्तानाबाहेरील लोक मोठ्या संख्येने इस्लाम धर्मात येऊ लागले. त्यांनी मोठ्या उत्साहाने इस्लामचा अभ्यास सुरू केला. तेव्हा मग आपल्या धर्मातील सर्व कायद्यांचे उगमस्थान व स्फूर्तिस्थान म्हणून कुराणा-लाच आपण आधारभूत मानले पाहिजे ही गोष्ट त्यांना पटू लागली. धर्मावरील त्यांची श्रद्धा या गोष्टीला कारणीभूत होती. तेव्हा मग 'राय' पद्धतीचा मोकाट व अनिर्बंध वापर करून स्वतःच्या लहरी मतानुसार मत देण्याच्या पद्धतीवर नियंत्रण घालण्यात आले आणि कोणत्याही 'राय'ला कुराणाचा आधार असलाच पाहिजे असा दंडक घालण्यात आला. एखाद्या प्रश्नाच्या सोडवणुकीचे बाबतीत कुराणात अगोदरचा दाखला सापडत नसेल तेव्हा तत्सम दुसऱ्या एखाद्या प्रश्नासंबंधी जो दाखला कुराणात मिळेल (असा दाखला कुराणात मिळू शकतो असे मानले जाते) त्याआधारे योग्य तो निष्कर्ष काढला जावा असे सांगितले जाऊ लागले. या पद्धतीतूनच 'कियास'चे 'निकष'चे म्हणजेच 'सदृश परिस्थिती'तून तर्काने अनुमान काढण्याचे तत्त्व– विकसित

झाले. मुस्लिम न्यायशास्त्राचे जे चार मूलाधार आहेत त्यांपैकी हे तत्त्व हा दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा मूलाधार समजला जातो. अर्थात खुद्द कुराण हा पहिल्या क्रमांकाचा मूलाधार होय.

वर उल्लेखिलेली ' कियास 'ची तर्कपद्धती इराणी पंडित अबु हनीफा ( मृत्यू ७६७ ) याने विकसित केली असे मानले जाते. इराकमधील कुफा या गावी त्याचा जन्म झाला. उमाय्यद घराण्याच्या ऱ्हासानंतर खिलाफतीसाठी झालेल्या संघर्षात मुहम्मद पैगंबरांच्या अपयशी वंशजांची– अलीची– बाजू त्याने घेतली होती. कारण इराणी माणसाच्या वारसाच्या न्याय्यतेची त्याच्या मनात जाणीव होती. आपल्या हयातीत त्याने अनेक अनुयायी मिळविले. हेच लोक कालांतराने मुस्लिम न्यायशास्त्राच्या एका सर्वात प्राचीन आचार पंथाचे[1] केंद्रबिंदू बनले. हनीफाच्या मृत्युनंतर हा पंथ हनिफी पंथ या नावाने ओळखला जाऊ लागला. स्वतः अबु हनीफाने कोणतीही पद्धतशीर अशी विधिसंहिता किंवा न्यायशास्त्रावर एखादा पद्धतशीर ग्रंथ अथवा कायदाविषयक क्रमिकसंहिता लिहिलेली नाही. त्याने इस्लामच्या एकंदर तत्त्वांची फारशी चिकित्सा करीत न बसता आपल्यापुढे आलेल्या प्रश्नांसंबंधीचे आपले निर्णय फक्त सांगितले असे दिसते. त्याच्या शिष्यांनी त्याच्या वचनांचा जो संक्षिप्त संग्रह तयार केला आहे तो पाहता असे दिसते की कायद्याच्या व्यावहारिक बाजूंविषयी हनीफाला विशेष रुची नव्हती. हनीफाचा चरित्रकार इब्ने खालिकन याने त्याचे जे चरित्र लिहिले आहे त्यावरून असे दिसते की हनीफा क्वचितच बोलत असे. परंतु जेव्हा बोले तेव्हा त्याच्या मुखातून शब्दांचा नुसता धबधबा बाहेर पडत असे.

' कियास 'चे किंवा ' सदृश परिस्थिती 'चे तत्त्व लागू करताना अबु हनीफा, आपण सांगतो आहोत ते नियम व कुराणातील लिखित[2] नियम यामध्ये शाब्दिक साम्य आहे की नाही एवढेच पाहून थांबत नसे तर कुराणातील नियमांच्या शब्दरचनेमागे कोणता हेतू आहे हेही खोलवर जाऊन पाहात असे. हनीफाच्या मते कुराणातील नियमांचा नवीन अर्थ किंवा त्यातून काढलेला कायदा[3] यातील हेतू ( इल्लत ) कुराणातील प्रकटी-करणामागे किंवा पारंपरिक प्रथेमागे जो मूळ हेतू असेल तसाच असला पाहिजे. उदा-हरणार्थ दारूमुळे नशा चढते या कारणाने ( इल्लत ) ती पिण्यास कुराणाने मनाई केलेली आहे. हा सदृश दाखला देऊन आंबविलेला खजुरीचा रस घेण्यास मनाई करावयाची असेल तर ती त्याच कारणासाठी करता येईल.

कुराणातून काढलेला प्रत्येक कायदा हा कुराणात अभिप्रेत असतोच असा अबु

१. मजहब.

२. नूसूस ( एक वचन-नास ).

३. याला ' फार ' म्हणजे ' शाखा ' असे म्हणतात.

हनीफाच्या काही वारस शिष्यांनी दावा केला आणि त्यायोगे 'राय' किंवा 'कियास' पद्धतीच्या उपयोगाला कुराणाचा दुजोरा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे असे की, आपण फक्त युक्तिवादाच्या मार्गाने जे कुराणात अगोदरच सांगितले आहे ते दाखवून देत आहोत. दुसऱ्या काही शिष्यांनी या भूमिकेत दुरुस्ती केली. त्यांचे म्हणणे असे की अशाप्रकारे युक्तिवादाच्या मार्गाने फक्त ऐहिक जीवनाविषयीचे कायदेच कुराणांतून काढून दाखविता येतात. कुराणातील धर्मशास्त्रविषयक कायदे पूर्णतः स्वच्छ व स्पष्ट असल्यामुळे त्यांचा अर्थ अनुमानपद्धतीने किंवा 'सदृश परिस्थिती'च्या पद्धतीने लावण्याची आवश्यकताच नाही. परंतु स्वतः अबु हनीफाला यांपैकी कोणतेच मत ग्राह्य वाटले नसते. कारण त्याच्या मते समाजाला आवश्यक असलेले काही कायदे व नियम कुराणात असले तरी सर्वच कायदे व नियम कुराणात आहेत असे मुळीच नाही. म्हणून मूळ कुराण किंवा त्यातील कायदे यांच्या सहाय्याने 'कियास' पद्धतीने नव्या आज्ञा तयार करणे जरूर आहे. उदाहरणार्थ कुराणात[1] चोरीच्या गुन्ह्याला (म्हणजे दुसऱ्याच्या वस्तू त्याला नकळत घेणे) सजा सांगितलेली आहे. परंतु चोरी करण्याच्या हेतूने केलेल्या घरफोडीसाठी सजा सांगितलेली नाही. 'कियास' पद्धतीने असे दाखवून दिले आहे की घरफोडीच्या अपराधाला चोरीच्या अपराधाइतकीच म्हणजे हात तोडण्याची सजा आहे.

एक अधिकारी अभ्यासक म्हणतो, "वस्तुस्थिती अशी आहे की, दैनंदिन व्यवहारांत (पैगंबरांचे) सोबती ज्या रितीने वागले त्याला युक्तिवादाचा व तर्काचा आधार देण्याचे काम 'कियास'ने केले आहे... तथापि 'कियास'चे तत्त्व माणसाच्या नैसर्गिक क्रियांना किंवा प्राचीन रीतिरिवाजांना लागू करता येणार नाही. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या मासिक ऋतुस्रावाचा किमान काळ किती, मूल होण्याचा काळ कोणता, गर्भावस्थेचा काळ किती या बाबतीत 'कियास' पद्धतीचा उपयोग होऊ शकणार नाही. कारण कुराणांतून अशा बाबींची माहिती मिळविता येत नाही. तसेच जे कायदे दीर्घकाळापासून चालत आलेले आहेत त्यांना 'कियास'द्वारे समर्थन मिळवता येणार नाही. कारण कुराणात त्यांची माहिती असू शकत नाही. कारण त्यांपैकी काही कायदे असे आहेत की त्यांचे संयुक्तिकपणे स्पष्टीकरण करता येत नाही. उदाहरणार्थ, खुनी माणसाच्या नातलगाने खून झालेल्या व्यक्तीचा बदला दुसऱ्या व्यक्तीच्या रक्ताने घेतला पाहिजे हा कायदा. त्याचप्रमाणे कुराणातील रद्द केलेल्या आयतांच्या आधारानेदेखील 'कियास' करता येणार नाही."

'राय' पद्धतीच्या उपयोगातून मतभेद उद्भवले. अबु हनीफाच्या अगदी निकटच्या शिष्यांनीदेखील काही प्रसंगी 'राय' व 'कियास' पद्धतीचा बिनतक्रारपणे

---

१. ५४२.

उपयोग करण्यास नकार दिला होता. यासंबंधींची अनेक उदाहरणे अबु युसुफ याने लिहिलेल्या 'किताब अल् खराज' या करविषयक ग्रंथात आढळतात. अबु युसुफने हा ग्रंथ खलिफा हरून अल रशीद या आपल्या आश्रयदात्यासाठी लिहिला होता. नमुन्या-दाखल यापैकी एक उदाहरण सांगता येण्यासारखे आहे. एका प्रकरणी अबु युसुफ याने असा युक्तिवाद केला होता की एखादी 'मृत' म्हणजे पडीक किंवा बेवारशी जमीन एखाद्या माणसाने लागवडीखाली आणली असेल तर त्या जमिनीवर त्या माणसाला मालकीहक्क सांगता येईल. अबु हनीफानेसुद्धा या बाबतीत असेच मत दिलेले आहे. तथापि या संदर्भात असा आक्षेप घेण्यात आला की, इस्लामच्या ( म्हणजे खलीफाच्या ) पूर्वसंमतीने सदर जमीन त्या इसमाने लागवडीला आणली असेल तरच त्याचा त्या जमिनीवरचा मालकीहक्क कायदेशीर मानता येईल अशीही एक अट अबु हनीफाने घालून दिलेली आहे. शिवाय अशाच अर्थाचे एक हदिसही अस्तित्वात आहे. या आक्षेपाला अबु युसुफने असे उत्तर दिले की, त्या जमिनीच्या मालकीबद्दल कदाचित परस्परविरोधी दावे केले जाऊ लागले तर निर्णय करण्यास सुलभ जावे म्हणूनच केवळ अबु हनीफा यांनी खलीफाच्या पूर्व-परवानगीची अट घातली आहे. अशा प्रकारे अबु युसुफने आपल्या मताचा आग्रह कायम ठेवला.

न्यायाधीश आपल्या व्यक्तिगत मताचा, 'राय'चा अनिर्बंधपणे वापर करू लागले तर त्या पद्धतीचा दुरुपयोग होण्याची शक्यता होती हे उघडच होते. त्यावर इलाज म्हणून त्या त्या काळातील विद्वज्जनांच्या मतांच्या तात्पर्याचे ( याला 'इज्मा' असे म्हणतात ) सहाय्य घेऊनच अखेर 'कियास' पद्धतीने सांगितलेल्या कायद्याचा संयुक्तिकपणा ठरविला पाहिजे असे सांगण्यात आले. कुराण व हदिसांच्या बरोबरीने मुस्लिम कायद्याचे एक उगमस्थान म्हणून मान्यता मिळविण्यासाठी प्रदीर्घ संघर्ष केल्यानंतरच 'कियास' पद्धतीला मुस्लिम न्यायशास्त्राच्या चार 'मूलाधारां'मध्ये स्थान प्राप्त करता आले.

'कियास'पद्धतीतील एक धोका असा होता की तिच्यामुळे धर्माधर्म ठरविताना शब्दांचे खेळ करावयास उत्तेजन मिळत असे. उदाहरणार्थ, आपल्या सोयीनुसार कायद्याचा हवा तसा विपर्यास करण्याच्या बाबतीत अबु युसुफ कुप्रसिद्ध होता. इतका की त्याने दिलेले निर्णय व तो सांगत असलेले हदिस यांविषयी त्याच्याच पंथांतील त्याच्या सहधर्मीयांनादेखील विश्वास वाटत नसे. इब्ने खालिकन याने इतिहासकार तबरीने असे म्हटल्याचे सांगितले आहे की परंपरावादी लोक अबु युसुफने सांगितलेल्या कोणत्याही हदिससंबंधी साशंक असत. कारण 'राय'पद्धतीचा सतत वापर करण्याची त्याला फारच संवय होती; तसेच तो कायद्याचे नवे नवे अर्थ जुळवून सांगत असे. अबु हनीफा या आपल्या गुरूने, विकसित केलेल्या 'इस्तिहसान' किंवा 'तुलनेने चांगले समजणे' या सिद्धांताचा अबु युसुफ याने विशेष उपयोग केला. या सिद्धान्तामुळे त्याला कायद्याचा हवा तसा अर्थ लावण्याची भरपूर मोकळीक मिळाली आणि स्थानिक

रीतीरिवाज व समजुती यांचा एकंदर इस्लामी कायदेकानू म्हणून स्वीकार करता आला. शिवाय 'कियास'पद्धती लागू केल्यामुळे एखाद्या प्रश्नाच्या सोडवणुकीत अडचण व गैरसोय निर्माण झाली की त्यांतून पळवाटा काढण्यासाठीही अबु युसुफला या सिद्धान्ताचा सोयीस्करपणे उपयोग करता आला. याबाबतचे एक उदाहरण असे :

"समजा, 'युद्धाचे माहेरघर' असलेल्या [ म्हणजे बिगरमुस्लिम ] देशांतील एखादा इसम आपल्या जीविताच्या संरक्षणाची हमी मिळाल्यामुळे आपल्याकडे आला किंवा एखादा परराष्ट्रीय राजदूत येथे आला आणि त्याने चोरीचा अथवा व्यभिचाराचा गुन्हा केला तर...काही न्यायपंडित त्याला नेहमीच्या पद्धतीने सजा झाली पाहिजे असे म्हणतील. परंतु प्रस्तुत लेखकाचे असे मत आहे की ज्या समाजाचे अस्तित्व आपण खपवून घेतलेले आहे त्याच्यातील तो इसम नसल्यामुळे त्याला आपले कायदेकानू लागू होत नाहीत. काही लोकांच्या मते त्याला नेहमीच्या पद्धतीने शिक्षा दिली पाहिजे... आणि गैरवर्तनाबद्दल त्याला रीतसर दण्ड दिला पाहिजे. या लोकांचे असे म्हणणे आहे की, एखाद्या मुसलमान माणसाने या इसमाची चोरी केली तर ज्याप्रमाणे त्या मुसलमान माणसाला हात तोडण्याची सजा दिली जाते, त्याचप्रमाणे 'कियास'पद्धतीनुसार त्या ( बिगरमुस्लिम ) इसमालाही चोरीच्या गुन्ह्यासाठी तशीच सजा दिली पाहिजे. परंतु मला मात्र माझेच मत अधिक योग्य वाटते."

यानंतरच्या काळातील 'कियास'चे एक उदाहरण उपलब्ध आहे. या 'कियास'साठी कुराणाबाहेरच्या तत्त्वाचा आधार घेण्यात आला आहे. अबु हनीफाच्या आवडीचा सैद्धान्तिक पद्धतीचा तो आधार आहे. हे प्रकरण असे : दोन इसम एका विहिरीत पडले. त्यांपैकी एक चांगले डोळे असलेला व दुसरा आंधळा होता. डोळस माणसाच्या अंगावर आंधळा माणूस पडला आणि डोळस माणूस मेला. हे प्रकरण खलिफा उमरपुढे गेले. मृत माणसाला नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी करण्यात आली. खलिफाने असा निवाडा दिला की आंधळ्या माणसाने मनुष्यवधाचा अपराध केला असल्यामुळे त्याने नुकसानभरपाई दिली पाहिजे. या निवाड्यावर आंधळ्याने अपील केले. बरीच उलटसुलट चर्चा झाली. काहींनी असा युक्तिवाद केला की डोळस माणसाच्या मृत्युबद्दल आंधळ्याला जबाबदार धरता येणार नाही. कारण आंधळ्याला दिसत नसल्यामुळे डोळस माणसाने त्याला विहिरीवर नेले म्हणून डोळस माणूसच ते दोघे विहिरीत पडले या घटनेस जबाबदार आहे. आपणही विहिरीत पडायचे आणि आंधळ्यालाही विहिरीत ढकलावयाचे असा निश्चित हेतू मनात बाळगून जर डोळस माणूस विहिरीवर गेला असता आणि मग आंधळा मेला असता तर डोळस माणसाला आंधळ्याच्या मृत्युबाबत जबाबदार धरता आले असते. परंतु तशा निश्चित हेतूने तो विहिरीवर गेला नसेल तर आंधळ्याच्या मृत्युला तो जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. [ म्हणजेच 'सदृश उदाहरणा'च्या तत्त्वानुसार यामधून असा निष्कर्ष निघतो

की डोळस माणसाच्या सहाय्यानेच स्वत: आंधळ्याला विहिरीवर जावे लागले आणि अपघात घडवून आणण्यासाठी मुद्दाम तो तेथे गेला नाही. त्यामुळे त्या डोळस माणसाच्या वधाबद्दल जबाबदार धरता येणार नाही. ] याउलट दुसऱ्या काही मंडळींनी खलिफा उमरने दिलेला निवाडाच योग्य आहे असे सांगितले. कारण डोळस माणसाने आंधळ्याला त्याच्या संमतीनेच विहिरीवर नेले होते. आणि ज्या माणसाने त्याला नेले त्याने आपले कर्तव्यच बजावले होते. म्हणून एखाद्याला एखादी गोष्ट करावयाला सांगितली असता त्याने ती केली तर त्यातून उद्भवलेल्या घटनेबद्दल त्या माणसाला जबाबदार धरता येणार नाही. आता या आंधळ्या माणसाविषयी सांगायचे तर तो त्या डोळस माणसावर पडला व त्याने त्याला ठार मारले ( यात शंका नाही ) म्हणून या हत्येची जबाबदारी अंध माणसावरच पडते. सदृश उदाहरण सांगायचे तर छपरावरून दुसऱ्याच्या अंगावर पडलेल्या माणसाचे देता येईल.

अबु हनीफा याचे अनुयायी हे प्रामुख्याने एका विशिष्ट प्रदेशातील ( विशेषत: इराकमधील ) इस्लामी कायदाविषयक दृष्टिकोणाचे प्रतिनिधित्व करीत असत. अरबस्तानातील ज्या पवित्र शहरात मुहम्मद पैगंबरांच्या जीवनातील अनेक घटना घडल्या आणि त्यांच्या कथांद्वारे [ यांपैकी काही विश्वसनीय आहेत तर काही निश्चितच तशा नाहीत ] त्यांची स्मृती चिरंतन झाली अशा शहरातील धर्मपंडितांच्या दृष्टिकोनाहून अबू हनीफाच्या शिष्यांचा दृष्टिकोन भिन्न होता. विशेषत: ज्या मदिना शहरात पैगंबरांनी आपल्या उत्तरायुष्यातील अधिकतर प्रभावशाली काळ घालविला त्या शहरात स्थानिक रीतिरिवाजांच्या समर्थनार्थ ' परंपरां 'चाच प्रामुख्याने आधार घेतला जात असे. खरे तर मदिनाच्या धर्मपंडितांना परिस्थितीच्या गरजेपोटी कुराणातील कायदाविषयक तरतुदींना पुस्ती जोडणे जरूर झाले तेव्हा त्यांनी अन्य प्रांतातील मुस्लिम पंडितांप्रमाणे युक्तिवादाचा आधार घेतला नाही, तर आपल्या नवीन कायद्यांच्या समर्थनासाठी किंवा कुराणातलेच कायदे नवीन रीतीने लागू करण्याच्या प्रयत्नात या पंडितांनी पैगंबरांची हदिसे मुद्दाम शोधून काढली.

काटेखोर अर्थाने सांगावयाचे तर एखादे विशिष्ट ' हदिस ' म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रसंगाचा किंवा प्रश्नासंबंधीचा पैगंबरांचा ' सुन्ना ' अथवा त्यांची कृती आणि त्यांचे वचन. एखाद्या प्रश्नाचे बाबतीत जेव्हा कुराणातील एखाद्या संदेहास्पद विधानाचा अथवा कुराणाविरुद्ध असलेल्या एखाद्या परस्परविरोधी व घट्ट रुजलेल्या रिवाजाचा कुराणातील तत्त्वाशी मेळ घालावा लागल्यामुळे पेच निर्माण होत असे तेव्हा एकच मार्ग मोकळा असे. आणि तो म्हणजे तत्सम परिस्थितीत खुद्द पैगंबरांनी काय केले ते पाहणे. त्यामुळे जवळपास प्रत्यक्ष ' सुन्ना 'ला कुराणाइतकाच अधिकार प्राप्त झाला आहे. पुढे तर मूळ स्रोत व कायदेशीरपणा या दृष्टीने सुन्नांना इस्लामी धर्मशास्त्रात कुराणाच्याबरोबरीचे स्थान प्राप्त झाले. म्हणूनच "तुमच्यावरील परमेश्वरीकृपेचे आणि तुमच्यासाठी

(पृथ्वीवर) त्याने जे पुस्तक व ज्ञान पाठविले आहे त्याचे स्मरण ठेवा,[१]" हा कुराणातील परिच्छेद विशद करून सांगताना कुराणाचा टीकाकार बैदावी याने 'पुस्तक व ज्ञान' म्हणजे, कुराण व सुन्नाच होय असे म्हटले आहे. प्रत्येक हदिसमध्ये प्रथम पैगंबरांची (प्रवचने) ज्यांनी ऐकली व त्यांचा वृत्तांत कथन केला त्या अनेक अधिकारी व्यक्तींच्या नावाची मालिका (इस्नाद) व त्यानंतर त्या वृत्तांताचे सार किंवा मूळ वृत्तांत (मतन) दिलेला असतो. सर्वसाधारणपणे 'हदिस'चे रूप पुढीलप्रमाणे असते : कथन करणारा म्हणतो, 'क' ने सांगितले (त्याला ते 'ख' कडून समजले, त्याला 'ग' कडून कळले, 'ग' ला 'घ' ने सांगितले.) की पैगंबर [ त्यांना शांती लाभो ] असे म्हणाले, (किंवा पैगंबरांनी असे केले.) [ ...यानंतर संबंधित वृत्तान्ताचे सार किंवा मूळ वृत्तान्त (मतन) दिलेला असतो ]. बहुसंख्य मुस्लिम समाजाने पैगंबरांच्या सुन्नाचा वृत्तान्त कथन करू शकत अशा अनेक व्यक्ती मानलेल्या आहेत. पैगंबरांचा चुलता व त्यांचा एक 'सोबती' अब्दुल्ला इब्ने अब्बास, इब्ने उमर, पैगंबरांची पत्नी व (पैगंबरांचा पहिला उत्तराधिकारी अबु बकर याची कन्या) आयेशा आणि पैगंबरांचा एक स्नेही अबु हुरेयरा या त्यापैकी काही व्यक्ती होत. या व्यक्तींनी सांगितलेला 'सुन्ना' जे मानतात त्यांना 'सुन्नी' म्हणतात आणि जे मानीत नाहीत त्यांना 'शिया' म्हणतात. प्रारंभी शियांचा एक राजकीय पक्ष होता. पुढे तो एक धार्मिक समाजही बनला. शियांच्या मते मुस्लिम समाजाला आपला प्रमुख निवडण्याचा अधिकार नाही. कारण इमाम हाच त्यांचा कायमचा प्रमुख असतो आणि परमेश्वरच मुहम्मदांच्या वंशातील किंवा त्यांच्या सर्वांत नजीकच्या नातलगाच्या कुटुंबामधील कोणाची तरी त्या पदावर नियुक्ती करीत असतो. पैगंबरांच्यामागे त्यांचा कोणी मुलगा जिवंत नव्हता; म्हणून त्यांच्या जावयाकडेच-अलीकडे-त्यांचा वारसा हक्क पोचतो. म्हणून मुहम्मदांमागून जे तीन 'खलिफा' किंवा 'उत्तराधिकारी' इस्लामी धर्मसत्तेवर आले ते आणि अन्य सर्व 'खलिफा' हे सर्व बळजबरीने पद बळकावणारे तोतये होत. त्याचप्रमाणे इब्ने अब्बास, आयेशा, अबु हुरेयरा इत्यादी मंडळींनी ज्या हदिसांमुळे स्वतः पैगंबरांनी अली याची इस्लामी धर्मसत्तेवरच्या प्रमुख पदावर नेमणूक केली होती असे सिद्ध होऊ शकते ती हदिसे कधीच उजेडात येऊ दिली नाहीत. त्यामुळे या मंडळींनी कथन केलेली सर्वच्या सर्व हदिसे शियापंथीय अस्वीकारार्ह समजतात. कारण त्यांच्या मताने ती कलंकित आहेत. शिया लोक फक्त अली याने सांगितलेली हदिसेच खरी मानतात. त्यामुळे शियापंथीयांची मान्यता असलेल्या 'फिक़'मध्ये सुन्नीपंथीयांच्या हदिसांना न्यायशास्त्राचा एक मूळ आधार म्हणून स्थान नाही.

खरे तर कोणाही एकाच व्यक्तीला, अगदी पैगंबरांनादेखील (अर्थात् पैगंबर ईश्वरीपुरुष होते असे इस्लाममध्ये कधीही म्हटलेले नाही हे येथे स्पष्ट केले पाहिजे),

---

१. कुराण २[२३१].

तिच्या जीवनकालात जे अनुभव आले त्यांचा पूर्वीचा दाखला म्हणून मर्यादित प्रमाणांतच उपयोग होऊ शकतो. ही वस्तुस्थिती, मुहम्मदांच्या मृत्युनंतर अल्पावधीतच आणि मुहम्मदांचे मनुष्यरूप पूर्णपणे संपून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आख्यायिकेत रूपांतर होण्याअगोदर, इस्लाममध्ये मानली गेली असावी असे दिसते. म्हणूनच खलिफा अलीच्या अमदानीच्या प्रारंभी यादवी युद्ध पेटले आणि अलीचे विरोधक तलहा व झुबेयर संकटमय परिस्थितीत सापडले तेव्हा त्यातून कसे बाहेर पडता येईल याचा विचार करीत असता ते दोघे असे म्हणाल्याचे सांगतात की, "आम्ही व ते दोघेही मुस्लिम आहोत. यापूर्वी अशी संकटमय परिस्थिती कधी उद्भवली नव्हती. त्यामुळे कुराणात त्याविषयीचे प्रकटीकरण करणे जरूर नव्हते किंवा त्यासंबंधीची पैगंबरांची 'परंपरा' कुराणात असणे शक्य नव्हते. ही एक नवी परिस्थिती आहे."

हदिसांच्या अस्सलपणाची शहानिशा करण्याचा प्रयत्न येथे प्रस्तुत नाही. तर मुस्लिम धर्मशास्त्राच्या "मूलाधारा"त हदिसांना काय स्थान आहे ते येथे पहावयाचे आहे. तथापि प्रचलित हदिसांची प्रचंड संख्या लक्षात घेता ती सांगणाऱ्या अधिकारी व्यक्तींची लांबलचक यादी देण्यात येत असली तरी त्यांपैकी बरीचशी हदिसे बनावट आहेत हे उघड आहे. फार पूर्वीपासून मुस्लिमांच्याही ही गोष्ट लक्षात आली आहे. मुस्लिम परंपरांची माहिती, पैगंबरांचे कुटुंबीय व त्यांचे सोबती यांच्याकडून दिली गेली होती. म्हणून खरे म्हणजे या व्यक्तींपासून दूर राहात असलेल्या आणि नंतरच्या काळातील लोकांना अडचणींच्या प्रसंगी सोयीस्कर अशी हदिसे तयार करण्याचा मोह होणे स्वाभाविक होते. अनेक बनावट धार्मिक 'परंपरा' अस्तित्वात आहेत याची मुस्लिम धर्मपंडितांना कल्पना होती. तरीही कालांतराने इस्लामी कायद्यांचा विश्वासार्ह "मूलाधार" या स्वरूपात हदिसांचा विकास होत राहिला. या मुद्दाम बनविलेल्या हदिसांनी अगोदरपासून अस्तित्वात असलेल्या स्थानीय रूढी किंवा मुस्लिमेतर अथवा प्राचीन समाजाकडून इस्लामने घेतलेले कायदेकानू यांना केवळ इस्लामला उपयुक्त असे मूर्त स्वरूप देण्याचे किंवा त्यांना मंजुरी देण्याचे काम केले.

'हदिसां'चा बालेकिल्ला असलेल्या मदिनानगरीतच 'राय' व 'कियास' या पद्धतींच्या अनियंत्रित आणि मनसोक्त वापराविरुद्ध मालिक इब्ने अनस ( मृत्यू ७९५ ) या मदिनावासीयाने नंतरच्या काळात बंड केले. कित्येक लोकांच्या मतांचा तो प्रवक्ता बनला. या लोकांचा एक पंथ तयार झाला. मालिकी पंथ (मजहब) या नावाने तो ओळखला जाऊ लागला. मालिक इब्ने अनस व अबु हनीफा यांचे उद्देश सारखेच होते आणि त्यांच्या निर्णयांतील फरकही तपशीलापुरताच मर्यादित होता. तथापि मदिनाचा धर्मपंडित मालिक हा पैगंबराने सांगितलेल्या किंवा स्थानिक प्रथेने ठरवून दिलेल्या 'परंपरां'चा कुराणाखालोखाल अधिकार आहे असे मानणारा होता. एकाच प्रश्नासंबंधी परस्पर भिन्न हदिसे असतील तेव्हा तो स्थानिक प्रथेला ( अमल ) प्राधान्य देत असे. आणि एखाद्या मुद्यासंबंधी निर्णय करताना कोणतेही हदिस उपयोगी पडत

नसेल किंवा मदिनाप्रांत विद्वत्तेचा आपला अधिकारसुद्धा कामी येत नसे तेव्हाच मालिक आपल्या 'राय'चा आधार घेत असे आणि या प्रयत्नात त्याने 'संशयास्पद' हदिसांचा-देखील उपयोग केलेला दिसतो. त्याने अवलंबिलेल्या पद्धतीची कल्पना त्याच्या 'मौत्ता' म्हणजे 'चांगला रुळलेला किंवा निर्विघ्न मार्ग' या पुस्तकावरून येते. कायदेशीर निर्णय देण्यास मार्गदर्शन होईल अशा रितीने या पुस्तकात हदिसे, स्थानिक परंपरा व चालीरीती यांचा विषयवार संग्रह केलेला आहे. सुरुवातीस शास्त्रार्थासाठी उपस्थित झालेल्या विषयाची माहिती, त्यानंतर त्यासंबंधीचा कुराणातील परिच्छेद आणि त्यापुढे संबंधित हदिस अशी मालिकच्या या ग्रंथाची सर्वसाधारणपणे रचना आहे. ज्या विषयासंबंधी कुराणाचाच अधिकार मानलेला आहे अशा विषयाबाबतची हदिसे दिलेली नाहीत. उदाहरणार्थ, 'घरात पाळलेले काही प्राणी खाणे कायदेशीर आहे की नाही' या विषयाची चर्चा करताना मालिक म्हणतो, "घोडे, खेचरे व गाढवे मारून खावीत की नाही याचे सर्वांत योग्य उत्तर म्हणजे ती खाऊ नयेत हेच होय. कारण परमेश्वराने (कुराणात) सांगितले आहे : 'घोडे, खेचरे व गाढवे तुम्ही त्यांच्यावर बसावे यासाठी आहेत.'[1] अशा रितीने घोडे, खेचरे व गाढवे बसण्याकरता आणि इतर गुरे बसण्या-साठी अथवा खाण्याकरिता असे ठरवून दिले आहे."[2] एखाद्या विषयाच्या बाबतीत कुराणात पूर्वीचे उदाहरण नसेल तेव्हा मालिकने हदिसचा उपयोग केला आहे. उदाहरणार्थ मांसभक्षक प्राणी खाणे कायदेशीर आहे किंवा काय याविषयी कुराणामध्ये स्पष्ट मार्गदर्शन केलेले नाही. या विषयासंबंधी मालिक म्हणतो, "परमेश्वराच्या दूताने सांगितले आहे की सुळे असलेला कोणताही प्राणी खाण्यास बंदी आहे." या हदिसचे मूळ कशात आहे हे समजून घेण्याच्या दृष्टीने मूळ 'मौत्ता'च्या टीकाकाराने सांगितलेली एक गोष्ट महत्त्वाची आहे. त्याचे म्हणणे असे की स्वतः 'मौत्ता'चा रचनाकार मालिक यालाच तरस, कोल्हे, लांडगे, जंगली मांजरे इत्यादी स्वतः मांस खाणारे प्राणी माणसाने खाणे पसंत नव्हते हे त्याने स्वतःच कबूल केले होते. या संदर्भात प्रख्यात इतिहासकार व टीकाकार तबरी याचे एक विधान नमूद करण्यासारखे आहे. "घोडे, खेचरे व गाढवे ही तुम्ही त्यांच्यावर बसावे यासाठी व शोभेचे प्राणी आहेत" या कुराणामधील वचनाचे स्पष्टीकरण करताना तबरी म्हणतो, "काही विद्वान पंडितांच्यामते घोड्याचे मांस खाण्यास (कुराणाने) बंदी केली आहे याचा हे वचन हा पुरावा आहे. स्वतः इब्ने अब्बास[3] याला घोडे, खेचरे व गाढवे या प्राण्यांचे मांस खाणे पसंत नव्हते. म्हणून तो असे म्हणत असे की परमेश्वराचे असे

१. कुराण १६८.

२. कुराण १६५-७.

३. अब्दुल्ला इब्ने अब्बास हा पैगंबरांचा चुलता. यानेच अधिकांश हदिसे कथन केली असे साधारणपणे समजले जाते.

म्हणणे आहे, की 'त्याने निर्माण केलेली गुरेढोरे तुम्हास खाण्याकरता आहेत.' म्हणून गुरेढोरे खावयास हरकत नाही. (आणि परमेश्वराने असे म्हटले आहे की) 'आणि घोडे, खेचरे, व गाढवे बसण्याकरिता आहेत.' म्हणून हे प्राणी बसण्याकरिताच आहेत. तथापि इतर काही पंडितांचा या मताला विरोध आहे. त्यांचे म्हणणे असे, की (वर उल्लेखिलेली कुराणांतील) ही दोन वचने एकमेकांच्या शेजारी असली तरी त्यात बंदी अभिप्रेत नाही. आपण आपल्या सेवकांवर कोणत्या गोष्टी देऊन मेहरबानी केली आहे, हेच फक्त परमेश्वराला त्यांना दाखवून द्यावयाचे आहे.

जेव्हा एखाद्या विषयासंबंधींचे पैगंबरांचे हदिस अस्तित्वात नसते तेव्हा स्थानिक रीतिरिवाज व प्रथा यांना मालिकने आपल्या पद्धतीत महत्त्वाचे स्थान दिले तर ते समजण्याजोगे होते. परंतु एखाद्या विषयासंबंधींचे सकृत्‌दर्शनी निर्णायक स्वरूपाचे हदिस अस्तित्वात असतानासुद्धा रीतिरिवाज व प्रथा यांचाच वरचष्मा मालिकच्या पद्धतीत असल्याचे दिसून येते. अशा प्रकारचे 'मुवाट्टा'मधील पुढील उदाहरण मालिकच्या पद्धतीवर प्रकाश टाकणारे आहे. अरब जमातीमध्ये जन्मलेल्या बिगर-अरब मुलाला वारसाहक्क आहे की नाही, याविषयी आपले मत सांगताना मालिकने प्रथम एक परंपरा नमूद केली आहे. या 'परंपरे' प्रमाणे ज्या मुलाचा जन्म अरब माता-पित्यापासून झालेला नाही अशा कोणाही मुलाला वारसा हक्क देण्यास खलिफा उमरने नकार दिला होता. ही प्रथा सांगितल्यानंतर मालिकने स्वतःचे मत नमूद केले आहे ते असे, की शत्रू देशातील एखादी स्त्री मुलासह अरब जमातीत आली असेल आणि तिचे मूल त्या जमातीतच राहिले असेल तर अशा मुलाला त्या बाईचा वारसा मिळू शकेल. मालिक पुढे म्हणतो, "मदिनामधील विद्वानांशी चर्चा केल्यावर मला असे आढळून आले, की आमच्यामध्ये ज्याविषयी एकमत आहे आणि ज्याविषयींचा मुद्दा वादातीत आहे अशी बाब म्हणजे इस्लामवर श्रद्धा नसलेल्या कोणाही व्यक्तीला कोणीही मुस्लिम आपला वारस नेमू शकत नाही."

काहीही बदल न करता इस्लामपूर्व काळातील प्रथाच मालिकने सांगितली आहे अशी उदाहरणे सापडतात. उदाहरणार्थ, महसूलाच्या संदर्भात खलिफा उमरने केलेल्या एका निर्णयाचा मालिकने केलेला उल्लेख. नव्याने बांधलेल्या विहिरीच्या पहिल्या पाण्यावर खलिफा उमरने कर बसविला. ही इस्लामपूर्व जुनीच प्रथा होती. अशा प्रकारच्या प्रश्नासंबंधीची प्रथासुद्धा हदिसशी विसंगत असू शकते. या संदर्भात 'उम्रा'चा उल्लेख केला जातो. 'उम्रा' म्हणजे एखाद्या माणसाला त्याच्या हयातीपुरती दिलेली देणगी. तो माणूस मेल्यावर ती देणगी दात्याला किंवा त्याच्या वारसाला परत मिळते. अशा प्रकारची देणगी देण्याची चाल इस्लामपूर्व काळात बरीच प्रचलित असावी असे दिसते. ही देणगी देताना घातल्या जाणाऱ्या अटींविरुद्ध अनेक हदिसे अस्तित्वात होती. स्वतः मालिकनेच आपल्या 'मुवाट्टा' या ग्रंथात अशा हदिसांचा उल्लेख केला आहे.

तथापि ही दानप्रथा कायदेशीर आहे असेच त्याचे मत आहे. काहीवेळा एखादी प्रचलित प्रथा किंवा स्थानिक लोकमताचे तात्पर्य ( इज्मा ) हदिसशी विसंवादी असल्याचे आणि हदिसऐवजी ती प्रथाच मानली जात असल्याचे आढळते. अशावेळी एक सिद्धान्त लागू केला जाऊ लागला. तो असा, की प्रचलित हदिस रद्द करणारे पैगंबरांचे दुसरे एखादे हदिस कोठेतरी अस्तित्वात असले पाहिजे आणि त्या आधारेच लोकांनी आपले मत ( इज्मा ) बनवले असले पाहिजे. कारण मर्त्य मनुष्यांच्या शब्दांनी पैगंबरांचे वचन रद्द झाले आहे, असे मानताच येणार नाही.

ज्या काळात मुस्लिम न्यायशास्त्र बरेच विकसित अवस्थेत होते त्या काळात परंपरा व रीतिरिवाज यांचा त्यामध्ये कसा प्रवेश झाला याची आणखी उदाहरणे 'हयात अल् हैवान' अर्थात 'प्राण्यांचे जीवन' या दामिरी याच्या पुस्तकात सापडतात. दामिरी हा १९ व्या शतकातील एक इजिप्शियन निसर्गशास्त्रज्ञ होता. या ग्रंथात प्राण्यांच्या संवयी व वैशिष्ट्ये यांविषयींची ऐकीव माहिती जशी आहे, त्याचप्रमाणे प्राण्यांविषयी माणसाने पाळावयाचे नियम व कायदे यांचीदेखील चर्चा आहे. 'वराल' या पालीच्या जातींतील एका सरपटणाऱ्या प्राण्याविषयी ग्रंथकार म्हणतो, 'सर्प खाणे निषिद्ध आहे हा निर्णय पूर्वीच झालेला आहे. आधीच्या काळातील न्यायशास्त्र्यांच्या मतानुसार हा निर्णय झालेला होता हे स्पष्टच आहे. तथापि रफी याने त्याहिपूर्वीच्या काळात जाऊन अरबांना सर्प खाणे आवडत होते किंवा काय याचा शोध घेतला आहे. त्याचा हा प्रयत्न, "कोणती गोष्ट कायदेशीर आहे असे ( लोक ) तुम्हाला विचारतील तेव्हा चांगल्या गोष्टी करणे कायदेशीर आहे असे त्यांना सांगा[1]" या कुराणांतील आयताशी मेळ घालण्यासाठी असावा. या विषयासंबंधी कोणताही विचार करताना अरब लोकांची मते सर्वांत अधिकृत मानली जातात. कारण इस्लाम धर्म हा अरबी धर्म आहे आणि पैगंबर हे अरब होते. परंतु या विषयाचा विचार शहरे व खेड्यांत वस्ती करून राहणाऱ्या लोकांच्या संदर्भातच झाला पाहिजे. केवळ वाळवंटी प्रदेशांत राहणाऱ्या असंस्कृत लोकांच्या दृष्टीने विचार करून चालणार नाही. कारण हे लोक कोणताही सरपटणारा प्राणी भेदाभेद न करता खात असतात...परंतु काही लोकांच्या मते पैगंबरकालीन अरबच या बाबतीत अधिकारवाणीने सांगू शकतात. कारण त्यांना नजरेसमोर ठेवूनच ( कुराण ) सांगितले होते."

याच शीर्षकाखाली थोडे पुढे "एका महत्त्वाच्या टिपणी"मध्ये दामिरी म्हणतो, "जे प्राणी ( अन्न म्हणून ) खाणे कायदेशीर आहे किंवा काय यासंबंधी ( पैगंबरांच्या ) सहकाऱ्यांनी कोणतेही मत दिलेले नाही अशा प्राण्यांचाच या पुस्तकात उल्लेख केलेला आहे, हे लक्षात घेणे जरूर आहे. परंतु ( पैगंबरांच्या सहकाऱ्यांनी ) सर्वच बाबतीत लागू होणारे काही सर्वसाधारण नियम आणि काही विशिष्ट बाबींना लागू होणारे नियम

१. कुराण ५६.

सांगितलेले आहेत. या नियमांतूनच ' वराल ' संबंधीचा नियम काढलेला आहे. " दामिरी पुढे अशी माहिती सांगतो, की एखादा प्राणी खावा की नाही याविषयी बदावींचा सल्ला विचारला आणि या बाबतीत त्यांच्याकडून परस्परविरोधी मते मिळाली, तर जी गोष्ट बहुमताने सांगितलेली असेल ती गोष्ट करावयाची असते. दोन्ही बाजूंची मते समप्रमाण असतील तेव्हा त्यांपैकी जे कुरेशी लोकांचे मत असेल ते काही धर्मशास्त्रज्ञ ग्राह्य मानीत. कारण कुरेशी हा बदावी अरबांचा ' कणा ' होय असे मानले जात असे आणि कुरेशीपैकींच कोणाकडे तरी पैगंबरांचे वारसापद जात असते. कुरेशींतच जेव्हा या विषयाबाबत मतभेद असत किंवा त्याबाबत कोणताही निर्णय द्यावयास ते तयार नसत तेव्हा विवाद्य प्राण्याशी निकटचे साम्य असलेले इतर प्राणी खाणे योग्य आहे की नाही याचा विचार केला जात असे. आणि या पद्धतीने कोणताही निर्णय घेता येत नसे तेव्हा मग यासंबंधी भिन्न भिन्न मते आहेत, असे समजले जात असे.

कालांतराने इस्लामी कायद्याचा निश्चित अर्थ ठरविण्याच्या आणि कायद्याची कक्षा विस्तृत करण्याच्या बाबतीतील विभिन्न पद्धतींमधील मतभेद स्पष्ट होत गेले आणि या विभिन्न पद्धतींना संहितांचे स्वरूप प्राप्त होऊन त्या पद्धतीच्या समर्थकांचे वेगवेगळे पंथ[1] जन्मास आले. त्यापूर्वीच्या काळात जे लोक इस्लामी न्यायशास्त्राचा (' फिकाह 'चा) मूलाधार म्हणून प्रामुख्याने ' राय ' पद्धतीला महत्त्व देत होते त्यांच्यामध्ये आणि जे लोक कुराणाखालोखाल ' हदिसां 'ना मूलाधार म्हणून प्रमुख स्थान देत होते त्यांच्यामध्ये निश्चित व कडक असा फरक केला जात[2] नसे. जसजसा काळ लोटला आणि धर्मसत्तेचा अधिकार वाढत गेला तसतसे ' राय ' व ' कियास ' पद्धतींना अधिक सामर्थ्य मिळवून देण्यासाठी हदिसचा उपयोग केला जाऊ लागला. इतिहासकार तर असे म्हणतात, की परमेश्वराने एखाद्या प्रश्नावर प्रकटीकरण देण्याची कृपा केली नसेल तेव्हा आपण आपल्या ' राय 'चा– आपल्या मताचा उपयोग केलेला आहे असे खुद्द पैगंबरांनी म्हटले होते. याला समांतर अशा एका हदिसचा उल्लेख करता येईल. एकदा एका काझीला पैगंबरांनी काही प्रकरणी निवाडा देण्यासाठी येमेनला पाठविले. त्या वेळी पैगंबरांनी काझीला प्रश्न केला, " तू तुझ्यापुढील प्रकरणांचा निवाडा कशाच्या आधाराने

---

१. बर्गस्ट्रासर याने ' Islam ' या पुस्तकात ' मजहबां 'च्या प्रारंभीच्या इतिहासाचे मोठे सडेतोड वर्णन केलेले आहे. त्यामुळे या ' मजहबां 'च्या जन्माविषयी जी परंपरागत माहिती उपलब्ध आहे ती पार बदलून टाकली आहे.

२. इब्ने कुतैब ( मृत्यू : इ. स. ८८९ ) याने असे म्हटले आहे की अबु हनीफ, मालिक बिन अनस, अबु युसुफ अल काझी व अल्-आवझाई ( मृत्यू : इ. स. ७७४– एका अल्पजीवी हदिसविषयक पंथाचा संस्थापक ) हे सर्व ' अशाब अल् राय ' म्हणजे ' राय 'च्या पद्धतीचा वापर करणारे होते.

देणार आहेस ? " काझीने उत्तर दिले, " कुराणात जे सांगितलेले आहे त्याचा मला उपयोग होईल. आणि माझ्यापुढील प्रकरणाविषयी कुराणात काही सापडल नाही तर मी 'सुन्ना'चा (पैगंबरांनी घालून दिलेल्या पद्धतीचा) आधार घेईन. आणि त्याचाही उपयोग झाला नाही तर शेवटी मी माझ्या स्वतःच्या मताप्रमाणे, 'राय'-प्रमाणे निवाडा देईन."

खलिफा उमरविषयीसुद्धा अनेकदा असे सांगितलेले आढळते की, पूर्वीचे दाखले नसतील तर काझींनी आपल्या स्वतःच्या मताचा वापर करून निवाडे द्यावे अशा त्याने सूचना दिल्या होत्या. परंतु हे म्हणणे अनधिकृत वाटते. कायदाविषयक प्रश्नांसंबंधी सूचना देण्याइतकी उमरला कायद्याची माहिती असणे किंवा तसे करण्याच्या मनःस्थितीत तो असणे संभवनीय दिसत नाही. कारण तो लष्करी सेनानी होता आणि इस्लामी साम्राज्यात जिंकून आणलेल्या नव्यानव्या प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन करण्याच्या कार्यात आणि आपल्या मोहिमांमध्ये तो सतत गुंतलेला असे. तथापि त्याने ज्या "सूचना" दिल्या असे सांगितले जाते त्या एका कारणासाठी उपयुक्त आहेत. ते असे की, त्या 'सूचना' शोधून काढणारे लोक न्यायशास्त्राचा योग्य 'मूलाधार' म्हणून कोणत्या गोष्टी मानीत होते याची तरी कल्पना येते. या संबंधात आणखी एक उदाहरण दिले जाते. अबू मूसा अल् अशारी नावाच्या एका प्रसिद्ध काझीला आणि पैगंबरांच्या सोबत्याला उमरने एक पत्र लिहिले होते. असे सांगितले जाते, की त्या पत्रांत उमरने काझीला पुढील सूचना दिली होती, "तुमच्या पुढील ज्या प्रकरणासंबंधी" लिखित ग्रंथांत (म्हणजे कुराणात) किंवा "परंपरां"त पूर्वीचे दाखले नसतील अशा प्रकरणांचा विचार करताना पूर्वीची तत्सम प्रकरणे पाहावीत आणि त्याआधारे अनुमान काढावे. मात्र परमेश्वराने जे सांगितलेले असेल त्याच्याशी आणि सत्याशी जास्तीत जास्त सुसंगत असे ते अनुमान असले पाहिजे." दुसऱ्या एका काझीला पुढील स्वरूपाची सूचना देण्यात आली होती, "ज्या प्रश्नाविषयी तुला परमेश्वराने दिलेल्या ग्रंथाकडून (कुराणाकडून) मार्गदर्शन होईल त्याबाबत दुसऱ्या कोणाचाही सल्ला घेऊ नको. ज्याविषयी तुला परमेश्वरी ग्रंथातून मार्गदर्शन होणार नाही त्याबाबत 'सुन्ना'चा आधार घे; आणि 'सुन्ना'मध्येही तुला काही मिळाले नाही तर मग तुझ्या स्वतःच्या विवेक बुद्धीचा उपयोग कर."

हदिसचे एकूण स्वरूपच लवचिक असल्यामुळे अनेक परस्परविरोधी मते व गोंधळ निर्माण झाला आणि त्यातून आणखी आचारपंथ (मजहब) जन्मास आले. हदिसांचा विकास ज्या स्वरूपात झाला त्यामुळे त्यात अनेक परस्परविसंगत 'परंपरां'ना थारा मिळत गेला. ते अपरिहार्य होते. इस्लामी साम्राज्यातील विभिन्न प्रदेशांमध्ये कायद्या-संबंधींच्या अगदी प्रारंभिक स्वरूपाच्या मुद्यांविषयी जी वेगवेगळी मते होती त्यामुळे आणि मुस्लिम साम्राज्यातील विभिन्न घटक प्रदेशातील परस्परभिन्न गरजांनुसार

अशा प्रकारच्या परस्परविसंगत 'परंपरा' निर्माण झाल्या होत्या. याचे एक उदाहरण देता येईल. एकदा पैगंबरांना विचारण्यात आले, की "एखाद्या नुकत्याच इस्लामधर्म स्वीकारलेल्या माणसाला चारपेक्षा जास्त बायका असतील, तर त्याने काय करावे ?" पैगंबरांनी उत्तर दिले, "तसे असेल तर त्याने चार बायका सोडून बाकीच्यांशी घटस्फोट घ्यावा." या संबंधीच्या हदिसच्या अर्थाबाबत इराकी व हिझाझीप्रदेशीय लोकांचे दृष्टिकोण भिन्नभिन्न होते. या हदिसमध्ये सांगितलेल्या 'परंपरे'चा शब्दशः अर्थ घेऊन हिझाझी म्हणत, की कोणत्या बायकांशी फारकत घ्यावयाची हे फारसे महत्त्वाचे नाही. फक्त चार बायकांशी संसार करण्याचा कायदा पाळला की झाले. याउलट इराकी म्हणत, की या हदिसामागील हेतू लक्षात घेतला पाहिजे. त्यानुसार पहिल्या चार बायकांशी प्रपंच करणेच कायदेशीर आहे. कारण चारापेक्षा जास्त बायकांशी झालेले विवाह इस्लाममध्ये कधीच कायदेशीर ठरत नाहीत. इस्लामी इतिहासाच्या दुसऱ्या शतकात हदिसांना इस्लाम धर्मात कुराणाच्या बरोबरीने अधिकार प्राप्त झाला तेव्हा मात्र गंभीर स्वरूपाची अडचण उद्भवली. कारण काही हदिसे कुराणांतील नियमांशी विसंगत होती. कुराण व सुन्ना, दोन्ही परमेश्वराने दिलेले आहेत असे मानले, तर कुराणातील एखादा नियम नंतरच्या सुन्नामधील एखाद्या नियमामुळे रद्द होऊ शकतो, हे तर्कप्राप्त मानले पाहिजे. शिवाय मुस्लिम साम्राज्यात सर्वत्र हदिसांशी विसंगत अशा अनेक प्राचीन प्रथा अस्तित्वात होत्या. आणि त्या प्रथा इतक्या प्रमाणात समाजाच्या अभिन्न अंग बनलेल्या होत्या, की त्या नाहीशा करणे शक्यच नव्हते. त्यामुळे निर्माण झालेल्या अडचणीतून काही तरी मार्ग काढणे जरुर होते. इस्लामच्या दुसऱ्या शतकाच्या अखेरीस एका व्यक्तीने ही बिकट जबाबदारी अंगावर घेतली. त्यांचे नाव मुहम्मद अल् शाफी.[1] तो जन्माने अरब होता आणि 'राय' व 'हदिस' या दोन्ही पद्धतींचा त्याने अभ्यास केलेला होता. त्याने मालिक इब्ने अनसबरोबर मदिनामध्ये आपल्या अध्ययनास प्रारंभ केला. त्यानंतर त्याने अबू हनीफ याचा शिष्य व तरुण सहाध्यायी अल् शेबानी याच्याकडून हनीफच्या पद्धतीची माहिती मिळवली. मालिक व हनीफ या दोघांच्या पद्धतींचे परिशीलन केल्यानंतर त्या दोन्ही पद्धतींनी त्याची निराशाच केली. मालिकची पद्धती त्याला समाधानकारक वाटली नाही. याचे कारण मालिकची पद्धती परंपरांशी पक्की जखडलेली होती. आणखीही एक कारण कदाचित असे असावे, की त्या पद्धतीमध्ये कायदे व प्रथा यांच्या वास्तविक स्वरूपाचा मुहम्मदांच्या सुन्नाशी मेळ घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्या पद्धतीतील काही तरतुदी संदेहास्पद बनल्या होत्या. तसेच अबू हनीफची पद्धती मुहम्मद अल् शाफीला समाधानकारक वाटली नाही; याचे आणखी एक कारण हनीफच्या पद्धतीमध्ये 'राय'चा उपयोग करण्याची परवानगी असल्यामुळे व्यक्तिगत पूर्वग्रहांना अतिशय वाव होता आणि परिणामतः

१. मृत्यू : २०८–८२०.

व्यक्तिगत लहरीनुसार न्यायपंडितांकडून निर्णय दिले जाण्याची शक्यता असे. म्हणून मुहम्मद अल् शाफी याने पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या पद्धतींमधील दोष टाळून एक नवीनच पद्धती विकसित करण्याचे काम हाती घेतले. एका हेतुपूर्वक केलेल्या प्रयत्नाची साक्ष त्याच्या या कार्यात मिळते. त्यामुळेच मुहम्मद अल् शाफी हा मुस्लिम न्यायशास्त्र पद्धती कशी असली पाहिजे आणि तिचे 'मूलाधार' कोणते याची स्पष्ट मांडणी करणारा पहिला विधिज्ञ ठरतो. कोणतीही विधिसंहिता तयार करताना दीर्घकाळापासून चालत आलेले रीतिरिवाज व प्रथा विचारात घेतल्या पाहिजेत, याचे महत्त्व त्यानेच पहिल्या प्रथम ओळखले आणि म्हणूनच त्याने इस्लामी न्यायशास्त्राच्या 'मूलाधारा'त रीति-रिवाजांचा व प्रथांचा ठामपणे समावेश केला.

'इज्मा' ( म्हणजे मुस्लिम धर्मपण्डितांच्या धर्ममतांचे तात्पर्य ) हे तत्त्व म्हणजे परमेश्वरी इच्छेची अभिव्यक्ती होय. या सिद्धान्तावर त्याने आपली मांडणी केली. मालिकनेही त्या तत्त्वाचा आधार घेतला होता. अर्थात त्याने मदिनानिवासी धर्मपंडितांच्या धर्ममता-पुरतेच ते तत्त्व मान्य केले होते. पण शाफीने 'इज्मा'च्या कक्षा अधिक विस्तृत केल्या. पैगंबरांव्यतिरिक्त इतर अधिकारी पुरुषांकडून ज्या कल्पनांची व निर्णयांची सुव्यवस्थित रचना केली गेली होती आणि ज्यांच्याविषयी त्यांच्यामध्ये मतभेद नव्हते अशा विपुल कल्पनांचा व निर्णयांचा शाफीने 'इज्मा'मध्ये समावेश केला. 'इज्मा'ही परमेश्वरी इच्छेची अभिव्यक्ती होय, हा शाफीचा सिद्धान्त अतिशय महत्त्वाचा ठरला. कारण खरे तर एकूण इस्लामच्या दृष्टिकोणावर ज्यांचा परिणाम होत असतो अशा सर्व प्रश्नांविषयी आणि प्रत्येक अडचणीच्या प्रसंगी याच तत्त्वाच्या आधारे निर्णय घेतला जाऊ लागला. पैगंबरांच्या देहावसानानंतरचा काही काळ स्वाभाविकपणेच पैगंबरांच्या सहकाऱ्यांच्या धर्ममतांपुरते 'इज्मा'चे तत्त्व मर्यादित राहिले होते. धर्ममते सांगणाऱ्या या श्रेष्ठींचा एक वर्गच बनला होता. या श्रेष्ठींच्या मृत्यूनंतर मक्का व मदिना या दोन्ही पवित्र नगरींतील धर्मपंडितांचा अधिकार मानला जाऊ लागला आणि त्यांचे 'इज्मा' निर्णायक समजले जाऊ लागले. परंतु कालांतराने अरबस्तानबाहेरील मुस्लिमही इस्लामी कायद्याचा अभ्यास करू लागले. यांचा एकंदर राजकीय दर्जाही उंचावला. त्यामुळे अरबेतर धर्मपंडितांच्या मतांचा अधिकार मान्य करावा लागला. आणि म्हणून त्या त्या काळातील इस्लामच्या सर्व मान्यताप्राप्त न्यायपंडितांचे ( फकींचे ) सर्वसाधारण मत म्हणजे 'इज्मा' असा अर्थ त्या सिद्धान्ताला प्राप्त झाला.[१] या फकी लोकांनाच इस्लामी कायदाविषयक पुस्तकांचा

---

१. "कायदाविषयक निर्णय आणि धार्मिक महत्त्वाची कोणतीही बाब या विषयींची ज्यांची मते 'इज्मा'मध्ये विचारात घेतली जातात अशा लोकांतील एकमत म्हणजे 'इज्मा'" अशी व्याख्या अल् अमीली याने आपल्या Malim al-din या ग्रंथांत केली आहे. 'फिकाह'च्या तत्त्वांविषयींचे हे शियापंथीयाने लिहिलेले पुस्तक आहे. 'इज्मा'चा अधिकार नाकारताना प्रारंभी हे विधान केलेले आहे.

अर्थ लावण्याचे व संदेहास्पद मुद्यांवर[1] निर्णय देण्याचे ज्ञान आहे आणि खुद्द कुराणाद्वारे फक्त त्यांनाच तो अधिकार मिळालेला आहे असे मानले जात[2] असे.

झाहिरीसारखे काही प्राचीन पंथांचे अनुयायी इतर कोणत्याच 'इज्मा'चा कायदेशीरपणा मानीत नसत, ते फक्त पैगंबरांच्या सहाध्यायांचाच 'इज्मा' कायदेशीर आहे असे समजत. परंतु जसजसा काळ गेला तसतसे बहुसंख्य मुस्लिम न्यायपंडितांना, एका विशिष्ट काळातील 'इज्मा'मुळे त्या आधीच्या काळातील 'इज्मा'मध्ये बदल होत असतो [ याला फक्त पैगंबरांच्या सहाध्यायांच्या 'इज्मा' चा अपवाद मानलेला आहे. ] या गोष्टीला मान्यता द्यावी लागली. तसेच हीदेखील गोष्ट त्यांना स्वीकारणे भाग पडले की 'इज्मा' हा कधीच चुकत नाही असेच मानले पाहिजे; कारण नाहीतर मग इस्लाममध्ये कायद्याच्या बाबतीत कोणाचाच शब्द अंतिम नाही असे म्हणावे लागेल. मात्र याचा अर्थ असा नव्हे, की 'सन् हेड्रिन' किंवा कौन्सिलसारखे सर्व इस्लामच्या दृष्टीने योग्यायोग्य काय हे ठरविणारे एखादे न्यायपीठ त्या काळात अथवा कधीकाळी अस्तित्वात होते. या संदर्भात एवढेच म्हणता येईल, की रीतिरिवाज व प्रथा या मागोमाग मताला ( रायला ) हळूहळू निश्चित आकार मिळत गेला आणि प्रत्येक काळात त्याला विशिष्ट दिशा मिळत गेली.

सारांश कुराण, पैगंबरांचा सुन्ना व 'इज्मा' हे शाफीप्रणित न्यायशास्त्र पद्धतीच्या 'मूलाधारां'पैकी तीन 'मूलाधार' होते. तथापि कायदाविषयक सर्व गरजा भागविण्याच्या दृष्टीने ते अपुरे होत असे शाफीचे मत होते. म्हणून त्याने 'कियास' म्हणजे 'सदृश उदाहरण' या तत्त्वाचा चौथा 'मूलाधार' म्हणून स्वीकार केला. इतर न्यायशास्त्री या तत्त्वाचा उपयोग करण्यात अयशस्वी झाले; परंतु शाफीने ते तत्त्व यशस्वीपणाने उपयोगात आणले.'[3]

'राय' किंवा 'मत' या पद्धतीच्या व तिचीच उपशाखा असलेल्या 'इस्तिहसान' पद्धतीच्या अनिर्बंध स्वातंत्र्यावर शाफीचा राग होता. त्याच्या मते 'कियास' ही नियंत्रित करून वापरता येईल अशी पद्धती आहे. कारण एखाद्या मुद्याविषयी कोणतेही समर्पक तर्कानुमान काढताना कुराणात पूर्वीच जे सांगितले आहे, त्यामागील 'इल्ला' किंवा हेतू

---

१. कायदाविषयक मुद्यांसंबंधीच्या निर्णयाला 'फतवा' म्हणतात आणि फतवा सांगणाऱ्या व्यक्तीला 'मुफ्ति' म्हणतात.

२. उदाहरणार्थ १६[४५]. "ज्या व्यक्तींना आदेश मिळाला आहे त्यांना विचारा..." याचा अर्थ ( पवित्र ) ग्रंथाच्या ज्ञात्यांना विचारा. अथवा "परंपरांचे ज्ञान असलेल्या व्यक्तींना ( उलेमांना विचारा )" ( बैदावी कुराण ३[५] ).

३. 'इज्तिहाद' म्हणजे मार्गदर्शन मिळविण्यासाठी केलेले व्यक्तिगत 'प्रयत्न'. या तत्त्वाशी 'कियास' या तत्त्वाचे शाफीच्या मतानुसार साम्य आहे.

काय हे पाहिले पाहिजे. शाफी पंथाच्या पद्धतीत फार कमी लवचिकपणा आहे. त्यामुळे 'कियास' द्वारे त्या पद्धतीने काही प्रश्नांविषयीची काढलेली तर्कानुमाने हनफींच्या तर्कानुमानांशी पुष्कळदा जुळत नाहीत. कारण हनफी पद्धत काहीशी अधिक उदार व लवचिक आहे. उदाहरणार्थ, कायद्याने वयात न आलेल्या परंतु कुमारी न राहिलेल्या मुलीच्या लग्नाच्या वेळचे पालकत्व कोणाकडे असावे हा प्रश्न. हनफी पंथीयांच्या मताप्रमाणे अशा मुलीचे लग्नाच्या वेळचे पालकत्व ('वली'पद) तिच्या मालमत्तेची व्यवस्था पाहणाऱ्या पालकाकडे असले पाहिजे. कारण ती अविवाहित 'कुमारिका' राहिली असती, तर त्याच्याकडेच ते राहिले असते. तथापि शाफींना हा दृष्टिकोन मान्य नाही. त्यांचे म्हणणे असे की वयात न आलेल्या कुमारिकेची मालमत्ता कायद्यानेच पालकाकडे सोपविलेली असते. कारण ती मुलगी त्याच्या ताब्यात दिलेली असते, परंतु याउलट परिस्थितीत मात्र तसे होऊ शकत नाही. अल्पवयीन पण कुमारिका नसलेल्या मुलीची मालमत्ता पालकाकडे सोपविलेली असली, तरी पुन्हा लग्न करण्याच्या बाबतीत होकार किंवा नकार देण्याचा तिला हक्क आहे. त्यामुळे तिच्या पूर्वसंमतीशिवाय पालकाला 'वली' बनून तिचे लग्न लावून देता येत नाही.

एक तत्त्व म्हणून 'कियास'ला धर्मपंडितांनी स्पष्टपणे मान्यता दिल्या क्षणापासून त्या तत्त्वाला विरोध सुरू झाला. त्यावर हल्ले सुरू झाले. अहमद इब्ने[1] हनबाल (इब्ने हनबाल या नावाने तो सर्वसाधारणपणे ओळखला जातो.) हा 'कियास'चा एक मोठा टीकाकार होता. खुद्द अल् शाफीचा तो शिष्य होता. त्याच्या मतानुसार कुराणात सांगितलेल्या गोष्टींचा आणि 'परंपरां'चा बुद्धिनिष्ठ अर्थ लावावयास हरकत नाही. म्हणून त्याने व त्याच्या विचाराच्या मंडळींनी 'इज्मा' हा एक बेकायदेशीरपणे केलेला 'फेरबदल' (बिदा) आहे असे सांगून त्यास मान्यता देण्यास नकार दिला. तथापि इब्ने हनबाल याला एकूण इस्लामी न्यायशास्त्राचा विचार विशेषसा अभिप्रेत नव्हता. त्याला हदिसच्या न्यायशास्त्रीय अंगापेक्षा त्याचे मूळ स्रोत कोणते हे पाहण्यात मुख्यतः रस होता. या भूमिकेतूनच त्याने 'मसनद' हा 'परंपरां'चा महान् संग्रह तयार केला. त्याने 'फिकाह'ची कोणतीही नवी पद्धती स्थापन केले नाही. म्हणूनच तबरी हा इतिहासकार व न्यायशास्त्री इब्ने हनबाल हा इस्लामी न्यायशास्त्रासंबंधींचा अधिकारी पुरुष होता असे मानीत नाही; तर तो त्याला एक 'परंपरावादी'च समजतो; परंतु हदिसासंबंधीच्या विवेचनाच्या ओघात हनबालने कायदाविषयक मुद्यांविषयीची आपली मते सांगितलेली आहेत. इसवी सनाच्या अकराव्या शतकात हनबालची विचारपद्धती मानणाऱ्यांचा पंथ शक्तिशाली बनला तेव्हा मुस्लिम जगतामधील 'इज्मा'कडून त्या पंथास इस्लामी न्यायशास्त्रातील एक सनातन विचाराचा पंथ म्हणून आणि हनबाल यास त्या पंथाचा संस्थापक म्हणून मान्यता

---

१. मृत्यू : २४१ / ८५५.

मिळाली. एकंदरीत हा एक सर्वांत जास्त प्रतिगामी पंथ आहे. त्यामुळेच त्यानंतरच्या काही शतकांत त्याचा ऱ्हास होत गेला. आणि आता तर त्या पंथात फारच थोडे लोक राहिले आहेत. तो पंथ खरे म्हणजे जवळपास नष्टच झाला असता; परंतु त्या पंथाची एक उपशाखा म्हणून उदयास आलेल्या व राजकीय सत्ता प्राप्त केलेल्या अरबस्तानातील वहाबी पंथाने त्याचे पुनरुज्जीवन केले. या पंथाचा हिंदुस्थानातील काही भागातदेखील प्रसार झाला. त्याचप्रमाणे नेजद व हिजाज येथील वहाबी पंथाचा राजा इब्ने सौद याची राजकीय सत्ता भरभराटली, तेव्हा तो पंथ अरबस्तानातही शक्तिसंपन्न बनला.

हदिसच्या बाबतीमधील सुन्नीपंथीयांचा अधिकार शियापंथीय मानीत नसावेत असे दिसते. शियापंथीयांचा असा, दावा आहे, की त्यांच्या स्वतःच्या हदिसात व कुराणात इस्लामचे सर्व कायदेकानू आहेतच; त्यामुळे ' राय ' किंवा त्याची ' कियास ' ही उपशाखा किंवा ' इज्मा ' यांची काहीही आवश्यकता नाही. शियांच्या मते ' कियास ' कायदेशीर असता, तर स्वतः पैगंबरांनीच त्या पद्धतीचा उपयोग केला असता; पण त्यांना ते आवश्यक वाटले नाही. कारण धर्मपरायण माणसाची कर्तव्ये कुराणामध्ये स्पष्टपणे सांगितलेलीच आहेत. कुराणात म्हटले आहे, की " आम्ही तुमच्यासाठी स्मरण करून देणारा ग्रंथ ( म्हणजे कुराण ) पाठविला आहे. हेतू हा की त्यात जे सांगितलेले आहे ते तुम्ही लोकांना समजावून सांगावे आणि त्यांनी त्याचे मनन करावे." म्हणून कुराणात न सांगितलेले असे पैगंबरांनी काही सांगितले असते, तर ते निश्चितच जगात शिल्लक राहिलेच नसते; परंतु कायद्याचा ' सन्मार्ग ' अद्याप टिकून आहे आणि तो काय आहे हे समजूनही घेता येते. शियांचा सुन्नी पंथीयांवर असा आरोप आहे, की त्यांनी आपणाला हवे तसे काही परिच्छेद कुराणात दडपून घातले आहेत आणि ते शक्य नसेल तेव्हा त्यांनी आपल्या स्वतःच्या मतांना अनुकूल अशा प्रकारे ' कुराणा 'चा विपर्यास केला आहे. शिया पंथीयांचे असेही म्हणणे आहे, की ' कियास ' पद्धतीने एखादा नियम सांगणे म्हणजे जवळपास स्वतः परमेश्वराने कथन केलेल्या ' प्रकटीकरणां 'सारखी प्रकटीकरणे माणसाने निर्माण करण्याचाच प्रकार होय.

शियापंथीयांच्या म्हणण्याप्रमाणे पैगंबरांनंतर मनुष्यजातीला सत्याचा मार्ग दाखविण्यासाठी पैगंबरांच्या वंशातील बारा इमाम– म्हणजे दैवी साक्षात्कार झालेले नेते– होऊन गेले. यांपैकी महदी हा शेवटचा इमाम इस्लामी इतिहासाच्या तिसऱ्या शतकात रहस्यमय रीतीने अदृश्य झाला आणि तेव्हापासून जगाच्या नजरेआड होऊन तो एक ' गूढ 'च होऊन बसला. तथापि तो जीवित आहे आणि शरियतच्या बाबतीत सदैव त्याचाच अधिकार कायदेशीर म्हणून समजला जातो. शरियतचा रक्षक तोच आहे. कोणत्याही ' इज्मा ' संबंधीचे त्याचे काय मत आहे, हे सांगितले जात नाही, तोवर तो ' इज्मा ' पूर्ण होऊ शकत नाही आणि त्याचे मत लक्षात न घेता अगदी अबू बकरपासून आतापर्यंतच्या इस्लामी धर्मपंडितांची मते एकत्र करून काढलेला ' इज्मा 'देखील ( अर्थात् तसे कधी केले जात नाही ) रद्द ठरतो.

अशा प्रकारे शेवटचा इमाम हा अदृश्य व गूढावस्थेत वावरत असला, तरी त्याचे प्रतिनिधी– मुज्ताहिद प्रत्येक युगात जन्म घेत असतात. ते आपल्या ' परमप्रयत्नां 'च्या ( म्हणजे ' इज्तिहाद ' ) जोरावर कुराण व ' परंपरा ' यांचे संपूर्ण ज्ञान प्राप्त करून घेऊ शकतात. जोवर हा ( शेवटचा ) इमाम जगात जिवंत आहे तोवर ' इज्तिहादचा दरवाजा ' अनुग्रहप्राप्त व्यक्तींना खुला आहे अशी समजूत शियांमध्ये दृढपणे अस्तित्वात होती. त्यामुळेच इराणमध्ये[1] ज्या व्यक्ती आपल्या विद्वत्तेने व व्यक्तिगत योग्यतेमुळे लोकप्रिय होत्या त्याच व्यक्ती धार्मिक क्षेत्रात आणि परिणामान्ती राजकीय क्षेत्रातही जबरदस्त प्रभाव गाजवीत होत्या असे आढळते.

' इज्तिहादच्या दरवाजा 'चा सिद्धान्त सुन्नीपंथीयदेखील स्वीकारतात; परंतु त्यांचे म्हणणे असे, की चार सनातन आचारपंथां ( मजहब ) पैकी अखेरच्या पंथाचा संस्थापक इनबाल याच्या त्यूनंतर हा ' दरवाजा ' बंद झालेला आहे. तथापि इस्लामच्या तिसऱ्या व चौथ्या शतकांपर्यंत ' इज्तिहाद 'ची परंपरा अनुसरणे शक्य होते. कारण त्या काळात इस्लाममधील चार पंथांच्या बरोबरीने इतरही अनेक धार्मिक गट अस्तित्वात होते आणि त्यांच्या नेत्यांची ख्याती ते राहत असलेल्या देशाबाहेरही पसरलेली होती असाही एक कालखंड होता. यांपैकी काही धार्मिक गट नष्ट झाले. त्याला बहुतांशाने राजकीय कारणे कारणीभूत होती. परंतु भूगोलकार मक्दीसी म्हणतो त्याप्रमाणे धर्मशास्त्राच्या अभ्यासाकरता बाहेर पडलेले विद्यार्थी एखाद्या प्रसिद्ध गुरूच्या शोधार्थ पवित्र हिझाझ शहरांच्या प्रदेशातच बहुधा जात. त्यामुळे आडवळणाच्या गावात वस्ती करून राहिलेल्या गुरूंना एखादा स्वतंत्र ' पंथ ' चालविण्याइतके शिष्य मिळत नसत. अनेक धार्मिक गट कालौघात नष्ट झाले याचे हेही पुष्कळदा एक कारण होते. नाहीतर दाऊद अल् जाहिरी, सुफायन अल्-थॉरी आणि सुफायन अल्-थॉरीचा शिष्य अल्-ऑझै यांच्यासारख्यांचे धार्मिक पंथ टिकून राहण्यास हरकत नव्हती. अल्-ऑझै याच्या पंथाला तर दहाव्या शतकात हनफी व शाफी पंथांच्या बरोबरीने मान्यता मिळालेली होती.

अद्याप टिकून असलेले सर्व आचारपंथ सुन्नी लोकांत आढळतात. प्रत्येक सुन्नी यांपैकी कोणत्या ना कोणत्या पंथाचा अनुयायी असतो. शाफीपंथीय मुस्लिम प्रामुख्याने दक्षिण अरबस्तान, मलाया, पूर्व आफ्रिकेतील टांगानिका आणि मध्य आशियातील काही भागात आढळतात. मालिकी पंथाचे मुसलमान उत्तर आफ्रिकेत

---

१. १५०१ मध्ये इस्माईल सफावी हा इराणांत अधिकारावर आल्यानंतर शिया-पंथाला सरकारी मान्यता प्राप्त झाली. हमदल्ला मुस्ताफी याने आपला ' नझहट अल कुलुब ' हा ग्रंथ लिहिला ( ७४०-१३४० ) त्या काळात इराणातील अनेक शहरात सुन्नी पंथीयांची वस्ती होती.

मोठ्या संख्येने ( एके काळी मुस्लिम स्पेनमध्येही त्यांची मोठी संख्या होती ) आहेत. तसेच पश्चिम आफ्रिका, सुदान, इराणी आखाताच्या अरेबियन किनारपट्टीवरील अनेक भागांमध्येही मालिकी आहेत. हनफी मुस्लिम भूतपूर्व तुर्की साम्राज्यात प्रभावशाली आहेत. शिवाय हिंदुस्थान व पाकिस्तान या उपखंडात ते आहेतच. हनबाल पंथीय मुस्लिम प्रामुख्याने मध्य आशिया आणि हिंदुस्थानातील काही ठिकाणी आहेत.

एखाद्या व्यक्तीचा ' मजहब ' सुरुवातीला बहुधा योगायोगाने ठरत असावा; परंतु पुढे त्या व्यक्तीच्या वंशांतील लोक आपण त्याच ' मजहब ' चे आहोत असे मानीत ते केवळ स्वाभाविक परंपरेने. निदान गेली पाच शतके तरी चारही मजहब हे परंपरावादी धर्मश्रद्धांच्या बाबतीत सारखेच आहेत ही गोष्ट ' इज्मा ' मानीत आला आहे. असे असले, तरी एक ' आचारपंथ ' सोडून दुसऱ्या आचारपंथाचा स्वीकार क्वचितच कोणी करते. विवाह करणे सोयीचे व्हावे यासाठी तसे कधी कधी केले जाते. विवाह हा इस्लाममध्ये एक गंभीर स्वरूपाचा आचार मानलेला आहे. तुलनेने अगदी प्रारंभिक कालातदेखील व्यावहारिक फायद्यांकरिता आपला ' मजहब ' एकदा किंवा वारंवार बदलणाऱ्या व्यक्तिविषयी नाराजी व्यक्त केली जात असे. एक आचारपंथ सोडून दुसरा पंथ जबरदस्तीने स्वीकारावयास लावण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणांत कधी कधी घडलेले आहेत. याची कारणे बहुधा राजकीय असत. उदाहरणार्थ, सोळाव्या शतकात इराक व हिझाझमधील सत्ता हस्तगत केल्यानंतर ऑटोमन तुर्कांनी शियापंथीय काझींना हनफी आचारपंथ ( तुर्क या पंथाचे होते ) स्वीकारण्यास अथवा आपले काझीपद सोडण्यास जबरदस्तीने भाग पाडले होते. असेच आणखी एक उदाहरण आहे. इराणमध्ये सफावी हा शियापंथीय वंश सत्तेवर आला तेव्हा त्याने सर्व इराणातील ' पुराणमतवादी ' अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकले होते.

इस्लाममधील चार आचार पंथांतील वादविवादांतून अनेकदा रक्तपात झाला असाही एक काळ इस्लामी इतिहासात होऊन गेलेला आहे. विशेषतः हिजरीच्या पाचव्या व सहाव्या शतकात बगदादच्या रस्त्यारस्त्यात शाफी व हनबाल पंथीय यांच्यात भयानक लढाया झालेल्या आहेत. तसेच इस्फाहानमध्ये हनफींनी कत्तली केलेल्या आहे. या लढाया संपल्या तेव्हा या आचार पंथांचे न्यायपंडित शाब्दिक लढाया लढू लागले. कायदाविषयक तार्किक मुद्यांचा वापर या लढायात शस्त्रासारखा केला जाऊ लागला. त्या अगोदरच्या काळात ' इक्तिलाफ ' किंवा ' मतभेदा 'च्या सिद्धान्ताला महत्त्व प्राप्त होऊन त्याला एखाद्या तत्त्वज्ञानशास्त्रांतील शाखेचे स्वरूप प्राप्त झाले होते. इक्तिलाफमध्ये विभिन्न ' संप्रदायां 'च्या 'फिकाह'च्या निर्णयांची अगदी बारीकसारीक फरक लक्षात घेऊन छाननी केली जात असे. इस्लामच्या दृष्टीने सुद्धा हे मतभेद फारसे महत्त्वाचे नसावेत असे दिसते. कारण जसजसा काळ लोटला तसतसा मुस्लिमांच्या मानसिक दृष्टिकोनात फरक पडला आणि आता अशा मतभेदांच्याबाबतीत ते सहिष्णू बनलेले आहेत. पूर्वीच्या काळात याच मतभेदांसाठी त्यांनी रक्तपात केला असावा.

इस्लामच्या चार 'आचार पंथां'तील मतभेदांच्या काही बाबींची उदाहरणे गुलामीची पद्धती व विवाह यासंबंधीच्या भागात अगोदरच्या प्रकरणात आलीच आहेत. अधिकांश मतभेद अतिशय नैतिक स्वरूपाच्या मुद्यांच्या अर्थासंबंधी असत. उदाहरणार्थ कुराणातील उपोद्‌घाताच्या कवितेमधील 'बिस्मिल्लाह'– 'परमेश्वरासाठी' हा उद्‌गारवाचक शब्द. प्रार्थनाविधी करताना हा शब्द त्याचा संदर्भ लक्षात घेऊन वापरावा की नाही? अशा प्रकारे तो शब्द उच्चारण्यास मालिकींचा विरोध आहे, तर बाकीच्या पंथीयांची त्यास हरकत नाही. काही अवास्तव प्रश्नांसंबंधीही मतभेद आहेत. उदाहरणार्थ, वस्तुतः ज्या प्राण्यांचा अन्नासाठी कधीच उपयोग केला जात नाही अशा प्राण्यांचे मांस खावे की नाही? घोड्याचे मांस खाणे कायदेशीर आहे की नाही, याविषयी विभिन्न पंथांत असलेले मतभेद पूर्वी सांगितलेच आहेत. शाफींना व हनबाल पंथीयांना घोड्याचे मांस निषिद्ध वाटत नाही, तर हनफी व मालिकी ते वर्ज्य समजतात.

परंतु काही वेळा एखाद्या काहीशा व्यावहारिक महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीही मतभेद असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, अरबी भाषा येत नसलेल्या व्यक्तीने स्थानिक भाषेत कुराण वाचावे की नाही? या गोष्टीला नकार देणे याचा अर्थ इस्लाम धर्म स्वीकारलेल्या अनेक बिगर-अरब समाजांना प्रार्थनाविधी करण्यास प्रतिबंध असा होऊ शकतो. कारण प्रार्थनाविधीमध्ये कुराणातील 'फातीहा' हा उपोद्‌घाताचा भाग म्हणण्याला अतिशय महत्त्व असते आणि सर्व मुस्लिम तो भाग आपल्या रोजच्या प्रार्थनेत म्हणत असतात. फक्त अबू हनीफच्या पंथाने कुराणातील या भागासह सर्व प्रार्थना आपल्या मातृभाषेत म्हणावयास बिगर-अरबांना (उदाहरणार्थ इराण्यांना) कायदेशीर परवानगी दिलेली आहे.

उपासविधीच्या संबंधांतले मतभेद हे अशाच प्रकारचे आहेत. नाइलाजाने किंवा आकस्मिकपणे मध्येच उपवास सोडावा लागला तर काय करावे, या प्रश्नाची अबू हनीफने दखल घेतलेली नाही. तथापि मालिक व इब्ने हनबाल यांनी मात्र जेवढे दिवस उपास थांबविला असेल तेवढे दिवस पुन्हा उपवास करून भरून काढले पाहिजेत असे सांगितले आहे.

ज्यू किंवा खिश्चन यांपैकी कोणालाही इस्लामी देशांतील गावांत व शहरांत प्रार्थना मंदिरे बांधता येणार नाहीत याबाबतीत मात्र चारही पंथांचे एकमत आहे. इस्लामी वस्ती असलेल्या गावांपासून दूर अंतरावर या धर्मियांना मंदिरे बांधता येतील की नाही, यासंबंधी मात्र या पंथांत मतभेद आहेत. मालिक, शाफी व इब्ने हनबाल यांची या गोष्टीसही संमती नाही; तर अबू हनीफची त्यास हरकत नाही. इतर अनेक बाबतीत अबू हनीफचा दृष्टिकोण जसा समजूतदारपणाचा व मानवी सहानुभूतीचा[1] आहे तसा

---

१. हे मत चुकीचे आहे असेही म्हटले जाते; परंतु या बाबतीत दिल्या जाणाऱ्या पुराव्यात विशेष जोर नाही.

याही बाबतीत आहे. शहराच्या किंवा खेड्याच्या बाह्य तटबंदीपासून किमान एक मैल अंतर ठेवून चर्चेस किंवा सायनॅगॉग्ज बांधावयास त्याची हरकत नाही. मोडकळीस आलेली चर्चेस व सायनॅगॉग्ज पुन्हा उभारण्याच्या बाबतीत अबु हनीफच्या मताशी मालिक व शाफी हे दोघेही सहमत आहेत. मात्र त्यांनी अशी अट घातलेली आहे, की ही वास्तू ज्या जागेवर उभी असेल ती जागा मुस्लिम शासकाने मोफत दिलेली असली पाहिजे. ती जागा इस्लामकडून बळकावलेली[1] असेल तर त्यावरील वास्तूचा जीर्णोद्धार करणे कायद्याविरुद्ध आहे. या बाबतीत इब्ने हनबालची काय भूमिका होती यासंबंधी विभिन्न मते आहेत. एक मत असे आहे (आणि त्याला बराच पाठिंबा आहे), की अर्धवट मोडकळीस आलेले किंवा पूर्णपणे विध्वंस झालेले कोणतेही मुस्लिमेतर प्रार्थना मंदिर पुन्हा उभारण्यास हनबालची संमती आहे. हनबालच्या भूमिकेसंबंधीच्या दुसऱ्या एका मतानुसार मोडकळीस आलेले मंदिर बांधण्यास हनबालची संमती आहे; पण संपूर्णपणे नष्ट झालेले मंदिर बांधण्यास त्याची परवानगी नाही. दोन्ही अवस्थेतील मंदिरे पुन्हा बांधण्यास हनबालची संमती होती असेही एक मत आहे; पण ते फारसे विश्वसनीय नसावे.

इस्लामवर श्रद्धा नसलेल्या लोकांसंबंधींच्या मतभेदांचे दर्शन हनफी आचारपंथांतील दोन पंडितांच्या विभिन्न भूमिकांत घडते. कान्झ अल्-डाकाइक या ग्रंथाचा लेखक नसफी याच्या मताप्रमाणे एखादे अन्न किंवा पेय खाणे अथवा पिणे मुस्लिमांच्या दृष्टीने कायदेशीर आहे की नाही याबाबत अश्रद्ध (मुस्लिमेतर) माणसाचे मत ग्राह्य धरावयास हरकत नसावी. वरील पुस्तकाच्या टीकाकाराच्या मते लेखकाने हे विधान चुकून केले असावे. कारण धार्मिक सिद्धान्त इतके गुंतागुंतीचे असतात, की त्याबाबत कोणाही मुस्लिमेतर व्यक्तीला अधिकारपूर्वक निर्णय देता येणे शक्य नाही.

'इज्मा'ची मान्यता असलेल्या इमामांनी घालून दिलेल्या प्रथा व त्यांची शिकवण यांच्या आधाराने विभिन्न 'मजहब' आपले कायदे-कानू करतात तोवर त्यांच्यात संघर्ष निर्माण होत नाही. मात्र अगदी इस्लामच्या जन्मापासून सर्व मुस्लिमांतील मतैक्याचे मूलभूत आधार बहुतांशाने अपरिवर्तित राहिले आहेत. परमेश्वर एक आहे आणि कुराणाचे प्रामाण्य शाश्वत आहे, यांसारख्या प्रश्नांच्याबाबतीत कोणताही वाद कधीही नव्हता. पैगंबरांचा खरा वारस कोण, यासारख्या राजकीय स्वरूपाच्या गंभीर प्रश्नांसंबंधीं शियापंथीयांचा आपल्या 'सनातनी' धर्मबांधवांशी वाद आहे. परंतु सुन्नीपंथांतील चारही 'संप्रदायां'चे त्या बाबतींत एकमत आहे. त्यांच्यातील मतभेदाचे मुद्दे क्वचितच व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे दिसते. एकंदर बरेचसे मुस्लिम न्यायशास्त्र (फिकाह) वास्तवतेपासून दूर आहे. इस्लामी कायद्याची सर्व पुस्तके मुस्लिम माणसाचे व्यक्तिगत आचरण

---

१. अशा प्रकारच्या घटना स्पेनमध्ये तुर्की साम्राज्यातील प्रदेशात घडल्या असाव्यात.

अनुशासित करण्यासाठी जशी लिहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे राज्यसंस्थेचा कारभार आणि व्यवहार यांचे नियमन करणे हाही त्यांचा उद्देश आहे. तथापि असे दिसून येते, की सत्ताधारी मुस्लिम राजांनीं आणि लष्करी विजेत्यांनी धर्मसत्तेच्या आदेशांप्रमाणे नव्हे; तर परिस्थितीच्या गरजेप्रमाणे जरूर त्या पद्धतीचा उपयोग करून कारभार केला. परिणामान्ती इस्लामी न्यायशास्त्रातील धार्मिक विधी व व्यक्तिगत आचरण यांविषयींचे कायदे तसेच ' अवक्फ ' म्हणजे धार्मिक प्रतिष्ठानाविषयींचे कायदे तेवढे प्रत्यक्ष व्यवहारात बाजवीपणे लागू झाले. शरियतचा भक्तिभावपूर्वक अभ्यास करणाऱ्यांना असे वाटते, की शरियत हा एक आदर्श आहे आणि त्या आदर्शाची प्रत्यक्ष अमलबजावणी महदीच्या ( पुनरुत्थानाचे अखेरचे प्रतीक ) उदयानंतर करावयाची असते.

' फिकाह ' मधील तरतुदींचे धार्मिक व नैतिक अधिष्ठान व त्या नियमांचे एकंदर स्वरूप कसे आहे, याची कल्पना धार्मिक विधींच्या वेळची शुचिता, प्रार्थना, जकात आणि यात्रा यासंबंधीच्या काही कायद्यांवरून येते. तसेच रोमन कायद्यासारख्या साध्या सरळ नागरी संहितेपेक्षा ' फिकाह ' मधील तरतुदींची रचना कशी भिन्न आहे हेही त्यावरून लक्षात येते. रोमन कायद्यांतील तरतुदी एक तर आज्ञात्मक किंवा निषेधात्मक आहेत आणि त्यांचे उल्लंघन झाले तर काय सजा होईल, हेही त्यांत सांगितले आहे. याउलट मुस्लिम कायद्याने विशिष्ट परिस्थितीत व्यक्तीने काय करावे हे बहुदा त्या त्या व्यक्तीवर सोपविलेले आहे. आवश्यक, निषिद्ध, शिफारसवजा, परवानगी असलेले व परवानगी नसलेले अशा पाच गटांत मुस्लिम कायद्यांची विभागणी केलेली आहे. यांपैकी शेवटच्या गटांतील कायद्यांना धर्मसत्तेची मान्यता आहे की नाही, यासंबंधी काहीही सांगितलेले नाही. कायद्यांची अशा प्रकारे पाच गटांत विभागणी केली आहे यावरूनच यांपैकी फक्त दोन प्रकारच्या कायद्यांच्या उल्लंघनासाठी निश्चित शिक्षा अभिप्रेत आहे. आणि ती शिक्षादेखील प्रायश्चित्तवजा आहे. मुस्लिम विधिसंहिता ही धार्मिक संहितेच्या स्वरूपाची आहे याचे हे निदर्शक आहे. मुस्लिम कायद्यासंबंधींच्या पुस्तकांची मांडणी ज्या पद्धतीने केलेली आहे तीदेखील याच वस्तुस्थितीची निदर्शक आहे. ' फिकाह ' मधील नागरी व फौजदारी कायदे एवढेच नव्हे, तर लष्करी आज्ञा यांना धार्मिक विधी आणि धार्मिक उत्सव यासंबंधीच्या नियमांच्या अगदी बरोबरीचे स्थान मुस्लिम कायदाविषयक पुस्तकांत देण्यात आले आहे.

मुस्लिम कायदेकानू प्रत्यक्ष परिस्थितीशी सुसंवादी करण्याच्या अनिवार्य गरजेमुळे आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणित कायद्यांशी मिळतेजुळते करावेत या उद्देशाने आधुनिक इस्लामी राष्ट्रांनी शरियतच्या कायद्यातील उणीवा दूर केल्या आहेत. नवा बदल बहुतांशी इहलोकवादी स्वरूपाचा आहे. उदाहरणार्थ, १९४९ मध्ये इजिप्तने तयार केलेल्या सिव्हिल कोडमध्ये कायद्याचा मूलस्रोत म्हणून सरकारने केलेल्या कायद्यांना प्रथम स्थान दिले आहे आणि त्यानंतर रूढिगत कायदा ( उर्फ ) आणि शरियत यांना स्थान दिले

आहे. अशाच प्रकारचे कायदे १९४९ मध्ये सीरियात व १९५३ मध्ये इराकमध्ये लागू करण्यात आले.

## परिशिष्ट

'फिकाह' संबंधीच्या काही ग्रंथांतील माहिती सारांशरूपाने अधिक अभ्यासासाठी या परिशिष्टात देत आहे. त्यातून निव्वळ धार्मिक विधी व उत्सव आणि धार्मिक कर्तव्ये यासंबंधीच्या नियमांची माहिती वगळली आहे. यासाठी पुढील तीन 'फिकाह'-विषयक पुस्तके निवडली आहेत. ( १ ) मज्मु अल् फिकाह लेखक ( १ ) झैद इब्ने अली, ( २ ) तनबीह, लेखक शिराजी, ( ३ ) जामी अल सार्धीर, लेखक-मुहम्मद इब्ने हसन अल शेबानी. या तिन्ही पुस्तकांतील सामग्रीचा उपयोग याच पुस्तकांतील धार्मिक विधीसंबंधीच्या भागातही केला आहे.

या तीन ग्रंथांची कथनपद्धती भिन्नभिन्न स्वरूपाची आहे. 'मज्मु' या ग्रंथात प्रश्नोत्तर पद्धतीचा अवलंब केला आहे तर 'तनबीह' ग्रंथ कायद्याच्या विभिन्न प्रश्नांच्या अनुषंगाने परिच्छेद पाडून लिहिलेला एक प्रबंध आहे. 'जामी अल साघीर' म्हणजे प्रश्नांच्या उत्तरांची एक मालिका असलेला ग्रंथ आहे. मात्र प्रत्यक्षात हे प्रश्न नमूद केलेले नाहीत. हे प्रश्न बहुतांशाने नैतिक स्वरूपाचे आहेत.

फिकाहविषयक या तीन ग्रंथांपैकी फक्त शिराजीचे 'तनबीह' वगळता बाकीची दोन पुस्तके कायदाविषयक प्रश्नांचे निर्णय घेण्यासाठी सांप्रत क्वचितच उपयोगात आणली जातात. त्यामुळे या पुस्तकांचे महत्त्व फक्त इतिहास समजून घेण्यापुरतेच सध्या मर्यादित आहे. त्या त्या काळातील कायद्याच्या जुन्या पुस्तकांच्याबाबतीत अशी एक अवस्था केव्हा ना केव्हा तरी येते, की त्या वेळी त्या पुस्तकांतील गोष्टींचे स्पष्टीकरण व भाष्य नव्याने करावे लागते. त्याचा परिणाम असा होतो की नव्या अधिकारी व्यक्तींनी नव्याने केलेली मूळ ग्रंथांवरील भाष्येच मूळ ग्रंथांची जागा घेतात.

या बाबतीत असे दिसून येते, की वेगवेगळ्या आचारपंथांचे अनुयायी आपापली कायदाविषयक पुस्तकेच आधारासाठी उपयोगात आणतात आणि बाकीच्या पंथांच्या पुस्तकांचा क्वचित्च उपयोग करतात. कारण अनेक कायद्यांचे अर्थ अनेक प्रकारांनी लावता येतात आणि प्रत्येक पंथ त्यापैकी एकच अर्थ आग्रहपूर्वक मानीत असतो. आणि त्या त्या पंथाचे विद्वान आपली कायद्यांची संहिता बनविता आपल्या पंथाच्या अनुयायांनी कोणता अर्थ मानावा हे ठरवून देतात.

'मज्मु' या ग्रंथात धर्मादाय करांविषयींच्या प्रकरणापूर्वी "मृताबाबतची (कर्तव्ये)" असा एक भाग आहे. त्यांतील मुख्य विषय पुढीलप्रमाणे आहेत:

शव धुणे, ते पुरण्यासाठी नेणे, मृतांसाठी प्रार्थना, कबरीत शव कसे ठेवावे, दफन, सुतक, शव सुरक्षित राखण्याची व्यवस्था इत्यादी प्रसंगी कसे वागावे, पोटात 'मुस्लिम'

मुलाचा गर्भ असताना मृत पावलेली ज्यू स्त्री, कोणत्याही मुलाचा पोटात गर्भ असताना मेलेली स्त्री, प्रार्थनेसंबंधींचे भिन्नभिन्न प्रश्न.

'तनबीह' ग्रंथाचा प्रारंभ "मृत व्यक्तीसंबंधी काय करावे?" या विषयाने होतो. त्यापुढील विषय 'मज्मु'प्रमाणेच आहेत. परंतु फक्त नैतिक स्वरूपाच्या प्रश्नांची चर्चा त्यांतील अखेरच्या भागात नाही. 'जामी-अल-साघीर'मध्ये यासंबंधीचे प्रकरणच नाही.

फक्त नागरी व फौजदारी कायद्यांविषयीची चर्चा असलेल्या भागाचा प्रारंभ तिन्ही पुस्तकांत 'विक्री' संबंधींच्या प्रकरणाने होतो.

## 'मज्मु'

या संबंधींचे या पुस्तकातील प्रमुख विषय : कायदेशीरपणे केलेल्या प्राप्तीचे फायदे, धंद्यासंबंधीचा व्यवहार करण्यापूर्वी 'फिक़ाह'मधील नियमांचा विचार करण्याविषयी; आपल्या जमातींतील लोकांच्या वतीने (परस्पर) सौदा करणाऱ्या जमात प्रमुखाला मिळणारी सजा, जबर व्याज घेण्याचे (पाप), माप करून किंवा वजन करून वस्तूंचा विनिमय करणे, नफेबाजी, ज्या वस्तू विकण्यास बंदी आहे अशा वस्तू विकणे, विक्री करताना फसवणूक करणे, (मालातील) दोष, फळे पिकण्यापूर्वी त्यांची विक्री करणे, आपल्या प्रत्यक्ष ताब्यात नसलेली गोष्ट विकणे– उदाहरणार्थ, अद्याप जन्माला न आलेला गुलाम किंवा जनावर, अद्याप न पकडलेला मासा– इत्यादी खाद्यपदार्थांची विक्री, रक्ताचे नाते असलेल्या गुलामांची विक्री करून त्यांचेपासून फारकत मिळवणे हा गुन्हा आहे, विकत घेतलेल्या गुलाम स्त्रीबरोबर किती दिवसपर्यंत सहवास करू नये, मालकाच्या मृत्यूनंतर स्वतंत्र होणाऱ्या गुलामांची विक्री, मालकापासून मुले झालेल्या गुलाम स्त्रीचा विक्रय, व्यापार करण्यास परवानगी असलेला गुलाम, प्रत्यक्षात नंतर देण्यात यावयाच्या मालाची विक्री, सर्वांच्या अगोदर एखादी वस्तू विकत घेण्याचा अधिकार, नफ्याचे वाटप, भागीदारी, वेतन, तारण, कर्ज व कर्जरोखे, देणग्या व धर्मादाय अनुदान, बेकायदा घेतलेला ताबा आणि त्याचे परिणाम, तबदीली, जामीन, हमी इत्यादी.

## 'तनबीह'

विक्री या विषयासंबंधी या पुस्तकात पुढील बाबींचा समावेश आहे : एखाद्या वस्तूची विक्री पूर्ण झाली आहे असे कधी म्हणता येईल, कशाची विक्री करावी किंवा करू नये, नफा (कोणत्या मालावर तो घेता येईल), (दुसऱ्यास विकलेल्या जमिनी-तील) कंदमुळे व फळे विकणे, दुभत्या जनावरांची विक्री व त्यात दोष निघाल्यास ती परत करण्याचा प्रश्न, परस्परांच्या फायद्यासाठी विक्री, विक्रेता व गिऱ्हाईक यांच्यामधील तंटा, प्रत्यक्षात पुढे द्यावयाच्या मालाची विक्री; कर्जे, तारण, दिवाळे, (अल्पवयीन मुलाच्या मालमत्तेचे) व्यवस्थापकपद इत्यादी. यापुढील विषय 'मज्मु'प्रमाणेच आहेत याशिवाय त्यात पुढील विषय आहेत : सामने [युद्धशस्त्रे घेऊन केलेला दोन माणसा-

तील सामना, प्राण्यांच्या शर्यती इत्यादी ]. ' मृत ' ( पडीक ) जमीनी लागवडीस आणणे इत्यादी; सापडलेली संपत्ती, टाकून दिलेली बेवारशी मुले,[१] धार्मिक प्रतिष्ठाने, देणग्या, मृत्युपत्रे, गुलामांची मुक्तता. ' जामी अल्-साघीर 'मध्ये वरील विषयांची वेगळ्या अनुक्रमाने वेगवेगळ्या भागात चर्चा केलेली आहे. त्यानुसार हे विषय पुढीलप्रमाणे आहेत : पुढे देण्यात यावयाच्या मालाची विक्री, कशाची विक्री करता येईल आणि कशाची करता येणार नाही, मापाने व वजनाने विकावयाच्या वस्तू, किंमतीबाबत विक्रेता व ग्राहक यांच्यामधील वाद, ( सौद्याच्या वेळी ) घातलेली पर्यायी शर्त, ( मालातील ) दोष, घर विकत घेण्याशी संबंधित हक्क, गुलामाला व्यापाराची परवानगी देऊन नंतर त्याची मालकाने विक्री करणे अथवा त्याला स्वतंत्र करणे, मालमत्तेबाबत हमी, दोघांच्या समाईक मालकीची मालमत्ता दोघांपैकी एकाने विकणे, तारण.

## साक्षीपुरावा

' मज्मु ' या ग्रंथात, पुरावा व न्यायालयीन निर्णय हे विषय हाताळले आहेत.

' तनबीह 'मध्ये हे विषय दोन भागांत दिले आहेत आणि ते पुस्तकाच्या शेवटी आहेत. पहिल्या भागात न्यायालयीन निकाल, न्यायाधीशाचे अधिकारपद व न्यायदानाची पद्धती; मालमत्तेची वाटणी व दावे आणि पुरावा हे विषय आहेत. साक्षीपुराव्याबाबतच्या विभागात साक्षीदाराची पात्रता, पुरावा ग्राह्य धरण्याबाबत, परस्परविरोधी पुरावा व कबुलीजबाब.

' जामी अल् साघीर 'मध्ये दावे, शपथेवर निर्णय देणे, पुराव्याच्या आधाराने दिलेला निर्णय, वारसा हक्क प्रकरणाबाबतचे निकाल वगैरे विषयांची चर्चा असलेले विभाग आहेत. तसेच एजन्सीसंबंधी एक वेगळा विभाग या ग्रंथात आहे. शिवाय ठेवी, कर्जे, देणग्या, भाड्याने देणे वगैरेसंबंधीही विभाग आहेत.

## विवाह

' मज्मु 'मध्ये या प्रश्नाच्या संबंधांत पुढील विषय आहेत : विवाहविधीचे पावित्र्य, ' महर ', ' वली ' व विवाहाच्या वेळचे साक्षीदार, ज्यांना विवाहाची परवानगी आहे अशा गुलामांचा विवाह, ज्यांचा विवाह व्हावयाचा आहे त्यांच्या दर्जातील समानता, अश्रद्ध व्यक्तीचा विवाह, अनेक बायका असलेल्या पुरुषाच्या बायकांना निःपक्ष वागणूक मिळण्याबाबत, बायकांना निर्वाहभत्ता देणे, बायकोत शारीरीक अपूर्णता आढळल्यास, लालनपालन करून नाते जोडणे इत्यादी.

---

१. ही मुले '–स्वतंत्र ' समजली जातात.

'तनबीह 'मधील विषय : कोणत्या व्यक्तींना एकमेकांशी विवाह करता येईल किंवा करता येणार नाही, कोणते विवाह निषिद्ध आहेत, विवाह स्वातंत्र्य आणि शारीरिक दोषांमुळे (बायकोला) परत पाठविणे, 'मुटा' विवाह, विवाहानिमित्त मेजवानी, सर्व बायकांशी निःपक्षपातीपणे वागणे.

'जामी अल्-साबीर 'मधील विषय : कुमारिकांचा व अल्पवयीन मुलींचा विवाह, विवाहेच्छू स्त्री-पुरुषांतील समान दर्जा, नियमबाह्य विवाह, 'महर', स्त्री किंवा पुरुष गुलामांचा विवाह.

## घटस्फोट

'मज्मु 'मधील विषय : नियमानुसार झालेला घटस्फोट, घटस्फोटित स्त्रीने पुन्हा विवाह करण्याआधी किती दिवस थांबले पाहिजे, रद्द न होऊ शकणारा घटस्फोट, वैवाहिक जीवनातील संभोगापासून नवऱ्याने दूर राहणे, व्यभिचाराच्या कारणावरून बायको टाकणे इत्यादी.

'तनबीह 'मधील विषय : नवरा-बायकोपैकी कोणीही दुसऱ्याला सोडणे, घटस्फोट, घटस्फोटासंबंधीच्या निर्णयाची घोषणा किती वेळा उच्चारावी, सशर्त घटस्फोट, संशयास्पद घटस्फोट, घटस्फोटित स्त्रीने परत पूर्वीच्या पतीकडे जाणे, वैवाहिक जीवनातील शरीरसंभोगापासून अलिप्त राहणे, 'झिहार' नावाने ओळखला जाणारा घटस्फोट घेण्याची पद्धत, व्यभिचाराच्या कारणासाठी पत्नीला टाकणे, अनौरस अपत्याचे जनकत्व कबूल करणे.

'जामी-अल् साबीर 'मधील विषय : नियमानुसार घटस्फोट, घटस्फोट घेताना करावयाची घोषणा कितीदा करावी, घटस्फोटासंबंधीची शपथ, घटस्फोटाच्या घोषणेऐवजी रूपक उच्चारणे, नवरा-बायकोपैकी एकाने दुसऱ्याला टाकणे, वैवाहिक जीवनातील शरीरसंभोगापासून अलिप्त राहणे, घटस्फोटित स्त्रीने दुसरे लग्न करण्यापूर्वी किती दिवस थांबले पाहिजे, जनकत्व व मुलाचा जन्म सिद्ध करणे, (घटस्फोटानंतर) नवरा-बायकोपैकी कोणाचा मुलावर अधिक हक्क असतो, घरातील सामानसुमानासंबंधीचा तंटा इत्यादी

## (हुदुद) दंडपात्र अपराधांविषयी[१]

[ त्यासाठी प्राणदंड, अवयव तोडणे आदी सजा आहेत. ]

'मज्मु 'मधील विषय : व्यभिचार, व्यभिचाराचा खोटा आरोप, पुरुषाशी संभोग मद्यपान, चोरी, चेटुक, इस्लामविरोधी मत, एकाच्या प्राणाच्या बदल्यात दुसऱ्याचा प्राण घेणे या विषयांवरील चर्चा एका विभागात स्वतंत्रपणे केलेली आहे.

---

१. या प्रश्नाविषयीच्या सर्वसाधारण माहितीसाठी 'शासन' हे प्रकरण पाहा.

'तनबीह'मधील विषय : गुन्ह्याला प्रत्युत्तर म्हणून कोणाला शिक्षा करावी अथवा करू नये, प्रत्युत्तर दिले पाहिजे असे गुन्हे, प्रत्युत्तराची सूट, कोणाच्या बाबतीत प्राणाचा बदला घेऊ नये, कोणत्या बाबतीत प्राणाचा बदला घ्यावा, प्राणाचा बदला घेणे, ज्यांनी प्राणाचा बदला दिला पाहिजे असे गुलामाचे नातेवाईक कोणते, हत्येबद्दलचे प्रायश्चित्त, बंडखोरांशी युद्ध, धर्मद्रोह्यांना ठार मारणे, अश्रद्धांचा मुकाबला, लुटीचे वाटप, संरक्षणाचा करार, डोईकर बसविणे, शांततेचा तहनामा, 'सवाद' (मेसोपोटेमियामधील जमीन) वरील महसूल वसूल करणे, व्यभिचाराबद्दल सजा, चोरी, वाटमारी व मद्यपान याबद्दलची शिक्षा. लहानसहान गुन्ह्यांचे निराकरण [ याच विभागाला जोडून सुलतानपदाला आवश्यक असलेली पात्रता या विषयावरील भाग आहे. ]

'जामी अल साघीर'मधील विषय : चोरी, हात तोडण्याची सजा कोणत्या गुन्ह्यासाठी अनिवार्य आहे आणि नाही, [ नशा आणणारी ] द्रव्ये, दंडपात्र अपराध, प्रत्युत्तरात्मक कारवाईची आवश्यकता कधी असते किंवा प्राणाचा बदला घेण्याने ती केव्हा पुरी होते, ठार मारण्याच्या अपराधाविषयीचा पुरावा, ठार मारण्याच्या घटनेच्या वेळची परिस्थिती, प्राणघातक नाही अशी जखम करणे, गुलामाकडून घडलेले अपराध, गुलामाचा बेकायदा ताबा घेणे, [ दहशत बसेल अशा रीतीने ] शस्त्र दाखविणे, भिंतीची किंवा इमारतीच्या अन्य भागाची नासधूस इत्यादी.

## मोहिमा ( मुस्लिमेतर देशांवर )

'मज्मु'मध्ये यासंबंधी पुढील विषय आहेत : नास्तिकांविरुद्ध मोहिमा व हल्ले, इस्लामच्या प्रसारासाठी 'जिहाद' (प्रयत्न) करण्याचे महत्त्व, हौतात्म्याचे महत्त्व, लुटीचे वाटप, तहनामे व संरक्षण देणे, निशाणे व ध्वज, लुटीची वाटणी करण्यापूर्वी टोळी-प्रमुखाच्या मताचे महत्त्व, धर्मद्रोही, समाईक कोठारांतील अफरातफर, बंडखोरांशी सामना इत्यादी.

'तनबीह' मध्ये या आधी सांगितलेल्या बहुतांश विषयांचा 'दंडपात्र गुन्हा' या भागात समावेश केलेला आहे.

'जामी अल-साघीर' मध्ये याबाबत पुढील विषय आहेत : धर्मद्रोह आणि धर्मद्रोही व्यक्तीच्या नागरी कृत्यांचा कायदेशीरपणा, जिंकलेल्या ग्रीक नगरांवर बसवावयाची खंडणी, मुस्लिम गुलाम आणि शत्रूंनी जप्त केलेली त्यांची मालमत्ता इत्यादी.

## वारसा

प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणात या विषयासंबंधी विस्तृतपणे चर्चा केलीच आहे. फक्त त्यात 'मज्मु-अल् फिकाह' या पुस्तकांतील वारसासंबंधींच्या कायदेशीर भागाची भर घातलेली आहे. तथापि शिराजीच्या 'तनबीह' मध्ये तत्संबंधींची आणखी प्रकरणे आहेत. त्यांचा विचार करणे जरूर आहे. पहिले प्रकरण 'शपथ' या विषयासंबंधी

आहे. त्या प्रकरणात पुढील मुद्दे आहेत: कोणाची शपथ कायदेशीर मानली जाते किंवा जात नाही, उडवाउडवी करणे, खोट्या शपथेसाठी प्रायश्चित घेणे, घटस्फोटित स्त्रीने पुन्हा विवाह करण्यापूर्वी किती दिवस थांबले पाहिजे इत्यादी आणि घटस्फोटासंबंधींचे नेहमीचे मुद्दे. दुसऱ्या प्रकरणामध्ये घरप्रपंचाकरता कुटुंबप्रमुखाने कोणता खर्च केलाच पाहिजे त्याची चर्चा केलेली आहे. त्यामध्ये पुढील मुद्दे आहेत : बायकांचा उदरनिर्वाह, जवळच्या नातलगांचे, गुलामांचे, पाळलेल्या जनावरांचे व मुलांचे पालनपोषण.

'जामी अल सावीर' या ग्रंथांतदेखील 'शपथे'संबंधी एक प्रकरण आहे. शिवाय गुलामाला स्वतंत्र करण्याच्या विभिन्न पद्धती व 'आश्रितां'चा प्रश्न याविषयी दोन प्रकरणे आहेत.

□ □

प्रकरण ५

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प/120/2
मंत्रालय.

# इस्लाममधील नैतिक विचार

इस्लाममध्ये नैतिक आचरणाच्या कल्पना कायद्याशी अतिशय घनिष्टपणे निगडित आहेत. व्यक्तिगत आचरणाचे नियम, धार्मिक संस्कारांसंबंधीचे नियम आणि ज्या नियमांचा नागरी व गुन्हेगारी कायद्यांशी संबंध आहे असे मानले जाते, असे नियम- या सर्वांमध्ये, इस्लामच्या कोणत्याही अधिकृत विवेचनात ( उदाहरणार्थ 'फिकाह 'विषयक पुस्तकात ) विशेष फरक आढळत नाही. म्हणूनच अल्लाहचा कृपाप्रसाद आणि स्वर्गाचे बक्षीस प्राप्त करण्यासाठी सच्चा धर्मश्रद्ध व्यक्तीने ज्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे त्या मार्गाचे दिग्दर्शन करणाऱ्या व्यावहारिक आचरणाविषयीच्या संहितेचे, मुहम्मदांची नैतिक शिकवण हे एक अभिन्न अंग आहे असे मानले जाते. 'फिकाह 'मधील कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करणे म्हणजे अल्लाहचा कोप व नरकाची शिक्षा ओढवून घेणे होय,[1] असे इस्लामी न्यायपंडितांचे मत आहे. हे मत सर्व 'फिकाह' तसेच इस्लामी न्यायशास्त्राचे 'मूलाधार' यावर अधिष्ठित आहे.

आपली शिकवण मानणाऱ्यांनी आपण पुरस्कारिलेल्या काही श्रद्धा व आचार यांच्याशी एकनिष्ठ राहिलेच पाहिजे, अशी स्वतः पैगंबरांची अपेक्षा होती. जिथे इस्लाम जन्मला तेथील विशिष्ठ सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत कुराण सांगितले गेले. त्यामुळे त्या परिस्थितीला धरून कुराणात स्पष्टपणे अशी भूमिका घेतली गेली, की मूळ महत्त्व धर्मावरील श्रद्धेला आहे, व्यक्तीचे आचरण दुय्यम आहे. "अल्लाह हाच एकमेव परमेश्वर

---

१. कैरो शहराच्या बाहेरील कपाशीच्या शेतांजवळ १९४२ मध्ये पुढील सरकारी सूचना आढळली : ( वजन करण्यापूर्वी ) कापूस ओला करू नका. कारण ती लबाडी आहे. तसे केलेत तर या जन्मी तर तुमचे नुकसान होईलच; पण पुढील जन्मातही सजा भोगाल.

आहे आणि मुहम्मद हा त्याचा प्रेषित[1] आहे." या सिद्धान्तातील सत्याचे 'मनःपूर्वक समर्थन' म्हणजे इस्लामवरील श्रद्धा असे अबू अल हसन अल अशारी याचे मत होते. इस्लाममध्ये सर्वात व्यापक समर्थन प्राप्त असलेले हे धर्मविषयक 'सनातनी' मत आहे. धर्मविषयक मतांना स्पष्ट व मूर्तस्वरूप देण्यास प्रारंभ झाला त्या काळात हे मत मांडले गेले.

धार्मिक घोषणा उच्चारणे आणि (दानधर्म, प्रार्थना, उपवास व यात्रा ही) धर्माची 'आधारस्तंभ' (आरकान) असलेली व धार्मिक कायद्याने ठरवून दिलेली कर्तव्ये पार पाडणे या दोन, 'हृदयातील' धर्मविषयक श्रद्धांच्या शाखा (लहानशा फांद्या) आहेत. म्हणून ही 'शाखा'रूपी धार्मिक कर्तव्ये एखादी व्यक्ती पार पाडीत नसली, तर ती व्यक्ती सच्ची धर्मश्रद्ध व्यक्ती नाही असे होत नाही. अल्लाहचे 'एकत्व' व प्रेषिताची शिकवण जो नाकारतो, त्यालाच फक्त अश्रद्ध म्हणता येईल.

इतर धर्मग्रंथांप्रमाणेच खुद्द कुराणातही नैतिक मूल्यांसंबंधी एक अमूर्त असा दृष्टिकोणच मांडलेला आहे आणि न्याय्य व अन्याय्य यांतील फरक ठरविणारे कोणतेही सर्वस्पर्शी व सैद्धान्तिक असे निकष सांगितलेले नाहीत. मुहम्मदांनी असे निकष ठरवून दिले असते, तरी ज्या परिस्थितीत 'प्रकटीकरणे' सांगितली गेली त्या परिस्थितीशी ते निकष विसंगतच ठरण्याचा संभव होता. अल्लाह हाच एकमेव परमेश्वर आहे आणि त्याच्यापाशी सर्व प्रकारची श्रेष्ठ दैवी शक्ती आहे, याविषयी धर्मश्रद्ध माणसाची खात्री असेल, तर मग आचाराविषयींचे कोणतेही नियम त्याला पाळावयास लावणे कठिण नाही.

हेतुपुरस्सर किंवा निर्हेतुकपणे म्हणा, सर्वसाधारणपणे आपल्या अनुयायांच्या रूढ जीवनपद्धतीत मुहम्मदांनी फारसा बदल घडवून आणण्याची अपेक्षा बाळगली नव्हती. विशेषतः लैंगिक संबंध आणि इतर बाबतींत त्यांनी काही महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या असल्या, तरी आपल्या स्वतःच्या जमातीच्या सर्वमान्य नैतिक कल्पनाच त्यांनी बिनतक्रार स्वीकारल्या. मुरुव्वा (शब्दशः अर्थ 'गुण') या संज्ञेत या नैतिक कल्पनांच्या अर्थाचा समावेश झालेला दिसतो. 'दिलदारपणा, शौर्य' या शब्दांशी 'मुरुव्वा' या शब्दाचे बऱ्याच बाबतींत साम्य आहे. एका हदिसानुसार जाहिलिया (कुराणाचा साक्षात्कार होण्यापूर्वीचा काळ) तील पैगंबरांचा एक स्नेही साहिब यास पैगंबर एकदा म्हणाले, "जाहिलियामधील तुमच्या नैतिक प्रथा पाहा आणि इस्लाममध्ये त्या लागू करा : आपल्या पाहुण्याला संरक्षण द्या, अनाथाच्या बाबतींत उदारतेने वागा आणि

---

१. इब्ने हाज्म याच्या मते हा युक्तिवाद– कुराण हे अरबी भाषेत प्रकट झाले; त्या भाषेत 'इमान' याचा अर्थ 'तसदीक' (सत्य असल्याचे घोषित करणे) असा आहे– या गृहीत कृत्यावर आधारलेला आहे. 'आचरणांना' तसेच 'तवाहिद'ला (परमेश्वर 'एकच' असल्याचे ठामविधान) 'तसदीक' म्हणता येत नाही. कारण 'तवाहिद' हा शब्द 'इमान'चाच पर्यायवाची शब्द आहे.

तुमच्या ( संरक्षणाखाली असलेल्या परकी ) जारशी दयाळूपणाने वागा. " कुराणातदेखील हाच उपदेश एका आयताद्वारे केलेला आहे. त्या आयतामध्ये प्रारंभी अल्लाहची सेवा करण्याची धर्मश्रद्ध माणसाला आज्ञा केली आहे. त्या आयतात पुढे म्हटले आहे, " मातापिता, नातलग, अनाथ मुले, गरीब, नात्यातील किंवा अपरिचित ' जार ', सहाध्यायी, वाटसरू व गुलाम यांच्याशी प्रेमाने वागा. "

कुराणाने ' मुरुव्वा ' मधील फक्त उदारतापूर्ण मूल्यांचाच पाठपुरावा केला असून, सूड घेण्याच्या कल्पनेचा त्याग केला आहे. विशेषतः सूडासाठी रक्त सांडण्याची कल्पना वगळली आहे. खरे तर रक्तपूर्ण बदला घेण्याचा विचार हा एक कर्तव्य म्हणून " मूर्तिपूजक अरबांच्या अंतरात्म्यावर एखाद्या ओझ्यासारखा वावरत असतो. " या बाबतीत मुहम्मदी धर्माने ( ' दीन 'ने ) अतिशय महत्त्वाच्या सुधारणा लागू केल्या. सूडभावनेचा त्याग करण्यात भेकडपणा किंवा लज्जास्पद असे काही नाही; उलट क्षमाशीलतेत खरी उदात्तता आहे आणि जे आपला क्रोध आवरतात व लोकांना क्षमा करतात त्यांना इस्लाममध्ये सत्कर्म करणारे या नात्याने स्वर्गप्राप्ती होते, अशा प्रकारची इस्लामची शिकवण आहे. अगदी प्रारंभीच्या काळातील ' सुरां 'मध्येदेखील इस्लामधर्मीयांचे परस्परांशी कशा प्रकारचे संबंध असावेत याचा पैगंबर विचार करीत होते असे दिसते. इस्लाम धर्मावर श्रद्धा असणे अनिवार्य आहे आणि एखाद्या नास्तिकाने केलेली दया पूर्ण कृत्ये देखील धर्मश्रद्धेच्या बरोबरीची ठरू शकत [१] नाहीत. ईश्वरनिष्ठा किंवा परमेश्वराचे भय यानंतरच न्यायबुद्धी व न्यायपूर्ण व्यवहार [२] या गुणांचे महत्त्व आहे. स्वतः अल्लाह " अल् रहमान अल् रहीम ' ( करुणावंत, दयावंत ) [३] आहे. आणि तोच माणसाला सत् आणि असत् या ' दोन हमरस्त्यां 'कडे घेऊन जातो. अधीच्य एका परिच्छेदात ' सत् 'ची व्याख्या ' चढ ' अशी केली आहे. जे लोक ' उजव्या बाजूला आहेत ' म्हणजे जे प्रामाणिक आहेत तेच हा ' चढ ' चढून जातात, आणि त्याचे फळ म्हणून त्यांना स्वर्गाची प्राप्ती होते. ' सत् ' कृत्यात पुढील कृत्यांचा समावेश केलेला आहे : कैद्याला मुक्त करणे, जवळच्या नात्यातील अनाथ मुलाला किंवा रस्त्यावर धुळीत पडलेल्या गरीबाला अन्न मिळाले नसेल, त्या दिवशी त्याला अन्न देणे. याव्यतिरिक्त धर्मावर श्रद्धा ठेवणे, एकमेकांविषयी सहिष्णू असावे असा उपदेश करणे आणि ' करुणेने

---

१. ९[१९].

२. ५[११].

३. बैदावीने कुराणातील १[१] या आयतावर भाष्य करताना म्हटले आहे की, ' रहमान ' ही संज्ञा जास्त व्यापक अर्थाची आहे. कारण त्यामध्ये अल्लाह हा सर्व मानवांचा, मुस्लिम धर्मीयांचा अथवा नास्तिकांचाही उपकारकर्ता आहे हा अर्थ अंतर्भूत आहे. तर रहीम या संज्ञेचा अर्थ अल्लाहची इस्लाम धर्मीयांवरील कृपादृष्टी एवढ्यापुरताच मर्यादित आहे.

वागा, असे एकमेकांना सांगणे या गोष्टीही 'सत्'कर्मात समाविष्ट केलेल्या[१] आहेत. अन्य एके ठिकाणी[२] अनाथाला जो दूर लोटतो आणि गरीबांना अन्न देण्याच्या कामी जो इतरांना प्रवृत्त करीत नाही 'तो' धर्म न मानणारा माणूस असे म्हटले आहे.

जाहिलियाच्या काळात ज्या कल्पना प्रचलित होत्या त्यांच्या संदर्भात मुहम्मदांच्या कल्पनांचा विचार केला म्हणजे, असे दिसते, की सत् व असत् याबाबतीतील अप्रगत टोळ्यांच्या परिभाषेचा मुहम्मदांनी उपयोग केलेला आहे. सत् श्रद्धा व सदाचार या दोन्ही कल्पना मुहम्मदांना एकाच शब्दात व्यक्त करावयाच्या असतात तेव्हा ते 'अल् मारूफ' (याचा शब्दशः अर्थ 'ज्ञात') या संज्ञेचा आणि 'उर्फ' म्हणजे "प्रचलित व मान्यताप्राप्त" या संज्ञेचा वापर करतात. आणि असत् श्रद्धा व असत् वर्तन यांच्यासाठी 'अल् मन्कर' [ म्हणजे 'मान्यता नसलेले किंवा अधिक शब्दशः अर्थाने अज्ञात किंवा अपरिचित' ] या संज्ञेचा मुहम्मद वापर करतात. जाहिलियाच्या काळातील संस्कृतीच्या दृष्टीने अरब जनातीच्या पातळीवर असलेले इतर अप्रगत समाजही अरबांप्रमाणेच, जे ज्ञात व परिचित आहे त्याला 'सत्' समजत आणि जे अज्ञात व अपरिचित आहे आहे त्याला 'असत्' समजत. कुराणात अनेक ठिकाणी 'मारूफ'चा उपदेश केलेला आहे आणि 'मन्कर'ला मनाई केलेली आहे.[३] काही टीकाकारांच्या, उदाहरणार्थ बैदावी[४] यांच्या, मतानुसार 'मारूफ' ही संज्ञा 'न्याय' या शब्दाला समानार्थी आहे. आणि 'मन्कर' म्हणजे शरियतने ज्या गोष्टी असत् (कावीह) ठरविल्या आहेत त्या गोष्टी. "न्यायप्रिय लोक ज्या ज्या गोष्टी वाईट ठरवितात त्या सर्व बाबी" असाही 'मन्कर' या संज्ञेचा आणखी एक अर्थ सांगितलेला आहे.

प्राचीन समाजाकडून घेतलेल्या नैतिक तत्त्वांचा खास इस्लामच्या नैतिक तत्त्वांशी कुराणामध्ये मेळ घातलेला आहे. त्यानुसार जे धर्मश्रद्ध लोक आपल्या वासनांना आवर घालतील, आपल्या शब्दाची प्रतिष्ठा राखतील आणि प्रार्थनाविधी जे काळजीपूर्वक पार पाडतील त्यांना स्वर्गप्राप्तीचे फळ मिळेल असे आश्वासन दिलेले आहे.[५] मक्केमधील सुरांपैकी एका सुरात पुढील परिच्छेद आहे, तो सुनिश्चित पद्धती नसलेल्या अनौपचारिक संहितेच्या स्वरूपाचा आहे.

"तुझ्या परमेश्वराची अशी आज्ञा आहे की, त्याच्याशिवाय तू दुसऱ्याची सेव

---

१. $९०^{१०-१८}$.

२. $१०७^{१-३}$.

३. उदाहरणार्थ $३१^{१६}$.

४. $२^{१०६}$.

५. उदाहरणार्थ $७०^{२९}$; $७९^{४०}$.

करता कामा नये; आणि माता-पित्यांशी प्रेमाने वागले पाहिजेस[1]...नातेवाईकास, गरीबास व वाटसरूस त्यांच्या वाट्याचे असेल ते दे. उगाच उधळमाधळ करू नकोस. हात मानेशी जखडून ठेवू नकोस किंवा अगदी रुंद फैलावूही नकोस... दारिद्र्याच्या भयाने आपली मुले ठार मारू नकोस. आम्ही त्यांची सोय करू. लक्षात ठेव, मुलांना मारणे हे महान् पाप आहे. व्यभिचार करू नकोस. व्यभिचार ही सदैव निंदनीय वाईट गोष्ट आहे. योग्य[2] कारण नसेल तेव्हा परमेश्वराने निर्मिलेल्या पवित्र माणसाची हत्या करू नकोस. चांगल्या कार्यासाठी त्याची जपणूक कर. अन्यायाने एखाद्या माणसाला ठार मारण्यात आले, तर त्याबाबत काय करावे[3] यासंबंधीचे अधिकार आम्ही त्याच्या 'वलीला'ला[4] दिलेले आहेत. परंतु त्याने ( ठार मारणाऱ्याला ) ठार मारून मर्यादेबाहेर जाऊन काम करू नये. त्याला आम्ही सहाय्य करू. अनाथ मुलाच्या मालमत्तेविषयी, त्याचे त्यात हित नसेल तर आणि तो पूर्ण वयात येईपर्यंत काही करू नको. केलेला करार पाळ. करार खरे-पणाने कर. खरे माप व वजन दे. हाच त्या कराराचा सर्वोत्तम अर्थ आहे. तुझ्याजवळ तत्संबंधी माहिती नसेल, तर दुष्कृत्यांचे आरोप करू नको. कारण त्याविषयी तू काय ऐकलेस, काय पाहिलेस आणि तुझ्या मनात काय आहे, या सर्वांबाबत तुला विचारले जाईल. आत्मवंचना करीत जगात वावरू नकोस. कारण त्यामुळे काही तू पृथ्वी दुभंगू शकणार नाहीस, की पर्वतांच्या शिखरांना स्पर्श करू शकणार नाहीस."[5]

स्त्री-पुरुषांना शालीनतेने वागण्याचा उपदेश केला आहे. ( जाहिलियाच्या काळात स्त्री-पुरुष नखरेलपणाने वागत असत असे म्हणतात. ) तसेच स्त्रियांनी नियमितपणे प्रार्थना करावी, दानधर्म करावा, परमेश्वराचा व त्याच्या दूतांच्या आज्ञांचे पालन करावे.[6] पुढे एका आयतामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचा समावेश करून असे सांगितलेले आहे, की जे स्त्रीपुरुष खरे 'शरणागत' ( मुस्लिम ) असतील, धर्मशील, सत्यनिष्ठ, सहनशील, नम्र दाते असतील, उपवास काळातील कर्तव्यांचे पालन करीत असतील, लैंगिक व्यव-

---

१. पण ( बहुधा ) ते धर्मश्रद्ध असले तरच. कुराण ९[२३].

२. अशी पुढील तीन कारणे सांगितली आहेत. धर्मत्याग करणे, पवित्र जीवन सोडून वेश्या बनणे आणि हेतुपुरस्सर एखाद्या निरपराध मुस्लिमाची हत्या करणे" ( बैदावी ).

३. " ... ज्याने ठार मारले असेल त्याच्याकडून त्या गुन्ह्याबद्दल भरपाई मिळवणे किंवा ठार मारणाऱ्याचा बदला घेणे."

४. सर्वात जवळचा नातलग

५. १७[२४-४०]. हीच नीतितत्त्वे कुराणातील २[७२], २५[६४], ३१[१६-१८] या आयतांमध्ये अधिक स्पष्टपणे सांगितलेली आहेत. ती सांगतांना नैतिक उपदेशाबरोबर आचरणाविषयीही मार्गदर्शन केलेले आहे.

६. ३२[३२].

हारात मर्यादशील असतील आणि परमेश्वराचे नित्य स्मरण करीत असतील, त्या सर्व स्त्री-पुरुषांना परमेश्वराकडून क्षमा मिळेल, प्रसाद[१] मिळेल.

केवळ धार्मिक आचारांचे पालन करणे पुरेसे नाही, असे पैगंबरांनी बजाविले आहे. ते म्हणतात, "तू प्रार्थनेच्या वेळी कोणत्या दिशेला तोंड करतोस, पूर्वेकडे की पश्चिमेकडे यावरून काही तुझी धर्मनिष्ठा ठरत नाही. परमेश्वरावर, 'कयामत'वर आणि देवदूतांवर ज्याची श्रद्धा आहे आणि जो आपली संपत्ती आपल्या आप्तेष्टांच्या प्रेमाखातर व अनाथ मुले, गरीब व वाटसरू यांच्यासाठी खर्च करतो तोच धर्मपरायण माणूस होय."[२] पैगंबरांनी पुढे असेही सांगितले आहे, की भलाईला भलाईचेच फळ येते.[३] पण त्यालाही एक शर्त आहे. धार्मिक कायद्यांचे निव्वळ ढोंगीपणाने व दिखाऊ[४] पालन करता कामा नये. तसेच श्रद्धेच्या अभावी कायद्यातील केवळ शब्दांना चिकटून कोणतेही कर्म करता कामा नये (उदाहरणार्थ, दान करताना ते घेणाऱ्याला अपमानित करणे किंवा त्याच्याशी क्रूरपणाने वागणे), कारण त्यामुळे भल्याचा मोबदला भल्याने मिळण्याची शक्यता नष्ट[५] होते. तसेच वाईट गोष्टीपासून दूर राहिले पाहिजे (किंवा शक्य तर त्याची किंमत) "त्यातल्या त्यात चांगले कर्म करून" (चुकती केली पाहिजे).[६] कारण चांगले किंवा वाईट यांना तंतोतंत असा पर्यायच नसतो. शत्रूशी मोबदल्यात भलाईने वागले तर "तो जणू प्रेमळ स्नेही बनतो."[७]

इस्लामची ही नीतितत्त्वे सर्व मानवसमाजाला लागू केलेली नाहीत. ती फक्त धर्मश्रद्धांनाच लागू आहेत. कारण अल्लाहवरील श्रद्धा ही इस्लामी भ्रातृभाव प्राप्त होण्यासाठी पहिली अट आहे.[८] इस्लामपूर्व काळात जे गुणविशेष म्हणून समजले जात आणि जे मुहम्मदांच्या ठायी होते असे समजले जाई, त्या गुणांचा विचार करता इस्लामची आदर्श वर्तनाची कल्पना काय होती, हे स्पष्टपणे लक्षात येते. या गुणसमुच्चयाने परिपूर्ण अशा मुहम्मदांचे शक्य तितक्या पूर्णतेने अनुकरण करणे ही कोणाही धर्मपरायण मुस्लिम व्यक्तीची सर्वोच्च महत्त्वाकांक्षा असते. आपल्या शेजाऱ्याशी माणसाचे संबंध कसे असावेत, यापासून तो [ आणि तशाच प्रकारच्या अन्य गोष्टी. त्या कितीही व्यक्तिगत समजल्या जात असल्या, तरी त्यांना एक सामाजिक बाजू असतेच. ] मानवाचे अल्लाहशी

---

१. $३३^{३५}$.
२. $२^{१७२}$.
३. $५५^{६०}$.
४. १०७६, ४४.
५. $२^{६५}$.
६. $२३^{९८}$.
७. $४१^{३४}$.
८. $१६^{९९}$.

असलेले नाते येथपर्यंत मानवी जीवनातील प्रत्येक योग्य व अयोग्य गोष्टींचा निवाडा पैगंबरच करीत असतात, अशी धर्मनिष्ठ मुस्लिमाची श्रद्धा असते. कुराणाप्रमाणेच हदिसनेही इस्लाम धर्मातील उत्सवसमारंभ, धार्मिक संस्कार व नैतिक मूल्ये या संबंधातील आवश्यकतांचा विचार केला आहे. तथापि हदिसांतही धर्मनिष्ठेच्या कल्पनेचा विकास आणि उच्च दर्जाच्या नैतिक मूल्यांच्या दिशेने केलेली प्रगती यांचा प्रत्यय येतो.

गझाली याचा इहिया इल्म अल् दीन ( धर्मविषयक ज्ञानाचे पुनरुज्जीवन ) या नावाचा एक ग्रंथ आहे. त्या ग्रंथात परंपरांद्वारे सांगितले गेलेले पैगंबरांच्या व्यक्तित्वाचे व्यापक दर्शन घडते. या पुस्तकात लेखकाने प्रारंभी मुहम्मदांचे जेवणाच्या वेळचे शिष्टाचार आणि त्यांच्या व्यक्तिगत आवडी-निवडी याचे वर्णन केले आहे. या सर्व गोष्टींचा मुहम्मदांच्या काळातील मुस्लिमांच्या आचारविचारांवर व आवडीनिवडीवर परिणाम होत असे, लेखकाने पुढे मुहम्मदांच्या नैतिक गुणांची व त्यांच्या नीतिविषयक मतांची माहिती दिली आहे. तो म्हणतो, " परमेश्वराचा हा दूत अतिशय विनम्र होता. स्वतःला तो अगदी यःकश्चित समजत असे. परमेश्वराने आपणाला चांगले गुण आणि उदार स्वभाव द्यावा म्हणून त्याची तो नित्य प्रार्थना करीत असे. परमेश्वराला तो अशी याचना करीत असे, की हे देवा मला निसर्गतःच ( खल्क ) आणि संवयीनेच ( खुल्क ) चांगला बनव. मला सर्व अवैध संवयींपासून दूर ठेव. परमेश्वराने त्याची ही याचना ऐकली व त्याला वचन दिले, " तू मला हाक मार आणि मी तुला हवे ते उत्तर देईन. "[१] आणि मग परमेश्वराने त्याला कुराण कथन केले. मुहम्मदांचे व्यक्तित्व कुराणाला ( हवे होते ) तसे होते.

गझाली याने हदिसमधील काही अवतरणे दिली आहेत, त्यावरून पैगंबर हे अतिशय शांत, शूर, न्यायप्रिय व आत्मसंयमी होते. एखादी स्त्री आपल्या मालकीची ( म्हणजे गुलाम ) किंवा लग्नाची अथवा अगदी जवळच्या रक्तसंबंधांतली असल्यामुळे जिच्याशी विवाह करण्यास हरकत नाही अशी नसेल, तर तिला पैगंबर कधीही स्पर्श करीत नसत. मुहम्मद अत्यंत उदार होते. दिवस संपला की त्यांच्यापाशी एकही 'दिनार' अथवा 'दिर्हाम' शिल्लक राहत नसे. रात्र झाल्यावर जवळ पैसा शिल्लक असला आणि तो देण्यासाठी तोवर कोणी भेटले नसेल, तर मुहम्मद आपल्या जवळच्या कोणातरी गरजू माणसाला पैसा देऊनच घरी परतत असत. परमेश्वराने पाठविलेल्या अन्नापैकी आपल्याला जरूर तेवढे मुहम्मद घेत असत. त्यांचे अन्न कमालीचे साधे होते—खजुर व जव. आपले जोडे आणि कपडे ते स्वतःच दुरुस्त करीत. समाजातील हलके काम करणाऱ्या लोकांबरोबर ते काम करीत, त्यांच्याबरोबर खातपीत. ते इतके लाजाळू होते, की कोणाकडे कधी रोखून देखील पाहत नसत. समोरचा माणूस गुलाम असो की स्वतंत्र असो, त्याच्या विनंतीचा ते अव्हेर करीत नसत. कोणी कितीही छोटी देणगी दिली, तरी ती ते प्रेमाने

---

१. ४०६२.

स्वीकारीत. स्वतःला अपायकारक असले तरी जे न्याय्य असेल तेच ते करीत. त्यांनी मूर्तिपूजकांकडून सहाय्याची कधीही अपेक्षा केली नाही. खरे तर त्या वेळी प्रत्येक माणसाला जवळ[1] करण्याची त्यांना गरज होती. त्रासदायक गोष्टी ते सहन करीत.

परंपरेद्वारे सांगितली गेलेली व स्वतः पैगंबरांची नीतिमत्तेची कल्पना काय होती हे सांगताना गझालीने एक गोष्ट उद्धृत केली आहे ती अशी : मूर्तिपूजकांचा अरबी प्रदेश जिंकला तेव्हा एका तरुण स्त्रीला कैद करण्यात आले. तेव्हा ती मुहम्मदांना म्हणाली, " मुहम्मदा, तुम्ही मला मुक्त करावयाचे ठरविलेत आणि माझ्या दुर्दैवाची मजा अरब जमातीला भोगू दिली नाहीत ( तर उत्तमच ). कारण मी माझ्या जमातीच्या नेत्याची कन्या आहे. माझ्या वडिलांवर ज्यांच्या रक्षणाची जबाबदारी होती त्यांचे रक्षण त्यांनी केले आहे. जे संकटात होते त्यांना त्यातून सोडविले आहे. भुकेल्यांना अन्न दिले आहे, देशाबाहेर शांतता निर्माण केली आहे आणि गरजू माणसाला त्यांनी कधीच नकार दिलेला नाही. मी हातिम ताईची कन्या आहे. " पैगंबरांनी उत्तर दिले, " मुली, खरी धर्मश्रद्ध माणसे अशीच असतात. "

पुढील महान् व सर्वोत्तम गुणांचा अल्लाहने इस्लाममध्ये समावेश केलेला आहे, असे पैगंबर इस्लामविषयी बोलताना सांगत असत. सामाजिक संबंधात प्रेमळपणा आणि माणसामाणसांतील व्यवहारात औदार्य, जे कायदेशीर आहे त्याचे विनामूल्य दान, गरिबांना अन्न, शांततेचा प्रसार, रुग्ण मुस्लिमाची ( मग तो पवित्र असो की पापी असो) विचारपूस, मृत मुस्लिमाची तिरडी वाहून नेणे, चांगला शेजारधर्म– मग तो शेजारी मुस्लिम असो की काफर असो, वृद्ध मुस्लिमाचा आदर करणे, कोणी अन्न मागितले तर ते देणे, कोणी जेवायला बोलावले तर जाणे, क्षमा करणे, माणसा–माणसात शांतता प्रस्थापित करणे, औदार्य, दानशूरता, मनाचा मोठेपणा, कौतुक करण्यासाठी प्रथम पुढे येणे आणि क्रोधाचे संयमन. इस्लामने ज्या गोष्टी टाळायला सांगितले आहे त्या अशा : क्षुद्र सुखे, वाटेल ती वाद्ये ( संगीतासाठी योग्य अशी तंतुसहित व तंतुरहित ) वाजविणे व वाटेल ते गाणे, दुसऱ्याची बदनामी, असत्य वचन, क्षुद्रता, कठोरता, कारस्थाने, विश्वासघात, नालस्ती, मित्राशी बेईमानी, नाते नाकारणे, दुष्टपणा, औद्धत्य, बढाई, कावा, अमर्याद हव्यास, गर्विष्ठपणा, अपमान, अश्लील कृत्य, हेवा, मत्सर, अस्थिरता, आक्रमकता व जुलुम.

बुखारी याने तयार केलेल्या हदिसांच्या संग्रहातील पहिल्या हदिसात असे म्हटले आहे, की कर्मापेक्षा ते कोणत्या हेतूने केले आहे यावर फळ काय मिळेल हे

---

१. गझालीने पैगंबरांच्या गुणांचे वर्णन केल्यानंतर शेवटी असे म्हटले आहे की पैगंबर निरक्षर होते; त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. ते अज्ञानाने भरलेल्या मोकळ्या मैदानी देशांत वाढले होते. अनाथावस्था व दारिद्य आले तेव्हा त्यांनी मेंढपाळाचे काम केले होते तरी देखील परमेश्वराने त्यांना सर्वोत्कृष्ट गुणांची देणगी दिली होती.

अवलंबून असते. कुराणातील अनेक[१] परिच्छेदांत दांभिकतेचा धिक्कार केलेला आहे. वर उल्लेखिलेले बुखारी याचे विधान हे त्याच विचाराचे सामान्य रूप आहे. धूर्त व लबाड ( दुटप्पी ) माणूस हा मृत माणसाच्या पुनरुत्थानाच्या वेळी 'सर्वांत वाईट माणूस' समजला जातो. चांगल्या-वाईटातील विवेक कसा करता येईल याविषयी दुसऱ्या एका 'परंपरेत' असे म्हटले आहे की, पावित्र्य याचा अर्थ चांगल्या गुणांचा ठेवा आणि पाप म्हणजे जी गोष्ट आत्म्याची शांतता ढळवते व "जी लोकांना समजावी असे वाटत नाही" अशी गोष्ट.

आपणाला जे हवे ते आपल्या भावालासुद्धा मिळाले पाहिजे असे जो मानतो तोच खरा मुस्लिम होय, या अर्थाचे जे हदिस[२] अस्तित्वात आहे ते इस्लाम धर्मातील नैतिक मूल्यांवर हदिसांमध्ये कसा भर दिलेला आहे या गोष्टीचे निदर्शक आहे. सकल ज्ञानाचे तात्पर्य काय, असे एका 'ग्रीक' राजाने उमर खलिफाला विचारले तेव्हा त्यानेही खऱ्या मुस्लिमासंबंधी वरीलप्रमाणेच विधान केले होते. बुखारीच्या संग्रहात, केलेला करार इमानदारीने पाळणे हा धर्माचा एक भागच आहे असे विधान केलेले आहे; पण त्याला पुष्टी देणारे हदिस त्याने उद्धृत केलेले नाही. मसुदी यानेही अशाच स्वरूपाचे तत्त्व प्रतिपादिले आहे आणि पैगंबरांच्या या संदर्भातील एका निवेदनाचा उल्लेख केला आहे. त्या निवेदनात पैगंबर म्हणतात, इमानदारी हेच समृद्धतेचे साधन आहे ( आणि दानधर्म हे एक दिलेच पाहिजे असे जड ओझ्यासारखे कर्ज आहे ). धर्मश्रद्ध माणसाचा शब्द हा करारासारखा आहे प्रत्येक मुस्लिमाने आपले वचन ( जी गोष्ट करण्यास मनाई आहे ती कायदेशीर आहे असे समजून दिलेल्या वचनाव्यतिरिक्त आणि जी करण्यास परवानगी आहे पण जी बेकायदेशीर आहे असे समजून दिलेले वचन वगळून ) पाळलेच पाहिजे. या गोष्टी माझ्या बांधवांनी केल्या तर परमेश्वराची त्यांच्यावर कृपा होईल.

पैगंबरांना असत्याविषयी तिरस्कार होता. एकवेळ भेकड व कंजुष लोकांना ते इस्लाम धर्मात घ्यावयास तयार असत; परंतु असत्यवचनी माणसाला ते सच्चा मुस्लिम मानावयास तयार नसत. खोटे बोलणाऱ्या माणसाची, त्यांनी आश्वासन मोडणाऱ्या माणसात गणना केलेली आहे. आणि जे स्वतः केलेला गंभीर स्वरूपाचा करार विश्वासघाताने मोडतात आणि विश्वासघात करून कोर्टात दावा नेतात त्यांना पैगंबरांनी ढोंगी म्हटलेले आहे.

---

१. उदाहरणार्थ १०७६.

२. या हदिसाच्या अर्थासंबंधी भाष्यकारांत मतभेद आहे. त्यामुळे त्याच्या अर्थासंबंधींच्या शंकेला वाव दिसतो. कारण त्याच संग्रहांत नमूद केलेली दुसरी एक परंपरा असे सांगते की पापी माणूस हा खरा धर्मश्रद्ध असेल तर त्याने केलेली मोठाली पापेसुद्धा जणू त्याने केलीच नाहीत असे समजले जाते.

कुराणामध्ये दांभिक लोकांचा जागोजागी धिक्कार केला असला तरी खोटे बोलण्याचा स्वतंत्रपणे व स्पष्ट शब्दांत कोठेही निषेध केलेला नाही. त्यामुळे नंतरच्या काळात इतर प्रश्नांप्रमाणे याही बाबतीत धर्मपंडितांनी आपापल्या मतानुसार निष्कर्ष काढले आहेत असे दिसून येते. झाहिरी (शब्दप्रामाण्यवादी पंथ) इब्ने हाज्मच्या मताप्रमाणे कोणत्याही कारणासाठी असत्य बोलणे पापच होय असे मानणारी काही मंडळी आहेत; परंतु असत्य बोलणे ज्या बाबतीत योग्य समजले जाते अशा पाच गोष्टी सांगितलेल्या आहेत. उदाहरणार्थ, निर्दय व जुलमी सत्ताधाऱ्यापासून एखादा धर्मश्रद्ध माणूस लपून राहिला असेल असा प्रसंग. अशा प्रसंगी त्या माणसाचे जीवित व मालमत्ता यांचे रक्षण व्हावे म्हणून त्याच्या धर्मबांधवांनी खोटे सांगावयास हरकत नाही. या बाबतींत सर्व मुस्लिमांचे एकमत असावयास हरकत नाही. अशा माणसाचा विश्वासघात करणारा माणूस परमेश्वराच्या दरबारी पापी ठरेल, तर उलट लपून राहिलेल्या माणसाचा आपणास ठावठिकाणा माहीत नाही, असे जो सांगेल तो त्या माणसाचा उपकारकर्ता समजला जाईल व त्याला त्याचा मोबदला मिळेल.

या संदर्भात आणखीही काही प्रसंग सांगितलेले आहेत. उदाहरणार्थ, आपल्या बायकोचे प्रेम संपादन करण्याच्या हेतूने खोटे सांगणे किंवा मुस्लिम कैद्यांची मुक्तता करण्याच्या उद्देशाने मूर्तिपूजकांविरुद्ध युद्ध चालू असताना असत्य बोलणे. यापैकी दुसऱ्या प्रकारच्या प्रसंगी बोललेले असत्य हे परमेश्वराच्या दृष्टीने असत्य असेल, तरच ते पाप ठरते; केवळ युक्तिवाद करून ते पाप ठरविता येत नाही.

गझालीने म्हटले आहे, की वाणी हे कोणत्या तरी साध्याचे साधन असते. जेव्हा एखादा कायदासंमत हेतू केवळ असत्य बोलले तरच सिद्ध होतो असे नाही, तर सत्य बोलूनही सिद्ध होऊ शकतो, तेव्हा असत्य बोलणे निषिद्ध (हराम) समजले जाते. परंतु तो हेतू असत्य बोलण्यानेच सिद्ध होणार असेल, तर अशा वेळी असत्य वचन कायदासंमत मानले जाते. एखादा[1] हेतू साध्य होणे अत्यंत आवश्यक असेल, तेव्हा असत्य बोलणे हे योग्य (वाजिब) मानले जाते. परंतु खरे तर असत्याच्या बाबतीत माणसाने सावधच राहिले पाहिजे. कारण एकदा असत्याचा दरवाजा मोकळा ठेवला, की मग जरूर नसतानादेखील असत्य बोलण्याची सवय लागण्याचा धोका असतो.

गझालीने पुढे असे म्हटले आहे, की खोटे बोलण्याने एखाद्या मुस्लिमाचे हित होणार असेल किंवा त्याची धोक्यापासून सुटका होणार असेल, असे प्रसंग सोडून अन्य प्रसंगी असत्य बोलणे हे मर्यादेचे उल्लंघन होय असे एक मत आहे. तुझ्याजवळ काय काय संपत्ती आहे, असे एखाद्या जुलमी माणसाने एखाद्या मुस्लिम व्यक्तीला विचारले तर त्याने आपणाजवळ काही नाही, असे सांगावयास हरकत नाही. तसेच एखाद्या राजाने

---

१. उदाहरणार्थ, जेव्हा एखाद्या मुस्लिमाचे जीवन धोक्यात आहे; किंवा युद्धाचे हेतू अन्य मार्गांनी साध्य होणार नसतील तेव्हा; अथवा भंगलेली दोस्ती दुसऱ्या मार्गाने पुनश्च जोडली जाण्याची शक्यता नसेल अशा वेळी.

एखाद्या मुस्लिमाला पकडले आणि " तूं परमेश्वराविरुद्ध पापे केली आहेस काय ? " असे विचारले तर त्याने नाही म्हणून सांगावयास हरकत नाही. या संदर्भात पुढील परंपरा प्रचलित आहे : " एखाद्याने एखादे गलिच्छ पाप केले असेल तर त्याने परमेश्वरा-आड लपावे. कारण पापाची वाच्यता हे आणखी एक पाप होय. "

असत्य बोलून साध्य करावयाची गोष्ट कायदासंमत असली, तरी असत्य बोलण्या-तून निषिद्ध असे फळ निघण्याची शक्यता असते. म्हणून मनुष्याने न्यायाच्या तराजूत असत्य बोलण्याची आवश्यकता व सत्य ही दोन्ही तोलून पाहावयास हवीत. खरे बोलण्या-तून निषिद्ध असलेले फळ निघण्याची शक्यता आहे आणि ते फळ शरियतच्या दृष्टीने असत्यापेक्षाही दुःखद आहे असे दिसले, तर खऱ्याऐवजी खोटे बोलावयास प्रत्यवाय नाही. बहुतांश लोक पैशासाठी किंवा पदासाठी खोटे बोलत असतात; म्हणून स्वार्थी हेतूसाठी खोटे बोलण्यास परवानगी नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

या संदर्भात साक्षीच्या वेळी शपथ घेण्याची बाब अतिशय महत्त्वाची मानलेली आहे. खोटी शपथ घेणे हे पाप समजले गेले आहे आणि त्यासाठी पापक्षालन ( कफ़ारा ) आवश्यक आहे. हा नियम इतक्या तांत्रिकपणे पाळला जातो की कधी कधी शपथ मोडण्यापूर्वीच, तसा गुन्हा घडण्याची शक्यता लक्षात घेऊन पापक्षालन करावयास लावले जाते. अशा प्रकारे नियमाची शब्दशः अमलबजावणी क्वचित प्रसंगीच केली जाते, आणि तीसुद्धा ' नियया ' किंवा ' अभिप्राय ' या संबंधीच्या सर्वमान्य शिकवणुकीशी धरून असेल तेव्हाच.

जे सत्य कलहाला जन्म देते त्या सत्यापेक्षा सद्हेतूने केलेले असत्याचरण केव्हाही बरे, अशा अर्थाचे एक प्रसिद्ध विधान सादीने केले असले, तरी इस्लाममधील नैतिक विचारात सामान्यतः असत्याला विरोधच आहे. तोतया जाहिझने पुढील शब्दात सादीचा वर उल्लेखिलेला विचार अधिक चांगल्या रीतीने व्यक्त केला आहे : " सत्याला चिकटून राहा. कारण शूर माणसाच्या हातातील धारदार तलवारीपेक्षासुद्धा सत्य अधिक सामर्थ्य-शाली आहे. सत्यामुळे तुम्हाला पसंत नसलेली गोष्ट जरी प्रकट होत असली, तरी सत्य सांगणे हेच गौरवास्पद आहे. आणि असत्याद्वारे तुम्हाला आवडणारी गोष्ट प्रकट होत असली, तर ते अप्रतिष्ठापूर्ण आहे. शिवाय असत्य बोलण्याबद्दल प्रसिद्ध असलेला माणूस खरे बोलला, तरी त्याच्याविषयी संशय येतो. "

अबू धार नावाचा मुहम्मदांचा एक सहकारी होता. त्याला पैगंबरांनी कर्तव्याची सप्तसूत्रे सांगितली होती. ही सप्तसूत्रे हदिसद्वारे सांगितलेल्या नीतितत्त्वांचे दुसरे अंग आहे. कुराणातील सर्वसाधारण नैतिक शिकवणुकीशी ही सूत्रे बरीचशी जुळतात. ती सप्तसूत्रे अशीः गरीबांवर प्रेम कर; त्यांना तू सहज उपलब्ध असला पाहिजेस; आपल्या-पेक्षा खाली असतील त्यांच्याकडे पाहा; वरच्यांकडे पाहू नकोस. कोणाकडे काहीसुद्धा मागू नकोस; नातलगांविषयी राग असला तरी त्यांच्याविषयीची निष्ठा नाहीशी होऊ देऊ नकोस; कटू असले तरी सदैव सत्य बोलत जा; अल्लाहसाठी कोणतेही कार्य असताना

घाबरू नकोस आणि " अल्लाहइतके सामर्थ्य दुसऱ्या कोणातही नाही " असे सदैव सांगत जा." अशाच प्रकारचा उपदेश वारंवार केलेला आढळतो. उदाहरणार्थ, " ज्याचा अल्लावर व अंतिम निवाडयाच्या दिवसावर विश्वास आहे त्याने खरे तेच बोलावे, नाहीतर स्वस्थ बसावे; आपला शेजारी व आपला पाहुणा यांचा मान राखावा." तसेच " अल्लाचे भय बाळग, दुष्कृत्यानंतर एक सत्कृत्य कर. हेतू हा की केलेले दुष्कृत्य रद्द व्हावे."

पैगंबरांचा स्वभाव सौम्य व क्षमाशील होता आणि त्यांना दुसऱ्यांना दुःख देणे व क्रूरपणा आवडत नसे, असे हदिसवरून समजावयास हरकत नाही. असे काही सांगण्याचा हदिसांचा अधिकार मोठा आहे. चांगले वागावे की वाईट वागावे, असा प्रश्न पैगंबरांच्या मनात कधी उद्भवतच नसे. ते सहजपणे चांगल्याचीच निवड करीत. धर्माच्या ( फि साबिल अल्लाह ) बाबतींत नुकसान करणारी बाब सोडून इतर कोणत्याही बाबतीत कोणाशीही ते सूडबुद्धीने वागत नसत. एकट्याने खाणे, गुलामाला मारझोड करणे, क्षमा करावयाचे नाकारणे किंवा आपल्या सहकाऱ्यांचा द्वेष करणे या गोष्टी पैगंबर दुष्टपणाच्या मानीत. मूक प्राण्याविषयी दया हा परमेश्वराकडून सर्व पापांची क्षमा मिळेल असा गुण आहे, असे मुहम्मद समजत.

मुहम्मदांचा जावई व ' सनातनपंथीयां 'चा चौथा खलिफा अली इब्ने अबी तालिब याच्या नावाने एक हदिस प्रचलित आहे. त्या हदिसांत सांगितलेले नैतिक विचार, मुहम्मदांचे जे नैतिक विचार होते असे सांगितले जाते, त्याहून फार भिन्न नाहीत. या खलिफाने केलेल्या एका कवनाविषयीचे हे हदिस आहे. त्या कवितेमध्ये त्याने पुढील दहा ' पवित्र ' गुण मोठेपणाचे निदर्शक आहेत असे म्हटले आहे. युक्तिवाद, धर्म, ज्ञान, दया, मनाचा मोठेपणा, सहानुभूती, ईश्वरनिष्ठा, सहनशीलता, कृतज्ञता आणि करुणा.

वर चर्चिलेले कुराण व हदिस यांमध्ये प्रकट झालेले निवडक नैतिक विचार हीच मुस्लिमांच्या नैतिक आचारांची तत्त्वे होत आणि त्यांच्यावरच मुस्लिमातील परस्परसंबंध आधारलेले असले पाहिजेत असे मुहम्मद व त्यांचे सनातनपंथीय भाष्यकार मानतात. या नैतिक विचारांना ' फिकाह 'ने इतर धर्मविषयक तरतुदींप्रमाणे ( उदाहरणार्थ धर्मश्रद्ध व्यक्तीचे अल्लाहशी नाते ) व्यावहारिक नियमांचे स्वरूप दिलेले आहे. हेतू हा की मुस्लिम धर्मियांना शरियत कायद्याप्रमाणे काय करणे जरूर आहे, याविषयी शंका राहू नये. या नियमांचे आहे तसे पालन करण्यात काही मुस्लिमांना संतोष मिळत असला, तरी जे मुस्लिम धर्मनिष्ठेच्या उच्च ध्येयांनी प्रेरित झालेले असतात ते हदिसांमागील तत्त्वांना महत्त्व देतात आणि बाह्याचारापेक्षा त्या आचारामागील हेतूला जास्त महत्त्व असते, असे ते समजतात. प्रत्येक ' फिकाह 'मध्ये व्यावहारिक नियम सांगितलेले आहेत. आणि त्या नियमानुसार खालील पाच वर्गांत आचारांची विभागणी केलेली आहे :—

(अ) 'फर्ज' अथवा 'वाजिब' – आवश्यक कर्तव्ये. या कर्तव्यांची पूर्ती केली तर त्याचा मोबदला मिळतो आणि त्यांची उपेक्षा केली तर सजा होते.

(आ) मुस्तहाब, सुन्ना, मस्नुन किंवा मंजूर – ही कर्तव्ये करावीत अशी शिफारस केली असली, तरी ती आवश्यक मानलेली नाहीत. त्या कर्तव्यांची पूर्ती केली, तर त्याचा मोबदला मिळतो; पण त्यांची उपेक्षा केली तर शिक्षा होत नाही.

(इ) जायज किंवा 'मुबाह' — कायद्याच्या दृष्टीने जी महत्त्वाची नाहीत अथवा जी कृत्ये केल्याचा मोबदला मिळत नाही किंवा जी केली नाहीत म्हणून सजाही होत नाही अशी कृत्ये.

(ई) मक्रूह – मंजूर नसलेली परंतु मनाई नसलेली कृत्ये. आणि

(उ) हराम अथवा महझूर–मनाई केलेली व ज्यांबद्दल सजा होते अशी कृत्ये.

यांपैकी पहिल्या वर्गातील कर्तव्यांमध्ये कुराणाने सांगितलेल्या प्रार्थना, दानधर्म, उपवास व यात्रा या कर्तव्यांचा समावेश होतो. फक्त ही कर्तव्येच इस्लाममध्ये सर्वत्र अटळ समजलेली आहेत. इतर कृत्यांपैकी कोणती कृत्ये कोणत्या वर्गात मोडतात याविषयी भिन्न पंथीयांनी भिन्न अनुमाने काढलेली आहेत. तथापि 'हराम' या वर्गात मोडणाऱ्या काही कृत्यांच्या बाबतीत सर्वांचे काहीसे मतैक्य आहे. ही कृत्ये म्हणजे 'फिकाह'ने कुराणाच्या आधाराने पाप म्हणून ठरविलेली कृत्ये होत. तसे ठरविताना धार्मिक विधिसंबंधींच्या नियमांविरुद्ध केलेली कृत्ये आणि नैतिक आचरणाविषयीच्या नियमांविरुद्ध केलेली कृत्ये असा भेद फिकाहने केलेला नाही. अशा कृत्यांसंबंधीची माहिती अल् सुबकी याच्या जाम अल अवामी या ग्रंथाचा टीकाकार अल् बन्नानी याने दिलेली आहे. सुन्नी या सनातनी संप्रदायाच्या मताची ती माहिती निदर्शक आहे.

'कुफ्र' म्हणजे 'धर्मावर विश्वास नसणे' हे सर्वांत मोठे पाप समजले जाते. या पापाची तुलना दुष्टतेशीच होऊ शकते. या खालोखालचे प्रमुख अपराध पुढीलप्रमाणे : हेतुपुरस्सर हत्या, व्यभिचार, समलिंग संभोग, मद्यपान व कोणतीही नशा करणे, चोरी व बेकायदा कब्जा, व्यभिचाराचा चुकीचा आरोप, नालस्ती, बदनामी, खोटी साक्ष, खोटी शपथ, नाते नाकारणे, मातापित्यांची अवज्ञा, खोटे वजन-माप, योग्य कारणाभावी ठरलेल्या वेळेआधी किंवा नंतर प्रार्थना करणे, परमेश्वरी प्रेषिताविरुद्ध रास्त कारण नसताना असत्य बोलणे, एखाद्या मुस्लिमाला ठोकणे, प्रेषिताच्या 'सोबत्यां'ची बदनामी, साक्षीपुरावा दडपणे, लाच, स्त्रीलंपटता, हीन वासनेला उत्तेजन, दोष दाखविणे, दानधर्मास नकार, ईश्वरी दयेविषयी निराश होणे, लबाड माणसावर विसंबणे (म्हणजे परमेश्वराकडून क्षमा मिळवून नुकसान भरपाई करता येईल असे सांगून दुसऱ्यांना अपराध करावयास लावणाऱ्या इसमावर विसंबून राहणे), 'झिहार' (इस्लामपूर्व काळातील घटस्फोटाचा

एक प्रकार ), [१] डुकराचे किंवा नैसर्गिक मृत्यू आलेल्या प्राण्यांचे मास खाणे, रमजानचा उपवास मोडणे, विश्वासघात, धर्मश्रद्धांविरुद्ध लढणे, चेटुक, जबर व्याज घेणे, सतत लहान लहान पापे करणे.

'फिकाह 'च्या सर्वसामान्य पुस्तकात व्यापार उदीमाविषयींच्या नियमांचा बराच उहापोह केलेला आहे. त्यामध्ये अधिकाराचा संकोच करण्यावर प्रतिबंध, व्यक्तीचे व मालमत्तेचे नुकसान, जुगार व सट्टा यासंबंधी अनेक नियम सांगितलेले आहेत. त्यानुसार वक्फ ( धार्मिक कार्यासाठी कायमची दिलेली मालमत्ता ) मालमत्ता किंवा उम्म वलद ( म्हणजे मालकापासून जिला संतती झालेली आहे अशी गुलाम स्त्री. मालकाच्या मृत्यू-नंतर ती स्वतंत्र होते. ) यांची विक्री कायदेशीर समजली जात नाही. तसेच जी वस्तू विकल्यामुळे मूक प्राण्याशी निर्दयपणा होईल अशा वस्तू ( जिवंत मेंढराच्या अंगावरील लोकर काढून विकणे ) विकणे, अथवा वस्तूचे नुकसान होईल अशा पद्धतीने ती विकणे ( तयार कपड्यातील कापडाचा तुकडा विकणे ) बेकायदेशीर आहे.

प्राण्यांच्या शर्यतींना बंदी केलेली नाही; परंतु 'फिकाह 'मध्ये त्या कशा व्हाव्यात यासंबंधीचे नियम सांगितलेले आहेत. शर्यतीच्या निकालावर जुगार खेळण्यास त्याच-प्रमाणे कोणत्याही प्रकारच्या सट्ट्यास मनाई केलेली आहे. जे अद्याप अस्तित्वात आलेले नाही ( उदाहरणार्थ, पुढील हंगामाचे पीक अथवा अद्याप जन्मावयाचा गुलाम ) अथवा ज्या वस्तूचे माप, वजन अगर किंमत माहीत नाही ( उदाहरणार्थ, माप न केलेला धान्याचा ढीग किंवा गुराच्या आचळातील दूध ) अशा गोष्टींची विक्री करण्यास बंदी केलेली आहे.

इस्लामच्या विभिन्न आचार पंथांच्या संस्थापकांचे आणि त्यांच्या सहाय्यकांचे वैशिष्ट्य असे, की त्यांनी सर्व आचारांना नियमबद्ध केले. त्यांच्यानंतरच्या धर्मपंडितांनी देखील आपल्या पूर्वसूरींच्या गुरूंचे अनुकरण करून इस्लाम ही विधिनिषेधात बांधलेली एक कडवी व्यवस्था बनविली. ज्या स्वरूपात 'फिकाह ' अस्तित्वात आहे त्यात हे सर्व विधिनिषेध व आचरणविषयक नियम सांगितलेले आहेत. तथापि 'फिकाह 'मधील नीति-तत्त्वांच्या जोडीने आणखीही काही उच्चतर नीतितत्त्वे हदिसमध्ये व अन्यत्र सांगितलेली आहेत. इस्लामी इतिहासाच्या पाचव्या शतकात गझाली ( मृत्यू : इ. स. ११११ ) याने या क्षेत्रात दूरगामी स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणल्या. त्याच्या प्रभावशाली कार्यामुळे त्याला 'हुज्जत अल् इस्लाम ' ( इस्लामची तटबंदी ) असे नाव मिळाले होते. वस्तुतः त्याचे शिक्षण धर्मशास्त्राच्या विद्वज्जड अभ्यासपद्धतीने झाले होते. या पद्धतीने प्राचीन इस्लाम धर्मातील सारा जिवंतपणा नाहीसा केला होता. आणि त्याला केवळ कर्मकांडाचे स्वरूप दिले होते. खूप चिंतनानंतर गझालीला धर्माचे हे बाह्य रूप निरर्थक

---

१. बैदावीचे कुराण ३३४ वरील भाष्य.

असल्याचे आढळले आणि आपल्यासमोरील समस्यांच्या सोडवणुकीसाठी त्याने दुसरीकडे धाव घ्यावयाचे ठरविले. त्यासाठी त्याने ग्रीक तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास आरंभला तेव्हा तो ॲरिस्टॉटलच्या विचारांनी व नव प्लेटोवादाने प्रभावित झाला. तथापि जीवनाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून निव्वळ बुद्धिवाद अपुरा आहे हे त्याच्या अखेर ध्यानी आले आणि सूफींच्या गूढवादी तत्त्वज्ञानाने तो प्रभावित झाला. अर्थात् त्याच्यावर पूर्वी झालेल्या शिक्षणाचे संस्कार संपूर्णपणे नाहीसे होणे शक्य नव्हते. जुने शिक्षण आणि नव्याने केलेला अभ्यास यांच्या सहाय्याने गझाली याने इस्लाममधील वेगवेगळ्या विचारांचा मेळ घालून एक नवा विचारप्रवाह विकसित केला. हा प्रवाह 'फिकाह'चे जे मूळ आधार– कुराण व हदिस– त्यांच्या गाभ्यात जाऊन केलेल्या तपासणीवर प्रामुख्याने आधारलेला आहे. ही तपासणी करताना गझालीने कुराण व हदिस यांच्या पूर्वीच्या भाष्यकारांच्या प्रभावापासून स्वतःला दूर ठेवण्याची काळजी घेतली. स्वतः नव्याने केलेली तपासणी आणि आपल्या स्वतःच्या श्रद्धा यांच्या सहाय्याने व मानवतावादाचे पुट देऊन त्याने आपली विचारप्रणाली विकसित केली. आपल्या 'इह्या इल्म अल्-दीन' (धर्मज्ञानाचे पुनरुज्जीवन) या ग्रंथामध्ये त्याने मुस्लिम व्यक्तीची जीवनपद्धती कशी असावी यांची तपशीलवार मांडणी केलेली आहे. धर्माचा विचार व आचार यांच्या जवळपास प्रत्येक बाजूचा त्यात समावेश आहे असे म्हणता येईल.

गझालीच्या या ग्रंथाचे अवलोकन करण्याआधी त्याच्यावर ज्या गोष्टींचा प्रभाव पडलेला होता आणि त्याने जे विचार आपल्या अध्ययन काळात स्वीकारार्ह मानले त्यासंबंधी अधिक चर्चा करणे आवश्यक आहे. गझाली गाढ धार्मिक प्रवृत्तीचा माणूस होता. त्यामुळे जगातील चांगले व वाईट आणि पापाचे मूळ इत्यादी प्रश्नांसंबंधी तो गंभीरपणे विचार करीत असे. उपलब्ध असलेल्या आधारांच्या सहाय्याने आपणाला या प्रश्नांच्या बाबतीत कोणताही ठाम असा निर्णय घेता येत नाही असे त्याच्या प्रत्ययास आले. उदाहरणार्थ, कुराणात माणसाला प्रथम अल्लाहवरील श्रद्धेच्या दुव्याने बांधून घेतले आहे आणि मग परमेश्वराशी श्रद्धेचे नाते ठेवले तर त्याचे काय फळ मिळेल हे सांगितले आहे. मात्र मनुष्याच्या बाबतीत अल्लाहच्या काय जबाबदाऱ्या आहेत हे पैगंबरांनी सांगितलेले नाही. आपल्या इच्छेनुसार अल्लाह सर्व काही करीत[1] असतो. तो सर्वशक्तिमान, सर्वज्ञ व सर्वन्यायी आहे. तथापि कुराणात देखील या संदर्भात दोन भिन्न विचार सांगितलेले आहेत आणि त्यामुळे इस्लाम धर्मात एका गंभीर वादाला जन्म मिळाला आहे. एक विचार असा, की ज्यांना सन्मार्ग दाखवावा अशी अल्लाहची इच्छा असेल त्यांना अल्लाह तसा मार्ग दाखवितो[2] आणि त्यामुळे त्यांना खरा धर्म कळतो व त्याचे फळ

---

१. कुराण २२[१४], [१९] इत्यादि.
२. २[१३६], २२[१६],

म्हणून त्यांना स्वर्गप्राप्तीही होते.[१] आणि ज्यांना अल्लाह सन्मार्ग दाखवू इच्छित[२] नाही त्यांना तो भलत्या[३] मार्गाकडे नेतो. दुसरी कल्पना अशी, की आपला सेवक अश्रद्ध असावा अशी काही परमेश्वराची इच्छा[४] नसते. जे चांगले होते ते परमेश्वरामुळे आणि जे वाईट होते ते स्वतः माणसांच्यामुळे.[५] जे भूतलावर कुकर्म करतील त्यांना ईश्वरी शाप मिळेल आणि नरकात जावे लागेल.[६] माणसाला सैतान भलत्या मार्गाने नेतो व त्याच्या मनात पापबुद्धी निर्माण करतो असे पैगंबरांचे मत असावे असे दिसते.[७]

या परस्पर विसंगत अशा विधानांसंबंधीच्या चर्चेचा, धर्मशास्त्राची परमेश्वराच्या स्वरूपाविषयीची कल्पना कोणती या प्रश्नाशी संबंध आहे. सनातन धर्ममतवादाचे असे मत आहे (या मताचा सर्वोत्तम प्रवक्ता अबू अल्–हसन अल्–अशारी हा होय.) की, परमेश्वर हाच सर्वशक्तिमान, सर्वज्ञ व सर्वन्यायी असल्यामुळे त्याच्या इच्छेनुसार चांगल्या–वाईट, हितकारी व अनहितकारी गोष्टी घडत असतात. त्याला जे व्हावे आणि जे होईल असे वाटत असते, तेच तो आपल्या सेवकाकडून करून घेत असतो. आणि त्यानेच 'सुसंरक्षित पाटी' वर लेखणीने हे सर्व लिहून घेतलेले आहे आणि ती 'पाटी' स्वर्गात जतन करून ठेवलेली आहे. तीच त्याची माणसाला लागू असलेली अपरिवर्तनीय अशी आज्ञा व निष्ठुर निवाडा होय. म्हणून अल्लाह हा सर्वांचा स्वामी आहे. तो आपल्या इच्छेनुसार करतो आणि आपणाला योग्य वाटेल तो निर्णय घेतो. म्हणून त्याने निर्मिलेल्या सर्व मनुष्यप्राण्यांना त्याने स्वर्गात पाठवले, तरी त्यात कोणताही अन्याय नाही किंवा त्याने त्या सर्वांना नरकात रवाना केले, तरी त्यात काही चूक (जुल्म) नाही. जी वस्तु स्वतःची नाही किंवा ज्यावर न्याय्य अधिकार सांगता येणार नाही अशा वस्तूसंबंधीचे हक्क जबरदस्तीने आपल्या हाती घेण्यात पाप आहे. पण ईश्वर हा तर सर्व मनुष्यमात्रांचा संपूर्णपणे स्वामी आहे. त्यामुळे (त्याने माणसाच्या बाबतीत केलेली कोणतीही कृती) चुकीची समजता येणार नाही. शिवाय मनुष्याला आपल्या सर्व अटळ कर्तव्यांचे ज्ञान परमेश्वरी 'प्रकटीकरणा'द्वारेच होत असते. मनुष्याच्या कोणत्याही आवश्यक कर्तव्याचा आदेश त्याला त्याच्या बुद्धीकडून मिळू शकत नाही. प्रत्यक्ष बुद्धी एखादी कृती चांगली आहे की वाईट आहे, हे ठरवू शकत नाही. तथापि परमेश्वरासंबंधीचे ज्ञान मनुष्याला त्याच्या बुद्धीद्वारेच मिळते आणि 'प्रकटीकरणां'मार्फत परमेश्वर आपल्या आज्ञा फर्मावीत

१. २२[१४].
२. १६[३८].
३. १३[२७,३०,३३].
४. ३९[९].
५. ४[८९].
६. १३[२५], ४[९८].
७. २४[२१].

असतो. त्यामुळे परमेश्वरी आज्ञेविषयीचे अज्ञान हे पापाचे समर्थनपर कारण ठरू शकत नाही. कारण कुराणात म्हटले आहे : "आम्ही जोवर (आमचा) दूत पाठविला नव्हता तोवर आम्ही (पापांची) शिक्षा करीत नव्हतो."[1] म्हणूनच कल्याणकर्त्याबद्दल कृतज्ञता, आज्ञाधारकाला बक्षीस, अवज्ञा करणाऱ्याला शिक्षा या गोष्टी आवश्यक असल्याचे प्रकटीकरणाद्वारे सांगितले आहे, माणसाच्या बुद्धीद्वारे सांगितलेले नाही. तथापि स्वतः ईश्वराचेदेखील काहीतरी अनिवार्य असे कर्तव्य आहे अशी मानवी बुद्धीने कल्पनाही करता कामा नये. कारण मानवाकडून ईश्वराला काही मिळत नाही किंवा मानव त्याचे नुकसानही करू शकत नाही; आणि परमेश्वरच निर्विवादपणे सर्वसत्ताधीश आहे.

या युक्तिवादातून एक प्रश्न निर्माण होतो तो असा, की जी कर्तव्ये आपल्या सेवकाला पुरी करता येणे शक्य नाही अशी कर्तव्ये ईश्वर त्याच्यावर लादतो काय? गझालीचे या प्रश्नाबाबतचे उत्तर होकारात्मक होते; परंतु सनातन धर्ममतवादी मंडळी सामान्यतः परमेश्वर मनुष्याचे वाईट करील असे मानावयास तयार नसतात. कारण त्यांच्या मते परमेश्वर हा करुणाकर व दयावंत असल्यामुळे आपल्या सेवकांच्या बऱ्यावाईट कर्मांकडे पाहून तो त्यांना काय फळ द्यावयाचे, ते ठरवीत नाही; तर आपल्या मर्जीला येईल ते फळ देत असतो.

अहमद इब्ने हाज्म या नावाचा झाहिरी पंथाचा ('शब्दप्रामाण्यवादी' पंथ) एक पंडित (मृत्यू : स्पेनमध्ये ४५६।१०६९) होऊन गेला. त्याने अशारी पंथीयांनी मांडलेल्या परमेश्वराच्या स्वरूपाविषयीच्या सिद्धांताला कडाडून विरोध केला आणि मूळ कुराणातील विधानांतून निघणारे तर्कसंगत निष्कर्ष पुढे मांडले. तो म्हणत असे : काही लोकांना वाटते, की तुम्हा-आम्हां मानवांना जे चांगले वाटते तेच परमेश्वर करीत असतो आणि आपणाला जे वाईट आहे असे वाटते असे परमेश्वर काहीही करीत नाही. असे समजणारे लोक खरे तर आपल्या स्वतःच्या दृष्टिकोणांतून या प्रश्नाचा विचार करीत आहेत आणि मानवी कल्पना विकृतपणे परमेश्वरावर लादीत आहेत. एखादी गोष्ट चांगली असते याचे कारण परमेश्वरच ती चांगली करतो आणि एखादी गोष्ट वाईट असते याचे कारण परमेश्वरच ती वाईट करतो. जगातील कोणतीही गोष्ट स्वतःच मूलतः चांगली अथवा वाईट नसते; परमेश्वर जे चांगले ठरवितो ते चांगले असते आणि ते कृत्य जो करतो तो सदाचारी ठरतो. तसेच परमेश्वर जे वाईट ठरवितो ते वाईट असते आणि ते कृत्य जो करतो तो दुराचारी बनतो. सर्व काही परमेश्वराच्या आज्ञेनुसार होत असते. कारण एखादे कृत्य एखादे वेळी चांगले असते; परंतु ते अन्य वेळी वाईट ठरू शकते. उदाहरणार्थ, एके काळी प्रार्थनेच्या वेळी जेरुसलेमकडे तोंड करणे चांगले समजले जात असे. पुढे मक्का हा 'किब्ला' (प्रार्थनेच्या वेळी ज्या बाजूला वळावयाचे असते ती दिशा) होय असे सांगितले गेले आणि पूर्वीची पद्धत वाईट ठरली. परिस्थितीमधील

---

१. १७६.

बदलानुसार कोणतीही कृती बरी किंवा वाईट ठरत असते. उदाहरणार्थ रतिक्रीडा–लग्ना-पूर्वीची व नंतरची. अथवा संरक्षण दिलेल्या व प्रारंभी स्वतंत्र असलेल्या 'परकी' माणसाने आपला शब्द मोडला म्हणून त्याला गुलाम करणे. अशा माणसाला कैद करता येते व गुलाम म्हणून त्याची विक्री करता येते.

परमेश्वराने ठरवून दिलेले नसेल, तर कोणाही माणसाला दुसऱ्याकडून विशेष हक्काची अपेक्षा करण्याचा अधिकार नाही. उदाहरणार्थ, परमेश्वराची इच्छा असेल तर मातीतून देखील मूल जन्माला येऊ शकेल; पण मातापित्यांच्या पोटी ते जन्म घेते आणि त्याचा त्यांना आनंद मिळविता येतो. म्हणून मातीविषयी मुलाला कृतज्ञता वाटण्याची गरज नाही तशी आईबापाविषयीही वाटण्याची आवश्यकता नाही. तथापि आईबापां-विषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे, अशी परमेश्वराची आज्ञा आहे. अन्यथा ती बाळगण्याची आवश्यकता नाही.

काही लोकांच्या मते जुलुम हे पाप आहे. तुम्ही विचारलेत की जुलुम म्हणजे काय? तर उत्तर मिळेल, ठार मारणे किंवा दुसऱ्यांचा छळ करणे किंवा त्यांची मालमत्ता बळकावणे. आत्महत्त्या व स्वतःचे अवयव तोडणे ही देखील पापे आहेत. तथापि परमेश्वरानेच खुरासानमधील त्याच्या शत्रूंची संपत्ती बळकावण्यास संमती दिली होती. तसेच (पवित्र धर्मयुद्धात) 'अल्लाहच्या मार्गा'वर असताना स्वतःला ठार मारून घेण्यासाठी पुढे येण्यास कुराणाने निःसंदिग्धपणे मान्यता दिलेली[१] आहे. तीच गोष्ट यात्रेच्या वेळच्या औपचारिक विधींची. हे विधी करण्याची परमेश्वरानेच आज्ञा दिलेली नसती तर ते विधी हा एक मूर्खपणाचा प्रकार ठरला असता. एवढेच काय, सर्वांत मोठे पाप समजले गेलेले 'कुफ्र' (म्हणजे धर्मावरील अश्रद्धा) हे सुद्धा परमेश्वराने तसे सांगितले नसते, तर पापमय समजले गेले नसते. अर्थात् एक चतुराईचे धोरण (तकिया) म्हणून[२] 'कुफ्र'चे पाप कबूल करणे जरूर असेल तेव्हा तसे करण्यास परमेश्वराने परवा-नगी दिलेली आहे. एरवी 'कुफ्र' हे सर्वांत मोठे पापच आहे असे परमेश्वराने सांगित-लेले आहे. मद्यपानाचे पापही अशाच प्रकारचे आहे. कुराणाने मद्यपानास मनाई

---

१. २[५१]. आपल्या बायकोच्या (शरीराचे) दुसऱ्यापुढे प्रदर्शन करणे ही गोष्ट परमेश्वराला वाटत असेल तरच पापमय ठरू शकते हे सिद्ध करण्यासाठी इब्ने हाज्मने हाच युक्तिवाद केलेला आहे.

२. कुराण ३[२७]. राजा व प्रजा यांच्यामध्ये धार्मिक मतभेद दिसू लागले तेव्हा हे 'तकिया'चे तत्त्व विकसित करण्यात आले. त्यानुसार विशेषतः शियापंथीयांनी आपल्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आपली धर्मश्रद्धा लपविणे दोषास्पद नाही असे मानण्यात येऊ लागले.

करण्यापूर्वी[1] मद्यपान करणे धर्मबाह्य कृत्य आहे असे कोणी म्हटले असते, तर तो नास्तिक ठरला असता. उलट कुराणाने मद्यपानास बंदी केल्यानंतर मद्यपान करणे धर्मबाह्य नाही, असे कोणी म्हटले तर तो नास्तिक ठरेल. म्हणूनच परमेश्वराने जे 'कुफ्र' ठरविले असेल तेच 'कुफ्र' होय. तीच गोष्ट 'जुल्म' (अयोग्य) कृत्याची. परमेश्वराने जी गोष्ट 'जुल्म' ठरविली असेल तीच गोष्ट अयोग्य होय. परमेश्वर कधीच चुकत नाही. ज्या परमेश्वरी आज्ञेचे पालन करणे माणसाला शक्य नसेल आणि तिच्या अवज्ञेबद्दल त्याला परमेश्वराने सजा केली असली तरी अशा प्रकारची अवज्ञा पापमय ठरू शकत नाही. कारण स्वतः परमेश्वराने तशी ती ठरवलेली नाही.

इब्ने हाज्म याच्या चांगले व वाईट यासंबंधींच्या सनातन मतांच्या अगदी विरुद्ध टोकाची आणि परंपरागत विचारांना सोडून अशी मते मुताझिली या पंथाच्या मंडळींनी मांडलेली आहेत. हा पंथ इस्लामी इतिहासाच्या तिसऱ्या शतकातील, 'स्वतंत्र, स्वेच्छे'च्या तत्त्वाचा पुरस्कार करणारा एक महत्त्वाचा पंथ होता. या पंथाच्या मते परमेश्वर कधीच काही वाईट करीत नसतो. 'कुफ्र' किंवा दुष्टता अस्तित्वात असावी अशी त्याची इच्छा नसते. अश्रद्ध माणसाने अश्रद्धा बाळगावी किंवा दुष्ट माणसाने दुष्टता करावी अशी परमेश्वराची इच्छा नसते. त्याची अशीही इच्छा नसते की त्याची नालस्ती केली जावी किंवा प्रेषिताची हत्या व्हावी. या बाबतीत मुताझिली पंथीय कुराणातील काही आयतांचा आधार घेतात. त्या आयतात असे म्हटले आहे, की आपल्या सेवकांच्या नास्तिकतेमुळे परमेश्वराला काही आनंद होत[2] नसतो. परमेश्वराला ज्याचा राग येतो त्या गोष्टी पापी माणसे करीत असतात आणि परमेश्वराला जे आवडते ते ते करीत[3] नाहीत. मुताझिलींचे असे म्हणणे आहे, की अश्रद्ध किंवा पापी लोक जसे वागतात तसेच त्यांनी वागावे अशी स्वतः परमेश्वराचीच इच्छा असेल तर मग परमेश्वरी आज्ञाच[4] ते कार्यवाहित आणीत आहेत आणि म्हणून ते ईश्वरी प्रसादाला पात्र ठरतात. खरे तर परमेश्वर फक्त चांगलेतेच करीत असतो. कारण तो सर्वांत सुज्ञ आहे. आणि म्हणून तो आपल्या सेवकांचा सांभाळ करतो ते त्याच्या सुज्ञतेचा एक भाग

---

१. ५[९२]. दुसऱ्या एका आयतात (२[२१६]) दारू काही अंशी चांगली असली तरी दारूचा वाईटपणा तिच्यातील चांगलेपणापेक्षा जास्त आहे असे सांगितले आहे.

२. ३९[९].

३. ४७[१०].

४. मुताझिलींच्या युक्तिवादाला इब्ने हाज्म याचे उत्तर असे की परमेश्वराची इच्छा असेल तर तो अश्रद्ध माणसाला 'कुफ्र' करण्यास आणि पापी माणसास पाप करण्यास प्रतिबंध करू शकेल. परमेश्वर असे करू शकणार नाही असे समजणे म्हणजे त्याच्या सर्वज्ञतेविषयी शंका घेणे होय. आणि म्हणूनच तो नास्तिकपणा होय.

म्हणूनच. असे असले तरी माणूस स्वतःची भली बुरी कर्मे स्वतःच 'जन्माला घालतो' आणि त्यामुळे त्याला त्याच्या कर्मानुसार भला बुरा मोबदला मिळत असतो. [1] भल्या-बुऱ्यातील फरक समजण्यासाठी विशिष्ट ज्ञानाची व योग्यतेची आवश्यकता असते. परमेश्वराने कोणतीही 'प्रकटीकरणे' दिली नव्हती तेव्हापासून अशा प्रकारची योग्यता माणसामध्ये अस्तित्वात आहे. फरक इतकाच की माणसाने कसोटीला उतरावे व त्याला ज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने अल्लाहला अपेक्षित असलेल्या कर्तव्यांचे शिक्षण अल्लाहच्या कृपेने प्रेषितांद्वारे मनुष्यमात्राला[2] मिळाले.

---

१. इब्ने हाज्म म्हणतो, हे दुष्टपणाचे व तिरस्करणीय विधान करणारी मुताझिलीं-मधील एक श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती वस्तुतः असेच म्हणत आहे, की काफीर (नास्तिक) हे परमेश्वराने निर्माण केलेले नाहीत. कारण काय तर ते (काफीर) मानवी शरीर व 'कुफ्र' यांच्या मिश्रणातून बनलेले आहेत. आणि यापैकी, त्याचे फक्त शरीर परमेश्वराने तयार केलेले आहे. त्यांच्यातील 'कुफ्र' ला परमेश्वर जबाबदार नाही.

२. शाहरिस्तानी म्हणतो, "अशा पद्धतीचा युक्तिवाद करणाऱ्या मुताझिलींवर इब्ने हाज्म याचा असा आरोप होता, की ही मंडळी कुराणातील मूळ गोष्टींचा चलाखीने वापर करीत असतात. इब्ने हाज्मने 'स्वतंत्र विचारकां'च्या मतावरही हल्ला चढविला आहे. या विचारकांचे असे मत होते, की जाळणे हा जसा अग्नीचा 'नैसर्गिक' स्वभाव किंवा थंडपणा हा जसा बर्फाचा 'नैसर्गिक' स्वभाव त्याचप्रमाणे माणसाची कर्मे ही त्याची 'नैसर्गिक' प्रकृती होय. इब्ने हाज्मचा असा दावा होता, की मेलेल्या माणसांच्या बाबतीत सुद्धा ही मते खरी ठरू शकतील. तो पुढे म्हणतो, "लोक म्हणतात की माणसाच्या कृती 'जन्माला घातल्या जातात' आणि माणसाने फक्त आपल्या इच्छेचा उपयोग केला पाहिजे." "आता आम्हाला असे दिसून आले आहे की," इब्ने हाज्म पुढे म्हणतो, "आपल्या इच्छेवर मनुष्याला नियंत्रण ठेवता येत नाही अथवा आपल्या मनाप्रमाणे तिचा चतुराईने हवा तसा वापर करता येत नाही. माणसाला आपल्या शरीराच्या हालचाली करता येतात किंवा निश्चल राहता येते. परंतु इच्छाशक्ती त्याला नियंत्रित करता येत नाही. कारण पुष्कळदा एखादा सुदृढ शरीराचा माणूस सुरेख स्त्रीची अभिलाषा मनात बाळगत असल्याचे आपण पाहतो. पण केवळ भीतीपोटी तो त्या बाबतीत काही करत नाही. माणसाला वास्तविक रात्रीच्या थंडीत किंवा दुपारच्या उन्हात नमाज पढण्यापेक्षा झोपायला आवडते. उपवासाच्या दिवसात खावेखावेसे वाटते आणि आपल्याजवळील पैसे दान म्हणून देण्यापेक्षा जवळ घट्ट बाळगून ठेवावेसे वाटते. परंतु आपली इच्छा जबरदस्तीने दडपून प्रत्यक्ष व्यवहारात तो तिच्या-विरुद्ध वागतो. आपल्या इच्छेला आपणाला हवे तसे वळण लावण्याचे साधन त्याच्या-जवळ असत नाही."

या संदर्भात असे म्हणता येईल, की भल्या-बुऱ्याच्या जबाबदारीसंबंधीची शिया-पंथीयांची विचारसरणी मुताझिली पंथीयांच्या विचारांशी पुष्कळ जुळते. एक म्हणजे दोघांच्या मते कोणत्याही अनिष्ट कृतीच्या बाबतीत परमेश्वर निर्दोष ( मुनाझाह ) असतो. त्यांच्या सर्व कृती ज्ञान व भलाई यांच्याशी सुसंगत असतात. शिवाय परमेश्वर हा सर्वसमर्थ आहे. अर्थात् त्याला करता येतात त्या सर्वच गोष्टी तो करतो असे नाही.[1] परमेश्वर कोणतीही वाईट गोष्ट कधी करीत नाही. त्याच्याकडून कोणतीही अनिष्ट कृती होणे शक्य नाही. कारण ( अ ) वाईट कृत्ये करणाऱ्या माणसाला आपण काय करीत आहोत याची जाणीव असते किंवा ( आ ) त्याला त्याची जाणीव नसते अथवा ( इ ) पापकृत्य करणे त्याला अटळ होते किंवा ते करणे जरूर असते किंवा ( ई ) पापकृत्य टाळणे त्याला शक्य असते आणि ते करण्याची गरज नसते परंतु ते तो निर्हेतुकपणे करतो. यापैकी पहिल्या प्रकारच्या परिस्थितीत परमेश्वर अज्ञानी आहे असे गृहीत धरलेले आहे; दुसऱ्या प्रकारच्या परिस्थितीत तो दुर्बल आहे असे मानलेले आहे; तिसऱ्या प्रकारात परमेश्वरालाच माणसाच्या दुष्कृत्यांची गरज वाटते असे गृहीत धरलेले आहे आणि चौथ्या प्रकारच्या परिस्थितींत तो मूर्ख आहे असे मानलेले आहे. यापैकी एकही गोष्ट परमेश्वराच्या बाबतीत गृहीत धरता येणार नाही.

मानवी कृतीविषयी इमामीं( शिया )ची अशी धारणा आहे की माणूस ही या बाबतीत स्वतंत्रपणे काम करणारी एक कारक शक्ती आहे. चांगल्यावाईट कृती या माणसाच्या विचारशक्तीद्वारे घडत असतात. म्हणून शरियत किंवा कायदा यांच्या संदर्भात त्यांचा विचार न करता खुद्द त्या कृतीच्या संदर्भात त्या चांगल्या की वाईट हे पाहिले पाहिजे. इमामींनी चांगुलपणाची अशी व्याख्या केली आहे, की जी गोष्ट मनुष्य आपल्यांतील स्वतंत्र व समर्थ कारकशक्तीच्या द्वारे करतो आणि जिच्यामुळे तो या जगात गौरवपात्र आणि पुढील जगात बक्षीसपात्र होतो ती गोष्ट म्हणजे चांगुलपणा आणि ज्या गोष्टीमुळे तो निंदा व शिक्षा ओढवून घेतो ती गोष्ट वाईटपणा ( कुबह ).

एखादी कृती चांगली की वाईट यासंबंधीचा निर्णय कधीकधी तत्काळ करता येणे शक्य असते. उदाहरणार्थ, लाभप्रद सत्य व हानिप्रद असत्य. तर कधी कधी या बाबतीत विचार करूनच निर्णय करता येतो. उदाहरणार्थ, तात्कालीक उपाय म्हणून बोललेले असत्य किंवा हानिप्रद होईल असे सत्य. अशाप्रकारचे असत्य किंवा सत्य चांगले की वाईट याचा निर्णय विचार व चिंतन याद्वारे करता येतो. तथापि अशाही काही गोष्टी असतात, की त्यांचा चांगलेवाईटपणा कोणा माणसाने ठरवावयाचा नसतो. तो कायद्याद्वारेच ठरविता येतो. उदाहरणार्थ, रमझानमधील शेवटच्या दिवशी उपवास करणे योग्य आहे काय आणि

---

१. असे सांगून परमेश्वरच पाप जन्माला घालतो या आरोपातून त्याची मुक्तता करण्याचा शियांनी प्रयत्न केला आहे.

त्यानंतरच्या दिवशी (म्हणजे शव्वाल महिन्याच्या पहिल्या दिवशी) उपवास करणे अयोग्य आहे काय, ही बाब.

जरा वेगळ्या प्रकारे शियांच्या दृष्टिकोणाचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल :

परमेश्वर हाच सर्वांचा निर्माता आहे. परमेश्वर फक्त चांगलेच निर्माण करतो आणि वाईटाची निर्मिती सैतान करतो असे झरथुष्ट्री लोकांप्रमाणे मानणे इस्लामविरोधी आहे. तथापि परमेश्वर चांगल्या-वाईट गोष्टींच्या निर्मिती-साठी कोणाचा तरी माध्यम म्हणून उपयोग करू शकतो किंवा करीत असतो. देवदूतांना किंवा अन्य कारकशक्तींना तो आपली सृजनशक्ती देतो. परमेश्वराच्या सर्वाधिकारप्राप्त सेवकांच्या चांगल्या-वाईट कृती या त्यांच्या स्वतःच्या असतात; परमेश्वराच्या असत नाहीत आणि त्यांना असलेल्या निवडीच्या स्वातंत्र्यानुसार त्याची बरीवाईट फळे त्यांना मिळविता येतात. परमेश्वराने आज्ञा केलेल्या किंवा मनाई केलेल्या कृती ते आपल्या इच्छेनुसार करतात. स्वतःमध्ये नसलेल्या परंतु परमेश्वराकडून प्राप्त झालेल्या शक्तीमुळेच त्यांच्या हातून कर्मे घडत असली तरी त्यांना चांगल्या वा वाईट कृतींतून निवड करण्याचे परमेश्वराने स्वातंत्र्य दिलेले असते. आणि परमेश्वरच त्यांच्या कर्मांची चांगली वाईट फळे निश्चित करीत असतो. असे असले तरी चांगल्या-वाईटाचा निर्माता परमेश्वरच आहे. आणि त्याचा सेवक हा त्याचा, या कृतीच्या बाबतीतील केवळ प्रतिनिधी व कारक माध्यम आहे.

सूफीवादाच्या गूढवादी तत्त्वज्ञानाने, वास्तव प्रश्नाशी ही सर्व चर्चा गैरलागू आहे, असे सांगून ती फेटाळून लावली. सूफी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने वाईट हे स्वतः मुळी अस्तित्वात नसतेच, ती एक अवास्तव वस्तू आहे. कारण परमेश्वरनिर्मित चांगुलपणाचे ते उलटे केलेले किंवा विपर्यस्त रूप [1] आहे. तथापि असेही काही सूफी तत्त्वज्ञ होते, की ज्यांची अरबीभाषेतील 'नफ्स' (हीन दर्जाचा 'आत्मा' किंवा 'शरीर') या शब्दांच्या दुहेरी अर्थामुळे फसगत झाली आणि त्यांनी असे प्रतिपादन केले, की जन्मतःच मुळी मनुष्याच्या आत्म्याचा कल दुष्टतेकडे असतो. मनुष्यामध्ये दोन गुणधर्म असतात. पहिला गुणधर्म त्याला चांगुलपणा करू देत नाही आणि दुसरा गुणधर्म त्याला पापी वासनेकडे जाण्यास उत्तेजित [2] करतो. विवेकबुद्धी व कायदा यांना मंजूर नसलेली

---

१. जलाल अल् दीन रूमी म्हणतो, "एखादी गोष्ट नसणे किंवा ती दोषपूर्ण असणे हे सर्व कलावस्तूंचे सुंदर दर्शन घडविणाऱ्या आरशातील प्रतिबिंब होय....अनैतिकता हे सामर्थ्याचे व वैभवाचेच आरशातील उलट प्रतिबिंब होय."

२. कुशायरीने असे म्हटले आहे, की जलाल अल्-दीन रूमी याची परमेश्वराच्या चांगुलपणाविषयी खात्री होती तरी माणसांतदेखील पापवृत्ती वसत असते असे त्याला खात्रीपूर्वक वाटत असे. परमेश्वरापाशी दुष्टता नाही पण त्याने निर्माण केलेल्या

[ पुढील पान पाहा ]

अभिमान, मत्सर, हाव, क्रोध, द्वेष इत्यादी सर्व पापे व हीन दोष त्याच्यामुळेच ( म्हणजे हीन दर्जाच्या आत्म्यामुळे किंवा शरीरामुळे ) तत्काळ उद्भवतात. कारण तो ( 'आत्मा' ) दुष्टतेचे वसतिस्थान असतो. म्हणून सवयीच्या मार्गापासून आपल्या आत्म्याला माणसाने दूर नेणे आणि धर्मनिष्ठेच्या लगामाने त्याच्या अभिलाषांना आवरणे हा एकच मार्ग मनुष्यापुढे आहे.

चांगल्या जीवनासंबंधीच्या विविध धर्मपंथीयांनी कल्पिलेल्या घटकतत्त्वांची चर्चा धर्मविषयक अधिकृत पुस्तकात सूफीवादाचा विचार करताना सामान्यतः केलेली असली, तरी परमेश्वरासंबंधींची वास्तवता हे जे सूफीवादाचे मूलभूत तत्त्व आहे त्यामुळेच तज्ज्ञ धर्मज्ञांना आपापले उपसिद्धान्त विकसित करण्यास प्रवृत्त केले. यातूनच, अगदी कायद्याचे जीवनातील स्थान यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावरदेखील परस्परविरोधी विचार मोठ्या प्रमाणावर जन्माला घातले गेले. हुसेन मन्सूर ई-हल्लाज या एका उच्चपदस्थ व विलक्षण अशा पंडितामध्ये धर्मश्रद्धेपेक्षा " धर्मावर श्रद्धा असली की पुरे, नैतिकतेची काही आवश्यकता नाही " ही विचारसरणी जास्त स्पष्टपणे दिसून येत असे. कारण शरियत ( कायदा ) हा परमेश्वराने सांगितलेला असला तरी त्याचे पालन ही एक स्वतंत्र बाब आहे. म्हणून पापकृत्य घडणे ही कायद्याची अवज्ञा असली, तरी ती परमेश्वरी इच्छेची अवहेलना ठरत नाही. अबू सैद इब्ने अबी अल् खैर ( मृत्यू : १०४८ ) या इराणी गूढवादी तत्त्वज्ञाच्या मताप्रमाणे देखील अनुभवजन्य धर्माचे विभिन्न प्रकार हे अंतिम[1] अर्थाने निरर्थक होत. याउलट कुशाय्री ( मृत्यू : १०७४ ) याचे असे म्हणणे होते, की शरियत ही सत्याच्या ( हकीगत ) आविष्काराची एक पद्धती आहे; मनुष्य-मात्रासाठी तयार केलेल्या खुद्द परमेश्वराच्या आज्ञा आहेत आणि या आज्ञांचा हेतू परमेश्वराची सेवा करताना मनुष्यमात्राने कसे वागले पाहिजे हे सांगणे हा आहे. बगदाद येथे जुनैद हा आणखी एका सूफीवादी तत्त्वज्ञ होऊन गेला. गझालीवर त्याचा अधिक प्रभाव पडलेला होता. या तत्त्वज्ञाच्या मताप्रमाणे पैगंबरांचे अनुसरण न करणाऱ्यांना परमेश्वराकडे नेणारे सर्व मार्ग बंद आहेत. कुराणातील तत्त्वे आणि सुन्ना यांना सूफी तत्त्वज्ञान बांधलेले आहे असे स्पष्ट शब्दात तो सांगतो. तो म्हणतो, ज्याच्या उजव्या हातात ईश्वरी ग्रंथ ( कुराण )

---

[ मागील पानावरून ]

मनुष्यप्राण्यात ती आहे असे त्याचे मत होते. आणि मनुष्यातील दुष्टता हीसुद्धा सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सर्वव्यापकतेचीच एक अभिव्यक्ती आहे. कारण मनुष्याच्या सर्व भल्याबुऱ्या कृती परमेश्वरी हेतूच्या पूर्तीसाठीच होत असतात.

१. तो म्हणत असे, की आपण कोणत्याही मजहबचे ( धार्मिक किंवा आचार-पंथाचे ) नाही तर सर्व पंथांची अतिशय बिकट अशी अंगे आपण स्वीकारलेली आहेत. तसेच हा पंडित 'धिक्र' ( वेळी अवेळी प्रार्थना करीत राहणे ) करीत असल्यामुळे 'फिक़ाह 'ने घालून दिलेल्या नियमांचे त्याच्याकडून उल्लंघन होत असे.

आणि डाव्या हातात मुहम्मदांचा सुन्ना आहे आणि जो त्यांच्या प्रकाशात वाटचाल करतो आणि म्हणूनच संदेहाच्या गर्तेत किंवा धर्मद्रोहाच्या अंधारात कोसळत नाही, त्याच्यासाठीच हा ( सूफीतत्त्वाचा ) मार्ग आहे. असे असले तरी अगोदरच्या काळात होऊन गेलेला सूफीवादी अबू अल् हुसेन नूरी ( मृत्यू ९०८ ) याने असे स्पष्टपणे म्हटले आहे की सूफीवाद म्हणजे कोणत्याही एका पद्धतीचा आचार करणे नाही किंवा नुसते ज्ञान नाही. नैतिकता व ईश्वरी चारित्र्य संपादन करण्याचा प्रयत्न म्हणजे सूफीवाद.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे या गोष्टीचा संपूर्णतया नाही तरी बऱ्याच अंशी नैतिकतेशी संबंध आहे. त्यामुळे अधिक प्रबुद्ध सूफीवाद्यांपैकी काहीजणांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे, की खरा सत्पुरुष आपल्या बांधवातच राहतो, त्यांच्याशीच व्यापार, विवाह आदी व्यवहार करतो आणि क्षणभर देखील ईश्वराचे विस्मरण न होऊ देता समाजजीवनात सहभागी होत असतो. अर्थात् सत् तत्त्वाच्या प्राप्तीसाठी संन्यासी जीवनच स्वीकारले पाहिजे असेही काही सूफी मानीत असत. सूफीवादाच्या प्रारंभीच्या काळात कुराणातील दैववादी तत्त्वज्ञानाची तवक्कुल ( परमेश्वरावर ' सर्वस्वी ' विसंबणे ) च्या सिद्धान्तामध्ये, म्हणजेच निवृत्तीवादामध्ये स्वाभाविक परिणती झाली होती. व्यक्तिगत गोष्टींची संपूर्ण उपेक्षा आणि प्रेते धुणाऱ्या माणसाच्या हातातील प्रेताप्रमाणेच परमेश्वराच्या हातात मनुष्य मात्र असतो या विचारातून उद्‌भवलेली, परमेश्वरी इच्छेला शरण जाण्याची संपूर्णपणे विरक्त व अलिप्ततावादी वृत्ती हा या निवृत्तीवादाचा अर्थ होय. या वर्गातील सूफीवाद्यांच्या काही वक्तव्यांवरून असे स्पष्टपणे दिसते, की जीवनयापनासाठी आवश्यक अशी नित्याची कामेसुद्धा ते करीत नसत आणि आपल्या निर्वाहाचे सर्व काम ते ' परमेश्वरा 'वर सोपवून स्वस्थ बसत. कारण ' स्वर्गातील व पृथ्वीवरील सारी संपत्ती ' परमेश्वरापाशी आहेच अशी त्यांची धारणा होती. भिक्षा मागायची नाही, कोणी दिली तर ती नाकारावयाची नाही आणि कशाचा संग्रह करावयाचा नाही ही ' तवक्कल 'ची काही तत्त्वे होती. समाजाच्या मदतीवर जगण्याच्या या प्रवृत्तीला समाजाचा विरोध होऊ लागला तेव्हा काही अतिरेकी सफीवादी वगळून बाकीच्यांनी त्या प्रवृत्तीचा त्याग केला. सूफीवाद्यांतही आपली रोजची भाकरी आपण स्वतः मिळवणे हे पवित्र कर्तव्य आहे असे मानणारे काही होते. एवढेच नव्हे तर त्यांचे असेही मत होते, की प्रसंगविशेषी देखील ( उदाहरणार्थ, आजारपणात ) आपल्या बांधवांचे सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करणे हे ' तवक्कुल ' सिद्धान्ताविरुद्ध आहे.

अधिक नेमस्त प्रवृत्तीच्या सूफी पंडितांच्या मते मनुष्यसमाजापासून अलिप्त राहण्याची किंवा जीवनातील नित्य कर्मांचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. तथापि निवृत्तिमार्ग ही एक चांगली गोष्ट आहे असेच सर्वसाधारणपणे सूफीवाद्यांचे मत होते. परंतु तो कोणत्या प्रकारचा असावा यासंबंधी त्यांच्यात मतभेद होते. काहींच्या मते, जे ' हराम ' ( शरियतने मना केलेले ) असेल त्यापासून दूर राहावे आणि जे ' हलाल ' ( शरियतने कायदेशीर मानलेले ) असेल त्यापासून दूर राहण्याची गरज नाही. कारण

परमेश्वराने हलाल कृत्ये करण्यास परवानगी दिलेली आहे. म्हणून परमेश्वराने एखाद्या माणसाला अमाप संपत्ती दिली असेल, तर त्याबद्दल त्याने परमेश्वराविषयी कृतज्ञ राहावे आणि आपल्या संपत्तीचा आपल्या इच्छेप्रमाणे उपभोग घ्यावा. अशा माणसावर टीका करण्याचे कारण नाही. कारण दैवी सत्तेद्वारे त्याला ती संपत्ती मिळालेली असते. इतर काही सूफीवाद्यांचे म्हणणे असे, की 'हराम' गोष्टीपासून सर्वांनी अलिप्त राहावे ही मुळी परमेश्वरी आज्ञाच आहे. त्यामुळे तसे करण्यात काही मोठे विशेष नाही. खरे महत्त्व 'हलाल'पासून दूर राहण्यात आहे. खराखुरा धर्मपरायण मनुष्य सहनशील असला पाहिजे आणि संसारात त्याला जे लाभलेले आहे त्यावर त्याने संतुष्ट राहिले पाहिजे. सूफीवाद्यांतील सर्वसाधारण मत या विचाराला अनुकूल आहे आणि कोणत्याही प्रकारची खंत न करता ऐहिक संपत्तीचा त्याग करणे म्हणजे 'झुहद' असे त्यांचे ठाम मत आहे. आणखी काही सूफीवाद्यांच्या मते 'झुहद' म्हणजे सर्व लौकिक गोष्टींच्या विचारांपासून अथवा चिंतेपासून 'मुक्ती.'

इतर अनेक गुण सूफीवाद्यांनी ठरविले. उदाहरणार्थ, आशावाद, प्रांजलपणा आणि परमेश्वराच्या चांगुलपणाविषयी श्रद्धा व कृतज्ञता, मनुष्यमात्राच्या सर्व कृतींकडे परमेश्वराचे लक्ष असते याची जाणीव, खरी धर्मनिष्ठा, चिकाटी, सत्य, शालीनता आणि 'फुतुव्वा'. 'फुतुव्वा' या गुणविशेषाचे दिलदारपणा, औदार्य, निःस्वार्थी वृत्ती वगैरे अनेक अर्थ आहेत. अबू अली अल्-दकाक याच्यासंबंधीच्या एका कथेद्वारे हा गुण सूचित केला गेला आहे. तो एकदा म्हणाला होता, "या मनुष्यमात्रांचे पैगंबराशिवाय अन्य कोणीही संरक्षण करणार नाही. 'आत्म्याच्या पुनरुज्जीवनाच्या दिवशी' बाकीचे सर्वजण म्हणतील 'मला, मला', परंतु तोच तेवढा सांगेल, "माझ्या माणसांना, माझ्या माणसांना." 'फुतुव्वा' या गुणविशेषाच्या याशिवाय अनेक व्याख्या अस्तित्वात आहेत. त्यापैकी फदल ( इब्ने रबी ) ची व्याख्या अशी, की इस्लामी बांधवांच्या दोषांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे 'फुतुव्वा'. आपल्या शेजाऱ्यापेक्षा स्वतःला मोठे न समजणे आणि दुसऱ्याकडून न्याय्य वागणुकीची अपेक्षा न करता तशी वागणूक स्वतः मात्र दुसऱ्याशी करणे हे आणखी या शब्दाचे दोन अर्थ होत. माणूस संत असो की नास्तिक असो, कोणताही भेदभाव न करता त्याच्याबरोबर जेवणे ही आणखी एक व्याख्या आहे. या व्याख्येच्या संदर्भात एक कथा खूप प्रचारात होती. कारण इराणी नीतिवादी तत्त्वज्ञ सादी याने आपल्या 'बोस्तान' या पुस्तकात ती कथा सांगितली आहे. ती कथा अशी : 'अल्लाहचा मित्र' इब्राहिम हा कोणातरी पाहुण्याला बरोबर घेतल्याशिवाय कधीही एकटा जेवायला बसत नसे. एकदा, ज्या पाहुण्याबरोबर तो भोजन करणार होता, तो पाहुणा मॅगियन आहे असे मागाहून त्याच्या लक्षात आले तेव्हा पाहुण्याने इस्लाम धर्म स्वीकारला नाही तर त्याला जेवण मिळणार नाही, असे इब्राहिमने सांगितले. पण लगेच त्याला एक दैवी प्रकटीकरण मिळाले. ते असे होते : "तो नास्तिक होता तरी गेली पन्नास वर्षे आपण त्याला जेऊ घातले आहे. तेव्हा त्याने धर्म

बदलला पाहिजे अशी मागणी न करता त्याला दोन घास दिले असतेस [ तर काही बिघडले नसते. ]"

'फुतुव्वा 'च्या जे विरुद्ध असेल ते सर्व दुर्गुण होत आणि ते टाळले पाहिजेत. असे दुर्गुण म्हणजे अभिमान, हाव व मत्सर. यांपैकी मत्सरापासून विशेषतः दूर राहिले पाहिजे. कारण एखाद्याचा मत्सर करणे याचा अर्थ संपत्ती वाटताना परमेश्वराने अन्याय केला आहे असे गृहीत धरणे होय.

आता पुन्हा गझाली याच्या तत्त्वज्ञानाकडे वळू या. इस्लाममधील सनातनी मंडळी सूफीवाद हे एक धर्मद्रोही तत्त्वज्ञान आहे असे फार काळ मानीत होते. सूफीवाद्यांतील काही लोकांचा नीतिवादाला असलेला विरोध याला कारणीभूत होता. शारमधील तत्त्वे व सूफी तत्त्वज्ञानातील गूढवादी विचार यांचा मेळ घालण्याची कामगिरी गझालीनेच केली. त्यामुळे सूफीवादाला इस्लामी तत्त्वज्ञानाचाच एक भाग अशी मान्यता मिळाली. आणि परिणामी यमनियम व कायदे यांचे वर्चस्व असलेल्या इस्लामच्या स्वरूपात नैतिकतेच्या खऱ्या कल्पनांना स्थान मिळाले. सॉक्रेटिसप्रमाणे गझाली याने योग्य कृती जी ज्ञानामागोमाग येते असे सांगून आपल्या तत्त्वज्ञानाची ज्ञानाच्या पायावर उभारणी केली. परंतु सॉक्रेटिसप्रमाणे केवळ शास्त्रीयता किंवा ज्ञान हीच अखेरची निर्णायक सत्ता आहे असे मानावयास तो तयार नव्हता. परमेश्वरानेच आपल्या प्रेषितांच्याद्वारे मनुष्यमात्राला जे ज्ञान दिले आहे ते काय आहे ते स्वतः शोधून काढणे सामान्य मनुष्यमात्राला शक्य नाही. 'कुराण ' व 'परंपरां ' द्वारे सांगितलेले ज्ञानच अधिकृत आहे असे मानले पाहिजे. त्या ज्ञानापलिकडे सामान्य माणसाने जाण्याचे कारण नाही. गझाली म्हणतो, की माणसाची जीभ जी अनेक पापे करते त्यापैकी एक असे की ईश्वराचे गुणावगुण, कलाम (विद्वानांनी सांगितलेले धर्मशास्त्र) आणि हुरुफ ('आवश्यक' कर्तव्यासंबंधी गूढवादी तत्त्वे) याविषयी सामान्य माणसे फारच शंकाकुशंका घेत असतात. खरे तर कुराणात सांगितलेल्या गोष्टींचे पालन कसे करता येईल याचाच फक्त सामान्य जनांनी विचार करायला हवा. पण या लोकांना हे काम म्हणजे ओझे वाटते आणि उगीचच ते लुडबुड करीत असतात. शिवाय आपण विद्वान आणि ज्ञानी आहोत असा भ्रम गावढळ लोकात सैतान निर्माण करतो आणि मग हे लोक धर्मतत्त्वज्ञानाच्या (इल्म) विषयात तोंड खुपसतात. आणि या उठाठेवीत सैतान त्यांना इतके मनसोक्त डुंबू देतो, की विद्वत्तेचा आव आणून ही माणसे धर्मविरोधी गोष्टी बडबडू लागतात. पण आपण काय बोलतो आहोत याचा त्यांना पत्ता नसतो. सामान्य लोकांनी इतर कोणतेही पापकृत्य केले तरी ते 'इल्म ' विषयी, विशेषतः परमेश्वर व त्याचे गुणदोष यांविषयी चर्चा करण्याच्या पापापेक्षा निश्चितच बरे.

दुसऱ्या एका परिच्छेदात गझाली म्हणतो की, धर्मनिष्ठेसाठी सखोल ज्ञानाची मोठी आवश्यकता आहे असे नाही. याबाबतीत मार्गदर्शक म्हणून एखाद्या माणसाला एखाद्या गुरूची आवश्यकता वाटली तर त्याने जी व्यक्ती आत्मानुशासन करू शकते,

कमी खाते व कमी झोपते, प्रार्थनेत बराच काळ व्यतीत करते, खूप दानधर्म करते आणि जिच्या अंगी सोशिकपणा, कृतज्ञता, परमेश्वरावर श्रद्धा, चित्तशांती इत्यादी नैतिक गुण आहेत अशा एखाद्या व्यक्तीची निवड करावी. असा माणूस हा पैगंबरांच्या तेजाचा एक किरणच होय. अशा गुरूचे अनुकरण करणे लाभदायक ठरेल. गझाली पुढे म्हणतो " परंतु असे गुण असलेली माणसे दुर्मिळ आणि लाल गंधकापेक्षाही मूल्यवान असतात."

आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ मूळ कुराणाचा व हदिसांचा भरपूर उपयोग करून गझाली याने तत्त्वज्ञांवर आणि त्यांनी हाताळलेल्या विषयांमागील त्यांच्या मानसशास्त्रीय भूमिकेवर हल्ले चढविले. तथापि त्याने स्वतः काही नीतितत्त्वांचा स्वीकार केलाच होता. या तत्त्वांची तपशीलवार चर्चा त्याने आपल्या विचारसरणीचे विवरण करताना केलेली आहे. विशेषतः आत्म्याचे तीन भाग आणि चार पायाभूत गुण आहेत हे प्लेटोने प्रतिपादलेले तत्त्व नीतिविषयक प्रश्नांवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने त्याला उपयुक्त वाटले.

उत्तम नीतितत्त्वे कोणती या संबंधीची परंपरावाद्यांची आणि मान्यताप्राप्त धर्मज्ञांची मते सांगून त्याने जुन्या पद्धतीने विषयाच्या चर्चेस प्रारंभ केलेला आहे. कुराणातील या विषयाला धरून असलेली वचने प्रथम सांगून नंतर जिब्रिअल देवदूताने मुहम्मद पैगंबरांना केलेला उपदेश कथन केला आहे. तो असा : " तुला झिडकारणाऱ्याशी मैत्री कर, तुला लुबाडणाऱ्याला दे आणि तुझे वाईट केले असेल त्याला क्षमा कर. " त्यानंतर उत्तम नैतिक आचरण हाच इस्लामचा पाया आहे आणि माणूस चांगल्या चारित्र्यानेच मोठा होत असतो– अशा प्रकारची सुभाषिते दिलेली आहेत. तथापि गझालीने पुढे असेही बजावले आहे, की नैतिकतेचा खरा गाभा निव्वळ नीतिविषयक मते आणि सूत्रे यांच्याद्वारे हाती लागणार नाही. कारण ही मते व सूत्रे नैतिकतेच्या केवळ काही बाह्य लक्षणरूपी ' परिणामांशी ' संबधित असतात. खरे म्हणजे मनुष्यप्रकृती ( खल्क ) व नैतिक गुण ( खुल्क ) ही दोन रूपे आहेत आणि त्यांचा एकत्रच विचार केला पाहिजे. आपण जेव्हा म्हणतो की अमुक अमुक मनुष्य स्वभावाने आणि वागणुकीने फार चांगला आहे तेव्हा त्याचा अर्थ तो आतून व बाहेरून चांगला आहे असा असतो. कारण दृष्टिगम्य असे शरीर व मनोगम्य असा आत्मा व चैतन्य यांच्या मिश्रणातून माणूस बनतो. शरीर व आत्मा यांना स्वतःचे असे एक रूप असते. शरीर केवळ मातीचे असते तर आत्मा परमेश्वरी चैतन्याशी निगडीत असतो. त्याची एका निश्चित प्रकाराने रचना केलेली असते आणि कोणत्याही पूर्व विचाराशिवाय उत्स्फूर्तपणे आत्म्यातून कर्मांचा उगम होत असतो. ती कर्मे चांगली आणि उदारतापूर्ण असतील, तर त्याचा अर्थ ती जेथून उद्भवली ते उगमस्थान ' चांगले ' आणि तसे नसेल तर ते उगमस्थान ' वाईट '. म्हणून मनुष्याचे ज्ञान अथवा बाह्यकृती यांवर ही गोष्ट मुळीसुद्धा अवलंबून नसते.

चेहऱ्याची सुंदरता जशी चेहऱ्याच्या प्रत्येक अंगाच्या सौंदर्यावर अवलंबून असते तशी आत्म्याची आंतरिक सुंदरतादेखील आत्म्याच्या ज्या प्रवृत्ती आहेत त्यांच्या

पूर्णतेवर व समतोलपणावर अवलंबून असते. या प्रवृत्ती म्हणजे ज्ञान, क्रोध, वासना व न्यायवृत्ती. या चार ऐंद्रीयशक्ती ( कुव्वा ) होत. शब्द व श्रद्धा यांच्या संबंधांतील सत्य–असत्य आणि कर्माचा बरेवाईटपणा यांतील फरक सहजपणे करता येण्याच्या शक्तीत उत्तम प्रतीचे ज्ञान आहे. ज्ञानाची ही प्रवृत्ती मजबूत असली म्हणजे त्याला विवेकाची फळे येतात. आणि विवेक हा उत्तम नीतितत्त्वांचा ( अखलाक ) प्रमुख घटक आहे. मनुष्य विवेकाच्या सहाय्याने उग्र क्रोध कसा ' आवरतो ' अथवा ' मोकळा सोडतो ' यावर ' संयम 'शक्ती अवलंबून आहे. वासनेचे तसेच आहे. विवेकाच्या मार्गदर्शनानुसार म्हणजेच विचारशक्ती व शरियत यांच्या अनुषंगाने वागण्यावर वासना या प्रवृत्तीचा मोठेपणा अवलंबून आहे. विचारशक्ती व शरियत यांच्या सहाय्याने वासना व क्रोध याचे कसे नियंत्रण केले जाते यावर न्यायबुद्धीचा मोठेपणा अवलंबून आहे. या बाबतीत विचार-शक्ती सल्लागाराचे काम करीत असते, तर न्यायबुद्धी प्रत्यक्ष कृती करणारी शक्ती असते. या बाबतीत न्यायबुद्धी शिकारीच्या वेळी बरोबर नेलेल्या कुत्र्यासारखी असते. त्या कुत्र्याला शिकवून तयार करावे लागते. तसेच इच्छेचे आहे. ती खेळायच्या घोड्यासारखी आहे. त्याला कधी लगाम लावावा लागतो तर कधी त्याचा लगाम सैल सोडावा लागतो.

यानंतर ॲरिस्टॉटलप्रणीत ' मध्यबिंदू 'च्या सिद्धान्ताची चर्चा केलेली आहे. ज्या माणसामध्ये वर उल्लेखिलेल्या प्रवृत्ती संतुलित प्रमाणात असतात, तो माणूस निर्विवाद-पणे उत्तम चारित्र्याचा असतो. यांपैकी कोणत्याही प्रवृत्तीचा अभाव किंवा अतिरेक हा दुर्गुणांना कारणीभूत होतो. या प्रवृत्तीच्या दुसऱ्या टोकाला दुर्गुण असतात. दोन टोकांमधील मध्यबिंदू म्हणजे सद्‌गुण. सर्व गुणांत ' मातृस्थानी ' व ' मूलस्थानी ' असलेले गुण चार होत : विवेक, धैर्य, धोरणीपणा व न्यायवृत्ती. या चार गुणांतूनच बाकीचे सर्व गुण उद्भवतात.

चांगले गुण शिक्षणाने व सवयीने प्राप्त करणे शक्य असते हा ॲरिस्टॉटलचा म्हणून मानला गेलेला दुसरा एक सिद्धान्त गझालीनेही प्रतिपादन केला आहे. एखाद्या माणसाला आपल्या ठायी उदारतेचा गुण असावा असे वाटत असेल, तर त्यासाठी त्याने आपली संपत्ती सढळ हाताने वाटण्याच्या कलेचा सराव करणे हाच मार्ग आहे. त्याने या गोष्टीचा इतका सराव केला पाहिजे की, तो त्याचा एक स्वभावच बनेल. हीच गोष्ट इतर गुणांना लागू पडते. त्याचप्रमाणे दुर्गुणदेखील शिक्षणाद्वारे नाहीसे करता येतात किंवा त्यांचे चांगल्या सवयीत परिवर्तन करता येते.

काही लोक दुष्टतेच्या अधीन झालेले असतात आणि आत्म्याचे संयमन करणे व आपले नैतिक आचरण सुधारणे त्यांना कष्टप्रद वाटते. असे लोक असा युक्तिवाद करतात की, शरीराची वैशिष्ट्ये जशी बदलता येत नाहीत त्याचप्रमाणे आत्म्याच्या स्वाभाविक लक्षणात परिवर्तन करता येत नाही. हे लोक म्हणत असतात की, बुटबैंगण माणसाला आपली उंची वाढविता येत नाही किंवा कुरूप माणसाला सुंदर होता येत नाही, त्याचप्रमाणे आंतरिक कुरूपतादेखील नाहीशी करता येत नाही. शिवाय सद्‌गुणी होणे

याचा अर्थ राग, लोभ यांचे दमन करणे, जगाविषयींच्या प्रेमाशी आणि तशाच अन्य खोलवर रुजलेल्या प्रवृत्तींशी फारकत घेणे. दीर्घकालच्या अनुभवावरून असे म्हणता येईल, की मर्त्य मानवाचा स्वभाव व त्याच्याठायी सत्त्वरूपाने असलेल्या या प्रवृत्तींचे दमन करण्याचा खटाटोप करणे हा कालाचा अपव्यय आहे. तथापि गझालीच्या मते हा युक्तिवाद चुकीचा आहे. ज्यांना असे वाटते, की या प्रवृत्तींचे संपूर्णपणे दमन किंवा नाश करणे हाच आत्मसंयमनाचा हेतू आहे तेच लोक हा युक्तिवाद करीत असतात; पण वस्तुस्थिती तशी नाही असे गझालीने म्हटले आहे. चांगल्या हेतूनेच लोभाची प्रवृत्ती किंवा वासना-वृत्ती माणसात निर्माण करण्यात आली आहे. आणि ती प्रवृत्ती ही मनुष्याच्या प्रकृतीचे एक अत्यावश्यक अंग आहे. माणसातून अन्नाची वासनाच नाहीशी करून टाकली, तर तो नष्टच होईल; तसेच मनुष्यातील लैंगिक संभोगाची वासनाच नष्ट करून टाकली, तर मनुष्यजातच उरणार नाही. त्याचप्रमाणे मनुष्यातील राग पार निपटून टाकला, तर विनाश-कारी आपत्तीपासून त्याला आपले रक्षण करता येणार नाही आणि तो नाश पावेल. जोवर वासनेचे मूळ शिल्लक राहील तोवर संपत्तीविषयीचे प्रेम आणि त्यातून निर्माण होणारा लोभ व संपत्ती मिळविण्याची वृत्ती कायम राहील. या सर्व प्रवृत्ती पूर्णपणे नष्ट करणे हा आत्मसंयमनाचा उद्देश नसून, त्या योग्य प्रमाणात, अतिरेक व अभाव यांच्या-मधोमध, ठेवणे हा आहे.

यांपैकी कोणत्याही एका किंवा सर्व नैतिक प्रवृत्तींचे खरेखुरे संतुलन साधणे शारने भूषणास्पद मानले आहे. असे संतुलन जन्मतःच ज्यांना परमेश्वरी कृपाप्रसाद लाभलेला आहे त्यांच्या बाबतीत आपोआप घडते. परंतु ज्यांना असा कृपाप्रसाद लाभलेला नाही त्यांना अशा प्रकारचे संतुलन विवेकाने आणि शारने सांगितलेले अनुशासन पत्करूनच प्राप्त करता येते. शारने किंवा विवेकाने ज्या गोष्टी निषिद्ध ठरविलेल्या आहेत त्या गोष्टी केवळ टाळण्याने उत्तम चारित्र्य प्राप्त करता येत नाही. तर ज्या गोष्टी चांगल्या ठरविलेल्या आहेत त्या करणे आनंदप्रद वाटेल आणि तो आपला स्वभाव बनेल अशा रीतीने त्या करण्यानेच उत्तम चारित्र्य प्राप्त करता येते.

सद्प्रवृत्तींचे संस्कार जीवनभर करीत राहिले पाहिजे. त्याचा प्रारंभ माणसाच्या जन्मापासूनच करायला हवा. कारण त्यावेळी मुलाचे अंतःकरण एखाद्या अनघड व निर्दोष रत्नासारखे असते. संस्कारांनी माणसाला सच्चरित्र बनविता येते ( तसा तो झाला तर त्याला या आणि पुढील लोकात सुख लाभेल, आणि त्याचा मोबदला मिळेल. तसेच त्याच्या मातापित्यांना व गुरुजनांना त्यात वाटा मिळेल. ) किंवा दुश्चरित्र ( जनावरा-सारखा सुस्त ) बनविता येते. या अवस्थेत तो दुःखी होतो व एक दिवस नाहीसा होतो. या जगातील अग्नीपासून आपल्या मुलाचे रक्षण करणे हे तर त्याच्या बापाचे कर्तव्य आहेच; पण त्याहीपेक्षा नंतरच्या जगातील अग्नीपासून मुलाचा बचाव करणे हे त्याचे

अधिक मोठे कर्तव्य आहे. या कर्तव्याच्या पूर्तीसाठी मुलाला शिक्षण देणे, त्याच्यावर संस्कार करणे हाच मार्ग आहे. त्याला चांगले आचार व नीतितत्त्वांचे धडे दिले पाहिजेत. अनिष्ट सोबत्यांपासून त्याला दूर ठेवले पाहिजे; त्याला आरामाची सवय होऊ देता कामा नये. भपका व चैनी वस्तूंची हौस करू देता कामा नये; कारण त्यामागे लागल्याने त्याच्या म्हातारपणी त्याच्या आयुष्याचा नाश होईल आणि तो निरंतर नाश ओढवून घेईल. मुलासाठी सज्जन व धर्मशील दाई ठेवावी. ती निषिद्ध अन्न खाणारी नसावी. तशी ती असली तर निषिद्ध कर्मे करण्याकडे ती मुलाचा कल वळविण्याचे भय असते. विवेक करण्याची शक्ती मुलात निर्माण झाल्याची चिन्हे दिसतील तेव्हा लक्ष ठेवावे. लज्जा व नम्रता आणि काही गोष्टी करावयास नकार ही ती चिन्हे होत. मुलात विवेकाचा उदय झाल्याची ही लक्षणे समजावी. मुलगा मग बऱ्यावाईट कृतींत फरक करू लागेल. तसेच त्याला परमेश्वरी प्रसाद प्राप्त झाल्याचे आणि उत्तम रीतीने संतुलित असे चारित्र्य त्याला लाभल्याचे ते लक्षण होय.

अगदी प्रारंभी त्याला खादाडपणाची सवय लागेल. म्हणून त्याला भोजनाच्या वेळचे रीतीरिवाज शिकवले पाहिजे. उजव्या हातानेच जेवावे, जेवताना ईश्वराचे नामस्मरण करावे, जे आपल्याजवळ असेल ते प्रथम खावे, दुसऱ्याच्या आधी जेवण्याची घाई करू नये, अन्नावर नजर खिळवून बसू नये, तर दुसरे जेवतात त्यांच्याकडे लक्ष द्यावे. भरभर जेऊ नये, अन्न चांगले चावून खावे, न थांबता एकापाठोपाठ घास घेऊ नयेत आणि जास्त खाऊ नये. जास्त खाणे पशुवत् आहे हे मुलाला सांगितले पाहिजे. जी काही थोडी मीठभाकर मिळेल त्यावर समाधान मानण्यास त्याला शिकवले पाहिजे. रंगीबेरंगी अथवा रेशमी कपड्यांऐवजी साध्यासुध्या कपड्यांवर संतुष्ट राहावयास त्याला सांगितले पाहिजे. असले कपडे फक्त बायका घालतात, ते पुरुषांना बायकी बनवतात म्हणून ते त्याने घातले, तर पुरुष त्याची कुचेष्टा करतील हे मुलाला पटवून दिले पाहिजे. अशा प्रकारचे आणखीही संस्कार मुलांवर करीत राहिले पाहिजे.

बाह्याचारांच्या शिक्षणाच्या चर्चेनंतर आत्मसंयमनाची चर्चा केलेली आहे. खूप खाऊन अतितृप्त होण्यापेक्षा भुकेले राहणे चांगले आणि म्हणून शारीरिक वासना काबूत ठेवल्या पाहिजेत या तत्त्वावर आत्मसंयमनाचे शिक्षण आधारलेले असले पाहिजे. सूफींच्या मते माणसाने विवाहाची घाई करू नये. त्यामुळे त्याला आपल्या कार्यशक्ती 'सूफी मार्गा'च्या कामी लावता येतील.

संस्कार करताना उद्भवणारे दोष नाहीसे करणे जरूर आहे. अशा दोषांत वाचे-संबंधीचे दोष प्रथम येतात. मौन हा एक गुण आहे. बोलण्याने हातून अनेक नैतिक दोष घडत असतात. अती बोलणे, निरर्थक बडबड, शाब्दिक खटके, वादविवाद, शिवीगाळ, तळतळाट; गुप्त गोष्टींची वाच्यता, असत्य वचन, गाणे, कविता म्हणणे, मस्करी, उपहास व उपरोध, खोटी शपथ इत्यादी. काही प्रसंगी असत्य बोलण्यास हरकत

असत नाही. खोटे बोलण्यास मूलतः मनाई केलेली नाही. खोटे बोलण्याने ऐकणाऱ्याचे किंवा अन्य कोणाचे तरी नुकसान होण्याची शक्यता असल्याने खोटे बोलू नये एवढेच म्हटले आहे. कधी कधी खोटे बोलणे आवश्यक आणि सत्य बोलण्यापेक्षा चांगले असते. उदाहरणार्थ, सत्य सांगण्यामुळे एखाद्या निरपराध मनुष्याच्या प्राणाला धोका निर्माण होण्याचे भय असते अशी परिस्थिती.

कोणत्याही कृतीमागील 'उद्देश' ( निय्या ) काय आहे ही गोष्टच नैतिकदृष्ट्या महत्त्वाची असते. 'इच्छा' व 'हेतू' हे 'निय्या' याचे समानार्थी शब्द आहेत. 'निय्या'चे दोन आवश्यक घटक आहेत. एक मनात 'विचार' येणे आणि दुसरा, त्याप्रमाणे 'कृति' घडणे. विचार प्रथम येतो आणि तोच घटनेच्या मुळाशी असतो. कृती हे फळ असते आणि ते विचारामागोमाग येते, हे खरे असले पाहिजे. कारण हेतुपुरस्सर केलेली प्रत्येक कृती ( स्वेच्छेने केलेली किंवा न केलेली ) ही तीन घटकांनी बनलेली असते. कृती करण्याचा विचार, ती करण्याची इच्छा व ती करण्याची क्षमता. जी कृती करण्याचा विचार माणसाच्या मनात येत नाही, ती करण्याची त्याला इच्छा होत नाही. कोणत्याही घटनेचा विचार करताना त्यामागील 'हेतू'चा विचार टाळता येणार नाही. एखाद्या गोष्टीचे मानसिक आकर्षण म्हणजे 'हेतू' आणि ज्या गोष्टीचे असे आकर्षण वाटते त्या गोष्टी मागील हेतूशी दूरच्या किंवा नजीकच्या अर्थाने ती गोष्ट जुळणारी असते.[१]

एक हदिस असे आहे, की "धर्मश्रद्ध मनुष्याचा हेतू त्याच्या कृतीपेक्षा महत्त्वाचा आहे." या हदिसचा गझालीने असा अर्थ लावला आहे, की यातील 'कृति' व 'हेतु' चा शब्दांचा विचार उद्दिष्टाच्या संदर्भातच केला पाहिजे. एकादी गोष्ट 'करणे' ही चांगली गोष्ट असली, तरी तिचा खरा चांगलेपणा तिच्यामागील चांगल्या हेतूमध्ये अभिप्रेत असलेल्या परमेश्वरी कायद्याचे पालन झालेले आहे की नाही, यावर अवलंबून असतो. परंतु अवैध साधनांच्या साहाय्याने योग्य हेतू साधण्याचा प्रयत्न केला तर तो हेतूही भ्रष्ट होतो. बळजबरीने लुबाडलेल्या पैशांनी मशीद बांधली तर ती मशीद बांधण्यासाठी पैसे कोठून आले याविषयी ती बांधणाऱ्याला माहिती असो वा नसो, ती मशीद बांधणे ही पापपूर्ण कृती ठरते.

प्रथम नीतिशास्त्रविषयक तत्त्वांची सर्वसाधारण चर्चा केल्यानंतर त्या तत्त्वांच्या

---

१. मनुष्याला आपला 'हेतू' स्वतंत्रपणे ठरविता येत नाही असे नंतर एके ठिकाणी सांगून गझालीने आपले स्वतःचेच यासंबंधीचे अगोदरचे विधान खोडून काढले आहे. न कळत प्रेमात पडावे किंवा भूक भागविण्यासाठी खावेसे वाटावे तसा 'हेतू' हा उत्स्फूर्त असतो; तर्काच्या पलीकडचा असतो. अगदी काटेकोरपणे सांगायचे तर 'हेतू'च्या बाबतीत नैतिकतेचा प्रश्न उद्‌भवतच नाही.

प्रत्यक्ष व्यवहाराचे गझालीने विवरण केले आहे. ते करताना त्याने रीतिरिवाज, नैतिक आचार व कायदे यांची आणि दैनंदिन जीवनाच्या अनेक अंगांची चर्चा केलेली आहे. त्याच्या दृष्टीकोनाचा नमुना म्हणून त्यातील एका भागाचा उल्लेख करता येईल. व्यापार-धंदाविषयक कायदेकानूंची चर्चा करताना त्याने प्रारंभी असे म्हटले आले आहे, की कोणतेही व्यवहार काही निश्चित नियमांनुसार झाले पाहिजेत. कारण पुष्कळदा ( नैतिक ) प्रतिबंधाद्वारे एखादा कायदेशीर करार बेकायदेशीर ठरविता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे नियम 'मुफ्ति' (न्यायशास्त्री ) च्या दृष्टीने कितीही कायदेशीर असले तरी त्यामुळे अन्याय होण्याची व परमेश्वरी कोप होण्याची शक्यता असतेच. उदाहरणार्थ, ज्या व्यापारी कराराद्वारे दुष्काळात धान्य खरेदी करून आणि साठवून ते पुढे वाढत्या किंमतीने विकण्याची संधी मिळते असा करार. असा करार व्यापारी नियमाप्रमाणे कायदेशीर असला, तरी शारच्या दृष्टीने ( नैतिक दृष्टीने ) तो अन्याय्य आहे. कारण सर्व समाजावर अन्याय करण्याची अशा कराराने सवलत मिळते.

या संदर्भात दुसरे एक उदाहरण खोट्या नाण्यांचे देता येईल. एखाद्या व्यापारी व्यवहाराशी संबंधित दोन्ही माणसांना त्या व्यवहारात बनावट नाण्यांचा वापर केला जात आहे याची कल्पना असली, तरी त्यामुळे नुकसान व्हावयाचे ते होतच असते. कारण ज्याला ती नाणी मिळतात ती तो दुसऱ्याला देतो आणि तो माणूस परत तिसऱ्याला देतो. परंतु नाणी खोटी असल्याचे जो प्रथम सांगेल तो दोषी समजला जाईल आणि त्याच्यावर नुकसानीची जबाबदारी राहील. बनावट नाण्यांसंबंधीच्या आपल्या कर्तव्याची जाणीव प्रत्येक मुस्लिम व्यापाऱ्याने बाळगली पाहिजे. अशी नाणी आपल्या हातात आली तर ती त्याने विहिरीत फेकून दिली पाहिजेत. स्वतःचे नुकसान टाळण्यासाठी तर हे आवश्यक आहेच, परंतु नाणी बनावट आहेत याची ज्याला कल्पना नाही अशा दुसऱ्या एखाद्या मुस्लिमाला आपल्या हातून ती दिली जाऊ नयेत आणि प्रथम खोटी नाणी दिल्याचा अपराध आपल्याकडून घडू नये, यासाठीसुद्धा ती खोटी नाणी फेकून देणे जरुरीचे आहे. आपल्या हातून घडणाऱ्या प्रत्येक कृतीची जाणीव मुस्लिम माणसाला असली पाहिजे. त्यामुळे सर्व मुस्लिमांच्या हिताचे संरक्षण होईल. आणि म्हणून अशी जाणीव बाळगणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे.

आणखी एक प्रकारचा व्यवहार संभवतो. या प्रकारच्या व्यवहाराने साऱ्या समाजाचे नुकसान होत नसले, तरी तो व्यवहार करणाऱ्यांपैकी कोणाचे तरी नुकसान होते. अशा व्यवहारामुळे झालेल्या नुकसानीबद्दल न्यायालयाकडून भरपाई मिळणे जरूर आहे. कारण कोणाही मुस्लिमाने आपल्या मुस्लिम बांधवाचे नुकसान करता कामा नये, हाच खरा न्याय आहे. आपल्या बाबतीत जी गोष्ट घडू नये असे वाटते ती गोष्ट आपल्या बांधवांच्या बाबतीत आपणही करता कामा नये हे सर्वसाधारण तत्त्व असले पाहिजे. विकत देताना एखाद्या वस्तूच्या योग्यतेची खोटी प्रशंसा करू नये, त्या वस्तूंतील वैगुण्ये लपवू

नयेत, त्या वस्तूचे खरे वजन किंवा माप सांगण्याचे टाळू नये आणि त्या वस्तूच्या किंमती संबंधीची कोणतीही बाब ती वस्तू विकली जाणार नाही या भयाने लपवू नये.[1]

सामाजिक कर्तव्यासारख्या प्रश्नावर गझालीने बरेच लिहिले आहे. सर्वांची सामाजिक कर्तव्ये सारखीच असत नाहीत. मुस्लिम बांधवाला समाजांतर्गत अनेक विशेष हक्क असतात, नातलग नसलेल्या मुस्लिम बांधवाला त्यापेक्षा कमी अधिकार असतात आणि हे सर्व अधिकार त्यांना 'सोनेरी' कायद्यांमुळे प्राप्त होत असतात. त्यानंतर जमातीबाहेरच्या 'संरक्षित परकी माणसाचा' (जार) किंवा 'परकी माणसा'चा या बाबतीत क्रम लागतो. त्याला त्याहीपेक्षा कमी हक्क असतात. तथापि ते अतिशय महत्त्वाचे समजले जातात. 'संरक्षित परकी माणसा'चे हक्क कोणते हे सांगताना त्यांची जी काही विशिष्ट लक्षणे सांगितली आहेत, त्यावरून इस्लाम धर्मात नसलेले परंतु इस्लामधर्मीयांशी मैत्रीचे संबंध असलेले असे जे 'जार' असतील त्यांच्या संबंधीच्या इस्लामच्या दृष्टिकोणाची कल्पना येते. 'जार' व्यक्ती नात्यातली व इस्लामधर्मीय असली तर तिला प्राप्त असलेल्या त्रिविध हक्कांनुसार (हे हक्क ती व्यक्ती इस्लाम धर्माची, नात्यातली व 'जार' असल्यामुळे तिला मिळतात.) मिळणाऱ्या विशेष सवलती मिळण्याचा तिला अधिकार असतो. जार व्यक्ती जर मुस्लिम असेल तर तिला यापैकी दोन अधिकार मिळतात आणि ती व्यक्ती बिगर मुस्लिम असेल तर तिला तिच्या 'संरक्षका'कडून फक्त एकाच हक्काची अपेक्षा करता येते. 'जार' व्यक्तीच्या अधिकाराविषयी खूपच आग्रह धरलेला आहे. आणि 'जार' व्यक्तीला न्यायपूर्ण पण कोरडी वागणूक न देता तिच्याशी जास्त सहृदयतेने वागावे असे आवाहन करणाऱ्या अनेक 'परंपरां'चा निर्देश करण्यात आला आहे. यांपैकी बऱ्याचशा 'परंपरा' अरबेतर मुस्लिम 'जार' शी कसे वागावे यांविषयीच्या आहेत. काही 'हदिसा'त ज्यू व खिश्चन 'जार' व्यक्तींना कशी वागणूक दिली जावी याविषयी उल्लेख आहेत. घरात जेवण तयार करताना या विधर्मीयांचा सहानुभूतीने विचार करावा एवढेच या हदिसात सांगितलेले आहे. गुलामाशी कसे वागावे याविषयी एका हदिसात सूचना केलेल्या आहेत. गुलामाशी वागताना धर्मश्रद्ध माणसाने ईश्वराविषयी भय बाळगावे अशी या हदिसात आज्ञा केलेली आहे. पैगंबरांच्या तोंडून असे वदविले गेले आहे, की "तुम्ही जेवत असाल ते अन्न, तुम्ही वापरत असाल तसे कपडेलत्ते त्यांना द्या. अतिशय जबर कामाचे ओझे त्यांना देऊ नका. त्यांच्यापैकी तुम्हांला जे आवडत असतील ते जवळ ठेवा; जे आवडत नसतील त्यांना विकून टाका. परंतु परमेश्वराच्या या लेकरांना यातना देऊ नका."

---

१. या नंतरच्या प्रकरणात गझालीने या संबंधीच्या सर्वसाधारण तत्त्वाचे विवरण केलेले आहे. आपणास जे हवेसे वाटते ते आपल्या मुस्लिम बांधवालाही मिळाले पाहिजे आणि स्वतःच्या बाबतीत जे होऊ नये असे वाटते ते दुसऱ्याच्या बाबतीतही करू नये अशी प्रत्येक मुस्लिमाची वृत्ती असली पाहिजे.

गझालीच्या ग्रंथासंबंधीचे विवेचन संपवण्यापूर्वी त्या ग्रंथातील ' मुहतासिब ' ( नियंत्रणाधिकारी ) या विषयावरील चर्चेची माहिती देणे योग्य ठरेल. शारमध्ये सांगितलेल्या कायदेकानूंचे उल्लंघन होऊ नये याची काळजी घेणे हे या अधिकाऱ्याचे काम होय. त्याविषयी जास्त माहिती पुढे येईल. या ठिकाणी या अधिकाऱ्याच्या नैतिक पात्रतेचाच विचार अभिप्रेत आहे. जी व्यक्ती स्वतः पूर्णपणे निष्कलंक नाही अशा व्यक्तीची या अधिकारपदावर नियुक्ती करता येते काय या प्रश्नासंबधीच चर्चा येथे आहे. गझालीचे याबाबतीत असे मत आहे, की ' मुहतासिब ' पदावरचा मनुष्य संपूर्णपणे पापमुक्त असावा अशी अपेक्षा करणे म्हणजे ' इहतिसाब 'चा दरवाजा ( म्हणजे नियंत्रणाचे काम ) बंद करणे होय. खुद्द मुहम्मद पैगंबरांचे सोबती देखील पापमुक्त नव्हते. त्याआधीचे जुने प्रेषितसुद्धा निर्दोष नव्हते. कारण कुराणात आदमने केलेल्या पापाचा उल्लेख आहे. गझाली पुढे म्हणतो, की किरकोळ स्वरूपाचे पाप ( उदाहरणार्थ शारमधील नियमाविरुद्ध रेशमी कपडे वापरण्याचे पाप ) करणाऱ्या व्यक्तीचा या बाबतीत अपवाद करावयाला काही धर्मपंडितांची हरकत नाही. अशा माणसाला व्यभिचार व मद्यपान यांना प्रतिबंध करण्याचा अधिकार द्यावयास हरकत नाही. मात्र गझालीच्या मते ही सवलत फारशी मोठी नाही. काफीरांतील नास्तिकता नाहीशी करण्यासाठी एखाद्या मद्यपीला ' जिहाद ' मध्ये सामिल होऊन लढायला परवानगी देता येईल काय, असा प्रश्न एखाद्याने टाकला तर त्याचे उत्तर काय, अशी गझालीने शंका उपस्थित केली आहे. या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी असेल, तर ते निश्चितपणे रूढ असलेल्या व्यवहाराविरुद्ध आहे असे म्हणावे लागेल. कारण इस्लामसाठी लढणाऱ्या सैन्यात सर्व प्रकारचे, सदाचारी तसेच पापी लोक सामील होते. आणि पैगंबरांच्या किंवा त्यानंतरच्या काळातील पवित्र युद्धात मद्यपींना किंवा अनाथ मुलांचा छळ करणाऱ्या लोकांना लढावयास प्रतिबंध केलेला नव्हता हे सर्वज्ञात आहे. आणि वरील प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल, तर रेशमी कपडे वापरणारा माणूस दुसऱ्या माणसाला दारू पिण्याच्या बाबतीत प्रतिबंध करण्याचे काम करू शकेल आणि मद्यपी माणसाची खुनांना प्रतिबंध करण्याच्या कामावर नेमणूक होऊ शकेल. गझालीच्या ग्रंथातील या प्रकरणाच्या शेवटी शारमधील नियमांपैकी कोणत्या नियमांचे उल्लंघन गंभीर समजले जाते या संबंधीचे विवरण आहे.

गझालीने न्यायशास्त्रीय सिद्धांतांची बरीच चर्चा केली असली, तरी इतर मुस्लिम धर्मशास्त्रज्ञ व धर्माचे अभ्यासक यांच्याप्रमाणेच त्यानेसुद्धा व्यावहारिक वर्तनाच्या बाबतीत ' फिकाह 'मधून पुरेसे मार्गदर्शन होते ही गोष्ट मानलेली आहे. फारच थोड्या धर्मपंडितांनी नीतिविषयक तत्त्वज्ञानाला एक शास्त्र म्हणून दर्जा दिलेला आहे असे दिसते. आणि हे बहुधा सर्व धर्मपंडित सनातनी धर्ममतवाद्यांच्या दृष्टीने धर्मविरोधी होते ( कदाचित हे त्यांचे मत सकारण असेलही ). उथळ स्वरूपाच्या ॲरिस्टॉटेलियन पद्धतीनुसार नीतिविषयक तत्त्वे ' ही ' व्यावहारिक तत्त्वज्ञानाच्या तीन शाखांपैकी एक शाखा मानली जात असत. बाकीच्या दोन शाखा अर्थशास्त्र व राजनीति-

शास्त्र या होत. हाजी खलिफा या ग्रंथसूचिकाराने नीतिशास्त्र ( इल्म अल् अखलक ) म्हणजे काय या विषयींच्या एका प्रचलित मताचा उल्लेख केला आहे. " नीतिशास्त्र म्हणजे सद्‌गुणांचे आणि त्या गुणांचे संपादन करून त्या द्वारे आत्म्याची शोभा वाढविण्याच्या मार्गाचे ज्ञान. तसेच दुर्गुणांचे व दुर्गुणांपासून आत्मा मुक्त राहावा यासाठी त्यांना दूर ठेवण्याच्या मार्गाचे ज्ञान. नैतिक पात्रता, नैतिकतेची व्यवच्छेदक लक्षणे आणि विवेकशील आत्मा यांच्याशी संबधित बाबी हा या शास्त्राचा विषय आहे. " ही व्याख्या सांगताना हाजी खलिफा याने या शास्त्राच्या व्यावहारिक उपयुक्ततेसंबंधी सनातनमतवादी पद्धतीनुसार संदेह व्यक्त केला आहे. त्याचे म्हणणे असे, की मनुष्याचे नैतिक आचरण व चारित्र्य यात बदल घडवून आणणे शक्य झाले तरच नीतिशास्त्राचा उपयोग आहे; पण व्यवहारात हे शास्त्र निरुपयोगी आहे. कारण या दोन गोष्टीत बदल घडणे शक्य नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. या मताला पुष्टी देणारी हदिसेही आहेत. त्यांपैकी एका हदिसात म्हटले आहे, की माणसाचा स्वभाव बदलता येतो या गोष्टींपेक्षा पर्वत इकडचा तिकडे हालविता येतो या गोष्टीवर अधिक विश्वास ठेवणे शक्य आहे.

मुस्लिम तत्त्वज्ञांच्या नीतिशास्त्रविषयक विचारप्रणालीचे नजीकचे उगमस्थान ग्रीक विचारपद्धतीत आहे. कुराणातील नीतितत्त्वांशी आपल्या नीतिविषयक विचारांचा मेळ घालण्यासाठी या तत्त्वज्ञांना बरेच श्रम घ्यावे लागले. ' फिकाह 'मध्ये ज्या अर्थाने नीतितत्त्वांचा विचार केलेला आहे त्यापेक्षा भिन्न अर्थाने नीतिविषयक तत्त्वांची चर्चा करणाऱ्या प्राचीन तत्त्वज्ञांपैकी अल् फराबी हा एक होता ( मृत्यू ९५० ). तो तुर्कस्तानचा रहिवासी. त्याने नीतिविज्ञानाची स्वतंत्र अशी चर्चा केलेली नाही; परंतु आत्म्याच्या कार्यप्रवृत्तींची चर्चा करताना त्याने चांगले व वाईट या संबंधीच्या आपल्या तत्त्वज्ञानाची तपशीलवार मांडणी केलेली आहे. त्याच्या मते प्रत्येक मनुष्याच्या अंतर्मनात दोन ' शक्ती ' ( वृत्ती ) वास करीत असतात. एक विवेकाची व दुसरी ' पशू 'ची. या प्रत्येक वृत्तीपाशी स्वत:ची अशी इच्छा व निवड करण्याची शक्ती असते. तसेच या प्रत्येक प्रवृत्तीचा विशिष्ट कल असतो. मनुष्य या दोन प्रवृत्तींमध्ये उभा असतो. पशुवृत्तीचा कल तत्काल मिळणाऱ्या इंद्रियसुखांकडे असतो, तर विवेकवृत्तीचा कल प्रशंसनीय परंतु दूरच्या ध्येयांकडे असतो. उदाहरणार्थ, विज्ञान, कला आदी ध्येयांना उत्तेजन देणाऱ्या गोष्टी. तसेच मनुष्य कार्य करीत असतो तेव्हा त्याची चांगल्या-वाईट अशा दोन्ही प्रकारच्या प्रसंगांशी गाठ पडत असते. या प्रसंगांचा चांगल्याकरिता किंवा वाईटाला आवर घालण्यासाठी उपयोग करून घेऊन आपल्या ( कनिष्ठ ) आत्म्याला तो शिक्षण देऊ शकेल. अखेर विवेकवृत्तीच्या द्वारेच सुष्ट व दुष्ट यामधील फरक समजून घेता येतो. आणि आपल्या आसपासच्या लोकांच्या कार्याचे अवलोकन केले, तर माणसाला या दोहोंमधील फरक प्रत्यक्ष कळू शकेल.

इब्ने फराबी याच्यामागून ॲव्हिसेन्ना ( इब्नसिना ) या नावाचा आणखी एक

थोर तत्त्वज्ञ होऊन गेला (मृत्यू १०३७). सर्व मुस्लिम तत्त्वज्ञांपैकी हाच तत्त्वज्ञ पाश्चिमात्य जगाला जास्त परिचयाचा आहे. या तत्त्वज्ञाने नैतिक तत्त्वांची व्यावहारिक चर्चा फारशी केलेली नाही. तो विषय त्याने बहुधा 'फिकाह'कडे सोपविला असावा. तथापि किताब अल्-सियासा ' (राजनीतिशास्त्रविषयक ग्रंथ) या ग्रंथास लिहिलेल्या आपल्या प्रस्तावनेत त्याने, चांगले व वाईट आणि सत्य व असत्य यांतील भेद समजण्याचा जो महान् गुण परमेश्वराने मनुष्यमात्राला दिलेला आहे, त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद दिले आहेत. याच पुस्तकातील पुढील एका भागात इंद्रियवासनांचे नियमन या विषयी लिहिताना म्हटले आहे, कीं दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचे नियमन करण्यापूर्वी माणसाने इंद्रियवासनांचे नियमन केले पाहिजे. "आपल्यावर कोण नियंत्रण करतो हे समजून घेताना मनुष्याला प्रथम ही गोष्ट माहीत असली पाहिजे, की मन नावाची एक वस्तू आहे, ती माणसावर नियंत्रण करते. इंद्रियवासनांची आणखी एक प्रवृत्ती आहे. ती त्याला दुष्टतेला प्रवृत्त करीत असते. आणि या प्रवृत्तींत निसर्गतःच सर्व दुष्कृत्ये सामावलेली असतात. दुष्कर्म करणाऱ्या माणसाला सुधारायला निघालेल्या व्यक्तीने प्रथम (त्याचे) सर्व दोष समजून घेतले पाहिजेत. तसेच आत्मसंयमन, आत्मशासन व आत्मसुधारणा करू इच्छिणाऱ्या माणसाला, आपल्यामधील सर्व दोषांचे ज्ञान झाल्याशिवाय या कार्याचा त्याला प्रारंभही करता येणार नाही." दुसऱ्या दोन इराणी लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथात नीतिविज्ञानाची विशेष चर्चा केलेली आढळते. या दोन लेखकांच्या काळात सुमारे दोन शतकांचे अंतर आहे. यांपैकी पहिला लेखक इब्ने मिस्कावाहयी (मृत्यू १०३०) हा होय. हा विद्वान पंडित व शास्त्रज्ञ बुवैद सुलतान अब्दुल अल् दावला याच्या पदरी होता. दुसरा लेखक ' तस 'चा नासिर अल दीन हा होय. तो इस्माईली या धर्मविरोधी मंडळींशी संबंधित होता. या लोकांचा बालेकिल्ला असलेले अलामुत हे शहर मंगोल हुलागू याने काबीज केले, तेव्हा नासिर अल दीन त्याच्याबरोबर बगदाद येथे गेला. तेथेच त्याचा १२७४ मध्ये मृत्यू झाला.

यांपैकी पहिला तत्त्वज्ञ इब्ने मिस्कावाहयी याने आपल्या प्रबंधात नीतिविषयक विचारात सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादलेली आहे. ज्ञान हा सदाचाराचा पाया होय, या सॉक्रेटिसच्या विचाराचा त्याने पुरस्कार केला आहे. विवेक व ज्ञान यांच्या विभिन्न स्वरूपांशी आत्म्याच्या कार्यप्रवृत्ती विशेषतेने संबंधित असतात. या प्रवृत्तींमागे जेवढ्या उत्साहाने मनुष्य जाईल तेवढ्या प्रमाणात त्याला गुणवत्ता प्राप्त होईल. आपल्या आत्म्याची ज्या प्रमाणात मनुष्य काळजी घेईल आणि आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गात येणारे अडथळे तो पार करील, त्या प्रमाणात त्याची गुणवत्ता वाढेल. हे अडथळे म्हणजे माणसातील इंद्रियवासना आणि शारीरिक सुखातील व्यग्रता. सर्व प्राणीमात्रात वसत असणारे गुणावगुण मनुष्यमात्रातही वसत असतात. परंतु त्याचबरोबर त्यांच्यात एक खास गुणही असतो. तो म्हणजे इच्छाशक्ती. या गुणाशी विचारशक्ती व सारा-

सारबुद्धी संलग्न[१] असतात. मनुष्याच्या इच्छा शक्तीशी संबंधित असलेल्या गोष्टींचे दोन प्रकार असतात– सुष्ट व दुष्ट. त्यांचे वर्णन अशा प्रकारे करता येईल : मनुष्यप्राणी ज्या गोष्टींसाठी जन्माला घातला गेला त्या अनेक गोष्टींपैकी ज्या गोष्टी मनुष्य स्वेच्छेने व स्वप्रयत्नाने प्राप्त करतो त्या गोष्टी चांगल्या होत आणि या चांगल्या गोष्टी साध्य करण्याच्या मार्गात ज्या गोष्टी अडथळा निर्माण करतात किंवा ज्या मनुष्याची इच्छा व प्रयत्न विफल करतात त्या गोष्टी वाईट होत. या दृष्टीने आळस व उपेक्षावृत्ती या वाईट बाबी होत. जो मनुष्य आपल्या अशा प्रयत्नांत यशस्वी होतो तो सुखी समजला जातो आणि अपयशी होतो तो दु:खी मानला जातो.

मिस्कावाहयी पुढे म्हणतो, सुखाची कित्येक रूपे असतात आणि एकट्या मनुष्याला ही सर्व सुखे मिळविता येणे शक्यच नसते. म्हणून माणसांनी एकत्र राहून ही सर्व सुखे प्राप्त करण्यासाठी एकमेकांना साहाय्य केले पाहिजे. सर्व चांगल्या गोष्टी व सुखे संपर्काद्वारेच मिळत असतात. समाजात राहिल्यानेच ती पूर्णत्वास पोचतात. आणि या गोष्टी प्राप्त झाल्या, की त्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांना त्या सारख्याच प्रमाणात मिळतात. शरीराचे अवयव जसे एकमेकांना साहाय्य करतात, त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्ती एकमेकाला साहाय्यभूत होत असते. म्हणून खरी नैतिकता हा सामाजिक गुण आहे. विजनवासात एकट्याला तो साध्य करता येत नाही.

प्लेटोच्या शब्दात सांगावयाचे, तर मनुष्याच्या आत्म्याचे चार गुणविशेष आहेत: विवेक, संयम, धैर्य व न्यायवृत्ती. मनुष्याने याशिवाय अन्य कोणत्याही गुणांचा अभिमान बाळगू नये. कर्माच्या विभिन्न क्षेत्रात या गुणांमुळे मनुष्याच्या आत्म्याला योग्यता प्राप्त होत असते. उदाहरणार्थ, विवेक म्हणजे माणसाची सारासार विचार करण्याची योग्यता. तिच्याद्वारे त्याला कोणती गोष्ट करावी व कोणती गोष्ट करू नये याचे ज्ञान होत असते. संयम धैर्याद्वारे मिळतो. आणि धैर्य हेच, विवेकबुद्धीने जे करणे जरूर आहे असे सांगितले असेल ते करून घेणारे क्रियाशील तत्त्व होय. धैर्यामुळेच प्रशंसनीय व चांगले कर्म करताना वाटणाऱ्या परिणामाच्या भयावर मात करता येते. संयम हा बुभुक्षित आत्म्याला आवश्यक असलेला गुण आहे. विवेकाच्या साहाय्याने इच्छेचे नियमन करणे म्हणजे संयम. आणि या सर्व गुणांच्या मिश्रणातून न्यायवृत्ती जन्म घेते.

दुर्गुणाच्या दोन टोकातील ( ॲरिस्टॉटलच्या कल्पनेतील ) ' मध्यबिंदू ' म्हणजे सद्गुण अशी मिस्कावाहयीने सद्गुणाची व्याख्या केलेली आहे. मध्यबिंदूवर सद्गुण आणि व्यासाच्या दोन्ही टोकांना दुर्गुण अशा वर्तुळाची या संदर्भात कल्पना करता येईल. हा मध्यबिंदू शोधून काढणे आणि तो सापडल्यावर त्यावर स्थिर राहणे या दोन्ही गोष्टी बिकट आहेत. कारण वर्तुळाच्या परिघाच्या दिशेने झालेली कोणतीही हालचाल ही दुर्गुणाच्या दिशेने केलेली हालचाल समजली पाहिजे.

---

१. " याच्या अभ्यासाला ' व्यावहारिक तत्त्वज्ञान ' असे म्हणतात. "

मनुष्याची स्वभाववैशिष्ट्ये ही जन्मतःच त्याच्या प्रकृतीचा एक भाग असतात. परंतु मिस्कावाहयीच्या मते ती वैशिष्ट्ये संस्काराने व सवयीने बदलू शकतात. त्याचे हे मत, माणसाची स्वभाववैशिष्ट्ये बदलता येत नाहीत, असे समजणाऱ्या लोकांच्या मताविरुद्ध आहे; पण प्रत्यक्ष अनुभवाअंती आपले हे मत बनले असा त्याचा दावा आहे. आणि शिवाय मनुष्याचे स्वभाव विशेष बदलत नाहीत हे खरे मानावयाचे, तर मग सारासार विचारशक्ती व विवेकबुद्धी यांचे अस्तित्वच अमान्य करावे लागेल. तसेच मुलांवर संस्कार करता येतात ही कल्पनाही निरर्थक मानावी लागेल. पडवीतील लोकांच्या ( स्टोकताईक तत्त्वज्ञ ) मताविषयी सांगायचे, तर त्यांना असे वाटते, की जन्मतः माणसे चांगली असतात; परंतु दुष्ट माणसाच्या संगतीमुळे दुर्गुणांकडे माणसाचा स्वाभाविक कल होतो. त्यामुळे ती बिघडतात. ॲरिस्टॉटलची मात्र अशी धारणा होती, की संस्काराने दुर्गुण सद्गुणात परिवर्तित करता येतात.

सर्व प्राणीमात्रांप्रमाणे मनुष्यानेदेखील स्वतःच स्वतःची अशी एक विशिष्ट पूर्णता प्राप्त करावयाची असते. ही पूर्णता त्याच्याशिवाय अन्य कोणालाही मिळविता येत नाही. उदाहरणार्थ, घोडा या प्राण्याची स्वतःची अशी एक पूर्णता असते. ती त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणासही प्राप्त करता येत नाही. मनुष्याने प्राप्त करावयाची पूर्णता दोन प्रकारांची असते– एक चिंतनविषयक व दुसरी व्यवहारविषयक. चिंतनविषयक पूर्णता शिक्षणाच्या व ज्ञानाच्या संपादनातून मिळते, तर व्यवहारविषयक पूर्णता व्यावहारिक गोष्टीतील आचरणातून प्राप्त होते. या दोन्ही बाबतीत पूर्णत्व प्राप्त करणाऱ्या मनुष्यास पूर्ण सुखाचा लाभ होतो. आपली मते अचूक होईपर्यंत मनुष्याने ज्ञानोपासना केली पाहिजे. त्यामुळे त्याची धर्मश्रद्धा बिनचूक होईल आणि सत्यासंबंधी त्याच्या मनात काही संदेह राहणार नाहीत. या प्रक्रियेच्या शेवटी त्याला वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान होईल. महत्त्वाच्या दृष्टीने कोणती गोष्ट आधी व कोणती गोष्ट नंतर हे कळू लागेल. ज्ञानाची सर्वोच्च पायरी– म्हणजे ईश्वराविषयीचे ज्ञान– गाठल्यानंतर मनुष्य हृदयांतरी प्रसन्न व संदेहरहित होईल आणि मनुष्याच्या हृदयातून सारा संदेहजन्य गोंधळ नाहीसा होईल. हीच मनुष्याच्या चिंतनवृत्तीची परिपूर्ण अवस्था होय.

तहधिब अल् अखलाख या ग्रंथात मनुष्याच्या आचरणविषयक प्रवृत्तीची प्रामुख्याने चर्चा केली आहे. मानवी चारित्र्य ( खुल्क ) परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने या प्रवृत्तीचे महत्त्व आहे. ही परिपूर्णता प्राप्त करण्यासाठी प्रथम मनुष्याने आपल्या स्वाभाविक प्रवृत्ती व आपली प्रत्यक्ष व्यवहारातील कर्मे यांपैकी कोणीही एक दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविणार नाही आणि कर्मावर विवेकाचे नियंत्रण राहील अशा पद्धतीने त्यांचे नियोजन केले पाहिजे. सर्व माणसांनी असे केले, तर त्यातून सुव्यवस्थित अशी एक राज्यसंस्था अखेर निर्माण होईल. या राज्यसंस्थेत सर्व कर्मे व सत्ता सर्व नागरिकांत सारखी वाटलेली असतील. आणि सर्वांना समान सुखाचा वाटा मिळेल.

आपले भावविश्व आणि सुखाचे क्षण आठवीत राहणे आणि त्या सुखद अनुभवांची पुनरावृत्ती घडावी अशी कल्पना करणे हेच मनुष्याच्या बौद्धिक शक्तीचे ( म्हणजे स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती ) कार्य होय, अशी काही लोकांची धारणा असते. या धारणेमुळे हे लोक आपल्या आत्म्याला इंद्रियवासनांचा क्षुद्र गुलाम बनवून टाकतात. आणि त्याला आपल्या खाण्याच्या, पिण्याच्या व शरीरसंभोगाच्या वासनांना जुंपतात. बहुसंख्य सर्वसामान्य माणसे अशीच असतात. अशा लोकांसमोर स्वर्गप्राप्तीची व आपल्या निर्मात्याच्या समीप जाण्याची भाषा करण्याने त्यांच्या मनातील अशा प्रकारच्या शारीरिक सुखांच्या वासनांनाच फक्त चालना मिळत असते. त्यामुळे अशा सुखासाठीच ते परमेश्वराची प्रार्थना करतात. हे लोक जगाला विसरून आणि विरक्तवृत्तीने धार्मिक कृत्ये वगैरे करीत असले, तरी तोदेखील स्वार्थासाठी केलेला एक प्रकारचा व्यापार व सौदाच असतो. मोठ्या किंमतीची गोष्ट मिळविण्यासाठी कमी मोलाच्या गोष्टींचा त्याग करावयाचा आणि चिरंतन वस्तूच्या प्राप्तीसाठी विनाशी वस्तूपासून दूर जावयाचे अशा प्रकारचा हा सौदा असतो.

माणसांचे विभिन्न वर्ग असतात. त्यांपैकी आपण कोणत्या वर्गातले आहोत हे स्वतः ठरविणे मनुष्याला शक्य असते. माणसात तीन प्रकारच्या 'प्रवृत्ती' असतात. पशुवृत्ती, असभ्यवृत्ती व विवेकवृत्ती. ज्या मनुष्यात विवेकवृत्ती परमोच्च स्वरूपात असते आणि ती साधण्याची ज्याच्यात सर्वाधिक आकांक्षा असते तो मनुष्य महान् होय. आणि ज्या माणसात फक्त इतर दोन 'प्रवृत्ती 'च वास करतात, ती माणसे हीन दर्जाची होत. एखाद्या माणसावर बालपणी संस्कार केलेले नसतात किंवा संस्कार केलेले असतात. परंतु मागाहून त्याचा बापच त्याला वाईट मार्गाला लावतो. त्याला अश्लील काव्य वाचून दाखवितो. त्या काव्यातील असत्य, अश्लीलता व सुखविलास ( उदाहरणार्थ या सर्व गोष्टी इम्र अल् केज, नाबिघा इत्यादींच्या काव्यात आढळतात. ) यांचे पाठ देतो. असाही एखादा माणूस असतो, की ज्याला अशा काव्याची आवड असते अशा वडिलधाऱ्या मंडळींच्या सहवासात तो वाढलेला असतो. हे लोक त्याला भरमसाट किंमतीच्या वस्तू घेऊन देत असतात. आपल्या वयाच्या मुलांकडे तो ओढला जातो. शारीरिक सुखोपभोगाच्या उद्योगात ती मुले त्याचे दोस्त बनतात. एखाद्या माणसापाशी खूप पैसा असतो. त्यामुळे तो खाणेपिणे, कपडालत्ता, घोडे व दागदागिने यांच्यात डुंबत असतो. अशा प्रकारच्या माणसांनी या सर्व गोष्टी पापमय आहेत आणि खऱ्या सुखाच्या दृष्टीने हितकारक नाहीत, ही गोष्ट ओळखली पाहिजे आणि या गोष्टीपासून स्वतःला दूर ठेवण्याचा हळूहळू प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या स्वतःच्या दृष्टीने कोणती गोष्ट कल्याणप्रद व सुखप्रद आहे हे ज्या त्या व्यक्तीने स्वानुभवातून समजून घेतले पाहिजे. कारण कल्याणप्रद गोष्टी दोन स्वरूपात अस्तित्वात असतात. एक संपूर्ण, निरपवाद स्वरूपात आणि दुसरे त्या त्या व्यक्तीच्या

संदर्भात. ज्या प्रमाणात मनुष्याचे व्यक्तिगत सुख सर्वश्रेष्ठ व संपूर्ण कल्याणाशी जवळिक साधेल त्या प्रमाणात त्याच्या सुखाला संपूर्णता लाभेल. त्यातच परमोच्च सुख आहे; ते सुख निरंतर आणि अढळ आहे. तथापि माणसावर अनेक प्रसंग कोसळतात. त्यामुळे एखाद्या अत्यंत संपन्न माणसावरही दुर्दैव कोसळते. म्हणून माणूस मरण पावल्यानंतरच मग त्याचे जीवन सुखी ( सुदैवी ) होते की नाही, हे सांगता येते.

इब्ने मिस्कावाहयी याच्या तहधिब अल् अखलाक ग्रंथाप्रमाणे नासिर अल् दीन तुसी याच्या अखलाक ई नासिरी या ग्रंथावर, त्या अगोदर लिहिल्या गेलेल्या ग्रीक ग्रंथांतील विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. तथापि नासिरने आपली विचारप्रणाली कुराणांतील विचारांशी सुसंवादी बनविण्याचा अधिक दृढतेने प्रयत्न केला आहे. आपला विचारप्रबंध मांडताना त्याने प्रारंभीच आपल्यावर होणाऱ्या संभाव्य टीकेची दखल घेतली आहे. कारण त्याने सुरवातीसच सांगून टाकले आहे, की आपल्या प्रबंधांत जे काही समाविष्ट केलेले आहे ते सर्व व्यावहारिक तत्त्वज्ञानावरील अगोदरच्या ग्रंथांतील गोष्टींची केवळ नक्कल आहे. प्राचीन व अर्वाचीन तत्त्वज्ञांनी सांगितलेल्या परंपराच आपण केवळ कथन केलेल्या आहेत. त्या खऱ्या की खोट्या याचे मूल्यमापन आपण केलेले नाही. आपण दिलेली अवतरणे किंवा उतारे यांचे धार्मिकदृष्ट्या असलेले महत्त्व किंवा त्यात अभिप्रेत असलेला अर्थ यांपकी कशाचीही जबाबदारी आपल्यावर नाही. कारण आपण केवळ नक्कलकार आहोत, आपणाला कशाचे समर्थन करावयाचे नाही किंवा कशाला विरोधही करावयाचा नाही.

दृश्य वस्तू विनाशी असतात; पण आत्मा अविनाशी असतो. या सिद्धान्ताची व आत्म्याची एकंदर चर्चा प्रारंभी केली आहे. त्यानंतर लेखकाने आत्म्याच्या तीन प्रवृत्ती कोणत्या हे सांगितले आहे. या तीन प्रवृत्तीच मनुष्याच्या सर्व क्रिया घडवून आणीत असतात. पहिली प्रवृत्ती विवेकशक्ती. ही शक्ती सत्कर्म व दुष्कर्म यातील भेद स्पष्ट करते. दुसरी वासना. ती सुखाच्या अभिलाषेला जन्म देते, शारीरिक सुखाकडे माणसाला धावायला लावते. तिसरी क्रोध. ती मनुष्याला संकटाला पिटाळून लावायला प्रवृत्त करते. भीतीला सामोरे जावयास लावते आणि त्याच्यात वर्चस्वाची व स्वामित्वाची भावना निर्माण करते. मनुष्य आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणे आपल्यातील या प्रवृत्ती प्रखर बनवू शकत नाही. त्या मूलतः असतात तशाच कायम राहतात.

मनुष्यामध्ये आत्मा असतो आणि त्याचा ईश्वराशी संपर्क असतो, म्हणूनच मनुष्य हा सर्व प्राणीमात्रांत सर्वश्रेष्ठ होय. तथापि कनिष्ठ प्रतीच्या जगाच्या काठावर राहणारी कनिष्ठ प्रतीची माणसे पशुवृत्तीच्या जगातील अत्यंत बुद्धिमान लोकांच्या सहवासात राहत असतात; त्यांच्यावरच्या पायरीवर विभिन्न उच्च श्रेणींची माणसे राहतात. ही माणसे आपल्या बुद्धिमत्तेने व कौशल्याने नावलौकिकास चढतात आणि अखेर प्रेषितपदावर पोचतात. या प्रेषितांनी कोणत्याही लौकिक साधनांच्या साहाय्याशिवाय केवळ अंतः-

प्रेरणेच्या मदतीने चिरंतन सत्याचे ज्ञान प्राप्त केलेले असते. भूतलावरील मानवांना या प्रेषितांच्या माध्यमाद्वारे सुख व आनंदाची प्राप्ती होते. मनुष्यप्राण्यातील सर्वश्रेष्ठ वर्गापेक्षाही श्रेष्ठ वर्ग देवदूतांचा. त्या पलीकडे विवेकाची आणि स्वर्गाची वस्ती असलेले जग असते आणि त्याही पलीकडे अखेर 'एकरूपते'चे क्षेत्र वसत असते. एका विशिष्ट बिंदूपासून सुरू झालेली रेषा पुन्हा त्याच बिंदूपाशी यावी त्याप्रमाणे या ठिकाणी अस्तित्वाचे वर्तुळ पूर्ण होते.

निसर्गतः मनुष्य हा मध्यम श्रेणीतील प्राणी आहे. स्वभावतः त्याचा कल हीन श्रेणीकडे असतो. तथापि आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर उच्च श्रेणीकडे त्याला जाता येते. आपल्यामधील विवेकशक्तीमुळेच मनुष्यप्राणी इतर हीन प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ मानला जातो. त्याच्या स्वतःच्या योग्यायोग्यतेतच त्याच्या सुखदुःखाची आणि पूर्णापूर्णतेची गुरुकिल्ली वसत असते. सदाचाराच्या व ज्ञानाच्या सरधोपट मार्गाने जावयाचे मनुष्याने ठरविले, तर त्या मार्गावर पायरीपायरीने त्याची प्रगती होऊ शकते. कारण पूर्णत्वाच्या दिशेने प्रयत्न करणे हे त्याच्या स्वभावातच असते. अशा रीतीने ईश्वरी प्रकाश ज्या ठिकाणी त्याच्या मस्तकावर तळपत राहील अशा जागी तो पोचू शकेल. तेथेच त्याला निवाऱ्याच्या परमोच्च जागी जाणारा मार्ग सापडेल. उलट माणसांत प्रयत्नशीलता नसेल आणि तो नैसर्गिक प्रवृत्तींच्या अधीन झाला असेल, तर तो अधःपतनाच्या मार्गाने जाईल व आपल्यातील विनाशकारी भावनांच्या आहारी जाईल. यापैकी काय स्वीकारावयाचे हे मनुष्याच्या विवेकशक्तीवर अवलंबून आहे. कदाचित मनुष्य आपल्यातील 'हीन' प्रवृत्तीला म्हणजे पशुवृत्तीला वश होईल अथवा मध्यमवृत्तीला म्हणजे 'अप्रगत' प्रवृत्तीला शरण जाईल किंवा उच्चत्तम वृत्तीच्या म्हणजे देवदूतवृत्तीच्या अधीन होईल. या तीन प्रवृत्तींचे कुराणांत अनुक्रमे 'अधोमुखी', 'दोषपूर्ण' आणि 'निःसंदेह' अशा शब्दांत वर्णन केलेले आहे.[1]

पूर्णत्वाची प्राप्ती हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट किंवा ध्येय आहे. मानवी शक्तीच्या कक्षेत असलेले असेच हे उद्दिष्ट आहे. आणि आपल्या जवळील सर्व शक्तिनिशी मनुष्याने आपले विचार प्रत्यक्ष व्यवहारात उतरविले तर त्याला पूर्णत्व प्राप्त करता येईल. पूर्णत्वास पोचलेला किंवा संपूर्ण मनुष्य तोच, की ज्याला समाधानी जीवन लाभलेले आहे आणि ज्याला परमेश्वरी आज्ञांचे पालन करण्यातच परमानंद मिळत असतो. अशा मनुष्याला परमात्म्यापासून दूर ठेवणारा पडदा असणार नाही. आणि आपण परमेश्वराच्या समीप आहोत या गौरवपूर्ण जाणिवेने त्याला परमोच्च सुखाचा अनुभव येईल.

---

१. या संज्ञा अनुक्रमे कुराणाच्या १२[५३], ७५[२] व ८९[२७] या आयतांमधून घेतल्या आहेत. पण त्यांचा जो अर्थ लावला आहे तो फारसा बरोबर वाटत नाही.

नासिर अल् दीन पुढे म्हणतो, ॲरिस्टॉटलपूर्व तत्त्वज्ञांच्या मतानुसार सुखप्राप्ती आत्म्याद्वारेच होत असते. ॲरिस्टॉटलनंतरचे स्टोईक तत्त्वज्ञांसारखे तत्त्वज्ञ असे सांगू लागले, की मनाप्रमाणे शरीराद्वारेही सुखप्राप्ती होते; परंतु असे म्हणणे म्हणजे सुखासारख्या उदात्त व संपूर्णपणे अपरिवर्तनीय आणि अविनाशी गोष्टीचे भवितव्य मानवी शरीरासारख्या तुच्छ वस्तूवर अवलंबून ठेवणे होय; सुखाचे भवितव्य योगायोगावर सोपविणे होय. ॲरिस्टॉटलने विभिन्न मानवी समाजांचे आणि विभिन्न लोकांच्या सुखविषयक भूमिकांचे अवलोकन केलेले होते. त्यामुळे त्याचे असे मत बनले होते, की प्रत्येक मनुष्याची स्वतःची अशी आदर्श सुखाची कल्पना असते. आणि भिन्न भिन्न काळातील माणसाच्या आदर्श सुखाच्या कल्पना भिन्नभिन्न असतात. म्हणून त्याने सुखाची पाच घटकात ( शारीरिक आरोग्य हा त्यातील पहिला घटक होय ) विभागणी केली. यांपैकी कोणत्याही घटकाचा अभाव असेल, तर संपूर्ण सुखाचा लाभ होणे अशक्य आहे. याच तत्त्वज्ञाने ( ॲरिस्टॉटलने ) आणखी असेही म्हटले आहे, "भौतिक संपन्नता व खूप मित्रमंडळी नसतील तर मनुष्याला आपली महान् कार्ये करणे कठीण आहे. म्हणून तत्त्वज्ञानाच्या अंगी असलेले श्रेष्ठ गुण जगासमोर यावेत यासाठी राज्यसत्तेने तत्त्वज्ञानाचा अंगिकार केला पाहिजे." याला आमचे असे ( उत्तर ) आहे, की ( महान कार्यांची ) देणगी परमेश्वराकडून आली तरच त्यात खरे सुख आहे.

सुखाची प्राप्ती इहलोकात होऊ शकते की परलोकात, याविषयीच्या जुन्या तत्त्वज्ञांच्या मताचा लेखकाने उल्लेख केला आहे. या तत्त्वज्ञांच्या मते, फक्त आत्माच सुख काय ते समजू शकतो. परंतु आत्म्याला शरीराचे आवरण असते. हे आवरण नष्ट होते तेव्हाच आत्म्याला सुखाचे ज्ञान होऊ शकते. ॲरिस्टॉटल म्हणतो, या लोकात धर्मावर श्रद्धा ठेवून मनुष्याने वागावे आणि नित्य सत्कर्म करीत राहावे म्हणजे मग तो व त्याची सत्कर्मे यांचा नाश झाल्यावर त्याला सुखाचा लाभ होईल, हे म्हणणे निरर्थक आहे. ॲरिस्टॉटलच्या मते मनुष्याला त्याच्या प्रयत्नानुसार याच लोकात विभिन्न प्रकारची कमी जास्त सुखे मिळत असतात. नासिर अल् दीन यातून असा निष्कर्ष काढतो, की विवेकाने प्रत्येक सुख मिळविण्याचा आणि त्याद्वारे चांगल्या सवयी जडविण्याचा व त्या टिकविण्याचा मनुष्याने प्रयत्न केला पाहिजे. ज्याच्या सुखाच्या कल्पनेत फेरबदल होत नाही किंवा ज्याचे सुख लोप पावत नाही आणि जो मनुष्य आपल्या नशिबाच्या चढउतारातही आपली चित्तशांती ढळू देत नाही तोच मनुष्य संपूर्ण सुखी होय. अशा सुखाचा धनी असलेला मनुष्य जिवंत असेपर्यंत बाह्य शक्तीं ( तबाई ) च्या तसेच स्वर्गीय शक्तींच्या अधीन असतो. आणि त्याच्या सुदैवाचे किंवा दुर्दैवाचे ग्रह त्याच्याभोवती वावरतच असतात. आपल्या सभोवतालच्या आपल्या बांधवांच्या दुर्दैवाचा त्याला स्पर्श होत असला, तरी त्याची त्याला बाधा होत नाही. कारण असा मनुष्य बाह्यशक्तींच्या बाधेपासून मुक्त असतो.

सदाचारवृत्ती हा मानवी सुखाचा मूलस्रोत आहे. ही वृत्ती कशी संपादन करता

येईल याविषयी आपल्या प्रबंधात नासिर अल्-दीन याने मार्गदर्शन केले आहे. स्वतः-मधील नैसर्गिक गुणांच्या साहाय्याने किंवा कृत्रिम उपायांनी मनुष्य पूर्णत्व प्राप्त करण्याचे प्रयत्न करीत असतो. यांपैकी नैसर्गिक गुण हे एखाद्या बीजासारखे असतात. या बीजांतून ' प्राणीमात्र ' क्रमशः आपोआप पूर्णतेच्या दिशेने विकसित होत जातो. परंतु कृत्रिम उपायांचे तसे नाही. अवजाराच्या साहाय्याने लाकूड कापावे, तासावे आणि खुर्ची तयार करावी तसे कृत्रिम उपायांना पूर्णत्व प्राप्तीसाठी कामाला लावावे लागते. मनुष्यप्रणित कृत्रिम साधनांपेक्षा नैसर्गिक गुण केव्हाही उच्च प्रतीचे होत. कारण त्यांचा उगम प्रत्यक्ष ईश्वराच्या ज्ञानात असतो, तर कृत्रिम उपाय हे मानवी धडपड व वासना यांतून जन्म घेत असतात. तसेच नैसर्गिक गुण हे गुरूसारखे असतात. तर मनुष्यप्रणित कृत्रिम साधने ही या गुरूच्या शिष्यासारखी असतात. एखाद्या वस्तूच्या उत्पत्तीच्या वेळी तिच्या निर्मात्याने तिचा कल ज्या दिशेने ठेवलेला असेल त्याच दिशेने तिला पूर्णत्व दिले पाहिजे. म्हणून मनुष्यप्रणित कृत्रिम साधनांच्या साहाय्याने माणसाला लाभलेले पूर्णत्व नैसर्गिक गुणांनी प्राप्त होणाऱ्या आणि परमेश्वराने अगोदरच निश्चित केलेल्या पूर्णत्वाशी साम्य असलेले असेच असले पाहिजे. आचारांचे नियमन करणे आणि सद्गुणांची प्राप्ती करणे हे मनुष्यप्रणित साधनांचे उद्दिष्ट असल्यामुळे या साधनांनी बाबाबतीत नैसर्गिक गुणांचेच अनुकरण केले पाहिजे. मूळ नैसर्गिक प्रवृत्तींच्या मापानेच मनष्याने आपल्या शक्ती व कार्यप्रवृत्ती यांची रचना प्रथम केली पाहिजे आणि मग त्यांना वळण लावले पाहिजे. नवजात बालकातील विभिन्न कार्यशक्ती जशा क्रमशः विकसित होत असतात तसे झाले पाहिजे. बालकात अनेक स्वाभाविक शक्ती असतात. उदाहरणार्थ, दिलेले अन्न पचविणे किंवा अन्न दिले नाही म्हणजे रडणे. बालक मोठे होईपर्यंत त्याच्यामधील या विभिन्न शक्ती संस्कारित केल्या जात असतात. नैतिक आचरणांच्या बाबतीत तसेच केले पाहिजे. वासनांचे नियमन करण्यापासून प्रारंभ केला पाहिजे. मग क्रोधाचे नियंत्रण करायला, तसेच इतर प्रवृत्तींचे नियमन करायला शिकले पाहिजे. अशा प्रकारच्या नित्य शिक्षणाद्वारे मनुष्याला सद्गुणांची व सुखाची प्राप्ती होऊ शकेल.

तथापि आतापर्यंत उल्लेख केलेल्या तत्त्वज्ञानविषयक साहित्याचा इस्लामी नीति-तत्त्वांवर फारच अल्प प्रभाव पडलेला आहे असे दिसते. इस्लामी लोकसाहित्यात देखील जुन्या कर्मठ आचार-विचारांचीच शिकवण दिलेली आढळते. लोकसाहित्यात सर्वत्र हा अनुभव येतो. काहीही संबंध नसताना कित्येक पुस्तकात अशा प्रकारच्या कर्मठ विचारांचे अनावश्यक पाठ दिलेले आहेत. ( त्याला काही थोडे अपवाद आहेत. त्यांचा पुढे विचार करू. ) याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे ' अरेबियन नाईटस् 'मधील कथा. धर्माच्या आवश्यकता लक्षात घेऊन त्या कथा ' संपादित ' केल्याच्या खुणा त्यांपैकी अनेक कथां-मध्ये आढळतात. त्यांपैकी काही कथांत उपदेशपर असे लांबलचक आणि कथेच्या एकंदर सूत्राशी विसंगत असे परिच्छेद घुसडलेले आहेत. अशा प्रकारचा एक परिच्छेद एका कथेत मजीद अल् दीन या मृत्युशय्येवर पडलेल्या एका व्यापाऱ्याच्या तोंडी घातलेला

आढळतो. या परिच्छेदात ' फिकाह 'मधील नैतिक आचरणविषयक नियमांशी बरेचसे साम्य असलेला नैतिक उपदेश आहे. आपल्या उपदेशपर निवेदनात या व्यापाऱ्याने आपल्या मुलाला लोकांशी अधिक घनिष्ठ संबंध ठेवू नकोस आणि ज्यामुळे नुकसान व अनहित होईल असे काही करू नकोस असा हितोपदेश केला आहे. व्यापारी म्हणतो, " शक्य असेल तेव्हा सत्कर्म कर. माणसाशी नित्य उदारपणे व्यवहार कर. दया ( मारूफ ) करण्याच्या प्रत्येक संधीचा उपयोग कर. अल्लाचे स्मरण ठेव तसे केलेस तर तो तुझे स्मरण ठेवील. तू उधळेपणा केलास तर तुला अगदी हीन लोकांकडे याचना करावी लागेल. मनुष्याचे मोल त्याच्यापाशी जे असेल त्यावरच अवलंबून असते हे लक्षात ठेव. तुझ्यापेक्षा जे कनिष्ठ असतील त्यांच्याविषयी दयावृत्ती असू दे; तरच तुझ्याहून जो श्रेष्ठ आहे तो तुझ्याबद्दल दयावृत्ती दाखवील. तू कोणाचेही वाईट करू नकोस, नाहीतर तुझे वाईट करणारा कोणीतरी परमेश्वर तुझ्यावर आणून ठेवील. "

कोणी एक राजा व त्याचा वझीर शम्मास यांच्यामध्ये एकदा एक प्रदीर्घ वाद-विवाद ( खरे म्हणजे प्रश्नोत्तरे ) झाला. या दोघांसंबंधीच्या एका कथेत तो कथन केलेला आहे. या वादविवादाचे स्वरूप बरेचसे ' फिकाह ' मधील चर्चेसारखे आहे. इहलोकातील व परलोकातील मनुष्याची ईप्सिते कोणती या प्रश्नाविषयी इस्लाम धर्मात परस्परविरोधी निर्देश दिलेले आहेत. यांतून निर्माण झालेल्या अडचणींच्या चर्चेने वर उल्लेखिलेल्या वादविवादाचा प्रारंभ होतो. या लोकात मनुष्य केवळ उदरंभरणामागे लागला तर ते त्याच्या आत्म्याला अनहितकारक होईल; आणि केवळ परलोकात मिळणाऱ्या लाभा-पाठीमागे मनुष्य लागला तर ते या लोकातील त्याच्या शरीरसुखाच्या दृष्टीने मारक ठरेल. यातून मार्ग काय ? याचे उत्तर असे, की या लोकात जीवननिर्वाहासाठी मनुष्य करीत असलेल्या धडपडीतुन त्याला परलोकासाठी लागणारी शक्ती लाभत असते. मनुष्याला आपली शाश्वत भक्ती करायला लावण्याचे सामर्थ्य ज्या परमेश्वरापाशी आहे त्याच्याविरुद्धही पाप करण्याची मनुष्याची क्षमता, या आणखी एका प्रश्नाविषयी या वादविवादात चर्चा केलेली आहे. या प्रश्नाचे या चर्चेच्या ओघात असे उत्तर दिले आहे, की आपल्यावर प्रेम करण्याची ज्यांची पात्रता आहे त्यांना ईश्वराने कल्याणाचा मार्ग दाखविलेला आहे आणि त्यांची इच्छा असेल ती सत्कृत्ये करण्याचे सामर्थ्य त्यांना दिलेले आहे. असे असूनही जे लोक दुष्कृत्ये करतात ते पापी होत; तथापि त्यांच्या-साठीही पश्चात्तापाचा मार्ग मोकळा असतो. चांगले किंवा वाईट करण्याची शक्ती मनुष्याच्या पंचेंद्रियात असते. खरे तर ईश्वरावर प्रेम करण्यासाठीच मनुष्याला त्याने जन्माला घातलेले आहे; परंतु मनुष्यातील आत्म्याची स्वाभाविक ओढ वासनेकडे असते आणि मनुष्य आपल्या पंचेंद्रियांच्या साहाय्याने चांगल्या आणि वाईट गोष्टी करीत असतो. मनुष्यातील तीन दुर्गुण असे आहेत, की ज्यांची अनिष्टता कोणालाही नाहीशी करता येत नाही. मूर्खता, हीन चारित्र्य व असत्य हे ते तीन दुर्गुण होत. ज्यामुळे नुकसान होण्याचे टळते आणि फायदा होतो असे असत्याचे काही प्रकार आहेत. वास्तविक सर्वच खोटेपणा अनैतिक

असला तरी वरील प्रकारांच्या बाबतीत थोडा जागा आहे. सर्वच सत्ये चांगली होत; तथापि काही प्रसंगींची सत्ये अनैतिक होत. उदाहरणार्थ आपल्यापाशी असलेल्या गोष्टीं-संबंधीं बढाई मारण्यासाठी सांगितलेले सत्य. आपल्यापाशी नसलेल्या गोष्टींची बढाई मारणारा मनुष्य तर सर्वांत निर्लज्ज समजला पाहिजे.

तथापि कथाकहाण्यात सर्वसामान्यपणे लोकसमाजात प्रचलित असलेल्या नीति-कल्पनांचाच समावेश केलेला दिसतो. वर उल्लेख केलेल्या नैतिक उपदेशाशी त्याचा फारच थोडा मेळ बसतो. म्हणूनच इस्लाममधील धर्मपंडितांचा या कथा वाचण्यावर व कथन करण्यावर रोष असावा यात आश्चर्य नाही. काही इस्लामी देशात या कथांचे वाचन व श्रवण दुर्दैवी समजले जाते. इस्लामी धर्मविषयक साहित्याचा आणि या कथांचा कांही संबंध नाही हे निश्चित. परंतु, इस्लामच्या गरजा लक्षात घेऊन व त्यांच्याशी मेळ घालून त्या सर्व कथा तयार केल्या गेल्या आहेत हेही खरे. ज्या कथांचे विषय इहलौकिक व मानवी स्वरूपाचे नाहीत अशा कथांतही कपोलकल्पकतेचा वापर केलेला आहे. या व अशा प्रकारच्या अन्य कथांचे या संदर्भातील एक लक्षण असे की त्या कथांमध्ये काल्पनिक न्यायाला स्थान नाही. याचा अर्थ न्यायाच्या कल्पनेचा त्यात अभाव आहे असा अर्थातच नाही. तथापि पापाला अटळपणे शिक्षा मिळतेच असे त्यात दाखविलेले नाही. कितीही दुष्ट मार्गांनी संपत्ति मिळविली तरी त्याबद्दल अभय आहे; दुसऱ्यांना मारून सत्ता व संपत्ति मिळवायला प्रतिबंध केलेला नाही; उच्च पदस्थांच्या अप्रामाणिकपणाचा व जुलुमाचा या कथात गौरवानेच उल्लेख केलेला आढळतो. अशा लोकांना त्यांच्या कुकर्मांची सजा अखेर याच लोकात मिळते किंवा पुढील लोकात ती कृत्ये हिशेबात घेतली जातात असे मुळीसुद्धा सूचित केलेले नाही.

अशा प्रकारच्या बहुतांश कथांचे मूळ विषयच नैतिक स्वरूपाचे नाहीत, त्यामुळे त्या कथात हा दोष आढळत असावा. म्हणजेच अनैतिकतेचा हेतुपुरस्सर पुरस्कार करण्याचा तो प्रयत्न नाही. याच कारणामुळे बहुदा नशा करणे, अफू व हाशिश खाणे, संगीत–नृत्यात रममाण होणे वगैरे गोष्टी नित्याच्याच असाव्यात अशा पद्धतीने त्यांचा या कथांमध्ये उल्लेख केलेला आहे आणि या गोष्टींबद्दल कोठेही नापसंती दाखवलेली नाही.

या कथांत अनेक नियमबाह्य लैंगिक संबंधांचे प्रसंग वर्णिलेले आहेत. ते प्रसंग सांगण्यामागे कामुक व स्वैराचारी प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याचा कितीसा हेतु आहे हे निश्चित सांगता येत नाही. अश्लील प्रसंगांचे वर्णन करण्याच्या हेतुनेच काही कथा सांगितल्या आहेत हे उघड आहे. परंतु अनेक प्रसंगांचे वर्णन करताना वैषयिक प्रश्नांसंबंधी अनैतिक दृष्टिकोण स्वीकारलेला नाही. अशा अनैतिक दृष्टिकोणासंबंधी इस्लामी धर्म-शास्त्रज्ञांनी अधिकृतपणे नापसंतीच दर्शविलेली असली व त्याची कदर इतरत्र केलेली असली तरी 'अरेबियन नाईटस्' मधील कथांमध्ये अशी कदर केलेली नाही. या संदर्भात असे म्हणता येईल की, शरीराच्या अन्य क्रियांप्रमाणेच शरीर संभोगाची क्रिया ही एक

सामान्य क्रिया आहे असे (अरेबिनयन नाईट्स्मधील) मुस्लिम व्यक्ती मानतात. अगदी लहान मुलांच्या देखतसुद्धा मुस्लिम माणूस या विषयाची निःसंकोचपणे चर्चा करतो आणि याबाबतींतल्या अशा थोड्याच गोष्टी असतील की ज्या लहान मुलांना माहीत नसतात किंवा ज्यांची ते चर्चा करीत नाहीत.

ज्यांचे संबंध शरियतप्रमाणे कायदेशीर (हलाल) आहेत अशा स्त्री-पुरूषांच्या आपली नैसर्गिक लैंगिक भूक भागविण्याच्या प्रयत्नास उत्तेजन दिलेले आहे. जो अनेक विवाह करील तो मुस्लिम समाजातील सर्वोत्तम माणूस होय अशा अर्थाचे एक हदिस आहे. इतर हदिसांप्रमाणे हे हदिस देखील युक्तिवाद करताना पूरक किंवा विरोधी म्हणून वापरले जाते. ब्रह्मचर्य हे सुन्नाविरोधी मानलेले आहे. आणि सुफीपंथीय लोकांव्यतिरिक्त अन्य पंथीयात ब्रह्मचर्याचे आचरण होत नसावे. तथापि वैषयिक सुखाचा अतिरेक टीकास्पद[1] ठरतो. मात्र प्रार्थनेच्या प्रसंगी किंवा (विवाहप्रसंगी) शुभचिंतनपर भाषणांत वैषयिक सुखाचा उल्लेख करावयास प्रत्यवाय नसतो.

विधवा स्त्रीला पतीच्या निधनानंतर किंवा नवऱ्याने तिला घटस्फोट दिल्यानंतर विशिष्ट मुदतीपर्यंत पुन्हा विवाह करण्यास शरियतने लैंगिक शुद्धतेच्या कारणासाठी मनाई केलेली आहे. परंतु पुरुषाला मात्र आपल्या घटस्फोटित स्त्रीशी तिने आपल्या पुनर्विवाहित पतीशी असलेला लग्नसंबंध संपविला तर लगेच पुन्हा विवाह करता येतो. कदाचित हा कायदा घटस्फोट सहजपणे घेण्याच्या प्रकाराला पायबंद बसावा म्हणून प्रारंभी केला गेला असावा परंतु हा कायदा लैंगिक शुद्धतेच्या इस्लाममधील सर्वसाधारण कल्पनेविरुद्ध आहे.

विवाहेतर लैंगिक संबंध फक्त रखेलीच्या बाबतीत कायदेशीर मानला आहे. वेश्या व्यवसाय रूढ असला तरी तो तिरस्करणीय आहे. 'लुत'संबंधीच्या कथेत गुदामैथुनास मनाई असल्याचे ध्वनित केले आहे.[2] परंतु अरेबियन नाईट्स्मधील गोष्टी आणि इतर पुरावे पाहता गुदामैथुन प्रचलित असावे आणि जनमनात त्याविषयी फारशी नापसंती नसावी असे दिसते. हा प्रकार व अन्य व्यभिचार आणि अनेक प्रकारच्या शारिरीक सुखाकडे वाढती प्रवृत्ती ही सर्व संस्कृतीच्या ऱ्हासाची लक्षणे होत असे इब्ने खाल्दुन याने म्हटले आहे.[3]

---

१. परंपरावादी मताचा पुरस्कर्ता अबु अब्दुल रहमान अल् नासी याला चार बायका व कित्येक रखेल्या होत्या.

२. कुराण २६^{६५} वर सुरुवातीस पहा.

३. फक्त मालिकी पंथाचे लोकच गुदामैथुन हा गंभीर गुन्हा मानीत होते असे इब्ने खाल्दुनला ध्वनित करावयाचे आहे असे दिसते. परंतु शाफी पंथीयदेखील या प्रकाराला एक प्रमुख पाप समजतात.

अर्थात खरी शालीनता किंवा तिचे सोंग करणारी दांभिक नम्रता यांचा अभाव होता असा या विवेचनाचा अर्थ नाही. उदाहरणार्थ शरियतने घालून दिलेले पडद्या-संबंधीचे नियम. अगदी धर्मनिरपेक्ष कायद्याद्वारे ज्या देशात पडद्याला बंदी केलेली आहे, त्या देशातसुद्धा, विशेषतः अधिक गरीब समाजात पडद्याची पद्धत चालूच आहे. पडदा न घालण्याच्या मानसिक परिणामांची वर्णने इस्लामी साहित्यात केलेली आढळतात. या संदर्भात अशी एक कथा सांगितली जाते की, एका हकीमाने एका स्त्रीरोग्याच्या बाबतीत पडदा अकस्मात काढून टाकावयास लावण्याच्या 'धक्कापद्धतीच्या उपचारा'चा उपयोग केला होता. बसरा येथील सूफीवादी तत्त्वज्ञ हसन याच्या चरित्रात फरिद अल् दीन अत्तार याने खऱ्या मर्यादाशीलतेचे एक उदाहरण दिले आहे. एकदा एक स्त्री चेहऱ्यावर बुरखा न घेता आणि हात न झाकता आपल्या नवऱ्याविरुद्ध तक्रार करण्या-साठी हसनकडे आली, तेव्हा हसनने तिला प्रथम चेहऱ्यावर पडदा घ्यायला सांगितले. त्यावर ती स्त्री उत्तरली, "(परमेश्वराने) मला अशा प्रकारचा जन्म दिला आहे की माझी अक्कल मला सोडून गेली आहे. आपण मला सावध केले नसते तर मी याच अवस्थेत रस्त्यात हिंडले असते. परंतु माझ्या चेहऱ्यावर बुरखा नाही हे आपल्या लक्षात आले नसते तरी ईश्वराशी एवढा जवळचा संबंध असलेल्या आपल्यासारख्या माणसाला त्याचे विशेष काय?" इब्ने कुतैब याने एका ठिकाणी दांभिक मर्यादाशीलतेचा धिक्कार केला आहे. तो म्हणतो, कोणी पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या जननेंद्रियाचा उल्लेख केला तर रागावण्याचे किंवा लज्जेने तोंड वळविण्याचे कारण नाही. माणसाच्या शरीरावयवाचा नामोल्लेख करण्यात काहीही पाप नाही. दुसऱ्यांची प्रतिष्ठा मलीन करण्यात आणि त्यांची बदनामी करण्यात मात्र पाप आहे.

ज्यामध्ये अनेकदा उपदेशपर नीतीपाठ दिलेले आहेत असे काही मुस्लिम साहित्य आहे. त्यात वागण्या-बोलण्याचे रीतीरिवाज (आदब) आणि 'व्यवहारातील' शिष्टाचार यांची चर्चा केलेली आहे. या वर्गातील साहित्य ललित व काव्यात्मक आहे. रीतीरिवाजांची व शिष्टाचारांची चर्चा करताना या साहित्य प्रकारामध्ये पैगंबर, त्यांचे सहयोगी आणि अन्य इस्लामी धर्मपंडित यांच्या तोंडच्या नीतिविषयक उद्गारांसह सर्व गोष्टींचा उपयोग केला आहे. अशा प्रकारच्या साहित्याचा हेतु काय आहे हे इब्ने कुतैब याने आपल्या उयुन अल् अखबार (परंपरांचे उगमस्थान) या ग्रंथाच्या प्रारंभी अचुकपणे सांगितले आहे. तो म्हणतो "या ग्रंथांत कुराण, सुन्ना, इस्लामी कायदा किंवा हलाल व हराम कोणते यासंबंधी काहीही चर्चा केलेली नसली तरी हे पुस्तक उच्च आचारांना मार्गदर्शक असे आहे. कारण त्यात माणसाला उदात्त चारित्र्याचे दिग्दर्शन केलेले आहे. या पुस्तका-मुळे हीन वर्तणुकीला प्रतिबंध होऊ शकेल. परमेश्वराकडे नेणारा फक्त एकच रस्ता आहे; आणखी रस्तेच नाहीत असे नाही. नमाजासाठी रात्री जागण्यात किंवा दीर्घकाळ उपवास करण्यात अथवा हलाल आणि हराम काय असते याविषयीच्या ज्ञानात काही सर्व सत्कर्म साठविलेले नाही. ईश्वराकडे जाणारे अनेक रस्ते आहेत. सत्कर्मांची दारे विशाल आहेत.

त्या त्या काळाची भरभराट होण्यातच धर्माची भरभराट आहे आणि त्या त्या काळाची समृद्धी सुलतानाच्या वैभवावर अवलंबून आहे. अल्लाहचा सुल्तानाला आशीर्वाद असेल तर सुलतानाची समृद्धी त्याच्यातील न्यायप्रियतेमुळे व निर्दोष बुद्धीमुळे होऊ शकेल."

इब्ने कुतैबच्या वरील विचारात प्रांजलपणाची एक चमक दिसून येते ती वगळता त्याच्या ग्रंथातील एकंदर विवेचनाचा नीतिविषयक दृष्टिकोण कर्मठ व गतानुगतिक आहे. 'आदब' विषयीचा त्याचा दृष्टिकोण इतर बहुतेक लेखकांप्रमाणेच आहे. आपल्या डोळ्यांना जे सुखकारक वाटते ते मनुष्याने टाळावे या वर्तनविषयक नियमासंबंधी त्याने आपले जे विचार व्यक्त केले आहेत त्यावरून त्याचा दृष्टिकोण स्पष्ट होतो. तो म्हणतो, "(ती गोष्ट टाळावी असे) त्यात काही नसते तर आपण त्या गोष्टीस प्रतिबंध केला नसता."

अशा प्रकारचे नैतिक आचरणासंबंधींचे आपले विचार इस्लामी नीतितत्त्वज्ञ सतत सांगत राहिल्याचा एकंदर परिणाम असा झाला की त्यापैकी काही महत्त्वाचे विचार इस्लामप्रमाणेच इतर धर्मीयांनाहि चांगले माहीत झाले. मंगोल वंशाच्या इतिहासाचा लेखक बुद्धधर्मीयांच्या 'नोम' या मंत्राविषयी लिहिताना म्हणतो की त्या मंत्राद्वारे बुद्धधर्मीयांना "इतर सर्व धर्मातील प्रेषितांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानासारख्या व धर्मश्रद्धेसारख्या उदात्त विचारांचा उपदेश मिळतो. त्यापैकी काही उपदेशात मनुष्याने दुष्कृत्य करण्यापासून सावध राहिले पाहिजे; दुसऱ्याला अपाय होईल असे काही करता कामा नये वगैरे गोष्टी सांगितलेल्या आहेत. तसेच दुष्कृत्याचा बदला सत्कृत्याने घ्यावा आणि प्राण्यांशी क्रूरपणाने वागू नये असाही आदेश देण्यात आला आहे."

धार्मिक आचारसंहितेमधील नैतिक आवाहनांचे आचरण इस्लाम धर्माचे लोक किती प्रमाणात करीत असतात याचा बिनचुक अंदाज करणे कठीण आहे. धर्मपंडितांनी घालून दिलेल्या आदर्शाप्रत जाण्याचा क्वचितच प्रयत्न होत असेल. शिराझ येथील शेख-सादीसारख्या लेखकांनी याबाबतीतील लोकांची प्रवृत्ती बरोबर ओळखली होती. कारण या लेखकांनी पुरस्कारिलेल्या नैतिक आचरणाच्या तत्त्वामध्ये 'फिकाह' पेक्षाही नैतिकतेची कमी बूज ठेवलेली आहे. सादीने केलेला नैतिक आचरणासंबंधीचा सर्व उपदेश खऱ्या नैतिकतेपेक्षा तत्कालिक उपयुक्ततेवर आधारलेला आहे. शांतता व लाभ मिळवून देणारे असत्य सादीच्या दृष्टीने कलह घडविणाऱ्या सत्यापेक्षा चांगले. सादीच्या मते राजा कधीच चुकत नाही आणि तसे सांगितले गेले पाहिजे. कारण राजाला विरोध करणे म्हणजे प्राणाला मुकणे होय. त्याचप्रमाणे आपल्या मित्रांशी सलोख्याने राहणे शहाणपणाचे होय. परंतु मित्रांवर पूर्ण भरंवसा टाकू नये. कारण कदाचित् त्यांच्याशी असलेली मैत्री कधीतरी संपुष्टात येईल आणि मग तुमच्याविषयी त्यांना असलेल्या माहितीचा ते तुमच्याविरुद्ध उपयोग करतील. दुसऱ्याने केलेल्या बुराईची भरपाई भलाईने करणे मूर्खपणाचे आहे. तसेच दुष्ट माणसाला दया दाखविणे म्हणजे सुष्टतेवर अन्याय करणे आहे. तुमचा शत्रु तुमच्या कचाट्यात सापडला असेल तेव्हा त्या संधीचा फायदा घ्या. जुलूम

करणाऱ्याला क्षमा करणे म्हणजे ज्याच्यावर जुलूम झाला आहे त्याला अपाय करणे होय. याउलट सादी याने मित्रनिष्ठा, कल्याणकर्त्याविषयी कृतज्ञता व कनिष्ठांविषयी दयाबुद्धी व समजूतदारपणा, समाधानीवृत्ती आणि प्रांजलपणा या गुणांचा गौरव केला आहे. आपल्या सर्व प्रतिभाशक्तीनिशी त्याने त्या गुणांचा उपदेश केला आहे. मनुष्याला त्याच्या कर्माबद्दल मिळणाऱ्या चांगल्या किंवा वाईट फळांविषयी सर्वच कर्मठ विचार-पंथातील उपदेशकांच्या मनात जशी अनिश्चितता आहे, तशीच ती सादीच्या मनातही आहे. नियति निष्ठुर आणि अगम्य आहे. नियतीचे निर्णय अपरिवर्तनीय आहेत आणि त्याविषयी शंका घ्यायची नसते.

नैतिक तत्त्वांसंबंधींच्या सादीच्या दृष्टिकोणासारखाच दृष्टिकोण लुकमान या ज्ञानी पुरुषाच्या म्हणून सांगितल्या जाणाऱ्या बोधपर कथांत आढळतो. इसापच्या कथांशी यापैकी बऱ्याच कथांचे साम्य आहे. या कथांचे संपादन ज्या मुस्लिम संपादकाने केले आहे त्याने प्रत्येक कथेच्या शेवटी तिचे तात्पर्य सांगितले आहे. त्यामध्ये ‘ फिकाह ’मधील नीति-तत्त्वांचा फारसा प्रभाव दिसत नाही. लुकमानच्या कथांतील तत्त्वानुसार मनुष्याचे इह-लोकांतील जीवन कितीही हालअपेष्टांनी व दारिद्र्याने भरलेले असले तरी तेच स्वर्गापेक्षा जास्त जगण्यालायक आहे. मृत्यु सर्व आनंदाचा शेवट करीत असतो. चतुराईने व लबाडीने ताबडतोब फायदा मिळविता येतो. भलाईचा आदर्श बहुतांश मानवाच्या शक्ती बाहेरचा आहे. कर्तव्याची हाक येते तेव्हा बहुतेक माणसे सुस्त राहतात; पण सुखाचा आवाज आला की त्यांचे कान टवकारतात. चांगुलपणाच्या महत्त्वाविषयी संदेह व्यक्त करणारा निराशेचा भाव बऱ्याचशा कथांत आढळतो. काही झाले तरी दुष्ट माणसाला सुष्ट माणूस सुधारू शकणार नाही. उलट तो स्वतःच त्याच्या संगतीने बिघडेल. आणि दुष्ट माणसाला दया दाखविणे म्हणजे त्याच्यातील दुष्टता फक्त वाढविणेच होय.

इस्लामच्या बहुसंख्य अनुयायांचे नैतिक आचरण शरियतने घालून दिलेल्या आदर्शांच्या मानाने कमी दर्जाचे आहे अशी टीका इस्लामच्या काही थोड्या मुस्लिम टीकाकारांनी त्याचप्रमाणे सामाजिक प्रश्नांसंबंधी उपरोधपूर्ण लेखन करणाऱ्या अगदी मोजक्या लेखकांनी केलेली आहे. सीरियामधील मारा येथील अंधकवि अबु अल् अला मृत्यु ( १०५८ ) हा यापैकी एक टीकाकार होता. शरियतच्या आज्ञा किंवा इस्लाम-धर्माचा एखादा पंथ मानण्यातच नीतिमत्ता आहे ही गोष्ट मानावयास त्याने धैर्यपूर्वक नकार दिला. तो म्हणतो की, भेदभाव न करता सर्वांशी न्यायाने वागणे आणि ज्याला जे रास्तपणे दिले पाहिजे ते त्याला देणे यातच खरा धर्म आहे. त्याने लिहिलेल्या एका चुटक्यात तो उपहासाने म्हणतो, “ तुम्ही स्वतःला धर्मपरायण म्हणविता, पण मी ईश्वराची शपथ घेऊन सांगतो की तुम्ही मशीदीत जात असाल पण तुमच्यापेक्षा अगदी सामान्य दुर्दैवी माणसाने तुमच्याबद्दल तक्रार करावी असे तुमच्या हातून काही घडले असेल तर तुम्हाला धर्म नाही ( असेच मी म्हणेन. ) ” दुसऱ्या एका चुटक्यात अबू

अल् अला म्हणतो, "अगदी मोझेसचे पुस्तक वाचणारा किंवा ईसाविषयी मनात भक्तिभाव उद्भवलेला" कोणीही मनुष्य मला (म्हणजे कोणाहि माणसाला) इजा करण्याच्या प्रवृत्तीपासून दूर राहणार असेल तर मी त्याच्यासाठी परमेश्वरी कृपेची करुणा भाकेन." केवळ उपास करण्यात किंवा आदरणीय (धार्मिक) पदावर असण्यात अथवा सूफी बाद्यांप्रमाणे लोकरीचे जाडेभरडे कपडे वापरण्यात सदाचार आहे असे नाही, तर दुष्ट प्रवृत्तीचा त्याग करण्यात आणि अंतःकरणांतून मत्सर व द्वेषभावना झटकून टाकण्यात सदाचार आहे.

आपल्यावर धर्म विरोधी मते सांगितल्याचा आरोप येऊ नये यासाठी अबु अल् अला याने क्वचितप्रसंगी इस्लाममधील बाह्य धर्माचार पाळले पाहिजेत असे सांगण्यात अनमान केलेले नाही. तथापि मनुष्याने या बाह्याचारांना दैनंदिन जीवनात नैतिक सदाचारांचीही जोड दिली पाहिजे असे त्याने आग्रहपूर्वक सांगितले आहे. या संदर्भात तो म्हणतो, "इतर लोक प्रार्थना करतील तेव्हा तुम्हीही प्रार्थना करा, दान कर द्या, परंतु निरर्थक चकाट्या पिटीत बसू नका. मास मिळावे म्हणून पशु मारण्याकरिता सुरीला धार लावू नका किंवा आपल्या बांधवांविरुद्ध तलवार उगारू नका."

तथापि योग्य ज्ञान प्राप्त व्हावे व त्यातून योग्य कृति व्हावी याकरिता विवेकशक्ती हेच साधन आहे ही गोष्ट दार्शनिकांप्रमाणे अबु अल् अला हा देखील सर्वसाधारणपणे मान्य करतो. सद्गुणांची प्राप्ती मनाद्वारेच होत असते आणि असद्प्रवृत्तीकडे असणारा मनुष्याचा स्वाभाविक ओढा मनच मोडून काढीत असते. तथापि अबु अल् अला सदसद्विवकेबुद्धीला विवेकवृत्तीपेक्षा श्रेष्ठ मानतो. "तुमची सदसद्विवेकबुद्धी जे दाखविते यापेक्षा काही निराळे तुम्हाला तुमच्या विवेकाच्या आरशात दिसत असेल तर ते चूक असले पाहिजे." आपल्या बाबतीत जे व्हावे असे आपणाला वाटते तेच दुसऱ्याच्या बाबतीत करावे आणि इतर लोकांना जे ऐकावेसे वाटेल तेच त्यांना ऐकवावे अशासारखा उपदेश अन्य नीतिउपदेशकांप्रमाणे त्यानेही केलेला आहे. तथापि तो ठामपणे असे प्रतिपादन करतो की, भलाई करण्याच्या उद्देशानेच भलाई केली पाहिजे; भलाईच्या मोबदल्याची अपेक्षा बाळगण्यात खरी नैतिकता नाही. याव्यतिरिक्त केलेले अन्य कोणतेही कर्म हा सत्कृत्यांचा निव्वळ व्यापार आहे.

अबु अल् अलाच्या मते जीवन हा एक कंटाळवाणा प्रकार आहे आणि निसर्गतः माणसे दुष्प्रवृत्त आहेत. म्हणून मनुष्याने खरे म्हणजे ऐहिक जीवनातून निवृत्त व्हावे व मुलांना जन्माला घालू नये. कारण दुसऱ्या लोकांवर तो एक नको असलेला बोजाच आहे. परंतु माणसांनी एकत्र राहणे आणि आपले नैसर्गिक विकार शमविणे जरूर असेल तर त्यांनी स्वतःचा उदरनिर्वाह स्वतःच केला पाहिजे. मात्र जीवनात संकटे येणार नाहीत अशी त्यांनी अपेक्षा करू नये. तसेच परमेश्वरी प्रसादापेक्षा अन्य कोणत्याही फळाची अपेक्षा न करता शक्य असेल तेव्हा सत्कर्म करीत राहावे. यापेक्षा सर्वात

महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपजीविकेची अन्य कोणतीही साधने राहिली नसतील तेव्हा स्त्रियांनी चरख्यावर काम करावे आणि आपल्या निर्वाहापुरती कमाई करावी. अशा स्त्रियांना ईश्वर आत्म्याच्या पुनरुत्थानाच्या दिवशी क्षमा करील. मनुष्याच्या कठिण दिवसात त्याच्या अंगचा सोशिकपणा जास्तच वाढतो. आपल्या शिवणटिपणाच्या कामातून मिळविलेल्या कमाईतून स्त्रियांनी दानधर्म करावा. त्यांनी तळपत्या उन्हात घराबाहेर पडून गरीब व भुकेलेल्या गरजू लोकांना अन्नदान करावे. असे करणाऱ्या स्त्रिया श्रेष्ठ प्रतीच्या सत्कृत्याच्या धनी होत.

अबु अल् अला याने मनुष्येतर जीवित प्राण्यांविषयींच्या दयावृत्तीला जीवनात सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आहे. याबाबतीत त्याच्यावर हिंदुस्थानातील जैनधर्मीयांच्या विचारांचा प्रभाव होता असे दिसते. वस्तुस्थिती काहीही असली तरी आपल्या या तत्त्वामुळे त्याने पराकोटीच्या शाकाहारी जीवनाचा अंगिकार केला होता. तो मांस-मच्छर तर खातच नसे; परंतु दूध, अंडी, मधही खात नसे. याच तत्त्वाखातर त्याने कपड्यासाठी जनावरांची कातडी आणि लोकर वापरणे निषिद्ध ठरविले आणि लाकडी खडावा वापरावे असे सांगितले.

उबैद-ई-झाकानी या उपरोधपूर्ण लेखन करणाऱ्या इराणी लेखकाने ( १३४० ) असे म्हटले आहे की अबु अल् अलाचा मुख्य सिद्धान्त अगदीच सामान्य आहे. त्याचे म्हणणे असे की सज्जन व उदार मनुष्य कोणत्या धर्माचा आहे याला महत्त्व नाही; इस्लामनिष्ठ दुश्चरित्र मनुष्यापेक्षा अश्रद्ध पण सज्जन मनुष्य चांगला अशी जुनी विचार-सरणी आहे. तसेच जुन्या पठडीतील तत्त्वज्ञांच्या मताप्रमाणे सूज्ञपणा, धैर्य, संयम व न्यायवृत्ती, हे ज्यासाठी मनुष्याने प्रयत्न करावा असे सद्गुण आहेत; त्यामुळे माणसाला या लोकांत सुखाचा व परलोकात स्वर्गाचा लाभ होतो, परंतु आता सर्व काही बदलले आहे. आता आधुनिक जगातील लोकांचा आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास नाही. मनुष्याचे जीवन या जगापुरतेच आहे. एकदा शरीर नष्ट पावले की मनुष्य कायमचा नष्ट होतो. म्हणून खावे, प्यावे आणि मजा करावी. तसेच विवेक, क्रोध व वासना या तीन प्रवृत्ती ज्या गोष्टींना जन्म देतात त्यांच्या स्वरूपातदेखील आधुनिक काळात परिवर्तन झालेले आहे असे 'आधुनिक' लोक मानतात. धैर्यशीलतेचा जो गुण माणसाला संकटे व भय यांच्याशी मुकाबला करण्याला प्रवृत्त करतो त्याचा शेवट निरपराध व्यक्तींचे रक्त सांडण्यात किंवा आत्मघातांत आणि नरकप्राय यातनात होत असतो असे या मंडळींना वाटते. जे अवैध असेल त्याकडे आपली नजर जाऊ द्यावयाची नाही, दुसऱ्याच्या बदनामीकडे आपले कान लावायचे नाहीत, इतरांची संपत्ती बळकाविण्यासाठी आपल्या हातांचा उपयोग करायचा नाही, अनैतिक शब्द बोलण्यासाठी आपल्या जिव्हेचा वापर करायचा नाही आणि आपल्या कनिष्ठ दर्जाच्या शरीराला ( आत्म्याला ) अनिष्ट गोष्टींपासून दूर ठेवायचे ही पूर्वीच्या काळी प्रतिष्ठित मनुष्यांची लक्षणे समजली जात. असा माणूस

आदरणीय मानला जात असे. या संदर्भात उबैद म्हणतो, "परंतु आजच्या जमान्यांतील लोकांना असे वाटते की आपल्या पूर्वजांच्या या कल्पना चूक होत्या. आणि त्यामागे लागल्यामुळे त्यांनी जीवनात कोणतेही सुख न मिळविता अज्ञानाने व मूर्खपणाने व्यर्थ काळ दवडला." आधुनिक लोकांना या जीवनाचे अधिक ज्ञान आहे. "या जगातील जीवन हा एक निव्वळ खेळ आहे, एक करमणूक आहे, एक मनोरंजनाचा प्रयोग आहे आणि व्यर्थ दिमाख दाखविण्याचे साधन आहे. आपल्या संपत्तीत आणि मुलाबाळांत वाढ करण्याचे स्थळ आहे इत्यादी..." या कुराणांतील[१] वचनाचा आधुनिक लोकांनी आपल्या कल्पनेप्रमाणे अर्थ लावला आहे. त्यांचे म्हणणे असे की कायद्याने निषिद्ध ठरविलेल्या मार्गांनीच जीवनात आनंद व मजा मिळविता येणे शक्य आहे. आणि दुसऱ्यांवर अन्याय केल्याशिवाय पैसा, संपत्ती मिळवणे शक्यच नाही. म्हणून संयमित व आदरणीय आचारांचा माणूस हा सांप्रतच्या जगातील मनुष्य आहे असे समजता येत नाही; कारण तो एक व्यर्थ जीवन जगत असतो. याच सुरात पुढे उबैद याने नैतिक आचरणाविषयीच्या आज्ञांना किंमत देण्याची जरूरी नाही असे म्हणणाऱ्या लोकांच्याविषयी उपरोधिकपणे लिहिले आहे.

मुस्लिमांच्या जीवनाचे प्रत्यक्ष अवलोकन केले तर असे दिसून येते की, इस्लाम-धर्माने सांगितलेल्या आदर्शांचा त्यांच्या वागणुकीवर काही बाबतीत प्रभाव पडलेला असला तरी इतर काही बाबतीत तो पडलेला नाही. सर्वसामान्यपणे असे म्हणावयास हरकत नाही की ज्या व्यक्तींनी आपल्या सद्धर्मनिष्ठेला बऱ्याचशा उच्च प्रतीच्या नैतिक आचरणाची जोड दिलेली आहे अशा व्यक्ती इतर धर्मीयांप्रमाणे इस्लाममध्येही पुष्कळ आहेत. खुद्द शरियतचे मोठ्या प्रमाणात अनुसरण होत असते. इतके की अनेक इस्लामी देशांत मादक पेये घेण्याचे प्रमाण कमी आहे. त्या देशात या व्यसनांविरुद्ध अतिशय तीव्र जनमत आहे. तथापि अफूसारख्या मादक पदार्थांचा वापर मात्र खूपच प्रमाणात केला जातो. वास्तविक अफुचे गुणधर्म पाहता तिचे सतत सेवन करावयाचे नसते. तरी-देखील अफू व भांग यांचा व्यापार मुस्लिम देशांत मोठ्या प्रमाणात व उघडपणे चालू असतो.[२] लैंगिक नीतिमत्तेच्या ज्या कल्पना साधारणपणे पाश्चिमात्य देशांत रूढ आहेत त्याहून इस्लाममधील तत्संबंधीच्या कल्पना भिन्न आहेत हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. परंतु लैंगिक नीतिमत्तेसंबंधीच्या इस्लाम धर्मातील कल्पनांचा निकष प्रचलित इस्लामी कल्पनांना लावला तरी लैंगिक बाबतीत बराच ढिलेपणा आहे असे दिसून येते. हा प्राचीन प्रथेचा अवशेष आहे. मात्र लैंगिक ढिलेपणाबद्दल जनतेत टीका होते. तसेच धर्माधिकाऱ्यां-कडून याबाबतीत तीव्र नापसंती व्यक्त केली जाते. निरपराध स्त्रियांना व मुलींना भ्रष्ट करणे हे

१. कुराण ५७[१९].

२. वेदनेपासून मुक्तता मिळविण्याचे शास्त्रशुद्ध उपचार मुस्लिम देशांत फारच कमी आहेत ही गोष्ट या संदर्भात लक्षात घेणे जरूर आहे.

सर्वत्र अप्रतिष्ठितपणाचे समजले जाते. तसेच वेश्याव्यवसाय करणे आणि वेश्यांकडे जाणे हे तिरस्करणीय मानले जाते. व्यापारधंद्यातील नीतिमत्ता त्या त्या व्यक्तीच्या चारित्र्यावर अवलंबून असली तरी बेकायदेशीर फायदा घेण्याच्या प्रवृत्तीचा कुराणाने धिक्कार केला असल्यामुळे त्याचाही प्रभाव व्यक्तीच्या व्यवहारावर पडतो. तसेच काही देशांत ( उदा.– पाकिस्तानात ) अद्यापही व्याज घेण्याच्या बाबतीत अनिच्छा दिसून येते. तथापि तेथेही याबाबतीत पुष्कळदा कुराणातील कायद्याचे तांत्रिकपणे पालन करण्याचीच प्रवृत्ती दिसून येते. सर्वसाधारणपणे खरे बोलण्यावर भर दिला जात असला तरी एकंदरीत इस्लाममध्ये हा प्रश्न प्रत्येक व्यक्तीच्या सदसदविवेक बुद्धीवर सोपविला आहे असे दिसते.

आपापसांतील भांडणात हत्येचा बदला हत्येने घेण्याची प्रवृत्ती नाहीशी करण्याचा मुहम्मदांचा प्रयत्न मात्र असफल झाल्यासारखा वाटतो. युरोपियन शासन आहे तेथे या प्रवृत्तीला पायबंद घातला गेला आहे. तथापि इतरत्र रक्तमय कलहाची प्रवृत्ती सक्रिय आहे आणि त्यातून माणसाचे खूनही पडतात. बदला घेण्याच्या कायद्याची प्रत्यक्ष अमलबजावणी मात्र कायद्यातील तरतुदीपेक्षा माणुसकीनेच होत असल्याचे आढळते. डोळ्याच्या बदला डोळा काढण्याची कायद्यातील तरतूद शब्दशः कधीच उपयोगात आणली गेली नसेल. हत्येद्वारे बदला घेण्याऐवजी पैशाने नुकसानभरपाई करून घ्यावी या ‘ फिकाह ’ मधील नियमामुळे याबाबतीतील बरीचशी अनैसर्गिक क्रूरता नाहीशी झाली असावी.

□ □

प्रकरण ६

# इस्लाममधील वहिवाटी, प्रथा व ऐहिक कायदे

या आधी प्रसंगवशात् सांगितल्याप्रमाणे इस्लामी साम्राज्य ही धर्माधिष्ठित सत्ता आहे आणि अल्लाह ही सर्वोच्च सत्ताधीश व कायदेकानू सांगणारी एकमेव विश्वासार्ह शक्ती आहे असे इस्लामच्या तत्त्वज्ञानात समजले जाते. मुहम्मद पैगंबर हे अल्लाहचे प्रतिनिधी असून ईश्वरी कायद्यांचे ज्ञान इस्लामधर्मीयांना मुहम्मदांच्याद्वारे होत असते. पैगंबरांचे एकंदर आचरण (सुन्ना) व त्यांची वचने आणि कुराण यांमध्ये हे ईश्वरी कायदेकानू स्पष्टपणे अथवा गर्भितपणे समाविष्ट आहेत. तसेच या कायद्यांवरच शरियत आधारलेले आहे असे गृहीत धरलेले आहे. मुहम्मद पैगंबर हेच कुराणाचे सर्वोत्तम भाष्यकार होते आणि त्यांच्या देहावसानानंतरच्या काळांत कायदेकानुंची संहिता याद्दष्टीने कुराण हे कधीच पुरेसे उपयुक्त आहे असे मानले जात नव्हते. कायदे म्हणून 'परंपरां'चा उपयोग करण्यात येऊ लागला तेव्हादेखील इस्लामी साम्राज्यांत आणलेल्या नव्या प्रदेशांच्या ऐहिक शासकांना नव्या राजकीय व शासकीय समस्यांच्या सोडवणुकीसाठी आपल्या स्वतःच्या उपायांचा आश्रय घ्यावा लागत असे. अशा वेळी शासकांपुढे दोन मार्ग असतः एक, नवे कायदे करणे आणि दुसरा, स्थानिक रीतिरिवाज इस्लामशी विसंगत आहेत की नाहीत याची फारशी चिंता करीत न बसता ते तसेच चालू ठेवणे.

लैंगिक संबंध व स्त्रियांचा दर्जा याबाबतींत पैगंबरांनी काही थोड्या लक्षणीय सुधारणा केल्या. परंतु त्या वगळता त्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेच्या तात्त्विक आधारांत फारशी ढवळाढवळ केली नाही. पैगंबरांनी आपल्या विचारांत टोळीच्या जागी सबंध मुस्लिम समाजाला कल्पिले एवढेच. परंतु त्यांनी केलेले कायदे मूलतः टोळी पद्धतीच्या जीवनाला लागू होणारेच होते. त्यांचे कायदेकानू प्रामुख्याने त्यांच्या स्वतःच्या कुरेशी टोळीच्या रीतिरिवाजांवर आधारलेले होते. इतर जनसमूहांवर व जनसमाजांवर ते लादले गेले होते. पैगंबरांच्या कुरेशी जमातीप्रमाणे या विभिन्न समाजांचे स्वतःचे असे दृढमूल झालेले संस्कार व सामाजिक कायदेकानू होते. पुष्कळशा बाबतींत नव्या इस्लामी सामाजिक पद्धतीला जुन्या सामाजिक पद्धतीत बदल घडवून आणता आला नाही. किंवा निदान असे म्हणता येईल की, जुन्या पद्धतीमधील बऱ्याचशा गोष्टी तशाच कायम

राहिल्या आणि नव्या इस्लामी सुधारणांच्या बरोबरीने जनजीवनात त्यांचे स्थान कायम राहिले.

पुढे नवे नवे प्रदेश इस्लामी साम्राज्यास जोडले गेले. साम्राज्यात अशांतता निर्माण झाली. या काळात ‘ फिकाह ’ सार्वत्रिक स्वरूपात प्रस्थापित झाले. त्यानंतर कायदेकानुंची सैद्धान्तिक पद्धतीने आणि सूत्ररूपाने मांडणी करण्याचा काळ आला. या काळात इस्लामी कायद्याच्या मूळ ‘ आधारां ’च्या सहाय्याने विधिपंडितांनी तर्कपद्धतीने व अनुमान-पद्धतीने इस्लामी कायदेकानुंचे विवेचन करण्याचे काम आरंभले. यातूनच विभिन्न आचारपंथांचा ( मजहब ) उदय झाला. विशिष्ट स्थानिक गरजा व विधिपंडितांच्या व्यक्तिगत आवडीनिवडी यानुसार या विभिन्न आचारपंथांत मतभेद होते. तथापि त्या सर्व पंथांच्या आचारसंहितांमध्ये मूलतः साम्य होते. या संहितांमधील अनेक नियम फारसे व्यावहारिक नव्हते; त्यांचा इस्लामधर्मीयांच्या सर्वसाधारण जीवनाशी फारसा संबंधही येत नसे. परंतु मूलतः हे नियम म्हणजे अल्लाहचे कायदे आहेत अशी भावना असल्यामुळे आदर्श आचारपद्धतीचा नमुना म्हणून त्यांना इस्लामधर्मीयात मान्यता होती. त्यामुळे दैनंदिन जीवनातील गरजांच्या बाबतीत ‘ फिकाह ’मधील ज्या नियमांची फारशी अडचण होत नसे ते नियम त्यासाठी बराचसा प्रयत्न आणि खर्च करावा लागत असला तरी अमलांत आणले जात. या नियमांनुसार मुस्लिम प्रार्थना करीत, उपास करीत, दानधर्म करीत आणि मक्केची यात्रा करीत.

तथापि अनेक देशांत पारंपारिक वहिवाटींनी व प्रथांनी कायद्याला बाजूला सारल्याचे प्रत्ययास येते. शिवाय अनेक इस्लामधर्मीय टोळ्यांत व अन्य जमातींमध्ये अलिखित कायदेकानू व परंपरा यांच्या संहिता प्रचलित आहेत असे स्पष्ट दिसते. त्याद्वारे त्या त्या जमातींमधील लोकांच्या जीवनाचे नियमन होत असते. खरे तर कुराणात[1] तीनदा असे बजावले आहे की, जे लोक अल्लाहने दिलेल्या प्रकटीकरणाप्रमाणे आपल्यातील वादांचा निर्णय करीत नाहीत ते अश्रद्ध व दुष्कर्म करणारे होत. पण अगदी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत दक्षिण पॅलेस्टीनमध्ये ‘ फेलाह ’ संहिता प्रचलित होती. ही संहिता “ शरीया ” किंवा शार या मुहम्मदी संहितेपेक्षा भिन्न अशा ‘ शरियत खलिल ’ म्हणजे ‘ अब्राहमचा कायदा ’ या नावाने ओळखली जाते. ‘ शरियत ’साठी नियुक्त केलेल्या काझीपेक्षा वेगळा असा खास न्यायाधीशांचा एक वर्ग अरबस्तानातील बदवीई जमातीत नेहमीच अस्तित्वात होता. या न्यायाधीशांना त्या जमातीच्या चालीरीतींची माहिती असे. जमातीशी संबंधित अशा सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीच्या बाबतीत या चालीरीतींचा आधार घेतला जात असे. या संदर्भात अनेक उदाहरणे देता येतील. काही खास बाबतीत टोळींचे कायदेकानू शारहून बरेचसे वेगळे असण्याची शक्यता असे. उदाहरण म्हणून खुनासाठी खून करणे हा महत्त्वाचा प्रकार सांगता येईल. कोणाही

---

१. कुराण ५४८, ४९, ५१.

मुस्लिम माणसाने दुसऱ्या निर्दोष माणसाला ठार मारता कामा नये; असा गुन्हा करणाऱ्यास नरकात निरंतर हालअपेष्टा सोसाव्या लागतील असे कुराणात मुहम्मदांनी सांगितले असूनदेखील वरील प्रथा नाहीशी झाली नाही. रक्तमय सूड घेण्याचा प्रकार अद्यापही टोळीच्या जीवनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. दुसरे उदाहरण चोरीचे देता येईल. अरबस्तानातील कित्येक जमातींत चोरी हा अपराध मानला जात नाही. उलट कदाचित् ज्यांच्याबरोबर कधी अन्न घेतलेले नाही अशा लोकांच्या घोड्यांचा अथवा अन्य मालमत्तेचा अपहार करणे हे एक धाडसाचे, कौशल्याचे चिन्ह समजले जात असावे.[१]

कौटुंबिक जीवनाशी संबंधीत अशा विवाह, घटस्फोट व वारसा संपत्तीची वाटणी याबाबतीतील शारच्या कायद्याकडे अतिशय मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जात असावे. ही गोष्ट हिमालयाच्या दक्षिणेकडील देशात राहणाऱ्या कित्येक मुस्लिम जनसमूहांत विशेषतेने दृष्टोत्पत्तीस येते. हे लोक इस्लाम मानीत असले तरी ते स्थानिक सामाजिक प्रथाच पाळतात. या सामाजिक प्रथा शेजारच्या मुस्लिमेतर समाजांच्या प्रथांहून भिन्न नाहीत. शार कायद्याविरुद्ध हिंदु-मुस्लिमांचे विवाह होतात. वास्तविक शारप्रमाणे हिंदु-धर्मीय मूर्तिपूजक मानले जातात आणि म्हणून हिंदू स्त्रियाही काफीर समजल्या जातात. स्वतःला महम्मुदी धर्माचे समजणारे लोक हिंदू स्त्रियांशी[२] विवाह करतात. विशेषतः शीख पुरुषांशी मुस्लिम स्त्रिया विवाह करताना आढळतात. वास्तविक शारने मुस्लिम स्त्रियांना काफीरांशी लग्न करण्यास स्पष्ट मनाई केलेली आहे. तसेच विधवांच्या पुनर्विवाहाला इस्लामचा विरोध नाही. (पैगंबरांनी घालून दिलेल्या उदाहरणाने या गोष्टीला प्रोत्साहन मिळाले. कारण त्यांची पहिली बायको खादिजा ही विधवा होती.) तरीही हिंदू धर्मातून इस्लाममध्ये आलेले काही मुस्लिम समाज विधवांनी पुनर्विवाह करणे निंदनीय समजतात.[३] त्याचप्रमाणे हिंदु धर्माच्या प्रभावामुळे हिंदुस्थानातील काही मुस्लिम जमातींमध्ये घट-स्फोटाचे प्रकार अतिशय कमी घडतात.

इंडोनेशियातील जरा दूरच्या व संपूर्णतया इस्लामीकरण न झालेल्या प्रांतात पहिल्या पत्नीच्या संमतीशिवाय पुरुषाला दुसरी पत्नी करता येत नाही. परंतु तशी परवानगी पहिली पत्नी बहुधा देते. कारण शारचा काहीही नियम असला तरी स्थानिक रूढींप्रमाणे दुसऱ्या बायकोला पहिल्या बायकोपेक्षा कनिष्ठ स्थान मिळते.

---

१. इतरत्र काही जमातींमध्ये चोरी हा अत्यंत वाईट असा गुन्हा समजला जात असावा आणि चोरी करणारा सर्वत्र तिरस्करणीय मानला जात असावा.

२. याबाबतीत असे स्पष्टीकरण केले जाते की, या स्त्रिया तांत्रिकदृष्ट्या मुस्लिमच आहेत. कारण लग्न करण्यापूर्वी त्यांनी इस्लामधर्म स्वीकारला होता.

३. स्थानिक अडचणींमुळे मोरोक्कोमध्ये विधवा क्वचित्‌च पुनर्विवाह करतात.

विवाहाच्या प्रश्नाशी निकटतेने निगडीत असलेला दुसरा प्रश्न म्हणजे मालमत्तेचा. स्त्रीने आपल्या गोत्राबाहेरील पुरुषाशीच विवाह केला पाहिजे ( विवाहानंतर ती व तिची मुले त्या गोत्राची होतात. ), या हिंदू धर्मातील नियमाचे अनुकरण हिंदुस्थानमधील पंजाब प्रांतातील गुरगाव जिल्ह्यामधील काही मुस्लिम जमातीही करतात. त्याच नियमाप्रमाणे गोत्राबाहेर संपत्ती जाऊ नये या उद्देशाने स्त्रीला व तिच्या मुलांना स्त्रीच्या वडिलांकडून वारसा हक्क मिळत नाही. त्यांचा वारसा हक्क स्त्रीच्या पतीच्या कुटुंबातील संपत्तीपुरताच मर्यादित असतो.[1] मलायातील मिनांग्काऊ प्रथेशी या प्रथेचे साम्य आहे. एकाच स्त्रीच्या वंशातील स्त्रियांशी ( सुकू ) विवाह करण्यास या प्रथेने प्रतिबंध करण्यात आला आहे. मुलांनादेखील आपल्या बापाचा वारसा मिळत नाही. गोत्रेतर विवाहासंबंधींच्या कायद्याद्वारे विवाह किती करावेत यावर मर्यादा ( मात्र एकपत्नी पद्धतीच निरपवादपणे रूढ आहे. ) घालण्यात आल्या आहेत. संपत्तीबाबतचे सर्व प्रश्न मातृसत्ताक पद्धतीप्रमाणे सोडवले जातात. विवाहानंतर संपादन केलेली संपत्ती नवरा-बायकोच्या समाईक मालकीची समजली जाते. नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याची स्वतःची मालमत्ता त्याच्या आईकडील नजीकच्या आप्त स्त्रीकडे जाते. बाकीची मालमत्ता विधवा बायकोला मिळते आणि तिच्यानंतर ती तिच्या मुलांना मिळते. मुलांना तसेच मुलींनाही या मालमत्तेतील वाटा मिळतो. तथापि यापैकी कोणाला किती वाटा मिळावा हे प्रथेद्वारे निश्चित ठरवून दिलेले आहे. सहारा प्रदेशातील तुआरेग जमातीत स्त्रीची मुले तिच्या नातेवाईकांची समजली जातात आणि आपल्या बापाऐवजी आईच्या नातेवाईकांकडून त्यांना वारसा मिळतो.

दक्षिण अरबस्तानांतील कारा डोंगरी प्रदेशांतील जमातींमध्ये वारशाची एक विचित्र पद्धती रूढ आहे. तेथे नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवांना त्याच्या संपत्तीचा दहावा हिस्सा मिळतो. त्या विधवांपैकी एखादीला एक किंवा तीन मुली असतील व मुलगा नसेल तर मुलींना वारसा मिळतो आणि मृत नवऱ्याच्या पुरुष नातेवाइकांना वारशातून वगळण्यात येते. तथापि हा नियम दोन मुली व मुलगा नसेल तर लागू होत नाही.

बहुतेक इस्लामी देशांमध्ये, कुराणात ठरवून दिल्याप्रमाणे मुलींना सरसहा वारसा मिळत नाही. क्वचित अपवाद म्हणून मिळत असेल. पाकिस्तानात व हिंदुस्थानातील मुस्लिमांत रूढ असलेल्या परंपराधिष्ठित कायद्यांचा विचार करता असे दिसते की, कुटुंबात मुलगे किंवा त्यांचे मुलगे असतील तर मुलींना, एवढेच नव्हे तर आईबापांनादेखील, विशेषतः जमीनजुमला किंवा अन्य स्थावर संपत्तीवरील वारसा हक्कांतून वगळण्यात येते. पंजाबमधील सिर्सी जिल्ह्यात कुटुंबात मुलगे नसले तर विधवेचा तिच्या हयातीपर्यंत

---

१. उत्तर मलबारमधील मोपला मुस्लिम 'मारुम्माकथ्थायम्' ही वारसाहक्कासंबंधीची पद्धती अनुसरतात. त्या पद्धतीनुसार स्त्रीकडूनच फक्त संपत्तीचा वारसा मिळतो.

सर्व मालमत्तेवर हक्क राहतो. बापाच्या आप्तेष्टांना हिस्सा मिळतो; पण मुलींना किंवा मुलाच्या मुलींना मालमत्तेत हिस्सा मिळत नाही. पंजाबमधील गुरगाव, सियालकोट वगैरे काही जिल्ह्यांत कुटुंबात मुलगे व मुली अशी दोन्ही असतात तेव्हा फक्त मुलग्यांना वारसा मिळतो. तथापि काही वेळा मुलींना फक्त जमिनीवरील वारसा हक्कांतून वगळण्यात येते. पण त्यांच्या बापाने त्यांच्या लग्नासाठी म्हणून वेगळी काढून ठेवलेली संपत्ती त्यांना मिळते. कुटुंबातील पुरुषाचे कोणी वंशज नसतील तर विधवापत्नीला इतरांपेक्षा अग्रहक्काने पतीच्या मालमत्तेचा वारसा मिळतो. याबाबतींतील प्रथासुद्धा वेगळी असू शकते. उदाहरणार्थ, काही बलुची कुटुंबांत विधवेला फक्त तिच्या हयातीपर्यंत उदर-निर्वाहापुरते मिळते.

मुलींना वारसा न देण्याची ही पद्धत हिंदुस्थानइतकीच पॅलेस्टीन व उत्तर आफ्रिकेत देखील प्रचलित आहे हे मागे पाहिलेच आहे. याचे एक कारण संभवते. शारचे वारसा-हक्कासंबंधीचे कायदेकानू टोळ्यांच्या वारसाविषयक नियमावर आधारलेले आहेत. टोळीवाल्यांच्या मालमत्तेचे हिस्से पाडणे सोपे असते. कारण गुरेढोरे व तशाच प्रकारची इतर जंगम मालमत्ता हीच टोळीवाल्यांची संपत्ती असते. इतर मुस्लिम जनसमूहांचे तसे नसते. त्यांच्यापाशी जमीनजुमल्यासारखी हिस्से पाडण्यास कठीण अशी स्थावर मालमत्ता असते. त्यामुळे टोळीवाल्यांच्या वारसानियमांवर आधारलेले शारचे वारसाकायदे या जनसमूहांना यशस्वीपणे लागू करणे शक्य नसते असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. त्यामुळे अशा प्रकारच्या कायद्यांचे सर्वत्र उल्लंघन होत असते. उदाहरणार्थ, भारतीय उपखंडात वाटणीबाबत एखादा तंटा उद्भवला तर शारप्रमाणे वाटा ठरवून देण्यासाठी काझीला क्वचितच बोलाविले जाते. हिंदुस्थानबाहेर काही मुस्लिम जमातींत ( उदाहरणार्थ, सुदानमधील रुबाताब जमातींत ) मृत माणसांच्या सर्वच वारसांचा वारसा हक्कावर संयुक्त अधिकार असतो आणि वारसाची वाटणी होत नाही. अन्यत्र काही ठिकाणी अन्य काही बाबतीत शारचे कायदेकानू पाळले जात नाहीत. मृत पुरुषाला झालेले मुलगे स्वतंत्र स्त्रीकडून झालेले असोत की गुलाम स्त्रीपासून झालेले असोत, त्या सर्वांना शारप्रमाणे तत्त्वतः समान वारसा मिळण्याचा अधिकार असला तरी गुरगाव ( पंजाब ) जिल्ह्यातील राजपूत मुस्लिमांतील प्रथेप्रमाणे कायदेशीर बायको असलेल्या गुलाम स्त्रीच्या मुलांनाही बापाचा वारसा मिळत नाही.

विवाहाचे काही प्रकार शारने बेकायदेशीर ठरविले आहेत. परंतु कित्येक इस्लामी देशांत विभिन्न काळात स्थानिक रीतिरिवाजांनुसार असे विवाह करण्यास परवानगी होती. उदाहरणार्थ, ‘ मुत्आ ’ पद्धतीचा विवाह. या विवाहप्रकाराला खलिफा उमरची अनुमती नव्हती. सुन्नी मुस्लिमांत सामान्यतः अशा विवाहाची परवानगी नाही. परंतु शिया मुस्लिमांत हा विवाहप्रकार रूढ आहे. अलीकडे खुद्द मक्का शहरातील सुन्नी-पंथीयांची या विवाहप्रकाराच्या कायदेशीरपणाला अनधिकृत मान्यता मिळाली आहे. एकाच वेळी दोन बहिणींशी विवाह करता कामा नये हा कायदासुद्धा नेहमीच पाळला

जात नाही. एके काळी मोसुलचा अधिपती असलेल्या कोणी मुतामिद अल्-दौला किरवाश या नावाच्या गृहस्थाने हा कायदा मोडून विवाह केला. ही गोष्ट त्याच्या निदर्शनास आणली तेव्हा त्याने उत्तर दिले, " पण मग आपण करतो त्यांपैकी कोणत्या गोष्टीला शरियतची परवानगी आहे ? " वहाबी पंथाचा उदय होण्यापूर्वी अरबस्तानातील असीर जमातीमधील पुरुषाला एखाद्या सन्माननीय अतिथीला आपली बायको उसनवार देता येत असे. एखादा माणूस एखाद्या गृहस्थाकडे मेंढपाळाचे काम करीत असेल तर त्याबद्दल त्याला त्या गृहस्थाच्या बायकोशी असलेल्या संबंधात भागीदारी करता येत असे असाही एक काल होता. बलुचीस्तानमधील एका अल्पसंख्य व अप्रसिद्ध जमातीमध्ये मनोरंजनासाठी पाहुण्याला अविवाहित परंतु विवाहयोग्य अशी आपली मुलगी देण्याची पद्धत अगदी अलीकडच्या कालापर्यंत प्रचलित होती. यासंबंधीचा विश्वासार्ह पुरावा उपलब्ध आहे.

इस्लाम धर्माने ठरविलेल्या कायदेशीर व बेकायदेशीर गोष्टींविषयी भारतामधील एका प्रांतातील ( उत्तरप्रदेश ) सर्वसाधारण जनतेचा शरियतशी किती प्रमाणात मतभेद आहे याचे कोष्टकाच्या स्वरूपांतील एक निवेदन इस्लामच्या लिखित कायद्यांच्या अभ्यासाच्या संदर्भात एका अधिकारी अभ्यासकाने तयार केले आहे. त्यानुसार शार आणि जनमत या दोहोंच्याही दृष्टीने डुकराचे मांस खाणे पूर्णपणे पापपूर्ण आहे. याउलट दारू किंवा अन्य मादक पेयांचे सेवन शारप्रमाणे बेकायदेशीर असले तरी, समाजांतील उच्चवर्गीय लोकांच्या मते ते कृत्य फारसे पापपूर्ण नाही, परंतु समाजांतील इतर काही वर्गांच्या दृष्टीने दारू पिणे हा एक त्यामानाने गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. शारची घटस्फोटाला संमती आहे तर लोकमतानुसार ते एक ' पाशवी कृत्य ' आहे. याचे कारण असे सांगितले गेले आहे की, बहुदा लोक आपल्या नातलगांतच लग्नसंबंध करीत असतात. म्हणून घटस्फोट दिलेल्या बायकोमुळे तिच्या सर्व आप्तेष्टांची म्हणजेच तिच्या नवऱ्याच्याही आप्तेष्टांची बेअब्रू होते.

विभिन्न इस्लामी देशांत आणखी काही ठिकाणी सुद्धा ' फिकाह 'मधील कायदेकानुंची कशी उपेक्षा केली गेली याची उदाहरणे पुढे दिली आहेत. काही वेळा उदासीनतेपोटी अशी उपेक्षा झाली असली तरी, प्राचीन चालीरिती कायम ठेवल्यामुळे आणि बदलत्या परिस्थितीनुसार नव्या प्रथा विकसित होत गेल्यामुळेच प्रामुख्याने ' फिकाह 'मधील कायदेकानुंचे पालन झालेले नाही.

अशाप्रकारचे स्थानिक रीतिरिवाज व रूढी यांवर आधारलेल्या सर्व अलिखित कायदेकानुंना ' उर्फ ' ( म्हणजे जे सर्वांना ज्ञात व संमत आहे ते )[1] अथवा ' अदा '

---

१. या शब्दाचा ' व्यावहारिक बुद्धी ' असादेखील अर्थ असू शकतो. आणि ' अदा ' याला समानार्थी म्हणून हा शब्द वापरतात तेव्हाच फक्त त्याचा ' प्रथा ' असा अर्थ असतो.

( प्रथा ) असे म्हणतात. हेतुपूर्वक घालून दिलेल्या प्रथांतून अथवा परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या प्रयत्नात अहेतुकपणे निर्माण झालेल्या दीर्घकालीन प्रथांतून हे अलिखित कायदे जन्मलेले असतात. म्हणून व्यवहाराला सर्वांत महत्त्व दिले जाते तेथे या अलिखित कायद्यांचेच अनुसरण केले जाते. स्थानिक प्रथांवर आधारलेल्या या कायद्यांना ( उर्फ ) ' फिकाह 'चा एक मूळ आधार म्हणून स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. परंतु प्रारंभीच्या काळातील सुन्नी पंथीय ' मुज्ताहिदां 'चे ग्रंथ वगळले तर कायदेतज्ज्ञांनी या कायद्याची सर्वसाधारणपणे दखल घेतलेली नाही असे दिसून येते. तथापि त्यांना अगदी कोणीच महत्त्व दिले नव्हते असे मात्र नाही. काही फकी ' कियास ' पद्धतीद्वारे तयार केलेल्या कायद्यांपेक्षा प्रथांवर आधारलेले हे कायदे अधिक स्वीकारार्ह होत असे समजत आणि ज्या भागात या कायद्याचा प्रभाव असे तेथे प्रथा व रीतीरिवाजच निर्णायक मानले जात.

इस्लामी जगतातील भटक्या जनसमाजात प्राचीन परंपरेचे अतिशय वर्चस्व आहे. अशा समाजांत रूढ असलेल्या ' उर्फ ' कायद्यांविषयी सरधोपटपणे काही विधान करणे कठीण आहे. कारण प्रत्येक भटक्या जमातीच्या प्रथा भिन्नभिन्न त्याचप्रमाणे अनिश्चित स्वरूपाच्या असतात. तसेच त्या प्रथा अचानक बदलतातही. त्यामुळे अगदी कसलेल्या अभ्यासकालादेखील या जमातींच्या प्रथा कोणत्या हे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही. असे असले तरी या भटक्या जमातींच्या स्वतःच्या अशा शारव्यतिरिक्त आचारसंहिता व नियमावल्या आहेत. आवश्यकतेप्रमाणे त्यांचा वापर होत असतो. युरोपियनांच्या स्वामित्वाखाली असलेल्या प्रदेशांतील अशा जमातीय कायद्यांना, राज्यसत्तेने केलेल्या नागरी कायद्यांपेक्षा भिन्न असे ' उर्फी ' कायदे असे नाव आहे. किरकोळ स्थानिक प्रकरणात हे कायदे आधारभूत मानले जातात. अर्थात्, ज्या प्रकरणांत नागरी कायद्याचे गंभीर स्वरूपाचे उल्लंघन झाले असेल ( उदाहरणार्थ, भांडणतंट्यांतून झालेली मनुष्यहत्त्या ) अशा प्रकरणांचा फक्त याबाबतींत अपवाद केला जातो. वहाबी अरबस्तानात, सत्ताधारी अनुसरीत असलेल्या कडक अशा विधिसंहितेशी जमातीय कायदे विरोधी असतील तर त्यांची ' तागुत ' ( गैरवर्तणूक ) या शब्दाने संभावना केली जाते. ' जाहिलिया 'च्या काळातील अधर्म्य वर्तणुकीच्या बाबतीत या संज्ञेचा वापर केला जातो. जमातीय कायद्यांच्या स्वरूपासंबंधींचे हे वर्णन कितपत खरे आहे आणि शार कायदेकानुंचे या कायद्यामुळे कशाप्रकारे उल्लंघन होते हे तूर्त निश्चित सांगता येणार नाही, कारण त्याबाबत संशोधन झालेले नाही.

त्या त्या जमातीचा शेख किंवा कधी कधी मागे सांगितल्याप्रमाणे खास निवडून दिलेली वडिलधारी मंडळी यांच्यापाशी या पारंपारिक जमातीय कायद्यांचा संग्रह असतो. प्रकरणे उद्भवली की हे लोक न्यायाधीश म्हणून काम करतात. आणि एखादवेळी दिवाणी न्यायालयाचे निर्णय मान्य केले जात नाहीत; पण या लोकांच्या निवाड्याचा आदर केला जातो.

शरियतची जाणुनबुजून किती प्रमाणात अवहेलना होत असते याविषयी अद्याप खूपच संशोधन व्हावे लागेल. काही बाबतींत शरियतच्या आज्ञांचे पालन करणे निश्चितच अशक्य असते. इजिप्शियन किसानाला, अनातोलियाच्या शेतकऱ्याला, आणि जावा-मधील कृषकाला कितीही इच्छा असली तरी आपले काम मध्येच थांबवून आणि धार्मिक विधीच्या पवित्रतेसाठी आवश्यक म्हणून बळी वगैरे देऊन दिवसातून पाच-सात वेळा नमाज पढणें क्वचित्‌च शक्य असते. अन्य काही मुस्लिम समाज नमाजाच्या नियमांचे पालन करीत नाहीत त्याचे कारण त्यांची त्याबाबतींतील उदासीनता हे होय. कुर्द शहरात वाढलेले तुर्क, इजिप्शियन्स आणि युरोपीय संस्कार झालेले हिंदी मुसलमान हे नमाजाच्या बाबतींतील निष्काळजीपणाबद्दल कुख्यात आहेत. मात्र रमझानचा उपवास विशेष महत्त्वाचा समजला जात असावा. मुस्लिम पंचांगांतील[1] अनिश्चिततेमुळे अत्यंत कडक उन्हाळ्यात कधी कधी उपवासाच्या तिथी येतात आणि त्यामुळे उपवासाचा विशेषच त्रास होतो. अशावेळींदेखील उपवासाच्या नियमांचे उघडपणे उल्लंघन क्वचित्‌च होते. विशेषतः ज्यांच्यावर या उपासाचा सर्वांत जास्त ताण पडतो अशा गरीब मुसल-मानांकडून तर या नियमांचे क्वचितच उल्लंघन होते.

दुसरे उदाहरण ' जकाती 'संबंधींच्या कायद्याचे. जकात वसूल करण्याची व वसूल झालेल्या रकमेचा योग्यप्रकारे विनियोग करण्याची जबाबदारी कोणा एका सत्ताधारी व्यक्तीची राहिली नाही तेव्हा ' फिकाह 'मधील ' जकाती ' संबंधींचेनियम अमलात आणणे अशक्य होऊ लागले. दमास्कस, बगदाद आणि इस्लामी देशांतील इतर राजधान्यांतील बडेबडे उमराव व व्यापारी यांच्या आणि मोठमोठ्या टोळीप्रमुखांच्या हातात प्रचंड संपत्ती येऊ लागली तसे ' जकात ' म्हणून द्यावयाच्या रकमेसंबंधींचे नियम अक्षरशः लागू करणे कठिण होऊ लागले. ' जकाती 'च्या प्रचंड रकमांची वसुली क्वचित्‌च होत असे. किंवा वसुल केलेले पैसे कुराणाने सांगितलेल्या धार्मिक कार्यासाठी; म्हणजे गोरगरीब, अनाथ मुले व वाटसरू यांच्या निर्वाहासाठी पूर्णपणे क्वचित्‌च खर्च केले जात. याव्यतिरिक्त दुसरेही काही कायदेशीर अथवा बेकायदेशीर[2] कर आणि मोठमोठाल्या दंडाच्या रकमा आपल्या गबर सरदारांकडून खलिफा व सुलतान वसूल करीत. आणि हे सरदार मग शेतकऱ्यांना पिळून त्याची जमेल तेवढी भरपाई करीत. अशाप्रकारे मिळवलेली संपत्ती दानधर्मासाठी वापरली जात नसे. असे असले तरी ' जकाती ' संबंधींच्या कायद्यामागील तत्त्वाचा प्रभाव कायम आहे. परलोकात परमसुख प्राप्त व्हावे यासाठी दानधर्म करणे बंधनकारक आहे अशी धर्मपरायण मुस्लिमाची धारणा असते.

---

१. कुराणात ( ९:३६ ) सांगितल्याप्रमाणे या पंचागांत १२ चांद्रमास असतात.
२. खराज, जिझिया व मुकुस इत्यादि.

कुराणाने सांगितलेले प्रत्येक मुस्लिमाचे चौथे धार्मिक कर्तव्य म्हणजे हाज, मक्केची यात्रा. शारीरिकदृष्ट्या दुर्बल नसलेल्या अशा प्रत्येक प्रौढ, स्वतंत्र स्त्री-पुरुष मुस्लिमाने ही यात्रा केलीच पाहिजे, ते एक प्रमुख महत्त्वाचे कर्तव्य आहे असे बहुतेक इस्लामी देशांत मानले जाते.[१] तथापि फार पूर्वी म्हणजे इस्लामी इतिहासाच्या चौथ्या शतकात, दोन अलीबंधूंच्या अस्थी जेथे पुरल्या आहेत, अशा एका कबरीचा उल्लेख करून अबुल अला अल् माऽरी याने असे म्हटले आहे की, या ठिकाणी दोन वेळा 'अल्लाहु अकबर'चा घोष करणे हे काबामधील काही धार्मिक विधींइतकेच समान मूल्याचे धर्मकृत्य आहे. आजदेखील इराण व इराकमध्ये मशहाद, करबला नजाफ व काझीमायून येथील इमामांच्या मकबऱ्यांचे 'दर्शन' (झियारा) घेणे हाजपेक्षा कमी योग्यतेचे मानले जात नाही. त्याचप्रमाणे दक्षिण अरबस्तानांतील टोळीवाले, 'मझर अल्-वली' या सुप्रसिद्ध मकबऱ्याला तीन वेळा जाणे मक्केची यात्रा करण्याइतकेच मूल्यवान समजतात. बलुचिस्तानमधील झिकीडी टोळीवालेदेखील हाज यात्रेला जाण्या-ऐवजी यात्रेच्या महिन्याच्या नवव्या दिवशी केच भागांतील कोह मुराद या टेकडीवर जातात.

शरियत कायद्यांना इस्लामधर्मीयांतील सर्वच वर्ग सारखे महत्त्व देत नाहीत ही गोष्ट स्थानिक रीतिरिवाजांच्या प्रभावाची निदर्शक आहे. डुकराचे मांस[२] खाणे व दारू[३] पिणे मुस्लिमांना वर्ज्य केलेले आहे. त्यातल्या त्यात डुकराचे मांस खाणे अत्यंत घृणास्पद समजले जाते. इतके की, कोणीही इस्लामधर्मीय व्यक्ती मेलेल्या डुकराच्या जवळपासही फिरकणार नाही. तथापि कट्टर कर्मठ मुसलमान सोडून बाकीचे मुसलमान निदान दारू न पिण्याच्या बाबतीत काटेकोर नाहीत. किताब अल् अघानी व अरेबियन नाईट्समध्ये (गाण्या-बजावण्याच्या जोडीला) मद्यपान व नशा या प्रकारांचे अनेक उल्लेख आहेत. वास्तविक गाणे-बजावणे हे तितकेच निंदनीय मानलेले आहे. इराणमध्ये सर्वत्र मद्यपान केले जाते. कवींनी तर मद्यपानाचा खूपच गौरव केला आहे. हफीजने तर आणखीनच पुढे जाऊन दारू पिणे हे पातक नाही असे प्रतिज्ञापूर्वक सांगितले[४] आहे. इराणमध्ये

---

१. शियापंथीयांच्या नियमांनुसार दुसरा माणूस यात्रेसाठी पाठविता येतो. त्याचा खर्च त्याला पाठविणाराने करावयाचा असतो.

२. कुराण ५[४], १६[११६], २[१६८].

३. कुराण २[२१६], ४[४६], ५[९२]. मादक पेयांचे सेवन करणाऱ्यांना शारीरिक दंड दिला जावा असे सांगून 'फिकाह'ने दारू पिण्यास मनाई आहे असे सूचित केले आहे.

४. "तू व मी पेला दोन पेले दारू झोकली तर काय बिघडेल? दारू म्हणजे म्हणजे द्राक्षातले रक्त. ते काही तुझे माझे रक्त नाही. ज्यामुळे निश्चितपणे नुकसान होते असा काही हा अपराध नव्हे. आणि तो अपराध असलाच तर त्याचे एवढे काय? निर्दोष असा माणूस आपणास कोठे सापडतो?"

मद्यपान हे जीवनाचे एक अगदी सर्वसामान्य असे अंग आहे. इतके की, काबुसनामा यासारख्या रीतिरिवाज व नैतिक तत्त्वे यासंबंधी मार्गदर्शन करणाऱ्या पुस्तकांत ( हे पुस्तक प्रामुख्याने एका तरुण राजपुत्रासाठी लिहिले होते हे येथे सांगणे मात्र जरूर आहे. ) मद्यपानाच्या वेळच्या शिष्टाचारासंबंधी एक स्वतंत्र प्रकरण आहे; तर हल्बत् अल कुमायत हा संपूर्ण गद्य ग्रंथ आणि अबु नुवास याची अरबी साहित्यातील 'मद्यगीते' ( खामरियात ) ही मद्यपान-कलेलाच वाहिलेली आहेत.

कुराणामध्ये 'फर्ज' किंवा 'वाजिब' ( सर्व मुस्लिमांनी आवश्यक कर्तव्ये म्हणून अवलंबावयाची कर्तव्ये ) स्वरूपाच्या ज्या आज्ञा आहेत त्यांचे किती प्रमाणात पालन होत असते याचा येथवर विचार केला. इस्लामवर श्रद्धा असलेल्या माणसाची, इस्लामवर श्रद्धा नसलेल्या माणसाशी असलेली भिन्नता दर्शविणारे आणि इस्लामनिष्ठेची बाह्यचिन्हे असलेले जे धार्मिक उपचार व कर्तव्ये आहेत त्यासंबंधी कुराणातील या आज्ञा आहेत. तथापि मुहम्मदी धर्मातील सर्वांत महत्त्वाच्या धार्मिक संस्कारांपैकी सुंता ( खितान किंवा तहारा ) या संस्काराचा कुराणात नामोल्लेखसुद्धा नाही. 'जाहिलिया' मधील अरबांत सुंताचा प्रघात प्रचलित होता. मुहम्मदांनी निःशंकपणे त्या प्रथेचा स्वीकार केला. इस्लाममधील विभिन्न 'आचारपंथा'त हा धार्मिक संस्कार अत्यावश्यक कर्तव्य आहे की नाही याविषयी मतभेद आहेत. कारण, शाफीपंथीय, हा संस्कार 'वाजिब' असून तो संस्कार न करणे दंडपात्र आहे असे समजतात. तर मालिकीपंथीय त्या संस्काराला 'सुन्ना' ( स्तुत्य ) पेक्षा जास्त[1] महत्त्व देत नाहीत. तरीदेखील काही थोडे संदेहास्पद अपवाद वगळता सर्व मुस्लिम प्रत्यक्षात सुंता हा इस्लामधर्मातील एक आवश्यक संस्कार आहे असे मानतात. कुराणामध्ये या संस्कारासंबंधी स्पष्ट शब्दांत आज्ञा नसल्यामुळे त्याची अपवादात्मक उपेक्षा केली जात असावी. दुसऱ्या धर्मशील उमर खलीफाने असे म्हटल्याचे सांगितले गेले आहे की इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्यांनी सुंता करणे आवश्यक नाही. कारण " अल्लाने मुहम्मदाला पाठविले ते माणसांना ( इस्लाममध्ये येण्याची ) आज्ञा करण्यासाठी, सुंता करण्याकरिता नव्हे. " आशिया मायनरमध्ये युरूक या नावाचे इस्लाममधील एका पाखंडी पंथाचे टोळीवाले आहेत. त्यांच्यामध्ये क्वचित्‌च सुंता केला जातो. तीच गोष्ट हरसुस खोऱ्यातील किझिलबाश जमातीयांची. भटक्या किझिलबाश टोळीवाल्यांप्रमाणे हरसुस खोऱ्यातील किझिलबाशदेखील स्त्रियांचा पडदा, बहुपत्नीत्व, मद्यनिषेध आणि मशिदीत नमाज पढणे याबाबतीत सनातन मुहम्मदी प्रथा अनुसरीत नाहीत. वसंत ऋतूत बारा दिवस ते उपास करतात. त्यांच्यातील स्त्रियांना त्यांच्या स्वतःच्या नावाने हाक मारली जाते. पश्चिम हिंदुस्थानातील कच्छमधील मोमीन मुस्लिम सुंताचा विधी करीत नाहीत. चीनच्या युनान प्रांतात कधीकधी त्याचे पालन होते. आणि कित्येक बर्बर टोळ्यांना तर

---

१. झैदीपंथीयांच्या मतेसुद्धा तो एक 'सुन्ना' आहे. शिफारस केलेल्या अनेक शरीरारोग्याच्या क्रियात त्यांनी त्याचा समावेश केला आहे.

हा विधी करावयाचा असतो हे कोणीही त्यांना सांगितलेले नाही असा बोलवा आहे. मनुष्याचा जन्म ज्यात झाला असे मानले जाते त्या अतिशय प्रथमावस्थेतील व निसर्ग-निर्मित अशा धर्माचा ( फित्रा ) किंवा मुहम्मदी धर्माचा एक भाग म्हणून सुंताविधीचा फकी लोक बहुदा पाठपुरावा करतात. काही लोकांच्या मते इस्लामशी मिळत्याजुळत्या अशा अब्राहमच्या धर्मातील तो एक विधी आहे. आणि जुन्या धर्मग्रंथात स्वतः अब्राहमचा सुंता झाला होता असे सांगितलेले आहे. म्हणून सदाचारी मुस्लिमाने सुंता केला पाहिजे असे मानले जाते. इस्लामपूर्व अरबस्तानातील काही जमातींत स्त्रियांचा सुंता केला जात असे. याविषयी इस्लाममध्ये अविकृतपणे काहीही सांगितलेले नसले तरी ही प्रथा आजसुद्धा भारतापासून मोरोक्कोपर्यंत इस्लामी देशात प्रचलित आहे.

थोडाबहुत महत्त्वाचा कुराणांत नसलेला आणखी एक नियम मूर्ती व रंगीत चित्रे यासंबंधींचा आहे. मूर्तींना व चित्रांना कुराणाने मनाई केलेली नाही. निदान इस्लामच्या अगदी प्रारंभीच्या काळात तरी चित्रांच्या बाबतीत कडक विरोध नसावा यासंबंधी पुरावा मिळतो. जिवंत प्राण्यांच्या मूर्तींचा निराळ्या वर्गात समावेश केलेला दिसतो. खुद्द कुराणामध्ये फक्त अप्रत्यक्षपणे मूर्तिपूजेसंबधींचा विचार मांडलेला आहे. त्यामुळेच कदाचित् मूर्तींना मनाई करण्यास कारण मिळाले असावे. इस्लामी इतिहासाच्या नंतरच्या काळात धर्मपंडितांच्या प्रभावामुळे आणि कदाचित् जुन्या कराराच्या स्मृतींतून मिळालेल्या प्रेरणेमुळे जीवित वस्तूंच्या सर्व प्रकारच्या प्रतिरूपाविषयीची[1] नापसंती निर्माण झाली, आणि मूर्ती व चित्रे यांना मनाई करणाऱ्या तत्त्वाला बळकटी आणण्यासाठी 'परंपरा'ही शोधून काढण्यात आल्या. त्यानुसार पैगंबरांनी असे म्हटल्याचे सांगितले जाते की, ज्या घरात कुत्रा किंवा मूर्ती असेल त्या घरात देवदूत जाणार नाहीत आणि आत्म्याच्या पुनरुत्थानाच्या दिवशी चित्रकारांना सर्वात जास्त कडक शिक्षा[2] मिळेल. कोणी एक मनुष्य एकदा आपल्या मित्राच्या घरी गेला असता त्याला त्याच्या घरातील सोफ्यावर चित्रे दिसली. त्या माणसाने वर उल्लेखिलेली नंतरची 'परंपरा' कथन केली आहे. चित्रांना व मूर्तींना मनाई करण्याचे मूळ कारण अल्ला-ह हा एकमेव 'निर्माता' किंवा 'घडविणारा' आहे हे तत्त्व असावे. कारण एका हदिसमध्ये असे सूचित करण्यात आले आहे की, 'घडवणारी' सर्व माणसे अल्लाहची नक्कल करणारी आहेत. आणि म्हणून आपल्यामध्ये दैवी गुण असल्याचा खोटा दावा करण्याचा अपराध ते करीत

---

१. 'Painting in Islam' या ग्रंथाचे लेखक सर टी. डब्ल्यू आर्नोल्ड यांनी सदर पुस्तकात म्हटले आहे की, इस्लाममध्ये जे ज्यू आले त्यांच्यामुळे चित्रे व मूर्तीवरील बंदीची ही कल्पना इस्लाममध्ये आली. "जो कोणी मूर्ती घडवील त्या मूर्तीत ( जीवन ) तत्त्व फुंकण्याची अल्ला-ह शिक्षा फर्मावील. हे बिकट काम मूर्तिकाराला कधीही करता येणार नाही."

२. या संदर्भात 'चित्रकार' या शब्दाचा 'मूर्तिकार' असा अर्थ केलेला आहे.

असतात. धर्मसत्तेने अतिशय स्पष्ट शब्दात चित्रकला किंवा मूर्तिकला याबद्दल नापसंती दर्शविली असली तरी, ज्या खलीफांना आणि विशेषतः इराण व हिंदुस्थान यांसारख्या इस्लामचा प्रसार झालेल्या देशातील सत्ताधाऱ्यांना या खर्चीक कला परवडल्या, त्यांनी त्यांना उदार आश्रय दिला होता. मेसोपोटेमिया व इराणमध्ये सार्वजनिक स्नानगृहाच्या भिंतींवरील गिलाव्यात रंगीत चित्रे काढलेली सरसहा दिसत. काही कायदेपंडितांच्या मते त्या देशात त्या चित्रांना कोणी आक्षेप घेत नसावे. त्याचप्रमाणे जमिनीवर अंथरण्याकरिता आणि चालण्यासाठी किंवा बसण्याकरिता तयार केल्या जाणाऱ्या गालिच्यांवर व गाद्यांवरदेखील चित्रे विणलेली असत. तथापि, घरातील भिंतींवर टांगण्यासाठी तयार केल्या जाणाऱ्या चित्रांना व पडद्यांना बंदी होती. अशीच बंदी दीर्घकालपर्यंत छायाचित्रांवरदेखील होती. परंतु आता इस्लाममध्ये बहुदा सर्वच कलाचित्रे ही केवळ प्रतिबिंबे आहेत असे समजून त्यावर आक्षेप घेतला जात नाही. इजिप्तमधील अॅलेक्झांड्रियातील मुहम्मद अली यांचा पुतळा व कैरोमधील इब्राहिम पाशांचा पुतळा यांना इतका काळ लोटला तरी कोणीही विरोध केलेला नाही. तसेच इराणात तेहरानमध्ये फिरदोसीचा, हमादानमध्ये अॅव्हिसेन्नाचा आणि राजधानीच्या व इतर बड्या शहरांत रिझा शाह पेहलवींचा असे अनेक पुतळे आज उभे आहेत. अलीकडे तर कुराणाची एक चित्रमय प्रतसुद्धा तयार करण्यात[1] आली आहे. तथापि ती मुस्लिमेतर प्रवाशांना पाहण्यासाठी आहे व मूळ कुराणाचा काही भाग त्यात गाळला आहे असे याबाबत स्पष्टीकरण केले जाते.

पैगंबरांच्या निधनानंतर तीस वर्षांनी आणि पैगंबरांचे सर्व सोबती-सहकारी निधन पावल्यानंतरच्या काळात कुराण हा धर्मग्रंथ व पैगंबर यांनी प्रत्यक्ष आचारलेला सुन्ना, या दोन्ही गोष्टी व्यावहारिक जीवनाला मार्गदर्शक होण्याच्या दृष्टीने कालबाह्य झाल्या. तेव्हापासूनच कुराण व सुन्ना यांवरच फक्त आपली निष्ठा आहे असे म्हणणारे वहाबी व सुनुसी यासारखे मुस्लिम, इतर इस्लामधर्मीयांच्या दृष्टीने फूटपाडे व पाखंडी ठरले. आणि यहुदी धर्मातील सॅमॅरिटन्स व काराइट्स आणि खिश्चन धर्मामधील प्युरिटन्स यांच्याप्रमाणेच त्यांची गत झाली. शिवाय 'फिकाह'च्या फार मोठ्या भागातील विवरण कुराण व सुन्ना यांच्यामधील सैद्धान्तिक तत्त्वांच्या आधारे केलेले असल्यामुळे, जवळपास प्रारंभापासून 'फिकाह'मधील नियमांना प्रत्यक्ष परिस्थितीच्या दृष्टीने उपयुक्त असे स्वरूप देणे आवश्यक झाले. प्राचीन प्रथा, आर्थिक व राजकीय परिस्थिती, मुस्लिमेतर समाजाशी आलेला संपर्क आणि इस्लामच्या विचारात परधर्मीयांच्या विचारांचा झालेला शिरकाव, यामुळे भूतलावर पावित्र्य आणण्यासाठी पुनरुत्थानाचा अग्रदूत जो माहदी अवतीर्ण होईल त्या वेळी प्रत्यक्षात येणारा निव्वळ एक आदर्श इतकेच शरियतचे महत्त्व उरले.

---

१. लीडन येथे १९३१ मध्ये झालेल्या कॉंग्रेस ऑफ ओरिएंटॅलिस्टमध्ये आर. गॉटेहइल यांनी या विषयावर एक निबंध वाचला होता.

परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या प्रवृत्तीचे एक उत्तम उदाहरण म्हणून ' जिहाद 'चा उल्लेख करता येईल. ' जिहाद 'द्वारे नास्तिकांशी चार हात करणे हे सर्व समाजाचे असे कर्तव्य समजले जाते. ' फिकाह 'प्रमाणे इमामाने ' जिहाद 'साठी माणसांची व घोड्यांची भरती करायची असते आणि शत्रुप्रदेशात जाण्यासाठी त्यांच्यापैकी कोण लायक आहेत हे ठरवायचे असते. इमामाने प्रारंभी अगदी जवळच्या व त्यातल्या सर्वाधिक प्रमुख नास्तिकांचा समाचार घ्यावयाचा असतो. ज्यू, ख्रिश्चन्स व मॅगिअन्स यांच्याशी, ते इस्लाम धर्म स्वीकारण्यास किंवा खंडणी देण्यास तयार होईपर्यंत इमामाने लढले पाहिजे. इतर नास्तिकांशी मात्र कोणतीही सवलत न देता मुस्लिम धर्म स्वीकारीपर्यंत लढले पाहिजे. जिहादसंबंधींचे हे कायदे अलीकडे अमलांत आणले जात नाहीत, हे स्पष्टच आहे. काही देशांत मुस्लिम अल्पसंख्य असल्यामुळे ते नास्तिकांचा समाचार घेण्याची घाई करीत नाहीत हे खरे, परंतु जेथे मुस्लिम बहुसंख्य आहेत अशा देशांत-देखील मुस्लिमांनी अलीकडच्या काळात ' जिहाद 'ची आज्ञा अंमलात आणलेली नाही.

धिम्मी म्हणजे ' आश्रित ' समाजांना ( मॅगिअन्स व स्वतःचा धर्मग्रंथ असलेले इतर समाज ) कशाप्रकारची वागणूक द्यावी यासंबंधींचे शरियतमधील कायदे प्रत्यक्ष व्यवहारात दृष्टिआड केले जातात असे विशेषतः दिसून येते. या आश्रित समाजांनी डोईकर दिला आणि मुस्लिमांहून आपण वेगळे आहोत हे दाखविण्यासाठी पोशाख, घरे व काही चीजवस्तू यांबाबतीत घातलेल्या काही विशिष्ट अपमानास्पद असलेल्या अटी त्यांनी स्वीकारल्या तरच त्यांना मुस्लिम देशांत राहण्याची परवानगी दिली जाते. दुसऱ्या कोणत्याही धर्माच्या नास्तिकाशी आणि इस्लामी कायद्याचा विशेषत्वाने तिरस्कार करणाऱ्या मूर्तिपूजकांशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यास परवानगी दिलेली नाही. असे असले तरी हिंदुस्थानातील मुस्लिम परंपरेनुसार हिंदूंचा ' धिम्मी ' वर्गात समावेश करीत आलेले आहेत. याउलट, गझनीचा मुहम्मद हा कडवा इस्लामनिष्ठ मुस्लिमविजेता हिंदूंना मूर्तिपूजक समजत असे. तथापि सध्याच्या परिस्थितीत इस्लामच्या दृष्टीने असलेली हिंदुस्थानातील ' धिम्मीं 'ची अपात्रता ही निव्वळ एक सैद्धांतिक चर्चेची बाब झालेली आलेली आहे. शरियतमधील सिद्धान्त व प्रत्यक्ष व्यवहार यांमध्ये दिसून येणारे सर्वांत जास्त अंतर व्यापार–धंद्याच्या क्षेत्रात प्रत्ययास येते. उदाहरणार्थ, शरियतनुसार काही विशिष्ट वस्तूंच्या विक्रीस पूर्णपणे बंदी आहे. कारण धार्मिक दृष्टीने या वस्तू अमंगल समजल्या जातात आणि त्यांचा उपयोग करण्यास मनाई आहे. म्हणून ( शाफींच्या संहिते-प्रमाणे ) कुत्रे, डुकरे, मद्य, शेण ( धार्मिक दृष्टीने ), जैतूनची अस्वच्छ फळे यांच्या विक्रीस बंदी आहे. तथापि अस्वच्छ कपडा विकणे कायदेशीर ठरवलेले आहे. त्याचप्रमाणे दारू तयार करणाऱ्या इसमाकडून द्राक्षरस खरेदी करणे, ' अल्लाहविरुद्ध ' ज्याने आपली शस्त्रे वापरली असतील त्याच्याकडून शस्त्रे विकत घेणे किंवा ज्याने आपली मालमत्ता निषिद्ध मार्गाने मिळवली असेल त्याच्याकडून सामान खरेदी करणे या गोष्टी नापसंत ( मक्रूह ) समजलेल्या आहेत. उपयोग करता येणार नाहीत अशा वस्तूंची ( उदाहरणार्थ, हानि-

कारक किंवा शिकारीस अयोग्य जंगली प्राणी ) विक्री अवैध ठरविली आहे. त्याचप्रमाणे ज्या वस्तू प्रत्यक्षात अस्तित्वात नाहीत– उदाहरणार्थ, झाडाला अद्याप न आलेले फळ, अशा वस्तू विकणे बेकायदा आहे. एखाद्या मालाचा सौदा झाल्यापासून तीन दिवसांच्या आत तो माल गिऱ्हाईकाला दिला पाहिजे. सौद्यातील माल गिऱ्हाईकाच्या प्रत्यक्ष हातात देईपर्यंत तो त्याच्या ताब्यात दिला असे समजले जात नाही. आणि सदर माल गिऱ्हाईकाला प्रत्यक्ष देईपर्यंत सौद्यातील मालाची सौदा देणाऱ्यावर जबाबदारी असते. माल प्रत्यक्ष मिळण्याच्या आधी गिऱ्हाईकाला मृत्यू आला तर सौदा रद्द होतो. जी वस्तू विक्रीनंतर गिऱ्हाईकाला प्रत्यक्ष देता येणे शक्य नसते ( उदाहरणार्थ, उडते पक्षी, पळून गेलेला गुलाम इत्यादी ) अथवा एखादी गोष्ट देताना मूळ वस्तूचे नुकसान होते ( उदाहरणार्थ, मेंढीच्या पाठीवरची लोकर किंवा एखाद्या कपड्याचा कापलेला काही भाग,– त्यामुळे मूळ वस्तूचे नुकसान होते. ) अशी वस्तू विकणे बेकायदेशीर आहे. त्याचप्रमाणे ज्या वस्तूचे निश्चित माप किती आहे हे माहीत नसते ( उदाहरणार्थ, माप न केलेला धान्याचा ढीग, आचळातील दूध, गर्भातील प्राणी इत्यादी. ) अशा वस्तूंची विक्री करणे अवैध आहे. विशेषतः सट्टेबाजीला आळा घालण्याकरता व्यापारी-व्यवहारांवर इतर अनेक निर्बंध घालण्यात आले आहेत. विक्रीचा जो माल गिऱ्हाईकाने पाहिलेला नाही त्या मालाच्या विक्रीसंबंधी दोन भिन्न मते आहेत. एका मताप्रमाणे अशा मालाची विक्री करणे अवैध आहे, तर दुसऱ्या मताप्रमाणे तो माल कसा आहे याची माहिती गिऱ्हाईकाला अगोदर देण्यात आलेली असेल आणि विकत घ्यावयाचा माल त्या माहितीप्रमाणे असेल आणि पसंत पडला तर विकत घे असे गिऱ्हाईकाला अगोदर सांगितलेले असेल तर त्या मालाची विक्री कायदेशीर ठरते. निरर्थक अटीवर एकादी वस्तू विकणे अवैध आहे. उदाहरणार्थ, एखादे जनावर विकत घेतल्यावर त्यावर बसले पाहिजे अशी अट घालून ते जनावर विकणे किंवा एखादे घर विकताना त्या घरात ते विकत घेणाऱ्याने महिनाभर राहिले पाहिजे,– वगैरे अटी घालून केलेला कोणताही विक्रीचा व्यवहार रद्द ठरतो. ( परंतु विक्रीच्या व्यवहाराचे आवश्यक अंग म्हणून घातलेल्या अटींचा याला अपवाद केला जातो. उदाहरणार्थ नियमितपणे बगीच्याला पाणी देण्याच्या अटीवर केलेली बगीच्याची विक्री. ) म्हणून कोणी असे म्हटले, " तू मला तुझे घर वीसाला देत असलास तर मी तुला हा गुलाम दहाला देतो." किंवा असे म्हटले, " पैसे रोख देणार असलास तर दहाला देतो आणि पैसे उशीरा देणार असलास तर वीस पडतील " अशा प्रकारचा विक्रीचा सौदा रद्द समजला जातो.

नफ्याच्या हेतूने वस्तूची विक्री करणे कायदेशीर आहे. मात्र खरेदीची किंमत व त्यावरील नफ्याची रक्कम यांची अगोदर माहिती दिली पाहिजे. ' फिकाह 'नुसार हा नियम सामान्यपणे एका वस्तुबद्दल दुसरी वस्तू देण्याच्या ( उदा. धान्य देऊन सोने घेणे. ) बाबतीत लागू होतो. ' समान ( किंमतीच्या ) वस्तूंच्या अदला-बदली ( बे )हून भिन्न असा कोणत्याही प्रकारचा वाढीव पैसा ( ' रिबा '–व्याज अथवा खंड ) घेणे

हे एक भयंकर पाप समजले जात असून [१] कुराणाने त्यास बंदी केली आहे. तथापि सोने, चांदी व मानवी उपयोगाच्या वस्तू कर्जाऊ दिल्या तर त्यावर व्याज घेऊ नये इतकीच मर्यादा कुराणाच्या भाष्यकारांनी घातलेली आहे. हदिसने गहू, बार्ली, खजूर व बेदाणा[२] या वस्तुंचाही अशा वस्तूंत समावेश केला आहे.

कित्येक मुस्लिम नित्याच्या व्यापार-व्यवहारावरील या विविध निर्बंधांकडे एकतर उघड उघड दुर्लक्ष करून स्थानिक रिवाजांनुसार व्यापारधंदा करीत असतात किंवा कायद्यांचे तांत्रिकदृष्ट्या पालन व्हावे परंतु गरजेप्रमाणे व स्थानिक प्रथेप्रमाणे सर्व व्यवहार सुरळीतपणे चालावे यासाठी लबाडीचा व काल्पनिक कायद्यांचा अवलंब करतात. व्याजासंबंधींच्या नियमाचा प्रथम विचार करू. अनेक धर्मपरायण मुस्लिम या कायद्या-प्रमाणे व्याज घेत नाहीत. उदाहरणार्थ, हिंदुस्थानमधील पोस्टल सेव्हिंग्ज बँकेत मुसल-मानांनी ठेवलेल्या ठेवींवरची लाखो रुपयांची व्याजाची रक्कम कोणी न मागितल्यामुळे तशीच पडून असते. काही मुसलमान मिळेल तेवढे व्याज घेतात. पंजाबी मुस्लिम सावकार इतर मुस्लिम सावकारांप्रमाणे व्याज घेतो. ज्याची सदसद्विवेकबुद्धी जागी आहे तो रोख पैशांऐवजी नोकरीच्या अथवा वस्तूंच्या रूपात व्याज घेतो. परंतु लवकरच[३] रोख पैशात व्याज घेणेच सोयीचे आहे असे त्याला वाटू लागते. व्याजासंबंधींच्या कायद्यांतून पळवाट काढण्याचा सरसकट प्रचलित असा एक मार्ग आहे. एखादी किमती वस्तू, घर किंवा घोडा गहाण ठेवून घेऊन सावकार ऋणकोला रक्कम देतो आणि त्या रकमेपेक्षा जास्त पैसे देऊन तीच वस्तू कालांतराने ऋणको परत सावकाराकडून विकत घेतो. या दोन रकमांतील फरक हे व्याज असते. इजिप्तमधील धर्मनिष्ठ मुसलमान, शेतकऱ्यांना अगोदर रोख रक्कम देऊन पुढे पीक-हंगामात धान्याच्या मोबदल्यात ती रक्कम वसूल करतात, किंवा आधी कर्जाऊ धान्य देऊन हंगामात रोख पैशाने त्याची परतफेड करून घेतात. हंगाम पाहून यापैकी ज्या पद्धतीने व्यवहार करणे किफायतशीर ठरेल त्या पद्धतीचा व्यवहार केला जातो. परतफेडीच्या पैशाच्या रकमेचे किंवा धान्याचे प्रमाण

---

१. २[२७६], ४[१६१], ३०[३९].

२. इस्लामपूर्व काळापासून ही बंदी असावी. कर्जाऊ दिलेल्या मालाच्या परत-फेडीच्यावेळी जास्त प्रमाणात माल मिळावा यासाठी कर्जाऊ माल परत करण्याची तिथी मुद्दाम लांबविण्याची प्रथा त्या काळात असल्यामुळे कर्ज देण्याच्या पद्धतीचा दुरुपयोग केला जात असे.

३. धंद्यात पैसा गुंतविणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे. "पॅनइस्लामिक... कंपनी लि. च्या शेअर्समध्ये पैसे गुंतवा. राष्ट्राची सेवा करण्याची व डिव्हिडंड मिळ-वण्याची सुवर्णसंधी कंपनी तुम्हांला देत आहे."—Islamic Review (London), August, 1953 मधील एक जाहिरात.

कधी शंभर टक्के तर कधी दोनशे टक्के असते. एवढेच नव्हे तर मुस्लिम स्त्रियादेखील आपली हुंड्याची रक्कम किंवा कोंबड्या पाळून मिळवलेला पैसा व्याजाने कर्जाऊ देतात आणि त्याबद्दल त्यांच्या " सद्सद्विकबुद्धीला वेदना " होत नाहीत.

शरियतमध्ये ज्या व्यवहारासंबंधींचे नियम सांगितलेले नाहीत अथवा ज्या व्यवहारांना मनाई होऊ शकते अशा इतर व्यवहारांच्या बाबतीत असेच उपाय अवलंबण्यात येतात. उदा. झाडावर अद्याप न आलेल्या फळांची विक्री करणे वास्तविक अवैध आहे. परंतु झाडाची पाने, मोहर यावर अवलंबून असलेली व त्यातून निर्माण होणारी कोणतीही वस्तू विकावयास परवानगी आहे. वजन किंवा माप न करता एखाद्या वस्तूचा संपूर्ण ढीग विकणे बेकायदेशीर आहे. परंतु ढीगातील एकेका भागाची स्वतंत्रपणे किंमत ठरवून तो विकणे बेकायदेशीर मानले जात नाही. म्हणजेच माप न करता धान्याचा सबंध ढीग विकणे अवैध असले तरी प्रत्येक भागाची किंमत ठरवून तो ढीग विकणे बेकायदेशीर नाही. शेणाच्या राशीसारखी गलिच्छ वस्तू किंवा कुत्रा यांच्या विक्रीच्या बाबतीतही एक युक्ती केली जाते. त्या वस्तू वापरण्याचा मालकाचा हक्क फक्त मोबदला घेऊन दुसऱ्याला दिला जातो. अशा वस्तुंची विक्री बेकायदेशीर मानली जात असली तरी त्या वस्तूंवरील त्याची मालकी (तसर्रुफ) किंवा त्याचे खास हितसंबंध (इख्तिसास) कायम असतात. ही मालकी किंवा खास हितसंबंध मालकाला मिळालेल्या किंमतीच्या मोबदल्यात दुसऱ्याला देता येतात. ज्या मालाचा सौदा ठरलेला असेल तो माल सौदा ठरल्यापासून तीन दिवसांच्या आत दिला पाहिजे हा शरियतचा नियम, तयार करून द्यायचा माल बरात्र असेल तेव्हा अव्यवहार्य ठरतो. म्हणून या नियमांतून मार्ग काढण्यासाठी दोन प्रकारचे उपाय योजिले जातात. पहिला उपाय असा की तयार करून द्यावयाच्या वस्तू ठरलेल्या वर्णनाबरहुकूम नसतील तर त्या नाकारण्याचा पर्याय असावा. यासाठी आगाऊ रक्कम (सलाम) देणे. दुसरा उपाय असा की एखादी वस्तू तयार करून देण्यासंबंधी कारागीराशी केलेल्या सौद्याच्या करारा (इस्तिस्ना) चा आधार घेणे. या करारानुसार झालेल्या सौद्यात वस्तू तयार करून देण्याची कालमर्यादा ठरविण्याची किंवा आगाऊ पैसे देण्याची गरज नसते.

व्यवसाय व व्यापाराच्या बहुतांश शाखांमध्ये प्रथा व प्रत्यक्ष व्यवहार यांनी स्वतःचे असे अलग कायदेकानू विकसित केलेले आहेत. या कायदेकानुंपैकी कित्येक मुहम्मदांच्या आगमनाच्या पूर्वीपासूनचे आहेत. या कायदेकानुंमार्फत व्यक्ति-व्यक्तिमधील तसेच व्यक्ती व समाज यांच्यामधील आणि पुष्कळ वेळा राजा व प्रजा यांच्यामधील व्यापारी कराराचे वेळी करारातील सर्वच्या सर्व तपशील नेहमीच ठरविला जातो असे नाही. पुष्कळशा बाबी कराराशी संबंधीत असलेल्या व्यक्तींच्या प्रामाणिक हेतूंवर अवलंबून ठेवल्या जातात; आणि नेहमीच्या सर्व गोष्टी करारात समाविष्ट आहेत असे गृहीत धरले जाते.

धार्मिक क्षेत्रांतसुद्धा कधीकधी स्थानिक प्रथांचा प्रभाव ' फिकाह 'पेक्षा मातबर ठरतो. एखाद्या विधानाला पुष्टी देण्यासाठी एखाद्या स्थानिक आदरणीय दृश्य वस्तूची शपथ घेतली जाते, तेव्हा याचा विशेष प्रत्यय येतो. इस्लाममध्ये बहुदा प्रत्येक ठिकाणी त्या त्या ठिकाणचे संत-साधू आहेत. त्यांच्या कबरी आहेत. त्यांच्याविषयी अतीव व भययुक्त आदरभाव दिसून येतो. खरे तर हे इस्लामच्या तत्त्वाशी विसंगत आहे. ' फिकाह 'प्रमाणे एका अल्लाहशिवाय अन्य कोणत्याही वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या नावाने शपथ घेणे ' मकूह ' ( नापसंत ) समजलेले आहे. अगदी खुद्द पैगंबरांच्या किंवा मक्के-मधील काबाच्या नावाने शपथ घेणेदेखील अयोग्य समजले जाते. असे असले तरी एखाद्या स्थानिक साधूच्या कबरीच्या नावाने घेतलेली शपथ ही सर्वांत गंभीर शपथ होय अशी कित्येक मुसलमानांची धारणा आहे. दक्षिण अरबस्तानांतील विभिन्न ( शाफी-पंथीय ) जमातींतील लोक आपापल्या साधुंच्या कबरींची शपथ घेतात. तसेच इराकच्या तळ प्रदेशांतील ( बहुतांशाने शियापंथीय ) रहिवासी करबला येथील बी–ल्–हुसेन म्हणजे हुसेनच्या ( कबरीच्या ) नावाने घेतलेली शपथ किंवा नजाफ येथील बी–ल्–अली म्हणजे अलीच्या ( कबरीच्या ) नावाने घेतलेली शपथ ही सर्वांत बंधनकारक शपथ समजतात. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

' अदा ' व ' उर्फ ' यांच्या बरोबरीने इस्लामी देशांतील समाजजीवनाचे नियमन करणारा एक सामर्थ्यवान घटक म्हणजे सत्ताधारी राजाची निरंकुश इच्छा हा होय. आपल्या मृत्युनंतर काय करावे याविषयी किंवा किमान आपल्यामागून आपला वारस कोण यासंबंधी पैगंबरांनी काहीही निर्देश देऊन ठेवलेले नव्हते. तरीदेखील इस्लामी सत्तेचे इहलोकातील शासक कोण असतील याविषयीची अनेक वचने पैगंबरांच्या तोंडी घातलेली आहेत. उदाहरणार्थ, पैगंबरांचे म्हणून पुढील एक वचन सांगितले जाते. –" माझ्या लोकांचे दोन वर्ग आहेत. ते न्यायप्रेमी असतील तर लोक न्यायप्रेमी होतील, ते अन्याय करू लागले तर लोक अन्याय करू लागतील. हे दोन वर्ग म्हणजे अमीर व फकी ( विधिज्ञ ) हे होत."

कुराणापेक्षा शासनसत्तेच्या ( सुलतान ) द्वारे अल्लाह लोकांना पापकर्मे करण्या-पासून परावृत्त करीत असतो, या अर्थाची आणखी एक परंपरा या संदर्भात सांगितली जाते. याचे एकूण तात्पर्य असे की, शरियतच्या कायदेकानूंची अंमलबजावणी करण्याची ज्याच्यावर जबाबदारी टाकलेली आहे असा सुलतान हा ( अल्लाहचा ) प्रतिनिधी आहे. परंतु इस्लाममधील राजांनी व सुलतानांनी आपली ही जबाबदारी एवढ्यापुरतीच मर्यादित न ठेवता शरियतहून निराळे असे कायदेही आपल्या स्वतःच्या आवश्यकतेनुसार केलेले आहेत.

इस्लाममधील कायदेकानुसंबंधींचे विभिन्न ' संप्रदाय ' मजबूत होत गेले तसे

'अदा'ला किंवा सुल्तानांच्या कायद्यांना कर्मठ इस्लामी[१] धर्मपंडितांची मान्यता मिळेनाशी झाली. तथापि अशाप्रकारचे लौकिक व्यवहाराशी संबंधित असे कायद्याचे अनधिकृत प्रकार अस्तित्वात होते आणि त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात महत्त्व दिले जात होते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. फार पूर्वी म्हणजे इस्लामच्या पाचव्या शतकात मावार्दी नावाचा सनातन संविधानिक ( कायदा ) शास्त्रातील एक अधिकारी पुरुष होऊन गेला. त्यानेदेखील असे सूचित केले आहे की, खुद्द शरियतइतकी तरी मुस्लिम समाजात 'उर्फ'ला मान्यता आहे. पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या गझालीला अशी कबुली द्यावी लागली की, सध्याची परिस्थिती लक्षात घेता लौकिक शासनाने केलेले कायदे योग्य आहेत असे म्हणणे भाग आहे.

आधुनिक काळात या दृष्टिकोनाशी साम्य असलेला दृष्टिकोन मोरोक्कन ग्रंथकार इब्ने खालिद् अल् नासिर याच्या एका ग्रंथांत आढळतो. या ग्रंथकाराने आपल्या देशाचा एक इतिहास लिहिला आहे. त्यात त्याने, अल् कराफी याने प्रथा व पूर्वीचे दाखले[२] यावर आधारलेल्या कायद्याविषयी जो युक्तिवाद केला आहे तो सांगून त्याच्याशी सहमती व्यक्त केली आहे. अल् कराफी याने केलेला युक्तिवाद असा :

"मालिक, शाफी इत्यादींच्या संप्रदायांची मान्यता असलेले आणि अद्याप प्रचलित अशा रूढींवर आधारलेले जे अहकाम ( सरकारी आज्ञा ) आहेत त्यासंबंधीची वस्तुस्थिती काय आहे असे तुम्ही विचारलेत तर त्याचे उत्तर असे की, उलेमाने ते कायदेशीर ठरविले आहेत. परंतु समजा, पारंपारिक रिवाजात बदल झालेला असेल आणि आज प्रचलित असलेली प्रथा पूर्वीच्या प्रथेविरुद्ध असेल तर अशा परिस्थितीत विधिज्ञांचे जे निर्णय पुस्तकात ग्रथित केलेले आहेत ते आता चुकीचे होत असे समजायचे आणि म्हणून नव्या प्रथांना अनुरूप असे नवे निर्णय तयार करावयाचे काय ? की जे निर्णय अस्तित्वात आहेत तेच आपण जसेच्या तसे मानले पाहिजे ? आणि धर्मविषयक कायदेकानुंच्याबाबतीत आपणाला नवा फेरबदल करता येणार नाही काय ? आणि म्हणून आपणाकडे पाठविलेल्या 'मुज्ताहिद' ग्रंथांमध्ये जे दिलेले आहे त्यानुसार आपण आपला व्यवहार केला पाहिजे काय ? या प्रश्नांचे उत्तर असे की, बदलेल्या प्रथांवर

---

१. इब्ने खाल्दुनसारख्या दार्शनिक मनोवृत्तीच्या पंडितानेदेखील लौकिक कायद्यांची सार्थता नाकारली आहे. त्याचे म्हणणे असे की, हे कायदे फक्त या क्षणभंगुर व असत्यस्वरूप सृष्टीशी संबंधित आहेत; तर शरियतचे कायदे हे मानवाच्या इहलौकिक व पारलौकिक कल्याणाकरिता आहेत.

२. अल्-कराफी याच्या ज्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे त्या ग्रंथाचे नाव अर्थपूर्ण आहे. ते असे : "फतावी ( विधिज्ञांचे निर्णय ) आणि अहकाम ( सरकारी आज्ञा ) यांच्यातील मतभेदांसंबंधीचा निवाडा."

आधारलेले सरकारी हुकूम लागू करणे हे 'इज्मा'च्या तत्त्वाविरुद्ध आणि इस्लाम-विषयीच्या अज्ञानाचे निदर्शक आहे."

याच पुस्तकातील दुसऱ्या एका भागात ग्रंथकाराने अशी कबुली दिलेली आहे की, 'फिकाह' व शरियतमधील कायदेकानुंच्या प्रकाशात ज्याप्रमाणे एखाद्या कायदा-विषयक प्रश्नाचा विचार केला जातो, त्याचप्रमाणे सारासार विचार व राजकीय गरज (सियासा) यांच्या संदर्भातही कायद्याच्या प्रश्नाचा विचार करता येऊ शकेल. हे विधान करताना आपल्यावर पाखंडीपणाचा आरोप होण्याची संभावना लक्षात घेऊन ग्रंथकाराने लगेच अशीही पुस्ती जोडली आहे, की, तरीदेखील 'फिकाह'चा आदर केलाच पाहिजे; कारण योग्य व अयोग्य ठरविण्याचा 'फिकाह' हा अंतिम आणि अचूक निकष आहे. खरे म्हणजे हे गृहितच आहे.

याबाबतची मध्यंतरीच्या शतकातील आणखीही निवडक उदाहरणे देता येतील. हिजरीनंतर आठव्या शतकात होऊन गेलेला इराणी तत्त्ववेत्ता सय्यद अल् शरीफ अल् जुरजानी याने काही संज्ञांच्या व्याख्या (तारिफत) सांगितल्या आहेत. त्यात 'उर्फ'चीही व्याख्या आहे. ती अशी : विवेकबुद्धीचे, प्रामाण्याच्या आधारे ज्यावर एकमत होते आणि स्वीकारण्याबाबत सर्व प्रकारच्या स्वभावप्रकृतींच्या माणसांचे एकमत होते असे..." 'अदा'ची व्याख्या हा तत्त्ववेत्ता अशी करतो : "त्याचप्रमाणे 'अदा' म्हणजे मनुष्य सामान्यतः जो मार्ग अनुसरतो असा मार्ग." या व्याख्येत शरियतशी असलेला विरोध इतका उघड आहे की त्यावर आवरण घालता येणार नाही.

ज्या काळात जुरजानी याने आपला ग्रंथ लिहिला त्याच सुमारास माक्रिझी या इतिहासकाराने इजिप्त या आपल्या मातृभूमीतील धार्मिक सत्ताधाऱ्यांची लौकिक व्यवहारासंबंधीची सत्ता ऱ्हास पावत असल्याबद्दल व्यक्त केला आहे. त्याने म्हटले आहे : "शरियतचे कायदे व 'सियास'चे (राज्यसत्तेचे) कायदे, असे दोन प्रकारचे कायदे असतात अशी आजच्या काळातील लोकांची समजूत आहे. आणि अगदी थेट इजिप्त व सिरियामधील तुर्की (माम्लुक) राजवटीच्या काळापासून अशी समजूत आहे." पूजा, प्रार्थना, उपवास, यात्रा इत्यादि, धर्मश्रद्धेशी संबंधित अशा आचारांविषयीच्या कायद्यांचा संग्रह म्हणजे शरियत अशी त्याने शरियतची व्याख्या केली आहे. तर 'सियासा' कायद्यांचा उगम मंगोलांच्या 'यासा' (विधिसंहिता) मध्ये आहे. इतिहासकार माक्रिझी याच्या मते ही मंगोल विधिसंहिता इजिप्त व सीरिया या देशात चेंगीझखानच्या तुशी (जुजी ?) या नावाच्या मुलाने–बाराका याने– सुरू केली. माक्रिझी पुढे म्हणतो : "इजिप्त व सीरिया या मंगोलेतर देशात मंगोल कायदे प्रचलित होते. धार्मिक सत्ताधाऱ्यांच्या भीतीमुळे या देशांतील नागरिक प्रार्थना, उपवास, दानधर्म व यात्रा यांसारख्या धार्मिक बाबींच्या बाबतीत (यामध्ये अवक्फचे व्यवहार, अनाथ मुलांचे संगोपन आणि विवाह व व्यापारविषयक तंटे या बाबींचाही समावेश होता.) मुख्य

काझींचा अधिकार मानीत. परंतु याव्यतिरिक्त सर्व प्रश्नांच्याबाबतीत तेथील नागरिक चेंगीझखानच्या कायद्यांपुढे व ' यासा ' या विधिसंहितेपुढे मान तुकवीत. या कामासाठी त्यांनी ' हाजिब ' ( कारभारी ) या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. दैनंदिन बाबीतील विवादात्मक प्रश्नांविषयी निर्णय घेण्याचे काम हा अधिकारी करीत असे. अशा रीतीने ' यासा ' मधील कायद्यांच्याद्वारे दुर्बल माणसाला सबळ माणसाविरुद्ध न्याय मिळवता येत असे. त्याचप्रमाणे लष्करी सेवेबद्दल जहागिऱ्या देण्याच्या प्रश्नाबाबत, तसेच महसूल-विषयक प्रश्नांबाबत वाद निर्माण झाला असेल आणि त्याबाबत ' दिवाण ' किंवा त्यांचे अधिकारी यांना काही निर्णय देता नसेल अशा वेळी सुलतानाच्या खाजगी कारभाऱ्याकडे असे प्रश्न सुपूर्द केले जात. खाजगी कारभाऱ्याच्या हाती एवढी सत्ता होती की, त्याच्या खिश्चन नोकरवर्गालादेखील सरकारी खजिना व जमीनमहसूल याविषयींच्या प्रकरणातील खटले चालविण्याची सत्ता होती. ज्या निवाड्याला अल्लाहची कधीही संमती मिळणे शक्य नव्हते, अशा प्रकारचे ' दिवाणा 'शी संबंधित प्रश्नासंबंधींचे निवाडे हे लोक देत आणि अशा रीतीने अल्लाहच्या अधिकाराचे उल्लंघन करीत, त्याचा अनादर करीत."

तथापि अत्यंत महत्त्वाची अशी प्रकरणे ' नाइब ' किंवा खुद्द सुलतानाकडे सोपविली जात ही गोष्ट माक्रिझीनेदेखील मान्य केली आहे. अर्थात् यालाही काही अपवाद केले जात. माक्रिझीने यासंबंधात एका प्रकरणाचा उल्लेख केला आहे. सुलतान सालिह इब्ने मुहम्मद याच्या राजवटीमधील हाजिब सैफ अल्-दिन कुर्जी याला सरकारी कायद्यानुसार कर्जासंबंधीचे खटले चालविण्याची परवानगी दिलेली होती. शरियतच्या कार्यकक्षेत येणाऱ्या प्रश्नांसंबंधी निवाडा करण्याची पूर्वी कधीही हाजिबला नगी दिली जात नसे. माक्रिझीने असे म्हटले आहे की, यानंतरच्या काळात कायद्या-संबंधीच्या अधिकारांची विभागणी करण्यात आली.

हिजरीनंतरच्या दहाव्या शतकातील एका ज्यू धर्मगुरुने त्या काळात कायद्याच्या अधिकार-क्षेत्राची द्विदल विभागणी झालेली होती असे नमूद केले आहे. तो म्हणतो : " त्यांच्या न्यायाचे दोन प्रकार आहेत. एक ' शारी ' व दुसरा ' उर्फी ' न्याय. शारी न्यायदान मुख्य काझीकडे सोपविलेले असते. तो धर्माच्या दृष्टीने ( हिब्रुमध्ये याला ' दीन ' म्हणतात ) योग्य काय आहे ते ठरवितो. आणि ' उर्फी ' न्यायदानाचे काम देशाच्या राजाकडे सोपविलेले असते. इतकेच नव्हे तर धार्मिक कायद्याविरुद्ध जाऊन राजा मुख्य काझीला न विचारता एखाद्या माणसाला ' उर्फ ' कायद्याप्रमाणे मृत्युदंडाची सजा देऊ शकतो. " आधुनिक काळातील इजिप्तमधील राजवटीमध्ये शरियतच्या अधिकाराला खूपच ओहोटी लागलेली आहे. विवाह, घटस्फोट व वारसा यांसारख्या व्यक्तिगत कायद्यांसंबंधीच्या बाबींवर तर मुलकी कायद्यांचे नियंत्रण आहेच, एवढेच नव्हे तर ' अवक्फ ' आणि धार्मिक प्रतिष्ठानांना मिळणाऱ्या देणग्या यावरदेखील शासनाचे नियंत्रण आहे.

अशीच उदाहरणे भारताच्या इतिहासात आढळतात. दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दिन खिलजीसंबंधी लिहिताना " तारीख-ई फिरोजशाही ' या ग्रंथात असे म्हटले आहे की, अल्लाउद्दिन खिलजीचे असे मत होते की राज्यसंस्था व सरकार, ही एक गोष्ट आहे तर शरियतचे कायदे आणि आज्ञा ही वेगळी गोष्ट आहे. राजाज्ञा स्वतः राजाच्या असतात तर शरियतमधील आज्ञा या काझींच्या व मुफ्तीच्या निर्णयबुद्धीवर आधारलेल्या असतात. आपल्या या धारणेच्या अनुषंगाने हा सुलतान त्याच्याकडे निवाड्यासाठी येणाऱ्या सर्व प्रश्नांच्या बाबतीत सार्वजनिक हिताच्या दृष्टीने न्याय करीत असे. आणि तो करताना आपल्यापुढील प्रश्न ज्या पद्धतीने हाताळीत आहोत ती पद्धत धार्मिक दृष्टीने कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे याची तो चिंता करीत नसे. त्याचप्रमाणे शासकीय महत्त्वाच्या प्रश्नावर त्याने मुफ्तींचा कायदेशीर सल्लाही कधी विचारला नाही.

बाबर बादशहाच्या आठवणींच्या पुस्तकात सूड घेण्याच्या हेतूने केलेल्या एका हत्येचा उल्लेख आहे. शरियत व उर्फ या दोन्ही दृष्टींनी सदर हत्या न्याय्य होती असे बाबरने म्हटलेले आहे. यावरून त्याच्या अमदानीमध्ये पारंपारिक न्याय संहितेला किती महत्त्वाचे स्थान होते हे दिसून येते. व्यक्तीचे सार्वजनिक व्यवहार आणि महसुली उत्पन्न याबाबतीत परंपराधिष्ठित कायद्याला विशेष महत्त्व होते. म्हणूनच पंजाबमध्ये व इतरत्र कायदे बनविताना शासकवर्ग तद्देशीय पद्धतींचा आधार घेत असे. ' वाजिब अल् अर्द ' ( गाव कारभारासंबंधीचे दफ्तर आणि ' खाज-इ-आम ' ( स्थानिक जमातीच्या व तद्देशीय रिवाजांसंबंधीचे पुस्तक ) यासारख्या साधनांचा त्या प्रांतामध्ये स्थानिक उपयोगाची विधिसंहिता बन विण्यासाठी वापर केला जात असे.

" धर्मपीठाने सांगितलेल्या कायद्यांव्यतिरिक्त " राजाचे मत व तद्देशीय प्रथा हे जे इस्लामी कायद्याचे दोन आधार आहेत त्यांचा प्रभाव इस्लामी जगतात इतर देशांप्रमाणे इराणातदेखील दिसून येतो. या देशाने केवळ या दोन आधारांच्या प्रभावामुळेच किती कायदे केले यावरून त्यांचा प्रभाव तितकासा स्पष्टपणे लक्षात येत नाही. न्यायदानाचे कार्य सामान्यपणे ज्या पद्धतीने तेथे होत असते त्यावरून हा प्रभाव स्पष्ट होतो. परंपरावादी इतिहासकार बेहाकी याच्या म्हणण्याप्रमाणे गझनविदांच्या राजवटीमधील काझी शरियतच्या कायद्याप्रमाणे न्यायदान करीत असत. परंतु न्यायदानात झालेल्या अन्यायासंबंधींचे अर्ज व तक्रारी ऐकून घेण्याकरता अधूनमधून खास अधिकारी पाठविले जात.

न्यायदानात झालेल्या अन्यायाविषयींचे तक्रार-अर्ज ऐकण्यासाठी आठवड्यातून दोनदा अमीराने दरबार भरविला पाहिजे, ते त्याचे कर्तव्य आहे असे समजले जात असे. अशा वेळी न्यायाधीश म्हणून काम करीत असताना अमीराला एक सल्लागार व काही न्यायालयीन अधिकारी मदत करीत. अमीराच्या हितसंबंधाची अधिक काळजीपूर्वक जपणूक व्हावी यासाठी बहुदा या अधिकाऱ्यांचे सहाय्य घेतले जात असावे. मसूद याच्या अमदानीत बळजबरीने सत्ता हस्तगत करणाऱ्या राजपुत्र मुहम्मद याचा वझीर

इस्लाक याच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. त्या खटल्यात राजदरबारातील सर्वात बडा खाजगी कारभारी आणि अनेक काझी, न्यायाधीश म्हणून काम करीत होते. याशिवाय राज्याचे अनेक प्रमुख अमलदार, काझी व बाल्खमधील प्रख्यात व्यक्ती त्या खटल्याच्या वेळी उपस्थित होत्या. आरोपीविरुद्ध, तो कॅरमॅथियन व पाखंडी आहे, असा आरोप होता. तथापि आरोपीचा खरा गुन्हा होता, अधिकारपदावर असताना राजाची संपत्ती विकण्यास सहाय्य करण्याचा. त्याने विकलेल्या राजाच्या मालमत्तेची यादी मुख्य पुरावा म्हणून खटल्याच्या वेळी दाखल करण्यात आली होती. फिर्यादी पक्षाच्या साथीदारांनी आरोपीवर दोषारोपण करून त्याची निर्भर्त्सना केली. खटल्याचे स्वरूप एवढेच मर्यादित होते. आरोपीला आपली कैफियत मांडण्याची परवानगी देण्यात आली. पण त्याने आणलेल्या साक्षीदारांचे म्हणणे ऐकून न घेता त्याला शिक्षा फर्माविण्यात आली. अशाप्रकारे या प्रकरणात अमीराच्या हितसंबंधापायी धर्महिताची संपूर्णपणे उपेक्षा करण्यात आली हे स्पष्ट[1] होते.

आपले हितसंबंध धोक्यात येण्याची भीती असे तेव्हा सत्ताधाऱ्यांनी आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या हातात कायदा घेतल्याची आणखीही काही उदाहरणे इराणी इतिहासाच्या नंतरच्या काळात आढळतात. अँथनी जेन्किन्सन नावाचा एक इंग्लिश प्रवासी इ. स. १५६२ मध्ये राणी एलिझाबेथचे शिफारसपत्र घेऊन शाह ताहमास्प याला भेटण्यासाठी इराणमध्ये गेला होता. तो म्हणतो, "कोणी माणसाने राजाचा गुन्हा केला तर राजा त्याला जबर सजा देतो, एवढेच नव्हे तर त्या माणसाच्या मुलाबाळांनाही शिक्षा करतो. चोरी व खून याकरता बहुधा सजा होतेच. तथापि गुन्हा घडला असेल त्या ठिकाणच्या राजाला जो गुन्हेगार मनुष्य खूष करील, त्याच्याशी दोस्ती करील किंवा आपल्या गुन्ह्यातून सुटका करून घेण्यासाठी पैसे देईल त्याला सजा होत नसे."

सर जॉन चार्डिन याने म्हटले आहे की, इराणमध्ये शरियतचा कायदा आणि 'उर्फ' यामध्ये फरक केला जात असे आणि ही गोष्ट महत्त्वाची आहे. तो म्हणतो, "उर्फची उभारणी प्रामुख्याने राजाच्या निरंकुश इच्छेवर झालेली आहे. बहुसंख्य भाविकांना व विशेषतः धर्माधिकाऱ्यांना ही गोष्ट एकप्रकारे जुलमी वाटते. धर्माधिकाऱ्यांच्या न्यायालयाच्या अधिकाऱ्यांनी चालवावयाचे खटले मुलकी न्यायालयाच्या

---

१. शरियतच्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कधी कधी काझीचा उपयोग केला जात असावा असे दिसते. खलिफा अल् झाहीरने आपल्या बगदादच्या काझीला, सुधारणा करण्याच्या उत्साहाच्या भरात अशी सूचना केली होती की, ज्या लोकांकडून बेकायदेशीरपणे मालमत्ता घेतली गेली आहे, त्यांनी त्या मालमत्तेवरील आपला अधिकार शाबित करणारा पुरावा पुढे आणला तर, त्यांची मालमत्ता त्यांना परत केली जावी.

अधिकाऱ्यांनी वास्तविक चालविले नाहीत तर फारसा अन्याय होईल असे नाही. परकी लोकांशी वा मुस्लिमेतर लोकांशी संबंधित असलेले गुन्हेगारीचे खटले व व्यापार-विषयक खटले यांच्याबाबतीत मुलकी न्यायालयांचा प्रभाव अधिक जाणवतो."

तसेच सतराव्या शतकातील जर्मन प्रवासी ऑलेरियस असा हवाला देतो की, त्या काळात दिवाणी खटले सरसहा धर्मातीत न्यायाधीशांपुढे– "ज्यांना ते 'उर्फ' म्हणतात"– चालविले जात असत. "हे न्यायाधीश त्यांच्या दृष्टीने एक प्रकारचे वकील असत. त्यांच्या प्रमुखाला 'दिवान-बेकी' म्हणत. मुहम्मदी कायदेकानुत ते चांगले तज्ज्ञ असणे आवश्यक समजले जाई." इराणचा जॉन ड्यूआन म्हणतो, "गुन्हेगारां-वरील खटले बड्या वझीरासमोर चालतात व गुन्हेगारांना सजा दिली जाते. वझीर आपल्या दुय्यम अधिकाऱ्याला म्हणजे वकीलाला ( अध्यक्षाला ) आज्ञा देतो. मग प्रकरण राजापुढे आणले जाते. परंतु राजाने न्यायदानाविषयीच्या सर्व किरकोळ तप-शीलाच्या बाबी विभिन्न शहरांच्या मंत्र्यांकडे व प्रांताधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या आहेत."

काझी व उलेमा यांना काहीच महत्त्व नव्हते असे या उदाहरणांवरून दिसते असे समजण्याचे कारण नाही. ते सदैव समाजाचा एक शक्तिशाली घटक राहिलेले आहेत. आणि विशेषत: स्थिरतेच्या काळात सामाजिक व्यवहारांना दिशा देण्याच्या-बाबतीत या वर्गाला निर्णायक महत्त्वाचे स्थान होते. सफावींच्या अमदानीत तर 'सद्र' चा दर्जा व महत्त्व शेख अल् इस्लाम किंवा तुर्कस्तानच्या ग्रँड मुफ्ती यांच्या बरोबरीचे होते. खुद्द सुलतानापेक्षाही वरचढ ठरू शकेल एवढी सत्ता असलेली ग्रँड मुफ्ती ही एक उच्चपदस्थ व्यक्ती समजली जाई. तथापि काझीकडे सर्वसाधारणपणे "कर्ज, वारसा हक्काची विभागणी, करारमदार व खरेदीचे व्यवहार" यासंबंधींची प्रकरणे सोपविली जात. तसेच विवाह व घटस्फोटासंबंधींची प्रकरणेदेखील काझीच पहात असे.[1]

---

१. शाह सुलेमान याचा दरबार पाहिलेला जॉन फ्रायर म्हणतो, "काझीकडे सर्व तऱ्हेचे करारमदार, बेचनपत्रे आणि तडजोडी यासंबंधीची प्रकरणे सोपविलेली असतात. अशा प्रकरणांचे दस्तऐवज पैसे घेऊन स्थानिक कायद्याच्या पद्धतीप्रमाणे लिहून देणारे लोक काझीच्या कचेरीच्या दाराशी बसलेले असतात. हे दस्तऐवज काझीपुढे निरीक्षणाखाली ठेवले जातात. त्यामध्ये एखाद्या जॉन-ए नोकसचा, जॉन-अ-स्टाइल्सचा, झैदचा आणि अमरचा उल्लेख असतो. काझी मग मोठ्याने पुकारतो, "झैद कुठे आहे?" मग झैद पुढे येऊन आपण हजर असल्याचे सांगतो. तेव्हा त्याला काझी पुढे विचारतो, "हे घर, बगीचा किंवा जमीन किंवा तसेच आणखी काही तू स्वखुषीने अमरला विकतो आहेस काय?" त्यावर झैद 'होय' असे उत्तर देतो. "तुम्ही दोघांनी किंमत ठरविली आहे काय?" "होय." "तर मग तुझे साक्षीदार कुठे

[ पुढील पान २७३ पहा ]

विशेष परिस्थितीतच फक्त खुनाची प्रकरणे काझीच्या अधिकारक्षेत्रात येत. आपले घर फोडून चोरी केली म्हणून एका खिश्चन घड्याळजीने एकदा एका इसमाला ठार मारले. त्या दुर्दैवी घड्याळजीच्या प्रकरणाचा ओलेरियस याने उल्लेख केला आहे. ओलेरियस सांगतो, " मृत माणसाच्या नातलगांनी तात्काळ धर्मपीठाच्या न्यायाधीशाकडे धाव घेतली आणि एका परकी व पाखंडी व्यक्तीने एका धर्मश्रद्ध माणसाचा खून केला असल्याची तक्रार केली. " घड्याळजीला पकडण्यात आले. परराष्ट्र वकीलांनी त्याच्यासाठी प्रयत्न केला. पण त्याला मृत्युदंडाची शिक्षा फर्मावण्यात आली. खुनी घड्याळजीसमोर, इस्लामधर्म स्वीकारून सुटका करून घे, नाहीतर मृत माणसाच्या नातलगांच्या हातून ठार मारून घेण्यासाठी स्वाधीन हो, असे पर्याय ठेवण्यात आले. खुनी माणसाने दुसरा पर्याय स्वीकारला.

जॉन फ्रायरच्या माहितीनुसार मोठ्या चोरीच्या गुन्ह्यासाठी तुरुंगवासाची शिक्षा दिली जात असे आणि किरकोळ चोरीकरता ' पायाचे तळवे काठीने झोडपून काढण्याची ' सजा होत असे. या दोन्ही प्रकारच्या शिक्षा इराणमध्येच विशेषतेने रूढ होत्या. शरियतने सांगितलेल्या शिक्षांशी, शिक्षेचे हे प्रकार विसंगत होते.

जवळपास अगदी आजपर्यंत इराणमध्ये द्विदल न्यायपद्धती चालू आहे. ' उर्फ ' वर्गातल्या न्यायदानाचे काम स्वतः शाह, त्याचे प्रांताधिकारी व राजाचा ' दिवाणखाना ' हे करीत असत असे इराणच्या शाहचा जर्मन डॉक्टर पोलक याने १९ व्या शतकात लिहून ठेवले आहे. ' उर्फ ' कायदा हा पारंपारिक कायदा होता असे डॉक्टर पोलक याने म्हटले आहे ते बरोबर आहे. कारण हा कायदा कोणत्याही पूर्वीच्या दाखल्यांवर

---

[ मागील पानावरून ]

आहेत ? "–काझी विचारतो. त्यावर शैद जबाब देतो, " मी ते घेऊन आलो आहे; ते स्वतः सांगतील. " काझी मग साक्षीदारांना विचारतो, " या गोष्टी शैदच्या मालकीच्या आहेत काय ? " त्यावर साक्षीदार उत्तर देतात, " होय. साऱ्या गावाला, अगदी पोरासोरांनादेखील ते माहीत आहे. " मग असे प्रश्न करून काझी आवाज चढवून विचारतो, " या व्यवहाराला कोणाची हरकत आहे काय ? " मग सर्वजण एकदम ओरडून ' नाही ' म्हणून सांगतात. मग काझी आपली मोहर मागवतो. चांदीच्या पत्र्यावर अक्षरे कोरलेली ती मोहर मग शाईत बुडवितो आणि तिचे निरनिराळ्या तीन-चार जागी तीन-चार ठसे मारतो. लबाडी करावयाला काही जागा राहू नये; किंवा दस्तऐवज करणाऱ्यांनी आपल्याच हाताचे ठसे उमटवू नयेत किंवा आपणच तो करार स्वतंत्रपणे केलेला आहे असे संबंधित व्यक्तींना दाखविता येऊ नये यासाठी दस्तऐवजाचे दोन भाग एकत्र आलेले असतात, त्या सांध्यावर विशेषतः शिक्के मारले जातात. अशा रितीने तो करार काझी पक्का करतो. "

किंवा नियमांवर अधिष्ठित नसून त्या त्या वेळच्या आवश्यकतांच्या आणि राज्यसत्तेच्या गरजांवर आधारलेला होता. कोणती प्रकरणे काझीच्या शरियतच्या न्यायालयाकडे जावीत आणि कोणती 'उर्फ' न्यायालयाकडे जावीत याविषयी कोणताही नियम अस्तित्वात नव्हता. प्रामुख्याने शासकीय व राजकीय स्वरूपाचे खटले 'उर्फ' न्यायालयात चालविले जात. उदाहरणार्थ शाह किंवा एखाद्या प्रांताधिकाऱ्याविरुद्ध बंड करणे, सरकारविषयी खोटी माहिती पसरविणे, खोटी नाणी पाडणे, कायदा व व्यवस्थेविरुद्ध अपराध, रस्त्यात दंगामस्ती करणे, पत्ते खेळणे इत्यादी; तसेच चोरी, खून व हमरस्त्यावरील दरोडे.

अलीकडच्या काळात इस्लामी देशांत राज्यकारभाराची पुनर्रचना झाली असल्यामुळे देशाच्या ऐहिक शासनसंस्थेकडे कायदे करण्याची व त्यांची अंमलबजावणी करण्याची बरीचशी सत्ता आली आहे. त्यामुळे शरियत कायद्याच्या कक्षेतील म्हणून समजल्या जाणाऱ्या अनेक बाबींचे आता नागरी कायद्यांद्वारे नियमन होत असते. त्यानुसार अलीकडच्या कायद्यांप्रमाणे विवाह व घटस्फोट सरकारी अधिकाऱ्यांपुढे नोंदवावे लागतात. पहिली बायको असता दुसरे लग्न करणाऱ्या इसमाला तसे जाहीर करावे लागते आणि रास्त कारणाच्या आधारे बायकोला घटस्फोट मागता येतो.

शरियतच्या पंडितांनी केलेल्या कायद्यांपेक्षा वेगळे असे कायदेकानू करण्याच्या ऐहिक शासनाच्या हक्काचा आग्रह प्रामुख्याने ऑटोमनांची सत्ता तुर्कस्तानात आल्यापासून तेथील सत्ताधाऱ्यांनी धरला. कोणत्याही जीवित राज्यसत्तेच्या सर्वच्या सर्व आवश्यकता धार्मिक विधिसंहितेद्वारे पुऱ्या होऊ शकत नाहीत आणि म्हणून त्या संहितेला दुसऱ्या साधनांची जोड दिली पाहिजे या गोष्टीचा अनुभव इतर मुस्लिम शासकांप्रमाणे तुर्कस्तानच्या राज्यकर्त्यांनाही आला. त्यामुळे वेळोवेळी परिस्थितीच्या गरजेनुसार राजाने केलेल्या नियमांना देशाच्या कायद्याचे स्थान स्वाभाविकपणेच मिळाले. शरियतचे जे विधिनियम सर्वसाधारणपणे संमत पावले आहेत आणि जे अंमलात आहेत अशा नियमांशी विसंगत नसलेले 'राजाज्ञे'चे (इरादासानिया) प्रत्येक प्रकटीकरण ही बंधनकारक आज्ञा होय, असा सिद्धान्त ऑटोमन राज्यात मानला जाऊ लागला. तथापि (अ) मंत्रिमंडळातील चर्चेनंतर जाहिर करण्यात आलेले 'राजाज्ञे'संबंधीचे प्रकटीकरण, आणि (आ) 'राजाज्ञे'ची निरंकुश अंमलबजावणी या दोहोंत प्रत्यक्ष व्यवहारात मात्र फरक करण्यात येत असे. यापैकी पहिल्याला 'कानून' किंवा 'निझाम'[1] म्हटले जाई, तर दुसऱ्याला 'इरादासानिया' असा सार्थ शब्द होता. अशा रितीने राजाच्या कायदे करण्याच्या सत्तेला तुर्कस्तानमध्ये 'उर्फ' असे नाव होते. इस्लामी कायद्याच्या 'अदा' म्हणजे प्रस्थापित प्रथा या इस्लामी कायद्याच्या दुसऱ्या मूलस्रोताहून भिन्न अशी ही सत्ता समजलेली आहे.

---

१. याला कधी कधी 'निझाम-नामा' असेही म्हटले जाई.

इतर इस्लामी देशांपेक्षा तुर्कस्तानचे यासंबंधांतील वेगळेपण असे की, प्रारंभींचे काही सुलतान वगळता बाकी सर्व सुलतानांनी आपले कायदे प्रसिद्ध केले होते आणि ते ( अरबीऐवजी ) आपल्या स्वतःच्या भाषेत लिहिले होते. कारण ती भाषा इहलौकिक व्यवहारासंबंधींच्या कायद्यांना अनुरूप अशी होती. पूर्वीच्या काळात सुलतानांचे कायदे प्रसिद्ध केले जात नसत. त्या त्या प्रसंगी अधिकाऱ्यांना पाठविलेल्या वेगवेगळ्या सूचना म्हणजे कायदे असे त्यावेळीं कायद्याचे स्वरूप होते.

कॉन्स्टॅन्टिनोलपचा विजेता दुसरा मुहम्मद हा 'कानून' कायद्यांचा खरा संस्थापक होय. त्याने तयार केलेला पहिला 'कानून-नामा' किंवा 'कायद्यांचा संग्रह' हा 'कानून' कायद्याचा पहिला ज्ञात संग्रह होय. परंतु पहिला सुलेमान 'कानूनी' या सुलतानानें कायदे करण्याच्या आपणास मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला आणि आपल्या शासनाच्या मुलकी व लष्करी आवश्यकतांच्या प्रत्येक बाबीसंबंधी कायदे केले. त्याच्यानंतर सुलतानपदावर आलेल्या अनेक सुलतानांनी त्याचे अनुकरण करून आपापल्या कायद्यांचे संग्रह ('कानून-नामे') प्रसिद्ध केले. ते अद्याप अस्तित्वात आहेत.

काही प्रसंगी राजाची आज्ञा शरीयाच्या काही सुपरिचित अशा नियमांशी विसंगत असल्याचे दिसून येई. जानिसारांची पलटण ज्या आज्ञेद्वारे उभारली गेली ती आज्ञा हे या संदर्भातील एक महत्त्वाचे उदाहरण आहे. डोईकर देणाऱ्या 'धिम्मी'ला ('संरक्षण-प्राप्त' जमातीचा सदस्य) गुलाम करता येत नाही किंवा त्याच्यावर आपल्या मुलांना गुलाम म्हणून देण्याची सक्ती करता येत नाही असा शरियतचा दंडक आहे. असे असूनही मॅसिडोनिया व थ्रेसच्या सुलतानांच्या ख्रिश्चन प्रजाजनांच्या तरुण मुलांना इस्लामधर्म पत्करावयास लावून गुलामांच्या जानिसार पलटणीत त्यांची भरती करता यावी यासाठी 'उर्फ' कायद्याच्या सहाय्याने त्यांना गुलाम म्हणून द्यावयास भाग पाडण्यात आले होते.[१] ही प्रथा पहिल्या मुरादने सुरू केली असे म्हणतात. सैन्यभरतीसंबंधीच्या त्याच्या कायद्यांत ( देवशिरमेह ) अशी एक जुलमी तरतूद होती की तिच्याद्वारे युरोपातील जित प्रदेशांमधील ख्रिश्चन तरुणांना 'खराज'कर देऊन लष्करात भरती होण्याच्या बाबतीत मिळणारी सूट नाकारता येत असे.[२]

शरियतमधील आज्ञांच्या विरोधी असलेल्या 'कानून'चे आणखी एक उदाहरण

---

१. सक्तीने धर्मांतर केले जात असे किंवा किमान सरकारची त्यास संमती असे या विधानाचा डी ऑहस्सन यांनी इन्कार केला आहे. बडा वझीराच्या व अन्य महत्त्वाच्या मंत्रीपदांवर जानिसारांची नियुक्ती होत असे हे मात्र खरे.

२. इ. स. १६३७ च्या सुमारास चौथ्या मुरादच्या कारकीर्दीत ही पद्धत रद्द करण्यात आली.

दुसऱ्या मुहम्मदाच्या 'कानून-नामा'मध्ये आढळते. एखाद्या विवाहित आणि संपन्न माणसाच्या हातून शरियतमधील आज्ञांच्या दृष्टीने व्यभिचार घडला असल्याचे सिद्ध झाले तर त्याला पैशाच्या स्वरूपात दंड दिला जावा असा एक कायदा या कानूननाम्यामध्ये आहे. तथापि कुराणाने व्यभिचाराच्या अपराधासाठी मृत्यूची किंवा अन्य शारीरिक दंडाची सजा सांगितलेली आहे. या 'कानून-नाम्या'मधील संबंधित 'कानून'ला जोडून असलेल्या नियमाशी कुराणाने सांगितलेल्या या सजेचा काहीसा संबंध जोडला आहे. सदर नियम असा आहे की, एखाद्या स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप असेल तर तिच्याशी व्यभिचार करणाऱ्या पुरुषाच्या मृत्युबद्दल तिने रक्तदंड ( म्हणजे व्यभिचार केल्याबद्दल जर त्या पुरुषाला ठार मारण्यात आले असेल तर त्याबद्दल द्यावयाची रक्कम ) दिला पाहिजे.

शरियतप्रणीत विधिसंहिता अस्तित्वात असल्यामुळे आणि 'कानून' कायद्याइतकीच ती अधिकृत समजली जात असल्यामुळे तिच्याशी विसंगत असे जे ऐहिक शासनाचे कायदे अस्तित्वात होते त्यांची नोंद घेणे जरूर आहे. ऑटोमनांचे कायदे तत्त्वतः तरी शरियतवर आधारलेले होते असे हनफींच्या भाष्यानुसार मत व्यक्त करणारे प्रमाणित अधिकृत पुस्तक म्हणजे सोळाव्या शतकाच्या मध्यानंतरचे, इतर 'फिकाह' संबंधीच्या पुस्तकाप्रमाणे अरबी भाषेत संकलित केलेले 'मुल्ताका अल्-अभूर' हे पुस्तक होय. इब्राहिम अल् हलाबी ( मृत्यू १५४९ ) याने या पुस्तकाचे संकलन केले आहे. शरियतप्रणीत विधिसंहितेचा तुर्कस्तानमधील प्रमुख भाष्यकार ग्रँड मुफ्ती किंवा शेख अल् इस्लाम हा होय. कधी कधी तर त्याचा 'फतवा' सुलतानाच्या आज्ञेपेक्षाही श्रेष्ठ समजला जात असे. धर्मसत्तेतील या उच्चपदस्थ व्यक्तीच्या सामर्थ्याचे एक नमूनेदार उदाहरण उपलब्ध आहे. सुलतान अब्दुल अझीझ ( १८६१–७६ ) याने राजघराण्यातील हयात असलेल्या सर्वात ज्येष्ठ पुरुषाला वारसा देण्याच्या जुन्या पद्धतीऐवजी गादीवर असलेल्या सुलतानाच्या सर्वात ज्येष्ठ मुलाला वारसा देण्याचा नियम करावयाचे ठरवले. तेव्हा तत्कालीन शेख अल् इमामने ( ग्रँड मुफ्तीने ) असा बदल करणे शरियतप्रमाणे कायदेशीर ( जायज ) ठरणार नाही असे बजावले. वास्तविक त्याआधी पहिला सुलतान अहमद याच्या मृत्यूपर्यंत ( १६१७ ) अशा तऱ्हेचा नियम अस्तित्वात होता तरी देखील ग्रँड मुफ्तीच्या विरोधामुळे सुलतान अब्दअल् अझीझला तो नियम लागू करता आला नाही.

ग्रँड मुफ्तीच्या व अन्य धार्मिक सत्ताधाऱ्यांच्या प्रभावामुळे आणि सत्तेवर येणारा प्रत्येक सुलतान हा स्वतःलाच खलिफा समजू लागल्यामुळे शरियतशी सुसंगत असेच सर्व 'कानून' तयार करण्यात येऊ लागले.[1] आणि अगदी अलिकडे म्हणजे १९२१

---

१. याला 'शारी शरीफ मुवाफिक कानून-नामा दिर' म्हणत.

मध्ये तर तुर्कस्तानच्या ग्रेट नॅशनल असेंब्लीने असा नियमच केला की, 'सर्व कायदेकानू शरियतमधील धर्मशास्त्रीय 'मूलाधारा'नुसारच केले गेले पाहिजेत. अर्थात हे कायदेकानू लोकांच्या सामान्य जीवनाशी जास्तीत जास्त मिळतेजुळते आणि काळाची गरज व देशाच्या परंपरा व संस्कार, संवयी यांच्याशी अनुरूप असे असले पाहिजेत.' परंतु १९२४ च्या सुमारास तुर्कस्तान राजकीयदृष्ट्या एवढा प्रगत झाला की, देशाच्या ऐहिक सरकारला परंपरा बाजूस सारण्याची तीव्रतेने आवश्यकता वाटू लागली. आणि त्याच वर्षी २० एप्रिल रोजी ग्रेट नॅशनल असेंब्लीने "ऑटोमन साम्राज्यातील कायदे करण्याची व ते अमलात आणण्याची संपूर्ण सत्ता आपल्या हातात एकवटलेली असून कोणताही कायदा करण्याची, सुधारण्याची किंवा रद्द करण्याची सत्ता फक्त आपल्यालाच आहे," असे घोषित केले. या घोषणेत 'कायदे करणे' यासाठी ताश्री (म्हणजे शार तयार करणे) ही संज्ञा वापरण्यात आली होती. पैगंबरांच्या कायदे करण्याच्या अधिकाराच्या संदर्भातच तोवर या संज्ञेचा उपयोग केला जात असे. इराणमधील कायदेमंडळाचे सदस्य कायदे करण्याच्या अधिकाराच्या संदर्भात या संज्ञेचा उपयोग काळजीपूर्वक टाळीत असत. आपल्या अधिकारांचा निर्देश करताना त्यांनी 'तक्नीन' (म्हणजे 'कानून' करणे) या शब्दापलीकडे जाण्याचे साहस केले नव्हते. धर्मपीठाच्या सत्ताधाऱ्यांची सत्ता घटविण्याचा हा हेतुपुरस्पर प्रयत्न असावा असे दिसते. स्वित्झर्लंडचे सिव्हिल कोड व इटलीचे पीनल कोड तुर्कस्तानने स्वीकारले तेव्हा तर शरियतप्रणीत कायद्यांच्या पंडितांचे सर्व विशेष अधिकार संपूर्णपणे संपुष्टात[1] आले. तुर्कस्तान नॅशनल असेंब्लीच्या वर उल्लेखिलेल्या घोषणापत्राच्या प्रस्तावनेत तुर्कस्तानच्या ऐहिक सत्ताधाऱ्यांचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. ही प्रस्तावना तुर्की प्रजासत्ताकाच्या न्यायमंत्र्यांनी लिहिली होती. त्यात असे स्पष्टपणे म्हटले होते की, तुर्कस्तानच्या कायद्याचे आधुनिकीकरण करण्याचे भूतकाळातील प्रयत्न फसले याचे कारण ते प्रयत्न करणारे लोक (कायद्याची) दोन स्वतंत्र अशी अधिकारक्षेत्रे आहेत असे मानीत. घोषणापत्रात म्हटले आहे, "(या लोकांच्या मते) खिलाफत व सुलतानपद या दोन भिन्न सत्ता एकाच व्यक्तीमध्ये एकवटलेल्या आहेत.[2] परिणामी वेगवेगळी अधिकार क्षेत्रे निर्माण झाली. त्यापैकी एक

---

१. नवे सिव्हिल कोड १७ ऑक्टोबर १९२६ रोजी अंमलात आले आणि नवीन पीनल कोड २१ ऑगस्ट १९२९ रोजी अंमलात आले. १ जानेवारी, १९२८ रोजी अल्बानियाने जुन्या ऑटोमन कोडऐवजी इटलीच्या पीनल कोडवर आधारलेले पीनल कोड लागू केले.

२. बडा वझीर व शेख अल् इस्लाम हे सुलतानाचे प्रमुख सहकारी होते असे म्हटले आहे. खरे तर शेख अल् इस्लाम याने आपली आध्यात्मिक सत्ता सुलतानापेक्षा कनिष्ठ आहे या गोष्टीस कधीच मान्यता दिली नसती.

सुलतानाचा प्रतिनिधी बडा वझीर याचे आणि दुसरे खिलाफतीचा प्रतिनिधी शेख अल् इस्लाम याचे. "यामुळे एकाच राज्यसंस्थेच्या अंतर्गत दुसरी राज्यसंस्था विकसित झाली. म्हणूनच ग्रेट नॅशनल असेंब्लीने सर्व प्रकारचे कायदे–मुलकी, व्यक्तिगत व फौजदारी यापुढे आपल्या नियंत्रणाच्या अधीन ठेवण्याचा निर्णय केला आहे."

□ □

प्रकरण ७

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/१२०
२
मंत्रालय.

# खिलाफत आणि केंद्रीय सत्ता

एखाद्या व्यक्तीला, अरबी समाजात घ्यावे किंवा नाही याचा इस्लामनिष्ठा हा इस्लामच्या उदयानंतर अरबस्तानात एक निकष बनला. अरबस्तानच्या समाजजीवनात इस्लामने घडवून आणलेला बहुधा हा सर्वांत खोल असा बदल होता. तोपर्यंत व्यक्तीचा जन्म हा विभिन्न गटांत झालेल्या समाजाच्या विभागणीचा निकष मानला जात होता. परंपरा व परस्परविरोधी असे भौतिक हितसंबंध या द्वारे एका टोळीचे दुसऱ्या टोळीशी असलेले भिन्नत्व ओळखले जात होते. तथापि कोण कोणत्या कुळातला आहे यासंबंधींच्या समजुतीला सर्वाधिक महत्त्व होते. तसेच समान वंशाच्या कल्पनेच्या आधारे प्रत्येक टोळीतील सभासद एकत्र बांधले जात. रक्ताच्या नात्याच्या या कल्पनेमुळे एकाच विशिष्ट गटातील व्यक्तींच्या दर्जाच्या बाबतीत आनुवंशिक फरकाचा प्रश्न बहुधा उपस्थित होत नसे. बदवी जमातीचे पुढारीपण त्या जमातींतील एकाच विशिष्ट कुटुंबात कायम राहात असे, असे नाही. काही पिढ्यांपेक्षा अधिक काळ कोणत्याही एका बदवी कुटुंबाकडे संबंध बदवी जमातीचे पुढारीपण राहिले असे क्वचितच होत असे.

युद्धाचा संभव असेल किंवा छापामार मोहिमा निघणार असतील अशा आणी-बाणीच्या प्रसंगी बहुधा टोळीनायकाची निवड त्याचे चारित्र्य, साहस व अनुभव यांचा विचार करून टोळीवाल्यांकडून केली जाई. टोळीनायकात हे गुण असतील तर त्याच्या जन्मघराण्याची बाब त्याला अधिकच फायदेशीर ठरत असे. ज्या काळात टोळीचे घटक स्वखुषीने आपल्या नायकाची सत्ता मानीत असत, त्या काळाव्यतिरिक्त इतर काळांतदेखील टोळीनायक आपल्या आज्ञा पाळण्याची सक्ती टोळीतील सभासदांवर करू शकत असे. टोळीच्या नायकाला आपल्या टोळीतील सभासदांवर कर बसविण्याची किंवा त्यांना दंड करण्याची सत्ता नव्हती. आणि शांततेच्या तसेच युद्धकाळातील आपल्या टोळीच्या सामुहिक इच्छा-आकांक्षाचा प्रतिनिधी या नात्याने टोळीचा नायक सामान्यतः आपल्या टोळीला आपल्या विचाराप्रमाणे वागावयास लावण्यापेक्षा तो स्वतःच टोळीच्या विचाराने वागे. परंतु एखादा शेख बलिष्ठ असेल तर तो टोळीच्या सामुहिक विचारावर आपला प्रभाव पाडू शकत असे. मालमत्तेसंबंधींचे छोटे तंटे किंवा नवरा-बायकोतील भांडणे

यासंबंधीचे निर्णय टोळीनायकच देत असे. तसेच टोळीकडे आलेल्या पाहुण्यांचा पाहुण-चारही तोच करीत असे. अर्थातच लुटीसाठी घातलेले छापे व आक्रमणे यांचे नेतृत्व करण्याच्या जबाबदारीशिवाय ही अतिरिक्त कामे त्याला करावी लागत. त्याचा मोबदला म्हणून त्याला सर्व लुटींमध्ये जादा हिस्सा मिळत असे. तसेच आपल्या जमातीच्या सर्व सभांत त्याला मानाचे स्थान मिळत असे. तसेच टोळी जेव्हा एका ठिकाणचा मुक्काम हलवून दुसरीकडे तळ टाकी तेव्हा आपला तंबू आपणाला हवा तेथे टाकावयाची त्याला सवलत मिळे.

टोळीतील प्रत्येक सभासद व्यक्ती टोळीनायक व एकंदर टोळी यांच्या संदर्भात संपूर्णपणे स्वतंत्र असे. एखाद्या कुटुंबाच्या प्रमुखाला आपल्या टोळीनायकाचे वर्तन उद्धटपणाचे वाटले तर तो त्याची निर्भर्त्सना करू शकत असे, किंवा आपल्यावर अन्याय झाला आहे असे त्याला वाटले तर तो टोळीतून बाहेर पडू शकत असे. जोपर्यंत तो टोळीत राहात असेल तोपर्यंत त्याने स्वखुषीने पत्करलेली टोळीची कामे त्याला करावी लागत. टोळीमध्ये होणाऱ्या सल्लामसलतींत तो भाग घेई आणि त्याला गरज लागेल तेव्हा टोळीचे संरक्षण त्याला मिळत असे. टोळीच्या विशिष्ट कायदेकानूंचे ( विशेषतः मालमत्तेच्या हक्कांसंबंधीचे कायदे ) तसेच विवाहविषयक परंपरागत रीतिरिवाजांचे त्याला पालन करावे लागे. अन्यथा तो स्वतंत्र असे. टोळीतला माणूस टोळीतून बाहेर पडला की आपल्या टोळीकडून संरक्षण मिळण्याचा हक्क गमावून बसे आणि त्याचा स्वीकार करावयास तयार असेल अशा दुसऱ्या एखाद्या टोळीतील कोणा सभासदाचा त्याने आपण होऊन आश्रय घेतला नाही तर त्याला शत्रुपक्षीय टोळीपासून सदैव भय असे. दुसऱ्या टोळीचा आश्रय घेणाऱ्या इसमाला, संरक्षण देणाऱ्या टोळीचा 'मुल्साक' ('संलग्न' सदस्य) किंवा 'हालिफ' (शपथ घेतलेला) म्हटले जाई. टोळीच्या विभिन्न सभासदांनी बंधमुक्त केलेले गुलाम आणि या बंधमुक्त गुलामांचे वंशज असे जे 'मवाली' त्यांचे आणि दुसऱ्या टोळीच्या आश्रयास गेलेल्या व्यक्तीचे अधिकार जवळपास सारखे होते.

प्रत्येक टोळीची रचना अशी असे : प्रमुख स्थान टोळीप्रमुख व त्याचे कुटुंब यांना; दुसरे टोळीप्रमुखाचे नेतृत्व मान्य असलेल्या स्वतंत्र अरब कुटुंबांच्या गटांना; तिसरे 'मवाली' व सलग्न सभासदांना; आणि चौथे व अखेरचे गुलामांना.

टोळीपद्धत शहरांत त्याचप्रमाणे काही अंशी स्थिर लोकवस्तीच्या प्रदेशांत अस्तित्वात होती. स्वतः मुहम्मदांच्या कुरेशी जमातीची संख्या मक्केमधील रहिवाशांत सर्वाधिक होती. आणि त्या जमातीचे प्रमुख सदस्य हेच मक्केचे महत्त्वपूर्ण नागरिक समजले जात. तीच गोष्ट मदिना शहराची. मात्र त्या शहरातील लोकवस्ती ऑ व खझराज या दोन शक्तिशाली व परस्परांच्या प्रतिस्पर्धी असलेल्या जमातींमध्ये विभागलेली होती.

अन्य सर्व निष्ठांपेक्षा इस्लामनिष्ठेला श्रेष्ठ स्थान असले पाहिजे ही आपली शिकवणूक मुहम्मदांना मदिना शहरातच प्रत्यक्ष व्यवहारात आणता आली. मुहम्मदांचे मदिनात आगमन झाले, त्यावेळी ऑ व खझराज या जमातींचे परस्परांशी जबरदस्त वैर होते. इस्लामचे सामर्थ्य वाढू लागले तसे या दोन प्रतिस्पर्धी जमातींमधील दुराव्याची जागा इस्लामवर निष्ठा असणारे आणि नसणारे यांच्यातील दुराव्याने घेतली. पैगंबरांचे मक्केमधील 'सह निर्वासित '–मुहाजिर आणि मदिनावासीयांतील त्यांचे 'सहाय्यक '–अन्सार यांची इस्लामवर निष्ठा असणाऱ्यांत गणना केली जाई तर पैगंबरांशी व त्यांच्या धर्माशी वैर करणाऱ्यांचा इस्लामवर श्रद्धा नसलेल्यांत समावेश होत असे. असे लोक संख्येने जास्त होते तसेच त्यांच्यात अनेक ज्यू होते.

ही परिस्थिती काळजीपूर्वक हाताळणे जरूर होते. आपले उद्दिष्ट साध्य करण्याइतकी मुहम्मदांची स्थिती मजबूत झाली तेव्हा त्यांनी आपल्या छोट्या राज्यांतील प्रत्येक गटाचे अधिकार व कर्तव्ये ठरवून देणारी एक सनद तयार केली.

या सनदेतील मुख्य कलमे खालीलप्रमाणे होती असे म्हणतात :

"ही सनद पैगंबर मुहम्मदाने तयार केली आहे. यसरीब ( मदिना ) मधील तसेच कुरेशीमधील धर्मश्रद्ध व मुस्लिम, त्यांचे अनुयायी व त्यांच्याशी संबंधित तसेच त्यांच्याबरोबर लढणारे या सर्वांना ही सनद लागू आहे.

हे सर्व मिळून एक 'उम्मा' ( समाज ) आहे.

कुरेशींमधील मुहाजिर हे त्यांच्या पूर्वीच्या ( जमातीय ) शासनपद्धतीखालीच राहतील. ( त्यांच्यातील कोणाही सदस्याला द्यावा लागणारा रक्तदंड इत्यादी ) ते सर्व मिळून देतील. तसेच धर्मश्रद्धांच्या दृष्टीने योग्य व न्याय्य अशा मार्गांनी आपल्यातील बंद्यांची मोबदला देऊन ते मुक्तता करून घेऊ शकतील.

खझराज जमातीचे पाच गट तसेच ऑ जमातीचे तीन गट आपापली जुनी शासन-घटना चालू ठेवू शकतील आणि त्या गटातील प्रत्येक व्यक्तीला पूर्वीप्रमाणे गटाने द्यावयाच्या रकमेतील आपला वाटा द्यावा लागेल. तसेच आपले कैदी सोडवून घेण्याच्या बाबतीत प्रत्येकाला जबाबदारी घ्यावी लागेल.

कर्जाचा बोजा असलेल्या आपल्यातील कोणाही व्यक्तीला धर्मश्रद्धांनी विसरू नये. आपली सोडवणूक करून घेण्यासाठी त्याला त्यांनी मोबदला देण्याच्या किंवा रक्तदंड देण्यासारख्या योग्य कामी सहाय्य करावे.

एका धर्मश्रद्धा माणसाने दुसऱ्या धर्मश्रद्ध व्यक्तिविरुद्ध तिच्या मौलांशी ( मवालीचे एकवचन ) संगनमत करू नये.

धर्मश्रद्धांविरुद्ध बंड करणाऱ्या किंवा त्यांच्याशी लबाडीने, वैराने अथवा दुष्ट-पणाने वागणाऱ्या कोणाही व्यक्तीला कर्तव्यपरायण धर्मश्रद्धांनी विरोध केला पाहिजे. अशी व्यक्ती त्यांच्यापैकीच एखाद्याचा मुलगा असली तरी त्याचा त्यांनी एकजुटीने विरोध केला पाहिजे.

पाखंडी माणसासाठी कोणाही धर्मश्रद्ध माणसाने दुसऱ्या धर्मश्रद्ध माणसाला मारू नये किंवा एका धर्मश्रद्धाविरुद्ध दुसऱ्या धर्मश्रद्धाने पाखंडी माणसाला सहाय्य करू नये.

(परमेश्वराच्या समाजाचे) संरक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. काही लोकांनी घेतलेली संरक्षणाची जबाबदारी ही (सर्वांची) जबाबदारी समजली पाहिजे. त्याचप्रमाणे (परक्या) लोकांपासून सर्व धर्मश्रद्धांनी एकमेकांना आश्रय दिला पाहिजे.

जो ज्यू आपले अनुयायित्व पत्करील त्याला त्यांनी सहाय्य व आधार दिला पाहिजे. अशा (ज्यूवर) अन्याय करता कामा नये किंवा त्यांच्यावर अन्याय करणाऱ्यांना सहाय्य करता कामा नये.

धर्मश्रद्धांनी केलेला शांतता करार एकच एक व सामुहिक असावा. ईश्वराच्या कामगिरीवर असताना केलेल्या कोणत्याही लढाईत कोणीही धर्मश्रद्धाने इतर धर्मश्रद्धांना सोडून स्वतंत्रपणे शांततेचा करार करू नये. सर्वांना समान अटी घातल्या जाव्यात. आपल्या-बरोबर छाप्यामध्ये आलेल्यांना (ज्यांच्यापाशी घोडे नसतील) प्रत्येक छापामार दलाने आपल्या घोड्यावर बसू द्यावे. परमेश्वराच्या कामगिरीवर असताना सांडलेल्या रक्ताचा बदला घेण्याच्या बाबतीत सर्व धर्मश्रद्ध सामुहिकपणे जबाबदार असतील.

अत्युत्तम व अतिशय अचुक मार्गाचेच कर्तव्यनिष्ठ धर्मश्रद्धांनी अनुसरण करावे. कोणाही मुस्लिमेतर व्यक्तीला, कोणाही कुरेशीला (म्हणजे खुद्द पैगंबरांचे जमातबांधव. ते तोपर्यंत इस्लामधर्मात आले नव्हते.) किंवा त्याच्या मालमत्तेला संरक्षण देण्याचा (कोणालाही) अधिकार नाही. किंवा धर्मश्रद्धाविरुद्ध कुरेशींची बाजू घेता येणार नाही.

एखाद्याने एखाद्या धर्मश्रद्ध माणसाचा खून करून त्याचा प्राण घेतला आणि तसे सिद्ध झाले तर हत्येचा बदला हत्या करून घेता येईल. मात्र ठार मारण्यात आलेल्या व्यक्तीचा निकटतम नातलग फक्त रक्तदंडावर संतुष्ट असेल तर हत्येने बदला घेता येणार नाही. खुनी इसमाला सर्व धर्मश्रद्धांनी विरोध केला पाहिजे. त्याला विरोध करण्या-शिवाय त्यांना अन्य मार्ग नाही.

या सनदेत समाविष्ट असलेल्या गोष्टी बरोबर आहेत असा ज्या धर्मश्रद्ध व्यक्तीचा विश्वास आहे आणि जिचा ईश्वरावर व अंतिम दिवसावर (कयामत) विश्वास आहे तिने कोणाही बदनाम इसमाला आधार व आश्रय देऊ नये. जो अशाप्रकारे आधार व आश्रय देईल तो ईश्वरी शापाचा धनी होईल; पुनरुत्थानाच्या दिवशी ईश्वरी कोप ओढवून घेईल आणि त्यावेळी त्याच्याकडून कोणताही दंड अथवा भरपाई स्वीकारली जाणार नाही.

एखाद्या गोष्टीसंबंधी तंटा असेल तर तुम्ही ईश्वराचा आणि मुहम्मदाचा आधार घ्यावा.

धर्मश्रद्धांशी केलेल्या युद्धाची नुकसानभरपाई ज्यूंनी दिली पाहिजे.

बानु औफचे ज्यू ( आणि इतर जमाती ) एक समाज या नात्याने ( ज्यू व मुस्लिम आपापल्या धर्मात राहूनही ) धर्मश्रद्धांबरोबर नांदू शकतील. त्यांना आपल्या आश्रितांसह राहता येईल. मात्र ज्या ' आश्रिता 'ने एखादे अन्याय्य कृत्य किंवा अपराध केलेला आहे अशाला वगळण्यात आले पाहिजे. त्याच्या कृत्याचा उपसर्ग तो स्वतः आणि त्याचे घरदार याशिवाय दुसऱ्या कोणाला पोचता कामा नये.

ज्यूंच्या मित्रांचा दर्जा ज्यूंप्रमाणेच राहील.

मुहम्मदांच्या संमतीशिवाय त्यांच्यापैकी कोणीही युद्धात भाग घेऊ नये. आपणाला झालेल्या इजेबद्दल कोणीही बदला घेत असेल तर त्याला अडविले जाणार नाही. कोणताही अन्याय झाला नसताना जो दुसऱ्यावर हल्ला करील त्याचे परिणाम त्याला स्वतःला व त्याच्या कुटुंबियांना भोगावे लागतील. अशा बाबतीत ज्याचे कृत्य समर्थनीय असेल त्याच्यावर ईश्वराची नजर असेल.[1]

स्वतः सोडून कोणीही माणूस ( दुसऱ्याकरिता ) काहीही मिळवीत नसतो. या दस्तऐवजात जे योग्य व पवित्र आहे त्यावर अल्लाहची देखरेख आहे. या सनदेचा पापी व दुष्कर्म करणाऱ्याला उपयोग होणार नाही. जो सरळ मार्गाने जाईल तो सुरक्षित राहील. जे पाप व दुष्कर्म करतील, त्यांच्याव्यतिरिक्त जो घरात राहील त्याला मदिनेत धोका नाही. अल्लाह हा निष्पाप व ईश्वरभीरू माणसाचा संरक्षक आहे आणि मुहम्मद हा अल्लाचा प्रेषित आहे. "

त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही जमातीची शासनव्यवस्था पैगंबरांना नष्ट करावयाची नव्हती, तर विशाल इस्लामी समाजाच्या दृष्टीने ती जास्तीत जास्त अनुरूप व्हावी यासाठी पैगंबरांना फक्त तिची व्याप्ती वाढवावयाची होती; तिच्यात सुधारणा करावयाच्या होत्या हे या सनदेवरून स्पष्ट होते. या सनदेत इस्लामी राज्यसत्तेची बीजे सापडतात. अर्थात त्या सत्तेला राज्यसत्ता म्हणता येणे शक्य आहे की नाही हा प्रश्नच आहे. कारण या सत्तेची रचना अतिशय प्रासंगिक स्वरूपाची आहे आणि त्यातील शासनाची कार्ये पार पाडणारी यंत्रणा अत्यंत अपूर्ण व प्राथमिक अवस्थेत ठेवली गेली आहे. शासनाच्या कार्यांपैकी कायदेकानू करण्याच्या कार्याविषयीचीच काय ती योग्य तरतूद करण्यात आली आहे. आणि ती सुद्धा स्वतः मुहम्मद जिवंत असेपर्यंतच्या काळापुरती. त्यातही पुन्हा आवश्यक असेल तेव्हा समाजाला मार्गदर्शन करण्याच्या कामी पैगंबरांच्या पाठीशी अल्लाह उभा आहेच. न्यायदान व कारभार यांसारख्या राज्य-सत्तेच्या अन्य जबाबदाऱ्यांचा विचार करता विभिन्न जमातींत तत्संबंधी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या यंत्रणेपेक्षा जास्त चांगली यंत्रणा सनदेत सांगितलेली नाही. जुन्या जमात नेत्यांची जमात–अंतर्गत सत्ता काही अंशी तशीच कायम ठेवण्यात आली आहे. कुटुंबांतील सदस्यांनी केलेल्या अपराधाबद्दल कुटुंबाने दंड दिला पाहिजे आणि आपल्या

१. मूळ सनदेत याविषयी पुरेशी स्पष्टता नाही.

नातलग कैद्यांची मुक्तता कुटुंबानेच मोबदला देऊन केली पाहिजे या जुन्या नियमांद्वारेच कुटुंबात शांतता व व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली आहे. मात्र एक महत्त्वाची भर घालण्यात आली. ती अशी की, एका जमातीला दुसऱ्या जमातीविरुद्ध जेव्हा अन्यायाचा बदला घ्यावयाचा असेल तेव्हा त्या जमातीनेदेखील आपल्यापैकी ज्या व्यक्तीने दुसऱ्या जमातीपैकी एखाद्याचा अपराध केला असेल त्यालाही तिने सजेसाठी उभे केले पाहिजे.

बाह्यतः पाहता मुस्लिम जीवनावर तत्काल परिणाम करील असा फारच थोडा बदल पैगंबरांच्या सनदेमुळे घडून आला. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. खुद्द त्या सनदेवरूनच ते स्पष्ट होते. या सनदेमुळे एक फार मोठा बदल घडून आला होता. तो असा की, मुस्लिम समाजाने कसे वागावे व काय करावे हे ठरविण्याची अंतिम सत्ता पुढील काळात जमात प्रमुखांच्या हातात किंवा जमातीच्या सामुहिक मतावर अवलंबून राहणार नव्हती, तर ती सत्ता मुहम्मदांच्या आणि त्याहीपेक्षा अल्लाहच्या हाती जाणार होती. त्या वेळेपर्यंत सर्वांवर हुकूमत असलेली अशी एक शक्ती आहे ही कल्पना अरबांना परिचयाची नव्हती. ही कल्पना या सनदेद्वारे प्रथमच पुढे आली. इस्लामी समाजाच्या घटक असलेल्या व्यक्तींना आपल्या पुरातन स्वातंत्र्याचा बराच मोठा अंश सोडावयास लावण्यात आले होते. आपल्या प्रमुखाची अनिर्बंधपणे निवड करण्याच्या स्वातंत्र्याचा त्याग करून ईश्वरी सत्तेला शरण जाण्यास लावले होते. ज्याच्यातील सर्व शासनसत्ता अल्लाहच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या हाती आहे असा एक धर्माधिष्ठित समाज, ' परमेश्वरी समाज ', असे स्वरूप आता अरब समाजाला प्राप्त झाले. या समाजात धर्माचे पीठ व राजसत्ता असा भेद संभवत नव्हता. ' उम्मा ' म्हणजे ' समाज ' यामध्ये या दोन्ही गोष्टी समाविष्ट आहेत आणि त्यापैकी एकाची जी उद्दिष्टे तीच दुसऱ्याचीही उद्दिष्टे होत. तसेच पैगंबर ज्या ईश्वरीय पदावर आहे त्याद्वारेच पैगंबरांना आपल्या हातातील शासकीय सत्ता प्राप्त झालेली आहे, अन्य कशाहीपासून नाही[1] असे मानले गेले.

धार्मिक व शासकीय या उभय सत्ता कशाप्रकारे एकत्र गुंफलेल्या होत्या याची कल्पना खलिफा उमर याने बसराचा सुभेदार अबु मुसा अल् अशारी याला पाठविलेल्या एका कथित पत्रावरुन येते. त्या पत्रात म्हटले आहे : " जनतेचे सत्ताधीश जनतेचे तिटकारा करीत असतात; पण अल्लाहला मी विश्वासाने सांगतो की तुम्हाला व मला या गोष्टीची अभावितपणे किंवा कळत न कळत बाधा झालेली नाही. किंवा ( जनतेच्या मनात ) आपल्याविषयीही तिरस्कारभावना नाही. दिवसातून एक तास का होईना, आपल्या कायद्यांची अंमलबजावणी होईल याकडे लक्ष द्या. तुमच्यासमोर एक पवित्र

---

१. खरे तर यात नवीन असे काहीच नव्हते. पुरातन इस्रायली समाज हा अशाच प्रकारचा एक समाज होता. आणि रोमन न्यायशास्त्रांमध्ये ius sacrum हे isus publicum चाच एक भाग होते तर सम्राट हा ' सर्वोच्च धर्मगुरू ' मानला जात असे.

पारलौकिक ( ईश्वरीय ) व दुसरी लौकिक अशा दोन बाबी उभ्या राहिल्या तर तुम्ही ईश्वरीय बाबीची निवड करावी. कारण हे जग नष्ट होणार असून परलोकच शिल्लक राहणार आहे. अपराध्यांना दहशत बसवा आणि त्यांचे अवयव तोडून त्यांचे ढीग रचा. आजारी मुस्लिमांना भेटायला जा; त्यांच्या अंत्यसंस्कारांना हजर रहा; मुस्लिमांसाठी तुमचा दरवाजा खुला असू दे आणि त्यांच्या अडचणींकडे स्वतः लक्ष द्या. तुमच्यावर ईश्वराने अतिशय मोठी जबाबदारी टाकली आहे, एवढाच फरक, एरवी तुम्ही त्यांच्यातलेच एक आहात."

पैगंबरप्रणीत नव्या व्यवस्थेच्या इहलौकिक व पारलौकिक या दोन्ही बाजूंमध्ये जवळचे नाते होते. तरीदेखील ज्यांना नागरी किंवा शासनविषयक कायदेकानू म्हणता येईल असे कायदेकानू कुराणात जवळपास नाहीतच. अशा प्रकारच्या कायदेकानूंशी निकटचे साम्य असलेले असे जे काही थोडे कुराणात आहे असे म्हणता येईल, ते म्हणजे, इस्लामनिष्ठ व्यक्तीला परमेश्वराच्या, त्याच्या धर्मदूताच्या "तसेच तुमच्यापैकी अधिकारी पुरुषांच्या" आज्ञा पाळण्याचा दिलेला[1] आदेश. भाष्यकारांचे, विशेषतः बैदावी याचे असे मत आहे की, ज्या अधिकारी पुरुषांचा कुराणात उल्लेख आहे ते म्हणजे खुद्द मुहम्मदकालीन प्रमुख श्रेष्ठपदस्थ मुस्लिम व्यक्ती होत. अशा व्यक्तींमध्ये खलिफा, काझी, सेनापती आणि कायदेपंडित या मंडळींचा समावेश होतो. तथापि दुसरे असेही एक मत आहे की, "अधिकारी पुरुषां"संबंधीचे कुराणातील हे वचन हा त्यावेळी मोहिमेवर निघालेल्या एका विशिष्ट सेनापतीच्या सैन्याला केलेला केवळ उपदेश आहे.

वस्तुस्थिती अशी दिसते की, स्वतः मुहम्मदांनी किंवा त्यांच्या जवळच्या लोकांनी मुहम्मदांच्या मृत्युच्या संभाव्यतेची कधी कल्पनाच केली नसल्यामुळे समाजाची शासनव्यवस्था पुढेही चालू राहावी यासाठी काहीच तरतूद केली नव्हती. तसेच जी व्यक्ती ( इस्लामी ) राज्याची प्रमुख आणि समाजाची आध्यात्मिक मार्गदर्शक होती तिचा उत्तराधिकारीही नेमण्यात आला नव्हता. शिवाय स्वतः मुहम्मदांनीच आपण ईश्वराचे भूतलावरील साक्षात आणि एकमेव प्रतिनिधी, तसेच अखेरचे प्रेषित आहोत आणि आपला कोणीही वारस नाही असे जाहीर केले[2] होते.

त्यामुळे मुहम्मद हे अखेर मर्त्य मानव आहेत हे ज्यावेळी स्पष्ट झाले तेव्हा इस्लामी समाजात प्रचंड गोंधळ माजला, त्रेधा उडाली. पुढे उपस्थित झालेला खिलाफतीचा प्रश्न नीट समजण्याच्या दृष्टीने या संदर्भात थोडासा इतिहास सांगितला पाहिजे. व्यावहारिक बुद्धीने 'साक्षात् दैवी मार्गदर्शना'ची जागा घेतली आणि अल्-खताब याचा मुलगा व पैगंबरांच्या कुरेशी जमातीमधील सर्वात प्रमुख व्यक्तीने, उमरने

१. कुराण ४६२.
२. कुराण ३३४०.

अबु बकर याच्या तळहातावर आपल्या तळहाताने टाळी 'बाया' दिली तेव्हा इस्लामी समाजाच्या नेतृत्वासंबंधीच्या अडचणींची सोडवणूक झाली. एखादा करार किंवा सौदा ठरल्याची 'बाया' ही एक प्रचलित खूण होती. पुढे सार्वभौम अधिकारास मान्यता असल्याचेही ते चिन्ह मानले जाऊ लागले[१].

अबु बकर हा पैगंबरांच्या अनुयायांपैकी ज्येष्ठ अनुयायी आणि शिवाय त्यांचा श्वसुर होता. 'परंपरा'गत कथनानुसार मृत्युशय्येवर असताना पैगंबरांनी प्रार्थनेच्या वेळी इमाम म्हणून अबु बकर याने समाजाचे नेतृत्व करावे असे त्याला सांगितले होते. त्यामुळे किमान इहलौकिक बाबतींतील पैगंबरांचा 'प्रतिनिधी' म्हणून तरी 'खलिफा' पदावर ज्याचा काही अंशी अधिकार होता अशी अबु बकर ही एक व्यक्ती होती. धर्मनिष्ठांच्या प्रार्थनेच्या प्रसंगी इमाम म्हणून काम करण्यासारखी काही धार्मिक कर्तव्ये खलिफा या नात्याने करण्याचा अधिकार अबु बकर याला मिळाला, परंतु धार्मिकदृष्ट्या अत्यंत आदरणीय अशी एक व्यक्ती असे पद मुस्लिम समाजाने त्याला दिले नव्हते. कारण इस्लामने कधीही विशिष्ट धार्मिक कर्तव्ये करणाऱ्या व्यक्तींना असे पद दिलेले नाही. तसेच इस्लाममध्ये धर्मगुरूंचा अथवा उच्चनीचपदस्थ अशा धर्माधिकाऱ्यांचा वर्ग अस्तित्वात नाही. त्यामुळे ख्रिश्चनधर्मात पोपला असलेले स्थान इस्लाममध्ये खलिफाला नाही. आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. इमाम म्हणून काम करीत असल्यामुळे किंवा पैगंबरांशी नातेसंबंध होते म्हणून अथवा दुसऱ्या एखाद्या विशिष्ट 'अधिकारा'मुळे अबु बकर खलिफा बनला असे मुळीच नव्हते. खरे तर उमरच्या या निर्णयामुळे सर्वच दृष्टींनी अबु बकर समाजावर लादला गेला होता. त्याच्या बदल्यात अबु बकरने मृत्युसमयी उमरची खलिफापदावर नियुक्ती केली. तसेच त्याला 'धर्मश्रद्धांचे सेनापती' पदही मिळाले. उमर त्या अधिकारपदावर कोणत्या पद्धतीने चढला याविषयी कोणी प्रश्नही उपस्थित केला नाही. स्वतःचा उत्तराधिकारी म्हणून अबु बकरने ज्याची निवड केली त्यानेच (उमरने) खलिफापद नाकारले तेव्हा त्याने आपला उत्तराधिकारी निवडण्याकरता सहाजणांचे एक मंडळ नियुक्त केले. या मंडळाने मुहम्मदांचा एक जावई व उमाय्यदवंशीय उस्मान इब्ने आफ्फान याची निवड केली. त्याच्या निवडीमुळे पैगंबरांच्या दुसऱ्या एका जावयाची अलीची उपेक्षा झाली होती. शिवाय अली हा नात्याने पैगंबराचा चुलतभाऊ होता : आणि त्यामुळे इतरांपेक्षा आपणालाच खलिफा होण्याचा प्रथम अधिकार आहे असे त्याचे म्हणणे होते. यातून कलहाची बीजे पेरली गेली आणि अगदी वरपासन खालपर्यंत इस्लामी समाजात फूट पडली.

उस्मानच्या खलिफापदावरील निवडीचे परिणाम त्याच्या अमदानीच्या उत्तरार्धात

---

१. नव्या माणसाला इस्लाममध्ये घेतेवेळी पैगंबर नेहेमी हा विधी–'बाया' किंवा 'मुयाबा' करीत असत. कुराण ९[११२].

दिसू लागले. याचे कारण उस्मानची कधी कमकुवत, तर कधी कठोर वागणूक. त्यामुळे त्याचे बहुसंख्य प्रजाजन, विशेषतः इजिप्त व इराकमधील लोक, त्याच्याशी शत्रुत्व करू लागले होते. हा असंतोष अलीभोवती मूर्तस्वरूपात संघटित झाला आणि अखेर उस्मानचा वध होऊन अलीची खलिफा म्हणून निवड करण्यात आली. तथापि उस्मानचे उमाय्यद घराणे बलिष्ठ होते. सीरियाचा सुभेदार मुआविया हा त्या घराण्यातील होता. आपल्या नातलग राजाच्या मृत्यूला मदिनाचा खलिफा अली हाच जबाबदार आहे अशी त्याची धारणा झाली. आणि म्हणून अलीला आव्हान देऊन सीरियामध्ये मुआविया स्वतंत्रपणे सत्ता चालवीत होता. संधी मिळताच प्रथम त्याने "धर्मनिष्ठांचे खरे सेनापती आपणच आहोत" असे घोषित केले. परिणामी अलीच्या मृत्युपावेतो एक दमास्कसचा व दुसरा मदिनाचा असे दोन खलिफा अस्तित्वात होते.

अलीला मुख्यतः मदिनेमध्ये पाठिंबा होता. परंतु नंतर तो मदिना सोडून युफ्रेतिस नदीकाठच्या कुफा या शहरात गेला. इराकचे सीरियाशी वैर होते. त्याचा फायदा घेऊन आपल्या प्रतिस्पर्ध्याचा ( किंवा अलीच्या मताप्रमाणे आपल्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अशा एका बंडखोराचा ) आपण पराभव करू शकू अशी अलीला आशा होती. खूप प्रचार चालू होता. यहुदी धर्म सोडून नुकताच इस्लाम धर्म स्वीकारलेला कोणी अब्दल्ला इब्ने साबा नावाचा एक इसम उस्मानच्या अमदानींतच अलीच्या बाजूने सर्वत्र प्रचार करीत होता. त्याचे म्हणणे असे की, आतापर्यंत एकूण एक हजार प्रेषित होऊन गेले, त्यांपैकी प्रत्येकाचा एक 'वासी' किंवा कार्याधिकारी होता. अली हा अंतिम प्रेषित मुहम्मद याचा 'वासी' होय. आणि परमेश्वराच्या धर्मदूताच्या कार्याधिकारीपदावर असलेल्या व्यक्तीला बाजूला सारून इस्लामी समाजाची सत्ता बळकावण्याहून अनैतिक असे दुसरे कोणतेही कृत्य नाही. या प्रचाराचा अपेक्षित तो परिणाम झाला. विशेषतः मनाने अद्याप इराणी असलेल्या आणि अनुवंशिकतेच्या सर्वच सिद्धान्तांकडे अनुकूल कल असलेल्या इराकवर या प्रचाराचा परिणाम झाला. शेवटी अलीला 'खारीजी' ( किंवा 'विभक्त झालेले' ) नावाच्या एका माथेफिरू धार्मिक गटाच्या हातून मृत्यू आला. हे 'खारीजी', अली किंवा मुआविया यांपैकी कोणालाच मानीत नव्हते. या दोघांनीही अनाधिकाराने अधिकारपद बळाकविले आहे असे त्यांचे मत होते. कारण यापैकी कोणालाच अरब प्रथेस अभिप्रेत असलेल्या स्वतंत्र निवडीच्या तत्त्वानुसार इस्लामचे नेतेपद मिळालेले नव्हते. लोकशाही प्रवृत्तीच्या या अरबांना मक्केच्या वरिष्ठ वर्गातील घराण्या-घराण्यांमधील रक्तलांछित हेवेदावे आणि मदिना येथील सत्ताधारी वर्गाचे उच्चनीच अधिकारपदासंबंधींचे दावे या दोन्हींसंबंधी घृणा होती. खरे तर जोवर ईश्वरीय कायद्याचे पालन होत आहे तोवर कोणाही इमामाची अथवा इस्लामी राज्यप्रमुखाची आवश्यकता आहे ही गोष्टच ते मानायला तयार नव्हते. तसेच त्यांचे असेही मत होते की या दोन प्रतिस्पर्ध्यांपैकी कोणाचाही विजय हा ऐहिकतेचा इस्लाम धर्मावरील विजय होय. म्हणून त्यांनी दोघांनाही ठार मारण्याचा निश्चय केला. मुआवियावर त्यांनी केलेल्या हल्ल्यातून तो वाचला, पण

अली मात्र त्यांनी केलेल्या हल्ल्यांतील जखमांमुळे मरण पावला. अलीचा मुलगा हसन याला मदिनाचा खलिफा म्हणून मान्यता देण्यात आली. तथापि आपल्यावर मुआविया स्वारी करून येत आहे असे कळताच हसनने मुआवियासाठी आपल्या पदाचा त्याग केला.

खलिफापदावर कोण बसू शकतो या गोष्टीचा उमाय्यद टोळीचा प्रमुख असलेला मुआविया कोणत्या दृष्टीने विचार करीत होता त्याची कल्पना पुढील आख्यायिकेवरून येऊ शकते.

मुआवियाचा पणजा हाशिम याचे पैगंबरांप्रमाणेच वंशज असलेले हाशिमी यांना भेटून विनंती करण्यासाठी एकदा मुआविया त्यांच्याकडे गेला. त्याने त्यांना विचारले की, " इतर कुरेशींऐवजी तुम्हालाच एक वारसाप्राप्त हक्क म्हणून खलिफापद मिळाले पाहिजे हा दावा तुम्ही कशाच्या आधारे करीत आहात हे तुम्ही मला समजून सांगाल काय ? सर्व इस्लाम-धर्मीयांनी व्यापक एकमताने तुम्हाला मान्यता दिली आहे; तुमची निवड केली आहे हे एक कारण असू शकते, किंवा तुमचे पैगंबरांशी नातेसंबंध होते हे दुसरे कारण असू शकते किंवा ही दोन्हीही कारणे एकाच वेळी असू शकतात. तुम्ही तुमचा दावा इस्लामधर्मीयांच्या सार्वत्रिक मान्यतेच्या आधारे करीत असाल तर तुमचे पैगंबरांशी नाते आहे ही बाब तुमच्या हक्काला कोणत्याही प्रकारे मजबूती देते असे नाही. पैगंबरांशी असलेल्या तुमच्या नात्यामुळे तुम्ही दावा करीत असाल तर मग पैगंबरांचा चुलता अब्बास याने खलिफा होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली तर त्याला मुळीच प्रतिबंध होऊ शकत नाही. शिवाय हा माणूस ( अब्बास ) पैगंबरांचा वारस आहे. त्याने यात्रेकरूंना पाणी दिले आहे, अनाथ मुलांना आधार दिला आहे. आणि इस्लामधर्मीयांची सार्वत्रिक मान्यता, त्यांचे व्यापक एकमत आणि पैगंबरांशी नाते या तिन्ही अटी पुऱ्या होणे खलिफापदासाठी आवश्यक आहे असे मानले तरी यापैकी शेवटची अट ही इमामपदासाठी अथवा खलिफापदासाठी जरूर असलेल्या पात्रतेच्या अटींपैकी फक्त एक अट आहे. तुम्ही हाशिमी, यांपैकी केवळ शेवटच्या पात्रतेच्या जोरावर खलिफापदाचा हक्क सांगत आहात. परंतु या उलट खलिफापदावर ज्याचा सर्वांत अधिक हक्क आहे असा कुरेशी जमाती-पैकी मीच आहे. कारण दोन्ही हात पसरून सर्वांनी मला मान्यता दिली आहे. मोठ्या आशेने ते माझ्याकडे आले आहेत, आणि आपल्या आशा पुऱ्या होतील असा त्यांना विश्वास आहे." अशाप्रकारे आणखी अनेक प्रकारे युक्तिवाद करून मुआवियाने अखेर हाशिमींना सांगितले, " इतर समाजाला तुमच्यामध्ये जी गोष्ट आहे असे वाटत नाही अशी कोणतीही गोष्ट आपल्यात आहे असे तुम्ही समजावे यात तुमचे हित नाही. "

तथापि इस्लामचा प्रमुख म्हणून आपले आसन बिनधोक होताच मुआवियाला आरल्या लोकशाहीवादी मतांचा विसर पडला आणि आपल्याच कुटुंबात खलिफापद कायम ठेवण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्यात निर्माण झाली. मुआवियाच्या म्हणण्याप्रमाणे " मेंढपाळाशिवाय मेंढरांना सोडावे तसे मुहम्मदांच्या समाजाला " सोडावे लागेल या

भयाने त्याने आपला मुलगा याझीद याची आपला 'वली-अल् अहद' ("करारानुसार वारस" म्हणजेच निर्विवाद भावी उत्तराधिकारी) म्हणून नियुक्ती केली. वरील उद्गार मुआवियाने खलिफा उमरचा मुलगा अबद्-अल्लाह याच्यापाशी काढले होते. याला उत्तर म्हणून अबद्-अल्लाहच्या तोंडी पुढील शब्द घालण्यात आले आहेत : "तुमच्या मृत्युनंतर समाज ठरवील त्याला मी संमती देईन. परंतु आता तुम्ही सिंहासनावर आलात तर मी येऊन तुम्हाला माझी निष्ठा देईन आणि अल्लाहच्या शपथ सांगतो, तुम्ही मरण पावल्यावर सर्व समाजाने एकमताने ॲबिसीनीयातील एखाद्या (काळ्या) निग्रोला तुमचा (उत्तराधिकारी) केले तरी मी समाजाचा तो निर्णय मान्य करीन."

स्वतंत्र प्रवृत्तीच्या अरबांचा मुआवियाच्या या दंडेलीला विरोध होणे अपरिहार्य होते. याझीदला प्रतिस्पर्धी म्हणून जवळपास लगेच दोन व्यक्ती पुढे आल्या. एक : हिजाजचा अब्द अल्लाह इब्ने झुबैर ( याझिदच्याच घराण्यातील एक ज्येष्ठ कुटुंबीय) आणि दुसरा इराकमधील कुफाचा हुसेन (मुहम्मदांची मुलगी फातिमा हिच्याशी झालेल्या विवाहातून जन्मलेला अलीचा मुलगा.) इब्ने झुबैरने अतिशय चाणाक्षपणे याझीदविरुद्ध तरुण हुसेनला बंड करण्यास चिथावणी दिली. आणि याझीदकडून हुसेनने केलेला दुर्बल उठाव मोडला जाऊन करबला येथे हुसेन मारला जाईपर्यंत इब्ने झुबैर वाट पाहात राहिला. त्यानंतर लवकरच दमास्कस येथील उमाय्यदवंशीय खलिफा मुआविया हा आपला खलिफा नसून इब्ने झुबैर हाच खलिफा आहे असे इब्ने झुबैयरच्या मदिना येथील भक्तगणांनी जाहीर केले. ही मंडळी दमास्कसच्या उमाय्यद खलिफाचा, एक नास्तिक व धार्मिक बाबतीत स्वैराचारी व्यक्ती म्हणून तिरस्कार करीत.

पूर्वी पैगंबरांचा जावई अली याने खलिफापदावर हक्क सांगितला होता, आणि तो नाकारण्यात आला होता. आता अलीचा मुलगा हुसेन याचा करबला येथील लढाईत वध झाला. या दोन्ही गोष्टी एकत्र जोडल्या गेल्या आणि परिणामी कायदेशीर वारसाचा आग्रह धरणाऱ्या एका गटाची त्यातून स्थापना झाली. पैगंबरांचे थेट वंशज असलेल्या व्यक्तींनाच फक्त पैगंबरांचे उत्तराधिकारी होण्याचा अधिकार आहे असे या गटाचे मत होते.[१] 'शिया' म्हणजे (अलीचे) 'पक्षपाती' पंथाचा जन्म असा झाला. या आधी सांगितल्याप्रमाणे याची दुसरी अशी एक परिणती झाली की, इस्लामी धर्मामध्ये काही काळ दोन प्रतिस्पर्धी खलिफा काम करू लागले. एक सीरियाचा पाठिंबा असलेला उमाय्यदवंशीय खलिफा आणि दुसरा हिझाझ व इजिप्तचे समर्थन असलेला इब्ने झुबैर हा खलिफा. कालांतराने विकसित झालेल्या खिलाफतीच्या एका सिद्धान्ताच्या दृष्टीने ही घटना महत्त्वाची आहे.

---

१. म्हणजे पैगंबरांचा चुलतभाऊ अली हा पैगंबरांची मुलगी फातिमा हिचा पती या नात्याने उत्तराधिकारी होता.

आपल्या तरुण मुलाला (दुसरा मुआविया) आपल्या खिलाफतीचा उत्तराधिकारी करण्याच्या बाबतीत सीरियातील उमाय्यद खलिफा याझीद याला उमाय्यद सेनेचा पाठिंबा मिळविण्यात यश आले. परंतु हा तरुण मुलगा प्रकृतीने दुर्बल होता. तो फार काळ जगला नाही. त्याच्यामागून त्याच्या धाकट्या भावाच्या वतीने खिलाफतीवर हक्क सांगण्यात आला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही आणि पहिल्या मुआवियाचा भाऊ आणि उमाय्यद वंशाचा संस्थापक पहिला मारवान हा खलिफापदावर आला. आनुवंशिक अधिकाराचा दावा सांगणाऱ्या एखाद्या व्यक्तीला खिलाफतीवर बसविण्यापेक्षा त्या पदावर एखादी मजबूत व्यक्ती आली पाहिजे अशा मताच्या दमास्कस येथील एका गटाने वास्तविक मारवानला सत्तेवर चढविले होते. परंतु स्वतः मारवानने मात्र अब्द अल् मलिक या आपल्या मुलाचीच आपला भावी उत्तराधिकारी म्हणून निवड केली. अब्द-अल मालिक याला सतत नऊ वर्षांच्या संघर्षानंतर (त्याचा प्रतिस्पर्धी खलिफा) इब्ने झुबैरचा व त्याच्या सत्तेचा शेवट करण्यात यश आले. आणि त्यानंतर तोच इस्लामचा एकमेव खलिफा बनला. आपल्या बापाप्रमाणे अब्द अल् मलिकनेदेखील आपल्यामागून आपल्या भावाऐवजी आपल्या मुलाला खलिफापद दिले. वास्तविक भावाची आधी त्या पदावर नियुक्तीही झाली होती. परंतु अब्द अल् मलिकने खलिफापदावर भावी उत्तराधिकारी असलेल्या आपल्या भावाला बाजूला सारून आपल्या दोन मुलांनी एकामागून एक अशा रीतीने खलिफापदावर यावे असे ठरविले. त्या दोन मुलांच्या सुदैवाने अब्द अल् मलिकचा खरा उत्तराधिकारी असलेला भाऊ खलिफापदावर येण्यापूर्वीच मरण पावला.

अब्द अल् मलिकच्या दोन मुलांच्या नेमणुकीची सूचना प्रांतांच्या सुभेदारांकडे पाठविण्यात आली. अरबांतील लोकसत्ताक जमातीय प्रथेचा उमाय्यदांवर किती प्रभाव होता याचे हे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे. खलिफापदाबाबत केलेल्या व्यवस्थेशी आपण एकनिष्ठ राहू अशी अभिवचने बहुतेक प्रत्येक ठिकाणच्या सुभेदारांनी दिली. याला फक्त मदिनाचा अपवाद होता. तेथील सैद इब्ने अल् मुसायब याने भावी खलिफा म्हणून आपण या दोन राजपुत्रांना मान्यता देणार नाही, असे जाहीर केले. सैद इब्ने अल् मुसायबच्या विरोधाची विभिन्न कारणे इतिहासकार सांगतात. (१) सर्व समाजबांधवांना एकत्र जमवून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नव्हते किंवा (२) नियुक्ती झालेल्या व्यक्तींना त्याने स्वतः पाहिले नव्हते. किंवा (३) खलिफा अब्द अल् मलिक जिवंत असेपर्यंत दुसऱ्या कोणालाच तो मान्यता द्यावयास तयार नव्हता.

अब्द अल् मलिकमागून त्याचेच चार मुलगे खलिफापदावर आले. मात्र त्याच्या पहिल्या दोन आणि दुसऱ्या दोन मुलांच्या कारकीर्दीच्या मध्यंतरीच्या काळात त्याचा चुलतभाऊ दुसरा उमर हा काही काळ खलिफा होता. उमाय्यदांनंतर खलिफापदावर आलेल्या अब्बासीवंशीयांनी आपल्या भावांऐवजी आपल्या मुलांना खलिफापद मिळावे या हेतूने बहुधा आपल्या उत्तराधिकाऱ्याची अगोदरच नियुक्ती करण्याच्या पद्धतीचा

उपयोग केला. याला काही अपवाद होते. अब्बासी वंशातील पहिला खलिफा अल्-सफाह याला, त्याचा उत्तराधिकारी होऊ शकेल असा कार्यक्षम मुलगा नव्हता. म्हणून त्याने आपल्यामागून आपला भाऊ मन्सूर आणि त्यानंतर आपला चुलतभाऊ इसा इब्ने मुसी यांनी खलिफापद घ्यावे असे ठरवून दिले. त्याप्रमाणे मन्सूर खलिफा झाला. परंतु इसाला खलिफापदावरील आपला हक्क सोडावयास भाग पाडण्यात आले. तथापि भरपाई म्हणून त्याला मोठी रक्कम देण्यात आली. दुसरा अपवाद खलिफा मामुन याचा. त्याने आपला भाऊ मुतासिम याची किंवा दुसऱ्या एका माहितीप्रमाणे मुतासिमचा मुलगा अबु इशाक याची नेमणूक केली.

परंतु भावी उत्तराधिकारी म्हणून ज्या मुलाची नियुक्ती होत असे तोच खलिफा होत असे, असे मात्र नेहमीच घडलेले नाही. कारण आनुवंशिक वारसा अधिकाराचे तत्त्व किंवा ज्येष्ठ मुलाला वारसा मिळावा हे तत्त्व अस्तित्वात नव्हते आणि त्या तत्त्वाला कायद्याची मान्यताही नव्हती. त्यामुळे राजघराण्यातील कोणा तरी सर्वांत बलिष्ठ व्यक्तीकडेच बहुधा खलिफापद जात असे.

इस्लामी इतिहासाच्या तिसऱ्या शतकामध्ये अगोदरच ऱ्हासाप्रत पोचलेले अब्बासीवंशीय खलिफा आपल्या भाडोत्री तुर्की सैन्याच्या सत्तेच्या कह्यात गेले. एका बलदंड वंशाच्या हातचे ते बाहुले बनले. प्रारंभी कास्पियन सागराच्या दक्षिण प्रदेशामधून आलेल्या जुलमी बुवेहिद राजांच्या आणि नंतर सेल्जुकांच्या. आपल्या देहावर-देखील अब्बासी खलिफांचा अधिकार राहिला नाही तर मग आपला उत्तराधिकारी नेमण्याच्या अधिकाराचा प्रश्नच नाही. ‘धर्मनिष्ठांचा सेनापती (खलिफा)’ तुर्की ‘अमीर अल् उमरा’च्या अथवा ‘सरसेनापती’च्या लहरीनुसार निवडला जाऊ लागला किंवा पदभ्रष्ट केला जाऊ लागला. ‘सरसेनापती’ पदावर मात्र सदैव अब्बासी घराण्यातील व्यक्ती निवडली जात असे. उदाहरणार्थ, तुझुन या सेनापतीने खलिफा मुत्ताकी याचे डोळे काढून त्याला खलिफापदावरून काढून टाकले (इ. स. ९४४) आणि त्याच्याजागी मुत्ताकीचा चुलतभाऊ मुस्ताक्फी याला १ लक्ष दिनार लाच घेऊन खलिफापदावर बसविले. एक वर्षानंतर मुस्ताक्फी याचेही डोळे काढण्यात येऊन त्याला त्याच्या अगोदरच्या खलिफाप्रमाणे राजपदाच्या दृष्टीने कुचकामी बनविण्यात आले. बुवेहिद हे शियापंथीय असल्यामुळे त्यांच्या मनात खरे तर अब्बासी खिलाफत नष्टच करावयाची होती. बुवेहिदांच्या मते ही खिलाफत बळजोरीने स्थापन करण्यात आली होती. परंतु अब्बासींना नष्ट केल्यावर त्यांची जागा आलीद वंशाकडे जाणार होती आणि बुवेहिदांना ते नको होते. कारण आपल्या डोक्यावर एखादा आध्यात्मिक स्वामी घेऊन बसणे त्यांच्यासारख्या बेबंद गटाला आपल्या हिताच्या दृष्टीने पसंत नव्हते. कारण असा कोणी स्वामी आला तर तो त्यांचे स्वातंत्र्य नाहीसे करील आणि त्यांना अत्यंत प्रिय असलेली त्यांची सत्ता हिरावून घेईल अशी त्यांना भीती होती. म्हणून खलिफांच्या हाती कोणतेही अधिकार न देता त्यांना पूर्णपणे त्यांनी आपल्या अधीन ठेवले. तरीही मागे

सांगितल्याप्रमाणे कोणाही अब्बासी घराण्याबाहेरील व्यक्तीला खलिफा करण्याचे धाष्टर्य मात्र त्यांनी केले नाही.

खलिफा कादीरची राजवट येताच बुवेहिद सत्तेने अखेरचा श्वास घेतला. बुवेहिदांनीच कादीरला खलिफापदावर बसविले होते. परंतु या खलिफामध्ये आपला अधिकार चालविण्याचे सामर्थ्य व इच्छा शक्ती होती. ज्यांचा खून न होता ज्यांना स्वाभाविक मरण आले अशा मोजक्या खलिफांपैकी तो एक होता. त्याच्या व्यक्तित्वाचे ते एक चिन्ह आहे. प्रत्यक्ष मृत्युशय्येवर असताना त्याने निकटवर्ती बड्या मंडळींना भेटीसाठी बोलाविले. कादीरने आपला पुत्र अल् काईम यालाच आपला वारस निवडावे अशी भेटीला आलेल्यांनी त्याला विनंती केली. त्याने त्यास मान्यता दिली. अल् काईम मागून त्याचा नातु मुक्तादी गादीवर आला, कारण काईमचा मुलगा त्याच्या आधीच मृत्यु पावला होता. मुक्तादीनंतर आणि मंगोलांनी अब्बासी वंश नष्ट करीपर्यंतच्या काळात काही अपवाद वगळता बापामागून त्याचा मुलगा असे राजपदावर येत राहिले.

कार्डोव्हा येथील उमाय्यद राजघराण्यातील पहिल्या सहा पिढ्यांत, म्हणजे पहिला अब्द अल् रहमान ते मुन्धीरपर्यंत, बापाकडून मुलाकडे राजेपद येत राहिले. मुन्धीरमागून मात्र त्याचा भाऊ अब्द अल्लाह गादीवर आला. नंतर पुन्हा चार पिढ्यांपर्यंत बापामागून मुलगा गादीवर बसण्याचा क्रम चालू होता. त्यानंतर पुढील काळात प्रख्यात तिसरा अब्द अल् रहमान याच्याशी वंशाच्या दृष्टीने फारच थोडा संबंध असलेल्या व्यक्ती सत्तेवर आल्या.

ऑटोमन सुलतानांना मिळालेले राजेपद यापेक्षा अधिक पूर्णत्वाने आनुवंशिक पद्धतीचे होते. स्वतःला ते कडवे रूढीप्रिय सुन्नी समजत असले तरी जवळजवळ तीनशे वर्षे उस्मान ( इ. स. १२९९ ) ते तिसरा मुहम्मद ( इ. स. १५९५ ) या सुलतानांची सत्ता बापाकडून मुलाकडे जात राहिली. त्यानंतरच्या काळात सुलतानांच्या मृत्युनंतर त्यांचे भाऊ त्यांच्या मुलांऐवजी सत्तेवर बसत. पुढे दिल्लीच्या तख्तावरील मोंगलवंशाने आपल्या वंशाचा पहिला बादशहा बाबर याच्याच घराण्यात राजेपद राहावे यासाठी कमालीचे प्रयत्न केले.

' रूढीनिष्ठ ' खलिफांच्या व दमास्कस येथील उमाय्यदांच्या काळात नव्या राजाचा राज्यारोहण समारंभ अतिशय साधेपणाने होत असे. त्यानंतरच्या काळात मात्र हा समारंभ मोठ्या थाटामाटाने करण्यात येऊ लागला. खलिफा अल् वालिद इब्ने अब्द अल् मलिक हा खलिफा या नात्याने दमास्कस या राजधानीत सार्वजनिकरित्या प्रथम उपस्थित झाला त्या प्रसंगाचे इतिहासकारांनी थोडक्यात वर्णन केले आहे. आपल्या वडिलांचा दफनविधी संपल्यावर घरी न जाता खलिफा थेट शहरांतील मुख्य मशीदींत गेला. तेथील व्यासपीठावर उभे राहून त्याने प्रार्थनेसाठी जमलेल्या समुदायापुढे पुढील भाषण केले : " आपण सारे ईश्वराच्या हाती आहोत आणि त्याच्याकडेच आपण

आश्रयासाठी जात असतो. आपल्या संकटप्रसंगी तसेच धर्मनिष्ठांच्या सेनापतीच्या मृत्यूच्या वेळी ज्याच्या सहाय्याची आपण अपेक्षा करतो, तोच ईश्वर होय. ईश्वरानेच आम्हाला खिलाफत दिली आहे. त्याची तिच्यावर कृपा रहावी यासाठी त्याची प्रार्थना करा. उठा व माझे आभार माना. " कोणी अब्द अल्लाह अल् साल्ली नावाचा गृहस्थ आभारप्रदर्शनासाठी प्रथम उभा राहिला. त्याने दोन प्रशंसापूर्ण कविता शैलीदार पद्धतीने म्हटल्या आणि तो खाली बसला. त्यानंतर बाकीच्या समुदायाने खलिफाला वंदन केले.

खलिफापदावर खलिफा कसे येत यासंबंधींची इतिहासात आढळणारी त्रोटक माहिती वर दिली आहे. आता इस्लामी कायदेपंडितांनी खिलाफतीसंबंधीचा जो सिद्धान्त विकसित केला त्याचाही परामर्श घेणे जरूर आहे. या बाबतींतील अधिकारी विवेचन म्हणून साधारणपणे मावार्दीच्या लिखाणाचा विचार केला जातो. 'अमीर अल् उमरा' या बुवेहिदाने खलिफांची पूर्णपणे दीन अवस्था करून टाकली होती त्या काळातील बगदाद येथील हा लेखक होता. मावार्दीच्या अल् अहकाम अल् सुलतानिया ( याचा गर्भितार्थ 'राजेपदासंबंधीचे कायदे' असा आहे. ) या ग्रंथात मुस्लिम राज्याची घटना आणि विशेषतः त्याचा प्रमुख, इमाम किंवा खलिफा या बाबींची सुन्नी किंवा 'रूढीवादी' दृष्टिकोनातून चर्चा केलेली आहे.

मावार्दीच्या मताप्रमाणे इमामपदाची किंवा खलिफापदाची नियुक्ती, पैगंबरांच्या पदाचा वारसा चालू रहावा व तसेच धर्माचे रक्षण व्हावे व जगाला योग्य प्रकारचे शासन मिळावे या हेतूने खुद्द ईश्वराने केलेली आहे. इमाम अथवा खलिफापदाच्या आवश्यकतेविषयी शंकाच नाही. परंतु ही आवश्यकता विवेक व कायदा यांना धरून आहे काय याविषयी मतभेद आहे. विवेकालाच जे महत्त्व देतात त्यांचे म्हणणे असे की विवेकशील माणसे राजाच्या सत्तेला स्वभावतःच शरण जात असतात. कारण राजा त्यांना एकमेकांवर अन्याय करू देत नाही. तसेच त्यांच्यातील वादासंबंधी निर्णय देतो. सत्ता चालविणारी अशी व्यक्ती नसेल तर माणसे नेतृत्वहीन बनतील आणि भलतीकडे जातील. एका बदवी कवीने म्हटले आहे, "ज्या लोकांना आपला पुढारी नसतो त्यांची प्रगती होत नाही; आणि त्यांच्यातील हीन लोक जेव्हा त्यांचे नेतृत्व करतात तेव्हा लोकांना कोणी पुढारी आहे असे म्हणता येत नाही."

इमामपद किंवा खिलाफत ही एक कायद्याची ( शार ) आवश्यकता आहे असे जे मानतात त्यांचे म्हणणे असे की, शारच्या अंमलबजावणीची चिंता इमामलाच सर्वा-पेक्षा अधिक असल्याने त्याच्या पदाची आवश्यकता आहे. विवेकशील माणसाची विवेकबुद्धी माणसाला फक्त दुसऱ्यावर जुलूम करू नये, कलह करू नये तसेच न्याय व सलोखा याची शिकवण देत असते. विवेकी माणूस फक्त आपल्या स्वतःपुरताच विचार करीत असतो. इतरांच्या विचारांची तो फारशी दखल घेत नाही. कायद्याच्या अंमलबजा-

वणीचे कार्य व कायद्याने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचे काम ज्याच्यावर परमेश्वराने सोपविले आहे त्याच्याकडून ते होत असते.[1] कुराण म्हणते, "ईश्वराच्या, त्याच्या दूताच्या व तुमच्यावर ज्यांची सत्ता आहे त्यांच्या आज्ञांचे पालन करा." म्हणून माणसांवर ज्यांचा अधिकार चालतो त्यांच्या आज्ञांचे पालन करण्याची सक्ती ईश्वरानेच केलेली आहे. इमाम हेच ते लोक होत. "इमामाची नियुक्ती करणे हे इस्लामी समाजाचे अनिवार्य कर्तव्य होय."

इमाम किंवा खलिफामध्ये अनेक गुण असले पाहिजेत. तो न्यायी असला पाहिजे; कुराणातील कायद्यांचे महत्त्व आणि त्यातून निघणारे अर्थ काय, याचे त्याला ज्ञान असले पाहिजे; त्याची सर्व पंचेंद्रिये अस्तित्वात असली पाहिजेत; शरीराचा प्रत्येक अवयव उत्तम स्थितीत असला पाहिजे; त्याने स्वतंत्र बुद्धीने वागले पाहिजे; तो चांगल्या विचारांचा आणि उच्च धैर्याचा आणि शेवटचे म्हणजे चांगल्या वंशातला म्हणजेच कुरेशी वंशातला असला पाहिजे. या शेवटच्या अटीची चर्चा करताना इतिहासकार व तत्त्वज्ञ इब्ने खाल्दुन याने असे मत व्यक्त केले आहे की, खलिफा हा पैगंबरांच्या घराण्यातीलच असणे आवश्यक आहे असे नाही; पण तो जन्माने कुरेशी असण्याच्या आवश्यकतेला जे कायदेपंडित विरोध करतात त्यांचा युक्तिवाद मात्र पैगंबरांच्या हदिसांच्या चुकीच्या अर्थावर आधारलेला आहे. खलिफांच्या अन्य पात्रतांचे विश्लेषण करताना व विस्तारपूर्वक त्या सांगताना इब्ने खाल्दुन म्हणतो की, ज्ञान, न्यायीपणा व कर्तबगारी या योग्यतांविषयी मतभेद असू शकतील; परंतु शारीरिक व मानसिकदृष्ट्या इमाम वा खलिफा हा सुस्थितीत असला पाहिजे याविषयी चर्चाच होऊ शकत नाही. मन व शरीर पूर्णपणे कामाला लावण्यास ज्या दोषामुळे प्रतिबंध होतो असा कोणताही दोष असलेली व्यक्ती खलिफापदासाठी अपात्र होय. वेड, अंधपणा, बहिरेपणा ही एखाद्या व्यक्तीला इमामपद न देण्याच्या दृष्टीने पुरेशी कारणे आहेत. एखाद्या मुस्लिम किंवा मुस्लिमेतर माणसाच्या कैदेत किंवा वरचढ शक्तीच्या स्वाधीन असणे हीसुद्धा एखाद्या अवयवाचा अभाव असण्याच्या बरोबरीची बाधक गोष्ट आहे. त्यामुळे इमाम आपले कार्य करण्याच्या अधिकारापासून वंचित होऊ शकतो. त्याचप्रमाणे खलिफाला त्याच्याच एखाद्या सेवकाने उघडपणे त्याच्या आज्ञांचा भंग न करता किंवा त्याच्या-विरुद्ध बंड न करता त्याच्यावर आपला वरचष्मा ठेवून त्याला आपल्या आज्ञेत ठेवलेले असेल तर तो खलिफा आपल्या पदाला अपात्र ठरतो. तथापि तपासाअंती अशा प्रकारच्या ( खलिफाच्या ) 'पालका'ची एकूण वागणूक ही कायद्याच्या व इस्लामच्या तत्त्वाला धरून आहे असे आढळून आले तर इमामाला त्याच्या पदावर ठेवता येते. याउलट परिस्थिती असेल तेव्हा खलिफाने गमावलेली सत्ता त्याला परत मिळवून देऊ शकेल अशा व्यक्तीला आपल्या साहाय्यासाठी मुस्लिम समाज आमंत्रित करू शकतो.

---

१. ४६२.

बुवेहिदांनी खिलाफतीचा ताबा घेतला आणि कुरेशी जमातीचे अब्बासी खलिफा शासन चालविण्याच्या बाबतीत फारच दुर्बल ठरले तेव्हा त्यांना खिलाफतीसाठी अपात्र ठरविण्यात आले. तथापि कुरेशींमध्ये एखादा कणखर खलिफा असता तर इस्लामच्या प्रमुखपदासाठी कुरेशीच पात्र ठरविण्यात आला असता हे निश्चित.

खलिफांपासून, कायदेपंडितांच्या व सिद्धान्तप्रविणांच्या काही अपेक्षा होत्या. त्यामुळे खलिफाला खलिफापद कसे मिळावे याबाबतीत केवळ योगायोगावर अवलंबून रहावयास ते तयार नव्हते. निवडणूक हीच योग्य पद्धत आहे असे मावार्दी समजतो. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, जेव्हा इमामची आवश्यकता निर्माण होते तेव्हा इस्लामी समाज आपले दोन गट पाडतो. पहिला गट इस्लामसाठी प्रमुख निवडण्यास जे पात्र आहेत त्यांचा आणि दुसरा ज्या व्यक्तींमधून इस्लामप्रमुखाची निवड करावयाची अशा व्यक्तींचा. खलिफापदास आवश्यक असलेल्या पात्रतांसंबंधी या अगोदर सांगितलेच आहे. आता खलिफाची निवड करणाऱ्यांमध्ये कोणत्या गोष्टी असणे आवश्यक मानले होते याचा विचार करावयाचा आहे. त्यासाठी त्यांच्यामध्ये तीन गुण असणे जरूर आहे. पहिला, सर्व बाबतीत न्यायवृत्ती; दुसरा, खिलाफतीसाठी कोण पात्र आहे हे समजण्याचे ज्ञान; तिसरा, खिलाफतीसाठी सर्वात योग्य माणसाची निवड करण्यास सहाय्यभूत होईल अशी उत्तम निर्णयबुद्धी. समाजावर ज्यांचा खराखुरा प्रभाव आहे आणि ज्यांच्यात "एकत्र बांधण्याची व सोडविण्याची" शक्ती आहे त्याच लोकांत खलिफाची निवड करण्याची आवश्यक पात्रता आहे असे समजले जाते. ज्याला इमाम म्हणून निवडायचे तो ज्या शहरात रहात असेल त्याच शहरात राहणाऱ्या लोकांना इतरत्र राहणाऱ्या लोकांपेक्षा इमामाच्या निवडणुकीत भाग घेणे जास्त शक्य होते. कारण शहरातील लोक इमाम राहतो त्या शहराच्या जवळपास राहतात; इमामाच्या निधनाचे वृत्त त्यांना अगोदर समजते आणि खलिफापदासाठी सर्वांत योग्य अशा व्यक्ती त्यांच्या शहरामध्येच असतात. त्यामुळे मान्यता पावलेल्या पूर्व प्रथानुसार ( उर्फ ) त्यांना इतरांपेक्षा इमामाच्या निवडणुकीच्या बाबतीत जास्त महत्त्व येते. पण ते बरोबर नाही. कायदा ( शार ) काही तसा नाही.

इमामाची निवडणूक किती लोकांनी करावी याविषयी मतभिन्नता आहे. काही लोकांच्या मते इमामची निवड करण्यास पात्र असलेल्या शहरांतील सर्व लोकांचे त्यांच्या निवडीबाबत एकमत झाले पाहिजे. परंतु अबु बकरची ज्या पद्धतीने निवड झाली होती त्याचा दाखला देऊन अशा एकमताची आवश्यकता नाही असे दुसऱ्या काही जणांचे मत आहे. अबु बकरच्या सान्निध्यात त्यावेळी जे लोक होते त्यांनीच फक्त त्याची निवड केली होती. इतर पंडितांच्या मतानुसार इमामाच्या निवडणुकीसाठी फक्त पाच लोकांची आवश्यकता असते. कारण पूर्वी उमरने इमामाची निवड करण्याकरता जे सहाजणांचे मंडळ नेमले होते त्यापैकी उस्मान या सदस्याची इतर पाचजणांनी निवड केलेली होती. आणखी दुसऱ्या काही पंडितांचे असे मत आहे की एखाद्या विवाहाच्या कायदेशीर

मंजुरीसाठी ज्याप्रमाणे .एक 'वली' व दोन साक्षीदार पुरेसे असतात त्याप्रमाणे खलिफाच्या निवडणुकीसाठी फक्त तीन निर्वाचक व्यक्ती पुरेशा आहेत. आणि (आशरी) यांच्यासारखे असेदेखील काही पंडित आहेत की ज्यांच्या मते खलिफाची निवड फक्त एका माणसाने केली तरी ती कायदेशीर ठरते.

"बांधण्याची व सोडविण्याची" ज्यांच्यापाशी शक्ती आहे असे लोक इमामाची निवड करण्यासाठी एकत्र जमतात. प्रथम ते त्या पदासाठी योग्य अशा व्यक्तीच्या चारित्र्याची छाननी करतात आणि त्यांच्यापैकी जी व्यक्ती इष्ट व आवश्यक गुणांच्या बाबतीत सर्वश्रेष्ठ ठरेल व जिच्या आज्ञेचा समाज आदर करील अशा व्यक्तीची निवड करून तिच्याविषयी ते आपली श्रद्धा जाहीर करतात. विचाराअंती त्यांनी ज्या व्यक्तीची निवड केली असेल तिला विलंब न लावता इमामपद देऊ केले पाहिजे. त्या व्यक्तीने त्या पदाचा स्वीकार केला तर तिला इमाम म्हणून ते संमती देतात आणि त्याची संमती मिळाली की त्या व्यक्तीचे इमामपद निश्चित होते. त्यानंतर सर्व समाजाने नव्या इमामाला आपली श्रद्धा अर्पण करून त्याच्या आज्ञेचे आपण पालन करू असे जाहीर करणे जरूर असते. तथापि त्या व्यक्तीने इमामपद स्वीकारण्यास नकार दिला तर त्यासाठी त्याच्यावर सक्ती करता येत नाही.[1] कारण इमामपद हा एक स्वेच्छया केलेला करार असतो आणि त्यात सक्ती येत नाही. निवड केलेल्या पहिल्या माणसाने इमामपद स्वीकारण्यास नकार दिला तर मग त्याच्या खालोखाल योग्य असलेल्या माणसाला ते देऊ केले जाते. समान पात्रता असलेले दोन उमेदवार असतील तर त्यांच्यापैकी जो वयाने मोठा असेल त्याला मान्यता दिली जाते. दोघांच्या वयात फरक नसेल तेव्हा तत्कालीन परिस्थिती व तिच्या आवश्यकता लक्षात घेऊन इमामाची निवड करावयाची असते.

दोन वेगवेगळ्या खिलाफतींनी दोन वेगळ्या खलिफांची निवड केली तर ती बेकायदेशीर समजली जाते. कारण एकाच वेळी इस्लामी समाजाचे दोन इमाम असू शकत नाहीत. मात्र एकापेक्षा अधिक इमाम असणे कायदेशीर आहे असा दावा करणारेही काही लोक आहेत.[2]

---

१. याच्याशी सर्व विधिज्ञ सहमत नाहीत. शिराझी याच्या मतानुसार इमामाची निवड करणे ही सर्व समाजाची जबाबदारी आहे. इमामपदासाठी कोणी एकच व्यक्ती पात्र असेल तर ते पद तिने घेतलेच पाहिजे. ती ते पद नाकारीत असेल तर ते घेण्याची सक्ती केली पाहिजे.

२. मावार्दी याने ज्या काळात ग्रंथरचना केली त्याकाळी प्रत्यक्षात तीन खिलाफती अस्तित्वात होत्या. बगदाद येथील अब्बासी यांची, इजिप्त व सीरियामध्ये फातिमी यांची आणि स्पेनमध्ये उमय्यद यांची. इब्ने खाल्दुन याचे असे मत होते की, एकाचवेळी दोन इमाम असावयास हरकत नाही. परंतु ते दोघे एकाच देशात व एकमेकांशी

[ पुढील पान पाहा ]

मावार्दीच्या मते इस्लामी समाजासाठी खलिफा निवडण्याची दुसरीही एक पद्धत असू शकते. ती म्हणजे अगोदरच्या खलिफाने आपल्या नंतरच्या खलिफाची निवड करण्याची पद्धती. अगोदरपासून अस्तित्वात असलेल्या प्रथेला कायदेशीर मान्यता देण्याचे काम साधारणपणे 'इज्मा' करीत असतो. या बाबतीतील 'इज्मा' हा अबु बकर व उमर यांनी प्रस्थापित केलेल्या पूर्व प्रघातावर आधारलेला आहे. कारण अबु-बकर याने स्वतःच आपल्यानंतरचा खलिफा म्हणून उमरची नेमणूक केली होती आणि उमर याने स्वतःच आपला उत्तराधिकारी निवडण्याचे काम एका समितीवर सोपविले होते.

हे झाले राजेपद धारण करणाऱ्यांची पात्रता व त्यांचे कार्य याविषयीच्या सनातन इस्लामच्या दृष्टिकोणाविषयी. सुन्नींच्या मताप्रमाणे खलिफा हाच राजा असतो. पण इस्लामच्या प्रमुखपदासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेसंबंधींचा शियांचा दृष्टिकोण या अगोदर काही अंशी दर्शविल्याप्रमाणे फारच भिन्न आहे. पहिली गोष्ट म्हणजे इस्लामच्या प्रमुखपदाच्या पात्रतेसंबंधींचा सनातन दृष्टिकोण न मानणाऱ्या लोकांपैकी बहुसंख्य लोक पैगंबरांच्या प्रत्यक्ष वंशजाचा वारसाहक्क मानणारे आहेत.

इथ्ना-अशरिया, साबीया व झैदिया हे उपपंथ असलेल्या इमामिया पंथाच्या मते इस्लामचा प्रमुख हा अलीशी विवाह झालेल्या पैगंबरांच्या फातिमा या मुलीचा वंशजच असला पाहिजे. इमामियांच्या मते "समाजाचा नेता किंवा प्रमुख म्हणजे इमाम याची निवड करण्याची बाब, ही समाजजीवनातील इतर साधारण गोष्टींप्रमाणे समाजाच्या निर्णयावर सोपविता येणार नाही. इमामपद हा इस्लामचा मुख्याधार व पाया आहे. हे अधिकारपद धारण करणाऱ्याची नियुक्ती करण्याचे काम समाजाच्या अनिर्बंध मर्जीवर सोपविण्याचे धाष्टर्य खुद्द पैगंबरांनीही केले नव्हते. आणि समाजाच्या दृष्टीने या पदावर नियुक्ती करण्याची जबाबदारी खुद्द पैगंबरांनीच घेतली होती... अली ही अशा प्रकारे त्यांनी निवडलेली व्यक्ती होती." याविषयी इमामियांचे एकमत आहे. शियांचे हे मत त्यांनी आपल्या स्वतःच्या सिद्धांतानुसार कुराणातील काही वचनांचा जो अर्थ लावलेला आहे त्यावर आणि कुराणात न आढळणाऱ्या दुसऱ्या काही वचनांवर आधारलेले आहे. कुराणात न आढळणारी ही वचने ज्यांची स्वतःची मते त्या वचनांहून भिन्न आहेत अशा लोकांनी मुद्दामच गाळलेली आहेत असे शियापंथीयांचे म्हणणे आहे.

---

[ मागील पानावरून ]

लगत असलेल्या देशात असता कामा नयेत. त्यांच्या अधिकारांमध्ये संघर्ष होणार नाही इतके ते एकमेकांपासून दूर असले पाहिजेत. इमामपद दोन व्यक्तींच्या हाती एकाच वेळी असू नये हा सिद्धान्त मुस्लिमांच्या 'साहिह'मध्ये इस्लामच्या नेतृत्वाच्या प्रश्नाविषयी चर्चा असलेल्या भागात उल्लेख केलेल्या एका 'परंपरे'तून निघालेला आहे असे इब्ने खाल्दुनचे मत आहे. विशेषतः अंदालुसिया व उत्तर आफ्रिका येथील पंडित एकापेक्षा जास्त खलिफा असणे कायदेशीर आहे या मतास अनुकूल होते.

पैगंबरांच्या वंशजांचा वारसा हक्क मानणाऱ्यांमध्ये अलीच्या वारसांविषयींच्या मुद्द्यांवर मतभेद आहेत. 'इथ्ना–अशरियां'चे असे मत आहे की अलीमागून फातिमा (पैगंबरांची मुलगी) च्या वंशजांकडे इमामपद जाते आणि प्रत्येक इमाम आपल्या उत्तराधिकाऱ्याची अगोदर नियुक्ती करतो. असे मत धारण करणारे 'बारावाले' या नावाने ओळखले जातात. कारण या लोकांचे असे म्हणणे आहे की पृथ्वीवर आजपर्यंत बारा इमाम अवतीर्ण झाले. त्यापैकी पहिला इमाम अली हा असून शेवटचा मुहम्मद इब्ने अल्–हसन अल् अस्कारी हा होता. या शेवटच्या इमामाला हे लोक अल् माहदी (म्हणजे 'योग्य मार्गदर्शन मिळालेला') या नावाने संबोधितात. या इमामाने हिल्ला येथील गुहेत, हिजरी २६० (इ. स. ८७३–७४) मध्ये प्रवेश केला व तेथूनच तो अदृश्य झाला.[1] काळाची अखेर येईल तेव्हा तो पुन्हा अवतीर्ण होईल व पृथ्वीवर न्याय आणील. तोवर खऱ्या धर्मश्रद्धांचे म्हणजे शियांचे राजेपद ज्या व्यक्तींकडे असते, ते फक्त सार्वजनिक व्यवस्थेचे संरक्षक होत. म्हणूनच शियापंथीयांच्या दृष्टीने इराणचा शाह राजा हा शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम सोपवलेली व तात्पुरते राजेपद धारण करणारी एक व्यक्ती होय. यापेक्षा शाहचे जास्त महत्त्व नाही. इ. स. १५०२ मध्ये सफावी वंश इराणात सत्तेवर आल्यापासून इराण हा अधिकृतपणे शियापंथीय देश आहे.

'इथ्ना अशरिया' यांनी सांगितलेल्या बारा इमामांपैकी जाफर अल् सादिक या सहाव्या इमामापर्यंतच्या सर्व इमामांना 'साबिया' (किंवा 'सातवाले') पंथीयांची मान्यता आहे. पण त्यानंतरच्या इमामांविषयी या दोन गटात मतभेद होऊन ते एकमेकांपासून भिन्न ठरतात. या फारकतीचे कारण या प्रश्नाच्या मुळात सापडते. परंतु त्याचे उत्तर सोपे सरळ करून देण्यात येते. 'बारावाले' सांगतात की जाफर अल् सादिक याने आपला उत्तराधिकारी म्हणून आपला दुसरा मुलगा मुसा अल् काझिम[2] याची नियुक्ती केली; याचे कारण त्याचा सर्वात वडील मुलगा इस्माईल हा दारुड्या व त्या सन्माननीय पदाला अपात्र होता. आणि शिवाय तो आपल्या बापाअगोदरच मृत्यू पावला होता. तथापी 'बारावाल्यां'पेक्षा जास्त कडवी भूमिका असलेल्या 'सातवाल्यां'च्या मते मुसा अल् काझीमच्या नियुक्तीला महत्त्व नाही. कारण प्रत्येक इमाम आपल्या अगोदरच्या इमामाचा सर्वात थोरला मुलगा असला पाहिजे; अगदी अनादी काळाच्या प्रारंभापासून ईश्वरानेच ते पद त्याला देऊन ठेवलेले आहे. आणि म्हणून इस्माईल हाच सातवा इमाम आहे. 'सातवाले' त्यामुळेच स्वतःला 'इस्माइली' म्हणवितात.[3] तसेच त्यांचे असे

१. वेळोवेळी अवतीर्ण झालेले व स्वतःला 'माहदी' म्हणवणारे तोतये बाराव्या इमामाच्या सन्माननीय पदावर दावा सांगताना दिसतात.

२. बगदादजवळील काझिमयत येथे दफन केलेल्या दोन इमामांपैकी एक.

३. युरोपामध्ये झालेल्या धार्मिक युद्धात ज्यांनी प्रचंड खळबळ माजवली होती ते 'मारेकरी' याच गटाचे होते.

म्हणणे आहे की इस्माईल हा आपला वडिलांच्या अगोदर मरण पावला हे खरे नाही तर तो अदृश्य झाला आणि तोच शेवटचा इमाम असून तो पुनश्च एक दिवस अवतीर्ण होणार आहे.

इमाम हा मुहम्मदांची मुलगी फातिमा हिच्या वंशातला मुहम्मदांचा वंशज असावा या व्यतिरिक्त इमामाजवळ आणखीही पात्रता असणे आवश्यक आहे, या मुद्यासंबंधी ' झैदिया ' या गटाचा इतर गटांशी मतभेद आहे. हुसेन याचा नातू झैद याचे हे झैदिया हे अनुयायी होत. लोकशाही तत्त्वाच्या दृष्टीने त्यांचे असे मत आहे की, इमाम हा शियांनी निवडून दिलेला असला पाहिजे आणि इमामपदावर हक्क सांगणारी व्यक्ती ही ज्ञानवंत, विरक्त व शूर पुरुष असली पाहिजे. त्यांच्या सिद्धांतानुसार इमामानेच आपला उत्तराधिकारी नियुक्त केला पाहिजे असे नाही. तसेच एकाच वेळी दोन इमाम असण्याची शक्यता ते मानतात; मात्र या दोन इमामांच्या राज्यकक्षा एकमेकांपासून फार दूर असल्या पाहिजेत. स्वतःला ' इमाम ' म्हणविणारे इजिप्तमधील राजे हे या ' झैदीयां ' पैकी होत.

आणखीही इतर फुटीर गट आहेत. त्यापैकी खारीजी यांचा उल्लेख केला म्हणजे पुरे. इस्लामी कायद्यांचे पालन होत असेल तर इमाम असण्याची काहीही आवश्यकता नाही; परंतु एखादा इमाम असणे जरूर आहे असे वाटले तर योग्य अशा धर्मनिष्ठ व्यक्तीची त्या पदावर निवड केली जावी; आणि निवड करताना ती व्यक्ती गुलाम आहे की स्वतंत्र आहे, अरब आहे की अरबेतर आहे याला महत्त्व दिले जाऊ नये असे खारीजी गटाचे मत आहे.

इस्लामी इतिहासात ज्या सिद्धान्तानुसार खलिफाची निवड प्रत्यक्षात झाली त्याच्याशी विसंगत असा या बाबतीतील सुन्नीपंथीयांचा सिद्धान्त आहे असे या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी म्हणता येईल. तरीही ज्या पंडितांनी सुन्नी सिद्धान्ताची उभारणी केली त्यांनी वास्तविकतेची संपूर्ण उपेक्षा केलेली नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे. कारण ज्या कायद्यांच्या आधारे मुस्लिम धर्माधिष्ठित राज्यसंस्थेचा कारभार चालला होता त्यांचे संकलन करण्याचे, त्यांचा अर्थ लावण्याचे, आणि त्यातील अनुमाने सांगण्याचे काम या पंडितांनीच केलेले होते. आणि म्हणूनच त्यांना दरबारात महत्त्वाचे स्थान होते. विशेषतः धर्माचे राजाशी बहिणीसारखे नाते आहे हा इराणी आदर्श मानणाऱ्या अब्बासी राजांच्या दरबारात त्यांना महत्त्वाचे स्थान होते. ज्या प्रश्नांच्या बाबतीतील वस्तुस्थिती कायदेपंडितांना मान्य करणे भाग असते अशा प्रश्नांविषयीची समाजातील एकवाक्यता, खरे तर समाजाची निमूट संमती, म्हणजेच ' इज्मा '–या द्वारे सर्व गोष्टींना इस्लाममध्ये समर्थन मिळू शकते या सिद्धान्ताचे सहाय्य हे कायदेपंडित घेत असत. खिलाफत हे प्रत्यक्षात वंशपरंपराधिष्ठित प्रतिष्ठापद बनले होते. कायदेतज्ञांच्या दृष्टीने ही गोष्ट हितावह नव्हती. कारण खलिफाची निवड निवडणूक पद्धतीने झाली असती तर या कायदेपंडितांना कदाचित पंच होण्याची संधी मिळाली असती. तथापि खलिफाने आपला वली अल्-अहद

किंवा भावी वारस नेमण्याची प्रथा रूढ झाली तेव्हा ती कायदेशीर असल्याचे कायदे-पंडितांना प्रथम मान्य करावे लागले आणि मागाहून मग त्यांनी आपल्या कृत्याच्या पुष्ट्यर्थ 'इज्मा' कडे बोट दाखवले.[1]

कुरेशी जमातीचा घटक असणे ही खलिफा होण्यासाठी आवश्यक पात्रता आहे, या गोष्टीविषयी विधिपंडितांचा व सिद्धान्तकर्त्यांचा आग्रह होता हे सहज लक्षात येते. कारण उमाय्यद किंवा अब्बासी घराण्यातील चारही 'रूढीवादी' खलिफा व इतर सर्व खलिफा यांच्यापैकी प्रत्येक खलिफा हा कुरेशी जमातीच्या या ना त्या शाखेतील होता. अब्बासीवंशीय खलिफाचा इराण्यांशी निकट संबंध असल्यामुळे खलिफापद हे वंशपरंपराधिष्ठितच असावे या मताला अब्बासीवंशीय खलिफा अनुकूल होते. अब्बासी हे स्वतः पैगंबरांचे प्रत्यक्ष वंशज नव्हते, या वस्तुस्थितीचा इस्लामी समाजाला विसर पडावा याचा त्यांनी आपल्या दरबारातील विधिज्ञांच्या सहाय्याने दृढ प्रयत्न केला. खरे तर जन्माने कुरेशी नसूनही अब्बासी खलिफा इस्लामी समाजाच्या संमतीनेच खलिफापदावर बसले[2] होते.

जन्माने कुरेशी असण्याव्यतिरिक्त सिद्धान्तकर्त्यांनी खलिफापदासाठी आवश्यक मानलेल्या शर्तींपैकी अन्य शर्ती सत्तेवर आलेल्या फारच थोड्या खलिफांच्या बाबतीत[3] पुऱ्या झालेल्या दिसतात. इस्लामी राज्याचे प्रमुख या नात्याने ते त्या पदावर बसले होते तरी देखील त्यांच्यापैकी कित्येक खलिफा निरंकुश सत्ताधीश बनले, त्यांनी आपल्या धर्मबांधवांच्या अधार्मिक कारणांसाठी कत्तली केल्या. खलिफा मामुनच्या देहावसानानंतर ( २१८।८३३ ) अब्बासींच्या अधःपतित झालेल्या वंशात साम्राज्याच्या शासनाचे व धर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडण्याचे कर्तृत्व असलेला एकही खलिफा झाला नाही. ही वस्तुस्थिती इस्लाममधील तत्त्वचिंतकांनी ओळखली होती. परंतु याही वेळी इस्लामी समाजाच्या व्यावहारिक बुद्धीचे मूर्त स्वरूप मानल्या जाणाऱ्या 'इज्मा'मुळे

---

१. त्या नंतरच्या काळातील इस्लामभक्त वंशपरंपरागत राजेपदाला 'सुन्नत किस्रा वा कायसर' : "कोसरो व सीझर यांची प्रथा" म्हणजे निधर्मी ( खिश्चन ) साम्राज्याचा मार्ग असे म्हणत.

२. मुन्तासीर हा खलिफा झाला तेव्हा हुसेन इब्ने दद्हाक नावाच्या एका गृहस्थाने त्याचे पुढील शब्दांत अभिनंदन केले, "हे धर्मश्रद्धांचा सेनापती, खलिफा झाल्याबद्दल मी तुझे अभिनंदन करतो. 'उम्मा'चे ( समाजाचे ) तुझ्यासंबंधी एकमत झाले आहे."

३. अब्बासी वंशातील फक्त एका विशिष्ट कुटुंबामधील ( कादीर याच्या ) खलिफा निवडले जात असाही एक काळ होता. कारण ते कुटुंब सोडून इतर सर्व अब्बासी इतर सर्वसामान्य अब्बासींपैकीच मानले जात होते आणि त्यामुळे समाजाचा आदर प्राप्त होण्याइतकी प्रतिष्ठा त्यांच्यापाशी उरली नव्हती.

सर्वसामान्य मुस्लिम, इस्लामी राज्यसत्तेचे काय चालले आहे याची फारशी फिकीर न करता आपले नित्याचे जीवन जगत होता. गझाली ( मृत्यु इ. स. ११११ ) याने यासंबंधी म्हटले आहे, "काही लोकांच्या मते आता इमामत मेली आहे. कारण इमामतीपाशी जरूर ती लायकी उरलेली नाही. इमामतीला दुसरा पर्यायही शोधून काढणे शक्य नाही. मग काय करायचे ? आपण इस्लामी कायद्याचे पालन करावयाचेच सोडून द्यावयाचे काय ? काझींना बडतर्फ करायचे ? सर्वच सत्ता कवडी किंमतीची आहे असे म्हणावयाचे की लग्ने करणे थांबवावयाचे ? आणि उच्च पदाधिष्ठित व्यक्तींनी केलेले सर्व बाबतींतील कायदेकानू बेकायदेशीर ठरवावयाचे ? आणि समाजाला दुराचारपूर्ण जीवन जगायला मोकळे सोडायचे ? की आहे त्या परिस्थितीत रहावयाचे आणि इमामत खरोखरच अस्तित्वात आहे असे मानावयाचे ? की परिस्थिति व तत्कालीन गरज ओळखून केलेले शासनाचे सर्व कायदेकानू योग्य समजावयाचे ? "

गझाली याच्या या विचारांशी अन्य सिद्धांतकर्ते सहमत होते असे त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट दिसते. त्यांना कोणतेतरी स्थिर सरकार हवे होते, मग त्यात जुलूम-जबरदस्ती होत असो की गृहयुद्ध होत असो. जो कोणी सत्तेवर असेल त्याच्या आज्ञांचे सर्व प्रजेने पालन करणे जरूर आहे असे ते मानीत. धर्मनिष्ठांच्या सेनापति-पदावर एखादा हातपाय तोडलेला निग्रो गुलाम असला तरी त्याच्या आज्ञांचे पालन केले पाहिजे अशा अर्थाचे एक 'हदिस' आहे. दुसरे एक हदिस असे : "माझ्याशी ( पैगंबरांशी ) आज्ञाधारकत्व म्हणजे ईश्वराशी आज्ञाधारकत्व आणि इमामाच्या आज्ञांचे पालन म्हणजे माझ्याच आज्ञांचे पालन होय. तसेच माझ्याविरुद्ध विद्रोह म्हणजे धर्म-विरुद्ध विद्रोह होय आणि इमामाविरुद्ध बंड म्हणजे माझ्याविरुद्ध बंड[१] होय."

इस्लामच्या प्रमुखपदावर आल्यानंतर 'धर्मश्रद्धांचा सेनापती' या नात्याने प्राप्त असलेल्या विशेषाधिकारांचा प्रत्येक खलिफाने आग्रह धरलेला आहे. इमाम किंवा इस्लामी समाजाचा अग्रणी या नात्याने खलिफा स्वतः ज्यावेळी मशिदीत होणाऱ्या प्रार्थनेचे नेतृत्व करीत नसेल तेव्हा त्याच्याऐवजी प्रार्थनेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीने 'खुत्बा' ( दर शुक्रवारी मशिदीतील प्रार्थनेच्या वेळी केले जाणारे भाषण ) मध्ये मान्यताप्राप्त अशा इस्लाम प्रमुखाचे कल्याण चिंतण्याच्या हेतूने इमामाच्या– राजाच्या– नावाचा उल्लेख करण्याला अतिशय महत्त्व दिले जात असे.[२] कारण दरबारी कट–कारस्थाने आणि

---

१. "माणूस न्यायी असेल तर त्याला त्याचे बक्षीस मिळेल; तुमच्याकडून कृतज्ञता मिळेल. परंतु तो जुलमी असेल तर त्या पापाचा धनी तोच राहील अशा वेळी धीर धरणे हेच तुमचे काम आहे."

२. मुस्लिमेतर राजवटीत प्रत्यक्ष सत्तेवर असलेल्या राजाच्या नावाचा उल्लेख नेहमीच केला जात नाही.

लोकांना निश्चितपणे कोठेही जाता यावे याकरिता नागरिकांचे जीवित व मालमत्ता यांच्या सुरक्षिततेची हमी खलिफाने घेतली पाहिजे. अल्लाहने निषिद्ध म्हणून सांगितलेल्या गोष्टी केल्या जाणार नाहीत यासाठी कायद्याने ठरवून दिलेली सजा अपराध्यांना दिली जाईल याकडे खलिफाने लक्ष दिले पाहिजे. तसेच कोणत्याही कज्जातील व्यक्तींना न्याय दिला जाईल याची काळजी घेतली पाहिजे. इस्लामच्या पवित्र भूमीवर शत्रूचा आकस्मिक हल्ला झाला तर तो परतवून लावण्यासाठी तसेच कोणाही मुस्लिमाचे किंवा त्याच्या दोस्त-बांधवांचे. हल्ल्यापासून रक्षण व्हावे यासाठी खलिफाने देशाच्या सीमा सैन्याच्या सहाय्याने सुरक्षित ठेवल्या पाहिजेत. इस्लामचा स्वीकार करण्याचा आदेश देण्यात आलेल्या लोकांनी तसे करण्यास विरोध केला तर त्यांच्याविरुद्ध ' जिहाद ' पुकारले पाहिजे. या-बाबतीत फक्त ' संरक्षित ' समाजांचा अपवाद केला जावा. साम्राज्यातील कराची वसुली करणे आणि धर्मादाय देणग्या व ' सदाक ' जमा करणे ही खलिफाची कायद्याने अपेक्षित अशी जबाबदारी आहे. ती त्याने कोणत्याही प्रकारची भीती व खेद न बाळगता पार पाडली पाहिजे. सरकारी तिजोरीमधून द्यावयाचे सर्व तऱ्हेचे तनखे व अनुदाने दिली जात आहेत की नाही याकडे त्याने लक्ष दिले पाहिजे. सरकारी अधिकारपदांसाठी आणि अर्थव्यवहार पाहण्याकरिता खलिफाने विश्वासू इसमांची नेमणूक करावयाची असते. खलिफाची शेवटची जबाबदारी म्हणजे स्वतःला ऐशाराम व चैन करण्यासाठी सवड मिळावी म्हणून दुसऱ्याकडे आपल्या कामाची जबाबदारी न सोपविता खलिफाने स्वतःच राज्यव्यवहारांचे नियमन केले पाहिजे आणि परिस्थितीवर नजर ठेवली पाहिजे.

राज्यसंस्थेतील शासनासंबंधींच्या आधुनिक पाश्चिमात्य विवेचनात ( १ ) कायदा करणे ( २ ) अंमलबजावणी ( ३ ) न्यायदान असे तीन प्रकारचे अधिकार राजाला किंवा सरकारला आहेत असे समजले जाते. खलिफाचे काम प्रत्यक्ष कसे चालत असे याचा या संदर्भात अधिक तपशीलात विचार करणे उपयुक्त ठरेल.

इस्लामी समाजासाठी कायदेकानू करण्याचा खलिफाला तत्त्वतः काहीही अधिकार नाही. कारण फक्त ईश्वरच कायदे करू शकतो आणि त्याने त्याबाबतीतील आपले मानस मुहम्मद पैगंबरांच्याद्वारे कुराणात स्पष्ट केले आहे. जेथे कुराणात एखाद्या बाबीत अस्पष्टता किंवा अपुरेपणा होता तेथे तो हदिसांद्वारे दूर केलेला आहे. कारण हदिसे हा स्वतः पैगंबरांच्या वचनांचा व कृतींचा लेखपट आहे आणि अल्लाहचे मानस काय आहे हे समजण्याच्या दृष्टीने हदिसांद्वारे भरपूर मार्गदर्शन होत असते. ज्या प्रश्नांसंबंधींची हदिसे अस्तित्वात नाहीत आणि ज्या बाबतीत अद्याप काही अनिश्चितता आहे, किंवा प्रकटीकरणांद्वारे मिळालेला कायदा नव्या रीतीने लागू करण्याची आवश्यकता आहे अशा वेळी इमाम व कायद्याच्या चार ' संप्रदायां 'चे संस्थापक यांसारख्या अनेक अधिकारी पुरुषांनी मूळ कायदेकानूंचा अर्थ समजून सांगितलेला आहे किंवा त्यांचे विवेचन केलेले आहे. याबाबतीत खलिफाला कोणताही वेगळा अधिकार दिलेला नाही. खलिफा हा

तत्त्वतः कायद्याचा केवळ प्रतिनिधी किंवा कारक आहे; जिच्या प्रयत्नाद्वारे कायद्याची अंमलबजावणी होत असते अशी एक व्यक्ती आहे. त्याने स्वतः कायद्याचे पालन करावयाचे असते आणि दुसरे तो पाळतील याची हमी घ्यावयाची असते. ज्या बाबतीतील[1] कायदा स्पष्ट व स्वच्छ आहे त्याबाबतीत त्याने अस्तित्वात असलेल्या कायद्याची अंमलबजावणी करावयाची असते. त्याच्या कोणत्याही तपशिलात त्याला बदल करता येत नाही. उदाहरणार्थ, दानधर्म कर. कायद्याच्या मूळ पुस्तकात सांगितल्याप्रमाणे कोणतेही भय न बाळगता किंवा पक्षपात न करता खलिफाने हा कर गोळा करणे कायदेपंडितांनी आवश्यक मानलेले आहे. मात्र खुद्द खलिफाशी संबंधित असलेल्या ज्या प्रश्नांच्या बाबतीत कायद्याच्या पुस्तकांत आणि पूर्व प्रघातांद्वारे कोणताही निर्देश दिलेला नसेल अशा बाबतीत इस्लामी सिद्धान्तकर्त्यांनीदेखील खलिफाला बरेचसे स्वातंत्र्य दिलेले आहे. उदाहरणार्थ, नास्तिकांविरुद्ध चाललेल्या युद्धातील कैद्यांचे काय करावे यासंबंधी आणि जितप्रदेशाची कशाप्रकारे वाटणी केली जावी याबाबत आपल्या इच्छेप्रमाणे कृती करण्याचे स्वातंत्र्य खलिफाला दिलेले आहे. त्याचप्रमाणे सरकारी अधिकारपदाच्या नेमणुका आणि परकी राजांशी संबंध यासंबंधींचे कायदेकानू खलिफाला आपल्या इच्छेप्रमाणे करता येतील.

मुहम्मदांच्या मृत्यूनंतर कायदेकानू प्रत्यक्षात कसे अस्तित्वात आले हे या आधी काही प्रमाणात दाखवून दिलेच आहे. इस्लामच्या प्रस्थापनेनंतर ज्या बाबतीत कायदे करण्याची खास गरज नव्हती अशा बाबतींतील निर्विवाद प्राचीन स्थानिक प्रथा होत्या तशाच चालू ठेवण्यास संमती देण्यात आली. परंतु कधी कधी इस्लाममधील प्रतिपादनाशी विसंगत अशा व्यावहारिक गोष्टींचा समावेश असलेले एखादे प्रकरण अनपेक्षितपणे राजधानीत खलिफासमोर किंवा कोणा विजेत्यासमोर अथवा एखाद्या प्रांताच्या सुभेदारापुढे येई. सामान्यपणे अशा वेळी कायद्याची आवश्यकता भासत असे. खुरासानमध्ये एकदा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. तेथील अनेक नागरिकांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यामुळे त्यांना करमाफी देण्यात आली. परिणामी तेथील सरकारी खजिना रिकामा झाला. तेव्हा त्या संबंधात काहीतरी कायदा करणे भाग पडले. अशा प्रकारे परिस्थितिजन्य सोय म्हणून केलेल्या कायद्यामागे तात्पुरत्या उपयुक्ततेशिवाय अन्य हेतू असण्याची शक्यता नव्हती हे उघडच आहे.

परिस्थितिअनुसार कायद्यांत सुधारणा करण्याची अथवा स्वतः कायदे करण्याची क्षमता फारच थोड्या, विशेषतः फारच थोड्या अब्बासीवंशीय खलिफांमध्ये होती. त्यांना त्याबाबतीत उलेमा (पंडित) आणि फकी (विधिज्ञ) यांचे सहाय्य होई. ही मंडळी कायद्याच्या शाखेत प्रशिक्षित असत आणि ते राजाची कायद्यासंबंधीची कामे करीत

१. ज्या प्रश्नांच्या बाबतीत निश्चित स्वरूपाचे 'नास' किंवा मूळ लिखाण आहे.

असत. खलिफा हरून अल् रशीद याच्या कायदा सल्लागाराचे काम अबु युसूफ हा काझी करीत असे. हरून अल् रशीदसाठीच त्याने ' किताब अल् खराज ' हा ग्रंथ लिहिला. " कर, भूमिकर, दानधर्मासाठी द्यावयाचा संपत्तीचा हिस्सा, गरीबांसाठी कर, डोईकर इत्यादी ज्या बाबींवर खलिफाने देखरेख ठेवावयाची असते आणि त्यांची अंमलबजावणी करावयाची असते " अशा बाबींसंबंधी ' किताब अल् खराज 'मध्ये मार्गदर्शन केलेले आहे. परंतु आपल्या कायदा सल्लागारांचा सल्ला खलिफा नेहमीच मानीत होते असे नाही असे दिसते. ' मस्ला ' ( म्हणजे सार्वजनिक हिताचा उपाय )च्या नावाखाली शार ( लिखित कायदा )शी विसंगत असे कायदे स्वतःच्या आज्ञेद्वारे खलिफाला लादता येत आणि तसे ते प्रत्यक्षात लादतही असत. काही वेळा आपल्या स्वतःच्या आकांक्षांच्या दृष्टीने उपयुक्त अशा प्रकारचा किंवा तत्कालीन स्थानिक परिस्थिती व काळ यांना अनुरूप होईल अशा प्रकारचा एखाद्या विशिष्ट आचारसंप्रदायाने लावलेला कायद्याचा अर्थ खलिफा ग्राह्य मानीत अथवा काही विशिष्ट कायदे लागू करण्याचेच स्थगित करीत. आणि अशा मार्गांनी वास्तविक ज्या काझींचा कायद्याचा अर्थ सांगण्याचा अधिकार होता त्या काझींच्या कार्यकक्षांवर कधी कधी मर्यादा घालीत. याउलट इस्लामी कायद्याचा अर्थ सांगण्याचे काम बव्हंशी उलेमा व विधिपंडित करू लागले तेव्हा खुद्द खलिफांच्या प्रभावापेक्षा या लोकांचा समाजावरील प्रभाव वरचढ ठरला. खिलाफतीचा अस्त झाला तेव्हा तर उलेमांच्या हातीच पुष्कळदा राजाची सत्ता गेली. आणीबाणीच्या काळात उलेमाच समाजाला मार्गदर्शन करीत. एवढेच नव्हे तर बलिष्ठ राजेसुद्धा त्यांच्यामार्फत कारभार करणे फायदेशीर समजत. मंगोलविजेता हुलागू याने बगदादची राजधानी व त्याचबरोबर तेथील खिलाफत नष्ट केल्यानंतर ( १२५८ ) स्वतः मुस्लिम नसतानाही, राजधानीमधील मुस्तानसीरिया या प्रख्यात मदरसाच्या मुफ्तींना " आदरास पात्र माणूस कोण ? अश्रद्ध पण न्यायी माणूस की धर्मश्रद्ध पण अन्यायी माणूस–" याविषयी त्यांचे मत विचारले होते. मुफ्तींनी यापैकी पहिल्या वर्गातला माणूस आदरास पात्र होय असा आपला निर्णय दिला आणि अशा रीतीने मुस्लिम समाजाच्या सत्ताधीशपदावरील हुलागूच्या अधिकाराला त्यांनी पाठिंबा[1] दिला.

इस्लामच्या कायद्यांची कार्यवाही आणि इस्लामी साम्राज्याच्या सीमांचे संरक्षण या खलिफाच्या राज्यकारभारविषयक प्रमुख जबाबदाऱ्या होत असे सिद्धान्ततः समजले

---

१. मोरोक्कोमधील फ्रेंच सत्तेच्या इतिहासात यासंबंधीचे आधुनिक काळातील उदाहरण सापडते. आपला वकील फेझमध्ये ठेवण्याची फ्रान्सने सुलतान मुले हसन- ( १८७३–९४ ) कडे परवानगी मागितली तेव्हा सुलतानाने तो प्रश्न मक्केच्या उलेमाकडे सोपविला आणि फतवा देण्याची विनंती केली. त्याप्रसंगी सुलतानाने असे सांगितले होते की, अल्जीयर्ध हा फ्रेंचांनी जिंकलेला देश असला तरी तो दार-अल्-इस्लाम म्हणजे मुस्लिम देश समजला जावा; दार-अल्-हार्ब म्हणजे शत्रूचा प्रदेश समजला जाऊ नये.

जाई. कुराणामधील राज्यकारभारविषयक कायदेकानूंची संख्या उपेक्षणीय आहे हे मागे सांगितलेच आहे. त्यामुळे आपणास योग्य वाटेल अशी किंवा उपयुक्त होईल अशी कारभाराची पद्धती विकसित करण्याची जबाबदारी व्यक्तिशः खलिफावरच येऊन पडे आणि या कामी खलिफाला उचित वाटले तर तो इस्लामी कायद्यात तज्ज्ञ असलेल्या मंडळींचे सहाय्य घेई. इस्लामी साम्राज्याचा विस्तार होत होता त्या काळात अगोदर-पासून आपल्या ताब्यात असलेला प्रदेश सुरक्षित ठेवणे आणि आणखी प्रदेश आपल्या साम्राज्यामध्ये आणणे हेच काम बहुतेक खलिफांनी केलेले आहे. आपल्या प्रदेशात आणि विशेषतः राजधानीत व इतर मोठ्या शहरांमध्ये किंवा त्यांच्या आजुबाजूस काही राजांनी सार्वजनिक उपयोगाची बांधकामे केली. प्रजेच्या उपयोगासाठी त्यांनी मशिदी व इतर इमारती बांधल्या, शेतीसाठी व व्यापारी वाहतुकीसाठी कालवे खोदले तर काही राजांनी स्वतःची महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठी भव्य प्रासाद उभारण्याचेच फक्त काम केले. सैन्याचा निर्वाह व नागरीहिताच्या योजना या दृष्टीने पैसा ही सर्वांत आवश्यक अशी बाब होती. त्यामुळे महसूलखाते हा शासनव्यवहाराचा केंद्रबिंदू बनला आणि त्या खात्याचा पसारा हळूहळू वाढत गेला.

इतिहासाच्या आपल्या अध्ययनातील निरीक्षणाच्याआधारे इब्ने खाल्दुन याने असे म्हटले आहे की राज्यकारभाराच्या तीन प्रमुख आवश्यकता असतात : सैन्य, पैसा व दूरच्या विभिन्न प्रदेशांशी दळणवळण ठेवण्याची साधने. तो म्हणतो की या आवश्यकता पुऱ्या करण्याची सरकारची साधने दोन : तलवार व लेखणी. यापैकी ‘ तलवार ’ हा शब्द सरकारच्या सैनिकी अंगाचा सूचक आहे. त्याचा मागाहून विचार करू. प्रथम ‘ लेखणी ’ या साधनाचा थोडा विचार करू. खिलाफतीच्या इतिहासात ‘ लेखणी ’ ही संज्ञा विभिन्न अधिकारी व त्यांच्या जबाबदाऱ्या यांची निदर्शक म्हणून वापरलेली आहे. मुहम्मदांच्या पहिल्या चार उत्तराधिकाऱ्यांच्या अमदानीत आणि मदिना ही साम्राज्याची राजधानी होती त्या काळात खुद्द ‘ खलिफा ’च्याच हाती ‘ लेखणी ’ होती. तो इस्लामी विजयाचा प्रारंभीचा काळ होता. त्या काळांत खलिफा व त्याचे अधिकारी प्रामुख्याने नवा नवा प्रदेश साम्राज्यात आणण्यामध्ये गुंतलेले होते. लष्करी गरजांना त्या काळात प्राधान्य होते. सैन्याची उभारणी व संघटन, सेनाधिकाऱ्यांच्या नेमणुका आणि लष्करी हालचाली व त्यांचे मार्गदर्शन ही राज्याची मुख्य कामे होती. तथापि याशिवाय जित देशांतून पाठविण्यात आलेल्या खंडणीच्या प्रचंड रकमांची इस्लामच्या अनुयायांत वाटणी करावी लागे. त्यासाठी खलिफा उमरने ‘ लेखणी ’चा ‘ दिवान ’ लिहिण्यासाठी उपयोग केला. खंडणीच्या पैशांतील वाटा मिळण्याचा अधिकार असलेल्या खलिफाच्या अंतेवासीयांचे ‘ दिवान[१] ’ हे एक रजिस्टर आहे. साम्राज्याबाहेरच्या मोहिमांमध्ये प्रत्यक्ष गुंतलेल्या

१. असे दिसते की, कालांतराने ‘ दिवान ’ या संज्ञेच्या अभिप्रायात परिवर्तन झाले आणि त्याची व्याप्ती वाढून त्या संज्ञेला ‘ मंत्रालय ’ किंवा ‘ अधिकारपद ’ हा अर्थ प्राप्त झाला.

सैन्यांना पैशाची फारशी तत्काळ गरज नसे. कारण जित देशात ते विजेते म्हणूनच रहात आणि लढाईच्या प्रत्येक मैदानावर मिळवलेल्या प्रचंड लुटीमुळे ते गब्बर बनत. करांची पद्धतशीर आकारणी करण्याची व करवसुलीची गरज निर्माण होई तेव्हा जमा रकमेची वाटणी करण्याच्या कामाव्यतिरिक्त कामेही खलिफाला करावी लागत. आपत्कालीन राखीव संग्रह म्हणून जमा पैशांतील काही रक्कम सरकारी खजिन्यात ठेवण्याची कल्पना प्रारंभीच्या खलिफांना अपरिचित होती. तशी सूचना एकदा एका माणसाने खलिफा उमरला केली तेव्हा त्याने त्याला चांगलेच दटावले होते. ही सूचना म्हणजे ईश्वराची निंदा करण्यासारखे आणि आकस्मिक अडचणीची तरतूद अल्लाह करणार नाही असे सुचविण्यासारखे आहे असे उमरचे मत होते.

आपल्या अन्य जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त प्रारंभीचे खलिफा मशिदी बांधणे, शांतता व व्यवस्था राखणे आणि प्रसंगी स्वतः न्यायाधीशाचे काम करणे हीही कामे करीत. उदाहरणार्थ, मदिना येथे स्वतः उमर, काझी म्हणून काम करीत असे. एवढेच नव्हे तर राजधानीबाहेरच्या ठिकाणीदेखील स्वतःच काझींच्या नेमणुका करीत असे. या जबाब-दाऱ्या पार पाडण्यात खलिफांचा बराच वेळ व शक्ती खर्च होत असे. परंतु त्यांच्या राज्यकारभारविषयक कामकाजाचाच ही कामे हा एकंदर भाग होता. कुराणांतील आज्ञा व त्यांतील अनुषंगिक गोष्टी यानुसार समाजात सुधारणा घडवून आणणे हे खलिफाच्या मध्यवर्ती सत्तेचे काम नसून व्यक्तिशः प्रत्येक मुस्लिमाचे ते काम आहे असे समजले जात असे. कारण अल्लाहची प्रकटीकरणे मुस्लिम व्यक्तीलाच उद्देशून आहेत. राज्यसंस्था या नात्याने सरकार मजूरविषयक कायदे करीत नसे अथवा नोकरीसंबंधींच्या शर्ती वगैरे ठरवून देत नसे. कारण इस्लाममधील आचारांचे तसेच राज्यसत्तेच्या व्यवहाराचेही नियमन करणाऱ्या इस्लामी कायद्याप्रमाणे आपण आपल्या गुलाम नोकरांना कशी वागणूक दिली पाहिजे याची मुस्लिम समाजाच्या प्रत्येक घटकाला जाणीव असतेच. त्याचप्रमाणे राज्यसत्तेची स्वतःची अशी गरीबांच्या उन्नतीसंबंधीच्या कायद्यांची शासन-यंत्रणा नव्हती, परंतु गरजू याचकाला हक्काने दान मागता येत असे आणि तो ते मागत-सुद्धा असे. कारण दानधर्म हे एक अनिवार्य कर्तव्य म्हणून कुराणाने सांगितलेले आहे. आणि म्हणून दानधर्म स्वीकारणाऱ्यांचे अस्तित्व मानलेलेच आहे. शिक्षण ही जवळ जवळ पूर्णपणे व्यक्तिगत बाब होती. कारण ज्या मोठ्या मशिदीत शाळा होत्या त्या मशिदींची व्यवस्था खलिफाच्या केंद्रीय सत्तेकडे तत्त्वतः होती. तरीदेखील बहुसंख्य मशिदी या केवळ प्रार्थनेच्याच जागा होत्या. त्यात शाळा वगैरे काही नसे. या मशिदींची व्यवस्था स्थानिक समाजाकडून ठेवली जाई.

खिलाफतीवर उमाय्यदवंशीय आले आणि त्यांनी दमास्कस येथे आपली राजधानी हालविली त्या काळातसुद्धा खिलाफतीची केंद्रीय शासनव्यवस्था फारशी गुंतागुंतीची नव्हती. सत्तेवर आलेल्या या नव्या वंशातील पहिला खलिफा मुआवियाचा कल

अनियंत्रित सत्तेकडे होता. लष्करी हालचालींची तसेच जित प्रदेशाच्या कारभाराची जबाबदारी सांभाळणाऱ्या सेनाधिकारी वर्गाला बरेच स्वातंत्र्य होते. मुआवियाला ते नव्हते. त्यामुळे सत्तेच्या अधिकाधिक केंद्रीकरणास आता सुरुवात झाली. साम्राज्याला आता बरीचशी स्थिरताही आली होती. त्यामुळे अधिक सुसंघटित शासनव्यवस्थेची आवश्यकता निर्माण झाली. साम्राज्याच्या कारभारावर स्वतः खलिफा अद्यापही देखरेख व नियंत्रण ठेवीत असे. परंतु शांततेच्या काळातील अधिक कठिण व गुंतागुंतीच्या कामांचे बाबतीत खलिफाला जेव्हा अनेक 'दिवानां'चे सहाय्य घेणे आवश्यक झाले त्या काळात दिवान या संज्ञेला सरकारी खाती अथवा मंत्रालये असा अर्थ प्राप्त झाला होता. मुआविया याने 'दिवान अल् खताम्' या खात्याची प्रस्थापना करून सुसंघटित शासनयंत्रणेचा पाया घातला असे म्हणतात. सचिवाच्या कामासारखे या खात्याचे काम होते. खलिफाकडून जाणाऱ्या खलित्यांच्या नकलांचे रजिस्टर ठेवणे आणि ते पाठविण्या-आधी काळजीपूर्वक मोहोरबंद करणे ही कामे या खात्यात केली जात. हळूहळू आणखीही खाती निर्माण करण्यात आली. 'दिवान अल् रसाईल' या खात्यामध्ये सुंदर, अलंकारिक भाषेत सरकारी पत्रे लिहिली जात; 'दिवान अल्-मुस्तावहात' या विभागात सरकारी जमिनी व मालमत्ता यांच्या वापराच्या मोबदल्यात मिळणारे भाडे जमा केले जाई. सरकारी खजिन्याचे सर्वांत महत्त्वाचे काम 'दिवान अल् खराज' या खात्याकडे होते. सरकारी अधिकाऱ्यांचे पगार वगैरे देऊन आणि इतर आवश्यक खर्च करून साम्राज्याच्या विविध प्रदेशांतील उरलेला सर्व पैसा या खात्याकडे जमा होत असे. बहुधा याच खात्याकडून उमाय्यद खलिफांनी चालविलेल्या सार्वजनिक बांधकामांसाठी रकमा दिल्या जात असाव्यात.

मध्यवर्ती शासनव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली 'बारीद' किंवा टपालसेवा ही त्यानंतरच्या काळातच साम्राज्यात सर्वत्र चालू करण्यात आली. परंतु सर्व-साधारण प्रजेच्या पत्रांची ने-आण करण्यासाठी ही टपा सेवा नव्हती. विभिन्न प्रांतांतील सरकारी अधिकारी आणि राजधानी यांच्यातील सरकारी खलित्यांची ने-आण करण्या-पुरतीच ती मर्यादित होती. या टपाल-सेवेशी संलग्न असलेले प्रांतातील अधिकारी हे वस्तुतः गुप्तहेर खात्याचे लोक असत. साम्राज्याच्या वेगवेगळया भागांतील घडामोडींवर नजर ठेवून लक्षात घेण्याजोग्या कोणत्याही घटनांसंबंधी तसेच अगदी बिनमहत्त्वाच्या[1] बाबींसंबंधीदेखील अहवाल पाठविणे हे या गुप्तहेरांचे काम असे. "त्यामुळे बऱ्यावाईट घटनांची राजाला माहिती होते. पाचशे पॅरासांगइतक्या दूर अंतरावर कोणी एखाद्याने

---

१. ताहिर दि अँबिडेक्स्ट्रस याने खुतब्यामध्ये खलिफाच्या नावाचा उल्लेख वगळून मामुन खलिफाशी द्रोह करण्याचे जे कृत्य केले होते त्याची माहिती मामुनच्या गुप्तहेर अधिकाऱ्याने त्याला पाठविली असे अब्बासी खलिफांच्या अमदानीतील एक उदाहरण मागे उद्धृत केलेच आहे.

एखादा गवताचा पेंढा किंवा एखादी कोंबडी अन्यायाने बळकाविली तरी त्याची त्यामुळे राजाला खबर मिळते आणि तो गुन्हेगाराला सजा करण्याचा हुकूम देतो. त्यामुळे राजा जागरूक असल्याचे आणि त्याने प्रत्येक जागी अनुभवी माणसे नेमली असल्याचे इतर प्रजाजनांना कळते. त्यामुळे अन्याय करणारे अन्याय करण्यापासून दूर राहतील आणि प्रजेला ( खलिफाच्या ) न्यायाच्या छत्रछायेखाली बिनधास्तपणे आपली जीवननिर्वाहाची व शेतीची कामे करता येतील."

उमाय्यदांच्या काळातच हे टपालखाते प्रथम सुरू झाले असे नाही. कारण त्या खात्याच्या नावाचा ('बारीद') व्हेरेडस (डाक-घोडा) या लॅटिन शब्दाशी निःसंशय संबंध आहे. त्याचप्रमाणे या खात्याशी संबंधित असलेल्या अनेक शब्दांचे मूळ इराणी शब्दांत आहे. त्यावरून बायझन्टीन व इराणी साम्राज्यामध्ये[१] प्रचलित असलेल्या पद्धतीवरून उमाय्यदांनी डाकपद्धती घेतली असे समजावयास हरकत नाही. उमाय्यद खलिफा अब्द् अल् मलिक इब्ने मारवान ( ६८५–७०९ ) याने अन्य शासकीय उपाय-योजनांप्रमाणेच या खात्याचीही स्थापना केली अशी पारंपारिक समजूत आहे. तसेच दुसऱ्या उमरने प्रख्यात खुरासान या प्रमुख मार्गावर टप्प्याटप्प्यावर सोईस्कर ठिकाणी धर्मशाळा बांधल्या व या पद्धतीत सुधारणा केली असेही सांगतात. तथापि अब्बासी राजवटीतच 'बारीद'ला सर्वांत जास्त महत्त्व आले आणि आपले जे मूळ काम जासूदगिरी–ते ती करू लागली. अब्बासींच्या काळात राजधानीकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर सोयीस्कर टप्प्यांवर ठिकठिकाणी डाक-चौक्या होत्या. तसेच खलिफा माहदी याने इ. स. ७८१–८२ मध्ये येमेन ते मक्का व पुढे मक्का ते बगदाद असा डाक चौक्या असलेला एक नवा रस्ता बांधला. हरकाऱ्यांकरवी अथवा घोडेस्वार किंवा सांडणीस्वार यांच्याकरवी टपाल पाठविले जाई. इराणमध्ये यासाठी हरकाऱ्यांचा उपयोग केला जाई. त्यामुळे सीरिया किंवा अरबस्तानपेक्षा इराणातील डाक-चौक्या जवळजवळ होत्या. कधी कधी कबुतरांचादेखील टपाल पाठवण्यासाठी उपयोग केला जाई. एखाद्या विशिष्ट जागी सरकारी अंमलदारांना किंवा छोट्या सैन्यतुकड्यांना तातडीने जावयाचे असे तेव्हा 'बारीद'खाते त्यांनाही घेऊन जात असे. माम्लुकांच्या अमदानीत इजिप्तमध्ये तर दमास्कसहून कैरो येथे बर्फ नेण्यासाठी 'बारीद'चा उपयोग केला जात असे. इजिप्तमध्ये 'दिवान अल् इन्शा' किंवा खासगीच्या अंमलदाराकडे रस्त्यावरील विभिन्न टप्प्यांवर घोडे आणि जासूद यांची तरतुद करण्याचीही जबाबदारी सोपविली होती. कामावर असलेला जासूद पूर्वी एकेकाळी आपल्या गळ्यात पिवळ्या रेशमी कापडाची एक थैली अडकवित असे. त्या थैलीत सुलतानाचे नाव व पदवी कोरलेला एक तांब्याचा बिल्ला

१. 'जाहिलया'मध्ये तसेच इस्लामच्या उदयानंतरसुद्धा पोस्टमास्तराकडून राजांना ताज्या बातम्या मिळत असत. पैगंबरांच्या एका हदिसमध्ये 'बारीद'चा उल्लेख आहे.

असे. पुढे तांब्याचा बिल्ला वापरातून गेला आणि पिवळी थैली तेवढी जासुदाच्या हुद्याचे निदर्शक चिन्ह म्हणून राहिली.

कालांतराने खिलाफतीच्या डाकखात्याच्या प्रमुखाला– 'साहिब अल् बारीद' याला– विभिन्न प्रांतांच्या अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणारा अधिकारी हे राजकीय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. सर्व जिल्ह्यांतून प्रथम स्थानिक 'बारीद' अधिकाऱ्याकडे टपाल पाठविले जाई आणि मग ते अधिकारी ते टपाल जास्तीत जास्त जवळच्या मार्गाने राजधानीकडे रवाना करीत. राजधानीत टपालाचे एक खास 'दिवान' स्थापन करण्यात आले होते. आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांकडून आलेले खलिते किंवा त्यातून संकलित केलेला अहवाल खलिफाला सादर करण्याची जबाबदारी मुख्य टपाल मास्तरकडे होती. या मुख्य टपाल मास्तरच्या इतर जबाबदाऱ्या म्हणजे विभिन्न शहरांसाठी टपाल-अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे, सहाय्यकांची नियुक्ती करणे, रस्त्यावरील टपालचौक्यांवर योग्य माणसे नेमणे, जासूदांची नियुक्ती करणे आणि सर्वांना पगार व इतर सामग्री मिळेल अशी व्यवस्था करणे. प्रमुख टपाल अंमलदाराचे काम बव्हंशाने गुप्त हेरखात्याच्या संचालकासारखे होते.[1] त्यामुळे इतर सर्वसाधारण गोष्टींच्या माहितीव्यतिरिक्त त्याला विभिन्न रस्ते व प्रवासातील टप्पे यांची विशेष माहिती असणे आवश्यक मानले जाई. कारण खलिफाला कधीकाळी प्रवास करणे जरूर झाले किंवा सर्वात जवळच्या मार्गाने सैन्य पाठवावयाचे झाले तर अशा माहितीची आवश्यकता असे. 'बारीद'च्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची माहिती असलेली पुस्तके तयार केली होती. भूगोलासंबंधीची ती प्रारंभीची मुस्लिम पुस्तके होत. विभिन्न प्रवासमार्गांचा तपशील तसेच रस्त्यावर लागणाऱ्या शहरांसंबंधींची संक्षिप्त माहिती त्या पुस्तकात मिळते. तसेच त्या पुस्तकात ज्या प्रांतांतून प्रवासाचे मार्ग जात त्या प्रांतांचा महसूल व तेथे तयार होणाऱ्या वस्तू यांचीही माहिती आहे. सेल्जुक सुलतान आल्प आर्सलान (१०६३–७२) याने खिलाफतीच्या पूर्वेकडील प्रदेशातील 'बारीद' खाते बरखास्त केले. सुप्रसिद्ध मंत्री निजाम अल् मुल्क याचा या गोष्टीला वास्तविक विरोध होता. कारण साम्राज्यात सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने 'बारीद' खाते उपयुक्त आहे असे त्याचे मत होते.

खलिफांनी केलेली कालव्यांची व पाणीपुरवठ्याची कामे ही जनकल्याणाची महत्त्वाची कामे होत. खलिफा अब्द् अल् मलिक याच्या कारकीर्दीत इराकचा व्हाइस-

---

१. खलिफा मन्सूरच्या राजवटीत प्रत्येक जिल्ह्यातील 'बारीद'च्या अमलदाराला रोजच्या रोज पुढील गोष्टींसंबंधींची माहिती पाठवावी लागे : (अ) पीठ, धान्य व इतर अन्नवस्तूंचे भाव, (आ) जिल्ह्यातील काझींनी दिलेले निवाडे, (इ) अमिल किंवा सुभेदार यांच्या हालचाली, (ई) स्थानिक खजिन्यात जमा झालेला पैसा आणि (उ) महत्त्वाच्या इतर बाबी.

रॉय हज्जाज याच्या हुकुमाने बताइह या तैग्रीस-युफ्रातिसच्या प्रसिद्ध पाणथळ भूमीतील काही भागात कालवे काढण्यात आले. त्यांवर बांध घालण्यात आले. तसेच, पाणी वाहात रहावे व जलवाहतुकीसाठी त्याचा उपयोग व्हावा या दृष्टीने कालवे जास्त खोल व रुंद करण्यात आले. अली वालिदनेदेखील नवे रस्ते बांधले व जुन्यांची सुधारणा केली. तसेच कालवे खोदले. पुढे खलिफा हिशाम याच्या राजवटीमध्ये मोसुल शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी एक कालवा खोदण्यात आला. त्याचप्रमाणे इराकचा सुभेदार खलिद अल्-कास्री याने वासितचा ' इराक कालवा ' या नावाने प्रसिद्ध असलेला आणखी एक कालवा खोदला. अशा प्रकारच्या बांधकामांपासून स्थानिक रहिवाशांना फायदा होत होता तरी ज्या भागातून हे कालवे जात तेथील रहिवासी पुष्कळदा नाराज होत. कारण कालव्यामुळे जमीनमालकांना आपल्या जमिनींना मुकावे लागे आणि ते बांधण्यासाठी स्थानिक मजूरांना कामाला जुंपले जाई. फराझदाक या कवीने ' इराक कालवा ' बांधणाऱ्या खलिद अल् कास्रीवर आपल्या एका दोह्यात आग पाखडली आहे. " काहीही अधिकार नसताना तू या[1] अपशकुनी व अपवित्र कालव्यावर अल्लाहचे धन उधळले आहेस......

तू सच्चा लोकांच्या पाठी फोडतो आहेस आणि मलिकच्या[2] पाठीशी दडून तू अल्लाहचे जे देणे आहे ते देत नाहीस. "

आपल्या साम्राज्यामधील विभिन्न प्रांतांतील अधिकाऱ्यांना अली वालिद याने, पांगळे व कायमचे दुबळे बनलेल्या माणसांची सोय करण्याची आणि रुग्णांसाठी इस्पितळे बांधण्याची सूचना केली होती असेही म्हणतात.

---

१. या कालव्याला ' अल् मुबारक ( ईश्वराची करूणा ) ' हे नाव असावे.

२. मलिक हा बसरा येथील सुरक्षा ( पोलिस ) दलाचा सुपरिंटेंडेंट होता. ज्या भागातून हा कालवा जात होता त्या भागातील एका खेडेगावच्या मालकाची गावावरील मालकी मान्य करावयास मलिकने नकार दिला. जे. हेल यांनी प्रकाशित केलेल्या ( म्युनिक १९०१ ) फराझदाक याच्या काव्यसंग्रहात वरील दोह्याच्या दुसऱ्या ओळीतील ' जुल्म ' या शब्दाच्या जागी ' झहर ' हा शब्द असावा असे समजून त्या ओळीचा वेगळा अर्थ लावला आहे. त्यामध्ये अशी एक आख्यायिका सांगितली आहे की कोणा उमर इब्ने याझिद या इसमाला मलिक याने ठार मारले तेव्हा मलिकविरुद्ध आरोप दाखल करण्यासाठी बानु तामिम जमातीचे लोक इराकचा सुभेदार खालिद याच्याकडे गेले. तेव्हा खालिदने त्यांनी दिलेला पुरावा फेटाळून लावला. या खुनाची अधिक सविस्तर माहिती तबरीमध्ये आहे. या टीपेतील संदर्भाच्याबाबतीत मी दिवंगत प्राध्यापक ए. ए. बेव्हन यांचा ऋणी आहे. त्यांनी असे सुचविले की मूळ संदर्भ लक्षात घेता दुसऱ्या ओळीतील ' झहर ' या शब्दाचा अर्थ फराझदाकच्या ओळीतील ' जुल्म ' शब्दाप्रमाणेच आहे असे समजावे– म्हणजे ' मलिकने केलेल्या अपराधासाठी अल्लाह त्याला जे शासन करू इच्छितो त्याकडे तू दुर्लक्ष करीत आहेस."

आणखी एक शासनविषयक सुधारणा म्हणजे ७६/६९५-६ च्या आसपास मुस्लिम साम्राज्याच्या नाण्यात करण्यात आलेला बदल ही होय. ही सुधारणा अबद् अल्-मलिक इब्ने मारवान याने केली असे सांगितले जाते. धर्मविषयक अभिमानातून ही सुधारणा घडली असे अरबी तज्ञांचे मत असले तरी बहुधा त्या सुधारणेमागे महसूलाच्या अदायगीतील गोंधळ कमी करण्याचा हेतू असावा. इसवी सन ६९५-६ पर्यंतच्या काळात मुस्लिम विजयापूर्वी ज्या विभिन्न सत्ता इस्लामी साम्राज्याच्या भिन्नभिन्न प्रांतांत सत्तेवर होत्या त्यांची नाणी तेथे तेथे प्रचलित होती. उदाहरणार्थ, इजिप्त व सीरियामध्ये बायझन्टीन सत्ताधाऱ्यांची सोन्याची, चांदीची आणि तांब्याची नाणी उपयोगात होती. जे देश पूर्वी इराण्यांच्या ताब्यात होते तेथे ससानियनांची ड्रॅक्मा नाणी चालू होती. ही दोन्ही नाणी एकाच वेळी किंवा आलटून पालटून प्रचलित होती. ससानियन राजांची भरभराट संपली तेव्हा इराणी चलनाचे अवमूल्यन झाले. त्यामुळे, त्या चलनात एखादा व्यवहार केला जाई तेव्हा त्या व्यवहाराशी संबंधित लोकांना, पहिल्याप्रथम त्या व्यवहारातील पैशांची किंमत ठरवावी लागे. त्यामुळे सदैव गोंधळ माजत असे. आणि म्हणूनच नाण्यांचा एक नवा संच पाडण्यात आला. नवी नाणी जुन्या नमुन्याचीच होती. परंतु बायझन्टीन पद्धतीचे सोन्याचे दीनार, इराणी पद्धतीचे चांदीचे दिऱ्हॅम आणि हिमयाराईट पद्धतीची काही चांदीची नाणी एवढीच नवी नाणी पाडण्यात आली. त्यांच्या बनावटीत फारसा फरक नव्हता. परंतु इस्लामी जनतेला वापरण्यासाठी योग्य होतील अशा प्रकारे जुन्या बायझन्टीन नाण्यातच थोडा फरक करून काही नव्या नाण्यांची बनावट करण्यात आली. मूळ बायझन्टीन नाण्यांच्या दोन्ही[1] बाजूंवरील लॅटिन लिपींतील अक्षरांच्याऐवजी नव्या नाण्यांवर अरबी (कुफीक लिपीतील) अक्षरे कोरलेली होती. आणि क्रूस असलेला ध्वजदंड हाती धारण करणाऱ्या वरच्या बाजूच्या बायझन्टीन सम्राटाच्या आकृतिऐवजी हाती तलवार घेतलेल्या खलिफाची आकृती पुढील बाजूस आणि मागील बाजूस चार पायऱ्यांवर उभा असलेल्या क्रूसाच्या जागी डोक्यावर[2] एक चेंडू असलेला स्तम्भ अशी एकंदर नाण्याची बनावट होती. त्याचप्रमाणे अखेरच्या ससानियन राजांच्या ( दि कॉसरोज ) नाण्याच्या धर्तीवर चांदीची नाणी पाडलेली होती. कडेला चांद-तारे व 'बिस-मिल्लाह' ही अक्षरे यांची

---

१. एका बाजूस पुढील पंक्ती होत्या :
अल्लाशिवाय अन्य परमेश्वर नाही
मुहम्मद हाच देवदूत होय.

२. दुसऱ्या बाजूस पुढील पंक्ती होत्या :
अल्लाच्या वतीने,
हा दिनार हिजरी सन ७६ या साली पाडण्यात आला.

भर घालून थोडा बदल करण्यात आला होता. माबार्दीच्या म्हणण्याप्रमाणे ७०।६८९-९० या काळात पाडलेल्या सर्वांत जुन्या नाण्यांवर एका बाजूस 'शुभेच्छा' व दुसऱ्या बाजूस 'लिल्लाह' (अल्लाहपर्यंत) ही अक्षरे कोरलेली होती, तर नंतर एक वर्षाने इराकमध्ये पाडलेल्या हज्जाजच्या नाण्यांवर 'बिसमिल्लाह' ही अक्षरे व इराक प्रांताचा तत्कालीन सुभेदार हज्जाज याचे नाव कोरलेले होते. उमाय्यद खलिफांच्या काळापासून चालू असलेल्या नाण्यांचे अध्ययन करता असे दिसते की, उमाय्यद वंशातील खलिफा नाण्यांवर आपली नावे घालीत नसत, आणि खलिफा बदलला तरी त्यामुळे दमास्कससह कोठेही नाण्यांत बदल होत नसे. नवी नाणी सुरू केल्यानंतर नाणी कापणे किंवा तोडणे हा शिक्षायोग्य गुन्हा ठरविण्यात आला. तथापि या किरकोळ गुन्ह्यासाठी सजा करण्याच्या कायदेशीरपणाला इस्लामी पंडितांनी विरोध केला.

पुढे उमाय्यदांकडून अब्बासींकडे सत्ता गेली. या अब्बासींच्या नसांतून बरेचसे इराणी रक्त वाहात होते आणि बव्हंशाने इराण्यांच्या पाठिंब्यानेच ते सत्तेवर आले होते. बदवींच्या साध्या सरळ कारभार पद्धतीऐवजी त्यांच्या राजवटींत सरकारी कारभार गुंतागुंतीचा बनला. त्यात पुष्कळ बाबतीत इराण्यांचे अनुकरण केलेले होते. खलिफा ही आता साधे जीवन जगणारी आणि ज्याच्याकडे सर्वांना प्रवेश आहे अशी व्यक्ती राहिली नव्हती. आता सभोवती मंत्र्यांचा व सरकारी अधिकाऱ्यांचा गराडा असलेली खलिफा ही एक उच्चपदस्थ व्यक्ती बनली होती. आणि पूर्वी इराणांतील राजे ज्या चैनविलासांत राहात होते त्याची आता या खलिफांना संवय जडली होती. परंतु अब्बासी वंश खलिफापदावर आला त्याच काळात नेमके इस्लामी साम्राज्यांत नवेनवे प्रदेश आणि त्याचबरोबर नव्या लुटीचा पैसा येण्याची गती मंदावली; आता ते कठिण झाले होते पैसा क्वचित येत असे. त्यामुळे आपला स्वतःचा खाजगी खजिना भरण्याकरिता खलिफाला पूर्वीपासून स्थिरस्थावर झालेल्या साम्राज्यांतर्गत देशांतून मिळणाऱ्या करांच्या उत्पन्नांवरच अवलंबून राहणे भाग पडले.

या विभिन्न देशांतील प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या जमिनींचे अनेक वर्ग होते. उदाहरणार्थ : (अ) अश्र (दानधर्म कर) देणाऱ्या किंवा खराज (सर्वसाधारण कर) देणाऱ्या जमिनी. इस्लामी सत्ता येण्यापूर्वी या जमिनींकडून ज्या प्रकारचा कर मिळत असे त्यानुसार बहुधा या जमिनींची वर्गवारी केली जात असावी आणि या जमिनींना लागू केलेल्या मुस्लिम कायद्यांतील संज्ञा बहुधा केवळ वर्गवारीच्या निदर्शक असाव्यात.[१]

---

१. तत्त्वतः सर्व जमीन ही तमाम इस्लामी समाजाच्या मालकीची मानली जाते. जिंकून घेतलेली जमीन पुढील तीन वर्गांत वाटली होती :

(अ) ज्या जमिनींवरील मूळ रहिवाशांना हाकलून लावावे लागले असेल अशी जमीन. काही विधिपंडितांच्या मते अशी जमीन विजेत्यांमध्ये लुटीप्रमाणे वाटली जाते.

[ पुढील पान पाहा ]

( आ ) इराकमधील ज्या जमिनी मुळात ससानियन राजांच्या मालकीच्या होत्या आणि ज्या पुढे, खलिफांची व्यक्तिगत मालमत्ता बनल्या अशा जमिनी. तुर्कस्तानच्या सुलतानांच्या इराकमधील ' आरादी सानिया ' (शाही मालमत्ता) या वर्गातील जमिनींसारख्या या जमिनी होत्या. या जमिनींसाठी नेहमीच्या सरकारी दरापेक्षा जादा खंड द्यावा लागत असे. एखादा प्रदेश जिंकतेवेळी तेथील ज्या जमिनीचे मालक बेपत्ता असतील अशा जमिनी प्रथम सरकारच्या मालकीच्या होत आणि आपणाला योग्य वाटेल त्या पद्धतीने खलिफाला त्यांची विल्हेवाट लावता येई. अब्बासी खलिफांच्या अमदानीत शाही जमिनींची लागवड नेहमीच्या पद्धतीने केली जाई व त्यातील सर्व उत्पन्न खलिफाच्या खाजगी तिजोरीत जमा केले जाई. यापैकी बहुतेक जमिनी बगदादजवळील ' सावाद ' या संपन्न विभागात होत्या. मुक्तादिर खलिफांच्या काळात त्या जमिनींचा कारभार पाहण्यासाठी ' दिवान अल् दिया अल्–खासा ' नावाचा खास खाजगी मालमत्ता अधिकारी होता. ( इ ) जमिनीचा याव्यतिरिक्त आणखी एक प्रकार म्हणजे बुवेहिदांच्या आणि कधी कधी त्याही अगोदरच्या काळात युद्धातील सेवेचा मोबदला म्हणून ज्या जमिनी सैनिकांसाठी राखून ठेवल्या जात, अशा जमिनी. या ' कताई ' ( लष्करी वतन ) जमिनींसाठी ' खराज ' कर द्यावा लागत असे. मुस्लिमांची सत्ता आली त्यावेळी या जमिनींचे मालक कोण याचा पत्ता लागत नव्हता आणि म्हणून त्या बेत अल् मालची ( म्हणजे सरकारी खजिन्याची मालमत्ता म्हणून घोषित करण्यात आल्या. ( ई ) आणि अखेरचा जमिनीचा वर्ग म्हणजे पडित, लागवडीखाली न आलेल्या किंवा ' मृत ' ( आरादी मावात ) जमिनी. जे लोक या जमिनी लागवडीखाली आणू शकतील किंवा त्यांचा अन्य प्रकारे उपयोग करू शकतील अशा लोकांना खास अटींवर त्या खलिफा देऊ शकत असे.

खलिफाच्या नित्याच्या शासनविषयक कामाची कल्पना येण्यासाठी इब्ने अल् असीर या इतिहासकाराने सांगितलेली माहिती उद्धृत करण्यासारखी आहे. अब्बासी

---

[ मागील पानावरून ]

तर काहींच्या मते ती ' वक्फ ' किंवा सार्वजनिक मालकीची, समाजाच्या उपयोगासाठी असते. अशा जमिनीचे वाटप करण्यात आलें तर तिचे मालक ' अश्र ' कर देतात; मूळ रहिवाशांना त्या जमिनीवर परत राहू देण्यात आले तर ते ' खराज ' ( खंडणी ) देतात.

( २ ) ज्या जमिनींवर मूळ रहिवाशांना राहण्याची परवानगी दिलेली आहे अशा जमिनी. या जमिनीच्या वहिवाटदारांना वहिवाटीदाखल खंड म्हणून खराज द्यावा लागतो आणि म्हणून वहिवाटदारांनी इस्लामधर्म स्वीकारल्यानंतरदेखील त्यांना खराज द्यावा लागतो. वहिवाटदाराने आपली जमीन लागवडीस आणली नाही तर ती जप्त केली जाते.

( ३ ) ' खराज ' देण्याच्या शर्तीवर ज्या जमिनीवरील रहिवाशांशी शांततेचे करार केलेले आहेत अशा जमिनी.

वंशातील दुसरा खलिफा मन्सूर याच्यासंबंधी लिहिताना सदर इतिहासकार म्हणतो की, चांगल्या कामाच्या आज्ञा देणे आणि वाईट कामास मनाई करणे; आपल्या अधिकाऱ्यांना अधिकार देऊन कामे (विलायाह) नेमून देणे; त्यांना पदमुक्त करणे; साम्राज्याच्या सीमांचा व त्यालगतच्या प्रदेशांचा बंदोबस्त ठेवणे; रस्ते सुरक्षित ठेवणे; करव्यवहारांवर व खर्चावर देखरेख ठेवणे; आणि आपल्या प्रजेच्या कल्याणाची दक्षता घेणे. अशासारख्या कामात खलिफा सदैव गुंतलेला असे.

यापैकी महसूलावर देखरेख ठेवण्याचे काम साहजिकच प्रथम क्रमांकाचे होते. पूर्वीच्या काळात ते फक्त एक महत्त्वाचे काम मानले जाई. परंतु आता त्या कामाव सारा सरकारी कारभार अवलंबून होता. सरकारी[१] तिजोरी व खलिफाचा खाजगी[२] खजिना या तत्त्वतः दोन निरनिराळ्या गोष्टी होत्या तरी खलिफाचे या दोहोंवरही नियंत्रण असल्यामुळे स्वतः खलिफा प्रत्यक्ष व्यवहारात या दोन्हीत फारसा फरक करीत नसे. किंवा असे म्हणतात की खलिफाच्या खाजगी खजिन्यात जमा होणारा बराचसा पैसा या जमिनींवरील करांच्या व दंडांच्या रकमांचा असे. हे खरे असेल तर खलिफा हरून अल् रशीदला आपल्या मृत्युसमयी आपल्यामागे सरकारी खजिन्यात (बेत अल् मालमध्ये) ९० कोटी दिऱ्हाम[३] इतकी प्रचंड रकम कशी शिल्लक ठेवता आली हे समजणे कठीण आहे. त्याचप्रमाणे खलिफा मुक्तादिर याच्यापाशी एकेकाळी ५ लक्ष दिनार एवढी संपत्ती होती. असे म्हणतात की, मुक्तादीरच्या पूर्वीचा खलिफा मन्सूर एकदा असे म्हणाला होता की, राज्याच्या भरभराटीसाठी चार अधिकाऱ्यांची आवश्यकता असते. न्यायी काझी, न्यायी सुरक्षा अधिकारी (साहेब अल्-शुर्ता), [माझ्या प्रजेची वाटेल तशी लुबाडणूक करून (स्वतः) मी गबर झालो आहे हे लक्षात घेता] बळजबरीने लुबाडणूक न करता चौकशी करणारा महसूल अधिकारी आणि अखेर, या सर्व अंमलदारांविषयींची खरी माहिती देईल असा 'बारीद' अधिकारी. महसूल अधिकाऱ्यासंबंधी बोलताना खलिफाने कंसात दिलेले जे उद्गार काढले त्यावरून सरकारी पैशाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन पुष्कळच स्पष्ट होतो. तथापि स्वतःच्या तिजोरीशिवाय सरकारच्या तिजोरीची खलिफावर जी जबाबदारी होती ती स्वतः खलिफाच्या दृष्टीने नेहमीच फायदेशीर ठरत नसे. ज्यांना दरोडेखोरच (खरे तर त्यापेक्षाही जास्त काही तरी) म्हटले पाहिजे- असे बुवेहिद राजे सत्तेवर येण्यापूर्वीच्या अशांततेच्या काळात असाही थोडा काळ होता की,

---

१. बेत माल अल्-मुस्लिमी.

२. बेत माल अल्- खासा.

३. अगदी नेमस्त अंदाजानुसार ही रकम २ कोटी स्टर्लिंग पौंडाएवढी असेल. हरून अल् रशिद याचा आजा मन्सूर याने ९६ कोटी दिऱ्हाम एवढी संपत्ती जमा केली होती. परंतु ती त्याच्या मुलाने- माहदीने (हरूनचा बाप) मूर्खपणाने उधळली असे म्हणतात.

ज्यावेळी खिलाफतीमधून अनेक प्रदेश फुटून निघाले होते आणि महसुलाचे उत्पन्न घटले होते. त्यामुळे त्या काळात धर्मनिष्ठांच्या सेनापतीला (खलिफाला) स्वतःच्या खजिन्यातील पैसा सरकारी कामासाठी खर्च करावा लागत असे. एकदा सरकारी तिजोरी रिकामी पडली तेव्हा खलिफा मुक्तादिर याला बंड करून उठलेल्या भाडोत्री सैन्याचा पगार आपल्या स्वतःच्या खजिन्यातून चुकता करण्याकरिता ३ लक्ष दिनार खर्च करावे लागले. आपल्या कारभाराची तरफदारी करताना सुप्रसिद्ध वझीर अली इब्ने इसा याने असे उद्गार काढले होते की, आपल्या अगोदरच्या वझीराने खलिफाच्या खाजगी खजिन्यातील जेवढा पैसा खर्च केला त्याच्या एकदशांश पैसादेखील आपण खर्च केलेला नाही.

या प्रश्नाच्या बाबतीत खलिफांविषयी सहानुभूती वाटण्याचे फारसे कारण नाही. कारण जवळपास सर्व खलिफांनी आपल्या प्रजाजनांना, विशेषतः आपल्या माजी मंत्र्यांना आपल्या तिजोऱ्या भरण्यासाठी बेकायदेशीरपणे लुबाडलेले आहे. उदाहरणार्थ, खलिफा मुक्तादिरच्या मुहासिन या भूतपूर्व मंत्र्याच्या विधवेकडून खलिफाच्या हस्तकाने ७ लक्ष दिनार जबरदस्तीने घेतले आणि ते खलिफाच्या खाजगी खजिन्यात जमा केले. अशा-प्रकारे जबरदस्तीने लुबाडलेल्या पैशाची काही वेळा सरकारी तिजोरी व खलिफाचा खाजगी खजिना या दोहोंत वाटणी केली जात असे. स्वतःच पदभ्रष्ट केलेल्या आपल्या मंत्र्यां-कडून बहुतेक बलिष्ठ खलिफांनी अशा तऱ्हेने जबरदस्तीने पैसा उकळला व त्यासाठी त्यांचा छळदेखील केला. अशा मार्गांनी आपल्या तिजोरीत भर घालण्याच्या बाबतीत मुतावक्कील हा क्रूर व जुलमी खलिफा विशेष कुप्रसिद्ध आहे. एखाद्या मंत्र्याला अशा प्रकारे लुबाडण्यात आले तर ते त्या मंत्र्याच्या दृष्टीने नामुष्कीचे समजले जात नसे आणि पुष्कळदा त्याला त्याच्या अधिकारपदावर राहू दिले जात असे. स्वाभाविकच लुबाडण्याचे हे 'अधिकृत' प्रकार फक्त खलिफाच करीत होते असे नाही. गझनीचा सुल्तान मसूद यानेही असे उद्योग केल्याची उदाहरणे नमूद आहेत. त्याने एकदा खजिनदार नियाल तागिन या अधिकाऱ्याकडून मोठी रक्कम उपटली आणि त्याला सुभेदार म्हणून हिंदु-स्थानात पाठविले. इस्लामी इतिहासाच्या तिसऱ्या शतकामध्ये तर 'दिवान अल्-मुसादरीन' किंवा 'लुबाडलेल्या पैशाचे खाते' या नावाचे एक अधिकृत खाते होते आणि त्या खात्यासाठी इतर 'दिवानां' प्रमाणे मंत्री नेमले जात असत. हे खाते पूर्वीच्या 'बेत माल अल् मझालिम' (अन्यायाने लुबाडलेल्या पैशाचा खजिना) या खास स्थापन करण्यात आलेल्या खात्यातून जन्मले असावे. बळजबरीने पैसा उकळण्याच्या आरोपावरून ज्यांना पदमुक्त करण्यात येई अशा सर्व अमीलांचा (प्रांतिक अंमलदार किंवा महसूल अधिकारी) पैसा व इतर मालमत्ता जप्त करण्याकरिता खलिफा मन्सूर याने या खात्याची निर्मिती केली होती. या खात्यात जमा करण्यात आलेल्या प्रत्येक ठेवीवर काळजीपूर्वक चिठ्ठ्या लावल्या जात. मन्सूरच्या मृत्यूनंतर त्या ठेवी त्यांच्या मूळ मालकांना परत केल्या जावयाच्या होत्या.

सरकारी तिजोरीसाठी पैसा मिळविण्याच्या या मार्गाचा ज्या परिस्थितीत जन्म

झाला ती लक्षात घेता हा मार्ग अवलंबिला जाणे स्वाभाविकच होते. कारण कोणतीही हुद्द्याची जागा हा संपत्तीकडे नेणारा मार्ग आहे असे सरळसरळ मानले जात असे. ज्या अधिकाऱ्याची संपत्ती काढून घेतली जाई ते अधिकारी गरीब बिचाऱ्या शेतकरी वर्गाकडून विभिन्न मार्गांनी पैसे उकळीत आणि गमाविलेल्या संपत्तीची भरपाई करीत. शेतकरी वर्गाला मात्र कायदेशीर सरकारी कर तर द्यावा लागेच पण त्याबरोबरच बेकायदेशीरपणे वसूल केला जाणारा असा पैसाही द्यावा लागे. अबु युसूफ याने खलिफाला जे अनेक अनिष्ट प्रकार नाहीसे करण्याचा सल्ला दिला होता त्यासंबंधी त्याने स्वतःच लिहून ठेवले आहे. त्यातला एक प्रकार म्हणजे महसूल अधिकारी दौऱ्यावर असताना त्यांच्या खाण्यापिण्याचा व सरकारी लिखाणासाठी वापरल्या जाणाऱ्या कागदाचाही खर्च शेतकऱ्यांना करावा लागे. एवढेच नव्हे तर आपल्या पिकांतील सरकारला द्यावयाचा वाटा मोजण्या-मापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वजनमापांबद्दल शेतकऱ्यांना भाडे द्यावे लागे. तसेच सरकारी देणे देण्यासाठी येणाऱ्यांकडून जबरीने पैसा उकळला जात असे. कोणी एखादा शेतकरी सरकारी कर देण्याकरीता दिऱ्हीम नाणी घेऊन आला की त्या नाण्यांची चालू किंमत कमी आहे असे सांगून त्याच्याकडे जादा नाण्यांची मागणी केली जात असे. असे प्रकार अनेकदा घडत. कराची रकम घेऊन आलेल्या माणसाने जादा रकम देण्यास का कू केली तर त्याला दोरखंडाने बांधून कडक उन्हात उभे केले जाई किंवा 'जार्‍रा' ( गळफास ) देखील लावला जाई.

खलिफाच्या खाजगी तिजोरीहून भिन्न असलेला असा जो सरकारी खजिना किंवा इस्लामी साम्राज्याचा खजिना त्याला 'बेत अल् माल' (सरकारी संपत्तिभवन) असे म्हणत. ही संज्ञा एखाद्या विशिष्ट इमारतीशी किंवा जागेशी संबंधित नव्हती. नाण्यांच्या किंवा वस्तूंच्या स्वरूपातील जी संपत्ती सर्व इस्लामी समाजाच्या मालकीची समजली जाई आणि खलिफाचे अमील, अधिकारी किंवा कर वसूल करणारे अंमलदार यांच्यामार्फत जी संपत्ती जमा होई तिच्याशी संबंधित अशा खलिफाच्या कामाला ही संज्ञा लावली जात असे.

'बेत अल्-माल' मध्ये सिद्धान्ततः पुढील तीन मार्गांनी पैसे जमा होतः ( १ ) 'फे' किंवा मुस्लिमांनी जिंकलेल्या देशांकडून मिळणारी खंडणी, ( २ ) गनिमा म्हणजे लढाईत मिळालेली लूट आणि ( ३ ) सदाक म्हणजे दानधर्म कर.

( १ ) 'फे'च्या रकमेचा एक पंचमांश हिस्सा वगळून बाकीच्या रकमेवर 'बेत अल् माल'चा हक्क असे. इमामाला म्हणजे खलिफाला त्या रकमेची आपल्या मर्जी-प्रमाणे विल्हेवाट लावता येत असे.

( २ ) लढाईत मिळविलेली लूट म्हणजे 'गनिमा'. ज्यांनी लूट मिळविली असेल त्यांच्यामध्ये तिचा चार-पंचमांश हिस्सा वाटला जाई आणि उरलेल्या पाचव्या हिस्स्याचे

तीन भाग करून त्यातला एक हिस्सा ' बेत अल् माल ' मध्ये जमा केला जाई. या हिश्श्याला पैगंबरांचा हिस्सा म्हणत. इमाम आपल्या विचारानुसार मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी त्या हिश्श्याचा पैसा खर्च करी. बाकी दोन हिश्श्यांपैकी एक पैगंबरांच्या नातलगांना द्यावा लागे. त्यामुळे त्यावर इमामाचा अधिकार चालत नसे आणि त्या हिश्श्याचा पैसा ' बेत अल् माल 'च्या तिजोरीलाही मिळत नसे. उरलेला तिसरा वाटा ' बेत अल् माल ' कडे जाई. अनाथ मुले, गोरगरीब व वाटसरू यांना सहाय्य यासारख्या धर्मादाय कामांसाठी तो वापरावा लागे.

( ३ ) ' सदाक ' ( दानधर्म कर ) कराचे दोन प्रकार होते :

( अ ) मालकाने जाहीर न केलेल्या त्याच्या मालमत्तेवरील ' सदाक ' कर. या प्रकारच्या कराची रक्कम मालकाने आपल्या इच्छेप्रमाणे पण तत्काळ खर्च करावयाची असते.

( आ ) मालकाने उघडपणे मान्य केलेल्या संपत्तीवरील–म्हणजे शेतजमिनी, फळझाडे व गुरेढोरे यांच्यावरील कर. यापैकी शेतजमिनी व फळझाडे यांच्यावरील कराला ' अश्र ' ( दानधर्मासाठी काढून ठेवलेला हिस्सा ) आणि गुराढोरांवरील कराला धर्मादाय कर, सदाक किंवा जकात कर म्हणतात. दानधर्म कर घेण्याचे हेतू कुराणामध्ये ( ९<sup>६०</sup> ) स्पष्टपणे सांगितले आहेत : " गोरगरीब व गरजू, हा कर जमा करणारे, तसेच ज्यांची अंतःकरणे इस्लामला अनुकूल करण्यात आली आहेत अशी माणसे, कैद्यांच्या व कर्जबाजारी लोकांच्या ( सोडवणुकीसाठी ) आणि ईश्वरी मार्गासाठी जे ( लढत ) आहेत असे लोक व वाटसरू " यांच्यासाठी या कराचा पैसा वापरला पाहिजे.

' बेत अल् माल 'मध्ये ' गनिमा ' ( लूट ) व्यतिरिक्त खराज, अश्र व जकात या तीन करांद्वारे पैसा जमा होत असे. मुस्लिम साम्राज्याच्या सीमांच्या अंतर्गत असलेल्या जमीनजुमल्यावरील हे कर होते. या जमीनजुमल्याची कब्जेदार व्यक्ती मुस्लिम असो की ' आश्रित ' मुस्लिमेतर व्यक्ती असो, तिची जमीन इस्लामी समाजाच्या मालकीची समजली जात असे. कारण तत्वतः ही मालमत्ता इस्लामच्या विजयामुळे मिळालेली होती. जित देशांतील जमिनींची ( उदाहरणार्थ, इराक व सीरियामधील ) वाटणी ते देश जिंकणाऱ्या लोकांमध्ये करण्यास उमरने विरोध केला होता अशी पारंपरिक समजूत आहे. कारण उमरचे असे मत होते की, अशा रीतीने जित प्रदेशांतील जमिनी वाटल्या तर इस्लामजवळ आपली प्रगती करण्यासाठी काहीच उरणार नाही. परंतु लुटीची गोष्ट त्याच्या मते वेगळी होती. एक तत्त्व म्हणून ' फे ' किंवा जित देशांकडून मिळणारी खंडणी हा देखील त्या देशांकडून मिळालेला खराज किंवा मिळकत होय. तथापि खराज कर सर्वच जमिनींवर न बसविता फक्त दोन प्रकारच्या जमिनींवर आकारला जावा. पहिला प्रकार– ज्या प्रदेशांतील रहिवाशांनी काही अटींवर तडजोड केलेली आहे आणि ज्या तडजोडीतील एक अट त्यांनी आपल्या राजाचा त्याग करावा ही आहे– अशा

प्रदेशांतील जमिनी.[1] या जमिनींची विक्री केली जाऊ नये. तसेच या जमिनींवर बसविलेला 'खराज' हा एक प्रकारचा खंड असल्यामुळे त्या प्रदेशातील रहिवाशांनी इस्लामधर्म स्वीकारला तरी तो द्यावा लागतो आणि मुस्लिम व 'आश्रित' समाज अशा दोघांकडूनही तो घेतला जातो. दुसरा प्रकार– ज्या प्रदेशातील रहिवाशांशी मुस्लिमांनी तडजोड केलेली आणि तडजोडीमधील एक अट स्थानिक राजाची सत्ता चालू राहील ही आहे– असे प्रदेश.[2] या दुसऱ्या प्रकारच्या प्रदेशातील जमिनी विकता येतील. तेथे बसविलेला 'खराज' हा एक ('जिझिया') कर असतो, आणि तो ज्यांच्यावर बसविलेला असेल त्यांनी इस्लामधर्म पत्करला म्हणजे तो रद्द होतो. हा कर 'आश्रित समाजा'कडून घेतला जातो, मुस्लिमांकडून घेतला जात नाही.

खराज प्रदेशाची काहीशी निराळी व्याख्या अबु युसूफ याने केली आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे विजेत्या खलिफाने जे अरबेतर प्रदेश तेथील मूळ रहिवाशांपाशीच ठेवले आहेत असे सर्व प्रदेश. तसेच ज्या प्रदेशातील रहिवाशांनी इस्लामशी समझौता केला आहे व इस्लामचा आश्रय (धिम्मा) पत्करला आहे, अशा सर्व अरबेतर प्रदेशांना 'खराज प्रदेश' म्हणतात. ज्या प्रदेशातील रहिवाशांनी बिनतक्रार इस्लामचा स्वीकार केला आहे किंवा "इस्लाममध्ये या नाहीतर मरायला तयार रहा" अशी धमकी दिल्यानंतर इस्लाम पत्करला आहे आणि ज्यांना 'आश्रित' होण्याचा पर्याय दिलेला नाही–असे (अरबेतर) प्रदेश काही थोडे अपवाद सोडून 'अश्र' (दानधर्माचा हिस्सा) ला पात्र समजले जातात. त्यांना 'खराज' लागू होत नाही. त्याचप्रमाणे अशा प्रदेशातील जे मुस्लिमेतर रहिवासी 'खराज' देतात, त्यांनी जिझियादेखील दिला पाहिजे असेही मानले जाते.

'खराज' करासंबंधी या ठिकाणी नमूद केलेली सूत्रे इस्लामी इतिहासाच्या दुसऱ्या शतकाच्या अगोदर अस्तित्वात नव्हती. दुसऱ्या शतकाच्या सुमारास कोणतीही जमीन धारण करणाऱ्या मुस्लिमावर सर्व मुस्लिमांस द्याव्या लागणाऱ्या दानधर्म 'सदाक' किंवा जकात कराव्यतिरिक्त 'खराज' करही लादण्यात आला होता. अगदी पूर्वीच्या काळी मुस्लिमांना 'खराज' द्यावा लागत नसे. खलिफा उमरच्या अमदानीत कोणाही अरब मुस्लिमाला जित प्रदेशातील जमीन आपल्याकडे मालकीहक्काने ठेवता येणार नाही या नियमाचे कडकपणे पालन होत होते, आणि ज्या मुस्लिमेतर लोकांकडे जित प्रदेशातील जमिनी असत, त्यांच्याकडून मिळणारा खंडणीचा पैसा मोठ्या प्रमाणात सरकारी खजिन्यात जमा होत असे. परंतु पुढे या नियमाची अंमलबजावणी स्थगित झाली आणि

---

१. उदाहरणार्थ, इराणचे प्रदेश. इस्लामने त्यावर सत्ता मिळविल्यावर तेथील राजाला पदच्युत करण्यात आले होते.

२. असे प्रदेश म्हणजे फक्त हल्ला करण्यात आलेले अणि प्रत्यक्ष अंकित न केलेले प्रदेश. उदाहरणार्थ, बायझन्टीन साम्राज्यातील किंवा हिंदुस्थानातील प्रदेश.

सरकारी उत्पन्नावर त्याचा परिणाम होऊ लागला. त्यामुळे पुढे हज्जाज या इराकच्या उमाय्यदकालीन सुभेदाराने आपल्या नियंत्रणाखालील सर्व जमीनमालकांना जमीनकर सक्तीचा केला. याबाबतीत इस्लामचे अनुयायी असलेले किंवा नसलेले असा कोणताही भेद ठेवण्यात आला नव्हता. मुस्लिमांना करमुक्त करून इस्लामच्या प्रसाराला प्रोत्साहन देण्याच्या खलिफा दुसरा उमर याच्या धोरणामुळे परिस्थिती आणखीच चिघळली होती. धर्माचे अधिकार व सरकारी तिजोरीचे अधिकार या दोहोमध्ये संघर्ष सुरु झाला. (खुरासानवरील विजयाच्या इतिहासातून हा संघर्ष कसा झाला याची कल्पना येते.) अखेर मुस्लिम किंवा मुस्लिमेतर असा भेद न करता सर्व जमीनमालकांवर 'खराज' बसविला गेला. आणि मुहम्मदीधर्मीय देशांतील प्रत्येक रहिवाशाने 'जमीनकर' म्हणजेच 'खराज' दिला पाहिजे असे सूत्र ठरविण्यात आले. त्याशिवाय 'धिम्मी'वर (आश्रित समाज–ज्यू, ख्रिश्चन्स व तत्सम) जिझियासारखा बदनामीकारक करही लादण्यात आला. 'खराज' व 'जिझिया' या दोन मूलतः पर्यायवाची संज्ञा आहेत यात फारशी शंका नाही. हिजरीच्या पहिल्या शतकातील अरबी हस्तलिखितांत फक्त जिझियाचा उल्लेख आढळतो. या संज्ञेचा सर्वसाधारण अर्थ 'खंडणी' असा होता. पुढे जिझियाला 'खराज अला रूस अहल अल् धिम्मा' म्हणजे 'आश्रित समाजांवरील कर' असे म्हटले जात असावे[1]. या संज्ञेचा अर्थ आणखीही मर्यादित असावा. अबु हनीफा या विधिपंडिताच्या म्हणून सांगितल्या जाणाऱ्या पुढील विधानावरून तो स्पष्ट होतो : "कोणाही व्यक्तीवर एकाच वेळी जकात व खराज बसविता येणार नाही."

'बेत अल् माल'ला मिळणाऱ्या वेगवेगळ्या कर उत्पन्नांमध्ये खराजचे उत्पन्न सर्वात महत्त्वाचे होते. इस्लामी साम्राज्यामधील निरनिराळ्या प्रदेशांत कर-आकारणीच्या ज्या विभिन्न पद्धती प्रचलित होत्या, त्या पद्धतींनुसार खराजची आकारणी तेथे केली जात असे. तथापि ज्या पद्धतीने कराची आकारणी प्रत्यक्षात होत असे, त्याच्याशी कर आकारणीचे सूत्र नेहमीच सुसंगत असे असे नाही. तसेच कर-आकारणीच्या अगोदरच्या पद्धतीत खलिफाच्या लहरीनुसार बदलही होऊ शकत असे. इराकमधील 'सवाद' जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या पिकांतील जो हिस्सा कर म्हणून द्यावा लागे तो खलिफा मामुन याने एकद्वितीयांशावरून दोनपंचमांश एवढा–म्हणजे २० टके कमी केला होता. पुढे मामुनने हिजरी २०३ मध्ये रेय्य या शहराने (प्राचीन व्हेजिस) द्यावयाच्या कराच्या रकमेत दोन दशलक्ष दिर्हाम एवढी पुन्हा कपात केली. रेय्य या शहराला देण्यात आलेल्या या सवलतीमुळे प्रोत्साहन मिळून

१. "शेतकऱ्याला आपल्या जमिनीतील उत्पन्नानुसार खराज कर द्यावा लागे, तर 'धिम्मी'ला (ज्यू, ख्रिश्चन वगैरे 'आश्रित') ला दर 'डोई' हा कर द्यावा लागे."

त्यानंतर सात वर्षांनी आपल्यावरील 'खराज'च्या रकमेत कपात व्हावी अशी कुम्म शहरवासियांनी विनंती केली, तेव्हा मात्र खलिफा मामुन याने ती धुडकावून लावली. त्यामुळे कुम्म शहरवासियांनी कोणताही कर द्यावयास नकार दिला. परंतु त्यांच्यावर सैन्य पाठवून मामुन याने त्यांना ताब्यावर आणले; एवढेच नव्हे तर त्यांच्यावरील मुळातली 'खराज' कराची दोन दशलक्ष दिर्‍हामची रकम सात दशलक्षांपर्यंत वाढविली. महसूल व्यवस्थेवर खलिफाची किती पकड होती याचे आणखी एक उदाहरण तिसरा अब्बासी खलिफा माहदी याच्या अमदानीत ( ७७५–८५ ) मिळते. माहदीच्या काळापर्यंत लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या क्षेत्रानुसार रोखीने कर वसूल केला जात असे. परंतु त्याऐवजी जमिनीतील उत्पन्नावर कर ( रोख पैशात की वस्तूंच्या रूपात हे स्पष्ट नाही. ) बसवून उत्पन्नात वाढ करावी; तसेच खजुरीच्या व इतर फळझाडांवर त्याच पद्धतीने करआकारणी करावी या गोष्टीस वझीर उबेद अल्ला याने खलिफाला राजी केले होते.

प्रजेच्या हालअपेष्टा नाहीशा करण्याच्या बाबतीत तसेच समाजातील दुर्व्यवहारांना आळा घालण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याच्या बाबतीत खलिफाच्या मध्यवर्ती सरकारची गति सामान्यतः मंद होती. तरीदेखील काहीच शासनविषयक सुधारणा झाल्या नाहीत असे नाही. 'खराज' हा पीक हंगामानंतर वसूल केला जाणारा कर होता. या करासाठी सौर वर्ष हे आर्थिक वर्ष मानले जात असे. एके काळी इराण्यांच्या ताब्यात असलेल्या भागात ससानियनांचा 'नवरोझ' ( नववर्ष दिन ) ही सदर कर भरण्याची तिथी होती. नवरोझ हा पूर्वी उत्तरायणाच्या मध्यास ( २१ जून ) साजरा केला जात असे. त्या सुमारास इराणमध्ये सातूचे व गव्हाचे पीक हाती येत असे. तथापि त्यावेळी इराणमध्ये उपयोगात असलेले पंचांग प्रत्यक्ष सौर वर्षाशी जुळत नव्हते. त्यामुळे परिणामी नवरोझची तिथी हळूहळू वसंत ऋतुपर्यंत पुढे गेली. २८२–८९५ या वर्षी नवरोझची तिथी सत्तर दिवसांनी पुढे होती. परंतु सरकारी अधिकारी अद्याप जुन्या पंचांगाप्रमाणे काम करीत असत, आणि त्यामुळे शेतकऱ्यांना अतिशय त्रास होत असे. कारण शेतातील पीक हाती येण्यापूर्वी खूपु अगोदर त्यांच्याकडून कराची रकम वसूल केली जाई. ही अडचण दूर करण्यासाठी खलिफा मुतादिद याने त्या साली ( २८२ । ८९५ ) कराचा भरणा करण्याची मुदत सीरीयन ( रूमी ) सौर पंचांगातील हाझिरान ( जून ) महिन्याच्या ११ तारखेपर्यंत म्हणजे ६० दिवसांनी वाढवून[१] दिली. या सुधारणेचा इजिप्तमधील

१. त्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी खलिफा मुत्ताकी याच्या कारीदी या नावाच्या एका दुष्ट मंत्र्याने पुनःश्च आधार ( मार्च ) मधील जुन्या तिथीप्रमाणे करवसुली करण्याची पद्धती सुरू केली आणि खराज कराची रकम आगाऊ जमा केली. तसेच दुसऱ्या एका वझीराने एकाच वर्षात त्या वर्षाचा व त्यापुढील वर्षाचा खराज गोळा केला आणि सरकारच्या रिकाम्या खजिन्यात विपुल पैसा जमा केला.

खिश्चन शेतकऱ्यांनाही फायदा मिळाला. ते शेतकरीदेखील इराणी नववर्ष मानीत[१] असत.

मुक्तादिर (९०८-३२) याचा वझीर अली इब्ने इसा याने जी सुधारणा केली असे मानले जाते ती विशेषतः इराणमधील फार्स प्रांताच्या संदर्भातील आहे. 'तक्मीला' या नावाने तेथे प्रचलित असलेल्या पद्धतीमुळे लोकांना खूप त्रास होत होता. विभिन्न जिल्ह्यांनी द्यावयाच्या 'खराज'च्या बाऊक रकमा या पद्धतीद्वारे ठरवून दिल्या जात. ससानियनांच्या काळापासून ही पद्धत चालू होती. एखाद्या विशिष्ट जिल्ह्यातील करपात्र अशा शेतकऱ्यांनी कमी जबर कर असलेल्या दुसऱ्या जिल्ह्यात पळून जाऊन कर चुकविला असेल तर त्यांच्या वाट्याचा कराचा हिस्सा मागे राहिलेल्या त्यांच्या लोकांना द्यावा लागे. कराची आकारणी बहुधा जबर असल्यामुळे कर चुकता करण्यासाठी त्यांना आपल्या जमीनजुमल्याचा काही हिस्सा विकावा लागे. यावर कठोर टीका होऊ लागली तेव्हा खलिफाने 'तक्मीला' पद्धत रद्द करून तिच्या जाचातून शेतकऱ्यांची मुक्तता केली. मात्र खलिफाने तोवर लागू नसलेला फळझाडांवरील नवा कर लादला आणि एकूण कराचे पूर्वीचे उत्पन्न कायम राखले.

'तक्मीला'च्या दुःसह ओझ्याखाली चिरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीची राजधानीत चौकशी झाली. त्यासंबंधीचा एक मजेदार वृत्तान्त सांगितला जातो. धान्य पिकविणाऱ्या जमिनींच्या मालकांपैकी काही जरा धीट मालकांनी एकदा अशी तक्रार गुदरली की कराची आकारणी होईपर्यंत आपणास आपले धान्य रांजणांत ठेवावे लागते आणि त्यामुळे ते सडते, नाश पावते. पुराव्यादाखल त्यांनी धान्याचे नमुने सादर केले आणि अशी तक्रार केली की, धान्याचा पैसा मिळत नसल्यामुळे आम्हाला मजुरी करावी लागते; एवढेच नव्हे तर आम्हाला आमच्या घरातील बायकांच्या डोक्यावरील केस कापून विकावे लागतात. या लोकांनी पुढे असेही सांगितले की, याउलट फळ-उत्पादकांना मात्र कोणतीही तकलीफ नाही. हे फळ-उत्पादक पिकवीत असलेल्या फळांचे (अंजीर, अल्बुखार, बदाम, पिस्ते इत्यादी) नमुनेही त्यांनी दाखविले. फळ-उत्पादकांनी आपली बाजू मांडताना सांगितले की आम्ही फळझाडे विकत घेण्यासाठी पैसा ओतला आहे आणि आमच्यावर कर बसविण्यात आला तर आम्ही आमचा पैसा निष्फळ खर्च केला असे होईल. खलिफा माहदी याने फळझाडांवरील कर रद्द केला होता असाही त्यांनी दावा केला. तथापि 'तक्मीला' पद्धतीने कर देणाऱ्या शेतकऱ्यांची बाजू मजबूत ठरली आणि मागे सांगितल्याप्रमाणे खलिफाने 'तक्मीला' पद्धत रद्द केली.

करपद्धतीच्या क्षेत्रांतील एकसारखेपणा सिद्धान्तकर्त्यांना समाधानकारक वाटत

---

१. तेथील खिश्चनधर्मीय नागरिक अद्यापदेखील 'नवरोझ' हाच आपला नव-वर्ष दिन समजतात. सप्टेंबरच्या १० किंवा ११ तारखेला हा नववर्ष दिन येतो.

असे. त्यांनी करांचे वेगवेगळे प्रकार, ते कोणाकोणाला आणि किती द्यावे लागतात याविषयी पद्धतशीर विवेचन केलेले आहे. मावार्दीच्या मतानुसार इराकच्या सवाद प्रदेशातील (तैग्रिस–युफ्रेतिस खोऱ्याच्या सखल भागातील संपन्न प्रदेश) काही भागात अगदी पूर्वी जमिनीच्या प्रत्येक 'जारिब' (६०×६० गज) मागे एक 'काफिझ[1]' धान्य व रोख एक दिऱ्हाम खारिज कर आकारला जात असे. कराचा हा दर खलानियनांच्या काळातील होता. या करआकारणी-मध्ये उमरने बदल केला. त्याने त्या प्रदेशासाठी पुढील दराप्रमाणे कर बसविण्याचा अधिकार देऊन एक अधिकारी नियुक्त केला. द्राक्षमळ्याच्या किंवा दाट लागवड केलेल्या फळझाडांखालील जमिनीच्या प्रत्येक 'जारिब'मागे १० दिऱ्हाम, खजुरीच्या झाडांवर ८, ऊसावर ६, लवंगांवर ५, गव्हावर ४ आणि सातूवर २. सीरियात या कराचे दर निरनिराळे होते. आणि तेथेही खराजची आकारणी सरसकट दराने न करता करभार सहन करण्याच्या प्रत्येक जमिनीच्या क्षमतेचा आणि जमिनीला ज्या पद्धतीने पाणीपुरवठा केला असेल तिचा विचार करून करआकारणी केली जावी अशा अधि-काऱ्यांना सूचना दिल्या होत्या. कारण जनावरांच्या सहाय्याने किंवा पाणचक्कीने कृत्रिमपणे भिजविल्या जाणाऱ्या जमिनींना ओढे-नाल्यांच्या अथवा पावसाच्या पाण्याने भिजविल्या जाणाऱ्या जमिनींइतका कर देणे परवडणे शक्य नव्हते.

खराज कराच्या योजनेत पद्धतशीरपणा आणण्याचे काम उमरने केले असे म्हटले जात असले तरी असा पद्धतशीरपणा इस्लामी इतिहासाच्या चौथ्या शतकातही अस्तित्वात होता असे सांगतात. याविषयी या ठिकाणी अधिक विचार करणे शक्य नाही. ही खराज करव्यवस्था इराक तसेच बहुधा सीरियामध्ये चालू असलेल्या करआकारणीच्या पद्धतीशी खूपच मिळतीजुळती आहे. निरनिराळ्या जमिनींवर बसविल्या जाणाऱ्या करांचे जे विभिन्न प्रमाण मावार्दीने नमूद केले आहे ते त्या बाबतीत त्याला असलेल्या माहितीच्या आधारे आहे हे उघडच आहे. तसेच मावार्दीच्या फार पूर्वी ज्या गोष्टी रूढ होत्या आणि ज्या वस्तुतः अद्यापही चालू होत्या त्यांचे त्याने विवेचन केले आहे. त्यामुळे त्याला आपल्या आवडत्या पद्धतीप्रमाणे सुव्यवस्थित आकडेवारी देणे शक्य झालेले नाही. 'अश्र' किंवा दानधर्म हिस्सा गोळा करण्यासंबंधीची मागे सांगितलेली योजना ही मावार्दीच्या तात्त्विक पद्धतीला अधिक अनुरूप आहे. खराज करपद्धतीप्रमाणेच 'अश्र' करयोजनादेखील मुळात उमरने चालू केली असे सांगितले जाते. मुस्लिमांकडून घेतला जाणारा 'अश्र' दानधर्म कराप्रमाणे समजला जातो तर धिम्मी (शत्रु प्रदेशा-

---

१. एक 'काफिझ' म्हणजे ८ रत्तल असावेत. परंतु निरनिराळ्या देशांत विभिन्न काळात एका रत्तलाचे वजन वेगवेगळे असे. त्यामुळे एक रत्तल म्हणजे किती याचा निश्चित अंदाज करता येत नाही. सांप्रत इजिप्तमध्ये एक रत्तल = सुमारे २$\frac{1}{2}$ किलोग्रॅम किंवा ५ पौंड १० औंस असे प्रमाण आहे.

तील रहिवासी ) कडून घेतला जाणारा 'अश्र' हा 'खराज' कर समजला जातो. तसेच एखाद्या व्यापाऱ्याने 'अश्र' वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला आपण आपल्या मालावर अगोदरच दानकर दिलेला आहे असे शपथेवर सांगितले तर त्याचा माल 'अश्र' करातून वगळला जात असे. याचा अर्थ 'अश्र' व 'दानकर' हे दोन्ही कर समान समजले जात होते. आणि फक्त मुस्लिमालाच दान-कर द्यावा लागत असल्यामुळे तो न देणाऱ्या मुस्लिमेतरांना 'अश्र'ची सूट मिळू शकत[1] नसे.

अबु हनिफाच्या मतानुसार लाकूड, बी-बियाणे व गवत या वस्तू वगळता जमिनी-तून उत्पन्न होणाऱ्या इतर सर्व वस्तूतील काही हिस्सा दानासाठी कर म्हणून द्यावयाचा असतो. पिकाच्या एकूण उत्पादनातून सर्व प्रकारची मजुरी देऊन आणि जनावरांच्या चाऱ्याचा खर्च वजा करून जे उरेल त्याच्या आधारे हा कर आकारला जातो.[2] सर्वसाधारणपणे करपात्र रकमेचा फक्त १० वा हिस्सा एवढा हा कर मामुली असावा असे दिसते. या कर आकारणीची पद्धत अशी होती की, "हा कर जमा करणाऱ्या अधिकाऱ्याला ज्या वस्तू दाखविल्या जातात" त्या सर्व वस्तूंच्या किंमतीची प्रथम बेरीज करावयाची आणि मग पुढीलप्रमाणे 'अश्र' वसूल करावयाचा : मुस्लिम जमीन मालका-कडून प्रमाणित करदराचा एकचतुर्थांश, धिम्मींकडून एकद्वितीयांश आणि शत्रुप्रदेशांतील नागरिकांकडून संपूर्ण कर. २०० दिऱ्हामपेक्षा कमी किंमतीच्या वस्तूंवर अश्र घेतला जात नाही. तरीदेखील खेड्यातील शेतकरी, कायद्याप्रमाणे आपल्याजवळील जमिनीवर 'खराज' देत असल्यामुळे तो शहरातील व्यापारी जसा कायद्याने ठरवून दिलेला 'अश्र' देत असे त्याप्रमाणे आपल्या उत्पन्नातील अश्र हिस्सा कर म्हणून देत असेल अशी फारशी शक्यता नाही. शेतकरी आपल्या शेखला किंवा आपल्या जिल्ह्याच्या सरकारी प्रमुखाला म्हणजे मुख्ताराला एक उभयपक्षी संमत रक्कम किंवा पिकाचा काही भाग दानाचा हिस्सा म्हणून देत असावा, आणि मग मुख्तार करवसुलीचा अधिकार दिलेल्या माणसाला त्याच्या मागणीप्रमाणे कराची रक्कम देत असावा हेच अधिक शक्य वाटते. करवसुली करणारा हा माणूस नेहमीच सरकारी अधिकारी असे असे नाही. एक निश्चित रक्कम सरकारी तिजोरीत आगाऊ जमा करणाऱ्या ठेकेदारांना वेगवेगळ्या भागातील कर गोळा करण्याचे काम देण्याची मध्यवर्ती सरकारची पूर्वीपासून प्रथा होती. या पद्धतीचा

---

१. मुस्लिमांकडून दान-कर घेतला गेला असेल तर तो 'अश्र' करासारखा समजला जाई आणि तत्त्वतः, 'अश्र' कर वसूल करणाऱ्याला त्याचा हिशेब सरकारी तिजोरीला-'बेत अल् माल'ला नव्हे तर ज्यांच्यासाठी त्या दान-कराचा वापर करावयाचा असे त्यांना ( अहल् अल् सदाकत ) द्यावा लागे.

२. अबु युसुफ याने 'अश्र' करातून भाजीपाला वगळला होता असा उल्लेख आढळतो.

स्वाभाविकच दुरुपयोग होण्याची शक्यता होती.[१] आणि म्हणूनच काझी अबु युसफ याने आपल्या 'खराज'वरील ग्रंथात आपला धनी खलिफा हरून अल्-रशीद याला ही पद्धत बंद करण्याचा सल्ला दिला आहे. कारण करवसुलीच्या आपल्या करारा (कबाला)–नुसार ठेकेदार इसमाने जमविलेली रक्कम खराजच्या अपेक्षित रकमेपेक्षा कमी भरे, तेव्हा ठेकेदार शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने पैसे वसूल करी आणि त्यांचा छळ करून त्यांच्याकडून येणे असलेल्या कराच्या रकमेपेक्षा पुष्कळदा जास्त पैसा वसूल करी. तथापि शहरातील नागरिकांनी किंवा खेड्यातील शेतकऱ्यांनी खराजची रक्कम आपल्यापैकीच एखाद्या संपन्न किंवा वजनदार आणि व्यवहारात इमानदार असलेल्या इसमाकडे देण्याच्या कल्पनेस अबु युसफचा विरोध नाही. आकारण्यात आलेल्या खराज कराच्या रकमेच्या बाबतीत हा इसम सरकारला जबाबदार असावा; बेत अल् मालचा एक अधिकारी करवसुलीच्या वेळी त्याच्याबरोबर राहावा आणि त्याने त्याच्या कामावर देखरेख करावी असे तो म्हणतो.

बायझन्टीनांच्या काळातील पूर्वीच्या पद्धतीप्रमाणेच इजिप्तमध्ये सामुदायिकपणे कर दिला जात असे. सरकारचे तज्ज्ञ लोक निरनिराळ्या विभागांतील पिकांचा अंदाज घेत; ग्रामप्रमुखांच्या भेटी घेत आणि प्रत्येक गावाने एकूण किती कर द्यावयाचा ते ठरवून देत. त्यानंतर एकूण करांच्या रकमेची त्या त्या खेड्यातील सर्व कारागिरांत व इतर मजुरदारांमध्ये योग्य प्रकारे वाटणी करून करआकारणी केली जाई. एखाद्याने कर दिला नाही तर त्याच्या वाट्याचा कर इतरांना द्यावा लागे. या संदर्भात कायद्याच्या एका अभ्यासकर्त्याचे असे मत आहे की, जिझिया कराचे[२] दोन प्रकार अस्तित्वात होते. पहिला प्रकार व्यक्तिशः झिम्मींवर बसविल्या जाणाऱ्या जिझियाचा आणि दुसरा संपूर्ण गाव म्हणून प्रत्येक गावावर बसविला जाणारा जिझिया.

इराकमध्ये[३] विशेषतः ज्यावेळी सरकारी तिजोरीला पैशांची गरज असे तेव्हा कर-वसुलीचा ठेका (मक्ता) देण्याची ही पद्धत अवलंबिली गेली असावी. परंतु इजिप्तमध्ये मात्र फार पूर्वीपासून करवसुलीसाठी ती पद्धत नेहमीच अवलंबिली जात होती. अवर्षण व अन्य अडचणींच्या प्रसंगी पैसा वापरता यावा म्हणून चार वर्षांसाठी ठेका दिला जात असे आणि पूल बांधणे किंवा ते दुरुस्त करणे अथवा कालवे खोदणे या

१. उदाहरणार्थ, मूळ खराजच्या रकमेपेक्षा दुप्पट रक्कम ठेकेदाराला कधी कधी मिळत असे.

२. येथे 'कर' ही संज्ञा सर्वसाधारण अर्थाने अभिप्रेत आहे.

३. ठेकेदाराने करावयाची कबुलायत 'कबाला' यापेक्षा 'इल्तिझाम' या नावाने अधिक परिचित होती तसेच ठेकेदाराला 'मुल्तझिम' असे म्हणत. अद्यापही इराक-मध्ये नगरपालिकांचे तसेच अन्य अनेक कर वसूल करण्याचा ठेका 'मुल्तझिम'ला दिला जातो.

कामासाठी मक्तेदारांनी किंवा ठेकेदारांनी खर्च केलेल्या पैशांची 'खराज'च्या रजिस्टर-मध्ये ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सूट दिली जाई. अशा ठेक्यांमुळे जमिनीवरील कराइतकी निश्चित रक्कम देऊन ठेकेदारांना जमिनी ( कताई ) मिळवता येत. ही पद्धती इस्लामच्या सहाव्या शतकापर्यंत चालू होती. सामान्य प्रकारच्या 'कताई' जमिनीपासून मिळणारे महसुली उत्पन्न त्यावेळी खूपच घटले होते. आणि उमरांना ( लष्करी अधिकारी वर्गाला ) देण्यात आलेल्या कताई जमिनींवरील महसूल उत्पन्न दुप्पटीपेक्षा वाढले होते. त्यामुळे इजिप्तमधील सर्व 'कताई' जमीनी लष्करी अधिकाऱ्यांना जहागिरी म्हणून भराभर देण्यात आल्या. परंतु त्यामुळे फार काळपर्यंत वाढते महसुली उत्पन्न मिळाले नाही.

मक्तेदाराशी एखादा करार झालेला नसला तर बेत अल् माल ( सरकारी तिजोरी )ला प्रांतांतील 'खराज' धर्मादाय कराचे व दान कराचे संपूर्ण उत्पन्न मिळत नसे. प्रत्येक प्रांतातील सर्व सरकारी खात्याचा खर्च व लष्कराचा पगार देऊन उरलेली जादा रक्कमच बेत अल् माल्ला मिळे. काही कर, वस्तूंच्या रूपात तर काही रोख पैशात द्यावे लागत. करांबद्दल दिलेल्या वस्तू व रकमा राजधानीकडे पाठविल्या जात. तेथे त्यांची नोंद त्यासाठी निर्माण केलेल्या दिवान अल्–खराज ( महसूल कार्यालयाच्या रजिस्टरात ) मध्ये केली जाई. अनेक प्रकारचा खर्च वजा करूनदेखील सरकारी तिजोरीकडे कित्येक वर्षांपर्यंत प्रचंड पैसा पाठविला जात होता. खलिफा हरून अल्-रशीद ( हिजरी सन १७०–७३–इ. स. ७८६–८०९ ) याच्या राजवटीत फक्त एका वर्षांत सरकारी खजिन्यात जमा झालेल्या महसूलाचा जो संक्षिप्त हिशेब जतन करून ठेवण्यात आला आहे त्यावरून याची कल्पना येते—

## पूर्वेकडील प्रांत

| प्रदेश व वस्तू | दिऱ्हॅम |
|---|---|
| इराकच्या 'सवाद' भागातील धान्य जमिनींवरील करांपासून | ८,०७,८०,००० |
| सवादमधून मिळालेला इतर प्रकारचा कर | १,४८,००,००० |
| **वस्तुरूपात** | |
| नजरानी अंगरखे ( रत्तलांत ) | २०० |
| तेराची पर्णे ( रत्तलांत ) | २४० |
| कस्कार ( वासितचा एक भाग ) मधून | १,१६,००,००० |
| कुर दिज्ला ( शात अल्-अरबचा प्रदेश ) मधून | २,०८,००,००० |
| हलवानमधून | ४८,००,००० |
| अहवाझमधून | २,५०,००,००० |

वस्तुरूपात

| | |
|---|---|
| साखर ( रत्तलात ) | ३०,००० |
| फार्समधून | |

वस्तुरूपात

| | |
|---|---|
| काळ्या मनुका ( रत्तल ) | २०,००० |
| डाळिंबे व इडलिंबे ( रत्तल ) | १,५०,००० |
| गुलाबपाणी ( बाटल्या ) | ३०,००० |
| संरक्षित फळे ( रत्तल ) | १५,००० |
| सिराफी माती ( खाण्याची ) ( रत्तल ) | ५०,००० |
| बेदाणा, हाशिमी ( कुर्तात ) | ३ |
| किरमानमधून | ४२,००,००० |

वस्तुरूपात

| | |
|---|---|
| यमनी वस्तू ( अंगरखे ) | ५०० |
| खजूर ( रत्तल ) | २०,००० |
| जिरे | १०० |
| मुक्रानमधून | ४,००,००० |
| सिंध व इतर शेजारच्या प्रदेशांमधून | १,१५,००,००० |

वस्तुरूपात

| | |
|---|---|
| कैराख ( ? धान्य ) ( काफिझमध्ये ) | १०,००,००० |
| हत्ती | ३ |
| हाशिशी झगे | २,००० |
| जाकिटे | ४,००० |
| भारतातील कुडा लाकूड ( मण ) | २५० |
| इतर कडवट लाकूड ( मण ) | १५० |
| चप्पल जोड | १,००० |
| याशिवाय लवंगा व जायफळे | |
| सिजिस्तानमधून | ४६,००,००० |

वस्तुरूपात

| | |
|---|---|
| खास बनावटीचे झगे | ३०० |

| | |
|---|---|
| साखर ( रत्तल ) | २०,००० |
| खुरासानमधून | २,८०,००,००० |

**वस्तुरूपात**

| | |
|---|---|
| चांदीच्या लगडी | २,००० |
| ओझ्याचे घोडे | ४,००० |
| गुलाम | १,००० |
| अंगरखे | २७,००० |
| हरडे ( रत्तल ) | ३०० |
| जुझजानमधून | १,२०,००,००० |

**वस्तुरूपात**

| | |
|---|---|
| रेशीम ( मण ) | १,००० |
| क्यूमिसमधून | १५,००,००० |

**वस्तुरूपात**

| | |
|---|---|
| चांदीच्या लगडी | २,००० |
| पोशाख | ७० |
| डाळिंबे | ४०,००० |
| तबारिस्तान वगैरेमधून | ६३,००,००० |

**वस्तुरूपात**

| | |
|---|---|
| तबरी गालिचे | ६०० |
| पोशाख | २०० |
| अंगरखे | ५०० |
| हातरूमाल | ३०० |
| काचपात्रे | ६०० |
| रेयमधून | १,२०,००,००० |

**वस्तुरूपात**

| | |
|---|---|
| डाळिंबे | १,००,००० |
| जरदाळु ( रत्तल ) | १,००० |
| इस्फहानमधून | ११०,००,००० |

| | |
|---|---|
| **वस्तुरूपात** | |
| मध ( रत्तल ) | २०,००० |
| मेण | २०,००० |
| हमाधान इत्यादीमधून | १,१८,००,००० |
| **वस्तुरूपात** | |
| रॉब ( मण ) | १,००० |
| मध ( रत्तल ) | २०,००० |
| बसरा व कुफा ( म्हणजे निहावांद व दिनावर हे दोन माह ) | २,०७,००,००० |
| शहाराझूर इत्यादीमधून | २,४०,००,००० |
| मोसुल वगैरेमधून | २,४०,००,००० |
| **वस्तुरूपात** | |
| सफेद मध ( रत्तल ) | २०,००० |
| जाझिरा, दियार्स व युफ्रेतीसमधून | ३,४०,००,००० |
| अझर बैझानमधून | ४०,००,००० |
| मुकान व कराखामधून | ३,००,००० |
| जिलानमधून | |
| **वस्तुरूपात** | |
| गुलाम | २०० |
| बाब्र व तैलासानमधून | |
| **वस्तुरूपात** | |
| मध ( स्किन्स ) | १२ |
| बहिरी ससाणा पक्षी | १० |
| झगे | २० |
| उर्मियामधून | १,३०,००,००० |
| **वस्तुरूपात** | |
| महफुरी गालिचे | २० |
| कशिदा कामाचे कापड ( नग ) | ५८० |

| | |
|---|---|
| मोठ ( रत्तल ) | १०,००० |
| तारिख ( खारावलेली मासळी ) | १०,००० |
| बहिरीससाणे | ३० |
| खेचरे | २०० |

## २. सीरिया व इजिप्त

| प्रदेश व वस्तू | दिनार |
|---|---|
| किन्निस्रीन व सीमान्त शहरे यांमधून | ४,९०,००० |
| हिम्समधून | ३,२०,००० |

### वस्तुरूपात

| | | |
|---|---|---|
| बेदाणा ( उंट-गोणी ) | | १,००० |
| दमास्कसमधून | | ४,२०,००० |
| उर्दुनमधून | | ९६,००० |
| फिलीस्तीनमधून | ३,१०,००० | |
| सीरियातील सर्व ठाण्यांमधून | | |

### वस्तुरूपात

| | |
|---|---|
| बेदाणा ( रत्तल ) | ३,००,००० |
| इजिप्त ( तिन्निस, दामिएत्ता व अल् अशमु हे भाग वगळून. या भागांतील महसूलाचे उत्पन्न खर्चासाठी बाजूला काढून ठेवले जाई.) मधून | १९,२०,००० |

## ३. पश्चिमेकडील प्रांत

| | दिर्हाम |
|---|---|
| बार्कामधून | १०,००,००० |
| इफ्रिकियामधून | १,३०,००,००० |

### वस्तुरूपात

| | |
|---|---|
| गालिचे | १२० |

## ४. अरबस्तान

| | दिनार |
|---|---|
| येमेनमधून | ८,७०,००० (शिवाय झगे) |
| मक्का व मदिनामधून | ३००,००० |

वस्तुरूपाने जमा झालेल्या कराची रक्कम ५,०००,००० दिनार म्हणजे १२५,५३२,००० दिर्‍हाम ( १ दिनार[1] = २२ दिर्‍हाम ) एवढी होती.

रोख ( चांदीच्या ) नाण्यांतील रक्कम ४०,४७,८०,००० इतकी आहे. वस्तुरूपाने जमा रक्कम अधिक रोख रक्कम मिळून, एकूण रक्कम ५३,०३,१२,००० दिर्‍हाम एवढी[2] रक्कम होते.

वरील तालिकेत पूर्वेकडील प्रांतांकडून जमा झालेल्या रकमांचे आकडे चांदीच्या दिर्‍हाम नाण्यांत दिले आहेत हे लक्षात येईल. कारण पूर्वी हे प्रांत इराणच्या आधिपत्याखाली होते आणि इराणात चांदी विपुल प्रमाणात होती. त्याचप्रमाणे एके काळी रोमन साम्राज्यात असलेले सीरिया, इजिप्त व त्या लगतचा अरबस्तान हे प्रदेश सोन्याच्या दिनार नाण्यात 'खराज' वगैरे कर देत असत. प्रारंभी अब्बासींच्या कारकीर्दीत चांदीचे परिमाण रूढ होते आणि हिशेब दिर्‍हाम नाण्यांत केला जाई. उदाहरणार्थ, मन्सूरने बगदादमध्ये बांधलेल्या एका इमारतीस ४,८३३,००० दिर्‍हाम एवढा खर्च आला असे एके ठिकाणी म्हटले आहे. पण पुढे हरूनच्या काळात खंडणीद्वारे लढायातील लुटीतून इतके विपुल सोने मिळू लागले की, प्रांतांचे सुभेदार व इतर प्रमुख अधिकाऱ्यांचे पगार तसेच देणग्या व चैनीच्या वस्तूंची खरेदी इत्यादी प्रमुख बाबींसाठी होणारा खर्च सोन्याच्या नाण्यांत होऊ लागला. फक्त कनिष्ठ अधिकाऱ्यांचे पगार चांदीच्या नाण्यांत दिले जात. त्यामुळे चांदीची झपाट्याने उचलबांगडी होऊन सोने हे चलनाचे परिमाण बनले. सोन्यासारख्या, चांदीपेक्षा अधिक मूल्यवान धातूचा वाढता व्यय थांबविण्याचा किंवा त्याचा राखीव संग्रह करण्याचा प्रयत्नच झाला नाही. खलिफा मुक्तादिरच्या राजवटीत ( २९५–३२०/९०८–९३२ ) खलिफा व त्याचा लवाजमा

---

१. खरे म्हणजे एक सोन्याचा दिनार दहा ( चांदीच्या ) दिर्‍हामबरोबरीचा होता. पण हरूनच्या कारकीर्दीत सामान्यतः एका दिनारची किंमत वीस दिर्‍हाम होती. तथापि येथे सांगितल्याप्रमाणे सरकारी व्यवहारात एका दिनारची किंमत २२ दिर्‍हाम गणली जात असे.

२. हा हिशेब कसा करण्यात आला आहे ते स्पष्ट होत नाही.

यांवर होणाऱ्या अवाढव्य खर्चासाठी साम्राज्यातील[1] विभिन्न प्रांतांतून येणारा पैसा अपुरा पडू लागला आणि सरकारी तिजोरीला सदैव पैशाचा तुटवडा भासू लागला. त्यानंतर खिलाफतीवर आलेल्या आणखी दोन (काशिर व रादी) खलिफांची कारकीर्द संपण्यापूर्वीच खिलाफत अगदी रसातळाला पोचली. अखेर बुवेहिद राजांच्या वर्चस्वाच्या कालखंडात चांदीचे परिमाण पुनश्च प्रस्थापित झाले.

वर दिलेल्या जमेच्या ताळेबंदाशी मुक्तादिरच्या कारकीर्दीतील (३०६/९१८–१९) ताळेबंदाची तुलना करून पाहण्याजोगी आहे. त्या ताळेबंदामध्ये उत्पन्नाच्या पुढील विविध बाबींचा समावेश आहे. बसरा व सवादसारख्या विभिन्न जमिनींवरील धर्मादाय कर (सदाक); बसरा येथील जहाजांवरील जकात कर; बगदाद, सामारा, वासित, बसरा व कुफा येथील मेंढी बाजारातून मिळणारा कर, याच शहरातील टाकसाळीतून मिळणारा नफा; आणि बगदाद व इतर ठिकाणच्या धिम्मींकडून मिळणारा कर. याशिवाय राजधानीच्या शहरात व त्यालगतच्या प्रदेशांत अनेक प्रकारचे स्थानिक व पालिका (म्युकुस) कर लागू होते. काही ठिकाणी ते नेहमी वसूल केले जात तर अन्यत्र गरजेप्रमाणे. खिलाफतीची आर्थिक परिस्थिती अत्यंत ढासळली होती त्या काळात बगदादमध्ये खलिफाचा वझीर बारिदी याने शहरामध्ये आयात होणाऱ्या गव्हाच्या प्रत्येक 'कुर्र[2]' वर ७० दिऱ्हाम याप्रमाणे कर बसविला होता. तसेच वजन-मापाने विकल्या जाणाऱ्या तेलासकट सर्व वस्तूंवरही जबर कर बसविला होता. बुवेहिद राजा अबदुद अद् दावला याने इराकमधील सवाद येथील 'खराज' कर देणाऱ्या प्रत्येक जमिनीच्या करआकारणीत दहा टक्के वाढ तर केलीच पण शिवाय पिठाच्या गिरणींच्या नफ्यावरील कर, घोड्यांच्या, गाढवांच्या व उंटांच्या बाजारातील विक्रीवरील कर यासारखे अनेक नवे कर त्याने बसविले. तसेच निर्धारीत धर्मादाय कर व कुरणावरील कर यासंबंधीचे व्यवहार पाहण्यासाठी त्याने एक 'दिवान' (खाते) स्थापन केले. बगदाद शहरात तयार होणाऱ्या रेशमी व सुती कपड्यांवर धर्मादाय कर बसविल्यामुळे दंगल होऊन त्यामध्ये ३८९/९९९ या साली बगदादचा हासुदी राजवाडा जाळण्यात आला. सुती मालावर कर घेतला जाणार नाही, फक्त रेशमी मालावर तो आकारला जाईल, अशी सूट देण्यात आली तेव्हाच ही दंगल शमली. शहराच्या दोन्ही दिशांना दवंडी पिटून ही घोषणा करण्यात आली. करपात्र अशा प्रत्येक वस्तूवर शिक्का मारण्यासाठी चौकसनिसांची व निरीक्षकांची

---

१. "खुरासान हमरस्त्यालगतच्या एका जिल्ह्यातील महसुल अधिकाऱ्याला उद्देशून अली इब्ने इसा या वझीराने असे कळविले होते होते की, महसुली उत्पन्नाची किती गरज आहे हे तुम्ही जाणताच. ही गरज ध्यानी घेऊन तुम्ही कर गोळा करण्याचा अधिकाधिक प्रयत्न करावा."

२. "सहा गाढवांचे ओझे."

नेमणूक करण्यात आली. " अमिद अल् जुयुश याच्या अमदानीच्या अखेरपर्यंत " हे अधिकारी अस्तित्वात होते.

विशिष्ट कामासाठीदेखील कर बसविता येत. उदाहरणार्थ, खलिफा मुस्तार्शिद याने ५१७।११२३ मध्ये पूर्व बगदादमधील शाही आवाराभोवती असलेली भिंत अधिक विस्तृत करावयास लागणाऱ्या खर्चासाठी बगदादमधून बाहेर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या मालावर कर बसविला होता. या करामुळे एवढा असंतोष माजला की तो कर रद्द करणे व ज्यांनी तो दिला असेल त्यांना त्यांची रक्कम परत करणे भाग पडले. मुस्तार्शिदच्या अगोदर होऊन गेलेला एक खलिफा, मन्सूर यानेसुद्धा कुफा शहरातील अशाच एका कामासाठी शहरातील प्रत्येक पुरुष नागरिकावर ४० दिऱ्हॅम डोईकर बसविला होता. त्या अगोदर त्याने पुरुषांची एकूण संख्या किती हे अजमाविण्यासाठी शहरातील प्रत्येक पुरुष नागरिकास ५-५ दिऱ्हॅम दिले. शिरगणती करण्याची ही पद्धत व तिची आकडेवारी लोककाव्यातून जाहीर करण्यात येई. मक्केच्या ज्युद्दा (जेद्दा) बंदरात इ. सनाच्या १० व्या शतकात गहू, कापड, लोकर व केशर यांच्या आयातीवर कर होता तर निर्यात होणाऱ्या गुलामांनाही कर द्यावा लागे. त्याचप्रमाणे देशातील विभिन्न नियंत्रण ठाण्यांवर एक जकात कार्यालय होते. स्थानिक व्यापाऱ्यांच्या अंदाजानुसार या कार्यालयांच्या एकूण मिळकतीपैकी एकतृतियांश मिळकत सरकारी खजिन्यात जमा होत असे. इजिप्तमध्ये हे जादा कर (म्युकस) दर महिन्यास गोळा केले जात. म्हणून त्यांना 'मासिक' हिलाली कर म्हणत. शेतजमीन व शेतीमाल यावर दरसाल घेतल्या जाणाऱ्या 'खराज' कराहून हे कर भिन्न होते. हे म्युकस करही सलादीनच्या राजवटीपर्यंत 'बेत अल् माल'च्या उत्पन्नाची एक नित्याची बाब होती. सलादिनने हे कर रद्द केले. कारण ते तो बेकायदेशीर समजत असे.[1]

बेत अल् मालच्या उत्पन्नात खूप भर घालणारी आणखी एक बाब म्हणजे वारस नसलेल्या मृत व्यक्तीची सरकारकडे जमा होणारी संपत्ती. विधिपंडितांनी अशा पद्धतीने पैसा जमा करणे बेकायदेशीर ठरवीपर्यंत या मार्गाने सरकारी तिजोरीला पैसा मिळत असे. तसेच मृत्युपत्र न करता कोणी मेले तर कुराणामध्ये (४ [१२]) ठरवून दिल्याप्रमाणे त्याच्या संपत्तीचे कायदेशीर हिस्से, (कुराणाने) निश्चित केलेल्या नातलगांपैकी मृतव्यक्तीला कोणी नातलग असतील तर त्यांना दिले जात आणि बाकीची संपत्ती बेत अल्

१. "हे कर सलादिनच्या मृत्यूनंतर पुनश्च सुरू झाले. परंतु त्याचे उत्पन्न प्रांताच्या 'बेत अल् माल'मध्ये जमा होण्याऐवजी तेथील खिश्चन अधिकाऱ्यांच्या खिशात जात असे, हे स्पष्ट आहे. हिलाली करांमध्ये मोठी घरे, दुकाने, स्नानगृहे, भट्टया, पिठाच्या गिरण्या वगैरेंवरील कर तसेच समुद्रात व नाईल नदीत पकडली जाणारी मासळी यावरील आणि इतर करांचा समावेश असे."

मालकडे जात असे. या मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नासंबंधींचे व्यवहार पाहण्यासाठी बेत अल् मालचा 'दिवान अल्-मावारिस अल्-हाशिया' किंवा 'बेवारस संपत्तीसंबंधींचे खाते' या नावाचा एक खास विभाग स्थापन करण्यात आला होता. मात्र मृत्युपत्र न करता मरण पावलेल्या मुस्लिमेतर व्यक्तीची संपत्ती तत्वतः तरी 'बेत अल्-माल'ला कधीही घेता येत नसे, कारण मुस्लिम माणसाने मुस्लिमेतर माणसाची वारसा संपत्ती घेणे किंवा त्याला ती देणे या दोन्ही गोष्टी कायद्याच्या विरुद्ध समजलेल्या आहेत. खलिफा मुक्तादिरच्या राजवटीत हे खास खाते रद्द करण्यात आले. इब्ने अल्-फुरात या वझीराने सर्व प्रांतिक सुभेदारांना एक परिपत्रक पाठवून असे कळवले की, कुराण, सुन्ना किंवा तमाम इमाम यापैकी कोणाही अधिसत्तेने, मृत मुस्लिमाची संपत्ती बेत अल् मालने घेणे योग्य असल्याचे सांगितलेले नाही, म्हणून हे खाते रद्द करण्यात आले आहे. त्यानंतरच्या काळात, मृत मुस्लिम व्यक्तीच्या संपत्तीचे सर्व (कायदेशीर) हिस्से ज्याचे त्यास देऊन झाल्यावर अधिक संपत्ती उरली तर ती मृत व्यक्तीच्या रक्तसंबंधांतील अन्य आप्तेष्टांमध्ये वाटून दिली जाऊ लागली.

सार्वजनिक कामावर सरकारी तिजोरीतील फारच थोडा पैसा खर्च होत असे. खिलाफतीच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून बेत अल्-मालच्या तिजोरीतील सर्वात जास्त पैसा शाही कुटुंब, त्याच्या अनेक शाखा, त्यांचे महाल, त्यांचे जनानखाने व त्यांचा प्रचंड लवाजमा यांच्यावरच खर्च होत होता. याशिवाय शाही खर्चाची आणखी एक बाब म्हणजे अनेक प्रकारच्या गुणांचा व कलांचा दावा करणाऱ्या असंख्य लोकांना दिल्या जाणाऱ्या देणग्या. हे लोक खलिफाच्या दाराशी त्याचे लक्ष वेधून घेण्यासाठी व त्याची उदारता जागवण्यासाठी धरणे धरून बसत. त्यांना त्यात पुष्कळदा यशही येत असे. याशिवाय पैगंबरांशी व खलिफाशी नातेसंबंध असल्याचा दावा करणाऱ्या आणि म्हणून हक्काने सरकारी पेन्शनची मागणी करणाऱ्या हाशिमी वंशाच्या असंतुष्ट लोकांचा एक मोठा वर्ग होता. या लोकांना नियमितपणे पेन्शन दिले जात असे. मात्र ते त्यांना आपोआप मिळत नसावे असे दिसते. त्यासाठी खास हुकूम (साक्क) काढला जाई. आणि कधी कधी तो मागेही घेतला जाई.

खलिफाची सत्ता अगदी कळसाला पोचली होती त्या काळात खलिफाच्या शरीर संरक्षक दलाच्या पगारावर केला जाणारा खर्च, तसे पाहिले तर शाही कुटुंबावर होणाऱ्या अफाट खर्चाच्या मानाने किरकोळ होता. तथापि तिसऱ्या इस्लामी शतकाच्या प्रारंभानंतर लगेच जेव्हा खलिफाच्या सत्तेच्या ऱ्हासाची चिन्हें दिसू लागली त्या काळांत खलिफा मुतासिम (हि. स. २१८–२२७/इ. स. ८३३–८४२) याने तुर्की, बर्बर व अन्य लोकांचे भाडोत्री शरीरसंरक्षक दल ठेवण्याची प्रथा सुरू केली. त्यानंतरच्या काळात शरीररक्षकांवरील खर्चात झपाट्याने अमर्याद वाढ झाली. एकट्या तत्कालिन तात्पुरत्या राजधानीतील–सामरीमधील शरीरसंरक्षक दलावर हि. स. २५२–

इ. स. ८६७ मध्ये २० कोटी दिनार एवढी अफाट रक्कम खर्च झाली होती. सबंध साम्राज्याच्या दोन वर्षांच्या खराज कराच्या उत्पन्नाइतकी ही रक्कम होती. सरकारी अधिकारी व कधी कधी धनिक नागरिक यांच्याकडून बळजबरीने पैसा मिळवल्याशिवाय एवढी रक्कम उभी राहणे शक्यच नव्हते. बगदाद शहराला सैन्याचा प्रथम वेढा पडला त्या काळात खलिफा अमीनने श्रीमंत व्यापाऱ्यांना आणि इतर लोकांना या मार्गाने सैन्याचा खर्च भागविण्यासाठी पिळून काढले होते.

बेत अल्–मालचे उत्पन्न सर्वसाधारणपणे कशा रितीने खर्च होत असे, याची कल्पना ३०६/९१८-९ या वर्षांच्या जमाखर्चाच्या ताळेबंदावरून[1] येते. माहितीसाठी तपशीलासह हा ताळेबंद जतन करून ठेवला आहे. शासकीय खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे होत्या:—

| विषय | दिनार |
|---|---|
| पवित्र शहरे[2] (मक्का व मदिना) व त्याकडे जाणारे यात्रेचे मार्ग | ३१५,४२६½ |
| सीमान्त ठाणी | ४९१,४६५ |
| साम्राज्यातील काझींचे वेतन | ५६,५६९ |
| साम्राज्यातील पोलिस अधिकारी व न्यायाधीशांचा पगार | ३४,४३९ |
| बारीद (टपाल) खात्याच्या अंमलदारांचा पगार | ७९,४०२ |

सार्वजनिक कामावर झालेला खर्च आणि इतर सरकारी खर्च मिळून, एकूण सुमारे १ दशलक्ष दिनार होता तर शाही कुटुंब, सरकारी दिवानखान्यामधील छोटे अंमलदार, राजधानीतील सुरक्षा पोलिस आणि इतर बाबी यावर[3] झालेला खर्च १४½ दशलक्ष दिनारांपेक्षाही अधिक होता.

---

१. "उत्पन्नापेक्षा खर्च २० लक्ष दिनार जास्त होता"

२. या पवित्र नगरांसाठी व यात्रामार्गांसाठी केला जाणारा व्यय केवळ धर्मप्रेमातून केला जात असे, असे नाही. साम्राज्याची मुलकी राजधानी व धार्मिक राजधानी या दोहोंत घनिष्ठ संपर्क राहावा या दृष्टीने या यात्रामार्गांचा उपयोग होत असे. या मार्गांसाठी खर्च करण्याच्या धोरणाचा साम्राज्याच्या प्रगतीवर खूपच अनुकूल परिणाम झालेला दिसतो. अगदी खलिफा माहदी याच्या राजवटीतदेखील (१६१।७७८) बगदाद ते मक्का या रस्त्यावर लष्करी चौक्या उभारलेल्या होत्या, मैलाचे दगड लावलेले होते आणि विहिरी खणण्यात आल्या होत्या.

३. याची तपशिलवार यादी अशी :

पहारेकरी आणि द्वाररक्षक व तत्सम इतर सेवक, देशी व विदेशी भाडोत्री शिपाई;

[पुढील पान पाहा]

बेत अल् मालमध्ये ( सरकारी कोष ) येणाऱ्या पैशाला व महसूलाला दिवान अल् खराजमुळे ओहोटी लागू लागली. साम्राज्याच्या मध्यवर्ती प्रांतातील–इराकमधील संपन्न सवाद जमिनींपासून मिळणाऱ्या महसूलाच्या व्यवहाराचे नियंत्रण हे दिवाण अल् खराज या खात्याचे मुळचे कार्य होते. पुढे खलिफा मुतादिद ( २७९–२८९ । ८९२–९०२ ) याच्या कारकीर्दीमध्ये या खात्याला दिवान अल् सवाद असे म्हटले जाऊ लागले. परंतु त्याचबरोबर इतर दूरच्या प्रांतांतील महसूलाच्या बाबी ठरविणे, जमेच्या व खर्चाच्या बाबी तपासून पाहणे, याशिवाय सरकारी तिजोरी खात्याचे एकंदर हिशेब ठेवणे ही कामे सदर खाते करीत असे. या खात्याशी निकटचा संबंध असलेले दुसरे खाते म्हणजे दिवान अल् नफाकत किंवा ' विनियोग विभाग ' म्हणजेच खरे म्हणजे शाही कुटुंबाच्या खर्चाचे हिशेब नियंत्रण खाते.

या ' दिवानां ' द्वारे उत्पन्न व खर्च यांचे जेवढे नियमन केले जात होते त्याहून अधिक नियमन करण्याची आवश्यकता खलिफा माहदी ( इ. स. ७७५–८५ ) याच्या काळापासूनच भासू लागली होती. कारण त्यावेळी केवळ एकट्या वझीराच्या हाती सर्व खात्याची सत्ता एकवटली होती. म्हणून खलिफा माहदी याने विभिन्न खात्यांच्या हिशेबांचे नियमन करण्यासाठी दिवान अल् अझीम्मा या नावाचा एक खास विभाग स्थापन करण्याचे ठरविले. या विभागातील प्रत्येक खात्याचे रजिस्टर ( झिमाम ) एका अधिकाऱ्याकडे सोपविले जात असे आणि त्या सर्वांचे नियंत्रण करणारा एक निरीक्षक नेमलेला असे. त्यानंतरच्या काळात आर्थिक व्यवहार करणाऱ्या प्रत्येक सरकारी खात्याचे

---

[ मागील पानावरून टीप ]

निग्रो ( बहुतांशाने इजिप्त, मक्का वगैरे ठिकाणी खरीदलेले गुलाम ); खलिफाचे बंधमुक्त गुलाम ( राजवाड्यात वाकनिस म्हणून आणि प्रवासात संरक्षक म्हणून हे लोक काम करीत ); खासगतीतील संरक्षक दल ( पायदळ व घोडेदळ ); शाही कुटुंबाच्या सेवेसाठी नियुक्त केलेले अधिकारी व इतर सतरा प्रकारचे अधिकारी; तसेच खबरे; कुराण म्हणणारे; मुराद्दिन ( प्रार्थना सांगणारे ); ज्योतिषी; साकी ( दारूचा प्याला भरून देणारा सेवक ); विदूषक इत्यादी; बगदादमधील सुरक्षा पोलिस, तुरुंगाधिकारी, गस्तवाले वगैरे; निवडक गुलामांच्या सैन्य तुकड्या; खाजगी शाही पाकगृहे व बेकऱ्या इत्यादी; सैन्यासाठी व गुलामांकरिता सार्वजनिक पाकगृहे व बेकऱ्या; राजवाड्यातील व बेकऱ्यांतील पाणके; राजवाड्यातील खाजगी सेवक; कारागीर व कसबी ( शिंपी, धोबी, चर्मकार, लोकर काढणारे वगैरे ); दरबारे, हकीम, शिकारी वगैरे; शाही गलबतावरील नाविक; हाशिमी लोकांची पेन्शने; बगदाद येथील मशिदीत शुक्रवारची प्रार्थना सांगणारे खातिब; विभिन्न दिवानांमधील वरिष्ठ लेखनिक, खजिनदार, द्वारपाल, मुदीर इत्यादी.

रजिस्टर असावे आणि त्यासाठी एक खास ' दिवान ' स्थापन करून त्यावर एक अधिकारी नेमला जात असावा असे दिसते. उदाहरणार्थ, खुद्द ' दिवान अल् खराज ' मध्ये ' दिवान झिमाम अल् खराज ' असा विभाग होता. हा विभाग एकूण सर्व महसूल व ज्यावर महसूल वसूल केला जाई अशा जमिनींच्या सर्व व्यवहारांवर देखरेख करीत असे. तसेच ' दिवान अल् नफाकत 'मध्ये ' दिवान झिमाम अल् नफाकत ' हा विभाग होताच. अशा प्रकारचेच एक खाते इजिप्तमध्ये होते. प्रत्येक ' दिवान'चा अधिकारी त्या त्या खात्याच्या मुतवल्लीकडे अथवा सर्व विभागाचे संयुक्तपणे नियंत्रण करणाऱ्या कौन्सिल अध्यक्षाकडे आपल्या ' दिवानां 'चा हिशेब देत असे.

गरजेनुसार अथवा खलिफाच्या लहरीनुसार बगदादच्या केंद्र सरकारात आणखीही ' दिवान'ची स्थापना केली जात असे. यापैकीच एक अतिशय महत्त्वाचे दिवान ( खाते ) म्हणजे ' दिवान अल्-जेयश ' किंवा ' सैन्य खाते. ' सैन्य भरती व सैन्याचा पगार या बाबी सदर खात्याकडे सोपविलेल्या होत्या. या खात्याचा अधिकार नेहमीच चाले असे नाही. कारण या खात्याचे अस्तित्वच मुळी त्यावेळी सत्तेवर असलेला खलिफा अथवा त्याचा वझीर कसा आहे याच्यावर अवलंबून असे.

बगदाद या राजधानीचा संस्थापक खलिफा मन्सूर याच्या अमदानीतील कनिष्ठ हुद्यांच्या जागांमध्ये अल् खातम ( मोहोर ), खाजगी कारभारी व किताबत अल् रसाईल वल सीर ( गुप्त दप्तर ), शाही मालमत्ता आणि ' खर्च ' या खात्यांच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. त्यांच्या सर्वच खात्यांना त्याकाळी रीतसर ' दिवानां'चा दर्जा प्राप्त झालेला नव्हता. त्यानंतरच्या खलिफांच्या राजवटीत अशा प्रकारची अनेक खाती निर्माण झाली होती. त्यामुळे सरकारी कारभाराला फारशी मदत होत नसावी असे दिसते. कारण कर्तबगार शासक म्हणून ख्याती पावलेल्या खलिफा मुक्तादिरने पुढे त्या सर्व खात्यांचे एका मध्यवर्ती खात्यात, दिवान अल् दार ( राजमहाल खाते ) मध्ये एकत्रीकरण केले. या मध्यवर्ती खात्याचे तीन भाग होते. ( अ ) ' दिवान अल् मश्रिक' –खलिफा माहदीच्या काळापासून हे खाते चालू होते. पूर्वेकडील प्रांतांच्या कारभाराचे काम या विभागाकडे होते. ( आ ) ' दिवान अल् माग्रिब '– पश्चिमेकडील प्रांतांचा कारभार या विभागाकडे होता. ( इ ) दिवान अल् सवाद किंवा दिवान अल् खराज– म्हणजे खराज करासंबंधीचा[1] विभाग. दिवान पद्धती आटोपशीर करण्याचे हे प्रयत्न फारसे फलदायी ठरले नाहीत. उलट त्यामुळे सरकारी पदाची व त्यापासून मिळणाऱ्या प्राप्तीची इच्छा बाळगणाऱ्या अनेक लोकांत असंतोष पसरला. आणि खलिफा मुक्तादिर ( २९५–३२० । ९०८–३२ ) याच्या कारकीर्दीत अली इब्ने इसा या वझीराने ज्या शासकीय सुधारणा घडवून आणल्या, त्यामध्ये किमान दहा ' दिवानां 'साठी तरी स्वतंत्र

---

१. " हे सर्वात महत्त्वाचे दिवान समजले जात असे. "

अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. दिवान अल् दारचा अधिकारी त्यापैकीच एक होता. तसेच वरील तीन खाती स्वतंत्र करण्यात आली.

अब्बासी खलिफांच्या अमदानीच्या प्रारंभी दिवानांच्या अधिकाऱ्यांना फार पगार मिळत नसे. खात्याच्या प्रमुखांना व प्रांतांच्या सुभेदारांना सारखाच म्हणजे दरमहा ३०० दिऱ्हाम इतका पगार मिळे. उम्मायद खलीफांच्या राजवटीत सामान्यतः मिळणाऱ्या पगाराइतकाच हा पगार होता. पुढे सुमारे दीडशे वर्षांनी म्हणजे खलिफा मुक्तादिर याच्या अमदानीत सवाद दिवानच्या मंत्र्याला सर्वांत जास्त पगार मिळत असे. त्याला दरमहा ११,००० दिऱ्हाम पगार होता. नंतर काही काळ त्यात ५,००० दिऱ्हाम इतकी कपात करण्यात आली. कनिष्ठ पदस्थ अधिकाऱ्यांना फक्त १०० दिनार ( २२०० दिऱ्हाम ) एवढ्या पगारावर काम करावे लागे. तत्त्वतः तरी सर्व अंमलदारांचे पगार बेत माल अल् मुस्लिमीन किंवा केंद्रीय तिजोरीतून दिले जात असत. कारण हे अधिकारी सर्व समाजाची कामे करीत असल्यामुळे त्यांना समाईक कोषातून पगार देणेच योग्य समजले जात असे. तथापि कधी कधी मागे सांगितल्याप्रमाणे अधिकाऱ्यांच्या पगाराचा खर्च त्या त्या प्रांताच्या उत्पन्नातून केला जाई.

सरकारी पत्रे लिहिण्याचे व मोहोर करून ती पाठविण्याचे एक स्वतंत्र खाते ( दिवान ) होते. या ना त्या नावाने ते नेहमीच अस्तित्वात होते. उमाय्यद खलिफांच्या अमदानीत ' दिवान अल् खातम ' या नावाचे असे एक खाते अस्तित्वात असल्याचा उल्लेख मागे येऊन गेलाच आहे. अब्बासी खलिफांच्या राजवटीत या खात्याचे जे प्रधान काम होते त्याला अनुसरून दिवान अल्-तॉकी[1] असे म्हटले जाई. खलिफापुढे विचारासाठी ठेवलेल्या अर्जावर व अन्य कागदपत्रांवर खलिफाने दिलेल्या निर्णया ( तॉकी ) ला विस्तृत पत्राचे रूप देणे हे या खात्याचे प्रमुख काम होते. कधी कधी स्वतः खलिफा आपल्या सहीनिशी कागदपत्रावर आपला ' तॉकी ' लिहीत असे. त्यामुळे क्वचित् प्रसंगी ' तॉकी ' याचा खलिफाची सही असाही अर्थ होत असे. खराज कर भरण्याची मुदत पुढे ढकलण्याच्या खलिफा मुतादिद याने दिलेल्या एका निर्णयाच्या निमित्ताने या दिवानाच्या कामकाज पद्धतीची कल्पना येते. एकदा खलिफा मुतादिदपुढे खराज-संबंधीचा एक अर्ज ठेवण्यात आला. तेव्हा त्याने आपला निर्णय आपल्या सचिवाला सांगितला. त्याने तो मोजक्याच पण शक्य तो सुंदर शब्दांत आणि चांगल्या व अचूक अक्षरांत कागदावर लिहिला. मग खलिफाच्या निकालासहित तो अर्ज दिवानच्या अधिकाऱ्यांकडे देण्यात आला. त्यावरून त्यांनी कायदेशीर लेख तयार करून त्याच्या अनेक प्रती तयार केल्या ( त्यांपैकी एक रजिस्टरमध्ये ठेवली ), त्यावर खलिफाचा शिक्का

१. काही वेळा या खात्याला ' दिवान अल्–रसाइल ' किंवा इजिप्तप्रमाणे दिवान अल्–इन्शा म्हटले जाई.

व मुद्रा मारली आणि त्या सर्व प्रति परिपत्रक म्हणून सर्व प्रांतीय सुभेदारांकडे व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे रवाना करण्यात आल्या. खलिफाचा सचीव हा राजकारणी व कारस्थाने करणारा असेल तर त्याच्या पदाला खूपच राजकीय सामर्थ्य प्राप्त होत असे आणि त्याची प्रांतांच्या सुभेदारांवर व महसूल अधिकाऱ्यांवर सत्ता चालत असे. कारण याच अधिकाऱ्यांशी मुख्यतः सचिवाचा पत्रव्यवहार होत असे. म्हणून पुष्कळदा त्याच्या पदाला "सुभेदारांवर देखरेख ठेवणारे व निर्णयाचे पद" असे संबोधिले जाई.

सर्व दिवानांवर अधिकार असलेला व खलिफाशी निकटचा संबंध असलेला अधिकारी म्हणजे वझीर. हे अधिकारपद प्रारंभीच्या काळात सचीव व सल्लागार या नात्याने अगदी मुहम्मदाच्या काळापासून अस्तित्वात होते. मुहम्मदांपाशी व अब्बासी खलिफांच्या अगोदरच्या सर्व खलिफांपाशी त्यांचे विश्वासू सचीव असत. तसेच प्रसंग-विशेषी अनुभवी व ज्ञानी माणसांचा सल्लाही घेतला जात असे. तथापि पूर्वी इराणमध्ये होते तशाप्रकारचे वझीराचे कायमचे अधिकारपद अब्बासींच्या काळापासूनच निर्माण झाले. या पदावर बसलेली पहिली व्यक्ती म्हणजे 'मुहम्मदाच्या कुटुंबाचा वझीर' म्हणून समजला जाणारा अबू सलामा हा होय. या पदाचे कमी-जास्त महत्त्व खलिफाच्या व खुद्द त्या पदावर असलेल्या अधिकारी व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असे. मन्सूर किंवा माहदीसारख्या बलिष्ठ खलिफाने आपल्या वझीराला सत्ता दिली होती तरी सरकारी कारभारावर त्याचा काबू होता. तर हरून अल् रशीदसारखा करडा अंमल गाजविणारा परंतु फारसा कर्तबगार नसलेला असा राजा सत्तेवर असे, तेव्हा तो आपल्या वझीरांना (उदाहरणार्थ, प्रख्यात बार्मेसीद) सत्तेचा खूप वापर करू देई आणि मग अत्याचाराच्या मार्गाने सत्तेवर पुन्हा काबू मिळविण्याचा प्रयत्न करी. वझीराची नेमणूक नेहमीच गुणवत्तेवर केली जात असे असे नाही. पैशाच्या लोभाने खलिफाने वझीरपद दिल्याची उदाहरणे नमूद आहेत. एका दरबाऱ्याच्या सूचनेवरून खलिफा माहदी याने कोणा एका याकूब इब्नेला आपले वझीरपद देण्यासाठी त्याच्याकडून एक लक्ष दिनार घेतले होते असे म्हणतात.

सर्वसाधारणपणे पूर्वीचे बलिष्ठ खलिफा वझीर व दिवानांचे (खात्यांचे) प्रमुख या दोन्ही पदांवरील नेमणुका स्वतःच करीत असत. क्वचित प्रसंगी, उदाहरणार्थ माहदीच्या अमदानीत वझीराकडेच एक किंवा अधिक दिवान सोपविले जात. आणि वझीरपदावरून त्याला एखादेवेळी काढण्यात आले तरी त्याच्याकडे दुसरे एखादे मंत्रीपद ठेवले[1] जाई. उलट खलिफा अल्-मुक्तादिर याच्या अशांततापूर्ण अमदानीत वझीरांची नियुक्ती खलिफा

---

१. उदाहरणार्थ, अली इब्ने याक्तीन या वझीराच्या जागी खलिफा माहदी याने दुसऱ्याची नियुक्ती केल्यानंतरही याक्तीन याला 'दिवान अल् रसाइल' हे दिवान आपल्याकडे ठेवण्याची परवानगी दिली होती.

करीत असला तरी दिवानांच्या प्रमुखांच्या नेमणुका वझीर करीत असे. उदाहरणार्थ, इब्ने रजाकान या वझीराने आपल्या पसंतीची माणसे भिन्न भिन्न पदांवर नेमली होती. एवढेच नव्हे तर प्रत्येक पदाचा दर्जा निश्चित ठरवून दिला होता. वझीर कर्तृत्ववान असला तर साम्राज्याच्या [1] कारभारावर त्याला एकंदर नजर ठेवता येत असे. वझीराच्या कार्यक्षेत्र सीमान्त प्रदेशांच्या, दिवानांच्या व प्रांतांच्या कारभाराचा समावेश होत असे. या व्यतिरिक्त इस्लामच्या चौथ्या शतकात सरकारचा सर्वोच्च अधिकारी या नात्याने वझीराकडे इराक हा साम्राज्याची राजधानी असलेला प्रांत सुपूर्द केलेला होता. वझीराच्या हाती असलेली महत्त्वपूर्ण शासकीय सत्ता आणि इतरांवर अनुग्रह करण्याचे त्याच्यापाशी असलेले सामर्थ्य या दृष्टीने त्या काळातील वझीरपद हे आजकालच्या प्रधानमंत्रीपदासारखे होते. तथापि पुष्कळदा वझीरपदावर असलेली व्यक्ती आपल्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याचेही दिसते. मागितलेली लाच देण्याच्या सामर्थ्यापेक्षा ज्या माणसांपाशी अन्य कोणतीही पात्रता नाही अशा माणसांकडून लाच घेऊन दिवानमधील अधिकारांच्या जागांवर त्यांची नियुक्ती करण्याचा उद्योग वझीर करीत असे. त्यामुळे स्वतः वझीराला आपल्या मिळकतीसाठी आपल्या पगारावर अवलंबून राहण्याची बहुधा गरज नसे. अर्थात् खिलाफतीच्या इतिहासाच्या मध्यकाळात वझीराला पगार वगैरेच्या रूपाने खूप प्राप्ती होत असे. त्यामध्ये 'कातिआ' (जहागिरी) चासुद्धा कधी कधी समावेश होत असे.

खिलाफतीच्या अवनतीच्या कालखंडांत व बुवेहिद राजांच्या वर्चस्वाखाली खलिफा होते त्या काळात वझीराची जागा काही काळ तहकूब करण्यात आली होती. खरे तर खलिफा अल् रादी याच्या अमदानीतच वझीर हे साम्राज्यातील सर्वोच्च अधिकारपद अमीर अल् उमादा (सरसेनापती) याच्याकडे गेले. बुवेहिदांच्या काळात त्यांचा मुख्य अधिकारी हाच खरा वझीर असे आणि खलिफाचा मंत्री (वझीर) हा काहीसा त्याच्या खाजगी सचिवासारखा होता. त्याला रईस अल् रुआसा ही पदवी होती. पुढे सेल्जुकांच्या काळात खिलाफतीचे काही अंशाने पुनरुज्जीवन झाले तेव्हा त्याचबरोबर वझीरालाही त्याचे मूळ अधिकारपद व सत्ता प्राप्त झाली.

आता आपण खलिफाच्या तिसऱ्या शासकीय जबाबदारीचा–पोलिस व न्यायदानविषयक कारभाराशी संबंधित जबाबदारीचा विचार करू. इस्लामपूर्व काळात जमातीने ठरविलेल्या नैतिक आचरणविषयक [2] नियमांचा भंग करणाऱ्या जमातीमधील घटकांची हकालपट्टी केली जात असे अथवा 'बदला' घेण्याच्या मार्गाने जमातींत शांतता व

---

१. आपल्या अगोदरचा वझीर अली इब्ने इसा याची उलटतपासणी घेत असताना इब्ने अल् फुरात याने असे उद्गार काढले होते की, आपण पाच वर्षे "राज्याच्या शासनाचा कारभार पाहिला होता."

२. दारूबाजी व व्यभिचार यासाठी हकालपट्टी झाल्याच्या उदाहरणासाठी.

व्यवस्था राखण्याचे काम केले जात असे. जमातीमधील कोणाही माणसाचा दुसऱ्या जमातीतील व्यक्तीने अपराध केला तर त्याची जमात त्याचा बदला घेईल असा एक करार जमातीचे परचक्रापासून संरक्षण व्हावे यासाठी ठरलेला असे. त्यामुळे आपली संपूर्ण जमात ज्यामुळे गुंतली जाईल अशाप्रकारचा रक्तपात करण्यास कोणी तयार होत नसे. मक्का शहरात कुरेशी जमातीची संघसत्ता–हिल्फ-अल् फुदुल अस्तित्वात होती. शेजारच्या प्रदेशांतील टोळीवाल्यांच्या अत्याचारांना आणि शहरातील जुलमजबरदस्तीच्या कृत्यांना पायबंद घालण्याचे काम ही संघसत्ता करीत असे. तसेच शहरातील नागरिक किंवा शहराबाहेरील इसम, स्वतंत्र माणूस अथवा गुलाम व्यक्ती असा भेदभाव न करता प्रत्येक माणसाला त्याच्या हक्कांची हमी ही संघसत्ता देत असे.

मुहम्मदांनी आपल्या मदिना सनदेमध्ये कायदा व व्यवस्था राखण्याच्या या पद्धतीचा मुख्य भाग तसाच कायम ठेवला होता हे आपण मागे पाहिलेच आहे. त्याचबरोबर मुहम्मदांनी कायद्याचे पालन करणाऱ्यालाही संरक्षण दिले. तसेच खाजगी दुष्मनीतून व निश्चित उद्देश मनात बाळगून एखाद्या माणसाने दुसऱ्या व्यक्तीवर अन्याय केला तर त्या माणसाला त्याच्या जमातीने ज्याच्यावर अन्याय झाला असेल त्याच्याकडे किंवा त्याच्या वतीने सूड घेणाऱ्या इसमाकडे सुपूर्द केले पाहिजे असा एक दंडक केला. या मार्गाने गुन्ह्याचा बदला घेता येईल अशी मुहम्मदांनी निश्चित हमी मिळवून दिली. अपराधकर्त्यांच्या नातलगांनाही वरील नियम लागू करण्यात आला. त्यामुळे जमातींतील जो कोणी इसम हाती लागेल त्याचा बदला घेणे मुहम्मदांच्या नव्या नियमामुळे अशक्य झाले. आणि जो प्रत्यक्ष अपराधी असेल त्याचाच बदला घेणे कायदेशीर ठरले. रक्तपाताबद्दल सूड घेण्याच्या हक्काची परिणती जमाती-जमातीमधील पिढीजाद हाडवैरात होऊ नये या हेतूने हा नियम बनविण्यात आला होता. तथापि उम्मा (समाज) बाहेरील व्यक्तीने केलेल्या अत्याचाराचा सूड रक्तपाताने घेण्याचा हक्क कायम ठेवण्यात आला. पण असा सूडदेखील ज्याच्यावर अत्याचार झाला असेल त्या माणसालाच घेता येत असे. तो माणूस ज्या समाजातील असेल त्या सबंध समाजाला असा सूड घेता येत नसे, कारण ज्याच्यावर अत्याचार झाला असेल त्या इसमाला अथवा अत्याचार करणारा इसम अत्याचारात मारला गेला असेल तर त्याच्या वलीलाच (सर्वांत जवळचा नातलग). अत्याचारी माणसाला कोणते शासन करावयाचे हे ठरविण्याचा पूर्वीप्रमाणेच अधिकार होता. अत्याचाराचे शासन रक्तपाताने करावयाचे की अन्य नुकसान-भरपाई घेऊन करावयाचे हे हा वली आपल्या अधिकारात आपल्या इच्छेनुसार ठरवीत असे. हाच प्रघात इस्लाममध्ये कायदा म्हणून चालू राहिला.

एखाद्या इसमाला हेतुपुरस्सर दुसऱ्याचा खून केल्याच्या आरोपाखाली इमामापुढे उभे केले असेल आणि ती गोष्ट स्पष्टपणे आणि पुराव्याने सिद्ध झालेली असेल तर त्या खुनी इसमाला खून झालेल्या माणसाच्या वलीच्या हवाली करण्यात येते. वली मग

आपल्या मर्जीप्रमाणे खुनी इसमाला ठार मारतो किंवा क्षमा करून सोडून देतो. आपल्या गुन्ह्याची खुनी इसमाने स्वखुषीने कबुली दिली तरीही त्याला वलीच्या ताब्यात दिले जाते. ज्या गुन्ह्यांचा बदला घेता येतो किंवा जे गुन्हे ' हुदुद 'ला ( धार्मिक कायद्याने ठरवून दिलेल्या शिक्षा ) पात्र आहेत अथवा ज्या गुन्ह्यांसाठी मर्जीनुसार सजा ( ताझिर) देता येते असे गुन्हे करणाऱ्या माणसांच्या बाबतीतदेखील हा नियम लागू होतो. त्याचप्रमाणे जखमी इसमाला जखम करणाऱ्याला क्षमा करावयाची नसेल तर त्या गुन्ह्याचा जखमी इसमाला बदला घेता येतो.

तथापि जखम करणाऱ्या अपराध्याला सजा करण्यापूर्वी त्याला निवाड्यासाठी इमामा (म्हणजे खलिफा अथवा त्याचा प्रतिनिधी) पुढे उभे करणे बंधनकारक मानलेले आहे. ज्याला जखम केली गेली असेल, त्याला किंवा त्याच्या वलीला त्याचा परस्पर बदला घेता येत नाही. तथापि बदला घेण्याच्या हकाच्या न्याय्यतेला इमामाने मान्यता दिली असली तरी काही प्रकरणांत ( उदाहरणार्थ, डोक्याला इजा झाली असेल अशा प्रकरणात ) बदला घेण्यास प्रतिबंध केला जात असे. अशा वेळी इमाम किंवा त्याचा प्रतिनिधी या नात्याने स्वतः समाज हस्तक्षेप करीत असे. जखमी व्यक्तीला गुन्हेगाराकडून भरपाई देवविली जाई आणि गुन्हेगाराकडून स्पष्ट शब्दांत पश्चात्ताप व्यक्त केला जाईपर्यंत त्याला बदडले जाई व तुरुंगात ठेवले जाई. विशिष्ट व्यक्तीविरुद्ध केलेला गुन्हा हा गुन्हेगार व ती व्यक्ती यांच्यामधील व्यक्तिगत कारणामुळे केला गेला आहे की काय याचाही विचार केला जात असावा. एखाद्याने एखाद्याला हमरस्त्यावर लुबाडले असेल अशा प्रकरणातील गुन्हेगाराला झालेल्या शिक्षेची अंमलबजावणी इमामानेच करावी लागते. वरील प्रकारच्या गुन्ह्यासाठी गुन्हेगाराला करावयाची सजा समाजाने करावी असे गृहीत धरलेले आहे किंवा किमान ज्या व्यक्तीला अपाय केला गेला असेल त्यालाच त्याचा नेहमी बदला घेता येईल असे नाही असे मानलेले आहे. कायद्याने ठरवून दिलेल्या शिक्षा अल्लाहने प्रतिबंध केलेल्या गोष्टी मनुष्याने करू नयेत व अल्लाहच्या आज्ञांची माणसांच्या हातून उपेक्षा होऊ नये, या हेतूने स्वतः अल्लाहनेच ठरवून दिलेल्या सजा होत असेच खरे म्हणजे तत्त्वतः मानले गेले आहे. इस्लामच्या एकंदर तत्त्वाशी ही गोष्ट सुसंगतच आहे. कारण इस्लाममध्ये अल्लाह ही शासकीय व आध्यात्मिक या दोन्ही बाबतीत अंतिम अशी सत्ता मानलेली आहे. ही गोष्ट इस्लामपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या न्यायविषयक कल्पनेला नवीन होती.

मुहम्मदी धर्माच्या आगमनानंतर पैगंबर व त्यांचे उत्तराधिकारी ( खलिफा ) यांनी इस्लामी समाजाच्या अंतर्गत अनुशासनाची जबाबदारी स्वतःकडे घेतली. पुढे साम्राज्याचा विस्तार होत गेला, तेव्हा वझीर व विभिन्न प्रांतांचे सुभेदार त्या जबाबदारीतील आपला वाटा उचलू लागले. असे असले तरी साम्राज्यातील प्रजेमध्ये व्यवस्था ठेवण्याची प्रत्यक्ष जबाबदारी अंतिमदृष्ट्या खलिफाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांवर किंवा त्याच्या विशेष

महत्त्वाच्या प्रतिनिधींवरच होती. प्रत्येक शहरात एका 'रईस' (प्रमुख)ची नियुक्ती केलेली असे. शहरातील व्यवहार सुरळीत ठेवण्याची त्याच्यावर जबाबदारी असे. कधी कधी सरकारी येणे वसूल करण्याचेही काम त्यालाच पाहावे लागे. राजधानी बगदादमधील प्रत्येक विभागासाठी खलिफाचा एकेक प्रतिनिधी असे. खलिफाचा हा प्रतिनिधी आधुनिक काळातील 'मुख्तार' सारखा होता. आपल्या भागांतील घडामोडींवर तो नजर ठेवीत असे आणि आपल्या वरिष्ठांना हव्या असलेल्या कोणाही माणसाला तो पकडून देईल असा त्याच्याबद्दल विश्वास बाळगला जाई. दंगल उद्भवली किंवा अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेर परिस्थिती गेली की शहर लष्कराच्या ताब्यात दिले जात असे.

स्वसंरक्षणासाठी खलिफा सैन्याचा एक दस्ता राजधानीत नेहमी ठेवीत असे. सुरुवातीच्या काळात सैन्यामध्ये बहुसंख्य असलेल्या अरब टोळीवाल्यांपैकी निवडक सैनिकांना या दस्त्यात घेतले जात असे. पण पुढे या दस्त्यांत परकी (तुर्की व उत्तर आफ्रिकी) पगारी सैनिकांचा समावेश केला जाऊ लागला. कारण स्थानिक कट कार-स्थानांना हे परकी सैनिक बळी पडणार नाहीत आणि आपल्या धन्याशी ते एकनिष्ठ राहतील असा त्यांच्याविषयी भरवसा बाळगता येई. हा सैनिक दस्ता,[1] 'शुर्ता' या नावाने ओळखला जाई आणि राजधानीमध्ये शांतता राखण्याचे तो काम करी. कालां-तराने 'शुर्ता'ला पोलिस दलाचे स्थान प्राप्त झाले. उदाहरणार्थ, खलिफा मुक्तादिर याच्या अमदानीच्या आरंभीच्या अशांततेच्या काळात खलिफाचा खजिनदार मुनीस याने बगदाद शहरात नऊ हजार घोडदळ व पायदळ पोलिसांच्या साहाय्याने शांतता राखली होती. अशाच प्रकारचे शुर्ताचे दस्ते सुभेदार व अन्य बडे अधिकारी राहात असलेल्या प्रांताच्या राजधान्यांत व तत्सम अन्य शहरांत तैनात केलेले आढळत. त्याहून लहान शहरांमध्ये 'मौना' नावाचे सैन्यदस्ते असत. राजाचे किंवा त्याच्या प्रतिनिधीचे खास संरक्षकपथक म्हणून करावे लागणारे काम वगळता या पथकाला 'शुर्ता'दस्त्यासारखीच कामे करावी लागत. या दस्त्याच्या प्रमुखाला साहिब अल् शुर्ता किंवा साहिब अल् मौना असे म्हणत. इजिप्तमध्ये त्याला वली म्हणत. माक्रिझी याच्या म्हणण्याप्रमाणे शहरात पोलिसाच्या सहाय्याने व्यवस्था ठेवण्याची व रात्री शहरांतून हिंडून गुन्हेगारांना पायबंद घालण्याची जबाबदारी या अंमलदारावर असे. तसेच आपल्या हाताखालच्या लोकांकडून रोजच्यारोज शहरातील सर्व घडामोडींची माहिती घेऊन आणि त्याचा लेखी अहवाल तयार करून तो सुलतानाला देणे हाही त्याच्या जबाबदारीचा एक भाग होता. इब्ने खाल्दुन म्हणतो त्याप्रमाणे साहिब अल् शुर्ताचे एकंदरीत काम कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित होते. गुन्ह्यांचा बंदोबस्त, गुन्ह्यांचा तपास व गुन्हेगारांना सजा देणे ही त्याची कामे होती. साहिब अल् शुर्ता या अधिकारपदाचा उगम कशातून झाला हे सांगताना इब्ने खाल्दुन म्हणतो की, ज्या देशांतील प्रजेला खलिफाच्या सत्तेचा

---

१. या शब्दाचे मूळ परकी (? ग्रीक) शब्दात असावे.

विसर पडल्याचे दिसून येई त्या देशांतील प्रजेच्या गाऱ्हाण्यांची (मजलिम) दाद घेण्याचे काम, खलिफाने, तसे करण्याचा अधिकार दिलेला असो वा नसो, सुलतानावर येऊन पडे. अशावेळी पोलिसखाते व कायदेखाते यांच्या शासनाची जबाबदारी साहिब अल् शुर्ता व काझी हे दोघे मिळून सांभाळीत. यापैकी साहिब अल् शुर्ता हा अधिकारी 'शासकीय' कायद्याच्या (म्हणजे 'उर्फ' किंवा 'परंपराधिष्ठित कायदा.' प्रत्येक देशात अशा प्रकारचा कायदा नव्याने अस्तित्वात आला होता किंवा पूर्वीचाच जतन केला गेला होता.) आधारे आपले काम करी व निर्णय घेई. 'उर्फ' कायदा राज्याच्या भौतिक कल्याणाशी संबंधित होता. कुराणावरील भाष्य व धार्मिक कायद्याचे अन्य 'आधार' यातून निर्माण झालेल्या व धार्मिक बाबींशी संबंधित अशा 'शारी' कायद्याहून 'उर्फ' कायदा भिन्न होता. 'काझी'ला अन्य कामे करावी लागत. उदाहरणार्थ 'शार' विरुद्ध किंवा निश्चित शब्दात सांगावयाचे तर धार्मिक कायद्याविरुद्ध वर्तन करणाऱ्यांना योग्य शासन देणे आणि कायद्याने ठरवून दिलेली शिक्षा देणे ही त्याची कामे होती.

'शारी' बाबी हाताळणाऱ्या सामान्य न्यायाधीशांपेक्षा किंवा काझीपेक्षा साहिब अल् शुर्ताला व्यापक अधिकार होते. न्यायाधीशासमोर जे गुन्हे निवाड्यासाठी येत किंवा ज्या गुन्ह्यांचा आरोप असे, त्यांची आपल्या न्यायालयाच्या कक्षेबाहेर तपासणी करण्याचा न्यायाधीशाला अधिकार नव्हता किंवा त्याला आरोपीकडून सक्तीने कबुलीजबाब मिळविण्याचाही प्रयत्न करता येत नसे. तसेच संबंधीत पक्षाकडून गुन्ह्यासंबंधींची (उदा. चोरी अथवा व्यभिचार) तक्रार करण्यात आली तरच न्यायाधीशाला त्याची दखल घेता येत असे. नेहमीचा न्याय पद्धतीनुसार त्याला काम करावे लागे.[1] याउलट पोलिस खात्याच्या[2] सचिवाला तसेच प्रांताची लष्करी सत्ता असलेल्या अमीराला, गुन्ह्याचा संशय असलेल्या इसमाविषयी आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून आलेल्या अहवालाच्या आधारे कारवाई करण्याचा अधिकार होता. या बाबतीत असा नियम घालून दिलेला होता की संशयित गुन्हेगाराविषयी काही शंका असेल तेव्हा त्याचे पूर्वचरित्र विचारात घेतले पाहिजे. अमीर व पोलीस खात्याचा सचीव यांना गुन्ह्याच्या तपासासाठी संशयित इसमाला तुरुंगात डांबता येत असे, त्याला धमकावता येत असे किंवा त्याच्याकडून कबूली-[3]

---

१. एखाद्या व्यक्तीने दुसऱ्यावर गुन्ह्याचा नुसता आरोप केला असेल तर तेवढ्या-वरून आणि खटला न चालविता आरोपित व्यक्तीला न्यायाधीश तुरुंगात पाठवू शकत नसे.

२. वली अल् अहदाथ वा 'ल् माविन म्हणजे पोलीस खात्याचा प्रमुख अधिकारी –साहिब अल् शुर्ता याचे हे आणखी एक नाव आहे.

३. बळजबरीने घेतलेला कबुलीजबाब रद्द मानला जावा असा नियम असू अशा प्रकारे छळ केला जाई.

जबाब मिळविण्याकरिता त्याचा छळ करता येत असे. परंतु काझीला हा अधिकार नव्हता. तसेच अमीर व पोलीस सचिवाला, सराईत गुन्हेगार इसमाला आजन्म तुरुंगात डांबता येत असे. 'संरक्षित'[1] धर्मातील बिगर मुस्लिम साक्षीदारांचा आणि काझीच्या कोर्टात ज्यांचा पुरावा कायदेशीर समजला जात नाही अशा अन्य इसमांचा पुरावा ऐकून घेण्याचा अमीर व पोलीस सचीव यांना अधिकार होता. तसेच मारहाणीच्या ज्या प्रकारासाठी कायद्याने शिक्षा ठरवून दिलेल्या आहेत अशा गुन्ह्यासंबंधीच्या तक्रारीही या दोघा अधिकाऱ्यांपुढेच ठेवल्या जात. साहिब अल् शुर्ता या पदावर येणारे लोक नेहमीच निर्दय व दुष्ट स्वभावाबद्दल कुप्रसिद्ध असत. अब्दल् रहमान इब्ने उमेद हा अशा अधिकाऱ्यांपैकी एक कमालीचा निर्दय व दुष्ट इसम होता. अब्द अल् मलिक या उमय्यद खलिफाच्या अंमदानीतील इराकचा सुप्रसिद्ध सुभेदार हज्जाज[2] याने या इसमाची कुफा येथे पोलिस सचीव म्हणून नेमणूक केली होती. एका समकालीन माणसाने त्याच्याविषयी पुढील माहिती सांगितली आहे : "त्याच्यासारखा साहिब अल् शुर्ता मी कधीही पाहिलेला नाही. कर्ज प्रकरणातील इसम वगळता इतर कोणाही इसमाला त्याने कधीही साधी तुरुंगाची शिक्षा देऊन सोडले नाही. एखाद्या 'ताकिब' (समाजातील एखाद्या गटाचा प्रमुख) माणसाला त्याच्यासमोर उभे केले की तो त्याला एका टोकदार हत्याराने (मानकिबा) खुपसत असे. त्याच्यासमोर कोणी सोन्याची खाण खणण्याचा व्यवसाय करणारा इसम आला की त्याच्यासाठी कबर खोदून त्यात तो त्याला पुरत असे; कोणी एखाद्याने तीक्ष्ण हत्याराने दुसऱ्यावर हल्ला केला असेल किंवा त्याचा प्राण घेण्याची धमकी दिली असेल असा इसम त्याच्यासमोर आणला गेला तर त्याचे तो हात तोडून टाकी; कोणी राहात असलेले एखादे घर कोणी इसमाने जाळले तर तो त्या इसमाला जाळून टाकी; चोरीच्या गुन्ह्याचा संशय असलेला व संशयास्पद चारित्र्याचा एखादा इसम त्याच्यापुढे आला तर त्या इसमाविरुद्ध प्रत्यक्ष पुरावा नसला तरी तो त्याला तीनशे फटक्यांची सजा ठोकी. त्याच्यासमोर एकही गुन्हेगार उभा केला नाही असेही काही दिवस जात. हज्जाज याने शेवटी तर त्याच्याकडे कुफाप्रमाणेच बसरा येथील पोलिसखातेदेखील सोपविले होते."

इस्लामी राज्याचे धार्मिक व राजकीय असे जे द्विदल स्वरूप होते त्याच्याशी सुसंगत अशा पद्धतीने कायद्याचे निश्चितपणे पालन व्हावे यासाठी साहिब अल् शुर्ता या अधिकाऱ्याप्रमाणेच मुहतासिब या नावाची दुसरीही एक अधिकाराची जागा निर्माण करण्यात आली होती. कायद्यातील धर्मविषयक बाबींच्या पालनावर लक्ष ठेवणे हे या अधिकाऱ्याचे काम होते, तसेच इस्लामच्या धार्मिक व नैतिक आदेशांचे पालन होते

---

१. काझीच्या कोर्टात फक्त मुस्लिमांचाच पुरावा ग्राह्य मानला जाई.

२. मृत्यू : ९५ । ७१४

आहे की नाही ते पाहणे, ही त्याचीच जबाबदारी होती. या अधिकाऱ्याची नियुक्ती खलिफा किंवा त्याचा वझीर याच्याकडून केली जात असे. अन्य सरकारी अधिकाऱ्यां-प्रमाणे हा अधिकारीसुद्धा मुस्लिम तसेच प्रतिष्ठित व स्वतंत्र माणूस असावा लागे. सामान्यपणे तो विधिपंडित असे. त्याच्यावर सोपविलेल्या ठराविक पोलिसी कामा-व्यतिरिक्त तो फौजदारी न्यायाधीशाची कामेही करीत असे. कामाच्या दृष्टीने त्याचे स्थान काझी व नाझीर अल् मजलिम ( अपराध समीक्षक ) या दोहोंच्या मधले होते. परंतु त्याच्या अधिकाराचा दर्जा व अधिकार या बाबतींत तो या दोन्ही अधिकाऱ्यांपेक्षा कनिष्ठ होता.[1] काही बाबतीत त्याच्या व काझीच्या जबाबदाऱ्या सारख्याच होत्या. कारण या दोन्ही अधिकाऱ्यांना अर्जदारांच्या अर्जांचा विचार करण्याचा अधिकार होता. तथापि मुहतासिबचे अधिकारक्षेत्र सदोष वजने-मापे, लबाडीचे विक्रीव्यवहार आणि कर्जाची परतफेड न करणे यांच्याशी संबंधित बाबींपुरतेच मर्यादित होते. जेव्हा गुन्ह्याच्या वस्तुस्थितीविषयी संदेह नसेल, तेव्हा त्याला तत्संबंधीचे खटले तात्काळ चालविता येत. परंतु पुरावे तपासून घेण्याची व शपथ घेण्याची ज्या प्रकरणात गरज असे तेव्हा ती प्रकरणे काझीकडे सुपूर्द केली जात. मुहतासिबचे काम मुख्यतः नियंत्रकाच्या कामासारखे होते. संबंधित पक्षाकडून गाऱ्हाणे आले नाही तरी स्वतः पुढाकार घेऊन व्यवहार योग्य-रीतीने घडतील आणि त्यात काही गैरप्रकार होणार नाही हे पाहण्याचा त्याला अधि-कार होता. कोणत्याही ठिकाणचा मुस्लिम समाज मशिदीत जाऊन शुक्रवारची प्रार्थना करण्याच्या आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करणार नाही यावर मुहतासिबला लक्ष ठेवावे लागे. ज्या ठिकाणी किमान चाळीस मुस्लिम असतील, त्यांनी एकत्र जमून प्रार्थना केली पाहिजे. परंतु मुस्लिमांची संख्या चाळीसपेक्षा जास्त असेल आणि एकत्र प्रार्थना करण्याबाबत त्यांच्यात मतभेद असेल तेव्हा त्यांना एकत्र प्रार्थना करावयास लावण्याच्या बाबतीतील मुहतासिबचा अधिकार कधी कधी विवादास्पद समजला जाई. 'आधान'चा आग्रह धरणे किंवा 'मुआधाधिन'च्या प्रार्थनेसाठी बोलाविणे हे या प्रसंगीचे मुहता-सिबचे एक कर्तव्य समजले जाई. 'आधान'च्या[2] कायदेशीर वेळा कोणत्या हे सांगण्यासाठी 'मुआधिन'ला बोलावून घेण्याचा मुहतासिबला अधिकार होता. बहुधा नियमितपणे प्रार्थनेला येणारी एखादी मुस्लिम व्यक्ती एखादवेळी आली नाही तर तिने नेहमी आलेच पाहिजे असा आग्रह मुहतासिबला धरता येत नसे. ज्या मशिदी खाजगी व्यक्तींच्या ताब्यात नसतील अशा मशिदींची दुरुस्ती करणे आवश्यक असेल तेव्हा त्याकडे समाजाचे लक्ष वेधणे हे मुहतासिबचे काम होते. त्याचप्रमाणे धार्मिक

---

१. परंतु काझी आपल्या कामाकडे दुर्लक्ष करीत आहे असे मुहतासिबला आढळले तर त्याबद्दल त्याने आपली नापसंती दर्शविली पाहिजे अशी अपेक्षा होती.

२. प्रार्थनेसाठी जमलेल्या लोकांची पंचाईत होईल इतकी लांबलचक प्रार्थना एखादा इमाम करीत असेल तर मुहतासिब त्याला ताकीद देऊ शकत असे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना (उदाहरणार्थ, रमझानच्या उपवासात जेवणारांना) पायबंद घालणे, ही मुहतासिबची जबाबदारी होती. परंतु निव्वळ संशयावरून मुहतासिबला त्यांच्याविरुद्ध कारवाई करता येत नसे. प्रथम या लोकांकडून नियमांचे उल्लंघन कोणत्या कारणांमुळे झाले याची चौकशी करणे जरूर मानले जाई.[१] त्याचप्रमाणे विधवा व घटस्फोटिता यांनी पुन्हा लग्न करण्यापूर्वी काही निश्चित काळ (इद्दत) थांबले पाहिजे, या कायद्याचे त्यांच्याकडून पालन होईल याकडे लक्ष ठेवणे हे मुहतासिबचे काम होते. आपल्याच दर्जाच्या पुरुषांशी अविवाहित मुलींना लग्न करण्यास उत्तेजन देणे हेही त्याचे काम समजले जात असे.

इस्लामची वास्तविक तत्त्वे व इस्लामनिष्ठांचे आध्यात्मिक हित यांची काळजी घेणे हेही मुहतासिबचे काम समजले जाई. उदाहरणार्थ, सामान्यपणे विधिपंडितांच्या वर्गात न मोडणारा एखादा इसम अकस्मात कायद्याचे अध्ययन करू लागला असेल आणि आपल्याकडे अर्ज घेऊन येणाऱ्यांची तो कदाचित दिशाभूल करीत असेल, तर तो व्यवसाय करण्यात त्याचा हेतू काय आहे त्याचा तपास करून, त्याला त्याच्या व्यवसायातून दूर करण्याची सत्ता मुहतासिबला होती. त्याचप्रमाणे नियमानुसार धर्मशास्त्राचा अभ्यास करणारी एखादी व्यक्ती 'इज्मा'ने संमत केलेल्या मतांविरुद्ध मते मांडू लागली तर तिला प्रतिबंध करण्याची सत्ता मुहतासिबला होती. अशा इसमाने पश्चात्ताप व्यक्त केला तर ठीकच, नाही तर धर्माची शुद्धता राखण्याची जबाबदारी (बहुधा मुहतासिबच्या सांगण्यावरून) राजाला पार पाडावी लागे. मुहतासिब शाळांनादेखील भेटी देत असे. शाळांमध्ये काय व कसे शिकविले जाते याची पाहणी करणे हाच केवळ त्याच्या भेटीचा हेतू असे असे नाही, तर शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना कठोरपणे बडवीत नाहीत ना हे पाहण्यासाठीही तो शाळांना भेटी देत असे.

जनतेच्या नैतिक आचरणाकडे लक्ष देणे हे मुहतासिबचे एक महत्त्वाचे काम होते. सार्वजनिक ठिकाणी पुरुष स्त्रियांबरोबर फिरणार नाहीत याची काळजी घेणे; तसेच दारू पिऊन घराबाहेर हिंडताना कोणी दिसला आणि आपल्या त्या अवस्थेबद्दल खोटी कारणे सांगत असला तर त्याला कडक शासन करणे ही त्याची जबाबदारी होती. सार्वजनिक जागी मद्यप्राशनास अटकाव करणे, तसेच मद्यप्राशन करणारा मुस्लिम असेल तर त्याला ताकीद देणे आणि त्याच्याजवळची दारू ओतून देणे[२] हे त्याचे काम होते. मद्यपी व्यक्ती 'संरक्षित' धर्मांपैकी एखाद्या धर्माची असेल तर तिला सार्वजनिक ठिकाणी

---

१. रमझानच्या उपवासात जेवणारा इसम कदाचित अशक्त असेल किंवा प्रवासात असेल, म्हणून उपवास न करण्याबद्दल त्याला क्षमा करता येते.

२. अबू हनिफा या सर्वांत उदार विचाराच्या इमामाने अशा प्रकारे एखाद्याच्या खाजगी मालकीची वस्तू नष्ट करण्याचा मुहतासिबला हक्क नाही असे म्हटले आहे.

पुन्हा तशा प्रकारचा गुन्हा न करण्याची ताकीद मुहतासिब देत असे. धार्मिक कायद्या-प्रमाणे संगीताची वाद्ये वाजविण्यास मनाई केलेली आहे. या नियमाचे पालन होते की नाही ते पाहण्याचे काम मुहतासिबला करावे लागे. त्याचप्रमाणे त्याला खेळ व खेळणी यांच्यावरही देखरेख ठेवावी लागे. कारण या गोष्टी प्रत्यक्षपणे कायद्याच्या विरुद्ध[1] नसल्या तरी गुन्ह्याच्या कारणांशी त्यांचा संबंध असू शकतो असे मानलेले आहे. मुलींमध्ये मातृभावना निर्माण करण्याच्या दृष्टीने बाहुल्यांचा उपयोग होत असला तरी त्यामुळे विवाहित स्त्रीचे चित्र काढण्यास एखाद्याला उत्तेजन मिळण्याची किंवा त्यावरून मूर्ती तयार केली जाण्याची शक्यता मानली जाते.

येथे ज्या गुन्ह्यांचा उल्लेख केला आहे, ते गुन्हे जाहीरपणे केले गेले असतील तरच मुहतासिबला त्याविरुद्ध इलाज करता येत असे. बंद दरवाजापलीकडे जाण्याची किंवा शिष्टाचाराच्या पडद्याच्या आत डोकावण्याची मुहतासिबला मुभा नव्हती. बाजारात व इतर सार्वजनिक जागी लबाडीचे व्यवहार होणार नाहीत याची काळजी घेणे हे त्याचे काम होते. विशेषतः व्यापारउदीमात होणाऱ्या लबाड्या त्याच्या कार्यकक्षेत येत असत. बाजारा-तील सर्व व्यापाऱ्यांवर व कारागिरांवर त्याची देखरेख असे. मुहतासिबच्या सहाय्यक अधिकाऱ्यांना या लोकांवर देखरेख ठेवण्यासाठी रोज हिंडावे लागे. व्यापाऱ्यांच्या व कारा-गिरांच्या हिकमतींशी अधिकाऱ्यांना तोंड देता यावे यासाठी त्यांच्या हिकमतींची माहिती देणारी काही पुस्तकेही होती. उधारीच्या व्यवहारांवर जबर व्याज घेतले गेले असले तरच मुहतासिबला त्याची दखल घेता येई. कारण अशा प्रकारे जबर व्याज घेण्याचे प्रकार बेकायदेशीर असल्याबद्दल सर्वच कायदेपंडिताचे एकमत होते. तथापि रोख रकमेवर व्याज घेण्याची बाब मुहतासिबच्या कार्यकक्षेत येत नसे. अशा व्यवहाराला फारशी कायदेशीर हरकत घेतली जात नसे. नोकरचाकरांना पुरेसे खायला न घालता किंवा त्यांना शक्तीबाहेर काम करावयास लावून त्यांच्याशी किंवा जनावरांशी क्रूरपणाने वाग-ण्याच्या प्रकारांची दखल मुहतासिबच घेत असे.

मुहतासिबकडे जी इतर अनेक प्रकारची कामे सोपविलेली होती, त्यांपैकी कित्येक कामे सार्वजनिक सुखसोयींशी निगडीत होती. नैतिक आचरण किंवा धार्मिक संस्था यांच्याशी त्यांचा तितकासा संबंध नव्हता. उदाहरणार्थ, ज्या गावातील पाणवठे अस्वच्छ झाले असतील किंवा ज्या गावी गरीब वाटसरूंची सोय नसेल अथवा जेथील भिंती कोसळण्याची भीती असेल, अशा गावातील गावकऱ्यांना सरकारी तिजोरींत पैसा नसेल तेव्हा स्वखर्चाने या गोष्टींचा बंदोबस्त करण्याचा हुकूम मुहतासिबला देता येत असे.

---

१. मुहम्मद पैगंबरांना एकदा आपली पत्नी आयेषा ( ती ९ वर्षांची असताना तिच्याशी त्यांनी विवाह केला होता ) ही इतर मुलींबरोबर बाहुल्यांचा खेळ खेळताना दिसली. तेव्हा त्यांनी त्याबद्दल नापसंती दर्शविली नव्हती अशी पारंपरिक समजूत आहे.

इस्लामी प्रदेशाच्या सीमेवरील एखाद्या गावच्या भिंती कोसळून त्या प्रदेशाला धोका पोचणार असेल तर त्या ठिकाणच्या लोकांना ते गाव सोडून दुसरीकडे जाण्याची सुभेदार परवानगी देऊ शकत नसे. इतर संकटप्रसंगी ज्याप्रमाणे श्रीमंतांना व समर्थ स्थानिक व्यक्तींना सहाय्याचे आवाहन केले जाई, तसे अशाही प्रसंगी केले जात असे. तथापि अशी बाब सरकारच्या नजरेला आणून देणे आणि प्रमुख असामींना मदतीचे आवाहन करणे ही मुहतासिबची जबाबदारी समजली जाई. एखादा रहदारीचा रस्ता भरपूर लांब-रुंद आहे म्हणून घर अथवा अन्य इमारत बांधावयास हरकत नाही असे समजून कोणी बांधकाम करीत असेल तर ( ती इमारत अगदी मशीद असली तरी ) त्यामुळे रस्त्यावर अतिक्रमण होऊ न देण्याची तसेच रस्त्यावर येणारा इमारतीचा भाग पाडून टाकण्याची दक्षता घेणे हे मुहतासिबचे काम समजले जाई. त्याचप्रमाणे मुस्लिम व्यक्तीच्या मालकीच्या घरांतील स्त्रियांची उठण्याबसण्याची जागा वरच्या बाजूने दिसेल इतक्या उंचीवर शेजारी दुसरे घर[१] बांधले जाणार नाही हे पाहणे हीदेखील मुहतासिबचीच जबाबदारी होती. तसेच एखाद्या घराच्या पावसाच्या पन्हाळी किंवा घाण-पाणी सांडणाऱ्या उघड्या नळ्या रस्त्यावर येत असल्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या अंगावर घाण पडणार नाही याची मुहतासिबला काळजी घ्यावी लागे. वाहनांच्या किंवा पादचाऱ्यांच्या रहदारीला अडथळा किंवा अडचण होणार नाही हे पाहण्याचा मुहतासिबला अधिकार होता. जाण्या-येण्याला अटकाव होईल अशा रीतीने बाजारपेठेतील अरुंद रस्त्यांवर आपला माल ठेवण्यास मुहतासिब व्यापाऱ्यांना बंदी करू शकत असे. बाजारात येणाऱ्या गिऱ्हाईकांच्या व इतर लोकांच्या कपड्यांना व शरीराला इजा पोचू नये यासाठी बाजारातून लाकडाची किंवा गवताची ओझी अथवा अन्य एखादी अप्रिय वस्तू प्राण्यांच्या पाठीवर लादून नेण्यास मुहतासिब बंदी करू शकत असे. त्याचप्रमाणे बाजारातील व्यापारी आपले गाळे साफसूफ ठेवतात की नाही हे पाहणे ही त्याचीच जबाबदारी होती.

अशा रीतीने कायद्याविरुद्ध गुन्हे होणार नाहीत हे पाहणे, ते शोधून काढणे व दोषी ठरलेल्या गुन्हेगारांना दिलेल्या सजांची अंमलबजावणी करणे या साहिब अल् शुर्ता व मुहतासिब यांच्या जबाबदाऱ्या होत्या. आरोपीवरील आरोपांची तपासणी करण्याचे व त्याला सजा देण्याचे काम काझी करीत असे. कायदाविषयक सर्व बाबींत तत्त्वतः काझीचीच सत्ता चालत असे. इस्लामधर्माचा प्रमुख हाच कायद्याने सर्व मुस्लिम समाजाचा न्यायाधीशही आहे असे मानलेले आहे. त्यालाच तंट्याचा निवाडा करण्याची सत्ता असते. आपल्यावर अन्याय झाला आहे असे ज्यांना वाटते ते न्याय मिळावा म्हणून आपले गाऱ्हाणे त्याच्याचपुढे नेत असतात; किंवा आपल्यावरील अन्यायाचा सूड घेणे स्वतःला शक्य होत नाही तेव्हा त्याच्याकडेच धाव घेत असतात. पैगंबर व प्रारंभीचे खलिफा त्यांच्यापर्यंत पोचू शकणाऱ्या लोकांच्या प्रकरणांचा पुष्कळदा स्वतः तेच निवाडा

---

१. विशेषतः ज्यू किंवा ख्रिश्चन व्यक्तीचे घर.

करीत असत. खलिफाला या कामी मदत करण्यासाठी प्रथम खलिफा उमरनेच काझीची नियुक्ती केली असे सामान्यतः मानले जाते. त्याप्रमाणे मदिना, कुफा व बसरा येथील न्यायाधीशांची नेमणूक उमरनेच केली असे नमूद आहे. तथापि हिशाम व दुसरा वालिद या उमय्यद खलिफांच्या अमदानींत या शहरातील न्यायमूर्तींच्या नेमणुका खलिफां-ऐवजी इराकचा सुभेदार करीत असे. न्यायमूर्तींच्या नेमणुका करण्याच्या आपल्या अधिकाराचा प्रांतांचे सुभेदार उपयोग करीत ही गोष्ट तर प्रसिद्धच आहे. खरे तर आपल्या मर्जीप्रमाणे ते न्यायाधीशांची निवड करीत किंवा त्यांना काढून टाकीत. प्रारंभीच्या काळातील अब्बासी खलिफा मन्सूर याच्या अमदानीत न्यायाधीशाची नियुक्ती खलिफाने करण्याची पद्धत पुनश्च सुरू झाली. परंतु नंतरच्या काळात पुन्हा वझीर व प्रांतांचे सुभेदार स्वतःच आपले काझी नेमू लागले. खलिफाने नियुक्त केलेल्या काझींच्या बरोबरीची सत्ता सुभेदाराने व वझीराने नेमलेल्या काझींना होती. काझींची नियुक्ती खलिफाने किंवा त्याच्या प्रतिनिधीने केलेली नसेल तर कोणाही काझीला सत्ता प्राप्त होत नसे. पण एकदा त्याला ती मिळाली की मग कोणत्याही नियंत्रणापासून तो स्वतःला स्वतंत्र समजत असे. ही गोष्ट पुढील हकीगतीवरून स्पष्ट होते. इजिप्तमधील बारीद (गुप्तहेर खाते) चा एक अधिकारी एकदा एका काझीच्या कोर्टात न्याय देण्यासाठी बसण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा काझीने त्याला सुनावले, "हे 'धर्मश्रद्धांच्या सेनापती'चे[1] कोर्ट आहे. त्याच्या आज्ञेशिवाय कोणालाही येथे न्यायासनावर बसता येणार नाही.[2]"

इस्लामी साम्राज्यातील सर्व प्रमुख शहरांसाठी मुख्य काझी होता. बगदाद, कैरो व खिलाफतीच्या पूर्व भागातील शहरांतील मुख्य काझीला काझी अल् कुज्जात असे म्हणत तर उत्तर आफ्रिका व स्पेनमधील काझी, 'काजी अल् जामा' (समाजाचा काझी) या नावाने ओळखला जाई. स्पेनमध्ये सुरुवातीच्या काळात लष्करातील वरिष्ठ वर्गामधील व्यक्तीची या पदावर नेमणूक होत असे. त्या काळात या पदावरील व्यक्ती, 'काझी अल् झुंड' किंवा 'सेनेचा काझी' या संज्ञेने ओळखली जात असे. तसेच उत्तर आफ्रिकेत 'काझी अल् अस्कर' या नावाचा अशाच प्रकारचा एक अधिकारी असे. तथापि त्याचे कार्यक्षेत्र सेनेपुरतेच मर्यादीत होते. मात्र राजधानीतील सेना सोडून इतरत्र जेथे जेथे सेनेची ठाणी असतील तेथे तेथे त्याचा अधिकार चालत असे.

इजिप्तमध्ये फातिमी वंशाच्या राजवटीत बहुधा स्वतः खलिफाच न्यायव्यवस्थेचा कारभार पाहण्यासाठी आपला प्रतिनिधी नेमीत असे. त्यालादेखील काझी अल् कुज्जात

---

१. त्यावेळी खलिफा मामुन हा या पदावर होता (हिजरी सन १९८–२१८).

२. काझी इब्ने हरबावायही (हिजरीचे तिसरे शतक) याने इजिप्तमध्ये त्याची नियुक्ती झाली तेव्हा तेथील सुभेदार इब्ने बिस्ताप याला भेटून त्याला आदरांजली वाहण्यास काझीने नकार दिला.

म्हणत आणि त्याचा हुद्दा श्रेष्ठ समजला जाई. पुढे राज्याची खरीखुरी सत्ता वझीराच्या हाती गेली आणि लष्करावरही त्याची हुकूमत चालू लागली[१] तेव्हा काझीची नियुक्ती वझीर करू लागला. इब्ने खाल्दुनच्या काळात[२] प्रख्यात कैरो मशिदीतील विद्यालया-मधील व अल् अझर विद्यापीठातील इस्लामी कायद्याच्या चार 'संप्रदायां'पैकी प्रत्येक संप्रदायाचा स्वतःचा असा 'काझी अल् कुज्जात' होता. परंतु त्या सर्वांमध्ये शिया-पंथीयांच्या काझीचे स्थान सर्वांत श्रेष्ठ होते. कारण त्याच्या सत्तेला बहुसंख्य लोकांची मान्यता होती.

काझीच्या पदासाठी पुढील शर्ती आवश्यक मानल्या जात. तो पुरुष असला पाहिजे, कारण स्त्रिया या सार्वजनिक[३] अधिकारपदाच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यास समर्थ नसतात असे मानलेले आहे. तो पूर्ण वयात आलेला व स्वतंत्र असला पाहिजे, कारण नाहीतर आपल्या कृतींच्या बाबतींत तो कायदेशीरपणे जबाबदार राहणार नाही. तसेच तो मुस्लिम असला पाहिजे.[४] कारण कोणाही इस्लामेतर व्यक्तीला खऱ्या इस्लामधर्मीयांवर सत्ता चालविण्यासाठी नेमता येत नाही. तसेच त्या व्यक्तीजवळ चांगली आकलनशक्ती व समज असला पाहिजे. त्याची दृष्टी निर्दोष असली पाहिजे आणि त्याला चांगले ऐकू आले पाहिजे.

काझी हा सच्चरित असावा ही त्याच्या बाबतीतील एक अनिवार्य पात्रता मानली जात होती. तथापि इतर अधिकारपदांप्रमाणे न्यायमूर्तीपदावरही पुष्कळदा व्यक्तिगत किंवा पैशाच्या हेतूने नेमणुका होत ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणूनच इमाम अबू हनिफा-सारख्या प्रतिष्ठित व्यक्तींनी ते पद स्वीकारणे मानहानीकारक आहे असे समजून ते नाकारले होते. जुनी कागदपत्रे व उपरोधात्मक लिखाण विश्वासार्ह मानले तर इस्लामी राज्यांतील न्यायशासन नेहमीच उच्च प्रतीचे होते असे दिसत नाही, ही वस्तुस्थिती

---

१. बद्र अल्-जमाली (४६६ / १०७४) हा वझीरपदावर आल्यापासून या गोष्टीस सुरुवात झाली.

२. इ. स. १३३२–१४०६.

३. ज्या प्रकरणात स्त्रियांनी दिलेले साक्षीपुरावे कायदेशीर मानलेले आहेत, त्या प्रकरणी स्त्रियांना न्यायाधीश म्हणून कायद्याप्रमाणे काम करता येऊ शकते, असे अबु हनिफा याचे मत असल्याचे मावार्दी याने नमूद केले आहे. परंतु इतर अधिकारी पंडित, स्त्रिया या कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रात काम करावयास पात्र आहेत हे मानावयास तयार नाहीत. त्यांचे असे मत आहे की, कुराणाने (४३८) पुरुषाच्या डोक्यावर स्त्रियांना अधिकारी म्हणून बसावयास मनाई केलेली आहे.

४. मात्र इस्लामेतर व्यक्तीला आपल्या स्वतःच्या समाजात न्यायाधीश म्हणून काम करता येते असे अबु हनिफा याचे मत आहे.

आहे. अगदी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपासून अगदी कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत न्यायशासनातील प्रत्येक अधिकारी भ्रष्ट होता असे वर्णन जाहिझ याच्या एका उपरोधपूर्ण कथेत केलेले आहे. एवढेच नव्हे तर खलिफा हरून अल् रशीद याचा काझी अबु युसुफ यानेदेखील त्या काळातील न्यायाधीश आपले काम इमानदारीने करीत होते की नाही याविषयी संदेह व्यक्त केलेला आहे. कायद्यातील तरतुदीप्रमाणे आपल्या अगोदरच्या भ्रष्ट काझीवरील भ्रष्टाचाराचा खटला नव्या काझीला चालविता येतो. परंतु भ्रष्ट काझीने शपथ घेतली तर ती निरपराधीपणाचा पुरावा म्हणून स्वीकारली जाते. काझीपदाला तत्त्वतः आवश्यक समजल्या जाणाऱ्या अन्य पात्रतांपैकी एक अशी की, काझीला इस्लामी कायद्याच्या (फिकाह) चार उसूलांचे (मूळ तत्त्वांचे किंवा 'आधारां'चे) ज्ञान असले पाहिजे. अशी पात्रता असलेल्या काझीला, आपल्यासमोर विचारार्थ आलेल्या कायद्यांतील बाबींसंबंधींचे निर्णय (फतवा) देण्यासाठी 'इज्तिहाद' पद्धतीचा किंवा अनुमानाने निश्चित अधिकृत निर्णय घेण्याच्या पद्धतीचा वापर करण्याचा अधिकार असतो. या प्रक्रियेच्या दरम्यान एखाद्या प्रश्नाचा विचार करीत असता, कुराणात अथवा पैगंबरांच्या सुन्नांमध्ये तत्संबंधीचा पूर्वीचा एखादा दाखला काझीला सापडला नाही तर त्याला आपल्या स्वतःच्या सारासार बुद्धीचा वापर करण्याचा अधिकार दिलेला आहे. निर्णय देताना त्याने अशा वेळी समानान्तर व साम्य असलेल्या इतर उदाहरणांचा आधार घेतला पाहिजे.

काझीच्या अधिकारक्षेत्राची मर्यादा व्यापक व सीमित अशी दोन्ही प्रकारची होती असे दिसते. काझीचे अधिकारक्षेत्र व्यापक असेल त्या वेळी तो संबंधित पक्षांतील तंटा कायदेशीर तरतुदीप्रमाणे मिटवीत असे, अथवा विरुद्ध बाजूवर कायदेशीर जबाबदारी टाकीत असे. अर्थातच अशा प्रसंगी विरुद्ध पक्षाचे बाबतीत कबुलीजबाबाचा किंवा अन्य पुरावा उपलब्ध असला पाहिजे. सुरुवातीच्या काळात काझीकडे हेच एकमेव काम होते. कालांतराने त्याच्याकडे अन्य कामे आली. ती अशी– बुद्धिभ्रंश झाल्यामुळे किंवा अल्पवयीन वा नादार असल्यामुळे ज्या इसमांना आपल्या मालमत्तेचा ताबा मिळण्यास बंदी केलेली आहे अशा इसमांवर सतत नियंत्रण ठेवणे; तसेच त्यांचे हक्क व त्यांच्यासंबंधींच्या जबाबदाऱ्या यांची अमलबजावणी करून घेणे; अवक्फ (धार्मिक न्यास) ची व्यवस्था पाहणे; कायदेशीर मृत्युपत्रातील शर्तींची अंमलबजावणी करणे; आपल्याच सामाजिक दर्जाच्या पुरुषाशी कोणा अविवाहित स्त्रीला लग्न करावयाची इच्छा असेल तर त्या पुरुषाशी तिचे लग्न लावणे;[१] कायद्याने ठरवून दिलेल्या सज

---

१. हे काझीचे काम आहे ही गोष्ट अबु हनीफास मान्य नव्हती. आपल्या विवाहाचा प्रश्न हाताळण्यास स्वतः स्त्रियाच समर्थ आहेत असे त्याचे मत होते.

देणे;[१] रस्ते व सार्वजनिक बागा यांच्यावरील अतिक्रमणास आळा घालून आणि त्यावर इमारती बांधण्यास प्रतिबंध करून आपल्या अधिकारक्षेत्राखालील विभागाच्या हिताची जपणूक करणे.[२]

'खराज' कराची व्यवस्था ठेवण्याचे काम काझीच्या कार्यकक्षेत येत नाही. "ते लष्करी अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेतील (काम) आहे." तथापि काही तज्ज्ञांच्या मते दान-कराचा ('सदाकत') कारभार पाहण्यासाठी कोणी अधिकारी नियुक्त केलेला नसेल तर ते काम काझीच्या कक्षेत येऊ शकते. काझीला दानकर गोळा करता येतो आणि धार्मिक स्वरूपाच्या योग्य कामासाठी त्याचा पैसा खर्च करता येतो. इतर तज्ज्ञांच्या मते, काझीचे अधिकारक्षेत्र व्यापक असले तरी खराज किंवा दानकराचा कारभार त्याला पाहता येत नाही, कारण हे काम अर्थखात्याच्या कार्यकक्षेत येते आणि म्हणून ते खलिफाकडेच ठेवले पाहिजे.

काझीचे अधिकारक्षेत्र मर्यादित असेल तेव्हा त्याला आपल्या समोर आलेल्या अन्य पुराव्यावर निर्णय देता येत नाही, परंतु कबुलीजबाबावर निर्णय देता येतो. त्याला विवाहविषयक प्रकरणांसंबंधी निर्णय देता येत नाही. तथापि कर्जविषयक प्रकरणात देता येतो; तसेच धर्मादाय हिस्सा ठरविण्यासाठी मालमत्तेची किंमत ठरविता येत नाही. त्याचप्रमाणे काझीला एखाद्या विवक्षित मर्यादित क्षेत्रापुरता व्यापक अधिकार असू शकतो. उदाहरणार्थ, नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलेल्या बगदादसारख्या शहराच्या एका भागापुरता अथवा शहरातील एखाद्या विशिष्ट भागापुरता त्याला अधिकार असतो.

इस्लामच्या प्रारंभीच्या काळात खरे तर, फक्त मोठ्या शहरांसाठी काझींची नेमणूक केली जाई. कारण अशा शहरातच त्या काळात बहुसंख्य अरब मुस्लिम रहात असत. मुस्लिमेतर प्रजेला दीर्घ काळपर्यंत आपले तंटे आपापसांतच मिटवावे लागत होते आणि शक्य असेल त्या मार्गाने न्याय मिळवावा लागे. परंतु न्याय मिळणे जरूर असेल तेव्हा तो

---

१. अल्लाहसंबंधीच्या कर्तव्यांविरुद्ध केलेल्या गुन्ह्यांबद्दल या सजा असतील तर काझी स्वतः त्यांची दखल घेऊन सजा देत असे. त्यासाठी कोणी मागणी करण्याची जरुरी नसे. माणसांच्या बाबतीत केलेल्या अपराधांबद्दल त्या सजा असतील तर त्यासाठी कोणी तरी सजेची मागणी करणे आवश्यक मानले जाई. पण अबु हनीफाच्या मते या दोन्ही बाबतींत कोणाकडून तरी तक्रार केली जाणे जरूर आहे.

२. या बाबतीत स्वतः काझीला पुढाकार घेता येतो. अबु हनीफाच्या मते याही बाबतीत तक्रार येणे जरूर आहे. तथापि काझीची ही विशिष्ट जबाबदारी त्याला प्राप्त असलेल्या दैवी अधिकाराशी संबंधित आहे आणि कोणी तक्रार करो वा न करो ती जबाबदारी काझीने पार पाडावयाची असते असे समजले जाते.

त्यांना मिळत नसे असे नाही. उदाहरणार्थ, एकदा उमाय्यद वंशातील खलिफा दुसरा उमर इब्ने अब्द अल् अझीझ याच्याकडे एका ख्रिश्चन माणसाने हिशाम नावाच्या आपल्या एका नातलगाने आपली संपत्ती लुबाडली अशी तक्रार गुदरली. तेव्हा खलिफाने ती संपत्ती परत करण्याचा हिशामला हुकूम दिला आणि ज्या कागदपत्रांच्या आधाराने हिशामने त्या संपत्तीवर दावा केला होता ती कागदपत्रे नष्ट केली. खरे तर, विवाह व घटस्फोट, वारसा व अवक्फ (धार्मिक न्यास) यांसारख्या धार्मिक कायद्यांशी संबंधित बाबी काझीच्या अधिकारक्षेत्रात येत. इतर बाबी बहुधा अन्य सामान्य अधिकाऱ्यांकडे सोपविल्या जात. आपल्यापुढील बाबींसंबंधीचे निवाडे हे अधिकारी 'फिकाह' (अधिकारी व्यक्तींनी तयार केलेला कायदा)च्या अनुषंगाने न करता त्या कामी 'अदा' (परंपराधिष्ठित कायदा– इराणमध्ये त्याला उर्फ म्हणतात) चा उपयोग करीत. हा कायदा स्थानिक परिस्थिती-नुसार (काही वेळा तर खूपच) वेगवेगळा होता. त्याचप्रमाणे इस्लामचा अगदी प्रारंभीचा काळ सोडला तर नंतरच्या काळात 'इज्तिहाद' द्वारे स्वतंत्रपणे आपले निर्णय घेण्याची काझीची सत्ता हिरावून घेण्यात आली होती. काझी, कायद्याच्या ज्या संप्रदायाचा (मजहब) असेल त्या संप्रदायाच्या कायद्याच्या पुस्तकाप्रमाणे त्याला आपला निवाडा द्यावा लागे.[1]

तात्त्विकदृष्ट्यासुद्धा निकाल देण्यापलीकडे काझीचा अन्य कोणत्याही गोष्टीशी संबंध नव्हता. कायद्याच्या अंमलबजावणीचे सर्व काम अमीराकडे म्हणजे लौकिक व्यवहाराच्या शासकाकडे सोपवलेले होते. अमीर व काझी या दोघांच्या अधिकार-क्षेत्रांत जेव्हा परस्परविरोध निर्माण होई तेव्हा आवश्यकतेनुसार अमीर काझीचे निर्णय डावलू शकत असे, असे दिसते. अशा प्रकारच्या क्वचित प्रकरणांपैकी इजिप्तमधील एक प्रकरण सांगितले जाते. या विशिष्ट प्रकरणात एका विवाहित स्त्रीच्या 'वली'ने त्या स्त्रीचा विवाह रद्द करावा अशी काझीकडे मागणी केली. कारण कायद्यातील अटींप्रमाणे तिच्या नवऱ्याचा सामाजिक दर्जा तिच्या बरोबरीचा नव्हता. पण काझीने सदर विवाह कायदेशीर असल्याचे सांगून सदर मागणी फेटाळून लावली. त्यानंतर ते प्रकरण अमीरा-कडे नेण्यात आले. तेव्हा अमीराने काझीचा निवाडा स्वतः रद्द केला नाही. परंतु आपला निवाडा बदलण्याची व ते लग्न रद्द ठरविण्याची काझीला आज्ञा दिली.

दिवाणी दावा प्रथम काझीकडे जाई. दाव्याशी संबंधित असलेले पक्ष त्याच्या-समोर तोंडी कैफियत मांडीत. काझीसमोर येणारे दावे कसे चालविले जावेत या-संबंधीच्या कार्यपद्धतीचे काटेकोर नियम कायद्याच्या पुस्तकात सांगितलेले आहेत.

---

१. याला असलेला एक अपवाद लक्षणीय मानला जातो. बगदादचा काझी इब्ने हर बाबायही हा इजिप्तमध्ये काझी म्हणून काम करीत असताना आपले स्वतःचे मतच प्रमाण मानीत असे.

उदाहरणार्थ, असा एक नियम आहे की, न्यायदानाचे काम करताना तंट्याशी संबंधित व्यक्ती त्याच्यापाशी सहज पोचू शकतील अशा प्रशस्त व मोकळ्या जागी काझीने बसले पाहिजे. तसेच योग्य कारणाशिवाय त्याने एकांतात जाऊ नये. त्याने मशिदीत काम चालवू नये;[1] मशिदीत कोर्ट चालविल्यामुळे कदाचित काही लोकांना तेथे जाता येणार नाही हे लक्षात घेऊन बहुधा ही सूचना केली असावी. कैद्यांची विचारपूस करून त्यांच्यापैकी कोणाला अन्यायाने डांबले असेल तर त्याची मुक्तता करणे हे काझीचे कोर्टातील पहिले कर्तव्य असते. प्रत्यक्ष न्यायदानाचे काम सुरू झाल्यावर काझीची संदर्भ-ग्रंथांची पेटी त्याच्यासमोर असली पाहिजे. तसेच टिपणे घेणाऱ्या कारकुनावर काझीचे लक्ष राहील इतक्या अंतरावर तो बसलेला असावा. कठीण स्वरूपाच्या प्रकरणांचे बाबतीत काझीने विद्वान कायदेतज्ज्ञांशी सल्लामसलत करावी आणि आपला निर्णय साक्षीदार व कायदेपंडितांच्या उपस्थितीतच जाहीर करावा. आपल्यासमोरील खटल्यातील सत्य त्याला स्वच्छपणे प्रतीत झालेले असेल तर त्याने त्यानुसार आपला निवाडा द्यावा. पण तसे नसेल तर निर्णय काय द्यावा हे प्रतीत होईपर्यंत थांबावे. आपल्याऐवजी दुसऱ्या कोणास तरी निर्णय घेण्यास सांगू नये. प्रवासात असलेले फिर्यादी सोडून अन्य कोणी फिर्यादी एकदम मोठ्या संख्येने काझीच्या कोर्टात फिर्याद घेऊन आले तर काझीने त्याच्यांपैकी जो प्रथम आला असेल त्याची फिर्याद ऐकून घ्यावी. एकदम एकाच वेळी अनेक फिर्यादी आले तर चिठ्या टाकून प्रथम कोणाची फिर्याद ऐकावयाची हे काझीने ठरवावे.

दाव्याशी संबंधित असलेल्या दोन्ही पक्षांना, कोर्टात प्रथम कोणी बोलावे, कोठे बसावे, आपले म्हणणे कसे सांगावे, त्यांची सुनावणी कशी व्हावी या बाबतीत काझीने समान वागणूक दिली पाहिजे. दाव्याच्या दोन पक्षांपैकी एकजण मुस्लिम व दुसरा मुस्लिमेतर असेल तर मुस्लिम इसमाला कोर्टात बसण्यासाठी वरची जागा दिली जावी व त्याचे म्हणणे प्रथम ऐकून घेतले जावे. परंतु काझीने त्यांच्यापैकी कोणा एकाची बाजू घेता कामा नये किंवा आपली कैफियत कशी मांडावी यासंबंधी त्यांच्यापैकी कोणाच्याच कानात सांगता कामा नये किंवा सूचना करता कामा नये. काझीसमोर दोन्ही पक्ष येऊन बसले की मग काझीने त्यांच्यापैकी कोणी कधी बोलावे हे ठरवावे आणि ते आपले म्हणणे मांडीत असताना त्याने मध्ये बोलू नये. त्यांच्यापैकी प्रत्येकजण जर दुसऱ्याच्या अगोदर बोलण्याचा दावा करू लागला तर त्यांच्यापैकी ज्याने प्रथम खटला भरला असेल त्याला प्रथम आपले म्हणणे मांडू द्यावे. कोणी दुसऱ्याला बोलताना अडवू लागला तर काझीने त्याला आवरले पाहिजे, आणि त्याने ऐकले नाही तर त्याला शिक्षा केली पाहिजे.

एखाद्या पक्षाने अगदी उघड उघड असमर्थनीय असा दावा केला असेल तर काझीने त्याची दखल घेता कामा नये. तथापि दावा न्याय्य असेल तर काझीने प्रति-

---

१. तरीही काझी पुष्कळदा-विशेषतः पूर्वीच्या काळी-आपले कोर्ट मशिदीत चालवीत असत.

वादीला त्यासंबंधी आपले म्हणणे मांडावयास सांगावे. परंतु वादीने तशी विनंती करीपर्यंत काझीने तसे प्रतिवादीला सांगता कामा नये असे काही तज्ज्ञांचे मत आहे. परंतु ही गोष्ट महत्त्वाची नाही. प्रतिवादीला वादीचा दावा मान्य असेल तर त्याच्या विरुद्ध निवाडा दिला जावा. परंतु वादीने तशी विनंती केली पाहिजे. प्रतिवादीने वादीचा दावा नाकारला तर काझीने वादीपाशी त्याने केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ पुरावा असेल तर तो मांडण्यास सांगावे आणि तो मांडला जात असेल तेव्हा स्वतः काझीने बोलू नये. वादीजवळ पुरावा नसेल तर प्रतिवादीचे म्हणणे शपथेवर मंजूर केले जावे. परंतु वादीने विनंती करीपर्यंत काझीने प्रतिवादीला शपथ घ्यावयास सांगू नये. प्रतिवादीने शपथ घेण्यास नकार दिला तर वादीला शपथ घ्यावयास सांगावे आणि त्याने शपथ घेतली तर निकाल त्याच्या बाजूने केला जावा. त्यानेही शपथ घ्यावयाचे नाकारले तर मग काझीने दोघांनाही रजा द्यावी.[1]

आपल्या दाव्याच्या पुष्टीसाठी वादीने साक्षीदार आणले असतील तर वादीच्या पुराव्याचे खंडन करणारे पुरावे आणण्यासाठी प्रतिवादीला तीन दिवसांची मुदत दिली जावी. तीन दिवसांनंतर प्रतिवादीने कोर्टात हजर झाले पाहिजे अशी मागणी करण्याचाही वादीला हक्क आहे. ठरलेल्या मुदतीत प्रतिवादीला आवश्यक तो पुरावा हजर करता आला नाही तर वादीला आपल्या बाजूने निर्णय झाला पाहिजे अशी मागणी करण्याचा अधिकार आहे. साक्षीदार जेव्हा न्यायाधीशाच्या परिचयाचे नसतील[2] आणि ते मुस्लिम आहेत की नाही याविषयी शंका असेल अशावेळी ते स्वतःविषयी जे सांगतील ते मान्य केले जाते. साक्षीदार 'स्वतंत्र व्यक्ती' आहेत की नाही याविषयी शंका असेल तेव्हा साक्षीदारांनी त्याविषयीचा पुरावा सादर केला पाहिजे.[3] साक्षीदार व्यक्ती 'उदुल' 'सच्चा'

१. शाफीच्या मते ज्या वस्तूच्या मालकीसंबंधी दावा केलेला आहे, ती वस्तू ज्याच्या ताब्यात असेल त्याचा स्वतःचा शब्द हा त्या वस्तूवरील त्याच्या मालकीच्य दृष्टीने पुरेसा समजला जावा.

२. काझीसमोर साक्षीदार येतात तेव्हा (काझीला ते अपरिचित असल्यामुळे) काझी त्यांच्यापैकी प्रत्येकाचे वर्णन लिहून ठेवतो. आपल्या कुटुंबाशी असलेले साक्षीदाराचे नाते किंवा मौला या नात्याने त्याचा कोणाशी संबंध आहे, त्याची तत्संबंधीची निदर्शक पदवी (ती असेल तर), त्याच्या घरचा पत्ता, त्याच्या धंद्याच्या ठिकाणाचा पत्ता, तो जात असलेल्या मशिदीचे किंवा पूजास्थानाचे नाव वगैरे वर्णन काझी लिहून घेतो.

३. कुराणानुसार (२^२८२) दोन साक्षीदारांची साक्ष आवश्यक आहे. दोन पुरुष साक्षीदार मिळत नसतील तर त्याऐवजी एक पुरुष व दोन स्त्रिया पुरेशा असतात. बैदावी याच्या मते फक्त दिवाणी दाव्यातच स्त्रिया साक्षीदार म्हणून स्वीकारार्ह असतात. कुराणाच्या भाष्यकारांचे असे म्हणणे आहे की साक्षीदार हे पूर्ण वयात आलेले, 'स्वतंत्र' व सच्चरित असले पाहिजेत.

व सुयोग्य अशा आहेत की नाही याबद्दल शंका घेतली गेली असेल आणि त्यासंबंधींच्या चौकशीसाठी [ अशी चौकशी 'अशाब अल् मसाइल'[1] या नावाने ओळखले जाणारे

---

१. याचा शब्दशः अर्थः 'शंका असलेले' म्हणजे 'चौकशी करणारे'. घॉथ इब्ने सुलेमान (हि. स. १४०–४) या इजिप्तमधील काझीने साक्षीदारांची गुप्तपणे चौकशी करण्याची पद्धत प्रथम सुरू केली. त्याच्या अगोदरचे काझी त्यांच्यासमोर आलेल्या व प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या साक्षीदारांच्या साक्षी निःशंकपणे मान्य करीत असत. प्रतिष्ठित न समजल्या जाणाऱ्या साक्षीदारांच्या साक्षी फेटाळून लावल्या जात. साक्षीदार अगदीच अपरिचित असेल तेव्हा त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्याची माहिती विचारली जाई व त्यांनी दिलेली बरी किंवा वाईट माहिती मान्य केली जाई. साक्षीदारांची गुप्तपणे चौकशी करणारा घॉथ, हा काझी होईपर्यंत ही पद्धती चालू होती. "त्या काळात (आपली साक्ष देऊन झाल्यावर) साक्षीदार इतर लोकांत सामान्य माणूस म्हणून पुन्हा जाऊन बसत असे. कोणीही (धंदेवाईक) साक्षीदार कधीच नव्हता किंवा तसा कधी कोणाचा उल्लेख केला जात नसे."

"इब्ने नक्षुवायूही याने म्हटले आहे : एकदा बसराचा काझी तामिनी याने ३६ हजार लोकांच्या साक्षी घेतल्या. मी त्याला म्हटले, "ही संख्या फारच मोठी झाली. हे कसे काय?" तेव्हा काझीने उत्तर दिले, "साक्षीदार होण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या करू शकणारे सर्व लोक साक्षी देण्यास पात्र असतात, या अबु हनिफा व अन्य कायदेपंडितांच्या मताचे काझी आहेत." त्यामुळे सर्व लोकांना तामिनीसमोर साक्षी देता येत. त्यांची साक्ष ऐकून घेतल्यानंतर त्यांना तो प्रश्न विचारीत असे. साक्षी देणारे प्रतिष्ठित इसम असतील तर, त्यांच्या साक्षी तो ग्राह्य मानीत असे. एकाच भागात राहणारे एकमेकांचे शेजारीपाजारी व इतर लोक एकमेकांच्या बाजूने साक्षी देत असत. इस्माईल सत्तेवर येईपर्यंतच्या काळात काही विशिष्ट लोकांचीच साक्षीदार म्हणून नेमणूक करण्याची पद्धत होती असे आम्हांला आढळले नाही."

असे असले तरी अगदी पूर्वी मामुन खलिफाच्या कारकीर्दीमध्ये 'साक्षीदार' या नावाने ओळखले जाणारे एक प्रकारचे अधिकारी होऊन गेले असावेत (इब्ने अल् असीर). इब्ने अल् असीर हा या बाबतीत तबरीशी सहमत दिसत नाही. धंदेवाईक 'साक्षीदारां'चे हे पद भ्रष्ट व कमीपणाचे समजले जाई. असे म्हणतात की एकदा एका प्रसंगी एका काझीने उद्गार काढले होते की, "साक्षीदारामध्ये हे 'नारकीय' गुण नसतील तर तो स्वतःच नरकात जाईल." काझीने पुढे प्रश्न केला आहे, "१० हजार वस्तीच्या शहरात फक्त १० जण साक्षीदार असतील तर त्यांचे कसे काय होत असेल? शहरातील बाकीच्या लोकांपैकी प्रत्येकजण त्यांचा हुषारीने पराभव करण्याच्या योजना करतात.

[ पुढील पान पाहा ]

लोक गुप्तपणे करतात ] मुदतीची आवश्यकता असेल तेव्हा चौकशी पूर्ण होईपर्यंत साक्षीदारांना डांबून ठेवण्याची मागणी वादीला करता येते. वादीपक्षाने आपला साक्षीदार कोर्टात आलेला नाही असे सांगितले असेल, तर प्रतिवादीला शपथ घ्यावयास सांगायचे की वादीने आपला साक्षीदार हजर करीपर्यंत वादीला थांबवून घ्यावयाचे यासंबंधीचा निर्णय न्यायाधीशाने आपल्या मर्जीप्रमाणे करावयाचा असतो.

कर्जासंबंधीच्या दाव्यामध्ये प्रतिवादी पक्ष आपल्या हिशेबाच्या वह्या पाहून कर्जा-संबंधीचा व्यवहार जरूर तर तपासतो. परंतु प्रतिवादीने त्या वह्या कोर्टात हजर केल्या पाहिजेत अशी वादीला मात्र मागणी करता येत नाही. तथापि प्रतिवादीने आपण कर्ज काढलेले नाही किंवा ते परत केले आहे असे सांगितले तरी ते पुराव्याशिवाय ग्राह्य धरले जात नाही. मृत इसम किंवा लहान बालक अथवा कोर्टात स्वतः उपस्थित नसलेली व्यक्ती यांच्या इस्टेटीवरचा हक्क तत्संबंधी पुरावा दिला गेला तरच कायदेशीर समजला जातो. स्वतः कोर्टात हजर नसलेल्या नागरिकाच्या हक्काच्या बाबतीत काझीला दखल घेता येते की नाही याबद्दल मतभेद आहेत.

प्रतिवादीविरुद्ध केलेल्या दाव्यामध्ये जबाब देण्याकरिता प्रतिवादीला कोर्टात बोला-विण्याच्या बाबतीत वादी पक्षाने न्यायाधीशाची मदत मागितली असेल आणि प्रतिवादी शहरात राहात असेल तर त्याला न्यायाधीश कोर्टात हजर राहण्यासाठी बोलावणे पाठवितो. प्रतिवादीने कोर्टात येण्यास नकार दिला तरी ती गोष्ट शपथेवर सांगण्याकरीता दोन साक्षीदारांना वादी घेऊन येतो आणि नंतर पोलिसप्रमुखाला[1] भेटून प्रतिवादीला कोर्टात सक्तीने हजर करण्याची त्याला विनंती करतो. प्रतिवादी शहरात हजर नसेल व ज्या ठिकाणी न्यायाधीश नाही अशा गावी असेल तर कोणा तरी समजदार माणसाला उभय पक्षांत मध्यस्थी करण्यासंबंधी काझी पत्रद्वारे कळवितो. असा कोणी माणूस मिळाला नाही आणि वादी पक्ष आपला दावा शाबीत करू शकत नसेल तर कोर्टात उपस्थित राहण्याची सक्ती काझी प्रतिवादीवर करू शकत नाही. एखाद्या 'स्वतंत्र' स्त्रीविरुद्ध दावा असेल आणि ती स्त्री कधी घराबाहेर पडत नसेल तर तिने स्वतः कोर्टात येण्याची गरज नसते. तिने आपला प्रतिनिधी नेमला तरी चालतो. जरूर तर तो प्रतिनिधी तिच्या वतीने शपथ घेतो.

---

[ मागील पानावरून टीप ]

दक्षता, बुद्धीची तीक्ष्णता, सावधपणा व आकलनशक्ती या गुणांच्या दृष्टीने ते प्रत्यक्ष पिशाच्चासारखे नसतील तर त्यांची भरभराट कशी होईल ?" दारूडे, कल्पनाविलास करणारे कवी ( ते असत्यभाषी मानलेले आहेत ) आणि जुगार व अन्य निंदास्पद उद्योग करणारे लोक यांच्या साक्षी सामान्यतः ग्राह्य मानल्या जात नाहीत." ( शाफी )

१. साहिब अल्–शुर्ता याला.

कोणत्याही प्रकरणाचा निर्णय करताना काझीला फक्त उघड व स्पष्ट स्वरूपाचाच पुरावा विचारात घेता येतो. परंतु एखाद्या (कृतीमागे) कोणता अदृश्य हेतू किंवा कारण अथवा विचार आहे यासंबंधी निव्वळ अंदाज करता येत नाही. आपल्यापुढील खटल्याविषयी स्वतःला जी माहिती असेल तिच्या आधारे न्यायाधीशाने निकाल द्यावा की नाही याविषयी मतभेद आहेत. याबाबत तीन विभिन्न मते आहेत : (१) न्याया-धीशाला तशा प्रकारे निकाल देता येईल. (२) देता येणार नाही आणि (३) ज्यासाठी 'हुदुद अल्लाह' (व्यभिचार, चोरी, आस्तिकाविरुद्ध युद्ध, मद्यपान या सारख्या गुन्ह्यांसाठी कुराणाने सांगितलेल्या शिक्षा) सारख्या सजा नाहीत अशा प्रकरणांच्या बाबतीत काझी निकाल देऊ शकतो.

कायदा व प्रत्यक्ष निर्णयाची न्याय्यता यामध्ये पुष्कळदा फरक दिसून येई. इब्ने कुतैब याने या संदर्भात म्हटले आहे, "एकाच्या प्राणाच्या बदली दुसऱ्याचा प्राण घेणे हे कायदेशीर व न्याय्य आहे; गुलामासाठी स्वतंत्र माणसाला ठार करणे हे न्याय्य असले तरी कायदेशीर नाही; आणि एक कायदेशीर पण न्याय्य नसलेला निर्णय असे की, ठार मारणाऱ्या व्यक्तीच्या जमातीने मेलेल्या माणसाचा बदला रक्तपाताने घेऊ दिला पाहिजे."

काझीचा निर्णय कोणत्याही पद्धतीने घेतलेला असो, तो निर्णय तत्त्वतः अखेरचा समजला जातो आणि त्यावर अपील करता येत नाही. परंतु आपण मागे पाहिले त्याप्रमाणे प्रत्यक्षात मात्र काझीवर त्याचा निकाल फिरविण्याची प्रांताचा सुभेदार सक्ती करू शकत असे. तसेच एखाद्या काझीने अन्यायाने दिलेले निकाल, त्याच्यामागून आलेल्या काझीने फिरविल्याचीही काही उदाहरणे आढळतात.

कायद्यांच्या पुस्तकांत काझीच्या फीसंबंधी उल्लेख आढळत नसला तरी काझीला वादीकडून तसेच बहुधा प्रतिवादीकडूनदेखील किंवा किमान ज्याच्या बाजूने निकाल लागला असेल त्या पक्षाकडून फी मिळत होती हे निश्चित. काझीचे काम हे सार्वजनिक काम समजले जात असल्यामुळे त्याला सरकारी तिजोरीतून पगार दिला जावा असा कायद्यांच्या पुस्तकात नियम आहे. यावरून फिर्यादी पक्षाला कायद्याने काझीला फी देता येत नसे. असे असले तरी काझी पदावर असताना ज्यांनी संपत्ती कमावली आणि काझी-पदावर आपली नियुक्ती व्हावी म्हणून ज्यांनी पैसे खर्च केले अशा अनेक काझींचा उल्लेख आढळतो. याउलट काही प्रतिष्ठित व निर्धन काझींचाही उल्लेख आढळतो.

शारीरिक इजेसंबंधींच्या खटल्याची कार्यपद्धती दिवाणी प्रकरणांच्या कार्यपद्धती-सारखीच होती. एखाद्या इसमाचा, आपणास जखम केली असा दुसऱ्या इसमावर आरोप असेल तेव्हा त्याने त्यासंबंधी काझीपुढे पुरावा दाखल करणे जरूर असते. त्याने समाधानकारक पुरावा आणला तर निकाल त्याच्याप्रमाणे होतो आणि आणला नाही

तर आरोपीला आपला निरपराधीपणा शपथेवर सांगण्यास सांगितले जाते. त्याने तशी शपथ घेतली तर त्याला दोषमुक्त केले जाते आणि घेतली नाही तर फिर्यादीच्या बाजूने निकाल दिला जातो. खुनासंबंधींच्या खटल्यातील आरोपीस पन्नास वेळा शपथ घ्यावी लागते.

एक विशिष्ट [1] प्रकारचा खटला वगळता, बाकी सर्व खटले चालविण्याची पद्धती सारखीच असते. प्रथम वादीपक्ष पुरावा मांडतो.[2] परंतु त्याला आपला दावा शाबीत करता आला नाही तर गुन्ह्याची जबाबदारी आपल्यावर नसल्याची शपथ प्रतिवादीला घ्यावयास सांगून त्याला निर्दोष म्हणून मुक्त केले जाते.

मुस्लिम कायदाविषयक कार्यपद्धतीमध्ये शपथ ही एक अत्यंत महत्त्वाची बाब मानलेली आहे. धर्म व परलोक यासंबंधींच्या कल्पनांमुळे तिला महत्त्व प्राप्त झाले आहे. शपथेच्या सामर्थ्याची अनेक उदाहरणे आढळतात. एकदा बाहुज या मदिनामधील एका जमातीने, शम्माख या कवीने, आपल्या लोकांवर उपरोधपूर्ण शब्दांनी हल्ला चढविला व आपली नालस्ती केली आणि आपल्याला शहराबाहेर घालवून दिले अशी तक्रार खलिफा उस्मान ( हि. स. २३–२५ ) याच्याकडे केली. कवीने हा आरोप नाकारला. तेव्हा त्याला मदिना येथील मशिदीमधील पैगंबरांच्या व्यासपीठावर उभे राहून आपले म्हणणे शपथपूर्वक सांग असे सांगण्यात आले. संबंधित अधिकाऱ्याने कवीला पुढील शब्दांत समज दिली, " शम्माख, परमेश्वरी दूताच्या व्यासपीठावरून तू शपथ घेत आहेस. आणि येथे खोटी शपथ घेणारा कायमचा नरकाचा धनी होतो. " आजही मुस्लिमेतर देशांतसुद्धा शपथ– विशेषतः पवित्र जागी घेतलेली शपथ– ही कोणत्याही खटल्याच्या बाबतीत निर्णायक ठरते.[3]

---

१. प्रत्यक्षात स्वतंत्र असलेला इसम आपण गुलाम असल्याचे सांगत असेल अशा इसमासंबंधींचा खटला. गुलाम असल्याचा त्याने पुरावा आणला तरी तो स्वतंत्र आहे असेच समजले जाते.

२. हे तत्त्व बहुधा रोमन कायद्यांतून घेतले असावे.

३. सीमेसंबंधीच्या वादाचा निर्णय करण्याच्या कामावर प्रस्तुत लेखक दक्षिण इराकमध्ये होता, तेव्हा त्याच्याकडे फिर्याद करण्यासाठी येणारे लोक पुष्कळदा त्याला असे खात्रीपूर्वक सांगत की विरोधी बाजूने शपथपूर्वक ( बिल हुसेन– म्हणजे करबला येथील हुसेनच्या कबरीसमोर घेतलेली शपथ ) जबाब दिले तर आपण ते स्वीकारावयास तयार आहोत. त्याचप्रमाणे साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीची सत्यता ते करबला येथील किंवा जवळपासच्या दुसऱ्या पवित्र जागेची शपथ घ्यावयास तयार आहेत की नाहीत यावरून पडताळली जाई.

ज्या लोकांना आपल्यावर अन्याय किंवा जुलूम झाला आहे असे वाटे, त्यांना त्याचे निवारण करून घेण्याचे काझीच्या कोर्टाप्रमाणेच आणखीही एक ठिकाण होते. ते म्हणजे राजधानीत होणारा खलिफाचा किंवा प्रांतिक सुभेदाराचा दरबार. पहिल्या चार खलिफांच्या राजवटीमध्ये कायद्याशीं संबंधित अशा सर्व प्रकरणांचे बाबतीत निकाल देण्याचा अधिकार काझींना दिलेला होता. परंतु त्यांची सत्ता लौकरच क्षीण झाली. कायदे धाब्यावर बसवणारी कृत्ये होत तेव्हा अली स्वतःच गाऱ्हाण्यांची दाद घेत असे. हे दरबारातील न्यायालय अतिशय सामर्थ्यवान होते. त्या न्यायालयाला नझ्र अल्-मझलिम (अपराधांची समीक्षा) असे म्हणत. या कोर्टात "काझीच्या न्यायाला राजाच्या सत्तेची जोड मिळाली होती." नंतरच्या काळातील उमाय्यद खलिफांनी या दरबार कोर्टाची रीतसर स्थापना केली. या कोर्टामध्ये येणाऱ्या सर्व अर्जदारांचे अर्ज खलिफा स्वतः स्वीकारीत असत. माहदीपासून मुहतादिपर्यंतच्या आरंभीच्या सर्व अब्बासी खलिफांनीही उमाय्यद खलिफांनी सुरू केलेली ही प्रथा चालू ठेवली. परंतु त्यानंतरच्या खलिफांनी (उदा. खलिफा क्वाहीर) आपण स्वतः अपराधांची (मझलिम) चौकशी करू असे आश्वासन दिले होते, तरी ते काम प्रत्यक्षात बझीरच करीत असे. त्याने ते काम केले नाही तर ती गंभीर स्वरूपाचीच चूक मानली जाई. कधी कधी या कामासाठी खलिफा प्रांताच्या राजधानीत अथवा मुख्य राजधानीच्या विभिन्न भागांत आपल्या वतीने आपले प्रतिनिधी नियुक्त करीत असे. खलिफा मुक्तादिर याने, बगदादमधील प्रत्येक विभागासाठी तक्रार-अर्जांची दाद घेण्याकरिता वकिलांची नेमणूक करावी अशी तेथील पोलिस प्रमुखाला आज्ञा दिली होती. कोर्टात तक्रार घेऊन येणाऱ्या लोकांना अर्ज लिहिण्याच्या कागदाचेदेखील पैसे द्यावे लागत नसत इतकी खलिफाला न्यायाविषयी आस्था होती. याच राजाच्या आईने थुमाल नावाच्या एका परिचारिकेची, दर शुक्रवारी फिर्यादी ऐकून घेण्यासाठी बगदादच्या रूसाफा विभागात नेमणूक करावी यासाठी राजाचे मन वळविले. परंतु फिर्यादी ऐकण्यासाठी थुमाल पहिल्यांदा तेथे गेली, तेव्हा लोकांनी गैरहजर राहून तिच्या नेमणुकीविषयीची आपली असहमती प्रदर्शित केली. दुसऱ्या शुक्रवारी ती आपल्याबरोबर एक काझी घेऊन गेली, तेव्हा मात्र सर्व काम सुरळीत पार पाडले. तसेच खलिफा मुतावक्कील याने अली इब्ने जाहम या कवीची हुलवान येथे याच कामासाठी नेमणूक केली, तेव्हादेखील ती नेमणूक फारशी योग्य आहे असे मानले गेले नसावे.

"अपराधाच्या तपासनीसा"च्या दरबारात पुढील प्रकारच्या प्रकरणांची दाद घेतली जात असे: (अ) अधिकारी वर्गाकडून खलिफाच्या प्रजेवर होणारी जुलुमी कृत्ये (आ) कर-आकारणीच्या बाबतीतील अन्याय[1] (इ) सरकारी कचेरीतील कारकुनांची कृत्ये. ज्याची अशा प्रकारच्या कृत्यांबाबत तक्रार असेल अशा इसमाने आपण

---

१. या संदर्भात मावार्दी याने मुहतादी या राजाचे उदाहरण दिले आहे. या

[ पुढील पान पहा ]

होऊन तक्रार केली नसली तरी त्याबाबत कारवाई करण्याचा ' अपराधांच्या तपास-नीसा 'ला हक्क होता. ( ई ) सरकारी पगार मिळणाऱ्या लोकांच्या पगारांतील कपात अथवा पगार न दिल्याबाबतच्या तक्रारी ( उ ) अन्यायाने बळकावलेली मालमत्ता परत देण्यासंबंधींची मागणी ( ऊ ) खाजगी किंवा सार्वजनिक ' अवक्फ ' ( धार्मिक न्यास )च्या हितसंबंधींचे संरक्षण ( ए ) उच्च व सत्तासंपन्न पदांवर असलेल्या आरोपींच्या बाबतीत काहीशा कमजोर काझींनी दिलेल्या निकालांची अंमलबजावणी. ( ऐ ) अपराधांना प्रतिबंध; मुहतासिबच्या अधिकारकक्षेत येणाऱ्या परंतु त्याला लागू करण्याची सत्ता नसलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे. ( ओ ) सामूहिक प्रार्थना व एकंदर धार्मिक विधी आणि ते योग्य रीतीने केले जात आहेत की नाही यावर लक्ष ठेवणे. ( औ ) सर्वसाधारण वादग्रस्त प्रश्नांची सुनावणी व निर्णय. सर्वसाधारण काझी व न्यायाधीश यांच्यासमोर चालणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत जी कार्यपद्धती अवलंबिली जाते तीच कार्यपद्धती अशा प्रकरणांचे बाबतीत लागू केली जाते.[1]

काझी व ' मझलिम 'चा तपासनीस या दोघांच्या अधिकारांत फरक होता. तपासनीसाला खूपच व्यापक अधिकार होते. फिर्यादी पक्ष पुरावा न देता एखादी गोष्ट नाकारू लागला तर त्याला तपासनीस अटकाव करू शकत असे. तसेच अपराधी माणूस हिंसक कृत्ये करू लागला तर त्याला तपासनीस आवर घालू शकत असे. आरोपीकडून कबुली मिळविण्यासाठी त्याला तपासनीस दहशत ( इर्‌हाब ) दाखवू शकत असे. तसेच

---

[ मागील पानावरून टीप ]

राजाने इराणी व बायझन्टीन नाण्यांत कर देण्याच्या पद्धतीची चौकशी केली होती. उमर खलिफाच्या काळात काही जित प्रदेशांत स्थानिक नाण्यांमध्ये कराची रक्कम स्वीकारली जात असे; पण नाण्यांचे वजन किती आहे ते पाहिले जात नसे. त्या काळात विभिन्न प्रांतातील नाण्यांच्या वजनात खूपच फरक असे. परंतु लोकांमधील सचोटी कमी होऊ लागली तसे लोक हलक्या वजनाची नाणी देऊ लागले. त्यामुळे कर गोळा करणारे अधिकारी, वजनातील तूट भरून काढण्यासाठी लोकांकडे जादा नाण्यांची मागणी करीत. त्यामुळे अन्याय होऊ लागला आणि परिणामी सवाद व इतर भारी जमिनींचे मालक भिकेला लागले. पुढे मन्सूरच्या कारकीर्दीत काही शेतकऱ्यांना आपल्या पिकावरील कर वस्तुरूपाने देण्याची सवलत मिळाली आणि इतरांना कराची सूट देण्यात आली. मुहतादी खलिफाने दरसाल सुमारे १ कोटी २० लक्ष दिऱ्हॅम रकमेइतका महसुलात तोटा होत असूनही कोणत्याही वजनाच्या नाण्यात कर भरण्याची सवलत दिली. इतर उदाहरणे प्रामुख्याने कर-आकारणीसंबंधींची आहेत. उदाहरणार्थ, मालमत्तेवर कराची आकारणी करण्यासाठी घेण्यात आलेल्या आधारासंबंधींची व जबरदस्त कर-आकारणी बाबतींतील एक तक्रार.

१. अशा प्रकारच्या खटल्यांची काही उदाहरणे : एक, दुकानासंबंधींचा तंटा आणि दुसरे, एका पुलाच्या कमानीच्या रुंदीसंबंधीचा वाद.

अनावश्यक पुरावे आणण्यास नकार देण्याचा त्याला अधिकार होता. पुराव्याची चौकशी करण्यासाठी तसेच आपल्यापुढील खटल्याचा सर्वांगीण विचार करण्याकरता तो मुदत घेऊ शकत असे. सामान्य न्यायाधीशांना ही सवलत नव्हती. त्यांना लागलीच खटले हातावेगळे करावे लागत. जबाबदार व्यक्तीचा लवाद नेमून त्याच्याकडे तपासणीसाठी फिर्यादीची फिर्याद सोपविता येत असे. खटल्यातील उभय पक्षांची संमती असेल असे खटले सोडून, इतर खटल्यांच्या बाबतीत काझींना या पद्धतीचा अवलंब करता येत नसे. जेव्हा वादी किंवा प्रतिवादी पक्षांपैकी एखादा पक्ष उघड उघड बिनबुडाचा दावा करीत असेल किंवा पुराव्याशिवाय आपले समर्थन करीत असेल अशा वेळी अपराध तपासनीसाला दोन्ही पक्षांना न्यायालयात उपस्थित राहण्याची सक्ती करता येत नसे. त्याचप्रमाणे दोन्ही पक्षांत तडजोड व्हावी यासाठी जामीन घेणे कायदेशीर असेल अशा वेळी त्याला जामीन मागता येत असे. ज्यांच्या खरेपणाविषयी शंका असेल अशा साक्षीदारांना तो प्रतिज्ञा घ्यावयास लावू शकत असे. अशा रीतीने आपल्या शंकेचे निरसन होण्यासाठी आवश्यक वाटेल तेवढ्या साक्षीदारांना प्रतिज्ञा घेण्यासाठी तो बोलवी. सामान्य न्यायाधीशाला हे करता येत नसे. आणि शेवटची गोष्ट कार्यपद्धतीबाबतची. साक्षीदारांना स्वतः बोलावून आणि वादग्रस्त प्रश्नांसंबंधी त्यांना माहिती आहे की नाही त्याविषयी प्रश्न विचारून तपासनीसाला खटल्याची सुरुवात करता येई. काझीच्या कामाची पद्धत याउलट होती. काझी प्रथम फिर्यादीला आपले पुरावे आणण्यास सांगे आणि फिर्यादीने विनंती करीपर्यंत काझी आपण होऊन पुराव्यांची छाननी करीत नसे.

तथापि इतर बाबतींमध्ये काझीचे व 'मझलिम'च्या तपासनीसाचे अधिकार समान होते. तपासनीस व काझी या दोघांच्याही अधिकारक्षेत्रात येऊ शकतील अशा बाबींच्या बाबतीत कधी कधी काझीला 'मझलिम'च्या तपासनीसाचे काम करता येत असे. उदाहरणार्थ, अबु झैद (वीरपुरुष) याने एका हट्टी सावकाराला ठोकले व कर्जाचे खटले चालविणाऱ्या एका कठोर व लोभी वृत्तीच्या मझलिम (दिवाणी गुन्हे) च्या न्यायाधीशाऐवजी एका दयाळू "अपराधांच्या (कोर्टाच्या) अधिकाऱ्या"पुढे उभे केले अशी एक घटना हारिरी याच्या 'मकामत' मध्ये सांगितलेली आहे. या बाबतीत हारिरीच्या ग्रंथाचा टीकाकार शारीषी याने "अपराधांच्या कोर्टाचा अधिकारी" म्हणजे पोलिस अंमलदार असावा असे स्पष्टीकरण केले आहे. परंतु हारिरी याला येथे 'मझलिमचा न्यायाधीश' म्हणजे काझी असेच म्हणावयाचे होते हे स्पष्ट आहे.

मझलिम (दिवाणी गुन्हे) च्या सुनावणीचे काम वझीर किंवा दुसऱ्या एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे असते (इतर कामाप्रमाणे हेही काम आपले आहे असे तो समजतो.) तेव्हा तो त्या कामासाठी एक खास दिवस राखून ठेवतो.[१] तर उलट या

१. निजाम अल् मुल्कच्या मते राजाने या कामासाठी आठवड्यातून दोनदा बसले पाहिजे.

कामासाठीच मुद्दाम नियुक्त केलेला अधिकारी असतो, तेव्हा त्याला रोजच्या रोज हे काम करावे लागते. इजिप्तमध्ये फातिमी राजांच्या राजवटीत आणि राज्याचा मुख्य अंमलदार म्हणून वझीर काम करीत असे त्या काळात वझीर अथवा साहिब अल् बाब कैरो येथील सुवर्ण दरवाजापाशी आठवड्यातून दोनदा दिवाणी दाव्यांची सुनावणी करण्यासाठी व न्यायदानासाठी बसत असे. त्याच्यासमोर वेगवेगळ्या जमातींचे प्रतिनिधी व राजाचे कारभारी येऊन बसत. मग दवंडीवाला शिपाई फिर्यादींना पुकारी. फिर्यादी कैरो किंवा मिसर या शहरांतले असतील तर ते आपली फिर्याद तोंडीच पेश करीत. त्यानंतर दाखल केलेली प्रत्येक तक्रार आवश्यक चौकशीसाठी पोलिस कोतवालाकडे किंवा त्या त्या विभागाच्या काझीकडे पाठविली जाई. ज्याच्याविरुद्ध तक्रार गुदरलेली असेल तो इसम या दोन शहरांबाहेरचा असे, तेव्हा फिर्यादी आपली तक्रार लेखी लिहून देई. राजाचा कारभारी अशा लेखी तक्रारींचा स्वीकार करून त्या "काटेकोर लेखणीने लिहिणारा लेखक" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अंमलदाराकडे देत असे. हा अंमलदार प्रत्येक तक्रार अर्जावर त्या संबंधींचा निर्णय लिहून ते सर्व अर्ज "ओबडधोबड लेखणीने लिहिणाऱ्या लेखका"कडे पाठवीत असे. तो मग अर्जातील प्रकरणाविषयींची, पहिल्या लेखकालाच फक्त सांगता येईल अशी माहिती देत असे. नंतर सर्व तक्रार-अर्ज खलिफाकडे संमतीसाठी व मंजूरीसाठी पाठविले जात. खलिफाच्या मंजूरीनंतर एका थैलीत सर्व तक्रार-अर्ज घालून ते राजाच्या कारभाऱ्याकडे परत पाठविले जात. हा कारभारी राजवाड्याच्या दरवाजापाशी बसलेला असे. तो ज्या त्या अर्जदाराला त्याचा अर्ज परत देत असे. त्या अर्जावरील निर्णयाची अंमलबजावणी संबंधित 'दिवान' (खात्या) कडून केली जात असे.

इस्लामी कायद्याविरुद्ध केलेल्या काही गुन्ह्यांसाठी कायद्याने ठरवून दिलेल्या शिक्षा देण्याचा वारंवार प्रसंग येतो. कुराणाप्रमाणे या शिक्षा दिल्या जातात. त्यांपैकी सर्वात महत्त्वाच्या सजा धर्मत्याग, मनुष्यवध, व्यभिचार, हातपाय तोडणे व चोरी यासंबंधीच्या आहेत. पूर्वी एका प्रकरणात व्यभिचारासाठी होणाऱ्या शिक्षेसंबंधी विचार केलाच आहे. आता इतर शिक्षांसंबंधी चर्चा करावयाची आहे. या गुन्ह्यांपैकी चोरीचा गुन्हा वगळता बाकीच्या सर्व गुन्ह्यांसाठी मृत्युदंड दिला जातो. कुराणात उल्लेखिलेल्या वरील गुन्ह्यांपैकी एखादा गुन्हा एखाद्या मुस्लिम व्यक्तीने केला असेल तरच खलिफा किंवा त्याचा प्रतिनिधी त्याला देहान्ताची सजा देऊ शकतो. असे असले तरी मुस्लिम प्रजाजनांना–बहुधा उच्चपदस्थ व्यक्तींना–अनेकदा राजकीय अपराधासाठी अथवा केवळ द्वेषापोटी ठार मारण्यात आले होते असे इतिहासकार सांगतात. तसेच पुष्कळदा गुन्हेगारांना सजा झालीच तर ती 'फिकाह'च्या तत्त्वानुसार दिली जात नसे, तर सोयीनुसार व लहरीनुसार दिली जात असे.

धर्मश्रद्ध माणसाने धर्माचा त्याग करणे हा अतिशय तिरस्करणीय असा अपराध[१] मानला जातो. इस्लामी राज्याच्या एकूण विशेषतेशी हे सुसंगतच आहे. धर्मत्याग केलेल्या इसमाला पश्चाताप व्यक्त करण्याची तीनदा संधी देण्यात यावी आणि तो तसे करण्यास स्पष्ट नकार देईपर्यंत त्याला ठार मारू नये असा कायदेपंडितांनी नियम घालून दिलेला आहे.

मनुष्यवधाच्या बाबीचा गंभीरपणे विचार केला जातो. इस्लामधर्मीय व्यक्तीचा हेतुपुरस्सर वध करण्यास मनाई आहे.[२] प्राणासाठी प्राण हा मोझेसचा दंडक इस्लामनेही ग्राह्य मानलेला असला[३] तरी मनुष्यवधामागील उद्देश विचारात घ्यावाच लागतो. आणि खुनी माणसाने जाणूनबुजून खून केला की चुकून खून केला याचा विचार करणे ही खलिफाची किंवा त्याच्या प्रतिनिधीची जबाबदारी आहे असे मानलेले आहे. खुनी इसमाने हेतुपुरस्सर आणि कोणतेही कारण नसताना एखाद्याचा खून केला[४] असे दिसून आले तर खून झालेल्या इसमाच्या वलीला किंवा त्याच्या नातलगाखालोखालच्या पुरुष व्यक्तीला खुनी माणसाचा सूड घेण्याचा अधिकार असतो.[५] परंतु त्या व्यक्तीने क्रूरपणाने म्हणजे खुनी इसमाचे हातपाय तोडून सूड घेता कामा नये किंवा खुनी इसमाऐवजी दुसऱ्याला ठार मारता कामा नये. तथापि हत्येचा बदला हत्येनेच घेतला पाहिजे असे नाही. खरे तर

---

१. कुराण २ २१४.

२. कुराण ४ ९४.

३. कुराण ५ ४९. " स्वतंत्र स्त्रीकरीता स्वतंत्र पुरुष, गुलामासाठी गुलाम, स्त्रीसाठी स्त्री. " ( कुराण २ १७३ ).

४. " हातात शस्त्र घेऊन ठार मारण्याची धमकी मुस्लिमांना देणाऱ्या इसमाला मुस्लिम ठार मारू शकतात; आणि त्याबद्दल त्यांना सजा होत नाही. तसेच एखादा इसम रात्री-अपरात्री दुसऱ्याच्या घरात शिरला आणि त्याने चोरी केली, तर त्या इसमाचा पाठलाग करून घरमालक त्याला ठार मारू शकतो; आणि त्याबद्दलही त्याला सजा होत नाही. शस्त्र दाखवून, धमकी देऊन किंवा ठोसा मारून एखाद्याने दुसऱ्याला मारले तर तो गुन्हेगार ठरतो आणि सूड घेण्यास पात्र समजला जातो. "

५. कुराण १७ ३५. मुस्लिमपूर्व काळात आणि मुस्लिम इतिहासाच्या अगोदरच्या काळात, एखाद्या इसमाने शत्रुजमातीच्या एखाद्या इसमाला ठार मारले असेल तर मयत माणसाचा वली, खुनी इसमाला पकडून ओलिस ठेवू शकत असे. 'अघानी 'मध्ये या संदर्भात एका प्रसंगाचा उल्लेख आढळतो. एकदा अनाझा या शत्रुजमातीचे लोक आपल्या उंटांना पाणी पाजीत असता त्यांच्यापैकी बुहेज या इसमावर माझीन जमातीमधील हिलाल इब्ने असार या इसमाने 'मिहवार' ( डाग देण्यासाठी वापरले जाणारे हत्यार ) फेकून त्याला ठार मारले. तेव्हा बुहेज याच्या मुलाने हिलाल याला पकडून त्याच्या सुटकेची बोलणी चालू असेपर्यंत त्याला डांबून ठेवले.

खुनी इसमाकडून[1] मुबलक नुकसानभरपाई घेऊन त्याला माफी देणे कुराणाने प्रशंसनीय मानलेले आहे. या पर्यायासंबंधीची व दया दाखविण्यासंबंधीची कुराणातील आयते संदिग्ध आहेत. त्यामुळे कायदेपंडितांमध्ये तत्संबंधी पुष्कळच मतभेद व वाद आहेत. प्राणासाठी प्राण हे जे कुराणात सांगितलेले तत्त्व आहे त्या बाबतीत अबु हनिफा व त्याच्या संप्रदायाचे लोक यांचे असे मत आहे की, वध झालेल्या व्यक्तीच्या वलीने वधाचा बदला प्राण घेऊनच घेतला पाहिजे; त्याला पर्याय नाही. खुनी इसमाला उपकृत करण्याची वलीची इच्छा असेल तरच त्याने त्याच्यापासून 'दिया' (खुनाबद्दलची भरपाई) घेऊ नये. कुराणातील यासंबंधीच्या निर्देशाचा काटेकोर अर्थ स्वीकारून हनफी संप्रदायी असे मानतात की, एखाद्याने हत्या केलेली व्यक्ती मुस्लिम किंवा 'संरक्षित' धर्मींपैकी एखाद्या धर्माची स्वतंत्र अथवा गुलाम व्यक्ती असली तर तिची हत्या करणाऱ्या इसमालाही ठार मारले पाहिजे. त्याचप्रमाणे स्त्री वधाच्या बदल्यात पुरुषाला ठार मारले जावे, आणि तरुण स्त्रीच्या हत्येच्या बदल्यात वृद्ध स्त्रीला ठार मारावे. परंतु मुलाच्या बदल्यात त्याच्या बापाला अथवा गुलामाच्या बदल्यात त्याच्या मालकाला किंवा मुलाच्या गुलामासाठी मुलाच्या बापाला मारता येणार नाही. शाफी पंथीयांच्या मतानुसार ठार मारलेल्या इसमाच्या वलीला, प्राणाचा बदला प्राणाने घ्यावयाचा की त्याबद्दल पैशांत नुकसान-भरपाई घ्यावयाची, या दोहोंमध्ये निवड करण्याचा अधिकार आहे. मात्र वध करणारी व्यक्ती व वध झालेली व्यक्ती या दोघांचा सामाजिक दर्जा समान हवा. याचा गर्भितार्थ असा की, मुस्लिमेतर व्यक्तीच्या वधासाठी कोणाही मुस्लिम व्यक्तीचा वध करता येणार नाही. तसेच गुलामासाठी स्वतंत्र व्यक्तीला मारता येणार नाही. किंवा मुलाची अथवा नातवाची हत्या केल्याबद्दल बापाचा अथवा आजाचा प्राण घेण्याची जरूरी नाही. कुराणातील यासंबंधीच्या नियमाचा मालिकीपंथीय असा अर्थ लावतात की, खुनी माणूस स्वतंत्र असो की गुलाम असो त्याला दुसऱ्याचा वध केल्याबद्दल ठार मारले गेले पाहिजे, हे सार्वत्रिक तत्त्व या नियमात समाविष्ट आहे. मात्र खुनी इसम "धर्म व स्वातंत्र्य या बाबतीत खून झालेल्या इसमापेक्षा श्रेष्ठ दर्जाचा असेल"–म्हणजे खुनी व्यक्ती इस्लामधर्मीय अथवा स्वतंत्र व खून झालेली व्यक्ती मुस्लिमेतर वा गुलाम असेल तर, प्राणाचा बदला प्राणाने घेण्याची आवश्यकता नाही. या सूत्रानुसार मुलाच्या किंवा नातवाच्या प्राणासाठी बापाचा अथवा आजाचा प्राण घ्यावयास मालिकी पंथीयांची हरकत नाही. प्राणासाठी प्राण हा नियम असला तरी मालिकीपंथीयांच्या मते मृत माणसाचे पुरुष वारस हेच त्याचे वली असल्यामुळे प्राणाचा बदला प्राणाने घेण्याच्या बाबतीत त्यांच्यात संपूर्ण एकमत असणे जरूर आहे. त्यांच्यापैकी एकाने जरी बदला घेण्याचा अधिकार सोडावा असे म्हटले, तरी पैशाने प्राणाची नुकसानभरपाई करून घेता येते. हेतुपूर्वक केलेल्या हत्येच्या बदल्यात प्राण घ्यावा या सर्व-

---

१. कुराण २ १७३.

सामान्य तत्त्वाच्या बाबतीत मालिकीपंथीय हनबालपंथीयांशी सहमत असावे असे दिसते.

एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला अहेतुकपणे आणि अगदी चुकून ठार मारले असेल, तेव्हा मृत्यूचा बदला घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. परंतु नुकसानभरपाई-दाखल पैसे द्यावे लागतात आणि वध झालेल्या इसमाच्या वारसांना नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी वध करणाऱ्या इसमाच्या कुलाला[1] सामुदायिकपणे घ्यावी लागते. मात्र हेतुपूर्वक एखाद्याला ठार मारण्यात आले असेल तर खुनी इसमाच्या संपत्तीतून नुकसानभरपाई दिली जाते.

एखादा इसम परक्या जमातीच्या प्रदेशात अपरिचित माणसाकडून मारला गेल्याचे आढळले, तर त्या जमातीतील लोकांना मृत इसमाच्या वलीला खुनाबद्दल भरपाई द्यावी लागते. ही प्रथा निश्चितच दीर्घकाळापासून चालत आलेली आहे. परंतु या प्रथेस पैगंबरांच्या एका परंपरेचा कायदेपंडितांनी आधार मिळवून दिला आहे.

हत्येबद्दल घ्यावयाच्या मोबदल्याचे– ' दिया 'चे–प्रमाण वेगवेगळे आहे. अशी एक परंपरा सांगितली जाते की, खुनी इसमाच्या कुटुंबाची सांपत्तिक स्थिती आणि ते कुटुंब कशाला संपत्ती समजते ते लक्षात घेऊन पैगंबर मोबदल्याचे प्रमाण ठरवीत असत. उदाहरणार्थ, खुनी इसमाकडे उंट असले तर त्याला शंभर उंट ' दिया ' म्हणून द्यावयास लावले जाई आणि तो इसम शेळ्या-मेंढ्यांचा मालक असला तर त्याला एक हजार मेंढ्या द्यावयास सांगत. खून अहेतुक असेल आणि खुनी इसमाच्या कुटुंबाने ' दिया ' द्यावयाचा असेल, तेव्हा तर तो तीन वर्षात हप्त्याहप्त्याने देता येत असे. विभिन्न परिस्थितीत द्यावयाच्या ' दिया 'च्या मूल्यासंबंधी कायद्याच्या पुस्तकात विस्तृत तपशीलासह सूचना दिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, अबु युसूफ याने असे म्हटले आहे की, चुकून ठार मारलेल्या स्त्रीबद्दल चुकून मारलेल्या पुरुषासाठी द्यावयाच्या मोबदल्याच्या रकमेच्या निम्मी रक्कम दिली जावी. एखाद्या गुलामाने चुकून कोणाची हत्या केली असेल तर स्वतंत्र माणसाने द्यावयाच्या ' दिया 'च्या निम्मा दिया त्याच्या मालकाकडून घेतला जावा. मौला ( मुक्त केलेला इसम ) करिता, स्वतंत्र आणि शुद्ध रक्ताच्या अरब टोळीवाल्यासाठी द्यावयाच्या ' दियाच्या 'च्या निम्मा ' दिया ' देण्याची पद्धतही रूढ होती. स्वतंत्र माणसाने एखाद्या गुलामाला चुकून मारले असेल तर त्याने गुलामाच्या मालकाला गुलामाची त्याच्या मृत्यूच्या वेळी जी किंमत असेल ती दिली पाहिजे.

---

१. म्हणजे त्याच्या ' अकिला 'ला. अकिला म्हणजे " एकमेकांचे रक्षण करण्यासाठी जे एकत्र येतात आणि ज्यामध्ये वडिलांच्या बाजूचे नातलग समाविष्ट असतात असा जथा. या जथ्यातील लोक ( खुनी इसमाशी संबंधित असल्यामुळे ) अहेतुपूर्वक मारलेल्या व्यक्तीबद्दल मोबदला देतात. "

मनुष्यवधाप्रमाणेच मनुष्याचे अवयव तोडण्याच्या गुन्ह्याबद्दलदेखील सूड म्हणून बदला घेण्याचा नियम लागू केला जात असे. उदाहरणार्थ, तंगडीसाठी तंगडी, डोळ्यासाठी डोळा, दातासाठी दात. तथापि त्याऐवजी नुकसानभरपाई देखील देऊ करता येत असे आणि ती स्वीकारून सूड म्हणून बदला न घेण्याची सूट देता येत असे. विशेषतः डोक्याला जखम करण्यात आली असली तर अशी सूट दिली जाई. कारण डोक्याच्या जखमेला साजेसा निश्चित असा बदला घेता येणे शक्य नसे. एखाद्या स्त्रीने एखाद्या इसमाला ठार मारले तर त्याबद्दल तिला ठार मारले जाते. परंतु तिने एखाद्या पुरुषाचे अगर स्त्रीचे अवयव तोडले असतील तर पुरुषाचा त्याच पद्धतीने सूड म्हणून बदला घेतला जात नाही. तिने पैशांत नुकसानभरपाई दिली तरी चालते. खुद्द स्त्रीचे अवयव तोडले असतील व त्यामुळे तिने पाय किंवा डोळा गमावला असेल तर पुरुषाला अशाच प्रकारच्या नुकसानाबद्दल जेवढी भरपाई दिली जाते त्याच्या निम्मी भरपाई तिला त्याबद्दल दिली जाते. 'स्वतंत्र' पुरुषाने गुलामाचे फक्त अवयव छाटले असतील आणि त्यामुळे त्याचे प्राण गेले नसतील तर त्याचा सूड म्हणून बदला घेऊ दिला जात नाही. उदाहरणार्थ, एखाद्या स्वतंत्र इसमाने एखाद्या गुलामाचा हात छाटून किंवा कान कापून त्याचा अंगभंग केला असेल तर त्या गुलामाचा मालक गुलामाचे किती नुकसान झाले याचा अंदाज घेतो आणि मग झालेल्या नुकसानानुसार स्वतंत्र इसमाने नुकसानभरपाई द्यावयाची असते.

चोरी करणाऱ्या स्त्री किंवा पुरुषाच्या हातून चोरीचा पहिलाच गुन्हा घडलेला असेल तेव्हा त्याचा किंवा तिचा उजवा हात कापला जातो.[१] दुसऱ्यांदा चोरीचा गुन्हा केलेला असेल तर डावा पाय कापला जातो. आणि याच पद्धतीने यापेक्षा अधिक चोरीच्या गुन्ह्यांसाठी शिक्षा दिली जाते. जे ठिकाण निःसंशयपणे खाजगी व राखीव आहे अशा ठिकाणी किमान एकचतुर्थांश दिनार किंमतीइतक्या संपत्तीचे अपहरण करणे म्हणजे चोरी अशी चोरीची व्याख्या केलेली आहे.[२] चोरीबद्दलची शिक्षा स्त्री-पुरुष अथवा स्वतंत्र गुलाम किंवा मुस्लिम-मुस्लिमेतर असा भेदाभेद न करता सर्व चोरांना सारखीच दिली जाते. परंतु लहान मुलाला, आपल्या मालकाची चोरी करणाऱ्या गुलामाला आणि आपल्या मुलाची चोरी करणाऱ्या आई-बापांना चोरीबद्दल सजा होत नाही.

तुरुंगाची शिक्षा देणे-न देणे हे जो कोणी सत्तेवर असेल त्याच्या मर्जीवर अवलंबून असावे असे दिसते. सराईत गुन्हेगारांना कायद्याप्रमाणे आजीवन कारावासाची सजा देता येते. अशा गुन्हेगारांपाशी स्वतःचे उदरनिर्वाहाचे साधन नसेल तर 'बेत अल्

१. कुराण ५[४२].
२. कुराण ५[४२] वरील बैदावीचे भाष्य.

माल ' ( सरकारी तिजोरी )मधून त्यांच्या अन्न–वस्त्राची सोय केली जाते. पण पुष्कळदा हे लोक मदतीच्या लोभाने पायात बेड्या घेऊन हिंडताना दिसतात. बेड्या घातल्यावर नमाजासाठी उभें राहता येत नसल्यामुळे कोणाही मुस्लिम कैद्याला कायद्याने बेड्या घालता येत नाहीत. कैदेची सजा सर्वस्वी स्वाभाविकपणे व निर्हेतुकपणे दिल्या जात असे दिसत नाही. पुष्कळ वेळा सरकारी अधिकाऱ्यांच्या अनियंत्रित वृत्तीच्या पोटीही त्या दिल्या जात. असे असले तरी खिलाफतीच्या काळात एका खास ' दिवान ' ( विभाग )–मध्ये कैद्यांसंबंधीची कागदपत्रे ठेवली जात. एकदा बगदादमधील एका दंगलीत ही कागदपत्रे पळवून जाळण्यात आली होती, तसेच काही रजिस्टरे नष्ट करण्यात आली होती.

□ □

म. रा. सा सं. मं. ग्रंथालय
प्र/920
2
मंत्रालय.

प्रकरण ८

# खिलाफतीमधील प्रांतांची शासनपद्धती

पहिली सव्वाशे वर्षे इस्लामने जिंकलेल्या सर्व प्रदेशांत प्रथम मुहम्मद पैगंबर आणि नंतर त्यांचे परंपरावादी व उमाय्यद् वंशीय उत्तराधिकारी यांचेच प्रमुखत्व आणि सत्ता मानली जाई. पैगंबरांच्या निधनानंतरच्या शतकात ऑक्झसपासून थेट भारताच्या सीमा, तसेच इराण, अरबस्तान, आफ्रिका खंडाच्या उत्तरेकडचा भाग ते पिरेनीज व अटलांटिक महासागरापर्यंत झपाट्याने इस्लामचा विस्तार झालेला होता. त्या काळात मदिना किंवा दमास्कस येथील एकामागून एक आलेले सर्व खलिफा इस्लामचे सार्वभौम सत्ताधीश व प्रमुख असल्याचे घोषित करण्यात आले होते.

इस्लामी इतिहासाच्या पहिल्या कालखंडातील फार थोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. लव्हाळी कागदावर लिहिलेली काही हस्तलिखिते एवढेच काय ते अवशेष शिल्लक आहेत. सर्वांत जुने लिखित अवशेष इस्लामच्या दुसऱ्या शतकातील आहेत. यापैकी पहिल्या शतकातील घटनांसंबंधी जी कागदपत्रे आहेत त्यांत परंपरा आणि अहवाल यावर बरीच भिस्त ठेवलेली आहे. त्यामुळे ती कितपत विश्वसनीय मानता येतील याची शंका आहे. असे असले तरी चिकित्सक कसोट्या लावल्यानंतरही जे उरते त्यांत त्या काळी सरकार आणि प्रशासन कसे चालत असे याचा जो वृत्तांत मिळतो तो असमाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही.

इस्लामचा जेथे जेथे प्रवेश झाला होता त्या प्रत्येक भागात पैगंबरांनी आपल्या हयातीमध्येच कर गोळा करण्यासाठी अम्माल (एकवचन 'अमील') म्हणजे प्रतिनिधी नेमले होते असे परंपरा सांगते. पैगंबर या अधिकाऱ्यांबरोबर अमीरांना पाठवीत असत. हे अधिकारी सक्तीने करवसुली करण्यासाठी पाठविलेल्या फौजांचे बहुधा प्रमुख असावेत. ही पद्धती प्रस्थापित झाली तेव्हा एखादा प्रांत जिंकून त्याचा अमीर बनणाऱ्या प्रत्येक सेनानीच्या मागोमाग कर गोळा करण्यासाठी 'अमील'ही नेमला जाऊ लागला. कित्येकदा अमीराच्या गैरहजेरीत अमीलच खलिफाचा प्रतिनिधी म्हणून सर्व लष्करी व मुलकी कामे पाही. अरबस्तानात मुहम्मदांनंतर खलिफापदावर आलेला अबु बकर याने

सर्व प्रमुख शहरांत अम्माल नेमले होते. द्वीपकल्पाबाहेरही सीरियामध्ये एकापेक्षा अधिक अमील नेमण्यात आले होते. विजेता खलीद इब्ने वालिद हा त्यांचा प्रमुख होता. युफ्रेटिस आणि तैग्रिस यांचे पाणी मिळणाऱ्या प्रदेशासाठी इराकमध्ये दोन अम्माल नेमले होते. तसेच बसरा व कुफा यांच्यावर अंमल चालविण्याकरीता आणखीही अधिकारी पाठविण्यात आले होते.

इस्लामी विजयाच्या सुरुवातीच्या काळात प्रांतांच्या कारभाराचा भार वर उल्लेखिलेल्या या अधिकाऱ्यांवर असे. सुरुवातीच्या अमीरांनी तलवारीच्या बळावर जे प्रदेश घेतले तेथील जवळ जवळ सर्वाधिकार स्वाभाविकच त्यांच्याकडे होते आणि साहजिकच· बराच काळपर्यंत कर गोळा करणे व बंडाची प्रवृत्ती दडपून टाकणे एवढेच काय ते तेथील त्यांच्या कारभारामागील मुख्य उद्देश होते. उमरने तीन अधिकारी इराकमध्ये पाठविले होते असे अबु युसफ सांगतो. त्यापैकी एक, युद्ध व प्रार्थना यांचे नेतृत्व करण्यासाठी; दुसरा, न्याय आणि खजिना यांच्या कारभाराचा प्रमुख म्हणून आणि तिसरा, नवीन जिंकलेल्या प्रदेशाची जमीन महसुलाच्या दृष्टीने मोजणी करण्यासाठी पाठविलेला होता. विजयाचा पहिला भर ओसरल्यावर जिंकलेल्या प्रदेशातील सत्ता एकवटण्याकडे मुस्लिमांनी लक्ष वळविले तेव्हा अमीलचे महत्त्व वाढत जाऊन तो अमीराच्या बरोबरीचा झाला. खजिन्याच्या हितसंबंधांचा प्रश्न असे तेव्हा त्याचे मत निर्णायक मानले जाई.[1]

उमाय्यद सत्तारूढ झाल्यानंतर आणि जित प्रदेशात त्यांची सत्ता एकवटण्यापूर्वी त्या प्रदेशांतील फौजा मध्यवर्ती सत्तेपासून बऱ्याचशा स्वतंत्र होत्या. त्यामुळे नव्या जिंकलेल्या प्रदेशात आपल्या पसंतीचेच सुभेदार असले पाहिजेत असा आग्रह फौजांना धरता येऊ लागला. उस्मानच्या मृत्यूच्या वेळच्या ( ३५/६५६ ) प्रांतिक अधिकाऱ्यांची गणती करताना तबरीने म्हटले आहे की लष्करी ठाणे म्हणून स्थापन केलेल्या बसरा येथील सुभेदारास ते पद सोडणे भाग पाडण्यात आले व त्याच्या जागी दुसऱ्या कोणासही पाठविण्यात आले नाही. त्याचप्रमाणे कुफा येथील खलिफाच्या प्रतिनिधीस देखील हुसकण्यात आले. तर इजिप्तमध्ये खलिफाच्या अपरोक्ष निरनिराळ्या अधिकाऱ्यांत सत्तेसाठी स्पर्धा चालू होती. सीरियात मुआवियाने बळाच्या जोरावर आपली सत्ता टिकविली. त्याने प्रांतांतील शहरांसाठी आपल्या पसंतीचे दुय्यम अधिकारी नेमले.

उमाय्यदांच्या राजवटीतील प्रांतिक कारभाराची यंत्रणा साधी होती. प्रत्येक प्रांतात नेमावयाच्या अधिकाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या अधिकारांची व्याप्ती त्या त्या खलिफांच्या कमी-जास्त वैभवानुसार ठरे. तबरीसारखे वार्षिक वृत्तांत लेखक दरवर्षी झालेल्या नव्या नेमणुकांची नोंद करीत. या नोंदीवरून असे दिसते की प्रत्येक अधिकाऱ्याच्या वैयक्तिक कुवतीनुसार त्याच्याकडे लहान-मोठा प्रदेश सोपविण्यात येई.

---

१. उदा. खुरासानमधील खराज कराच्या प्रश्नासंबंधी.

एखाद्या प्रांतास पूर्वी एकच अधिकारी असला तरी काही वेळा तेथे समान सत्ता असलेले दोन अधिकारी पाठविण्यात येत किंवा खलिफाच्या इच्छेनुसार एकाच अधिकाऱ्याकडे दोन प्रांतांचा कारभार सोपविण्यात येई.

अब्दुल्ला इब्ने अमीर ४१/६६१–६२ साली बसऱ्याचा सुभेदार झाला व त्याच्याकडे सिस्तान आणि खुरासान या प्रदेशांविरुद्धच्या मोहिमेची सूत्रे सोपविण्यात आली. दोन वर्षांनी अब्दुल्लाने खुरासानमधील आपल्या प्रतिनिधीस बडतर्फ केले व त्याच्या जागी अब्दुल्ला इब्ने खासिम यास नेमले. त्यानंतरच्या वर्षी अब्दुल्ला इब्ने अमीरलाच बसऱ्याच्या सुभेदारपदावरून दूर करण्यात आले. त्याच्या जागी नेमलेल्या अल् हरीसला तर अवघ्या चार महिन्यांनी बडतर्फ करण्यात आले. नंतर झियाद "इब्ने अबीही" याची त्या जागी नेमणूक झाली. त्याला सिस्तान व खुरासानचा सुभेदार नेमण्यात आले आणि भारत, बहरिन व उमानची नाममात्र सत्ताही त्याच्याकडे सोपविण्यात आली. पाच वर्षांनी कुफाही त्याच्या नियंत्रणाखाली देण्यात आला. झियाद इब्ने अबीही हा आपला सावत्र भाऊ असल्याचा मुआवियाचा दावा होता. त्याचवर्षी सबंध उत्तर आफ्रिकेचा कारभार मसलमा इब्ने मुखल्लद याच्याकडे सोपविण्यात आला. इजिप्तला पूर्वी स्वतंत्र सुभेदार होता. पण त्याची सत्ताही आता मसलमा इब्ने मुखल्लदकडे सोपविण्यात आली. उलट असे सांगतात की मुआवियाने दोन भावांना खुरासानचे संयुक्त अमील नेमले होते आणि त्यांपैकी एकाने म्हटल्याप्रमाणे, दोन[1] सुभेदार नेमण्याइतका या प्रांताचा विस्तार होता. पूर्वेकडील प्रांतांचा कारभार एकाच माणसाकडे असल्याचे अनेकदा आढळून येते. उदा. विख्यात हज्जाज इब्ने युसुफ हा केवळ इराकचाच नव्हे तर खुरासान आणि सिस्तानच्या सुभेदारपदाची धुरा सांभाळण्यास समर्थ आहे असे मानले जात असे. पण इराणमधील प्रांतांत मात्र तो आपल्या इच्छेप्रमाणे अधिकारी बदलत असे.

---

१. या दोन भावांपैकी एका भावासंबंधींच्या 'तबरी'तील आनुषंगिक माहितीद्वारे प्रांतिक सरकारचे हेतू व उद्देश यांवर प्रकाश पडतो. तीन वर्षे अधिकारपद उपभोगल्यानंतर हा भाऊ दमास्कसला परतला तेव्हा त्याच्यापाशी २ कोट दिर्‍हाम होते. खलिफा याझीद याला हे समजताच त्याने त्याच्यापुढे दोन पर्याय ठेवले. एक तर ही संपूर्ण रकम खलिफाच्या खजिन्यात भरून टाकावी– कदाचित स्वतःसाठी अधिक संपत्ती मिळावी म्हणून असेल किंवा त्याच्यानंतर येणाऱ्या सुभेदाराला १० लाख दिर्‍हाम द्यावेत (याशिवाय खलिफाला मोठी रक्कम द्यावयाची ती वेगळीच) व अधिकारपदावरून दूर व्हावे. असाच एक प्रसंग जशियारीने सांगितला आहे. मुआवियाच्या काळातील इराकमधील खराजचा सुभेदार खलिद यास नवरोज व मिहरगान या पारशी लोकांच्या मेजवानीचे प्रसंगी १ कोटि दिर्‍हाम किंमतीच्या देणग्या मिळाल्या होत्या.

वाहतुकीच्या अडचणीमुळे दूरच्या प्रांतांवर केंद्रीय नियंत्रण ठेवणे नेहमीच कठीण जात असावे. अधिकारावर आल्यावर बडतर्फ होईपर्यंत त्या प्रांताचे अधिकारी जवळजवळ स्वतंत्र असत. याउलट उमाय्यदांच्या काळात प्रमुख सुभेदारांची नेमणूक सुरुवातीला जरी नेहमी दमास्कसहून केली जाई तरी सुभेदार प्रांतात प्रत्यक्ष पोचल्यावर तेथे त्याला विरोध होई. उदाहरणार्थ, खलीद अल् कासरी सिंधचा कारभार पाहण्यासाठी गेला तेव्हा तेथील स्थानिक अधिकाऱ्याने त्याच्या नेमणुकीस हरकत घेतली आणि "या भागाच्या अंतर्गत कारभाराचे नियंत्रण चालू ठेवण्यास खलिफा उमर इब्ने अब्दल अझीझ याने आपणास वंशपरंपरेने परवानगी दिली आहे" असा त्याने दावा मांडला. खलीद सिंधमध्ये प्रत्यक्षात फारच थोडा काळ होता, कारण लवकरच बसऱ्याचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक झाली असे म्हणतात.

साम्राज्याच्या दुसऱ्या टोकाला असलेला स्पेन ९२ / ७११ मध्ये जिंकून घेण्यात आला. त्याचा कारभार पाहण्यासाठी अनेक अम्माल नेमण्यात आले. उत्तर आफ्रिकेच्या व्हाइसरॉयपेक्षा त्यांचा दर्जा दुय्यम होता. तसेच अनेकदा फार थोडा काळ ते अधिकारावर राहात. व्हाइसरॉयांचीसुद्धा अनेक वेळा इजिप्तमधील अशाच स्वरूपाच्या अधिकारपदावरुन बदली होई. पण उमाय्यदांची राजधानी दमास्कस इतकी दूर होती की, तेथून पश्चिमेकडील प्रदेशावर कडक नियंत्रण ठेवणे खलिफाला शक्य नव्हते. अबुल खत्तर १२५ / ७४३ साली स्पेनमध्ये अमीर म्हणून गेला. पण तेथल्याच अब्दुल रहमान याने त्या पदावर स्वतःच दावा सांगून अब्दुल खत्तरला हरकत घेतली. पण दोन वर्षांत अंदालुसी जनतेने त्याला बडतर्फ करून आपला स्वतःचा सुभेदार नेमला.

उमाय्यद काळातील इजिप्तमधील सरकारी कारभाराची तपशीलवार माहिती लव्हाळी हस्तलिखितात आढळते. नंतरच्या इतिहासकारांनी केलेली वर्णनेही त्यातील माहितीस पूरक आहेत. अमीर किंवा वली हा प्रांताचा प्रमुख असे. त्याची नेमणूक खलिफा करी आणि प्रत्येक नव्या राजाबरोबर हा अधिकारीही बदले. प्रार्थनेचे वेळी नेतृत्व करणे (अलाल-सलात)[१] आणि कधी कधी महसुलाची व्यवस्था (खराज) ही कामे त्याच्याकडे असत. त्याच्याकडे खराजची जबाबदारी सोपवलेली नसे तेव्हा त्या कामासाठी तो स्वतः निराळा अधिकारी नेमू शकत असे. अनेकदा 'साहेब खराज' नावाचा एक स्वतंत्र अधिकारी या कामासाठी नेमला जाई व तो खलिफाशी सरळ संपर्क ठेवीत असे. लष्करी संघटनेचा प्रमुख या नात्याने अमीर हा प्रांताचा नाममात्र मुख्य अधिकारी असे. पण महसुलाची जबाबदारी असलेल्या अमीलची कामे वाढू लागली, त्याबरोबर त्याचे महत्त्व व दर्जा वाढून तो अमीरच्या बरोबरीचा झाला. काही बाबतींत त्याला अधिक सत्ता असे. अब्बासींच्या काळात या दोन अधिकाऱ्यांचा दर्जा

---

१. व्यवहारात याचा अर्थ जवळपास 'नागरी सत्ता' असा होतो.

समान होता. याचे एक प्रतीक म्हणजे विख्यात वझीर इब्ने अल् कुरात हा या दोन्ही अधिकाऱ्यांना सारख्याच बहुमाननिदर्शक पदव्यांनी संबोधित असे.

नव्या प्रदेशात आल्यावर प्रथम आणि नंतरही बराच काळ, कारभाराचा तपशील जुन्या राजवटीतील निरनिराळ्या प्रांतातल्या दुय्यम स्थानिक अधिकाऱ्यांवर सोपविण्याची पूर्वीपासून प्रथा होती. ती मुस्लिम आक्रमकांनी पुढेही चालू ठेवली. कर गोळा करणे हाच प्रत्यक्षात कारभाराचा मुख्य भाग असे. सुभेदार आपले दुय्यम अधिकारी स्वतः नेमीत असत. यात जुन्या महसूल पद्धतीचा कारभार चालू ठेवण्यासाठी नेमलेले अधिकारी आणि इस्लाममुळे आवश्यक झालेल्या नव्या पदांसाठी नेमलेले अधिकारी यांचा समावेश असे. हज्जानंतर याझीद इब्ने मुहल्लब इराकचा सुभेदार झाला. त्याने हिजरी सन १०७ मध्ये खराजचा अधिकारी नेमला. इराक व खुरासानचा सुभेदार म्हणून खलीद अल् कासरी याची नेमणूक केली. बसरा येथील प्रार्थनेच्या व्यवस्थेसाठी एक अधिकारी नेमला. आणखी एकाला न्यायव्यवस्थेचा प्रमुख आणि दुसऱ्याला शुर्ताचा अधिकारी नेमले. समरकंद येथे पोलिसांचा प्रमुख असलेला अधिकारी लष्करी कामांना आणि करवसुलीलाही जबाबदार असे. खलीद अल् कासरीने ११०/७२८ मध्ये महसूल सोडून सर्व सरकारी कचेऱ्या एकाच व्यक्तीच्या हाती सोपविल्या. प्रार्थनेची व्यवस्था, पोलीस आणि न्यायदानाचा कारभार ही सर्व कामे त्याच्याकडे असत. एकंदरीत सरकारी पगार मिळणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष संख्या कमी होती. कारण बहुसंख्य बाबतीत कायदा व सुव्यवस्था राखण्याची आणि करवसुलीची जबाबदारी टोळ्यांचे प्रमुख आणि गावप्रमुख यांच्यावर टाकलेली असे. उदा., खुरासानमध्ये प्रत्येक 'बलाद'ला किंवा शहराला आपला प्रतिनिधी निवडण्याची मोकळीक असे. तो त्या गावच्या कारभाराचे बाबतीत सरकारला जबाबदार राही.

सीरियामध्ये जुन्या बायझन्टीन अधिकाऱ्यांनाच नोकरीवर कायम ठेवण्यात आले. तसेच इस्लामच्या आगमनापूर्वीचीच महसूल पद्धती चालू ठेवण्यात आली आणि कराच्या याद्याही ग्रीक भाषेमध्येच ठेवण्यात आल्या. त्याचप्रमाणे इराकमध्ये कुफा व बसरा येथे दोन दिवान किंवा करनोंदणी रजिस्टरे ठेवण्यात आली होती. त्यापैकी एक अरबीत होते. अरब-आक्रमकांचे हिशेब, त्यांना द्यावयाचे पगार व निवृत्ती-वेतन यांची नोंद त्यात असे. दुसरी नोंदवही फारसीत असे. त्यात स्थानिक रहिवाश्यांकडून मिळावयाच्या महसुलाची नोंद असे.. यापैकी दुसरे रजिस्टर हिजरी सन ५८१ पर्यंत म्हणजे धर्मनिष्ठ खलिफा 'अब्दल् मलिक इब्ने मारवान'[1] याच्या कारकीर्दीपर्यंत फारशीमध्येच

१. वालिद इब्ने हिशाम इब्ने मख्झुम इब्ने सुलेमान याने फारशीऐवजी अरबीतून नोंद करण्याची सुधारणा केली असे माक्रिझीचे मत आहे. तो २२९/८३७ मध्ये निधन पावला. "परंतु बहुतेकांच्या म्हणण्याप्रमाणे हा बदल हज्जाज याने हिजरी सन ८० नंतर घडवून आणला, पण ( सीरियातील ) ग्रीक भाषेऐवजी अरबी भाषेचा वापर अब्दल मलिक व त्याचा मुलगा हिशाम या दोघांनीही सुरू केला असे माक्रिझी याचे मत आहे.

होते असे एक परंपरा सांगते. तर दुसऱ्या परंपरेप्रमाणे सुभेदार हज्जाज इब्ने युसुफ[1] याने त्यात बदल केला. माक्रिझीच्या म्हणण्याप्रमाणे मुस्लिमांच्या विनंतीनुसार इजिप्तमधील महसुलाच्या नोंदवह्या कॉप्टीक भाषेत (इजिप्तमधील ख्रिश्चनांची भाषा) लिहिल्या जात. अब्दल् मलिक इब्ने मारवान (हि. स. ८७) याचा मुलगा अब्दुल्ला याने सुधारणा करीपर्यंत हीच पद्धत चालू होती. इस्लामच्या पहिल्या शतकात इजिप्तमधील बहुसंख्य महसूल अधिकारी कॉप्ट (प्राचीन इजिप्शियनांचे ख्रिश्चन वंशज) होते. त्यांनी हिशेबासाठी स्वाभाविकच आपली भाषा वापरली यात शंका नाही. पण जुन्या राजवटीच्या अधिकाऱ्यांनी काही नोंदी ग्रीकमध्ये ठेवल्या होत्या हे निश्चित.

निरनिराळ्या उमाय्यद प्रांतांत कारभाराच्या ज्या विभिन्न पद्धती चालू होत्या त्याविषयीची उपलब्ध अशी सर्वांत विश्वासनीय माहिती इजिप्तमधील कारभार पद्धतीसंबंधींची आहे. महसूल खात्याचा प्रमुख अमीर असो किंवा अमील असो आर्थिक कारभाराचे प्रत्यक्ष काम कॉप्टिक सल्लागारच करीत. त्यांना बायझन्टीन पद्धतीचे शिक्षण मिळालेले होते व त्यांची नेमणूक खात्याच्या प्रमुखामार्फत केली जात असे. पण इस्लामच्या विजयानंतर खलिफा या नेमणुका[2] स्वतः करू लागला. इजिप्तमधील[3] उत्तर व दक्षिण भागांच्या महसुलावर दोन अधिकाऱ्यांचे संयुक्त नियंत्रण होते. त्यांनी या भागाचे कुरा किंवा जिल्हे पाडले होते. प्रत्येक कुरामध्ये एक मुख्य शहर किंवा मोठे गाव आणि आसपासचा प्रदेश यांचा समावेश असे आणि मुख्य शहर हे त्याचे आर्थिक केंद्र असे. 'कुरा'चे छोटे घटक म्हणजे 'कार्यास' किंवा खेडी. मुझुल हा प्रत्येक खेड्याचा प्रमुख असे. ही मूळ 'कुरा' पद्धती कातिमी कालखंडापर्यंत चालू होती. नंतर महसुलपद्धतीची पुनर्घटना करून 'परगणे' ('अमाल'– एकवचन 'अमल') पाडण्यात आले.

---

१. दहाव्या शतकात अरबी हीच फार्सची राजभाषा होती. परंतु स्थानिक लोक फारशीचा वापर करीत.

२. उदाहरणार्थ, थिओडोरची नेमणूक. तो इ. स. ६६१ ते ६७७ पर्यंत अधिकारावर होता.

३. अखेर या दोन्ही भागांची स्वतंत्रपणे व्यवस्था पहाणारे मुस्लिम अधिकारी त्यांच्या जागी नेमण्यात आले. पण करवसुली अधिकारी बदलल्यामुळे तेथील रहिवाशांचा काही फायदा झाला नाही. कारण नव्या अधिकाऱ्यांनी आल्याबरोबर स्वतःचे आणखी कर लादले. "काही दिवसांनी राजाने नेमलेले दोन अधिकारी इजिप्तला पोचले. ते मुसलमान होते. त्यांनी दक्षिण इजिप्तवर दोन व उत्तर इजिप्तवर एक असे जादा कर बसविले."

बायझन्टीन काळातील शेतीपद्धती खलिफांच्या अमदानीपर्यंत चालू होती. या पद्धतीत जमीन राज्याच्या मालकीची असे. कसणाऱ्या शेतकऱ्यांना ती खंडाने देण्यात येई. हंगामानंतर धान्य काढून त्याचे ढीग करीत. कब्बाल नावाचा सरकारी अधिकारी त्याची मोजणी करी. तो खंड म्हणून खलिफाच्या वाट्याचा भाग घेऊन जाई व राहिलेला भाग शेतकऱ्यासाठी ठेवण्यात येई. खिलाफतीच्या इतर प्रांतांत शेतकऱ्यांवर जसा खराज नावाचा खास कर असे तसा या भागात होता असे दिसत नाही. कर आकारणी निश्चितच सामुदायिक होती. विशिष्ट रक्कम भरण्यास विशिष्ट गटांना जबाबदार धरले जाई. याशिवाय डोईपट्टीच्या स्वरूपाचा एक कर असे. प्रांताची राजधानी फुस्तात येथे कर किती जमा करावा हे निश्चित केले जाई. प्रत्येक ' कार्यास 'मधील कर स्थानिक प्रमुख गोळा करी व मुख्य कचेरीकडे पाठवून देई. याशिवाय कोणत्याही वेळी जादा कर बसवले जात. प्रत्येक कूरावर ते बसविले जात आणि ते गोळा करण्याची जबाबदारी कूराचे प्रमुखावर असे. जहाजांसाठी लाकूड, हत्यारे यांसारख्या वस्तूंच्या स्वरूपात हे कर असत. करापोटी काही वेळा कारागीर किंवा खलाशी यांचीही मागणी केली जाई. काही असले तरी कराच्या मागण्या तंतोतंत पुऱ्या करण्याच्या बाबतीत सबंध समाजास जबाबदार धरले जाई. मागणी करण्यात आलेल्या वस्तूंच्याऐवजी पैसा स्वीकारला जात नसे. कर आणि खंडणीच्या स्वरूपात जो पैसा व वस्तू मिळत त्यांचा उपयोग प्रथम प्रांतांतील सैनिक अधिकाऱ्यांचे पगार भागविण्यासाठी आणि लष्करासाठी आवश्यक माल खरेदी करण्यासाठी केला जाई. राहिलेली रक्कम दमास्कस येथे उमाय्यदांच्या खजिन्यात पाठवण्यात येई.

अर्धफारसी असलेल्या अब्बासींनी उमाय्यदांची अरब सत्ता उलथून टाकली आणि बगदाद येथे नवी राजधानी स्थापन केली तेव्हा इस्लामी प्रदेशामध्ये एकच एक धार्मिक केंद्रसत्ता राहिली नाही. तेव्हापासून विघटनाला सुरुवात झाली. पण अशी दोन वेगळी सत्ताकेंद्रे फक्त एक शतकापर्यंत इस्लामी जगतात अस्तित्वात होती. एक पूर्वेकडील अब्बासी खलिफांचे आणि दुसरे कॉर्डोव्हच्या उमाय्यदांच्या नेतृत्वाखालील अंदालुसियाच्या अमीरांचे. पूर्वेकडील खलिफांच्या सर्वच प्रांतांच्या कारभारव्यवस्थेत आढळणारा एक समान विशेष म्हणजे बगदादहून नेमलेले अमीर व अमील. हे तेथील कारभाराचे प्रमुख असत. असे असले तरी निरनिराळ्या प्रांतिक सरकारांच्या कारभाराच्या तपशीलांत बराच फरक असे. स्थानिक परंपरा किंवा आकस्मिक परिस्थिती यामुळे हा फरक पडे. इराक प्रांत हा खिलाफतीच्या राजधानीजवळ असल्याने त्याचे राजधानीशी विशेष नाते होते. सवाद नावाने ओळखल्या जाणाऱ्या इराकच्या सुपीक भागाच्या कारभाराचा प्रमुख म्हणून साधा सुभेदार नव्हे, तर एक स्वतंत्र मंत्री नेमण्यात येई. सर्व मंत्र्यांमध्ये सवादचा मंत्री किंवा दिवान होणे फार लाभदायक समजले जाई. आणि हे पद मिळविण्यासाठी धडपड चाले. राजधानी बगदाद तैग्रीस नदीच्या उजव्या तीरावरील बादुरच्या जिल्ह्यास लागून असल्याने त्या जिल्ह्याकडे खास लक्ष दिले जाई. जी व्यक्ती या भागाचा कारभार

चांगल्या प्रकारे पाहील ती खराजचा मंत्री होण्यास लायक समजली जाई. तसेच वझीर होण्यासाठी खराजचा मंत्री असणे ही एक पात्रता मानली जाई. खलिफा राज्यकारभाराच्या तपशीलात लक्ष घालीत असे त्या काळात इराकच्या इतर प्रमुख प्रांतांत खलिफा स्वतःच वली किंवा अमील नेमी ( मात्र दोन्ही नेमीत नसे ); किंवा वझीराला तसा अधिकार असे तेव्हा तो या नेमणुका करी.

खिलाफतीच्या इतर प्रांतांत, म्हणजे अरबस्तानातील पवित्र शहरे, येमेन, सीरिया, अझरबैजान, आर्मेनिया, जाझिया किंवा मेसोपोटेमिया, उत्तर आफ्रिका, इजिप्त, सिंध आणि इराणचे निरनिराळे विभाग, यांमध्ये अब्बासींच्या सुरुवातीच्या काळात खलिफाने नेमलेला व्हाइसरॉय ( अमील ) हा प्रमुख असे. पुढे काही प्रसंगी विशेषतः इजिप्तमध्ये दोन अधिकारी नेमण्यात आले होते. लष्कराचा प्रमुख म्हणून अमीर आणि महसुलास जबाबदार म्हणून दुसरा एक अधिकारी. बहुधा इस्पहानचे महत्त्व लक्षात घेऊन ३०४/९१६–१७ साली तेथे लष्करी संघटनेचा प्रमुख म्हणून एक खास अधिकारी ( मुतवल्ली अल् हार्ब ) व महसुलावर देखरेख ठेवण्यासाठी दुसरा एक अधिकारी ( मुतवल्ली अल खराज ) नेमण्यात आला होता.

उमाय्यदांप्रमाणेच अब्बासींच्या अमदानीत सुरुवातीस इजिप्तमध्ये प्रार्थना व खराजचे प्रमुख म्हणून सुभेदार नेमण्यात येत. काहींच्याकडे प्रथम फक्त नामधारी प्रमुखत्व होते. प्रार्थनेच्या वेळी त्यांनी इमाम म्हणून काम करणे त्यात अभिप्रेत होते व वित्तविषयक नियंत्रण दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपविलेले असावयाचे. अब्बासी सत्तेच्या दुसऱ्या शतकात अधिकाऱ्यांच्या कामाची वाटणी थोडी निराळी होती. दोन प्रमुख अधिकाऱ्यांपैकी एक युद्ध व प्रार्थनेचे वेळी नेतृत्व करी, तर महसूल व्यवस्था दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली होती. पुढे अहमद इब्ने तुलूनच्या नेतृत्वाखाली २५४/८६८ मध्ये इजिप्तने स्वातंत्र्य मिळविल्यानंतर त्या समर्थ व महत्त्वाकांक्षी सत्ताधाऱ्याने सर्व अधिकारपदे आपल्या हाती ठेवली. अल् इक्शिदनेही पुढे त्याचेच अनुकरण केले. मध्यंतरी काही थोडा काळ बगदादने इजिप्तमध्ये पुन्हा पाय रोवला होता त्या काळात ३२५/९३५ मध्ये तेथे अमीर म्हणून पाठविलेला अल् इक्शिद हा स्वतःच तेथील सत्ताधीश झाला.

सुभेदारपदावर कधी कधी केवळ राजकीय हेतूने नेमणुका केल्या जात. आपला भाऊ अमीन याच्याविरुद्ध आपणास मदत केली त्याची फेड म्हणून खलिफा मामुनने इराणमधील लोकांना त्या देशात त्या अधिकारपदावर नेमले. फाझल इब्ने साहलची नेमणूक अशाच प्रकारची होती. आपण इराणच्या शहांचे वंशज असल्याचा त्याचा दावा होता. त्याच्या कुटुंबात त्याच्या बापानेच प्रथम झरतुष्ट्री धर्म सोडून इस्लामी धर्म स्वीकारला होता. पूर्वेकडील हमदान पर्वतापासून सिकिनान पर्वत व तिबेटपर्यंत लांब आणि फारस व

हिंदच्या समुद्रापासून ( म्हणजे इराणच्या आखातापासून ) देलाम व तुर्जानपर्यंत ( म्हणजे कास्पियन समुद्रापर्यंत ) रुंद पसरलेल्या प्रदेशाचा प्रमुख म्हणून मामुनने फाझलची नेमणूक केली. त्याला त्याने ३ लाख दिऱ्हॅम पगार ठरवून दिला. त्याला तो ' दोन प्रमुख पदांचा मानकरी ' असे संबोधित असे. लष्करी सत्ता व मुल्की कारभार या दोन्हींचाही तो प्रमुख होता व त्यास अनुलक्षून हे संबोधन होते.

सुभेदारपद पैसा देऊन खरेदी करता येई. पण काही वेळा राजकीय कारणासाठी ते पद स्वीकारण्यास नकारही दिला जाई. अझरबैजान व आर्मेनियाचा सर्वाधिकारी युसुफ इब्ने अबी अल् साज याला आपल्या प्रदेशात रेय्य हा भाग सामील करून घेण्याची आकांक्षा होती. फौजा घेऊन तो तेथे गेला. खलिफा मुक्तादिरला त्याने मोठी रक्कमही देऊ केली. पण खलिफाने त्याला त्या प्रदेशाचे प्रमुख नेमण्याचे नाकारले तेव्हा त्याने माघार घेतली. पण माघार घेताना शहरातील बिचाऱ्या रहिवाशांची कत्तल केली.

खलिफाशी नाते असल्यास सुभेदारपदावर स्वाभाविक हक्क सांगता येई. मामुन खलिफापदावर येण्यापूर्वी त्याचा पिता हसन याने त्याला खुरासानचा अमील नेमले होते. खलिफा मुक्तादिरने २६१/८७५ मध्ये जाफर व अबु अहमद या आपल्या दोन मुलांना अनुक्रमे पूर्व व पश्चिम प्रांतांचे सुभेदार नेमले होते. तसेच या दोन राजपुत्रांबरोबर काम करण्यासाठी अनुभवी सहकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. यावरून राजपुत्राची नेमणूक नामधारी होती असे दिसते. शिवाय इजिप्त व इराणपुरता विचार करावयाचा तर या नेमणुकीला विशेष महत्त्व नसून ती औपचारिक होती असे दिसते. कारण इजिप्तमध्ये अहमद इब्ने तुलुन स्वतंत्रपणे सत्ता चालवीत होता. तर समानिद नस्र इब्ने अहमद याच्या हातीही ट्रान्सऑक्सियाना व खुरासान या प्रांतांची तेवढीच प्रबळ सत्ता होती. समानिदांना खलिफा अजूनही व्हाइसरॉय म्हणून संबोधित व प्रत्येक नव्या समानिदास मान्यतेचे पत्र पाठवीत. पण प्रत्यक्षात मात्र अनेक वर्षांपासून अशा पत्राला काहीही महत्त्व राहिलेले नव्हते.

अब्बासींच्या कारकीर्दीतील सवादमधील महसूल कारभाराची पद्धती वैशिष्ट्यपूर्ण होती असे म्हणता येईल. प्रदेशाची दोन ' कूरां 'मध्ये ( जिल्ह्यांत ) विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक ' कूरा 'चे अनेक विभाग पाडलेले असत. त्यांना तास्सुज म्हणत. बादुरय्या हा सर्वांत संपन्न विभाग होता. त्याचे बारा रस्तक ( ग्रामीण विभाग ) होते. त्यापैकी अल् कार्ख सर्वांत उत्तम होता. त्यात बारा ' कार्यास ' म्हणजे खेडी होती. इराकच्या बाकुबा हे प्रमुख शहर असलेल्या ' तारीक खुरासान ' ( खुरासानमधील हमरस्ता ) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागाचीही अनेक ' तास्सुज 'मध्ये विभागणी केलेली होती. वासीतभोवतीच्या महसल विभागाला ' अमाल ' म्हणत. अमाल हा विभाग ' तास्सुज 'च्या बरोबरीचा मानता येईल. अमीलच्या नियंत्रणाखाली असलेल्या

मोठ्या कारभार घटकांप्रमाणे कूराचे क्षेत्रफळ ठराविक नव्हते. केंद्र सरकारच्या इच्छेप्रमाणे त्याचा विस्तार केला जाई किंवा त्याला दुसऱ्या एखाद्या कूराचा भाग बनविण्यात येई.

अनेकदा अमिल हा दिवान अल् खराजचा पगारी अधिकारी म्हणून नव्हे तर सरकारसाठी कराची वसुली करणारा मक्तेदार म्हणून काम करी असे दिसते. एक ठराविक रकम आगाऊ देऊन किंवा तिची अर्थखात्याला हमी देऊन त्याला हे अधिकारपद प्राप्त होत असे. त्यामुळे प्रांतांतील रहिवाश्यांकडून वाटेल तसा पैसा वसूल करण्याचा जणू त्यास परवाना मिळे. अझरबैजान व आर्मेनियामध्ये लष्करी प्रश्न, प्रार्थना व सरकारी हुकुमांची अंमलबजावणी यांचा प्रमुख म्हणून अमील नव्हे तर अमीर काम करी. राजधानीकडे महसूल पाठविण्याची त्याच्यावर जबाबदारी होती. याचे एक उदाहरण इब्ने अल् असीरने दिले आहे.

करवसुलीचे मक्ते खरेदी करणे व विकणे आणि मक्तापद्धतीमुळे होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक हे अब्बासींच्या काळातील प्रांतिक सरकारांचे मुख्य वैशिष्ट्य होते. बगदादची सत्ता पूर्णपणे नाहींशी होण्यापूर्वीच्या काळात प्रांतांसाठी खलिफा एखादा अधिकारी ( मुश्रिफ ) नेमीत असे किंवा एखादा जबाबदार मंत्री महसूल हिशेबांची तपासणी करण्यासाठी प्रांताला नियमितपणे भेट देत असे. अमील व अमीर ( लष्कराचा प्रमुख ) हे दोघे मिळून प्रांताचा कारभार पाहात आणि त्यांचे एकमेकांशी संगनमत[1] असले आणि केंद्र सरकार दुबळे असले की ते दोघे आपल्या मर्जीप्रमाणे गोष्टी घडवून आणू शकत. बारीदचा अधिकारी लांचखाऊ व अकार्यक्षम असला म्हणजे हे विशेषतेने घडत असे. राजधानीतील अधिकाऱ्यांच्या वतीने प्रांतिक अधिकाऱ्यांवर हेरगिरी करणे हे या अधिकाऱ्याचे काम असे. एखादा महत्त्वाकांक्षी[2] गव्हर्नर, फौजा आणि खराज या दोन्हींवर नियंत्रण करण्याची सत्ता मागण्याइतका प्रबळ असेल तर त्याच्याबाबतीत गोष्टी सोप्या असत. मामुनसारखा प्रबळ खलिफा मात्र दोन्ही कामे एकाच व्यक्तीकडे विश्वासाने सोपवू शकत असे.

पहिल्या शतकानंतर इस्लामी नियंत्रणाखालील प्रदेश एवढा मोठा होता की एकट्या राजाला त्यावर परिणामकारक नियंत्रण ठेवणे शक्य नव्हते. कारण दळणवळणाची साधने अतिशय अपुरी होती. त्यामुळे राजधानीपासून दूर असलेल्या प्रांतांचे सुभेदार

---

१. फार्स व किरमान या युक्त प्रांताच्या अमीराने व आर्थिक अधिकाऱ्याने तीन महिने बगदादला महसूल पाठविला नव्हता हे या संदर्भातील एक उदाहरण आहे.

२. उदाहरणार्थ, बजकाम या महत्त्वाकांक्षी तुर्की सुभेदाराने आहॉज प्रांतांतील या दोन्ही बाबींच्या नियंत्रणाची सत्ता आपल्या हाती सोपविल्याशिवाय तेथे रुजू होण्यास नकार दिला होता.

व रहिवासी यांच्या हालचालींवर पुरेशी देखरेख ठेवणे शक्य होत नसे. साम्राज्याच्या टोकांना असलेल्या अंदालुसिया व खुरासान या प्रांतांत उमाय्यदांनी दमास्कसहून नेमलेले सुभेदार जवळजवळ स्वतःच राजे बनत. पण इस्लामची सत्ता मजबूत झाल्यानंतरच्या काळातही विजेत्यांमध्ये वितुष्ट व स्पर्धा निर्माण झाली की जित प्रांतातील रहिवाशांना कोणाची तरी बाजू घेणे भाग पडे. तसे करताना कोणता पक्ष जिंकतो याची त्यांना फिकीर नसे. परिस्थितीच अशी होती की ज्या कोणा व्यक्तीत निर्धार आणि महत्त्वाकांक्षा या दोन्ही गोष्टी असत आणि जो कोणी धर्म, भावना किंवा लष्करी बळ यांसारख्या एखाद्या परिणामकारक कारणासाठी पाठिंबा मागे, त्याला तो हमखास मिळे. अंदालुसियामध्ये अब्बासी फौजांनी केलेल्या कत्तलीतून बचावलेल्या एका उमाय्यद सरदाराने आपल्या कुटुंबाबद्दल लोकांमध्ये शिल्लक असलेल्या निष्ठेचा कुशलतेने उपयोग करून घेतला व त्याने स्वतःचे राज्य स्थापन केले. आणि आपणच खलिफाचा न्याय्य वारसा पुढे चालवीत आहोत असा दावा केला आणि अंदालुसियाने अब्बासींची सत्ता व सार्वभौम अधिकार कधीही आणि कोणत्याही अर्थाने मानलेला नाही हे दाखवून दिले.

तसेच बगदादच्या स्थापनेनंतर थोड्याच काळात मदिना येथे इस्लामच्या गादीचे आपणच हक्कदार असल्याचा दावा करणाऱ्या अलीच्या अनुयायांनी बंड केले. हे बंड दडपून टाकण्यात आले व त्याच्या नेत्यांना पळून जाणे भाग पडले. त्यापैकी अलीचा वंशज इद्रिस इब्ने अब्दल्ला मोरोक्कोस गेला. तेथे त्याने शियांचे राज्य स्थापले. अब्बासी खिलाफतीला विरोध करीत ते सव्वाशे वर्षे टिकले ( ७८८–९२२ ). उत्तर आफ्रिकेतील बर्बर लोकांवर फूटपाड्या व धर्मविरोधी प्रचाराचा नेहमीच प्रभाव पडत आलेला आहे. इद्रिसी व त्यांचे ट्युनिसमधील शेजारी अघलावी यांचा ऱ्हास झाल्यावर कोणा उबेदल्ला या इसमाचे प्रचारक तेथे आले. उबेदल्ला हा माहदी असून इमामियांचा वंशज म्हणजे पैगंबरांची कन्या फातिमा हिचा वंशज आहे असा दावा उबेदल्लाचे प्रचारक मांडू लागले. त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले आणि उबेदल्लाने फातिमी खिलाफतीची स्थापना केली. या खिलाफतीचा व त्याचबरोबर शिया पंथाचाही प्रसार इजिप्त व सीरियातही झाला. अब्बासींना आपल्या संपन्न प्रदेशाचा काही भाग गमवावा लागला. फातिमींची सत्ता २९७।९०९ पासून ५६७।११७१ पर्यंत टिकली आणि त्यानंतर सलादिनच्या हाती सत्ता गेली. त्याआधी अडीच शतके अब्बासींचे नाव या प्रदेशातील नाण्यांवर व खुत्बामध्ये आढळत नव्हते. ते आता सलादिनने पुन्हा प्रस्थापित केले. इजिप्त हे पुन्हा सुन्नी पंथाचे राज्य झाले व त्याचे राज्यकर्ते स्वतःला सुलतान म्हणवुन घेऊ लागले. फातिमींचा प्रचार वस्तुतः इफ्रिकिया ( ट्युनिस ) मध्ये प्रथम सुरू झाला होता. उबेदल्ला सत्तेवर आला त्यावेळी इफ्रिकिया अघलावींच्या हाती होता. अघलावी हे इब्राहिम इब्ने अघलाबींचे वंशज. अघलाब याची हारून अल् रशीदने संपूर्ण उत्तर आफ्रिकेच्या प्रांताचा सुभेदार म्हणून १८४।८०० मध्ये नेमणूक केली होती. अघलावी हे सुन्नी होते आणि बगदादच्या खलिफाचे नाममात्र का होईना मांडलीक होते तरी त्यांनी कोणाचीच

सत्ता मानली नाही. त्यांच्यापैकी काहींनी तर नाण्यांवर खलिफाचे नाव घालण्याचा उपचारसुद्धा पाळला नाही.

बगदादच्या खलिफाने खलिफा किंवा अमीर अल् मुमिनिन ( धर्मश्रद्धांचा प्रमुख ) ही पदवी किंवा तिच्याशी निकटचे साम्य असलेली एक पदवी बळकावली, ही त्याच्या पूर्ण स्वातंत्र्याची किंवा बंडखोरीची बाह्य खूण होती. सुरुवातीच्या फातिमी राजघराण्यांपैकी मोरोक्कोचे इद्रिसी किंवा तबरीस्तानचे अली राजे हे 'सय्यद' ही पदवी वापरीत हे खरे. ते पैगंबरांचे वंशज असल्याची ही पदवी निदर्शक होती. पण इजिप्त व सीरियाचे फातिमी स्वतःलाच खलिफा म्हणवून घेत. स्पेनमध्ये प्रसिद्ध उमाय्यद राजा तिसरा अब्दल् रहमान गादीवर येईपर्यंत तेथील उमाय्यद राजे अमीर किंवा 'खलिफाचा पुत्र' या पदवीवरच समाधान मानीत. अब्दल् रहमान तिसरा याने मात्र आपल्या कारकीर्दीच्या सतराव्या वर्षी ( ३१७ / ९२९ ) उत्तर आफ्रिकेच्या अली राजांचे अनुकरण करून 'अमिर अल् मुमिनिन' ही पदवी घेतली. त्याने पाडलेली ही प्रथा त्याच्या घराण्यातील वारसांनी चालू ठेवली. एवढेच नव्हे तर 'मुल्क अल् तवाइफ'[1] या छोट्या राजांनीही ती प्रथा कायम ठेवली. उमाय्यद राजघराण्याच्या अस्तानंतर या छोट्या राजांनी उमाय्यद राज्याचा प्रदेश आपसात वाटून घेतला होता आणि स्वतः राजे झाल्याची घोषणा केली होती. पुढे अल्मोरावींनी त्यांना पदच्युत केले व स्वतःच 'अमीर अल् मुसल्मीन' असल्याचे घोषित केले. सर्व बाबतीत 'अमीर अल् मुमिनीन'च्या तोडीचीच ही पदवी होती. इजिप्तमधील इक्शिदी स्वतःला अमीर[2] म्हणवीत. तर अय्युबी राजे व मामलुक यांना सुलतान म्हणत. युरोपात मध्ययुगात 'सोल्दन' ही साधारणपणे इजिप्तच्या राजाची पदवी मानली जाई.

यापैकी काही कनिष्ठ कुळांत जन्मलेल्या राजांची आपल्या पदाला लोकांकडून औपचारिक मान्यता मिळावी अशी इच्छा असे. निग्रो गुलाम काफूर याने त्याआधी इक्शिदी राजांच्या अमदानीत दीर्घकाळ सरकारची सूत्रे सांभाळली होती. मामलुक काफूर ३५५/९६६ मध्ये गादीवर आला तेव्हा इजिप्शियन अमीर व लष्कर यांची त्याने आपल्या सत्तेला मान्यता मागितली. सुलतान अल् मलिक अल् नासिर यालाही तसेच करावे लागले. इजिप्तच्या इतिहासातील अस्थिरतेच्या काळात तो गादीवर आला.

---

१. याचा अर्थ 'टोळ्यांचे राजे'. प्रांतांच्या व शहरांच्या राजांना मुस्लिम इतिहासकारांनी दिलेले हे नाव आहे. आपल्या सम्राटाची सत्ता ऱ्हास पावल्यानंतर या राजांनी त्याची जमीन आपापसात वाटून घेतली. अल्मोरावींनी त्यांना पदच्युत करीपर्यंत ते स्वतःच राजे बनून जुल्मी राज्य केले.

२. काफूर हा निग्रो गुलाम राजा स्वतःला नम्रतासूचक 'उस्ताद' म्हणवून घेत असे.

आपल्या सार्वभौमत्वाला औपचारिक मान्यता मिळविण्यासाठी आणि ते कायद्यानुसार प्रस्थापित करण्यासाठी त्याने सरदारांना बोलावून घेतले. काहींनी त्याला मान्यता देण्याचे नाकारले तेव्हा त्यांच्याशी त्याचा गंभीर स्वरूपाचा संघर्ष झाला. पण अखेर काझींनी तोच खरा व हक्काने झालेला सुलतान आहे असा हुकूम काढला.

इराणमधल्या कोणत्याही स्वतंत्र राजाने 'खलिफा' ही पदवी स्वतःसाठी घेतली नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. इराणमध्ये उमाय्यद व अब्बासी यांनी नेमलेल्या सुभेदारांनी जी राजघराणी स्थापली त्या सर्वांनी खलिफाशी निदान नाममात्र निष्ठा ठेवली. इतर राजघराण्यांनीही खलिफास मान्यता दिली, त्यामागे त्यांची स्वतःची काही कारणे होती. या इतर राजघराण्यांमध्ये गझनी, बुवेहिद व सेल्जुक या महत्त्वाच्या घराण्यांचा समावेश होता. यापैकी पहिले व तिसरे म्हणजे गझनी व सेल्जुक हे पवित्र सुन्नी होते. धार्मिक भावनेमुळे धर्मश्रद्धांच्या प्रमुखांशी (म्हणजेच खलिफाशी) ते एकनिष्ठ होते. उलट शियापंथीय लोक बुवेहिद खलिफाला आपला राजाधिराज मानीत. कारण त्यामुळे त्यांना जे स्वातंत्र्य मिळाले ते शियापंथीय इमामला मान्यता देण्याने मिळाले नसते. बगदादची खिलाफत नष्ट झाल्यानंतर इराणमध्ये राष्ट्रवादाचा हळूहळू विकास झाला व त्याचबरोबर शियापंथीयांचाही विकास झाला. त्यामुळे इराणी लोकांच्या भावना अंतर्मुख होऊन त्याची परिणती सफावी शहांचे राष्ट्रीय राजघराणे स्थापन होण्यात झाली. बगदादची खिलाफत अस्तित्वात होती तोपर्यंत इराणमधील राजे प्रत्यक्षात संपूर्णपणे सर्वसत्ताधीश असले तरी आणि अमीर अल् मुमिनीनला ते आपली नाममात्र निष्ठा दाखवीत असले (खुत्बामध्ये आणि नाण्यात त्याचा उल्लेख करून) तरी त्यांच्यापैकी कोणीही राजा सुलतानापेक्षा श्रेष्ठ पदवीवर हक्क सांगत नसे. गझनीचा मुहम्मदसुद्धा आपल्या नाण्यावर आपला उल्लेख अमीर असाच करी. मुहम्मदाचा मांडलिक व सिस्तानचा राजा खलाफ इब्ने बानु यानेच प्रथम मुहम्मदाला सुलतान या नावाने संबोधिले असे सांगण्यात येते.

इराणमधील अगदी सुरुवातीच्या काळानंतरचे सुभेदार व राज्यकर्ते यांना त्यांच्या खलिफानिष्ठेबद्दल प्रत्यक्षात खरे स्वातंत्र्य उपभोगावयास मिळे. उमाय्यदांची प्रत्यक्ष सत्ता होती त्या काळात आणि त्यापूर्वीच्या अब्बासी खलिफांच्या काळात इराणच्या प्रांतातील-विशेषतः राजधानीपासून दूर असलेला खुरासान, ट्रान्सॉक्सियाना यासारख्या प्रांतातील-प्रमुख अधिकारी जवळजवळ दरवर्षी बदलले जात. त्यामुळे सुभेदार जरी केंद्रीय नियंत्रणातून मुक्त असत तरी त्यांपैकी कोणालाही आपल्या हाती फार सत्ता ठेवता येत नसे. मात्र त्यामुळे शासनातील स्थैर्य मात्र नष्ट होई. पण बगदादची सत्ता अत्यंत कमकुवत झाली आणि खलिफाच्या हुकुमांकडे दुर्लक्ष करणे शक्य होऊ लागले, किंवा ते हुकूम मोडले तरी शिक्षा होईनाशी झाली, तेव्हा सुभेदार आपले पद आपल्या मुलाला देऊ लागले. आणि अशा रीतीने त्यांनी स्वायत्त राजघराणी स्थापन केली. असा पहिला उघड प्रयत्न ताहिर धुल मामिनेन याने केला. मामुनने त्याला २०५/८२२ मध्ये खुरासानचा

सुभेदार केले. पण स्वतःचे स्वायत्त राजघराणे स्थापन करण्याचा ताहिरचा प्रयत्न अयशस्वी झाला असे मानले जाते. सुभेदाराने खुत्बामधून खलिफाचे नाव वगळले आहे असा अहवाल प्रांताच्या साहिब बारीदने खलिफाकडे रवाना केला. त्यानंतर फक्त एक वर्ष सत्तेवर राहिल्यानंतर ताहिर अचानक मरण पावला. या दोन घटनांचा एकमेकांशी संबंध होता काय याबद्दल केवळ तर्क करणेच शक्य आहे. पण ताहिरनंतर त्याचे दोन मुलगे, नातू व पणतू हे अमीर झाले ही वस्तुस्थिती आहे. महसुलाचा काही थोडा भाग वार्षिक खंडणी म्हणून देणे एवढ्यापुरतीच ताहिरच्या उत्तराधिकाऱ्यांनी खलिफाची सत्ता मानली होती.

ताहिदीर राजघराण्यातील शेवटच्या राजाला २५९ / ८७२ मध्ये आपले पद याकूब इब्ने लेथ सफार (तांबट) यास देणे भाग पडले. याकूबने त्याआधी दोन वर्षे बाल्ख, तुखारिस्तान व लगतचे भाग, तसेच अगोदरपासून त्याच्याकडे असलेल्या किर्मान, सिस्तान व सिंध या प्रांतांचा अमीर म्हणून आपणास मान्यता देण्यास खलिफा मुतामिदला भाग पाडले होते. मात्र याकूबला खुरासानलगतच्या प्रांताचा प्रत्यक्षातला सुभेदार म्हणून खलिफाची मान्यता मिळविण्यासाठी आणखी तीन वर्षे काढावी लागली. त्याच्यामागून गादीवर आलेला त्याचा भाऊ अमर हा अधिक विख्यात व अत्यंत कार्यक्षम पुरुष होता. खलिफाशी एकनिष्ठ असलेल्या प्रजेचा पाठिंबा मिळविण्याकरताच त्याने खलिफाशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला असावा. पण प्रांताच्या नाण्यावर आपले नाव घालण्याचा खलिफाचा खास अधिकार त्याने बळकावला. यावरून बगदादच्या नियंत्रणापासून तो स्वतःला मुक्त समजत होता असे दिसते. अतिमहत्त्वाकांक्षेमुळे त्याचा अधःपात झाला. त्याच्याच विनंतीनुसार त्याला ट्रान्सॉक्सियानाची सुभेदारी खलिफा मुतादिरकडून मिळाली होती. या नव्या प्रदेशाचा ताबा घेण्यासाठी तो गेला असता, त्याच्या आधीचा त्या प्रांताचा सुभेदार समानिद इस्माईल इब्ने अहमदने त्याचा पराभव करून आपले सुभेदारपद कायम ठेवले. अमरच्या या पराभवामुळे खलिफाला समाधान वाटले.

हाच समानिद सुभेदार पुढे खुरासानमध्ये चाल करून गेला. खलिफाने त्याला त्या प्रांताचा सुभेदार म्हणून मान्यता दिली आणि नेमणूकीची सनद व ध्वज पाठविला. त्याचे घराणे स्वतःला समानियन शहांचे वंशज मानीत असे. या घराण्यातील लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर जवळपास लगेच मामुनने त्यांना ट्रान्सॉक्सियानात व उत्तर इराणमध्ये इतरत्र अमीरच्या खालची दुय्यम अधिकारपदे दिली. खलिफा मात्र समानिदांना आपले अंकित[1] (किंवा मांडलिक) समजत असला तरी त्यांना वंशपरंपरा

१. "नासर इब्ने अहमद, 'मौला-इ-अमीर अल् मुमिनीन" ही अक्षरे अलप्तगिन याच्या नाण्यांवर कोरलेली आढळतात. नुह इब्ने मन्सूर समानी यांचेही असेच वर्णन अबु मुति अल्-बाल्ली याच्या 'अजाइब अल् आश्या, यामध्ये केलेले आहे. तसेच नुहचा भाऊ व मन्सूर इब्ने नुहचा मुलगा अहमद इब्ने मन्सूर यालाही त्याच्या बापाच्या नाण्यावर वरील पदवीनेच संबोधिले आहे.

नेमणुका करण्याची परवानगी देण्यात आली. त्यामध्ये बगदाद हस्तक्षेप करीत नसे. गरज उद्भवेल तेव्हा आपले लष्करी कर्तव्य[1] बजावून समानिद खलिफाशी निष्ठा दर्शवीत. पण ही ऐच्छिक लष्करी सेवा आणि खुत्बामध्ये व नाण्यांवर खलिफाच्या नावाचा समावेश या गोष्टी सोडल्या तर समानिद हे कोणत्याही प्रकारे स्वतःला अंकित किंवा कनिष्ठ प्रतीचे मानीत नसत.

समानिद स्वतःच्या देशात सर्वसत्ताधारी राजे होते. फक्त काही दूरच्या जिल्ह्यातील शासन त्यांनी स्थानिक घराण्यांचे हाती सोपविलेले होते. या घराण्यांमध्ये प्रमुखपद वंशपरंपरागत असे. हे प्रमुख, राजधानी बुखारास नाममात्र खंडणी पाठवीत. याच घराण्यांपैकी रुफारि हे होते. त्यांनी समानिदांचे सिस्तान प्रांतातील मांडलिकत्व मान्य केले असले तरी ते जवळजवळ स्वायत्त होते.

राजघराण्यातील सर्वात प्रबळ पुरुष गादी बळकावी आणि इतर त्याच्याविरुद्ध वारंवार बंड करीत. समानिद बादशहाच्या निधनानंतर वारस कोण व्हावा, याविषयी शंका उपस्थित झाली म्हणजे बादशहाचे निकटचे आप्त आणि राजधानीतील वृद्ध मंडळी एकत्र जमत आणि नवा राजा निवडीत. अहमद इब्ने इस्माइल आठ वर्षांचा मुलगा मागे ठेवून मृत्यू पावला तेव्हा असेच घडले होते.

समानिदांनंतर साम्राज्याची सत्ता गझनवींकडे आली. खिलाफतीशी त्यांचे संबंध समानिदांप्रमाणेच होते. चांगले सुन्नी या नात्याने अब्बासी खलिफांशी त्यांचे संबंध मित्रत्वाचे होते. गझनवी घराण्यातील सर्वात प्रबळ राजा मुहम्मद याने समानिदांची सत्ता उलथल्याची बातमी बगदादला पोचताच खुरासानचा अमीर म्हणून खलिफा अल् कादिरने ( ३८१/९९१–४२२/१०३१ ) मुहम्मदास मान्यता दिली. खलिफा आणि अमीर यांच्यातील सद्भाव अन्योन्य स्वरूपाचा होता. खलिफा अल् कादिर वारल्यानंतर त्याच्या वारसाची घोषणा करणाऱ्या प्रतिनिधीचे गझनी येथे मोठ्या समारंभाने स्वागत झाले. खुत्बामध्ये नवा खलिफा अल् काइम याचे नाव अमीरच्या बरोबर घालण्यात आले व नव्या खलिफाशी निष्ठा व्यक्त करणारा संदेश पाठविण्यात आला. ( मुहम्मदाचा मुलगा मसूद त्यावेळी अमीर होता. )

मसूद इब्ने मुहम्मद याच्या राज्यारोहण समारंभाचा जो वृत्तांत उपलब्ध आहे त्यात मन्शूरचा ( म्हणजे खलिफाने पाठविलेली नेमणूक सनद ) अनेकदा उल्लेख केला आहे. त्या मन्शूरद्वारे नव्या अमीरास त्याच्या वडिलांकडे असलेले सर्व प्रदेश तर दिलेच

---

१. उदाहरणार्थ, खलिफाच्या विनंतीवरून अहमद इब्ने इस्माइलने मुस्लिमेतर तुर्कांशी केलेली लढाई.

होते पण त्याशिवाय जे प्रदेश तो भविष्यकाळात जिंकण्याची शक्यता होती असे प्रदेशही दिले होते. एका मोठ्या सभेमध्ये ही मूळ अरबी सनद प्रथम जशीच्या तशी वाचून दाखविण्यात आली व त्यानंतर फारशीतील त्याचे संक्षिप्त भाषांतरही वाचून दाखविण्यात आले. नंतर खलिफाने पाठवलेला 'खिला' (मानाचा झगा) अमीराने घातला व प्रार्थनेच्या वचनांतील दोन भाग त्याने म्हटले व समारंभ संपला. मन्शूरच्या प्रती नंतर गझनवी साम्राज्यातील सर्व प्रमुख शहरांकडे पाठविण्यात आल्या.

खलिफाने समानिदांप्रमाणेच गझवींनाही खुरासानचे अमीर यापेक्षा अधिक कमी प्रतीचे मानले नाही. गझनवी स्वतःच्या प्रदेशात सर्वसत्ताधीश राजे होते व एखादा दुय्यम प्रतीचा राजा त्यांना तसे मानण्याचे नाकारी तेव्हा ते त्याची भेट अत्यंत नाखुषीने घेत.[1]

इराणमध्ये इतर ज्या राजघराण्यांनी या ना त्या काळात राज्य केले त्यापैकी इस्लामच्या चौथ्या शतकातील बुवेहिद आणि पाचव्या व सहाव्या शतकातील सेल्जुकांच्या निरनिराळ्या शाखा यांचे खलिफाशी असलेले संबंध विचित्र होते. ते खलिफापासून केवळ स्वतंत्र होते, एवढेच नाही तर ते खलिफाचे जणू मालक आणि नियंत्रक होते. असे असले तरी दोन्ही राजघराण्यांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणे निरनिराळ्या कारणांसाठी खलिफाची सर्वश्रेष्ठता मान्य करण्याचा देखावा केला. कारण दोन्ही राजघराण्यांच्या नाण्यांत राजाचे नावाबरोबर खलिफाचेही नाव आढळते.

बगदाद खिलाफत १२५८ साली नष्ट झाल्यानंतर एके काळी इराणवर प्रभुत्व गाजविणाऱ्या त्या परकी सत्तेच्या खुणाही नष्ट झाल्या आणि इस्लामच्या प्रमुखत्वाचा जो दावा करील त्याचे आपण अंकित असल्याचा देखावा करण्याचीही तेथील सत्ताधीशांना आवश्यकता राहिली नाही. त्यानंतर अडीचशे वर्षे इराणमध्ये मंगोल विजेते व त्यांचे वारस यांचे राज्य होते. पण राष्ट्रीयतेच्या व सामुदायिकतेच्या प्राचीन भावनेचे इराणमध्ये हळूहळू पुनरुज्जीवन होत होते. सफावी इस्माईलला जो उत्साहपूर्ण पाठिंबा मिळाला त्यावरून हे दिसून आले. इस्माईलने पंधराव्या शतकाच्या अखेरीस इराणमधील सर्व छोट्या मंगोल राजघराण्यांना बाजूला सारून आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली. स्वतःच्या व बहुसंख्य लोकांच्या धार्मिक भावनांनुसार त्याने शिया पंथ हाच राष्ट्रीय धर्म म्हणून प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. इस्माईल हा पीर किंवा मुर्शिद कुटुंबांपैकी होता. सुफींचे नेतृत्व या कुटुंबांकडे होते असे मानले जाई. ती कुटुंबे शेख सफी अल् दिन यांची वंशज होती. शेख सफी अल् दिन, आपण सातवा इमाम मुसाअल् कासीम याच्या वंशातील असल्याचा दावा मांडी. परंतु आपणच इमाम असल्याचा दावा

१. ख्वारझाम शहाने खुतबामध्ये मुहम्मुदाचे नाव वगळले तेव्हा मुहम्मुदाने त्याचा सूड घेतला.

इस्माईलने मात्र सोडला नाही. शिया पंथ हा देशाचा धर्म करण्याच्या आपल्या कार्यात दैवी शक्तीचा पाठिंबा आपणास आहे असे तो सांगे. त्याला जो दैवी मान देण्यात आला, तसेच त्याला व त्याच्या वंशजांना इराणमध्ये जी प्रतिष्ठा मिळाली त्याचे एक कारण या राजघराण्याचे धार्मिक स्वरूप व वंशपरंपरागत श्रेष्ठत्व यांवर या घराण्याने सांगितलेला दावा यात होते.

सुरुवातीच्या काळातील, इराणमधील स्वतंत्र किंवा निमस्वतंत्र राज्यातील सरकारी कारभाराच्या पद्धतीसंबंधी फारसा तपशील उपलब्ध नाही. इराणमध्ये एका विशिष्ट पद्धतीने कारभारपद्धतीचा विकास झाला असे दिसते. प्राथमिक अवस्थेत कारभाराची सर्व सूत्रे खुद्द राजाच्या हाती असत. लष्कराचा तो प्रमुख असे. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांवर त्याची देखरेख असे. त्यातून पुढे निरनिराळ्या श्रेणींच्या अधिकाऱ्यांची सुविहित अशी यंत्रणा विकसित झाली. खुरासानमधील अब्दल्ला इब्ने ताहिर याचा कारभार हे सरळ सोप्या कारभाराचे एक उदाहरण म्हणता येईल. तो काळ आणि त्यावेळचे लोक यांचे आदर्श लक्षात घेता ताहिरचे एकतंत्री राज्य म्हणजे जुलमी राजवट किंवा वाईट सरकारच होते असे म्हणता येणार नाही. अर्थात प्रत्येक अनियंत्रित राजाच्या ठायी प्रजेच्या हिताची सारखीच बुद्धी असे असे मात्र नाही. खुरासानमध्ये ताहिरच्या मागून त्याचा मुलगा अब्दल्ला सत्तेवर आला. त्याला शेतीची आवड होती. पाण्याची टंचाई असलेल्या भागात पाण्याच्या हक्कावरून नेहमीच भांडणे होत. ती संपविण्याचा प्रयत्न अब्दल्लाने केला. भूमिगत कालवे हे इराणचे वैशिष्ट्य आहे. या कालव्यांच्या पाण्याच्या वाटपासंबंधींच्या सरकारी नियमाबाबत 'फिकाह'ची पुस्तके किंवा पैगंबरांच्या 'हदिस'मध्ये अब्दल्लाला काहीच मार्गदर्शन आढळले नाही तेव्हा त्याने खुरासान व इराक येथील कवींना बोलावून या विषयावर नियमांचे पुस्तक (किताब-ई-कुनीय) तयार करण्यास सांगितले. अब्दल्लानंतर दोन शतकांपर्यंत गार्दिझीच्या काळात या पुस्तकाचा उपयोग केला जात होता. गार्दिझीने तसे नमूद केले आहे. अब्दल्लाने धान्य उत्पादनास उत्तेजन दिले. सार्वत्रिक शिक्षणाचे महत्त्वही तो मानीत होता असे दिसते.

याकुब इब्ने लेथ सफ्फारने लुटालूट करून आपल्या लष्करी कारकीर्दीला सुरवात केली होती. त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या इतिहासावरून असे दिसते की खुरासानचा मुलकी कारभार आणि त्याच्या ताब्यात असलेल्या जमिनी याबाबत त्याने फारसे काही केले नाही. महसुलाची नियमित वसुली होण्याची वाट पाहात न बसता संधी मिळेल तेव्हा आणि तेथे त्याने अदूरदृष्टीने व जबरदस्तीने पैसे वसूल केले. त्याच्यानंतर गादीवर आलेला त्याचा भाऊ अमर याने अधिक पद्धतशीरपणे व्यवस्था व आर्थिक स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने कार्य केले. या संदर्भात अमरचा एक अधिकारी हसन इब्ने अल् मर्झबान याचा उल्लेख भूगोललेखक इब्ने हॉकल याने केला आहे. दिवान अल् इस्ति-

द्राकचा ( कायद्याने ताब्यात घेण्याचे खाते ) तो प्रमुख होता व त्याच्या कुटुंबात सरकारी नोकरी परंपरागत चालत आलेली होती. सैनिकांसाठी अमरने एक शस्त्रागार आणि खजिना निर्माण केला. धर्मादाय कर व इतर खास कर यांच्याद्वारे जमा झालेला पैसा खजिन्यात भरला जाई व त्याचा उपयोग केवळ लष्कराचा पगार व साधनसामग्री यांच्यासाठीच केला जाई. स्वतःच्या खाजगी उपयोगासाठी त्याचा निराळा खजिना होता. त्यातून तो धान्यासाठी किंवा धान्य उत्पादन करणाऱ्या जमिनीसाठी खर्च करी. याशिवाय आणखी एक तिसरा खजिना होता. त्यात कराचा पैसा जमा होई. राजदरबारचे आश्रित आणि अधिकारी यांच्यासाठी त्यातील पैशाचा उपयोग केला जाई.

सफारींच्या मागून समानिद अमीरांचे राज्य स्थापन झाले. या अमीरांच्या ताब्यात बराच मोठा प्रदेश होता. किंबहुना खिलाफतीच्या प्रारंभापासून इराणमध्ये स्थापन झालेले हे सर्वात मोठे स्वतंत्र राज्य होते. त्यांचे सरकार स्थिर होते. कारभार सुव्यवस्थित होता. बुखारा ही सरकारची राजधानी होती. पण राजाच्या फौजांचा प्रमुख हा अमीराचा खुरासानमधील प्रतिनिधी म्हणूनच काम पाही व त्याचा मुक्काम मर्व्ह किंवा निशापूर येथे असे.

राजधानीच्या मुल्की कारभारासाठी दिवानांची ( कचेऱ्यांची ) जी सुव्यवस्थित यंत्रणा उभारलेली होती ती पाहून बगदादची आठवण होत असे. नासिर ( दुसरा ) इब्ने अहमद[1] याच्या काळात तर राजधानी चांगल्या प्रकारे प्रस्थापित झाली होती. या राजाने राजप्रासादाच्या प्रवेशद्वाराशीच आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या ठेवलेल्या होत्या. वझीर, मुस्तावफी ( खजिनदार ), अमील अल् मुल्क ( राजाचा खाजगी सचीव ) आणि दिवान-इ-रिसालत ( किंवा न्यायालयाचा प्रमुख ), साहिब शुर्ता ( पोलीस-प्रमुख ), साहिब मुआय्यद ( याचा शब्दशः अर्थ मदत अधिकारी. त्याची कामे सांगितलेली नाहीत ), मुतासिब ( मुद्रण नियंता ), काझी, तसेच राजाच्या खाजगी कारभाराचे आणि अवक्फचे ( धार्मिक निधी ) व्यवस्थापक यांच्या कचेऱ्या तेथे असत.

अधिक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका राजा स्वतः करी व काही वेळा आपल्या कुटुंबातील व्यक्तींना मुख्य अधिकारांच्या जागा देई. नासर-इब्ने-अहमदने आपल्या एका मुलास वझीर व दुसऱ्यास सिपाही-सालार नेमले होते. राज्याचे अधिकारी आणि राजप्रासादाचे ( दरगाह ) अधिकारी यांच्यांत साधारणतः फरक असे. राजप्रासादाच्या अधिकाऱ्यांची मुख्य कामे राजदरबारचे समारंभ आणि राजघराण्याचा कारभार पाहणे ही असत. राजप्रासादाच्या प्रमुख अधिकाऱ्याला हाजिब अल् हुज्जाब असे म्हणत. सरकारी अधिकाऱ्यांत त्याचे स्थान फार वरचे असे. अमील किंवा प्रांतिक महसूल अधिकाऱ्यापेक्षाही तो वरिष्ठ दर्जाचा अधिकारी मानला जाई.

---

१. त्याच्या वंशातील चौथा राजा.

वझीर हा राज्यातील मुख्य मुलकी अधिकारी. वय कमी असल्याने किंवा इतर कारणांनी राजा आवश्यक कार्ये करण्यास असमर्थ असे तेव्हा सर्व जबाबदारीचा भार वझीरावर पडे. युवराज नासर इब्ने अहमद लहान असताना वझीर अब्दुल्ला-अल्-जेहानी याने राज्याचा सर्व कारभार पाहिला. वझीर प्रबल असला तर तोच इतर अधिकाऱ्यांच्या तसेच वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका करी किंवा त्यांना बडतर्फ करी. पंधराव्या शतकातील इतिहासकार मीर खाविंद याची माहिती बरोबर असेल तर लष्कराचे प्रमुखपदही वझीराला स्वतःकडे घेता येत असे.

गझनवींच्या राजवटीतील कारभार त्यांच्या पूर्वीच्या राजांच्या राजवटीसारखाच होता. सिपाही सालार, हजीब-इ-बुझुर्ग (राजप्रासादाचा सर्वोच्च अधिकारी) आणि वझीर हे राज्याचे प्रमुख अधिकारी होते. एकंदर सर्व इस्लामी साम्राज्यामधील दुसऱ्या कोणत्याही ठिकाणापेक्षा गझनीमधील कोणत्याही अधिकारपदाचा दर्जा व महत्त्व राजाचा स्वभाव आणि इच्छा यांवरच जवळजवळ पूर्णपणे अवलंबून असे. सुलतान मुहम्मदाचा मृत्यू आणि त्याचा मुलगा मुहम्मद याचे राज्यारोहण या दरम्यानचे काळात प्रासादाचा वरिष्ठ प्रमुख अधिकारी अली हा सरकारी कारभार पाहात असे. कधी कधी अधिकारपदावर नसलेल्या एखाद्या बाहेरच्या व्यक्तीस बोलावून तिच्याकडे पुष्कळशी सत्ता व जबाबदारी सोपविली जात असे. पण सर्वसाधारणपणे खुद्द अमीराच्या खालोखाल वझीरालाच मान असे. सर्वसामान्य लोकांचे जीवितच नव्हे तर इतर अधिकाऱ्यांचे भवितव्यही वझीराच्या हाती असे. एक उदाहरण द्यावयाचे तर, अबु साहल झावझानी हा वझीर झाल्यानंतर, दिवान-इ-रिसालत (न्यायालयाचा प्रमुख) हा वास्तविक काही अंशी महत्त्वाचा अधिकारी असूनही नव्या वझीराच्या भीतीने नोकरीवर हजर झाला नाही.

मुस्तावफी हा खजिन्याचा प्रमुख होता. त्याचा दर्जा बगदादमधील साहिब दिवान अल् खराजसारखा असावा. त्याच्या अधिकाराखाली अनेक ' खजिने ' (खजिनदार) असत. हे खजिनदार रोकड पैसा आणि मौल्यवान वस्तूंच्या निरनिराळ्या विभागांचे प्रमुख असत. हिशेब ठेवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असे. या कामात अनेक कातिब (कारकुन) व मुश्रिफ (पर्यवेक्षक) त्यांना मदत करीत. समानिदांच्या राजवटीप्रमाणेच दिवान-इ-रिसालतला (न्यायालय) महत्त्वाचे स्थान होते. सरकारी पत्रके, अधिकारपदाच्या सनदा आणि राज्याचे जाहीरनामे तेथूनच निघत. या दिवानचे महत्त्व तेथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी वाजवीपेक्षा अधिक वाढवून सांगितलेले आहे. पण राजकीय अधिकाऱ्यांचे भवितव्य– त्यांना वर चढविण्यात किंवा खाली ओढण्यात– याबाबतींत या खात्याला बरेच महत्त्व होते यात शंका नाही. त्याची तुलना काही प्रमाणात राज्याच्या दिवाण-इ-बारिदशी (गुप्तहेर विभागाची मुख्य कचेरी) करता येईल.

इस्लामच्या चौथ्या शतकात बुवेहिद गादीवर आले. फारस आणि शिवाय त्याच्यालगतचे प्रांत आणि इराक येथपर्यंत त्यांची सत्ता होती. फारसमध्ये तर त्यांची राजधानीच

होती. त्यावेळी बगदादला एखाद्या प्रांतिक राजधानीचा सामान्य दर्जा प्राप्त झाला होता. राजघराण्यातील सुरुवातीच्या सत्ताधाऱ्यांनी सत्तेची सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवली पण कारभारातील तपशील पाहण्यासाठी वझीरांची नेमणूक केली. काही प्रसंगी सेनाप्रमुख म्हणूनही वझीर काम करी. अदूद अल्-दावलाने दोन वझीर नेमले होते. त्यांपैकी एकाला त्याने फारसमध्ये त्याचा प्रतिनिधी म्हणून ठेवले होते. दुसऱ्याला इराकमधील[1] दलदलीच्या प्रदेशात बंडखोरांचा मुकाबला करण्याचे काम दिले होते. बुवेहिदांच्या पूर्वी खलिफाच्या मंत्र्याला वझीर म्हणत. बुवेहिदांच्या अमदानीत खलिफाच्या सचीवाइतका त्याचा दर्जा खाली आला व त्याला 'रईस अल् रुआसा' अशी पदवी मिळाली. पुढे फारसमध्ये राज्य करणाऱ्या राजांनी कारभाराचे काम वाढत्या प्रमाणात मंत्र्यावर सोपविले. साहिब इस्माइल इब्ने अब्बाद या विख्यात वझीराला तर त्याचा राजा मुआय्यद अल् दावला याने आपल्या आर्थिक कारभाराचाही प्रमुख नेमले होते. या राजघराण्याचा आपल्या मंत्र्यांवर किती विश्वास होता याचेच हे निदर्शक होते.

सेल्जुक राजवटीचा कारभार, प्रमुख बाबतीत समानिदांसारखाच होता. निजाम-अल्-मुल्कने केलेले सेल्जुकांच्या राज्यकारभाराचे वर्णन हे प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा आदर्शाचे चित्रण आहे. तरीही त्याचा बराच भाग वस्तुस्थितीवर आधारलेला असला पाहिजे. येथे एवढेच म्हटले तरी पुरेसे होईल की, राज्यव्यवस्थेत वझीराला सर्वात महत्त्वाचे स्थान होते. वझीराची कार्यक्षमता आणि अमील, काझी, साहिब बारीद व रईस या प्रांतातील दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यक्षमता यावर राज्याची समृद्धी अवलंबून असे.

मंगोल कारभार पद्धतीवर इस्लामचा फारच थोडा प्रभाव होता. त्यामुळे त्या पद्धतीचा विचार या पुस्तकाच्या कक्षेबाहेर आहे. सफावी राजघराणे गादीवर आल्यानंतर इस्लामी धर्तीची नव्हे तर इस्लामी परंपरा असलेली कारभार पद्धती इराणमध्ये पुन्हा सुरू झाली. सुरुवातीचे सफावी शहा राजधानीतील आपल्या कामांपैकी काही कामे वाटून देत. शहा ताहमास्प याने ( १५२४–७६ ) एक सल्लागार मंडळ नेमले. हे सल्लागार सर्वसाधारणपणे 'सुलतान' म्हणजे प्रांतांचे सुभेदार असत. प्रांतांच्या कारभाराबद्दल ते मुख्यतः राजाला जबाबदार असत. प्रांतांतील प्रत्यक्ष सरकारी कारभार त्यांच्या प्रतिनिधींच्या 'खानां'च्या हाती असे. या सल्लागारांना स्वतःचे मत नसे व राजाने विचारला तरच आपला सल्ला देता येत असे.

शहा एक वझीरही नेमी. पण त्याच्याकडून शहा ज्या गुणांची अपेक्षा करी ते

---

१. मंत्री उच्च पदावर असले तरी त्यांनी राजाला दुखविले तर राजा त्यांना मारहाण करीत असे. इराणमध्ये तर अशी शारीरिक मारहाण होणे हा कलंक मानला जात नसे. तेथे नेहमीच असे प्रकार होत. तथापि मारहाण झालेला मंत्री पुन्हा आपल्या कामाला रूजू होऊ शकत असे.

लक्षात घेतले तर खाजगी चिटणीसाहून त्याचा दर्जा अधिक नसे. नंतरच्या काळात प्रांताच्या सुभेदाराला वझीर म्हटले जाई व बडा वझीर हा सर्व सुभेदारांचा प्रमुख मानला जाई. बड्या वझीराला 'इ' तिमाद अल् दावला (राज्याचा आधारस्तंभ) ही पदवी होती. पण महत्त्वाच्या प्रश्नावर शहाच नेहमी निर्णय घेत असे. मग तो प्रश्न परराष्ट्रसंबंधांचा असो की प्रमुख प्रांतांच्या कारभाराचा असो. बड्या वझीराच्या पदव्या व हुद्दा काहीही असला तरी राजा आणि बाह्य जग यांच्यातील मध्यस्थ यापेक्षा त्याचे स्थान प्रत्यक्षात अधिक नसे.

इराणमधील सफावी काळातील सरकारविषयीची सर्वात उत्तम माहिती युरोपियन प्रवाशांकडून मिळते. राजकीय किंवा व्यापारी कारणांसाठी हे प्रवासी इराणमध्ये गेले होते. ओलिरिअसने इराणला[1] नोव्हेंबर १६३६ ते फेब्रुवारी १६३८ च्या दरम्यान भेट दिली. त्याने दिलेली माहिती अशी : त्यावेळी शहा 'बडा अब्बास' याचा मुलगा साफी याची कारकीर्द चालू होती. त्याचा इतिमाद अल् दावला किंवा मुख्याधिकारी हा राजाच्या मंत्रिमंडळाचा अध्यक्ष होता. तसेच तो कारभाराचा आत्मा, राज्याचा प्रमुख मंत्री आणि इराणचा व्हाइसरॉयही होता. राज्याचा महसूल व खजिना यांवर त्याची देखरेख असे. तोवरच्या सर्व मंत्र्यांमध्ये तो अत्यंत स्वार्थी होता. दरबारात असा एकही व्यवहार होत नसे की ज्यापासून त्याला काही फायदा मिळत नसे. एखाद्या कामासाठी किंवा नोकरीसाठी अर्ज करणाराला या मुख्याधिकाऱ्याशी करार करून तो मागेल ते देणे द्यावे लागे. हे देणे जबर असे. दरबारला वर्षातून दोनदा द्याव्या लागणाऱ्या देणग्यांच त्यात समावेश असे. म्हणजे जबरदस्तीने केलेल्या या वसुलीत एका अर्थाने राजाही भागीदार होत असे. मुख्य कारभारी हा दुर्बल असल्याने त्याला मिळालेली सर्व संपत्ती त्याच्या मरणाचे वेळी राजालाच मिळावयाची.

काही वेळा इतिमाद अल् दावला हा राजा या नात्याने असलेल्या आपल्या जबाबदारीव्यतिरिक्त काही कमी महत्त्वाच्या प्रांतांवर स्वतः नियंत्रण ठेवी.

राजाच्या इतर प्रमुख अधिकाऱ्यांपैकी पूर्वीच्या राजघराण्यांच्या काळातील दिवान-इ-रिसालत (न्यायालय) हे पद 'वाकिआ-नवीस'च्या (कामकाज टिपण लेखक) स्वरूपात चालू राहिले. प्रांतांना पाठवावयाचे हुकूम व खलिते त्याच्यामार्फत पाठविले

१. ॲडाम ओलिरियस हा वकिलातीचा चिटणीस होता. ड्यूक ऑफ होल्स्टेन फ्रेड्रीक याने ग्रेट ड्यूक ऑफ मस्कोव्ही व इराणच्या राजा यांच्या दरबाराकडे ही वकिलात पाठविली होती. "किडवेलीच्या जॉन डेव्हिस याने ओलिरियस याने दिलेली माहिती इंग्रजीत चोखपणे अनुवादित करून" १६६९ मध्ये लंडनमध्ये प्रसिद्ध केली.

जात. राजवराण्याच्या कारभारासाठी खजिन्यातून देण्यात येणाऱ्या मालाचा व पैशाचा हिशेब हाच अधिकारी ठेवी.[1]

इराणी राज्याच्या घटक प्रांतांतील खालच्या पातळीवरील कारभार मध्यवर्ती सरकारप्रमाणेच चालत असे. मुख्य फरक म्हणजे खालच्या पातळीवरील छोट्या घटकांतील महसूल अधिकाऱ्यास त्याच्या वास्तविक महत्त्वानुसार दर्जा मिळे. जमीन महसूलाच्या तत्कालीन व्यवस्थेशी त्याची कामे निगडीत असत. जमीन महसूलाची दीर्घकाळ चालू असलेली पारंपरिक स्थानिक व्यवस्थाच कायम ठेवली जाई. त्यात विशेष बदल होत नसे. समानिदांच्या आणि गझनवींच्या सुरुवातीच्या काळात घटक प्रांतांचा कारभार वलींच्या नियंत्रणाखाली असे. प्रत्येक वली स्वतःचे अधिकारी नेमी. वझीर, सिपाही सालार ( सेनापती ) आणि वकील इ–दार ( खाजगी कारभारी ) या अधिकाऱ्यांचा त्यात समावेश असे. सुरुवातीला गझनवींच्या काळात सर्वसाधारणपणे वलीवरच महसूलाची जबाबदारी टाकली होती व त्याला आर्थिक मदतनीस म्हणून एक साहिब दिवान दिला होता. गझनवींपूर्वीच्या म्हणजे समानिदांच्या राजवटीत मात्र प्रत्येक प्रांतांत आर्थिक कारभार पाहण्यासाठी अमील असे. तो वलीवर अवलंबून नसून स्वतंत्रपणे कारभार पाही.

इराणमध्ये फार प्राचीन काळापासून ग्रामीण भागातील महसूल गोळा करण्याची आणि कायदा व सुव्यवस्था यांची प्रत्यक्ष व निकटची जबाबदारी ' दिहकानां'वर टाकण्यात आलेली होती. हे दिहकान लहानमोठे शेतकरी व जमीन मालक होते. देशाची बरीच संपत्ती त्यांच्या हाती असे. इराणची परंपरागत विद्या त्यांनीच जतन केली हे या अनुषंगाने सांगितले पाहिजे. फिर्दोसीचा ' शहानामा ' हा ग्रंथ त्यांनी जतन केल्यामुळेच उपलब्ध झाला.

त्या काळातले तसेच त्या नंतरच्या काळातले सुभेदार आपली पदे वंशपरंपरागत आहेत असे मानीत आणि आपल्या ताब्यात असलेला प्रदेश आपलीच मालमत्ता समजत. पण शहा आपल्याला बडतर्फ करण्याचा संभव असे हे माहीत असल्याने नजराणे देऊन ते शहाची मर्जी संपादीत. शहाही उलट नववर्षदिनी मानवस्त्र ( मानाचा झगा ) देऊन त्याची परतफेड करी. राजाच्या या प्रतिनिधीपुढे प्रबळ टोळी प्रमुख कधीच मान तुकवीत नसे. अनेक विभागांतील हाकिमांना किंवा लष्करी सुभेदारांना

---

१. अर्वाचीन काळात कजारांच्या राजवटीत अंशतः युरोपियनांच्या प्रभावामुळे मंत्र्यांची संख्या वाढली. शहाच्या वझीरांचे मंत्रिमंडळ असे. त्यामध्ये सद्र-इ-आझम ( न्यायमंत्री ), वझीर-इ-आझम ( प्रधान मंत्री ), मुस्तावफी अल्–मामलिक ( गृहमंत्री ) व वझीर–इ–निजाम ( युद्धमंत्री ) हे प्रमुख मंत्री असत.

आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून बंडखोर सरदारांविरुद्ध युद्ध करणे आणि बाह्य आक्रमणापासून आपल्या प्रांतांच्या सीमांचे रक्षण करणे भाग पडे. सर्वसाधारणपणे प्रत्येक प्रांतांच्या खानास ( हंगामी सुभेदार ) या प्रकारची कामे करावी लागत. आणि खानाची नेमणूक किंवा बडतर्फी करण्याचे अधिकार शहाच्या हाती असल्यामुळे महसूलातील काही ठराविक रकम शहाला द्यावी लागे.[१]

कजार राजांच्या कारकीर्दीत अनेकदा सुभेदार हे राजघराण्यातील व्यक्तींपैकीच असत व आपापल्या वैयक्तिक दर्जाप्रमाणे विशिष्ट पदव्याही ते धारण करीत. 'इयालत'[२] हे सर्वात महत्त्वाचे प्रांत त्यांच्या हाती सोपविण्यात येत. पण या प्रांतांतील कारभाराच्या पद्धतीत फारच थोडी व्यवस्था किंवा नियमितपणा होता. दुसरा, विलायत म्हणजे वली किंवा हाकिम यांच्या नियंत्रणाखाली दिलेला लहान मोठा प्रदेश. हा सर्वसाधारणपणे जिल्ह्याएवढा असे आणि भौगोलिक किंवा आर्थिक दुव्यांनी तो कोणत्या तरी मोठ्या गावास किंवा शहरास ( कसबा किंवा केंद्र ) जोडलेला असे. त्यास मुख्यतः सुभेदार जबाबदार असे. सुभेदार कसब्याचा अंतर्गत कारभार पाहात नसे. कारण कसब्याच्या रहिवाश्यांना आपले स्वतःचे न्यायाधीश निवडण्याचा, तसेच बाजाराचे नियम ठरविण्याचा आणि स्वतःची मुलकी व व्यापारी लवादमंडळे स्थापण्याचा अधिकार असे.

सुरुवातीच्या राजघराण्यांचे काळात स्थानिक स्वरूपाचा कारभार एखाद्या रईसकडे किंवा शिहनाकडे सोपविलेला असे. समारंभप्रसंगी आपल्या भागातील प्रजेचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणे आणि राजाचे हुकूम गावकऱ्यांना पोचविणे हेच त्याचे[३] मुख्य काम असल्याचे दिसते. प्रत्येक मोहल्ल्या ( भाग ) साठी आणि शहराच्या बाजारभागासाठी स्थानिक लोकांनी निवडलेला प्रतिनिधी असे. हा प्रतिनिधी रईसच्या हुकुमांची अंमलबजावणी होते की नाही हे पाही. शहरात बहुतेक कनिष्ठ प्रांतिक अधिकारी राहात. वस्तूंच्या स्वरूपात बसविलेल्या करांचे आणि सरकारी कोठाराचे हिशेब ठेवणारा 'बुंदार', आणीबाणीच्या काळात लष्करासाठी माल पुरविणारा शिवाय काही पोलिसी कामे पाहणारा 'साहिब मौना' या कनिष्ठ प्रांतिक अधिकाऱ्यांचा त्यात समावेश असे. हे अधिकारी त्यांच्या खात्याच्या प्रांतिक प्रमुखाचे नियंत्रणाखाली असत

१. सफावी कारभारासंबंधींची विस्तृत माहिती व्ही. मिनोरस्की याने "ताधकिरात अल् मुलुक" या अज्ञात लेखकाने लिहिलेल्या ग्रंथावरील आपल्या टीकेत दिली आहे.

२. म्हणजे अझरबैजान, फार्स, खुरासान व किरमान हे प्रदेश. पण इलायत या नावाने वर्गीकरण केलेल्या या प्रदेशात आणखी काही भूभागाची जरुरीप्रमाणे भर घातली जाई किंवा काही भाग काढून टाकला जाई.

३. सफावीच्या राजवटीत या अधिकारपदावर 'कलांतार'ची नियुक्ती केली जात असे.

व प्रांतिक खातेप्रमुख अमीराला जबाबदार असत. स्थानिक अधिकारपदे तसेच दिह्कानचे पद ससानियन काळापासून वडिलांकडून मुलाकडे याप्रमाणे वंशपरंपरागत चालत येत असे.

मोठ्या शहरांपासून दूर असलेल्या बाकीच्या भागांतील बरीच लोकसंख्या तेव्हा आणि सांप्रतदेखील भटके किंवा निमभटके जीवन जगत होती व आहे. आपले प्रतिनिधी म्हणून या भटक्या टोळ्यांच्या प्रमुखांवरच बहुधा केंद्र सरकार भिस्त ठेवीत असे. अमीर आणि टोळीप्रमुख यांच्यात एकवाक्यता असे तेव्हा ज्या जिल्ह्यात त्याची टोळी संचार करीत असे त्या जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी टोळी प्रमुखावर टाकली जाई. सरकारसाठी कर गोळा करण्याचे कामही तो करी.

दहाव्या शतकातील भूगोललेखक इब्ने हॉकल याने आपल्या काळात केंद्र सरकारचे अधिकारी व फारसच्या मेंढपाळ कुर्दिश टोळ्या यांचे संबंध कसे होते याचे वर्णन केले आहे. प्रत्येक झुम्ममध्ये (मेंढपाळ विभागात) 'नाहिया' (चराईचा प्रदेश) व अनेक शहरे किंवा मोठी खेडी असत. तेथील लोकवस्ती बरीचशी स्थायिक झालेली असे. लोक व्यापार किंवा शेती करीत. प्रत्येक नाहियामध्ये टोळीप्रमुखास नियंत्रणाचे अधिकार असत. करवसुली, शांतता व सुव्यवस्था राखणे तसेच एकट्यादुकट्या प्रवाशाचे व उंटांच्या तांड्यांचे संरक्षण ही कामे त्याने करावी असे सामोपचाराने प्रथम त्यास सांगितले जाई. जरूर तर त्याच्यावर त्या कामाची सक्ती केली जाई. टोळ्यांबाबत सामोपचाराचा मार्ग सरकारच्या दृष्टीने अधिक चांगला होता. कारण टोळ्यांची संख्या मोठी होती.[1] तसेच आपणास पसंत नसलेल्या हुकुमास यशस्वीपणाने विरोध करण्याची ताकद त्यांच्यात होती.

फारसपेक्षा खुरासान प्रांतांतील लोकवस्ती अधिक स्थिर किंवा स्थायिक झालेली होती. त्याचा एक 'कूरा' बनविण्यात आला होता. महसूल वसुलीसाठी त्याचे तीस अमाल (परगणे) पाडण्यात आले होते. नंतरच्या गझनवी आणि समानिद राजांच्या काळात अनेक अमील करआकारणीचे व करवसुलीचे काम आपसात वाटून घेत. प्रांताच्या अधिक महत्त्वाच्या भागात छोटे सुभेदार असत. ते प्रशासक (हाकिम) म्हणून काम पाहात. प्रत्येक अमालमध्ये एक काझी व एक बारीद असे. बारीदची नेमणूक स्वतः अमीरच करी. या अधिकाऱ्याच्या कामात कोणी अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची धडगत नसे.[2]

---

१. टोळ्यांची संख्या पाच लाख होती असे इब्ने हॉकल म्हणतो. पण ही कदाचित अतिशयोक्ती असावी. पण 'सदाकत' (धर्मादाय कर) विषयीच्या नोंदीवरून नक्की आकडा समजू शकेल असेही तो म्हणतो.

२. गझनवी राजे आपल्या गुप्तहेर विभागाला खास महत्त्व देत. दंडात्मक कारवाईसाठी काढलेल्या मोहिमांचे नेते राजधानीशी नेहमी संपर्क ठेवीत. अमीराकडे रोजच्यारोज खलिते पाठविता यावेत यासाठी क्वचित प्रसंगी या मोहिमांबरोबर 'दिवान-इ-रिसालत' यासारखा एखादा प्रमुख मंत्रीही पाठविण्यात येई.

मुहम्मदाचा मुलगा मसूद याच्या कारकीर्दीत संबंध राज्याचे चार जिल्हे पाडले होते व प्रत्येक जिल्हा मुश्रिफाचे ( पर्यवेक्षक ) देखरेखीखाली दिला होता. गुप्तहेरांचा सर्वत्र संचार असे. राजघराण्याचे लोकही त्यांच्या पाळतीतून सुटत नसत.

समानिदांच्या काळातील करपद्धतींमध्ये फारस प्रांतात अस्तित्वात असलेली पद्धती वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. ससानियन काळापासून चालत आलेल्या पद्धतीचे महत्त्वाचे विशेष त्यात होते. त्याशिवाय इस्लामच्या प्रसाराबरोबर या पद्धतींत आणखी काही वैशिष्ट्ये आली. महसुलाच्या दृष्टीने फारसचे त्या काळात पाच कूरा पाडले होते. प्रत्येक कूरामध्ये त्या कूराचा कसबा ( बाजारपेठ ) व नाहिया ( वर उल्लेखिलेले चराईचे भाग असलेले जिल्हे ) यांचा समावेश असे.[1]

उत्पन्नाच्या साधनांमध्ये—कुर्दिश मेंढपाळ टोळ्यांशी सरकारी खजिन्याच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या करारानुसार मिळणारा कर, शेत जमिनींवरील खराज आणि इतर अनेक कर यांचा समावेश असे. या इतर करांमध्ये धर्मादाय कर, इराणी आखातांतील बंदरांत उतरणाऱ्या मालवाहू जहाजांच्या मालावरील कर, खाणींवरील कर, कुरणांवरील कर, बिगर मुस्लिम मुक्त नागरिकांवरील डोईकर, टांकसाळीचा नफा, खाजगी जमिनींवर उभारलेल्या चौक्यांवरील कर, सरकारी इमारतींचे भाडे, पाणी पट्टीचा आठवा भाग, मिठागरे व पाण्याच्या तलावांवरील कर यांचा समावेश असे.

खराजची आकारणी पुढील तीन पैकी एका पद्धतीने केली जाई: ( अ ) लागवडीखालील जमिनीच्या आधारे. ( आ ) पिकांची, संबंधितांना मान्य अशी विभागणी करण्याच्या पायावर. ( इ ) सरकारी खजिन्यांत जमिनीवरील कराची वार्षिक रक्कम भरण्याच्या पायावर—मग ताब्यात असलेली जमीन लागवडीखाली आणलेली असो की पडीत असो. यापैकी शेवटची पद्धत सुस्थिर झालेली होती. जमिनीचे क्षेत्रफळ आणि अनेक वर्षे त्या जमिनीत आलेल्या पिकांची किंमत या पायावर सरकारला द्यावयाची रक्कम ठरविण्यात येई.

फारस प्रांतात खराजची आकारणी पहिल्या पद्धतीने होई. झुमुम म्हणजे भटक्या कुर्दिश मेंढपाळ टोळ्यांनी लागवडीखाली आणलेल्या जमिनीचा फक्त अपवाद केला जाई. कुर्दिश टोळीवाले ठरलेली वार्षिक रक्कम किंवा पिकाचा भाग देत. क्षेत्रफळाच्या पायावर आकारलेल्या कराचे प्रमाण सर्वत्र सारखे नसे. त्यात फरक पडे व तो अजूनही पडतो.

---

१. अर्वाचीन इराणमध्ये विलायतची विभागणी 'बलुकां'मध्ये केलेली आहे. प्रत्येक 'बलुक'मध्ये अनेक खेड्यांचा ( 'कार्या किंवा दिह' ) समावेश होतो. प्रत्येक खेड्याला गाव प्रमुख ( 'केड खुदा' किंवा 'रिशी-इ-सफीद ) असतो. सरकारने मागणी केलेला कर देणे ही त्याची मुख्य जबाबदारी.

जमीनीला पाणीपुरवठा करण्याची पद्धती आणि जमिनींतील पीक यानुसार हा फरक पडतो. एका मोठ्या 'जरीब[1]' एवढ्या क्षेत्रफळाच्या जमिनीस नैसर्गिक ओढ्याचे पाणी मिळत असेल आणि त्यात गहू किंवा सातू लावलेला असेल तर १९० दिऱ्हाम एवढा कर द्यावा लागे. फळझाडे लावली तर १९२ दिऱ्हाम, खजूर किंवा काकडी लावली तर २३७$\frac{१}{२}$ दिऱ्हाम, कापूस लावल्यास २५६ दिऱ्हाम, ४ डांक आणि द्राक्षवेल लावल्यास १४२५ दिऱ्हाम एवढी रक्कम द्यावी लागे. हे दर राजधानी शिराजच्या आसपासच्या भागासाठी होते. कूरांमध्ये सर्वसाधारणपणे हे दर एक तृतियांशाने कमी होते. पावसाचे पाणी मिळणाऱ्या जमिनीवर नैसर्गिक ओढ्याचे पाणी मिळणाऱ्या जमिनीवरील कराच्या एकतृतियांश कर असे तर विहिरीच्या पाण्यावर कलिंगडे, काकड्या, हिरवा भाजीपाला काढणाऱ्या जमिनीवर तो दोन तृतियांश असे. ज्या जमिनींतून नदी किंवा नैसर्गिक ओढा वाहात असे, तिच्यावर एक चतुर्थांश जादा कर असे. तो अवांतर प्राप्ती म्हणून राजाकडे जाई.

अमीराच्या खाजगी जमिनींवरही कर होता. तो सरकारी खजिन्यात जमा होई. या जमिनींमध्ये काढलेल्या पिकांचा ठराविक हिस्सा मध्यवर्ती सरकारकडे जाई. 'मस्ताघल्लार' वर म्हणजे शहरी मालमत्तेवरही कर भरावा लागे. बाजाराची जागा, पिठाच्या गिरण्या, गुलाबपाण्याचे कारखाने यावरचा कर केंद्रीय खजिन्यात जमा होई. कररूपाने मिळणारा सर्व पैसा समानिद खलिफा आपल्या स्वतःसाठीच करीत नसत. सार्वजनिक संस्थांना देणग्या म्हणून त्यातील बरीच रक्कम खर्च होई. अमीर इस्माइलने खरेदी केलेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नाचा उपयोग बुखारा येथे प्रवाशांसाठी एक वसतिगृह बांधण्याकरिता व ते चालविण्याकरता करण्यात आला अशी आख्यायिका आहे. विद्यार्थ्यांचा खर्च, पैगंबरांचे जावई अली यांच्या वंशजांना मदत, राजधानीतील गरीबांना मदत यासाठी भरपूर देणग्या किंवा निधींची तरतूद केलेली असे.

समानिदांच्या काळात ट्रान्सऑक्सियाना व खुरासान[2] यांमध्ये करांचे प्रमाण कमी होते. तसेच शेतात पूर येई त्या वर्षी शेतकऱ्यांना पूर्ण कर माफी दिली जाई. पण शेतकऱ्यांवर खराज हाच काही एकमेव कर-बोजा होता असे नाही. राजदरबारने जी गावे

---

१. एक मोठा 'जरीब' = ३$\frac{३}{३}$ लहान जरीब

१ लहान 'जरीब' = ६० × ६० हात (राजाने ठरविलेले)

१ राजाने ठरविलेला हात = ९ 'कब्ज़ा' (कबडा म्हणजे बंद मूठ)

२. इब्ने हॉकल आपल्या एका ग्रंथात म्हणतो, मन्सूर इब्ने नुह याच्या काळात २ कोट दिऱ्हामपेक्षा जास्त करवसुली होत नसे. हा राजा आपल्या अधिकाऱ्यांना पगार व भत्ते मिळून प्रत्येक तिमाहीस किमान ५० लक्ष दिऱ्हाम देत असे.

दान म्हणून आपल्या मर्जीतल्या लोकांना दिली तेथील गावकऱ्यांवर नव्या मालकास द्यावयाच्या कराचा जबर बोजा पडे. बुखाराजवळच्या एका खेड्यात एक स्थानिक धंदा चांगला भरभराटीस आला होता. हे खेडे पूर्वी राजाच्या मालमत्तेचाच भाग होते. पण राजाने दरबारातील एका इसमास त्या खेड्याचे दान केले. त्यातून त्या व्यक्तीला दरवर्षी १० हजार दिऱ्हाम कर उत्पन्न मिळे. हा कर जबर होता. अनेक वर्षे तो सोसल्यावर रहिवाशांनी अमीर इस्माइल इब्ने अहमदकडे तक्रार केली. तंटा दीर्घ काळ चालू होता. अखेर आपणास एकदम १,७०००० दिऱ्हाम मिळाल्यास त्या खेड्यावरचा कर वसुलीचा हक्क सोडण्याचे त्या जमीनमालकाने मान्य केले.

फारसमध्ये करांचे प्रमाण जेव्हा वाजवीपेक्षा जास्त झाले· तेव्हा छोट्या जमीनमालकांनी आपल्या जमिनी इराकमधील सरदारांकडे सोपविल्या. हे सरदार त्या जमीनमालकांशी केलेल्या करारानुसार त्या जमिनीचे जवळजवळ मालकच बनले. आपल्या इच्छेप्रमाणे या जमिनी विकण्याचा किंवा मृत्युपत्राद्वारे त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार या सरदारांना मिळाला.

गझनवींच्या काळातील करासंबंधी फारसा तपशील उपलब्ध नाही. पण ते जबर होते हे पुढील गोष्टीवरून दिसून येईल. गझनीच्या मुहम्मदाचा मुलगा मसूद याच्या अमदानीत इस्पहानचा सुभेदार हा सुलतानाला दरवर्षी दोन लाख सुवर्ण दिनार रोख, स्थानिक कापडाचे १० हजार तुकडे आणि त्याशिवाय नवरोझ (नव वर्ष दिनाचा वसंत ऋतूंतील मेष-विषुव उत्सव ) आणि मिहरगान ( हिवाळ्यातील तुला-विषुव उत्सव ) या प्रसंगी होणाऱ्या मेजवान्यांचे वेळी बरेच नजराणे देत असे. राजा काही प्रसंगी खूष होऊन करात सूट देई. तिरमिधचे अमील व रईस यांनी एका विजयाबद्दल मसूदचे अभिनंदन केले तेव्हा त्याने करात अशी सूट जाहीर केली होती व ही सूट सर्व नागरिकांना सारख्या प्रमाणात मिळेल हेही स्पष्ट केले होते. मसूद मुख्यतः योद्धा होता. तो आपल्या प्रजाजनांकडे निव्वळ करदाते म्हणून पाहात असे. राजाला मौल्यवान भेटी देऊन त्याची मर्जी संपादण्यासाठी त्याचे प्रतिनिधी प्रजेची निर्दयपणे पिळवणूक करीत. एकदा बाल्खच्या लोकांनी मसूदच्या गैरहजेरीत कारखानी हल्लेखोरांचा हल्ला परतवून लावला तेव्हा तो चिडला व हे तुमचे काम नव्हे असे सांगून म्हणाला, "मी तुम्हाला दंड करणार आहे. शहरात बराच पैसा खर्च करून मी तुमच्यासाठी बाजार बांधला. त्याचा खर्च मी तुमच्याकडून भरून घेईन." वस्तुतः बाजारासाठी झालेला खर्च करांमधून किंवा भारतातील मोहिमांच्या लुटीतून केव्हाच भरून निघाला होता.

इराणच्या मुस्लिम राजवटीत करांचे प्रमाण विशिष्ट मर्यादेत बदलत गेले. पण उत्पन्नाचा बराच मोठा भाग नेहमी जमिनीवरच्या करांतूनच मिळत असे. सफावींच्या काळात सर्व जमीन तत्त्वतः 'मुलकी शाही' म्हणजे शहाची मालमत्ता असे. पण प्रत्यक्षात बरीच

जमीन फार प्राचीन काळापासून खाजगी मालकीची होती. [ म्हणूनच या जमिनींना 'अरबाबी' ( खाजगी मालकांची ) असे म्हटले जाई ] सफावी शहा तहमास्प हा शेतकी उत्पन्नाच्या तसेच चराई जमिनीच्या किंमतीच्या एकपंचमांशाइतका भाग कर म्हणून घेई. तसेच मेंढ्या व गुरांवर त्याने कर बसविला होता. हा कर शहा अब्बासने रद्द केला. त्याने रमजानच्या महिन्यात शियांवरील सर्व कर रद्द केले. तसेच सर्व मुस्लिमांना 'अहदात'ची ( कुराण किंवा शारमध्ये नसलेले नवे कर ) सूट दिली. त्याच्यामागून आलेल्या शहा शफीने गुरे व मेंढ्यांवर पुन्हा कर बसविले. गुरांना पाणी पाजण्याच्या व चराईच्या सोयींबद्दल दरसाल हे कर घेतले जात. ( त्यांना अनुक्रमे आब-खुरी व अलफ-खुरी असे म्हणत. ) हे स्थानिक कर काही जिल्ह्यांत अजूनही वसूल केले जातात. गुरांच्या विक्रीवर कर, रस्ते व पुलांवरील जकात कर, प्रवाशांच्या धर्मशाळेचे भाडे, नदीतील मासेमारी, स्नानगृहे व वस्तुभांडारे, सार्वजनिक कुंटणखाने, नेफ्ताचे ( बासलेट ) झरे यावरील करांपासूनही आणखी उत्पन्न मिळविले जाई. ज्या लेखकाने ही माहिती दिली आहे तो म्हणतो, "कारंजांतून येणारे पाणीसुद्धा शहा विकत असे. राजधानी इस्पहानमधील एकट्या झिंदारत नदीपासून तो वर्षाकाठी १६ हजार क्राउनइतकी रक्कम मिळवी. इराणमध्ये आर्मेनियन खिश्चनांची संख्या मोठी आहे; ते वर्षाला दर माणशी दोन क्राऊन डोईकर देआत."

पेरे द मान्स याने १६६० मध्ये लिहिले आहे की, प्रत्येक विभागात कर गोळा करणारा एक ( मक्तेदार ) शेतकरी असे. सर्व सरकारी जमीन त्याच्या हाती असे. गावकरी त्याच्याकडून मिळेल तेवढी जमीन खंडाने घेत आणि त्या बदला जमिनीचे पन्नास टक्के ते दोन तृतियांश उत्पन्न राजाच्या खजिन्यात जमा होई.

करआकारणीची ही पद्धती काही थोडे बदल सोडता अगदी अलीकडच्या काळापर्यंत चालू होती. सरकारी जमिनीचा ( खालसा ) बराच भाग व्यक्तींना भाडे-पद्धतीने दिला जाई. त्याबद्दल त्या व्यक्ती पिकाचा काही टक्के भाग किंवा रोकड रक्कम देत. खाजगी मालकीच्या जमिनींची ( अरबाबी ) सरकारीरीत्या आकारणी करण्यात आलेली असेल तर त्या जमिनीच्या मालकाला त्याच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा कर म्हणून द्यावा लागे. तसे नसेल तर परंपरागत हिशेबानुसार हा कर आकारला जाई. त्याचा तपशील स्थानिक मुस्तावफीच्या किंवा जिल्हा खजिनदाराच्या पुस्तकांत लिहिलेला असे. हा अधिकारी ही पुस्तके म्हणजे जणू आपले भांडवल व पुष्कळ अंशी आपली मालमत्ताच मानी. हा कर सर्वसाधारणपणे प्रांतिक सुभेदार किंवा टोळ्यांचे प्रमुख[१] गोळा करीत.

---

१. इराणमधील महसूल पद्धती व तिचा इतिहास यांच्या विस्तृत आढाव्यासाठी पहा : A. K. S. Lambton, 'Landlord and Peasant in Persia' ( Oxford, 1953 )

यानंतरचा दुसरा लक्ष वेधून घेणारा देश म्हणजे इजिप्त. फातिमींच्या काळात पूर्वेकडील खिलाफतीपासून इजिप्त पूर्ण स्वतंत्र झाला. खलिफा मुइझ्झ ( ९५२–७५ ) चा एक सेनानी जोहर याने ९६९ मध्ये कैरोची स्थापना केल्यानंतर दोन शतके सीरियाची सत्ता फातिमींकडे होती. इतर इस्लामी राजांप्रमाणे फातिमींनी स्वतःच्या हाती नियंत्रण ठेवून कारभाराचा तपशील मंत्री व दिवानांकडे सोपविला होता. यापैकी काही मंत्री राजप्रासादाचा तर काही राज्याचा कारभार पहात. राज्यात खलिफाच्या खालोखाल वझीराला महत्त्वाचे स्थान होते. सर्व मुलकी कारभाराचा आणि अर्थव्यवस्थेचा तो प्रमुख असे. खलिफा मुस्तानसिरच्या काळापर्यंत दिवानपद मुलकी अधिकाऱ्याकडे (लेखणीप्रमुख) असे. खलिफा मुस्तानसिरने ४६७ / १०७४–७५ मध्ये बद्र अल् जमाली याला दिवान नेमले. तो सेनेचा त्याचप्रमाणे मुलकी कारभाराचा प्रमुख होता. मुख्य काझीसारख्या मोठ्या अधिकाऱ्याच्या नेमणुका तो करी. तेव्हापासून वझीर सर्वसाधारणपणे लष्करी पेशातील असे व त्याला वझीराच्या ऐवजी अमीर अल् जुयूष (सेनाप्रमुख) अशी पदवी असे. फातिमींच्याच काळातील नंतरच्या वझीरांना इतर पदव्यांच्या जोडीला 'मलिक' ( शब्दशः अर्थ राजा ) ही पदवी होती. अल् हाफीजचा वझीर म्हणून रिद्वान इब्ने वालाखशी याची नेमणूक ५३० / ११३६ मध्ये झाली तेव्हा त्याला 'अल् सय्यद अल् मजाब अल् मलिक अल् अफजल (अत्यंत पराक्रमी राजा, उत्कृष्ट राजा)' अशा पदव्या मिळाल्या होत्या.

प्रत्यक्षात मात्र वझीर किंवा अमीर अल् जुयूषला असलेले अधिकार त्याच्या या भव्य पदव्यांशी नेहमीच जुळते नसत. मुस्तानसिरच्या काळात अनेक वझीरांना एकामागून एक असे थोड्या थोड्या अंतराने बडतर्फ करण्यात आल्याने, त्या पदाची सत्ता कमी झाली होती. अली हाफिजच्या कारकीर्दीनंतर असा काही काळ गेला की त्या काळात कोणी वझीरच नव्हता. राज्याचा कारभार स्वतः खलिफा किंवा गादीचा वारस असलेल्या आपल्या मुलामार्फत पाही. कार्यक्षम मंत्री शोधण्याच्या प्रयत्नात त्याने एकदा एका खिश्चनाला दिवान नेमले होते. पण दंगल करून जमावाने त्याला पदच्युत केले. अल् जहीर पूर्वीच्या एका राजाने एकदा मुख्य काझीची वझीर म्हणून नेमणूक केली होती. अब्बासींच्या काळात अशी नेमणूक क्वचितच केली जाई. या मंत्र्याचे नाव अबु मुहम्मद होते. न्यायालयविषयक तसेच मंत्रिपदासंबंधींच्या अशा दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्याची त्याला परवानगी होती. सय्यद अल् वझारा (वझीरांचा प्रमुख) अशी पदवी त्याला देण्यात आली होती.

वझीरपद कोणत्या टप्प्यांनी मिळत असे यासंबंधींचा उल्लेख अल् जहीरच्या दोन मंत्र्यांच्या वृत्तांतात केला आहे. हे दोन्ही मंत्री न्यायालयाचे (दिवान–अल्–इन्शा) प्रमुख होते. त्यापैकी एक शुर्ताचा कप्तान होता. शुर्ता हेच राजाचे शरीर रक्षक तसेच राजधानीतील पोलिसदल म्हणून काम करी.

वझीराच्या खालोखाल महत्त्व मुख्य खाजगी कारभारी किंवा साहिब अल् राब (राजप्रासादाच्या प्रवेशद्वाराचा प्रमुख अधिकारी) याला होते. काही वेळा त्याला कनिष्ठ वझीर असेही म्हणण्यात येई. सर्वसाधारणपणे त्याला राजप्रासादाच्या अधिकाऱ्याचे काम करावे लागे. खलिफापुढे परराष्ट्र वकिलांना भेटीस नेण्याचा त्याला अधिकार होता. चौदाव्या शतकातील न्यायालयाचा एक अधिकारी कलकशादी याने त्याच्या काळातील व त्याच्या पूर्वीच्या काळातील इजिप्तमधील सरकारी अधिकाऱ्यांसंबंधीचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. त्यात वझीर व साहिब अल् राब हे अधिकारी तलवारबहाद्दरांच्या वर्गातील असत असे म्हटले आहे.

इतर मुलकी अधिकाऱ्यांपैकी मुख्य काझी हा महत्त्वाचा अधिकारी होय. तो केवळ न्यायालयाचा प्रमुखच नव्हे तर टांकसाळीचाही पर्यवेक्षक असे. या खालोखाल कनिष्ठ दर्जाचा अधिकारी म्हणजे दाइ अल् दुआत म्हणजे मुख्य प्रचारक. कायदा व धर्मतत्त्वांसंबंधीच्या प्रश्नांना उत्तरे देणे हे त्याचे काम होते. कुराणातील कठीण परिच्छेद तो विशद करून सांगे. दार अल् इल्म विभागाचे अध्यक्षस्थान त्याच्याकडे असे. ग्रंथालय, विद्यापीठ, नोंदणी कचेरी, माहिती विभाग दार अल् इल्ममध्ये एकत्रित झालेले होते. याशिवाय ऐवान अल् कबीर या मोठ्या सभागृहात धर्मश्रद्ध पुरुषांच्या आणि मजलिस अल् दाह मध्ये स्त्रियांच्या सभा होत. प्रचारक म्हणून दाइ अल् दुआत हाच या सभांना जात असे. बानू अब्दल् कावी याच्या घराण्यात हे पद वंशपरंपरागत होते. या पदावरील त्या घराण्यांतील शेवटची व्यक्ती मुख्य काझीही होती.

राज्यात सत्ता कोणाची हे नेहमी त्या त्या राजाच्या व्यक्तिमत्त्वावर ठरे. बिकट काळात सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या हातीच सत्ता असे असे नाही. खलिफा अल् जहीरच्या कारकीर्दीत तीव्र दुष्काळ पडला होता आणि ४१५ / १०२४ साली तर दुष्काळाने परिसीमा गाठल्याने राज्यकारभारात अत्यंत गोंधळ निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला होता (कारण खलिफा स्वतःच्याच सुखचैनीत दंग होता). अशा वेळी काळ्या हिजड्या मिदादने (खलिफाने त्याला काइद किंवा शाही फौजांचा सेनानी नेमले होते) स्वतःच्या हिमतीवर सरकार चालविण्याचा निर्धार केला. आणखी तीन मुलकी अधिकाऱ्यांना त्याने मदतनीस म्हणून बोलाविले. आपल्या चौघांशिवाय आणखी कोणा अधिकाऱ्यास खलिफाच्या भेटीस जाऊ द्यावयाचे नाही असे त्यांनी आपसांत ठरविले. यापूर्वी बडे अधिकारी दर वीस दिवसांनी खलिफाची भेट घेत. असे चार अधिकारी होते : साहिब अल् मिझल्ला (लष्करी अधिकारी व राजछत्र-धारक), साहिब अल् इन्शा (न्यायालयाचा प्रमुख), दाइ अल् दुआत (मुख्य प्रचारक) आणि नकीब नकबा अल् तालिबीयिन (अली घराण्याचा प्रवक्ता व मुख्य प्रतिनिधी). पुढे अशांततेच्या काळात हे अधिकारी मागे पडले.

मंत्रालयांपैकी मजलिस या दिवानाचे मुख्य काम राजघराण्याच्या तनख्यांचा, तसेच

दिवाणी देणग्यांचा हिशेब ठेवणे हे असे. पारंपरिक प्रथेनुसार ठराविक वेळी राजा देत असलेल्या देणग्या, राजघराण्यातील व्यक्तींना तसेच आश्रितांना मिळणारे सर्व भत्ते यांचा हिशेब हे दिवान ठेवी. तसेच दरसाल निश्चित प्रमाणात सरकारी खजिन्यात जमिनीचे उत्पन्न भरण्याच्या अटीवर दिल्या जाणाऱ्या जमिनींची ( इक्तात ) नोंद हेच दिवान ठेवी.

बेत अल् मालची निरनिराळी खाती दिवान अल् नजरच्या ( पर्यवेक्षण खाते ) नियंत्रणाखाली असत. दुय्यम अधिकाऱ्यांना नेमण्याचा व बडतर्फ करण्याचा अधिकार या खात्याच्या संचालकास असे आणि हा संचालक फक्त खलिफा आणि वझीर यांना जबाबदार असे. आपल्या खात्याच्या कामासंबंधीची कागदपत्रे व अहवाल ते मागतील त्यावेळी तो पाठवी. वकील, व्हाइसरॉय व इतर राजप्रतिनिधीही प्रथम या अधिकाऱ्याशी संपर्क साधीत.

राज्यामध्ये आणखी एक अर्थखाते होते. दिवान अल् जैशवाल-रवातिब ( लष्कर व लष्कराच्या पगाराचा विभाग ) असे त्याचे नाव होते. नावावरून लक्षात येते त्याप्रमाणे ते मुख्यतः लष्कराचे पगार देणारे खाते होते. सर्व हजेरीपत्रके त्याच्या नियंत्रणाखाली असत. प्रत्यक्ष लष्करी नोकरीवर असलेल्या सर्वांची त्यात नोंद करण्यात येई. जे काही कारणाने लष्कर सोडून गेले असतील, त्यांचीही नोंद केलेली असे. लष्कराला लागणारी सामग्री व पदके हे खाते मागवी. तसेच लष्करी जहागिऱ्यांची नोंद ते ठेवी. तसेच लष्करी कारणासाठी तरतूद केलेल्या निधीतून ज्या स्त्री-पुरुषांना पगार दिला जाई त्यांचीही नोंद केली जाई. निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या पगाराचा उल्लेख आढळतो. वझीरास दरमहा ५००० दिनार मिळत असल्याही नोंद आहे, तर राजवाड्याचा संचालक, खजिनदार, राजछत्रधारी वगैरे त्यापेक्षा कमी महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना फक्त १०० दिनार मिळत.

आपला उद्देश साध्य होत असे तेव्हा मुस्लिमेतरांची नेमणूक करण्यासही फातिमी खलिफ कचरत नसत. दिवान अल् इन्शामध्ये ( न्यायालय ) ज्यू व खिश्चन अधिकारीही नेमले होते. अल् अजीज ( ९७५-९६ ) या खलिफाने मानासेह नावाच्या ज्यूला सीरियाचा सुभेदार नेमले होते. पण इजिप्तच्या मुस्लिमांचा रोष झाल्याने त्याला ती नेमणूक मागे घेणे भाग पडले.

राज्यकारभारासाठी देशाचे चार विभाग पाडले होते. कुसा ( उत्तर इजिप्त ) हा या चार विभागांतील प्रमुख विभाग होता. शरकीया ( पूर्व ), घरबीया ( पश्चिम ) आणि अलेक्झांड्रिया. मक्ता पद्धतीने कर गोळा करण्यात येई. असे सांगतात की, आपली राजधानी कैरो येथे नेल्यानंतर एक वर्षाने मुइझ याने दोन अधिकाऱ्यांची नेमणूक केली–याकुब

इब्ने किलीस आणि असलूज इब्ने हसन. राज्याच्या महसूलाला ते जबाबदार होते. खाजगी जमिनी आणि इतर प्रकारच्या मालमत्तेवरील कराच्या वसुलीची ते ठेके ( कबालात ) मागवीत व जी व्यक्ती पुरेशा रकमेचा आगाऊ भरणा करण्याची हमी देई तिला ठेका दिला जाई. काही सार्वजनिक जमिनी-सर्वसाधारणपणे [मावात ( मृत )–म्हणजे निरुपयोगी व लागवडीस न आणलेल्या जमिनी–लष्करी निधिसाठी किंवा सार्वजनिक खर्चाच्या इतर बाबींसाठी देणगी म्हणून दिल्या जात. या संदर्भात असेही सांगता येईल की काळाच्या ओघात ज्या मौल्यवान खाजगी जमिनी या किंवा त्या कारणाने सरकारजमा झाल्या त्या लष्करी जमिनी म्हणून मावातमध्ये समाविष्ट करण्यात आल्या. याचा परिणाम असा झाला की माक्रिझीच्या काळापर्यंत बरीच जमीन सुलतान किंवा त्याच्या लष्करी सेनानीच्या मालकीची झाली. स्वतंत्र शेतकरी लष्करी जहागिरदारांचे जमिनीस बांधलेला दास झाल्याने जमिनीचे व सरकारी खजिन्याचेही उत्पन्न कमी झाले. कारण आपल्याला पुरेसे मिळत आहे तोपर्यंत हे जहागिरदार जमिनीचे काय चालले आहे याकडे फारसे लक्ष देत नसत.

इजिप्तमधील उत्पन्नाचा बराच भाग अनुषंगिक करांतून ( अहदात किंवा मुकूस )[1] मिळे. पण इस्लामी साम्राज्यांतील प्रदेशांप्रमाणेच इजिप्तमधील या करांचा कायदेशीरपणा विवादास्पद होता.[2] हे कर रद्द करणे हे जणू एक धर्मकृत्य आहे असे धार्मिक वृत्तीच्या राजांना वाटे. मध्यवर्ती सरकार हे कर एक तर आयात व निर्यात व्यापारावर बसवीत असे किंवा मालाच्या विक्रीपासून झालेल्या फायद्यावर किंवा बाजारात विक्रीसाठी आणलेल्या मालावर नगरपालिकांकडून ते बसविले जात. सुलतान सलादिनच्या काळात इजिप्तला भेट दिलेला प्रवासी इब्ने जुबेर म्हणतो की, देशात प्रवेश करणाऱ्या सर्व मुस्लिमांकडून जकात (डोईकर) घेतला जात असे. त्यांच्याजवळ असलेला एकूण माल व पैसा यांच्या काही टक्के प्रमाणात ही जकात असे. या जकातीचे उत्पन्न सुलतानाला मिळत नसे, तर ते अधिकाऱ्यांच्या खिशात जाई. फातिमींच्या काळात रूढ असलेल्या अहदात करांमध्ये औषधे, मसाल्याचे पदार्थ, इतर माल, कापूस, इमारती लाकूड, मीठ, चटया, मालाची आयात किंवा वाहतूक करणारे काफिले यांच्यावरील कर यांचा समावेश होत असे. साखर कारखाने, पीठ गिरण्या, कत्तलखाने तसेच बाजार, गरम पाण्याची स्नानगृहे यांसारख्या सार्वजनिक उपयोगाच्या इमारतींवरील कराचाही त्यात समावेश असे. सलादिनने हे कर रद्द केले. परिणामी मुस्लिम नागरिक कुराणात सांगितलेल्या दानकरांशिवाय अन्य कोणताही कर त्यावेळी देत नव्हता असे अलेक्झांड्रिया येथे इब्ने

---

१. वर्षाकाठी ःयेणाऱ्या पिकावरील खराज करापेक्षा भिन्न अशा या करांना ' हिलाली 'कर ( ' मासिक ' कर ) म्हणत.

२. ' मुकूस 'कर वसूल करणाऱ्या म्हणजे ' मक्कास ' अधिकाऱ्याविषयी जनतेला सदैव तिटकारा वाटे.

जुबेरला आढळून आले. कुराणातल्या या दानकरातलाही फक्त तीन अष्टमांश भाग सरकारला प्रत्यक्षात मिळे, बाकीचा भाग नागरिकोपयोगी अवक्फ व धर्मादाय निधीत जमा होई.[१] नागरिकांना मिळालेली ही सूट सलादिनच्या कारकीर्दीपर्यंतच टिकली. त्याच्या मुलाने व वारसाने हे कर पुन्हा बसविले, एवढेच नव्हे तर त्यांचे प्रमाण वाढविले.

उत्पन्नाच्या अधिक कायम स्वरूपाच्या व यापूर्वी उल्लेख न केलेल्या साधनांमध्ये निरनिराळ्या मक्तेदाऱ्या, मृत्युकर ( किंवा सरकारजमा मालमत्तेवरील कर ), जहाजे व पुलांवरील कर, टांकसाळीमुळे होणारा फायदा व तपासणी कचेरीची फी यांचा समावेश असे. शारीरिकदृष्ट्या अपंग नसलेल्या, प्रत्येक स्वतंत्र मुस्लिमाकडून जकात कर घेतला जाई. प्रत्येक मुस्लिमाचे आर्थिक भांडवल, गुरे, बागा, व फलोद्यानातील फळे यांच्यावर हा कर आकारला जाई. आर्थिक भांडवलात सुवर्ण नाणी, रोखे किंवा व्यापारी माल यांचा समावेश केला जाई.[२] मुस्लिमेतर व्यक्ती स्वतंत्र आणि पूर्ण वयाच्या असतील तर त्यांना 'जिझिया' कर द्यावा लागे. स्त्रिया, मुले, गुलाम किंवा वेडे यांना मात्र हा कर द्यावा लागत नसे. जराग्रस्त वृद्ध आणि भिक्षू यांना हा कर लागू करावयाचा की नाही याबद्दल वाद होता. सलादिनच्या काळात करदात्याच्या संपत्तीनुसार वरचा, मधयम व खालचा दर अशा वर्गवारीने हा कर आकारण्यात येई. वरचा दर $४\frac{१}{६}$ दिनार, मधला दर $२\frac{१}{१२}$ आणि खालचा "एक दिनार एक तृतियांश आणि एक चतुर्थांश व दोन ग्रेन" म्हणजे दीड दिनारपेक्षा थोडा कमी असे. हा कर वर्षातून एकदा मोहरमच्या महिन्यातील पहिल्या तिथीला (शुक्ल प्रतिपदेला) द्यावयाचा असे. उत्तर इजिप्त व आस्वानमध्ये आर्मेनियनांनी जिझिया कर देणारांचा एक खास वर्गच तयार केला होता. हा वर्ग दर माणशी १ दिनार व २ किरात कर देत असे. पण कोणत्याही अधिकाऱ्यास सुलतानाच्या खास परवानगीशिवाय हा कर मागण्याची मोकळीक नसे. जिझिया कर देणारी व्यक्ती तिच्या शहरात किंवा खेड्यात दीर्घकाळापासून राहात नसेल, पण त्या ठिकाणी तिच्या मालकीचे एखादे घर असेल तर त्या घराच्या भाड्यातून कर कापून घेतला जाई. पण या प्रश्नाचा निर्णय जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्याने घ्यावयाचा असे.

फातिमी राजवट चांगली सुस्थिर झाल्यानंतर इजिप्त, सीरिया आणि आशिया

---

१. शहरांत मोठ्या संख्येने राहणाऱ्या ज्यू व ख्रिश्चन यांना कर द्यावा.

२. किमान २० मिथकाल एवढ्या किंमतीचे सोने करपात्र समजले जाई आणि त्यावर $\frac{१}{२}$ मिथकाल कर मिळे. अधिक किंमतीच्या सोन्यावर अधिक कर घेतला जाई. २०० दिऱ्हामपेक्षा कमी रकमेच्या रोख्यांवर कर नसे. २०० दिऱ्हाम किंमतीच्या रोख्यांवर ५ दिऱ्हाम आणि त्याच प्रमाणात पुढील रकमेच्या रोख्यांवर कर द्यावा लागे. परत विक्रीसाठी आणलेल्या मालाच्या किंमतीवर याच प्रमाणात कर आकारला जाई.

मायनरच्या सीमेस लागून असलेला प्रदेश या तीन मुख्य विभागांसाठी सुभेदार नेमण्यात आले. मुइझ इजिप्तकडे जाताच पश्चिमेकडचा मघरिब प्रांत आक्रमकांनी बळकावला होता. दुय्यम दर्जाच्या प्रांतांच्या कारभाराची केंद्र सरकार मधूनमधून तपासणी करीत असले तरी तेथील कारभार बऱ्याच अंशी स्थानिक अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे पुढाकार घेऊन करता येत असे. इफ्रिकीया सोडून खलिफा मुइझ इजिप्तमधील आपल्या नव्या प्रदेशाकडे रवाना झाला तेव्हा त्याने जाफर इब्ने अली याला प्रतिनिधी म्हणून मागे ठेवण्याचे ठरविले. त्यावेळी जाफरशी झालेल्या त्याच्या मुलाखतीची जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून वरील मुद्दा अधिक स्पष्ट होतो. जाफर याला प्रतिनिधी म्हणून नेमण्याच्या खलिफाच्या सूचनेस जाफरने पुढील उत्तर दिले : "तुमच्या एखाद्या मुलास किंवा भावास मागे ठेवा. तो राजवाड्यात बसेल व मी कारभार पाहीन, आणि पैशाबद्दल मला प्रश्न करू नका; कारण मी जेवढा खर्च करीन तेवढ्याच रकमेचा कर बसवीन. तसेच एखादी गोष्ट मला साधावयाची असेल तर तुमच्या हुकमाची वाट न पाहता मी ती साध्य करीन. कारण इजिप्त व मघरिबमध्ये फार मोठे अंतर आहे. न्यायमूर्ती व महसूल खात्याचा (खराज) प्रमुख या नेमणुका माझ्या हाती असल्या पाहिजेत." मुइझने संतापाने या अटी फेटाळून लावल्या आणि बर्बर अल् सनहाजीची नेमणूक करून कार्यक्षम कारभाराच्या दृष्टीने आवश्यक तेवढे नियंत्रण त्याच्यावर ठेवले.

इजिप्तमध्ये फातिमींच्या व त्यांच्या नंतरच्या राजांच्या काळात नेमलेल्या दुय्यम महसूल अधिकाऱ्यांची संख्या तुलनात्मक दृष्ट्या बरीच होती. नाझीर (पर्यवेक्षक) पासून ते मुतावल्ली अल् दिवान (जिल्हा दिवानचा प्रमुख अधिकारी) आणि खाली कारकून व कोटनीसापर्यंत सर्व श्रेणींचे नोकर त्यांत असत. नाझीर हा मुख्य प्रांतिक अधिकारी. मुतावल्लीचे हिशेब तपासणे हे त्याचे मुख्य काम. त्याच्याकडे किंवा मुश्रिफ (इन्स्पेक्टर)कडे आपल्या खात्याच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या मुख्य बाबींची नोंद ठेवण्याचे काम सोपविलेले असे. काही अटींवर त्याची नेमणूक केली जाई. या अटी पुढीलप्रमाणे असत : (अ) महसूलाचे पैसे जमा होतील तसतसे ते त्याने पाठविले पाहिजेत (याला इमान म्हणत). (आ) पूर्वीच्या अधिकाऱ्यापेक्षा अधिक उत्पन्न मिळवून देण्याचे त्याने अभिवचन दिले पाहिजे (बधल) किंवा (इ) विशिष्ट रक्कम आपण निश्चितपणे जमा करू असे त्याने स्वतःला बांधून घेतले पाहिजे (याला दमान म्हणत).

करवसुलीच्या तपशिलाची नोंद करण्याचे काम 'अमील'कडे किंवा काही वेळा मुतावल्लीकडे असे. तो नाझीर आणि मुश्रिफला जबाबदार असे. हे कंटाळवाणे व किचकट काम त्यालाच करावे लागे.

सलादिन व त्यानंतरच्या अय्युबींनी ५६४/११६९ ते ६५०/१२५२ या काळात तुलनात्मकदृष्ट्या कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कारभार केला. परंतु मामलुक सुलता-

नांच्या काळात कारभारपद्धतीचा बराच विस्तार करण्यात आला आणि कारभाराची काळजीपूर्वक उभारणी करण्यात आली. सुरुवातीच्या काळातील मामलुकांचे[1] शिक्षण सैनिकी पेशाचे होते. त्यामुळे त्यांनी राज्याचे लष्करीकरण करून टाकले. फातिमींच्या काळातच ही प्रवृत्ती काही प्रमाणात दिसू लागली होती. त्या राजघराण्यांतील नंतरच्या राजांनी राज्यकारभारप्रमुख म्हणून बहुदा सैनिकांचीच नेमणूक केली. अनेक मामलुकांच्या काळात राज्याचा मुख्य अधिकारी नायब अल् काफिल (उपसर्वाधिकारी) हा असे. त्याला अत्यंत व्यापक अधिकार असत. तो लष्करप्रमुख असल्याने सेनानींच्या नेमणुका वगळता नित्याच्या सर्व बाबी तो स्वतः पुढाकार घेऊन करीत असे. या बाबतीत सुलतानाला त्याला विचारावे लागत नसे. सुलतानाने करावयाची अनेक मुलकी कामेही तोच पार पाडी. अगदी वरच्या श्रेणीचे अधिकारी सोडून बाकी सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका तोच करी. त्याच्या पसंतीशिवाय एकही नेमणूक केली जात नसे. वझीराला महत्त्व असले तरी, त्याचा दर्जा या काळात बराच कमी झालेला होता. वझीर सैनिकी किंवा मुलकी यांपैकी कोणत्याही वर्गातला असला तरी तो नायब अल् काफिलपेक्षा कनिष्ठ समजला जाई. नायब हाच " प्रतिसुलतान होता. " सुलतानाच्या सीरियांतील नायबपेक्षा (प्रतिनिधी) हा नायब वेगळा आहे असे दर्शविण्यासाठी 'काफिल अल् मामलाकाती अल् शरीफाती अल् इस्लामीयती '[2] ही पदवी त्याला देण्यात आली होती. हे अधिकारपद नेहमीच अस्तित्वात होते असे नाही. सुलतान अल् नासिर इब्ने कलायुनने ते पद वझीरपदाबरोबरच रद्द केले. (७३७/१३३६–७). पण पुढील सुलतानांच्या कारकीर्दीत ते पुन्हा स्थापन करण्यात आले. त्यानंतर मधुनमधून अनेकदा हे अधिकारपद रद्द करण्यात आले व अल् नासिर फराज इब्ने बरकूकच्या काळात ते कायमचे रद्द झाले.

हाजिब अल् हुज्जाब (खाजगी मुख्य कारभारी) हा अधिकारी त्या खालोखाल महत्त्वाचा होता. अमीर व लष्करी अधिकारी जनतेशी न्यायाने व आदराने वागत आहेत की नाही हे पहाणे हे त्याचे काम होते. बढत्यांचे हुकूम देताना किंवा सेनेची जमवाजमव करताना त्याचा शब्द मानला जाई. नायबच्या अनुपस्थितीत या बाबतीत त्याचाच अधिकार सर्वश्रेष्ठ असे. 'शार' संबंधित प्रश्नांचे बाबतीत अधिकार गाजविण्यास त्याला तात्त्विकदृष्ट्या मनाई केलेली होती. लष्करी तंटे व लष्करी जहागिऱ्यांचे प्रश्न त्याच्या अधिकारकक्षेत येत. 'हाजिब'च्या अधिकारांवर घातलेली ही मर्यादा प्रत्यक्षात कधीच अंमलात आली नाही आणि त्याच्या कामांचे वर्णन करताना इतिहासकार माक्रिझीने ज्या स्वरूपाची तक्रार केली आहे तशी तक्रार दुसऱ्या इतिहासकाराने क्वचितच केलेली आढळते. माक्रिझीला काझीबद्दल संशय असे. माक्रिझी म्हणतो, पूर्वी एखाद्या

---

१. 'मामुलक ' या नावाचा अर्थ " अंकित ". साधारणपणे गोऱ्या, तुर्की किंवा सिरकॅसियन गुलामासाठी हा शब्द वापरला जाई.

२. 'महान इस्लामी राज्याचा पूर्णाधिकारी.'

मुलकी अधिकाऱ्याने ( करमक्तेदाराने ) हाजिबच्या अधिकारकक्षेतून निघून काझीकडे आसरा घेतला तर काझीच्या संरक्षणाखालून त्याला हलविता येत नसे. पण आज लहान-मोठा प्रत्येकजण हाजिबच्या अधिकारक्षेत्राखाली आहे; मग त्याला ' शार ' लागू असो किंवा राजकीय कायदा लागू असो. हाजिबच्या अधिकारांतून कोणत्याही गुन्हेगारास आपल्या संरक्षणाखाली घेण्याचे धैर्य आता कोणत्याही काझीस होणार नाही. असे असले तरी हाजिबच्या कोणीही प्रतिनिधीने मग तो खालच्या दर्जाचा असला आणि त्याचे इतरांशी बेकायदा कामाच्या बाबतीत संबंध असले तरी तो कोणाही आरोपीस काझीच्या अधिकारकक्षेतून आपल्या अधिकार कक्षेत घेऊ शकतो आणि आपल्या अधिकारात त्याला मारहाण किंवा दंडाची शिक्षा करतो. त्याला याबद्दल कोणी जाब विचारू शकत नाही असे माक्रिझीने म्हटले आहे. ज्याला ' राजकीय कायदा ' म्हणत तो म्हणजे मुख्यतः मुख्य खाजगी कारभाऱ्याने केलेले नियम हाच होता. हा ' सैतानी ' शब्द-प्रयोग कसा प्रचारात आला याचे मूळ आपल्यापैकी बहुसंख्य लोकांना माहीत नाही तरी त्याचा उपयोग सहजपणे करून हे लोक म्हणतात, " हा विषय ' शारी ' कायद्याशी संबंधित नसून तो राजकीय कायद्याच्या कक्षेत येतो. हे लोक ही साधी बाब समजतात पण देवाच्या दृष्टीने ती गंभीर घटना आहे. "

मामलुक कारभार पद्धती किती परिश्रमपूर्वक तयार करण्यात आलेली होती याची कल्पना पंधराव्या शतकातील कैरोचा जो वृत्तांत इतिहासकार इब्ने ताबरी ब्राडी याने लिहून ठेवला आहे त्यावरून येईल. सुलतान अल् मलिक अल् नासिर फराज याच्या कारकीर्दीचे वर्णन करताना त्याने प्रथम त्यावेळच्या ( ८०१ / १३९८–९ ) अधिकाऱ्यांची यादी दिली आहे. प्रथम चार मजहबांचे चार प्रमुख काझी, नंतर लष्कराचा अता बेग ( अमीर अल् कबीर म्हणजे सरसेनानी ), अमीर सिलाह ( मुख्य दारूगोळा अधिकारी ), अमीर मजलिस ( प्रेक्षककक्षेचा प्रमुख ), अमीर आखुर अल् कबीर ( राजाच्या अश्वशाळेचा प्रमुख ), हबीब अल् हुज्जाब ( मुख्य खाजगी अधिकारी ), रास नौबत अल् नबाब ( मुख्य रक्षक दलाचा कप्तान ) [ दवादार अल् कबीर, प्रमुख कारकून– सुलतान मलिक अल् जहीरचा पुतण्या बेबर्स हा या अधिकारपदावर होता. ] खजानादार, शाद्द ( मद्यगृहाचा नियंत्रक ), उस्तदार ( राजघराण्याचा सचिव ), कातिब अल् सिर्र ( खाजगी चिटणीस ), वझीर, नाझिर अल् जेयश वा अल् खास ( लष्कर आणि खाजगी जमिनींची देखरेख करणारा अधिकारी ), कैरोचा मुहतासिब व शेवटचा अधिकारी म्हणजे वाली किंवा पोलिस सुपरिंटेंडेंट. [१]

कलकशादीने अनेक दुय्यम अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे. यांपैकी बहुतेक

---

१. येथे उल्लेखिलेल्या अनेक पदव्या मूळ फारसी असलेल्या पण तुर्की भाषेतून आल्या आहेत. मामुलकांची मातृभाषा तुर्की होती.

महसूल खात्यात नोकरीस होते. माक्रिझी म्हणतो, असे एकही लहानमोठे खेडे नव्हते की जेथे अनेक कारकून, मुकादम व त्यासारखे नोकर नव्हते. त्यांपैकी अनेक इजिप्शियन खिश्चन होते. शेतकऱ्यांच्या जीवावरच ते जगत. शेतकऱ्यांवरील अनेक करांचे उत्पन्न आपल्या खिशांत टाकीत. सुलतान नासिर मुहम्मद इब्ने कलाउन याने ७१५।१३१५-१६ साली अनेक बेकायदा मुकूस कर व मक्तेदाऱ्या रद्द केल्या. त्यात पक्षांच्या पिलांच्या उघड विक्रीची व कुंटणखान्यावरील कराची मक्तेदारी यांचा समावेश होता. त्याने करपद्धतीत सुधारणा केल्या. करपात्र जमिनींची पाहणी करून प्रत्येक खेड्याने किंवा शेतजमिनीने द्यावयाची रकम ठरवून दिली. कलाउन राजघराण्याच्या अंतापर्यंत या सुधारणा अंमलात होत्या.

इजिप्तमधील कारभाराचे एक आगळे वैशिष्ट्य म्हणजे एका तोतया खलिफाचे अस्तित्व. बगदादच्या खलिफांचे राज्य मंगोलांनी १२५८ मध्ये नष्ट केल्यानंतर अब्बासी राजघराण्यातील एक पुरुष कैरोस पळून गेला. त्याने व त्याच्या वंशजांनी, इजिप्तवर ऑटोमनांनी विजय मिळवीपर्यंत तेथे राज्य केले. बगदाद येथील खलिफाच्या सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतरच्या काळात खलिफांना तेथे जेवढी सत्ता होती त्यापेक्षा अधिक सत्ता या खलिफांनी भोगली. त्यांच्या इतिहासाच्या या दुसऱ्या टप्प्यात दिल्लीच्या सुलतानांनी आपल्या नाण्यांवर त्यांचा खलिफा म्हणून उल्लेख केला होता. पण कैरो येथील खलिफांच्या या पुनरुत्थानाला भारताच्या राजधानीने ऐंशी वर्षे मान्यता दिली नव्हती व तत्कालीन खलिफांच्या नावांचा उल्लेख ( नाण्यांवर ) केला नव्हता. दरम्यान सुलतान मुबारक शहाने स्वतःच खलिफाची पदवी धारण केली. ७९५।१३९३ मध्ये दिल्लीच्या सुलतानांनी काढलेल्या नाण्यांत अमीर अल् मुमिनिनचा उल्लेख आहे पण मुबारक शहाचे नावचा उल्लेख नाही. बंगालच्या राजांचे बाबतीत असेच म्हणता येईल. पण जौनपुरच्या राजांनी अनेकदा त्या काळच्या खलिफांचा उल्लेख केलेला दिसतो. मुस्तानसिर खलिफांच्या पुन्हा प्रस्थापित झालेल्या राज्यातील पहिल्या खलिफाविषयी इजिप्तमधील मामलुक सुलतान बेबर्सने आदर दर्शवून त्याचे व त्याचा वारस अल् हकीम याचे नाव आपल्या नाण्यांवर घातले होते.

नंतरच्या मामलुकांनी ही प्रथा पाळली नाही आणि त्या काळच्या इजिप्तच्या इतिहासात खलिफाचे नाव काझीच्या बरोबर आढळते ते फक्त ज्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी शारचा आधार घ्यावा लागे अशा बाबतींतच. उदा. सुलतान मलिक अल् नासिर याच्या कायदेशीर दर्जाबाबत काझींशी खलिफा सहमत झाल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या एका प्रसंगी जरूर पडल्यास व्यापाऱ्यांची व अवकफची मालमत्ता जप्त करणे कायदेशीर होईल काय, हे ठरविण्यासाठी काझींना व सरदारांना खलिफाने बोलाविल्याचा उल्लेख असून फक्त काझींनी त्या वेळी दिलेल्या उत्तराची नोंद सापडते. ऑटोमनांनी १५५७ मध्ये विजय मिळविल्यानंतर शेवटचा अब्बासी अल् मुतावक्कील तिसरा, याने

आपले पद आपल्या चिन्हांसह सुलतान सलीमला अर्पण केले असे सांगण्यात येते. पण याबद्दल वाद आहे. तेव्हापासून अलीकडच्या काळात ऑटोमन राजाने तुर्कस्तानात घडलेल्या घटनांमुळे १९२४ मध्ये खिलाफतीचा त्याग करीपर्यंत तो राजा (अल् मुतावक्कील) व त्याचे वारस स्वतःला 'धर्मनिष्ठांचा सेनापती' समजत.

मामलुक सुलतानांच्या लष्करीधर्तीच्या पद्धतीसारखीच पद्धती ऑटोमन तुर्कांच्या काळातही प्रचलित होती. ऑटोमन तुर्कांचे सुरुवातीचे राजे बहुतेक कारभार स्वतःच पाहात. अधिकाऱ्यांची फारशी मदत ते बहुदा घेत नसत. कॉन्स्टॅन्टिनोपल घेतल्यानंतर सरकारी कारभाराचा भार उचलण्यासाठी मंत्री नेमण्याची आवश्यकता भासली व दुसऱ्या मुहम्मदाने आपल्या अनेक गुलामांना निरनिराळ्या अधिकारपदांवर नेमल्याचे सांगण्यात येते. बडा वझीर, बेलार बे[१], संजाक बे,[२] या व राज्यातील इतर[३] मोठ्या अधिकार-पदांवर गुलाम होते तरी त्यांचे गुलामपण कायमच होते. कारण ते आपल्या राजाच्या पूर्णपणे अधिकाराखाली असत व त्यांना त्यांच्या कामाबद्दल पगार मिळत नसे. पण सुरुवातीपासून त्यांना भारी किंमतीचे वार्षिक नजराणे मात्र दिले जात. सदर ई आझम (पंतप्रधान) व शेख अल्-इस्लाम (राज्याचा धर्मप्रमुख) यांना प्रत्येकी ३०,००० आकचा (सुमारे ९०० पौंड), वझीरांना प्रत्येकी २०,००० आकचा, रूम-ईली (म्हणजे युरोपियन तुर्कस्तान) व अनतोलियाचे काझी अकूसार (मुख्य न्यायमूर्ती) यांना तेवढीच रक्कम मिळे. निशानजीला (लॉर्ड प्रीव्हीसिल) ३०,००० आकचा व चौष बाशीला १५,००० आकचा मिळत.

बडा वझीर (वझीर[४]-इ-आझम) हा सर्व खात्यांचा प्रमुख होता आणि मुलकी, लष्करी, आर्थिक, राजकीय सर्व प्रकारचा कारभार तो पाही आणि कायद्यांत उल्लेख नसलेल्या अनेक बाबतींत वाटेल तो दंड करण्याचा त्याला अधिकार होता. सुलतान प्रजेपासून दूर बहुधा एकांतात राही. बडा वझीरालाच फक्त त्याच्याशी अनिर्बंधपणे संपर्क ठेवता येई. सुलतान व बाहेरचे जग यांच्यातील दुवा म्हणून वझीर काम करी. सर्व अधिकाऱ्यांचे अहवाल प्रथम त्याच्याकडे सादर होत. त्या अहवालांवरून सुलतानास सादर करण्यासाठी तो टिपणे तयार करी. ही टिपणे दोन प्रकारची असत. एक म्हणजे प्रचलित प्रश्नांसंबंधींची.[५] वझीर त्यावर आपले मत व्यक्त करून सुलतानाचे मार्गदर्शन घेई. दुसरी टिपणे आधीच निर्णय घेतलेल्या पण सुलतानाची

---

१. प्रांतांचे सुभेदार.

२. प्रांतांचे दुय्यम सुभेदार किंवा प्रांताच्या उपविभागांचे नायब सुभेदार.

३. कूची बे.

४. पहिला मुराद याच्या कारकीर्दीत अलीपाशा (खैर अल्-दिन पाशा याचा मुलगा) याला प्रथम ही पदवी मिळाली.

५. या प्रकारच्या टिपणाला 'तकूरीर' अशी तांत्रिक संज्ञा आहे.

औपचारिक मान्यता[१] आवश्यक असलेल्या बाबींविषयी असत. तसेच सुलतानाची राजमुद्रा सर्वसामान्यपणे बड्या वझीराजवळ असे. त्याचप्रमाणे जरूर पडल्यास खजिन्याच्या जागी प्रवेश करण्याचा व राजधानीत पोलिस बंदोबस्त ठेवण्याचा अधिकार त्याला असे. शिवाय युद्ध चालू असेल तेव्हा सुलतानाच्या गैरहजेरीत दिवानचे अध्यक्षपद तो स्वीकारी.

बड्या वझीराचे खालोखाल किअह्या बे[२] या अधिकाऱ्याला महत्त्व होते. अंतर्गत कारभाराच्या तपशिलाकडे तो लक्ष देई. सुलतानाची सर्व फर्माने व खलिते त्याच्या हातून जात. तसेच राज्याच्या विभिन्न प्रांतांतून आणि खात्यांकडून येणारी कागदपत्रे व अहवाल प्रथम त्याच्याच हाती जात. सर्वसाधारणपणे त्याचा दर्जा दुय्यम वझीराचा होता. तो विशेषतः राजधानीचे संरक्षण व पोलिस व्यवस्था यास जबाबदार समजला जाई. रईस एफेंडी हा अधिकारी त्याच्याबरोबर काम करी. तो परराष्ट्रमंत्री व न्यायालयाचा प्रमुख असे. चाऊस बाशी (न्याय खात्याच्या अंमलबजावणी विभागाचा प्रमुख व न्यायालयाचा प्रमुख पदाधिकारी) हा अधिकारीसुद्धा वझीराबरोबर काम करी. हे तिघे व त्यांच्या हाताखालचे दुय्यम अधिकारी या सर्वांच्या मिळून असलेल्या कचेरीला बाब इ–अली (बडा दरवाजा) असे म्हणत. तीच पुढे तुर्कांच्या काळात परराष्ट्र कचेरी झाली.

कॉन्स्टॅन्टिनोपलच्या विजेत्याने दोन नवे दिवाण स्थापन केले असे मानले जाते. अलीकडच्या काळापर्यंत ते अस्तित्वात होते. यांपैकी एक दिवान राजप्रासादात (सराय) व दुसरा, बड्या वझीराचे निवासस्थानी होता. यांपैकी पहिल्या दिवानात मंत्रिमंडळ, सर्वोच्च न्यायालय व काराभाराचे केंद्रीय कार्यालय या सर्वांचास मावेश होत असे. तेथूनच राज्याचा मुख्य कारभार पाहिला जात असे. सुलेमान पहिला याने राजवाड्यांत दिवानसाठी घुमटाकार खोली बांधली होती. त्यात बसणाऱ्या बड्या वझीराशिवाय इतर मंत्र्यांना 'कुब्बा (घुमट) वझीरलार' (घुमटांतील मंत्री) म्हणत. त्यांना पाशा हा हुद्दा होता. मुहम्मद दुसरा याच्या कारकीर्दीत बड्या वझीराशिवाय फक्त आणखी तीन पाशा होते. नंतर त्यांची संख्या आठपर्यंत वाढली व दुसरा वझीर, तिसरा वझीर असे हुद्दे त्यांना देण्यात आले. युद्धकाळात ते सुलतानाच्या किंवा बड्या वझीराच्या हुकुमानुसार सेनानी म्हणून काम करीत. सुलतान किंवा बडा वझीर सरसेनानी असत. दुय्यम[३] वझीर निरनिराळ्या जबाबदाऱ्या पार पाडीत. काही बाबतींत बड्या वझीराचे मदतनीस म्हणून ते काम करीत. आपसांतील मत्सरामुळे कालांतराने त्यांची संख्या कमी झाली आणि मुहम्मद

---

१. दुसऱ्या प्रकारच्या टिपणाला 'तल्खीस' म्हणत.

२. फारसी भाषेत 'केड-खुदा' हा अधिकारी 'पाशा'च्या दर्जाचा होता आणि त्याला तीन 'तुघ' (तुरे) होते.

३. वासिफ, तारिख इ वासिफ इत्यादि.

तिसरा ( ११**१५/१७०३-११४३/१७३० ) याने तर फक्त एक वझीर ठेवून बाकी सर्व वझीरपदे रद्द केली.

सुलतान मुहम्मद तिसरा ( विजेता ) ते सुलेमान पहिला यांच्या वारसांचे काळात बड्या[1] वझीराचे अध्यक्षतेखालील दिवान राज्यकारभार चालवी. सुलतान राजधानीत असे तेव्हा दिवानच्या कामकाजाकडे लक्ष देई. दिवानची बैठक सरायमध्ये ( राजवाड्यात ) भरे. सुरुवातीच्या काळात दिवानमध्ये ज्या संबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे अशा कायदेविषयक,न्यायविषयक किंवा राजनीतिविषयक प्रश्नांचा विचार होई. हळूहळू दिवानची न्यायविषयक कामे दुसऱ्या दिवानकडे सोपविण्यात आली. ' बडा दरवाजा 'शी हा दिवान संलग्न असे. न्यायाची मागणी करणारे अर्ज या दिवानकडे येत. तेथे त्यांचा निकाल लावला जाई किंवा ' शार 'चे कोर्टाकडे ते पाठविले जात.

सुलतान सलीम पहिला याने ९२१/१५१५ मध्ये भरविलेल्या दिवानमध्ये जे उपस्थित होते त्यांची अधिकारपदे व हुद्दे यावरून राज्याची रचना लष्करी स्वरूपाची कशी होती ते दिसून येते. जानिसारांचा आगा ( प्रमुख ), पाशा ( वझीर ) व काझी अस्कर हे त्यावेळी उपस्थित होते. सुलतान स्वतः फौजांचा सरसेनानी असे. जानिसार हे मुराद पहिला याने मामलुक पद्धतीचे अनुकरण करून उभारलेले दल होते. त्यात प्रारंभी मॅसिडोनिया व थ्रेसमधील ख्रिश्चनांची सक्तीने भरती करण्यात येई. पाशा हे संजाक बे ( ध्वजप्रमुख ) म्हणजे मुख्य प्रांताचे लष्करी सुभेदार होते. वेळ येताच आपली सैन्ये घेऊन युद्धावर निघाले पाहिजे या अटीवर त्यांना त्यांची पदे व जहागिऱ्या मिळालेल्या होत्या. काझी अस्करच्या दोन जागा होत्या. एक युरोपातील प्रांतासाठी व दुसरी अनातोलियासाठी. सुलताना-बरोबर मोहिमांवर जाणे आणि लष्करात न्यायमूर्ती म्हणून काम करणे ही त्यांची प्रारंभीची कामे होती. कॉन्स्टॅन्टिनोपल मुस्लिम साम्राज्यात आल्यानंतर युरोपियन प्रांतांच्या ( रूम ) काझी अस्करकडे सर्व अस्करी म्हणजे मुस्लिमांचे तंटे न्यायदानासाठी सोपविण्यात आले व बिगर मुस्लिम ( बलादी ) मुलकी तंट्यांचा निकाल देण्याचे दुय्यम काम अनातोलियाच्या काझी अस्करवर सोपविण्यात आले.

सुलतान मुराद चौथा याच्या कारकीर्दीत दिवानमध्ये बडा वझीर, मुफ्ती ( म्हणजे शेख अल् सलीम–इस्लामी कायद्याचा सर्वोच्च प्रवक्ता ), कापुदान पाशा ( नाविक दल प्रमुख ) व दफ्तरदार ( मुख्य आर्थिक अधिकारी ) यांचा समावेश असे. देशातील परि-स्थितीबाबत सल्ला घेण्यासाठी राजाने ज्या अनेक उच्च अधिकाऱ्यांना १०६३/१६५३ मध्ये आमंत्रित केले होते त्यांत वरील अधिकारी होते.

सुरुवातीचे ऑटोमन सुलतानसुद्धा ' दफ्तरदार ' नावाचा अधिकारी नेमीत असत असे दिसते. युरोपात साम्राज्य स्थापन झाले तेव्हा बायाझिद दुसरा याने काही काळ युरोपातील प्रांतांसाठी दुसरा दफ्तरदार नेमला होता. पहिला दफ्तरदार आशिया मायनर-

१. त्याला ' दिवान हुमायून कुली ( शाही दिवानचा गुलाम ) ' असे म्हणत.

मधील काम पाही. सलीम पहिला याने इजिप्त, सीरिया व दियारसाठी तिसरा दफ्तरदार नेमला. तर सुलेमान पहिला याच्या कारकीर्दीत हंगेरी आणि डॅन्यूब प्रांतांसाठी चौथा दफ्तरदार नेमणे आवश्यक झाले. हे प्रांत गमाविल्यानंतर दफ्तरदार हे पद रद्द झाले व पुढे केंद्रीकरणाच्या प्रक्रियेत फक्त एक दफ्तरदार मुख्य खजिनदार म्हणून राहिला. सरकारी खजिन्याच्या रोजच्या व्यवहाराचे हिशेब त्याच्याकडे रोज रात्री दिले जात व ते तो मुख्य वझीरास कळवी. राजधानीतील सैनिकांना वर्षातून दोनदा ठरलेल्या वेळी पगार मिळतो की नाही हे पाहणे हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे काम होते.

महसूल आणि स्थानिक कारभार या कामांसाठी दोन मोठे विभाग करण्यात आले होते. बायझन्टीन काळापासून ही पद्धती चालू असावी. रुमेलिया ( म्हणजे युरोपीय तुर्कस्तान ) व अनातोलिया ( म्हणजे आशियातील तुर्कस्तान ) हे ते दोन विभाग होत. बेलारबे किंवा मीर मीरान ( सरसुभेदार ) हा या विभागांचा प्रमुख असे. त्याला त्याच्या अधिकाराची निशाणी म्हणून दोन किंवा तीन तुऱ्यांचा ध्वज दिलेला होता. सुरुवातीच्या सुलतानांच्या काळात या अधिकाऱ्यांच्या हाताखाली संजाक बे नावाचा एक अधिकारी असे. तो संजाक ( ध्वज ) किंवा मीर लिवा ( त्याच अर्थाचा शब्द ) याचा प्रमुख असे. त्याची निशाणी एक तुरा होती. मूळ मोठ्या घटकाचा एक उपविभाग त्याच्या नियंत्रणाखाली असे.

सर्वसाधारणपणे इस्लामी प्रथेप्रमाणे राज्यातील सर्व जमीन तत्त्वतः सुलतानाची[1] मालमत्ता समजली जाई. यापैकी काही मौल्यवान जमीन सुलतानासाठी राखून ठेवली जाई व बाकीची जमीन वापरण्याचा अधिकार ( तसरुफ ) सैनिकांना किंवा ती जमीन पूर्वी ज्यांच्याकडे होती त्या ख्रिश्चनांना काही अटींवर दिली जाई. अशा प्रकारे दिलेली जमीन खराजिया, उशरिया किंवा अर्द मामलकिया यापैकी एखाद्या वर्गातील असे. दीर्घकालीन स्थानिक प्रथेनुसार ठरलेल्या प्रमाणात खराजिया वर्गातील जमिनीसाठी खराज द्यावा लागे. ' उशरिया ' जमिनीवर एक दशांश प्रमाणात महसूल द्यावा लागे. अर्द मामलकिया म्हणजे सरकारी जमीन. मोठ्या हुद्यांच्या सैनिकांना किंवा काही मुलकी अधिकाऱ्यांना जहागिरी म्हणून ती दिली जाई. या जमिनीवर सरकारला सर्वसाधारणपणे जो कर मिळाला असता तेवढा घेण्याचा या अधिकाऱ्यांना हक्क असे व त्याच्या मोबदल्यात ते युद्धकाळात लष्करी नोकरी करीत व जहागिरीच्या[2] किंमतीच्या प्रमाणात

---

१. तिला ' रकबा ' म्हणजे वापरावयास किंवा लागवडीस दिलेल्या जमिनीहून भिन्न अशी मालमत्ता म्हणत.

२. अशा जहागिरीची किंमत दरसाल २० हजार पिॲस्टर्सपेक्षा जास्त असेल तेव्हा तिला ' किलिज झिआमत ' ( संक्षिप्त रूप झिआमत ) म्हणजे ' लढण्यासाठी जहागीर ' म्हणत, आणि त्यापेक्षा कमी किंमतीची जहागिरी असे तेव्हा तिला ' तिमार ' म्हणत सुरुवातीस या दोन संज्ञांच्या अर्थामध्ये फरक नसावा.

माणसे व घोडे पुरवीत. काही वेळा याच्याबदली काही रक्कम देण्याची अधिकाऱ्यास परवानगी दिली जाई. शांततेच्या काळात या जहागिरदारांकडे आपल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम असे. त्यासाठी त्यांना लष्करी व कारभारविषयक अधिकार दिलेले होते. यातील कारभारविषयक अधिकार फारसा वापरला जात नसे. कारण सार्वजनिक कामे अवक्फचे प्रशासक पार पाडीत आणि प्राथमिक स्वरूपाचा नगर कारभार काझीच्या किंवा अधिक महत्त्वाच्या ठिकाणी मुहतासिबच्या हाती असे. जहागिरदारांना स्वारस्य असे ते मुख्यतः करवसूलीत मग ती स्वतःसाठी असो की केंद्रसरकारसाठी असो.

संजाक बे किंवा मीर लिवा आणि सर्वसाधारण शिपाई यांच्या दरम्यान दोन अधिकारी असत. एक अलाई बे व दुसरा सू बाशी. अलाई बे हा संजाक बेचा दुय्यम अधिकारी असे आणि सू बाशी हा जिल्हाप्रमुख असे. गुन्हेगार पकडण्याची आणि शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर असे.

कॉन्स्टँटिनोपल १४५३ साली घेतल्यानंतर मुहम्मद दुसरा याने दोन किंवा तीन तुऱ्यांचा हुद्दा असलेल्या पाशांची संख्या वाढविली आणि साम्राज्याचा अधिक विस्तार होत गेला तेव्हा नंतरच्या सुलतानांनी आणखी पाशा नेमले. संजाब बेंना त्यांच्या जहागिरीच्या किंमतीनुसार हुद्दा मिळेल असा सुलेमान पहिला याच्या कारकीर्दीत कायदा करण्यात आला. संजाब बेंपैकी एखादा पदच्युत बडा वझीर असेल तर त्याला मात्र याबाबतीत अग्रक्रम मिळेल. संजाब बेस प्रारंभी दिलेल्या जहागिरीची किंमत २ लाख पियास्टर असे. त्याच्या नोकरीची मुदत वाढेल त्या प्रमाणात जहागिरीच्या क्षेत्रात वाढ होई. तो बेलार बे किंवा मीर मीरान होईपर्यंत त्याला ही वाढ मिळे. जानिसारांच्या आगाची संजाक बे म्हणून नेमणूक झाली तर त्याला वर्षास ५ लाख पियास्टर किंमतीची जहागिरी मिळे, तर निशानजी बाशी आणि घोडदळप्रमुख यांना त्यांच्या पूर्वीच्या उत्पन्नापेक्षा एक लाख पियास्टर जादा मिळत. अशा बेंना किंवा सरदारांना युद्धातील त्यांच्या कामगिरीबद्दल पडित जमिनी ( तिमार ) बक्षीस मिळत.

संजाक बेला मिळणाऱ्या दर ५००० पियास्टरमागे त्याला लष्करी नोकरीसाठी एक शस्त्रसज्ज सैनिक पुरवावा लागे. संजाक बेला असे कमीत कमी चाळीस सैनिक पुरवावे लागत. कारण त्याला वर्षास किमान २,००००० पियास्टर मिळत असत.

जन्माने तुर्क असलेल्या प्रजाजनांना तत्त्वतः कर माफ असे. पण प्रत्यक्षात मात्र लष्करी नोकरीव्यतिरिक्त त्यांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करही द्यावा लागे. प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतजमिनीबद्दल जिझिया किंवा खराज, तसेच जमिनीत काढलेल्या पिकांवर आणि गुरांवर कर ( रस्म घनान ) द्यावा लागे. याशिवाय अधिकारी इतर किरकोळ करही घेत. जी कुटुंबे युद्धावर सैनिक पाठवीत नसत त्यांना ' खाना अवारिडी ' हा कर द्यावा लागे. इराणमधील ' खाना-वारी 'च्याच स्वरूपाचा हा कर होता.

व्यापाऱ्यांना आपल्या मालावर कर द्यावा लागे. या मालामध्ये गुलाम, गुरे आणि दास यांचाही समावेश असे. मोठ्या शहरातील गुमरूकवर म्हणजे जकात नाक्यांवर आणि सरहद्दीवर व्यापारी हा कर देत. याशिवाय वस्तूंच्या विक्रीवरही कर द्यावा लागे. कर वसुलीचा मक्ता देण्याची पद्धती साम्राज्याच्या सुरुवातीच्या काळापासून रूढ होती असे सांगण्यात येते. स्वतःचे नाव ऑटोमन राजघराण्याला देणारा त्या घराण्याचा संस्थापक उस्मान गाझी याने कराजा हिसार शहर घेतल्यानंतर खुतबा जाहीर केला. स्वतःच्या नावाची नाणी काढली व एका काझीची आणि सू बाशीची नेमणूक करून स्थानिक कारभाराची तरतूद केली. पुढे एकदा शेजारच्या शहरातील एक व्यक्ती त्याच्याकडे आली व बाजारावर बसविलेला कर वसूल करण्याचा मक्ता घेण्याची तिने परवानगी मागितली. सुलतानाने प्रथम त्याचे म्हणणे ऐकून घेण्याचेच नाकारले. पण अखेर बाजारात आलेल्या सर्व वस्तूंवर प्रत्येक ओझ्यामागे २ ॲस्पर (पियास्टर) कर वसूल करण्यास सुलतानाने त्याला परवानगी दिली.

ख्रिश्चन व ज्यू यांना डोईपट्टी[1] द्यावी लागे. हा कर फक्त पुरुषांवर बसविण्यात येई आणि दर महिन्याच्या प्रारंभी तो द्यावा लागे. काही ठराविक महिन्यांपेक्षा अधिक काळ तो द्यावयाचा राहून गेला असेल तर सरकारचा त्या करावरील हक्क रद्द[2] झाला असे समजले जाई.

सुलेमान पहिला (कानूनी) याच्या मृत्यूपर्यंत जहागिऱ्या देण्याची ही पद्धत काही प्रमाणात यशस्वीपणे चालू होती. त्याच्या आणि तसेच त्याच्या पूर्वजांच्या कारकीर्दीत तुर्की साम्राज्याचा पूर्वेकडे व पश्चिमेकडे विस्तार झाला होता. पण सुलेमाननंतर ऱ्हासाला सुरुवात झाली. जहागिऱ्या कधीच वंशपरंपरागत नव्हत्या; पुढील काळात मात्र त्या तशा बनल्या. पाशा प्रजेकडून तिला न पेलवणारा कर वसूल करीत. पण आपल्या

---

१. त्याला 'खराज' म्हणत. तुर्कस्तानातील व्हेनेशियन परराष्ट्र वकीलांनी त्याला 'कराज' म्हटले आहे.

२. राज्यातील मुस्लिम व बिगर मुस्लिम नागरिक यांच्यात जो फरक मानला गेला होता त्यामध्ये अलीकडे रद्द झालेल्या कलमांचे मूळ आहे. १८५६ च्या पॅरीस तहान्वये तुर्कस्तानचा युरोपीय राष्ट्रसमूहात प्रवेश झाल्यानंतर सुलतानाच्या दरबाराने एक जाहीरनामा काढला आणि सुलतानाच्या मुस्लिम व मुस्लिमेतर (रयत वा बी रयत) प्रजेतील भेदभाव नाहीसा केल्याचे घोषित केले. इस्लामला अपरिचित असलेल्या राष्ट्रीयतेच्या कल्पनेचा (तबाइयत) अशा रीतीने प्रवेश झाला आणि 'तबाई शहाना' (साम्राज्याचे प्रजाजन) किंवा 'तबा ई दौलत ई उस्मानिया (ऑटोमन राज्यातील प्रजाजन)' या संज्ञांचा वापर होऊ लागला. डोईकर रद्द झाला पण लष्करी नोकरी करू शकणाऱ्या लोकांना दंडपात्र ठरवून त्यांच्याकडून दंड वसूल केला जाऊ लागला.

जबाबदाऱ्या मात्र पार पाडीत नसत. मग ती जबाबदारी लष्करी स्वरूपाची असो की सुलतानाला कराची रक्कम देण्याची असो. शिवाय राजधानीत कर वसूल करणाऱ्या मक्तेदारांना जहागिऱ्या दिल्या जात. स्वतःचे खिसे कसे भरता येतील हीच एकमेव चिंता त्यांना असे.

मुराद तिसरा (१५७४–९५) याच्या कारकीर्दीत या पद्धतीची पुनर्घटना करण्यात आली. त्याने इयालतींमध्ये (प्रांत) साम्राज्याची विभागणी केली. प्रत्येक इयालतचा कारभारप्रमुख म्हणून वलीची नेमणूक करण्यात आली. त्याला पाशा तसेच वझीराचा हुद्दा आणि त्या हुद्याची निदर्शक अशी तीन तुऱ्यांची निशाणी मिळाली. इयालतची विभागणी 'लिवा'मध्ये करण्यात आली होती. लिवाचे प्रमुखास मीर मीरानचा हुद्दा व त्याची निदर्शक अशी दोन तुऱ्यांची निशाणी देण्यात आली. या सुधारणेचा महत्त्वाचा विशेष म्हणजे अधिकारी व त्यांना दिलेली जहागीर ठराविक काळापुरतीच दिलेली असे. पुढे तर ही मुदत एक वर्ष केली गेली. त्यामुळे इयालतच्या प्रमुखांना आपल्या हाती भरमसाट सत्ता घेणे आणि प्रजेच्या किंवा सुलतानाच्या पैशाने स्वतः गब्बर होणे अधिक कठिण झाले. हे निर्बंध होते तरी राजधानीपासून दूर असलेले पाशा एवढे प्रबळ होते की ते सुलतानाला न जुमानता डेरे बे (सरदार) होऊन उघडपणे जवळजवळ स्वतंत्र असल्यासारखे वागत. याची उल्लेखनीय उदाहरणे म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीचे बगदादचे सुलेमान पाशा व दाऊद पाशा आणि इजिप्तमधील मुहम्मद अली ही होत. सुलतान मुहम्मद दुसरा (१८०४-३९) याला ही सरंजामशाही संस्था चालू ठेवणे, केंद्र सरकारच्या दृष्टीने निरर्थक असल्याची अखेर जाणीव झाली व त्याने लष्कराची व राज्यकारभाराची एक नवी पद्धती सुरू केली. त्यावेळी युरोपात प्रचलित असलेल्या पद्धतीवरून ती घेतलेली होती.

इस्लामी जगताच्या पश्चिम टोकाला स्पेनमध्ये करवसुली हेच इतरत्रप्रमाणे मुख्यतः स्थानिक प्रमुखाचे प्रधान काम असे. सरकारी अधिकाऱ्यांच्या संदर्भात विचार केला तर कार्डोव्हाच्या सुरुवातीच्या काळातील उमाय्यदांचे अधिकारी आणि बगदादमधील अधिकारी यांच्यात फारसा फरक नव्हता. सुलतानाचा प्रमुख अधिकारी वझीर असे. नंतरच्या उमाय्यद सुलतानांच्या काळात त्याचे महत्त्व कमी झाले. खजिना, न्यायालय, सीमासंरक्षण यासारख्या राज्यकारभाराच्या निरनिराळ्या शाखांच्या प्रमुखांना वझीराचा हुद्दा देण्यात आला. वझीराला पूर्वी असलेले अधिकार आता हाजिबकडे (सुलतानाचा खाजगी कारभारी) गेले. इजिप्तमध्ये पुढे असाच बदल झालेला दिसतो.

उत्तर आफ्रिकेत मात्र वझीर हाच मुख्यमंत्री म्हणून अस्तित्वात राहिला. हाजिब हा राजवाड्याचा अधिकारी असे. बहुधा हिजड्याची त्या जागेवर नेमणूक होई.

मुस्लिमांची जमिनमालकीची पद्धत, करपद्धती व स्थानिक कारभारव्यवस्था या

संबंधीची आणखी काही उदाहरणे भारतीय इतिहासात आढळतात. दिल्लीच्या गुलाम राजांचे काळात शम्स अल् दिन (इ. स. १२१०–३५) याने लष्करी नोकरीबद्दल सैनिक अधिकाऱ्यांना जहागिऱ्या देण्याची पद्धत सुरू केली होती. अर्ध्या शतकातच त्यातील दोष दिसून येऊ लागले व सुलतान बियात अल् दिन बल्बन याने त्या पद्धतीत सुधारणा केली. मूळ जहागिरदारांना देण्यात आलेली खेडी त्याने त्यांच्याकडेच ठेवली पण इतर जहागिरदारांचे दोन वर्ग केले. एक लढवय्यांचा व दुसरा मूळ जहागिरदारांच्या नातलग स्त्रिया व मुलांचा. यांपैकी पहिल्या वर्गात मोडणारांना आपापल्या खेड्यात राहण्याची सवलत देण्यात आली. मात्र कराच्या उत्पन्नाचा काही भाग त्यांना सरकारला द्यावा लागे. दुसऱ्या वर्गात येणाऱ्या मूळ जहागिरदारांच्या नातलग स्त्रिया व मुले यांच्याकडून जमिनी काढून घेण्यात आल्या व मोबदला म्हणून त्यांना निर्वाहभत्ता दिला.

अल्लाउद्दिन खिलजी ६९५ । १२९५–६ इ. मध्ये गादीवर आला. त्याने या सर्व मोफत इनाम जमिनी (मुल्क) जप्त केल्या; पण लष्करी नोकरीबद्दल जहागिरी देण्याची पद्धत चालू ठेवली. हुमायूनच्या काळापर्यंत ती चालू होती. जमीन हेच आपल्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे हे अल्लाउद्दिनच्या ध्यानी आले आणि जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा आपणास अधिक स्पष्ट अंदाज यावा या उद्देशाने जमिनीची पाहणी व पीकनिश्चिती करण्याची पद्धती त्याने सुरू केली. जमिनीतील पिकांपैकी निम्मे पीक तो स्वतः घेई. त्याचा दुय्यम वझीर (नायब वझीर अल् मयालिक) याचे आर्थिक व्यवहारावर नियंत्रण असे. महसूल अधिकाऱ्यांनी गोळा केलेली कराची रक्कम पटवाऱ्यांनी (गावचे कुलकर्णी) ठेवलेल्या नोंदीशी जुळली पाहिजे यासाठी महसूल अधिकाऱ्यांवर तो सतत लक्ष ठेवी. अहदात हा नवा कर त्याने रद्द केला. तसेच राजधानीतून त्याने "दास विक्रेत्यांची व जुगार खेळणारांची" हकालपट्टी[१] केली. त्यांच्याकडून जबर कर घेतला जात असे. हिंदूंकडून डोईपट्टी घेण्यास मात्र त्याने नकार दिला. कारण इमामांपैकी अबु हनीफ सोडून बाकी कोणाचीही 'धिम्मी' या वर्गात हिंदूंचा समावेश करण्यास संमती[२] नव्हती. जे लोक इस्लामच्या संरक्षणाखाली राहून 'जिझिया' देत, त्यांना 'धिम्मी' म्हटले जाई. हिंदू लोक कुलीन व श्रीमंत होते तरी ते सरकारला खराज किंवा कऱ्ही (घरावरचा कर) किंवा चराई यांपैकी कोणताही कर देत नसत. त्यामुळे त्यांच्या जमिनी काढून घेण्याचे अल्लाउद्दीनने ठरविले. सर्वसाधारणपणे मुस्लिम सरदार

---

१. मात्र 'अहदात'ची हकालपट्टी फार काळ टिकली नाही. कारण मुहम्मद (दुसरा) इब्ने तुघलख व त्याच्यामागून आलेला फिरोजशहा (तिसरा) यांच्या कारकीर्दीत हा कर पुन्हा 'रद्द' करण्यात आल्याचे दिसते.

२. म्हणून ही संज्ञा हिंदूंच्या बाबतीत चुकीची आहे. तरीही मुस्लिम इतिहासकारांनी हिंदूंच्या संदर्भात ती वापरली आहे.

किंवा हिंदू राजे जोपर्यंत कर देत होते तोपर्यंत सुलतानांनी त्यांना शांततेने राहू दिले. बाबर व हुमायून या प्रारंभीच्या मोगल बादशहांनी त्यांचेच उदाहरण पुढे चालू ठेवले. बाबरच्या काळात जमीनमालकांच्या हातीच देशाचा प्रत्यक्ष कारभार होता. हे जमीन-दार महसूल वसुलीचीही हमी देत. अकबराने मात्र ही पद्धत बदलली आणि आपले उद्देश व आकांक्षा यांना अनुकूल अशी व्यवस्था निर्माण केली. या नव्या व्यवस्थेचा परिणाम टिकाऊ ठरला.

□ □

प्रकरण ९

# इस्लाममधील लष्करी संघटना

इस्लामपूर्व अरबस्तानात वर्षांतून काही काळ युद्ध करणे हा टोळीवाल्यांच्या जीवनाचा एक नित्याचा भाग बनला होता. बाह्यतः लुटीच्या किंवा कोणाचा तरी सूड घेण्याच्या हेतुने जरी ही युद्धे खेळली जात असली तरी वाळवंटांतील कंटाळवाण्या जीवनापासून मुक्तता मिळविणे ही आंतरिक इच्छाही त्यामागे असे. लोकांना युद्धास प्रवृत्त करण्याच्या या जुन्या हेतूमध्ये इस्लाममुळे आणखी एका नव्या हेतूची भर पडली.

युद्धासारखे उद्योग हाती घेणारे पहिले मुस्लिम म्हणजे मुहाजिद. मुहम्मदांबरोबर मक्का सोडून जाणारे ते त्यांचे सहकारी होत. कुरेश टोळीशी झालेल्या पैगंबरांच्या लढाईचे वेळी या लोकांचे छोटे गट शत्रूंच्या तांड्यांना थोपवून धरण्यासाठी पाठविले गेले होते. हिजरीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाच्या मोहिमांत हे लोक कमी संख्येने होते. पहिली मोहीम अयशस्वी झाली. तिच्यात तीस लोक होते. दुसरींत ६० व तिसरीत ३० होते. तथापि बद्रच्या लढाईत तीनशेपेक्षा अधिक मुस्लिमांनी भाग घेतला होता. त्यापैकी सत्तर मुहाजिद व बाकी अन्सार होते. अन्सार म्हणजे मदिना येथे इस्लामचा स्वीकार केलेले निष्ठावंत लोक. बद्रच्या मोहिमेचा उद्देश अबु सुफियनच्या नेतृत्वाखालील प्रसिद्ध कुरेश तांडा आपल्या कब्जाखाली आणणे हा होता. आणखी एक वर्षाने उहदच्या लढाईत मुहम्मदांना माघार घ्यावी लागली. त्यांच्या फौजेतील लोकांची संख्या तोवेळपावेतो एक हजाराइतकी झाली होती. पण प्रत्यक्ष लढाई सुरू होण्यापूर्वीच त्यापैकी तीनशे लोक त्यांना सोडून गेले. या लढाईत विरुद्ध बाजूच्या कुरेश टोळीत तीन हजार लोक होते. त्यांच्याजवळ दोनशे घोडे होते तर मुस्लिमांजवळ फक्त दोन होते. कुरेश टोळीपैकी सातशेजण चिलखत घातलेले होते तर पैगंबरांच्या बाजूला फक्त शंभरजण चिलखतधारी होते अशी आख्यायिका आहे. पुढील काळातील कूटनीतिक हालचालींमुळे व प्रतिपक्षाचा एकेक भाग विनाश पावल्यामुळे मुहम्मदांची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित झाली. कुरेश, मेदिनी व इतर टोळ्यांतील लोक मुहम्मदांना मिळून त्यांच्या अनुयायांची संख्या वाढली. मुता मोहिमेवर हि.सन ८ साली तीन हजार लोक पाठविण्यात आले होते असे सांगतात. त्याच वर्षी मक्केला वेढा घालून ती ताब्यात घेतली. त्या

वेळच्या मोहिमेत हिजाज येथील अरब टोळीचे अनेक लोक सामील झाले होते. पैगंबरांच्या मृत्यूपूर्वीची ही शेवटची मोहीम होती.

लढायांत भाग घेणारे लोक सामान्य अरब टोळीवाले होते. उंट आणि मेंढ्या पाळणे हा त्यांचा नित्याचा व्यवसाय. त्या त्या मोसमांतील लष्करी नोकरी संपल्यावर ते परतून नित्याची कामे करू लागत.

मुहम्मदांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांत फूट पडली. तसेच इतरही अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे अबु बकर व उमर यांनी अरबस्तानाबाहेर काढलेल्या मोहिमांत फार थोडे लोक होते. पण या लोकांची घरापासून दूर दीर्घकाळ राहण्याची तयारी होती व त्यांनी आपल्याबरोबर आपली कुटुंबेही घेतली होती. अबु बकरने सीरियात हिजरी सन १३ मध्ये पाठविलेल्या सैन्यांत सात हजार सैनिक होते तर त्याच वर्षी झालेल्या यारमुकच्या लढाईचे वेळीं मुस्लिमांच्या बाजूला २७००० लोक होते. याशिवाय खालिद इब्ने वालिदच्या[1] नेतृत्वाखाली नऊ हजार लोक त्यांना मिळाले. आख्यायिकेत हे आकडे फुगविलेले असावेत. कारण विरोधी बाजूच्या बायझन्टीन सेनेत १४०००० लोक होते असे हीच आख्यायिका सांगते.

त्याच वर्षी इराकवर पाठविलेल्या फौजेतील सैनिकांचा आकडा मात्र थोडा कमी सांगितलेला आहे. उबेद इब्ने मसूद याच्या नेतृत्वाखाली उमरने पाच हजार लोकांना या मोहिमेवर पाठविल्याचे सांगण्यात येते. पुढे त्यांना थोडीशी कुमक मिळाली तरी ब्रिजच्या लढाईत त्यांचा पराभव झाला. पराभवाची बातमी समजताच उमरने निरनिराळ्या अरब टोळ्यांकडे सैनिकांची मागणी केली. त्यांनी ती मान्य केली. हिरा मधील मुथान्ना येथे त्यांनी मुहम्मदांकडे आपले सैनिक पाठविले. कादिसिया येथे झालेल्या निर्णायक लढाईत सात हजार सैनिक[2] मुख्य ठाण्याहून पाठविण्यात आले असा अंदाज आहे. याशिवाय स्वयंसेवक म्हणून किंवा कुमक म्हणून आणखी काही लोक गेले होते. या लढाईत प्रत्यक्ष किती मुस्लिम होते याबद्दल निश्चित सांगता येत नाही. कारण बालाधुरीच्या म्हणण्याप्रमाणे नऊ ते दहा हजार लोक इराणवर चाल करून गेले तर तबरीच्या म्हणण्याप्रमाणे कादिसियाच्या लढाईत व त्यापूर्वीच्या हल्ल्यात सहा हजार लोक मारले गेले. त्यानंतर दोन वर्षांनी मदाइत येथे बारा हजार लोक ठेवले होते व ते सर्व घोड-

---

१. बालाधुरी याने म्हटले आहे की, सुरुवातीस प्रत्येकी तीन हजार सैनिकांची एक याप्रमाणे तीन तुकड्या सीरियांत पाठविण्यात आल्या. पुढे ही फौज २४ हजार पर्यंत वाढविण्यात आली. याशिवाय खालिद इब्ने वालिदची सहाय्यक सेना होतीच.

२. या लढाईतील एकूण मुस्लिम सेनेतील एक चतुर्थांश सैनिक बाजिला या टोळीचे होते.

दळाचे[1] होते असे त्याने म्हटले आहे. याकुबीने दिलेल्या आकड्यांशी हे आकडे काही अंशी ताडून पहाता येतील. कादिसिया येथे पाच हजार तगडे अरब ( मुदार व रबिया संघराज्यांतील ) आणि एक हजार इतर मुस्लिम होते.

इजिप्त जिंकण्यासाठी उमरने अमर इब्ने-अल् आस याला चार हजार सैनिक दिले होते पण त्याच्या जोडीला तेवढीच कुमक मिळविणे त्याला भाग पडले. मुराविर्याच्या काळापर्यंत भत्यास पात्र असलेल्या लोकांची संख्या चाळीस हजार झाली होती.

इस्लामचा प्रसार होत गेला आणि त्याच्या अरब आणि बिगर अरब अनुयायांची संख्या वाढली त्याबरोबर त्याच्या फौजांमध्येही नवी भरती झाली. उमरने इराकमध्ये प्रथम फक्त आठशे लोकांची शिबंदी पाठविली होती. त्यांच्या बरोबर त्यांची बायकामुलेही पाठविण्यात आली होती. पूर्वेकडच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी हे सैनिक पाठविण्यात आले होते. पण त्यांची संख्या वाढत जाऊन त्यांतूनच बसरा शहर वसले. हे लोक प्रथम तंबूतून रहात होते. पण संख्या वाढताच त्यांनी खेडी उभारली. ती विकसित होऊन व एकत्र येऊन एक मोठे शहर तयार झाले. ही शिबंदी येऊन पंचवीस वर्षे पुरी होण्यापूर्वी झियाद इब्ने अबीही या सुभेदाराच्या कारकीर्दीत शिरगणती घेण्यात आली तेव्हा शस्त्र धारण करू शकणारे पुरुष ऐंशी हजार असल्याचे जाहीर करण्यात आले. बसऱ्याला शिबंदी ठेवण्यात आली त्याच सुमारास कुफा येथेही शिबंदी ठेवण्यात आली होती. तेथील पुरुषांची संख्या साठ हजार व स्त्रिया आणि मुलांची संख्या ऐंशी हजार झाली होती. रेय्य आणि अझरबैजानविरुद्ध लढण्यासाठी कुफा येथील सैनिक कामी लावले होते. या दोन ठिकाणच्या मोहिमांत २४ / ६४५ साली दहा हजार सैनिकांनी भाग घेतला व आणखी चाळीस हजार सैनिक कुफा येथे तयार[2] होते. झियाद हा सुभेदार होता त्या काळात ५१ / ६७१ साली खुरासानमध्ये इराकींच्या वसाहती होत्या आणि आगेकूच पुढे चालू ठेवण्यासाठी हज्जाज इब्ने युसुफने ८० / ६९९ मध्ये आपल्या इराकच्या सुभेदारपदाच्या काळात कुफा व बसरा येथून वीस हजार सैनिक पाठविले होते. खुरासानच्या पूर्व भागाविरुद्ध ९६ / ७१४–१५ मध्ये बसऱ्याहून चाळीस हजारांची फौज पाठविण्यात आली. अलिदा, बक्र, तामीम, अब्दुल कायस आणि अझ्द या पाच संघसत्तात्मक टोळ्यांचे हे लोक होते. त्यांना अखमा ( पंचक )

---

१. इराणकडे निघालेल्या मुस्लिम सैन्यात इराण्यांशी जलूला येथे झालेल्या लढाईत ( हिजरी सन १६ ) इतकेच सैनिक होते असे सांगितले जाते.

२. रेय्य व अझरबैजानवरील मोहिमांत दर चार वर्षांनी प्रत्येक सैनिकाने भाग घेतला असे सांगितले गेले आहे. परंतु सुरुवातीच्या काळातील इस्लामी इतिहासाला पद्धतशीर स्वरूप देण्याच्या हेतूने हे विधान केले गेले असावे असे दिसते.

म्हणत. प्रत्येक खुमचे स्वतंत्र पथक होते व प्रत्येकाचा वेगळा नेता होता. या फौजेत सात हजार कुफन व तेवढेच मवाली ( इस्लामचा स्वीकार केलेले बिगर अरब ) होते.

अरबांच्या एकसूत्री अंमलाखाली संपूर्ण इराण येण्यापूर्वीच इराणमधील बऱ्याच मोठ्या प्रदेशांनी अरबांचे प्रभुत्व मान्य केले होते आणि इस्लामचे पहिले शतक संपण्याच्या बराच काळ आधी बऱ्याच इराणींची आघाडीच्या फौजांत भरती करण्यात आली होती. त्यांपैकी काही स्वेच्छेने भरती झाले होते यात शंका नाही. पण जिंकलेल्या प्रदेशाकडून खंडणी म्हणून बऱ्याचजणांना सक्तीने भरती करण्यात आले होते. ऑक्झस नदी ओलांडून तुखारिस्तानावर स्वारी करणाऱ्या पाच हजार सैनिकांत एक हजार इराणी होते. पुढे ऑक्झस ओलांडल्यावर कुतैब याने बुखारा, काश, नसाफ व ख्वारझम ( खिव ) येथील रहिवाशांवर वीस हजार लोक पुरविण्याची सक्ती केली. ही फौज त्याने शाशकडे ( ताश्कंद ) पाठविली. चार वर्षांनी याझीद इब्ने मुहल्लबने एक लाखाची फौज उभारली. ( हा आकडा, सेना भली मोठी होती हे दर्शविण्यासाठी निवडलेला असल्याचे दिसते ) त्यांत सीरियन, इराकी व खुरासानी सैनिक होते. ही फौज जुर्जान व तबरीस्तान जिंकण्यासाठी उभारली होती. तिच्यात काही 'मवाली' व काही स्वयंसेवक, ( मुताताव्विअ ) होते.

इराणशिवाय इतर दिशांना सुरुवातीस पाठविलेल्या फौजाही लहान होत्या. पण धर्मांतर केलेल्या खलिफांच्या बिगर अरब प्रजाजनांची त्यात भरती होऊन त्यांची सैनिक-संख्या वाढली. उस्मान मुआविया हा सीरिया आणि जाझीराचा सुभेदार असताना या प्रांतांतून आठ हजारांची फौज त्याने आर्मेनियाविरुद्ध पाठविली. पुढे कुफांच्या सैनिकांशी त्या फौजेची चकमक उडाली तेव्हा तिला त्याने आणखी कुमक पाठविली. उमाय्यदांनी सीरिया व जाझिराचे सीमेपलीकडे ग्रीकांविरुद्ध उन्हाळ्यात व हिवाळ्यात ज्या मोहिमा केल्या त्यांतही या दोन प्रांतांतील रहिवाशांना पाठविले होते. सुलेमान इब्ने अब्दल् मलिक याने आपला भाऊ मस्लामा याच्या नेतृत्वाखाली कॉन्स्टँटिनोपलविरुद्ध आपली दुर्दैवी मोहीम केली तेव्हा नवे बिगर अरब मुस्लिम हेच त्याच्या फौजेचे मुख्य बळ होते. पश्चिमेकडच्या मोहिमांचे वेळीही तशीच परिस्थिती होती. तारिक इब्ने झियादने अंदालुसियावर ९२/७११ मध्ये स्वारी केली तेव्हा त्याच्या सात[1] हजार सैनिकांत बर्बर किंवा इतर वंशाचे 'मवाली' होते आणि अरब अत्यल्प होते.

उमाय्यदांचे हाती सत्ता येण्यापूर्वी झालेल्या यादवी युद्धांत आणि त्यांच्या राजवटीत झालेली बंडे मोडून काढण्यासाठी पाठविलेल्या फौजांत त्यांच्या स्वतःच्या सैनिकांपेक्षा बाहेरून भरती केलेल्या सैनिकांचाच जास्त भरणा होता. पण ही माहिती काळजीपूर्वक ताडून पाहिली पाहिजे. कारण या माहितीनुसार सिफिनच्या लढाईत भाग घेतलेल्या

---

१. तबरीच्या म्हणण्याप्रमाणे १२०००.

सैनिकांची संख्या एवढी मोठी आहे की, तिच्या अचुकपणाबद्दल शंका निर्माण होते. या लढाईत अलीच्या बाजूने ९० हजार व त्याचा प्रतिस्पर्धी मुआविया याच्या बाजूने ८५ हजार सैनिक होते असे या वृत्तांतात म्हटले आहे. पण एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की अल् मुराद टोळीचा शेख हनी बिन उर्वा हा अलीचा मुलगा हसन याला पाठिंबा देणाऱ्यांपैकी एक होता. हसनविरुद्ध झालेल्या कटात त्याचे डोके उडविण्यात आले. पण त्याची टोळी त्याच्याशी एकनिष्ठ असती तर तो लढाईत चार हजार घोडदळ, त्याच्या दुप्पट पायदळ आणि किंडा टोळी यांच्या मदतीने तीस हजारांची फौज उभा करू शकला असता.

खारीजींविरुद्ध दीर्घकाळ झालेल्या लढायांत आणि विशेषतः प्रबळ शबीब अल् अझराकी याच्याविरुद्ध झालेल्या लढाईत सरकारजवळच्या साधन संपत्तीची अगदी कसोटी लागली. हज्जाजने ७६।६९५ साली सहा हजार निवडक इराकींची फौज शबीबविरुद्ध पाठवून त्याचा पराभव केला. पण पुढच्याच वर्षी कुफन व इतर इराकी सैनिक, बंड मोडून काढण्यास असमर्थ आहेत असे दिसून येताच हज्जाजने खलिफा अब्दल् मलिक-कडे सीरियन फौजांची मागणी केली. खलिफाने दोन तुकड्यांनी सहा हजार सैनिक पाठविले. त्यांच्यासह त्याने कुफन सैनिकांची फौज चाळीस हजारापर्यंत वाढविली. कुरेश, इतर अरब टोळ्या आणि त्यांचे दहा हजार अनुयायी मिळून लढण्यास समर्थ असलेल्या कुफातील पुरुषांची संख्या तेवढीच होती.

इस्लामच्या अगदी सुरुवातीच्या काळातील सैनिकांमधील बरेचजण परलोकांत मिळावयाच्या अध्यात्मिक लाभाच्या प्रेरणेमुळे लढले होते. अशा लोकांपैकी उस्मानचा विशेष उल्लेख करता येईल. या लोकांनी पैगंबरांच्या मोहिमांच्या खर्चास उदारपणे मदत केली. नंतर सुरुवातीच्या खलिफांच्या काळात परदेशी मोहिमा निघाल्या, तेव्हा त्यांत सामील होण्यासाठी टोळीवाल्यांना प्रेरणा देणारा एक उद्देश, ज्या प्रदेशावर ते स्वारी करीत तेथील संपत्ती लुटावयास मिळेल, हा होता. अबु बकर आणि उमरच्या कार-कीर्दीत त्यांच्या आशा फलद्रुप झाल्या. लुटीत मिळालेल्या मोठ्या रकमा, प्रत्यक्ष लढाईत भाग घेतलेल्या लोकांनाच नव्हे तर अरबस्तानात मागे राहिलेल्या आपल्या लोकांनाही त्यांनी वाटल्या. इस्लामला व्यावहारिक संघटनेचे स्वरूप देण्याच्या कामी उमर याचा सर्वांत अधिक वाटा होता. त्यानेच प्रथम प्रत्येक सैनिकाला वर्षास चार हजार दिऱ्हाम मिळावेत अशी योजना केली. या रकमेचा सैनिकाने पुढील चार कामांसाठी उपयोग करावा अशी कल्पना होती. लढाईवर असताना आपल्या कुटुंबाचा खर्च, घरी असताना सैनिकी साहित्यासाठी खर्च, बाहेर असतानाचा त्याचा निर्वाह खर्च आणि एका सह-काऱ्याचा खर्च या कामांसाठी ही रकम सारख्या प्रमाणात खर्च केली जात असे. सैनिकांचे दिवान किंवा रजिस्टर ठेवण्याची प्रथाही उमरनेच प्रथम सुरू केली. त्यानुसार कादि-सियाच्या आणि नंतरच्या लढायांत भाग घेतलेल्या प्रत्येक सैनिकास 'आटा' किंवा भत्ता देण्यात येई.

पगाराच्या प्रत्यक्ष वाटणीसाठी सैनिकांची इराफांमध्ये किंवा गटांमध्ये विभागणी करण्यात येई. इराफामधील सैनिकांची संख्या निरनिराळ्या काळात निरनिराळी होती. सुरुवातीला त्यात दहा लोक व त्यांचा नेता असे. पण पुढे ही संख्या वाढविण्यात आली. उमरने कादिसियाच्या लढाईचे वेळी प्रत्येक इराफ्यात त्रेचाळीस सैनिक आणि तेवढ्याच संख्येने स्त्रिया व मुले ठेवली होती. अशा प्रत्येक इराफ्यास तो एक लाख दिऱ्हॅम देई. नंतरच्या काळात जे इस्लामला मिळाले व कादिसियानंतरच्या लढायांत ज्यांनी भाग घेतला त्यांची इराफ्यातील संख्या मोठी होती. तरीही प्रत्येक इराफ्यास दिली जाणारी रकम तेवढीच होती.

बहुदा अब्बासींच्या काळात इराफामध्ये पुन्हा बदल करण्यात आला असावा. मुताईन याच्या काळात रुढ असलेली पद्धती पुन्हा सुरू करावी अशी मागणी मुहतादीच्या कारकीर्दीतील ( २५६/८७० ) तुर्की पगारी सैनिकांनी केल्याचा वृत्तान्त आहे. प्रत्येक नऊ माणसांवर एक अरीफ, पन्नास माणसांवर एक खलीफा आणि शंभर माणसांवर एक 'काइद' अशी ही पद्धती होती. इराफामध्ये स्त्रियांचा समावेश करू नये तसेच शस्त्रास्त्रांची किंमत घेतली जाऊ नये अशीही मागणी त्यांनी केली.

ज्या काळात अनिर्बंधपणे लूट केली जात होती त्या काळात सैनिकांचा पगार त्या लुटींतूनच दिला जाई. लुटीचे साधन संपुष्टात आल्यावर बळकावलेल्या प्रदेशामधून जो कर खजिन्यात जमा होई त्यातून सैनिकांचा पगार दिला जाई. पण अगदी सुरुवातीच्या खलिफांच्या काळातसुद्धा सोयीचे असेल तेव्हा सैनिकांना जमिनीचे दान ( इक्तात ) केले जाई. खरे तर या पद्धतींतून पूर्वी गैरप्रकार निर्माण झाले होते. परदेशी राजघराण्यांनी, विशेषतः सेल्जुकांनी ही पद्धती सुरू केली असे मुस्लिम इतिहासकार सांगतात.

उमाय्यदांच्या कारकीर्दीत निरनिराळ्या प्रांतात कामगिरीवर असलेल्या सैनिकांचा पगार ही स्थानिक उत्पन्नातून द्यावयाची पहिली बाब असे. इजिप्तमध्ये मुराबियाच्या काळात चाळीस हजार लोकांना प्रत्येकी दोनशे दीनार ( वर्षाला ? ) दिले जात असत असे सांगण्यात येते. यावरून खलिफाला प्रांतांतून मिळणारी रक्कम तुलनात्मकदृष्ट्या फार थोडी होती असे दिसते. शिबंदीचे सैनिक व त्यांची कुटुंबे यांच्या संख्येवर खलिफाचे कडक लक्ष असे. शिबंदीमध्ये आल्या-गेल्याची नोंद करणे एवढ्याच कामासाठी त्याने एक अरब अधिकारी नेमला होता. सीरिया हा राजघराण्याचा मुख्य प्रांत. तेथे प्रत्येक 'जुंद'[1]ला ( जिल्ह्याला ) एक शिबंदी असे व तिचा पगार स्थानिक करांतून दिला जाई.

---

१. अशा लष्करी जिल्ह्याला 'जुंद' हे नाव दिलेले आढळते. त्यामुळे जिल्ह्यातील लष्करास 'जुंद' म्हटले जाई. सुलतानाच्या अथवा टोळीप्रमुखाच्या शरीररक्षकासही याच नावाने संबोधण्यात येई. तर सबंध लष्कराला 'अस्कर' असे म्हणण्यात येई. , मुतातव्विअ ' किंवा सर्वसामान्य जनसमाजाहून भिन्न अशा अर्थाने खड्या फौजेसाठीही याच शब्दाचा वापर केला जाई.

लष्कराला माणसांचा सतत पुरवठा निश्चितपणे व्हावा यासाठी उमाय्यद खलिफा निरनिराळ्या टोळ्यांच्या प्रमुखांना आर्थिक मदत देत आणि सैनिक पुरविण्याबाबत त्यांच्याशी करार करीत. उमाय्यद राजघराण्यातील पहिल्या चार सुलतानांना सीरियांतील कहतान या टोळ्यांच्या संघाकडून दोन हजार खडे सैनिक मिळत. त्याच्या बदला ते या टोळ्यांच्या प्रमुखांना प्रत्येकी वीस लाख दिऱ्हाम देत आणि हे टोळीप्रमुख ज्याला आपला वारस नेमतील त्याला टोळीप्रमुख करण्याची हमी दिली जाई; मग तो वारस त्याचा मुलगा असो की पुतण्या असो. तसेच टोळ्यांच्या अंतर्गत कारभाराची व्यवस्था पाहण्याच्या बाबतींत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले जाई. बोलावणे येताच लष्करी नोकरीत रुजू झाले पाहिजे या अटीवर याझिद दुसरा हा तीन हजार लोकांना पगार देत असे. सुरुवातीचे अब्बासी सुलतानसुद्धा खास कामगिरीसाठी टोळ्यांना असेच आर्थिक सहाय्य करीत. खलिफा मन्सूर याने बायझन्टीन सीमेवरील मालत्या ( मेलिटिन ) शहर वसविल्यानंतर मेसोपोटेमियांतील चार हजार सैनिकांना ( कारण हे लोक त्या शहरालगत राहात असत. ) तेथे स्थाईक केले व प्रत्येक सैनिकास त्याच्या पगाराशिवाय दहा दिनार खास अनुदान व शंभर दिनार खास भत्ता दिला. एखाद्या टोळीकडे मागितलेल्या सैनिकांची संख्या तिने पुरी न केल्यास त्याबद्दल तिच्याकडून नुकसानभरपाई घेतली जाई. या रकमेचा[1] उपयोग कमी पडलेल्या सैनिकांऐवजी दुसरे सैनिक भरती करण्यासाठी केला जाई.

धर्मनिष्ठेचा पहिला उत्साह ओसरल्यानंतर इस्लामच्या लष्करात नोकरी करणे हा ज्यांचा व्यवसाय होता ते लोक पगार मिळूनसुद्धा आपले कर्तव्य पार पाडण्याची टाळाटाळ करू लागले. उमाय्यद खलिफा अब्द् अल् मलिक याच्या कारकीर्दीत हज्जाज इब्ने युसुफ नावाचा इराकचा एक सुभेदार होता. त्याच्यासारखा एखादाच कार्यक्षम व निष्ठुर प्रशासक लोकांवर लढण्याची सक्ती करीत असे. पण त्याच्याएवढी सत्ता आणि प्रभावी चारित्र्य सर्वांपाशीच नसे. त्याने ८०/६९९ साली बसरा व कुफा या लष्करी शिबंदी असलेल्या दोन शहरांतून इराणवर चालून जाणाऱ्या सेनेस कुमक पाठविण्यासाठी वीस हजार सैनिक सक्तीने उभारले. तीन वर्षांनी खुरासानमधील मोहिमेसाठी आणखी एवढ्याच सैनिकांची मागणी त्याने कुफाकडून केली. भरती होणाऱ्या सैनिकांना पगार देण्यात येईल; पण पगार मिळाल्यानंतर कामावर रुजू होण्यात जे सैनिक तीन दिवसांपेक्षा अधिक विलंब लावतील त्यांना ठार करण्याचे मला हुकूम आहेत असे त्याने जाहीर केले. त्यापूर्वी खारिजी बंडखोरांविरुद्ध मोहिमांसाठी त्याने कुफा येथे सक्तीने सैन्यभरती केलेली होती. बलिष्ठ शबीबविरुद्ध तीन हजार सैनिक ७६/६९५ साली पाठविण्यात आले. त्यांपैकी एक हजार सैनिक सुरुवातीच्या सैनिकांपैकी होते व बाकीचे हज्जाजने कुफामधून सक्तीने भरती केले होते. कडक शिक्षेची धमकी देऊन, पुढे हज्जाजने आणखी एक सेना उभारली. तिच्यात सहा हजार सरदार व मोठे अधिकारी होते. पण बंडखोर शबीबने

---

१. या रकमेसाठी 'जुल' हा शब्द होता.

या सेनेविरुद्ध विजय मिळविला. एवढेच नव्हे तर पुढच्या वर्षी हज्जाजने पाठविलेल्या त्याहीपेक्षा बलिष्ठ फौजेविरुद्धही त्याने विजय मिळवला. हज्जाजने या मोहिमेसाठी चाळीस हजार सैनिक व दहा हजार तरुण पाठविले होते आणि कुफामधील प्रत्येक उपलब्ध पुरुषाची सक्तीने भरती केली होती.

सुलतानाशी एकनिष्ठ असणारे सैनिक आणि निर्वाहवेतन व 'अर्झाक'[1] (लढण्याचे साहित्य) मिळणारे टोळीवाले व इतर सैनिक हा केंद्रसत्तेने युद्धासाठी उभारलेल्या सेनेचा गाभा होता. कामावर रूजू होण्याचा हुकूम होताच त्यांनी रूजू झाले पाहिजे अशी अपेक्षा असे व तसे न करणारांना सक्तीने रूजू व्हावयास भाग पाडीत. याशिवाय नियमित भत्ता न मिळणारे पण जरूरीच्या वेळी खास अनुदान दिले की लष्करी नोकरी करणारे इतर लोक असत. याशिवाय केवळ धर्मावरील निष्ठेच्या उत्साहाने स्वखुषीने भरती झालेले स्वयंसेवकही (मुताताव्विअ) सैन्यात असत. ते स्वतःच्या खर्चाने येत व त्यांना लूट मिळाल्यास त्याचा काही[2] भाग मोहिमेचा खर्च भागविण्या-साठी त्यांना द्यावा लागे. स्वखुषीने या मोहिमेत भाग घेणारे स्वयंसेवक आणि 'झुंड' यांच्यातील फरक असा की, स्वयंसेवकांना आपल्या लष्करी नोकरीच्या मुदतीबाबत खलिफाशी करार करता येत असे. उमाय्यदांच्या (१३०/७४७-८) शेवटच्या लढायां-पैकी एका लढाईत खलिफा मारवान दुसरा याच्या बाजूने सीरिया आणि मेसोपोटेमियाचे चार हजार स्वयंसेवक सरदार लढले होते. त्यांच्या नोकरीच्या अटींत एक अट अशी होती की मोहिमेचे उद्दिष्ट साध्य झाल्यावर त्यांना घरी परतण्याची परवानगी देण्यात यावी.

उम्मायदांच्या कारकीर्दीचे शेवटी त्यांचे लष्करी बळ संख्येच्या दृष्टीने बरेच होते. शेवटचा खलिफा मारवान दुसरा याच्या कारकीर्दीत हिजाझ येथे बंड झाले. ते मोडण्या-साठी खलिफाने पाठविलेल्या ८० हजारांच्या फौजेत कुरेशींची काही पथके, अन्सार व साधे 'व्यापारी' होते. तसेच १३१ / ७४८-९ मध्ये बंडखोर अब्बासींच्या फौजा-विरुद्धच्या लढाईत एक लाख ते दीड लाख उमाय्यद सेना पाठविण्यात आली होती. तिच्यात मुख्यतः सीरियातील अरब टोळीवाले किंवा खुरासानमध्ये स्थाईक झालेले त्यांचे भाऊबंद होते. तथापि अब्बासींच्या फक्त २० हजार सैनिकांनी त्यांचा पराभव केला.

---

१. निर्वाहवेतन व 'अर्झाक' मिळणाऱ्यांना 'मुर्ताझाक' असे म्हणत. एकऱ्या इराकमध्ये हिजरी सन ६४ मध्ये असे ६०,००० 'मुर्ताझाक' होते. त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना वर्षाला ६ कोटी दिऱ्हाम भत्ता दिला जाई.

२. जियाद इब्ने अबी सुफ्यान याने हिजरी सन ५१ मध्ये रबी इब्ने जैद याची खुरासानचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. 'मोहिमेच्या खर्चासाठी 'झुंड'ने काही वाटा द्यावा असा हुकूम त्यानेच प्रथम काढला.' अशा वाट्याला 'तनाहुद' असे म्हणत.

सुरुवातीच्या काळातील अब्बासी– लष्कराच्या सामर्थ्याचे मूळ, अबु मुस्लिमने उभारलेल्या खुरासानी टोळीवाल्यांच्या सेनेत होते. अबु मुस्लिम हा अब्बासींचा प्रचारक होता व त्याच्यामुळेच अब्बासींच्या सत्तेचा उदय झाला. छोट्या प्रमाणात सुरुवात करून त्याने १२९ । ७४६–७ मध्ये सात हजारांची फौज उभारली. फौजेतील सैनिकांना मधूनमधून छोट्या रकमा भेट[१] देऊन आपल्याशी एकनिष्ठ राहण्यासाठी अबु मुस्लिम सैनिकांना प्रवृत्त करीत असे. एक वर्षानंतर आणखी कित्येक हजार लोक त्याला मिळाले. त्यांत केवळ खुरासानमधील रहिवाशीच होते असे नव्हे तर, उमाय्यद फौजांतून फुटलेले सैनिकही होते.

मुतासिम २१८/८३६ मध्ये गादीवर येईपर्यंत जवळजवळ एक शतक अब्बासी फौजेमध्ये व खलिफाच्या शरीररक्षक दलामध्ये प्रामुख्याने खुरासानचे रहिवासीच होते.[२] बायझन्टीनवर केलेल्या हल्ल्यांत त्यांचाच उपयोग मुख्यतः केला गेला. तसेच इतर मोहिमांतही त्यांचा उपयोग करण्यात आला. १६२/७७८-९ मधील मोहिमेत खुरासानच्या तीस हजार सैनिकांनी भाग घेतला. इतर मोहिमांतही त्यांनी कमीअधिक संख्येने भाग घेतला. अर्थात खुरासानींची फौज ही काही खलिफाची एकमेव फौज नव्हती. बगदादचा संस्थापक खलिफा मन्सूर याने आपल्या फौजेत अनेक अरब ठेवले होते. त्यांत उमाय्यदांच्या फौजेतून फुटलेले काही अरब होते व बाकीच्या अरबांत मुदारच्या उत्तर अरबस्तानी राज्य संघातील, तसेच येमेनच्या दक्षिणेकडील टोळ्यांपैकी व रबिया राज्यसंघांतील काही अरबांचा समावेश होता. इतर अरब प्रदेशांतूनही मिळतील तेवढ्या सैनिकांचा उपयोग करण्यात आला. उदा. भारतावर १५९–७७६ मध्ये समुद्रमार्गे केलेल्या स्वारींत भाग घेतलेल्या सैनिकांत, बसऱ्याच्या अजनाद किंवा इतर टोळ्यांमधून भरती केलेले दोन हजार लोक, सीरियन प्रमुखाचे नेतृत्वाखालील सात हजार सीरियन, मूळ इराणातले, पण बसऱ्यात स्थायिक झालेले चार हजार सरदार व अनेक स्वयंसेवक यांचा समावेश होता. स्वयंसेवकांपैकी पंधराशेजणांनी सीमारक्षक म्हणून काम केले. याशिवाय एक हजार सामान्य नागरिक होते. ते आपला पैसा बरोबर घेऊन गेले

---

१. माणशी ३ दिऱ्हाम व शिवाय जादा ४ दिऱ्हाम भेट म्हणून दिली जाई असा उल्लेख आढळतो.

२. खुरासान व बगदाद यांचे संबंध दीर्घकालपासून चालत आले होते. याचे द्योतक अशा एका घटनेचा उल्लेख आढळतो. खुरासानच्या फौजांच्या जागी तुर्की फौजा आल्यानंतर मुहतादी याच्या कारकीर्दीत ( २५५/८६९ मध्ये ) खुरासानचे सैनिक खलिफाच्या शहरी आले. खुरासानी सैनिकांसाठी पूर्वी उभारलेल्या निधींतून आपणास पैसे मिळतील अशी त्यांची अपेक्षा होती. पण एका ठगाने त्याआधीच तो निधी लांबविला असल्याचे त्यांना समजले.

होते. खलिफा अमीनने आपला भाऊ मामुन याच्या फौजेविरुद्ध लढण्यासाठी सीरिया-मध्ये एक सेना उभारली होती. मामुनच्या फौजेचे नेतृत्व ताहिरकडे होते. सीरियामधील टोळ्यांचे प्रमुखही एकामागून एक आपल्या फौजा घेऊन आले. पण बगदादमधील खुरासानी फौजांशी त्यांचे जमले नाही व अखेर ते आपल्या घरी परत गेले.

इतिहासकार तबरीने १९३/८०८–९ मधील घटनांची नोंद करताना 'तुर्की'[1] पगारी फौजांचा प्रथमच उल्लेख केला आहे. अब्बासी खलिफांच्या इतिहासात खडी फौज म्हणून पगारी तुर्की सैनिकांनी पुढे महत्त्वाचा भाग घेतला. यावेळी हे सैनिक बंडखोर रफि इब्ने लेथ याच्या बाजूने सरकारी फौजांचा प्रमुख मामुन याच्याविरुद्ध लढले. दोन वर्षांनी तुर्क, ख्वाराजम व बुखाराचे लोक मामुनच्या बाजूने त्याच्या भावाविरुद्ध–अमीनविरुद्ध लढले. खलिफा मुतासिम २१८–८३३ मध्ये गादीवर आल्यानंतर बगदादमधील इराणी 'झुंड'ने खलिफाचा पुतण्या अब्बास (मामुनचा मुलगा) याच्या बाजूने बंड केले. पण त्याने स्वतःच मुतासिमची सत्ता मान्य केल्यामुळे ते बंड शमले. पण इराणच्या फौजांबद्दल खलिफाच्या मनातील अविश्वास तसाच कायम राहिला. त्याने तुर्कीभाषी पूर्व इराणी प्रांत व ट्रान्सऑक्सियानामधील लोकांना खरेदी करून किंवा इतर मार्गाने त्यांची मोठी सेना उभारली. पुढे २१९/८३४ साली खलिफाने ही सेना बगदादमध्येच ठेविली आणि आपल्या प्रचंड तुर्की शरीर-रक्षकदलासह त्याने तेथून आपला दरबार हलविला. तो प्रथम काबूलला व नंतर सामाराला[2] गेला.

अरबांबद्दलच्या अविश्वासामुळे आणि तुर्की सैनिकांना द्यायला पैसा हवा म्हणून खलिफाने इजिप्तमधील पगार-यादीतून अरबांची नावे काढून टाकण्याचा हुकूम दिला. परिणामी गादीवर आल्यानंतर एका वर्षाने त्याच्या नोकरीत अरब सैनिक शिल्लक राहिले नाहीत. त्यांच्या जागी परकीयांची भरती करण्यात आली. अहमद इब्ने तुलुनने सत्ता बळकावीपर्यंत हे चालू राहिले.

मुतासिमने आपली फौज केवळ तुर्कीपुरतीच मर्यादित ठेवली नाही. निरनिराळ्या ठिकाणांहून त्याने लोकांची भरती केली. त्यांतले काही गुलाम तर काही स्वतंत्र होते. पश्चिमे (माघ्रिब) कडच्या सैनिकांची त्याने एक निराळी सेना उभारली. दोन्ही सेना २२३ / ८३८ साली अमोरियमवरील वेढ्याच्या वेळी बायझन्टीयनांविरुद्ध लढल्या. तुर्कांवरील मुतासिमच्या विश्वासाचे एक प्रतीक असे की, आशिया मायनरवरील

१. व्यापक अर्थाने परकी सैनिकांचा उल्लेख 'तुर्की' या शब्दाने केला जातो.

२. हरून अल् रशीद यानेही असेच बगदादहून रक्काला स्थलांतर केले होते.

स्वारीसाठी पाठविलेल्या[1] फौजेचे नेतृत्व अशनास आणि अफशिन यांच्याकडे संयुक्तरीत्या होते. त्यापैकी निदान अशनास तरी तुर्क होता.

फरघानातील लोक, निग्रो व इजिप्शियन्स यांची भरती करून पगारी फौजांची संख्या वाढविण्यात आली. मुतावक्कील २३२।८४७ साली गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीतही या लोकांच्या पगारापोटी खजिना आटून गेला. खलिफा पगार देताना पक्षपात करून काही फौजांना विशेष खूष करी. त्यामुळे तो स्वतःच अडचणीत आला होता. गादीवर आल्यावर त्याने नव्या भरती झालेल्या सैनिकांना (शाकिरिया[2]) आठ महिन्यांचा पगार दिला. मात्र अगोदरच्या तुर्कांना आणि माग्रिबींना खूपच कमी पगार दिला तेव्हा त्यांनी तो घेण्याचे नाकारले. पण गुलाम सैनिकांना सैन्य सोडून स्वतःला विकण्याची मोकळीक देऊन आणि स्वतंत्र सैनिकांना "मी तुमची आदर्श सेना बनवितो" असे आश्वासन देऊन त्याने असंतुष्टांचे समाधान केले.

खडी फौज एकनिष्ठ राहावी यासाठी बरेच परिश्रम व काळजी घेण्यात येत असे. आपण ज्याला गादीचा वारस नेमू त्यालाही या खड्या फौजेची निष्ठा लाभावी अशी सुलतानाची इच्छा असे. म्हणून तिजोरीतून प्रथम खड्या फौजेचा पगार भागविला जाई. आणि काही कारणाने तो मिळाला नाही तर ते भयंकर दंगा करीत. पण असंतोषाचे दुसरे काही कारण असेल तेव्हा पगार देऊनही त्यांच्या निष्ठेविषयी खात्री बाळगता येत नसे. अनेक जण सैन्यांतून फुटून दरोडेखोर बनत. लष्करी गणवेषांत वावरणे म्हणजे डाकूगिरी[3] असे समीकरण बनले होते.

मुतावक्कीलचा खून सामारा येथे त्याचा एक तुर्की सरदार बाघीर याने केला तेव्हापासून खलिफा हा आपल्या रक्षकांच्या ताब्यातील निव्वळ एक प्राणी बनला. रक्षकांचे परस्परविरोधी गट खलिफाला आळीपाळीने आपल्या ताब्यात ठेवीत. आणि लोकांना त्याच्याबद्दल वाटणाऱ्या निष्ठेचा फायदा घेत. रक्षकांचा एक गट बगदादला परत आला आणि त्यांच्यातील परस्परविरोधी गटांच्या भांडणात सामान्य नागरिकांचे बरेच

---

१. मायकेल सायरस यांच्या मते मुतासिम याच्या सैन्यात ८० हजार सैनिक होते आणि त्याच्याबरोबर ३० हजार व्यापारी व माल पुरविणारे होते.

२. 'चाकीर' ('नोकर' किंवा 'उमेदवार') या मूळ इराणी शब्दातून 'शाकिरिया' हा शब्द आला आहे. 'झुंड 'हून भिन्न असे जे 'तरुण' होते त्यांच्या संदर्भात हा शब्द वापरला जातो. त्यामुळे हे भरती केलेले लोक असावेत असे वाटते.

३. मामुनच्या पदरी असलेला प्रसिद्ध शास्त्रज्ञ बानु मुसा याचा पिता विद्वान पंडित नव्हता तर " 'झुंड'च्या बुरख्यात लपलेला लुटारू व दरोडेखोर होता" असे 'तारिक अल् हुकामा' या पुस्तकात म्हटले आहे.

हाल झाले. पुढे बाघीरचा त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी खून केला. त्याच्या खुनासंबंधींच्या काही कवितांत राजधानीतील त्या वेळच्या निरपराध नागरिकांच्या दुर्दशेचे विदारक वर्णन केलेले आहे. घोड्यांवरून किंवा पायी संचार करणाऱ्या तुर्क, माघ्रिबी व फरघानी या सशस्त्र टोळ्यांनी आपसांतील भांडणात शहर उद्ध्वस्त करून टाकले होते.

सामारा येथे राहिलेल्या तुर्की रक्षकांनी २५१/८६५ साली मुतावाक्कीलच्या जागी मुताझची खलिफापदावर निवड केली. तर बगदादमधील रक्षकांनी मुस्ताइनला खलिफा म्हणून मान्यता दिली. मुताझने नेमलेल्या नव्या अधिकाऱ्यांसंबंधींच्या वृत्तांतात असा उल्लेख आहे की एक अधिकारी हारासचा (खलिफाचे शरीररक्षक) प्रमुख होता, दुसरा अधिकारी तुर्कांच्या युद्धकचेरीचा प्रमुख होता आणि तिसरा खजिन्याचा आणि तुर्क, माघ्रिब व शाकिरिया यांचे पगार देण्याच्या खात्याचा प्रमुख होता.

मुताझची सत्ता वरचढ होती त्या काळात बगदादमधील तुर्कांबद्दलची आपली जबाबदारी तो पार पाडीनासा झाला. पगारासाठी तुर्की रक्षक दंगा करीत आहेत असे त्याला सांगण्यात आले तेव्हा आपणाला त्यांची जरूर नाही, आपण त्यांना मदत करणार नाही असे त्याने जाहीर केले. त्यानंतर तुर्क व इतर शरीररक्षकांच्या हालचालीं-संबंधीचे जे वृत्तान्त उपलब्ध आहेत ते मुख्यतः पगारास विलंब झाल्याने त्यांनी केलेल्या दंगलीबाबत आहेत. परदेशी मोहिमांत या तुर्की शरीररक्षकांनी प्रभावीपणे भाग घेतल्याची नोंद नाही. बायझंटीन हल्ल्यापासून संरक्षण करण्याचे काम प्रामुख्याने खलिफाच्या सैनिकांच्या शिरावर पडले होते. देशात असत तेव्हाही हे तुर्की शरीररक्षक त्यांना मिळणाऱ्या पगाराइतकेही काम करीत नसत. संख्येने तीन हजारांपेक्षाही[1] कमी असलेल्या अशा पाखंडी करामातींनी बगदादवर चाल केली तेव्हा त्यांच्या प्रतिकारासाठी पाठविलेल्या ८० हजार फौजेचा करामातींनी धुव्वा उडविला. आपल्या दिवानमध्ये अशा कामचुकार एक लाख पगारी सैनिकांची नोंद असल्याची तक्रार खलिफा मुहतादीने आपल्या शेवटच्या आजारात केली होती.

तुर्की शरीररक्षक सैनिकांतील भेकडपणाचे अंशतः कारण अकार्यक्षम नेतृत्व हे होते. मुवाफ्फक व त्याचा मुलगा अबुल अब्बास यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखाली उभार-लेल्या फौजा दक्षिण इराकमधील दलदलीच्या बिकट प्रदेशांतही झांज बंडखोरांविरुद्ध प्रभावी ठरल्या होत्या, आणि मजूर मिळत असतानाही वेढा दिलेल्या शहरांच्या भिंती-खाली सुरुंग पेरण्याचे अवघड कार्य त्यांनी साध्या हत्यारांनी केले होते.

मध्यवर्ती सत्ता जेव्हा प्रबळ होती आणि तिजोरीत कराचा पैसा जमा होत असे अशा काळी या खड्या फौजांना त्या पैशातूनच पगार व भत्ते दिले जात. काही

---

१. हे सैनिक १५०० किंवा २७०० होते असेही म्हणतात.

फौजांना पगाराच्याशिवाय किंवा त्याऐवजी जहागिऱ्या दिल्या जात. मन्सूरने मासिसा (मॉपस्वेसटिया) येथील शिबंदीस पगाराच्याव्यतिरिक्त जमिनी दिल्या, पण मन्सूर-मागून आलेल्या माहदीने ही प्रथा बंद केली असे सांगण्यात येते. पुढे तिजोरीतल्या पैशातून जेव्हा सैनिकांचा पगार भागविता येईनासा झाला तेव्हा तुर्की रक्षकांच्या प्रमुखांना प्रांतांतील जमिनी देण्यात आल्या. अट एवढीच की त्यांनी तेथे शांतता व सुव्यवस्था राखून वर्षाला काही रक्कम राजधानीस पाठविली पाहिजे. या व्यवस्थेचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे बायाकबाक (बाबाक्याल) याला इजिप्तमधील बरीच मोठी जमीन जहागीर म्हणून मिळाली. तो स्वतः बगदादला राहात असे. जमिनीची व्यवस्था पाहण्याचे काम त्याने अहम्मद इब्ने तुलुनकडे सोपविले. खलिफा मुहतादीच्या हुकुमाने बायाकबाक याला ठार करण्यात आले. त्यानंतरही त्याचा इजिप्शियन जमीन-जुमला अहमदाच्या नियंत्रणाखाली राहिला. पुढे काही वर्षांनी देशाची सत्ताच अहमदाच्या हाती आली.

नंतरच्या काळात अनुदान पद्धतीचा सर्वात जास्त उपयोग सेल्जुकांनी केला. याचे एक प्रमुख उदाहरण म्हणजे सेल्जुक सुलतान अहमद याने ५१५ । ११२१ मध्ये अमीर अक्सुनकर यास युद्धातील कामगिरीबद्दल मोसुल शहर व त्याच्या आसपासच्या जमिनी दिल्या. सेल्जुक काही श्रीमंत नव्हते. काही वेळा सैनिकांचे पगारही देणे त्यांना कठीण जाई. पण त्यांनी शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण व्हावे म्हणून त्यांना काही संरक्षक हक्क देऊन त्यांच्यांकडून काही ठराविक रकमा गोळा करण्याची पद्धत अवलंबिली. तसेच शिक्षेपोटी त्यांच्या बायकामुलांचा ते छळ करीत नसत.

अनुदान पद्धतीचा दुरुपयोग होऊ लागला तेव्हा सर्वसामान्य सैनिकांत आणि शेतकऱ्यात ती पद्धती अत्यंत अप्रिय झाली. कारण प्रमुख अधिकारी जमिनीची नीट व्यवस्था पहात असले तरी सर्वसामान्य सैनिकांना शेतीची काही माहिती नव्हती. पाणी-पुरवठा, रस्ते वगैरेंकडे दुर्लक्ष करून त्यांनी जमिनीची थोड्याच अवधीत दुर्दशा करून टाकली. त्यामुळे आपणाला लष्करी सेवेबद्दलचा मोबदला जमिनीच्या स्वरूपात न देता दुसऱ्या कोणत्या तरी स्वरूपात द्यावा अशी अखेर त्यांनी मागणी केली.[1]

तुर्कांना अखेर बुवेहिदांनी अधिकारपदावरून पदच्युत केले. बुवेहिद अधिक संघटित असल्याने त्यांना ते शक्य झाले. बगदादमधील तुर्कांचे 'झुंड' या त्या काळात व नंतरच्या काळातही नागरिकांवर झडप घालून त्यांची लूट करणाऱ्या निर्नायकी टोळ्या बनल्या होत्या.

---

१. बुवेहिद मुइझ अल्-दावला ( ३३४ / ९४५–४६ ) याला आपल्या सैनिकांना पगार देणे शक्य झाले नाही किंवा तशी त्याची तयारी नव्हती तेव्हा त्याने त्यांना जमिनी दिल्या यासंबंधात हा उल्लेख आहे. परंतु त्यापूर्वीपासूनच या पद्धतीविषयी असंतोष होता.

तुर्की शरीरक्षकांचे प्रभुत्व असलेल्या काळात खलिफाच्या मुस्लिम साम्राज्यामध्ये इस्लामसाठी लढणारी अशी केंद्रीय सेना राहिली नाही. पण धोका निर्माण होताच मदतीस धावून येतील असे इस्लामच्या श्रद्धेने प्रभावीत झालेले काही निष्ठावंत लोक होते हे लक्षात घेतले पाहिजे. उमाय्यद हे एक निव्वळ लौकिक आणि अधार्मिक असे राजघराणे आहे असे समजले जात असले तरीही त्यांच्या बाजूने स्वयंसेवक लढले होते हे याअगोदर सांगितलेच आहे. असेच अनेक स्वयंसेवक मुस्लिम प्रदेशाच्या संरक्षणाची गरज उद्भवली तेव्हाही अब्बासींच्या निशाणाखाली जमा झाले व आशिया मायनरमधील बायझन्टीनांचे प्रदेशावर त्यांनी हल्ले केले. शत्रूने सीरिया, मेसोपोटेमिया व इतर इस्लामी प्रदेशांतील सीमांत शहरांवर ( तुघूर ) शत्रूंचे हल्ले झाले तेव्हा त्यांच्याविरुद्ध खलिफांची सेना लढली नाही तर स्थानिक रहिवासी लढले. " ज्यांच्याजवळ घोडे व शस्त्रे नव्हती असे लोक सोडून " बाकी सर्व रहिवाश्यांनी या लढाईत भाग घेतला. पाखंड्यांविरुद्ध लढण्यासाठी आपल्या फौजा पाठविण्याची खलिफाची इच्छा नसे किंवा त्याला ( उदाहरणार्थ, मुस्ताईन ) ते शक्य नसे तेव्हा आक्रमित प्रदेशापासून दूर अंतरावर राहणारे मुस्लिमदेखील सीमांचे रक्षणार्थ लढणाऱ्या आपल्या धर्मबांधवांच्या मदतीसाठी माणसे व लष्करी सामग्रीच्या स्वरूपात मदत पाठवीत.

एखाद्या बंडखोराविरुद्ध किंवा पाखंड्याविरुद्ध आपल्या प्रदेशाच्या जवळच सामना देणे आवश्यक झाले तर खलिफाला किंवा त्याने सक्तीने फौज उभारण्याचा अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याला अनेकदा स्थानिक मदतीवर विसंबून राहावे लागे. खलिफा मुतामिदबाबत तेच झाले. २५७ / ८७१ मध्ये आपल्या खासगी कारभाऱ्याच्या नेतृत्वाखाली झांजविरुद्ध लढण्यासाठी पाठविलेल्या फौजांचा पराभव झाला तेव्हा मुतामिदने अहमद अल् मुवाल्लिदला बसऱ्यास पाठविले. तेथे त्याला मोठ्या संख्येने लोक मिळाले. त्यांत बहुतेक स्वयंसेवक होते. लढाईचे शिक्षण व कौशल्य यांचा त्यांच्यात अभाव असल्याने लढाईचा सराव व निर्धार असलेल्या शत्रूच्या फौजेने त्यांचा विनासायास धुव्वा उडविला. मुतातावियांची नेमणूक करण्यात दुसरा तोटा म्हणजे लष्करी गरजेनुसार लादल्या जाणाऱ्या समाईक शिस्तीखाली ते येत नसत. ते जसे स्वेच्छेने येत तसेच स्वतःच्या लहरीनुसार निघून जात. उमाय्यदांच्या कारकीर्दीत असाच एक प्रसंग घडला. त्याचे वर्णन यापूर्वीच केले आहे. तबरीने दुसरे एक उदाहरण दिले आहे. बाबक या खुर्रामी पाखंड्याविरुद्ध दीर्घकाळ लढाई झाली. त्याचे वर्णन करताना तो म्हणतो, विजय अशक्य दिसू लागला तेव्हा स्वयंसेवकांनी घरी परतण्याचा निर्णय घेतला.

जेव्हा खलिफाची सत्ता सर्वश्रेष्ठ होती; त्याचे अधिकार व प्रभाव अबाधित होता तेव्हा राज्याची लष्करी संघटना बऱ्याच प्रमाणात कार्यक्षम होती. केंद्रीय सरकार दिवान अल् जैश ( लष्कर खाते ) मार्फत लष्कराचे काम पाही. सैनिकांची भरती व त्यांचा पगार

यास हे खाते जबाबदार होते. अर्थात स्वतः खलिफा किंवा त्याचा वझीर हेही त्यात लक्ष घालीत. कारण राज्याच्या दृष्टीने या बाबी सर्वांत महत्त्वाच्या समजल्या जात. लष्करी धोरण अखेर खलिफाच ठरवी. युद्धाला आणि शांततेला तोच जबाबदार असे. त्याच्या स्वतःच्या रक्षणासाठी सैनिक असत. युद्धाच्या किंवा शांततेच्या काळात खलिफाचे संरक्षण करणे हेच त्यांचे काम असे. त्या काळात युद्ध ही नित्याची बाब होती. युद्ध करणे शक्य नसेल तेवढ्या काळापुरती शांतता असे. जेव्हा एखादा परकी पाखंडी किंवा बंडखोर मांडलिकासारख्या प्रबळ शत्रूविरुद्ध सैन्य पाठविणे आवश्यक ठरे तेव्हा शरीर-रक्षक दलांत टोळीवाल्यांची भरती करण्यात येई. टोळ्यांचे नायक या बाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावीत. कारण तेच टोळ्यांना युद्धासाठी तयार करीत. प्रत्येक टोळी आपल्या 'रईस'च्या सांगण्यावरून एकत्र येई, कूच करी व लढे. युद्ध आणि सर्वसाधारण व्यवस्था या गोष्टी केंद्रीय सत्तेकडे सोपविल्या होत्या.

तुर्की शरीररक्षकांच्या हकालपट्टीनंतरच्या काळात खलिफाच्या पूर्वेकडील राज्यात बुवेहिदांचीच केंद्रीय सत्ता होती. त्यांची संघटना निश्चितपणे लष्करी होती. पण इतिहास-कारांनी या गोष्टीवर फारसा प्रकाश पाडलेला नाही. इब्ने अल् असीर याने लिहिलेल्या इतिहासाची अनेक पाने बुवेहिदांच्या मोहिमांच्या वर्णनांनी भरलेली आहेत. पण त्यांच्या लष्कराची संघटना किंवा युद्धाची पद्धती यासंबंधींचा फारच थोडा तपशील त्याच्या इति-हासात सापडतो. लुटीचा वाटा आपणाला मिळाला पाहिजे या अटीवरच डेलाइट टोळीवाले बुवेहिद सरदारांच्या नेतृत्वाखाली लढले असे दिसते. कारण त्यांना पगार मिळाला नाही तेव्हा इतर टोळीवाल्यांप्रमाणे त्यांनीही दंगल केली. फौजा पुढे सरकू लागल्या तसतसे निरनिराळ्या वेळी जिंकलेल्या प्रदेशांतील लोक आणि टोळ्यांचे नायक व त्यांचे परिवार लाभाच्या आशेने त्यांना येऊन मिळाले. बुवेहिदांच्या पद्धतींत स्वेच्छेने भरती झालेल्यांना महत्त्वाचे स्थान नव्हते.

बुवेहिदांना पुढे सेल्जुकांनी पदच्युत केले. सेल्जुकांसंबंधी बरीच माहिती उपलब्ध आहे. गझनीच्या मुहम्मदाशी ४२०/१०२९ मध्ये त्यांची लढाई झाल्याचे सांगण्यात येते. सेल्जुकांनी मुहम्मदाच्या प्रदेशावर स्वारी केली होती. मुहम्मदाने त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला व बुखाराबाहेर मोकळ्या प्रदेशात त्यांच्यावर हल्ला केला. दोन हजार तंबूत राहतील एवढी बुवेहिद सैनिकांची संख्या होती. मुहम्मदाने हल्ला केला तेव्हा सेल्जुक सैन्य इस्पहानकडे निघण्याच्या तयारीत होते. या घुझ तुर्कांची दुसरी शाखा त्या वेळी तुघरिल, बेग, दाऊद आणि याबघू यांच्या नेतृत्वाखाली ट्रान्सऑक्सियानात होती आणि ते दक्षिणेकडे व पश्चिमेकडे जात होते. ही शाखा संख्येने त्या वेळीसुद्धा फार मोठी असली पाहिजे. कारण मुहम्मदाला त्यांच्यासंबंधी माहिती मिळाली तेव्हा त्याने सेल्जुक इब्ने लुकमनच्या चार मुलांशी वाटाघाटी सुरू केल्या. "भारतातील स्वारीसाठी मला तुमची मदत लागेल. तुम्ही काय मदत देऊ शकाल?" असे त्याने विचारले. ही

विचारणा म्हणजे सेल्जुकांच्या लष्करी बळाची काहीशी कल्पना यांच्याकडूनच मिळावी या उद्देशाने केलेली एक बतावणी होती. सेल्जुक प्रतिनिधीजवळ एक धनुष्य होते व त्याच्या कमरपट्ट्यास दोन बाण होते. त्यांपैकी एक बाण मुहम्मदास देऊन तो म्हणाला, "तुला मदतीची जरूर भासेल तेव्हा हा बाण पाठव. एक लाख घोडदळ तुझ्या मदतीस येईल." "आणखी मदत लागल्यास काय करावयाचे ?" असे मुहम्मदाने विचारताच तो प्रतिनिधी म्हणाला, "दुसरा बाण पाठव. आणखी पन्नास हजार घोडदळ तुझ्या मदतीस येईल." "हे सैन्यही अपुरे पडले तर ?" मुहम्मदाने पुन्हा प्रश्न केला. तेव्हा सेल्जुक सेनानीने त्याला धनुष्य दिले व म्हणाला, "हे धनुष्य तुर्कस्तानला प्रतीक म्हणून पाठव. तुला दोन लाख सैनिकांची गरज लागली तरी ते मिळतील."

सेल्जुकांची त्या सुरुवातीच्या काळातील परिस्थिती पाहता हे आकडे अतिशयोक्तिपूर्ण आहेत यात शंका नाही. पण एकदा मोहिमांना गंभीरपणे प्रारंभ झाल्यानंतर सेल्जुकांच्या फौजेत निरनिराळ्या टोळ्यांतील लोकांची भरती होत गेली. त्यात स्वकीय होते तसेच परकीय होते. त्यांना त्यांनी आपले गुलाम केले किंवा त्यांच्याशी दोस्ती केली. अझरबैझानमध्ये व इतरत्र तुघरिल बेगला हे राजे शरण आले. त्यांनी आपल्या झुंडी (पथके) त्यांच्या दिमतीस दिल्या आणि काही वर्षांनी तुबतागिन या तुर्कोमन अमीराने बायझन्टीन प्रदेशावर हल्ला केला तेव्हा त्याने आपल्यास येऊन मिळण्याबद्दल सेल्जुक सुलतान अल्प अर्सलान याचे मन वळविले. अल्प अर्सलानने आशिया मायनरमधील अनेक शहरे जिंकली. तेथील रहिवासी त्याच्या झुंडीत सामील झाले. तसेच मंझीकर्टच्या निर्णायक लढाईत (४६३।१०७०) बायझन्टीनांचा पराभव होऊन त्यांचा बादशहा रोमानुस डायोजिनिस पकडला गेला (त्या लढाईमुळे पूर्वेकडील आशिया मायनरमधील रोमनांचे प्रभुत्व संपुष्टात आले.) तेव्हा झालेल्या शांततेच्या करारातील एक अट अशी होती की, 'जेत्याने' मागणी करताच त्याला विशिष्ट संख्येने फौजा पुरविल्या पाहिजेत.

परकीय सैनिक व सेल्जुक सैनिक यांची मिश्रित सेना हा एक ठरलेल्या धोरणाचाच भाग झाल्याचे दिसते. लागोपाठ तीन सुलतानांचा प्रधानमंत्री असलेला निजाम-अल् मुल्क 'सियासतनाम्या' (शासनविषयक प्रबंध) त म्हणतो, "एकजुटीने होणाऱ्या बंडाचा धोका टाळण्यासाठी सैन्यात निरनिराळ्या जमातींचे लोक असले पाहिजेत." म्हणून राजप्रासादाच्या रक्षक दलात दोन हजार डेलामी व खुरासान आणि जॉर्जिया व फार्समधील काही लोक असावेत अशी सूचना त्याने केली. निजाम अल् मुल्कचे हे तत्त्व अंशतः गझनीच्या मुहम्मदाच्या पद्धतीवर आधारलेले होते. मुहम्मदाने आपल्या सेनेत तुर्क, खुरासानी, अरब, हिंदू, डेलामी व असेच इतर निरनिराळ्या राष्ट्रांचे व वंशांचे लोक घेतले होते. या फौजेतील प्रत्येक 'राष्ट्रा'च्या गटाने रात्रीच्या पहाऱ्यासाठी किती सैनिक पुरविले पाहिजेत हे त्याला कळविण्यात येई. त्याने कोठे पहारा करावयाचा हेही ठरवून दिले जाई. दुसरा गट आपल्याविरुद्ध कागाळी करील या भीतीने कोणत्याही

गटास पहाट संपेपर्यंत आपणास नेमून दिलेल्या जागेपासून हलण्याचे धैर्य होत नसे. लढाई दिवसा झाली तर प्रत्येक गट स्वतंत्र पथक म्हणून लढे.

सेल्जुकांचे राज्य लष्कराच्या आधारानेच चाललेले असल्याने आपल्या सुलतानाची फौज चार लाख होती असे निजाम अल् मुल्कने म्हटले आहे यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ही फौज सत्तर हजारांपर्यंत कमी करावी अशी सूचना शांततेच्या काळात एका दूताने सुलतानास केली होती. तेव्हा ही सूचना मान्य केली तर राज्याला धोका निर्माण होईल, उलट फौज सात लाखांपर्यंत वाढविली पाहिजे; म्हणजे राज्याची समृद्धी होईल, असे मत निजामाने व्यक्त केले.

हे सर्व सैनिक नेहमी एकाच भागात नोकरीला असत असे नाही. गझनवीं-विरुद्धच्या लढाईत सुलतान मलिकशहाचे सेनेत शेहेचाळीस हजार सैनिक होते असा उल्लेख आढळतो. तर मंझीकर्टच्या लढाईत शत्रूजवळ दोन लाखांची फौज होती; पण सुलतान अल्प अर्सलान मात्र पंधरा हजारांपेक्षा अधिक सैनिक उभारू शकला नाही.

पैगंबरांप्रमाणेच खलिफा हा त्या काळात तत्त्वतः नसला तरी प्रत्यक्षात मात्र इस्लामी फौजांचा सर्वश्रेष्ठ प्रमुख होता. फौजांचा उपयोग करण्याचा आणि लष्करी सामग्रीची विल्हेवाट आपल्या इच्छेप्रमाणे लावण्याचा अधिकार त्यास होता. हरून अल् रशीदने आपला मुलगा मामुन याला खुरासानमधील आपल्या गादीचा वारस करण्याचे ठरविले तेव्हा त्याने काझी व इतर प्रमुख व्यक्तींना बोलावून घेतले आणि त्यांना सांगितले, “ आता यापुढे आपल्या सैन्यांतील पैसा, खजिना, शस्त्रे, घोडे व इतर सामग्री आपला मुलगा मामुन याच्या हाती राहील, दुसऱ्या कोणाच्याही हाती राहणार नाही. या गोष्टीला तुम्ही साक्षी आहात. ” बायझन्टीनांविरुद्ध झालेल्या लढायांत स्वतः हरूनने अनेकदा फौजांचे नेतृत्व केले होते आणि हरून अल्पवयीन होता त्या वेळीही बर्मिसाईड कुटुंबाच्या एका सभासदाच्या पालकत्वाखाली त्याला एका फौजेचे नाममात्र प्रमुखपद देण्यात आले होते.

पैगंबर किंवा खलिफाच्या खालोखालचे स्थान त्यांनी नेमलेल्या सेनानींना असे. कधी कधी खलिफा स्वतःच्या मुलांनाच सेनानीपद देई. पण अनेकदा युद्धाचा अनुभव असलेल्या लोकांना सेनापतीपद दिले जाई. हे सेनापती स्वतःच आपले अधिकारी नेमीत व काही अपवाद वगळता या नेमणुका करताना लष्करी कौशल्य हीच पहिली कसोटी मानली जाई. अंदालुसिया जिंकणारा तारीक इब्ने झैद हा बंधमुक्त गुलाम होता. नंतरच्या काळात गुलामानांही सेनापती करण्यात आले. पण पुष्कळदा त्यांनी स्वतःच ते

पद[1] बळकाविलेले आहे. सरसेनापतीच्या नेतृत्वाखाली असलेले टोळ्यांचे नायक सर्व-साधारणपणे आपल्या नेतृत्वाखालील लोकांना लढाईवर पाठवीत. पण हे नायक काही कारणांनी गैरहजर राहिले तर सरसेनानी त्यांच्या जागी दुसरे कार्यक्षम सेनानी नेमीत असे. पैगंबरांच्या मृत्यूनंतर काही काळ टोळ्यांमधील वेगळेपणाची जुनी भावना काही टोळ्यांमध्ये पुन्हा डोके वर काढू लागली. उदा. यार्मुकच्या लढाईत मुस्लिम फौजांचा प्रमुख कोण असावा याबद्दल वाद निर्माण झाला तेव्हा एकमेकांशी विचारविनिमय न करता किंवा एकमेकांचे सहकार्य न घेता प्रत्येक टोळी प्रमुखाने आपापले लोक घेऊन स्वतंत्रपणे लढाईला जाण्याची तयारी केली.

लष्करात वरिष्ठ-कनिष्ठ क्रमवारीची पद्धती उमरने सुरू केली असे सांगण्यात येते. त्याने मुहम्मदांची पद्धती हा पाया धरला. इराणवर स्वारी करणाऱ्या सेनानीला त्याने जे पत्र लिहिले त्यांत या पद्धतीचा उगम आहे असे म्हटले जाते. हा सेनानी त्या वेळी कादिसिया येथे होता. फौजेचे दहा भाग पाडावे, अरीफ व अमीर यांच्या नेमणुका कराव्या आणि सबंध फौजेची ताबियाचे स्वरूपात ( लष्करी पंक्तींच्या स्वरूपात ) उभारणी करावी असे या पत्रात हुकूम दिलेले होते. सबंध फौजेचे दहा दहाचे गट पाडावे; प्रत्येक दहाच्या गटावर[2] ( इराफावर ) त्यांच्यातलाच एक प्रमुख नेमावा ( अरीफ ) असेही हुकूम या पत्रात होते. वरिष्ठतेच्या दृष्टीने या क्रमवारीत पहिला क्रम अमीराचा किंवा सरसेनानीचा. त्याखालोखाल तबिया विभागाचे प्रमुख, त्या खालोखाल दहाच्या गटांचे प्रमुख ( अरीफ ), त्याखाली ध्वजधारक[3] ( त्यांना श्रेष्ठ स्थान होते असे दिसते ) आणि शेवटी टोळ्यांचे नायक असा क्रम असे. पायदळ व घोडदळाचे वेगवेगळे सेनापती असत, पण त्यांचे स्थान क्रमवारीच्या यादीत स्पष्ट केलेले[4] नाही.

---

१. ' तुर्की ' सरदार बजकल व अल्-बरीदी यांच्यातील लढाईत अल् बरीदी याने आपला गुलाम अबु जाफर याला आपल्या सेनेचे प्रमुख नेमले होते. इजिप्तची सत्ता बळकावणारा अहमद इब्ने तुलुन हाही गुलाम होता आणि त्या देशातील मामुलक राजे हेही गुलाम होते.

२. दहाचा गट ( इराफा ) स्थापण्याची पद्धती पैगंबरांनीच सुरू केली असे मानले जाते. उमरच्या काळात असा गट पगारवाटपाच्या दृष्टीने सोयीचा समजला जात असे.

३. खलिद इब्ने वालीद हा प्रारंभी अमीर नव्हता, पण पैगंबरांच्या एका ध्वजाचा तो प्रमुख धारक झाल्यानंतर त्याने स्वतःच स्वतःकडे अमीरपद घेतले.

४. खलिफा अमीन याच्या फौजेत बाजारबुणग्यांचीच अधिक भरती होती. बगदादच्या वेढ्याच्या वेळी त्याची फौज अशाच पद्धतीने उभारलेली होती. प्रत्येक दहाच्या गटावर एक ' अरीफ ', दहा ' अरीफां 'वर एक ' काइद ', दहा ' काइदां 'वर एक अमीर अशी त्याची सैन्यरचना होती.

या लढणाऱ्या अधिकाऱ्यांशिवाय फौजेत हकीम, काझी, दाइय्या, राईद, दुभाषा व कारकून यांच्या नेमणुका केल्या जात. लूट वाटण्याअगोदर ती काझीचे ताब्यात दिली जाई. तिचे न्याय्य वाटप होते की नाही हे तो पाही. लोकांचे दावे 'दाइय्या' मांडी. छावण्यांसाठी जागा शोधणे हे 'राईद'चे काम असे.

सर्वसाधारण युद्ध संघटनेत लष्कराच्या खास शिक्षणाचा क्वचितच समावेश केलेला असे. मोठ्या प्रमाणावर हल्ले करण्याच्या कामात सैनिक मुख्यः गुंतलेले असत आणि हल्ले करण्याच्या कलेत टोळीवाल्यांना काही शिकविण्याची आवश्यकता नसे. खलिफाचे वैयक्तिक शरीररक्षक दल हा लढाऊ फौजेचा मुख्य कणा होता. त्याचे स्वरूप मात्र निराळे होते. त्याची अनेकदा पाहणी व चाचणी केली जाई. खलिफा मुतादिर स्वतः ही पाहणी व चाचणी करी. ठराविक दिवसांनी तो फौजांना राजधानीच्या कवायत मैदानावर जमा होण्याचा हुकूम देई. तेथे एक लक्ष्य ठेवून प्रत्येक सैनिकाचे नेमबाजीतील व घोड्यावर बसण्यातील कौशल्य यांची चाचणी घेतली जाई. चांगला, मध्यम किंवा निकृष्ठ अशा प्रकारे चाचणीसंबंधीचा शेरा नोंदबुकात नोंदला जाई व प्रत्येकाला द्यावयाच्या कामाचे स्वरूप त्यावर अवलंबून राही.

मैदानावरील कवायत चालू असो, कूच चालू असो किंवा लढाई चालू असो 'तबिया' मध्येच लष्कराची रचना सर्वसामान्यपणे केली जात असे. 'तबिया'-नुसार लष्कराचे पाच[१] मुख्य विभाग पाडलेले असत. मध्य, उजवी व डावी बाजू, आघाडी (मुकादमा) आणि पिछाडी (साका). प्रत्येक विभागातले लोक एकाच टोळीचे किंवा एकमेकांशी परिचित असत. मध्य विभागात अमीर व त्याचा फौजफाटा असे. दोन्ही बाजूंना दुय्यम सेनानी व त्यांचे सैन्य विभाग असत. मध्य-विभागाच्या पुढच्या बाजूस आघाडीचा विभाग असे. त्याला स्वतःचा सेनानी व ध्वज असे. साका म्हणजे पिछाडीचा विभाग. सामान, रसद, शस्त्रे, वेढा घालण्यासाठी लागणारी मोठी यंत्रे त्यांच्या ताब्यात असत. याशिवाय छोटी शस्त्रे धारण करणारांचे वेगळे विभाग (मुजारद), तसेच स्वयंसेवक दले किंवा आघाडीची दले (तालाई) असत. सैन्यरचनेचे निरनिराळे विभाग एकमेकांच्या नजिक किंवा परिस्थितीप्रमाणे एकमेकांपासून काही अंतरावर वस्ती करून राहात.

पाच विभागांत केलेली ही सैन्यरचना पैगंबरांच्या काळापासून अस्तित्वात होती. बद्र व ओहदच्या लढायांतील सैन्याची रचना अशाच प्रकारची होती. या पद्धतीच्या शोधा मुळे व तिच्या वापरामुळेच मुस्लिम सैन्यांना विरोधकांवर विजय मिळविता आले.

---

१. यावरूनच अरबी भाषेत काही वेळा सैन्यासाठी 'खामिस' (पाच) हा शब्द वापरला जातो. इब्ने खाल्दुनच्या मते ग्रीक व इराणपासून ही सैन्यरचना पद्धती घेतली आहे.

कारण विरोधक, हल्ल्याच्या जुन्याच विस्कळीत पद्धतींचा अवलंब करीत होते. या पद्धतीत पुढे काही बदल झाले असले तरी एकंदरीत इस्लाममध्ये सर्वमान्य सैन्यरचना म्हणून हीच पद्धती अनेक शतके रूढ होती. सैन्य रस्त्यावरून कूच करीत असो की कवायतीच्या मैदानावर असो, याच पद्धतीने त्याची रचना केलेली असे; पण प्रत्यक्ष लढाईत मात्र ही रचना नावालाच टिकलेली दिसते.

प्रथम अचानक हल्ला चढवायचा, लागलीच माघार घ्यावयाची व पुन्हा अचानक हल्ला चढवायचा ही लढाईची[1] पद्धत अरबस्तानात पैगंबरांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच्या काळात रूढ होती. पैगंबरांनी दीक्षा दिलेल्या सुरुवातीच्या मुस्लिमांनीही कुरेश टोळीवाल्यांवरील हल्ल्यासाठी याच पद्धतीचा अवलंब केला होता. त्या वेळी एकमेकांवर फारतर बाण फेकण्यात आले आणि आपले उद्दिष्ट न साधताच व स्वतःची व शत्रूचीही फारशी हानी न करता हे बाण परत आले. बद्रच्या लढाईपर्यंत (हि. स. २) पैगंबर लष्करी हालचालीसंबंधींच्या[2] ज्ञानात काही प्रमाणात तयार झाले होते. त्यांनी 'तबिया' पद्धतीची रचना त्या वेळी प्रथमच केली व त्यात बरेच यशही मिळविले. त्या वेळी त्यांच्याजवळ फक्त तीनशे लोक होते. त्यांत केवळ एक घोडेस्वार होता. पैगंबरांनी आपल्या सैनिकांची सरळ पद्धतीने रचना केली. स्वतः बाण घेऊन ते त्यांच्याबरोबर चालत आणि रांग मोडून पुढे येणाऱ्या सैनिकांना मागे सारीत. लढणाऱ्या सेनेच्या पिछाडीस 'साका' असे. सामान व वाहतुकीची जनावरे त्यांच्या ताब्यात असत. कुराणातील एका आयताचा (६१४) शब्दशः अर्थ घेतला तर ही नवी रचना कायमची अवलंबावी असे पैगंबरांचे मत होते असे दिसते होते. या अंदाजाला पुष्टी देणारी एक घटना १४५/७६२ मध्ये घडली. त्या वर्षी खलिफा मन्सूरने इसा इब्ने मुसा याला, अलिद तोतया इब्राहिम इब्ने अब्दल्ला (आपण पैगंबरांचा नातलग असल्याचा तो दावा करी) याच्याविरुद्ध लढण्यासाठी पाठविले. त्या वेळी जुन्या पद्धतीने सैन्यरचना न करता सैनिकदलांची विभक्त रचना करून आक्रमणाचा प्रतिकार करावा असा सल्ला अलीदला देण्यात आला. पण तसा बदल करणे म्हणजे इस्लामची अवज्ञा करणे होईल असे म्हणून त्याने कुराणातील वर उल्लेखिलेल्या आयताचा आधार दिला.

पुढील काळात लढाईचा सराव असलेल्या शत्रूंशी सामना देण्याचा अनुभव मुस्लिमांना आला आणि त्यांची युद्धाची साधनेही सुधारली, तेव्हा आपली पद्धतीच कायम ठेवावी असे पैगंबरांनी पूर्वी सूचित केले असले, तरीही त्यात बदल करणे अटळ झाले.

---

१. या पद्धतीला 'कर्र ऊ फर्र' (माघार व हल्ला) असे म्हणत.

२. बद्रच्या लढाईत पैगंबरांनी अवलंबिलेले डावपेच त्यांच्यापेक्षा अधिक लष्करी अनुभव असलेल्या मंडळींना पसंत पडले नव्हते.

सैन्यात घोडदळाचा समावेश झाल्यानंतर एक महत्त्वाचा बदल घडून आला. बद्रच्या लढाईत पैगंबरांजवळ फक्त एक घोडेस्वार होता. शत्रूचा हल्ला होईपर्यंत वाट पाहणे त्यांना भाग पडे. परंतु शत्रूच्या घोडदळाला तोंड देण्यासाठी सैनिकांची अभंग फळी उभारण्याचे तत्त्व त्यांनी अवलंबिले होते. एका डोलीत बसून बद्रच्या लढाईत ते देखरेख करीत होते.

यानंतर दहा वर्षांच्या आत यारमुक येथे बायझंटीनांशी झालेल्या लढाईत मुस्लिम सेनेजवळ ४६ हजार घोडेस्वार होते. सबंध सेना घोडदळाचीच होती, पण जवळपास झालेल्या लढायांत पायदळाचा मुळीच वापर झाला नाही असे नाही. सिफीनच्या लढाईत अली आणि मुआविया या दोघांच्याही बाजूने पायदळ व घोडदळ हे दोन्ही विभाग होते. त्यांचे स्वतंत्र सेनानीही होते. पायदळ व घोडदळ एकमेकांना सहाय्यक असतात या गोष्टीचे महत्त्व उमाय्यदांनी ओळखले होते. शक्य असेल तेथे या दोन्हींचा ते उपयोग करीत. हुसेनच्या मृत्यूचा बदला घेण्यास निघालेल्या कुफा येथील सुलेमान इब्ने सुर्द याच्या नेतृत्वाखालील शियापंथीय बंडखोरांविरुद्ध उमाय्यदांनी ६५।६८४–८५ मध्ये लढाई दिली, तेव्हा दोन्ही प्रकारच्या सैन्यांचा उपयोग केला. कुतैबने इराणवरील आक्रमणात घोडदळाला पूरक म्हणून पायदळाचा उपयोग केला. बुखारापर्यंत पोचण्यापूर्वीच त्याला प्रतिकार झाला तेव्हा त्याने शहराला वेढा दिला. तुर्कोमन घोडदळाने केलेला हल्ला परतवून लावण्यात आला. पण ते घोडदळ नदीपलीकडे उंचवट्याच्या जागी पुन्हा जमा झाले, आणि त्याने कुतैबची आगेकूच थोपवून धरली. टोळीवाले काकू करीत होते तरी अखेर धीर करून मुस्लिम घोडदळ नदी पोहून गेले. छोटेसे पायदळ त्यांनी मागे ठेवले. त्याला नदी ओलांडता यावी यासाठी त्यांनी झटपट एक पूल बांधला. घोडदळाने तुर्कोमन सैनिकांचे लक्ष दुसरीकडे वळविले. ही संधी साधून पायदळाने त्यांच्यावर हल्ला केला व त्यांना पळ काढायला लावले.

अब्बासींच्या काळात पायदळाचा उपयोग आणखी कमी प्रमाणात करण्यात येऊ लागला. उत्तर इराकमधील दलदलीच्या प्रदेशातील झांजांविरुद्धची मोहीम वगळता अब्बासींनी सर्वत्र[1] घोडदळाचाच वापर केला. पायदळ नेणे जेव्हा आवश्यकच असे तेव्हा अनेकदा घोडदळाच्या मागून घोड्यांवरून पायदळातील सैनिकांना नेण्यात येई. झाबच्या लढाईत उमाय्यदांचा पूर्ण धुव्वा उडाला. घोडदळातील सैनिकांनी घोड्यावरून खाली उतरून व खाली वाकून भाले पुढे परजत जाऊन लढाई करावी असा हुकूम अब्बासींच्या घोडदळाला देण्यात आला होता. घोड्यांच्या हालचालीस प्रदेश अनुकूल नसे, तेव्हा घोडदळाला खाली उतरून लढावे लागे.

---

१. सैन्यात इतरही काही लोक होते. कारण झाबच्या लढाईत कैद केलेल्या एका सैनिकाने असे सांगितले की, आपण एका सैनिकाचे गुलाम आहोत.

यारमुकच्या लढाईत त्यावेळच्या रूढ सैन्यरचनेत आणखी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला. या लढाईत बायझंटीन फौजांच्या तुकड्या एकामागून एक अशा पद्धतीने चाल करून गेल्या. त्याचा अरबांवर एवढा प्रभाव पडला की त्यांचा सेनानी खालिद इब्ने वालिद याच्या सूचनेनुसार अरबांनी लागलीच आपलीही सैन्यरचना बायझंटीन पद्धतीप्रमाणे केली. मध्य, पूर्व व पश्चिम विभागाच्या अनेक तुकड्या पाडण्यात आल्या ( अंदाजे ३६ ते ४० ). प्रत्येक तुकडीत एकाच टोळीचे लोक असत व टोळीचा नेताही त्यांच्यातलाच असे. या संदर्भात मुस्लिम सेनेतील करादी ( एकवचन कर्दुस ) तुकड्यांचा प्रथमच उल्लेख आढळतो. पण तबरीने पुढे एके ठिकाणी स्पष्ट म्हटले आहे की शेवटचा उमाय्यद खलिफा मारवान दुसरा याने अविभक्त सैन्यरचनेची पद्धती रद्द करून ज्या छोट्या छोट्या अनेक तुकड्यांत सैन्यरचना केली त्या तुकड्या 'करादी' म्हणून ओळखल्या जात. यारमुकच्या लढाईत केलेली करादी तुकड्यांच्या पद्धतीची सैन्यरचना हा तात्पुरता उपाय असावा असे यावरून सूचित होते व काही काळ पूर्वीचीच अभंग लांबोडी सैन्यरचना अस्तित्वात होती. ते काही असो. कर्दुस हा मोठ्या विभागाचा एक तुकडा किंवा पोटविभाग होता असे दिसते. कारण मध्यविभाग, उजव्या व डाव्या बाजूचे विभाग ही रचना चालूच राहिली. फक्त या विभागांची अनेक करादींमध्ये ( तुकड्यांमध्ये ) विभागणी केलेली असे. मुरासिमच्या नेतृत्वाखाली झालेल्या अमोरियमवरील हल्ल्यात सैन्याची अशीच रचना केलेली होती. त्या लढाईत मध्यविभाग आणि दोन्ही बाजूंचे विभाग यांच्यात एका परसांगाएवढे अंतर होते आणि प्रत्येक विभागाचे पुन्हा उजवे व डावे असे विभाग पाडण्यात आले होते. पण सर्वसाधारणपणे या विभागांचा एकमेकांशी निकटचा संपर्क असे व एखाद्या विभागावर कामाचा जास्तच भर पडू लागला म्हणजे बाकीच्या विभागातील माणसे त्याच्या मदतीस पाठविली जात.

लढाई सुरू होण्यापूर्वी आपल्या बांधवांच्या पराक्रमाची आठवण करून देणारी गीते म्हणून लोकांचा लष्करी उत्साह जागा करावयाची पद्धत मुस्लिमपूर्व काळापासून चालत आलेली होती. कादिसियाच्या लढाईचा सेनानी आपल्या सहकाऱ्यांना एकदा म्हणाला होता, "तुम्ही कवी, वक्ते व अरब सरदार आहात. टोळ्यांमध्ये व सैनिकांत जाऊन त्यांना युद्धासाठी प्रवृत्त करा."

आणखी एक प्रथा म्हणजे सार्वत्रिक हल्ल्यास प्रारंभ करण्यापूर्वी प्रथम दोन्ही बाजूंच्या कुशल योद्ध्यांत लढाया होत. बद्रच्या लढाईत हल्ल्याचा हुकूम देण्यापूर्वी एकेकट्या माणसांशी लढायला तुमची माणसे पाठवा, असे आव्हान पाखंडी कुरेशांच्या नेत्याने मुस्लिमांना दिले. मदिनाचे तीन नागरिक पुढे आले, पण कुरेशींना ते मान्य झाले नाहीत. वयाने व बळाने आमच्या माणसांच्या जोडीची माणसे पाठवा असे त्यांनी पुन्हा कळविले. पैगंबरांनी अखेर आपल्या तीन सहकाऱ्यांना पाठविले. कुरेशींनी ते मान्य केले. त्यापैकी दोन मुस्लिमांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना सरळ ठार केले, पण

तिसऱ्याला थोडे कठीण गेले. तेव्हा त्याचे दोस्त त्याच्या मदतीस धावले व विस्कळीत स्थितीत युद्धाला सुरुवात झाली. दोन्ही बाजूंच्या एकेकट्या सैनिकांच्या लढाईने युद्धाला सुरुवात करावयाची ही पद्धती परदेशी मोहिमांतही अवलंबण्यात आली होती. बायझन्टीनांवर ११५ / ७३३ सालच्या उन्हाळ्यात केलेल्या हल्ल्यांत एका तरुण ग्रीकाने पाच जणांना ठार केले होते, तेव्हा मुस्लिम सेनानी स्वतः पुढे झाला व त्याने प्रथम त्या ग्रीक तरुणाला ठार मारले व मग आपल्या फौजेला हल्ला चढवायचा हुकूम दिला. बाहेरच्या ठाण्याच्या किंवा आघाडीच्या तुकड्यांच्या एकमेकांशी प्रारंभी चकमकी होऊन नंतर बहुधा मुख्य युद्धाची सुरुवात होत असे. मुख्य फौजांत नंतर लढाई होई. सेल्जुक व गझनवी फौजांतील लढाई अशाच पद्धतीने झाल्याची नोंद आढळते.

लढाईचे डावपेच स्वाभाविकच परिस्थितीप्रमाणे बदलत. "मी हुकूम दिल्याशिवाय हल्ला करावयाचा नाही. शत्रू फारच जवळ आला तर त्याच्यावर बाण सोडा" असा हुकूम बद्रच्या लढाईत पैगंबरांनी आपल्या लोकांना दिला होता.

कादिसियाच्या लढाईत इराणी फौजांच्या एकामागे एक अशा तेरा रांगा होत्या. तर संख्या व लष्करी साहित्य या दोन्ही दृष्टींनी अरब कमी दर्जाचे होते. इराणी सैनिकांच्या बाणांच्या वर्षावाने अरबांच्या पहिल्या तीन रांगांची बरीच हानी झाली. शिरस्त्राणाऐवजी आपल्या सामानात उभ्या रोवलेल्या ताडवृक्षांच्या फांद्या व डोक्याला गुंडाळलेल्या चामड्याच्या वाद्या यांच्या सहाय्याने बाणांच्या वर्षावापासून अरब सैनिक आपले संरक्षण करीत होते. बाणांची संख्या व त्यांचा दर्जा या दोन्ही दृष्टींनी त्यांचे बाण कमी प्रतीचे होते. ही तर निव्वळ 'चाती' आहे या शब्दात या बारीक अरब-बाणांची हेटाळणी इराण्यांनी केल्याचे इतिहासात नमूद आहे. पण अशी अपुरी लष्करी सामग्री असूनही अरबांनी लढाई जिंकली. हल्ल्याचा हुकूम होईपर्यंत मुस्लिम आपल्या जागी ठाम राहिले. हुकूम होताच भाले घेऊन ते इराण्यांवर तुटून पडले. बाकीची अवजड शस्त्रे फेकून देऊन त्यांनी तरवारीचा प्रभावीपणाने उपयोग केला.

सिफीनच्या लढाईत अलीची मुआविया सैन्याशी लढत झाली; तेव्हा अलीने पैगंबरांच्या पद्धतीप्रमाणे आपल्या पायदळ सैनिकांची एकच अभंग रांग उभी केली. पुढच्या बाजूस चिलखती दल होते. उमाय्यद सैनिकांच्या छातीशी भाले भिडेपर्यंत आगेकूच करा व पुढील हुकुमासाठी थांबा असे हुकूम अलीने आपल्या सेनेस दिले होते. हल्ला करताना भाल्याच्या पुढे वाका म्हणजे चांगला परिणाम साधेल अशा त्याच्या सूचना होत्या. त्याच्या घोडदळाची विभागणी 'करादी' (तुकड्या) पद्धतीने करण्यात आली होती. तसेच घोडेस्वारांजवळ बाण व तलवारी होत्या, पण एकदा हल्ला करून शत्रूच्या फळीत घुसल्यावर बाणांचा उपयोग होत नसे. तेव्हा मग सैनिक तलवारींचाच उपयोग करीत.

उमाय्यदांची सैन्यरचना मधला विभाग आणि बाजूचा विभाग अशा प्रकारची होती असे शबीब खिरजीशी झालेल्या लढाईवरुन दिसते. आघाडीला तलवारधारी पायदळ असे. त्याचा वेगळा सेनानी असे. पायदळामागे भालेधारी घोडदळ व त्यामागे धनुष्यबाणधारी दल असे. बहुधा धनुष्यबाणधारीही घोड्यावर बसत. सेनाविभागाची तुकड्यांत (रायात) विभागणी केली जाई; पण प्रत्येक 'राया'मध्ये एकाच प्रकारची शस्त्रे धारण करणारे सैनिक असत की भिन्न भिन्न प्रकारचे शस्त्रधारी असत हे निश्चित कळत नाही.

अब्बासींच्या सुरुवातीच्या काळात रणांगणावरील सैन्यरचनेत बदल झाला होता की नाही याची निश्चित माहिती नाही, पण जुनी सैन्यरचना काटेकोरपणे पाळली जात होती असेही नाही. खुद्द मामुन व अमीन या दोन अब्बासींमध्ये खुरासान येथे १९५ । ८१० साली झालेल्या लढाईत त्यांचे सेनानी अनुक्रमे ताहिर आणि अली इब्ने इसा यांनी फौजांची रचना वेगवेगळ्या प्रकारे केली होती. नेहमींप्रमाणे मधला विभाग आणि बाजूला दोन विभाग अशी अली इब्ने इसाने रचना केली होती. पण त्याच्या सैनिकांची संख्या थोडी होती. म्हणून सर्वांनी एकदम चाल करुन जावयाचे नाही असे त्याने ठरविले. एक हजार सैनिकांची एक तुकडी याप्रमाणे त्याने आपल्या सैन्याच्या तुकड्या पाडल्या. डाव्या व उजव्या बाजूच्या विभागांनी हल्ले करायचे, एकेक फर्लांग[1] अंतर ठेवून एकेक तुकडी (रायात) पाठवायची अशा सूचना त्याने दिल्या. प्रत्येक तुकडीच्या आघाडीला चिलखती दलाचे सैनिक होते. एकेकाने क्रमाक्रमाने हल्ला करायचा, विश्रांती घ्यायची, पुन्हा हल्ला करायचा अशा त्यांना सूचना होत्या. स्वत: अली, त्याचे रक्षक दल व प्रमुख सरदार मधल्या विभागात होते. ताहिरने आपल्या फौजांची छोट्या तुकड्यांत (कताईब व करादी) रचना केली होती. मोठ्या फौजांच्या हल्ल्यांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. पण मध्यंतरीच्या काळात त्याने सैन्य जमवून अलीच्या मधल्या विभागावर अचानक हल्ला चढविला, त्यामुळे अलीचे सैनिक पळाले. ताहिरने तसे केले नसते तर त्या दिवशी त्याचा पराभव झाला असता.

खलिफा मुस्तारशीद याचा बंडखोर मांडलिक दुबायस याने ५१७/११२३ मध्ये सरकारी फौजांविरुद्ध झालेल्या लढाईत नेहमीपेक्षा एक निराळीच सैन्यरचना पद्धती अवलंबिल्याचे दिसते. मधला विभाग व बाजूचे दोन विभाग, दोन वेगवेगळ्या सेनानींच्या नेतृत्वाखाली देऊन दुबायसने सबंध सेनेची एक अभंग फळी उभारली; मात्र पायदळ घोडदळापुढे ठेवले. त्यामुळे पायदळ विस्कळीत होऊन निरुपयोगी झाले व दुबायसचा अखेर पराभव झाला.

सेल्जुकांच्या फौजेत जवळजवळ सर्व घोडदळच होते. त्यामुळे त्यांच्या डावपेचांना

---

१. 'एका बाणाच्या अंतरावर' असे इब्ने अल असीर म्हणतो.

मर्यादा पडल्या. मधला विभाग व बाजूचे दोन विभाग अशा पद्धतीचीच त्यांची सैन्य-रचना होती. पण अब्बासींपेक्षा ती अधिक खोल होती. प्रत्येक विभागात एकापेक्षा अधिक दुय्यम सेनानी होते. सुलतान मासूद आणि त्याचा चुलता सुलतान संजार यांच्यात दिनावरजवळ ५२६/११३१ मध्ये लढाई झाली. त्या लढाईत आपल्या फौजेतील उत्तम निवडक सैनिकांसह स्वतः सुलतान संजार हा मधल्या विभागात लढत होता, आणि बाजूच्या दोन्ही विभागांतील सैनिक, तीन दुय्यम सेनानींच्या नेतृत्वाखाली होते. मधल्या विभागापुढे हत्तींचे दल होते. मासूदच्या फौजेची रचना अशाच पद्धतीची होती. फरक एवढाच की बाजूच्या दोन्ही विभागांत दोन सेनानी होते.

'पंच' विभाग पद्धतीची ही सैन्यरचना खलिफांच्या पूर्वेकडील राज्याच्या प्रदेशात गझनीच्या मुहम्मदासारख्या मोठ्या योद्ध्यानेही अवलंबिली होती. शिवाय हत्तींचा उपयोग करून त्याने ती अधिक परिणामकारक केली. समानींचा पराभव करून आपण खुरासान कसे जिंकले याची माहिती देताना खलिफा अल् कादिरला पाठविलेल्या पत्रात मुहम्मद लिहितो, "पूर्वेकडच्या विभागाचे नेतृत्व मी माझ्या भावाकडे दिले. या विभागात दहा हजार घोडदळ व तीस हत्ती होते. डावीकडच्या विभागात बारा हजार घोडदळ आणि चाळीस हत्ती होते." मधल्या विभागात सत्तर हत्ती, तलवारी, भाले, ढाली आणि चिलखतधारी अशा वीस हजार घोडदळ सैनिकांसह स्वतः मुहम्मद लढत होता.

स्पॅनिश निबंधकार अबु बकर तुर्तुशी ( म्हणजे तोर्तोसा येथील अबु बकर–मृत्यू : ५२०/११२० ) याने युद्धतंत्राविषयीचे आपले काही विचार सिराज अल् मुल्क या आपल्या पुस्तकात मांडले आहेत. त्याच्या मते युद्धाचा नेता धीट, धाडसी, युद्धाचा अनुभव असलेला आणि लढाईतील मधली, डावी व उजवी बाजू यांचे ज्ञान असलेला असा असला पाहिजे. पुढे पायदळ, मध्ये धनुष्यबाणधारी दल व शेवटी घोडदळ ही फौजेची सर्वांत चांगली रचना होय असे त्याचे मत आहे. पायदळाजवळ चांगल्या ढाली, लांब भाले आणि अणकुचीदार बरच्या असल्या पाहिजेत. भाल्याची पुढील तीक्ष्ण टोके शत्रूवर रोखून भाल्याची मागील जाड टोके शत्रूच्या कलत्या दिशेने मागे जमिनीत घट्ट रोवली पाहिजेत. सैनिकांनी डाव्या गुढघ्यांवर वाकून आपल्यासमोर ढाली सरळ धरल्या पाहिजेत. मधल्या धनुष्य-बाणधारी दलात, ज्यांचे बाण शत्रूंचे चिलखत फोडतील असे निवडक, निष्णात धनुर्धर असले पाहिजेत आणि त्यांच्यामागे घोडदळ असले पाहिजे. हल्ल्यात शत्रूला प्रथम आत येऊ द्यावयाचे; पायदळाने आपल्या बरच्यांनी व धनुर्धरांनी आपल्या बाणांनी त्यांना भोसकावयाचे; मग शत्रू आणखी जवळ आल्यावर भाल्यांचा उपयोग करावयाचा व शत्रू सैरावैरा पळू लागताच त्याच्यावर तुटून पडून 'देव देईल ते मिळवायचे.'[1]

---

१. आपण वर्णन करीत असलेली सैन्यरचना आपण प्रत्यक्ष पाहिली असल्याचे अबु बकर तुर्तुशीने म्हटले आहे.

सर्वसाधारणपणे पंचविभाग रचनापद्धती परिणामकारक ठरली. पण तिच्यात एकच धोका होता, तो म्हणजे फौज फार मोठी व लांब पसरलेली असे तेव्हा तिच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण जाई. विशेषतः धुळीच्या वादळात एक विभाग दुसऱ्या विभागाला दिसेनासा झाला म्हणजे तर नियंत्रण ठेवणे फारच कठीण जाई. कारण निरनिराळ्या विभागांना दूतामार्फत किंवा तुतारी वाजवून किंवा ध्वजाच्या खुणा करून पाठविलेले हुकूम त्यांच्यापर्यंत पोचणे वादळामुळे अशक्य होई.

हल्ल्याची सूचना द्यावयाची झाल्यास ध्वज हलवायचा किंवा तुतारी फुंकायची किंवा या[1] दोन्ही गोष्टी करायच्या अशी सर्वसामान्य पद्धती होती. मुस्लिमांच्या लढायांत ध्वजाला आणखी एक महत्त्व होते. प्रत्येक टोळीचा स्वतःचा ध्वज असे व ध्वज हे सैनिकांनी लढाईत एकत्र जमण्याचे केंद्र समजले जाई. ध्वजाजवळच सेनानीची जागा[2] असे. या संदर्भात सलादिन व सफादिन (सैफ अल् दिन) यांच्यातील लढाईमधील एक प्रसंग उदाहरण म्हणून देता येईल. सफादिनच्या सेनानीने मैदानाच्या सखल भागात ध्वज उभारला होता. लढणाऱ्या सैनिकांना तो दिसत नव्हता. लढाईतील एका कसोटीच्या प्रसंगी ध्वज दिसला नाही तेव्हा लागलीच अफवा पसरली की सेनानी पळून गेला.

पैगंबरांचा ध्वजधारक आणि अन्सारांचा ध्वजधारक यांच्या नावांना बद्रच्या लढाईत ज्या प्रकारे महत्त्व दिले जात होते, त्याचप्रमाणे नंतरच्या लढायांत ध्वजधारकांना जे स्थान होते त्यावरून ध्वजाच्या महत्त्वाची कल्पना येईल. मोहिमेवर पाठविणे याला 'ध्वज बांधणे' असे म्हटले जाई. तसेच 'ध्वज देणे' याचा अर्थ सेनानीपद देणे असा केला जाई. खलिफा माहदी खुरासानमध्ये असताना त्याला इराणी सरदार उस्तादसिस याच्या बंडाला तोंड द्यावे लागले. कोणी खाजिम इब्ने खुझायमा हा हे बंड शमविण्यास सिद्ध झाला, पण त्याने अशी अट घातली की त्याच्या अथवा त्याने 'बांधलेल्या' ध्वजाशिवाय दुसरा कोणाचाही ध्वज फडकताना दिसता कामा नये. त्याला नेतृत्व मिळताच त्याला नको असलेल्या सर्वांचे ध्वज त्याने खाली उतरविले.[3]

---

१. "निहावांद तुमान येथील लढाईत अमिन म्हणाला होता, पैगंबरांना सकाळी लढाई करणे अशक्य आहे असे दिसले तेव्हा सूर्यास्त होऊन वारे वाहू लागेपर्यंत ते वाट पाहणार हे माझ्या लक्षात आले. माझ्या हातातील ध्वज मी तीन वेळा हलवीन. ध्वज पहिल्यांदा हलविताच सर्वांनी स्नान, नैसर्गिक विधी उरकावेत, नैसर्गिक गरजा भागवाव्या. दुसऱ्यांदा ध्वज हलविताच तलवार सज्ज करावी आणि तयारीत रहावे, आणि तिसऱ्यांदा ध्वज हलविताच हल्ला करावा. शेजाऱ्याकडे पहात बसू नये."

२. "तुम्ही ज्या अमीराच्या मदतीला गेलेले असाल आणि ज्या ध्वजाखाली एकत्र आलेले असाल त्यांना तुम्ही सोडून जाऊ शकत नाही."

३. या संदर्भात 'लिवा' (पताका) आणि 'आलम' (ध्वज) यांत फरक केलेला आहे.

बायझन्टीन बादशहा लिओ सहावा ( दि वाइज ) याच्या 'टॅक्टिका' या एका महत्त्वाच्या मुस्लिमेतर ग्रंथात अब्बासींच्या लष्करी पद्धतीसंबंधी थोडी अधिक माहिती मिळते. स्वतः लिओ सारासेनांविरुद्ध लढला नव्हता, त्यामुळे त्याची माहिती स्वतःच्या अनुभवावर आधारलेली नाही. पण आपल्या ग्रंथासाठी त्याने आपले वडील– बादशहा बासिल आणि लढाई लढलेल्या सेनापतींनी पुरविलेल्या माहितीचा उपयोग आपल्या पुस्तकात केला आहे. बायझन्टीन बादशहाने ८८६–९१२ च्या दरम्यान राज्य केले. खलिफा मुतामिद, मुक्ताफी आणि मुक्तादीर यांचा तो समकालीन होता. या काळात अब्बासी राजवटीच्या ऱ्हासाला सुरुवात झाली होती. खलिफा मुतामिचा भाऊ मुवाफ्फक याच्या नेतृत्वाखाली दक्षिण इराणमध्ये झांज बंडखोरांविरुद्ध खलिफाच्या फौजांनी दिलेल्या लढाईत त्या फौजांना बरेच यश मिळाल्यामुळे जुनी सैन्यरचनापद्धती बऱ्याच प्रमाणात चालू ठेवण्यात आली.

टॅक्टिका या ग्रंथात लक्ष वेधून घेणाऱ्या ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांत सारासेनांनी, सैन्याचा वेग आणि गतिमान हालचाली यांना किती महत्त्व दिले होते हे दिसून येते. सारासेनांचे पायदळ घोड्यावरूनच नेले जात असे किंवा घोडदळाच्या मागून ते जाई. म्हणून त्यांच्या घोड्यांवर तसेच सैनिकांवर हल्ले करणे हाच परिणामकारक डावपेच होता. कारण त्यामुळे त्यांची हालचाल थंडावे. धनुष्यबाणांचा भरपूर साठा जवळ बाळगणे हा सारासेनांपासून व तुर्कीपासून बचाव करण्याचा उत्तम मार्ग होता, कारण "या लोकांची विजयाची सर्व मदार बाणांवर होती." वाहतुकीसाठी ते उंट, घोडे, गाढवे व खेचरांचा उपयोग करीत. लढाईत ते झांजा वाजवीत आणि शत्रूच्या घोड्यांना घाबरविण्यासाठी उंटांचा उपयोग करीत. उंट व इतर भारवाहक पशूंचा युद्धात दुसराही एक उपयोग होत असे. फौज फार प्रचंड व प्रभावी आहे असा भास व्हावा अशा पद्धतीने या पशूंना सेनेत उभे केले जाई. फौजेच्या आघाडीला एथिओपिअनांच्या तुकड्या दाटीने ठेवण्यात येत. त्यांच्याजवळची शस्त्रे छोटी असली आणि त्यांच्यामागे संरक्षक फळ्या नसल्या तरी शत्रूंवर त्यांचा बराच प्रभाव पडे. सेनानीजवळ धनुष्यबाण, दुधारी तलवारी ( स्पाथा ), भाले, ढाली व कुऱ्हाडी असत. चिलखत म्हणून ते शिरस्त्राण तसेच छातीचे कवच, हाताची व पायाची कवचे घालीत. शिवाय रोमनांप्रमाणे इतर लष्करी सामग्रीही त्यांच्याजवळ असे.

लढाईच्या वेळी हल्ला चढवताना किंवा बचाव करताना सारासेन आपली सैन्यरचना कधीही मोडीत नसत. काही कारणाने ही रचना मोडली तर पुन्हा सहजपणे पुनर्रचना करता येत नसे. ही रचना लांबट चौकोनासारखी असे. ती बरीच सुरक्षित असल्याने तिच्यावर हल्ले करणे कठीण जाई. सैन्याची कूच चालू असताना, तसेच सैन्य शत्रूच्याजवळ पोचले तरी ही रचना कायम ठेवली जाई. शत्रूच्या हल्ल्यास सारासेन शांतपणे व सावकाश उत्तर देत. शत्रू दमेपर्यंत वाट पाहून ते हल्ला चढवीत. आरमारी लढायांतही ते याच पद्धतीचा अवलंब करीत.

लिओ किंवा त्याला माहिती देणाऱ्या व्यक्तींना अरबांच्या मनोवृत्तीचे चांगले ज्ञान असावे. तो लिहितो, "विजयाची आशा असे तेव्हा ते धीट बनतात पण निराश असतील तेव्हा फार सहज घाबरतात. परकी प्रदेशात रात्रीच्या वेळी हल्ला करावयास ते सदैव फार भीत असतात." ते अशा वेळी फार दक्षता घेत. पहारेकरी सर्व रात्रभर पहाऱ्यावर असत. अनपेक्षित हल्ल्यापासून बचाव करण्याच्या हेतूने छावणीला भक्कम तटबंदी केली जाई.

लिओने लिहिलेल्या गोष्टींपैकी बऱ्याच गोष्टींस मुस्लिम इतिहासकारांच्या पुस्तकांतून पुष्टी मिळते. तसेच त्याच्या सर्वसाधारण विधानांना पूरक माहिती त्यांच्या इतिहासांत मिळू शकते.

मुस्लिम लष्करी संघटनेच्या इतर अंगांचा आता विचार करू. सुरुवातीच्या काळात इस्लामी फौजांजवळ माणसे व शस्त्रे या दोन्ही गोष्टी कमी होत्या. ग्रीक व इराण्यांशी आलेल्या संबंधातून ते बरेच शिकले. सुरुवातीच्या काळानंतर पायदळाजवळची मुख्य शस्त्रे म्हणजे भाले-बरच्या व तलवारी. घोडदळाजवळ धनुष्यबाण व भाले किंवा तलवारी असत. गोफणींचा उल्लेख कोठे कोठे आढळतो. पण सैनिकांजवळच्या नेहमीच्या आवश्यक लष्करी साधनसामग्रीत त्यांचा समावेश नव्हता. संरक्षणासाठी प्रत्येक सैनिक शिरस्त्राण घाली. त्याच्या मागच्या बाजूस फ्लॅप असे. छातीवर कवच घालीत. तसेच गोल ढाल जवळ बाळगीत. दूरच्या मोहिमांचे वेळी सैनिक आपल्याबरोबर सुई-दोरा, आरी, कात्री वगैरे सामानही ठेवीत. लढाईत सेनानी व इतर बडे अधिकारी चिलखती कोट घालीत. कित्येकदा ते फार जड वाटत. पूर्ण सुसज्ज सैनिक छातीची दोन कवचे व चिलखताचा संपूर्ण सूट (तन्नर) घाली. एकट्या दुकट्या शत्रूशी लढताना सैनिक फक्त तलवार व ढाल बरोबर घेई आणि जवळून होणाऱ्या घनघोर लढाईत धनुष्यबाणाऐवजी तलवार व कट्यारीचा (दाब्बूस) उपयोग करण्यात येई. हल्ला चढविताना घोडदळ भाले-तलवारींचा वापर करी.

बंदुकीचा शोध अरबांनीच लावला असे म्हटले जाते. परंतु पाश्चात्य सैनिक या शस्त्राचा उपयोग करू लागल्यानंतरही पुढे काही वर्षेपर्यंत तरी अरब त्याचा वापर करीत नव्हते असे दिसते.

आपल्या सीमांचे रक्षण हे इस्लामच्या सुरुवातीच्या साम्राज्याचे एक तातडीचे व स्वाभाविक कर्तव्य होते. त्या काळात बायझन्टीन सीमेवरूनच मुख्यतः हल्ले होण्याचा संभव असल्याने तेथे अनेक किल्ले व बळकट ठाणी (अवासिम) सुरुवातीच्या काळात बांधली गेली. तेथे स्थानिक टोळीवाले किंवा परदेशी पगारी सैनिक यांची शिबंदी ठेवण्यात येई. हल्ल्याच्या व बचावाच्या ग्रीक पद्धतींपासून मुस्लिम बरेच शिकले. पण ग्रीकांशी त्यांचा गंभीर संघर्ष होण्यापूर्वीही बचावाच्या सोप्या पद्धतीचे त्यांना ज्ञान होते. स्वतः

पैगंबर मोर्चेबंदीची कला साल्मन अल् फारीशी या इराण्याकडून शिकले असे सांगण्यात येते. मक्केतील लोकांच्या संभाव्य हल्ल्यापासून मदिनेचे रक्षण करण्यासाठी त्यांनी तिचा वापर केला होता. रणांगणावर खंदकांचा[1] उपयोग करण्यात येऊ लागला. काही वेळा तर दीर्घ-काळपर्यंत खंदकांचा उपयोग केला जाई. झांज बंडखोरांविरुद्ध लढण्यासाठी पाठविलेल्या बसऱ्याच्या फौजेला हुसकावून देण्यात आले, त्या अगोदर ती फौज सहा महिने खंदकांत राहिली होती.

अधिक मजबूत तटबंदी केलेल्या शहरांत तटाच्या भिंतींपुढे जादा संरक्षक उपाय म्हणून खंदक खणण्यात येत. तटाच्या भिंती मुद्दाम जाड ठेवलेल्या असत. वेढा देणाऱ्या शत्रूच्या शस्त्रांपासून रक्षण व्हावे म्हणून भिंतीपुढे लाकडाचे ओंडके टाकले जात.[2] ज्या दरवाजावर व तटबंदीच्या इतर भागांवर हल्ला होण्याचा संभव असेल अशा भागांच्या रक्षणासाठी दगड फेकणाऱ्या यंत्रांचा व गोफणींचा उपयोग करण्यात येई. मुताझच्या फौजांनी बगदादला वेढा दिला तेव्हा मुस्ताइनने हा उपाय अवलंबिल्याचा उल्लेख आढळतो. संरक्षणासाठी खंदक खणणे आणि वेढा दिलेल्या शहरांच्या व किल्ल्यांच्या भिंतींना सुरुंग लावणे या कामासाठी सैन्याबरोबर मजुरांची खास पथके ठेवली जात. मजूर मिळत नसत तेव्हा मात्र फौजांनाच हे काम करावे लागे.

किल्ले व इतर मजबूत ठाण्यांवर हल्ले करण्याकरता सुरुवातीच्या काळातील मुस्लिम आक्रमक फौजा आपल्याबरोबर दगड फेकणारी यंत्रे व गोफणी नेत. ग्रीकांपासूनच[3] त्यांचा उपयोग करण्यास ते शिकले असावेत असे अनुमान निघते. कारण "मँगोनेल" हा ग्रीक शब्दच अरबी भाषेत दगडफेक करणाऱ्या यंत्रासाठी वापरलेला आहे. हिजरी सन १३ मध्ये दमास्कसच्या वेढ्यात या शस्त्राचा उपयोग करण्यात आला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नसावा. कारण अखेर सैनिकांना खंदक पोहून जावे लागले आणि मनोऱ्यावरून टाकलेल्या दोरांच्या सहाय्याने भिंती चढून त्यांना किल्ल्याची दारे उघडावी लागली.

---

१. घोडदळाच्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी अदृश्य खंदकांत लपून राहण्याचे तंत्र त्या वेळी सुपरिचित होते.

२. कॅमॅकॉनच्या लढाईत ग्रीकांनी सुरूच्या झाडाच्या ओंडक्यांचा वापर केला होता.

३. मांजानिक किंवा मांगानिक हा अरबी शब्द मांगानिको या ग्रीक शब्दापासून आला असावा. मुस्लिम वापरीत असलेल्या यंत्राला असलेला मूळ शब्द मोनॅनकॉन ह्या शब्दावरून आला असण्याचीही शक्यता आहे. मोनॅनकॉन म्हणजे एकहाती गोफण. सर्वसाधारण गोफण दोन हातांची असते. दोर किंवा केस गुंडाळून ती चालवितात. प्रस्तुत लेखक या माहितीसाठी मि. रिचर्ड बार्बेट (ब्रिटिश म्युझियमचे) यांचा ऋणी आहे.

उमाय्यदांनी व अब्बासींनी भारतावरील तसेच पूर्व इराणसारख्या मोहिमांतही या यंत्रांचा उपयोग केला. सिंधमधील दायबुलाच्या वेढ्यात महंमद बिन कासिमने एक मँगोनेल उभारली होती. तिला त्याने 'अल् अरूस' (नवरी) हे नाव दिले होते. पाचशे सैनिक ती चालवीत. सर्वसाधारणपणे गोफणीसारख्या दिसणाऱ्या या यंत्रातून दगड फेकले जात. पण काही वेळा अग्नी व शुद्ध रॉकेलचाही वर्षाव केला जाई. शुद्ध रॉकेल (नाफ्ता) हे युद्धसामग्रीचाच एक भाग म्हणून बरोबर बाळगले जाई. हिरॅक्लीच्या वेढ्याच्या वेळी हरून अल् रशीदने दगडांबरोबर गंधक आणि पांढऱ्या नाफ्त्याचा उपयोग केला होता. हे सर्व एकत्र बांधून, दोऱ्यांनी आवळून व पेटवून भिंतीवर फेकण्यात येई. भिंतीला ते चिकटून बसे व त्यातील उष्णतेमुळे भिंतीला भेगा पडत. नाफ्ता तयार करून त्याचा उपयोग करण्याच्या कामासाठी एक खास पथकच (नाफ्तातून) नेमलेले असे. मुस्लिमांविरुद्ध नाफ्त्याचा वापर झाला तर त्याला तोंड देण्याची कामगिरीही या पथकाकडेच असे. हरूनने आशियामायनरवर स्वारी केली तेव्हा बादशहा निकोफोरसने रस्त्यावरील झाडे पाडून व ती पेटवून आपला मार्ग अडविल्याचे त्याला आढळले. नाफ्तातून सैनिकांजवळ आगीने पेट न घेणारे असे खास कपडे असत. या सैनिकांनी रस्त्यावरील त्या झाडांच्या जळत्या लाकडात उड्या टाकल्या व ती बाजूला सारून लष्कराला मार्ग मोकळा करून दिला.

अमोरियमच्या वेढ्याच्या वेळी वापरलेल्या मँगोनेल्स 'चार माणसाइतक्या रुंद होत्या.' चाके असलेल्या गाड्यांवर त्या ठेवल्या होत्या. त्यामुळे त्या भिंतीच्या जवळ नेऊन त्यांचा वापर करता येई. खाण्यासाठी आणलेल्या मेंढ्यांची कातडी व माती टाकून खंदक भरून काढण्यात येई. जेथे खंदक भरून काढणे शक्य नसे तेथे 'अराडा' नावाच्या छोट्या इंजिनचा उपयोग करण्यात येई. एखाद्या होडीला ते बांधता येई व भिंतीजवळ कोणत्याही सोयिस्कर जागी नेता येई.

धनुर्धर वापरू शकत त्यापेक्षा मोठे व अवजड बाण मोठ्या संख्येने वापरण्यासाठी, सलादिनच्या नेतृत्वाखालील मुस्लिमांनी, सिहयुनच्या लढाईत झियार नावाच्या यंत्राचा वापर केला होता. आडव्या बांधलेल्या धनुष्यांनी हे यंत्र बनविलेले होते. एकदा तीन धनुष्यांनी असे यंत्र बनविल्याचा उल्लेख आढळतो. इब्ने अल् असीर याने म्हटले आहे की, हातांनी धनुष्यांचा उपयोग करून साध्या बाणांचा आणि आडव्या बांधलेल्या धनुष्यांनी आणि झियारने मोठ्या बाणांचा वर्षाव किल्ल्यावर करण्यात येई. धनुष्याच्या जाड दोऱ्यांचा मधमाशांच्या गुणगुणण्यासारखा आवाज येतो. त्यामुळे आडव्या धनुष्यांना 'झंबूरक'[१] म्हणत.

शहराच्या तटबंदीवर सरळ हल्ला करण्यासाठी वापरले जाणारे आणखी एक यंत्र

---

१. आधुनिक काळात इराणमध्ये छोट्या तोफेला हाच शब्द वापरतात.

म्हणजे दुब्बाबा. अनेक टप्पे किंवा मजले असलेला तो एक फिरता मनोरा होता. निर-निराळ्या टप्प्यांवरून एकाच वेळी हल्ला करण्यासाठी प्रत्येक मजल्यावर सैनिक ठेवलेले असत. खालच्या लोकांजवळ टिकाव व विंधण्याचे हत्यार असे. इतर सैनिक धनुष्यबाण वापरीत. केवळ आपल्या लोकांचे रक्षण करण्यासाठीच नव्हे तर भिंतीचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना मारण्यासाठीही ते धनुष्यबाणांचा उपयोग करीत. कॅमॅकॉनच्या वेढ्याच्या वेळी १४९/७६६ मध्ये असा एक 'दुब्बाबा' वापरण्यात आला होता असा उल्लेख आढळतो. तसेच मुतासिमने अमोरियमच्या वेढ्याच्या वेळी अनेक दुब्बाब वापरले होते. प्रत्येक दुब्बाबमध्ये दहा सैनिक असत. दुब्बाब वापरण्यातील मुख्य अडचण म्हणजे वाहतुकीच्या दृष्टीने ते अवजड होते. खंदक भरून काढण्यासाठी मेंढ्यांची कातडी व माती टाकली जाई. त्यामुळे त्यातून दुब्बाब ओढून नेताना ते रुतून बसण्याचा संभव असे. अमो-रियमच्या लढाईत ज्याप्रमाणे ग्रीकांनी बाणांचा व दगडांचा वर्षाव केला होता तसा दगड-बाणांचा वर्षाव किल्ल्याचा बचाव करणाऱ्यांनी केला, म्हणजे हे दुब्बाब खड्ड्यांत रुतून बसत आणि त्यातील माणसांना सोडविणे फार कठीण जाई.

केरकच्या वेढ्याचे वेळी ५८० / ११८४ साली सलादिनने प्रथम बाहेरची ठाणी सर केली. पुढे त्याला असे आढळले की किल्ल्याच्या व आपल्या दरम्यान एक खोल खंदक आहे. किल्ल्याचे रक्षक बाणांचा व जळत्या नाफ्त्याचा वर्षाव करीत होते, त्यामुळे खंदक भरून काढणे त्याला फार कठीण गेले. तेव्हा आपल्या सैनिकांचे रक्षण करण्या-साठी दुसरा काही तरी उपाय शोधणे त्याला भाग पडले. त्याने तुळया व विटांची एक पडवी बांधायचा हुकूम दिला व मग त्याच्या आड दडून सैनिकांनी आपले काम चालू ठेवले.

खंदक नसेल आणि संरक्षक भिंतीवर सरळ हल्ला करणे शक्य असेल त्या वेळी भुयारांचा उपयोग केला जाई. टिकाव व विंधण्याच्या हत्याराने भुयार खोदण्याचे खास शिक्षण घेतलेल्या लोकांचे (नक्काबुन) पथक या कामास लावले जाई. त्यांचे काम चालू असता पिछाडीला असलेले धनुर्धर बाणांचा वर्षाव करून त्यांचे रक्षण करीत. काही वेळा कबूश किंवा एडके यांचा यासाठी उपयोग केला जाई. भगदाड पाडण्यास अशक्य होईल इतकी मजबूत भिंत असे, तेव्हा शिड्यांचा उपयोग केला जाई.

मजबूत ठाणे जिंकण्याची आणखी एक पद्धती म्हणजे ठाण्याचे रक्षण करणारांना थोडीही उसंत न देता त्यांच्यावर सतत हल्ला करीत राहणे. बरझियाच्या वेढ्यात (५८४/११८८) सलादिनने या पद्धतीचा अवलंब केला. त्याने आपल्या फौजेचे तीन भाग पाडले. प्रत्येक भागाने अखंडपणे एकामागून एक हल्ले चालू ठेवले. त्यामुळे फ्रँकिश सैनिकांना शरण येणे भागच पडले. ही पद्धती या वेढ्यात उपयोगी पडली याचे कारण फ्रँकिश सैनिक पहिल्या हल्ल्याचे वेळी खचले आणि नंतर मागे ठेवलेल्या राखीव सैनिकांनी त्यांच्यावर बाणांचा घातक वर्षाव केला.

सुसज्ज फौज आपल्याबरोबर नेहमी युद्धाची :सर्व आवश्यक यंत्रे नेत असे. दक्षिण इराणमधील दलदलीच्या प्रदेशात राहात असलेल्या झांज बंडखोरांविरुद्ध झालेल्या लढाईत मुवाफ्फकच्या फौजेने मँगोनेल्स व गोफणी तर आणल्या होत्याच, पण दगडही बरोबर नेले असले पाहिजेत. कारण इराकच्या त्या भागात दगड उपलब्ध नव्हते. नाफ्ता व कुन्हाड यासारखे साहित्यही ते बरोबर नेत. दलदलीच्या प्रदेशातील अनेक खेड्यांत जाण्यासाठी नद्या व लहान ओढे ओलांडावे लागत. ते ओलांडण्यासाठी होड्याही बरोबर घेत. तेथे उपलब्ध असलेल्या बांबूपासून बनविलेल्या थोड्याशा खोलगट अशा लांब होड्यांचीच त्यात अधिक संख्या असे. पण वल्ही असलेल्या काही मोठ्या बोटीही असत. बांबूनी वेढलेली बरीच मोठी व बंदिस्त मोकळी जागा या बोटींवर असे. या बोटी चालविण्यासाठी साध्या सैनिकांपेक्षा निराळे असे नावाडी नेमण्यात येत. झांज नेता अल् खाबिद याच्या शहरावर मुख्य हल्ला चढविण्यात आला, त्या वेळी फौजेबरोबर दहा हजार पगारी नावाडी होते. याशिवाय सैनिक आणि त्यांचे सामान यांची वाहतूक करणाऱ्या होड्यांचे खलाशी वेगळेच.

मुस्लिम इतिहासकारांना एखाद्या विशिष्ट मोहिमेचे महत्त्व दाखवून द्यावयाचे असते, तेव्हा फौजांच्या सामग्रीची चांगली तरतूद केली होती या गोष्टीचा ते उल्लेख करतात. झांजच्या मोहिमेत बगदादचे व्यापारी आपल्याला मोठ्या प्रमाणावर सामान पुरवतील अशी व्यवस्था फौजेचा सेनापती मुवाफ्फक याने केली होती. मुवाफ्फकिया या शहरात त्यासाठी बांधलेल्या खास कोठारात या वस्तू ठेवल्या होत्या. झांज अतिशय निर्धाराने लढला. त्याच्याविरुद्ध दीर्घकाळ युद्ध चालले. मुरासिमने आशियामायरनवर स्वारी केली तेव्हाही लष्कराला भरपूर रसद पुरविण्यात आली. त्यासाठी लष्कराजवळ तीस हजार व्यापारी व माल पुरविणारे, हजारो उंट व खेचरे होती असे मायकेल सायरसने म्हटले आहे.

इब्ने अल् असीरने पुढे म्हटले आहे की मुतावक्कीलच्या कारकीर्दीत सुदानींची एक टोळी त्याच्या प्रदेशांतील मुस्लिम मालकीच्या एका खाणीवर नेहमी हल्ले करी व लुटीचा एकपंचमांश भाग मोबदला म्हणून इजिप्तच्या खजिन्यात भरी. पुढे हल्ले चालू राहिले तसे खाणीतील काम व रक्कम देणे थांबले, तेव्हा खलिफाकडे तक्रार करण्यात आली. त्याने त्याबाबत सल्ला घेतला तेव्हा हल्लेखोरांच्या प्रदेशात जाणे अवघड आहे, कारण वाळवंटी प्रदेशातून जावे लागते, तसेच या सुदानींविरुद्ध लढण्यासाठी पाठवावयाच्या फौजेला जाण्यायेण्याच्या प्रवासात पुरेल एवढी सामग्री पुरवावी लागेल असे सल्लागारांनी सांगितले. तेव्हा खलिफाने इजिप्तमधील आपल्या सेनेच्या अमीलला आवश्यक तेवढी सामग्री देऊन आपले संपूर्ण सैन्य मोहिमेवर पाठविण्याचा हुकूम दिला. अमील आपल्या फौजेसह तांबड्या समुद्रावरील एका ठिकाणापर्यंत गेला. तेथे मांस, ऑलिव्ह फळे, खजूर, सातु, पीठ वगैरे मालाने सुसज्ज अशी सात जहाजे ठेवण्याचा हुकूम देण्यात

आला होता. त्याप्रमाणे तेथे या सर्व सामग्रीसह जहाजे उभी होती. जरूर लागेल त्याप्रमाणे आवश्यक त्या वस्तू पुरविण्याचा हुकूम त्यांना दिला होता. सुदानी टोळ्यांच्या सेनापतीस ही जहाजे तेथे असल्याची कल्पना नव्हती. मुस्लिम शत्रूवर प्रत्यक्ष हल्ला न करता त्यांच्याजवळचा अन्न-पेयांचा साठा संपुष्टात आल्यावर हल्ला करावयाचा आणि इतर फौजांप्रमाणे त्यांचा निःपात करावयाचा असा बेत त्याने आखला होता. पण तो फसला, कारण मुस्लिम फौजेला रसद चालूच राहिली. शिवाय समर्थ अशा एका शत्रूशी सुदानी टोळीच्या सेनापतीची गाठ पडली होती.

सर्वसाधारणपणे इतिहासकार रसदीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचा उल्लेख करीत नाहीत. त्यावरून वरीलसारखी उदाहरणे अपवादात्मक असली पाहिजेत. खरे म्हणजे असे होते की सामान्यपणे मुस्लिम फौजा ज्या देशावर स्वारी करीत तेथल्याच सामग्रीवर गुजराण करू पाहात आणि काही वेळा त्याचे घातक परिणाम त्यांना भोगावे लागत. उमय्यदांच्या काळात कॉन्स्टँटिनोपल घेण्यासाठी झालेले प्रयत्न ( हि. स. ६७३ व ७१८ ) अयशस्वी झाले, तसेच अब्बासींच्या काळात तौरसच्या पलीकडे कायमचा पाय रोवण्यासाठी हरून अल् रशीदने हिजरी ८०६ साली व मुतासिमने हिजरी ८३८ साली केलेले प्रयत्नही अपेशी ठरले, त्याचेही कारण मुस्लिम फौजा त्या त्या ठिकाणच्या सामग्रीवरच अवलंबून राहिल्या हे होय.

कूच करीत असलेल्या फौजा आणि त्यांच्या छावण्यांचा विचार आता करावयाचा आहे. सुरुवातीच्या काळातील मोहिमा हे केवळ लुटीसाठी केलेले हल्ले नव्हते, तर वसाहती करण्यासाठी केलेल्या मोहिमा होत्या हे लक्षात घेतले पाहिजे. कारण इराण, सीरिया व इजिप्तच्या मोहिमांवर सैनिक निघत तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांची कुटुंबेही असत. उमय्यदांच्या काळात व त्यापूर्वीही सेनानी साध्या हल्ल्याचे वेळी किंवा गंभीर लढाईचे वेळीसुद्धा आपल्या बरोबर बायका नेत असत. एवढेच नव्हे तर अधिक दूरच्या मोहिमांत कायम वसाहती करण्याच्या ठरलेल्या धोरणाचा एक भाग म्हणून सैनिकांना कुटुंबे बरोबर नेण्यास उत्तेजन दिले जाई. म्हणूनच हज्जाजने बसरा व कुफाहून खुरासानला पाठविलेले सैनिक बायका व मुले बरोबर घेऊन गेले होते. तसेच कुतैब फौजांनी काशगरवर चाल केली तेव्हा वाटेत समरकंद व इतर ठिकाणी वसाहत करता यावी या उद्देशाने कुटुंबवत्सल सैनिकांनी आपल्या बरोबर आपली कुटुंबे नेली होती. फौजेने ऑक्सस नदी ओलांडली की तेथे ठेवलेले पहारेकरी कोणालाही परवानगीशिवाय मागे फिरण्यास प्रतिबंध करीत.

मुख्य फौजेच्या पिछाडीबरोबर ( साका ) स्त्रिया व मुलांना डोलीतून नेण्यात येई. त्यांच्यामुळे सैनिकांना लढण्यास कधी उत्तेजन मिळाले, तर कधी बायका-मुलांमुळे त्यांची पिछेहाट झाली असेही म्हणतात. पण पहिले म्हणणे साधारणपणे अधिक खरे असावे,

कारण प्रसंगी स्त्रियाही उत्तम कामगिरी बजावीत. यारमुक व इतर लढायांत स्त्रियांनी अशी कामगिरी बजावली होती. बुखाराच्या वेढ्यातही ९०/७०९ साली त्यांनी अशीच कामगिरी बजावली. वेढा दिलेल्या शहरातील काही शत्रुसैनिक एकदम पिछाडीच्या बाजूने बाहेर आले तेव्हा त्यांच्याशी बायकांनी झुंज दिली. शत्रूला चकित करण्यासाठी किंवा इतर कारणांसाठी अचानक चाल करणे भाग पडे, तेव्हा शत्रूच्या मार्गात अडचणी निर्माण करतील अशा गोष्टी मागे ठेवल्या जात. त्यासाठीच स्त्रिया-मुलांना मागे ठेवीत. त्यांच्या रक्षणासाठी रक्षक ठेवले जात. समरकंदवरील पहिल्या हल्ल्याच्या वेळी असे करण्यात आले होते. त्या वेळी कुतैबच्या फौजेतील फक्त घोडदळ व धनुर्धारी पथक चाल करून पुढे गेले होते.

या मोहिमेत फौजेची रचना पंचविभाग पद्धतीची होती. आघाडीचे पथक पुढे होते, मधला विभाग आणि डाव्या-उजव्या बाजूचे विभाग हा सेनेचा मुख्य भाग त्यानंतर होता, आणि शेवटी साका ( पिछाडीचा विभाग ) होता. त्यात मुख्यतः सामान-सुमान, वेढ्याची इंजिने, अवजड सामग्री व रसद असे. स्त्रिया व मुले बहुधा, ' साका ' बरोबर असत. तसेच मागून रसद घेऊन येणाऱ्या लोकांचे गटही बरोबर असत असे दिसते. पण सुरुवातीच्या काळातच ही पद्धत अस्तित्वात होती. पुढे धर्मयुद्धासाठी निघालेल्या मोहिमांच्या काळात जनावरे व अडचणीचे वाटणारे सामान आधी पुढे पाठविण्याची पद्धत सुरू झाली. त्यांच्याबरोबर छोटे रक्षकदल असे. पण काही प्रसंगी हे रक्षकदल अपुरे ठरल्यामुळे फौजेतील जनावरे व इतर साहित्य शत्रूच्या हाती पडत असे. ढोलाच्या तालात फौज कूच करी. ढोलाचा आवाज थांबला की, सैन्य जेथे असेल तेथे थांबे.

छावण्यांच्या जागांची निवड काळजीपूर्वक केली जाई. खास या कामासाठी एक अधिकारी नेमलेला होता. फौजांचा तळ थोड्या दिवसांकरीता असो की दीर्घ मुदतीचा असो, तिच्या संरक्षणासाठी छावणीच्या सर्व बाजूंनी खंदक खणण्यात येई. अधिक दक्षता म्हणून शस्त्रसज्ज सैनिक नेहमी पवित्र्यात खडे असत. कधी कधी काही अडचणींमुळे खंदक खणले जात नसत. अशा वेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक दक्षता घेतली जाई. खुरामी पाखंडी बंडखोर बाबक याच्याविरुद्ध खलिफाच्या फौजेचा सेनानी अफशिन चाल करून गेला तेव्हा चारी बाजूंस अक्रोडाची झुडपे असलेल्या जागी अफशिनने आपल्या आपल्या मुख्य सेनेचा तळ टाकला आणि तेथून दीड कोस अंतरावरील आपल्या छावणी-भोवती घोडेस्वारांचे टेहळणीपथक रात्रंदिवस फिरते ठेवले. छावणीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवाऱ्यासाठी मोठे तंबू उभारले जात. त्यांत ते जेवण घेत, झोपत, कैद्यांच्या मुलाखती घेत व इतर कामे करीत.

शांततेच्या काळात शिबंदीच्या सैनिकांची राहण्याची सोय शक्य असेल तेथे शहरातील लोकांकडे केली जाई. अनेकदा सैनिकांची दंडेली व त्यांचे गैरवर्तन यामुळे स्थानिक लोकांत असंतोष निर्माण होई. तेव्हा मग सैनिकांच्या निराळ्या छावण्या

उभाराव्या लागत. हज्जाज इब्ने युसुफने कुफा शहरातील लोकांकडे आपल्या सीरियन सैनिकांची राहण्याची सोय केली होती, पण लोकांनी त्याबद्दल निषेध व्यक्त करताच तेथून फौज काढून घेऊन वासित हे शिबंदींचे स्वतंत्र शहर वसविण्यात आले. पुढे बऱ्याच काळानंतर सेल्जुक राजांनी स्वतःच्या छावण्या असतानासुद्धा नागरिकांकडे, आपल्या फौजांची राहण्याची व्यवस्था केली, तेव्हाही बराच असंतोष निर्माण झाला व सेल्जुकांना आपले सैनिक नागरिकांच्या घरांतून काढून घेणे भाग पडले. मालाट्या (मेलिटन) या सीमेवरील शहरात खलिफा मन्सूरने चार हजार सैनिकांची वसाहत वसविली होती. दहा ते पंधरा सैनिकांचा एक 'इराफा' (पथक) अशी त्यांची पथके पाडण्यात आली. प्रत्येक इराफ्यासाठी एक दुमजली घर बांधण्यात आले. त्यात एक तबेला असे. आवश्यक वस्तू त्यांना स्थानिक लोकांकडून मिळण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

पूर्वेकडील बगदाद खिलाफतीच्या फौजेचा विचार आतापर्यंत मुख्यतः केला. पण खिलाफतीच्या कक्षेबाहेर असलेल्या इतर मुस्लिम फौजांचाही– विशेषतः फातिमी, अय्यूबी (विशेषतः सलादिनच्या काळातील), मामलुक व तुर्क यांच्या फौजांचा– थोडा विचार केला पाहिजे. या सर्व फौजांमध्ये काही समान वैशिष्ट्ये होती.

अलीदचा मुख्य प्रचारक अब्दल्ला याने उत्तर आफ्रिकेत चाळीस हजारांची फौज उभी केली, तेव्हाच प्रथम फातिमी फौजांचा उदय झाला. "इफ्रिकियांतील प्रत्येक शूर वीर व्यक्तीला त्याने आपल्या सेनेत सामील करून घेतले होते."

या राजघराण्याच्या इजिप्त व सीरियामधील सत्तेच्या काळात फौजेची संख्या झपाट्याने वाढली. इराणी प्रवासी नासिर-इ-खुश्रो याने १०४७ मध्ये इजिप्तला भेट दिली. कैरोत त्या वेळी शिस्तबद्ध अशी मोठी सेना होती असे त्याने म्हटले आहे. नाईलच्या दरवाजांच्या उद्घाटन समारंभाचे वेळी सैनिकांचे संचलन झाले त्याचे वर्णन 'सफरनाम्यात' त्याने केले आहे. घोडदळ, पायदळ अशी सर्व फौज त्या वेळी उपस्थित होती. प्रत्येक पलटणीला नाव व हुद्दा दिलेला होता. घोडदळाच्या पलटणींमध्ये उत्तर आफ्रिकेतील केरावानचे वीस हजार सैनिक, वायव्य आफ्रिकेतील निग्रो व इतर मिळून तीस हजार पगारी सैनिक होते. पायदळामध्ये उत्तर आफ्रिकेतलेच उमद्या बांध्याचे पण विद्रुप चेहऱ्याचे काळे मसमूदी होते. ते भाले व तलवारींशिवाय दुसऱ्या शस्त्राचा वापर करीत नसत. याशिवाय पौर्वात्य म्हणून ओळखले जाणारे दहा हजार लोक होते. जन्माने ते इजिप्शियन असले तरी ते मूळचे इराण किंवा तुर्कस्तानमधील होते. याशिवाय विकत घेतलेल्या गुलामांची एक पलटण होती. हे गुलाम बाजारपेठेत विकत घेतलेले होते. त्यांची संख्या तीस हजार होती. हिज्जाजचे पन्नास हजार बदवीअी या सेनेत होते. ते भाल्यांनी लढत. याशिवाय एका स्वतंत्र सेनानीच्या नेतृत्वाखाली राजप्रासाद रक्षकांचे एक मोठे पायदळ होते. या दलात निरनिराळ्या देशातले सहा हजार लोक होते असे

सांगतात. त्यांच्या देशवार तुकड्या पाडलेल्या होत्या. आपापल्या देशांतील सराव असलेल्या शस्त्रांनी त्यांच्यापैकी प्रत्येकजण लढे. तसेच तीस हजार झांज किंवा इथिओपियन सैनिक होते. ते तलवारींच्या सहाय्याने लढत. फौजेची एकूण संख्या दोन लाख पंधरा हजार होती. ती कधी वाढे, कधी कमी होई. तरीही फातिमी राजवटीच्या अखेरीस त्यांच्या सेनेत चाळीस हजार घोडेस्वार व तीस हजार पायदळ सैनिक होते. ते जवळजवळ सर्व निग्रो गुलाम होते.

फातिमींची लष्करी संघटनेची पद्धती परिश्रमपूर्वक तयार केलेली होती. पण अपेक्षे इतकी ती प्रत्यक्षात कार्यक्षम होती की नाही याची शंका आहे. वझीरांच्या मदतीने खलिफा धोरणविषयक प्रश्न सोडवी व दिवान अल् जयशमार्फत सैनिकांचा पगार देई. समाजातील निरनिराळ्या वर्गांना खंडाने दिलेल्या जमिनीवरचा कर व पिके यांतून जमा झालेल्या रकमेपैकी एकतृतीयांश रक्कम लष्करासाठी खर्च केली जाई. सैनिकांना जहागिरी देण्याची हानिकारक पद्धती अजून[1] अस्तित्वात आलेली नव्हती.

वझीर हाच सर्वसाधारणपणे दिवानचा आणि ( तो 'लेखणीप्रमुख' नसेल तर ) लष्करी कारभाराचाही प्रमुख असे. त्याच्या हाताखालील व त्याच्या खालोखालचा लष्कराचा प्रमुख अंमलदार 'इस्फाह सलार' हा होता. त्या खालोखाल सुवर्ण साखळी धारण करणारे अमीर, तलवारधारक आणि रेजिमेंट अधिकारी यांचा क्रम असे. अनेक पलटणी होत्या. प्रत्येक पलटणीस एखाद्या खलिफाचे, वझीराचे किंवा सैनिक ज्या प्रदेशातील असत त्या प्रदेशाचे नाव दिले जाई. उदा. हफीझिया ( हफीझ नावाच्या वझीरावरून ), रुमिनिया ( ग्रीक ), साकालिबा ( गुलाम ), अशी नावे असत.

फातिमींना अखेर सलादिन व अय्यूबी यांनी पदच्युत केले. फातिमी फौजेची इतिहासकारांनी कितीही स्तुती केली असली तरी संख्येच्या दृष्टीने त्यांची फौज पूर्वीच्या राजवटींच्या सेनेपेक्षा कधीच मोठी नव्हती. कार्यक्षमतेच्या दृष्टीने मात्र ती खूपच वरचढ होती. इतिहासात अशी नोंद आहे की फातिमी सुलतानाने ५६७।११७१ ( मोहरम ) या वर्षी आपल्याविषयी निष्ठा बाळगणाऱ्या सर्व फौजेने एकत्र यावे असा हुकूम देणारा जाहीरनामा काढला, तेव्हा "इस्लाममधील कोणाही राजाने पूर्वी कधीही जमविले नव्हते एवढ्या प्रचंड संख्येने सैनिक जमले होते." सैन्यात एकूण १४७ 'तुल्ब' होते. तुल्ब म्हणजे 'गुझ' ( तुर्की ) भाषेत निशाण व तुतारीच्या सलामीचा अधिकार असलेला सरदार. प्रत्येक तुल्बपाशी ७० ते २०० घोडेस्वारांचे पथक असे. या १४७ तुल्बपैकी वीस गैरहजर होते व जे हजर होते त्यांनीही आपली पूर्ण पथके आणलेली नव्हती. याचा अर्थ एकूण फक्त चौदा हजार सैनिक होते. यापैकी बहुतेक सर्व पगारी व स्वतंत्र लोक होते. त्यांना तवाशिया म्हणत म्हणत. तवाशी म्हणजे सर्वसाधारणपणे

---

१. माक्रिझीने या संदर्भात इब्ने ममाती याचा हवाला दिला आहे.

सातशे ते एक हजार दिनार भत्ता मिळणारा सरदार. पण पुष्कळदा हा भत्ता १२० दिनारइतकाच मिळे. या रकमेतून त्याला दहा भारवाहक जनावरे आणि स्वतःची शस्त्रे व लष्करी सामग्री नेण्यासाठी एक गुलाम सांभाळावा लागे. संबंध फौजेला काळ्या गुलामांची आणि स्वेच्छेने भरती झालेल्या सैनिकांची कुमकही मिळे.

सलादिनने गादीवर येताच इजिप्तमधील निग्रो गुलामांची सेना बरखास्त केली. फातिमींनी ती कायम ठेवली होती. तिचे अधिकारी इजिप्शियन, अरब व आर्मेनियम असत. निग्रो सेनेच्या जागी सलादिनने कुर्द व तुर्कांची खास फौज उभारली. तिच्यात बारा हजार घोडेस्वारांपेक्षा अधिक सैनिक नव्हते. आर्थिक कारणांमुळे सलादिनने हा निर्णय केला असावा. सलादिनला ५७७/११८१ साली लष्करी जहागिऱ्यांच्या प्रश्नाची चौकशी करणे भाग पडले. त्याने नऊ हजार सैनिक, १११ अमीर, ७००० तवाशिया आणि पंधराशे निग्रो गुलाम (काला गुलामिया) एवढीच फौज ठेवण्याचे ठरविले. सहा वर्षांनंतर तिबेरियाच्या वेढ्याच्या वेळी त्याच्या सेनेत भत्ता मिळणारे बारा हजार सरदार होते. पण त्यांच्या जोडीला अनेक स्वयंसेवक त्याच्याजवळ होते व जरूर पडल्यास तो आणखी स्वयंसेवकांची कुमक उभारू शकत असे. धर्मयुद्ध करणाऱ्या विरुद्धच्या लढाईत त्याला मोसुल व मेसोपोटेमिया तसेच इजिप्त व सीरियामधील मुस्लिम बांधवांची मदत मिळाली होती. पण खुद्द त्याला स्वतःला आपल्या स्वयंसेवकांच्या हालचालींवर संपूर्णपणे नियंत्रण ठेवता येत नसे. जेरूसलेमच्या पाडावानंतर मुस्लिम फौज टायरे येथे रोखण्यात आली तेव्हा स्वयंसेवकांच्या सेनेपैकी श्रीमंत व अधिक प्रबळ असलेल्या सरदारांच्या विभागांनी आपल्या देशांत परत जावे असे त्याचे मत होते. हा वेढा अयशस्वी ठरण्याचा संभव आहे असे कारण बाह्यतः त्याने दिले. पण सलादिनचा युद्ध-मोहिमेचा खजिना रिकामा झाला आहे हे त्यांच्यापैकी अनेकांना माहीत होते व मोहीम चालविण्यासाठी तो आपणाकडून सक्तीने कर्जे घेईल अशी त्यांनाही भीती होतीच. अखेर मुस्लिम सैन्याच्या सेनानीला ती मोहीम सोडून देणे भाग पडले. वसंत ऋतु सुरू होताच पुन्हा मोहिमेत सामील झाले पाहिजे या अटीवर सैनिकांना हिवाळ्यासाठी घरी जाण्याची त्याने परवानगी दिली. पूर्वेकडचे व मोसुलचे सैनिक तसेच सीरिया आणि इजिप्तचे स्वयंसेवक सैनिक आक्त येथे सैन्य सोडून गेले तेव्हा स्वतःच्या अनुयायांशिवाय सेनानीच्या सेनेत कोणीही राहिले नाही.

सलादिनच्या लढाईच्या व वेढ्याच्या डावपेचासंबंधी यापूर्वी थोडे सांगितलेच आहे. त्याने लढाईसाठी पंचविभाग पद्धतीची रचना कायम ठेवली, पण त्यात एक बदल केला. सर्व चांगले सैनिक मधल्या विभागात ठेवण्याऐवजी त्यांपैकी निवडक धनुर्धरांचे दल (जालिशिया) आघाडीला ठेवले. सुरुवातीच्या हल्ल्यांसाठी या धनुर्धरांवरच त्याची भिस्त असे. मधला विभाग व बाजूचे विभाग योग्य वेळी पुढे पाठविले जात. साका नेहमीप्रमाणे पिछाडीला असे.

सलादिनच्या मृत्यूनंतर त्याची सेना विसर्जित झाली तरीही त्याचा मुलगा अल् मलिक अल् अझीझ याच्या नेतृत्वाखाली आठ हजार सरदार होते. प्रत्येक सरदाराचे बरेच सैनिक होते. माक्रिझीने या सैनिकांची एकूण संख्या दोन लाख दिली आहे पण त्यात काहीशी अतिशयोक्ती असावी.

अब्बासींकडून तुर्की मामलुकां (गुलामा)कडे सत्ता गेली आणि ते स्वतःच सुलतान बनले तेव्हा राष्ट्रीय लष्कर अस्तित्वात आले. अर्वाचीन काळात युरोपात ही पद्धती अस्तित्वात आली. इस्लाममध्ये पूर्वी ही पद्धती नव्हती. अर्थात तुर्की मामलुकांचे आप्त असलेल्या ऑटोमन तुर्कांनी जवळपास या राष्ट्रीय लष्करासारखीच एक सेना (जानिसार दल) पूर्वी स्थापन केले होते. सलादिनप्रमाणे मामलुकांनीही तुर्क व थोडे कुर्द यांच्यापुरतीच सैन्यभरती मर्यादित ठेवली होती. तुलनेने त्यात तुर्क संख्येने फारच कमी होते. मन्सूर कलाउनच्या फौजेत तुर्की गुलामांची संख्या सात ते बारा हजार होती. ही संख्या पुढे वाढली. अल् नासिर मुहम्मद इब्ने कलाउनच्या काळात त्याच्या सेनेत चोवीस हजार सरदार होते.

कलाउन ७८४ / १३८२ मध्ये पदच्युत झाल्यानंतर नवा सुलतान अल् मलिक अल् झहीर बसक याने पूर्वीच्या सुलतानांची तुर्की व कुर्द सैनिक असलेली 'अशरफी' सेना बरखास्त केली आणि स्वतःचे सिर्कासियन गुलामांचे नवे शरीररक्षकदल उभारले. हे गुलाम विकत घेतलेले किंवा भरती केलेले होते. त्यांची संख्या चार हजार होती. पुढे झपाट्याने वाढलेल्या फौजेचा हा गाभा होता.

मामलुक राजवटीच्या दोन्ही कालखंडांत लष्करी संघटनेची पद्धती एकसारखी होती. सेनेचे तीन विभाग होते. पहिला विभाग भरती केलेल्या सैनिकांचा (मुस्ताखदिमुन). दुसरा विभाग मामलुक किंवा गुलाम यांचा. या दोन्ही विभागांना सुलतानाकडून ठराविक पगारभत्ता मिळे. तिसरा विभाग जहागिरदारांच्या सेनेचा.[1] त्यांना लष्करी नोकरीबद्दल पगाराऐवजी जमीन मिळे. या विभागातील प्रत्येक जहागिरदाराला वेगळी जहागीर मिळे. तिचे वार्षिक उत्पन्न कमीतकमी दहा हजारांपासून जास्तीत जास्त तीस हजार दिन्हीम इतके असे. याशिवाय एखाद्या जहागिरदारास वरचेवर लष्करी सेवेसाठी बोलाविले जाई तेव्हा त्याला आपल्या सैनिकांच्या व्यवस्थेसाठी जादा पाच हजार दिन्हीम दिले जात. सैन्यपथकाचा प्रमुख दहा जणांची तुकडी घेऊन लढाईवर जाई. हे दहा जण प्रमुखाबरोबरच खातपीत. तसेच सेनेत प्रामुख्याने असलेल्या गुलामांनाही पथकप्रमुखाच्या स्वयंपाक घरातलेच अन्न दिले जाई. गुलामांची संख्या कमीजास्त असे पण मुख्यतः त्यांच्यासाठीच पथकप्रमुखाच्या भत्त्याचा बराच भाग खर्च होई.

---

१. अजनद अल् हल्का (सैनिकांची साखळी).

मामलुक सुलतान मन्सूर लाजिनच्या कारकीर्दीत (इ. स. १२९६) इजिप्तचे चोविस भाग पाडण्यात आले होते. त्यांपैकी चार भाग सुल्तानाची खाजगी इस्टेट म्हणून ठेवले होते. दहा भाग "जहागिरदार सैनिकां"ना व दहा भाग अमीर किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेले होते. खरे तर या अमीर किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याआधीच चांगल्या जमिनी बळकावल्या होत्या. त्यामुळे दुय्यम दर्जाच्या सैनिकांच्या कपाळी दारिद्र्य आले व त्यांना डाकूगिरीचा अवलंब करावा लागला. लाजिन याने जमीन सुधारणा केल्या. त्याने उपलब्ध जमिनीचे फेरवाटप केले. चोवीस भागांपैकी अकरा भाग त्याने अमीर व बड्या अधिकाऱ्यांना दिले आणि बाकीचे नऊ इतर सैनिकांना दिले. त्यामुळे अमीरांमध्ये असंतोष निर्माण झाला. नंतरच्या राजवटीत या पद्धतीत काही बदल झाले तरी जमिनीवर ज्यांचे जीवन अवलंबून होते त्या सर्वांत समाधानकारक अशी पद्धती कधीच स्थापन झाली नाही.

फौजेची चार श्रेणीत विभागणी केलेली होती. सेनाप्रमुख हे 'हजार सैनिकांचे प्रमुख'[1] म्हणून ओळखले जात. त्यांच्या नियंत्रणाखाली किमान शंभर सैनिक किंवा कारागिरांची पथके असत. अल् नासिर मुहम्मद इब्ने कलाउननंतर सबंध इजिप्तसाठी चोवीस सेना प्रमुख नेमण्यात आले. सेनाप्रमुखाच्या खालोखालचा अधिकारी म्हणजे ढोलप्रमुख.[2] त्यांच्या संख्येवर मर्यादा नव्हती. प्रत्येक ढोलप्रमुखाच्या नियंत्रणाखाली चाळीस सैनिक असत. दुय्यम खातेप्रमुख, महसूल अधिकारी व इतर अधिकारी यांचा याच श्रेणीत समावेश केला जाई. त्याखालचा क्रम दहा सैनिकांचा प्रमुख[3] व पाच सैनिकांचा प्रमुख यांचा असे. वरिष्ठ श्रेणी मिळालेले सैनिकप्रमुख यापेक्षा या लोकांना अधिक महत्त्व नव्हते.

भरती झालेल्या तरुण मामलुक (गुलाम) सैनिकांना मिळणाऱ्या शिक्षणासंबंधीची माहिती माक्रिझीने दिली आहे. गुलामांच्या व्यापाऱ्याने एखाद्या गुलाम मुलाला विकत घेतले की तो व्यापारी प्रथम त्याला सुलतानापुढे पसंतीसाठी हजर करी. सुलतान मग त्या गुलाम मुलाला योग्य वर्गात दाखल करून घेई. गुलाम मुलाच्या अभ्यासक्रमाचा पहिला भाग शाळेत पूर्ण होई. तेथे अक्षरओळख, कुराणाचे पठण, धार्मिक कर्तव्यांची शिकवण, प्रार्थना विधी यांचे शिक्षण त्याला दिले जाई. वयात आल्यावर काटेकोर अर्थाने त्याच्या लष्करी शिक्षणाला आरंभ होई. घोड्यावर बसणे, धनुर्विद्या, तलवार चालवणे, भालाफेक या शिक्षणाचा त्यात समावेश असे. मग त्यापैकी लायक गुलाम तरुणांना एकेक वरची श्रेणी मिळत जाऊन ते अखेर अमीर होत. ज्यांची इतर क्षेत्रात बुद्धी चाले ते कायदेतज्ज्ञ, कवी किंवा हिशेबनीस होत. पण सर्वांना कडक लष्करी शिस्त पाळावी लागे. त्यांना जरुर तेव्हा लष्करी नोकरीसाठीही बोलावले जाई.

---

१. तुर्की भाषेत 'बिन बाशी.'
२. 'उमरा अल्–तबल–खाना.'
३. तुर्की भाषेत 'ऑन–बाशी.'

मामलुकांच्याच पद्धतीवर ऑटोमन फौजेच्या 'जानिसार' (येनीचेरी) या नव्या दलाची उभारणी केली होती. सुलतान मुराद पहिला[1] याने ७६३/१३६१ मध्ये ही सेना स्थापन केली. सुरुवातीला ही सेना फार छोटी होती. तिच्यात 'अजाम ओघलू' (परकीयांची मुले) म्हणजे सुलतानाच्या थ्रेसमधील खिस्ती प्रजेतून भरती केलेले लोक होते. जानिसारात प्रवेश दिलेल्यांचे शिक्षण प्रमुख बाबतींत मामलुकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणासारखेच होते. शिक्षणावर काळजीपूर्वक देखरेख ठेवली जात असे. ज्यांच्यात विशेष लष्करी पात्रता दिसून येत नसे त्यांना लष्कराशी संलग्न असलेला व्यापारी करण्याची मोकळीक दिली जाई. चांगल्या लोकांना हळूहळू पण निश्चित टप्प्यांनी बढती दिली जाई व निवडक लोक उच्च श्रेणीपर्यंत पोचू शकत. अशा लोकांतूनच सुलतान आपल्या मुख्य मंत्र्यांची निवड करी. सामान्य सैनिकांना पायदळात घेतले जाई. एकूण भरती केलेल्या सैनिकांच्या संख्येनुसार त्यांच्या तुकड्या व पथके पाडली जात. मुराद पहिला याच्या जुन्या भरती कायद्यानुसार जानिसारींच्या दलात फक्त खिस्ती मुलांनाच घेतले जाई. आणि इतर सेनेत फक्त मुस्लिमांना घेतले जाई. त्यामुळे जानिसारामधील सैनिकांची संख्या तुलनेने कमी असे. सुलेमान पहिला (कानूनी) याच्या कारकीर्दीत जानिसाराची संख्या बारा हजारांपेक्षा जास्त नव्हती. मुराद तिसरा याच्या कारकीर्दीत ही संख्या पंचेचाळीस हजार झाली होती. पण सैनिकांना नियमित पगार मिळत नसल्यामुळे या सेनेत कारस्थाने व चळवळींना ऊत आला होता. या सेनेचे बेक्ताशी दरवेशांशी निकटचे संबंध होते. अखेर ही सेना विसर्जित करण्यात आली. सुलतान मुहम्मद दुसरा याने १२४१/१८२६ मध्ये या सेनेतील अनेकांची विश्वासघाताने[2] कत्तल केली.

इस्लामी इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात खलिफांनी किंवा त्यांच्या वारसदारांनी केलेल्या हल्ल्याच्या किंवा बचावाच्या योजनेत लष्कराच्या जोडीला आरमारानेही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. सुरुवातीच्या काळातील मुस्लिम सेनेत प्रामुख्याने वाळवंटी प्रदेशातील अरब होते. ते समुद्राशी अपरिचित होते. त्यामुळे त्यांना समुद्राची भीती

---

१. डी. ओहसन याच्या म्हणण्याप्रमाणे हे पथक ओरखान याने १३३० मध्ये स्थापन केले.

२. जानिसारींच्या तपशीलवार माहितीसाठी पुढील पुस्तके पाहा : Eugenio Alberi, 'Relazioni degli Ambasciatori Venetiai-al Senato', 15 Vols. (Florence, 1839–63); A. A. Lybyer, 'The Govt. of Ottoman Empire in the Time of Suleiman The Magnificient' (Cambridge, Mass., 1913); H. A. Gibbons, 'The Foundation of the Ottoman Empire' (Oxford, 1916); J. K. Birge, 'The Bekeashi Order of Dervishes' (London, 1937).

व तिटकारा वाटे. बायझन्टीन फौजेवर समुद्रावरून हल्ला करण्याची परवानगी मुआवियाने मागितली तेव्हा मुस्लिम सैनिकांच्या जीविताबद्दल वाटणाऱ्या भीतीमुळेच खलिफा उमरने ती नाकारली अशी धार्मिक आख्यायिका आहे. पण पुढे मात्र त्या समर्थ योद्धाने मुआवियाने सागरावरून हल्ला करण्यास परवानगी मिळावी यासाठी खलिफा उस्मान याचे मन वळविण्यात यश मिळविले. तरीही सैनिकांनी या हल्ल्यात स्वेच्छेने हवा तर भाग घ्यावा; कोणावरही त्याच्या इच्छेविरुद्ध भाग घेण्याची सक्ती केली जाऊ नये अशा सूचना खलिफा उस्मान याने दिल्या होत्या. शत्रूवर समुद्रावरून हल्ला करणारा मुआविया हाच पहिला सेनानी होय असे म्हटले जाते. त्याने उन्हाळ्यात व हिवाळ्यात पन्नास हल्ले केले. ते कोणत्या उद्देशाने केले हे स्पष्ट नाही. पण प्रारंभीच्या हल्ल्यांपैकी एक म्हणून सायप्रसवरील हल्ल्याचा उल्लेख केला जातो. सीरियाच्या किनाऱ्यावरून २८।६४३ मध्ये हा हल्ला करण्यात आला. त्याच वर्षी इजिप्तमधूनही या बेटावर हल्ला झाला. जहाजांवरील खलाशी, वल्हवणारे, सुकाणूधारक वगैरे ग्रीक किंवा कॉप्टस् होते. तर प्रत्यक्ष लढणारे सैनिक मुस्लिम होते. त्यांत काही अस्सल अरब तर काही मनाली होते. इजिप्तमध्ये सन ७१०–७११ मधील काही ग्रीक व अरेबियन अवशेष सापडले आहेत. त्या काळात इजिप्त उमाय्यदांच्या ताब्यातील प्रांत होता. या अवशेषांवरून असे स्पष्ट दिसते की बायझन्टीनांवर दरवर्षी होणारे हल्ले समुद्राप्रमाणे जमिनीच्या मार्गानेही होत. हल्ल्यासाठी नाविक दलाची पथके जेथून निघत त्या देशाचे नाव त्यांना दिले जाई. उदा. इजिप्त, अनातोलिया, फ्रान्स किंवा 'समुद्रावरून'. मुस्लिमांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशात ज्या पद्धतीने सैनिकांची भरती केली जाई, त्याच-पद्धतीने जहाजावरील खलाशांची भरती केली जाई. सर्वसाधारण कसबी कामे व व्यापार करणाऱ्या वर्गातून त्यांची भरती होई, आणि सैनिकांप्रमाणे त्यांना पगार व अन्नभत्ता मिळे.

मुआवियाने बायझन्टीनांवर ३४।६५४-५५ [1] साली मोठे आरमार पाठवून हल्ला चढविला व त्यांच्यावर निर्णायक विजय मिळविला.[2] या आरमारात दोनशे जहाजे होती तर बायझन्टीनांजवळ पाचशे होती. युद्ध प्रत्यक्ष पाहिलेल्या एकाने आपल्या वृत्तांतात म्हटले आहे की प्रारंभी मुस्लिमांना वारा प्रतिकूल होता. म्हणून त्यांनी आपली जहाजे किनाऱ्याजवळच नांगरली. शत्रूची जहाजेही जवळच होती. नंतर वारा पडला. युद्ध

---

१. काही इतिहासकारांनी हा हल्ला हिजरी सन ३१ मध्ये करण्यात आला असे म्हटले आहे.

२. या लढाईत वापर करण्यात आलेल्या जहाजांची संख्या फार मोठी होती. त्यावरून तिला 'शिडांचा हल्ला' असे म्हटले जाते. दुसऱ्या एका लढाईमध्ये बायझन्टीनांचे आरमार वादळात नष्ट झाले होते. त्या लढाईशी या लढाईची गल्लत मुस्लिम इतिहासकार करीत असावेत.

एक तर समुद्रावर खेळा किंवा जमिनीवर खेळा असा पर्याय मुस्लिमांनी बायझन्टीनांपुढे ठेवल्याचे दिसते. अखेर दोन्ही आरमारांची समुद्रावर लढाई झाली. एकेका जहाजाची झटापट होऊन कट्यारींनी सैनिक परस्परांशी लढले. जहाजांचे खलाशी कॉप्ट ( खिश्चन ) होते. त्यांनी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतल्याचे दिसत नाही.

उमाय्यद फौजांनी ७१७ साली कॉन्स्टॅटिनोपलवर जमिनीवरून आणि समुद्रावरून असा दुहेरी हल्ला केला. त्यांच्याजवळ त्या वेळी अठराशे जहाजे होती असे ग्रीक इतिहासकार सांगतात. पण बायझन्टीनांनी त्यांचा पूर्ण धुव्वा उडविला. या पराभवाचा सविस्तर वृत्तांत मुस्लिम इतिहासकारांनी दिलेला नाही. पण त्याचा तपशील शत्रूच्या कागदपत्रांतून मिळतो.

बगदादच्या खलिफाजवळ काही जहाजे असली तरी भूमध्य समुद्रावरील निर-निराळी शहरे व मोठी बेटे जिंकण्यासाठी झालेले हल्ले उत्तर आफ्रिका व स्पेनमधून झाले. फातिमींच्या राजवटीत इजिप्तनेही आरमार उभारले. कैरो, ॲलेक्झांड्रिया आणि दमिएट्टा येथे युद्धनौका बांधण्यात आल्या होत्या. बायझन्टीन बादशहा लिओ याने 'कंबारिया'चा ( जहाजांच्या मोठ्या अवजड तांड्याचा ) उल्लेख केला आहे. तांड्याचे वजन अतिशय असल्यामुळे तो हळू चाले. जवळच्या लढाईसाठी सारासेन अशा तांड्याचा चांगला उपयोग करीत. एके काळी, एका प्रमुख दर्यासारंगाच्या हाताखाली दहा दर्यासारंग व त्यांच्या नियंत्रणाखाली पाच हजार कप्तान एवढे आरमार होते. लष्कराच्या सेनानीप्रमाणेच या दर्यासारंगांनाही जहागिरी दिलेल्या असत.

फातिमी राजघराण्याचा ऱ्हासाबरोबर त्यांच्या आरमाराचाही ऱ्हास झाला. तरीही काही युद्धनौका अगदी अखेरपर्यंत त्यांच्याजवळ शिल्लक होत्या.

सलादिनने इजिप्तच्या आरमाराची पुन्हा उभारणी केली. त्यासाठी खास दिवान नेमला व आरमारासाठी खास आर्थिक तरतूद केली. सिसीलीच्या लोकांनी ॲले-क्झांड्रियावर ५६९/११७३ मध्ये हल्ला केला, तेव्हा त्या बंदरात युद्धनौका व व्यापारी जहाजांची गर्दी त्यांना दिसली होती असे सांगतात. सलादिनच्या मृत्यूनंतर आरमाराचा पुन्हा एकदा ऱ्हास सुरू झाला. आरमाराबद्दलची आस्था मावळली. आरमारात भरती होण्यासाठी तरुणांना सक्ती करावी लागे. तरुणांना रस्त्यांतून पकडून नेत. लाचलुचपत किंवा इतर मार्गांनी आपली सुटका करून घेणारे सोडले तर या लोकांना दिवसभर कामाच्या जागी साखळबंद करून ठेवीत आणि रात्री तुरुंगांत डांबीत. आरमार भरतीच्या या पद्धतीमुळे आरमाराचा ऱ्हास होऊन लाचलुचपत बोकाळली; आणि उस्तुली ( आरमारी सैनिक ) हा एक शिवीचा शब्द झाला.

स्पेनमधील मुस्लिमांनी आरमाराच्या बाबतीत सर्वांत जास्त आस्था दाखवली. मुहम्मद पहिला याने २६६/८७९–९० मध्ये "कॉर्डोव्हा नदीकिनारी" ( म्हणजे

गुअदल किहीर ) जहाजांची बांधणी केली. गॅलिशियाच्या जिद्दी लोकांवर अटलांटिकच्या बाजूने हल्ला करणे अधिक फलदायी होते, म्हणून अटलांटिकमध्ये उपयोग करण्यासाठी मुहम्मदाने ही जहाजे बांधली होती. पण मुहम्मदाच्या खलाशांना खुल्या समुद्रात संचार करण्याची सवय नव्हती. त्यामुळे या मोहिमेत जहाजे अटलांटिकमध्ये शिरताच त्यांचा एकमेकांशी संबंध तुटला. पुढे त्यांतील फारच थोडी जहाजे परत आली. भूमध्य समुद्रातील बहुतांश बेटे आणि किनारपट्टीचा प्रदेश मुस्लिमांच्या हाती कायम ठेवण्यात मूरीश आरमारी जहाजांनी अनेक शतके मोठी कामगिरी बजावली. त्यामुळेच युरोपच्या नौकानयनविषयक शब्दसंग्रहात अनेक अरबी शब्दांची रेलचेल दिसते.

स्पेनमधून मूरांची हकालपट्टी झाल्यानंतरच्या काळात भूमध्यसमुद्रातील[1] मुस्लिम नौकानयनाची परंपरा तुर्की व बार्बरी चाच्यांनी पुढे चालू ठेवली. आंतर्समुद्रावर त्यांनी जवळजवळ तीन शतके म्हणजे एकोणिसाव्या शतकापर्यंत प्रभुत्व गाजविले. उत्तर आफ्रिकेत फ्रेंचांचे साम्राज्य स्थापन होऊन त्यांच्या आधिपत्याखाली हे तुर्की व बर्बर चाचे जाईपर्यंत त्यांचे वर्चस्व[2] कायम होते.

हल्ला करण्याची व बचाव करण्याची मुस्लिम पद्धती प्रत्यक्ष कशी व्यवहारात आणली जात होती यासंबंधींच्या तपशीलाच्या जोडीला मुस्लिमांचे युद्ध आणि लष्करी संघटनाशास्त्र कोणत्या तत्त्वावर आधारलेले होते याची माहिती दिल्याशिवाय या विषयाचे पूर्ण आकलन होणार नाही. इराणी व बायझन्टीन यांच्याविरुद्ध झालेल्या लढायांत मिळालेल्या अनुभवातून लढाईची प्रत्यक्ष पद्धती बऱ्याच प्रमाणात विकसित होत गेली. तसेच त्यातूनच युद्धशास्त्र व त्याची तत्त्वेही निश्चित झाली. इस्लामची सूत्रे आणि पैगंबरांची वचने यांच्या एकत्र प्रभावाखाली झालेल्या मुस्लिम मनाच्या विशिष्ट घडणीनुरूप परिश्रमपूर्वक युद्धशास्त्र तयार होत गेले. युद्ध आणि लष्करी संघटना या विषयाचे विवेचन करताना थोर मुस्लिम तत्त्ववेत्ता इब्ने खाल्दुन याने यासंबंधीची वस्तुस्थिती स्पष्टपणे मांडली आहे. युद्धकला म्हणजे लढाया यशस्वीपणे लढण्याचा मार्ग हे त्याचे मत मुस्लिम युद्धशास्त्राचा गाभा या दृष्टीने बरोबर आहे. पण त्याच्या विवेचनात तपशिलाचा अभाव आहे. तो म्हणतो, खलिफाच्या राजवटीत लढाई लढण्याच्या दोन पद्धती होत्या. पहिली पद्धती म्हणजे एका रेषेत हल्ले करण्याची इराण्यांची पद्धती. दुसरी पद्धती बदवी अरबांची

---

१. पहा : Ibn Khaldun, 'Prolegomenes', ed. Quatremere, या पुस्तकातील संबंधित प्रकरणात यासंबंधीची आणखी काही माहिती मिळू शकेल. अर्थात त्या प्रकरणातील विधाने बरीचशी ढोबळ व गोंधळून केलेली आहेत. पण ती लेखकाच्या नित्याच्या काटेकोर विवेचनपद्धतीची निदर्शक नाहीत.

२. आणखी माहितीसाठी पहा : S. Lane-Pool, 'The Barbary Corsains', (London, 1890).

व बर्बरांची. ते पांगून गटागटांनी हल्ले चढवीत, नंतर झटकन माघार घेत व पुन्हा अचानक हल्ला करीत. इब्ने खाल्दुनच्या मते एका रेषेत व्यवस्थित सैन्यरचना करण्याच्या व हल्ला करण्याच्या पद्धतीत यशाची निश्चिती अधिक असे. कारण प्रार्थनेच्या वेळी मुस्लिमांनी रांगा कराव्या किंवा बाण एका रांगेत लावून ठेवलेले असावेत अशा प्रकारे हल्ला करणाऱ्या फौजांची व्यवस्थित रचना केलेली असे. अशी योग्य प्रकारे रचना केलेल्या फौजा युद्धात अधिक स्थिर राहतात. शत्रूच्या दृष्टीने त्या अभेद्य भिंतीसारख्या किंवा मजबूत किल्ल्यासारख्या ठरतात. कुराणातील एका वचनाद्वारे ( ६४ ) याला दुजोरा मिळतो.

हल्ला करावयाचा म्हणजे झडप घालावयाची ( कार्र उ फार्र ) एवढेच इस्लामपूर्व अरबांना माहीत होते. पण ते लवकरच एका रेषेत हल्ला करावयास शिकले. याला कारणे दोन होती. शत्रू रेषेच्या पद्धतीची रचना करून लढत असल्याने मुस्लिमांनाही त्याच पद्धतीचा अवलंब करावा लागला. दुसरे कारण म्हणजे मुस्लिम हे पाखंड्यांविरुद्ध जीवावर उदार होऊन जिहाद खेळणारे योद्धे होते. अशा जिहादमध्ये अशा पद्धतीची सैन्यरचना अधिक उपयोगी पडते. ' फिकाह 'च्या पुस्तकातही युद्धासंबंधी प्रकरणे आहेत. पण त्यात स्वाभाविकपणेच युद्धविषयक कायद्यांच्या प्रश्नांचा विचार केलेला आहे. पण लष्कराचा प्रमुख कोणत्या कर्तव्यांना जबाबदार आहे याची जी यादी ' फिकाह 'च्या पुस्तकात दिली आहे, त्यावरून युद्धकलेसंबंधीच्या मुस्लिम भूमिकेची काहीशी कल्पना येऊ शकेल. मावार्दी याने म्हटले आहे की कायद्याप्रमाणे सेनानी हा सेनेच्या सुरक्षिततेस जबाबदार आहे. अचानक हल्ल्यापासून त्याने आपल्या सैनिकांचे रक्षण केले पाहिजे. त्यासाठी जेथून छुपा हल्ला होण्याची शक्यता आहे ती सर्व ठिकाणे त्याने हेरली पाहिजेत. त्याने सर्व बाजूंना ठाणी व पहारे अशा रीतीने बसविले पाहिजेत की, सैन्य लढत नसेल त्या वेळी मुख्य सेनेतील सैनिकांना वैयक्तिक सुरक्षिततेची तसेच मालमत्तेच्या सुरक्षिततेची हमी मिळाली पाहिजे. एखाद्या मोहिमेत काही मालमत्ता मागे ठेवली असेल तर तिच्याही सुरक्षिततेची व्यवस्था केली पाहिजे. शत्रूशी जेथे लढाई द्यावयाची असेल ते ठिकाण निवडणे ही सेनानीचीच जबाबदारी आहे. ही जागा समपातळीची असावी. तसेच तेथे चांगला पाणीपुरवठा व भरपूर कुरण असले पाहिजे. या जागेच्या अवतीभोवती किंवा सीमांवर पर्वत, ओढे वगैरे नैसर्गिक संरक्षणे असली पाहिजेत, म्हणजे प्रत्यक्ष लढाईचे वेळी या जागेचा उपयोग करता येईल व तेथे सुरक्षितताही मिळेल. सैनिकांसाठी पुरेसे अन्न व जनावरांसाठी पुरेशा चाऱ्याची व्यवस्था त्याने केली पाहिजे. तसेच शत्रूच्या हालचाली व बळ याची माहिती त्यास असली पाहिजे; तरच शत्रूच्या डावपेचांना त्यास तोंड देता येईल व शत्रूवर हल्ला करण्याइतके बळ त्याच्याजवळ असेल. त्याने काही सैन्य आघाडीवर पाठवून काही फौजा राखीव ठेवल्या पाहिजेत. तसेच आपल्या निरनिराळ्या फळ्यांच्या सुरक्षिततेसाठीही पुरेशी सेना ठेवली पाहिजे. " लढाईत तुम्ही विजय मिळवलाच पाहिजे. शत्रू तुमच्या तोडीचा नाही.

लढताना मरण पावलात तर परलोकात अल्लाह तुम्हाला बक्षीस देईल; जिवंत राहिलात तर येथे तुम्हाला खंडणीचा व लुटीचा जादा भाग मिळेल" असे त्याने सैनिकांना सांगितले पाहिजे. अल्लाहची उद्दिष्टे व कार्ये साधण्यासाठीच लष्कराचा वापर त्याने केला पाहिजे. आपल्या सैनिकांना त्याने व्यापार किंवा शेती करण्याची परवानगी देऊ नये, कारण त्यामुळे पाखंड्यांविरुद्ध लढण्याच्या आपल्या खऱ्या कर्तव्यापासून ते विचलित होण्याचा संभव असतो.

प्रत्यक्ष लढाईत सेनानीने शत्रूकडील योद्धयाशी एकट्याने लढाई देऊ नये. कोणती हत्या कायदेशीर आहे याबद्दल ' फिकाह'ने म्हटले आहे की मुस्लिमाने युद्धात कोणाही पाखंड्यास ( मूर्तिपूजकास ) ठार करावयास हरकत नाही, मग तो सैनिक असो किंवा नसो. वृद्ध आणि भिक्षू यांना ठार करावे की नाही याबद्दल वाद आहे. स्त्रिया, मुले, गुलाम व इतर नोकर यांची हत्या करू नये. गुडघ्याच्या मागची शीर कापून किंवा अन्य मार्गाने घोड्याचा नाश करू नये, कारण अल्लाहचे उद्देश साधण्यासाठी आणि शत्रू-विरुद्ध लढण्यासाठी घोड्याचा उपयोग होऊ शकेल.

मूरीश निबंधकार तोर्तोसाचा अबु बक्र याने प्रतिपादलेली युद्धाची तत्त्वे प्रत्यक्ष अनुभवाशी अधिक जुळणारी आहेत. त्याच्या मते युद्ध म्हणजे शत्रूला चकविणे.[१] अगदी शेवटचा उपाय म्हणूनच लष्कराला आमनेसामने लढाई करण्यासाठी पाठवावे किंवा सैन्याच्या समोर सैन्य न्यावे. युद्ध जिंकण्यासाठी सेनानीने आपल्याला जास्तीत जास्त फायद्याचे असे डावपेच लढविले पाहिजेत व लष्कराच्या साहाय्याने आपली पकड घट्ट बसविली पाहिजे.

रणांगणावर कोणत्या क्रमाने सैन्य रचना करावी याविषयी म्हटले आहे की मध्यभागी साहसी, शूर व धिप्पाड योद्धे ठेवावे. हे तत्त्व अनुभवी सेनानींना सुपरिचित आहे. बाजूच्या फळ्यांची पीछेहाट झाली तरी ते सैनिक मधल्या विभागाकडे आशेने पाहतील. तेथे ध्वज फडकत आहेत, ढोल वाजत आहेत असे दृश्य दिसले तर बाजूच्या फळ्यांतील सैनिक तेथे जमा होतील. पळणारा प्रत्येक सैनिक तेथे आसऱ्याला जाईल पण मधली आघाडीच मोडली तर सैन्याच्या बाजूच्या आघाड्या किंवा अंगेही नष्ट होतील. बाजूच्या आघाड्यांचा धुव्वा उडाल्यानंतरही मधल्या आघाडीने लढाई जिंकल्याची अनेक उदाहरणे आहेत, पण या उलट उदाहरण क्वचित आढळते.

गनिमी हल्ला हा युद्धातील सर्वांत परिणामकारक डावपेच होय. त्यासाठी फार माणसे लागत नाहीत. हजार माणसापेक्षा एक चांगला माणूसदेखील अधिक उपयुक्त

---

१. अनेकांचे हेच मत होते. इराणचा उमाय्यद सुभेदार मृत्यूशय्येवर असताना, त्याने आपल्या मुलाला असा सल्ला दिला होता की युद्धात पराक्रमापेक्षा दूरदर्शीपणा व कपट अधिक उपयुक्त असते.

ठरतो. माणसे जास्त असली की अचानक हल्ला करणे शक्य होत नाही आणि अचानक हल्ला परिणामी विध्वंसकही ठरतो. गनिमी मोहिमेवरील सैन्यात चारशे व उत्तम सेनेमध्ये चार हजार सैनिक असणे सर्वोत्कृष्ट होय.

निबंधकार अबु बक्र याने आपल्या देशात पाहिलेल्या सर्वात उत्तम सैन्यरचनेविषयी म्हटले आहे की आघाडीला पायदळ होते. त्यातील सैनिकांपाशी ढाली, लांब भाले व टोकदार बरच्या होत्या. प्रत्येक सैनिक डाव्या गुढघ्यावर वाके, ढाल आपल्यापुढे उभी धरी, भाला शत्रूवर रोखलेल्या स्थितीत ठेवी. पायदळाच्या मागे निवडक धनुर्धर असत. त्यांचे बाण ढालीतून आरपार जात. त्यांच्यामागे घोडदळ असे. खिश्चन सैनिक ( रूम ) चढाई करीत तेव्हा ते आपल्या टप्प्याच्या आत आल्याशिवाय कोणताही मुस्लिम सैनिक जागचा हालत नसे. खिश्चन सैनिक जवळ येताच धनुर्धर त्यांच्यावर बाण सोडीत व पायदळ सैनिक बरच्या फेकीत. तसेच स्वतः त्यांच्या जवळ जाऊनही भाले फेकीत. शत्रूची सेना विस्कळीत झाली की घोडदळ हल्ला करी आणि " ईश्वराची इच्छा असेल ते त्यांच्याकडून घेतले जाई. "

अबु बक्र याने युद्धकलेवर लिहिलेला प्रबंध हा ' राजांसाठी मार्गप्रदीप ' या त्याच्या पुस्तकातील फक्त एक भाग आहे. संपूर्ण याच विषयावर लिहिलेले इतर ग्रंथही उपलब्ध आहेत. यांपैकी एक ग्रंथ एलियनच्या ' डावपेच ' या ग्रंथावर आधारलेला आहे. ( मुस्लिम प्रथा व अनुभवावर आधारीत अशा इतर गोष्टीही त्या ग्रंथात आहेत. ) इसा इब्ने इस्माइल अल् आक्सराई याने हा ग्रंथ लिहिला आहे. मुस्लिम इतिहासाच्या सातव्या शतकात लिहिलेले हे पुस्तक म्हणजे व्यावहारिक मार्गदर्शिकाच[1] आहे. धनुर्विद्या तसेच भाले, तलवार व इतर शस्त्रांचा वापर; कूच करणाऱ्या, तळ टाकलेल्या व लढत असलेल्या सेनेची रचना यासंबंधी त्या पुस्तकात सूचना आहेत. लष्करी हेरगिरी, विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी दलालांचा उपयोग करणे, पहारे व ठाणी, मोहिमेवर निघण्याचा शुभ दिवस ( पैगंबरांना गुरुवार पसंत असे म्हणून गुरुवारचीच निवड केली जाई. ), लष्कराच्या विविध शाखांसाठी लागणारी सामग्री व लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या इतर विषयांवर या पुस्तकांत माहिती दिली आहे.

---

१. किताब फी फजल अल्-जिहाद वा तालिम अल् फुरुसिया ( धर्मयुद्धातील नैपुण्य व अश्वयुद्धासंबंधींच्या सूचना याविषयींचा ग्रंथ निहायत ) आणि अल-सुल वाल-उमनिया फी तालिम अल् फुरुसिया ( अश्वयुद्धाच्या शिक्षणामागील आकांक्षा व इच्छा ) यांचा उद्देश अशी या पुस्तकांची नावे आहेत. ब्रॉकेलमन्न यांच्या मते नज्म अल्-दिन हसन अल् रामाह अल् अहदाब ( मृत्यू ६९४ / १२९४ ) याने वरील नावांची दोन स्वतंत्र पुस्तके लिहिलेली आहेत.

□ □

प्रकरण १०

# इस्लामी विश्वविज्ञान व इतर शास्त्रे

" नागरी लोक अध्ययनाच्या किंवा अध्यापनाच्या दृष्टीने ज्या शास्त्रांना विशेष महत्त्व देतात अशा शास्त्रांचे दोन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे माणूस ज्या शास्त्रांकडे आपल्या बुद्धिद्वारे ओढला जातो अशी प्राकृतिक शास्त्रे. दुसरा भाग परंपरागत शास्त्रांचा. ही परंपरागत शास्त्रे ज्यांनी निर्माण केली त्यांच्यापासून मिळालेल्या माहितीद्वारे शास्त्रांचे ज्ञान माणूस संपादन करतो. पहिल्या भागात तत्त्वज्ञानात्मक शास्त्रे येतात. माणसामध्ये अंगभूत असलेल्या विचारशक्तीद्वारे ही शास्त्रे तो आत्मसात करतो. दुसऱ्या भागात प्रक्षेपित, प्रस्थापित शास्त्रांचा समावेश होतो. ज्यांनी ही शास्त्रे निर्माण केली त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरच या शास्त्रांचे ज्ञान आधारलेले असते. ही शास्त्रे प्रत्यक्ष जीवनास लागू करताना जी अनुमाने काढावी लागतात त्यासाठी लागणारी बुद्धी सोडल्यास या शास्त्रांमध्ये बुद्धीला फारसा वाव नाही. "– वरील शब्दांत शास्त्रांच्या विभागणीसंबंधीचे आपले मत इतिहासकार व समाजशास्त्रज्ञ इब्ने खाल्दुन याने व्यक्त केले आहे. त्याने व्यक्त केलेले मत ही, इस्लामच्या तत्संबंधीच्या मतांचीच प्रतिछाया आहे. 'इल्म' (ज्ञान) या शब्दाचा इस्लामने प्रथम स्वीकार केला त्या वेळी त्या शब्दाच्या अर्थाची कक्षा मुहम्मदांच्या व त्यांच्या तत्कालीन निकटवर्ती शिष्यांनी दिलेल्या ज्ञानापुरतीच मर्यादित होती. ग्रीक तत्त्वज्ञानाच्या निष्कर्षांशी इस्लामचा तोपर्यंत परिचय झालेला नव्हता. त्यामुळे इस्लामची शास्त्रविषयक कल्पना बरीच स्वतंत्र होती. पैगंबरांच्या म्हणून सांगितल्या जाणाऱ्या एका सुभाषितात म्हटले आहे की " ज्ञान दोन प्रकारचे आहे. धर्माचे ज्ञान आणि शरीराचे ज्ञान.[१] " याचा सकृद्दर्शनी अर्थ असा की

या वर्गीकरणावरून असे स्पष्ट दिसते की इस्लाममध्ये प्राकृतिक शास्त्र या अर्थाने शास्त्र आणि धर्म यांच्यात विरोध तर नाहीच पण भेदही मानलेला नाही. उलट

१. अल् इल्म इल्ममा, इल्म-अल्-आद्यात वा इल्म अल्-अब्दान– ईश्वरज्ञान आणि औषधिशास्त्र यांच्यांत ज्ञान साठविलेले आहे. असे असले तरी या सुभाषिताचा अर्थ असा लावण्यात आला आहे की, शास्त्रांच्या दोन शाखा आहेत– एक निर्गुण आणि दुसरी सगुण.

प्राकृतिक शास्त्रांचा धर्माच्या कक्षेत समावेश होतो. इस्लामवर श्रद्धा असणाऱ्या सर्व-सामान्य माणसाचा असा विश्वास आहे की इस्लाम हा जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा महान धर्म आहे; आणि त्यामुळे नैसर्गिक व दृष्टिगम्य म्हणून समजल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींचा त्यात समावेश होतो. खलिफा उमर याच्या संबंधीच्या एका प्रसिद्ध आख्यायिकेवरून इस्लाममधील हा दृष्टिकोण स्पष्ट होतो. अलेक्झांड्रियाचे ग्रंथालय नष्ट करण्याचा हुकूम त्याने दिला होता; कारण त्याचे म्हणणे असे होते की तेथे मिळणारे ज्ञान एकतर कुराणात आहेच आणि कुराणात नसलेले ज्ञान तेथे मिळत असेल तर ते ज्ञानच नव्हे. ग्रंथालयांत मिळणारे ज्ञान कुराणातलेच असेल तर ग्रंथालय अनावश्यक आहे आणि कुराणात नसलेले ज्ञान तेथे मिळत असेल तर ते घातक आहे. या आख्यायिकेच्या खरेपणाबद्दल निश्चितच शंका आहे.[1] पण जगातील सर्व ज्ञान कुराणात किंवा पैगंबरांच्या परंपरात आहे असे मानणारे जे लोक मुस्लिमांमध्ये आहेत त्यांची वृत्ती यातून व्यक्त होते. सर्व ज्ञान तोराहमध्ये आहे असे जाहीर करणाऱ्या रॅबीसच्या दृष्टिकोणासारखाच हा दृष्टिकोण आहे. इब्ने हाझमच्या मते "बुद्धीने सिद्ध करता येईल अशी प्रत्येक गोष्ट कुराणाने किंवा पैगंबरांनी आपल्या शब्दात स्पष्टपणे सांगितलेली आहे." ही भूमिका घेणारांचे म्हणणे असे की इस्लामने ज्या अर्थी पूर्वीच्या सर्व धर्मांना त्याज्य ठरविले आहे त्या अर्थी त्या धर्मांशी निगडीत असलेले सर्व संचित ज्ञानही त्याने रद्द ठरविले आहे. पण ही एककल्ली भूमिका इस्लामी इतिहासाच्या तुलनात्मकदृष्ट्या नंतरच्या काळातील आहे. ज्या काळात उलेमांच्या जबर प्रभावामुळे इस्लाम धर्म फार कर्मठ व साचेबंद झाला त्या काळातील हा दृष्टिकोण आहे. तसे नसते तर नवव्या शतकात बगदादच्या अब्बासी खलिफांनी तसेच त्याच शतकातील इराणच्या राजांनी किंवा इजिप्तमधील फातिमी खलिफांनीं आणि स्पेनमधील उमाय्यदांनी ग्रीक शास्त्राच्या अभ्यासास एवढ्या उदारपणे उत्तेजन दिले नसते किंवा एवढ्या आस्थेने त्याचा अभ्यास केला नसता. विशेष म्हणजे या सर्व प्रदेशांत इस्लाम हाच एकमेव खरा धर्म म्हणून त्याचा कडवेपणाने आणि कित्येकदा अतिरेकी उत्साहाने प्रसार करण्यात आला.

इस्लामी इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात धर्मप्रस्थापनेच्या कार्यातच सारा वेळ गेल्याने मूळ कार्यापासून मन विचलित व अस्थिर करणाऱ्या ग्रीक तत्त्वज्ञानासारख्या विषयाच्या अभ्यासास इस्लामची मान्यता असणे शक्यच नव्हते.[2] अशा अभ्यासासाठी आवश्यक अशी साधनसामग्री उपलब्ध असती तरीही ते शक्य नव्हते. पण मुताझिलींच्या

---

१. इब्ने खाल्दुन याने आपल्या 'Prolegomenes' या ग्रंथात ही घटना इराणवरील विजयाशी निगडीत केली आहे. पण हे ग्रंथालय कोठे होते हे सांगितलेले नाही.

२. परंतु अशा काळातदेखील उमाय्यद राजपुत्र खालिद इब्ने याझीद इब्ने

[ पुढील पान पहा ]

उदयाबरोबर बाह्य जगातील घटनांचा प्रभाव जाणवण्यास सुरुवात झाली. मुताझिलींनी बौद्धिक पायावर आपल्या धर्मपंथाची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न केला. ग्रीक व इतर तत्त्ववेत्त्यांनी निरीक्षण व विचार यांच्या पायावर परिश्रमपूर्वक जी तत्त्वज्ञाने व शास्त्रीय पद्धती प्रस्थापित केल्या होत्या, त्यांतील कल्पनांचा विचार न करणे इस्लामला अशक्यच होऊ लागले होते. तत्त्वज्ञानाचे अस्तित्व मान्य करण्यात आल्यानंतरही 'इल्म'मध्ये [ इल्म ही संज्ञा 'सायेन्शिया' या लॅटिन संज्ञेशी मूळ अर्थाच्या बाबतीत मिळतीजुळती आहे. ] ईश्वरज्ञान आणि इस्लामच्या मूलभूत सिद्धान्ताशी संबंधित अशा अध्ययनाचा अंतर्भाव करण्यात येत होता. ग्रीक तत्त्वज्ञानातील कल्पनांनी प्रभावीत झालेले काही थोडे लोक सोडले तर इतर मुस्लिमांनी शास्त्रांचा अभ्यास केला तो हिब्रूलोकांप्रमाणेच निसर्गातील विविध चमत्कार हे ईश्वरी वैभवाचे कसे निदर्शक व प्रतीक आहेत हे दाखवून देण्यासाठी. ग्रीकांप्रमाणे काही मुस्लिम तत्त्वज्ञ केवळ अव्यक्त सत्याचा शोध घ्यावयाचा या हेतूने उद्युक्त झाले असले तरी त्यांची धर्मावरची श्रद्धा मात्र कायमच राहिली. उदाहरणार्थ, अविसेन्न हा तत्त्वज्ञ. विद्वान पंडित शाहरिस्तानी याच्या मते अविसेन्न हा अल्-अहवा यांच्या वर्गातला असला ( अहल अल् अहवा म्हणजे ज्यांनी धर्माच्या कक्षेबाहेर जाऊन स्वतःच्या 'इच्छां'मधून आपल्या कल्पना विकसित केल्या असे लोक. ] तरीही आपल्यासमोरील प्रश्न सोडविण्यात आपणास अपयश येई तेव्हा प्रार्थनेसाठी व स्फूर्तीसाठी आपण मशिदीत जात असू अशी कबुली अविसेन्नने आत्मचरित्रात दिली आहे.

'शास्त्रा'संबंधीच्या इस्लामी कल्पनेचा अधिक तपशिलाने विचार करणे या ठिकाणी आवश्यक आहे. शास्त्रांची, धार्मिक अभ्यास आणि ऐहिक अभ्यास अशी मुख्यतः विभागणी करण्यात आलेली दिसते. पहिल्या विभागातील शास्त्रात कुराण, हदिस आणि विश्वविज्ञान यांचा समावेश होतो. या शास्त्राची भाषा अरबी आहे. म्हणूनच त्यांना 'उलूम अल्-अरब' ( अरब शास्त्रे ) असे म्हणतात. ऐहिक शास्त्रे मुख्यतः ग्रीक प्राचीन ग्रंथांतून घेतलेली असल्याने त्यांना 'उलूम अल् आजम' ( अरबेतर शास्त्रे ) किंवा 'उलूम अल् अवाइल' ( प्राचीनांची शास्त्रे ) असे म्हणतात.

शास्त्रांपैकी अरबी किंवा परंपरागत शास्त्रांच्या वर्गांपैकी कुराणात प्रतिपादलेले

---

[ मागील पानावरून टीप ]

मुरुविया याने रसायन शास्त्र ( धातुपरिवर्तनविद्या ), औषधीशास्त्र व खगोलशास्त्र या शास्त्रांचे एका ग्रीक साधुबरोबर अध्ययन केले असे सांगतात. ( पहा : इब्ने खलिक्कन याने लिहिलेले या राजपुत्राचे चरित्र. ); पण इब्ने अल् नाझिमच्या म्हणण्याप्रमाणे या राजपुत्राने फक्त धातुपरिवर्तनविद्येचे अध्ययन केले. जे. रुस्का याने या माहितीसंबंधी शंका व्यक्त केली आहे.

शास्त्र हे साहजिकच सर्वांत महत्त्वाचे शास्त्र होय. या पवित्र ग्रंथाचा प्रत्येक शब्द अल्लाहचा शब्द मानला जातो. त्यामुळे कुराणातील प्रत्येक शब्दाला व अक्षराला महत्त्व असून त्याचा अत्यंत खोलवर असा अभ्यास व संशोधन झाले. या अभ्यासातूनच अरबी भाषेचा व विशेषतः पैगंबरांच्या कुरेश टोळीच्या बोली भाषेचा शब्दसंग्रह व व्याकरण यांचे संशोधन सुरू झाले. या अभ्यासाला मदत म्हणून प्राचीन अरबी काव्याचे उपलब्ध असलेले नमुने गोळा करण्यात आले. त्या काव्यातील ताल व लय यामुळे ते आठवणीत ठेवायला सोपे होते. कुराणातील व इतर ग्रंथांतील अपरिचित आणि क्वचित वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा अर्थ लावण्यासाठी या काव्याचा आधार घेण्यात येऊ लागला. इतर ग्रंथांमधूनही शब्दांच्या अभिप्रायाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले साहित्य जमा करण्यात आले व त्यातून अखेर अरबी शब्दकोशाचा पाया तयार झाला. कोश-रचनेशी व्याकरणाचा संबंध असल्याने व्याकरण हासुद्धा– विशेषतः इराकमध्ये– महत्त्वाचा अभ्यासविषय झाला. इराकमधील बसरा व कुफा येथील व्याकरणशाळा प्रसिद्ध होत्या. अरबी शब्दांचे अर्थ व व्याकरण नियमबद्ध करण्याचा हा प्रयत्न कुराणाच्या अभ्यासा-साठी सहाय्यक होता.

अभ्यासविषय म्हणून कुराणाच्या खालोखाल पैगंबरांच्या परंपरांना महत्त्व होते. इस्लाम धर्माच्या दृष्टीने तर परंपरांचे प्रत्यक्षातील महत्त्व कुराणाच्या बरोबरीचे होते. पैगंबरांच्या परंपरा ‘ फिकाह ’साठी एक मूळ स्रोत म्हणून तर उपयोगी पडल्याच, शिवाय मुहम्मदांच्या चरित्रासंबंधीची बरीचशी सामग्रीही त्यातून मिळाली. त्यांच्या चरित्र-लेखनाचे व मोहिमांच्या वर्णनाचे काम लवकरच हाती घेण्यात आले. या निरनिराळ्या मोहिमांत ज्या अरब व इतर लोकांशी पैगंबरांचा संपर्क आला त्यांच्या वर्णनाचाही अंतर्भाव त्यात करण्यात आला. पैगंबरांच्या सहकाऱ्यांसंबंधीही संशोधन होऊ लागले. त्यामुळे मुस्लिमपूर्व काळात ज्ञानाची एक शाखा म्हणून ज्या वंशावळशास्त्राला विशेष महत्त्व दिले जात असे त्या शास्त्राचे महत्त्व टिकून राहिले. वंशावळशास्त्राचा उपयोग आता संशोधक, पैगंबरांच्या नातलगांशी किंवा त्यांच्या कुरेश टोळीशी असलेले संबंध सिद्ध करण्यासाठी करू लागले. सुरुवातीच्या खलिफांच्या उदयानंतर आणि परदेशांतील विजयी मोहिमा सुरू झाल्यानंतर अधिक व्यापक स्वरूपाचा इतिहास लिहिण्यास प्रथमच चालना मिळाली. हा इतिहास केवळ अरबांपुरता मर्यादित नव्हता तर पैगंबरांच्या विजयी वारसदारांचा ज्या ज्या देशांशी संबंध आला त्या सर्वांचा त्या इतिहासात समावेश होता.[१]

याच काळात काव्य ( मुस्लिम पूर्व काळातील हा एक अवशेष होता ), अलंकार

---

१. ख्वाराज्मी याच्या ‘ मफातीह अल्-उलूम ’ ( इ. स. ९७६ मध्ये रचलेले ) तसेच इब्ने अल्-नाझिम याच्या ‘ फिहरिस्त ’ ( इ. स. ९८८ मध्ये रचलेले ) या ग्रंथात ही माहिती आहे.

आणि आदब ( लालित्यपूर्ण शैलीतील साहित्यासारखे साहित्य ) यांसारख्या साहित्याच्या अधिक व्यापक प्रकारांकडेही लक्ष दिले गेले. विशेषतः इस्लामचा प्रभाव वाढल्यानंतरच्या काळात धर्मप्रचार होईल किंवा धार्मिक शिकवण मिळेल अशा पद्धतीने या साहित्यप्रकारातील विषयांची मांडणी वाढत्या प्रमाणात करण्यात येऊ लागली. इब्ने खाल्दुनने शब्दकोश व व्याकरण याबरोबर या साहित्यप्रकारांचाही तत्त्वज्ञानात्मक शास्त्रात समावेश केला आहे. कुराणाच्या अभ्यासासाठी या शास्त्रांचे ज्ञान असणे ही प्राथमिक आवश्यक गोष्ट मानण्यात आली आहे. म्हणूनच ' मुस्लिम ' विज्ञानात त्यांचा समावेश करण्यात आला. ' फिक़ाह 'ची तत्त्वे आणि त्यांचा व्यवहारातील आचार तसेच ' कलमा ' म्हणजे ईश्वरविज्ञान ही शास्त्रे कुराण व हदिस या दोहोंवर आधारलेली आहेत. ईश्वराचे स्वरूप, त्याचे व्यक्त रूप, पुनरुत्थान, स्वर्गाचा लाभ, नरकाची शिक्षा, दैव आणि या सर्वांचे बुद्धीला पटणारे पुरावे हे सर्व विषय ' कलमा 'त समाविष्ट आहेत.

कुराणाचा धार्मिक व कायदाविषयक आशय विशद करणे हा या सर्व अभ्यासाचा मुख्य हेतू असला तरी पैगंबरांच्या आणि त्यांच्या शब्दांचा अर्थ लावणाऱ्यांच्या शास्त्रीय कल्पना तांत्रिक अर्थाने काय होत्या, यावरही या अभ्यासाद्वारे आनुषंगिक प्रकाश पडतो. घोड्यांची निगा, अश्ववैद्यक, उंटांची जोपासना, यांसारख्या अनेक कला झाहिलियातील अरबांना ज्ञात होत्या. त्यांची तांत्रिक परिभाषा प्रदीर्घ अभ्यासानंतर तयार झालेली होती. स्थिर तारे, ग्रहांच्या हालचाली, हवामानातील बदल यांचे ज्ञानही तद्देशीय लोकांनी संपादित केलेले होते. शांततेचा काळ असेल तेव्हा पक्षांचे व जनावरांचे कळप नव्या कुरणांकडे नेत असताना किंवा लढाईच्या मोहिमेवर असताना विश्वातील वरील सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक निरीक्षण केले जाई. स्थानिक व टोळीचा इतिहास आणि वंशावळीचा अभ्यास याच्याशी संबंधित अशी ज्ञानाची आणखी एक शाखा होती. वारसासंबंधीच्या प्रश्नांना तसेच त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे टोळीच्या किंवा व्यक्तिगत प्रतिष्ठेच्या प्रश्नाचा विचार करण्याच्या दृष्टीने वंशावळीच्या अभ्यासास बरेच महत्त्व होते. पैगंबरांची शिकवणूक समजण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग होई.

कुराणात निसर्गाच्या ज्या स्वरूपांचा उल्लेख आहे त्यांचा सर्वसाधारणपणे उत्पत्तीच्या वर्णनांशी संबंध आहे; तसेच हा उल्लेख अलंकारिक स्वरूपाचा आहे. पृथ्वी हा मध्य कल्पून पैगंबरांनी विश्वाची कल्पना केली असावी असे दिसते. उत्पत्तीच्या[१] वेळी पृथ्वी " ताणण्यात " आली किंवा " एखाद्या गालिच्याप्रमाणे[२] " पसरण्यात आली असेही उल्लेख वारंवार आढळतात. त्यावरून पृथ्वी सपाट[३] असावी अशी पैगंबरांची कल्पना

१. कुराण ७९$^{३०}$, ८४$^{३}$.
२. कुराण ५१$^{४८}$, ७१$^{१९}$.
३. कुराण ७८$^{४}$.

असल्याचे अनुमान काढता येते. पण सनातनी विचाराचे मुस्लिम ही गोष्ट[१] अमान्य करतात. पृथ्वीचा उल्लेख सर्वसाधारणपणे एकवचनीय आहे. पण कुराणातील एका[२] उताऱ्यात म्हटले आहे की अल्लाहने सात[३] स्वर्गाबरोबरच पृथ्वी निर्माण केली. त्यापूर्वी हे सर्व भाग[४] एकत्र होते. पृथ्वी स्थिर राहावी, ती सरकू[५] नये म्हणून जमिनीत पर्वतरूपी[६] खुंट्या ठोकल्या आहेत. अज्ञात काळातील जलाशयावर[७] पृथ्वी उभी आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावरही दोन समुद्र निर्माण करण्यात आले असून त्यांपैकी एक गोड्या पाण्याचा व दुसरा खाऱ्या[८] पाण्याचा आहे. हे समुद्र जवळ येतात पण एकमेकांत मिसळत नाहीत.[९] अज्ञात काळातील जलाशयाहून हे समुद्र निराळे आहेत. त्या जलाशयांवर अल्लाहचे[१०] सिंहासन तरंगत असते.

---

१. कुराण २$^{१०}$ वरील आपल्या टीकेत बैदावीने म्हटले आहे, पृथ्वी सपाट आहे असे पैगंबरांचे मत होते असे त्यांच्या उद्‌गारावरून वाटत नाही. कारण पृथ्वीचा पृष्ठभाग एवढा विस्तीर्ण आहे की ती 'पसरट' आहे असे म्हणता येणार नाही.

२. ६५$^{१२}$.

३. बैदावीचे कुराण ६$^{१}$, ३९$^{९७}$ वरील भाष्य.

४. कुराण २१$^{३१}$.

५. कुराण २१$^{३२}$, ३१$^{९}$, १६$^{१५}$. यांपैकी शेवटच्या आयताविषयी बैदावी याने असे म्हटले आहे की, पर्वत निर्माण होण्यापूर्वी पृथ्वी हा एक गुळगुळीत गोल होता आणि आपल्या गोलाकार वैशिष्ट्यानुसार स्वर्गाप्रमाणे पृथ्वी गोल फिरत होती किंवा इतर क्षुल्लक कारणांमुळे तशी फिरत होती. परंतु पृथ्वीवर पर्वत निर्माण झाल्यानंतर पृथ्वीच्या 'बाजू' (म्हणजे प्रमुख बिंदू) एकासेकांपासून वेगळ्या पडल्या आणि आपल्या वजनामुळे पर्वत केंद्रबिंदूपाशी स्थिरावले आणि पृथ्वी हालू नये यासाठी हेच पर्वत खुंटीचे काम करू लागले.

६. कुराण ७$^{८७}$.

७. कुराणाचे भाष्यकार 'नुन' (बॅबिलोनियन पुराणातील 'मत्स्य')चा उल्लेख करतात. खालच्या जलाशयाहून हा मासा वेगळा होता अशी त्यांची कल्पना होती.

८. कुराण २५$^{५५}$.

९. कुराण ५५$^{१९}$, २७$^{६२}$, ३५$^{१२}$.

१०. कुराण ११$^{९}$. तबरीने "पृथ्वी व स्वर्ग यांच्या सभोवती पसरलेला आणि सात पृथ्व्यांना एकमेकांपासून वेगळा करणारा समुद्र" असे या समुद्रासंबंधीचे एक मत उद्‌धृत केले आहे.

पृथ्वीवर आकाश एखाद्या छपराप्रमाणे[१] बांधलेले आहे. त्याला आधारस्तंभ[२] नाहीत. तरीही ते केवळ अल्लाहच्या सामर्थ्यामुळे अधांतरी उभे आहे. त्यात एकावर[३] एक याप्रमाणे भक्कम बांधलेले[४] सात[५] स्वर्ग आहेत. या स्वर्गाच्या दरम्यानचे अंदाजे अंतर, तसेच स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधील अंतर यासंबंधी काहीच कल्पना त्यात केलेली नाही. पण खलिफा उमर याचे असे मत असल्याचे टीकाकार सांगतात की पृथ्वी आणि स्वर्ग यांच्यातील अंतर पूर्व आणि पश्चिम या दरम्यानच्या अंतराएवढे आहे आणि सपाट रस्त्याने निघालेल्या एखाद्या प्रवाशास हे अंतर काटण्यास पाचशे वर्षे लागतील.

सूर्य आणि चंद्र[६] निरनिराळ्या स्वर्गांत तरंगतात. सर्वांत खालच्या स्वर्गात इतर ग्रह[७] व स्थिर तारे[८] आहेत. सूर्य प्रत्येक दिवशी त्याच्यासाठी ठरलेल्या विश्रांतिस्थळा[९]-पर्यंत प्रवास करून जात असतो. जणू सूर्याचे एखादे विश्रांतिस्थळ आहे! रात्रीच्या सौंदर्याचे दर्शन घडविण्यासाठी दिवस एखाद्या पडद्याप्रमाणे[१०] बाजूला सरकतो. राशि-मंडळातील[११] राशीवर नेमलेल्या ठिकाणी चंद्र रोज रात्री[१२] येतो. पण सर्व स्वर्ग एक फेरी

---

१. कुराण २१[३३].

२. कुराण १३[२].

३. कुराण २३[१६], २[२७].

४. कुराण ७८[१२].

५. कुराण ७१[१४], २३[१६], ६७३, २[२७]. मसूदी म्हणतो, "स्वर्ग बाष्पातून निर्माण झाले. पारंपरिक समजुतीनुसार सर्वांत खालचा स्वर्ग पाचूचा, दुसरा शुभ्र चांदीचा, तिसरा लाल प्रवाळाचा, चौथा शुभ्र मोत्यांचा, पाचवा लाल सुवर्णाचा, सहावा पीत प्रवाळाचा आणि सातवा प्रकाशाचा बनलेला आहे." बैदावीने कुराण २[२७] वरील आपल्या भाष्यात, कुराणातील स्वर्गासंबंधीच्या या कल्पना आणि बॅबिलोनियन टॉलेमीची नऊ गोलांची कल्पना यांची सांगड घसते असे म्हटले आहे, परंतु तरीही टॉलेमीच्या नऊ गोलांविषयी त्याने शंका प्रदर्शित केली आहे. पण टॉलेमीची कल्पना खरी असेल तर 'अर्श' व 'कुर्सी' (उभय शब्दांचा अर्थ 'सिंहासन') मिळून ९ गोल होतात.

६. कुराण ३६[४०], २१[३४], ७१[५].

७. कुराण ६७[५].

८. कुराण ८१[५].

९. कुराण ३६[३८].

१०. कुराण ३६[३७].

११. कुराण १५[१६].

१२. कुराण ३६[३९]. मनुष्याला काळ व ऋतु यांचे ज्ञान व्हावे यासाठी चंद्राच्या कळा ठरविल्या आहेत (कुराण २[१८५], १०[५]).

पूर्ण झाल्यानंतर पूर्वीच्याच[१] जागी येतात आणि आपल्या नियमित परिभ्रमणात[२] सूर्य चंद्राला किंवा रात्र दिवसाला त्या अगोदर मागे टाकीत नाहीत.

स्वर्गामध्ये पाऊस[३] साठविलेला आहे. वाऱ्याने हलणारे ढग आकाश व्यापतात. त्यांच्यामधून व त्यांच्या फटींतून पृथ्वीवर पाणी पडते व पिके येतात.[४] स्वर्गातून खाली पाठविल्या जाणाऱ्या काळ्या,[५] गर्जणाऱ्या व चमकणाऱ्या पर्वतप्राय ढगांबरोबर गारा[६] खाली पडतात.

सृष्टी मूलतः कोणत्या घटक द्रव्यांची बनलेली आहे याबद्दल कुराणात काहीच सांगितलेले नाही. पण टीकाकारांनी मात्र कुराणातून स्वतःचे असे काही निष्कर्ष काढलेले आहेत. पण सर्व जीवसृष्टीची उत्पत्ती[७] पाण्यापासून झाली असे पैगंबरांनी आपल्या प्रकटीकरणात स्पष्ट म्हटलेले आहे. मनुष्याचा जन्म मात्र मातीतून[८] व अग्नीच्या 'जिन'[९] पासून झाला अशी एक दुसरी कल्पना आहे.

लोकप्रिय विभूतींच्या तोंडी छोटी सुभाषिते घालून व अशा रीतीने मोठ्या नावांचा आधार घेऊन त्याद्वारे लोकांपर्यंत ज्ञान पोचवायचे अशी प्राचीन साधुसंतांची पद्धती होती. भौतिक सृष्टीच्या घटकद्रव्यांचा विषय कुराणाच्या भाष्यकारांनी याच पद्धतीने विशद केला आहे. खलिफा उमर याने ग्रीकांविरुद्ध केलेल्या युद्धांत एकदा ग्रीक बादशहाला लढाईचा कंटाळा आला तेव्हा त्याने खलिफाशी शाब्दिक द्वन्द्व सुरू केले. खलिफाकडे त्याने एक बाटली पाठवून विनंती केली की, जगातील "सर्व गोष्टी बाटलीत भरून" ती

---

१. कुराण ८६[११].

२. कुराण ३६[४०].

३. कुराण १५[२२].

४. कुराण ३०[४७-४९], २[१९], ७[५५]. "सिंहासनाखाली एक समुद्र आहे. त्यातून सर्व सजीव प्राण्यांना अन्न मिळत असते. मसूदीच्या मुरुज या ग्रंथांत म्हटले आहे, जे द्यावयाची परमेश्वरी इच्छा असते ते एका स्वर्गातून दुसऱ्या स्वर्गात 'अल्-अब्राम' या नावाच्या जागेपर्यंत पावसासारखे पडते. ते परमेश्वर वाऱ्याकडे पाठवितो आणि वारा ते ढगांकडे घेऊन जातो आणि ढग ते खाली पाठवितात."

५. कुराण २४[४३].

६. कुराण २[१९]. या आयताच्या संदर्भात बैदावी म्हणतो, "वाऱ्यामुळे ढगांचे समुदाय एकमेकांवर आदळतात व त्यांतून गडगडाट होतो."

७. कुराण २१[३०], २४[४४], २५[२५].

८. कुराण २३[१२], ३५[१२].

९. कुराण १५[२७].

परत पाठवा. खलिफाने ती बाटली पाण्याने भरून पाठवली व सोबत संदेश धाडला, "या बाटलीत ऐहिक जगांतील सर्व गोष्टी आहेत."[१]

बैदावीच्या[२] मताप्रमाणे परमेश्वर सर्व काही निर्माण करू शकतो. दुसरे कोणीही काही निर्माण करीत नसतो. कारण परमेश्वराने स्वतःच स्वर्ग व पृथ्वी निर्माण केली किंवा आधीच अस्तित्वात असलेल्या जडातून त्याने ती निर्माण केली. तसेच स्वर्ग व पृथ्वी यांच्या दरम्यान असलेल्या सर्व गोष्टी त्याने निर्माण केल्या. नवी निर्मिती ज्या जातीतून ईश्वराने उत्पन्न केली त्याच जातीची ती निर्मिती असेल असे नाही. उदा. आदम व प्राणी हे त्यांच्या मूळ द्रव्यापासून ( पाणी किंवा माती ) निराळे आहेत. तसेच सजीव प्राण्याची उत्पत्ती आदमपासून ईव्ह झाली त्याप्रमाणे किंवा एकट्या नरापासून किंवा मेरीपासून येशू झाला त्याप्रमाणे एकट्या स्त्रीपासून किंवा मानवजातीत सर्वत्र आढळते त्याप्रमाणे स्त्री-पुरुषांच्या संयोगातून होऊ शकेल. या संदर्भात असे म्हणता येईल की मानवाचे जे माकडात किंवा डुकरात रूपांतर झाले यासंबंधी कुराणाचे स्वतःचे असे वेगळे मत आहे.[३]

जगाची उत्पत्ती सहा दिवसांत[४] झाली असे कुराणात म्हटले आहे. ( याचे मूळ बायबलमध्ये आढळते. ) 'बुक ऑफ जेनिसिस' मधील विश्वोत्पत्तीच्या उपपत्तीची चर्चा रॅबिनिकल भाष्यकारांनी ज्याप्रकारे केली आहे त्याप्रकारेच मुस्लिम भाष्यकारांनी कुराणांतील उत्पत्तीची चर्चा केली आहे. विश्वाचे वय, त्याचा संभाव्य जीवितकाल यासंबंधी मुस्लिम व रॅबिनिकल भाष्यकारांनी केलेल्या अनुमानात ( सहा ते सात हजार वर्षे ) मात्र फारसा फरक नव्हता.

मुताझिलींच्या[५] उदयाबरोबर आणि त्यांनी आपल्या श्रद्धांना व बुद्धीला पटणारा आधार देण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर कुराण, हदिस यासारख्या अरबी ग्रंथांतून मिळणाऱ्या ज्ञानाच्या पलीकडे असलेले ज्ञान मिळविण्याची इच्छा इस्लाममध्ये वृद्धिंगत होत गेली. याचा परिणाम म्हणजे अब्बासींच्या काळात नवव्या शतकाच्या सुरुवातीला

---

१. मसूदी 'मुरुज' या आपल्या ग्रंथात म्हणतो की देवाने प्रथम पाणी निर्माण केले यासंबंधी शास्त्रज्ञांचे एकमत नाही.

२. कुराण ५[२०] वरील टीका.

३. कुराण २[६१], ५[६५].

४. ४१[८-१०], ५०[३२].

५. खलिफा मामुन याच्या काळात ( ८१३–३३ ) 'फुटीरां'चा हा पंथ विशेष क्रियाशील होता. कुराण अल्लाहने निर्माण केले असले तरी अल्लाहप्रमाणे ते चिरंजीव नाही. पैगंबरांचे म्हणून जे विशेष गुण समजले जातात त्यांना निराळे अस्तित्व नाही, अशा स्वरूपाचे या पंथीयांचे सनातनी मुस्लिम धर्मशास्त्रज्ञांशी मतभेद होते.

ॲरिस्टॉटलचे तत्त्वज्ञान व प्राकृतिक शास्त्रे, युक्लिडचे गणितशास्त्र आणि हिपोक्रेटिस व गालेन यांचे वैद्यकशास्त्र या शास्त्रांतील ग्रीकांचे ज्ञान भाषांतरित रूपाने अशा विषयांची आस्था असलेल्या मुस्लिम विद्वानांना उपलब्ध करून देण्यात आले. प्राकृतिक शास्त्रा-संबंधींच्या कुराणांतील संक्षिप्त कल्पनांचे विशदीकरण व विस्तार, खरे तर 'हदिस' सांगणाऱ्यांनीं तसेच पैगंबर, त्यांचे सहकारी व इस्लाम धर्मांतील इतर थोर पुरुष यांच्या संबंधींच्या बोधपर आख्यायिका ऐहिक चमत्कृतींच्या वर्णनाद्वारा उत्तमप्रकारे सांगता येतात, असे मानणारांनी केला. पण ज्यांच्या धर्मकल्पनेत परकीय विचारांचा अभ्यास-वर्ज्य नव्हता अशा लोकांना ग्रीक तत्त्वज्ञानाचा आदर्श व त्याची पद्धती यासंबंधी आकर्षण वाटत होते. अशा परकीय कल्पनांचा झपाट्याने प्रसार झाला आणि तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र याबद्दल आवड असणारे विद्वान त्याकडे औत्सुक्याने वळले. हे लोक तिकडे वळले ते आपणांस सत्याचे दर्शन व्हावे या अपेक्षेने नव्हे तर मनात जे प्रश्न नव्याने उपस्थित झाले आणि ज्यांना उपलब्ध ग्रंथांनी स्पर्श केलेला नाही अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी.

इस्लामच्या विचारावर ग्रीक प्रभाव पडण्यास प्रारंभ झाला त्या काळातील सर्वांत प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे अल् किंडी हा 'अरबांचा तत्त्वज्ञ' होय. तो इ. स. ८५० साली निधन पावला. त्याचा ग्रंथ मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. म्हणून त्याचा समकालीन बसऱ्याचा मुताझिली जाहिझ याच्या ग्रंथाचाच पर्याय म्हणून विचार करू. जाहिझ २५५–८६९ मध्ये निधन पावला. तो बहुश्रुत व सुसंस्कृत 'मौला' होता. त्याच्या लेखनात विषयांतर आहे. तथापि स्वतंत्र बुद्धीने परंपरागत ग्रंथांची चिकित्सा करून विश्वाच्या कोड्याचे बुद्धीला पटेल असे समाधानकारक उत्तर शोधण्याचा प्रयत्न त्याच्या लेखनात दिसतो. 'किताब अल् हयवान' हे त्याचे पुस्तक, प्राण्यांवरील क्रमिक पुस्तक या वरकरणी उद्देशाने लिहिलेले असले तरी अनेक विषयांत लेखकाने संचार केलेला आहे. त्याने केलेल्या चर्चेवरून ॲरिस्टॉटलचे चार मूळ घटकांचे तत्त्व ( अल्-अर्कान ) त्याला माहीत असल्याचे दिसते. 'चंद्राच्या खाली असलेले जग, पाणी, माती, हवा आणि अग्नी या चार मूळ घटकांचे बनलेले' आहे असे ॲरिस्टॉटलचे तत्त्व होते. ॲरिस्टॉटलचे हे तत्त्व स्वीकारूनही जाहिझ हा ॲरिस्टॉटलच्या प्रभावामुळे विश्वाची विभागणी दोन भागांत करतो. एक सजीव व विकासक्षम सृष्टी आणि दुसरी निर्जीव व विकासक्षमतेचा अभाव असलेली सृष्टी. जीव सृष्टीची तो पुन्हा प्राणीजगत् व वनस्पतीजगत् अशी उपविभागणी करतो व नंतर प्राण्यांच्या निरनिराळ्या जातींचे वर्णन करतो. प्राण्यांचे त्याने चार वर्ग पाडले आहेत. ते ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाशी सर्वसाधारणपणे जुळणारे आहेत. पण पूर्णपणे निराळीच पद्धत अनुसरून त्याने हे वर्गीकरण केले आहे. चालणारे, उडणारे, पोहणारे किंवा पोटावर सरपटणारे अशा प्रकारचे हे वर्गीकरण आहे. आपले हे वर्गीकरण समाधानकारक नाही याची त्याला जाणीव आहे. उदा. तो म्हणतो की, उडणारे प्राणी चालूही शकतात हे मला माहीत आहे. पण जे प्राणी चालतात पण उडू शकत नाहीत.

त्यांना कोणी उडणारे प्राणी म्हणणार नाही. तेव्हा आपल्या प्रतिपादनाबद्दल गैरसमज करून घेतला जाणार नाही असा त्याचा दावा आहे. चालणाऱ्या प्राण्यांची त्याने पुनश्च माणसे, माणसाळलेले प्राणी, जंगली श्वापदे व रांगणारे प्राणी अशी चार वर्गांत आणखी उपविभागणी केली आहे. रांगणारे प्राणी माणसाळलेले प्राणी किंवा वन्य श्वापदे यांच्या वर्गात येऊ शकतील. तरीही "हे भाषण ऐकणारांना आणि जीभ असलेल्या सर्वांना" हे वर्गीकरण आकलन होण्यासारखे आहे असे जाहिझने म्हटले आहे.

जाहिझ याने आपल्या प्राण्यांवरील ग्रंथाच्या इतर भागात चार मूळ घटकांच्या सिद्धान्ताची पुन्हा चर्चा केली आहे. उष्णता, थंडी, कोरडेपणा व द्रवता या चार घटकांपासून जग तयार झाले असे भौतिकवादी ( म्हणजेच ऐहिकतावादी तत्त्वज्ञानी ) मानतात. ( अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टी या चार "द्रव्यां"च्या[1] बनलेल्या आहेत असे ते मानतात. ) जाहिझच्या समकालीन संशोधकांना या प्रश्नाचे मोठे कोडे होते. त्यांच्या मते माती, हवा, पाणी व अग्नी हे चार मूळ घटक असून इतर चार घटक म्हणजे केवळ त्यांचे गुणधर्म आहेत, किंबहुना त्यांच्यापासूनच बनलेले ते घटक आहेत.[2]

जाहिझने विश्वघटकांचे स्वरूप ज्या पद्धतीने विशद केले आहे त्यावरून त्या काळातील मूळ शास्त्रीय सिद्धांतांची कल्पना येईल. चर्चेला आधार म्हणून प्रकाश देणारे व जळणारे पदार्थ त्याने घेतले आहेत. या पदार्थांतील अग्नी डोळ्यांनी दिसण्यापूर्वी त्यांच्यात होता काय? तसे असेल तर तो या पदार्थांच्या अनुषंगाने अस्तित्वात होता, की या पदार्थांमध्येच अस्तित्वात होता? असे प्रश्न त्याने उपस्थित केले आहेत. या पदार्थांमध्ये अग्नी अंतर्भूत नसेल तर तो कोठून आला? हवेने अग्नीचे व लाकडाचे

---

१. 'अजसाम'

२. 'फिर्दोस अल् हिक्मा' ( विज्ञानाचे नंदनवन ) हे पुस्तक अली इब्ने साहल् रब्बान अल् तबरी याने ८५० च्या आसपास लिहिले. त्याने हे मत मांडले असून पुढे असेही प्रतिपादन केले आहे की, या मूळ घटकांमध्ये आपले गुणधर्म बदलण्याची शक्ती आहे. पाणी म्हणजे सुप्त वायू व वायू म्हणजे सुप्त अग्नी. हा बदल गुणात्मक असतो. संख्यात्मक बदलाच्या दृष्टीने तो पूर्ण नसतो. ( उदा. स्नानगृहात गरम पाण्याच्या वाफा छतापर्यंत जातात; त्याचे पुन्हा पाणी होते. दिव्याच्या नुकत्याच विझलेल्या ज्योतीचा धूर ( वायू ) होतो. तसेच त्याचा पुन्हा अग्नीही होऊ शकतो. ) या पुस्तकाची एम्. झेड्. सिद्दीकी यांनी संपादित केलेली आवृत्ती ( बर्लिन, १९२८ ) पहा. स्वर्ग हा 'तबिया' या पाचव्या मूळ घटकापासून बनलेला आहे; चार मूळ घटकांपेक्षा हा पाचवा घटक भिन्न आहे या ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्तासंबंधी अल् किंडी याने एक ग्रंथ लिहिला आहे. त्यानंतर एका शतकाने मसूदी याने ॲरिस्टॉटलच्या या पाचव्या घटकाचा उल्लेख उष्णता, थंडी इत्यादींच्या मालिकेच्या संदर्भात केला आहे; पाणी, हवा या संदर्भात केलेला नाही.

कोळशात रूपांतर कसे होते ? असे प्रश्न त्याने विचारले आहेत. झाडातील ज्वालाग्राही घटक, दगडांतील ठिणग्या, अग्नीचा रंग कशाचा बनलेला असतो याबद्दलही त्याला जिज्ञासा आहे.

या माणसाच्या चिकित्सक दृष्टिकोनाचे आणखी एक उदाहरण म्हणजे ' अंका ' या कल्पित पक्षाच्या अस्तित्वासंबंधी त्याने केलेली चर्चा. या पक्षाचे काही बाबतीत फिनिक्स पक्षाशी साम्य आहे. हा पक्षी अस्तित्वात आहे असे काही लोक मानतात. पण जाहिझच्या मते हा पक्षी ही केवळ ' तांबड्या गंधका 'सारखी एक केवळ कल्पना आहे. या प्रश्नाची चर्चा करताना गेंडा व त्याच्या पिलाचा जन्म यासंबंधी हिंदुस्थानातील संशोधकांनी केलेल्या चर्चेचा उल्लेख त्याने केला आहे. याबाबत हिंदी संशोधकांनी जी विधाने केली आहेत ती त्यांनी पुनः पुन्हा केली नसती तर शास्त्रज्ञांनी ती मूर्खपणाची म्हणून सोडून दिली असती. गेंड्याचे पिलू स्वतःच्या पोषणासाठी प्रत्यक्ष जन्मण्यापूर्वी आईच्या पोटातून आपले तोंड बाहेर काढते. भोवतालच्या वनस्पती खाते आणि पोट भरल्यावर तोंड पुन्हा आत घेते असे हिंदी संशोधकांनी म्हटले आहे. जाहिझ यावर लिहितो, " हे अशक्य किंवा देवाच्या शक्तीपलीकडचे आहे असे मला वाटत नाही... कुराणाने किंवा इज्माने या गोष्टीचा इन्कार केलेला आपणास आढळत नाही. तेव्हा मीही ती गोष्ट फेटाळण्याचे धाडस करीत नाही. पण माझ्या हृदयाचा जोरदार कल त्यावर विश्वास न ठेवण्याकडे आहे. ही गोष्ट अशी आहे की ती सादृश्य उदाहरणाद्वारे माणसास समजणार नाही; प्रत्यक्ष पाहिली तरच समजू शकेल."

बहुतेक सर्व नामवंत मुस्लिम तत्त्वज्ञांनी काटेकोरपणे ॲरिस्टॉटलने प्रतिपादलेल्या व्यवस्थेच्या कक्षेतच विवेचन केलेले असून ' स्टॅगिराइट 'मध्ये कोणतेही महत्त्वाचे फेरबदल न करता ते स्वीकारले आहे. ॲरिस्टॉटलची शास्त्रांच्या वर्गीकरणाची पद्धत त्याच्या आवडत्या पृथक्करण व उपविभाग पाडण्याच्या पद्धतीशी जुळणारी होती. या पद्धतीनुसार शास्त्रांची प्रथम दोन गटांत विभागणी केली जाई. पहिल्या तात्त्विक व प्रात्यक्षिक ( किंवा व्यावहारिक ) वर्गात त्याने तत्त्वज्ञान ( अध्यात्म ), पदार्थविज्ञान व गणित यांचा समावेश केला व दुसऱ्या वर्गात बुद्धीच्या जोडीला ज्यात कृतीची जरूर आहे अशा कला व शास्त्रे यांचा समावेश केला. या वर्गाची आणखी उपविभागणी, कृतीनंतर ज्यांचा मागे काही परिणाम राहात नाही व ज्यांचा बराचसा परिणाम राहतो अशा कला व शास्त्रे, अशा रीतीने करण्यात आली.

मुस्लिम विद्वानांपैकी तुर्की साधू अबु नसर अल् फाराबी याने या प्रश्नाचा प्रथम विचार केला असे परंपरेनुसार मानले जाते. (तो दमास्कसमध्ये ३३९ / ९५० मध्ये निधन पावला. त्याच्या नावावरून तो ट्रान्सॉक्सियानातील फाराबचा रहिवासी होता असे दिसते.) ' इहसा अल् उलूम ' ( शास्त्रांची गणती ) या त्याच्या पुस्तकात त्याने पुढीलप्रमाणे शास्त्रांचे गट पाडले आहेत: ( १ ) भाषाशास्त्र ( सात भाग ), ( २ )

तर्कशास्त्र ( आठ भाग ), ( ३ ) गणितशास्त्र [ याचे सात भाग पुढीलप्रमाणे : अंकगणित, भूमिती, दृक्शास्त्र, फलज्योतिष, संगीत, वजने आणि गतिशास्त्र ], ( ४ अ ) धार्मिक व प्राकृतिक शास्त्र [ याचे आठ भाग पुढीलप्रमाणे– माणसे किंवा वस्तूंत समान असलेल्या नैसर्गिक गोष्टी, साध्या वस्तू , माणसे किंवा वस्तूंची उत्पत्ती व लय, अपघातांची सुरुवात, मूळ घटकात होणारे बदल, मूळ घटकापासून बनलेल्या वस्तू– खनिजे [1] वनस्पती व प्राणी ), ( ४ आ ) ] ईश्वरविज्ञान– यात राज्यशास्त्र, फिकाह ( कायदा ) व कलाम ( ईश्वर विज्ञानाचा सखोल अभ्यास ).

De Ortu Scientiarum हा आणखी एक ग्रंथ त्याने लिहिला असे म्हटले जाते. त्याचे फक्त लॅटिन भाषांतर अस्तित्वात आहे. पदार्थ, अपघात आणि या दोहोंचा निर्माता याशिवाय काहीच अस्तित्वात नाही असे त्यात म्हटले आहे. अपघातांची संवेदना इंद्रियांना होते तर पदार्थाचे आकलन फक्त बुद्धीने होते. पदार्थांतील बदलाच्या घटना व कारणे यांचे विवेचन प्राकृतिक शास्त्रे करतात. ते शास्त्र, काही घडणे आणि काही न घडणे यांचे शास्त्र आहे. चंद्राच्या गोलाखालील[2] सर्व वस्तूंचा उगम अग्नी, हवा, पाणी व माती या चार मूळ घटकांमध्ये आहे. उष्णता, थंडी, आर्द्रता व कोरडेपणा या त्यांच्या गुणधर्मापासून अपघात, त्याचप्रमाणे घडणे आणि न घडणे या गोष्टी घडतात. ही मूळ तत्त्वे आणि संख्या, मापन, खगोल व संगीत ही चार गणिती शास्त्रे या सर्वांतून चंद्राच्या गोलाखालील सर्व ज्ञान निर्माण होते. फलज्योतिष न्याय (de judiciis), औषधशास्त्र, शकुन ( denigromantia ), स्वप्नांचा अर्थ ( de imaginibus ), शेती नौकानयन, रसायनशास्त्र ( एका वस्तूचे दुसऱ्या जातीच्या वस्तूंत रूपांतर करण्याचे शास्त्र , व दृक्शास्त्र ( de speculis ) ही प्राकृतिक शास्त्रे होत.

अल् फाराबीनंतर झालेल्या इब्ने सीना ( अविसेन्ना– मृत्यू १०३७ ) या महान तत्त्वज्ञाच्या विचाराचे सूत्र थेट ॲरिस्टॉटलपर्यंत पोचते. पण आपल्या विशिष्ट उद्देशानुसार इब्ने सीना याने काही बदल केले. शास्त्रांचे वर्गीकरण या विषयावर लिहिलेल्या एका छोट्या ग्रंथांत त्याने ज्ञान किंवा तत्त्वज्ञान ( हिक्मा )[3] यांची प्राथमिक विभागणी दोन

१. खनिज, वनस्पती व प्राणी अशी वस्तूंची विभागणी अल् फाराबी यानेच प्रथम केली असावी. ॲरिस्टॉटलने निर्जीव सृष्टीचे केवळ पार्श्वभूमी म्हणून विवेचन केले.

२. पाचव्या मूळ सारतत्त्वाच्या घटकापासून आकाश निर्माण झाले हा ॲरिस्टॉटलचा सिद्धांत तो काटेकोरपणे मानतो.

३. अल् फाराबी याची अशी व्याख्या करतो : “ ही एक विचाराद्वारे साध्य होणारी विद्या आहे, त्या विद्येद्वारे मनुष्यालाआपल्या ‘ अस्तित्वा ’चा बोध होत असतो.

[ पुढील पान पाहा ]

भागात केली आहे. एक तात्त्विक किंवा वैचारिक व दुसरा भाग प्रात्यक्षिक किंवा व्यावहारिक. अस्तित्वात असलेल्या वस्तूंसंबंधी प्रस्थापित सिद्धान्ताचे ज्ञान संपादन करणे हा तात्त्विक शास्त्रांचा उद्देश आहे. त्यांचे अस्तित्व माणसाच्या कृतींवर अवलंबून नसते. समर्पक विचार ( राय ) करून निष्कर्ष काढणे हा त्यांचा उद्देश आहे. उदा.– ईश्वर एकच आहे या कल्पनेवर विश्वास ठेवणारे शास्त्र किंवा दैवाचे शास्त्र ( किस्मत ). व्यावहारिक शास्त्रांचा उद्देश केवळ प्रस्थापित मतांचे ज्ञानसंपादन करणे हा नसून, ज्या गोष्टींद्वारे माणूस चांगले असलेले साध्य करू शकेल अशा गोष्टींबाबत विचारपूर्वक मते बनविणे हा आहे; कृतीच्या उद्देशाने बनविलेले ते मत असते.

ज्यामध्ये शास्त्रांचे तीन विभाग केलेले आहेत असे आणखी एक निराळे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे : कनिष्ठ शास्त्र म्हणजेच प्राकृतिक शास्त्र ( अल् इल्म अल् ताबी ), मध्यम शास्त्र ( गणित : अल् इल्म अल् रियादी ) व उच्च शास्त्र ( ईश्वर विज्ञान : अल् इल्म अल् इलाही ).

मूळ प्राकृतिक शास्त्राचे दोन उपविभाग पाडण्यात आले आहेत. त्यापैकी पहिला[१] किंवा मूळ ( किंवा मुख्य ) विभाग निसर्गातील सर्व वस्तूंच्या गुणधर्मांचा विचार करतो. उदा.– पदार्थ, रूप, गती, वैशिष्ट्य, उत्पत्तीची कारणे. दुसरा विभाग म्हणजे पहिल्यातूनच निघणारी शाखा आहे असे म्हणता येईल. स्वर्ग, त्यातील घटक, चार मूळ घटक, त्यांचे नैसर्गिक गुणधर्म, त्यांच्या हालचाली व ठिकाणे यांचे ज्ञान त्यात येते.

या दुसऱ्या भागाचे निरनिराळ्या शास्त्रांच्या शाखांप्रमाणे पुढील उपविभाग पाडण्यात आले आहेत : औषधीशास्त्र, खगोलशास्त्र, मुख सामुद्रिक, ' कल्पनांचा अर्थ ( ताबीर )', जादू ( इल्म अल् तिलिस्मात ) व रसायनशास्त्र.

अल् फाराबी व अविसेन्ना यांच्या दरम्यानचे काळात ' इखवान अल् साफा ' ( शुद्धतेचे बांधव ) ही एक संस्था होती असे दिसते. चौथ्या। दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात बसरा येथे ही ॲकॅडमी किंवा संस्था भरभराटीस आली होती. या संस्थेने समकालीन ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांसंबंधीचे ग्रंथ तयार केले त्यावरून हे लोक बुद्धिवादी

---

[ मागील पानावरून ]

तसेच आपल्या आत्म्याच्या उन्नतीसाठी व पूर्ततेसाठी आपण काय करावे याचे मनुष्याला ज्ञान होत असते. त्याचप्रमाणे मनुष्याने सूज्ञ व समजदार कसे व्हावे, ऐहिक जगात कसे वावरावे, पण त्याचबरोबर मानवी शक्तीला शक्य आहे त्या प्रमाणात परलोकातील अंतिम परमानंदाच्या प्राप्तीसाठी मनुष्याने आपणा स्वतःला कसे तयार करावे याचे ज्ञान या विद्येद्वारे होत असते. "

१. ॲरिस्टॉटलच्या ' पहिल्या तत्त्वज्ञाना 'शी याचे साम्य आहे.

होते आणि विश्वासंबंधीच्या ज्या कल्पना मूळ इस्लामी धर्मग्रंथात आढळत नाहीत त्यांचे शिक्षण आपल्या मुस्लिम बांधवांना देण्याची त्यांची कल्पना होती. या लोकांनी लिहिलेले साहित्य मुख्यतः निनावी आहे. या व इतर कारणांवरून हे लोक शियापंथीय किंवा मुताझिली मताचे असावेत आणि अब्बासी राजघराणे पदच्युत करणे या निश्चित राजकीय उद्देशाने ते प्रेरीत झाले असावेत असे अनुमान काढण्यात आले आहे. त्यांच्या संस्थेला पडलेले[1] नाव ( शुद्धतेचे बांधव ) त्यांनी जाहीर केलेल्या संस्थेच्या उद्देशावरून पडले असावे. अज्ञानपूर्ण शिकवणुकीमुळे कायदा ( शरिया ) भ्रष्ट व चुकांनी दूषित झाला आहे; तो शुद्ध करण्याचा तत्त्वज्ञान हा एकच मार्ग आहे अशी त्यांची घोषणा होती.

इतर मुस्लिम बांधव या 'बांधवां'च्या मताशी सहमत नव्हते. 'शुद्धतेच्या बांधवां'वर इतर मुस्लिमांचा असा आक्षेप होता की या लोकांनी आपल्या ग्रंथांत प्रत्येक ज्ञानशाखेचे ज्ञान देण्याचा केलेला प्रयत्न वरवरचा असून तो समाधानकारक व उपयुक्त नाही. त्यात चुकीची विधाने व विपुल चुका आहेत. अबु सुलेमान अल् मांतिकी ( तर्कशास्त्रज्ञ ) याच्याकडे त्यांचे ग्रंथ पाठविण्यात आले तेव्हा अत्यंत प्रतिकूल टीका करून त्याने ते परत पाठविले. या लेखकांनी 'शरिया'च्या आवरणाखाली तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केला असून, त्यांच्या पूर्वी झालेल्या चतुर लोकांप्रमाणेच तेही या बाबतीत अयशस्वी झाले आहेत असे मत अबु सुलेमान याने व्यक्त केले. तुमच्या या मताची कारणे सांगा असे म्हणता त्याने उत्तर दिले, 'शरिया' म्हणजे अल्लाहची प्रेरणा झालेल्या मध्यस्थास अल्लाहने सांगितलेला कायदा. का व कसे असे प्रश्न न विचारता तो आपण मान्य केला पाहिजे. ग्रहांच्या किंवा स्वर्गाच्या हालचालींच्या प्रभावासंबंधी फलज्योतिषी किंवा खगोलशास्त्रज्ञ ( मुनाज्जिम ) जे सांगतात त्याला 'शरिया'-मध्ये स्थान नाही. तसेच प्राकृतिक शास्त्रज्ञाने निसर्ग-चमत्कारांचे केलेले निरीक्षण; उष्णता, थंडी, आर्द्रता आणि कोरडेपणा यांसंबंधीची त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती; एखादी शक्ती व तिचा प्रभाव जाणवणारी वस्तू यांची युती किंवा संघर्ष यासंबंधीचे या शास्त्रज्ञांचे विवेचन; तसेच भूमितिशास्त्रज्ञ किंवा तर्कशास्त्राचे प्रतिपादन यांपैकी कशालाही 'शरिया'-मध्ये स्थान नाही. अबु सुलेमान विचारतो की 'शरिया' आणि तत्त्वज्ञान यांचा संयोग करता येईल असा दावा हे बांधव कसे करू शकतात? इतर लोकही आपापल्या पद्धतीं-बद्दल असाच दावा मांडू शकतील. उदा.–मांत्रिक, रसायन किमयागार, ताईत-कवटीचे चमत्कार करणारा, स्वप्नांचा अर्थ सांगणारा व जादुगार हेही आपापल्या पद्धतींबद्दल असे दावे मांडू शकतील. या सर्वांचे व्यवसाय कायदेशीर असते तर अल्लाहने ते कायदेशीर असल्याचे जाहीर केले असते; आणि त्यांच्यातील दोष दूर करण्यासाठी 'शरिया'चा

---

१. संस्थेचे संपूर्ण नाव असे आहे : 'इख्वात अल् साफा वा खुल्लान अल् वाफा वा अहल् अल् अदल वा अब्ना ल् हम्द' म्हणजे 'शुद्धतेचे बांधव, सन्माननीयतेचे मित्र, न्याय्यतेचे समर्थक व गौरवास्पद आचाराचे पुत्र.'

उपयोग केला असता. पण अल्लाहने तसे काही केले नाही. उलट त्या सर्वांचा निषेध करुन त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवण्यास मुस्लिमांना बंदी केली. जो एखाद्या जादुगाराचा किंवा ज्योतिषाचा सल्ला घेतो तो वस्तुतः देवाची गुपिते शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. आणखी असे की अल्लाहने पैगंबरांमार्फत पाठविलेला धर्म संपूर्ण आहे व ईश्वरी स्फूर्तीद्वारे पैगंबरांनी स्वच्छ अशी स्पष्टीकरणे केली असल्यामुळे त्यासाठी बुद्धीचा आश्रय घेण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. मुस्लिमांनी यापूर्वी आपल्या धार्मिक मतभेदांची व अडचणींची चर्चा तत्त्वज्ञानाचा आधार न घेता केलेली आहे. ज्यू, ख्रिश्चन व मॅगियन यांचे धर्मही तत्त्वज्ञानापासून स्वतंत्र आहेत. तेव्हा इस्लामशी तत्त्वज्ञानाची सांगड घालण्याची आवश्यकता नाही असा त्याने आपल्या प्रतिपादनाचा शेवट केला आहे.

त्यानंतर एका शतकाने गझालीने आपल्या 'तहाफूत अल् फलासिफा'[1] (तत्त्वज्ञांचा गोंधळ) या व इतर पुस्तकांत वरील स्वरूपाच्या प्रतिगामी विचारांचा मर्यादित स्वरूपात समाचार घेतला. विरोधाला तोंड देत 'बांधवां'नी कार्य केले. जगातील चमत्कृतींसंबंधी परकी ग्रंथांतून मिळणारी वस्तुस्थितिनिदर्शक माहिती मुस्लिमांना शिकवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. 'बांधवां'चे हे प्रबंध[2] विद्वानांसाठी नव्हते तर सर्वसामान्यांसाठी होते. तरीही त्यात विचारांच्या बऱ्याच व्यापक क्षेत्रांचा अंतर्भाव असून, चौथ्या शतकात काही इस्लामी बांधवांची शास्त्रीय ज्ञानग्रहणाच्या बाबतीत किती प्रगती झालेली होती याची या प्रबंधांद्वारे कल्पना येते. या प्रबंधांमध्ये प्रतिपादन केलेल्या मूळच्या ॲरिस्टॉटलच्या तत्त्वांवर नवप्लेटोवादाचा गडद रंग पडल्याचे स्पष्ट दिसते. ग्रीक व मुस्लिम विचारांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्यात दिसत असला तरी या ग्रंथामागील प्रेरणेचा उगम कशात आहे हे सर्वत्र स्पष्ट दिसून येते.

संख्येसंबंधीच्या पहिल्या प्रबंधात सुरुवातीच्याच परिच्छेदात समग्र ग्रंथाच्या मांडणीची एकंदर योजना दिलेली असून, तत्त्वज्ञान किंवा शास्त्र यांची चार भागात विभागणी केली आहे. ते भाग अनुक्रमे असे : गणित, तर्कशास्त्र, प्राकृतिक शास्त्रे आणि ईश्वरविज्ञान. गणितशास्त्राच्या गटात अंकगणित, भूमिती, खगोलशास्त्र व संगीत यांचा समावेश आहे. हे वर्गीकरण पुढे शिक्षकांनी मान्य केले. या वर्गीकरणाला ते 'काड्रिव्हिअम' असे म्हणत. अंकगणितावरील प्रकरणात मुख्यतः संख्येची कल्पना विशद केली आहे. एक, दहा, शंभर, हजार अशा त्यांच्या चार श्रेणी पाडल्या आहेत. संख्या एकतर सम किंवा विषम असते. पण अल्लाहने नैसर्गिक वस्तूंची चार भागांत विभागणी

---

१. खुद्द या पुस्तकातील प्रतिपादनाचासुद्धा बाराव्या शतकातील तत्त्वज्ञ ॲव्हेरोज याने आपल्या 'तहाफूत अल् तहाफूत' या ग्रंथात प्रतिवाद केला आहे.

२. हे एकूण ५१ किंवा ५२ प्रबंध होते असे म्हणतात.

केली आहे. म्हणून या विभागणीशी जुळण्यासाठीच अशी चार भागांत विभागणी करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ– चार नैसर्गिक गुणधर्म ( तबाई )– उष्णता, थंडी, इत्यादी; चार मूळ घटक ( अर्कान )– पृथ्वी, आप, तेज, वायु; शरीरातील चार धातू– रक्त, कफ, पिवळे पित्त, काळे पित्त;[१] वर्षाचे चार ऋतु; चार दिशा; आणि निर्मित वस्तूंचे चार वर्ग– खनिजे, वनस्पती, प्राणी व माणूस. विशिष्ट आकड्यांच्या खास वैशिष्ट्याचेही वर्णन ग्रंथात केलेले आहे. दोन हा खरे तर पहिला सम आकडा, तीन हा पहिला विषम आकडा, पाच हा पहिला वर्तुळाकार आकडा, सात हा पहिला पूर्ण आकडा, याप्रमाणे बारा व त्यापुढील आकड्यांचे वर्णन केलेले आहे. नंतर क्रमशः गणिताच्या प्रक्रियांचे वर्णन केले आहे. त्यानंतर या ग्रंथास संख्याशास्त्रावरील प्रबंधाद्वारे प्रस्तावना का लिहिली याचे कारण दिले आहे. संख्याशास्त्रावरील प्रबंधाचे सार असे की प्रत्येक आत्म्यात संख्याशास्त्र सुप्तपणे वसत असते व त्याची माहिती होण्यास फक्त अभ्यास आवश्यक असतो. त्यानंतरच्या विभागात संख्याशास्त्र ही 'आत्म्याच्या शास्त्रा'ची मार्गदर्शिका कशी आहे याचे स्पष्टीकरण केले-आहे.

भूमिती हा दुसऱ्या प्रबंधाचा विषय आहे. संख्या, व्याप्ती यांच्या गुणधर्मांचे ज्ञान अशी भूमितीची व्याख्या केली आहे. बिंदूपासून सुरुवात करून रेषा, द्विमिती, त्रिमिती यांचे विवेचन त्यात केले आहे. प्रात्यक्षिक आणि तात्त्विक असे भूमितीशास्त्राचे दोन भाग पाडले आहेत. पहिल्यात इंद्रियगोचर आकृती व वस्तूंचा विचार आहे आणि दुसऱ्यात सूर्यप्रकाश व सावली यांच्यातील काल्पनिक रेषा किंवा हे दोन्ही अदृश्य झाल्यावर मनात राहणारी रेषा अशा काल्पनिक रेषांच्या आधारे विवेचन केले आहे. तात्त्विक भूमिती ही दृश्यापासून कल्पिताकडे आणि व्यक्ताकडून अव्यक्ताकडे नेणारी मार्गदर्शिका आहे असे त्यात म्हटले आहे.

तिसऱ्या प्रबंधाचा विषय खगोलशास्त्र हा असून विषयाच्या महत्त्वानुसार हा प्रबंध मोठा आहे. त्याचे तीन भाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या भागाचे नाव 'इल्म अल् हया' ( स्वर्गाच्या 'रचने'चे शास्त्र ) असे असून त्यात आकाशाची रचना, ताऱ्यांची संख्या, राशींच्या खुणा, ताऱ्यांतील अंतरे, त्यांचे आकार व गती वगैरे विषयांसंबंधीची सर्व माहिती आहे. दुसऱ्या भागात खगोलशास्त्रीय गणनेचे तक्ते, पंचांग तयार करण्याची कृती व अशाच इतर गोष्टी आहेत. तिसऱ्या भागाला 'इल्म अल् अह्काम' ( फलज्योतिष-न्याय ) असे नाव असून आकाशाचे भ्रमण, रात्रींच्या खुणा, ग्रहांच्या गती यावरून भावी घटनांचे भाकित करणे हा त्याचा विषय आहे.

ताऱ्यांचे वर्णन प्रकाशमान, गोल असे करण्यात आले असून त्यांपैकी १९२० मोठे तारे डोळ्यांना दिसू शकतात असे म्हटले आहे. त्यापैकी मोठ्या सात ताऱ्यांना ग्रह म्हणतात. हे ग्रह पुढीलप्रमाणे : शनि, गुरू, मंगळ, सूर्य, शुक्र, बुध आणि चंद्र;

---

१. हा गालेनपासून घेतलेला सिद्धांत आहे.

बाकीच्यांना स्थिर तारे म्हणतात. सात ग्रहांपैकी प्रत्येकास स्वतःचे आकाश आहे. ही आकाशे गोलाकार असून पारदर्शक व पोकळ आहेत. या आकाशाची संख्या[१] नऊ असून कांद्याच्या पाकळ्यांप्रमाणे एकाच्या आत दुसरे असे त्यांचे थर आहेत. यांपैकी चंद्रगोल हा आपणास सर्वांत जवळचा. चंद्राच्या सर्व बाजूंनी वातावरण आहे, तर पृथ्वी वातावरणाच्या मध्यात आहे. चंद्राच्या पलीकडे बुध, शुक्र, सूर्य, मंगळ, गुरू व शनि हे ग्रह क्रमाने आहेत. त्यापलीकडे स्थिर ताऱ्यांचा गोल आणि शेवटी सर्वव्यापक[२] गोल आहे. हा शेवटचा गोल पाणचक्कीप्रमाणे सतत फिरत असतो. तो रोज दिवसरात्र पृथ्वीच्या वरच्या भागात पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि खालच्या भागात पश्चिमेकडून पूर्वेकडे[३] फिरतो, इतर ग्रहगोलांनाही तो फिरवितो. त्याची बारा बुरुजांमध्ये[४] ( राशी ) मध्ये विभागणी करण्यात आली आहे.

---

१. त्यापैकी फक्त आठ आकाशांची गणती केली गेली आहे. " पण काही लोकांच्या मते आठव्या गोलापलीकडे अगदी अचल असा एक नववा गोल आहे. ".

२. कक्षेत फिरणाऱ्या ग्रहांची ही व्यवस्था ' बांधवा 'नी टॉलेमीपासून घेतली. पण ती प्रथमतः बॅबिलोनियनांकडून आली असावी असे दिसते. मसूदी ( मृत्यू ९५६ ) याने आपल्या मुरुज अल् दहाबा या ग्रंथात हीच व्यवस्था सांगितलेली आहे. आपल्या ' किताब अल् तनबीह ' या ग्रंथात तो म्हणतो, " ग्रहांच्या क्रमाविषयी प्राचीन व अर्वाचीन या दोन्ही शास्त्रज्ञांत वाद आहे. शुक्र व बुध हे ग्रह सूर्याच्या वर आहेत की खाली हे आपणास निश्चित सांगता येत नाही असे टॉलेमी क्लॉडियस अल्माजेस्टमध्ये आणि खगोलशास्त्रविषयक आपल्या पुस्तकात म्हणतो. तर प्लेटोच्या मते चंद्र सर्वांत जवळ, त्यानंतर सूर्य, त्यानंतर शुक्र, बुध व इतर तारे पुस्तकात दिलेल्या क्रमानुसार आहेत असे व्याकरणकार जोहान्सने म्हटले आहे." ' तनबीह 'मधील दुसऱ्या एका उताऱ्यात मसूदी म्हणतो की स्थिर ताऱ्यांच्या गोलाबाहेर एक गोल असून तो सर्व गोलांना गती देतो. त्याला विषुववृत्ताचा गोल म्हणतात. परंतु स्थिर ताऱ्यांचा गोल तो हाच असे काही खगोलशास्त्रज्ञांचे मत आहे.

३. मसूदी म्हणतो, " आपल्यातील अंगभूत गतीने हा गोल सतत फिरत असतो. त्याच्या गतीमुळे व त्याच्या आत असलेल्या ताऱ्यांच्या गतीमुळे उष्णता, थंडी इत्यादी चार आवश्यक गुणधर्म तयार झाले असून चार मूळ घटकांची ( अग्नी, पाणी इ. ) वाटणी झाली आहे. हे मूळ घटक व गुणधर्म यांच्या गतीमुळे आणि एकमेकांत मिसळण्यामुळे वारे वाहतात, ढग जमा होतात, पाऊस पडतो व पृथ्वीवरील सजीव प्राणी प्रभावित होत असतात. "

४. प्रत्येक ' बुरुज ' किंवा राशिचक्रातील राशी याची ३० अंशांमध्ये विभागणी केलेली आहे. प्रत्येक अंश ६० मिनिटांचा आहे. मिनिटांची ६० सेकंदांत व सेकंदांची आणखी विभागणी करण्यात आली आहे.

सूर्य वर्षात सर्व बारा राशींमधून जातो व त्याच्या मार्गाचे एक काल्पनिक लंबवर्तुळ तयार होते. या राशींपैकी सहा[1] (मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह व कन्या) राशी उत्तरेकडे आहेत. सूर्य या राशींमध्ये परिभ्रमण करीत असतो तेव्हा रात्र लहान व दिवस मोठा असतो. इतर सहा राशी दक्षिणेकडे असून सूर्य त्यांच्यात फिरत असतो तेव्हा रात्र मोठी व दिवस लहान असतो. उत्तर व दक्षिणेकडील राशी ज्या दोन बिंदूवर मिळतात त्यांना राशीगोलाचे ध्रुव म्हणतात.[2]

सूर्य आपल्या लंबवर्तुळाकार कक्षेतून फिरत असताना दोन ठिकाणी इतर ग्रहांच्या कक्षेतून जातो. त्या बिंदूंना छेदबिंदू (जौझाहर किंवा उक्द) म्हणतात. एका राशीत, एकाच छेदबिंदूवर सूर्य व चंद्र एकाच ठिकाणी येतात तेव्हा सूर्यास ग्रहण लागते. असे महिन्याच्या अखेरीस होऊ शकते. त्यावेळी चंद्र सूर्याच्याच रेषेत पण विरुद्ध बाजूला असतो. त्यामुळे सूर्य आपल्या दृष्टीआड जातो. त्याच्यावरून ढग जातात व सूर्य आपणास दिसणार नाही अशाप्रकारे त्याला ग्रहण लागते. पण सूर्य एका छेदबिंदूपाशी आणि चंद्र दुसऱ्या छेदबिंदूशी असेल तर चंद्राला ग्रहण लागते. असे महिन्याच्या मध्यासच होऊ शकते. कारण त्यावेळी सूर्य ज्या राशीत असतो त्याच्याविरुद्ध बाजूच्या राशीत चंद्र असतो. दोहोंच्या मध्ये पृथ्वी येते आणि चंद्राला प्रकाशित करणारा सूर्याचा प्रकाश चंद्राला मिळत नाही.

सूर्य बारा राशींतून ३६५$\frac{1}{4}$ दिवसांत जातो. प्रत्येक राशीत ३० दिवस व काही थोडे तास राहतो, व प्रत्येक अंशात एक दिवस, एक रात्र व काही तास राहतो. दिवसा तो पृथ्वीवर व रात्री पृथ्वीखाली असतो. उन्हाळ्यात तो वातावरणातील उत्तरेकडच्या राशींमध्ये भ्रमण करीत असतो व आपल्या डोक्यावरच्या[3] बिंदूला जवळ असतो. हिवाळ्यात तो दक्षिणेकडील राशीत भ्रमण करीत असतो व आपल्या डोक्यावरच्या

---

१. मसूदीच्या मते, "या राशी म्हणजे आकाशातील ताऱ्यांची जागा निश्चित करण्यासाठी ठरविलेल्या जागा आहेत."

२. मसूदी म्हणतो, "ॲरिस्टॉटल आणि त्याच्या आधीचे व नंतरचे भारतीय, इराणी व चाल्डियन तत्त्वज्ञ असे मानीत की आकाश ही एक गोलाकार पोकळी असून ती दोन ध्रुवांभोवती फिरत असते. त्यातील एक ध्रुव कर्क राशीच्या डोक्यावर व सप्तताऱ्यांच्या समूहाच्या शेपटीपाशी दक्षिणबिंदूच्या विरुद्ध दिशेस असतो आणि दुसरा ध्रुव मकर राशीच्या डोक्यावर व उत्तर बिंदूच्या समोर असतो. मकर राशीजवळचे तारे सप्तनक्षत्रासारखे दिसतात."

३. शब्दशः अर्थ "आपल्या डोक्यावरच्या दिशेस ['साम्त' म्हणजेच 'खमध्य'] असतो."

बिंदूपासून दूर आणि खालच्या वातावरणात असतो. ' ऑज '[१] बिंदूपासून सूर्य आकाशात सर्वांत उंचावर आणि पृथ्वीपासून सर्वांत दूर असतो. सर्वांत खाली व पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो त्या बिंदूस पेरीजी ( इंग्रजीत ) म्हणतात.

चार विशिष्ट राशींमध्ये सूर्य प्रवेश करतो तेव्हा चार ऋतूंना प्रारंभ होतो. त्याने मेष राशीच्या पहिल्या मिनिटात प्रवेश करताच दिवस व रात्र सारखे होतात; हवामान सम होते; आणि हिवाळा संपून वसंत ऋतू सुरू होतो. सूर्य कर्क, तुळ व मकर राशीत प्रवेश करताच अनुक्रमे उन्हाळा, शरद व हिवाळा सुरू[२] होतो.

या प्रबंधाचा शेवटचा भाग फलज्योतिषासंबंधीचा आहे. आकाशातील ग्रहांचा पृथ्वीवरील घडामोडींवर काय परिणाम होतो याचे विवेचन त्यात आहे. सर्वसाधारणपणे ग्रहांचे संबंध सलोख्याचे असतात, तेव्हा उत्पत्ती व लय पावणाऱ्या पृथ्वीवर सारे काही ठीक असते. पण ग्रहांचे संबंध बिघडतात तेव्हा पृथ्वीवरही अनिष्ट गोष्टी घडतात. काही ग्रहांच्या युतीमुळे पृथ्वीवर विशिष्ट परिस्थिती निर्माण[३] होते.

या संदर्भात कॉर्डोव्हा येथील हाजम ( ९९४–१०६४ ) याचे विधान लक्षात घेण्यासारखे आहे. त्याच्या मते ताऱ्यांचा पृथ्वीवरील घडामोडींवर काही परिणाम होत नाही. असा काही प्रभाव दिसत असलाच तर तो ताऱ्यांच्या स्वतंत्र, प्रभावी अशा शक्तीचा परिणाम नाही. कारण तारे स्वतःच दुसऱ्याच्या प्रभावाखाली असतात. दुसऱ्या-वर प्रभाव पाडण्याची शक्ती त्यांच्यात नाही. तसे नसते तर त्यांची गती त्यांच्या इच्छे-

---

१. पूर्वी प्रत्येक ग्रहाच्या संदर्भात हा शब्द वापरला जाई. परंतु आता सामान्यतः चंद्राच्या संदर्भात वापरला जातो.

२. मसूदी याने वसंत ऋतू ९३ दिवस २३$\frac{१}{८}$ तासांचा असतो असे म्हटले आहे. आधार ( मार्च ) महिना संपण्यास १० दिवस बाकी असताना वसंत सुरू होतो आणि हाजिरान ( जून ) च्या २४ व्या दिवसापर्यंत तो चालू असतो. इतर ऋतूंची कालगणना अशा प्रकारे केली आहे : उन्हाळा ९५ दिवस, २३$\frac{१}{३}$ तास; शरद ८८ दिवस, १९$\frac{१}{१५}$ तास; आणि हिवाळा ८९ दिवस, १४ तास.

३. मसूदीची अशी तक्रार आहे की त्याच्या काळातील खगोलशास्त्रज्ञांनी खगोल-शास्त्रविषयक गणिताकडे दुर्लक्ष केले (या शास्त्रात आकाशाची रचना व घडणीची चर्चा आहे.) आणि ग्रहांच्या प्रभावावरच सर्व लक्ष केंद्रित केले. परंतु खगोलशास्त्राच्या या दोन्ही शाखा अविभाज्य आहेत. कारण ग्रहांच्या गतीनेच त्यांचे प्रभाव निर्माण होतात. या शास्त्राच्या एका शाखेसंबंधीचे अज्ञान म्हणजे दुसऱ्या शाखेचेही अज्ञान होय, असे मसूदीने म्हटले आहे.

प्रमाणे राहिली असती. एकाच वर्तुळाकार कक्षेत त्यांना फिरणे भाग पडते तसे झाले नसते. त्यांचा प्रभाव पडत असलाच तर तो ज्वलनप्रक्रियेत अग्नीचा आणि थंड करण्याच्या प्रक्रियेत पाण्याचा जो प्रभाव असतो त्यापेक्षा अधिक नाही.

आपल्या प्रबंध मालिकेतील सोळाव्या प्रबंधात ' शुद्धतेचे बांधव ' पुन्हा विश्वविज्ञानाकडे जरा निराळ्या दृष्टिकोनातून वळले आहेत. सात आकाशे, सात पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानचे वातावरण मिळून बनलेल्या बृहत्‌विश्वाचे माणसाशी साम्य आहे. माणूस म्हणजे सुद्धा त्याचे सर्व भाग मिळून बनलेले एक विश्व आहे.[1] माणसाचा आत्मा आपल्या सर्व शरीरघटकांच्या हालचाली नियंत्रित करते. हे प्राचीन तत्त्वज्ञांचे मत त्यात विशद केले आहे.

बाह्य अंतराळात सात आकाशे व त्यात भ्रमण करणारे सात ग्रह, स्थिर ताऱ्यांचे आकाश आणि अल्लाहचे सिंहासन जेथे आहे ते बाह्य आकाश यांचा समावेश होतो. सर्वात खालचा ग्रह आणि पृथ्वी यांच्या दरम्यान वातावरण आहे. पृथ्वीवर पर्वत, समुद्र, वाळवंटे, नद्या, मनुष्यवस्ती असलेली जमीन, निर्मनुष्य जमीन या गोष्टी असल्या तरी सर्व मिळून पृथ्वी हा एकच गोल आहे आणि अल्लाहच्या कृपेने तो विश्वाच्या केंद्रभागी हवेच्यामध्ये[2] आहे.

हे सर्व अकरा गोल एका गोलाच्या आतल्या पृष्ठभागात एकमेकांना अगदी खेटून आहेत. या आतील पृष्ठभागाचा अंतर्गोलांच्या बाह्य पृष्ठभागाशी संपर्क येतो. त्यांच्या दरम्यान मोकळी जागा किंवा पोकळी नाही. फक्त कल्पनेला जाणवणारी पोकळी आहे. आकाशाच्या किंवा मूळ घटकांच्या अणूंच्या दरम्यान पोकळी आहे ही विद्वानांची कल्पना चुकीची आहे. अंतराळातील ग्रह एका जागेपासून दुसऱ्या जागेकडे भ्रमण करतात यावरून तेथे पोकळी असावी अशी त्यांनी कल्पना केली असावी. कारण दुसरी एखादी वस्तू अंतराळात असती तर तिचा ग्रहांच्या हालचालीस प्रतिबंध झाला असता. सर्व गोष्टी घन असत्या आणि त्यांतील अणू दगड किंवा लोखंडातल्या अणूंप्रमाणे एकमेकांना

---

१. " माणूस हाही विश्वासारखाच आहे. कारण त्याच्या घटकांची विभागणीसुद्धा बारा राशी व सात ग्रहांनुसार झालेली आहे. माणसातही अग्नीपासून बनलेले पिवळे पित्त, मातीपासून बनलेले काळे पीत्त, हवेपासून बनलेले रक्त आणि पाण्यापासून बनलेला कफ हे घटक आहेत, " असे जाहिज म्हणतो.

२. तथापि सूर्य मात्र विश्वाच्या मध्यभागी आहे, कारण त्याचा गोल गोलांच्या रचनेच्या मध्यभागी आहे असे ' बांधव ' मानतात.

घट्ट चिकटलेले असते तर हे म्हणणे खरे मानता आले असते. पण काही वस्तू पाण्याप्रमाणे मऊ, सूक्ष्म, द्रवरूप असतात. वातावरण अशा प्रकारचे असल्याने इतर वस्तूंच्या हालचालींना ते प्रतिबंध करीत नाहीत असे प्रबंध लेखकाने म्हटले आहे.

अकरा गोलांच्या पलीकडे कोणतीही वस्तू अस्तित्वात नाही किंवा तेथे अनंत पोकळी आहे ही समजूतही बरोबर नाही.[१] विश्वाच्या आत किंवा बाहेर पोकळी असणे शक्य नाही आणि विश्वाच्या बाहेर एखादी वस्तू आहे असे जे मानतात त्यांच्यावर तसे सिद्ध करण्याची जबाबदारी आहे असे लेखकाचे म्हणणे आहे.

घनरूप पृथ्वी सोडल्यास विश्वातील प्रत्येक गोल दोन समकेंद्री पोकळ गोलांचा बनलेला असून त्यांच्या दरम्यान एक प्रकारची खोली आहे.[२] पृथ्वीभोवतालचे वातावरण तिच्या पृष्ठभागापासून चंद्रगोलाच्या आतल्या पृष्ठभागापर्यंत पसरले आहे. त्याची खोली पृथ्वीच्या व्यासाच्या साडेसतरा पट व व्यास तिच्या खोलीच्या दुप्पट आहे. चंद्रगोलाचा व्यासही त्याच्या खोलीच्या दुप्पट आहे. बुधाच्या गोलाची खोली पृथ्वीच्या व्यासाच्या शंभर पट आहे आणि बुधाच्या खोलीची दुप्पट केली तर ती त्याच्या व्यासाच्या एक-पंचमांश येते ( याचा अर्थ व्यास खोलीच्या दसपट आहे. ). इतर ग्रहगोलांची मापेही याप्रमाणे अंदाजाने देण्यात आली आहेत. स्थिर ताऱ्यांच्या क्षेत्राची खोली पृथ्वीच्या व्यासाच्या बारा हजार पट आणि त्यांचा व्यास खोलीच्या दुप्पट आहे.

ग्रहांच्या जागा एकमेकांच्या संदर्भात बदलतात हे दर्शविण्यासाठी गोलांच्या गतीत फरक गृहित धरला आहे. दैवी शक्तीमुळे गती मिळालेला मुख्य गोल चोवीस तासांत पृथ्वीभोवती एकदा फिरतो. त्याला लागून असलेला आतला गोल[३] त्याच दिशेने पण थोड्या कमी गतीने फिरतो. गोलांच्या गतीत शंभर वर्षांत एक अंशाचा फरक पडतो. त्यापुढचा शनीचा गोल त्यापेक्षाही कमी गतीने फिरतो. त्याची गती दिवसाला दोन मिनिटांनी कमी आहे. त्यापुढचा प्रत्येक गोल आणखी कमी गतीने फिरतो.

---

१. "आठव्या गोलापलीकडे नववा अगदी अचल असा गोल आहे असे अनेकजण मानतात, कारण इतरांना गती देणारा मुख्य गोल स्वतः चल असणार नाही, म्हणूनच तो अचल आहे असे त्यांना वाटते."

२. पृथ्वीची खोली व व्यास समान ( २१६७ परसांग ) आहेत. तिचा परीघ ६८०० परसांग आहे.

३. 'बांधवां 'च्या प्रबंधात याला कौकाब (तारा) असा शब्द वापरला आहे. पण तो 'फलाक' ( ग्रहगोल ) या शब्दाऐवजी चुकून वापरला असावा. तो स्थिर ताऱ्यांचा गोल आहे.

चंद्राची गती सर्वांत कमी आहे. तो पृथ्वीभोवती एक फेरी २४$\frac{5}{6}$ तासांत पुरी[1] करतो.

ताऱ्यांच्या वरकरणी उलट्या वाटणाऱ्या गतीचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. सूर्य, चंद्र सोडून बाकी पाच गोल कधीकधी उलट दिशेने भ्रमण करीत असल्याचे किंवा त्यांची गती थांबल्याचे दिसते. पण तसे प्रत्यक्षात घडत नाही. तो दृष्टिभ्रम असतो. याचे कारण असे की प्रत्येक ग्रह आपल्या छोट्या क्षेत्रात फिरताना मोठ्या क्षेत्रालाही स्पर्श करतो. आपल्या परिभ्रमणात तो एका ठिकाणी बाह्य पृष्ठभागाला स्पर्श करतो तर दुसऱ्या ठिकाणी अंतर्पृष्ठभागाला स्पर्श करतो. तो कधी वर जातो म्हणजेच पृथ्वीपासून दूर जातो तर कधी पृथ्वीजवळ येतो म्हणजेच खाली येतो. वरच्या कक्षेत फिरता असताना तो राशीनक्षत्राच्या दिशांच्या उलट[2] दिशेने फिरताना दिसतो, तर खालच्या कक्षेत फिरताना राशीनक्षत्रांच्याच दिशेने फिरताना दिसतो; पण प्रत्यक्षात तो याप्रमाणे वरखाली जात असताना पृथ्वीवरून मात्र स्थिर आहे असे दिसते.

आकाशाच्या रचनेबाबत तत्त्वज्ञांचा असा दावा आहे की ते मूळ घटकांपैकी पाचव्या मूलभूत घटकाचे बनलेले आहे. याचा अर्थ निर्मिती व विकृती, तसेच आकार वाढणे व कमी होणे हे बदल पृथ्वीवरच्या वस्तूंत जसे होतात तसे आकाशातील वस्तूंमध्ये होत नाहीत. त्यांची गती सतत वर्तुळाकार असते. पृथ्वीवरच्या वस्तूंपेक्षा आकाश व त्यातील वस्तू मूलतः निराळ्या आहेत असे तत्त्वज्ञ मानीत असल्याचे समजले जाते. पण खरे तर ते आपल्या डोळ्यांना उघड दिसणाऱ्या पुराव्याने सिद्ध होते. प्रकाश आणि छाया ग्रहण करण्याच्या शक्तीबाबत पृथ्वीवरील वस्तूंइतकाच फरक चंद्रातही असल्याचे दिसून येते. त्या वस्तूंप्रमाणेच चंद्रालाही सावली आहे. पारदर्शकपणाच्या बाबतीत आकाशातील सर्व वस्तूंचे हवा, पाणी, स्फटिक आणि काच यांच्याशी साम्य आहे. सूर्य आणि तारे यांचे प्रकाशाच्या बाबतीत अग्नीशी साम्य आहे व कोरडेपणाच्या बाबतीत मातीशी साम्य आहे. आकाश स्वभावतः वर्तुळाकार गतीत फिरत असते आणि पृथ्वीवरच्या वस्तूंत होणाऱ्या परिणामापासून मुक्त असते. यापेक्षा पाचव्या मूळ घटकाचा अधिक काही अर्थ तत्त्वज्ञांना अभिप्रेत होता असे दिसत नाही.

---

१. "ज्या लोकांचा भूमितीचा शास्त्रशुद्ध अभ्यास नाही व ग्रह हे गोलाकार फिरत नाहीत तर पश्चिमेकडून पूर्वेकडे जातात असे जे मानतात त्यांची मते ग्रहांच्या निरनिराळ्या गतीसंबंधी स्पष्टीकरण देऊन" आपण खोडून काढली आहेत असा लेखकाच दावा आहे.

२. याचा शब्दशः अर्थ "त्यांपैकी पहिल्या राशीनक्षत्रापासून शेवटच्या राशी-नक्षत्रापर्यंत."

आकाश जड नाही की हलके नाही, अथवा उष्ण किंवा थंड नाही की ओलसर[1] नाही. विश्वाचे भाग अल्लाहने त्यांना ठरवून दिलेल्या योग्य जागी बसलेले आहेत. त्यांच्यात जडत्व किंवा हलकेपणा नाही. आकाश अल्लाहने योजलेल्या जागी प्रस्थापित झालेले असल्याने ते हलके नाही किंवा जड नाही. तसेच विश्वाच्या केंद्रभागी असलेली पृथ्वीही जड नाही. तिच्यावरचे पाणी किंवा हवाही जड नाहीत. वातावरणाच्या वरच्या बाजूस असलेला अग्नीही हलका नाही. पण विश्वाचे काही भाग मूळ घटकाच्या बाहेर असून ते परत मिळविण्याचा मूळ घटकांचा प्रयत्न असतो. माती पाण्यात किंवा हवेत असते तेव्हा ती भिन्न घटकांत असते. मार्गातील अडथळा दूर करण्यासाठी ती प्रयत्न करते तेव्हा ती जड झाली असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे पाण्यातील हवा आणि हवेतील अग्नीही स्वतःच्या मूळ घटकात जाण्याचा प्रयत्न करीत असतात. ज्या वस्तू पृथ्वीच्या मध्यावर स्थिर होण्याचा प्रयत्न करतात त्यांना जड म्हणतात व ज्या वातावरणाच्या परिघात स्थिर होऊ पाहतात त्यांना हलक्या म्हणतात.

पृथ्वीच्या आकृतीचे वर्णन करताना 'बांधव' म्हणतात की ती गोलाकार असून वातावरणाच्या मध्यभागी आहे. तिचा सर्वांत जास्त परिघ २५,४५५ मैल किंवा ६,८५५ परसांग असून व्यास ६,५२१ मैल किंवा २,१६७[2] परसांग आहे. पृथ्वीचा मध्य हा एक

---

१. 'तनबीह'मध्ये मसूदी या प्रश्नासंबंधी म्हणतो, "आकाशाच्या स्वरूपाविषयी प्लेटोपूर्वीच्या व त्याच्यानंतरच्या तत्त्ववेत्त्यांत मतभेद आहेत. उष्णता थंडी वगैरे चार 'नैसर्गिक' गुणांचे ते बनलेले आहे. जळत्या घटकाचे त्यात प्राबल्य आहे. परंतु हा घटक जळणारा अग्नी नसून वस्तूंमध्ये स्वाभाविकपणे आढळणारा तप्तपणा असतो. काही तत्त्वज्ञ, आकाश हे अग्नी, हवा व पाणी यांचे बनलेले आहे असे मानतात. त्यांच्या मते आकाशात माती नाही. परंतु आकाशात पाचवा मूळ नैसर्गिक घटक आहे. आकाश उष्ण नाही की थंड नाही, कोरडे नाही की द्रव नाही असे ॲरिस्टॉटलच्या आधीचे व नंतरचे तत्त्वज्ञ तसेच हिंदी, फारसी व चाल्डियन तत्त्वज्ञांचे मत आहे."

२. मसूदी 'तनबीह' या आपल्या ग्रंथात म्हणतो, "पृथ्वीची लांबी रुंदी व आकार या संबंधींच्या तज्ञांच्या मते पृथ्वीचा परीघ अंदाजे २४ हजार मैल आहे. हा पूर्ण परीघ असून त्यात सर्व जलाशय व समुद्र विचारात घेतलेले आहेत. पृथ्वीला जलाशयांचा वेढा आहे आणि जलाशयांच्या विस्ताराच्या सीमारेषा एकमेकांशी मिळणाऱ्या आहेत. अक्षांश किंवा रेखांशाच्या दृष्टीने ज्या ठिकाणी पृथ्वीच्या गोलाकारात अंतर पडलेले आढळते तेथे ते अंतर पाण्याच्या पट्ट्याने भरून काढलेले असते. अंशाचे (डिग्रीचे) अंतर पुढीलप्रमाणे मोजण्यात आले आहे : कुफा व बगदाद या शहरांच्या उंचीपैकी अधिक उंचीच्या आकड्यातून लहान आकडा वजा करता राहिलेल्या आकड्यास दोन्ही शहरांमधील अंतराच्या आकड्याने भाग देण्यात आला आहे. टॉलेमीच्या मते १ अंश = पृथ्वीच्या पृष्ठभागाचे ६६ मैल आहे."

काल्पनिक बिंदू असून तो व्यासाच्या मध्यभागी आहे व पृष्ठभागावरील कोणत्याही ठिकाणापासून, मग ते ठिकाण समुद्र असो की जमीन असो, सारख्या अंतरावर आहे. कोणताही भाग त्यापेक्षा कमी अंतरावर आहे असे म्हणता येणार नाही. कारण कमी अंतरावर आहे असे समजला जाणारा भाग पृथ्वीच्या मध्याच्या जवळ असतो. पृथ्वीचा बाह्य पृष्ठभाग, म्हणजे वातावरणाशी स्पर्श होणारा पृष्ठभाग वर असतो आणि पृथ्वीच्या पृष्ठभागावर माणूस कोठेही उभा असला तरी त्याचे पाय जमिनीवर असतात. ते खाली पृथ्वीच्या मध्याची दिशा दाखवतात तर डोके वरच्या आकाशाची दिशा दाखवते. त्याला आकाशाचा फक्त अर्धा भागच दिसतो. अर्धा पृथ्वीच्या गोलाआड गेलेला असतो. आणि माणूस एका जागेकडून दुसऱ्या जागेकडे जातो तेव्हा त्याच्या दृष्टीपासून दडलेला आकाशाचा भाग त्याला दिसतो.

पृथ्वीच्या पृष्ठभागापैकी निम्मा समुद्राने वेढलेला आहे व तोही अशा पद्धतीने की अर्धे अंडे पाण्यात व अर्धे पाण्याबाहेर असावे त्याप्रमाणे प्रत्येक गोलार्धाचा अर्धा भाग पाण्याखाली आहे. पाण्याच्या वर असलेल्या अर्ध्या पृष्ठभागाचा अर्धा भाग विषववृत्ता[१]-जवळ आणि त्याच्या दक्षिणेस असून तो वाळवंटमय आहे. विषुववृत्ताच्या उत्तरेस असलेला दुसरा अर्धा भाग मनुष्यवस्तीस योग्य आहे. उत्तरेकडच्या या वस्तीयोग्य भागात सात[२] मोठे समुद्र आहेत. ते भोवतालच्या महासागराचे उपसागर किंवा आखाते असून त्यांचे पाणी खारट आहे. दुसऱ्या भागातही निरनिराळ्या आकाराचे पंधरा छोटे समुद्र आहेत. पण पश्चिमेचा[३] समुद्र, सी ऑफ दी गॉग ॲडमॅगॉग[४], झांजचा

---

१. 'बांधवां 'च्या प्रबंधाच्या लेखकाच्या मते " विषुववृत्त ही मेष राशीच्या माथ्याखालून पूर्व-पश्चिम जाणारी एक काल्पनिक रेषा आहे. या रेषेवर दिवस व रात्र हे समान असतात. तसेच या रेषेवर दोन्ही ध्रुव क्षितिजावर असतात. त्यांपैकी एक कॅनोपस ताऱ्याच्या मुख्य भ्रमणबिंदूजवळ दक्षिणेस असतो, तर दुसरा मकर राशीनक्षत्रांच्या अगदी जवळ उत्तरेस असतो. "

२. हे सात समुद्र पुढीलप्रमाणे : ग्रीकांचा समुद्र ( भूमध्य सागर ), स्लाव्हांचा समुद्र ( बाल्टिक समुद्र ), जुर्जानचा समुद्र ( कास्पियन ), कुल्झुमचा समुद्र ( तांबडा समुद्र ), फार्सचा समुद्र ( इराणी आखात ), सिंध व हिंदचा समुद्र ( हिंदी महासागर ) व चिनी समुद्र. इतर माहितीसाठी पहा : Yaqut, 'Mujam al-Buldan, ed F. Wuestenfeld ( Leipzig, 1866 )', Hamdullah Mustawfi, 'Nuzhat al-qulub' ( tr. G. Le Strange, Gibb Series, London, 1919 ); 'Hudud al-alam' ( tr. V. Minovsky, Gibb series, London, 1937 ).

३. ( पश्चिम ) भूमध्य समुद्र.

४. ( ? ) काल्पनिक.

समुद्र,[१] झाबाजचा समुद्र,[२] हिरवा समुद्र[३] आणि सर्वांना वेढणारा महासागर हे या उत्तरेकडील वस्तियोग्य भागाच्या बाहेर आहेत.

या भागात निरनिराळ्या आकाराच्या दोनशे पर्वत रांगा आहेत. त्या पूर्व-पश्चिम किंवा उत्तर-दक्षिण पसरलेल्या आहेत. त्यापैकी काही राहण्यायोग्य भागात तर काही वाळवंटांत आहेत. या भागात २४० लहान-मोठ्या नद्या आहेत. त्या निरनिराळ्या दिशांना वाहतात. या नद्यांचा उगम पर्वतांत होतो. त्या समुद्राला किंवा दलदलीच्या प्रदेशास मिळतात. वाटेत त्या नद्यांचे पाणी शहरांना किंवा मशागत केलेल्या शेतांना मिळते. जादा पाणी समुद्रास जाते. कालांतराने त्या पाण्याची वाफ होऊन ती आकाशात जाते. तिचे ढग बनतात. वाऱ्याने ढग पर्वतशिखरांकडे जातात व मग पाऊस पडतो. पावसाच्या पाण्याच्याच पुढे नद्या बनतात.

मनुष्यवस्तीच्या या भागाची विभागणी सात प्रदेशांत करण्यात आली असून, पूर्वेकडून पश्चिमेकडे पसरलेल्या एखाद्या गालिच्याप्रमाणे हे प्रदेश कल्पिले आहेत. आकाराने ते भिन्न आहेत. पहिला प्रदेश सर्वात लांब[४] व रुंद तर सातवा प्रदेश लांबी[५] व रुंदी या दोन्ही दृष्टींनी सर्वात कमी. हे काही स्वाभाविक विभाग नाहीत, तर काल्पनिक रेषा कल्पून ते पाडले आहेत. राज्यांच्या सीमा निश्चित करण्यासाठी पूर्वीच्या राजांनी या काल्पनिक रेषा[६] काढल्या. यापैकी प्रत्येक प्रदेश कोणत्या तरी ग्रहाच्या प्रभावाखाली आहे असे मानलेले आहे. सातही प्रदेशांची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगितली आहेत. विषुववृत्ताच्या जवळचा प्रदेश निग्रोंचा आहे. त्याला लागून असलेल्या उत्तरेकडच्या पट्ट्यात मक्का व मदिना ही शहरे येतात. तेथील लोक भुऱ्या व काळ्या रंगाचे आहेत. तिसऱ्या पट्ट्यात मुख्यतः भुऱ्या वर्णाच्या लोकांची वस्ती असून कंदाहार, शिराझ,

---

१. झांजिबारच्या दक्षिणेस.

२. जावाचा समुद्र.

३. या सर्वांसभोवतालच्या महासागरास कधी कधी हे नाव दिले जाते. परंतु मुस्तावफीने उल्लेखिलेल्या त्याच नावाचा याच्याशी संबंध नाही.

४. ३००० परसांग लांब × १५० परसांग रुंद.

५. १५०० परसांग लांब × ७० परसांग रुंद.

६. मसूदी याच्या मते हे भाग विषुववृत्ताच्या फक्त उत्तरेकडील विभागाचे पाडलेले आहेत की उत्तरेप्रमाणेच दक्षिणेकडील प्रदेशही या विभागणीत समाविष्ट आहे याविषयी शास्त्रज्ञ व साधु यांच्यात मतभेद आहेत. दक्षिणेकडे फारच विरळ वस्ती असल्यामुळे भाग पडलेला प्रदेश विषुववृत्ताच्या उत्तरेकडील असावा असे बहुतेक शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीची सात गोलाकार प्रदेशांत विभागणी केली आहे. त्यांपैकी चौथा, मध्यप्रदेश ज्यात बाबिलोन आहे तो होय.

बसरा, दमास्कस, जेरुसलेम, इजिप्तमधील अलेक्झांड्रिया, कैरावान आणि टँजियर ही महत्त्वाची शहरे त्यात येतात. चौथा पट्टा साधुसंतांचा व प्रेषितांचा. तो मध्यभागी असून सूर्याच्या प्रभावाखाली आहे. त्याचे रहिवासी वर्णाने काळसर व गोरा रंग यांच्या दरम्यानच्या रंगाचे असून समतोल शरीरयष्टीचे व स्वभावाचे आहेत. काशघर, हिरात, मर्व्ह, निशापूर, रेमी, इस्पहान, बगदाद, मोसुल आणि अलेप्पो ही महत्त्वाची शहरे या प्रदेशात येतात. पाचवा प्रदेश गोऱ्या लोकांचा. तुर्कांचा प्रदेश, ऑक्सस नदी, उत्तर इराण, भूमध्य समुद्राच्या मध्यापासून ते पश्चिमेकडील समुद्रापर्यंत हा प्रदेश पसरलेला आहे. सहावा प्रदेश 'गॉग आणि मॅगॉग'च्या भूमीचा उत्तर भाग. सागिस्तान ( सिस्तान ) चा दक्षिण भाग, जुझीन, तबरिस्तान व गिलानचा उत्तर भाग, आर्मेनिया, कॉन्स्टँटिनोपलचा उत्तर भाग, मॅसिडोनिया व उत्तर आफ्रिकेच्या मध्यापासून श्चिमेकडील समुद्रापर्यंत हा प्रदेश पसरलेला आहे. यातील रहिवासी तांबूसपासून गोऱ्या वर्णापर्यंतच्या भिन्नभिन्न रंगांचे आहेत. सातवा प्रदेश अगदी उत्तर टोकाला आहे. जुझीनचा समुद्र, सागिस्तानची भूमी अशा काही नावाचे प्रदेश असल्याचा उल्लेख आहे; पण प्रत्यक्षात त्या नावाचे प्रदेश नसावेत, कल्पिताशीच त्यांचा अधिक संबंध आहे.

खगोलशास्त्रावरील ( भूगोल धरून ) प्रबंधानंतर गणिताच्या इतर शाखा, तर्कशास्त्र, व्यावहारिक कला, नीतिशास्त्र व आचार, 'इसागॉज' तत्त्वज्ञांनी तर्कशास्त्र आणि युक्तिवादासाठी योजलेली सहा तत्त्वे ('बांधवां'च्या मताने व्याकरणाचे शुद्ध बोलण्याशी जे नाते आहे तेच या तत्त्वांचे शुद्ध विचारांशी आहे.) या विषयांसंबंधी विवेचन या प्रबंधात आहे. नंतर प्राकृतिक शास्त्रांची ओळख करून देणारा जो प्रबंध आहे, त्यात आकार, घडण, गती, वेळ, अंतर या पदार्थशास्त्रात आढळणाऱ्या ॲरिस्टॉटलप्रणीत समान घटकांचे विवेचन आहे. नंतर वस्तूंच्या गुणधर्मांचे वर्णन असून चार मूळ घटक ( पृथ्वी, आप, तेज, वायू ) आणि या घटकांच्या मिश्रणाने बनलेले जनावरे, वनस्पती व खजिने हे उपघटक यांचे वर्णन केलेले आहे.

'पदार्थविज्ञाना'वरील पहिल्या प्रबंधात हवामानशास्त्राचा विचार असून त्याची सुरुवात वातावरणाच्या वर्णनाने केली आहे. वातावरणाची तीन स्पष्ट थरांत विभागणी झालेली आहे. चंद्राच्या जवळचा थर अत्यंत उष्ण असून त्याला 'ईथर' ( व्योम ) म्हणतात. मधला थर सर्वात थंड असून त्याला 'झामहारिर' म्हणतात. पृथ्वीला सर्वात जवळचा असलेला थर सौम्य वातावरणाचा आहे. बहुतेक ठिकाणी असेच वातावरण असून त्याला नासीम ( झेफिर ) म्हणतात. थर वेगवेगळे असले तरी ते एकमेकांत मिसळलेले असणे शक्य आहे.

सबंध वातावरण अनेक कारणांनी बदलू शकते. त्यात प्रकाश व अंधार, उष्णता व थंडी, आकाशातील वारे आणि वाफ या कारणांचाही समावेश आहे. त्याचा परिणाम म्हणून वलये, ढग, मेघगर्जना, वीज, पाऊस, दंव, हिम, झंझावात, इंद्रधनुष्य,

धुमकेतू इत्यादींचा उदय होत असतो. नद्यांना पूर आणि लाटांची भरती, ओहोटी यांसारखेही परिणाम होतात. समुद्राच्या जशा लाटा, तसा वारा म्हणजे हवेची हालचाल. पृथ्वीवरील पाण्याची वाफ होऊन ती वर जाऊ लागली की वातावरणात हालचाल निर्माण होते. अत्यंत थंड अशा झामहारिर या वातावरणाच्या थरापर्यंत ही दोन्ही वर जातात. तेथून ते हाकलले गेले की त्यामुळे वातावरणाच्या निरनिराळ्या भागातील स्थैर्य बिघडते व वारे निर्माण होतात.

बाष्प वर जाण्याचे मार्गात एखादी पर्वतश्रेणी येत असेल व त्याचा बराच दाब असेल तर पर्वतशिखरावरील थंडीने बाष्प खाली हाकलले जाईल; पायथ्याशी असलेल्या बाष्पात ते मिसळेल व ढग निर्माण होतील. ढग वर जातात आणि त्यांच्या हालचालीने कोरड्या हवेचे वाऱ्यात आणि ओलसर बाष्पाचे पावसाच्या थेंबांत रूपांतर होते. बाष्प रात्रीच्या वेळी वर गेले तर अत्यंत थंड हवेमुळे त्याची गती थांबून त्याचे दंवात रूपांतर होईल. वर जाऊ शकलेल्या बाष्पावर कडक थंडीचा परिणाम होईल व ते ढगाच्या फटीत जाऊन गोठेल आणि त्याचे बर्फ किंवा हिमात रूपांतर होईल. पाण्याचे हे गोठलेले कण हवेच्या कणांत मिसळून जमिनीवर अलगद पडतात. वसंत आणि शरद ऋतूत ढगांच्या मालिका उंच जातात. सर्वात उंच ढगांचा अत्यंत थंड वातावरणाच्या थराशी—झामहारिरशी संपर्क येतो व बाष्प गोठून त्याचे मोठे कण बनतात आणि गारा पडतात. खालच्या ढगांतून साधा पाऊस पडतो.

विजांचा चमचमाट व ढगांचा गडगडाट एकाच वेळी होतात. पण आवाज कानांपर्यंत पोचण्यापूर्वीच विजेचा प्रकाश डोळ्यांपर्यंत पोचतो. याचे कारण प्रकाश 'दैवी' आहे, तर ध्वनी 'मानवी' आहे. पृथ्वीवरील बाष्पकण वर जातात तेव्हा वातावरणातील कोरड्या हवेचे कण त्यांच्यात मिसळतात. हे कण तापले की बाहेर पडण्याच्या प्रयत्नात ते बाष्पाचे कवच फोडतात, त्यामुळे मोठा आवाज होतो आणि तो हवेत सर्व दिशांना पसरतो. बाष्पाचे कवच फोडून बाहेर पडलेले तप्त कण आकाशात तळपतात, त्यालाच वीज म्हणतात. नुकत्याच विझविलेल्या दिव्याच्या धुराजवळ ज्योत नेली तर धूर पुन्हा पेट घेतो तसेच हे घडते.

हवेत फारच आर्द्रता असते तेव्हा वातावरणाच्या खालच्या थरात इंद्रधनुष्य निर्माण होते. हे धनुष्य नेहमी उभे असते. त्याचा वरचा बांक वातावरणातील थंड हवेच्या थराच्या झामहारिरच्या जवळ असतो. सूर्यास्ताच्या वेळीच ते दिसते. ते सर्वसाधारणपणे अर्धवर्तुळापेक्षा थोडे लहान दिसते. पण सूर्य जेव्हा क्षितिजाच्या पातळीत असतो तेव्हा पूर्ण अर्धवर्तुळाकार इंद्रधनुष्य दिसते. याचे कारण सूर्याच्या मध्यापासून काटकोनात काढलेल्या रेषेवर इंद्रधनुष्याचा मध्य येतो; आणि सूर्य जितका वर तितके इंद्रधनुष्य दिसण्याची शक्यता कमी, कारण ते त्याच्याखाली व त्याच्यासमोर निर्माण झालेले असते. वातावरणातील बाष्पकणावर सूर्यकिरण प्रकाशात आणि ते परावर्तित झाल्याने इंद्रधनुष्य

दिसते. चार गुणधर्मांप्रमाणे इंद्रधनुष्याचे चार रंग असतात. चार मूळ घटक, चार ऋतू, शरीरातील चार धातू, फुले व मंजिऱ्यांचे चार रंग तसे इंद्रधनुष्याचेदेखील चार रंग असतात. याचे कारण असे की इंद्रधनुष्याचे चारी रंग दिसतात तेव्हा ते गवत व चाऱ्याची मुबलकता यांचे निदर्शक असते, कारण त्यावेळी वातावरणात आर्द्रता असते. आगामी मोसमात पिक चांगले येणार याची प्राणीमात्रांना सर्वसाधारण सूचना त्यातून मिळते.[१] पिवळ्याच्या वर तांबडा आणि हिरव्याच्या खाली निळा या क्रमानेच हे रंग दिसतात. पहिल्या इंद्रधनुष्याच्या खाली दुसरे इंद्रधनुष्य असेल तर त्याचे रंग मात्र उलट्या क्रमाने असतात.

झामहारिरमध्ये म्हणजे अत्यंत थंड वातावरणाच्या थरात धूमकेतू व उल्का यांची उत्पत्ती होते. पर्वत आणि खरखीत प्रदेश यांतून वर जाणाऱ्या सूक्ष्म बाष्पापासून ते बनलेले असतात. झामहारिर आणि व्योम ( ईथर ) यांना विभागणाऱ्या रेषेपर्यंत उल्का आली की ती परत फिरते आणि तिच्यात असलेला ईथरमधील अग्नी प्रज्वलित होतो. ढगाच्या ओलसर बाष्पात दबल्या गेलेल्या कोरड्या तेलकट धुराने ज्याप्रमाणे वीज प्रकाशते किंवा पांढऱ्या रॉकेलने अग्नि प्रज्वलित होतो तसेच हे घडते.[२] या उल्का कधी कधी छोट्या वर्तुळात फिरतात. हे वर्तुळ एका मोठ्या परिघात फिरत असते. कारण काही उल्का अंतराळातील सर्वांत उच्च बिंदू ओलांडून पूर्वेकडून पश्चिमेकडे, पश्चिमेकडून पूर्वेकडे, दक्षिणेकडून उत्तरेकडे व इतर निरनिराळ्या दिशांनी जाताना दिसतात. कापसाचे हलके चेंडू आकाशात फेकावे; अग्नीने ते पेटले म्हणजे दूर जावेत आणि पूर्ण जळून जाईपर्यंत त्यांच्या ठिणग्या उडत राहाव्यात त्या वेळी जसे दृश्य दिसेल तसे हे होत असते.

तारा निखळणे हा एक भास असतो. कारण हे तारे इतक्या हलक्या द्रव्यांनी बनलेले असतात की ते वरच जातात. शिवाय ते पेटलेले असल्याने त्यांचा हलकेपणा

---

१. " इंद्रधनुष्यातील तांबडा रंग जादा गडद असेल तर रक्तपात घडतो, पिवळा रंग गडद असेल तर आजार वाढतो, निळा गडद असेल तर दुष्काळ पडतो आणि हिरवा गडद असेल तर उत्तम पीक येते अशी सामान्य जनतेची समजूत आहे. "

२. " आम्ही आकाश दिव्यांनी सुशोभित केले आहे व दैत्यांविरुद्धची अस्त्रे म्हणून ते दिले आहेत " हा कुराणातील ( ६७[५] ) उल्लेख या निखळणाऱ्या ताऱ्यांसंबंधी आहे असे समजणे चुकीचे आहे असे ' बांधवां'चे मत आहे. हे तारे स्वर्गातून प्रथम हवेत व नंतर पृथ्वीवर पडतात असे काही लोक मानतात. परंतु या उल्कांची उत्पत्ती स्वर्गात होत नाही तर पृथ्वीजवळच होते, हे त्यांच्या निखळून पडण्याच्या द्रुतगतीवरूनच स्पष्ट होते. स्वर्गाच्या किंवा चंद्राच्या कक्षेत त्यांची उत्पत्ती झाली असती तर त्यांना निखळून पडण्याला खूप वेळ लागला असता.

अधिकच वाढतो. जे तारे खरोखरच पृथ्वीवर पडतात त्यांची उत्पत्ती नासीममध्ये म्हणजे वातावरणाच्या सर्वांत खालच्या थरात झालेली असते. ते ढगांत सापडून खाली दाबले जातात. त्यांची गती वर्तुळाकार असते. याचे कारण द्रवरूप वस्तू असा आकार घेतात की ज्यामुळे त्यांना कमीतकमी अडथळा होईल. पावसाचे थेंब हाच आकार घेतात कारण तोच त्यांचा पूर्णपणे योग्य आकार असतो.

धूमकेतू काही वेळा सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर आकाशात दिसतात. चंद्राला जवळ असलेल्या वातावरणाच्या थरात त्यांची उत्पत्ती झालेली असते. याचा पुरावा म्हणजे त्यांच्या हालचाली ग्रहांसारख्या असतात. सूक्ष्म बाष्पकण शनि आणि बुध यांच्या प्रभावाने एवढे गोठतात की स्फटिकाप्रमाणे ते पारदर्शक बनतात, आकाशातील ग्रहांप्रमाणे ते भ्रमण करतात व ते नष्ट होईपर्यंत त्यांचा उदयास्त होत राहतो.

हवामान शास्त्रावरील प्रबंधानंतर खनिजांची निर्मिती व घडण यासंबंधीचा विभाग आहे. या विभागाच्या सुरुवातीला भूगर्भ शास्त्रासंबंधीचे प्रास्ताविक प्रकरण आहे. वस्तूंचे गुणधर्म आणि बदल यासंबंधी थोडे सर्वसाधारण विवेचन त्यात आहे. पृथ्वीच्या बाह्य स्वरूपात होणारे बदल, उदाहरणार्थ, पर्वतांची मैदाने होणे, मैदानांचे समुद्र व नद्यांत परिवर्तन होणे, समुद्राचा दलदलीचा प्रदेश, वाळवंट किंवा पर्वत बनणे इत्यादी बदलांचा यात समावेश[1] आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर पर्वत किंवा इतर उंच-सखल भाग असतात. याचे कारण त्यामुळे सबंध जमीन समुद्राकडून पादाक्रांत होण्यास प्रतिबंध होऊ शकतो. पृथ्वी सपाट असती तर समुद्राने सारी जमीन व्यापली असती. नद्या व ओढे पर्वतावरून वाहात खाली येतात. पण सूर्य, चंद्र व ताऱ्यांच्या सुकविण्याच्या शक्तीमुळे त्यांचे प्रवाह कोरडे पडतात. पर्वतातील ओलसरपणा गेल्याने ते दुभंगून कोसळतात आणि त्यांतून खडक व दगड, रेती व वाळू तयार होते. विजा पडल्या की या क्रियेस चालना मिळते. पावसाच्या व नद्या–ओढ्यांच्या पाण्याबरोबर हे खडक, वाळू वगैरे समुद्र व सरोवरांना जाऊन मिळतात. त्यांच्या तळाशी लाटा व वादळांच्या क्रियेमुळे एकावर एक त्यांचे थर साचत जातात, आणि वाऱ्याच्या प्रक्रियेने

१. 'वांधवां'च्या मते "परिवर्तनाच्या या तत्त्वाचा ताऱ्यांवरही प्रभाव पडतो. दर तीन वर्षांनी स्थिर तारे आपली जागा बदलतात. ग्रहदेखील पृथ्वीपासूनच्या त्यांच्या सर्वांत जास्त अंतराचा कोन आणि राशींच्या संदर्भातील त्यांची जागा बदलत असतात. हा बदल नऊ हजार वर्षांत आकाशाच्या वर्तुळाचा एकचतुर्थांश भाग एवढा होत असतो. म्हणजे ३६ हजार वर्षांत आकाशाचे वर्तुळ पूर्ण होते. त्यामुळे ग्रहांच्या किरणांच्या प्रभावाची जागा सतत बदलत असते. त्याचा परिणाम म्हणजे दिवस व रात्र, उन्हाळा व हिवाळा यात होणारे बदल. जगाच्या चार भागांतील वातावरणात होणारे बदलही अंतराळातील बदलामुळे होत असतात."

वाळवंटात जसे वाळूचे डोंगर निर्माण होतात तसे समुद्रात अनेक युगांनंतर पर्वत निर्माण होतात.[1]

पर्वत विविध प्रकारच्या खडकांचे बनतात. काही पर्वत अतिशय कठीण अशा खडकांचे ( ग्रॅनाइट ) असतात तर काही मऊ दगडाचे असून त्यावर फारच थोड्या वनस्पती उगवतात. मक्केजवळील तिहामाचे पर्वत या प्रकारचे आहेत. काही पर्वत मऊ खडक, हलकी माती, जमीन, वाळू व रेती यांच्या थरांनी बनलेले असतात. अश प्रकारच्या पर्वतांत अनेक गुहा, पोकळ जागा, प्रवाहांनी बनलेले थर ( वादिस ) झरे व ओढे असतात आणि पॅलेस्टाईन व तबरीस्तानमधील पर्वतांप्रमाणे तेथे सर्वप्रकारच्या विपुल वनस्पती असतात. पर्वतांच्या गुहा व खोलगट भागांत पाणी साचते व ते बाहेर पडायला मार्ग नसल्याने तेथेच बंदिस्त राहते. तेथील माती गरम असेल तर तिच्या संपर्काने ते पाणी तापून गरम होते व त्याची वाफ बनते व वाफ प्रसरण पावताच बाहेर पडण्याचा मार्ग शोधू लागते. त्यामुळे धरणी दुभंगते किंवा खचते. बाहेर जायला मार्ग मिळाला नाही तर गुहांचा आतला भाग व खोलगट जागा थंड होईपर्यंत आणि वाफ द्रवरूप बनेपर्यंत भूकंप होत राहतात. हे द्रव त्या जागी दीर्घकाळ राहिले की त्याची शुद्धता व घनता वाढत जाते आणि अखेर त्याचा अस्थिर पारा बनतो. पुढच्या एका परिच्छेदात असे म्हटले आहे की हा 'खनिज' (पारा) म्हणजे अत्यंत जास्त उष्णतामानात ओलसरपणा आणि मातीच्या कणासारखे कण एकत्र येऊन बनलेली वस्तू आहे. गंधक व खनिज म्हणजे इतर धातूंचा पाया आहे ( अत्यंत उष्ण हवामानात ओलसरपणा व तेलासारखे कण एकत्र येऊन गंधक तयार होते असे गंधकाविषयी म्हटले आहे ). किती उष्णतामानात किंवा थंडीत धातूचे दोन घटक कोणत्या प्रमाणात एकत्र येतात यावरून धातूचे वैशिष्ट्य ठरते. सोने, चांदी, शिसे, लोखंड, सुरमा हे धातू याच पद्धतीने बनतात. रत्नेही ( शब्दशः अर्थ दगडासारखे खनिज ) याच पद्धतीने तयार होतात. फक्त त्यांच्या घडणीत अग्नी हा निर्णायक घटक असतो.

---

१. 'बांधवां'नी मानवी संस्कृतीची अशी उपपत्ती सांगितली आहे : "समुद्राच्या तळाशी पर्वत तयार होतात तेव्हा समुद्राचे पाणी चढते व त्यामुळे सखल प्रदेशात पूर येतात. कालांतराने हेच प्रदेश समुद्र बनतात आणि समुद्राची नंतर कोरडी जमीन बनते. समुद्रातून वर आलेल्या जमिनीवर पाऊस पडतो, ओढे वाहू लागतात. त्यांच्याबरोबर माती व वाळू वाहून येते. त्यात वनस्पती, चारा व झाडे वाढतात. त्यांमध्ये जंगली श्वापदे लपतात. लाकडे तोडण्यासाठी व शिकारीकरता आलेल्या माणसांचे त्या जमिनीकडे लक्ष जाते. मग तो माणूस तेथे राहतो व तेथील जमीन कसू लागतो. त्यात अनेक प्रकारची पिके येतात. मग तेथे खेडी व गावे विकसित होतात आणि त्यात माणसे घरे करून राहू शकतात."

या खनिजांतील सोने हा खनिज अत्यंत शुद्ध असून त्याची घडण अत्यंत समतोल असते. सोन्याचे शरीर, आत्मा व मन अगदी एकरूप झालेले असतात. सोन्याचे मन म्हणजे हवेतील अणू, आत्मा म्हणजे पाण्यातील अणू आणि शरीर म्हणजे मातीतील अणू. खनिजांच्याबाबतीत अग्नी हा निर्णायक घटक असतो. रत्नांमध्ये ज्याप्रमाणे 'जॅक्रिन्थ' हे रत्न सर्वांत विशुद्ध त्याप्रमाणे धातूंमध्ये सोने सर्वांत शुद्ध. कारण अग्नीने त्याचे घटक अलग होत नाहीत. सोने जेथे तयार होत असते तेथे ते तप्त स्थितीत दीर्घकाळ असते. सोन्याच्या परिपूर्णतेचे तेही एक कारण आहे. त्याच्या खालोखाल चांदी मौल्यवान आहे. खाणीतून काढताना चांदी लौकर थंड करावी लागली नसती तर ती कदाचित सोन्यापेक्षाही अधिक मौल्यवान ठरली असती. इतर सर्व प्रकारच्या खनिजांच्या निर्मितीची अशाच प्रकारची उपपत्ती सांगण्यात येते.[1]

सृष्टिनिर्मित वस्तूंच्या चढत्या मालिकेमध्ये खनिज हा सर्वांत खालचा टप्पा असून सर्वांत वर मानव व देवदूत येतात. खनिजांच्या वरचा टप्पा वनस्पतीचा. खनिज आणि वनस्पती यांच्या मिश्रणाने बनलेल्या वस्तू हा त्यांच्यामधील टप्पा. वनस्पतींच्या टप्या-नंतर प्राण्यांचा टप्पा. त्यांत सर्वांत श्रेष्ठ मानव.[2] वनस्पतिसृष्टीसंबंधीच्या प्रबंधात पृथ्वीच्या विशिष्ट भागात भिन्न भिन्न वनस्पती आहेत असे म्हटले आहे. प्रत्येक वनस्पतीची वैशिष्ट्ये आहेत. खनिजांचीही याच पद्धतीने विभागणी झालेली आहे. वाळवंट, पर्वत व मऊ खडकांतच सोने आढळते. तर चांदी, तांबे, लोखंड व इतर धातू मऊ मातीच्या बनलेल्या पर्वतात आणि खडकांतच आढळतात. गंधक ओलसर व मऊ जमिनीतच सापडते. लोहमय गंधकाचे क्षार, चिकट बेन्झाइन ( अकलाह ) यासारखे तेलकट पदार्थ दलदलीच्या प्रदेशात सांपडतात. तुरटी व मोरचूद खाऱ्या नापीक जमिनीत आढळतात.

खनिजे असंख्य असून त्यांपैकी काही माणसाला अज्ञात आहेत. चांगले-वाईट गुणधर्म रंग, रस, गंध व आकारमान यानुसार तज्ज्ञांनी खनिजांचे सुमारे तीनशे प्रकार पाडले आहेत. काही खनिजे दगडासारखी कठिण असतात, पण ते अग्नीने वितळतात व थंड होताच आणखी कठीण बनतात. सोने, चांदी, तांबे, लोखंड, शिसे, काच वगैरे धातू या प्रकारचे आहेत. काही धातू खूप उष्णता दिल्याशिवाय वितळत नाहीत व हिऱ्याच्या साहाय्यानेच त्यांचे तुकडे पाडता येतात. जॅक्रिन्थ व कॉर्नेलियन हे या प्रकारचे खनिज होत. क्षार, मोरचूद व अभ्रक यांसारखे खनिज भुसभुशीत असले तरी उष्णतेने

---

१. धातुपरिवर्तनशास्त्राच्या ( किमया ) इतिहासात व प्रात्यक्षिक उपयोगातही या उपपत्तीचे महत्त्व सांगितलेले आहे.

२. आकाश व तारे यांच्याद्वारे विश्वशक्ती आपले कार्य करीत असते. विश्व-शक्तीच्या चार घटकांवर निसर्गशक्तीची प्रक्रिया होऊन तीन राज्ये किंवा 'त्रिलोक' तयार झाले आहेत.

वितळत नाहीत. द्रवरूप, ओलसर, अग्नीला विरोधी अशी पाऱ्यासारखी खनिजे हा खनिजांचा आणखी एक प्रकार. त्याशिवाय अन्य एक प्रकार म्हणजे ईथर (दक्षु) किंवा तेलासारखे पण अग्नीने जळणारे गंधक, सोमल विष यासारखी खनिजे.

याशिवाय वनस्पतींच्या वर्गात पांढरे व तांबडे प्रवाळ आणि प्राण्यांच्या वर्गात मोती या खनिजांचा समावेश करता येईल. गोठून तयार झालेल्या खनिजांचा आणखी एक वर्ग असून त्यात तैलस्फटिक आणि बेझोअर हे खनिज आढळतात. यांपैकी पहिले समुद्रावरचे दंव असून ते काही ठिकाणी व काही वेळा गोठते. बेझोअर म्हणजे देखील विशिष्ट प्रकारच्या खडकावर पडलेले आणि त्यांच्या सांदीत गोठलेले दंवच होय. मोत्यांची उत्पत्तीही दंवापासूनच होते. कालव माशाच्या शिंपल्यांत दंवबिंदू पडतात व ते गोठून मोती बनतात.

जगासंबंधीची आपली उपपत्ती पुन्हा एकदा मांडल्यानंतर आणि आकाशातील ग्रहांचा पृथ्वीवर काय प्रभाव पडतो हे सांगितल्यानंतर 'बांधव' वनस्पती सृष्टीकडे वळतात. वनस्पतींच्या जाती, त्यांची उत्पत्ती व वाढ, त्यांचे रूप, रंग, रस, गंध, पाने, फुले, दाणे, बिया यांच्या आकारातील फरकांची कारणे, त्यांची मुळे, फांद्या आणि फायदेशीर गुणधर्मांची तत्त्वे विशद करणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे तद्विषयक प्रबंधाच्या उपोद्घातात 'बांधवां'नी म्हटले आहे.[1]

प्रत्येक प्रकारच्या वनस्पतींचा अंकुर म्हणजे विशिष्ट प्रकारचे मिश्रण (केमस) होय. आवश्यक असलेल्या विशिष्ट घटकांच्या एकत्रीकरणापासून विशिष्ट प्रकारचे हे मिश्रण तयार होते यातून विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींचीच वाढ होते. मूळच्या रोपाला नेहमीचेच पाणी दिले, एकाच जमिनीत ते लावले, त्याला तशीच वाऱ्याची-हवेची झुळूक मिळाली आणि सूर्याकडून सतत मिळणाऱ्या उष्णतेने ते पिकले तर ते कोणताही आकार धारण करू शकेल! पण त्या रोपाबरोबर दुसऱ्याही काही दुय्यम गोष्टी असतात. त्यांच्या उत्पत्तीच्या स्वरूपानुसार त्या विशिष्ट आकार धारण करतात. गहू व कापूस या दोन्हींची रोपे पाण्यातून वाढत असली तरी कापूस धाग्याच्या स्वरूपांत (ज्यापासून कपडे व कापड बनवितात) तर गहू पीठाच्या स्वरूपात (ज्यापासून कणीक तिंबून रोटी बनवितात) दिसू शकतो. याचे कारण जमिनीतला ओलसरपणा वनस्पतींच्या मूळापर्यंत पोचतो, त्याचा

---

१. "वनस्पती ही उघड दिसणारी व दृश्यमान निर्मिती असली तरी तिच्या अस्तित्वाचे कारण माणसाला अज्ञात व अदृश्य आहे. या कारणाला तत्त्वज्ञ 'नैसर्गिक शक्ती' म्हणतात, तर त्यालाच शरियतने "वनस्पतींची निगा, प्राण्यांची उत्पत्ती, खनिजांची घडण, चैतन्याचा अंश यासाठी नियुक्त केलेले देवदूत आणि अल्लाहचे सैन्य-पथक आहे असे म्हटले आहे."

विशिष्ट प्रकारचा लगदा बनून त्यातून विशिष्ट प्रकारचीच वनस्पती उगवते. निरनिराळ्या प्रकारची पाने, मोहोर, मुळे, दाणे याच पद्धतीने निर्माण होतात.

आकाशात वनस्पतींवर प्रभाव पाडणारी चैतन्यशक्ती असते. तिच्या प्रभावाने वनस्पतींच्या निरनिराळ्या[1] जाती बनतात. अल्लाहने या चैतन्यास सात प्रकारच्या शक्ती दिल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे : आकर्षून घेणे, धारण करणे, पचविणे, पुढे जाण्यास गती देणे, पोषण करणे, विस्तार करणे आणि घडविणे. त्यांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत : आकर्षणशक्ती, चार मूळ घटकांतील अर्क काढून घेते; धारणशक्ती, प्रत्येक वनस्पतीच्या जातीच्या गरजांप्रमाणे हे अर्क विशिष्ट स्वरूपात धारण करते; पचनशक्ती, त्यांचे पचन करते; गती देणारी शक्ती त्यांना वनस्पतीच्या निरनिराळ्या भागांत पोचविते; पोषणशक्ती त्यांचे पोषण करते; विस्तारशक्ती त्यांच्या वाढीस उत्तेजन देते व घडणशक्ती विविध आकार आणि रंग देते.

वनस्पतींची पहिली जात म्हणजे झाडे. उभे खोड असलेल्या सर्व वनस्पतींचा यात समावेश होतो. ही झाडे काही पूर्ण स्वरूपात तर काही अपूर्ण स्वरूपात असतात. मुख्य मूळ, त्यानंतर त्याला फुटलेले फाटे, फांद्या, पाने, मोहोर, फळ, साल, राळ या सर्व गोष्टी पूर्ण स्वरूपाच्या वनस्पतीत असतात; तर अपूर्ण वनस्पतीत यापैकी एका किंवा दुसऱ्या गोष्टीचा अभाव असतो. खोड नसलेल्या वनस्पती ही वनस्पतीची दुसरी जात. या वनस्पती जमिनीवर पसरतात किंवा झाडाच्या आधारे वर चढतात. द्राक्षवेल, भोपळा, कलिंगडे आदी वेली या वर्गात येतात.

वनस्पतींच्या वर्गीकरणाची आणखी एक पद्धत म्हणजे वाळवंट, जंगल, पर्वतशिखरे, नदीकाठ, समुद्रकिनारा, तळी, खोलगट भाग यापैकी जेथे त्या वाढत असतील त्यानुसार त्यांचे वर्गीकरण करणे. माणसाने शहरात किंवा लागवडीयोग्य जमिनीत आणि बागांमध्ये लावलेल्या वनस्पती हा एक खास वर्ग करावा लागेल.

बहुसंख्य वनस्पती जमिनीच्या पृष्ठभागावर वाढतात. ऊस, तांदूळ यांचे पीक फक्त पाण्यातच येईल. काही वनस्पती पाण्याच्या पृष्ठभागावर, तर काही खडकांवर वाढतात.

वनस्पतींच्या निरनिराळ्या श्रेणींमध्ये सर्वांत निकृष्ट जात म्हणजे चऱ्यांच्या ढिगांवर वाढणाऱ्या वनस्पती व सर्वात उत्कृष्ट जात म्हणजे ताडाची झाडे. गुणधर्माच्या बाबतीत या झाडांचे प्राणी जगताशी बरेच साम्य आहे. पहिल्या प्रकारच्या वनस्पती रात्रीच्या थंड आर्द्र हवेत उगवतात व दुपारपर्यंत नष्ट होतात. माडांच्या झाडांमध्ये नर व मादी अशा दोन जाती आहेत. नर जातीची शक्ती तिच्यात उघड स्वरूपात अस्तित्वात असते तर मादीत ती सुप्त स्वरूपात असते. इतर वनस्पतींत या शक्ती अलगपणे एकेका

---

१. " पैगंबरांनीं त्यांना ' देवदूत ' म्हटले आहे. "

वनस्पतीत आढळत नाहीत. हे विशेष फक्त प्राण्यांतच आढळत असल्याने ताडाचे झाड चैतन्यशक्तीच्या दृष्टीने प्राणी वर्गात मोडणारे पण शरीराच्या दृष्टीने वनस्पतीत मोडणारे आहे.

प्राण्यांमधील अगदी कनिष्ठ जातींप्रमाणे[1] वनस्पतींना फक्त एकच इंद्रिय असते. ते म्हणजे स्पर्शाचे. वनस्पती आपली मूळे ओलसर जागांकडेच वळवितात, खडकांकडे व कोरड्या जागांकडे वळवीत नाहीत यावरून हे सिद्ध होते. तसेच मर्यादित जागेवर लावलेल्या वनस्पती बाजूला पसरून अधिक जागा मिळविण्याचा प्रयत्न करतात. वनस्पती छपराने आच्छादित असल्यास त्यांच्या आटोक्यातल्या त्यातील एखाद्या भोकातून त्या मार्ग काढतात. वनस्पतींना स्पर्शज्ञान व आपल्या गरजांची पुरेशी जाणीव आहे असे या वस्तुस्थितीवरून दिसते.[2] वनस्पतींची उत्पत्ती प्राण्यांपूर्वी झाली. त्यांची रचनाच अशी असते की त्या प्राण्यांना खाण्यास योग्य असे मूळ घटक जमिनीतून ग्रहण करतात. आपल्या पोषणासाठीही असे घटक ते सतत मिळवीत असतात. वनस्पती नसत्या तर प्राण्यांना स्वतःलाच सरळ जमिनीतूनच अन्न ग्रहण करावे लागले असते.

अन्नाच्या शोधासाठी आपली जागा बदलण्याची प्राण्यांची शक्ती हे वनस्पतींपासून वेगळे करणारे त्यांचे वैशिष्ट्य आहे. तसेच वाणी व विचारशक्ती हे माणसाचे इतर प्राण्यांपासून वेगळे असे वैशिष्ट्य आहे असे 'बांधवां'नी म्हटले आहे. चार मूळ घटकांपासून सर्व सृष्टी निर्माण झाली. खनिजांपेक्षा वनस्पती श्रेष्ठ, याचे कारण वनस्पती जमिनीतून आपल्यासाठी अन्न शोषून घेतात व त्यांची वाढ होत असते आणि त्यांना स्पर्शज्ञान असते. प्राण्यांचे अंगी या शक्तीशिवाय एक किंवा अधिक इंद्रिये असतात; आणि माणूस इतर सर्व बाबतींत प्राण्यांसारखा असला, त्याला सर्व इंद्रिये असली तरी तो बोलतो व विचार करतो हे त्याचे वैशिष्ट्य आहे.

प्राण्यांचे पूर्ण आणि अपूर्ण अशा दोन वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे. जे प्राणी गर्भधारणा करून प्रजोत्पत्ती करतात, आपल्या अपत्यांना वाढवितात, अंगावर पाजतात ते पूर्ण प्राण्यांच्या वर्गात मोडतात. कुजलेल्या किंवा सडलेल्या वस्तूंमधून जे

---

१. प्राण्याची सर्वांत कनिष्ट जात म्हणजे 'हलाझुन' (गोगलगाय) होय. नदीकाठी किंवा समुद्रकिनारी वाढणाऱ्या बोरूच्या वनात ती दिसते. अन्नाच्या शोधासाठी ती निघते तेव्हा ओलसर भागाचा स्पर्श होताच ती आपले अंग पसरते व कोरडा भाग लागताच ती आपले अंग आखडून घेते.

२. 'बांधव' म्हणतात की, आपल्या अडचणीतून आपली सुटका करून घेण्याची किंवा संकटे दूर सारण्याची शक्ती वनस्पतींना दिल्याशिवाय दैवीशक्ती त्यांना अडचणीत टाकीत असेल हे शक्य नाही, कारण ते तिच्या सूज्ञपणाला साजेसे नाही.

प्राणी जन्मतात ते अपूर्ण वर्गात मोडतात. जे प्राणी अंडी घालून ती उबवितात व आपल्या पिलांना वाढवितात ते या दोन वर्गांच्या मध्ये पडतात. अपूर्ण प्राण्यांची उत्पत्ती प्रथम व पूर्ण प्राण्यांची उत्पत्ती नंतर झाली. अपूर्ण प्राणी थोड्या वेळात जन्मतात. जलाची उत्पत्ती जमिनीच्या आधी झालेली असल्याने जलचर प्राण्यांची उत्पत्ती ही जमिनीवरील प्राण्यांच्या आधी झाली. विषुववृत्ताखालील समशीतोष्ण कटिबंधांत दिवस व रात्र सारखे असतात. हवामान सम असल्याने नर-मादीच्या संयोगातून पूर्ण प्राण्यांचा जन्म प्रथम त्या भागात झाला. आदमचा जन्म या भागात झाला. उत्पत्तीच्या क्रमात प्राण्यांचा जन्म, मानवाच्या आधी झाला. प्राणी, मानवासाठी असून, त्याच्यामुळेच ते अस्तित्वात आहेत.

प्राण्यांच्या क्रमवारीत एकच इंद्रिय असलेले प्राणी सर्वांत खालच्या प्रतीचे. त्यांच्या वरचा क्रम किड्यांचा. झाडाची पाने, मोहोर, फळे यांत ते जन्मतात व त्यांच्या भोंवतीच सरपटत असतात. रस आणि स्पर्श ही दोनच इंद्रिये त्यांना असतात. त्यांच्या वरचा क्रम जलचर किंवा अंधाऱ्या जागेतील प्राण्यांचा. त्यांना रस व स्पर्शाच्या जोडीला गंधाचे तिसरे इंद्रिय असते. चौथा क्रम अंधाऱ्या जागी सरपटणाऱ्या प्राण्यांचा व किड्यांचा. त्यांना दृष्टी सोडून बाकी सर्व इंद्रिये असतात. दृष्टीची त्यांना आवश्यकता नसते. सर्व इंद्रिये असलेल्या प्राण्यांचा वर्ग सर्वांत वरचा. पूर्ण प्राणी या वर्गात येतात.

प्राण्यांच्या वस्तीच्या जागेप्रमाणे त्यांचे वर्गीकरण करण्याचीही एक पद्धती आहे. मासे, खेकडे, बेडूक, कासव यांसारखे जलचर प्राणी, आकाशात संचार करणारे बहुसंख्य पक्षी व किडे, जमिनीवर राहणारी गुरे व जंगली श्वापदे आणि मातीत राहणारे किडे असे हे वर्गीकरण करता येईल. या सर्व प्राण्यांमध्ये काही प्राणी दुसऱ्या प्राण्यांना खातात, तर काहींना दुसरे प्राणी खातात.

पूर्ण प्राणी रचनेच्या दृष्टीने पूर्ण असतात. त्यांना अनेक अवयव असतात, हाडे असतात. दोन्हीं बाजूंना समान अशा सांध्यांनी ती हाडे जोडलेली असतात व मज्जा-तंतूंनी एकत्र राखली जातात. आत मांस व रक्त वाहिन्या असतात. या सर्वांचे संरक्षण त्वचा करीत असते. ती केस, फर, लोकर, पिसे किंवा कवचांनी आच्छादलेली असते. शरीरात मेंदू व फुप्फुसे, हृदय, यकृत, प्लीहा, मूत्रपिंड, मूत्राशय, आतडी, जठर वगैरे महत्त्वाचे अवयव असतात.

शरीरात असा एकही अवयव नाही की जो इतर अवयवांचे रक्षण करीत नाही किंवा त्यांना पूरक नाही किंवा त्यांचे कार्य चालू राहण्यास मदत करीत नाही. मानवी शरीरावर एखाद्या सर्वसत्ताधारी बादशहाप्रमाणे नियंत्रण ठेवणाऱ्या मेंदूचेच उदाहरण या बाबतींत देता येईल. इंद्रियांचे उगमस्थान तेथे आहे. विचारांची निर्मिती तेथेच होते. बुद्धी, स्मृती, आत्मा यांचे मेंदू हे निवासस्थान असून हृदय व शरीराचे इतर भाग

त्याला मदत करतात. शरीराचे नियंत्रण व नियमन हे हृदयाचे कार्य आहे. रक्तवाहिन्या येथूनच निघतात. शरीरातील स्वाभाविक उष्णतेचे ते उगमस्थान आहे. यकृत, रक्तवाहिन्या आणि फुफ्फुसे, हृदयाला मदत करतात. यकृताच्या कार्यास पाच अवयवांची मदत होते. त्यात फुफ्फुसे प्रमुख आहेत. फुफ्फुसे, हे श्वासाचे निवासस्थान होय. छाती आणि छाती व पोट यांना विभागणारा पडदा, श्वासनलिका, नाकपुड्या, यांची फुफ्फुसांच्या कार्यास मदत होते. येथे श्वासोच्छ्वासाच्या कार्यपद्धतीचे वर्णन 'बांधवां'नी केले आहे. नाकपुड्यांनी आत घेतलेली हवा श्वासनलिकेत प्रवेश करते. तेथे तिचे तपमान नेहमीसारखे झाले की हवा फुफ्फुसांपर्यंत पोचते व तेथे ती शुद्ध केली जाते. हवा नंतर हृदयात प्रवेश करते. तेथे शरीराची स्वाभाविक उष्णता कमी केल्यावर ती रक्तवाहिन्यांतून नाडी (नब्ज)[1] पर्यंत जाते. जळलेली हवा हृदयातून फुफ्फुसांत प्रवेश करते व तेथून श्वासनलिकेच्या मार्गाने नाकपुड्यांत किंवा तोंडात जाते. हवा आत घेतली जाते तेव्हा ती प्रसरण पावते व बाहेर सोडली जाते तेव्हा आकुंचन पावून छाती फुफ्फुसांच्या कार्याला मदत करते. पचनक्रियेशी संबंधित इंद्रियांसंबंधीही अशीच उदाहरणे दिली आहेत.

निरनिराळ्या प्राण्यांना त्यांच्या राहण्याच्या सवयीनुरूप खास इंद्रिये कशी देण्यात आली आहेत याची 'बांधवां'नी आपल्या प्रबंधात कल्पना दिली आहे. वनस्पतींमध्ये राहणाऱ्या प्राण्यांना अन्नवस्तु धरण्यासाठी रुंद तोंड दिलेले असते. अन्न फोडता यावे यासाठी त्यांचे दात धारदार असतात व झाडपाला, दाणे, पाने, फांद्या, मगज यातील कठीण भाग चावता यावा यासाठी त्यांचे चावण्याचे दातही कठीण असतात. त्यांचा घसाही मऊ व रुंद असतो. त्यातून चर्वण केलेले अन्न गिळले जाते. काही प्राणी एकदा गिळलेले अन्न पोटातून तोंडात पुन्हा आणून ते पुन्हा रवंथ करीत बसतात. रवंथ केलेले अन्न गिळल्यानंतर खालच्या पोटात जाते. पोटाची रचना अशा प्रकारे केलेली असते की, धान्याचे जाडेभरडे भाग आणखी शुद्ध करून घेण्यासाठी यकृताकडे पाठविले जातात. जे शिल्लक राहते ते प्लीहा, पित्ताशय, हृदय, मूत्रपिंड आणि पोकळ शिरांकडे पाठविले जाते. ही इंद्रिये म्हणजे जणु कालवे होत. त्यांतून शुद्ध रक्त शरीराच्या सर्व भागात पोचते. जादा पौष्टिक अन्नासाठी पुरुषाच्या शरीरात काही खास इंद्रिये व नलिका असून त्यांतून ते जाते व त्याचे वीर्य बनते. समागमाच्यावेळी हे वीर्य या इंद्रियांमधून स्त्रीच्या शरीरात असलेल्या काही इंद्रियांच्या मार्गाने गर्भात जाते. तेथेच नवा जीव जन्मास येतो आणि वाढतो.

मांस खाणाऱ्या जंगली श्वापदांची शरीररचना झाडपाल्यावर जगणाऱ्या प्राण्यापेक्षा

---

१. रक्ताभिसरणासंबंधीचा हार्वेचा शोध लागेपर्यंत पाश्चात्य जगतात हीच उपपत्ति सर्वसाधारणपणे मानली जात होती.

निराळी असते. इतर प्राण्यांचे शरीर खाऊनच त्यांना पौष्टिक अन्न मिळत असल्यामुळे विधात्याने त्यांना कठीण दात, तीक्ष्ण पंजे दिले आहेत. अत्यंत चपळाईने झडप घालून भक्ष्य गिळंकृत करता यावे यासाठी त्यांना हलके शरीर दिले आहे.

प्राण्यांना पूर्ण आकार देताना निर्मात्याने सूज्ञपणाने त्यांच्या शरीराच्या उजव्या बाजूचा अर्धा आणि डाव्या बाजूचा अर्धा असे स्पष्ट दोन भाग केले. पहिला खरा आकडा ( ' एक ' हा खरे तर आकडा नसून तो फक्त भाग ( युनिट ) आहे. ) आणि मूलभूत घटकांचे एकत्रीकरण मिळते जुळते आहे. शरीराचे तीन भाग– दोन बाजू आणि मधला भाग–हे पहिल्या विषम आकड्याशी आणि मानवी शरीरातील त्रिदोष हे पहिल्या वर्गसंख्येशी जुळते आहेत. पंचेंद्रिये ही पहिला दशमसंख्येचा आकडा आणि पाच गुणधर्म यांच्याशी जुळती आहेत. पाच गुणधर्मांमध्ये चार नैसर्गिक गुणधर्म आणि एक दैवी गुणधर्म आहे. सहा दिशांना भ्रमण करण्याच्या शरीराच्या शक्तीत ( सहा दिशा म्हणजे होरायंत्रावरील चार बिंदू आणि वरची व खालची दिशा. ) पहिला पूर्ण आकडा आणि घनाकृतीच्या पृष्ठभागांची संख्या यांच्याशी जुळती अशी काहीतरी शक्ती आहे. सात भौतिक गुणधर्म हे पहिला पूर्ण आकडा आणि ग्रहांची संख्या यांच्याशी जुळते आहेत. ( मूलभूत घटकांची ) संभाव्य अशी आठ मिश्रणे पहिल्या घन संख्येशी जुळती आहेत. शरीररचना नऊ थरांमध्ये झालेली असून ही संख्या पृथ्वीभोवती असलेल्या गोलांच्या संख्येशी जुळती आहे. शरीराला बारा राशींप्रमाणे बारा द्वारे आहेत. त्याद्वारे मनुष्याला बोध होत असतो. शरीर ताठ उभे राहणे अठ्ठावीस मणक्यांवर अवलंबून असते. या मणक्यांची संख्या चंद्राच्या भ्रमणमार्गावरील टप्प्यांइतकी आहे. शरीरातील रक्तवाहिन्यांची संख्या ( ३६० ) राशीचक्राच्या अंशांच्या संख्येशी आणि वर्षाच्या दिवसांच्या संख्येशी जुळती आहे. शरीराचे भाग मोजले तर असे दिसून येईल की त्यांची संख्या सृष्टीतील कोणत्यातरी वस्तूंतील घटकांच्या संख्येशी जुळती आहे. ' बांधव ' म्हणतात, " संख्येच्या स्वरूपानुसार सर्व अस्तित्वांत असलेल्या वस्तूंचे गट पाडण्यात आले आहेत, हा पायथॅगोरसवाद्यांचा सिद्धान्त यावरून प्रस्थापित होतो. "

" बांधवां "नी रेखाटलेले विज्ञानाचे चित्र पुरे करावयाचे तर त्यात जादूविद्या, ज्योतिषविद्या आणि दैवी साक्षात्कार यांचाही समावेश केला पाहिजे. या कलांचा अभ्यास करताना त्यांनी भारतीय, फारसी तसेच ग्रीक विद्वानांच्या ग्रंथांचा अभ्यास केला. या कला प्रथम त्यांचे ज्ञान मिळविलेल्यांसाठीच केवळ आहेत; आणि त्या कलांतील काही भाग खरे व काही खोटे आहेत हे जाहीर करण्याची दक्षता मात्र त्यांनी घेतली आहे.

इखवानचे प्रबंध ज्या काळात लिहिले गेले त्या काळातील दुसऱ्या दोन ग्रंथांमध्ये इस्लामला चौथ्या शतकात ज्ञात असलेल्या शास्त्रीय ज्ञानाची संक्षिप्त माहिती मिळते. चौथे शतक म्हणजे इस्लामच्या इतिहासातील सर्वांत सर्जनशील शतक होय. इखवानच्या प्रबंधांची

त्यासी बरीच मोठी आहे. तथापि जे विषय त्या ग्रंथांत पूर्णपणे आलेले नाहीत अशा विषयांचा या दोन ग्रंथांमध्ये समावेश असून ते ग्रंथ म्हणजे एक प्रकारे इखवानच्या प्रबंधांची पुरवणी आहेत. हे दोन ग्रंथ म्हणजे मफातीह अल् उलूम (विज्ञानाच्या किल्ल्या) आणि फिहरिस्त ( सूची ) हे होत. मफातीह अल् उलूम हा ग्रंथ ९७६ मध्ये महमद इब्ने अहमद इब्ने युसुफ याने लिहिला. हा लेखक ख्वाराझममधील होता. फिहरिस्त हा ग्रंथ ९८८ मध्ये इब्ने अल्-नादिम अल् वराक याने लिहिला. तो बगदादमधील कागदविक्रेता किंवा ग्रंथांच्या नकला तयार करणारा होता.

' मफातीह अल् उलूम ' या ग्रंथामध्ये विज्ञानाच्या ' अरब ' व ' परकी ' या दोन शाखांमध्ये वापरलेल्या शब्दांचे मुख्यतः विवरण आहे. या शब्दांच्या सविस्तर व्याख्या त्यात दिलेल्या आहेत. ' अरब ' शास्त्रांवरील पहिल्या भागात सहा प्रकरणे असून, त्यांत फिकाह, कलाम, व्याकरण, चिटणीसपद, काव्य, छंदशास्त्र आणि इतिहास हे विषय आहेत. प्रत्येक प्रकरणात बरेच विषयांतर आहे. उदाहरणार्थ, फिकाहसंबंधींच्या प्रकरणातील जकातीसंबंधीच्या भागात लहान-मोठ्या सर्व प्राण्यांची नावे दिलेली आहेत. ' कलाम 'वरील प्रकरणांत निरनिराळे इस्लामी पंथ, तसेच ख्रिस्ती, यहुदी व लेखकाला परिचित असलेले आणि त्या काळच्या लोकमताविरुद्ध असलेले पंथ यांचा उल्लेख आहे. दुसऱ्या विभागात तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र ( ॲरिस्टॉटलच्या अर्थाने ), तत्त्वज्ञानाची परिभाषा, तर्कशास्त्र, वैद्यक, अंकगणित, भूमिती, खगोल, संगीत, यंत्रशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय आहेत.

इखवानच्या प्रबंधाला पूरक अशी माहिती मुख्यतः या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात आहे. वैद्यकावरील प्रकरणात शरीररचनेचे विवरण असून, शरीराचे निरनिराळे भाग, त्यांच्या जागा आणि कार्य यांची माहिती दिलेली आहे. रोग आणि आजारपण, अन्न, साधी व मिश्र औषधे, हकीमांची वजने–मापे व शेवटी अनेक तांत्रिक पारिभाषिक शब्द त्यात दिलेले आहेत. अंकगणितावरील प्रकरण त्या विषयाच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कारण एखादा अपरिचित विषय स्पष्ट करून सांगावा त्याप्रमाणे हिंदी आकड्यांचे[1] विशेषतः शून्याचे कार्य त्यांत विशद केलेले आहे. शून्य म्हणजे एक छोटे वर्तुळ. संख्येतील स्तम्भाचा क्रम राखण्यासाठी त्याचा उपयोग होतो. जो आकडा पहिल्या

---

१. म्हणजे आपले ' अरबी ' आकडे [ अरबी भाषेतील ' हिंदी ' हे विशेषण ' हांदिसी ' ( भूमितीविषयक ) या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे असे कॅरा द व्हॉक्स याचे मत आहे ]. वारशाची कायदेशीर वाटणी ठरविताना केले जाणारे गणित ( इल्म अल् फराइद ), ' माल ' ( वर्ग ) व ' शे ' ( वर्गमूळ : सुपरिचित ' क्ष ' हे अक्षर ) हे बीज-गणितातील शब्द आणि वर्गसमीकरणाची परिभाषा या सर्वांचे संशोधन करता असे दिसते की या गोष्टीसुद्धा भारतातून आल्या असण्याची शक्यता आहे.

स्तम्भात नाही त्याच्यापुढे एक शून्य असेल तर तो दशकामध्ये येतो. दोन शून्ये असतील तर शतकामध्ये. याप्रमाणे पाहिजे त्या क्रमापर्यंत ही संख्या वाढविता येते असे शून्याचे वर्णन त्यात केले आहे. रसायनासंबंधींच्या प्रकरणात उपकरणे, प्रक्रिया आणि या शास्त्रासाठी वापरले जाणारे पदार्थ यांचे वर्णन केले आहे.

सर्वसाधारणपणे 'मफातीह अल् उलूम' मधलेच विषये 'फिहरिस्त'मध्ये आहेत असे म्हणता येईल. पण वर्णनापेक्षा इतिहास व संदर्भसूचीसारखे त्याचे स्वरूप आहे. सध्याच्या स्वरूपात त्याचे महत्त्व या दृष्टीने आहे की इस्लाममध्ये 'परकी' शिक्षण देण्यासंबंधीच्या त्यावेळच्या कल्पना आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील नामवंत मुस्लिम व मुस्लिमेतर व्यक्ती यांचे जीवन आणि कार्य यांची त्यात माहिती आहे.

खगोलशास्त्र आणि वैद्यक ही क्षेत्रे वगळता, मुस्लिम विज्ञानाने चौथ्या शतकानंतर ग्रीक विज्ञानापलीकडे प्रगती केल्याचे आढळत नाही. मात्र खगोलशास्त्र व वैद्यक यामध्ये काही प्रात्यक्षिक निरीक्षणांची भर घालण्यात आली. पण त्यामुळे मूळ ग्रीक सिद्धान्तांमध्ये बदल झाला नाही. इब्ने खाल्दुनच्या (आठवे शतक) म्हणण्याप्रमाणे खलिफा मामूनच्या मृत्यूनंतर खगोलशास्त्राच्या क्षेत्रात ताऱ्यांची शास्त्रीय निरीक्षणे करण्याचे फार थोडे प्रयोग झाले आणि व्यवहाराच्या दृष्टीने पूर्वीच्या लोकांनी केलेल्या निरीक्षणावरच सर्वसाधारणपणे भिस्त ठेवण्यात आली. अर्थात इब्ने खाल्दुनजवळ सर्व माहिती नव्हती. त्याच्या काळात खगोलशास्त्राचा व्यवहारात अधिक वापर केला जात नसावा[1] आणि पूर्वीच्या विद्वानांचा अधिकारच एवढा मोठा होता की त्यांनी प्रतिपादन केलेल्या सिद्धान्तांपेक्षा कोणतेही नवे सिद्धान्त[2] तत्कालिन विद्वान प्रस्थापित करू शकले नाहीत. पण अनेक शतके खगोलाचा अभ्यास सतत चालू होता. नवी निरीक्षणे करण्यात येत होती. नव्या स्वरूपाची खगोलशास्त्रीय उपकरणे बनविण्यात येत होती. यातूनच आधुनिक

---

१. उदाहरणार्थ, रमझानचा प्रारंभ व शेवट ठरविण्यासाठी रमझानची तारीख आजदेखील खगोलशास्त्रीय गणिताने ठरविली जात नाही तर नवचंद्राचा उदय प्रत्यक्ष पाहून ठरविली जाते.

२. तथापि तर्क व अंदाज करण्यात येतच असत. अर्थात त्यातून कोणताही नवा सिद्धान्त विकसित होत नसे. याकुत याने 'मुजम् अल् बुलदान' मध्ये पृथ्वीच्या आकाराविषयी प्राचीन विद्वानांमध्ये कसे मतभेद होते याचा उल्लेख केला आहे. काहींच्या मते पृथ्वी सपाट आहे, तर काहींच्या मते ती पिपाच्या आकाराची आहे, तर दुसऱ्या काहींच्या मते ती वर्तुळाच्या काठावर घुमट उभारावा तशी, तर आणखी काहींच्या मते ती नळकांड्याच्या आकारासारखी आहे असे याकुतने म्हटले आहे. पृथ्वी फिरते म्हणून तारे फिरतात, आकाशातील ग्रह फिरतात म्हणून नव्हे असे काहींचे मत असल्याचे याकूतने म्हटले आहे.

खगोलशास्त्राचा पाया घातला गेला. ही वस्तुस्थिती त्या उपकरणांच्या अजूनही वापरात असलेल्या अरबी नावांवरून उघड दिसून येते.

वैद्यकाच्या क्षेत्रात अधिकारी विद्वानांबद्दलचा आदर अधिक स्पष्टपणे दिसून येतो. काही मुस्लिम वैद्यकशास्त्रज्ञ गालेनच्या नावाचा आजही आदराने उल्लेख करतात. राझेस आणि अविसेन्ना यांनीही शरीरविज्ञान, आरोग्य आणि उपचारशास्त्रांत ग्रीकांचेच सिद्धान्त मान्य केले. क्वचित एखाद्या प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे मूळ सिद्धान्तात सुधारणा करण्यात आली आहे. याचे अनेकदा उद्धृत केले जाणारे उदाहरण अब्दल अल् लतीफ अल् बगदादी (मृत्यू ६२९ / १२३१) याच्या रोजनिशीत आढळते. इजिप्तमधील प्रवासात त्याला हाडांच्या सांगाड्यांचा एक मोठा ढीग दिसला. मॅक्सच्या टेकडीवर एका साथीच्या रोगाला बळी पडलेल्यांचे हे सांगाडे होते. माणसाच्या खालच्या जबड्याचे गालेनने केलेले वर्णन प्रत्यक्ष हे जबडे पाहिल्यावर बगदादी याने दुरुस्त केले. अब्दुल अल् लतीफ अल् बगदादी याने आपले संशोधनकार्य इस्लामच्या सहाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात केले. सत्य शोधून काढण्यासाठी आपण स्वतःच जबड्यासारख्या वस्तूचे निरीक्षण करावे असे त्याच्या मनात पूर्वी कधी आलेच नव्हते. त्याच्या नामवंत पूर्वजांपैकी किंवा सहकाऱ्यांपैकी कोणी मानवी शरीराचे विच्छेदन कधी केले नव्हते. इस्लामी धर्मप्रमुखांनी शवविच्छेदनास बंदी केली होती म्हणून ते शरीराची चिरफाड करीत नसत असे नाही, तर मृताच्या शरीराची चिरफाड करू नये या प्राचीन रूढीचा त्यांच्यावर अधिक प्रभाव असल्यामुळे ते शरीरविच्छेदन करीत नसत. चोरी करणाराचे अवयव तोडण्याच्या शिक्षेस शरियतची मान्यता आहे. तेव्हा निदान जिवंत माणसाच्या शरीराचे अवयव छाटणे इस्लाममध्ये निषिद्ध मानले जात नव्हते. रोगाच्या कारणांची चिकित्सा व त्याची लक्षणे यांचे अनुभवजन्य अचूक निरीक्षण आणि उपचार-पद्धतीचे स्वयंप्रज्ञेने केलेले प्रयोग या दृष्टीने अरब वैद्यकाला महत्त्व आहे. प्राध्यापक ब्राऊन यांनी आपल्या 'अरेबियन मेडिसिन'[1] या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे "या प्राचीन अरबी डॉक्टरांनी शरीरविज्ञान व रोगनिदान यांसंबंधी पूर्वीच्या विद्वानांच्या

---

१. रोगलक्षणांचा अभ्यास केला जात होता याचा पुरावा 'अरेबियन नाईटस्'-मध्येही आढळतो. तावद्दुद या विद्वान गुलाम मुलीची तपासणी करण्यात आली तेव्हा निदानासंबंधीच्या एका प्रश्नास उत्तर देताना ती म्हणाली, "हृदयाच्या कंपांची कमी-अधिक तीव्रता, उष्णता, कोरडेपणा, थंडी आणि आर्द्रता या लक्षणांवरून हकीमाला निदान करता येईल." डोळ्यांना दिसणाऱ्या लक्षणांवरून त्याला शरीरातील रोगाची कल्पना येऊ शकते. डोळे पिवळे होणे हे काविळीचे लक्षण असते. पाठीत बाक येणे हे छातीत पाणी झाल्याचे लक्षण होय. अशा प्रकारे शरीरांतर्गत तक्रारींच्या लक्षणांचे निदान पुढील सहा प्रकारे करता येते : रोगाच्या प्रतिक्रियेवरून, उत्सर्जनावरून, वेदनांवरून, दुखण्याच्या जागेवरून, सुजेवरून व बाह्य लक्षणांवरून.

माहितीच्या आधारे जे लिहिले आहे, त्यापेक्षा त्यांची रुग्णचिकित्सेची टिपणेच अधिक सरस आणि महत्त्वाची आहेत. त्यांनी निव्वळ सिद्धान्त पाहिले नाहीत तर अनुभव व व्यवहारज्ञान यांतून सुचलेले उपाय केले. यामुळेच हे डॉक्टर यशस्वी ठरले असे दिसते."

मुस्लिम विद्वानांनी शास्त्राच्या आणखी एका शाखेस-धातुपरिवर्तन किंवा किमयाशास्त्रास बरेच महत्त्व दिले. पण या शास्त्राला खरोखरच ज्ञानाची शाखा मानावे की नाही याबद्दल त्यांच्यात मतभेद होते. हे शास्त्र इजिप्त किंवा ग्रीसमधून इस्लाममध्ये प्रथम आले. पण संशोधनाच्या इतर अनेक नव्या नव्या विषयांबरोबर या विषयाचाही औत्सुक्याने अभ्यास होऊ लागला. वैद्यकशास्त्रात जशी निश्चित व सर्वमान्य तत्त्वे आढळतात तशी धातुपरिवर्तन किंवा किमयाशास्त्राच्या क्षेत्रात ती कधीच नव्हती असे त्या शास्त्राच्या इतिहासावरून दिसते. अखेर अग्नी, हवा, पाणी आणि माती या चार द्रव्यांपासून सर्व वस्तू बनलेल्या आहेत हा ॲरिस्टॉटलचा सिद्धान्त हा या शास्त्राचा तात्त्विक आधार होता. पारा आणि गंधक या वस्तू खनिजांचा पाया होत असे 'इख्वान अल् साफा'ला आढळून आले. शिसे, कथील, तांबे, पारा किंवा लोखंड यांसारख्या हीन प्रतीच्या धातूंचे सोने किंवा चांदी यांसारख्या मौल्यवान धातूंत परिवर्तन करण्याची किमया शोधून काढता येईल असा किमयागारांचा विश्वास होता. परंतु धातूंमध्ये मूलतःच फरक आहे की केवळ त्यांच्या काही गुणधर्मात फरक आहे यासंबंधीच्या धारणेवर त्या त्या संशोधकाची संशोधन पद्धती अवलंबून राही.

अबु नस्र अल् फाराबी याचे असे मत होते की सर्व धातू एकाच जातीचे असून एका धातूचे दुसऱ्या धातूंत रूपांतर करणे शक्य आहे. अल् तुघराई या दुसऱ्या विद्वानाचे मत असे होते की धातूंच्या गुणधर्मात केवळ योगायोगाने किंवा अपघाताने फरक पडलेले आहेत. मौल्यवान धातू हे निकृष्ट धातूंपासून मुख्यतः कोणत्या बाबतीत निराळे आहेत हे शोधून काढण्यात धातू परिवर्तित होऊ शकतात की नाही याचे गुपित अवलंबून नाही, तर धातूंची मूलभूत द्रव्ये काळजीपूर्वक तयार करण्यावर ते अवलंबून आहे. एकदा आवश्यक ते मिश्रण साधण्यात यश आले की दोन धातूंमध्ये असलेले फरकही योग्य रीतीने निदर्शनास येतील.

या किमयागिरीमागील तात्त्विक भूमिका आणि तिची प्रात्यक्षिके ही दोन्ही खोटी व अप्रामाणिक आहेत असे इस्लाममधील विद्वानांनी स्पष्टपणे म्हटले असून त्यांनी त्यांचा निषेध केला आहे. तरीही आधुनिक रसायनशास्त्राचा उदय होईपर्यंत किमयागिरी अस्तित्वात राहिली. धातूंमध्ये स्पष्ट फरक असून प्रत्येकाची जात दुसऱ्यापेक्षा निराळी आहे असे अविसेन्ना याचे मत होते. त्याच्या मते एका धातूचे दुसऱ्या धातूत रूपांतर करणे अशक्य असून ही किमया करणारे लोक फक्त मौल्यवान धातूसारखे दिसणारे नकली धातू तयार करीत असतात आणि ज्या निकृष्ट धातूपासून हे

मौल्यवान धातू बनविलेले असतात, त्याचे आवश्यक गुणधर्म त्यात कायमच असतात.[१] किमयाशास्त्रात फसवणूक व लबाडी आहे असे मसूदी याचे मत होते. तत्त्वज्ञ अल् किंडी याने एका प्रबंधात या शास्त्राचा निषेध केला होता. निसर्गाच्या कृतींशी-स्पर्धा करण्यास माणूस असमर्थ आहे असे या ग्रंथात दाखवून दिले आहे. इब्ने खाल्दून याचेही असेंच मत होते. किमयाशास्त्राला प्राकृतिक शास्त्रांची शाखा मानण्यासही त्याने नकार दिला. या शास्त्राचा दावा खोटा आहे. त्याच्या मताने एका वस्तूचे अगदी पूर्णपणे निराळ्या वस्तूत रूपांतर करणे शक्य असेल तर ती कला जादूच्या क्षेत्रातील आहे; कारण एखादी वस्तु तिच्याशी अगदी विसंगत अशा साधनापासून तयार करता येते असा त्याचा अर्थ होतो असे मसूदीचे प्रतिपादन होते.

इस्लामी विज्ञानाने आपले सर्वसामान्य सिद्धान्त अधिक प्रमाणात ग्रीक तत्त्वज्ञान्यांकडून आणि त्यापेक्षा थोड्या प्रमाणात हिंदी व इराणी तत्त्वज्ञांकडून घेतले आहेत हे यावरून स्पष्ट होईल. मुस्लिम विद्वानांनी या दोन्ही तत्त्वज्ञांचे सिद्धान्त जसेच्या तसे मान्य केले. तरीही ज्या काळात त्यांच्या कार्याला उत्तेजन मिळाले त्या काळात विज्ञानाचा व्यवहारात उपयोग करण्याकडे त्यांनी सर्व लक्ष केंद्रित केले व अनेक निरीक्षणांचा संचय करून त्यांनी आपले अभ्यास-विषय समृद्ध केले. इस्लामच्या पाचव्या शतकानंतर संशोधनाची प्रवृत्ती कमी झालेली दिसते. कारण या काळात शास्त्रीय जगतातील ज्या नामवंत व्यक्ती मुस्लिम राजवटीच्या छत्राखाली व तिच्या उत्तेजनाने कार्य करीत होत्या; त्या मुसलमान नव्हत्या. ‘ उलेमां ’चा वाढता प्रभाव आणि निरनिराळ्या पंथांतील वाढता हट्टाग्रहीपणा या अवस्थेला बऱ्याच अंशी कारणीभूत असल्याचे दिसते. कर्मठ सनातनी मंडळींना तत्त्वज्ञांचा खटाटोप पसंत नसे. निर्माता सर्वव्यापी आहे अशी निर्मात्याच्या कृतींसंबंधी संशोधनातून ज्यांची खात्री झाली होती असे प्राकृतिक-शास्त्रांचे तत्त्वज्ञसुद्धा सनातन्यांना नापसंत होते. याचे कारण माणूस इतर प्राण्यांपेक्षा निराळा नाही; त्याचा आत्मा त्याच्या शरीराप्रमाणेच विनाशी आहे आणि त्याचे पुनरुज्जीवन होत नाही या प्राकृतिक शास्त्रज्ञांच्या प्रतिपादनास सनातन्यांचा विरोध होता. त्यामुळे या कर्मठ सनातन्यांनी प्राकृतिकशास्त्रज्ञांवर पाखंडी म्हणून शिक्का मारला. जो मुसलमान तत्त्वज्ञानावर आपले लक्ष केंद्रित करतो

---

१. Avicennae de Congelationae et Conglutinatione Lapidum ( Kitab al–Shifa [ ed E. J. Holmayard, Paris, 1927 ] ) या पुस्तकातील पान ९५ वरील एक उतारा. तरीही धातुपरिवर्तनशास्त्र ( किमयाशास्त्र ) ही प्राकृतिक शास्त्रांची एक शाखा आहे ही गोष्ट अविसेन्नाला मान्य होती. खनिजांचे म्हणजेच धातूंचे विशिष्ट स्वरूप बदलून व त्यांना दुसरे रूप देऊन अखेर इतर धातूंपासून सोने व चांदी निर्माण करणे हा किमयाशास्त्राचा उद्देश आहे असे अविसेन्नाने म्हटले आहे.

त्याला खरा मुसलमान मानता येईल[1] की नाही याबद्दल त्यांना शंका होती. म्हणूनच 'इल्म'ची शास्त्रीय बाजू धार्मिक बाजूपासून नेहमी अलग ठेवण्यात आली; आणि दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न झाला नाही.

धर्मावर खरी श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीने धर्म आणि निसर्गातले चमत्कार यामागील सत्याचा शोध घेणे हा आपल्या कर्तव्याचा भाग आहे असे मानणे आवश्यक आहे काय या प्रश्नाची चर्चा गझाली याने केली आहे. त्याने चर्चेच्या प्रारंभी दोन 'हदिसे' उद्धृत केली आहेत. ज्ञान मिळविणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे असे पहिल्यात म्हटले आहे, तर दुसऱ्यात पूर्णत्वाकडे जाण्याचा उपदेश आहे. ज्ञान, मग ते चीनमधील असले तरी ते मिळविले पाहिजे असे या दुसऱ्या हदीसात आवाहन केले आहे. अडचण आहे ती 'इल्म'च्या व्याख्येची. सनातनी धार्मिक विद्वानांच्या मते 'इल्म'चा अर्थ 'कलाम' असा आहे तर फकींच्या मते त्याचा अर्थ 'फिकाह' असा आहे. सुफीपंथीय तर 'सुफीवाद' म्हणजेच 'इल्म' असे समजतात तर अबु तालिब अल् मक्कीच्या[2] मते 'इल्म' म्हणजे इस्लामच्या पाच मूलभूत गरजा पुऱ्या करणारे ज्ञान.

या प्रश्नाविषयी निर्णायक असे आणखी काहीही न सांगता, गझाली म्हणतो की धर्माने सांगितलेली आवश्यक कर्तव्ये पार पाडण्यास जे ज्ञान उपयोगी पडते तेच ज्ञान माणसाने मिळवावे. त्याने ज्ञानाच्या निरनिराळ्या अंगांचे वर्गीकरण केले आहे. शरियतशी संबंधित असा एक व संबंधित नाही असा दुसरा असे त्याने ज्ञानाचे दोन भाग पाडले आहेत. पैगंबरांपासून मिळालेल्या सर्व शास्त्रांच्या ज्ञानाचा समावेश पहिल्या वर्गात आहे. गझाली म्हणतो, जसे बुद्धीने गणिताचे, अनुभवाने वैद्यकाचे किंवा श्रवणाने भाषेचे ज्ञान मिळविता येते, तसे पैगंबरांपासून मिळालेल्या शास्त्रांचे ज्ञान प्राप्त होत नसते. त्याने दुसऱ्या वर्गात बाकीच्या सर्व ज्ञानाचा समावेश केला आहे. या ज्ञानाचे पुढील तीन भाग पाडण्यात आले आहेत : ज्याबद्दल शिफारस केली आहे असे; जे घेण्याविषयी तीव्र नापसंती दर्शविलेली

१. उदाहरणार्थ, 'प्राचीन विद्वानांच्या शास्त्रां'चा अभ्यास केलेल्या अब्द् अल् सलाम याच्यावर पाखंडी असल्याचा आरोप करून त्याची पुस्तके सार्वजनिक जागी जाळण्यात आली. आणखी एक उदाहरण उमर खय्याम याचे. "तो ग्रीकांचे शास्त्र शिकवीत असे." सनातन्यांच्या मते त्याच्या ग्रंथांचा गर्भितार्थ "शरियतला सर्पांनी दंश करावा तसा होता." परंतु 'मुस्लिमांचा डॉक्टर' म्हणून ओळखला जाणारा ऱ्हाजेस व मुस्लिमांचा तत्त्ववेत्ता (धार्यू मुदाफा) म्हणून समजला जाणारा अल् फाराबी हे दोघे मात्र 'आक्षेपार्ह नाहीत' असे कर्मठ सनातन्यांचे मत आहे. कारण यापैकी अल् फाराबी 'दैवी प्रेरणा' (वाही) ही तत्त्वज्ञानाहून वेगळी आहे असे मानतो.

२. मृत्यु : ९९६ 'कुत अल्-कुलब' हा त्याचा सुफीवादावरील ग्रंथ प्रख्यात आहे.

आहे असे; आणि जे घेण्यास परवानगी दिलेली आहे असे. जगाच्या कल्याणाशी संबंधित अशा वैद्यक, गणित वगैरे ज्ञानशाखा पहिल्या भागात येतात. या वर्गातील प्रत्येक शास्त्र जमातीमधील एकाने तरी शिकलेच ( म्हणजे ते फर्ज अल् किफाया आहे ) पाहिजे. बाकीच्यांना त्यातून वगळण्यात आले आहे. पशुसंगोपन, विणकाम, पशूंना माणसाळविणे, शिवणकाम वगैरे प्राथमिक कलांचाही समावेश याच वर्गात केलेला आहे. पण गणिताच्या बारीक तपशीलाबाबतचे खोल :संशोधन आणि वैद्यकाच्या नियमांचे संशोधन अनावश्यक व वरकरणी आहे असे मानण्यात आले आहे; कारण त्याचा ताबडतोबीच्या व्यवहारात काही उपयोग नाही. जादू, ताईत, हातचलाखी यांसारख्या कलांबद्दल तीव्र नापसंती दर्शविण्यात आली आहे. कारण या कलांचा खरेपणा ठरविण्यासाठी अल्लाहपेक्षा इतर शक्तींवर भिस्त ठेवण्यात येते असे गझाली म्हणतो. परवानगी दिलेल्या ( याचा अर्थ या कलांच्या प्रत्यक्षातील उपयोगाविषयी इस्लामी धार्मिक कायद्याने काहीही सांगितलेले नाही. ) कलांमध्ये काव्य आणि इतिहास यांसारख्या विषयांच्या अभ्यासाचा समावेश आहे.

तत्त्वज्ञान्यांकडून घेतलेले सर्व ज्ञान खोटे आहे असे सांगण्यात आपण इस्लामची सेवा करीत आहोत असा इस्लामच्या कट्टर अनुयायांचा दावा होता. चंद्र-सूर्याच्या ग्रहणांबद्दलचे ज्ञानही नाकारण्यापर्यंत या कट्टरपंथीयांची मजल गेली आहे असे गझालीने अल् मुनकिध मिन अल् दलाल ( चुकांपासून मुक्ती देणारा ) या आपल्या आत्मचरित्रात्मक पुस्तकात सूचित केले आहे. आकाशातील ग्रह आणि तारे, चंद्रगोलाखाली असणारी मूलभूत द्रव्ये, पाणी, हवा, माती व अग्नी आणि त्यांच्यापासून उत्पन्न झालेले प्राणी, वनस्पती व खनिजे आणि त्यांच्यांतील बदल व एकीकरण यांचा अभ्यास करणे एवढेच फक्त ' प्राकृतिक ' शास्त्रांचे कार्य आहे या मतास गझालीचा विरोध आहे. ' तहाफूत अल् फलासिफा ( तत्त्वज्ञांचा गोंधळ ) या पुस्तकात दिलेल्या विशिष्ट प्रश्नांचे अपवाद वगळता वैद्यकशास्त्र निषिद्ध आहे असे ज्याप्रमाणे धर्म सांगत नाही त्याचप्रमाणे प्राकृतिक शास्त्रेही धर्माने निषिद्ध ठरविलेली नाहीत. निसर्ग हा अल्लाहपेक्षा कनिष्ठ आहे; तो स्वतःच्या बुद्धीने नव्हे तर आपल्या निर्मात्याच्या सूचनेनुसारच कार्य करीत असतो याचे ज्ञान सर्वांना देणे हाच सर्व शास्त्रांचा मूळ उद्देश आहे. गझाली म्हणतो की तत्त्वज्ञांनी सांगितलेल्या प्राचीनांच्या कल्पनांपैकी काही कल्पना कोणाच्याही मनात उत्स्फूर्तपणे येऊ शकतील अशा आहेत, तर बाकीच्या कल्पना शरियत संबंधीच्या पुस्तकांतून आढळतील, तर उरलेल्या बहुतेक कल्पनांची तत्त्वे सुफींच्या पुस्तकांत आढळतात. समजा, ती तशी आढळत नसली तरी त्या कल्पनांत अनुस्यूत असलेला विषय बुद्धीला पटणारा असेल, युक्तिवादाने सिद्ध करण्यासारखा असेल, कुराणाविरुद्ध किंवा सुन्नाविरुद्ध नसेल तर त्याचा निषेध करण्याची किंवा त्याला बंदी करण्याची आवश्यकता नाही. सर्व प्राचीन सत्ये फेटाळून लावायची तर मग केवळ इखवान अल् साफाने त्यांचा उल्लेख केला म्हणून

खुद्द कुराण, पैगंबरांच्या परंपरा आणि प्रमाणभूत ऐतिहासिक साधने ही सुद्धा नाकारावी लागतील. असेही म्हणता येईल की इखवानप्रमाणेच जे इतर लोक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत असतील त्यांच्या हातूनही चूक होण्याचा संभव आहे; कारण आपले म्हणून ते जे तत्त्वज्ञान सांगतात त्याची ते प्रेषिताने व सुफींनीं सांगितलेल्या ज्ञानात भेसळ करतात. आणि नंतर सत्यात अशा प्रकारे असत्याची भेसळ झाल्याची चूक ते कबूलही करून टाकतात. म्हणून या तत्त्वज्ञांची पुस्तके वाचण्यास कोणास सांगता कामा नये.

मात्र ज्ञानाशी संबंध नसलेल्यांच्या संशोधनाची दखल घेऊ नये असे गझालीचे मत होते. त्याच्या काळातील शास्त्रीय विचारांचा त्याला स्वतःला पूर्ण परिचय होता व त्यापैकी बराच भाग सत्य म्हणून त्याने मान्य केला होता. 'तहाफूत' या ग्रंथात नैसर्गिक शास्त्रांच्या निरनिराळ्या शाखांचे स्पष्ट विशदीकरण केलेले असून, यांपैकी आपणास, काय मान्य व काय अमान्य आहे हेही लेखकाने सांगितले आहे. काही तत्त्वज्ञांची काही मते (अल्-फाराबी आणि इब्ने सीना यांचा त्याने नाव घेऊन खास उल्लेख केला आहे.) इस्लामच्या तत्त्वांशी विसंगत नाहीत. तेव्हा त्या मतांना प्रेषितांची किंवा धर्मप्रचारकांची मान्यता मिळण्याची आवश्यकता नाही. अशा मताचे एक उदाहरण म्हणजे सूर्यापासून चंद्राला प्रकाश मिळतो, पण सूर्य आणि चंद्र यांच्यामध्ये पृथ्वी आल्यास हा प्रकाश अडला जाऊन चंद्राला ग्रहण लागते हे मत. या किंवा अशाच प्रकारच्या इतर मतां-विषयी शंका न घेता ती मान्य करावीत, कारण गणिताने ती सिद्ध करता येतात.

आपणास काय मान्य आहे याची नोंद करताना गझालीने त्याच्या काळातील शास्त्रीय अभ्यासाच्या विषयांचा सारांश दिला आहे. इखवानचे विषय आणि हे विषय यांत फारसा फरक दिसत नाही. ॲरिस्टॉटलच्या पदार्थविज्ञानाची सर्वसामान्य तत्त्वे (गती, बदल यासंबंधीच्या कल्पना वगैरे), आकाशाची रचना, चार मूळ घटक, नैसर्गिक गुणधर्म, उत्पत्ती आणि विनाश (भ्रष्टता), ढग, पाऊस, मेघगर्जना यांसारख्या हवामानविषयक घडामोडी ज्यामुळे होतात त्या घटकांची परिस्थिती, खनिजे, वनस्पती व प्राणी यांचे गुणधर्म, प्राण्यांतील चैतन्य व आकलनशक्ती, शरीराच्या मृत्यूबरोबर माणसाचा आत्मा मरण पावत नाही, तो चैतन्याचा अंश आहे वगैरे विषयांचा त्यात समावेश आहे.

हे मुख्यविषय असून, त्यांचे आणखी उपविषय पाडण्यात आले आहेत. या उप-विषयात शास्त्रांच्या शाखांचा समावेश असून त्यांत वैद्यकाचा पहिला क्रम आहे. मानवी शरीराचे आरंभापासूनचे ज्ञान, निरोगी व आजारी असतानाची स्थिती, आजाराची कारणे व लक्षणे आणि ती दूर करून शरीराचे आरोग्य चांगले राखण्याचे उपाय हे वैद्यकाचे उद्दिष्ट होय अशी व्याख्या करण्यात आली आहे. दुसरा उपविषय न्यायज्योतिष. ग्रहांच्या जागा व युती यावरून पृथ्वीवरील घटनांचे भाकित वर्तविणे हा या शास्त्राचा उद्देश आहे. तिसरा विषय मुखसामुद्रिक. माणसाच्या शारीरिक गुणविशेषांवरून त्याच्या स्वभावाचे

निदान करणे हा या शास्त्राचा उद्देश आहे. चौथा विषय स्वप्नांचा अर्थ. पाचवा विषय ताईत. दैवी शक्तींचा प्रभाव पृथ्वीवरील काही वस्तूंवर पाडून त्यातून अशी शक्ती निर्माण करावयाची की जी पृथ्वीवर अपरिचित असे कार्य करील. सहावा विषय पांढरी जादू. या जादूने पृथ्वीवरील आवश्यक द्रव्यांचे अशा पद्धतीने मिश्रण केले जाते की त्यातून अपरिचित वस्तू निर्माण होतात. सातवे व शेवटचे शास्त्र किमयेचे. खनिज द्रव्यांचे रूप बदलून व निरनिराळ्या तंत्रांचा अवलंब करून सोने व चांदी निर्माण करणे हा या शास्त्राचा उद्देश आहे.[1]

या नैसर्गिक-शास्त्रांना गझालीचा विरोध नाही. तत्त्वज्ञांशी त्याचा वाद आहे तो अधिक व्यापक व आध्यात्मिक प्रश्नांवर. त्या प्रश्नांची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. 'तहाफूत' या ग्रंथात पुढील चार गटांमध्ये या प्रश्नांचा समावेश केला आहे : (१) जगातील चमत्कृतींमध्ये जो कार्यकारणभाव दिसतो तो आवश्यक आहे. कार्याशिवाय कारण आणि कारणाशिवाय कार्य आढळण्याची शक्यता नाही, हा तत्त्वज्ञांचा निर्णय. (२) मानवी आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व असते ही तत्त्वज्ञांची ठाम भूमिका. (३) मानवी आत्म्याचा विनाश अशक्य आहे हे तत्त्वज्ञांचे विधान. (४) मृत्यूनंतर मानवी आत्मा शरीरात परत येत नाही.

इस्लामच्या इतिहासाच्या पाचव्या शतकात गझालीने घेतलेल्या भूमिकेपासून सनातनी इस्लाम ढळलेला नाही. पण व्यक्तिशः काही मुस्लिमांनी धर्मशास्त्राच्या विद्वानांच्या सिद्धान्तांपेक्षा आपापल्या काळातील शास्त्रीय संशोधनाचे निष्कर्ष मान्य केले आणि आपल्या कार्याने विज्ञानाच्या इतिहासात मान्यतेचे स्थान मिळविले.

□ □

---

१. अविसेन्ना याच्या व्याख्येला येथे पुष्टी मिळते असे दिसते.

# विषयसूची

[ नावामध्ये असलेले 'इ.' हे इब्नेचे संक्षिप्तरूप आहे ]


अकबर बादशहा ४०
अकलाख ई नासिरी २३६–३९
अबलावी ३८१
अजनाद अल् हल्का
अझरबैझान १३, ३७९, ४१९
ॲड्रिआनोपल ३३, ३६
अत्तार फरीद अल्दीन १३३, २४३
अतातुर्क १३०
अताबेग ( सुलतान ) ७२
अदा २५५ ( 'उर्फ' ही पहा )
अदुद अल् दावला ३३३, ३९०
अधिकारी ( विभिन्न राजवटींतील )
—बुवेहिद ३८९–३९०
—फातिमी ३९९–४०२
—गझनवी ३८९
—मामलुक ४०६–४०८
—मूर ( स्पेनमधील ) ४१४
—ऑटोमन ४०८–४११
—सफावी ३९०–३९२
—समानी ३८८
अधिकाऱ्यांचे पगार ३३९
अन्न ( धर्मसम्मत व असम्मत ) १५८, १६४, १७६, १७८–१७९, १८८, १८९, २५५, २५८
अन्सार ५५, ६३, २८१, ४१७
ॲन्टिऑक १०, ११
अनातोलिया ३३, ४११
अनाथ मुले १४१, १४४
अफूचे सेवन २४८
अब्काझी ३८ ( टीप )
अब्बासी लश्कर ४२३, ४२५, ४२९, ४३७
अब्द् अल् अझीझ ( ऑटोमन सुलतान ) २७६
अब्द् अल्लाह इ. अमीर ३७३
अब्द् अल्लाह इ. खासिम ३७३
अब्द् अल्लाह इ. झुबैर २८९
अब्द् अल्लाह इ. ताहिर ३८७
अब्द् अल् मलिक इ. मारवान ३१०, ३१३, ३७५
अब्द् अल् लतीफ अल् बगदादी ५०३
अब्द् अल् रहमान, तिसरा (कॉर्डोव्हाचा) २८, २९२, ३८२
अब्दुल्ला, मुहम्मद १०१
अब्बास ( पैगंबरांचा चुलता ) २८८
अब्बासी खलिफा ५९, ६३, २९०, ३००, ३१४, ३६२, ३७७, ३८०, ३८३
अब्बासी लश्कर ४२२, ४२५-३०, ४३७
अब्राहमचा धर्म २६०
ॲबिसीनिया ४६
अबु अली दक्काक २२१
अबु अल् अला अल् मारी २४५–२४७
अबु धार २०७
अबु नुवास २५९

अबु बकर ( खलिफा ) २, ६, ७, ५५, ६६, १३१, १७४, २८६, २९५, ३७१, ४१८
अबु बकर ( तुर्तुशी ) ४४१
अबु युसुफ १७१, १७२, ३०६, ३१८, ३२०, ३५३
अबु सलामा ३४०
अबु सुफायान ४१७
अबु सैद इ. अबील खैर २१९
अबु हनीफ १६९–१९६
अमर इ. अल् आस १५, १७, ४१९
अमर इ. लैथ सफ्फार ३८४, ३८७
अमिद अल् मुल्क ३८८
अमील ३७१–३८०
अमीर २६६, २७०, ३५५, ३७१–३८०
अमीर अल् उम्रा ( म्दा ) ३४१
अमीर अल् जुयूश ३९९
अमीर अल् मुमिनिन ३८२–३८३
अमीर अल् मुस्लिमीन ३८३
अमोरियम ४२६, ४३८, ४४६
अय्युबी ३८२
अरबस्तान १–५, १७३, १८५, १८७, २५८, ३७१, ३७८
अरबस्तानांतील स्त्रिया १२८, १२९, १३१, २५५, २६०
अरब व अजाम ५८–५९
अरब मोहिमा १४, २१
अरबी आकडे ५०१ ( टीप )
अरबी भाषा ४, ३७, ४७, १५२, ३७५, ४५९, ४६६
अरबी टोळ्यांच्या प्रथा २५०, २५३, २५५, २५६, २५९, २६६, २८१–२९१, ४१७
अरबी टोळ्यांतील वैमनस्य ४३४,
अरबी लिपी ४, १५४
अरबी समाजाची रचना ५१, ७१, १३३, २७९–२९१
ॲरिस्टॉटल २३४, २३८, ४७२, ४७४, ४७५, ४८१ ( टीप ), ४८९
ॲरिस्टॉटल प्रणीत मध्यबिंदूचा सिद्धान्त २२४, २३३
अरेबीयन नाइट्स २४१–२४३, २५८
अल् अझहर विद्यापीठ ३५२
अल्बानिया ३४, ३७ ( टीप )
अल्लाउद्दिन खिलजी २७०, ४१५
अल्मोरावी २९, ३८२
अल्मोहद २९
अल्लाह १, १५१, १९७–२००, २११–२१८, २८२
अल्लाहसंबंधींची कर्तव्ये २०९
अलामुत २३२
अलीद २४, ६३, ३८१
अली इ. अबी तालिब ( खलिफा ) २०८, २८६, ३६२
अली इ. ईसा ३१७, ३२३, ३३८, ३४१ ( टीप ) ४४०
अली जाहम १३८, ३६२
अलेक्झांड्रिया ४५८, ४६४
अवक्फ ( 'वक्फ 'चे अनेकवचन ) १४१, १९०, २१०, २६९, ३६३
अवासिम ११, ४४४
अविसेन्ना ( ॲव्हिसेन्ना ) २३१, २६१, ४६५, ४७५, ५०४, ५०५ ( टीप ), ५०९ ( टीप )
अश्रफ ६३, ६६
अश्र ( धर्मादायकर ) ६३, १६१–१६२, १९१, ३०५, ३१४, ३१९,

३२४, ३५४
अश्लील काव्य २३५
अशाब अल् मसाइल ३५८
अशारी अबु मुसा १२, १८०, २८४
अशारी अबु हसन १६८, २१२
अस्पृश्य ४१
असत्य कधी बोलता येईल? २०६, २२७
अहकाम अल् सुलतानिया २९३–३०४ (सर्वत्र)
अहदात ३९८, ४०२, ४१५
अहल १३५

ऑक्सस नदी २१
आखिया (भ्रातृसंघ) ८८
आगाखान ४१
ऑ २८०
ऑझे १८६
ऑटोमन सुलतान १४७
आत्महत्या २१४
आत्मा २१८, २२३, २२४, २३१, २३३, २३६, २३८, २४७, ५०९
आदब २४३–४४, ४६७
आधान १६०, ३४७
आफ्रिकेत इस्लाम ४५
आफ्रिका (उत्तर) १७, ३४, ४७, ३५१, ३७३, ३७८, ३८१, ३८२, ४५८
आफ्रिका (पश्चिम) ४८
आफ्रिका (पूर्व) ४५
आर्मेनिया ९, ४२०
आयेषा (पैगंबरांची पत्नी) १३२, १७४–१७५
आयेषा इ. तल्हा ९३
आरादी सानिया ३१५
आल्प आर्सलान (सुल्तान) ३२, ३११, ४३२
आशिया (अतिपूर्व) ४३
आशिया (उत्तर) ४३
आशिया (मध्य) २३, ४२, ८७, ८९, १२९, १८६
आशिया (मायनर) ९, १०, ३२, २५९, ४२६, ४३२
ऑस्ट्रिया ३५

इक्तात ४२२
इक्तिलाफ १८७
इख्वान अल् मुस्लिमीन ८९
इख्वान अल् साफा ४७६–५००, ५०४, ५०८
इज्मा १७१–१८७, २९७, ३००
इज्तिहाद १८६, ३५३, ३५५
इजिप्त
—अब्बासी खिलाफतीमधील एक प्रांत ३७८
—फातिमींचे शासन ४०१
— आक्रमणासाठी एक तळ २६, ४५७
— सिव्हिल कोड १९०
—समाजातील वर्ग ६६
—नाणी ३०२
—फातिमींची राजवट ३८२, ४५८
—इस्लामच्या मोहिमा व विजय १५, ४१९, ४१९
—न्यायव्यवस्था ३५१, ३६४
—मामलुक सुलतान ३८२, ४५४–४५६

—विवाहविषयक कायदे १००–१०१, १०६–१०७
—पोलीस ३४४
—प्रांतिक अधिकारी ३७२–३७७
—तोतया खलिफा ४०७
—महसूल ३२६, ४०२
—शार व उर्फ २६९
—तुर्की प्रांत ४१४
—पुतळे २६१
—उमाय्यद प्रांत ४२२, ४५७
—व्याजबट्टा २६४
—स्त्रियांचा पडदा १२९
इटली २७, ३४
इतिमाद अल् दावला ३९१
इद्दा १०६ (टीप)
इद्दत ३४८
इद्रिस इ. अब्द् अलाह ३८१
इद्रिसी ३८१
इफ्रिकिया १७, ३८१
इब्राहिम इ. अघलाघ ३८१
इब्राहिम पाशा २६१
इब्राहिम इ. अल् माहदी ६२
इब्राहिम अल् हलाबी २७६
इब्ने अल् असीर ३१५
इब्ने कुतैब्र २४३, ३६०
इब्ने खाल्दुन ५२, ५८, २४२, २९४, ३०७, ४५९, ४६३, ४६४ (टीप), ५०२, ५०५
इब्ने अल् फुरात ३४१ (टीप)
इब्ने बतुता ४२, १२८
इब्ने मिस्कावाहयी २३२–२३३
इब्ने सौद १८५
इब्ने हाजम २१३–२१५, ४६४, ४८२
इमाम २६२, २८६, २८७, ३०४, ३४३
इमाम (बारा) ६८, १८५, २९८
इमाम (सात) २९८
इयालात ३९३, ४१४
इर्हाब ३६३
इराक–
—मुस्लिम विजय ८, १२, ३१९, ४१८
—राजे ६६
—उमाय्यदांचा प्रांत २१, ३७४
—झांज बंडखोर ४२८
—अब्बासींचा प्रांत ३१५–३१६, ३४०, ३७७
—पाटबंधारे ३११–३१२
—इराकींच्या इराणातील वसाहती ४१९
—हनफी मजहब १७३
—पोलिस दल (शुर्ता) ३५०
—महसूल व्यवस्था ३२४–३२७, ३७५
—पवित्र मंदिरे २५८
इराण १२
—अब्बासींचा प्रांत ३७८
—प्रौढत्वाचे कायदेशीर वय १४२ (टीप)
—बारीद पद्धती ३०९
—पंचांग ३२२
—खिलाफत व राजे ३८३
—समाजातील वर्ग ६७–६९
—रूढीगत कायदे २७०–२७३
—सुभेदार ३७८, ३८४

—खिलाफतीमधील स्वतंत्र राजे ३८३–३९९
—इस्लामचा विजय ६, ८, ११–१४, २२, २५, ४१८–४२०
—मंगोल ३२
—राष्ट्रवाद ३८३, ३८६
—चित्रकला व मूर्तिकला २६१
—महसूल व्यवस्था ३९७–३९९
—शिया पंथ १८६, १८७, २९८, ३८३, ३८७, ३९८
—पवित्र वास्तू २५८
—मद्यपान २५८
—स्त्रियांचा दर्जा १०१, १०७, १०९, ११७, १२४, १२९, १३८, २७४
इराणी—
—मवाली ('आश्रित') ५८
—फारसी भाषा– प्रार्थनेची १८८
—फारसी भाषा–महसूल आकारणीच्या रजिस्टरची ३७५
इराणी आखात ११, १८७
इल्तिझाम ३२६ (टीप)
इल्म ४६३, ५०६
इल्म अल् फराइद १४५ (टीप)
इलिझाबेथ राणी, पहिली २७१
इस्फहान १८७, ३९७
इस्तिब्रा १०६ (टीप)
इस्तिहसान १७१, १८३
इस्पितळे ३१२
इसागॉज ४८९
इस्लाम —
—प्रारंभिक व्याप्ती ४
—व्याख्या व शिकवण १, १९७–२०१, २६०
—आणि ग्रीक तत्त्वज्ञान ४६३–४६५, ४७१–५०९
—इस्लामी आदर्श २०४, २४८
—आणि इतर धर्म ३, २०–२१, ३४, ४२–४३, ५४–५५, २८०
—इस्लामधर्म स्वीकारण्यासाठी अट २४
—प्रचार ३९–४२, ४५, ४८, ३२०
—लैंगिक संबंधविषयक सुधारणा १९८
—पापकृत्यांसंबंधींची कल्पना २०४
—टोळी (जमात) जीवनातील सुधारणा २८३
इस्माइल इ. अहमद (समानी) ३८४
इस्माइली समाज ४१
इहराम १२९
इहलोकवादी मुस्लिम राजे ६६
इहसा अल् उलूम ४७४

उदुल ३५७
उपवास १६२, १८८
उर्फ १९०, २००, ६ व्या प्रकरणात सर्वत्र, २९५, ३४५, ३५५,
उर्फी २५५, २६९
उबैद अल्लाह (फातिमी) ३८१
उबैद ई झाकानी २४७
उमर पहिला (खलिफा) ५, ७, ८, ११, १३, १५, २१, ५५, २८६, २९५, ३०८, ३५१, ४१८, ४२१, ४३४, ४५७
उमरचा जाहीरनामा ६४
उमर दुसरा (इ. अब्द् अल् अझीझ) १०, २३, ३२१, ३५५
उम्म वलाद ७६–७९, २१०, २५४

उम्मा ( मुस्लिम समाज ) २५०, २७९–२८४, ३४२ ( 'राज्यसंस्था' ही पहा)
उमान ३७३
उमाय्यद (उमय्या) खलिफा (पूर्वेकडील) २८७–२९०, ३०३, ३०८, ३१४, ३५१, ३६२, ३७२, ३७७, ४४९
उमाय्यद खलिफा (स्पेनमधील कॉर्डोव्हाचे) २८–३२, २९२, ३७७, ३८२
उमाय्यदांचे लष्कर ४२२–४२४, ४४०
उयून अल् अखबार २४३
उलूम अल् आजम ४६५, ४७०–५०२,
उलूम अल् अरब ४६५–४७०, ५०१
उलेमा ६७, ६९, २७२, ३०६
उहूदची लढाई ९६, ४१७
उश्र ( अश्र ) ३१४, ३१९, ३२४
उस्मान ( खलिफा ) १३, २८६, २९५ ३६१,३७२,४२१,४५७

एजिअन बेटे ३४,३६
एलियन ४६२

ओमान ८, ८४
ओलेरियस २७२, ३९१
औषधे ५०९

क्वाहीर ( खलिफा ) ३६२
कजर वंश ६९, ३९३
कर्तव्ये ( सामाजिक ) २२९
कताई जमिनी ३२७
कपुदान पाशा ४१०
कफारा २०७
कबाबिश ९७, १०८, १४६
कॅमकॉनचा वेढा ४४७
करबला २५८, २६६, २८९
कर आकारणी ( मुस्लिमांवर ) ५७–५८ ( जकातही पहा )
कर आकारणी ( बिगर मुस्लिमांवर ) २३, २९ ( 'जिझिया'ही पहा )
कर ( महसूल ) आकारणीच्या नोंदवह्यांची भाषा ३७६
कर वसुलीचे ठेके ३२५
करमाती ४२८
कलाऊन मन्सूर ४५४
कलाम १५१, ४६७, ५०१
करादी ४३८, ४४०
काइम ( खलिफा ) ३८५
काईफ १३६
काझीमायन २५८
काझी—
—नेमणूक, कर्तव्ये इत्यादी १०८, १०९, २५४, २७०–२७२, ३०८, ३४५, ३५०–३६४; ४३५
—वेतन ३६०
काझी अल् अस्कर ३५१, ४१०
काझी अल् कुदात ३५१
काझी अल् झामा ३२१
काझी अल् झुंड ३५१
कार्थेज १७
कादिर ( खलिफा ) २९२, ३०२, ३८५, ४४१
कादिसिया ८, १२, ४१८, ४३९
कानून २७४–२७६
काफीझ ३२४,
काफूर ( इक्शिदि ) ३८२
काबा २, २५८, २६६
काबुल १४
काबुसनामा ६८, २५९

कामथियन ७३
कायदे (नागरी) २७४
कायदेशीरपणा (गुलामांच्या मुलांबाबत) ६२
कायदे करण्याची पद्धत : प्रकरण ४ सर्वत्र
काल्पनिक कायदे २६४
कायदे शिक्षण शाळा २५
कायद्याने दिल्या जाणाऱ्या सजा ३४२–३४३
कायद्याच्या कार्यवाहीची कार्यप्रणाली ३५५–३५९, ३६१
कायद्यांची वर्गवारी १५१, १९०, २०९
कार्लोविट्झ ३५
काश्गर २३, ४४९
काश्मीर ३१, ४१
कास्पियन समुद्र १३
कॉर्डोव्हा २८–३०
कॉन्स्टॅन्टिनोपल ९, ३४, ३६, ४०९, ४२०, ४४९, ४५८
कॉप्ट्स (कब्ती) १६, ३२३, ३७६, ४०७, ४५८
कॉप्टिक भाषा ३७६
कॉसोव्होची लढाई ३३
किर्घीझ ४३
किझिलबाश २५९
किंडी ४७२, ५०५
किताब अल् खराज ३०६
किताबत अल् खातम ३३८
किताबत अल् रझाईल ३३८
किब्ला ४, १५९, १६१, २१३
कियास १६८–१७८ (सर्वत्र), १७९
क्रीट २५, ३७
क्रीमिया ३४, ३६
कुतैब इ. मुस्लिम २१, २२–२४, ५६, ४३७, ४४९
कुर्द १२९
कुन्या ५७
कुफ्र २०९, २१४
कुफा १२, १३, २५, ६३, २८७, ३३४, ३७२, ३७३, ४१९, ४३७, ४६६
कुबलायखान ४४
कुम्म ३२२
कुमारिकांचे विवाह ११०, ११५, १२४, १४४, १८४
कुराण—
—घडण, विषय वगैरे ३, १५१, प्रकरण ४ (सर्वत्र), १९७–१९८, २३७, २४८, २६१–२६२, २८४–२८५, २९७, ३०४, ४६४
—विश्वविज्ञान ४६७–४६९
—व ग्रीक नीतिशास्त्र २३१
—चित्रमय २६१
—धर्मग्रंथातील कथा १५५
—नैतिक मूल्यांची शिकवण १९८–२०१
—भाष्य २५, ४६५–४६६
—भाष्यकार १३१
—पठण १८८
कुरेश-कुरेशी २, ५२, ५४, ६१, १२५, १३९, १७९, २५०, २८०, २८५ २८८, २९४, ३००, ३४२, ४३८
कुशायरी २१९
केडखुदा ३९५
केंद्रिय शासनव्यवस्था ३०८–३७०
कैरवान १७
केरक ४४७

कैदेची (तुरुंगाची) शिक्षा ३६९-३७०
कैनारजी ३६
कैरो ३५१, ३६५, ३९९, ४५८
कौमार्यभंग (जाहीरपणे) १२४

खगोलशास्त्र ४७९-४८९, ५०२
खझराझ २८०,
खनिजे ४९२-४९४
खय्याम उमर ५०६
खराज (खिराज) १४, २४, ५७, ३२०-३३६, ३५४
खारीजी ४७, २८७, २९९, ३०३, ४२१, ४४०
खलिफा ५, २८६-३०९, ३८१
—व सैन्य ४३०-४३३
—लौकिक व आध्यात्मिक कर्तव्ये २५, २८६, २९३-२९६, ३०२-३७० (सर्वत्र), ३७७
—विशेषाधिकार ३०१-३०३
—तोतये ४०७
—पात्रता २९५
—अपात्रता २९४
—ची माता १३४
—एकापेक्षा अधिक २८७, २८९, २९६
—निवड २९५-२९६
खाजगी मालमत्ता ३१५, ३१६
खातमिया ८९
खादिजा (पैगंबरांची पत्नी) ९५
खान ३९०
खानांची (मध्य आशियातील) राज्ये ४३
खालिद (इ. अब्द् अल्लाह) कासरी ३७४, ३७५
खालिद इ. वालिद ६-८
ख्वाराझ्म २०, ५०१
खिलजी तुर्की ४०
खिलाफत १४७, २६१-३७० (सर्वत्र) ४०७
—शेवट ३८३, ३८६
—जमीनव्यवस्था ३१४
—वारसदार २८६-२९०, ३८५
—ची तत्त्वे २९३-३७०
—ऑटोमन २७६-२७८
खिश्चनधर्मीय व इस्लाम ३, ६, ९, १६, २६, २९-३१, ४६, ६४, १८८, २७५, ३२१, ३५५, ३९८, ४०१, ४१३, ४५६
खुत्बा २५, ३०१, ३८१, ३८३, ३८४-३८६, ४१३
खुरासान १३, १५, २०, २१, २४, ३२, ३०२, ३०५, ३२१, ३७३, ३७५, ३८३, ३८६, ३९४, ४२३, ४४९
खुरासान राष्ट्रीय मार्ग १२, १३, ३१०
खुनाची सजा २७३, २८२, ३४२

गझनी ३२, ३९, ३८३, ३८५
गझनवी ७२, २७०, ३९२
गझाली २०३-२०५, २१०, २२२-२३०, २६७, ३०१, ४७८, ५०६-५०९
गणितशास्त्र (अंकगणित) ४७८, ५०१
गनिमा ३१८
गरिबांविषयीचा कायदा ३०८
गॉल १९
गालेन ४७२, ५०३

ग्रीस व ग्रीक—
—करआकारणी रजिस्टरची भाषा ३७५
—तत्त्वज्ञान व इस्लाम ४६१–४६३, ४७०, ४७४–५०२, ५०५, ५०८
—आणि मुस्लिम २५, २६, ३६, ३७, ३७५, ४५७
गुजरात ३९
गुदामैथून १०५, २४२
गुण (चांगले) १५५, २०४, २०८ २३३, २४७
गुन्हे–अपराध (दंडपात्र) १९४
गुलाम
—गुलामाला कुटुंबात घेणे ७५
—लष्करी सेनापती ४३३
—मिळणारी वागणूक २२९,३०८
—मुक्तता ७९
—खच्चीकरण ७५
—विवाहः गुलामाचा ७७,१०१, १११,१२५
—विवाहः गुलामाशी ७८,१०५, ११७
—कायदेशीर दर्जा ७३–७७,१०१
—सैनिक ७२,४५१,४५३,४५४–४५६
—सरकारी मंत्री ४०८
—दिल्लीचे गुलाम राजे ४०,७२, ४१५
—गुलामांचा व्यापार ८०–८७, १९२,३३४
गुलामगिरी ७१–८९, १५६
—पकडून आणलेले गुलाम ७४
—वंशपरंपरेने असलेले गुलाम ७४
—विकत घेतलेले ७४
—सांप्रतची स्थिती ८४–८८
ग्रेट नॅशनल असेम्ब्ली (तुर्कस्तानची) २७७

घटस्फोट (फारकत, तलाक) ९७,९९, १२१–१२४,१३७,१९४,२४२, २५२, २५५,२७४
घटस्फोटाचे सूत्र १२१
घियात अल् दिन बल्बन ४१५
घुझ तुर्क ४३१
घूरी (घोरी) ३९

चर्च १८९
चाचे (बर्बरी) ४५९
चार्डिन, सर जॉन २७१
चार्ल्स (द हॅमर) १९
चिनी तुर्किस्तान १०९
चीन २३,४२
चोरी १७०, १९४, २५२ (टीपेसह), २७३, ३६५, ३६९

जकात (गरिबांसाठी दानकर) ५७, १५६, २५७, ३१९, ५०१
जपान ४५
जमिनीची मालकी १३,५७,३२०,४११
जहागीरदारांची सेना ४५८
जहाजे व बोटी ४४८, ४४९, ४५६–४५९
जॉर्जिया ३६
जॉर्डन नदी ८
जॉर्डन देश ६६
जादुविद्या ५०९
जानिसारी ३७, ८९, २७५, ४१०, ४१२, ४५४, ४५६

जाफ़र अल् सादिक २९८
जाफीर अल् साबीर १९१–१९५
जायज २०९
जार १९९, २२९
जा(ज)रिब्र ३२४, ३९६
जावा ४२, ४५
जाहिझ (बसराचा) ६२, ६७, ३५३, ४७२–४७४
जाहिझ (तोतया) २०७
जाहिलिया १९८–२००, ४६७
जिझिया (डोईकर) ३, ४, १३, १४, १६, २३, ५६, २६२, ३२०, ३२६
जिब्राल्टर १८
जिहाद १९५, २३०, २६२, ३०३, ४६०
जुगार २१०
जुरजानी अल् शरीफ २६८
ज्युनैद २१९
ज्यू व इस्लाम ३, १७, ६५, १५९, १८८, १९२
ज्यूआन डॉन (इराणमधील) २७२
जेद्दा (जुद्दा) ८४, ३३४
जेद्दाचा तह ८४
जेन्किन्सन २७२
जेरुसलेम ४, ८, १५९, २१३, ४५३
ज्येष्ठ मुलाचा वारसाहक्क १४६–१४८, २९०

झरतुष्ट्री धर्मीय व इस्लाम ९, १३, २४, ६५
झाग्रोस १२
झांज ४२८, ४३०, ४३७, ४४५
झांझिबार ४७
झाबची लढाई ४३७
झाहिरी १८३
झियाद 'इब्ने अबीही' ३७३
झियारा २५८
झुबेयर १७५
झुबैद (सिक्का) १३४
झैदिया २९८

ॅजियर्स १७
ट्यूनिशिया (ट्यूनिस) १७, ३८१
टान्गानिका १८६
ट्रान्सोक्सिआना २०–२५, ३२, ६९, ३८४
टायरे ४५३
टॉलेमी ४८० (टीप)
ट्रिपोली १७
टूर्सची लढाई १९
ट्रेव्हेसाची लढाई ३४
टोलेडो २९
टोळ्यांचे (जमातीय) कायदेकानू २५६
टोळी पद्धत २७९–२८०

ठाणेश्वर ४०
ठेबे ४१४
तक्मीला ३२३

तक्रार-अर्जाची सुनावणी २७०
तकिया २१४
तत्त्वज्ञान व धर्म २२२
तनबीह ग्रंथ (शिराझी लिखित) १९१–१९६
तबरी (इतिहासकार व न्यायपंडित) १८४ व सर्वत्र
तबरीस्तान ३८२

तल्हा १७५
तलवार–तलवारप्रमुख (सेनापती) ३०७, ३९९
तवक्कुल २२०
तवाहिद १९८ (टीप)
तहाफूत अल् फलासिफा ४७८
तहलील १२२ (टीप)
तॉकी ३३९
तार्तर ३८, ४३
तारिका ८९
तारिक इ. झियाद १७
तारीर इ. फिरोजशाही २७०
तारारी २७७
ताहमास्प शाह २७१
ताहिरी ३८४
ताहिर धुल् यामिनायन ३०२
ताझिर ३४३
तिबेट ४१
तुआरेग ४७, ८६, ८७ (टीप) १०८, १२८, १३२, १४७, २५३
तुर्क
—आशियात २०, २१, ३१–३३
—युरोपात २५–३८
—उत्तर आफ्रिकेत ३४
तुर्कस्तान ५, ८९, १०१, १०३, १०७, १२४, १३०, १४२ (टीप १ व २), १८७, २७४–२७८
तुर्कस्तान—
—लष्कर ४०९–१०, ४१२–४१४
—महसूल व्यवस्था ४११, ४१४
तुर्किस्तान ४२, २३१
तुर्की भाडोत्री सैनिक ३३५, ३४४, ४२६–४२८
तुर्कोमन ३१–३२
तुघ (तीन तुऱ्यांचा ध्वज) ४११, ४१२
तुघ्रिल बेग ३२
तुल्ब ४५२
तैमूरलंग ३३

थॉरी १८६

दत्तक व वारसा हक्क १४८
दफ्तरदार ४१०
दमास्कस ७, ४८७–४८९
दरवेशी संघ ८९
दाई अल दुआत ४००
दाऊद पाशा ४१४
दार्दानेल्स १०
दानकर ('जकात'ही पहा) ६३, १६१, ३०४, ३१९, ३५४
दानधर्म करणे ९१, ३०८
दान मागणारे ३०८
दामिरी १७८
दायबुलचा वेढा ४४६
दार अल् इल्म ४००
दावे (दिवाणी) ३५५
दिनार ३३२
दिया (रक्तदंड) १९४, २७६, ३६६, ३६८
दिऱ्हाम ३२०
दिल्ली ४०, २९२, ४०७
दिवान ३०७, ३०७ (टीप), ४०९, ४१०, ४२१
दिवान अल् अझिम्मा ३७७
—अल् इन्शा ३१०, ४०१
—अल् इस्तिद्राक ३८७
—अल् खराज ३०९, ३२७, ३३८
—अल् खातम ३०९, ३३८

—अल् जेयश ३३८, ४३०
—अल् तॉकी ३३९
—अल् दार ३३८
—अल् दिया अल् खासा ३१५
—अल् फीका ३३८
—अल् मार्रक ३३८
—अल् माघिब ३३८
—अल् मावारिस अल् हश्रिया ३३५
—अल् मुस्तावल्लात ३०९
—अल् रझाइल ३०९
—अल् मुसादरिन ३१७
—इ रिसालत ३८८
—अल् सवाद ३३८
—दिवान खाना २७३
—दिवान बेकी २७२

दिह्कान्स २४, ६८, ३९२
दुर्गुण २२२
दुब्राब ४४७
दुबायस ४४०
देवदूत २३७, २६०

धर्मश्रद्धांची कर्तव्ये १५६–१६६, २२२, ५०६
धर्मश्रद्धांचा सेनापती २८६, २९१, ३०१
धर्मग्रंथ असलेले समाज ( किताबी ) ४, ६५
धर्मत्याग १४७, २६६
धर्मयुद्ध ( खिश्चनांचे ), पहिले ३२
धर्मयुद्ध करणारे सैनिक ( खिश्चन ) ४५३
धर्मपरायणतेची व्याख्या २०२
धर्मविषयक ढोंगीपणा व लबाडी २०२, २०५
धर्माधिष्ठित राज्यसत्ता २८४–२८५
धातुपरिवर्तन ( किमया ) शास्त्र ४६५ ( टीप ), ५०४, ५०९
धिम्मी ( ' संरक्षित ' किंवा ' आश्रित ' बिगर मुस्लिम ही पहा ) ६६, २६२, २७५, ३१९–३२२, ३२६ ३४३ ( मुस्लिमेतर ), ३४८, ४१५

नकीब ६३
नजाफ २५८, २६६
नझ्र अल् मझलिम ३६२-३६४ २१८, २३१ व २४७
नफ्स ( कनिष्ठ आत्मा किंवा शरीर ) २१८, २३१, २४७
नफातून ( नाफ्तातून ) ४४६
नरक २१२
नवरोझ ३२२, ३७३ ( टीप ), ३९७
नस्र इ. अहमद समानी ३७९, ३८८
नसफी १८९
नाझिर अल् मझालिम ३४७, ३६२
नाणी ३०२, ३१३, ३३२, ३६३ (टीप), ३८१, ३८३, ३८४, ४०७, ४१३
नास्तिक ( पाखंडी ) २६२
न्यायव्यवस्था १६७–१६८, १८०, २७०–२७४, ३४१–३७०
न्यायशास्त्राचे मूलाधार १६८–१९०
नायजेरिया ४८
नायब अल् काफिल ४०५
नाविक दल ( जहाजे व बोटी पहा )
नास ३०५ ( टीप )
नाहिया ३९४
नासिर अल् दिन तुसी २३२, २३६–२३९

नासिर मुहम्मद ( सुल्तान ) ४०७
निकोपोलिसची लढाई ३३
निग्रो ५६, ५८, ६२
निझाम अल् मुल्क ३९०
निय्या २०७, २२७
निवृत्तिवाद २२०
निशानजी बाशी ४१२
निशापूर ३८८
निसेफोरस ११
निहावंद १२, १३
नीतिविषयक कल्पना
—रूढ असलेल्या २४१–२४२, २४४–२४५, २४८–२४९, २५५
—इस्लामच्या १९७–२४९ (सर्वत्र)
नीतिमत्ता ( सार्वजनिक ) ३४८
नुबिया ४५
नूरी अबुल हुसेन २२०

पडदा ( गोषा ) पद्धत १२५–१३०, २४३, २५९
पडदा पद्धत ( कायद्याने रद्द ) १०९
पत्नी
—पतीचा अधिकार ११७
—अन्नवस्त्राची सोय ९९, ११७, १९६
—किती करता येतात ? १००, १८१
प्रथा व कायदा १८१ ( 'उर्फ' ही पहा )
पृथ्वीवरील सात वस्तीयोग्य प्रदेश ४८८–४८९
पाकिस्तान ३९, ४०, ६९, १८७, २४९, २५३
पाखंडी २६१
पाणीपुरवठा ( कालवे ) ३११
पापकृत्य २०९, २१९, २२२
पालक ( 'वली' पहा )
प्राणाचा बदला प्राणाने घेणे ( टॅलिओ ) ७६, १९५, २४१, २८२, ३४१, ३४२, ३६०, ३६६–३६९
प्राण्यांच्या ( घोड्यासह ) शर्यती २१०
प्रांतिक शासन व्यवस्था २७१–४१५
प्रांतिक विभाग (सरकारचे) २७१–४१५
प्रार्थना : विधि व नियम १५७–१६१, ३७०
प्रार्थनेपूर्वीची स्वच्छता १५९–१६१
प्रार्थनेची भाषा १८८
पितृत्वाचे नाते १३५–१४०
पित्याचे कायदेशीर हक्क १४४
पिकाचा हंगाम ३२२
पुनरुत्थान २०५, २६०, २६१, २८२
पुनर्विवाह (बायकांचा) १०६, १२२, १३५, २४२
पुरोहित वर्गाचा अभाव ६७
पूर्णत्वाची प्राप्ती २३७
पोलिस दल ('शुर्ता' ही पहा) ३४१–३५०
पोलंड ३५
प्रौढत्वाचे कायदेशीर वय १४२
पंचांग ( कॅलेंडर ), २५७, ३२२
पंजाब ३१, ३९, ४०

फकी २६६, ३०५
फर्ज १५७, २०९, २५९,
फराइदाक ३१२
फलज्योतिष व न्यायज्योतिष ४८२, ५०८
फाझल इ. साइल ३७८
फातिमा (पैगंबरांची कन्या) २८९, २९८

फातिमी २९८, ३०२, ३५१, ३६५, ३८१, ३९९
फातिमी लश्कर ४५१
फातिहा १८८
फ्रान्स १९
फाराबी २३१, ४७४, ५०४, ५०६
फार्स ३२३, ३८९, ३९७
फिकाह १५१–१९६ (सर्वत्र), १९७, २३०, २३१, २५०, ४६७
फित्रा २६०
फिर्दौस अल् हिक्मा ४७३
फिर्दौसी २६१
फिहरिस्त ५०१
फुतुव्वा २२१
फुरात २५
फूला ४८
फे ३१८

बक्री ६६
बगदाद ३२, ६३, १३२, १३४, १८७, २९३, ३०६, ३१०, ३३३, ३३४, ३३६ (टीप), ३५१, ३६२, ३७७, ३८२, ३९०, ४१४, ४२६, ४२८
बडा खाजगी कारभारी २७१
बद्रची लढाई ४१७, ४३६, ४३८, ४४२
बर्बर १६, १७, १८, ४८, ३८१, ४६०
बयाझी ३३
बरझिया ४४७
बल्गेरिया ३३
बलुचिस्तान २५५, २५८
बसरा ११, १३, २५, ६३, २८४, ३७२, ४२३, ४६६, ४७६
बहरीन ३७३
बहाई ३८
बहुपतित्व ९०, १०२
बहुपत्नीत्व १००, १०१, २५२, २५९, २७४
बक्षीस किंवा शिक्षा (धार्मिक वर्तनाबद्दल) १९७, १९९, २००, २१३, २४५
बृहत्‌विश्व व विश्व ४८३
बॅबिस ३८
बाजार ३४९
बाबर २७०, २९२, ४१६
बार्मेसीद ३४०
बायझन्टीयम ६, ७, ९, १८, २७, ३२, ४३२, ४३३, ४३७, ४३८, ४५७
बायबल आणि कुराण ३
बाया २८६
बारीद दिवान अल् ३०९–३११, ३३६, ३५१, ३८९
बाल्कन ३३
बाल्ख १४, २०
बाहुल्या (खेळणी) ३४९
बालिआरिक बेटे ३० (टीप)
ब्रिजची लढाई ४१८
बिस्मिल्लाह १८८
बीजगणित ५०१ (टीप)
बुखरा २०–२२, ६९, ३८५, ३८८, ३९६,
बुखारी १३३
बुर्दा ३०३
बुवेहिद २९१, २९५, ३०२, ३१५, ३४१, ३८३, ३८६, ३८९, ४२९, ४३१,
बेक्ताशी दरवेशी ८९, ४५६

बेग ( पदवी ) ६९
बेत अल् माल ३१५–३३७, ३३९, ३६९
बेत अल् माल मुझालिम ३१७
बेत माल अल् मुस्लिमीन ३३९ ( 'बेत अल् माल' ही पहा )
बेबर्स ४०७,
बेलार बे ४११
बैदावी १५८
बोर्निओ ४१–४२
बोस्निया ३७ ( टीप )
बंगाल ४०,७१
बुंदार ३९३

भटक्या जमातीचे जीवन ६३
भूगर्भशास्त्र ४९२–४९५
भूगोल ४८६–४८९
भूमध्य समुद्रीय बेटे १६, २५–२८
भूमिती ४७९

मक्सरा ३०३
मक्का १–५, १२९, १३२, १६३, ( टीप ), १६४, २१३, २५४, २५८, २३६, २८०, २८७, ३१०, ३३४, ३३६, ३४२
मकामात ( हारीरी ) ३६४
मकूह २०९
मॅगिअन्स व इस्लाम ३, २६२
मजहब १८०, १८६–१८९, २५१, ३०४, ३५२, ३६६–३६७
मज्मु अल् फिकाह १९१–१९६
मजूरविषयक कायदे ३०८
मद्यपान १६६, २१५, २४८, २५५, २५८, २५९, ३४८
मदाईन ४१८
मदिना २, ३, ५, १५८, १७३, २८१, २८३, २८७–२८९; ३३६, ३८१
मन्कर १००,
मॅन्डिन्गो ४८
मॅन्गोनेल्स ४४५
मन्सूर ३८६
मन्सूर ( अब्बासी खलिफा ) ३१६, ३१७, ३३८, ३५१
मनुष्यवध १९५, ३६६–३६८
मफातीह अल् उलूम ५०१
मृताविषयीची कर्तव्ये १९१
मलाक्का ४२
मलाया ४२, १२९, १८६, २५३
मलिक इ. अनस १७५–१७७, १८२–१८९
मलिक इ. नासीर ( मामलुक ) ३८२
मवाली ५६–६४, ४२०, ४५७
मशीद बांधणे ३०७, ३०८
मशिदीतील प्रार्थना ३४७
मस्लामा इ. मुखल्लद ३७३
मॅसिडोनिया ३३, २७५
मसूद ( सुलतान ) ३१७, ३८५, ३९७
मसूदी ५०५
महम्मुद ( गझनीचा ) ३१,३९–४०, २६२, ३०२, ३८३, ४३१, ४४१
महर ६२, ९४, १०८, ११४, १२३, १२४
महसूल वसुलीच्या वेळची लुबाडणूक ३१७
माक्रिझी २६८
मार्को पोलो ४१
माजोर्का ( मजुर्का ) १८
मामलुक ७२, ४५४–४५६

मामुन (खलिफा) ३००, ३०२, ३२१, ३७९, ३८३, ४२६
मारवान पहिला (खलिफा) २९०
मारुफ २००, २४०
माल्टा २७
मालाझ्कर्दची लढाई ३२
मालिक शाह ४३३
मालिकी आचारपंथ १७५-'८९
मावात ('मृत' जमिनी) १७१, ३१५
मावार्दी २६७, २९३-३०३, ४६०
माहदी (अब्बासी खलिफा) ३१०, ३२२, ३२३, ३२६ (टीप), ३३७ ३३८
माहदी किंवा महदी (अली) १८५, २६१, २९८, ३८१
माहदी (सुदानी) ८९
माहदिया ८९
मिर्घानिया ८९
मिनाऩ्गकबाऊ २५३
मिहरगान ३७३
मुआविया (खलिफा) १०, १४, १८' २८७-२८९, ३०३, ३०९, ३७२ ४५७
मुइझ (फातिमी) ३९९
मुक्तादिर १३४, ३१७, ३३२, ३३८, ३३९, ३६२, ३७९, ४३५
मुकूस ३३३, ३३४
मुज्ताहिद १८६, २५६
मुटा (एक विवाह-प्रकार) ११५-११७, २५४
मुटाची लढाई ५, ४१७, ४३५
मुताझ (खलिफा) ४२८
मुताझिली २१७, ४६४, ४७१
मुतादि ३२२, ३३७, ३३९, ३८४
मुतामिद ३७९, ३८४
मुतावकील (खलिफा) ३१७, ३६२, ४२७
मुतासिम ३३५, ४२६
मुसान्ना ८, ४१८
मुख (मुद्रा) सामुद्रिक ५०८
मुदानियाचा करार ३७
मुनक्कि़ध मिन अल् दलाल ५०७
मुफ्ति २२८
मुबाह २०९
मुराद पहिला २७५, ४५६
मुराद तिसरा ४१४, ४५६
मुरायदीझम ८९
मुरुव्वा १९९
मुल्ताका अल् अभूर २७६
मुल्क अल् तवाईफ ३८२
मुलाचा कायदेशीरपणा १३७-१३९
मुले
—अंगावर पाजणे १४०
—पालकत्व } १४०-१४४
—पालनपोषण } १४०-१४४
मुलांना पुरण्याची प्रथा ९०
मुस्तानसिर (फातिमी) ३९९
मुस्तानसिरिया मदरसा ३०६
मुस्तावफी ३८८, ३८९
मुस्तार्शिद (खलिफा) ३३४
मुस्तातलात् ३९६
मुस्तहाब २०९
मुस्लिम
—सर्वांत मोठी जमात ३८
—सामाजिक विषमता ५५-५६
मुसा अल् काझिम २९८
मुसा-इ नुसैर १७, ४७

मुहतासिब २३०, ३४६–३५०, ३६३
२०
मुहम्मद (पेगंबर)
—चरित्रविषयक माहिती ४६६
—मुहम्मदांची सनद २८१–२८४, ३४२
—स्वभाव व प्रारंभिक शिकवण ५२–५३, १९८, २०२–२०५, २०८
—प्रारंभिक वातावरण १५३–१५५, ४६७
—व्यवसाय १, ५२
—मृत्यू ३, २८५
—वारस ५, २६६, २८६
—खानदानीपणाचा निकष ५४, २०२
—मुहम्मदांच्या परंपरा १७३
—मुहम्मदांचे सहाध्यायी १८३
मुहम्मदी धर्माचे ध्येय १, १९७ ('इस्लाम'ही पहा)
मुहम्मद अली २६, २६१, ४१४
मुहम्मद दुसरा (सुलतान) २७५, ४०४
मुहाजिर ५, ५५, ६३, २८१, ४१७
मूर्ति २६०
मूर्तिपूजा २६०, २६२
मूर ('स्पेन' पहा)
मूले हसन (सुलतान) ३०६ (टीप)
मूरांची आरमारी जहाजे ४५९
मर्व्ह ३८८
मेसोपोटेमिया ९, २६१ ('इराक'ही पहा)
मोगल बादशहा २९२
मोझेसचा पवित्र ग्रंथ १५२
मोरिस्को (मुसिया) ३०
मोरोक्को ११५, १४६, ३०६ (टीप) ३८१
मोसुल ९, ३१२
मोहाक्स ३४, ३५
मंगोल ३२
मंजूर २०९

यसरीब २
यज्दगिर्द तिसरा १२
याकुब इ. लेथ सफार ३८४
याझीद इ. मुआविया २९०, ३७३ (टीप)
याझीद इ. मुहल्लब ३७५
यात्रा १६३, २५८
यार्मुकची लढाई ८, ९, ४१८, ४३७, ४३८
यासा २६८
युक्लिड ४७२
युगोस्लाव्हिया ३७ (टीप)
युद्धकला ४५९–४६२
युरोपातील इस्लाम ३४–३८
येमेन ८४, ३१०
यौवनावस्था (पुरुषांची) १४१
यौवनावस्था (स्त्रियांची) १४२
ऱ्होड्स १८

रईस अल् रुआसा ३४१, ३९०
रक्तदंड (खूनाबद्दल भरपाई) २७६, ३६७
रक्तसूड १९९, २४९, २५२, २७०, ३४२, ३६६
रखेली ७८, ११७, १३६, २४२
रत्तल ३२४ (टीप)
रफी इ. लेथ ४२६

रमजान १६०, २१७, २५७, ३४८, ३९८
रवाज इ आम २७०
रशिया व तुर्कस्तान ३६
रस्ते बांधणी १२, १३, ३१०, ३३६
राज्यसंस्था २३४, २५०, २५५, २६५–२७८, २८२, ३०४–३७०
राज्यारोहण समारंभ २९२
राजाचा कारभारी ३६५
रादी ( खलिफा ) ३४१
राबिया ( गूढवादी संत ) १३२
राय १६८–१८०, १८३
राझेस ५०३, ५०६ ( टीप )
रिझा शाह ( पेहलवी ) १३०, २६१
रुमानिया ३७ ( टीप )
रुमेलिया ४११
रैय्य ( प्राचीन ऱ्हेजेस ) १३, ३२१, ४१९

ल आन १२१ ( टीप ), १३६, १३७, १४८
लकाब ५७
लष्कर
—फातिमी ४५१
—मामलुक ४५४–४५६
—सलादिनचे ४५२–४५४
—शस्त्रे व इतर साहित्य ४३९, ४४४
—युद्धसंघटना ४३५–४५०
—अधिकारी वर्ग ४३३
—निर्वाह व्यवस्था ४२२
—रचना ४२२, ४३०–४६१
लाजिन ( मामलुक ) ४५५
लिओ सहावा ( सम्राट ) ४४३, ४५८
लिबिया १०८
लुकमान २४५
लुटीतील हिस्सा ५८
लेखणी–लेखणी प्रमुख ३०७, ३९९
लैंगिक स्वैराचार २४१

व्यभिचार ९४, ११९–१२०, १३६, १३७, १६७, २७६, ३६५
व्याजबट्टा २४९, २६४, ३४९
व्यापारविषयक कायदे २१०
व्यापारविषयक नीतिनियम ३४९
व्यापार व शरियत २६२–२६५
व्यावसायिकांचे संघ ८८
व्यावहारिक तत्त्वज्ञान २३०
व्हिएन्ना ३४, ३५
वक्फ व अवक्फ १४१, १९०, २१०, २६९, ३६३
वझीर ३३७, ३३८, ३४०, ३४१, ३५१, ३६२, ३६५, ३७८, ३८८, ३८९, ३९०, ३९२, ३९९, ४१४, ४५२
वझीर ( बडा ) २७८, ३९१, ४०८, ४०९
वनस्पतिसृष्टी ४९५–९७
वरिष्ठ वर्ग ( जमातीमधील ) ५२
वली ( नातेवाईक पालक ) १०७, १०९, १४३, १८४, ३४२, ३६६
वली ( सुभेदार ) ३९२, ४१४
वाली अल् अहद २८९, २९९
वली व मौला ८०
वलीद इ. अब्दल् मलिक ( खलिफा ) २९०, ३१२
वहाबी १८५, २५५, २६१
वाजिब २०९

वाजिब अल् अर्द २७०
वारसा कायदे ९६, १४४–१५०, १५६, १५८, १६६, १७७, २५३
वारशाचे नियम ( बिगर मुस्लिमांविषयी ) ३३५
वारसा संपत्तीची वाटणी १४५–१४६
वारसा हक्क
—आईचा ९६
— मुलीचा ९६–९७, १४६, २५३
वासी २८७
वासित २५१
विक्री कायदा १९२
विधवा २५२–२५५
विवाह
—चे वय १०७
— विषयक नियम १९३, २६९
—एक इहलौकिक करार १००
— वर- वधू पक्षांतील समानता ६१, ११०
—स्वतंत्र पुरुषाचा गुलाम स्त्रीशी ६२, १०५
— गुलामाचा स्वतंत्र स्त्रीशी १०३, १०५
—पकडून आणलेल्या स्त्रीशी ९४
—ब अल पद्धतीचा ९३, ११५ व ११५ ( टीप )
—विकत घेतलेल्या स्त्रीशी ९४
—चुलत व आते नात्यातील स्त्री-पुरुषांचा १०२
—विवाह करण्यास वर्ज्य असलेले १०४
—जमातीबाहेर (गोत्रेतर) विवाहसंबंध १४१, २५३
—जमातींत ( गोत्रांतील ) ,, १४१
—विवाहपूर्व विधी १०८
— चा करार ११३–११५, ११७
—रद्द होणे किंवा करणे १२३–१२४
— बिगर मुस्लिम स्त्रीशी निषिद्ध १३८
विश्वाचे मूळ घटक ४७२, ४७३, ४७५, ४८५
विज्ञानाच्या शाखा ४६३, ४७८
वेनेशियन्स २६, ३५
वेश्या-व्यवसाय ११६, ११८, २४२, २४९
वंशावळशास्त्र ४६६

शपथ घेणे १९५–१९६, २६६, १३६
शबीब अल् अझराकी ४२१
शम्स अल् दिन ( दिल्लीचा ) ४१५
शरीफ ( ' अश्रफ ' ही पहा ) ६४
शाकिरिया ४२७, ४२७ ( टीप ), ४२८
शाफी ( मुहम्मद ) १८२, १८४
शाफी आचार पथ १८६, १८७
शार ( शरिया, शरियत ) १५१–१९६, २२२, २२८, २५०, २६९–२७०, २९३, ४७७, ५०७
शरियत खलिल २५१
शारीरिक इजा करण्याबद्दल सजा ३६०, ३६९
शारी न्याय २६९
शाहच्या ( इराणच्या ) जबाबदाऱ्या २९८
शिघार १०५
शिया पंथ
— तत्त्व व आचार १७४, १८९, २१४ ( टीप ), २१७, २९७–२९८

—मुलांविषयीचे कायदे १३६, १४० १४७
—स्त्रियांविषयीचे कायदे १०९, ११७,२५४
शियापंथीय १७४,१८५ ('शिया 'ही पहा)
शिक्षण २२५,३०८
शुर्ता साहिब अल् ३१६, ३४५
शुद्ध चारित्र्याचे नियम १२६
शून्याचा आकडा ५०१
शुहदा बिन अल् इबारी १३३
शेख (पदवी) ७०
शेख अल् इस्लाम २७६–२७७
शेखची कर्तव्ये २७९
शेबानी १८१

सत्-असत्च्या कल्पना २००, २०२, २१५–२१७, २२४, २३१, २३५
सट्टेबाजी २१०, २६३
सद्र २७२
सदाक ९४
स्वर्ग १६६, २००, २१२, २३५, २४७
स्टेसिफन (मदाईन) शहर ८, ११, ४१८
स्वप्नांचा अर्थ ५०९
स्पेन (तसेच मूरांची सत्ता) १८, २७–३०, ३७, १८७, ३५१, ३७४, ३८२, ४१४, ४५८–४५९, ४६४
सदसदविवेक २०५, २४६
सफावी शाह ६७, १८७, २७२, २९८, ३८३, ३८६, ३९०, ३९७
सफारी ३८४
सब्लाइम पोर्ट (बड़ा दरवाजा) ४०९
सर्बिया ३३
समरकंद २०, २२
समानता (समाजांतर्गत) ५३, ५४, ५५, ६७–६८
समानी ३१, ६९, ३७९, ३८४–३८५, ३८८, ३९५, ३९६, ४४१
सय्यद (पदवी) ३८२
सय्यद अल् वझारा ३९९
सलादिन ३०१, ३३४, ३७९, ३८१, ४०२, ४०४, ४४२, ४४६, ४४७, ४५३, ४५४, ४५८
सर्व्हेजचा तहनामा २६
सवाद ३१५, ३२४, ३३३, ३३७,३७७, ३७९
ससानियन्स ३१३,३१५
सृष्टीची घटकद्रव्ये ४७०
सार्डीनिया २७ (टीप), ३० (टीप)
सादी शिराझ २०७, २२१, २४४
सामर्रा (समारा) ३३५
सायनॅगॉग १८९
सायप्रस १८, २६, ४५७
सायरेनिका १६
सारासेनांचे लष्करी डावपेच ४४३
सालमन अल् फारिशी ४४५
सार्वजनिक बांधकामे व सुखसोयी ३०७, ३०८, ३११, ३३५ ३४९–३५०
साहिब अल् बाब ३६५
साहिब अल् बारीद ३११
साहिब मौना ३४४, ३९३
साहिब अल् शुर्ता ३४४–३४६, ३५०
साहिब शुरात ३८८
साक्षी पुराव्याचे कायदे १९३
साक्षीदार कायदेशीर ३५७, ३६० ३६४

स्त्रिय
—विवाहास संमती १११
—विवाह स्वातंत्र्य १०९
—अब्रूचे रक्षण ९३
—वारसा हक्क ९४, ९६–९७, २५२–२५४
—शिक्षण व विद्वत्ता १३२–१३३
—विवाह ९९–१०१
—एक पत्नी १०२
—मशिदीत नमाजासाठी जाणे ९८, १२७, १२९, १३१, १३२
—पैगंबरांची मते ९८, १२५–१२७
—सनातन्यांची मते १३१
—स्त्री व स्वर्ग १३१
—मालमत्तेचा अधिकार ९५, ९६, ९७, १३०
—घराबाहेरचे काम व सरकारी पदे ९८, ३५२, ३६२
—धार्मिक कर्तव्ये १३०
—पुनर्विवाह ('इद्दा'ही पहा) १२२
—मृत्युपत्राद्वारे संपत्ती मिळण्याचा हक्क ९५–९६
—पती निवडण्याचा हक्क ९२, १०९
—स्त्री साधुसंत १३२–१३३
—एकान्तवास १२७–१२९
सिएरा लिऑन ४८
सिवा ११७
सिंध ३७४
सिपाहीसालार ३८९, ३९२
सिफिनची लढाई ४२०
सियासतनामा ७२, ४३२
सिलोन ४०
सिस्तान २२, ३७३
सिसिली १८, २७
सीरिया ५–८, १०, १०१, १४२ (टीप), १९१, २८७, ३१९, ३२४, ३७२, ३७५, ४१८, ४२२–४२४, ४४९
सुखाची कल्पना २३३, २३५, २३८
सुदान ४६–४७, ४७ (टीप), ८५, २५४
सुफीवाद ८९, २१८–२२२, २२६, २४२, २४६
सुन्ना २०९
सुन्ना (मुहम्मदांचा) १५१, १७३–१७४, १८०, २२०, २४२, २५०, २६१
सुन्नी १७४, २२४
सुमात्रा ४१
सुनुसी (सुनुसियाह) ८५, ८९, २६१
सुलतानपदाचे वारस ३८५
सुलतान (ऑटोमन) २७६–२७७, २९२
सुलेमान द मॅग्निफिशिएंट (कानूनी) ३४, २७५, ४१२–४१३, ४५६
सुलेमान पाशा ४१४
सुंता २४, २५९
सेबियन्स ६५
सेल्जुक
—आशिया मायनरमध्ये ११
—ट्रान्सोक्सिआना व इराणमध्ये ३१, ३९
—आणि खिलाफत २९१, ३४१, ३८३, ३८६
—शासनपद्धति ३९०
सैतान २१६
सोव्हिएट रशियातील मुस्लिम राज्ये

४३, १०१, १०७, १२९
संगीत २५८, २५९, ३४९
संख्याशास्त्र ४७८
संजाक ( तुर्च्यांचे निशाण ) ४११
संजार ( सुलतान ) ४४१
संरक्षित किंवा आश्रित बिगर मुस्लिम-धर्मीय ६४-६५, २२९, ३१९-३२१

संवयी ( व्यक्तिगत ) २२६

हज्जाज इ. युसुफ २२, ५६, ३१२, ३१४, ३४६, ३७३, ३७५, ४१९
हद्रामौत ४२
हदिस १३०, १३३, १७१, १७३-१८५, २०३, २४२, २६०, ३०१, ३०४, ४६७
हनफी आचार पंथ १६९-१९६
हनबाली आचारपंथ १८४, १८७-१८९
हफीज २५८
हमादान १२, १३
हराम २०९, २२१
हरून अल रशीद १३४, १४७, १७१, ३०६, ३१६, ३४०, ३८१, ४३३, ४४९
हल्लाज ( हुसेन ) २१९
हलाल २२१
हवामानशास्त्र ४८९-४९१
हसन ( इ. अली ) ६७, २६६, २८८
हाज यात्रा ( 'यात्रा' पहा )
हाजिब २६९, ४१४
हाजिब अल हुज्जाब ३८८, ३८९
हाजी खलिफा २३१
हाशिमी ६३, २८८, ३३५
हिजडे १२८
हिजरा २, ५
हिरा ६, ८
हिल्फ अल् फुदुल ३४२
हिंदू ( धिम्मी या नात्याने ) २६२, ४१५-४१६
हिंदूंशी विवाहसंबंध २५२
हिंदुस्थानवरील इस्लामी आक्रमणे ८, ३१, ३९-४०, ३७३
हिंदी मुसलमान ३९-४२, ७०-७१, १८७, २५२, २५४-२५५, २५९, २६१, २७०
हिंदुस्थानमधील मुस्लिम महसूलव्यवस्था ४१५
हिप्पोक्रेटिस ४७२
हुदुद ३४३, ३६०, ३६५-३७०
हुलागू ३०६
हुसेन ( इ. अली ) ६७, २६६, २८९
हेलेसपॉन्ट १०
हौसा ४८
हंगेरी ३५


□ □

# निवडक संदर्भ ग्रंथांची सूची


Abdur Rahim. **Principles of Muhammedan Jurisprudence.** London, 1911.

Abu Bakr al-Turtushi. **Siraj al-muluk.** Cairo, A. H. 1289.

Abu'l-Qasim b. Hasan al-Jilani. **Quwanin al-usul.** Tabriz, 1858.

Abu Tammam. **Hamasa.** Ed. G. Freytag. 2 vols. Bonn, 1828-47.

Abu Yusuf. **Kitab al Kharaj.** Bulaq, A. H. 1302.

Adams, C S. **Islam and Modernism in Egypt.** London, 1933.

Aghababian, R. ( or Aghbaboff ). **Legislation Irainenne.** 2 vols. Teheran, 1939; Paris, 1951.

**Kitab al-Aghani.** 2 vols. Bulaq, A. H. 1285.

Ahmad b. Hanbal. **Musnad.** 6 vols. Cairo, A. H. 1313.

Ameer Ali. **Personal Law of Mohammedans.** London, 1880.

Amili, Hasan b. Zayn al-Din. **Maalim al-din,** Lucknow, 1301.

Anderson, G. N.D. **Islamic Law in Africa,** H. M. S. O. London, 1954.

Andre, P. J. **l'Islam Noir.** Paris, 1924.

**Annuaire du Monde Mussalman.** Ed. L. Massignon. Paris, 1925-1955.

Arib. **Tabari Continuatus.** Ed. M. J. de Goeje. Leyden, 1897.

Arnold, T. W. **Preaching of Islam.** London, 1913.

Arnold, T. W. **Painting in Islam.** Oxford, 1928.

Attar ( Farid al-Din ). **Tadhkirat al awliya.** Ed. R. A. Nicholson. 2 vols. Leyden, 1905-7.

Averroes ( Ibn Rashd ), **Tahafut al-Tahafut,** Tr. S. van den Bergh. 2 vols. London, 1954.

Avicenna. **De Congelatione et Conglutinatione Lapidum**. Ed. E. J. Holmyard. Paris, 1927.

Avicenna. **Risab Taqsim al-ulum**. B. M. M. S. add., 16,659.

Ayn Ali Efendi. **Qawanin-i Uthman**. Constantinople, A. H. 1280.

Baeumker, C. Alfarabi, **Uber den Ursprung der Wissenschaften. Beitrage zur Geshichtichte des Mittlelatters**, XIX, iii. Munster i. W., 1916.

Baladhuri. **Futuh al-buldan**. Ed. M. J. de Goeje. Leyden, 1866.

Barbier de Meynard. **Considerations sur l' Historie Ottomane.** (Publications de l' Ecole des Langues orientales vivantes.) Paris, 1886.

Barthold, **Turkestan down to the Mongol Invasions**. (E. J. W. Gibb Memorial n. s. v.) London, 1928.

Baydawi. **Anwar al-Tanzil** ( Commentaries in Coranum ). Ed. Fleischer. Leipzig, 1846.

Bayhaqi. **Tarikhi-i Masudi**. Ed. Morley. Calcutta, 1862.

Becker, C. H. **Islamstudien**. 2 vols. Leipzig, 1924.

Bell, Sir Charles. **People of Tibet**. Oxford, 1928.

Bennigsen, A. **L'Afrique et l'Asie**. Paris, 1952-53.

Biruni. **Kitab al-Tafhim** ( Elements of the Art of Astrology). Ed. and tr. R. Ramsay Wright. London, 1934.

Blunt, Lady Anne. **Bedouins of the Euphrates**. 2 vols. London, 1879.

Browne, E. G. **Literary History of Persia**. 2 vols. London, 1909, 1915; reissued ( 4 vols. ). Cambridge, 1928.

Browne, E. G. **Persian Literature under Tartar Dominion**. Cambridge, 1924.

Bukhari. **Sahih**. Ed. L. Krehl. (Le Recueil des Traditions Mahometanes. ) 3 vols. Leydon, 1862-8.

Bury, J. B. **A History of the Later Roman Empire**. 2 vols. London, 1889.

Bury, J. B. **A History of the Eastern Roman Empire.** 2 vols. London, 1889.

Butler, A. J. **The Arab Conquest of Egypt**. Oxford, 1902.

Caetani, L. **Chronographia Islamica.** Rome, 1912 ff.

**Central Asian Review.** London, 1953 ff.

Chan, Wing-tsit. **Religious Trends in Modern China.** New York, 1953.

Chardin, J **Travels in Persia**. London, 1927.

**China Hand-book.** Taipei, Taiwan, 1953.

Cromer, Lord. **Modern Egypt.** 2 vols. London, 1908.

Crooke, W. **Islam in India** Oxford, 1921.

Damiri. **Hayat al-hayawan** 2 vols Cairo, A. H. 1311.

Dinawari. **Akhbar al-tiwal** Ed. Guirgass. Leyden, 1888.

Doughty, C. M. **Arabia Deserta**. 2 vols. Cambridge, 1888.

Dozy, R. **Spanish Islam** tr. F. G. Stokes. London, 1913.

Dozy, R. ( ed. ) **History of Almohades** by al-Marrakushi. 2nd ed. Leyden, 1881.

Dunne, J. Heyworth. **Religous and Political Trends in Modern Egypt.** Washington, 1950.

**Eclipse of the Abbasid Caliphate.** Ed. and tr. H. E. Amedroz & Margoliouth. 7 vols. Oxford, 1920-21.

Elliot, H. M., and Dowson, J. **The History of India as told by its own Historians**. 8 vols. London, 1867-77.

**Frgmenta Historicorum Arabicorum**. Ed. M. J. de Goeje. 2 vols. Leyden, 1869-71.

Fryer, John. **A New Account of East India & Persia**. [ Hakluyt Society. ] 3 vols. London, 1915

Fyzee, A. A. A. **Outlines of Mohammadan Law**. Oxford, 1949. 2nd ed. Oxford 1955.

Gardizi. **Zayn al-Akhbar**. Ed. M. Nazim. Berlin, 1928.

Ghazali M. **Ihya ulum al-din**. 4 vols. Cairo, A. H. 1289.

Ghazali, M. (**Alguzel**) **Tahafot al Falasifat**. Ed. M. Bonyges, S. J. Beirut, 1927.

Ghazali, M. **Al Munqidh min al-dalal**. Cairo, A. H. 1309.

Ghazali, M. **Ayyuha'l Walad ( O Kind ! )**. Ed. Hammer-Purgstall. Vienna, 1838.

Ghazali, M. **Al–Durrat al–Fakhira**. Ed. & tr. Gautier. Geneva, 1878.

Gibb, H. A. R. **The Arab Conquests in Central Asia**. London, 1923.

Gibb, H. A. R. **Modern Trends in Islam**. Chicago, 1927.

Gibb, H. A. R. **Mohammedanism**. London, 1949.

Gibbon, E. **Decline and Fall of Roman Empire**. Ed. J. B. Bury. 7 vols. London, 1896–1900.

Goldziher, I. **Muhammedanische Studien**. 2 vols. Halle, 1889–90.

Goldziher, I. **Vorlesungen iiber den Islam**. 2nd ed. Ed. Fr. Babinger. Heidelberg, 1925.

Goldziher, I. **Die Zahiriten**. Leipzig, 1884.

Hajji Khalifa. **Kashf al Zunun**. Ed. and tr. G. Fluegel. 7 vols. Leipzig and London, 1835–58.

Halide Edib. **Inside India**. London, 1937.

Hariri. **Magamat**. Ed. S. de Sacy. Paris, 1822. 2nd ed. (Reinaud and Derenbourg). 2 vols. Paris, 1847–53.

Harris, M. **Egypt under The Egyptians**. London, 1925.

Hartmann, M. **Zur Geschichte der Islam in China**. Leipzig, 1921.

Hasnein, A. M. **The Lost Oases**. London, 1925.

Hasluck, F. W. **Christianity and Islam under Sultans**. 2 vols. Oxford, 1929.

Herklots, G. A. **Islam in India**. Ed. W. Crooke. London, 1921.

**Hudud al-alam**. Tr. V. Minorsky. ( Gibb Series ). London, 1937.

*

Hurgronje Snouck. **Mekka.** 2 vols. Leyden, 1888.

Ibn al-Athir [ Al-] **Kamil**. Ed. C. J. Tornberg. 14 vols. Leyden, 1851-76.

Ibn Battuta. **Voyages d'Ibn Batoutah.** Ed. C. Defremery et B. Saugninetti. 4 vols., Paris, 1874 ff.

Ibn al-Faqih. **Kitab al-Buldan**. Ed. M. J. de Goeje. Bibilotheca Geographorum Arabicorum. V. Leyden, 1885.

Iban Hawqal. **Kitab al-Masalik wal-Mamalik.** Ed. M. J. de Goeje. Leyden, 1873.

Ibn Hazm. **Kitab al-Fiscal.** 5 parts. Cairo, A. H. 1317.

Ibn Jubayr. **Travels.** Ed. Wright & M. J. de Goeje. ( Gibb Series V ). Leyden, 1907.

Ibn Khaldun. **Prolegomenes**. Ed. Quatremere. 3 parts. Paris, 1858.

Ibn Khaldun. **Prolegomenes.** Tr. Macguckin de Slane Notices et Extraits. vols. 19-21, Paris, 1863-8.

Ibn Khallikan. **Wafayat al-a'yan.** Tr. Mac-Guckin de Slane. 4 vols., Paris and London, 1843-71.

Ibn Miskawayhi. **Tahdhib al-akhlaq**. Cairo(?), A. H. 1298.

Ibn al-Nadim al-Warraq. **Fihrist.** Ed. G. Flugel. 2 vols. Leipzig, 1871-2.

Ibn al-Qifti. **Tarikh al-hukama**. Ed. J. Lippert. Leipzig, 1903.

Ibn Qutayba. **'Uyun al-akhbar.** Ed. C. Brockelmann. Berlin, 1900-8.

Ikhwan al-Safa. **Rasail**. 4 vols, Cairo, 1347/1928.

Indian Census Reports-1901, 1911, 1921 etc.

**Der Islam.** Strassburg, Berlin, 1910 ff.

The Islamic Review. Woking.

Istakhri. **Kitab al-Masalik wal. Mamlik**. Ed. M. J. de Goeje. Leyden, 1870.

Jahiz. **Kitab al-Bayan wal-tabyin**. 2 vols. Cairo, A. H. 1313.

Jahiz. **Triq Opiscula**. Ed. G. van Vloten. Leyden, 1903.

Jahiz. **Kitab al-Taj**. Ed. Ahmed Zeki Pasha. Cairo, 1914.

Jahiz. **Kitab al-Hayawan**. 7 parts. Cairo, 1325/1907.

Jashiyari. **Kitab al-Wuzara**. Ed. Hans von Mzik. Leipzig, 1926.

Jalal al-Din Rumi. **Mathnawi-i Manawi**. Ed. and tr. R. A. Nicholson ( Gibb Series ). 8 vols. London and Leyden, 1925-40.

Jenkinson, Anthony et. al. **Early Voyages and Travells To Russia & Persia**. Hakluyt Society. London.

Juynboll, A. W. T. **Handbuch des Islamichen Gesetzes**. Leyden 1910.

Kai Kaus b. Iskandar. **Qrbus-nama**. Ed. R. Levy ( Gibb Memorial Series n. s. XVIII ). 1951.

Kai Kaus b. Iskandur, **Qabus-nama**. Tr. ( under title A Mirror for Princes ) R. Levy. London, 1951.

Kennet, A. **Bedouin Justice**. Cambridge 1951.

(Sidi) Khalil b. Ishaq. **Mukhtasar**. Tr. I. Guidi and D. Santillana. 2 vols. Milan 1919.

Khwarazmi [ Muhammad b. Yusuf ]. **Mafatih al-ulum**. Ed. G. van Vloten. Leyden, 1895.

Kindi. **Kitab al Wulat**. Ed. R. Guest (Gibb Series). Leyden, 1912.

Kremer, A. Von. **Culturgeschichtliche Streifzuge auf dem Gebiete des Islams**. Leipzig, 1873.

Kremer, A. Von. **Culturgeschichtliche des Orients under den Chalifen**. 2 vols. Vienna, 1875-77.

Kremer, A. Von. **Die herrschenden Indeen des Islams**. Leipzig, 1868.

Lambton, A. K. S. **Landlord & Peasant in Persia**. Oxford 1953.

Landon, H. **Nepal**. 2 vols. London, 1928.

Lane E. W. **The Manners & Customs of the Modern Egyptians.** ( Everyman ed. ), London, n. d.

Lane E. W. **One Thousand and one Nights** 3 vols. London, 1841.

Lane Poole, S. **The Coins of the Eastern Khaleefehs in the British Museum.** London, 1875.

Lane Poole, S. **The Coins of The Mohammadan Dynasties in the British Museum.** London, 1876.

Lane Poole, S. **The Barbary Corsairs.** London, 1890.

Lane Poole, S. **The Mohammdan Dynasties.** London, 1894.

Lane Poole, S. **The Moors in Spain.** New York, 1898.

Lane Poole, S. **Saladin.** New York, 1898.

**Law in Middle East.** Ed. M. Khddur. and H. J. Liebensy. vol. I. **Origin and Development of Islamic Law.** Washington, 1955.

**The Legacy of Islam.** Ed. Sir T. W. Arnold and A. Guillanme. Oxford, 1931.

Leo ( Emperor ) VI. **Tactica,** in Migne, **Patrologia Graeca-Latina,** vol. 107.

le Strange, G. **The Lands of The Eastern Caliphate.** Cambridge, 1905.

Levy, R. **A Baghdad Chronicle.** Cambridge, 1929.

Lewis, B. **The Origins of Islmailism : a study of the historical background of the Fatimid Caliphate.** Cambridge, 1940.

Macdonald, D. B. **Development of Muslim Theology, Jurisprudence and Constitutional Theory.** London, 1913. New York, 1926.

Malik b. Anas. **Muwatta,** with commentary of Zurqani. Cairo, A. H. 1280.

Maqdisi [ Al-Mokaddasi ] **Descripto Imperri Moslemici.** Ed. M. J. de Goeje. Leyden, 1877; 2nd ed. 1906.

Maqrizi. **Khitat.** 2 vols. Bulaq, A. H. 1270.

Maqrizi. **Historie des Sultans Mamlouks de l'Egypte.** Tr. M. Quatremere. 2 vols. Paris, 1837–62.

Margoliouth, D. S. **Early Development of Mohammedanism.** London, 1914.

Marrakushi **History of the Almohades** Ed. R. Dozy. 2nd ed. Leyden, 1881.

Massignon. L. **Annuaire du Monde Mussulman**. Paris, 1925–55.

Masudi. **Muruj al–dhahab.** Ed. and tr. Barbier de Meynard and Pavet de Courteille. 9 vols. Paris, 1861 ff.

Masudi. **Kitab al– Tanbih.** Ed. M. J. de Goeje. Leyden, 1894.

Mawardi. Abu'l Hasan al-. **Constitutiones Politicae.** Ed. M. Enger. Bonn, 1853.

Mawardi, Abu'l Hasan al-. **Kitab Adab al-dunya wal-din**. Stambul, A. H. 1299.

**The Mejelle** (Hanafi Code). Tr. C. R. Tyser et al-. Nicosia, 1901.

Mez, A. **Die Renaissance des Islams**. Heidelberg, 1922.

Miskawayhi (et al.). **The Eclipse of the Abbasid Caliphate.** Ed. and tr. H. E. Amedroz and D. S. Margoliouth. 7 vols. Oxford, 1920–21.

Miller, W. **The Ottoman Fmpire.** 4th ed. Cambridge, 1936.

Morier, J. **Hajii Baba of Ispahan.** [ Introduction by E. G. Browne. ] 2 vols. London, 1895.

**The Modern World.** New York, 1911 ff.

Mubarrad. **[ Al– ] Kamil.** Ed. W. Wright. Leipzig, 1864 ff.

Musil, Alois. **Arabia Petraea.** 3 vol. Vienna, 1907–8.

Mustawfi ( Hamdallah ). **Nuzhat al-qulub** Ed. &. tr. G. le Strange. London, 1915-19.

Nasir al-Din Tusi. **Akhlaq–i Nasiri.** Lucknow, 1891.

Nicholson, R. A. **Literary History of Arabs.** Cambridge, 1930.

Nicholson, R. A. **Studies in Islamic Mysticism**. Cambridge, 1921.

Nicholson, R. A. **Studies in Islamic Poetry**. Cambridge, 1921.

Nizam al-Mulk. **Siyasat-nama**. Ed. & tr. C. Schefer, Paris, 1891-93.

Noldeke, Th. **Geschichte des Qorans**. Ed. F. Schwally (2nd ed.) Leipzig, 1909-19.

D'Ohsson [Mauradja]. **Tableau general de l'empire othoman.** 7 vols. Paris, 1788 1824.

Olearius, Adam (Oleschlager). **Voyages and Travels**. Tr. John Davies. London, 1669.

d'Ollone, G. **Recherches sur les Mussulmans Chinois.** Paris, 1911.

**Oriente Moderno**. Rome, 1923 ff.

Palgrave, W. G. A. **Year's Journey through Central and Eastern Asia.** 5th ed. London, 1869.

Philby, H. St. J. **The Heart of Arabia.** 2 vols. London, 1922.

Polo Marco. **Travels.** Ed. H. Yule. 3rd ed. 2 vols. London, 1903.

Poole, S. L. **Catalogue of Oriental Coins in the British Museum.** London, 1875.

Qifti. **Tarikh al-hukama**. Ed. W. Lippert, Leipzig. 1903.

Quatremere. **Histoire des Mongoles de la Perse**. Paris. 1836.

Quatremere. **Historic des Sultans Mamlouks de Egypte.** 2 vols. Paris, 1837-45.

Quchi Bey. **Risala.** (The Letter on the Organisation of the Government, sent to Sultan Murad IV). Constantinople, A. H. 1303. tr. Behnauer, vol. XV (1861).

Querry, A. **Droit Musulman. Recueil de slois Concernant les Musulmans Chyites**. 2 vols Paris, 1871.

Qushayri. **Risala**. Bulaq, A. H. 1287.

**Rein. Abesennien**. 3 vols. Berlin, 1918.

Reinaud, M. **Invasions des Sarrazins en France.** Paris, 1836.

**Revue des Etudes Islamiques**. Paris, 1927.

**Revue internationale de legislation musulmane.** Cairo, 1954.

Rodd, F. R. **People of the veil.** London, 1926.

Ross, W. D. **Aristotle.** London, 1923.

Ruxton, F. H. **Maliki Law**. London, 1916.

Sachau, E. **Muhammedanisches Recht**. Berlin, 1897.

Sadi. **Bustan**. Ed. C. H. Graf. Vienna, 1858.

Schacht, J. **Der Islam ( Religionsgeschichtliche Lesebuch ).** Tubingen, 1931.

Schacht, J. **Origins of Muhammadan Jurisprudence.** Oxford, 1950.

Seligman, C. G., and B. Z. " The Kabbubis ". **Harward African Studies**, II. Cambridge, Mass , 1918.

Shafi. **[ Kitab al-] Umm**. Bulaq, A. H. 1321.

Shahiristani. **Kitab al-Milal wal-nihal,** Ed. Cureton. London, 1846.

Shaybani. **Jami al-Saghir.** Lucknow 1893.

Shirazi. **Tanbih.** Ed. A. W. T. Juynboll. Leyden, 1879.

Skrine, C. P. **Chinese Central Asia**. London, 1926.

Skrine, F. H. and Ross, E. D. **Heart of Asia**. London, 1899,

Subki. **Jam al-Jawami fi'l-usul**. 2 vols. Bulaq, A. H. 1285.

Tabari ( Muhammad b. Jarir ). **Annales.** Arabic text, ed. M. J. de Goeje et al. 15 vols. Leyden, 1879-1901.

Tabari (Muhammad b. Jarir). **Tafsir.** 30 parts. Cairo, A. H. 1320-21.

Tabari ( Husan b. Ali ). **Kamil-i bahai.** Bombay, 1323.

**Tadhkirat al muluk**. Tr. V. Minorsky (Gibb Series, n. s. XVI ), London, 1921.

Thomas, E. **Revenue Resources of the Mughal Empire.** London, 1871.

Trimmingham, J. S. **Islam in Ethiopia**. Oxford, 1952.

Tupper, C. L. **Punjnb Customary Law**. 4 vols. Calcutta, 1881.

Turtushi ( Abu Bakr ). **Siraj al-Muluk**. Cairo, A. H. 1289.

Vambery, A. **Sketches of Central Asia**. London, 1868.

Wellhausen J. **Muhammed in Medina**. Vakidis Kitab al-Maghazi. Berlin, 1882.

Wellhausen, J. **Die Ehe bei den Araben**. Nachrichten von d. Konigl. Ges. d. Wissenschaften. Gottingen, 1893.

Wensick, A. J. **Handbook of Early Muhammadan Tradition**. Leyden, 1927.

Wensick, A. J. **The Muslim Creed.** Cambridge 1932.

Wills, C. J. **In The Land of the Lion and the Sun**. London 1893.

Wills, C. J. **Persia as It Is**. London 1886.

Winstedt, R. O. **Malaya and its History**. London, 1908.

Winstedt. **The Malays : A Cultural History**. London, 1950.

Yaqubi. **(Kitab al-) Buldan.** Ed. M. J. de Goeje. Leyden, 1883.

Yaqubi. **Historiae**. ed. M. M. Houtsma. 2 vols. Leyden, 1883.

Yaqut. **Irshad al-arib [Mujum al-udaba ]**. Ed. D. S. Margotiouth ( Gibb Series ). 7 vols., London, 1908-27.

Yaqut. **Mujam al-budlan.** Ed. F. Wuestenfeld. 6 vols., Leipzig, 1860-70.

Zayd b Ali. **Majmu al-fiqh**. Ed. E. Griffini. Milan, 1919.

Zaydan J. **Umayyads and Abbasids.** Tr. D. S. Margoliouth ( Gibb Series ), Leyden, 1907.

Zaydan, J. **Tarikh al-tamaddun al-Islami** , 5 vols. Cairo, 1902-6.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र 920/2
मंत्रालय.

## शुद्धिपत्रक

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १४ | माझना | गझनी |
| १७ | ६७८ पर्यंत | ६८७ पर्यंत |
| २३ | जक्झाईट | जक्झार्टस |
| २३ | १७१७–२० | ७१७–२० |
| २३४ | ( स्टोकताईक तत्त्वज्ञ ) | ( स्टोईक तत्त्वज्ञ ) |
| २७० | खाज-इ-आम | र वाज-इ-आम |
| ३७९ | हसन | हरून |
| ३७९ | मुक्तादिर | मुतामिद |
| ४६७ | कलमा | कलाम |
| ४७५ ( टीप क्र. ३ ) | अल् फाराबी | इब्ने सिन्ना |

१. पान २३४ वरील तिसऱ्या परिच्छेदातील पहिल्याच वाक्यामागे 'तुसी येथील नासीर अल् दिनच्या' हे शब्द जोडावे.

२. 'कुरेश' या जमातीला सर्वत्र चुकून 'कुरेशी' असे म्हटले आहे. त्याऐवजी 'कुरेश' वाचावे.

### विशेष शब्दांविषयी स्पष्टीकरण

(अ) मुहम्मदांच्या परंपरा या संदर्भात सर्वत्र आलेल्या परंपरा या शब्दाचा 'आख्यायिका' असाही अर्थ होऊ शकतो.

(आ) इजिप्शियन ख्रिश्चन, त्यांची भाषा या संदर्भात काही ठिकाणी कॉप्ट, कॉप्टिक या इंग्रजी शब्दांऐवजी मूळ 'कबती' हा शब्द वापरला आहे.

(इ) अब्बासी, उमय्या, समानी, अघलवी इत्यादी मुस्लिम राजवंशांच्या नावांचे उच्चार इंग्रजीत अब्बासीद, उमय्याद, समानिद, अघलविद असे केले जातात. या नावांचा उल्लेख करताना पुस्तकात पुष्कळदा दोन्ही प्रकारच्या उच्चारांचा वापर करण्यात आला आहे.